॥ श्री गणेशाय नमः ॥

Astro • Puja • Vastu

# हरी ॐ धार्मिक पूजा विधी केंद्र

## ज्योतिष आणि वास्तु सल्लागार

योगेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 95944 28749

निलेशशास्त्री ढवळे (गुरुजी)
Mob. 86524 02078

श्री ध र क वि वि र चि त

# श्रीरामविजय

संपादक :
नारायण
रामचंद्र
रानडे

केशव भिकाजी ढवळे
श्रीसमर्थ - सदन
गिरगाव, मुंबई.

॥ श्रीरामविजय प्रारंभ ॥



॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसरस्वत्यै नमः ॥ श्रीगुरुभ्यो नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ ॥ ॐ नमो जी पुराणपुरुषा ॥ श्रीमद्भीमातटविलासा ॥ दिगंबरा अविनाशा ॥ ब्रह्मानंदा जगद्गुरो ॥ १ ॥ जय जय जगदंद्या पूर्णब्रह्मा ॥ अजे अजित आत्मयारामा ॥ नीलग्रीवहृदयविश्रामा ॥ पूर्णानंदा परात्परा ॥ २ ॥ जय जय मायाचक्रचालका ॥ मायातीता विरिंचिजनका ॥ सकळचित्तपरीक्षका ॥ निजजनरक्षका करुणाब्धे ॥ ३ ॥ कमलोद्भव वैकुंठ कर्पूरगौर ॥ अंबिका गजवदन दिनकर ॥ हीं स्वरूपें तुझीं साचार ॥ तूं निर्विकार सर्वदा ॥ ४ ॥ मंगळकारक तूं गजवदन ॥ मंगळारंभीं तुझेंचि नमन ॥ मंगळजननीवरी करितां लेखन ॥ तुझे गुण न सरती ॥ ५ ॥ रातोत्पलें सुकुमार बहुत ॥ तैसे चरणतळवे आरक्त ॥ प्रपदं गौर नूपुरांसहित ॥ ध्याती भक्त हृदयांतरीं ॥ ६ ॥ क्षीरार्णवश्वेतांबर ॥ कीं कांसेसी लागला क्षीरसागर ॥ कीं निर्दोष यश पवित्र ॥ वसनरूपें आकारलें ॥ ७ ॥ अरुणसंध्यारागमिश्रित ॥ तैसी उटी दिसे आरक्त ॥ कीं मंदराचळ सिंदूरचर्चित ॥ चारही हस्त विराजती ॥ ८ ॥ भक्तांचा मनोवारण अनिवार ॥ नावरेचि कदा साचार ॥ तो आकर्षावया निर्धार ॥ विवेकांकुश धरियेला ॥ ९ ॥ भावें जे शरण येती अज्ञानी जन ॥ त्यांचें छेदावया अविद्याविपिन ॥ यालागीं ऊर्ध्व फरश धरून ॥ सिद्ध गजानन सर्वदा ॥ १० ॥ हातीं झळके लीलाकमळ ॥ जें अम्लान न विटे सर्वकाळ ॥ तेणें पूजूं इच्छी भक्त प्रेमळ ॥ जें कां निर्मळ अंतर्बाह्य ॥ ११ ॥ जैसे कल्पांतविजूचे उमाळे ॥ तैसे अळंकार अंगीं मिरवले ॥ नक्षत्रपुंज गुणीं ओविले ॥ तेवीं मुक्ताहार डोलती ॥ १२ ॥ हृदयाकाशीं सुरेख ॥ पदक झाला तो मृगांक ॥ क्षयरहित निष्कलंक ॥ निजसुखें सुरवाडला ॥ १३ ॥ भक्तांसी विघ्नें येती प्रचंडें ॥ तीं जो आकळी शुंडादंडें ॥ कल्पांतविजूचेनि पाडें ॥ एकदंत झळकतसे ॥ १४ ॥ दिगंतचक्रीं तेज न समाय ॥ तैसीं कुंडलें झळकती मणिमय ॥ किंवा चंद्र आणि सूर्य ॥ कुंडलरूपें तळपती ॥ १५ ॥ मुगुटीं झळकती रत्नकळा ॥ तेणें नभमंडप उजळला ॥ आदिपुरुष हा साकारला ॥ वरदान द्यावया कवीतें ॥ १६ ॥ ऐसा महाराज गजवदन ॥ वरदहस्तें दावी चिन्ह ॥ करीं रामकथाबीजारोपण ॥ त्यासी जीवेंन घालीन मी ॥ १७ ॥ ऐसा उगवतां वरदचंद्र ॥ तेणें उल्हासे कविहृदयसमुद्र ॥ साहित्यभरतें अपार ॥ असंभाव्य दाटलें ॥ १८ ॥ जय जय गजवदना निरुपमा ॥ अगाध न वर्णवे तव महिमा ॥ तुझिया गुणांची पावावया सीमा ॥ कैसा सरतो होईन मी ॥ १९ ॥ कायेसी मेरू घेऊनि देखा ॥ कैसी नृत्य करील पिपीलिका ॥ कैसें ब्रह्मांड उचलेल मशकीं ॥ भूगोळ मक्षिका केवीं हालवी ॥ २० ॥ चंद्रासी कर्पूराचें उटणें ॥ वासरमणीस दर्पण दावणें ॥ हिमनगासी वारा घालणें ॥ मेघासी अर्पणें उदकांजुळी ॥ २१ ॥ सुरतरुपुढें ठेविजे बदरीफळ ॥ मलयाचळासी धूपपरिमळ ॥ कामधेनूसी शुष्कतृणकवळ ॥ आणोनियां समर्पिले ॥ २२ ॥ क्षीरसिंधूसी समर्पिजे अजाक्षीर ॥ कनकाद्रीपुढें ठेविजे गार ॥ तैसें प्राकृतबोलें अपार ॥ तुझें महत्त्व केवीं वर्णूं ॥ २३ ॥

---

१ जन्मरहित. २ शंकराच्या हृदयाचें विश्रांतिस्थान असणाऱ्या. ३ ब्रह्मदेवाच्या पितृस्थानीं असणाऱ्या. ४ दयेच्या सागरा. ५ कल्याणदात्री अशा पृथ्वीवर. ६ लाल कमळें. ७ पायांचीं टोकें. ८ मंदारपर्वत. ९ डवडवीत. १० चंद्र. ११ शोभला. १२ प्राणी. १३ योग्य. १४ मुंगी. १५ चिलटाला. १६ सूर्याला. १७ कल्पवृक्षापुढें. १८ चंदनाचें आगर अशा मलयपर्वताला. १९ वाळलेल्या गवताचा घांस. २० सोन्याचा पर्वत.

परी जो जो छंद घेत बाळक ॥ तो स्नेहेंकरोनि पुरवी जनक ॥ तरी हा रामविजय सुरेख ॥ सिद्धी पावो तव कृपें ॥ २४ ॥ आतां नमूं सरसिजोद्भवकुमारी ॥ जे विलसे सदा कविजिव्हाग्रीं ॥ जिच्या वरप्रसादें मुकाही करी ॥ वाचस्पतीशीं संवाद ॥ २५ ॥ जे आनंदसरोवर-मराळिका ॥ जे चातुर्यचंपककळिका ॥ जे निजकृपेची करूनि नौका ॥ कविबाळका परतीरा नेत ॥ २६ ॥ कृपें तुझ्या विरिंचिकुमारी ॥ जन्मांध होती महाजोहरी ॥ अतिमूढ तो वेदार्थ करी ॥ शाकपर्दी निर्धारीं रंक बैसे ॥ २७ ॥ अंबे तूं कविहृदयाब्जभ्रमरी ॥ कीं निजानंदसागरींची लहरी ॥ वाग्वल्ली तूं बैसोनि जिव्हाग्रीं ॥ विरूढें सफळ सर्वदा ॥ २८ ॥ विवेकहंस शुद्ध धवळ ॥ त्यावरी तुझें आसन अचळ ॥ तप्त कांचन जैसें सुढाळ ॥ तैसें निर्मळ निजांग तुझें ॥ २९ ॥ शुभ्र कंचुकी शुभ्र अंबरें ॥ दिव्य मुक्तनग अळंकार ॥ निजबोधवीणा घेऊन सुस्वर ॥ गायन करिसी स्वानंदें ॥ ३० ॥ ऐकतां शारदेचें गायन ॥ तन्मय विधि विष्णु ईशानें ॥ अंबे तुझें सौंदर्य पाहोन ॥ मीनकेतन तटस्थ ॥ ३१ ॥ रंभा उर्वशी तिलोत्तमा ॥ सावित्री अंपर्णा मुख्य रमा ॥ तुझ्या चातुर्यसमुद्राची सीमा ॥ त्याही कदा न पावती ॥ ३२ ॥ अंबे तुझे गुण केवीं वर्णावे ॥ केवीं अर्कास अर्कीसुमनें पूजावें ॥ अंबरें मुष्टींत केवीं सांठवे ॥ पल्लवीं बांधवे वायु कैसा ॥ ३३ ॥ न करवे उर्वीचें वजन ॥ न गणवे सिंधूचें जीवन ॥ सप्तावरणें भेदोन ॥ मशक केवीं जाऊं शके ॥ ३४ ॥ ऐकोनि बाळकाचीं वचनें ॥ जननी हृदयीं धरी प्रीतीनें ॥ तैसें सरस्वतीनें निजकृपेनें ॥ घातलें ठाणें जिव्हाग्रीं ॥ ३५ ॥ माझें मन मूढ चकोर ॥ कुहूमाजी इच्छी रोहिणीवर ॥ तरी सरस्वती कृपाळु थोर ॥ शुद्ध बीजें प्रकटली ॥ ३६ ॥ बीजेपासून चढत्या कळा ॥ तों तों चकोरांसी अधिक सोहळा ॥ तैसी येथें रघुनाथलीळा ॥ चढेल आगळा रस पुढें ॥ ३७ ॥ ज्ञानाचे अनंत डोळे ॥ उघडिले एकेचि वेळे ॥ आतां वंदूं श्रीगुरूचीं पाउलें ॥ जयाचेनि प्रगटलें दिव्य ज्ञान ॥ ३८ ॥ जो अज्ञानतिमिर-च्छेदक ॥ जो प्रकट वेदांतज्ञानार्क ॥ तो ब्रह्मानंदमहाराज देख ॥ परमाद्भुत महिमा जयाचा ॥ ३९ ॥ जो कां पांडुरंगभक्त नर विख्यात ॥ जो भक्त भीमातीरीं समाधिस्थ ॥ तो यतिराजमहिमा अद्भुत ॥ कवण वर्णूं शके पैं ॥ ४० ॥ जागृती स्वप्न सुषुप्ति तुर्या पूर्ण ॥ या चार अवस्थांवरी ज्याचें आसन ॥ उन्मनीही निरसोन ॥ स्वसुखें पूर्ण समाधिस्थ ॥ ४१ ॥ चांदिणें कैंचें नसतां मृगांक ॥ किरणें कैंचीं नुगवतां अर्क ॥ जीवना-वांचोनि बीजीं देख ॥ अंकुर सहसा फुटेना ॥ ४२ ॥ जरी नेत्रेंवीण दिसे पदार्थ ॥ मंथनेंवीण जरी निवडे नवनीत ॥ तरी सद्गुरूवांचोनि परमार्थ ॥ ठायीं न पडे जीवासी ॥ ४३ ॥ वर नसतां व्यर्थ वऱ्हाड ॥ शिर नसतां कायसें धड ॥ तैसे गुरुकृपेवीण काबाडें ॥ तपें व्रतें साधनें ॥ ४४ ॥ अंजनेंवीण न सांपडे निधान ॥ गायत्रीवीण ब्राह्मणपण ॥ सीमा कैंची ग्रामावीण ॥ तैसें गुरूवीण ज्ञान नोहे ॥ ४५ ॥ म्हणोनि तनुमनधनेंसीं अनन्य ॥ ब्रह्मानंदस्वामीस शरण ॥ आरंभिली श्रीरामकथा गहन ॥ ग्रंथ संपूर्ण सिद्धी पावो ॥ ४६ ॥ ऐसे ऐकतां सप्रेम बोल ॥

२१ कमलपुष्पांतून निघालेली सरस्वती. २२ बृहस्पतीबरोबर. २३ हंसी. २४ ब्रह्मदेवाची मुलगी,सरस्वती. २५ सांनें. २६ चाळी. २७ घरा. २८ शंकर. २९ मदन. ३० पार्वती. ३१ सूर्याला. ३२ शरीच्या फुलांनीं. ३३ आकाश. ३४ पृथ्वीचें. ३५ अमावास्येला. ३६ चंद्राला. ३७ द्वितीया. ३८ गाढ झोंप. ३९ मनाचा चौथी अवस्था. ४० पांचवी अवस्था. ४१ लोणी. ४२ कष्ट. ४३ विशिष्ट प्रकारच्या काजळाशिवाय. ४४ ठेव, भूमिगत धन.

बोलिला श्रीगुरु दयाळ ॥ चैंकोराकारणें उतावेळ ॥ मृगांकें जैसा उगवे पैं ॥ ४७ ॥ कीं चौंतकांलागीं धांवे जलधर ॥ कीं क्षुधितापुढें क्षीर-सागर ॥ कीं कल्पतरू शोधीत आला घर ॥ दरिद्रियाचें सौक्षेपें ॥ ४८ ॥ तैसा श्रीगुरू दयासागर ॥ तेणें दिघला अभय वर ॥ म्हणे सिद्धी पावेल साचोंर ॥ रामविजय ग्रंथ हा ॥ ४९ ॥ आतां वंदूं संतसज्जन ॥ जे वैराग्यवनींचे पंचौंनन ॥ कीं ज्ञानांबरींचे चंडकिरणें ॥ उदय अस्त नसे जयां ॥ ५० ॥ जे भक्तसरोवरींचे राजहंस ॥ जे कां अविद्यारण्यहुताश ॥ कीं ते पद्महस्ती विशेष ॥ भवरोगा वैद्य होती ॥ ५१ ॥ कीं जीव पावे आपले पदासी ॥ ऐसा मुहूर्त देणार ते ज्योतिषी ॥ कीं ते पंचाक्षरी स्वप्रतापेंसीं ॥ पंचभूतांसी पळविती ॥ ५२ ॥ कीं ते दैवी संपत्तीनें भाग्यवंत ॥ मुमुक्षूंसी करिती दरिद्ररहित ॥ कीं ते दयेचीं अद्भुत ॥ गोपुरें काय उंचावलीं ॥ ५३ ॥ संत श्रोते चतुर पंडित ॥ माझें बोलणें औरुष अत्यंत ॥ जैसा सरस्वतीपुढें मूढ बहुत ॥ वाग्विलासें दावीतसे ॥ ५४ ॥ सूर्यापुढें जैसा दीप देख ॥ कीं जान्हवीस न्हाणावया थिल्लरोदक ॥ कीं कनकाद्री जो अति सुरेख ॥ त्यासी अलंकार पितळेचे ॥ ५५ ॥ कामधेनूस अर्पिलें अजाक्षीर ॥ चंद्रासी शीतळ करी रंभापुत्रें ॥ कल्पतरु कल्पिलें देणार ॥ त्यासी निंबोळ्या समर्पिल्या ॥ ५६ ॥ रत्नाकरापुढें काच समर्पिली ॥ तैसी माझी हे आरुष बोली ॥ परी तुह्मीं प्रीति बहु ठेविली ॥ प्राकृत शब्दीं नवल हें ॥ ५७ ॥ विष्णूसी भूषणें अपार ॥ परी तुलसीवरी आवडी थोर ॥ कीं पार्वतीपतीस बिल्वपत्र ॥ भक्तीं वाहतां आवडे ॥ ५८ ॥ रायें दासीस पाठीं घालितां ॥ तिची सर्वांवरी चाले सत्ता ॥ थोड्या मोलाचे अळंकार लेतां ॥ जनां समस्तां थोर दिसे ॥ ५९ ॥ म्हणोनि तुम्ही संत प्रभु थोर ॥ तुमचा महिमा न वर्णवे अपार ॥ मोटेंत बांधवेल सैंमीर ॥ चरणीं अंबर क्रमवेल पैं ॥ ६० ॥ गणवतील पृथ्वीचे रजःकण ॥ मोजवेल सिंधूचें जीवन ॥ कनकाद्रीचा चेंडू करून ॥ उडविजेल सर्वथा ॥ ६१ ॥ भोगींद्रमस्तकींचा मणी ॥ आणवेल एकादे क्षणीं ॥ सूर्य जातां घरवेल गगनीं ॥ नक्षत्रें गुंणीं ओंविजेतील ॥ ६२ ॥ काढवेल शशिमंडळींचें अमृत ॥ मोडवतील ऐरावतीचे दांत ॥ कीं दिग्गज आणोन समस्त ॥ एके ठायीं बांधिजेतील ॥ ६३ ॥ तुरंग करूनि प्रभंजनें ॥ करवेल सर्वत्र गमन ॥ परी न कळे संतांचें महिमान ॥ जे ब्रह्मानंदें पूर्ण सदा ॥ ६४ ॥ तों संत बोलती आनंदघन ॥ मन निवालें तव बोल ऐकून ॥ आम्हीं करूं इच्छितों रामकथाश्रवण ॥ वरी दृष्टांत गोड तुझे ॥ ६५ ॥ मेरू सुंदर रत्नेंकरून ॥ कीं नक्षत्रें मंडित गगनें ॥ कीं वृक्ष फळीं परिपूर्ण ॥ तैसा दृष्टांतें ग्रंथ शोभे ॥ ६६ ॥ कीं शांति क्षमा दया विशेष ॥ तेणें मंडित सत्पुरुष ॥ कीं परिवारासहित नरेशें ॥ दृष्टांत सुरस ग्रंथीं तैसे ॥ ६७ ॥ आधींच भूक लागली बहुत ॥ त्याहीवरी वाढिलें पंचामृत ॥ कीं दुर्बळासी अकस्मात ॥ कल्पतरू भेटला ॥ ६८ ॥ कन्यार्थी हिंडतां भूमंडळ ॥ त्यासी राजकन्या घाली माळ ॥ कीं रोगियासी रसायन निर्मळ ॥ अकस्मात जोडलें ॥ ६९ ॥ आतां बहु टाकोनि शब्दजाळ ॥ बोलें रामकथा रसाळ ॥

४५ पक्षिविशेष. ४६ चंद्र. ४७ पक्षिविशेष. ४८ मेघ. ४९ अगत्यपूर्वक, आग्रहानें. ५० खरोखर, सार्थपणें. ५१ सिद्ध. ५२ आत्मज्ञानरूपी आकाशांतील. ५३ सूर्य. ५४ अज्ञानरूपी अरण्यास (जाळणारे) अग्नि. ५५ पद्मचिन्हांकित हस्त असलेले. ५६ आर्ष, प्राकृत. ५७ शब्दपांडित्य. ५८ डबक्यांतलें पाणी. ५९ कर्पूर, कापूर. ६० रत्नखाण. ६१ वायु, वारा. ६२ नागलोक (शेष) त्याच्या मस्तकावरील. ६३ दोरीमध्यें. ६४ तृप्त झालें. ६५ आकाश. ६६ राजा.

जैसी सिकता[६६] सांडोनि मराळें[६७] ॥ मुक्ताफळेंचि[६८] सेविती ॥ ७० ॥ कीं कोशगृहीं[६९] प्रवेशोनी ॥ भांडारी रत्नें काढी निवडोनी ॥ कीं दोष टाकून सज्जनीं ॥ उत्तम गुण स्वीकारिजे ॥ ७१ ॥ ऐसे संतांचे बोल परिकरें[७०] ॥ ऐकोनि ब्रह्मानंदें श्रीधर ॥ साष्टांग घालोनि नमस्कार ॥ म्हणे सादर परिसिजे ॥ ७२ ॥ असंभाव्य श्रीरामचरित्र ॥ शतकोटि ग्रंथ सविस्तर ॥ वाल्मीक बोलिला अपार ॥ कथासमुद्र अगम्य ॥ ७३ ॥ जो सत्यवतीहृदयरत्न[७१] ॥ कथी जगद्गुरू पराशरनंदन ॥ तें व्यासोक्त रामायण ॥ कोणा संपूर्ण न वर्णवे ॥ ७४ ॥ वसिष्ठें कथिलें निश्चितीं ॥ तें वासिष्ठरामायण म्हणती ॥ शुकें कथिलें नाना रीतीं ॥ शुकरामायण बोलती तया ॥ ७५ ॥ जो अंजनीहृदयारविंदभ्रमर[७२] ॥ तेणें पाहोन श्रीरामचरित्र ॥ कथिलें नाटकरामायण साचार ॥ अपार चरित्र निजमुखें ॥ ७६ ॥ जो परमविश्वासें श्रीरामासी शरण ॥ शत्रुकारिजनकबंधू[७३] बिभीषण ॥ तेणें रामचरित्र कथिलें पूर्ण ॥ बिभीषणरामायण म्हणती तया ॥ ७७ ॥ कमलोद्भव विष्णुसुत ॥ तेणें नारदासी कथिलें हें चरित्र ॥ तें ब्रह्मरामायण अद्भुत ॥ उमेसी सांगत शिव रामायण ॥ ७८ ॥ जो कलशोद्भव[७४] महामुनी ॥ जेणें जलधि[७५] आटिला आचमनेंकरूनी ॥ तेणें रामकथा ठेविली विस्तारोनी ॥ अगस्तिरामायण म्हणती तया ॥ ७९ ॥ भोगींद्र[७६] कथी सर्पाप्रती ॥ तें शेषरामायण बोलिजे पंडितीं ॥ अध्यात्मरामायण समस्तीं ॥ ऋषींनीं निवडून काढिलें ॥ ८० ॥ एक शेषरामायण सत्य ॥ आगमरामायण एक बोलत ॥ कूर्मरामायण यथार्थ ॥ कूर्मपुराणीं बोलिलें ॥ ८१ ॥ स्कंदरामायण अपार ॥ एक पौलस्तिरामायण परिकर ॥ कालिकाखंडीं सविस्तर ॥ रामकथा कथियेली ॥ ८२ ॥ रविअरुणसंवाद ॥ तें अरुणरामायण प्रसिद्ध ॥ पद्मपुराणीं अगाध ॥ पद्मरामायण कथियेलें ॥ ८३ ॥ भरतरामायण चांगलें ॥ एक धर्मरामायण बोलिलें ॥ आश्चर्यरामायण कथिलें ॥ बकदाल्भ्यऋषीप्रती ॥ ८४ ॥ मुळापासून इतुक्या कथा ॥ कैशा वर्णवतील तत्त्वतां ॥ त्यांमाजी वाल्मीकनाटकाधारें कथा ॥ रामविजयालागीं कथूं ॥ ८५ ॥ समस्त कवींस नमस्कार ॥ जो जगद्गुरू आचार्य[७७] श्रीशंकर ॥ जेणें मतें उच्छेदोन समग्र ॥ शुद्ध मार्ग वाढविला ॥ ८६ ॥ पूर्वी एक सत्यवतीकुमर[७८] ॥ तैसाचि कलियुगीं श्रीशंकर ॥ जो ज्ञानाचा सागर ॥ जगदुद्धार केला जेणें ॥ ८७ ॥ सकळ मतें उच्छेदून ॥ सन्मार्ग वाढविला पूर्ण ॥ सकळ मतवादी जंबूक[७९] जाण ॥ शंकरसिंह गर्जतसे ॥ ८८ ॥ सकळ मतवादी दरिद्री ॥ शंकर श्रीमंत पृथ्वीवरी ॥ संन्यासदीक्षा निर्धारीं ॥ स्थापिली जेणें विधियुक्त ॥ ८९ ॥ अवघे मतवादी रजनीचर[८०] ॥ शंकर त्यांवरी रघुवीर ॥ कीं कौरव वधावया यादवेंद्र ॥ अति उदित साक्षेपें ॥ ९० ॥ तैसा श्रीशंकराचार्य सकळ ॥ कुमतें[८१] छेदी तात्काळ ॥ त्या आचार्याचें पदकमळ ॥ श्रीधरभ्रमरें वंदिलें ॥ ९१ ॥ जो श्रीधराचार्य[८२] टीकाकार ॥ त्यासी नमस्कारी श्रीधर ॥ मधुसूदनादिक कवींद्र ॥ ग्रंथ अपार जयांचे ॥ ९२ ॥ जो शृंगारवनींचा विहंगम[८३] जाण ॥ जो जयदेव[८४] पद्मावतीरमण ॥ त्याची काव्यकला पाहून ॥ पंडितजन तटस्थ ॥ ९३ ॥ जो वेदांतक्षीरार्णवींचा मीन[८५] ॥ जेणें विवेकसिंधु रचिला

६७ बालू. ६८ राजहंस. ६९ मोतीं. ७० जामदारखान्यांत. ७१ प्रकार. ७२ सत्यवतीपुत्र. ७३ अंजनीमातेच्या हृदयकमळांतील भ्रमर. ७४ इंद्रजिताचा पिता रावण, त्याचा बंधु. ७५ कुंभापासून जन्मलेला अगस्ति. ७६ समुद्र. ७७ नागराज, शेष. ७८ आद्य श्रीमच्छंकराचार्य. ७९ नास्तिक मतें ( बौद्ध, जैनादि). ८० पाखंड-नास्तिक-मतवादी. ८१ कोल्हे. ८२ राक्षस, निशाचर. ८३ पाखंडी मतें. ८४ भागवतटीकाकार. ८५ भगवद्गीतेवर टीका लिहिणारे. ८६ पक्षी. ८७ गीतगोविंदकर्ता. ८८ वेदान्तरूपी समुद्रांतील. ८९ मासा.

पूर्ण ॥ तो मुकुंदराज गुणनिधान ॥ तयाचे चरण वंदिले ॥ ९४ ॥ तारावया जन समग्र ॥ पुनः अवतरला रमावर ॥ गीतार्थ केला साचार ॥ तो ज्ञानेश्वर जगद्गुरू ॥ ९५ ॥ जो भानुदासकुलभूषण ॥ प्रतिष्ठानवासी परिपूर्ण ॥ त्या एकनाथें ग्रंथ संपूर्ण ॥ बहुसाल कथियेले ॥ ९६ ॥ जे चातुर्यराजधानीचे कळस ॥ मुक्तेश्वर मुद्गलदास ॥ ज्यांचे ग्रंथ पाहतां सुरस ॥ ब्रह्मानंद उचंबळे ॥ ९७ ॥ जैसा चंडांशु सतेज व्योमीं ॥ तैसाचि केवळ वामनस्वामी ॥ ज्याची श्लोकरचना या भूमी- ॥ मंडळावरी अपूर्व ॥ ९८ ॥ कृष्णदास जयराम ॥ जो शांतिदयेचें निजधाम ॥ ज्याचे ग्रंथ ज्ञानभरित परम ॥ जो निःसीम ब्रह्मचारी ॥ ९९ ॥ श्रीरामउपासक निर्मळ ॥ जो भजनसरोवरींचा मरोळ ॥ तो रामदास महाराज केवळ ॥ भक्ति प्रबळ लावी जनां ॥ १०० ॥ ब्रह्मानंदस्वामीचा बंधु सत्य ॥ नाम तयाचें श्रीरंगनाथ ॥ ज्याची कविता ऐकतां समस्त ॥ अपार जन उद्धरले ॥ १ ॥ आतां असोत समस्त कविवर ॥ अवघे ब्रह्मानंदरूप साचार ॥ त्यांसी अनन्य शरण श्रीधर ॥ द्यावा वर ग्रंथासी ॥ २ ॥ रविकुळीं अवतरोनि श्रीरघुवीर ॥ कैसें केलें लीलाचरित्र ॥ धन्य त्या वाल्मीकाचें वक्त्रें ॥ कथा अपार बोलिला ॥ ३ ॥ हें वर्णितां श्रीरामचरित्र ॥ तरला वाल्मीक साचार ॥ पापें आचरला अपार ॥ ऐका सादर गोष्टी ते ॥ ४ ॥ वाल्मीक पूर्वी द्विजसुतें ॥ त्यजोनि आचार यज्ञोपवीत ॥ किरात-संगें वाटें पाडितें ॥ अति उन्मत्त विषयांध ॥ ५ ॥ महा दुर्धर काननें ॥ देखतां भयभीत होय मन ॥ पर्वतदरीमाजी स्थळ करून ॥ सहपरिवारें वसे तेथें ॥ ६ ॥ भोंवतें द्वादश गांवेंपर्यंत ॥ पाळती राखोनि वाट पाडित ॥ केल्या ब्रह्महत्या असंख्यात ॥ नाहीं गणित इतर जीवां ॥ ७ ॥ मत्स्य धरावयालागीं बक ॥ बैसे होऊनियां सात्विक ॥ कीं मूषकालागीं बिडालेंक ॥ बैसे टपत जयापरी ॥ ८ ॥ कीं अंगमंकोचें पारधी ॥ जपोनि तत्काळ मृग साधी ॥ तैसा वाल्हा जीव वधी ॥ पापनिधि निर्दय ॥ ९ ॥ अपार जीव मारिले ॥ पापाचे पर्वत सांचले ॥ जैसे अंत्यज-गृहाभोंवते पडिले ॥ ढीग बहुत अस्थींचे ॥ ११० ॥ ऐसें करितां पापाचरण ॥ तयासी आलें वृद्धपण ॥ पुत्र झाले अति तरुण ॥ तरी आंगवेंण न सोडी ॥ ११ ॥ शस्त्र हातीं घेऊनि वाल्हा ॥ मार्ग रक्षीत जों बैसला ॥ तों अकस्मात नारद प्रगटला ॥ पूर्वपुण्येंकरूनियां ॥ १२ ॥ चंद्रा वेष्टित नक्षत्रें जैसीं ॥ भोंवतीं ऋषींची मांदी तैसी ॥ तों पाळती सांगती वाल्हियासी ॥ जाती तापसी बहुसाल ॥ १३ ॥ वाटेसी धांवोन आडवा आला ॥ शस्त्र उभारोनि ते वेळां ॥ दटावोनि ऋषींचा मेळा ॥ उभा केला क्षणभरी ॥ १४ ॥ कीं स्वर्गपंथें जातां नेटें ॥ जैसी यमपुरी लागे वाटे ॥ कीं तपें आचरतां उद्वेटें ॥ कामक्रोध अडविती ॥ १५ ॥ असो वाल्हा म्हणे तयांसी ॥ मात्रा आणा रे मजपासीं ॥ नाहीं तरी मुकाल प्राणांसी ॥ माझिया हस्तें या काळीं ॥ १६ ॥ मग पुढें होऊन ब्रह्मनंदनें ॥ म्हणे ऐक एक आमुचें वचन ॥ तुज आलें वृद्धपण ॥ पापें अपार घडलीं कीं ॥ १७ ॥ द्रव्य जोडिलें त्वां अपार ॥ झाले दुष्कृताचे संभारें ॥ तुझे पापासी वांटेकर ॥ कोण आहेत हें विचारीं ॥ १८ ॥ तुझें आलें जवळी मरण ॥ यम जेव्हां गांजील दारुण ॥ तेव्हां तुजला सोडवील कोण ॥ पाहें विचारून अंतरीं ॥ १९ ॥ दारा पुत्र धन यौवनें ॥

९० हंस. ९१ मुख. ९२ ब्राह्मणपुत्र. ९३ वाटमारेपणा करी. ९४ अरण्य. ९५ मांजर. ९६ वाल्मीकीचें पूर्वीचें नांव. ९७ (वाटमारेपणाची) संवय, खोड. ९८. मेळावा, समुदाय. ९९ घोर, खडतर. १०० द्रव्य, पैसाअडका. १ ब्रह्मदेवाचा मानसपुत्र नारद. २ पापाचे. ३ सांठे. ४ स्त्री. ५ तारुण्य.

बंधु सेवक आप्त स्वजन ॥ शस्त्रें अस्त्रें चतुरंग सैन्य ॥ न ये कामा ते वेळे ॥ १२० ॥ जीं जीं प्राणी कर्में करिती ॥ तितुकीं देव सर्व विलोकिती ॥ सकळ तत्त्वें व्यापून वर्तती ॥ मग साक्ष देती पैरत्रीं ते ॥ २१ ॥ यमपुरीस चित्रगुप्त ॥ पत्रें काढूनि वाचित ॥ मग त्यासारिखा दंड करीत ॥ कोण तेथें सोडवील ॥ २२ ॥ जो पुण्यपंथें न चाले नर ॥ निंदी तीर्थयात्रा समग्र ॥ त्यास ताम्रभूमी तप्त अपार ॥ तीवरी चालविती हळुहळू ॥ २३ ॥ जे परोपकार न करिती ॥ त्यांसी असिपत्रावरी हिंडविती ॥ इकडून तिकडे शस्त्रें टोंचिती ॥ कोण सोडवील ते स्थानीं ॥ २४ ॥ तप्त लोहाचा स्तंभ दारुण ॥ त्यासी भेटविती नेऊन ॥ देवद्विजां जो न करी नमन ॥ त्यासी जाण हीच गती ॥ २५ ॥ जो संतांसी देखों न शके अपवित्र ॥ त्याचे रागें गीधें फोडिती नेत्र ॥ जो कीर्तन स्मरण न करी अणुमात्र ॥ जिव्हा तोडिती सांडसें ॥ २६ ॥ गुरु देव ब्राह्मण सांडूनी ॥ जो षड्रस सेवी पापखाणी ॥ महानरकींचें दुर्गंधपाणी ॥ तयाचे वदनीं ओतिती ॥ २७ ॥ जो तीर्थस्नान निंदी खळ ॥ त्यासी तप्त कढयीमाजी जें तैल ॥ त्यांत तळिती तत्काळ ॥ कोण सोडवील तेथें पैं ॥ २८ ॥ जे साधुसंतांसी पीडिती ॥ त्यांचे अंगाचीं सालें काढिती ॥ जे गुरु द्विजें तीर्थें अव्हेरिती ॥ त्यांचे तोंडीं घालिती नरकमूत्र ॥ २९ ॥ धर्मवाट रोधोनि हरिती जे धन ॥ त्यांसी कुंभीपाकीं घालून ॥ खालीं चेतविती कृशान ॥ माजी आक्रंदोनी चडफडती ॥ १३० ॥ लोहदंड करूनि तप्त ॥ कानीं खोंविती यमदूत ॥ जो नायके हरिकथामृत ॥ गति निश्चित त्यास ही ॥ ३१ ॥ ऐसें बोलतां नारदऋषी ॥ अनुतापें जाहला त्याचे मानसीं ॥ वेगें आला निजसदनासी ॥ स्त्रीसुतादिकांसी पुसत ॥ ३२ ॥ पापें घडलीं मजलागीं ॥ कोणी होतां काय विभागी ॥ तंव तीं म्हणती आमुचे अंगीं ॥ न लागती पापें सर्वथा हीं ॥ ३३ ॥ आम्ही भाग्याचे वांटेकरी यथार्थ ॥ पापें तुझीं तूं भोगीं समस्त ॥ वाल्हा झाला सद्गदित ॥ म्हणे कैसें आतां करावें ॥ ३४ ॥ हा नरदेह उत्तम पूर्ण ॥ केवळ भगवत्प्राप्तीचें कारण ॥ म्यां आत्महित न करून ॥ बुडालों कीं अंधतमीं ॥ ३५ ॥ पुण्यक्षेत्र सरसाविलें ॥ तेथें कनकबीजें पेरिलें ॥ कनकाचें ताट घडिलें ॥ त्यांत वाढिलें तृणबीज ॥ ३६ ॥ सुधारसकुंभ दैवें जोडला ॥ तो नेऊन उकिरडां ओतिला ॥ चिंतामणी फोडून घातला ॥ पायरीस अभाग्यें ॥ ३७ ॥ सुरभी शोधीत आली घर ॥ तिसी मारूनि काष्ठप्रहार ॥ अभाग्यें घातली बाहेर ॥ तोच प्रकार मज जाहला ॥ ३८ ॥ बळें कल्पवृक्ष तोडून ॥ वाढविलें कंटकवन ॥ राजहंस दवडून ॥ दिवाभीत पाळिलें ॥ ३९ ॥ रंभा तोडूनि महामूर्खें ॥ अर्की वाढविल्या सकौतुकें ॥ ओसंडोनि सतेज मुक्तें ॥ सिकताहरळ भरियेली ॥ १४० ॥ असो ऐसा अनुतापें वाल्हा ॥ नारदापासीं परतोन आला ॥ सद्गद कंठ अश्रु डोळां ॥ साष्टांग घातला नमस्कार ॥ ४१ ॥ तनुमनधनेंसीं अनन्य ॥ स्वामी तुज मी आलों शरण ॥ तूं कृपेची नौका करून ॥ तारीं मज अघसागरीं ॥ ४२ ॥ महाराज तूं धन्वंतरी ॥ माझा भवरोग दूर करीं ॥ जळतों या वणव्याभीतरी ॥ मेघ झडकरी वर्षें तूं ॥ ४३ ॥

---

६ हत्ती, घोडे, रथ व पायदळ ह्या चार अंगांनीं युक्त असें सैन्य. ७ परलोकीं. ८ तांब्याच्या पत्र्यानें मढविलेल्या भूमीवर. ९ तलवारीवरून. १० गृध्र, गिधाडें. ११ ब्राह्मण. १२ नरकविशेष. १३ अग्नि. १४ पश्चात्ताप. १५ दाट काळोखांत. १६ घोळण्याचें पीं. १७ खोल्याचें. १८ नवलाचें पीं. १९ अमृतकुंभ. २० कामधेनु. २१ घुबड. २२ केळी. २३ दर्भ. २४ वाळू व खडे. २५ पापसमुद्रांत.

पडलों मायेचे मेळीं ॥ पंचभूतें मज झोंबलीं ॥ वासनाविवशी[२५] गळां पडली ॥ कदाकाळीं सोडीना ॥ ४४ ॥ अहंदेहबुद्धि[२७] डांकीण ॥ ममता सटवी दारुण ॥ लोभ झोटिंग एक क्षण ॥ मज उमज घेऊं नेदी ॥ ४५ ॥ क्रोध महिषासुर दारुण ॥ कामवेताळें झडपिलें पूर्ण ॥ तृष्णा मायराणी अनुदिन ॥ सर्वदाही न सोडी ॥ ४६ ॥ जाहलों मी अत्यंत क्षीण ॥ पंचाक्षरी तूं ब्रह्मनंदन ॥ सकळ भूतें टाकीं झाडून ॥ म्हणोनि चरण धरियेले ॥ ४७ ॥ अष्टभावें[२६] जाहला सद्गदित ॥ मग मनीं विचारी ब्रह्मसुत ॥ रोग पाहूनि वैद्य निश्चित ॥ दिव्य मात्रा काढी जेवीं ॥ ४८ ॥ म्हणे हा अनधिकारी परम ॥ 'मरा' ऐसें सांगे नाम ॥ म्हणे हेंचि तूं जपें सप्रेम ॥ मुख्य वेर्में[३०] जाण पां ॥ ४९ ॥ तें जीवन नाम जपत ॥ तेथेंचि बैसला ध्यानस्थ ॥ अंगावरी वारुळ वाढत ॥ ध्वनि उमटत आंतोनि ॥ १५० ॥ टोणपियांचा[३१] वृक्ष जाहला ॥ तों नारद बहुकाळें पातला ॥ त्या तरुवराखालीं उभा राहिला ॥ श्रवणीं ऐकिला नामघोष ॥ ५१ ॥ वारुळाचे छिद्रांमधूनी ॥ रामनामाचा मधुरध्वनी ॥ चातुर्यसमुद्र नारदमुनी ॥ जाणिलें मनीं वृत्त सर्व ॥ ५२ ॥ मग उकरोनियां वारुळ ॥ बाहेर काढिला तो पुण्यशीळ ॥ वर्मकळा रगडून तत्काळ ॥ सावध केला तेधवां ॥ ५३ ॥ जैसा भूमीवरी अर्क[३१] उतरला ॥ तैसा श्रीगुरु नारद देखिला ॥ धांवोनि चरणकमळा लागला ॥ पापाचा जाहला संहार ॥ ५४ ॥ नाम जपतां श्रीरामाचें ॥ दोष गेले अनंत जन्मांचे ॥ जैसे पर्वत तृणाचे ॥ अग्निसंगें भस्म होती ॥ ५५ ॥ पापें जळावया समस्त ॥ नामामाजी प्रताप बहुत ॥ नामाचेनि न जळे निश्चित ॥ ऐसें पाप नसेचि ॥ ५६ ॥ वाल्मीकें केलीं जीं पापें ॥ तीं भस्म जाहलीं नामप्रतापें ॥ नामापुढें अनेक तापें ॥ तुच्छ ऐसें जाणिजे ॥ ५७ ॥ जैसा पर्वत होतां संदीप्त ॥ मृगाढिजगेंण[३३] न राहती तेथ ॥ तैसीं नामामीपुढें समस्त ॥ पापारण्यें भस्म होती ॥ ५८ ॥ जैसीं स्वप्नीं घडलीं दुष्कृतें[३४] बहुत ॥ जागृतीं अवघीं मिथ्याभूत[३४] ॥ तैसे रामनामें समस्त ॥ पापसमूह भस्म होती ॥ ५९ ॥ तोंवरी तेंमाची[३५] दाटणी ॥ जों नुगवे वासरमणी[३५] ॥ तोंवरीच मद कीजे वारणीं[३५] ॥ जोंवरी सिंह नाहीं देखिला ॥ १६० ॥ सिंधु गर्जे तोंवरीच पाहीं ॥ जों कैलशोद्भव[३६] देखिला नाहीं ॥ तोंवरी भूतांची परम घाई ॥ जों मंत्रवादी[३६] न देखिला ॥ ६१ ॥ तोंवरीच पापांचा संभार ॥ जों नामीं न धरी आदर ॥ नामप्रताप अद्भुत थोर ॥ तरला साचार वाल्मीक ॥ ६२ ॥ असो वाल्मीक म्हणे गुरुनाथा ॥ जरी कृपा कराल सर्वथा ॥ तरी रामचरित्रकथा ॥ सविस्तर करीन मी ॥ ६३ ॥ ऐसें ऐकतां नारदमुनी ॥ परम संतोषला अंतःकरणीं ॥ वरद हस्त ठेवोनियां मूर्धनी[३९] ॥ वदला तें श्रवणीं आकर्णिजे ॥ ६४ ॥ साठी सहस्र वरुषांवरी ॥ विष्णु अवतरेल दशरथउदरीं ॥ तयाचें तूं भविष्य करीं ॥ शतकोटी सविस्तर ॥ ६५ ॥ जन्मकर्मलीला सर्व ॥ जे जे तूं वदसील भाव ॥ तैसाच वर्तेल राघव ॥ अवतारठेव अभिनव पैं ॥ ६६ ॥ शतकोटी ग्रंथ वाल्मीकें निर्मिला ॥ सुरस रस दिव्य ओतिला ॥ तिहीं लोकांसी कलह लागला ॥ व्यवहार गेला शिवापाशीं ॥ ६७ ॥ परम चतुर कैलासनाथ ॥ तीं ठायीं समान

---

२५ वासनारूपी इच्छा. २७ देहविषयक अहंकार. २८ स्वेद, स्तंभ, रोमांच, स्वरभंग, इत्यादि आठ सात्त्विक भाव. २९ खूण. ३० अज्ञानी बाल्यारूपी ओंडक्याचा, लहान रोपट्याचा. ३१ सूर्य. ३२ पशूंचे व पक्ष्यांचे कळप. ३३ पापें. ३४ खोटीं. ३५ अंधकाराचा. ३६ हत्तींकडून. ३७ अगस्ति. ३८ पंचाक्षरी, मांत्रिक. ३९ मस्तकीं.

वांटिला ग्रंथ ॥ शेवटीं दोन अक्षरें उरलीं यथार्थ ॥ कंठीं धरिलीं उमावरें ॥ ६८ ॥ शीतळ उपचार पूर्वी केले ॥ परी ते नाहीं सफळ जाहले ॥ चंद्रबिंब शिरीं धरिलें ॥ जटेंत आकळिलें गंगेसी ॥ ६९ ॥ हिमनगकन्या शीतळ सुंदर ॥ अर्धांगीं धरी कर्पूरगौर ॥ ठायीं ठायीं वेष्टिले फणिवर ॥ शीतळ थोर म्हणोनियां ॥ १७० ॥ गजचर्म अत्यंत शीतळ ॥ तेंही पांघरे जोश्वनीळ ॥ परी न राहे हाळाहळ ॥ जाळी प्रबळ अधिकचि ॥ ७१ ॥ मग हा ग्रंथ निवडितां थोर ॥ दोन अक्षरें निवडिलीं साचार ॥ तीं कंठीं धरितांचि उमावर ॥ शीतळ शरीर जाहलें ॥ ७२ ॥ हृदयीं आठविला रघूत्तम ॥ मुखीं स्मरतां रामनाम ॥ मध्यें हाळाहळ परम ॥ भयभीत जाहलें ॥ ७३ ॥ मुखीं नाम हृदयीं राम ॥ दाहकत्व सांडूनि जाहलें शमें ॥ भूषणरूप होऊनि परम ॥ शिवकंठीं मिरवलें ॥ ७४ ॥ नामें तरला वाल्मीक ॥ नामें तरले ब्रह्मादिक ॥ शीतळ जाहला कैलासनायक ॥ महिमा अद्भुत न वर्णवे ॥ ७५ ॥ किती गोड म्हणावा सुधारस ॥ किती वाड म्हणावें आकाश ॥ तेजस्वी परम चंडांशु ॥ किती म्हणोनि वर्णावा ॥ ७६ ॥ पृथ्वीस उपमा काय द्यावी ॥ पाताळखोली किती सांगावी ॥ कनकाद्रीची उंची किती वर्णावी ॥ तैसी नामाची पदवी अपार ॥ ७७ ॥ किती वर्णावा विष्णूचा प्रताप ॥ काय सांगावें शंकराचें तप ॥ तैसा रामनाममहिमा अमूप ॥ न वर्णवेचि सर्वथा ॥ ७८ ॥ प्राकृतभाषा म्हणोनि ॥ अव्हेर न करावा पंडितजनीं ॥ जैसीं कृष्णावेणीचीं तीरें दोन्ही ॥ परी उदक एकचि जाणिजे ॥ ७९ ॥ असो वाल्मीकें रचिला ग्रंथ ॥ भारद्वाजाचे मुखें समस्त ॥ असंख्य ऋषी श्रवण करीत ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ १८० ॥ हेचि कथा कैलासीं ॥ शिव सांगे हैमवतीसी ॥ पाताळीं काद्रवेयकुळासी ॥ भोगींद्रे सांगे हेचि कथा ॥ ८१ ॥ घटोद्भवाचे मुखें दिवसरजनी ॥ ऋषी श्रवण करिती कर्दळीवनीं ॥ किंपुरुषखंडीं स्वमुखेंकरूनी ॥ वानरांसी सांगे हनुमंत ॥ ८२ ॥ नारदाप्रती सरसिजोद्भव ॥ सांगे रामकथा अभिनव ॥ बदरिकाश्रमीं ऋषी सर्व ॥ व्यासमुखें ऐकती ॥ ८३ ॥ तेचि प्राकृत भाषेंत निवाडे ॥ श्रीधर वर्णी संतांपुढें ॥ जैसे बाळचाळे शब्द वेडेवांकुडे ॥ परी आवडती जननीसी ॥ ८४ ॥ तैसें प्राकृत आणि संस्कृत ॥ दोन्हीमाजी एकचि अर्थ ॥ जैसा दोहीं स्त्रियांचा एक नाथ ॥ दोन्ही हस्त एकाचेचि ॥ ८५ ॥ दोन्ही दाढा एकचि स्वर ॥ पाहाणार एक दोन नेत्र ॥ किंवा दोन पात्रांत पवित्र ॥ एकचि दुग्ध घातलें ॥ ८६ ॥ जैसें त्रिवेणीचें भरलें उदक ॥ दोन पात्रीं गोडी एक ॥ एक सुवर्णकूपिका अलोलिक ॥ एक ताम्रधातूची घडियेली ॥ ८७ ॥ दोन्ही कूपिका नेऊनि देख ॥ रामेश्वरासी केला अभिषेक ॥ दोन्ही धातु परी उदक एक ॥ देवासी समचि आवडती ॥ ८८ ॥ अबळां न कळे संस्कृतवाणी ॥ जैसें आडांतील निर्मळ पाणी ॥ परी दोरपात्रावांचोनी ॥ अशक्त जनां केवीं निघे ॥ ८९ ॥ तों तेंडागासी येतां त्वरें ॥ तत्काळचि तृषा हरे ॥ आबालजन तारावया ईश्वरें ॥ प्राकृत ग्रंथ निर्मिले ॥ १९० ॥ मुख्य संस्कृत पाहावें ॥ परी तें अबळां नेणवे ॥ महागज कैसा बांधवे ॥ कमळतंतू घेऊनियां ॥ ९१ ॥ सर्वांस मान्य

---

४० पार्वती. ४१ शंकर. ४२ श्रेष्ठ सर्प. ४३ हत्तीचें कातडें. ४४ शांत, सौम्य. ४५ अमृत. ४६ व्यापक, मोठें. ४७ सूर्य. ४८ मेरुपर्वताची. ४९ अनादर. ५० हिमालयाच्या कन्येला, पार्वतीला. ५१ कद्रूच्या वंशजांना, सर्पकुळाला. ५२ शेष. ५३ अगस्तीच्या. ५४ ब्रह्मदेव. ५५ सोन्याची घागर. ५६ मद्दानी लोकांस. ५७ तळ्याकडे.

गीर्वाणें ॥ जरी असेल पूर्वपुण्य ॥ तरीच तेथींचें होय ज्ञान ॥ आबालजन केवीं तरती ॥ ९२ ॥ उत्तम वस्त्रें लेतें[५७] नृपती ॥ तीं दुर्बळांसी प्राप्त न होती ॥ मग ते धोंगडीच पांघरती ॥ शीतउष्णनिवारणा ॥ ९३ ॥ जैसें दधि मंथितां बहुत ॥ त्यांतून निघे नैवनीत[५८] ॥ कीं स्वातीजळापासोन अद्भुत ॥ मुक्ताफळें[५९] निपजती ॥ ९४ ॥ कीं इक्षुदंडाचे पोटीं शर्करा ॥ रसनेस गोडी तेंचि विचारा ॥ कीं राजापासोनि राजपुत्रा ॥ मान्यता होय बहुतचि ॥ ९५ ॥ महाराष्ट्रवचनें निश्चित ॥ परी अत्यंत रसभरित ॥ मधुमक्षिकांचे[६०] मुखीं स्रवत ॥ मधु सुरस जैसे कां ॥ ९६ ॥ गीर्वाण हें शशिमंडळ[६१] अद्भुत ॥ त्याची प्रभा ते हें प्राकृत ॥ संस्कृत ग्रंथ वर्णिती पंडित ॥ अर्थ प्राकृत करिती कीं ॥ ९७ ॥ अर्कवृक्षीं मधुघट ॥ जरी भरतील यथेष्ट ॥ तरी गिरिकंदरीं करावया कष्ट ॥ काय कारण धांवावें ॥ ९८ ॥ सिकतेमाजी[६२] दिव्य रत्न ॥ जरी सांपडे न करितां प्रयत्न ॥ तरी चतुरीं करावें जतन ॥ किंवा अव्हेर करावा ॥ ९९ ॥ कष्टेंविण राज्य आलें हाता ॥ तरी काय ओसंडावें[६३] तत्त्वतां ॥ प्राकृतभाषीं ऐकोनि कथा ॥ लाभ श्रोतां घेइजे तेवीं ॥ २०० ॥ मुक्ताफळांची उत्तम माळा ॥ वरी सुगंध सुटला आगळा[६४] ॥ तरी चतुरीं कां न घालावी गळां ॥ अति आवडीकरोनियां ॥ १ ॥ आधींच इक्षुदंड[६५] गोड ॥ वरी आले साखरेचे घड ॥ तैसी रघुनाथकथा सुरवाड[६६] ॥ त्यावरी साहित्य पुरविलें ॥ २ ॥ आतां श्रोतीं सावधान ॥ वाल्मीकमहाराज गेले कथून ॥ तेचि रामकथा संपूर्ण ॥ मुळापासून ऐकिजे ॥ ३ ॥ दृष्टीं न पाहतां अवघा ग्रंथ ॥ उगाच दोष ठेविती अकस्मात ॥ ते शतमूर्ख जाणिजे निश्चित ॥ नव्हती पंडित विवेकी ॥ ४ ॥ ग्रंथा नाम रामविजय ॥ श्रवणें सदा पाविजे जय ॥ चिंतित मनोरथ सिद्ध होय ॥ एक आवर्तन[६७] करितांचि ॥ ५ ॥ आदिपुरुष श्रीअवधूत ॥ तोचि हा ब्रह्मानंद यथार्थ ॥ श्रीधरवरदें अद्भुत ॥ महिमा कोणा न वर्णवे ॥ २०६ ॥ इति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकिनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ प्रथमाध्याय गोड हा ॥ १ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

५८ संस्कृत भाषा. ५९ वापरतात. ६० लोणी. ६१ मोत्यें. ६२ मधमाशाच्या. ६३ चंद्रबिंब. ६४ वाळूमध्यें. ६५ टाकावें. ६६ विशेष. ६७ ऊस. ६८ सुखदायक. ६९ संपूर्ण वाचन.

२



॥ श्रीगणेशाय नमः ॥ जैसे मानससरोवरवेष्टित ॥ मेराळ दिसती शोभिवंत ॥ तैसे श्रवणासी बैसले संत ॥ लोचन अनंत जयांसी ॥ १ ॥ श्रवणीं ऐकतां संतसज्जन ॥ वाचेसी पारणें होय पूर्ण ॥ जैसा राकाइंदु[1] विलोकून ॥ सरितानाथ[2] उचंबळे ॥ २ ॥ कीं वर्षाकाळीं गंगेसी पूर ॥ कीं घन गर्जतां नाचती मयूर ॥ कीं वसंत देखोनि सुंदर ॥ कोकिळा गर्जे आनंदें ॥ ३ ॥ कीं रवि देखतां कमलें विकासती ॥ कीं दाता देखोनि याचक हर्षती ॥ तैशा देखोनि संतमूर्ती ॥ वाग्देवीस[3] आनंद ॥ ४ ॥ जैसी इंद्रापुढें रंभा ॥ दावी नृत्यकौतुकशोभा ॥ तैसी देखतां संतसभा ॥ वाग्वल्ली[4] आनंदे ॥ ५ ॥ कैसे द्यावे दृष्टांत ॥ हें मी नेणें निश्चित ॥ परी माझे अन्याय समस्त ॥ संतीं पोटांत घालावे ॥ ६ ॥ शिवकंठीं हालाहळ[5] ॥ कीं सागरापोटीं वडवानळ[6] ॥ कीं सृष्टीचा भार सकळ ॥ पाताळीं कूर्मे धरियेला ॥ ७ ॥ सकळां प्रकाशक जैसा शशी ॥ परी द्वितीयेसी लोक वाहती दशी[7] ॥ कीं हिमनगजामातासी ॥ धत्तूरपुष्पें[8] समर्पिती ॥ ८ ॥ तैसेचि हे शब्द निश्चित ॥ सज्जनीं हृदयीं धरिले सत्य ॥ असो प्रथम अध्यायीं गतकथार्थ ॥ उद्धरिला वाल्मीक नारदें ॥ ९ ॥ रामकथेचा आरंभ येथूनी ॥ जेवीं मूळसंकीर्ण[9] कृष्णावेणी ॥ परी पुढें विशाळ समुद्रगामिनी ॥ जाणिजे सज्जनीं कथा तैसी ॥ १० ॥ कमलोद्भवापासून[10] निश्चितीं ॥ पुत्र जाहला त्या नाम पुलस्ती ॥ महातपस्वी जैसा गभस्ती[11] ॥ चारी वेद ज्यासी मुखोद्गत ॥ ११ ॥ तृणबिंदुकन्या देववर्णी ॥ ते पुलस्तीची जाण गृहिणी[12] ॥ विश्रवानामें तिजपासोनी ॥ पुत्र जाहला विख्यात ॥ १२ ॥ भारद्वाजकन्या महासती ॥ ती दिधली विश्रव्याप्रती ॥ त्यांचे पोटीं निश्चितीं ॥ कुबेर पुत्र जन्मला ॥ १३ ॥ विश्रव्यापासोनि जन्म पूर्ण ॥ म्हणोनि नाम वैश्रवण ॥ तेणें तप करोनि दारुण ॥ चतुरानन[13] वश केला ॥ १४ ॥ कमलासन[14] संतुष्टोन ॥ पौत्रपुत्र म्हणोन ॥ लंका पुष्पक देऊन ॥ सागरोदरीं स्थापिला ॥ १५ ॥ पूर्वी विधीनें लंका निर्मिली ॥ ती दानवें बळेंचि घेतली ॥ मागुती निर्जरीं[15] सोडविली ॥ मग दिधली कुबेरातें ॥ १६ ॥ तों पाताळींचा दैत्य सुमाळी ॥ विप्रवेषें आला भूमंडळीं ॥ लंका देखोन तये वेळीं ॥ मनामाजी आवेशला ॥ १७ ॥ म्हणे हे लंका आमुची निश्चित ॥ हा कोण येथें राज्य करित ॥ समाचार घेतां जाहलें श्रुत ॥ सर्व वृत्त तयाचें ॥ १८ ॥ कुबेर देखोन सुंदर ॥ दैत्य करी मग विचार ॥ याचे पित्यासी साचार ॥ कन्या देऊं आपुली ॥ १९ ॥ तिजपासोन जे होती सुत ॥ तयां साह्य होऊं सर्व दैत्य ॥ हें लंकाराज्य समस्त ॥ हिरोन घेऊं क्षणार्धें ॥ २० ॥ ऐसा सुमाळी दैत्य दुर्जन ॥ विप्रवेष अवलंबून ॥ आला लटिकींच शांति धरून ॥ कपटी पूर्ण दुरात्मा ॥ २१ ॥ जैसा नटाचा वेष जाण ॥ कीं विषाचें शीतळपण ॥ कीं सांवचोराचें गोड वचन ॥ परप्राणहरणार्थ ॥ २२ ॥ कीं गोरियांचें[16] गायन ॥ कीं दांभिकाचें वरिवरी भजन ॥ धनलुब्धाचें तत्त्वज्ञान ॥ परधनहरणार्थ ॥ २३ ॥ वरिवरी सुंदर इंद्रावण[17] ॥ किंवा बकाची

१ राजहंस. २ पौर्णिमेचा चंद्र. ३ समुद्र. ४ सरस्वतीला. ५ वाणी. ६ विष. ७ वडवाग्नि. ८ द्वितीयेच्या चंद्राला जुन्या वस्त्राची दशा फेकून, 'जुनें वस्त्र घे व नवें दे' असें प्रार्थितात. ९ शंकराला. १० धोत-याचीं फुलें. ११ मुळांत लहान. १२ ब्रह्मदेवापासून. १३ सूर्य. १४ पत्नी. १५ ब्रह्मदेव. १६ देवांनीं. १७ दिसण्यांत खाव-प्रामाणिक-पण आंतून चोर. १८ फांसेपारध्याचें. १९ वृंदावन, कडु कपंडळ ( फळ ).

शांति पूर्ण ॥ कीं वेश्येचें मुखमंडणें[२०] ॥ कामिकमनहरणार्थ ॥ २४ ॥ कीं साधूवेष धरोनि शुद्ध ॥ यात्रेसी फिरती जैसे मेंदे ॥ कीं वाटपाडे[२१] निरंजनीं[२२] शुद्ध ॥ सिद्ध होऊन बैसले ॥ २५ ॥ असो ऐसा सुमाळी पापराशी ॥ तेणें आपुली कन्या कैकसी ॥ घेऊन आला विश्रव्यापासीं ॥ प्रार्थोनि त्यासी दिधली ॥ २६ ॥ म्हणे मी अकिंचन ब्राह्मण ॥ एवढें घ्या जी कन्यारत्न ॥ ऋषीनें कापट्य नेणोन ॥ लाविलें लग्न तियेसीं ॥ २७ ॥ दैत्य गेला स्वस्थानासी ॥ एके दिवशीं ते कैकसी ॥ सूर्य जातां अस्ताचळासी ॥ भोग पतीस मागत ॥ २८ ॥ जे संध्याकाळीं होय गर्भिणी ॥ तरी महातामसी जन्मे प्राणी ॥ तो होमकाळ साधोनी ॥ कैकसी मागे भोगातें ॥ २९ ॥ स्वस्त्रीस भोग न दे जरी ॥ तरी बाळहत्या पडे त्याचे शिरीं ॥ होम द्यावया दुराचारी ॥ जाऊं नेदी ऋषीतें ॥ ३० ॥ परम क्षोभोनियां ऋषी ॥ अंगसंग केला तियेसीं ॥ म्हणे तूं विप्रकन्या नव्हेसी ॥ महातामसी पापरूपे ॥ ३१ ॥ ब्रह्मराक्षस तुझे उदरीं ॥ पुत्र होतील दुराचारी ॥ येरी पतीचे चरण धरी ॥ एक तरी सुपुत्र देइजे ॥ ३२ ॥ रावण आणि कुंभकर्ण ॥ तिसरा भक्तराज बिभीषण ॥ तो पितृवरदानेंकरून ॥ साधु पूर्ण जन्मला ॥ ३३ ॥ कुंभकर्ण जेव्हां जन्मला ॥ मुख पसरोन टाहो फोडिला ॥ तेणें भूगोळ[२३] थरारिला ॥ प्रळय गमला जीवांसी ॥ ३४ ॥ ताटिका शूर्पणखा भगिनी जाण ॥ परी त्यांत रत्न बिभीषण ॥ जैसा कोंगविष्ठेंत[२४] अश्वत्थ[२५] पावन ॥ केवळ स्थान विष्णूचें ॥ ३५ ॥ कीं वायसांत[२६] कोकिळा श्रेष्ठ केवळ ॥ कीं शिंपीमाजी मुक्ताफळ ॥ कीं दैत्यकुळीं भजनशीळ ॥ प्रल्हाद पूर्वी जन्मला ॥ ३६ ॥ यावरी गोकर्णतीर्थीं जाऊन ॥ तिघे करिती अनुष्ठान[२७] ॥ रावणें आराधिला अपर्णारमण[२८] ॥ कुंभकर्णें कमलोद्भव[२९] ॥ ३७ ॥ श्रीविष्णूचें आराधन ॥ करिता जाहला बिभीषण ॥ ब्रह्मा येऊनि वरदान ॥ देता जाहला तिघांतें ॥ ३८ ॥ रावण मागे वरदान ॥ इंद्रादिदेव काद्रवेयगण[३१] ॥ यांसी बंदिशाळे रक्षीन ॥ सर्वांसी मान्य आज्ञा माझी ॥ ३९ ॥ संपत्ति संतति विद्या धन ॥ व्हावें सकळ-कळाप्रवीण ॥ याउपरी कुंभकर्ण ॥ वर मागे अपेक्षित ॥ ४० ॥ तों देव जाहले उद्विग्न ॥ काय मागेल कुंभकर्ण ॥ कीं हें चराचर भक्षीन ॥ ऐसें वरदान मागेल काय ॥ ४१ ॥ कीं गिळीन म्हणे भूगोळ ॥ कीं दाढे घालीन ऋषिमंडळ ॥ मग सरस्वतीतें देव सकळ ॥ प्रार्थिते जाहले तेधवां ॥ ४२ ॥ तूं जिव्हाग्रीं वससी देवी ॥ तरी त्या दुष्टासी भ्रांति घालावी ॥ लोकीं सुखी राहिजे सर्वी ॥ ऐसें वदवीं सरस्वती ॥ ४३ ॥ कुंभकर्ण आधींच राक्षस ॥ सरस्वती भ्रांति घाली विशेष ॥ तों विधि म्हणे घेटश्रोत्रास[३२] ॥ अपेक्षित माग कांहीं ॥ ४४ ॥ मग बोले कुंभकर्ण ॥ मज निद्रा देकां संपूर्ण ॥ अखंड करीन मी शयन ॥ चतुरानन[३३] अवश्य म्हणे ॥ ४५ ॥ तत्काळ निद्रा येऊन ॥ पडला जैसा प्राणहीन ॥ सुषुप्तीमाजी[३४] सर्व ज्ञान ॥ बुडोन गेलें तयाचें ॥ ४६ ॥ मंदराचळ आडवा पडला ॥ कीं महावृक्ष उन्मळला ॥

---

२० मुखशोभा. २१ ठक लोक. २२ वाटमारे, लुटारू. २३ अरण्यांत. २४ सारी पृथ्वी. २५ कावळ्याच्या विष्ठेंत. २६ पिंपळ. २७ कावळ्यांत. २८ तपश्चर्या. २९ पार्वतीपति शंकर. ३० ब्रह्मदेव. ३१ कद्रुवंशज सर्पसमूह. ३२ कुंभकर्णाला. ३३ चतुर्मुख ब्रह्मदेव. ३४ गाढ झोपेमध्यें.

निद्राभरें घोरूं लागला ॥ तेणें दश दिशा घुमघुमती ॥ ४७ ॥ म्हैसे हस्ती श्वापदें काननीं ॥ श्वासासरसीं प्रवेशती घ्राणीं ॥ उच्छ्वास टाकितां धरणीं ॥ बाहेर पडती आरडत ॥ ४८ ॥ निद्रा देहाची समाधि जाण ॥ निद्रा जीवात्म्याचें आवरण ॥ कीं भ्रांतीचें विश्रांति-स्थान ॥ कीं अज्ञान मूर्तिमंत ॥ ४९ ॥ निद्रा तस्करराची[३५] सहकारी[३६] ॥ ध्याना अनुष्ठाना विघ्न करी ॥ चातुर्य विद्या कळाकुसरी ॥ निद्रेमाजी बुडती पैं ॥ ५० ॥ निद्रा मरणाची सांगातिणी ॥ निद्रा रात्रीची ज्येष्ठ भगिनी ॥ निद्रा जीवाची विश्रांतिकारिणी ॥ आयुष्य हरोनि नेतसे ॥ ५१ ॥ स्थूल सूक्ष्म कारणें पाहीं ॥ बुडोन जाती सुषुप्तिडोहीं[३७] ॥ असो कुंभकर्णास शुद्धि नाहीं ॥ जागा कदा नोहेचि ॥ ५२ ॥ कुंभकर्ण निद्रासागरीं ॥ बुडोन गेला अहोरात्रीं ॥ पिता देखोन चिंता करी ॥ म्हणे व्यर्थ जन्म याचा ॥ ५३ ॥ मग तेणें प्रार्थिला कमळासन[३८] ॥ मागतसे हें वरदान ॥ षण्मास जाहलिया एक दिन ॥ सर्वसुखभोग यातें असो ॥ ५४ ॥ मग बिभीषणासी चतुर्वक्त्र[३९] ॥ म्हणे माग इच्छित वर ॥ तंव तो सत्वशीळ पवित्र ॥ काय बोलता जाहला ॥ ५५ ॥ म्हणे सत्समागम सच्छास्त्रश्रवण ॥ दया क्षमा उपरति[४०] भजन ॥ निंदा वाद द्वेष गाळून ॥ विष्णुचिंतन करीन मी ॥ ५६ ॥ आशा तृष्णा[४१] मनसा[४२] कल्पना ॥ भ्रांति भुली[४३] इच्छा वासना ॥ ममता अविद्या[४४] सांडुनि जाणा ॥ विष्णुचिंतन करीन मी ॥ ५७ ॥ काम क्रोध मद मत्सर ॥ मोह लोभ अहंकार ॥ हे दूर करोनि साचार ॥ विष्णुचिंतन करीन मी ॥ ५८ ॥ धन्य बिभीषणाची स्थिती ॥ केवळ ओतिली सुखाची मूर्ती ॥ कीं भक्तिरूप श्रीरामकीर्ती ॥ विस्तारिली आधीं पुढें ॥ ५९ ॥ सूर्याआधीं उगवे अरुण ॥ कीं ज्ञानाअगोदर भजन ॥ कीं भजनाआधीं वैराग्य पूर्ण ॥ तैसा बिभीषण जन्मला ॥ ६० ॥ तपाअगोदर शुचित्व पूर्ण ॥ कीं बोधाआधीं सत्वगुण ॥ कीं सत्वाआधीं अद्भुत पूर्ण ॥ पुण्य जैसें प्रगटतें ॥ ६१ ॥ कीं साक्षात्काराआधीं निजध्यास[४५] ॥ मननाआधीं श्रवण विशेष ॥ कीं श्रवणाआधीं सुरस ॥ आवडी पुढें ठसावे ॥ ६२ ॥ कीं शमदमा-आधीं विरक्ती ॥ कीं आनंदाआधीं उपरती[४६] ॥ कीं आत्मसुखाआधीं शांती ॥ पुढें येऊन ठसावे ॥ ६३ ॥ तैसा आधीं जन्मला बिभीषण ॥ जैसें फळाअगोदर सुमन[४७] ॥ विधि[४८] संतोषला ऐकोन ॥ म्हणे वंश धन्य याचेनि ॥ ६४ ॥ रामउपासक जे संत ॥ तयांचीं लक्षणें हींच निश्चित ॥ अमानित्व अदंभित्व ॥ अहिंसादि सर्व गुण जेथें ॥ ६५ ॥ अंतरीं निग्रह करून ॥ शांतिरसें भरले पूर्ण ॥ आत्मस्तुति मनांतून ॥ स्वप्नीं जयांसी नावडे ॥ ६६ ॥ दुजयाचे दोषगुणरीती ॥ हें कधीं नावडे जयांचे चित्तीं ॥ पराचे उत्तम गुण वानिती ॥ न विसरती कदाही ॥ ६७ ॥ गर्व नेणती अणुमात्र ॥ कोणासी न बोलती निष्ठुर ॥ आपुली निंदा ऐकतां साचार ॥ तिरस्कार नुपजेचि ॥ ६८ ॥ जैसे मेघ क्षारजळ प्राशिती ॥ परी पृथ्वीवरी गोड वर्षती ॥ धेनु तृण भक्षोनि देती ॥ क्षीर[४९] अमृतासारिखें

---

३५ चोराची. ३६ सखी. ३७ गाढनिद्रेच्या डोहांत. ३८ ब्रह्मदेव. ३९ वैराग्य. ४० विषयांची इच्छा. ४१ मनाची धांव. ४२ भलत्या विषयावर भूल पडणें. ४३ अज्ञान. ४४ आत्मचिंतन. ४५ पुष्प. ४६ दूध.

॥ ६९ ॥ इक्षुदंडासी घालिती खत ॥ तरी गोड होय रसभरित ॥ गंगा पाप जाळूनि पुण्य देत ॥ तैसे संत जाणावे ॥ ७० ॥ परिस लोहकाळिमा झाकोन ॥ तत्काळचि करी सुवर्ण ॥ तैसेचि महाराज सज्जन ॥ परदोष लपविती ॥ ७१ ॥ जैसी कुळवंत कामिनी ॥ अवयव झांकी क्षणोक्षणीं ॥ तैसें आपुलें सुकृत झांकोनी ॥ सज्जन जन ठेविती ॥ ७२ ॥ असो सर्वलक्षणयुक्त ॥ बिभीषण परम भक्त ॥ तयासी विष्णुनाभ सत्य ॥ वर देता जाहला ॥ ७३ ॥ विरिंचि म्हणे साचार ॥ तुज भेटेल श्रीरघुवीर ॥ तो चिरंजीव करील निर्धार ॥ शशी मित्र असती जों ॥ ७४ ॥ रावण कुंभकर्ण ते वेळे ॥ मेळविती राक्षसदळें ॥ प्रहस्त महोदर धांविन्नले ॥ प्रधान जाहले रावणाचे ॥ ७५ ॥ विद्युज्जिन्ह जंबुमाळी ॥ वज्रदंष्ट्र विरूपाक्ष बळी ॥ खर दूषण त्रिशिरा सकळी ॥ विद्युन्माली माल्यवंत ॥ ७६ ॥ मत्त महामत्त युद्धोन्मत्त ॥ शुक सारण दुर्धर समस्त ॥ बळ महाबळ धांवत ॥ रावणा वेष्टित सर्वही ॥ ७७ ॥ सकळ दळभार घेऊन ॥ लंकेवरी गेला रावण ॥ कदा नाटोपे वैश्रवण ॥ बहुदिन युद्ध करितां ॥ ७८ ॥ मग रावणें काय केलें ॥ पितयाचें पत्र आणिलें ॥ कुबेरासी पाठविलें ॥ येरें वंदिलें मस्तकीं ॥ ७९ ॥ उकलोनि वाची वैश्रवण ॥ आंत लिहिलें वर्तमान ॥ तुझा सापत्नबंधु रावण ॥ लंकाभुवन यासि दीजे ॥ ८० ॥ पितृआज्ञा ते वेदवचन ॥ मानोनि निघाला वैश्रवण ॥ सकळ संपत्ति पुष्पकीं घालोन ॥ विरिंचीपासीं गेला पैं ॥ ८१ ॥ मग कनकाद्रीचे पाठारीं ॥ निर्मूनि अलकावती पुरी ॥ कुबेर तेथें ते अवसरीं ॥ विष्णुसुतें स्थापिला ॥ ८२ ॥ मयासुर मंदोदरी आणि शक्ती ॥ देता जाहला रावणाप्रती ॥ दीर्घज्वाळा बळीची पौत्री ॥ ते दिधली कुंभकर्णा ॥ ८३ ॥ सरमानामें गंधर्वकन्या ॥ ते दिधली बिभीषणा ॥ सकळ भूप शरण रावणा ॥ लंकेसी येती भयेंचि ॥ ८४ ॥ रावणें सर्व देश जिंकिले ॥ गाईब्राह्मणांसी धरोनि बळें ॥ मुखीं घालोनियां सगळे ॥ दाढखालीं रगडित ॥ ८५ ॥ आकांतले पृथ्वीचे जन ॥ कोठें लपावया नाहीं स्थान ॥ मग कुबेरें स्वर्गीहून ॥ सांगोनि पाठविलें रावणा ॥ ८६ ॥ कुबेरसेवक बोले वचन ॥ तुम्ही ऋषिपुत्र वेदसंपन्न ॥ टाकिलीं वेदांचीं खंडें करून ॥ शास्त्रज्ञान नसे तुम्हां ॥ ८७ ॥ आम्ही जाणते एक सृष्टीं ॥ ऐसा अभिमान वाहतां पोटीं ॥ गोब्राह्मण देखतां दृष्टीं ॥ मारितां कैसे अधर्मी हो ॥ ८८ ॥ समजोनियां शास्त्रार्थ ॥ मग कर्में करणें अनुचित ॥ त्यासी ऐहिकें ना परमार्थ ॥ भोगील अनर्थ अनेक तो ॥ ८९ ॥ अवलक्षणी कुरूपी देख ॥ दर्पणीं न पाहे आपुलें मुख ॥ तोंवरीच अभिमान अधिक ॥ स्वस्वरूपाचा वाहतसे ॥ ९० ॥ तैसे दोष आचरती ॥ मग धर्मशास्त्र विलोकिती ॥ परी वीट न मानिती चित्तीं ॥ नवलरीति हे वाटे ॥ ९१ ॥ ऐसें बोलतां कुबेरदूत ॥ रावण क्रोधावला अद्भुत ॥ व्याघ्र-मुखीं मुष्टिघात ॥ ताडितां जेवीं खवळे पैं ॥ ९२ ॥ पदीं ताडितां महाउरग ॥ कीं शुंडा पिळितां मातंग ॥ कीं घृतें शिंपितां सवेग ॥ पावक जैसा खवळे पैं ॥ ९३ ॥ ऐसा सक्रोध रावण ॥ सकळ दळभार सिद्ध करून ॥ रात्रीमाजी जाऊन ॥ घाली कुबेरावरी घातला

४७ उंसाला. ४८ पुण्यकर्म. ४९ विष्णूच्या नाभिकमळांतून जन्मलेला ब्रह्मदेव. ५० ब्रह्मदेव. ५१ चंद्र. ५२ सूर्य. ५३ कुबेर. ५४ दुसऱ्यानें, कुबेरानें. ५५ मेरूपर्वताचे. ५६ नात. ५७ इहलोक. ५८ आरशांत. ५९ मोठा सर्प. ६० झडप.

॥ ९४ ॥ संपदा आणि पुष्पक ॥ वस्तू हरिल्या सकळिक ॥ मग तो कुबेर यक्षनायक ॥ गेला शरण शक्रातें[६१] ॥ ९५ ॥ मग तो कुबेर ते वेळां ॥ शक्रें कोशागृहीं[६२] ठेविला ॥ असो रावणासी पुत्र जाहला ॥ मेघनाद प्रथमचि ॥ ९६ ॥ एक लक्ष पुत्रसंतती ॥ सवा लक्ष पौत्रोत्पत्ती ॥ ऐशीं सहस्र युवती ॥ भोगितां रावण न धाये[६३] ॥ ९७ ॥ अठरा अक्षौहिणी[६४] वाजंत्री ॥ गर्जताती अहोरात्रीं ॥ पृथ्वीचे भूप महाद्वारीं ॥ कर जोडूनि उभे सदा ॥ ९८ ॥ अस्ता जातां दिनेकर[६५] ॥ कर्पूरदीपिका[६६] अठरा सहस्र ॥ पाजळोनि सभेसमोर ॥ निशाचर तिष्ठती ॥ ९९ ॥ इंद्राचिया भयें पर्वत ॥ रावणासी शरण येत ॥ शक्रें[६७] आमुचे पक्षें छेदित ॥ रक्षीं त्वरित आम्हांसी ॥ १०० ॥ लंकेश तयांसी अभय देत ॥ तुम्ही गज व्हा अवघे पर्वत ॥ समस्त अचळां[६८] मानली मौंत ॥ जाहले उन्मत्त वौंरण ॥ १ ॥ रावण देवांवरी चालिला ॥ मेघनादें इंद्र ते वेळां ॥ ऐरावतीसगट पाडिला ॥ निजबळें रणांगणीं ॥ २ ॥ ऐसा सत्रा वेळां सहस्रनेत्र[६९] ॥ जिंकी मंदोदरीचा पुत्र ॥ मग इंद्रजित नाम थोर ॥ ब्रीद तेथोन ऐसें बांधिलें ॥ ३ ॥ पाश घालोनि पाकशासन[७०] ॥ इंद्रजितें आणिला बांधोन ॥ मग विरिंचि आला धांवोन ॥ होय प्रसन्न शक्रजिता ॥ ४ ॥ अपेक्षित देवोनि वर ॥ सोडविला पुरंदर[७१] ॥ मग रावणें देव समग्र ॥ सेवेलागीं ठेविले ॥ ५ ॥ शक्रें[७२] आणावे नित्य हार ॥ छत्र धरी रोहिणीवर[७३] ॥ रसाधिपति[७४] निरंतर ॥ वाहे नीर[७५] धांवतचि ॥ ६ ॥ गर्भस्ति[७६] होय द्वारपाळ ॥ कुबेर आणि अनिळ[७७] ॥ यांहीं सडासंमार्जन सकळ ॥ गृहामाजी करावें ॥ ७ ॥ वस्त्रें धूत वैश्वानर[७८] ॥ पुरोहित जाहला विष्णुपुत्र[७९] ॥ पांडित्य करी अंगिराकुमर[८०] ॥ नारद तुंबर गाती सदा ॥ ८ ॥ दहावेळां शिव पूजिला ॥ रावण दश वक्त्रें पावला ॥ वीस हस्त लाधला ॥ शिवही केला वश तेणें ॥ ९ ॥ कोणे एके समयीं रावण ॥ पुष्पकविमानीं बैसोन ॥ कैलासगिरि चढतां पूर्ण ॥ तों नंदी रक्षण महाद्वारीं ॥ ११० ॥ म्हणे नको जाऊं लंकापती ॥ शिवउमा आहेत एकांतीं ॥ ऐसें ऐकतां मयजापती[८१] ॥ परम क्षोभ पावला ॥ ११ ॥ नंदीस म्हणे ते वेळे ॥ तुज मर्कटाचेनि बोलें ॥ मी न राहें कदाकाळें ॥ जाईन बळेंकरोनियां ॥ १२ ॥ ऐसें बोलतां दशकंधर[८२] ॥ कोपला तेव्हां नंदिकेश्वर ॥ शापशस्त्र अनिवार ॥ ताडिलें सत्वर तेणेंचि ॥ १३ ॥ म्हणे उन्मत्त तूं मूढमती ॥ तुज नर वानर रणीं वधिती ॥ तुवां दशरुद्र पूजिले निगुती ॥ अकरावा मारुति प्रगटेल ॥ १४ ॥ तो वानररूपें अवतरोन ॥ करील तुझें गर्व-मोचन ॥ ऐकतां क्रोधावला रावण ॥ म्हणे हा उपडीन कैलासगिरी ॥ १५ ॥ उचलोनियां कैलासपर्वत ॥ लंकेंत नेईन क्षणांत ॥ म्हणोन तळीं घातला हात ॥ समूळ उचलावयासी ॥ १६ ॥ तें जाणोनि हिमनगजामात[८३] ॥ निजपदें दडपिला पर्वत ॥ सहस्र वर्षेंपर्यंत ॥ आक्रंदत रावण ॥ १७ ॥ मग करी शिवाचें स्तवन ॥ प्रसन्न जाहला त्रिनयन[८४] ॥ दशवक्त्र दिधला सोडून ॥ आला परतोन लंकेसी ॥ १८ ॥ एकदा रेवातीरीं ध्यानस्थ ॥ बैसला असतां मयजाकांत ॥ पुढें सिकतालिंग[८५] विराजित ॥ तों पाणी चढत माघारें ॥ १९ ॥ सहस्रार्जुनें

६१ इंद्राला. ६२ भांडारगृहांत. ६३ तृप्त झाला नाहीं. ६४ पूर्ण सेना, प्रचंड संख्या. ६५ सूर्य. ६६ कापुराच्या दिवट्या. ६७ इंद्र. ६८ पंख. ६९ पर्वतांना. ७० गोष्ट पडली. ७१ इन्द्र. ७२ इंद्र. ७३ चंद्र. ७४ वरुण. ७५ पाणी. ७६ वायु. ७७ अग्नि. ७८ ब्रह्मदेव. ७९ बृहस्पति. ८० मुलें. ८१ मयकन्या मंदोदरीचा पति रावण. ८२ हिमालय पर्वताचा जांवई शंकर. ८३ वाळूचें लिंग.

निजभुजेंकरून ॥ कोंडिलें नर्मदेचें जीवेंन ॥ ध्यान करितां रावण ॥ आकंठपर्यंत बुडाला ॥ १२० ॥ परम क्रोधावला दशमौळी ॥ धांवोनि आला तयाजवळी ॥ म्हणे कोण रे तूं ये स्थळीं ॥ रेवाजळ कोंडितोसी ॥ २१ ॥ सहस्रार्जुनें कवळें[८४] घालून ॥ ग्रीवेसी[८५] धरिला दशवदन ॥ कीं मृगेंद्रें धरिला वारेंण ॥ जाहले प्राण कासाविस ॥ २२ ॥ बहुकाळ बंदीं घातला ॥ मग पौलस्तिऋषि धांविन्नला ॥ भिक्षा मागोनि तये वेळां ॥ सोडविला राक्षस ॥ २३ ॥ बळीचिया नगरा देख ॥ बळेंच आला लंकानायक ॥ जैसा व्याळींचे बिळीं मूंषक ॥ चारा घेऊं प्रवेशला ॥ २४ ॥ तों बळीचिया महाद्वारीं ॥ एक पुरुष उभा दंडधारी ॥ जयाचिया तेजामाझारी ॥ शशी मित्र झांकोळती ॥ २५ ॥ तो महाराज त्रिविक्रमें ॥ देखोनि बळीचें निजप्रेम ॥ द्वारपाळ जाहला पुरुषोत्तम ॥ अज अजित जगद्गुरू ॥ २६ ॥ मग तयासी म्हणे रावण ॥ बळीसी आणीं बोलावून ॥ नाहीं तरी हे नगरी उचलोन ॥ पालथी घालीन सागरीं ॥ २७ ॥ मग म्हणे वैकुंठविलासी ॥ तूं बळीचा प्रताप नेणसी ॥ आतांच येईल प्रत्ययासी ॥ जाईं वेगेंसीं आंतौता ॥ २८ ॥ मग आंत प्रवेशला त्वरित ॥ तों सभेसी बैसला विरोचनेंसुत ॥ तयासी म्हणे लंकानाथ ॥ करावया समरें[८६] पातलों मी ॥ २९ ॥ जैसा शुष्क तृणाचा पुतळा ॥ धरावया आला वडवानळा ॥ कीं वृषभ बळें माजला ॥ खोंचूं धांवला सिंहासी ॥ १३० ॥ व्याघ्रासी धरीन म्हणे बस्तें[८७] ॥ कीं आळिकें[८८] सुपर्णावरी[८९] धांवत ॥ ऐरावतीचा मोडावया दांत ॥ शलेंभ[९०] जैसा सरसावला ॥ ३१ ॥ वृश्चिकें[९१] धांवे सत्वर ॥ ताडावया खदिरांगारें[९२] ॥ खद्योत[९३] म्हणे दिवाकर ॥ आसडून पाडीन खालता ॥ ३२ ॥ तैसा बळीप्रती रावण ॥ सांगे आपुलें थोरपण ॥ कीं सरस्वतीपुढें मतिमंदें येऊन ॥ वाग्वाद आरंभिला ॥ ३३ ॥ हांसोनि बळी म्हणे ते वेळे ॥ या वैकुंठनाथें द्वारपाळें ॥ पूर्वी नारसिंहरूप धरिलें ॥ प्रह्लादभक्त रक्षावया ॥ ३४ ॥ नरसिंहगदाघायेंकरून ॥ हिरण्यकशिपूचें कर्णभूषण ॥ कुंडलें पडलीं उसळोन ॥ तीं उचलोन घेईं तूं ॥ ३५ ॥ तीं उचलों गेला दशकंधर ॥ बळें लाविले वीसही कर ॥ जैसा मशकासी न ढळे कुंजर ॥ तैसें जाहलें रावणा पैं ॥ ३६ ॥ निस्तेज जाहला ते वेळीं ॥ तों बळीची राणी विंध्यावळी ॥ सारिपाट खेळतां प्रीतिमेळीं ॥ फांसा हातींचा उसळला ॥ ३७ ॥ तों बळी म्हणे रावणासी ॥ फांसा आणीं वेगेंसीं ॥ परी तोही न उचले तयासी ॥ राक्षसासी खेद वाटे ॥ ३८ ॥ गदगदां हांसती दोघेंजणें ॥ बंदीं घातले म्हणती देव याणें ॥ येथें आला युद्धाकारणें ॥ तों फांसा यासी नुचलेचि ॥ ३९ ॥ जाहला परम अपमान ॥ माघारा चालिला दशवदन ॥ तों मार्गी बळीचे सेवकजन ॥ त्यांणीं रावण नागविलाँ ॥ १४० ॥ घेतलीं वस्त्रें शस्त्रें हिरून ॥ मुखासी तेल मसीं[९४] लावून ॥ वीसही हस्त बांधोन ॥ नगरामाजी हिंडविती ॥ ४१ ॥ एक अंगावरी धुळी टाकिती ॥ एक दाढी धरोनि ओढिती ॥ एक बळेंचि बैसविती ॥ एक उठविती सवेंचि ॥ ४२ ॥ एक करिती शेणमार ॥ काकुळती येत दशकंधर ॥ पळों पाहे जंव बाहेर ॥ तंव द्वारपाळ जाऊं नेदी ॥ ४३ ॥ क्षुद्र द्वार

८४ पाणी. ८५ झडपं. ८६ मानेला. ८७ सिंहानें. ८८ हत्ती. ८९ सापाचे. ९० उंदीर. ९१ वामन. ९२ बळी. ९३ युद्ध, लढाई. ९४ बोकड. ९५ कीड. ९६ गरुडावर. ९७ टोळ. ९८ विंचू. ९९ खैराचा निखारा. १०० काजवा. १ सूर्य. २ हत्ती. ३ नागवा केला. ४ काजळ.

मोग्यिमधून ॥ मस्तक घाली जंव रावण ॥ तंव सर्वांठायीं वामन ॥ दंडावरी मारित ॥ ४४ ॥ बळीचे अश्वशाळेंत रावण ॥ क्षुधाक्रांत हिंडे नग्न ॥ चणे खातसे वेंचून ॥ मागे कोरान्न[5] घरोघरीं ॥ ४५ ॥ पोटासाठीं वाघ्या होऊन ॥ म्हणे मी मल्हारीचा श्वान ॥ कोठेंचें चांडकें काखे घेऊन ॥ नाचोनि धान्य मेळवी ॥ ४६ ॥ तों दासींनीं धरिला कौतुकें ॥ उदक आणितां घातला काखें ॥ तयां काकुळती येत दीनमुखें ॥ मग सोडिती सत्वर ॥ ४७ ॥ मग विश्रवा धांवोन ॥ बळीस भेटला येऊन ॥ म्हणे बंदींत घातला रावण ॥ तो भिक्षेस मज देइजे ॥ ४८ ॥ बळी बोले आण वाहोन ॥ येथें कोणास नाहीं बंधन ॥ ग्रामांत असे रावण ॥ तो शोधोनि नेइजे ॥ ४९ ॥ तों बळीचे अश्वशाळेंत देखिला ॥ पिता देखोनि रडूं लागला ॥ मग ऋषीनें वामन स्तविला ॥ सोडवून नेला रावण ॥ १५० ॥ परम लज्जित रावण ॥ लंकेसी आला परतोन ॥ मागुती पराक्रम धरोन ॥ म्हणे मी जिंकीन वाँळीतें ॥ ५१ ॥ तों समुद्रतीरीं शँक्रसुत ॥ बसला असे ध्यानस्थ ॥ त्यासी धरावया लंकानाथ ॥ पुष्पकांतून उतरला ॥ ५२ ॥ जैसा पंचाननापुढें ॥ मार्जार दावी आपले पवाडे ॥ कीं पंडितापुढें महामूढें ॥ वाग्वाद आरंभिला ॥ ५३ ॥ कीं रोंसभें[11] बीद बांधोन ॥ नारदापुढें मांडिलें गायन ॥ कीं महाव्याघ्रावरी टवकारून ॥ जंबूकें[12] जैसा पातला ॥ ५४ ॥ तैसा वाळीपुढें उभा रावण ॥ मावध होतां शक्रनंदन ॥ ग्रीवेसी[13] दशग्रीव धरोन ॥ कँक्षे[14]-माजी दाटिला ॥ ५५ ॥ चतुःसमुद्रीं करोनि स्नान ॥ किष्किंधेसी आला परतोन ॥ अंगदाच्या पाळण्यावरी नेऊन ॥ उफराटा रावण बांधिला ॥ ५६ ॥ क्षणक्षणां धरोनि दाढी ॥ अंगद बाळभावें उपडी ॥ मग विश्रवा धांवोनि तांतडी ॥ भिक्षा मागे वाळीतें ॥ ५७ ॥ मग मुखामी काळें लावूनी ॥ वाळीनें दिधला भिरकावूनी ॥ लंकेंत पडिला येऊनी ॥ खेद मनीं बहुत करी ॥ ५८ ॥ एकदा रावण पुसे विरिंचीतें ॥ आमुचा अंत कवणाचेनि हातें ॥ सत्य सांगावें आम्हांतें ॥ स्नेहचित्तेंकरूनियां ॥ ५९ ॥ विधि म्हणे अज-पाळसुतें[15] ॥ त्याचें नाम विख्यात दशरथ ॥ त्यासी पुत्र होईल रघुनाथ ॥ तुझा अंत त्याहातें ॥ १६० ॥ रावणें केला मग पण ॥ तरी मी दशरथासी वर्धान ॥ तों अजपाळपुत्राचें लग्न ॥ मांडिलें इकडे गजरेंसीं ॥ ६१ ॥ तों नारद सांगे अजपाळा ॥ जतन करी दशरथकौसल्या ॥ लग्नसोहळ्यामाजी घाला ॥ घालील अकस्मात रावण ॥ ६२ ॥ ऐसें सांगता कँमलोद्भवसुत[16] ॥ मग जहाज घालोनि समुद्रांत ॥ लग्न आरंभिलें तेथ ॥ महागजरेंकरोनियां ॥ ६३ ॥ सागरामाजी होतें लग्न ॥ रावणें ही गोष्ट ऐकोन ॥ तंव तो अँष्टव[17]-र्गाचा दिन ॥ घातला घाला रात्रींत ॥ ६४ ॥ जैसे अंतरिक्षपक्षी[18] येती ॥ तैसे राक्षस उड्या घेती ॥ जहाज फोडोनि चूर्ण करिती ॥ गदापर्वतघातेंचि ॥ ६५ ॥ वऱ्हाड सर्व बुडविलें ॥ रावणें कौसल्येसी धेतलें ॥ जिचें स्वरूप न जाय वर्णिलें ॥ तीस घातलें पेटींत ॥ ६६ ॥ पेटी लंकेसी नेतां उचलोन ॥ राक्षसें बोलविला एक मीनें[19] ॥ तो बाहेर आला सागरांतून ॥ त्यासी रावण आज्ञापी ॥ ६७ ॥

५ कोरडें अन्न, सुकी भिक्षा. ६ रावणपिता. ७ वाली. ८ पराक्रम. ९ शास्त्रार्थचर्चा. १० गाढवानें. ११ कोल्हा. १२ मानगुटीला. १३ कांखेंत. १४ अजराजाचा पुत्र. १५ नारद. १६ जेवणावळीचा. १७ आकाशांतील पक्षी. १८ मासा.

ही पेटी करावी जतन ॥ कोणा न द्यावी मजवांचून ॥ लंकेंत प्रवेशला रावण ॥ ती वस्तु जतन मत्स्य करी ॥ ६८ ॥ समुद्राचे गहन बेटीं ॥ जेथें न पडे कोणाची दृष्टी ॥ तेथें मत्स्यें ठेवूनि पेटी ॥ गेला आपण स्वकार्या ॥ ६९ ॥ कैंचा सोहळा कैंचें लग्न ॥ लोक समग्र गेले बुडोन ॥ तरी दशरथ समुद्रांतून ॥ उफाळ्ला[19] अवचिता ॥ १७० ॥ ज्याचे पोटीं येणार श्रीराम ॥ दुर्गम तेंचि होय सुगम ॥ विष तें अमृत होय उत्तम ॥ अपाय तोचि उपाय ॥ ७१ ॥ तरी अंतरिक्षें[20] चढे पांगुळ ॥ देव जरी होय दयाळ ॥ आंगणींच्या लतौ[21] सकळ ॥ कल्पलता होती त्या ॥ ७२ ॥ दशरथ पाहे समुद्रांत ॥ तों भंगलें जहाज अकस्मात ॥ वाहत वाहत आलें तेथ ॥ त्यावरी दशरथ बैसला ॥ ७३ ॥ वायुवेगें जहाज गेलें ॥ त्याच बेटासी येऊनि लागलें ॥ दशरथें पेटी ते वेळे ॥ सहज लीलें उघडिली ॥ ७४ ॥ तों आंत कौसल्यानिधान ॥ पाहतां वेधला अजनंदनें[22] ॥ तों नारद अकस्मात येऊन ॥ उभा ठाके ते वेळीं ॥ ७५ ॥ ज्यासी भूत भविष्य सर्व ज्ञान ॥ तेणें मुहूर्तवेळा पाहून ॥ तत्काळ दोघांसी लाविलें लग्न ॥ विधियुक्त विधिसुतें[23] ॥ ७६ ॥ वोहरांसी[24] आशीर्वाद देत ॥ जो वैकुंठवासी रमाकांत ॥ तो तुमचे पोटीं अवतरेल सत्य ॥ भयभीत होऊं नका ॥ ७७ ॥ दोघें पेटींत बैसवून ॥ वेगें गेला ब्रह्मनंदन ॥ तों लंकेंत दशवदन ॥ कर्मळासनाप्रति[25] सांगें ॥ ७८ ॥ तुवां जें भविष्य कथिलें ॥ तें अवघेंचि असत्य झालें ॥ जहाज फोडूनि लोक बुडविले ॥ हिरोनि आणिलें कौसल्येसी ॥ ७९ ॥ मग बोले चतुरानन ॥ मघांच दोघांसी लाविलें लग्न ॥ कदा न टळे ब्रह्मवचन ॥ कल्पांतींही दशवक्त्रा ॥ १८० ॥ येरू म्हणे जर जाहलें लग्न ॥ तरी मी तुज इच्छित देईन ॥ मग पेटी आणविली मत्स्यापासून ॥ सभेमध्यें रावणें ॥ ८१ ॥ त्यामाजी नवरी असे तत्त्वतां ॥ ब्रह्मा म्हणे उघडीं आतां ॥ तों पेटी उघडूनि पाहतां ॥ वोहरें उभयतां देखिलीं ॥ ८२ ॥ परम आश्चर्य करी रावण ॥ म्हणे स्वरें जाहलें ब्रह्मवचन ॥ तरी मी या दोघांसी वधीन ॥ शस्त्र घेऊन सरसावला ॥ ८३ ॥ कौसल्या जाहली भयभीत ॥ पतीचें वदन विलोकित ॥ परी निर्भय वीर दशरथ ॥ नौ[26] भी म्हणत कौसल्येतें ॥ ८४ ॥ मी सूर्यवंशीं महावीर ॥ हें मशक काय दशकंदर ॥ दाहीं दाही शिरें समग्र ॥ खंडीन आतां येथेंचि ॥ ८५ ॥ मग रावणाचा हात ॥ धरिता जाहला विष्णुसुतें[27] ॥ म्हणे मज देईं इच्छित ॥ माग म्हणत दशवदन ॥ ८६ ॥ हीं दोघें वधूवरें आतां ॥ मज देईं लंकानाथा ॥ मंदोदरी म्हणे तत्त्वतां ॥ वचन असत्य न करावें ॥ ८७ ॥ गेला तरी जावो प्राण ॥ परी असत्य न करावें वचन ॥ यांसी वधितां येथेंचि विघ्न ॥ उठेल दारुण आतांचि ॥ ८८ ॥ बुद्धीचा प्रवर्तक भगवंत ॥ ब्रह्मयासी म्हणे नेईं त्वरित ॥ तेणें पेटी उचलोन अकस्मात ॥ अयोध्येसी आणिली ॥ ८९ ॥ अयोध्येंत जाहला जयजयकार ॥ वेगें पातला शैंचीवर[28] ॥ दशरथावरी धरी छत्र ॥ कर्तव्य विचित्र हरीचें ॥ १९० ॥ दशरथ राज्यीं स्थापून ॥ विधि आणि सहस्रनेंयन[29] ॥ वेगें पावले स्वस्थान ॥ आनंदें मनीं उचंबळले ॥ ९१ ॥ पुष्पकीं

१९ वर आला. २० आकाशांत. २१ वेली. २२ दशरथ. २३ ब्रह्मदेवपुत्र नारदानें. २४ वधूवरांस. २५ ब्रह्मदेवाला. २६ भिऊं नको. २७ इंद्राणीपति, इंद्र.

बैसोनि जातां दशकंदर[२८] ॥ एक देवस्त्री देखिली सुंदर ॥ तिचा बळेंचि धरिला कर ॥ तिसीं अविचार करूं इच्छी ॥ ९२ ॥ तंव ते आक्रंदत नितंबिनी[२९] ॥ रावणें सोडिली तेचि क्षणीं ॥ ती ब्रह्मयापासीं जाऊनी ॥ गान्हाणें सर्व सांगत ॥ ९३ ॥ रावणासी शापी सत्यलोकवासी ॥ परस्त्रीवर बलात्कार करिसी ॥ तरी शतखंडें निश्चयेंसी ॥ तुझे तनूचीं होतील ॥ ९४ ॥ जैसा सिंह आंडांत[३०] पडिला ॥ कीं महाव्याघ्र सांपळ्यांत सांपडला ॥ तैसा रावण बांधला ॥ शापपाशेंकरोनियां ॥ ९५ ॥ रावण पाप करी दारुण ॥ गांजिले गाई-ब्राह्मण ॥ पृथ्वी आक्रंदली पूर्ण ॥ गेली शरण ब्रह्मया ॥ ९६ ॥ गाईच्या रूपें धरित्री[३१] ॥ आक्रंदे विरिंचीच्या द्वारीं ॥ प्रजा ऋषिगण ते अवसरीं ॥ शरण आले विधातया[३२] ॥ ९७ ॥ विधि बाहेर आला ते क्षणीं ॥ तों समस्त सांगती गान्हाणीं ॥ रावणें यज्ञ टाकिले मोडोनी ॥ सत्कर्म अवनीं[३३] चालेना ॥ ९८ ॥ एक म्हणे माझिया मर्सा[३४] ॥ विघ्न करी नित्य ताटिका ॥ एक म्हणे सुबाहु मारीच देखा ॥ क्रतु[३५] माझा विध्वंसिती ॥ ९९ ॥ एक सांगती ऋषीश्वर ॥ आमुचीं कुटुंबें समग्र ॥ कुंभकर्णें ग्रासिलीं थोर ॥ अनर्थ मांडिला विधातया ॥ २०० ॥ त्रिदश[३६] आणि पुरंदर[३७] ॥ म्हणती बंदी पडले समग्र ॥ कोणासी नाटोपे दशकंधर ॥ काय विचार करावा ॥ १ ॥ मग देव प्रजा ऋषिगण ॥ मुख्य परमेष्ठी विष्णुनंदन ॥ क्षिरसागरासी येऊन ॥ अपार स्तवन मांडिलें ॥ २ ॥ शेषशयन नारायण ॥ कोटि-सूर्यांची प्रभा पूर्ण ॥ साठी सहस्र योजन ॥ शेषतल्पक शुभ्र तो ॥ ३ ॥ लक्षार्ध योजनें प्रमाण ॥ वरी पहुडला श्रीभगवान ॥ तो सच्चिदानंद रमारमण ॥ अलंकारें मंडित ॥ ४ ॥ जे अनंत शक्तींची स्वामिणी ॥ कमला विलसंत[३८] चरणीं ॥ जिच्या इच्छामात्रें करूनी ॥ ब्रह्मांड हें विस्तारलें ॥ ५ ॥ एक लक्ष योजनें देदीप्य[३९] ॥ विराजमान मध्य मंडप ॥ तेथींचें तेज पाहतां अमूप ॥ मार्तंड शशी लोपती ॥ ६ ॥ गरुडपाचूंचें जोतें स्वयंभ ॥ वरी हिऱ्यांचे विशाळ स्तंभ ॥ माणिकांचीं उथाळीं सुप्रभ ॥ स्वालीं तोळंबे[४०] हिरियांचे ॥ ७ ॥ सुवर्णाचीं तुळवटें प्रचंडें ॥ आरक्त रत्नांचे पसरिले दांडे ॥ वरी किलऱ्या झळकती निवाडें[४१] ॥ गरुडपाचूंचिया साजिऱ्या ॥ ८ ॥ असो पैलतीरीं देव सकळी ॥ उभे ठाकले बद्धांजुळी[४२] ॥ म्हणती पूर्णब्रह्म वनमाळी ॥ भक्तपाळका सर्वेशा ॥ ९ ॥ जय जय अनंतब्रह्मांडना-यका ॥ वेदवंद्या वेदपाळका ॥ विश्वंभरा विश्वव्यापका ॥ विश्वरक्षका जगद्गुरो ॥ २१० ॥ पुराणपुरुषा परात्परा ॥ पंकजलोचना पयो-ब्धिविहारा[४२] ॥ परमात्मया परम उदारा ॥ भुवनसुंदरा भवहृदया ॥ ११ ॥ कर्ममोचका करुणाकरा ॥ कैवल्यदायका कमळावरा ॥ कर्मातीता कैटभसंहारा ॥ कनकवसना करुणाब्धे ॥ १२ ॥ जय जय सकळदेवपाळका ॥ जय जय सकळचित्तचाळका ॥ निर्विकारा निरुपाधिका ॥ निर्गुणा निश्चळा निःसंगा ॥ १३ ॥ केशवा हरी मुरमर्दना ॥ रमावल्लभा मधुसूदना ॥ सकळदुरितकाननदहना ॥ तम-

२८ रावण. २९ स्त्री. ३० बिळांत. ३१ पृथ्वी. ३२ ब्रह्मदेवाला. ३३ पृथ्वीवर. ३४ यज्ञाला. ३५ देव. ३६ इंद्र. ३७ शोभत. ३८ प्रकाशमय. ३९ तुळ्या. ४० अत्यंत. ४१ हात जोडलेले. ४२ क्षीरसागरीं क्रीडा करणाऱ्या.

नाशना प्रतापसूर्या ॥ १४ ॥ प्रळयसमुद्रीं तूं जनार्दना ॥ विशाळ मीनरूप धरून ॥ महादैत्य विदारून ॥ वेदोद्धार तुवां केला ॥ १५ ॥ परम विशाळ मंदराचळ ॥ भेदीत चालिला पाताळ ॥ तूं कूर्मरूप धरूनि घननीळ ॥ पृष्ठी खालती दिधली ॥ १६ ॥ हिरण्याक्ष दैत्य सबळ ॥ कांखेसी घेऊन जातां भूमंडळ ॥ वराहवेष तूं तमाळनीळ ॥ दानव सकळ मर्दिले ॥ १७ ॥ दानववाळकप्रह्लाद ॥ त्यास तुझा अखंड छंद ॥ मग करूनि स्तंभभेद ॥ प्रगटलासी नरहरी ॥ १८ ॥ इंद्राचे कैवारें बळी ॥ तो तुवां घातला पाताळीं ॥ त्याचे द्वारीं तूं वनमाळी ॥ द्वारपाळ अद्यापी ॥ १९ ॥ नमतां सेना रथ सेवक ॥ फरशधर तूं भृगुकुलतिलक ॥ तीनें सप्तकें उर्वी निःशंक ॥ निक्षत्री केली हरी त्वां ॥ २२० ॥ आतां रावण कुंभकर्ण असुर ॥ इहीं त्रिभुवन पीडिलें समग्र ॥ भक्तकैवारी तूं सर्वेश्वर ॥ रक्षीं सत्वर दासांतें ॥ २१ तों क्षीरसागरीहूनि अद्भुत ॥ ध्वनि उठली अकस्मात ॥ रविकुळीं राजा दशरथ ॥ अवतार तेथें घेतों मी ॥ २२ ॥ शेष होईल लक्ष्मण ॥ भरत होईल पांचजन्य ॥ सुदर्शन तोचि शत्रुघ्न ॥ अवतार पूर्ण हे माझे ॥ २३ ॥ जनकराजा मिथिलापुरीं ॥ कर्मळा जाईल त्याचे उदरीं ॥ तुम्ही देव एकसरीं ॥ वानररूपें अवतरा ॥ २४ ॥ शिव तो होईल हनुमंत ॥ ब्रह्मा तो ऋक्ष जांबुवंत ॥ धन्वंतरी तो सुषेण सत्य ॥ अंगिरापति तो अंगद जाणिजे ॥ २५ ॥ अदिति आणि कश्यप ॥ तेचि कौसल्या आणि दशरथ भूप ॥ तेथें अवतरेल चित्स्वरूप ॥ आत्माराम रघुवीर ॥ २६ ॥ सुग्रीव तो जाणिजे मित्रे ॥ नळ तो अनळ साचार ॥ नील अनिळअवतार ॥ यम तोचि ऋषभ पैं ॥ २७ ॥ ऐसी आज्ञा होतां समस्त ॥ देव जयजयकारें गर्जत ॥ आनंद न माय अंबरांत ॥ गेले त्वरित स्वस्थाना ॥ २८ ॥ श्रीरामकथा अति रसाळ ॥ हेंचि मानससरोवर निर्मळ ॥ तुम्ही चतुर श्रोते मराळ ॥ बैसा सकळ एकपंक्तीं ॥ २९ ॥ श्रीरामकथा करितां श्रवण ॥ होय पापांचें सर्व खंडण ॥ चिंतिले मनोरथ होती पूर्ण ॥ भक्तिकरून वाचितां ॥ २३० ॥ श्रोतयांसी पडतां विघ्न ॥ श्रीराम निवारित स्वयें आपण ॥ सर्व काल रामचरणीं लीन ॥ असतां भवबंधन चुकेल ॥ ३१ ॥ ब्रह्मानंदा आत्मयारामा ॥ भक्तकामकल्पद्रुमा ॥ श्रीधरवरदा पूर्णब्रह्मा ॥ अक्षय अनामा अभंगा ॥ ३२ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकिनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ द्वितीयाध्याय गोड हा ॥ २३३ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥

---

४३ परशुधर. ४४ परशुराम. ४५ तीन सातवेळां, एकवीस वेळां. ४६ पृथ्वी. ४७ शंख. ४८ लक्ष्मी. ४९ सूर्य. ५० अग्नि. ५१ वायूचा अवतार. ५२ आकाशांत. ५३ हंस.

३

॥ श्रीगणेशाय नमः ॥ तुम्ही संत श्रोते भाविक ॥ कविमुद्रारत्नपरीक्षक ॥ श्रोता देखोनि मृगांक ॥ वक्ता सोमकांत पाझरे ॥ १ ॥ तुम्ही बोधसमुद्रींचीं मुक्तें[3] पवित्रें ॥ कीं चैतन्यनभींचीं दिव्य नक्षत्रें ॥ कीं वैराग्यवनींचीं सुमनें विचित्रें ॥ संतरूपें विकासलीं ॥ २ ॥ निवडलीं रामकथाभृतपात्रें ॥ कीं ज्ञानभरित पिकलीं क्षेत्रें ॥ कीं भजनपंथींचीं सरोवरें ॥ संतरूपें भरलीं हो ॥ ३ ॥ कीं भवजलद-जालप्रभंजनें[4] ॥ अज्ञानतिमिरच्छेदक चंडकिरणें[5] ॥ जो कां मदगजविदारक पंचानन ॥ मत्सरकाननदहन जो ॥ ४ ॥ रामविजय ग्रंथ वैरागर[6] ॥ साहित्यरत्नें निघती अपार ॥ हीं तुम्हीं अंगीकारावीं वारंवार ॥ कासयासी प्रार्थीवें ॥ ५ ॥ कमळकोशींचा मकरंद बरा ॥ हें नलगे सांगावें भ्रमरा ॥ राजहंसासी घे मुक्तचारा ॥ ऐसें किमर्थ प्रार्थीवें ॥ ६ ॥ शीतळ होईं चंद्रमंडळा ॥ कासया सांगावें वेळोवेळां ॥ मित्रासी प्रकाश आगळा ॥ पाडीं कासया म्हणावें ॥ ७ ॥ संतांसी धरा क्षमा शांती ॥ ऐसें वदे तोचि मंदमती ॥ प्रेमळासी करीं भक्ती ॥ सांगावें नलगेचि हें ॥ ८ ॥ तैसें पंडित तुम्हीं ज्ञानघन ॥ करा सुरस रामकथाश्रवण ॥ हें वारंवार म्हणतां दूषण ॥ वक्तयासी झगटेल ॥ ९ ॥ असो पूर्वाध्यायीं कथा निश्चितीं ॥ सांगितली रावणाची उत्पत्ती ॥ कौसल्या दशरथ अयोध्येप्रती ॥ नेऊनि विधीनें स्थापिलीं ॥ १० ॥ सूर्यवंशभूषण अद्भुत ॥ अयोध्यापती राजा दशरथ ॥ ज्याची पट्टराणी विख्यात ॥ कुशल बहुत कौसल्या ॥ ११ ॥ सुमित्रा कैकयी स्वरूपवंत ॥ दोघींस वरी राव दशरथ ॥ आणिक सातशें परिणीत ॥ भोगांगना सुंदरा ॥ १२ ॥ ज्ञानकळा कौसल्या सती ॥ सुमित्रा केवळ सद्भक्ती ॥ कैकयी ते कपटप्रकृती ॥ रजतमयुक्त सर्वदा ॥ १३ ॥ केवळ विवेक मूर्तिमंत ॥ तोचि अजसुत दशरथ ॥ जो परमयोद्धा रणपंडित ॥ धनुर्विद्या सर्व जाणे ॥ १४ ॥ अंधारामाजी शब्द उठतां ॥ तेथेंचि बाण मारी अवचिता ॥ धन्य त्याची हस्तकुशलता ॥ वीर दशरथाऐसा नसे ॥ १५ ॥ परी पोटीं नसे पुत्रसंतान ॥ तेणें राजेंद्र असे उद्विग्न ॥ पुत्राविण शून्य सदन ॥ बोलती शास्त्रज्ञ पंडित १६ ॥ शरीर जैसें प्राणाविण ॥ तारुण्याविण पंचबाण ॥ दयेविण व्यर्थ ज्ञान ॥ शांतिवांचून वैराग्य ॥ १७ ॥ संपत्ति जैसी धर्मेविण ॥ पंडितावांचून सभासदन ॥ कीं केरणीविण व्यर्थ ज्ञान ॥ दीपेंविण मंदिर जेवीं ॥ १८ ॥ कीं वेदांतज्ञानावांचून ॥ कोरडी व्युत्पत्ति[11] व्यर्थ ज्ञान ॥ कीं सत्पात्रावांचून दान ॥ कीं स्नेहेंविण बंधु जैसा ॥ १९ ॥ कीं जळेंविण वापिका[12] ॥ कीं नृपाविण नगर देखा ॥ कीं नासिकाविण मुखा ॥ शोभा जैसी न येचि ॥ २० ॥ कीं फळेंविण तरुवर ॥ कीं रामस्मरणाविण मंदिर ॥ तैसा पुत्राविण वंश पवित्र ॥ सर्वथा पावन नव्हेचि ॥ २१ ॥ असो राजा दशरथ ॥ संततीलागीं चिंताक्रांत ॥ सदा विपिनें[13] गहन हिंडत ॥ मृगयामिषेंकरोनियां ॥ २२ ॥ नावडे छत्रसिंहासन ॥ नावडे चातुर्यकळा गायन ॥ बहुत केले प्रयत्न ॥ परी संतान नव्हेचि ॥ २३ ॥ तों दशरथें स्वप्न देखिलें ॥ दोघे पुरुष आपण वधिले ॥ आणि एके स्त्रियेसी मारिलें ॥ अपराधेंविण

१ चंद्र. २ चंद्रकांतमणि. ३ मोत्यें. ४ संसाररूपी मेघसमुदायाला उडविणारा तुफानी वारा. ५ अज्ञानरूपी अंधकाराचा नाश करणारा सूर्य. ६ दिव्यांची खाण. ७ सूर्यकळा. ८ ज्ञानाचे मेघ. ९ मदन. प्रेम. १० कृतीवांचून, बागणुकीवांचून. ११ शास्त्रपठण. १२ विहीर. १३ वनें.

तत्त्वतां ॥ २४ ॥ गजबजोनि उठिला त्वरित ॥ कोणासीं न बोले मूकवत ॥ वसिष्ठगृहास जाऊन त्वरित ॥ नमोनि स्वप्न सांगतसे ॥ २५ ॥ गुरु बोले हें दुष्ट स्वप्न ॥ तीन श्वापदें येईं वधोन ॥ मग याची शांति करून ॥ दोषनिवारण करावें ॥ २६ ॥ गुरुआज्ञेनें ते दिवसीं ॥ राजेंद्र निघाला मृगयेसी ॥ वांसरमणि गेला अस्तासी ॥ परी श्वापद न सांपडे ॥ २७ ॥ पडला अत्यंत अंधकार ॥ एकला हिंडे नृपवर ॥ धनुष्यासी लावूनि शर ॥ शोधी कांतार तेधवां ॥ २८ ॥ तों एका सरोवराचे तीरीं ॥ राजा गुप्त बैसे वृक्षावरी ॥ कानाडी ओढूनि ते अवसरीं ॥ कर्णी ऐके सांचोलें ॥ २९ ॥ तों ते मार्गीं श्रावण ॥ आला मायबाप घेऊन ॥ दिवसा बहुत विघ्नें आणि उष्ण ॥ म्हणोनि रात्रीं गमन करी ॥ ३० ॥ दोघें वृद्धें स्कांदीं घेउनी ॥ श्रावण तीर्थें हिंडे मेदिनीं ॥ त्या सरोवराचे तीरीं येउनी ॥ उभा राहिला नावेक ॥ ३१ ॥ तों तीं वृद्धें म्हणती श्रावणा ॥ आम्हां करवीं उदकपाना ॥ ऐकतां ऐसिया वचना ॥ कावड स्कालीं ठेविली ॥ ३२ ॥ हातीं कमंडलु घेऊन ॥ जीवेंनांत प्रवेशला श्रावण ॥ दशरथें सांचोलें ऐकोन ॥ निर्वाणबाणें सोडिला ॥ ३३ ॥ सपक्ष बाण हृदयीं भेदला ॥ हातींचा कमंडलु स्कालीं पडला ॥ देह भूमीवरी टाकिला ॥ प्राण चालिला श्रावणाचा ॥ ३४ ॥ म्हणे कोणे सभाग्याचा बाण ॥ करीत आला रामस्मरण ॥ हृदय निवालें संपूर्ण ॥ केलें पावन मजलागीं ॥ ३५ ॥ ऐकोनि मनुष्याचें वचन ॥ नृपवर जवळी आला धांवोन ॥ तंव तो पडिलासे श्रावण ॥ रामस्तवन करीतचि ॥ ३६ ॥ मग म्हणे कर्म पापकारी ॥ पडली हत्या मजवरी ॥ श्रावण म्हणे राया न करीं ॥ स्वेद कांहीं सर्वथा ॥ ३७ ॥ माझीं मायबापें वृद्धें दीन ॥ तयांसी करवीं उदकपान ॥ मग मी सोडीन प्राण ॥ सत्य जाण राजेंद्रा ॥ ३८ ॥ दोघें वृद्धें अत्यंत पाहीं ॥ त्यांचे सेवेसी कोणी नाहीं ॥ दशरथ गहिंवरला हृदयीं ॥ शोकाकुलित जाहला ॥ ३९ ॥ श्रावण म्हणे दशरथा ॥ उदक दोघां पाजून त्वरिता ॥ मग हे सांगावी वार्ता ॥ नाहीं तरी प्राण त्यागिती ॥ ४० ॥ उदक नेतां अयोध्यानराणा ॥ वृद्धें म्हणती बा रे श्रावणा ॥ तंव तो न बोलेचि वचना ॥ कांहीं केलिया सर्वथा ॥ ४१ ॥ कां रे श्रावणा न बोलसी ॥ उदक मागितलें येवढे निशीं ॥ बा रे म्हणोन कोपलासी ॥ शिणलासी पाडसा ॥ ४२ ॥ उदयाचळीं मावळेल मित्रें ॥ शेष सांडील भूमिभार ॥ तीव्र तपेल रोहिणीवरे ॥ तरी क्रोध अणुमात्र न ये तूतें ॥ ४३ ॥ जैसें गंगेचें निर्मळ जीवन ॥ तैसें श्रावणा तुझें मन ॥ तान्हया कां रे न बोलसी वचन ॥ राजा ऐकोनि गहिंवरे ॥ ४४ ॥ मग अजराजपुत्र बोलिला ॥ म्यां अवचितां श्रावण वधिला ॥ तंव तिहीं धरणीवर देह टाकिला ॥ प्राण जाहला कासाविस ॥ ४५ ॥ आठवोनि श्रावणाचे गुण ॥ दोघें आक्रंदती दीनवदन ॥ ऐसा पुत्र हें त्रिभुवन ॥ शोधितांही न सांपडे ॥ ४६ ॥ अहा रे पुत्रा श्रावणा ॥ गंभीरा गुणनिधाना ॥ आमुचे प्राण करिती प्रयाणा ॥ श्रावणा वदन दावीं कां ॥ ४७ ॥ या ब्रह्मांडमंडपांत ॥ श्रावणाऐसा नाहीं सुत ॥ जैसीं लक्ष्मी आणि वैकुंठ-

१४ दिनकर सूर्य. १५ उलथ्य. १६ कानापर्यंत ताणून ओढलेली धनुष्याची दोरी. १७ चाहूल, हालचालीचा आवाज. १८ पृथ्वीवरील. १९ क्षणभर. २० पाण्यांत. २१ प्राणघातक बाण. २२ अयोध्येचा राजा दशरथ. २३ रात्री. २४ सूर्य. २५ रोहिणीपति चंद्र. २६ निघून जात आहेत.

नाथ ॥ तैसीं भावितें मातापिता ॥ ४८ ॥ जो न करी मातृपितृभजन ॥ जळो तयाचें ब्रह्मज्ञान ॥ तो षट्शास्त्रें आला पढून ॥ तरी त्याचें दर्शन न व्हावें ॥ ४९ ॥ त्याचें जप तप अनुष्ठान ॥ दान अध्ययन श्रवण मनन ॥ कळा चातुर्य व्यर्थ ज्ञान ॥ जैसें भाषण मद्यपियाचें ॥ ५० ॥ तेणें अभ्यासिल्या चौसष्टी कळा ॥ त्या अवघ्याचि जाहल्या विकेळा ॥ जयासी मातापित्यांचा कंटाळा ॥ त्या चांडाळा न शिवावें ॥ ५१ ॥ माता पिता गुरु देव जाण ॥ चारही दैवतें समसमान ॥ तोचि परम ज्ञाता जाण ॥ न मोडी वचन श्रेष्ठांचें ॥ ५२ ॥ म्हणोनि पुत्र एक श्रावण ॥ आठवूनि तयाचे गुण ॥ दोघें पडलीं मूर्च्छा येऊन ॥ जावया प्राण एकवटले ॥ ५३ ॥ मग तीं शाप देती प्राण जातां ॥ म्हणती तुझाही पुत्र पुत्र करितां ॥ प्राण जाईल रे दशरथा ॥ आम्हांऐसाचि तत्काळ ॥ ५४ ॥ मग तिहीं सोडिला प्राण ॥ रायें केलें तिघांचें दहन ॥ उत्तरकार्य संपादून ॥ अयोध्येसी परतला ॥ ५५ ॥ मनांत हर्ष मानी नृपवर ॥ मज शाप जाहला तो केवळ वर ॥ यांचे शापें तरी पुत्र ॥ हो कां सत्वर मजलागी ॥ ५६ ॥ अयोध्येसी आला दशरथ ॥ वसिष्ठासी सांगितला वृत्तांत ॥ पुढें द्वादश वर्षेंपर्यंत ॥ दुष्काळ पडला पृथ्वीवरी ॥ ५७ ॥ न वर्षे कदा बलाहक ॥ अत्यंत तीव्र तपे अर्क ॥ धान्य तृण जीवन सकळिक ॥ नाहीं निष्टंकें पृथ्वीवरी ॥ ५८ ॥ गायी ब्राह्मण पीडिले बहुत ॥ दैत्यगुरु परम कापट्यवंत ॥ तेणें जलद आकर्षिले समस्त ॥ वृष्टि एकोक्ष होऊं नेदी ॥ ५९ ॥ वृष्टि जाहलिया परिपूर्ण ॥ सुखी होतील गोब्राह्मण ॥ ते करितील महायज्ञ ॥ सुरांस पूर्ण बळ तेणें ॥ ६० ॥ वृषपर्वा दैत्येंद्र थोर ॥ त्यासी साह्य जाहला शुक्र ॥ निर्जरभारांसहित शक्रें ॥ युद्ध करीत तयासीं ॥ ६१ ॥ बहुत दिवस जाहला संग्राम ॥ परी शुक्र कपटी पूर्ण परम ॥ मेघ वर्षों नेदी अधम ॥ सुत्रामा चिंताक्रांत बहुत ॥ ६२ ॥ वज्रधरासी म्हणे अंगिरा-सुत ॥ अयोध्येचा राजा दशरथ ॥ तो प्रतापार्क रणपंडित ॥ जिंकील दैत्य क्षणमात्रें ॥ ६३ ॥ मग मातली आणी विजयरथा ॥ मूळ पाठविलें दशरथा ॥ मातली सांगे समूळ वार्ता ॥ अनावृष्टिकारणें जे ॥ ६४ ॥ ऐकोनि दैत्यप्रताप अद्भुत ॥ तत्काळ रथीं बैसला दशरथ ॥ तों कैकयी रायास प्रिय अत्यंत ॥ काय बोलत तेधवां ॥ ६५ ॥ म्हणे मी समागमें येईन ॥ आणि संग्राम तुमचा पाहीन ॥ राजा म्हणे तूं सुकुमार पूर्ण ॥ युद्धकंदन ते स्थानीं ॥ ६६ ॥ येरी म्हणे तुम्ही जवळीं असतां ॥ मज भय नाहीं सर्वथा ॥ ऐसे तिचे बोल ऐकतां ॥ घेतली रथावरी तेधवां ॥ ६७ ॥ निराळमार्गें रथ ते वेळीं ॥ घेऊनि जात चपळ मातली ॥ देवदैत्यांच्या रणमंडळीं ॥ रथ अकस्मात उतरला ॥ ६८ ॥ वैकुंठीहूनि विनतासुत ॥ क्षीराब्धितटीं उतरे अकस्मात ॥ तैसा राजा दशरथ ॥ सुरसमुदायांत उतरला ॥ ६९ ॥ अजपुत्र दखोनि पाकशासन ॥ देता जाहला क्षेमालिंगन ॥ दशरथ धनुष्य चढवून ॥ उभा ठाकला रणांगणीं ॥ ७० ॥ बाणापाठीं बाण सोडित ॥ जैसे शब्दामागें शब्द येत ॥ कीं मेघ धारा वर्षत ॥ शर सोडित त्याच रीतीं ॥ ७१ ॥ जैशा मेघाबाहेर

२७ मानीत. २८ दारुण्याचे. २९ व्यर्थ. ३० मेघ. ३१ सूर्य. ३२ अगदीं. ३३ शुक्राचार्य. ३४ देवांसहित. ३५ इंद्र. ३६ इंद्र. ३७ बृहस्पती. ३८ प्रतापसूर्य. ३९ बोलावणें. ४० निरालंब–आधाररहित-अशा आकाशामार्गानें. ४१ गरुड. ४२ दशरथ.

निवडोनी ॥ निघती कल्पांतसौदामिनी ॥ तैसा एकेक बाण तूणीरांतुनी ॥ ओढोनि काढी दशरथ ॥ ७२ ॥ दैत्यांचीं शिरें अकस्मात ॥ गगनीं उडती असंख्यात ॥ जैसे वृक्षावरोनि पक्षी उडत ॥ प्रातःकाळीं एकदांचि ॥ ७३ ॥ माघारले दैत्यभार तेव्हां ॥ तों पुढें आला वृषपर्वा ॥ कपटकळा युद्धमावो ॥ नानाप्रकारें दावित ॥ ७४ ॥ परी दशरथबाणसामर्थ्य ॥ कापट्यविद्या न चले तेथ ॥ जैसें मूर्खाचें वाग्जाळ समस्त ॥ उच्छेदी पंडित एकशब्दें ॥ ७५ जैसा मंत्रवादी महामती ॥ त्यापुढें भूतचेष्टा न चालती ॥ तैशा दशरथापुढें युद्धगती ॥ कदा न चालती तयाच्या ॥ ७६ ॥ देखोनि दशरथाचा प्रताप तेव्हां ॥ विरथ जाहला वृषपर्वा ॥ पाठी देऊनि तेधवां ॥ निघता जाहला सवेग ॥ ७७ ॥ धूर्तें शिंपिला वैश्वानर ॥ तैसा क्रोधायमान जाहला शुक्र ॥ रथीं बैसोनियां शर ॥ सोडिता जाहला प्रतापें ॥ ७८ ॥ जातवेदास्त्र ते अवसरीं ॥ सोडिता जाहला देवांवरी ॥ अयोध्याधीशें झडकरी ॥ जलदास्त्र प्रेरिलें ॥ ७९ ॥ शुक्रें वातास्त्र सोडिलें अद्भुत ॥ येरें आड घातले पर्वत ॥ वात कोंडिला समस्त ॥ दैत्यगुरूनें देखिलें ॥ ८० ॥ मग सोडिलें वज्रास्त्र ॥ पर्वत फोडिले समग्र ॥ दशरथें सोडिलें माहेश्वर ॥ देखोनि वज्रास्त्र विरालें ॥ ८१ ॥ शुक्र परम क्रोधायमान ॥ काढिला एक निर्वाण-बाण ॥ रथाचा आंस छेदून ॥ टाकिता जाहला तेधवां ॥ ८२ ॥ आंस छेदितां अकस्मात ॥ खालीं पडावा जों दशरथ ॥ तों कैकयी देखोनि धांवत ॥ घालोनि हात आंस धरी ॥ ८३ ॥ पर्वताकार रथ थोर ॥ दंडावरी घेतला भार समग्र ॥ वीरश्रीरंगें नृपवर ॥ समाचार नेणे तो ॥ ८४ ॥ दशरथें सोडिला निर्वाणबाण ॥ तोडिला कैवीचा स्यंदन ॥ अश्वांसहित कुटके करून ॥ रणमंडळीं पाडिला ॥ ८५ ॥ विरथ जेव्हां जाहला शुक्र ॥ दशरथें काढिला सूर्यमुख शर ॥ म्हणे यार्चे छेदीन शिर ॥ कापट्यमुकुटासहित पैं ॥ ८६ ॥ मागुती विचारी अंजनंदन ॥ शुक्र तरी केवळ ब्राह्मण ॥ याचा रक्षोनियां प्राण ॥ मुकुट मात्र छेदावा ॥ ८७ ॥ निमिष न लागतां गेला बाण ॥ मुकुट पाडिला तळीं छेदून ॥ मयभीत भृगुनंदन ॥ पळता जाहला तेधवां ॥ ८८ ॥ देव करिती जयजयकार ॥ पळूं लागला दैत्यभार ॥ जैसा महावात सुटतां समग्र ॥ भूस उडे अंबरीं ॥ ८९ ॥ रायें कोदंडासी घातली गवसणी ॥ तूणीर ठेविला आवरण घालोनी ॥ जैसा कुंडामाजी देदीप्य अग्नी ॥ आच्छादित याज्ञिक ॥ ९० ॥ दशरथ पाहे सावधान ॥ तों कैकयीनें हात घालून ॥ धरिला असे महास्यंदन ॥ वर्तमान कळलें तें ॥ ९१ ॥ आश्चर्य करी नृपवर ॥ आजिचें युद्ध अनिवार ॥ आम्हांसी जयलाभ समग्र ॥ कैकयीनें दीधला ॥ ९२ ॥ जैसें घर पडतां अकस्मात ॥ निजबळें उचली बळवंत ॥ तैसा कैकयीनें आजि रथ ॥ सांवरिला रणांगणीं ॥ ९३ ॥ खालीं उतरून दशरथ ॥ प्रियेलागीं आलिंगित ॥ म्हणे दोन वर मागें त्वरित ॥ जे कां अपेक्षित मानसीं ॥ ९४ ॥ कैकयी आनंदली थोर ॥ म्हणे मी जेव्हां मागेन वर ॥ तेव्हां मज द्यावे साचार ॥ म्हणोनि भाष घेतली ॥ ९५ ॥ महायुद्धीं जय पूर्ण ॥ कैकयीस यावया

४३ कल्पांतकाळींच्या विजा. ४४ भात्यांतून. ४५ दैत्यांचा राजा. ४६ युद्धाचे मायावी प्रकार. ४७ पंचाक्षरी. ४८ तुपानें. ४९ अग्नि. ५० दैत्यांचा गुरु. ५१ अग्निअस्त्र. ५२ दशरथानें. ५३ पर्जन्यास्त्र. ५४ शिवाचें अस्त्र. ५५ चक्रामधील कणा ( आंस ). ५६ धनुष्याला. ५७ भाता.

काय कारण ॥ काय होतें तीस वरदान ॥ तेंचि कारण ऐक पां ॥ ९६ ॥ पितृगृहीं कैकयी असतां ॥ एक तापसी आला अवचितां ॥ तयासी प्रार्थोनियां माता ॥ राहविती जाहली कैकयीची ॥ ९७ ॥ ऋषि बैसला अनुष्ठानातें ॥ माता निरोपी कैकयीतें ॥ उपकरण[58]-सामग्री लागेल यातें ॥ ती सिद्ध करोनि देइंजे ॥ ९८ ॥ पुष्पें धूप दीप आरती ॥ सिद्ध करोनि देत ऋषीप्रती ॥ येरू प्राणायाम करूनि निश्चितीं ॥ ध्यानीं जाहला निमग्न ॥ ९९ ॥ तंव कैकयीनें घेऊनि मॅस ॥ लाविली ऋषीच्या मुखास ॥ ध्यान जाहलिया तो महा-पुरुष ॥ स्वमुख करें पुसीतसे ॥ १०० ॥ तों हस्तास लागलें काळें ॥ कर्तृत्व कुमारीचें कळलें ॥ ऋषीनें शापिलें ते वेळे ॥ वदन काळें तुझें हो कां ॥ १ ॥ तुजवरी अपेश येईल प्रचंड ॥ जगांत होईल काळें तोंड ॥ पुत्रद्वेष करिसील उदंड ॥ नसतें बंड वाढविसी ॥ २ ॥ मातेनें समाचार ऐकोन ॥ वेगीं धरिले ऋषीचे चरण ॥ स्वामी कैकयी बाळ अज्ञान ॥ नेणोनि कर्म हें केलें ॥ ३ ॥ कांहीं द्यावें जी वरदान ॥ मग ऋषी कृपाळु होऊन ॥ म्हणे संग्रामीं पतीलागून ॥ जय देईल महारणीं ॥ ४ ॥ पूजासामग्री दिधली समस्त ॥ तरी हा हस्त होईल यशवंत ॥ त्या वरें या समयीं अद्भुत ॥ जय प्राप्त कैकयीतें ॥ ५ ॥ असो इंद्र आणि बृहस्पती[59] ॥ दशरथाचें यश वानिती ॥ वस्त्रें भूषणें अमरपती ॥ देता जाहला रायातें ॥ ६ ॥ वस्त्राभरणें अद्भुतें ॥ दिव्यमणि दिधला कैकयीतें ॥ येरीनें घातला वेणीतें ॥ परम प्रकाशवंत जो ॥ ७ ॥ तों देवआचार्य बोले वचन ॥ रायासी काय आहे पुत्रसंतान ॥ दशरथ म्हणे पुत्रवदन ॥ देखिलें नाहीं अद्यापि ॥ ८ ॥ सुरगुरु म्हणे राया वरिष्ठा ॥ त्रिभुवनपति[60] येईल तुझिया पोटा ॥ ज्याचें ध्यान लागलें नीलकंठा[61] ॥ सनकादिक भक्तांसी ॥ ९ ॥ जो मायाचक्रचाळक ॥ अनंत ब्रह्मांडांचा नायक ॥ जो कमलोद्भवाचा जनक ॥ तो पुत्र देख तुझा राया ॥ ११० ॥ जो वेद-शास्त्रांचा जिव्हार[63] ॥ जो आदिमायेचा निजवर ॥ तो पुराणपुरुष[64] अगोचर ॥ तुझा पुत्र होईल कीं ॥ ११ ॥ विभांडकाचा पुत्र शृंग-ऋषी ॥ हरिणीगर्भसंभूत तेजोराशी ॥ त्यासी आणावें नाना सायासीं ॥ पुत्रेष्टी[65] करावया ॥ १२ ॥ त्यास नाहीं मनुष्यदर्शन ॥ देखिलें नाहीं स्त्रियांचें वदन ॥ त्यास शब्दविषयें मोहून ॥ करोनि गायन आणावा ॥ १३ ॥ शक्र म्हणे देवललना[66] ॥ पाठवाव्या तया वना ॥ रंभा उर्वशी शुभानना ॥ ज्यांचे गायना मदन भुले ॥ १४ ॥ दशरथ इंद्रगुरूची आज्ञा ॥ घेऊन आला अयोध्याभुवना ॥ आनंद जाहला सकळ जना ॥ पर्जन्यवृष्टि जाहली ॥ १५ ॥ असंभाव्य पिकली मेदिनी[67] ॥ दुष्काळ गेला मूळींहुनी ॥ जैसीं विष्णुसहस्रनामें करूनी ॥ महापापें संहारती ॥ १६ ॥ इकडे वीणा टाळ मृदंग ॥ झल्लरी किंकिणी उपांग ॥ देवांगना घेऊन उपभोग ॥ वना सवेग चालिल्या ॥ १७ ॥ विभांडकऋषि तपोधन ॥ नित्य उषःकाळीं[68] उठोन ॥ करावया अनुष्ठान ॥ जान्हवीतीराप्रति जाय[69] ॥ १८ ॥ मागें आश्रमीं एकला पुत्र ॥ उंच बांधोनियां गोपुर ॥ त्यावरी शृंगी तो परम चतुर ॥ वेदाध्ययन करीतसे ॥ १९ ॥ गज व्याघ्र सावजें बहुत ॥

---

५८ साधन. ५९ काजळ. ६० देवांचा गुरू. ६१ ईश्वर. ६२ शंकराला. ६३ जिव्हाळा. ६४ जुनाट. ६५ पुत्रप्राप्तीसाठीं यज्ञ. ६६ अप्सरा. ६७ पृथ्वी. ६८ प्रातःकाळीं. ६९ गंगा.

देखतां होय भयभीत ॥ म्हणोनि उंच स्थळ बांधोनि सत्य ॥ त्यावरी सुत बैसविला ॥ १२० ॥ विभांडकऋषि अनुष्ठान करून ॥ दोन प्रहरां येत परतोन ॥ परमानंदें पुत्र देखोन ॥ अध्ययन सांगे तयातें ॥ २१ ॥ चारही वेद मुखोद्गत ॥ सकल शास्त्रें पारंगत ॥ यागविधि कर्में समस्त ॥ करतलामलक तयातें ॥ २२ ॥ असो विभांडक गेला स्नाना ॥ तो समय पाहोन देवांगनाँ ॥ वेगीं पातल्या तया वना ॥ सर्व संपत्ति घेऊनियां ॥ २३ ॥ वरी बैसला ऋषिनंदन ॥ तंव त्यांनीं आरंभिलें गायन ॥ जें ऐकतां भुले पंचबाणँ ॥ स्वरूपलावण्य तयांचें ॥ २४ ॥ जैशा केवळ सौदामिनी ॥ मंडित दिसती वस्त्राभरणँणीं ॥ ज्यांचीं स्वरूपें पाहोनी ॥ सुधापाँनी वेधले ॥ २५ ॥ टाळ मृदंग सुस्वर ॥ गायन ऐकून ऋषिपुत्र ॥ वरोनि पाहे सादर ॥ स्वरूप सुंदर न्याहाळोनी ॥ २६ ॥ तंव नेत्रकटाक्ष हावभाव ॥ दाविती नानापरींचें लाघँव ॥ शृंगीनें देखतांचि अपूर्व ॥ भय वाटे मानसीं ॥ २७ ॥ गायन ऐकतां सुस्वर ॥ संतोष वाटे अपार ॥ म्हणे मज धरावया साचार ॥ पातले कोण न कळे हें ॥ २८ ॥ भयेंकरून ते वेळां ॥ शृंगी वायुवेगें पळाला ॥ सर्वेंचि विलोकी परतोनि डोळां ॥ सुंदर स्वरूप तयांचें ॥ २९ ॥ विभांडक अनुष्ठान करून ॥ आश्रमासी येत परतोन ॥ देवांगना जाती तेथोन ॥ शापभयें ऋषीच्या ॥ १३० ॥ म्हणती विभांडकासी कळेल ॥ तरी आम्हां तत्काळ शापील ॥ यालागीं दोन प्रहर होतां सकळ ॥ जाती वेगेंकरूनियां ॥ ३१ ॥ असो पिता आला आश्रमासी ॥ शृंगी सांगे तयापाशीं ॥ म्हणे येथें आले होते तापसी ॥ उपमा ज्यांसी असेना ॥ ३२ ॥ मी तयांसी देखोनी ॥ पळालों देहलोभेंकरूनी ॥ आतां न येती ते दुसरेनी ॥ खंती मनीं वाटतसे ॥ ३३ ॥ विभांडक म्हणे पुत्रासी ॥ जरी आश्रमा आले संत ऋषी ॥ तरी आपण आतिथ्य करावें तयांसी ॥ पूजाविधीकरूनियां ॥ ३४ ॥ असो प्रातःकाळीं विभांडक मुनी ॥ गेला अनुष्ठानालागुनी ॥ शृंगी चिंता करी मनीं ॥ म्हणे कधीं नयनीं देखेन तयां ॥ ३५ ॥ विसरला लेखन पठन ॥ ज्ञान ध्यान आणि मनन ॥ लागलें मनीं स्त्रियांचें ध्यान ॥ अनर्थ पूर्ण स्त्रीसंगें ॥ ३६ ॥ ज्यानें स्त्री न देखिली स्वप्नीं ॥ त्यानें ती विलोकितां नयनीं ॥ गेला सर्व विसरोनी ॥ अनर्थ कामिनी तपासी ॥ ३७ ॥ मग ज्यांस अखंड स्त्रीचिंतन ॥ ते कैसे तरतील जन ॥ मूर्तिमंत भवाब्धि कामिनँ ॥ भुलवी सज्जन जाणते ॥ ३८ ॥ स्त्री केवळ अविद्येचा पसारा ॥ महाअनृत्या अविचारी ॥ सकळ असत्याचा थारा ॥ भय न धरी पापाचें ॥ ३९ ॥ स्त्री अनर्थाचें गृह सबळ ॥ कीं कलहाचें महामूळ ॥ कीं विषवल्लीच केवळ ॥ स्त्रीरूपें विस्तारली ॥ १४० ॥ स्त्री कामाची विशाळ दरी ॥ कीं ते क्रोधव्याघ्राची जाळी खरी ॥ कीं ते पापसमुद्रलहरी ॥ कीं ते भाजन असत्याचें ॥ ४१ ॥ कीं ते दुःखवृक्षाचें श्रेष्ठ फळ ॥ कीं ते मोहाचा पर्वत सबळ ॥ कीं ते मत्सरवनचि केवळ ॥ किंवा भ्रांति अवतरली ॥ ४२ ॥ कीं दंभचि मूर्ति-

---

७० तळहातावरील आवळ्याप्रमाणें, हस्तगत. ७१ अप्सरा. ७२ मदन. ७३ विज्ञा. ७४ वस्त्रें व अलंकार यांनीं. ७५ अमृत प्राशन करणारे देव. ७६ कौतुक. ७७ स्त्री. ७८ संसारसमुद्र. ७९ विद्वान्. ८० अज्ञानाचा, मायेचा. ८१ खोटी. ८२ साहसी. ८३ विषयाची. ८४ गुहा. ८५ पापरूपी समुद्राची लाट. ८६ पात्र, भांडें. ८७ हेवारूपी वन.

मंत विरूढला ॥ कीं अहंकार स्त्रीगड बांधिला ॥ कीं मूर्खत्व सकळ त्या स्थळा ॥ मिरॉस करूनि राहिलें ॥ ४३ ॥ कीं स्त्री मूर्तिमंत भवव्याधी ॥ कीं षड्मींची भरली नदी ॥ कीं सकळ विकारांची मांदी[८९] ॥ यात्रेसी आली त्या ठाया ॥ ४४ ॥ कवणें निर्मिली हे कुन्हाडी ॥ सबळ पुण्यवृक्ष तोडी ॥ कीं अविश्वासाची बेडी ॥ जिवाच्या पायीं ठोकिली ॥ ४५ ॥ कीं स्वर्गमोक्षअर्गळा सत्य ॥ दर्शनें पुरुषाचें चित्त चोरित ॥ स्पर्शबळें वीर्य हरीत ॥ आसुरी प्रत्यक्ष कामिनी ॥ ४६ ॥ कौटिल्यदंभसंयुक्त ॥ क्षमाशौचविवर्जित ॥ महामंत्राचें सामर्थ्य ॥ क्षणें हरीत न कळेचि ॥ ४७ ॥ गौडी माध्वी पैष्टी तीन्ही ॥ मदिरा ऐशा प्रकट जनीं ॥ चौथें मद्य ते कामिनी ॥ दुर्गंधि नाहाणी पापाची ॥ ४८ ॥ काय विद्या काय तप ॥ कायसें ध्यान काय जप ॥ कासया ज्ञान खटाटोप ॥ हरिलें सर्व स्त्रियांनीं ॥ ४९ ॥ जिव्हा दग्ध परान्नें पाहीं ॥ हस्त दग्ध प्रतिग्रहीं ॥ मन दग्ध स्त्रीचे ठायीं ॥ करूनि काय जप तप ॥ १५० ॥ व्यर्थ करिती पुरश्चरण ॥ स्त्रियेनें हरोनि नेलें मन ॥ करूं बैसतां जों ध्यान ॥ तों ध्यानीं चिंतन स्त्रियेचें ॥ ५१ ॥ काय अध्ययन काय कीर्तन ॥ व्यर्थ गेलें पुराणश्रवण ॥ काय घरूनि धर्मदान ॥ स्त्रियांनीं मन हरियेलें ॥ ५२ ॥ स्त्री स्वरूपाची धरोनि दिवी[९२] ॥ महानरकाची वाट दावी ॥ सज्ञानियासही भुलवी ॥ वनीं हिंडवी विषयांचिया ॥ ५३ ॥ कीं काळें दूती पाठविलें देखा ॥ चाळवूनि नेत महानरका ॥ दुराविलें मोक्षसुखा ॥ अधःपातीं पाडिलें ॥ ५४ ॥ आतां असो हा अनुवाद ॥ जरी कृपा करील ब्रह्मानंद ॥ तरीच तुटेल भवबंध ॥ हृदयीं बोध ठसावे ॥ ५५ ॥ जरी कृपा करील जगज्जीवन ॥ तरी हरिरूप दिसे जन वन ॥ कैचा पुरुष नपुंसक कामिन ॥ व्यापिलें पूर्ण श्रीरामें ॥ ५६ ॥ नर नारी मिथ्या भास ॥ अवघा वोतला पुराणपुरुष ॥ जैं कृपा करील सर्वेश ॥ ब्रह्मानंदस्वामी पैं ॥ ५७ ॥ असो आतां शृंगऋषी ॥ म्हणे कधीं येतील ते तापसी ॥ तों अकस्मात त्या समयासी ॥ रंभा उर्वशी पातल्या ॥ ५८ ॥ उत्तम स्वरूपें मंजुळ गायन ॥ सुंदर मुख आकर्ण नयन ॥ शृंगीलागीं खुणावून ॥ कॉमभाव दाविती ॥ ५९ ॥ नानापक्वान्नें अमृतफळें ॥ शृंगीस देती बहु रसाळें ॥ मग तो उतरोनि खालें ॥ जवळी येवोनि बैसला ॥ १६० ॥ तयांसी पुसे आवडीकरून ॥ सांगा तुमची नामखूण ॥ हीं गॅलंडें काय म्हणोन ॥ वक्षःस्थळीं तुमच्या पैं ॥ ६१ ॥ येरी गदगदां हांसती ॥ तुझिया माथां शृंग निश्चितीं ॥ म्हणोनि शृंगऋषी म्हणती ॥ तुजलागीं ऋषिपुत्रा ॥ ६२ ॥ आमुचें नांव गलंडऋषी ॥ बहु सुख असे आम्हांपाशीं ॥ येरु म्हणे तें दाखवा आम्हांसी ॥ चवी कैसी पाहों पां ॥ ६३ ॥ त्या म्हणती जी तत्त्वतां ॥ कामासन तुज शिकवूं आतां ॥ तों मदनें मोहिलें ऋषिसुता ॥ आसक्त सुरतालागीं होय ॥ ६४ ॥ मग तो म्हणे मी तुम्हां-आधीन ॥ जिकडे न्याल तिकडे येईन ॥ मग त्यांनीं विमानीं बैसवून ॥ आणियेला अयोध्येसी ॥ ६५ ॥ दशरथें करूनि नमस्कार ॥ केला बहुत आदर ॥ म्हणे महाराज तुम्ही बहु थोर ॥ दर्शन आम्हां दिधलें ॥ ६६ ॥ मग पाळकैकन्या आपुली ॥ शृंगऋषीस दिधली ॥

८८ हक्काची जागा. ८९ समुदाय. ९० व्रारबंधन, अडसर. ९१ राक्षसी. ९२ दान घेण्यानें. ९३ दिवटी, मशाल. ९४ मदनचेष्टा. ९५ उंचवटे, गोळे. ९६ भोगासाठीं. ९७ पाळलेली शांता.

लग्नसोहळा ते वेळीं ॥ चार दिवस जाहला ॥ ६७ ॥ मग ऋषी मेळविले बहुत ॥ जे शापानुग्रहसमर्थ ॥ वसिष्ठ मुख्य आचार्य जेथ ॥ न पडे पदार्थ न्यून कांहीं ॥ ६८ ॥ इकडे ज्ञानीं पाहे विभांडकमुनी ॥ तों स्त्रियांनीं सुत नेला चाळवुनी ॥ परम क्रोधाविष्ट होउनी ॥ अयोध्येसी पातला ॥ ६९ ॥ तों ऋषिवेष्टित देखिला कुमर ॥ जैसा नक्षत्रीं वेष्टिला रोहिणीवर[१] ॥ कीं किरणीं वेष्टिला दिवाकर[२] ॥ तैसा स्वसुत देखिला ॥ १७० ॥ क्षुधा देखोनि नयनीं ॥ विभांडक निवाला मनीं ॥ दशरथ लागला ऋषिचरणीं ॥ आनंदेंकरूनि तेधवां ॥ ७१ ॥ विभांडक आनंदे बहुत ॥ नृपासी आशीर्वाद देत ॥ तुज होतील चौघे सुत ॥ जे कां समर्थ त्रिभुवनीं ॥ ७२ ॥ असो यज्ञमंडपीं शृंगी आपण ॥ सकळ ऋषिमंडळ घेऊन ॥ स्वाहाकारासी[३] अवदान[४] ॥ मंत्रयुक्त टाकीत ॥ ७३ ॥ पूर्णाहुतीचिये काळीं ॥ प्रत्यक्ष प्रगटला ज्वाळामाळी ॥ जैसा सूर्य उगवे उदयाचळीं ॥ प्रातःकाळीं अकस्मात ॥ ७४ ॥ चत्वारिशृंग द्विमूर्धान ॥ सप्तपाणी त्रिचरण ॥ देखतां यज्ञनारायण ॥ ऋषिजन सुखावले ॥ ७५ ॥ हातीं पायसताट[५] भरून ॥ शृंगीपाशीं देत कृशान[६] ॥ म्हणे अविलंबें पिंड[७] करून ॥ तिघीं राणियांस देइजे ॥ ७६ ॥ बहु त्वरा करावी ये क्षणीं ॥ विलंबें होय कार्यहानी ॥ पोटा येईल कैवल्यदानी[८] ॥ क्षीरसागरविहारी जो ॥ ७७ ॥ ऐसें बोलोनि तये काळीं ॥ गुप्त जाहला ज्वाळामाळी ॥ शृंगीनें वसिष्ठाजवळी ॥ पायसपात्र दीधलें ॥ ७८ ॥ वसिष्ठें करूनि तीन विभाग ॥ राणियांस देत सवेग ॥ कौसल्येसी श्रेष्ठ भाग ॥ देता जाहला ऋषि तो ॥ ७९ ॥ दुजा सुमित्रेप्रती देत ॥ तिजा कैकयीकरीं घालित ॥ देखोनि ऐसें अद्भुत ॥ क्रोध आला कनिष्ठेतें ॥ १८० ॥ म्हणे मी रायासी प्रियकर ॥ म्यां रथचक्रीं घालोनि कर ॥ रणीं विजयी केला नृपवर ॥ इंद्रादिक देवांदेखतां ॥ ८१ ॥ वर्येकरूनि वृद्ध फार ॥ ते ज्येष्ठ नव्हे साचार ॥ जियेमाजी गुण थोर ॥ तीच श्रेष्ठ जाणिजे ॥ ८२ ॥ केतकीचें लघु पत्र ॥ त्यास मानिती सर्वत्र ॥ इतर पत्रें दिसती थोर ॥ परी चतुर न मानिती ॥ ८३ ॥ अमोलिक लहान रत्न ॥ काय करावे थोर पाषाण ॥ मृगेंद्राची आकृति लहान ॥ थोर वारण कासया ॥ ८४ ॥ जेवादिबिडालाचें वृषण सुवास ॥ लहान परी आवडी श्रीमंतांस ॥ रासभाचें थोर बहुवस ॥ न शिवे कोणी तयातें ॥ ८५ ॥ मज आधीं न देतां मान ॥ काय करावा भाग मागून ॥ म्हणोनि कैकयी रुसोन ॥ अधोवदन बैसली ॥ ८६ ॥ मग बोले वसिष्ठ मुनी ॥ विघ्न होईल येच क्षणीं ॥ तों करींचा पिंड झडपोनी ॥ घारीनें नेला अकस्मात ॥ ८७ ॥ हाहाकार जाहला ते अवसरीं ॥ निमिष न लागतां गेली घारी ॥ कैकयी पडे धरणीवरी ॥ आक्रंदत तेधवां ॥ ८८ ॥ म्हणे माझें पूर्वकर्म गहन ॥ मज कैंचें पुत्रसंतान ॥ अभाग्यासी निधान ॥ जिरेल कोठून सांग पां ॥ ८९ ॥ परम चिंताक्रांत दशरथ ॥ कौसल्येकडे विलोकित ॥ मग कैकयीचें समाधान करीत ॥ पट्टमहिषी तेधवां ॥ १९० ॥ कौसल्या सुमित्रा दोघी जणी ॥ अर्ध अर्ध विभाग काढोनी ॥ देत्या जाहल्या ते क्षणीं ॥ पूर्ण पिंड कैकयीतें ॥ ९१ ॥

९८ चंद्र. ९९ सूर्य. १०० 'स्वाहा' उच्चार करून. १ आहुति. २ अग्नि. ३ दूध, खीर. ४ विभाग. ५ मोठे देणारा (ईश्वर). ६ केवल्याचें पान; °ची प्राप्ति. ७ सिद्धान्नी. ८ इस्ती. ९ जवादी मांजरांचें. १० ठेवा.

जैशा भागीरथी आणि मंदाकिनी ॥ तैशा कौसल्या सुमित्रा दोघीजणी ॥ मत्सर अणुमात्र मनीं ॥ न करिती स्वप्नीं सर्वथा ॥ ९२ ॥ जे अत्यंत कुटिल देख ॥ तयांसी स्वप्नींही नाहीं सुख ॥ न कदा मानिती कोणी लोक ॥ सदा अपेशपात्र ते ॥ ९३ ॥ असो वसिष्ठें दिधलें तीर्थ ॥ तिघीही पिंड प्राशन करीत ॥ कैकयीच्या कंठीं पिंड अडकत ॥ कासाविस जाहली ते ॥ ९४ ॥ मग वसिष्ठें शिंपितां तीर्थ ॥ अंतरीं पिंड उतरत ॥ आनंदला राजा दशरथ ॥ दानें देत अपार ॥ ९५ ॥ वस्त्राभरणें उदंड दक्षिणा ॥ देवोनि गौरविलें ब्राह्मणां ॥ सकळ ऋषी पावले स्वस्थाना ॥ शृंगीआदिकरूनि ॥ ९६ ॥ तिघी राण्या जाहल्या गर्भस्थ[11] ॥ आनंदला राजा दशरथ ॥ म्हणे माझें भाग्य उदित ॥ दिसतें पुढें येथोनि ॥ ९७ ॥ घारीनें जो पिंड झडपिला ॥ त्याचा वृत्तांत काय जाहला ॥ श्रोतयांनीं आक्षेप केला ॥ कथा समूळ सांगा पां ॥ ९८ ॥ तरी केसरीनामें वानर ॥ त्याची स्त्री अंजनी सुंदर ॥ ऋष्यमूकपर्वतीं घोर ॥ तप करीत बैसली ॥ ९९ ॥ सात सहस्र वर्षेपर्यंत ॥ मौन धरोनि शुचिष्मंत ॥ आराधिला उमाकांत ॥ प्रसन्न जाहला तपांतीं ॥ २०० ॥ म्हणे अंजनी माग इच्छित ॥ येरी म्हणे देईं अक्षय सुत ॥ परम प्रतापी यशवंत ॥ महाभक्त वज्रदेही ॥ १ ॥ मग बोले उमावर ॥ अकरावा जो मी महारुद्र ॥ तुझे उदरीं अक्षय अवतार ॥ धरितों अंजनी जाण पां ॥ २ ॥ ऐकें शुभवदने अंजनी ॥ तूं अंजुळीपात्र पसरुनी ॥ बैसें सावध माझे ध्यानीं ॥ अंतर्दृष्टी करूनियां ॥ ३ ॥ सुटेल अद्भुत प्रभंजन[13] ॥ साक्षात् लोकप्राणेश[14] आपण ॥ प्रसाद देईल आणोन ॥ तो तूं भक्षीं अविलंबें ॥ ४ ॥ स्वस्थळा गेला शूलपाणी[15] ॥ ध्यानस्थ बैसली अंजनी ॥ नयन झांकोनि निजमनीं ॥ ब्रह्मानंदें उचंबळें ॥ ५ ॥ तंव कैकयीहातींचा पिंड झडपोनि ॥ घारी नेत असतां गगनीं ॥ तों चंडसमीरें[16] ते क्षणीं ॥ पिंड मुखींचा आसुडिला[17] ॥ ६ ॥ तो अंजनीच्या करांत ॥ आणोन घातला अकस्मात ॥ तो तत्काळ ती भक्षित ॥ शिवस्मरण करोनियां ॥ ७ ॥ घारी ते देवांगना[18] वहिली[19] ॥ नृत्य करितां चांचरी गेली ॥ मग विधीनें[20] शापिली ॥ घारी होईं म्हणोनि ॥ ८ ॥ मग ते सुवर्चसा नामें देवांगना ॥ लागे कमलोद्भवाचे[21] चरणा ॥ विधि म्हणे दशरथ राणा ॥ अयोध्येचा नृपवर ॥ ९ ॥ त्याच्या मैथुनसमयीं[22] पिंड झडपितां ॥ उद्धरसील तूं तत्त्वतां ॥ अंजनीकरीं पिंड पडतां ॥ निजस्थाना येसी तूं ॥ २१० ॥ असो घारी ब्रह्मवरेंकरूनि ॥ उद्धरोनि पावली स्वस्थानीं ॥ इकडे नवमास भरतां अंजनी ॥ प्रसूत जाहली तेधवां ॥ ११ ॥ ऋषिपत्न्या पाहती ते वेळां ॥ बळिया तो बाळ जन्मला ॥ कीं वासरमणि प्रकटला ॥ वानरवेषें दैदीप्य ॥ १२ ॥ विद्युत्प्राय कुंडलें झळकती ॥ गंडस्थळीं पडली दीप्ती ॥ दृढ कौपीन निश्चितीं ॥ कटिप्रदेशीं मौंजी झळके ॥ १३ ॥ तळपतसे यज्ञोपवीत ॥ ऐसें वानररूप अद्भुत ॥ मुर्ंसीं पुच्छाग्रीं आरक्त ॥ वर्ण दिसत प्रवालसम[23] ॥ १४ ॥ परम क्षुधाक्रांत बाळ ॥ चहूंकडे पाहे चंचळ ॥ तों अंजनी उतावेळ ॥ फळें गेली आणावया ॥ १५ ॥ रुदन करी क्षुधित बाळ ॥ तों आरक्त दिसे सूर्यमंडळ ॥ म्हणे हें दिसे

११ गर्भिणी. १२ भयंकर वायु. १३ शंकर. १४ ओढून घेतला. १५ देवस्त्री. १६ श्रेष्ठ. १७ अडखळली. १८ ब्रह्मदेवाच्या. १९ यज्ञसमयीं. २० गालांवर. २१ पोवळ्यासारखा.

उत्तम फळ ॥ उडे चपळ मारुती ॥ १६ ॥ पिंजारल्या रोमावळी ॥ सिंहनादें गर्जे निराळीं ॥ दिग्गजांचीं बैसलीं टाळीं ॥ आंदोळली वसुंधरा ॥ १७ ॥ स्फुरण दाटलें थोर ॥ गाजवी पुच्छाचा फडत्कार ॥ मागें अंगवातें तरुवर ॥ उन्मळोनि जाती आकाशीं ॥ १८ ॥ चपळ पदद्वय तैसेच हस्त ॥ प्रतापें झेंपावे गगनांत ॥ उड्डाणावर उड्डाण घेत ॥ जात आदित्य लक्षोनियां ॥ १९ ॥ कीं उर्वीवरोनि सुपर्ण ॥ जाय वैकुंठपीठ लक्षून ॥ तैसाचि अंजनीहृदयरत्न ॥ भानुमंडळा आटोपी ॥ २२० ॥ मनोवेगासी मागें टाकुनी ॥ हनुमंत वेगें जात गगनीं ॥ तों लोकप्राणेशें धांवुनी ॥ धरीन म्हणे स्वपुत्रा ॥ २१ ॥ परम तीव्र सूर्यमंडळ ॥ तेजें आहाळेल माझें बाळ ॥ म्हणून धरूं पाहे अनिळ ॥ परी तो चपळ नाटोपे ॥ २२ ॥ मग हिमाचलाचे शीतलांबुकण ॥ मागून शिंपी प्रभंजनें ॥ हनुमंत मुख पसरोन ॥ सूर्याजवळी पातला ॥ २३ ॥ तों ते दिवसीं सूर्यग्रहण ॥ राहु आला मुख पसरोन ॥ मारुतीस क्रोध आला दारुण ॥ सिंहिकासुतें देखतां ॥ २४ ॥ म्हणे मी अत्यंत क्षुधित ॥ फळ भक्षावया आलों येथ ॥ हा आला कोण अकस्मात ॥ ग्रासाआड माझिया ॥ २५ ॥ सबळ पुच्छघायेंकरून ॥ फोडिलें राहूचें वदन ॥ भिरकाविला पायीं धरून ॥ मूर्च्छा येऊन पडला तो ॥ २६ ॥ जैसा शुंडादंडेंकरून देख ॥ महागज विदारी बिडालक ॥ कीं भुजंगाचे कर्वते मूषक ॥ अकस्मात सांपडला ॥ २७ ॥ राहूचे कैवारें केत ॥ कपीवरी धांवला उन्मत्त जैसा केसरीपुढें जंबुक येत ॥ आपलें मरण विसरूनियां ॥ २८ ॥ केतु देखतांचि हनुमंतें ॥ तेथेंचि मर्दिला मुष्टिघातें ॥ आंग चुकवोनि वेगें बहुतें ॥ पळता जाहला केतू पैं ॥ २९ ॥ राहु आणि केत ॥ इंद्रापाशीं आले धांवत ॥ अशुद्धें नाहाले जेवीं पर्वत ॥ सिंदूरेंकरून माखले ॥ २३० ॥ आक्रोशें बोलती दोघेजण ॥ तूं सुरेश सहस्रनयन ॥ आम्हांवरी कोप धरून ॥ हें कां विघ्न धाडिलें ॥ ३१ ॥ नवा पुच्छराहु करून ॥ आम्हांवरी दिधला पाठवून ॥ आश्चर्य करी शचीरमण ॥ म्हणे हें कर्तृत्व कोणाचें ॥ ३२ ॥ कोणीं केली विपरीत करणी ॥ त्यास संहारावाया वज्रपाणी ॥ त्रिदशसमुदाय घेउनी ॥ वायुवेगें धांविन्नला ॥ ३३ ॥ राहु पुढें पुढें धांवत ॥ मागें देवांसहित अमरनाथ ॥ तों इकडे अंजनीसुत ॥ सूर्य ग्रासूं धांवतसे ॥ ३४ ॥ चळचळां कांपे मित्र ॥ म्हणे हा कैंचा आला अमित्र ॥ दिनमान सांडोनि दिनकर ॥ पळों न लाहे सर्वथा ॥ ३५ ॥ प्रतापरुद्र मारुती ॥ सूर्यमंडळ धरिलें हातीं ॥ हे फळ नव्हे निश्चितीं ॥ म्हणोनि पुढती टाकिलें ॥ ३६ ॥ जैसा केवळ वडवानळ ॥ तैसेंच देदीप्यमान सूर्यमंडळ ॥ फळ नव्हे म्हणोनि अंजनीबाळ ॥ टाकिता जाहला पुढती पैं ॥ ३७ ॥ माघारा पाहे परतोन ॥ तों राहु आला शक्रास घेऊन ॥ पुढती क्रोध आला दारुण ॥ म्हणे आतां न सोडीं यासी ॥ ३८ ॥ साह्य करून अमरपती ॥ मजवरी आला पुढती ॥ जैसे शलभ मिळूनि येती ॥ कल्पांतविजू धरावया ॥ ३९ ॥ ऐसें बोलत वायुनंदन ॥ राहूवरी लोटला येऊन ॥ इंद्रादेखतां ताडण ॥ राहूसी केलें बहुसाल ॥ २४० ॥ जैसा पर्वत पडे अकस्मात ॥

२२ केशपंक्ति. २३ आकाशांत. २४ पृथ्वी. २५ सूर्य. २६ पृथ्वीवरून. २७ गरुड. २८ वायु. २९ पोळेल. ३० राहु. ३१ तोंड. ३२ मांजर. ३३ मिठींत. ३४ रक्तानें. ३५ शेंपूट असलेला राहु. ३६ शचीपति इंद्र. ३७ देव. ३८ शत्रु. ३९ इंद्रास. ४० प्रलयकाळचीं वीज.

तैसा राहूसी दे मुष्टिघात ॥ ग्रहपूजा यथासांग तेथ ॥ वायुसुतें मांडिली ॥ ४१ ॥ राहु आक्रोशें फोडी हांका ॥ म्हणे काय पाहसी अमर-[41]नायका ॥ मग शक्रें ऐरावती देखा ॥ अकस्मात प्रेरिला ॥ ४२ ॥ जिकडे धांवे ऐरावत ॥ तिकडे भारें उर्वी[42] लवत ॥ कीं दुसरा मेरु मूर्तिमंत ॥ शक्राचें वाहन जाहला ॥ ४३ ॥ तों सबळ लोटला ऐरावती ॥ चपळ धांवला वीर मारुती ॥ जैसा वज्रघात पर्वतीं ॥ तैसा कुंभस्थळीं ताडिला ॥ ४४ ॥ धाकें ऐरावत तो पळे ॥ पौंकशासन[43] निजबळें ॥ ऐरावत आकळितां नाकळे ॥ रान घेतलें भयेंचि ॥ ४५ ॥ जैसी दुर्बळाची स्त्री नष्ट बहुत ॥ ती न मानी त्याचा वचनार्थ ॥ तैसा इंद्रासी ऐरावत ॥ नाटोपेचि सर्वथा ॥ ४६ ॥ असो विवेक करूनि बहुत ॥ काम क्रोध आवरिती महंत ॥ तैसा सहस्राक्षें ऐरावत ॥ पुढती समोर आणिला ॥ ४७ ॥ मागुता धांवे पवन-सुत ॥ धरी ऐरावताचे चारही दंत ॥ उलथोनि स्वालीं पाडित ॥ शक्रासहित तेधवां ॥ ४८ ॥ हस्तचपेटें हनुमंतें ते वेळीं ॥ शक्राचा किरीट पाडिला भूतळीं ॥ सकळ देवसेना ते काळीं ॥ भयभीत जाहली ॥ ४९ ॥ इंद्राची झोटी[44] मोकळी ॥ मागुती ऐरावत आकळी ॥ हनुमंतावरी बळेंचि घाली ॥ परी गज न टाकी पाउल पुढें ॥ २५० ॥ गज पळे रानोरान ॥ परम घाबरला सहस्रनयन[45] ॥ तो यम हस्तीं दंड घेऊन ॥ हनुमंतावरी धांविन्नला ॥ ५१ ॥ यमें दंड प्रेरावा जों ते वेळां ॥ तों मारुति अंगावरी कोसळला ॥ मुष्टिघात हृदयीं दिधला ॥ यम पाडिला धरणीवरी ॥ ५२ ॥ वक्षःस्थळीं वेंळंघोनि[46] हनुमंत ॥ पुढतीं मुष्टिघात प्रेरित ॥ हातींचा दंड हिरोनि घेत ॥ तेणेंचि ताडित तयासी ॥ ५३ ॥ यमें धरिले मारुतीचे चरण ॥ म्हणे मी तुजला अनन्य शरण ॥ हस्त जोडूनियां वरुण ॥ स्तुति करीत मारुतीची ॥ ५४ ॥ कुबेर धांवोन ते समयीं ॥ लागे हनुमंताचे पायीं ॥ तों ऐरावतारूढ लवलाहीं ॥ शैंक्र वेगें पातला ॥ ५५ ॥ ऐसें देखोनि ते अवसरीं ॥ मारुति धांवे शचीवैंरावरी[47] ॥ ऐरावतास पुच्छीं धरी ॥ पृथ्वीवरी आपटावया ॥ ५६ ॥ पुच्छ धरूनि भोवंडी गज ॥ पृथ्वीसहित कांपती दिग्गज ॥ अवनीवरी देवेंराज[48] ॥ वज्रासह पाडिला ॥ ५७ ॥ बळें गज आपटिला धरणीं ॥ देवांस मांडली महापळणी ॥ कैंडेकपाटीं[49] जाउनी ॥ महायोद्धे दडाले ॥ ५८ ॥ म्हणती पृथ्वी गेली रसातळा ॥ एकचि हाहाकार जाहला ॥ तों अमरेंद्रें ते वेळां ॥ औंव[50] धरिला पुढती पै ॥ ५९ ॥ वज्र बळें भोवंडित ॥ मुखावरी ताडिला हनुमंत ॥ तेणें मूर्च्छना दाटली बहुत ॥ पडे वायुसुत पृथ्वीवरी ॥ २६० ॥ कनकाद्रीवरून कोसळला ॥ पर्वतदरीमाजी पडला ॥ लोकप्राणेश[51] घांविन्नला ॥ सुत धरिला पोटासीं ॥ ६१ ॥ कासाविस वायुनंदन[52] ॥ विकेंळ[53] पडला अचेतन ॥ वायु रडे स्फुंदस्फुंदोन ॥ पुढें घेऊन हनुमंता ॥ ६२ ॥ म्हणे दुर्जन हा अमरेंद्र ॥ तान्हयावरी घातलें वज्र ॥ परम निर्दय पुरंदर[54] ॥ करीन संहार तयाचा ॥ ६३ ॥ माझिया तान्हयाचा जातां प्राण ॥ आटीन सकळ त्रिभुवन ॥ जैसे प्रल्हादाकारणें दैत्य संपूर्ण ॥ श्रीनृसिंहें आटिले ॥ ६४ ॥ वायुआधीन सकळांचे प्राण ॥ आकर्षिले न लागतां क्षण ॥ श्वासोच्छ्वास

४१ इंद्र. ४२ पृथ्वी. ४३ शेंडी. ४४ चवून. ४५ पर्वताच्या गुहांतून. ४६ हिंमत. ४७ वायु. ४८ मारुति. ४९ मरण.

कोंडून ॥ केलें त्रिभुवन कासाविस ॥ ६५ ॥ मग इंद्र विरिंचिँ सकळ सुरवर ॥ रमावरँ आणि उमावर ॥ सकळ प्रजा ऋषीश्वर ॥ शरण आले वायूतें ॥ ६६ ॥ पोटासी धरूनि हनुमंत ॥ वायु दीर्घस्वरें रडत ॥ तों ब्रह्मादि देव समस्त ॥ प्राणेनाथें देखिले ॥ ६७ ॥ हनुमंत कडेवरी घेउनी ॥ वायु उभा राहे ते क्षणीं ॥ तीन्ही देव देखोनि नयनीं ॥ नमस्कार करी तेघवां ॥ ६८ ॥ मग बोले कमळेंसन ॥ पुत्राचा केवार घेऊन ॥ अवघे जन निर्दाळून ॥ टाकिशी काय प्राणेशा ॥ ६९ ॥ येरू म्हणे न उठतां माझा सुत ॥ इंद्रासी आटीन देवांसाहित ॥ ऐकोनि हांसे इंदिरानाथ ॥ वर देतसे संतोषोनि ॥ २७० ॥ पूर्ण पिंडाचा हनुमंत ॥ यासी स्वर्गीही नाहीं मृत्य ॥ ब्रह्मकल्पपर्यंत चिरंजीव पुत्र तुझा ॥ ७१ ॥ मग बोले कर्पूरगौर ॥ माझिये तृतीय नेत्रींचा वैश्वानर ॥ क्षणें जाळील चराचर ॥ परी यासी बाधे ना ॥७२ ॥ माझीं त्रिशूळादि आयुधें तत्त्वतां ॥ तीं न रुतती हनुमंता ॥ मग विरिंचि होय बोलता ॥ निजवरदान ऐका तें ॥ ७३ ॥ माझें ब्रह्मास्त्र आणि पाश ॥ कदा न बाधितील यास ॥ म्यां जीं शस्त्रें निर्मिली बहुवस ॥ तींही यास न बाधिती ॥ ७४ ॥ मग इंद्रही वदे सवेग वर ॥ माझें यासी न बाधे वज्र ॥ हा वज्रदेही साचार ॥ अक्षय अभंग सर्वदा ॥ ७५ ॥ हनुवटीस झगडलें वज्र ॥ यास हनुमंत नाम साचार ॥ कुबेर म्हणे बहुत असुर ॥ क्षय पावती हस्तें याच्या ॥ ७६ ॥ यम वदे वरदान ॥ यास काळदंड न बाधी पूर्ण ॥ याचे करिती जे नामस्मरण ॥ त्यांसी बंधन न करीं मी ॥ ७७ ॥ मग बोले रसाधिपती ॥ अभंग असो यास शक्ती ॥ कधीं श्रम न पावे मारुती ॥ युद्ध करितां बहुसाल ॥ ७८ ॥ दिव्य कमळांची सुमनमाळ ॥ न सुके लोटतां बहुकाळ ॥ ती विश्वकर्में तत्काळ ॥ गळां घातली मारुतीच्या ॥ ७९ ॥ समस्तीं देऊन वरदाना ॥ गेले आपापले स्वस्थाना ॥ वायूनें हनुमंत ते क्षणां ॥ अंजनीजवळ आणिला ॥ २८० ॥ मारुतीस हृदयीं धरोनी ॥ स्फुंदस्फुंदोनि रडे जननी ॥ मुखामाजी स्तन घालुनी ॥ वदन कुरवाळी वेळोवेळां ॥ ८१ ॥ रामविजय ग्रंथ सुरस ॥ त्यामाजी हनुमंतजन्म विशेष ॥ श्रवण करिती जे सावकाश ॥ ग्रहपीडा त्यांस न होय ॥ ८२ ॥ हनुमंतजन्मकथन ॥ निजभावें करितां श्रवण ॥ दुष्टग्रहविघ्नें दारुण ॥ न बाधती कदाही ॥ ८३ ॥ पुढें रसाळ कथा बहुत ॥ डोहळे पुसेल राजा दशरथ ॥ अंजन्मा जन्मेल रघुनाथ ॥ तोच कथार्थ अवधारा ॥ ८४ ॥ जैसें जों जों क्षेत्र पिकत ॥ तों तों कणसें घनदाट दिसत ॥ तैसे प्रसंगाहून प्रसंग बहुत ॥ रसभरित असती पैं ॥ ८५ ॥ जयासी नाहीं पुत्रसंतान ॥ त्यानें करावें विजयावर्तनें ॥ संतति संपत्ति परिपूर्ण ॥ सदा नांदती त्याचे गृहीं ॥ ८६ ॥ येथोनि श्रीरामचरित्रकथा गहन ॥ श्रोतीं परिसावी सावधान ॥ तेणें ब्रह्मानंद ठसावोन ॥ कैवल्यपद पाविजे ॥ ८७ ॥ ब्रह्मानंदा श्रीरघुवीरा ॥ विषकंठहृदया परात्परा ॥ वेदवंद्या श्रीधरवरा ॥ दीनोद्धारा जगद्गुरो ॥ ८८ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ श्रवण करोत पंडित चतुर ॥ तृतीयाध्याय गोड हा ॥ २८९ ॥

५० ब्रह्मदेव. ५१ विष्णू. ५२ शंकर. ५३ वायूनें. ५४ अग्नि. ५५ अनेक. ५६ वरुण. ५७ ज्याला जन्म नाहीं असा (ईश्वर). ५८ रामविजयाचें पठण.

श्रीगणेशाय नमः ॥ चतुर श्रोते करिती प्रश्न ॥ तृतीयाध्यायीं हनुमंतजनन ॥ सांगितलें तुवां संपूर्ण ॥ कथा अद्भुत नवलचि ॥ १ ॥ आणिके पुराणीं साचार ॥ हनुमंतजन्मकथाप्रकार ॥ वेगळाचि असे विचार ॥ पृथक्पृथक् कथियेला ॥ २ ॥ तरी पुराणांतरीं विपरीत ॥ कथा पडावया काय निमित्त ॥ याचें प्रत्युत्तर यथार्थ ॥ सांग समस्तां कळावया ॥ ३ ॥ ऐसें श्रोतयांचें वाग्जाळ ॥ परिसोनियां कवि कुशळ ॥ शब्द बोले अति रसाळ ॥ परिसा सकळ श्रोते हो ॥ ४ ॥ अनादिसिद्ध अवतारमाळा ॥ जगदीशें गुंफिल्या अवलीळा ॥ जैसें तरंगापूर्वीं जळा ॥ व्यापोनियां असणें कीं ॥ ५ ॥ जैसी रहाटघटमाळिका ॥ तेवीं हें अवतारचरित्र देखा ॥ कीं भ्रमणें मित्र-भृगांका[1] ॥ प्रदक्षिणा करणें मेरूची ॥ ६ ॥ कीं जपमाळेचे मणी ॥ तेचि येती परतोनी ॥ तैसे अवतार ब्रह्मांडभुवनीं ॥ फिरती माळेसारिखे ॥ ७ ॥ तरी कल्पपरत्वें अवतार[2] ॥ जे जे वेळे जें जें चरित्र ॥ तैसेंचि बोलिला सत्यवतीकुमर ॥ कथा साचार तितुक्याही ॥ ८ ॥ एके अवतारीं वर्तलें एक ॥ तों दुसरे अवतारीं विशेष कौतुक ॥ तरी तितुकेंही सत्य देख ॥ विपरीतार्थ न मानिजे ॥ ९ ॥ रणामाजी एकांग वीर ॥ तैसा जाणिजे कवीश्वर ॥ बहुत श्रोतयांचे भार ॥ परम चतुर सागर जे ॥ १० ॥ सभानायक प्रवीण अत्यंत ॥ करीं संदेहधनुष्य घेत ॥ प्रश्नावर शर सोडित ॥ आशंकासमय लक्षोनियां ॥ ११ ॥ मग कवीनें धैर्यठाण मांडून ॥ चढविलें स्फूर्तीचें शरासन ॥ शास्त्रसंमताचे बाण ॥ सोडी अभंग अनिवार ॥ १२ ॥ सत्त्व ओढी काढूनि सत्वर ॥ क्षमावेशें सोडी शर ॥ परम कौशल्यें साचार ॥ प्रश्नबाण छेदित ॥ १३ ॥ श्रोत्यावक्त्यांचें संधान ॥ तटस्थ पाहती विचक्षण ॥ धन्य धन्य रे म्हणोन ॥ तर्जनी मस्तक डोलविती ॥ १४ ॥ आवेशा चढले दोघेजण ॥ सप्रेम करिती नामस्मरण ॥ तो घनघोष ऐकून ॥ आशंकाश्वापदें दूर पळती ॥ १५ ॥ वक्त्याचे वाग्बाण अत्यंत ॥ अर्थगौरवमुख लखलखीत ॥ पद्यरचना पक्षमंडित ॥ सुरंग मिरवित साहित्य ॥ १६ ॥ ऐसे शर सुटतां अपार ॥ भेदलें श्रोतयांचें अंतर ॥ डोलविलें तेणें शिर ॥ सुखोर्मीचेनि भरें पैं ॥ १७ ॥ वैरभाव नसतां किंचित ॥ हें आनंदाचें युद्ध होत ॥ क्षीराब्धीच्या लहरी मिळत ॥ जैसा एकमेकांसी ॥ १८ ॥ निष्कपट श्रोता पुसत ॥ निरभिमान वक्ता बोलत ॥ शब्दकौशल्य युद्ध सत्य ॥ जाणती पंडित विवेकी ॥ १९ ॥ देवभक्तांचा अनुवाद ॥ तेथें काय आहे वैरसंबंध ॥ कीं गुरुशिष्यांचा संवाद ॥ आनंदयुक्त शब्दांचा ॥ २० ॥ असोत ह्या बहुत युक्ती ॥ चातुर्यसिंधुमंथनपद्धती ॥ वर्म जाणिजे पंडितीं ॥ चातुर्यरीती कळ्या ज्या ॥ २१ ॥ कवीची घडामोडी बहुत ॥ युक्तिसागरींचीं रत्नें काढित ॥ एक गव्हांचे प्रकार बहुत ॥ करी जैसी सुंगरिणी[3] ॥ २२ ॥ एके मृत्तिकेचे घट अपार ॥ एका तंतूचे पट विचित्र ॥ एक हेमें[4] बहुत अलंकार ॥ हाटक-घडणार करी जैसा ॥ २३ ॥ एके काष्ठीं शिल्पकार ॥ युक्ति दाखवी अपार ॥ तैसा जो कवि चतुर ॥ शब्दसाहित्य विवरी पैं ॥ २४ ॥ असो हें चातुर्य करणें ॥ बोलावें लागलें श्रोतयां-

१ नक्षत्रें, सूर्य व चंद्र यांना. २ कल्पानुसार. ३ व्यास. ४ चतुरंगसैन्यावर एकटा चालक. ५ संशय धनुष्य. ६ बुद्धीच्या प्रेरणेचें. ७ धनुष्य. ८ संशयरूपी वन्य पशु. ९ सुखाच्या लहरी. १० सुगृहिणी, उत्तम स्वयंपाक करणारी पत्नी मानीण. ११ सुवर्ण, सोनें. १२ सुवर्णकार, सोनार.

कारणें ॥ पुढें रघुनाथकथा परिसणें ॥ श्रीधर चतुरां विनवीतसे ॥ २५ ॥ मागील कथानुसंधान ॥ तृतीयाध्यायीं निरूपण ॥ सांगितलें हनुमंतजन्मकथन ॥ मूळग्रंथआधारें ॥ २६ ॥ सिंहावलोकनें तत्त्वतां ॥ श्रोतीं परिसिजे मागील कथा ॥ तिघी राण्या जाहल्या गर्भस्था ॥ कौसल्या सुमित्रा कैकयी ॥ २७ ॥ जैसा शुद्धबीजेचा मृगांक ॥ दिवसेंदिवस कळा अधिक ॥ कीं पळेपळीं चढे अर्क ॥ उदयाद्री-हूनि पश्चिमे ॥ २८ ॥ कीं करितां संतसमागम ॥ दिवसेंदिवस वाढे प्रेम ॥ कीं औदार्येंकरूनि परम ॥ कीर्ति वाढे सत्वर ॥ २९ ॥ तैसे राणियांचे गर्भ वाढती ॥ तों वसिष्ठ बोले दशरथाप्रती ॥ राया धर्मशास्त्रीं ऐसी रीती ॥ डोहळे स्त्रियांसी पुसावे ॥ ३० ॥ ऐसें बोलतां ब्रह्मऋषी ॥ हर्ष वाटला रायासी ॥ नमोनि वसिष्ठचरणांसी ॥ राजेंद्र तेव्हां चालिला ॥ ३१ ॥ जैसा शचीचिया मंदिरांत ॥ वृत्रासुरशत्रु प्रवेशत ॥ तैसाचि अजपाळसुत ॥ कैकयीसदनीं प्रवेशे ॥ ३२ ॥ पिंडप्राशनाचे काळीं ॥ कैकयी होती रुसली ॥ म्हणोनि राजेंद्र ते वेळीं ॥ तिचे सदनीं प्रवेशला ॥ ३३ ॥ दूती जाणविती स्वामिनीतें ॥ डोहळे पुसावया तुम्हांतें ॥ नृपति स्वयें येतसे येथें ॥ सुमुहूर्त पाहोनियां ॥ ३४ ॥ सुंदरपणाचा अभिमान ॥ त्याहीवरी कैकयी गर्भिण ॥ जैसी अल्पविद्या गर्व पूर्ण ॥ तैसें येथें जाहलें ॥ ३५ ॥ जैसी गारुडियांची विद्या किंचित ॥ परी ब्रीदें बोंधिती बहुत ॥ कीं निर्नासिक वाहत ॥ रूपाभिमान विशेष पैं ॥ ३६ ॥ बिंदुमात्र विष वृश्चिका ॥ परी पुच्छाग्र सदा वरुतें देखा ॥ किंचित ज्ञान होतां महामूर्खा ॥ मग तो न गणी वाचस्पतीतें ॥ ३७ ॥ खडाणे धेनूसी दुग्ध किंचित ॥ परी लत्ताप्रहार दे बहुत ॥ अल्पोदकें घट उचंबळत ॥ अंग भिजत वाहकाचें ॥ ३८ ॥ तैसें कैकयीस जाहलें तये वेळीं ॥ प्रीतीनें दशरथ आला जवळी ॥ आपण सेजेवरी निजली ॥ नाहीं धरिली मर्यादा ॥ ३९ ॥ स्त्री सेवक अपत्य दासी ॥ श्वान मर्कट कुरूपियासी ॥ मर्यादा तुटतां मग सकळांसी ॥ ते अनिवार जाणिजे ॥ ४० ॥ म्हणोनि मर्यादा कांहीं तेथ ॥ कैकयी न धरी देखतां दशरथ ॥ तिसी डोहळे पुसे नृपनाथ ॥ उभा समीप राहोनी ॥ ४१ ॥ म्हणे कैकयी बोल वचन ॥ तुज जें आवडे मनांतून ॥ तें मी समस्त पुरवीन ॥ सत्य जाण प्रियकरे ॥ ४२ ॥ मग काय बोले ते वेळे ॥ तुम्ही काय पुरवाल डोहळे ॥ माझे मनींचे सोहळे ॥ पूर्णकर्ता दिसेना ॥ ४३ ॥ मग बोले अजनंदन ॥ तुजकारणें वेंचीन प्राण ॥ परी तुझे डोहळे पुरवीन ॥ सत्य जाण सुकुमारे ॥ ४४ ॥ मग ती म्हणे जी नृपवरा ॥ डोहळे हेचि माझे अवधारा ॥ कौसल्या सुमित्रेचिया कुमरां ॥ दिगंतरा दवडावें ॥ ४५ ॥ पाठवावे दूर कानना ॥ त्यांचा समाचार पुनः कळेना ॥ आमचें वर्तमान त्यांचिया कर्णां ॥ सहसाही न जावें ॥ ४६ ॥ राज्य द्यावें माझिया पुत्रा ॥ हेचि डोहळे होती राजेंद्रा ॥ तुम्ही म्हणाल अधर्म खरा ॥ तरी तो दोष मजवरी घालिजे ॥ ४७ ॥ मज निंदितील सकळ लोक ॥ तों तों वाटेल परम सुख ॥ समस्त जनां व्हावें दुःख ॥ हेंचि मजला आवडे ॥ ४८ ॥ ऐसें कैकयी वदे ते अवसरीं ॥ ऐकतां नृप खोंचला अंतरीं ॥

१३ शुक्लपक्षांतील द्वितीयेचा. १४ चंद्र. १५ सूर्य. १६ उदयगिरीवरून. १७ वसिष्ठ. १८ इंद्राणीच्या. १९ इंद्र. २० अजराजपुत्र दशरथ. २१ प्रतिज्ञेच्या विरुद्धावली. २२ नकटा मनुष्य. २३ विंचवीण. २४ बृहस्पतीला. २५ खिन्न झाला.

कीं काळिजीं घातली सुरी ॥ कीं अंगावरी चपेळा[२५] पडे ॥ ४९ ॥ वचन नव्हे तें केवळ ॥ दुःखवल्लीचें श्रेष्ठ फळ ॥ कीं संचरलें हालाहळ ॥ हृदयीं वाटे दशरथा ॥ ५० ॥ वाटे पर्वत कोसळला ॥ कीं काळसर्प जिव्हारीं झोंबला ॥ कीं तप्तशस्त्रघाय पडला ॥ अंगावरी अकस्मात ॥ ५१ ॥ कैकयीवचन कर्लेशोद्भव[२६] पूर्ण ॥ प्राशिलें आयुष्यसागरजीवन[२७] ॥ राव घाबरा होय जैसा चतुरानन[३०] ॥ वेद हरण केले जेव्हां ॥ ५२ ॥ परम खेद पावला नृपवर ॥ तीस नेदीच प्रत्युत्तर ॥ मग सुमित्रेचें मंदिर ॥ प्रवेशता जाहला ॥ ५३ ॥ संसारतापें जे संतप्त ॥ ते संतसमागमें जैसे निवत ॥ तैसाचि राजा दशरथ ॥ सुमित्रासदनीं सुखावला ॥ ५४ ॥ तिचें नांव सुमित्रा सती ॥ परी नामाऐसीच आहे रीती ॥ वरकड नांवें जीं ठेविती ॥ तीं तों व्यर्थचि जाणिजे ॥ ५५ ॥ नांव ठेविलें उदार कर्ण ॥ आंडका[३१] वेंचितां जाय प्राण ॥ बृहस्पति नाम ज्यालागून ॥ घड वचन बोलतां न ये ॥ ५६ ॥ कमलनयन नाम विशेष ॥ परी दोहीं डोळ्यां वाढले वडस ॥ क्षीरसिंधु नाम पुत्रास ॥ परी तर्कें[३२] तयासी मिळेना ॥ ५७ ॥ नांव ठेविलें पंचानन ॥ परी जंबुक देखतां पळे उठोन ॥ जन्म गेला मागतां कोरान्न[३३] ॥ सार्वभौम नाम तयातें ॥ ५८ ॥ नाम ठेविलें जया मदन ॥ तो निर्नासिक कुलक्षण ॥ तैसी सुमित्रा नव्हे पूर्ण ॥ करणी नामासारिखी ॥ ५९ ॥ नृप आला ऐकतां कर्णीं ॥ समोर आली हंसगामिनी ॥ दशरथाचिये चरणीं ॥ मस्तक ठेवी सद्भावें ॥ ६० ॥ स्त्रियांस देव तो आपला नाथ ॥ पुत्रासी माता पिता सत्य ॥ शिष्यासी गुरु दैवत ॥ गृहस्थासी दैवत अतिथि पैं ॥ ६१ ॥ म्हणोन सुमित्रेनें अजनंदन ॥ पूजिला षोडशोपचारेंकरून ॥ उभी ठाकली कर जोडून ॥ अधोवदन सलज्ज ॥ ६२ ॥ कैकयीडोहळ्यांचें दुःख प्रबळ ॥ राव विसरला हो सकळ ॥ जैसा बोध ठसावतां निर्मळ ॥ तमेंजाळ[३४] वितुळे पैं ॥ ६३ ॥ राजा म्हणे सुमित्रेसी ॥ काय डोहळे होताती मानसीं ॥ ते मज सांग निश्चयेंसीं ॥ कुरंगनेत्रे[३५] सुमित्रे ॥ ६४ ॥ मग किंचित हास्य करून ॥ बोले सलज्ज अधोवदन ॥ जें ऐकतां सुखसंपन्न ॥ अजनंदन होय पैं ॥ ६५ ॥ म्हणे हेच आवडी बहुवस ॥ कौसल्यागर्भी जगन्निवास ॥ अवतरेल जो आदिपुरुष ॥ जगद्वंद्य जगदात्मा ॥ ६६ ॥ त्याची अहोरात्र सेवा बरवी ॥ वाटे मम पुत्रेंचि करावी ॥ जाणीव शहाणीव आघवी ॥ ओंवाळावी तयावरूनि ॥ ६७ ॥ सेवेपरतें थोर साधन ॥ मम पुत्रासी न माने आन ॥ आपुले अंगाचें हांतरुण ॥ ज्येष्ठसेवनालागीं करूं ॥ ६८ ॥ त्रिभुवनराज्य तृणासमान ॥ त्याहूनि अधिक ज्येष्ठभजन ॥ चारही मुक्ति वाटती गौण ॥ ज्येष्ठसेवेपुढें पैं ॥ ६९ ॥ सुधारस त्यजोनि निर्मळ ॥ कोणास आवडेल हाळाहळ ॥ उत्तम सांडूनि तांदूळ ॥ सिकता[३७] कां हो शिजवावी ॥ ७० ॥ त्यजोनि सुंदर रायकेळें ॥ कोण भक्षील अर्ककफळें[३८] ॥ कल्पद्रुमीं जो विहंगम[३९] खेळे ॥ तो नातळे बाभुळेसी ॥ ७१ ॥ मानससरोवरींचा हंस पाहीं ॥ तो कदा न राहे उलूकगृहीं[४०] ॥ बुडी दिधली क्षीराब्धिडोहीं ॥ दग्ध वन नावडे तया ॥ ७२ ॥ नंदनवनींचा भ्रमर कदाकाळीं ॥ अर्कपुष्पीं रुंजी[४१]

२५ वीज. २७ प्राशलेला. २८ अगस्ती. २९ आयुष्यरूपी समुद्रांतील पाणी. ३० चतुर्मुख ब्रह्मा. ३१ पैसा. ३२ ताक. ३३ कोरडी भिक्षा. ३४ अज्ञानाचा पसारा. ३५ हरिणाक्षे. ३६ अमृत. ३७ वालू. ३८ रुईची फळें. ३९ पक्षी. ४० घुबडाच्या डोलींत. ४१ झोंप.

न घाली ॥ जेणें इंद्रभवनीं निद्रा केली ॥ खदिरांगारीं न निजे तो ॥ ७३ ॥ रंभेतुल्य जाया चांगली ॥ सांडोनि प्रेत कोण कवळी ॥ तैसी भजनीं आवडी घरिली ॥ कदा विषयीं न रमे तो ॥ ७४ ॥ म्हणोनि राजचक्रचूडामणी ॥ माझी आवडी ज्येष्ठभजनीं ॥ ऐसे सुमित्रेचे शब्द कर्णीं ॥ आकर्णिले दशरथें ॥ ७५ ॥ वाटे अमृत प्राशन केलें ॥ कीं त्रिभुवनराज्य हातासि आलें ॥ तैसें नृपाचें मन संतोषलें ॥ आलिंगिलें सुमित्रेसी ॥ ७६ ॥ म्हणे ऐक सुकुमार राजसे ॥ चंपककळिके परमडोळसे ॥ तुवां डोहळे इच्छिले जे मानसें ॥ ते मी सर्वस्वें पुरवीन ॥ ७७ ॥ नानाभूषणें अलंकार ॥ ओंवाळी तिजवरूनि नृपवर ॥ दानें देवविलीं अपार ॥ सुमित्रे-हातीं याचकां ॥ ७८ ॥ याउपरी ज्येष्ठ राणी ॥ कौसल्या नामें ज्ञानखाणी ॥ जे पुराणपुरुषाची जननी ॥ ख्याती त्रिभुवनीं जियेची ॥ ७९ ॥ जे परब्रह्मरसाची मूस ॥ कीं निजप्रकाशरत्नमांदुस ॥ क्षीराब्धिजाहृदयविलास ॥ जिनें अंतरीं सांठविला ॥ ८० ॥ जो इंदिरा-वर त्रिभुवनेश्वर ॥ ज्याचे आज्ञाधारक विधि शेंचीवर ॥ हृदयीं ध्याय अर्पणावर ॥ कौसल्याउदरनिवासी तो ॥ ८१ ॥ असो कौस-ल्येचे मंदिरीं ॥ प्रवेशता जाहला श्रावणारी ॥ सेवक राहविले बाहेरी ॥ द्वारमर्यादा धरोनियां ॥ ८२ ॥ कौसल्या ज्ञानकळा परम ॥ तीस अंतर्बाह्य व्यापला राम ॥ चराचर अवघें परब्रह्म ॥ न दिसे विषमें कदाही ॥ ८३ ॥ सांडोनि जागृति सुषुप्ति स्वप्न ॥ नयनीं ल्याली ज्ञानांजन ॥ चराचर अवघें निरंजनें-॥ रूप दिसे कौसल्ये ॥ ८४ ॥ दशरथ प्रवेशोनि अंतरीं ॥ पाहे स्थूळ-ओसरीवरी ॥ मग सूक्ष्मदेह-माजघरीं ॥ न दिसे कदा कौसल्या ॥ ८५ ॥ कारण-कोठडींत पाहे सादर ॥ तंव तेथें अवघा अंधार ॥ मग महाकारण उपरी थोर ॥ त्यावरी नृप चढिन्नला ॥ ८६ ॥ तेथेंही न दिसे कौसल्या सती ॥ मग चकित पाहे नृपती ॥ जिचे उदरीं सांठवला जगत्पती ॥ तिची स्थिति कळेना ॥ ८७ ॥ मग परात्पर-परसांत ॥ प्रवेशता होय अर्जुनपाळसुत ॥ तों वैसली समाधिस्थ ॥ निर्विकल्पवृक्षातळीं ॥ ८८ ॥ अंतरीं दृष्टि मुरडली ॥ वरदळें स्वनाम विसरली ॥ ब्रह्मानंदरूप जाहली ॥ न चाले बोली द्वैताची ॥ ८९ ॥ जैसा परम सतेज मित्रें ॥ तेथें डाग न लागे अणुमात्र ॥ स्वरूपीं पहुडतां योगेश्वर ॥ ज्ञान राहे ऐलीकडे ॥ ९० ॥ कल्पांतविजूंसें मशक गिळी ॥ पिपीलिकाँ मेरु कक्षेसी घाली ॥ धेनुवत्स मृगेंद्रा आकळी ॥ एकादे वेळे घडेल हें ॥ ९१ ॥ परी चतुरा विश्वरूपावरी ॥ दृष्टांत न चाले निर्धारीं ॥ श्रोत्रियांचे यज्ञशाळेभीतरी ॥ कोठें महारी प्रवेशेल ॥ ९२ ॥ वडवानळापुढें कर्पूर जाण ॥ कीं जलनिधिमाजी लवण ॥ तैसी बुद्धि आणि मन ॥ स्वसुखावरी विरालीं ॥ ९३ ॥ असो स्वानंदसागरांत ॥ कौसल्या पूर्ण समाधिस्थ ॥ जवळी उभा ठाकला दश-रथ ॥ पाहे तटस्थ उगाचि ॥ ९४ ॥ कौसल्या स्वस्वरूपीं लीन ॥ हे दशरथासी नेणवे खूण ॥ म्हणे हे रुसली संपूर्ण ॥ तरीच वचन न बोले ॥ ९५ ॥ म्हणून राजचक्रचूडामणी ॥ कौसल्येजवळ स्वयें बैसोनी ॥ स्नेहें तीस हृदयीं धरूनी ॥ समाधान करीतसे ॥ ९६ ॥

४२ शेराच्या जळजळत्या निखाऱ्यांवर. ४३ पत्नी. ४४ राजश्रेष्ठ. ४५ ऐकिले ४६ स्वप्रकाशरूप रत्नें ठेवण्याची पेटी. ४७ लक्ष्मीपति. ४८ ब्रह्मदेव. ४९ इंद्र. ५० पार्वतीपती शंकर. ५१ श्रावणशत्रु दशरथ. ५२ भेदभाव. ५३ ब्रह्मस्वरूप. ५४ बाह्यावृत्ती. ५५ सूर्य. ५६ विजेला. ५७ मुंगी.

तरी ते न उघडी नयन ॥ नाहीं शरीराचें भान ॥ मी स्त्रीपुरुषस्मरण ॥ गेली विसरोन कौसल्या ॥ ९७ ॥ अलंकार कैंचे एक सुवर्ण ॥ तरंग लटिके एक जीवन ॥ तैसें विश्व नाहीं एक रघुनंदन ॥ आनंदघन विस्तारला ॥ ९८ ॥ ऐसी कौसल्येची स्थिति जाहली ॥ राजा म्हणे हे झडपली ॥ कीं महद्भूतें पूर्ण घेतली ॥ ओळखी मोडली इयेची ॥ ९९ ॥ राजा म्हणे देवऋषि सिद्ध ॥ इहीं दिधला आशीर्वाद ॥ कीं पोटा येईल ब्रह्मानंद ॥ आदिपुरुष श्रीराम ॥ १०० ॥ ऐकतां रामनामस्मरण ॥ कौसल्येनें उघडिले नयन ॥ तों जगदाभास संपूर्ण ॥ रघुनंदनरूप दिसे ॥ १ ॥ राजा म्हणे हो नितंबिनी[५९] ॥ कुरंगनेत्रे[६०] गजगामिनी ॥ काय जे आवडी असेल मनीं ॥ डोहळे पुरवीन सर्व ते ॥ २ ॥ भ्रम टाकीं बोलें वचन ॥ तों कौसल्या बोले गर्जोन ॥ मी जगदात्मा रघुनंदन ॥ कैंचें अज्ञान मजपासीं ॥ ३ ॥ स्थूळ लिंग आणि कारण ॥ याहून माझें रूप भिन्न ॥ महाकारण हें निरसून ॥ आत्माराम वेगळा मी ॥ ४ ॥ द्वैत अद्वैत महाद्वैत ॥ याहून वेगळा मी अतीत ॥ सच्चिदानंद शब्द जेथ ॥ खुंटोनियां राहिला ॥ ५ ॥ जीव शिव हे दोन्ही पक्ष ॥ ध्याता ध्यान लय लक्ष ॥ यांवेगळा मी सर्वसाक्ष ॥ अचिंत्य अलक्ष श्रीराम ॥ ६ ॥ राजा म्हणे कौसल्ये ऐकें ॥ मी कोण आहें मज ओळखें ॥ डोहळे पुसावया महासुखें ॥ तुजजवळी बैसलों ॥ ७ ॥ येरी म्हणे ज्ञाता ज्ञेय ज्ञान ॥ हें सर्व गेलें आटोन ॥ नाहीं स्त्रीपुरुषनपुंसकपण ॥ मीतूंपण तेथें कैंचें ॥ ८ ॥ नृप म्हणे हे महद्भूतें घेतली ॥ ओळखी सर्व मोडली ॥ मग पुसे गोष्ट मागली ॥ धाकुटपणींची तियेतें ॥ ९ ॥ राजा म्हणे शशांकवदने ॥ गुणसरिते पद्मनेत्रने[६१] ॥ वर्‍हांड बुडवोनि तुज रावणें ॥ नेलें होतें आठवतें कीं ॥ ११० ॥ शत्रूचें नाम ऐकतां कर्णीं ॥ हांक फोडिली भुजा पिटोनी ॥ म्हणे धनुष्यबाण दे आणूनी ॥ टाकीन छेदोनि दाही शिरें ॥ ११ ॥ ताटिका मारूनियां आधीं ॥ ऋषियाग पाववीन सिद्धी ॥ महाराक्षस वधोनि युद्धीं ॥ गाधितनय[६२] तोषवीन ॥ १२ ॥ शिवचाप परम प्रचंड ॥ मोडूनि करीन दुखंड ॥ माझी ज्ञानशक्ति जे अखंड ॥ पण जिंकोनि आणीन ते ॥ १३ ॥ जेणें निःक्षत्री केली अवनि[६३] पूर्ण ॥ त्याचा गर्व हरीन न लागतां क्षण ॥ मी एकपत्नीव्रत रघुनंदन ॥ पितृवचन पाळीन मी ॥ १४ ॥ मी सेवीन घोर विपिन[६४] ॥ परिवारेंसीं त्रिशिरा खर दूषण ॥ क्षणमात्रें टाकीन वधोन ॥ अग्नि तृण जाळी जेवीं ॥ १५ ॥ [६५]रिसां वानरांहातीं ॥ लंका घालीन पालथी ॥ माझा वज्रदेही मारुती ॥ परम पुरुषार्थी महावीर ॥ १६ ॥ क्षणें जाळील राक्षसनगर ॥ शत्रूंचीं शिरें छेदीन अपार ॥ पाषाणीं पाल[६६]णोनि समुद्र ॥ लंकापुर घेईन मी ॥ १७ ॥ कौसल्या हांक फोडी दारुण ॥ लंकेपुढें माजवीन रण ॥ महाढिसाळ[६७] कुंभकर्ण ॥ टाकीन छेदून क्षणार्धें ॥ १८ ॥ सहपरिवारें वधोनि दशशिर ॥ बंदीचे सोडवीन सुरवर ॥ माझा बिभीषण प्रियकर ॥ छत्र धरवीन तयावरी ॥ १९ ॥ स्वपदीं स्थापोनि निजभक्त ॥ मी अयोध्येसी येईन रघुनाथ ॥ आधि व्याधि जरा मृत्य ॥ यांविरहित करीन प्रजा ॥ १२० ॥ स्त्रीपुरुषनपुंसकभेद ॥

५८ जगद्रूपानें विस्तारलेला पसारा. ५९ स्त्रिये. ६० हरिणाक्षि, कमलाप्रमाणें जिचे डोळे आहेत अशा स्त्रिये. ६१ आम्हां उभयतांचा लग्नसोहळा. ६२ विश्वामित्र. ६३ पृथ्वी. ६४ अरण्य. ६५ वानरांच्या. ६६ आच्छादून, बांधून. ६७ अपजड, अति विशाळ.

यांवेगळा मी ब्रह्मानंद ॥ मायाचक्रचाळक शुद्ध ॥ निष्कलंक अभेद पैं ॥ २१ ॥ मी प्रळयकाळासी शासनकर्ता ॥ आदिमायेचा निजभर्ता ॥ कर्ता हर्ता पाळिता ॥ मजपरता नसेचि ॥ २२ ॥ मी अज अजित सर्वेश्वर ॥ मीच नटलों चराचर ॥ धरोनि नाना अवतार ॥ मी मजमाजी सँमावें ॥ २३ ॥ ऐसें ऐकतां दशरथ ॥ म्हणे हे भूतें घेतली यथार्थ ॥ फांटा फुटलासे बहुत ॥ बडबडत भलतेंचि ॥ २४ ॥ पंचाक्षरी आणा पाचारून ॥ महाराज सद्गुरु ज्ञानघन ॥ तो सरसिजोद्भवनंदनें ॥ बोलावून आणा वेगीं ॥ २५ ॥ जेणें दर्भावरी घरिली अँवनी ॥ कमंडलु ठेविला सूर्यासनीं ॥ इंद्रसभेसी नेला वासरमणी ॥ अद्भुत करणी जयाची ॥ २६ ॥ वसिष्ठ आला धांवोन ॥ राजा दृढ धरी चरण ॥ म्हणे कोसल्येसारिखें निधानें ॥ भूतें संपूर्ण ग्रासिलें ॥ २७ ॥ म्यां याग केला सौंयासीं ॥ कीं पुत्र होईल कौसल्येसी ॥ तों मध्येंच हे विवँशी ॥ उठली ऋषि काय करूं ॥ २८ ॥ मग म्हणे ब्रह्मसुतें ॥ इच्या पोटा येईल रघुनाथ ॥ तीस गोष्टी हे विपरीत ॥ कालत्रयीं घडेना ॥ २९ ॥ अंधकूपीं पडेल तँरणी ॥ कोरान्न मागेल चिंतामणी ॥ सुधारस गेला कडवटोनी ॥ हें कालत्रयीं घडेना ॥ १३० ॥ क्षुधेनें पीडिला क्षीरसागर ॥ सुरतरूसी येईल दरिद्र ॥ तीव्र तपेल रोहिणीवरें ॥ हें कालत्रयीं घडेना ॥ ३१ ॥ अंधत्व आलें अग्निनेत्रीं ॥ ताम्रनाणें मागे कँनकाद्री ॥ अंत्यज नांदेल श्रोत्रियमंदिरीं ॥ हें कालत्रयीं घडेना ॥ ३२ ॥ असो वसिष्ठ कौसल्येजवळी ॥ येऊनि विलोकी तये वेळीं ॥ तंव ती श्रीरामरूप जाहली ॥ अंतर्बाह्य समूळ ॥ ३३ ॥ न दिसे स्त्रियेची आकृती ॥ धनुष्यबाण घेऊनि हातीं ॥ आकर्ण नयन विराजति ॥ देखे मूर्ति जगद्वंद्य ॥ ३४ ॥ मूर्ति पाहतां आनंदघन ॥ सद्गद जाहला ब्रँह्मनंदन ॥ अष्टभाव दाटले पूर्ण ॥ गेला विसरोनि देहभाव ॥ ३५ ॥ वसिष्ठ कौसल्या ते अवसरीं ॥ मुरालीं ब्रह्मानंदसागरीं ॥ दशरथ परम अंतरीं ॥ घाबरा जाहला नेणोनियां ॥ ३६ ॥ वसिष्ठासारिखा महामुनी ॥ भूतें झडपिला ये क्षणीं ॥ या भूताची करिता झाडणी ॥ कोणी त्रिभुवनीं दिसेना ॥ ३७ ॥ मी हतभाग्य संपूर्ण ॥ मज कैंचें पुत्रसंतान ॥ कौसल्याही गेली झडपोन ॥ ब्रह्मानंदें मूर्च्छित ॥ ३८ ॥ निरपराध वधिला श्रावण ॥ तेणें हें दुःख दारुण ॥ ऐसा तो महाराज अजनंदनें ॥ जळाला पूर्ण अंतरीं ॥ ३९ ॥ तों स्वानंदलहरी जिरवून ॥ वसिष्ठें उघडिले नयन ॥ राजा धांवोन धरी चरण ॥ आनंद न माय अंतरीं ॥ १४० ॥ रायासी कैसी पँरी जाहली ॥ कीं पूरीं बुडतां नौका आली ॥ अंधकूपीं पडतां तात्काळीं ॥ हस्त सूर्ये दीधला ॥ ४१ ॥ सर्प डंखितां गरुड धांवे ॥ गर्जे कोंडितां केसँरी पावे ॥ कीं क्षुधितापुढें हेलावे ॥ क्षीरसागर येऊनियां ॥ ४२ ॥ कीं वणव्यांत जळतां वरुषे घन ॥ कीं हुडहुडी भरतां धडके कृशानें ॥ कीं दरिद्रें पीडितां लक्ष्मी आपण ॥ घरीं येऊन बैसली ॥ ४३ ॥ ऐसा आनंदला राजा दशरथ ॥ म्हणे सद्गुरु स्वामी तूं समर्थ ॥ मज नवल हें वाटत ॥ तुजही भूतें झडपिलें ॥ ४४ ॥ आम्ही अत्यंत भाग्यहीन ॥ कैंचें देखों पुत्रसंतान ॥ मग हांसिन्नला ब्रह्मनंदनें ॥ काय

६८ सर्व जगद्रूप पसारा उपसंहारकालीं स्वतांमध्येंच सांठवतो. ६९ ब्रह्मदेवाचा मानसपुत्र, वसिष्ठ. ७० पृथ्वी. ७१ ठेवा. ७२ मोठ्या प्रयत्नानें. ७३ भूतबाधा. ७४ सूर्य. ७५ चंद्र. ७६ सुवर्णाचा मेरु. ७७ दशरथ, ७८ प्रकार, स्थिति. ७९ शांकलेल्या पद्धीत विहिरींत. ८० सिंह. ८१ अग्नि.

गर्जोन बोलत ॥ ४५ ॥ जो नीलग्रीवेंहृदयरत्न ॥ जो कमलोद्भवार्चे देवतार्चन ॥ सनकादिक करोनि यत्न ॥ हृदयसंबळींत वाहती पैं ॥ ४६ ॥ तो वैकुंठपुरविलासी ॥ आला कौसल्येच्या गर्भासी ॥ मारूनि सकळ दुष्टांसी ॥ देव सोडवील बंदींचे ॥ ४७ ॥ जें जें कौसल्या बोलिली सत्य ॥ तितुकें होईल यथार्थ ॥ तुज होतील चार सुत ॥ सत्य वचनार्थ राजेंद्रा ॥ ४८ ॥ शंख चक्र शेष नारायण ॥ चतुर्धा रूपें प्रकटेल जगज्जीवन ॥ ज्याची कथा ऐकतां पापी जन ॥ उद्धरोनि तरतील ॥ ४९ ॥ माध्यान्हा येईल चंडकिरण ॥ पुष्य नक्षत्र साधून ॥ अवतरेल रघुनंदन ॥ पूर्णब्रह्म जगद्गुरू ॥ १५० ॥ ऐसीं वसिष्ठाचीं वचनें ॥ कीं स्वानंदनभींचीं उडुगणें ॥ कीं सत्यवैराग्यरींचीं रत्नें ॥ निवडोनि दिधलीं दशरथा ॥ ५१ ॥ तेणें कर्णद्वारें त्वरित ॥ सांठविलीं हृदयसंदुकेंत ॥ धांवोनि गुरूचे पाय धरीत ॥ म्हणे कृतार्थ जाहलों मी ॥ ५२ ॥ असो भरलिया नवमास ॥ प्रसूतिसमय कौसल्येस ॥ कवण ऋतु कवण दिवस ॥ सावकाश ऐका तें ॥ ५३ ॥ वसंत-ऋतु चैत्र मास ॥ शुक्लपक्ष नवमी दिवस ॥ सूर्यवंशीं जगन्निवास ॥ सूर्यवासरीं जन्मला ॥ ५४ ॥ माध्यान्हा आला चंडकिरण ॥ पुष्य नक्षत्र साधून ॥ अवतरला रघुनंदन ॥ पूर्णब्रह्म जगद्गुरु ॥ ५५ ॥ श्रीराम केवळ परब्रह्म ॥ त्यासी जाहला म्हणतां जन्म ॥ संत हांस-तील परम ॥ तत्त्वज्ञानवेत्ते जे ॥ ५६ ॥ ज्याची लीला ऐकतां अपार ॥ खंडे जन्म मृत्यु दुर्धर ॥ त्या रामासी जन्मसंसार ॥ काळ-त्रयीं घडेना ॥ ५७ ॥ दाविली लौकिक करणी ॥ कीं कौसल्या जाहली गर्भिणी ॥ तो ब्रह्मानंद मोक्षदानी ॥ जन्मकर्म त्या कैंचें ॥ ५८ ॥ क्षीरसागरींहून नारायण ॥ येऊन अयोध्येसी जाहला सगुण ॥ शेषलक्ष्मीसहित जगज्जीवन ॥ तैसाचि तेथें संचरला ॥ ५९ ॥ जो अनंतकल्याणदायक ॥ अज अजित निष्कलंक ॥ भक्त तारावयासी देख ॥ जगन्नायक अवतरला ॥ १६० ॥ देव करिती जयजयकार ॥ करोनि राक्षससंहार ॥ म्हणती आतां अवतरेल हा रघुवीर ॥ बंधमुक्त करील आम्हां ॥ ६१ ॥ असो अयोध्यापुरीं निराळीं ॥ विमानांची दाटी जाहली ॥ दुंदुभींची घाई लागली ॥ पुष्पें वर्षती अपार ॥ ६२ ॥ असो ते कौसल्या सती ॥ बैसली असतां एकांतीं ॥ तों अष्टादश वरुषांची मूर्ती ॥ सन्मुख देखे अकस्मात ॥ ६३ ॥ निमाँसुर वदन सुंदर ॥ तेजें भरलें निजमंदिर ॥ ज्या तेजासी शशि मित्र ॥ लोपोनि जाती विलोकितां ॥ ६४ ॥ पदकमलमकरंदसेवना ॥ भ्रमरी जाहली क्षीराब्धिकन्या ॥ कदाही न विसंबे चरणां ॥ कृपण धना-लागीं जैसा ॥ ६५ ॥ संध्याराग अरुण बालार्क ॥ दिव्य रत्नांचे काढिले रंग देख ॥ तळवे तैसे सुरेख ॥ श्रीरामाचे वाटती ॥ ६६ ॥ चंद्र क्षयरोगें कष्टी होउनी ॥ निजांगाचीं दश शकलें करोनी ॥ सुरवाडला रामचरणीं ॥ स्वानंदधणी घेतसे ॥ ६७ ॥ रमा पदीं रंगली दिवसनिशीं ॥ तों बंधु पाहुणा आला शशी ॥ तोही राहिला अक्षय व्हावयासी ॥ नव जायचि माघारा ॥ ६८ ॥ ध्वज वज्रांकुश पद्म ॥ ऊर्ध्वरेखा चक्रादि चिन्हें उत्तम ॥ यांचा अर्थ ऐकतां परम ॥ सुख होय भक्तांसी ॥ ६९ ॥ सात्विक प्रेमळासी देखा ॥ ऊर्ध्व संकेत

८२ शंकराच्या हृदयांत रत्नाप्रमाणें जतन केलेला ( राम ). ८३ ब्रह्मदेवाचें. ८४ हृदयसंपुटांत. ८५ चार प्रकारचीं. ८६ सूर्य. ८७ नक्षत्रसमुदाय. ८८ सत्यरूप हिऱ्याच्या खाणींतील. ८९ निरालंब आकाशांत. ९० सुरेख. ९१ चरणकमळरूपी फुलांतील मध पिण्याकरितां. ९२ लक्ष्मी. ९३ लीन झाला. ९४ आनंदाची तृप्ती.

दावी ऊर्ध्वरेखा ॥ सत्यशील धार्मिकां भाविकां ॥ ऊर्ध्वपंथ दाविती ॥ १७० ॥ विद्यामदें मत्त गज ॥ एक भाग्यमदें डुलती सहज ॥ त्यांसी आकर्षावया सहज ॥ अंकुश पायीं झळकतसे ॥ ७१ ॥ पायीं झळके दिव्य पद्म ॥ तें पद्मेचें राहातें धाम ॥ ते जगमाउली सप्रेम ॥ तये पदीं सुरवाँडली ॥ ७२ ॥ अहंकार जड पर्वत ॥ शरणागतां बाधक यथार्थ ॥ तो फोडावयासी तळपत ॥ वज्र पायीं रामाच्या ॥ ७३ ॥ भवसागर तरावया गहन ॥ जहाज अद्भुत रामचरण ॥ त्यावरी ध्वज विराजमान ॥ रात्रंदिन तळपतसे ॥ ७४ ॥ काम क्रोध दुर्धर असुर ॥ त्यांचें छेदावया शिर ॥ देदीप्यमान दिव्य चक्र ॥ रामतळवां झळकतसे ॥ ७५ ॥ मळरहित प्रपद सुंदर ॥ घोंटीव त्रिकोणयंत्राकार ॥ इंद्रनीळ उपमा साचार ॥ न पुरती कठीण म्हणोनियां ॥ ७६ ॥ पदतलें आरक्त साजिरीं ॥ वसे तेथें सरसिजोद्भवकुमरी ॥ विश्रांति घ्यावया अहोरात्रीं ॥ रामचरणीं रंगली हो ॥ ७७ ॥ किती पापें हरावीं दिवसरजनीं ॥ म्हणोनि श्रमली जन्हुनंदिनी ॥ शुभ वांकी होउनी ॥ रामचरणीं विराजे ॥ ७८ ॥ मांड्या सुकुमार सांवळिया ॥ तेथें सुरवाडली मित्रतनया ॥ कीं यमानुजा अपवाद चुकवावया ॥ महदाश्रयें करीतसे ॥ ७९ ॥ ऐसी रामपदीं त्रिवेणी साचार ॥ प्रयाग तीर्थराज पावन थोर ॥ प्रेमें माघमासीं सभाग्य नर ॥ प्रातःस्नानासी धांवती ॥ १८० ॥ भक्त मुमुक्षु साधक संत ॥ हेचि राजहंस विराजत ॥ वांकीवरी रत्नें तळपत ॥ तेचि तपस्वी तपताती ॥ ८१ ॥ चरणध्वज झळके स्पष्ट ॥ तोचि जाणिजे अक्षयवट ॥ जेथें सनकादिक वरिष्ठ ॥ क्षेत्रसंन्यासी जाहले ॥ ८२ ॥ प्रयागीं मोक्ष देह त्यागितां ॥ येथें मोक्ष श्रवण करितां ॥ देहीं असतां विदेहता ॥ येत हाता भक्तांच्या ॥ ८३ ॥ त्या प्रयागीं कष्ट बहुत ॥ येतां जातां भोगिती अमित ॥ हा प्रयाग ध्यानीं अकस्मात ॥ प्रकटे सत्य भक्तांच्या ॥ ८४ ॥ तोडर वांकी नूपुरें ॥ असुरांवरी गर्जती गजरें ॥ वाटे नभ गाळोनि एकसरें ॥ पोटऱ्या जानूं वोतिल्या ॥ ८५ ॥ कीं सरळ कर्दळीचे स्तंभ ॥ कीं गरुडपाचूंचे उगवले कोंभ ॥ कीं इंद्रनीळ गाळोनि सुप्रभ ॥ जानू जंघा वोतिल्या ॥ ८६ ॥ मिळाल्या सहस्र चपळा ॥ तैसा कांसे झळके पीतांबर पिंवळा ॥ वरी तळपे कटिमेखळा ॥ पाहतां डोळां आल्हाद ॥ ८७ ॥ कटिमेखळेवरी महामणी ॥ कीं पंक्तीं बैसले वासरमणी ॥ दाहकत्व सांडूनि जघनीं ॥ श्रीरामाच्या लागले ॥ ८८ ॥ वेदांतींच्या श्रुति गहन ॥ अर्थ बोलती जेवीं शोधून ॥ तैशा क्षुद्रघंटा रुणझुण ॥ शब्द करिती रसाळ ॥ ८९ ॥ देखून कटिप्रदेश सुकुमार ॥ लाजोनि वना गेला मृगेंद्र ॥ वाटे त्या दुःखें स्वशरीर ॥ वाहन केलें दुर्गेचें ॥ १९० ॥ गंभीरावर्त नाभिस्थान ॥ जेथें जन्मला चतुरानन ॥ सत्व रज तम गाळून ॥ त्रिवळी उदरीं विराजे ॥ ९१ ॥ कौस्तुभतेज अपार ॥ पाहतां भुलती शशिमित्र ॥ गुणीं ओंविलीं नक्षत्रें समग्र ॥ मुक्ताहार डोलती तेवीं ॥ ९२ ॥ कीं त्या मुक्तांच्या माळा बहुत ॥ रघुपतीच्या गळां डोलत ॥ कीं मुक्तारूपें समस्त ॥ अनंत ब्रह्मांडें गुंफिलीं ॥ ९३ ॥ मुक्तामाळांचें तेज गहन ॥ परी त्यांचा पालटला

९५ लक्ष्मीचें. ९६ स्थान. ९७ लीन झाली. ९८ तळवे, तळपाय. ९९ तांबूस. १०० ब्रह्मकुमारी. १ गंगा. २ यमाची बहीण ( यमुना ). ३ मोठ्याचा आश्रय. ४ गुडघे. ५ मांड्या. ६ विजा. ७ सूर्य. ८ कमरेला. ९ लहान घागऱ्या. १० पोटावरच्या तीन वळ्यांचा समूह.

वर्ण ॥ दिसती इंद्रनीळ[11]समान ॥ श्यामलांगीं रघुपतीच्या ॥ ९४ ॥ नीळ गगनावरी सुंदर ॥ मंदाकिनी[12]ओघ दिसे शुभ्र ॥ तैसा अम्लान[13] सुमनहार ॥ श्यामतनुवरी शोभत ॥ ९५ श्यामलांगीं अति निर्मळ ॥ वरी डोले वैजयंती माळ ॥ पुष्करीं[14] शक्रचाप[15] सुढाळ ॥ सुरंग जैसें मिरवतसे ॥ ९६ ॥ कीं मेघीं स्थिरावली क्षणप्रभा[16] ॥ तैसी वैजयंतीची शोभा ॥ सहस्रमुखाच्या[17] जिभा ॥ गुण वर्णितां शिणल्या हो ॥ ९७ ॥ अनंत भक्त हृदयीं धरिले ॥ तरीच वक्षःस्थळ रुंदावलें ॥ ब्रह्मानंद मुरोनि वोतिलें ॥ हृदयस्थान सत्य पैं ॥ ९८ ॥ श्रीवत्स झळके सख्यांगीं[18] ॥ श्रीनिकेतन वामभागीं[19] ॥ उटी शोभे श्यामलांगीं ॥ कोण्या दृष्टांतें तें ऐका ॥ ९९ ॥ मित्रकन्येवरी[20] जान्हवीजळ[21] ॥ कीं राकेइंदुप्रभेनें[22] शोभे निराळ[23] ॥ कीं देदीप्य मणि इंद्रनीळ ॥ आवरण त्यावरी काश्मीराचें[24] ॥ २०० ॥ कीं हाळहळ जाहलें अपार ॥ म्हणोनि धांवला कर्पूरगौर[25] ॥ चंदनरूपें तो प्राणमित्र[26] ॥ श्यामलांगीं जडला हो ॥ १ ॥ तैसी उटी दिसे सुढाळ ॥ कीं चंद्रबिंब उकले निर्मळ ॥ कीं मुक्ताफळांचा गोळा सुढाळ ॥ इंद्रनीळा चर्चियेला ॥ २ ॥ शंख चक्र धनुष्य बाण ॥ चोहों हस्तीं शोभायमान ॥ हस्त-कटकांचे तेजेंकरून ॥ उजळीत नभातें ॥ ३ ॥ क्षणप्रभेचीं[27] चक्रें तळपती ॥ तैशा मुद्रिका करीं झळकती ॥ किंवा औपासक यंत्रें रेखिती ॥ तेंचि गती येथें दिसे ॥ ४ ॥ पाळयामीनें उघडिले नयन ॥ तेवीं कीर्तिमुखें परिपूर्ण ॥ कीं निष्कलंक रोहिणीरमण ॥ पदक हृदयीं डोलतसे ॥ ५ ॥ कंबुकंठ[28] अति शोभत ॥ नासिक सरळ सुकुमार बहुत ॥ मंदस्मितवदन विराजत ॥ कोटि मन्मथ[29] ओंवा-ळिजे ॥ ६ ॥ विद्रुमवर्ण[30] अधर सतेज ॥ माजी ओर्टीनें झळकती दिजे[31] ॥ त्या तेजें शशि नक्षत्रें तेजःपुंज ॥ झांकोळती[32] पाहतां ॥ ७ ॥ त्रैलोक्यींचा मेळवोनि आनंद ॥ वोतिलें रामाचें वदनारविंद[33] ॥ आकर्ण नेत्र भ्रुकुटी विशद[34] ॥ धनुष्याकृती शोभती ॥ ८ ॥ स्वानंद-सरोवरींचीं कमलदलें ॥ तैसे आकर्ण नयन विकामले ॥ त्या कृपादृष्टीनें निवाले ॥ प्रेमळ जन सर्वही ॥ ९ ॥ कुंडलें तळपती मकरा-कार ॥ कीं जडले रविरोहिणीवर ॥ कीं अंगिरापुत्र[35] भृगुपुत्रें[36] ॥ विचार पुसती रामातें ॥ २१० ॥ कीं वेदसागरींच्या रत्नज्योती ॥ पूर्व-उत्तर मीमांसा निश्चितीं ॥ कुंडलरूपें जाणविती ॥ अर्थविशेष स्वामीतें ॥ ११ ॥ श्रीरामतनु सुकुमार ॥ तेणें शोभती अलंकार ॥ पीत-वर्ण टिळक सुंदर ॥ अनुपम्य रेखिला ॥ १२ ॥ सुवर्णोदक नदीचा पूर ॥ नीळगिरिपाठारीं निरंतर ॥ तैसा टिळक सुंदर ॥ विशाळ भाळीं झळकतसे ॥ १३ ॥ जैसा कल्पांतीचा दिनकर ॥ तैसा मुकुट दिसे जाज्वल्य सुंदर ॥ तेज तळपतसे अपार ॥ चक्रामाजी न समाये ॥ १४ ॥ दावाग्नीचा कल्लोळ भडकत ॥ तैसें उत्तरीय वस्त्र रुळत ॥ दशांप्रति मुक्तें झळकत ॥ कृत्तिकापुंज जयापरी ॥ १५ ॥ तें परम तेजाळ क्षीरोदक[37] ॥ कीं शुभ्र यशा चढलें बीक[38] ॥ शुभ्रश्वेत मृडानीनायक[39] ॥ कर्पूरेंकरूनि उटिला कीं ॥ १६ ॥ कीं दिव्य रजत-

११ इंद्रनीळ मण्याप्रमाणें. १२ गंगेचा प्रवाह. १३ टवटवीत. १४ आकाशांत. १५ इंद्रधनुष्य. १६ वीज. १७ शेषाच्या. १८ उजवे भागीं. १९ डाव्या भागीं. २० यमुनेच्या प्रवाहांत. २१ गंगेचें पाणी. २२ पूर्णिमेच्या चंद्राच्या तेजानें. २३ आकाश. २४ केशरचें. २५ शंकर. २६ विष्णूचा सखा शंकर. २७ शंखाप्रमाणें. २८ मदन. २९ पोंवळ्याच्या रंगाचे, लाल. ३० दांत. ३१ निस्तेज दिसतात, ३२ मुखकमळ. ३३ निर्मळ. ३४ बृहस्पति. ३५ शुक्राचार्य. ३६ रेशमी उंची वस्त्र. ३७ बळ, तेज. ३८ पार्वतीपति शंकर.

तगट घडलें ॥ कीं पारदें कैलास डँवरिलें ॥ कीं जान्हवीतोयें ओपविलें ॥ दिनकरनाथें स्वहस्तें ॥ १७ ॥ सच्चिदानंदतनु सगुण ॥ अतसीकुसुमाँभास पूर्ण ॥ त्याचि रंगेंकरून ॥ नीलोत्पलें राबविलीं ॥ १८ ॥ नभासी चढला तोच रंग ॥ त्याचि प्रभेनें रंगले मेघ ॥ इंद्र-नीळही सुरंग ॥ त्याच प्रकाशें प्रकाशले ॥ १९ ॥ तेथींचें सौंदर्य अद्भुत ॥ गरुडपाचूंसी तेज दिसत ॥ मैंर्गजासी बीकें चढत ॥ तनु सांवळी देखोनियां ॥ २२० ॥ तो वैकुंठींचा वेल्हाळ सुंदर ॥ भक्तमंदिरांगणमंदारें ॥ कुरवंडी करूनि सांडावे साचार ॥ कोटि मकरध्वँज वरोनियां ॥ २१ ॥ ब्रह्मांड फोडोनि बाहेरी ॥ अंगींचा सुवास धांवत वरी ॥ लावण्यामृतसागर कैटभारी ॥ लीलावतारी साधक जो ॥ २२ ॥ पूर्णब्रह्मानंद रघुवीर ॥ लीलाँविग्रही श्रीधरवर ॥ हृदयीं रेखिला निरंतर ॥ निजभक्तीं प्रेमभरें ॥ २३ ॥ असो कौसल्या बोले ते अवसरीं ॥ भक्तवत्सला मधुकैटभारी ॥ तूं आतां बाळवेष धरीं ॥ माझे उदरीं अवतरें ॥ २४ ॥ लोक म्हणतील कौसल्यानंदन ॥ ऐसा होईं तूं मनमोहन ॥ अमलदँल राजीवनयन ॥ हास्यवदन विलोकीं ॥ २५ ॥ सजलजलदवर्ण कोमळ ॥ कौसल्येपुढें जाहला बाळ ॥ तंव ते परम सुवेळ ॥ पुष्यार्कयोग ते समयीं ॥ २६ ॥ जो क्षीरसागरवासी तमालनीळ ॥ तो कौसल्येपुढें जाहला बाळ ॥ चरणांगुष्ठ धरोनि कोमळ ॥ मुखकमळीं घालीतसे ॥ २७ ॥ भक्त चरणीं लागले बहुत ॥ गोड गोड म्हणोन वाखाणित ॥ यालागीं गोडी रघु-नाथ ॥ स्वयें पाहत चाखोनियां ॥ २८ ॥ कीं स्वचरणगोडी सेवित ॥ भक्तांसी लोभ लागावया बहुत ॥ म्हणोनियां कौसल्यासुत ॥ कौतु-कार्थ दावीतसे ॥ २९ ॥ पुत्र झाला कौसल्येस ॥ लागला वाद्यांचा एकचि घोष ॥ सुरांसहित सुराधीश ॥ जयजयकार नभीं करिती ॥ २३० ॥ सुमनसंभार ते अवसरीं ॥ देव वर्षती अयोध्येवरी ॥ दुंदुभिनाद अंबरीं ॥ न मायेचि तेधवां ॥ ३१ ॥ हळदीकुंकुमें तार्टे भरोनी ॥ बिदोबिदीँ धांवती सुवासिनी ॥ पावल्या कौसल्येच्या सदनीं ॥ वेगेंकरोनि तेधवां ॥ ३२ ॥ मंगळतुरांचा एकचि नाद ॥ घरोघरीं ब्रह्मानंद ॥ ते समयींचा आनंद ॥ भोगींद्र वर्णूं शकेना ॥ ३३ ॥ आनंदला ब्रह्मनंदन ॥ चहूंकडोन धांवले ब्राह्मण ॥ जैसा क्षीरसागर देखोन ॥ क्षुधार्थी वेगें पावती ॥ ३४ ॥ कीं महापर्वकाळ प्रगटला ॥ प्रयागासी धांवे भक्तमेळा ॥ कीं गांवासमीप परीस निघाला ॥ दुर्बळ धांवती लोह घेउनी ॥ ३५ ॥ कीं तृषाक्रांत गोभारें सकळी ॥ धांवती जैसे गंगाजळीं ॥ कीं वृक्ष दाटले देखून फळीं ॥ विहंगमँ जैसे झेंपावती ॥ ३६ ॥ तैसी ब्राह्मणांची ते काळीं ॥ दाटी जाहली राजाजवळी ॥ पुत्रमुख पहावया ते वेळीं ॥ दश-रथराव चालिला ॥ ३७ ॥ दशरथ म्हणे याचकांसी ॥ जे जे इच्छा असेल मानसीं ॥ ते ते मागा मजपाशीं ॥ येच समयीं देईन ॥ ३८ ॥ भांडारें फोडिलीं बहुत ॥ याचकांसी म्हणे दशरथ ॥ मोटा बांधोनि अमित ॥ आवडे तितुकें न्या आतां ॥ ३९ ॥ समागमें घेऊन ब्राह्मण ॥ महाराज तो अर्जनंदन ॥ प्रवेशला आनंदेंकरून ॥ कौसल्यासदनीं तेधवां ॥ २४० ॥ दशरथें करोनियां स्नान ॥

३९ शोभविलें. ४० अळशीच्या फुलाप्रमाणें. ४१ पाचेला. ४२ बळ, तेज. ४३ वृक्षविशेष. ४४ मदन. ४५ कैटभराक्षसाला मारणारा विष्णु. ४६ लीलेनें देहधारी. ४७ निर्मळ पाकळ्यांचें. ४८ रस्त्यांतून, गल्लयांतून. ४९ गाईबैलांचा कळप. ५० पक्षी. ५१ दशरथराजा.

केलें आधीं पुण्याहवाचन ॥ पहावयासी पुत्रवदन ॥ राजा जवळी पातला ॥ ४१ ॥ श्रीरामवदन ते अवसरीं ॥ न्याहाळितां तोषला अंतरीं ॥ मधुबिंदु घालोनि मुखाभीतरीं ॥ मधुकैटभारी तृप्त केला ॥ ४२ ॥ श्रीरामाचें जातक ॥ करी तेव्हां नृपनायक ॥ गोभूरत्नें असंख्य ॥ मग देत याचकांसी ॥ ४३ ॥ रत्नजडित सिंहासन ॥ त्यावरी माय बैसली राम घेऊन ॥ मृगांकवर्ण चामरें जाण ॥ दोघी ढाळिती दोहींकडे ॥ ४४ ॥ पीकपात्र घेऊनि हातीं ॥ समीप विलसे एक दूती ॥ कनकांबराची घेऊन बुंथी ॥ बैसली सती कौसल्या ॥ ४५ ॥ भोंवते वेष्टिले विद्वज्जन ॥ त्यांसी भूतभविष्यवर्तमानज्ञान ॥ सातशतें स्त्रिया धांवोन ॥ येत्या जाहल्या दशरथाच्या ॥ ४६ ॥ जैशा केवळ विद्युल्लता ॥ तैशा अलंकारवस्त्रमंडिता ॥ पाळीं कौसल्येभोंवता ॥ शोभला कैसा ते वेळीं ॥ ४७ ॥ महामाया आदि-भगवती ॥ तींभोंवत्या मिळाल्या अनंत शक्ती ॥ कीं सूर्यचक्रासी वेष्टिती ॥ किरणें जैसीं तयापरी ॥ ४८ ॥ वसिष्ठ गुरु होऊन पुढें ॥ विलोकी श्रीरामाचें रूपडें ॥ जे जे जन्मकर्मनिवाडे ॥ ते रायापुढें सांगत ॥ ४९ ॥ म्हणे हा क्षीरसागरविहारी ॥ जन्मला कौसल्येचे उदरीं ॥ निजजन तारावयासी निर्धारीं ॥ अवतरला आदिपुरुष ॥ २५० ॥ द्वादश वर्षें यासी भरतां ॥ एक द्विज येईल अवचिता ॥ प्रार्थोनियां दशरथा ॥ घेऊन यासी जाईल ॥ ५१ ॥ आरंभीं सोडोनि एक बाण ॥ एक राक्षसी वधील दारुण ॥ गोब्राह्मणमख-पाळण ॥ करील जाण पुत्र तुझा ॥ ५२ ॥ कृशोनु प्रवेशे शुष्कविपिनीं ॥ तैसा जाळील राक्षस मखरक्षणीं ॥ पुढें चरणस्पर्शेंकरूनी ॥ एक ललनौं उद्धरील ॥ ५३ ॥ परम प्रचंड कोदंड ॥ तें स्वदंडबळें करील दुखंड ॥ एकपत्नीव्रत प्रचंड ॥ वीर होईल त्रिभुवनीं ॥ ५४ ॥ महायोद्धा एक ब्राह्मण ॥ त्यास जिंकील न लगतां क्षण ॥ बंधुसहित परतोन ॥ अयोध्येसी येईल ॥ ५५ ॥ राज्यीं बसतां हा वरिष्ठ ॥ मग एक होईल अरिष्ट ॥ नगरलोक पावती कष्ट ॥ खेद उत्कट करितील ॥ ५६ ॥ हा नरवीर पंचानन ॥ प्रेमें पाळील पितृवचन ॥ मग स्त्रीसमवेत कानन ॥ चतुर्दश वर्षें सेवील ॥ ५७ ॥ हा नसतां आश्रमांत ॥ एक राक्षस येईल अकस्मात ॥ याचे स्त्रियेस नेईल सत्य ॥ षण्मासपर्यंत निर्धारें ॥ ५८ ॥ मग हा स्त्री शोधितां अरण्यांत ॥ वानर मिळतील अकस्मात ॥ एक वानर उन्मत्त ॥ त्यास मारील हा न कळतां ॥ ५९ ॥ ब्रह्मांड नाचवील नखाग्रीं ॥ ऐसा एक वानरकेसरी ॥ जाऊन सेतुसमुद्रसंभवपुरीं ॥ महाप्रयत्न करील तो ॥ २६० ॥ शुद्धि आणितां राघवेंद्र ॥ पाषाणीं पोंलाणील समुद्र ॥ शरण येईल एक रजनीचर ॥ चिरंजीव त्यासी करील हा ॥ ६१ ॥ मारूनि राक्षसां सकळां ॥ सोडवील सुरांच्या बंदिशाळा ॥ मागुती येईल स्वस्थळा ॥ अयोध्यापुरा गजरेंसीं ॥ ६२ ॥ अकरा सहस्र संवत्सर ॥ राज्य करील हा राजेंद्र ॥ पुढें पुत्रासीं युद्ध थोर ॥ करील कौतुकेंकरूनियां ॥ ६३ ॥ शेवटीं अयोध्या विमानीं घालोनी ॥ नेऊन ठेवील वैकुंठभुवनीं ॥ ऐसें जातक ऐकोनि कर्णीं ॥ राव दशरथ तोषला ॥ ६४ ॥ स्तनपान करितां रघुनंदन ॥ पाहे वसिष्ठाकडे

५२ चंद्रवर्णाची, शुभ्र. ५३ पिकदाणी. ५४ बुरखा. ५५ समुदाय. ५६ गाई, ब्राह्मण व यज्ञ यांचें रक्षण. ५७ अग्नि. ५८ स्त्री. ५९ समुद्रोत्पन्न लक्ष्मी. ६० मार्ग (सेतु) बांधील. ६१ राक्षस. ६२ देवांच्या.

परतोन ॥ कीं वाल्मीकभाष्य संपूर्ण ॥ कथिलें येणें अवलीलें ॥ ६५ ॥ तों सुमित्रेसी जाहला पुत्र ॥ म्हणोनि धांवत आले विप्र ॥ क्षीरसागरीं-हूनी श्रीधर ॥ कौसल्यामंदिरीं पातला ॥ ६६ ॥ तंव तो भोगींद्र[६३] पाँळती घेत ॥ पाठिराखा पातला त्वरित ॥ सुमित्रेचे शेजे रिघत ॥ बाळदशा घरोनियां ॥ ६७ ॥ सुमित्रा स्वप्न देखत ॥ कीं मज जाहला सुलक्षण सुत ॥ सावध होवोनियां पाहत ॥ पुढें खेळत बाळक तो ॥ ६८ ॥ ऐसा जन्मला सुमित्रानंदन ॥ विप्रांसहित दशरथ येऊन ॥ तत्काळ केलें पुण्याहवाचन ॥ जातकर्मादि सर्वही ॥ ६९ ॥ कैकयीस जाहले दोन कुमर ॥ ते विष्णूचे शंखचक्रअवतार ॥ परी कैसे जन्मले तो विचार ॥ कैकयीस नेणवे ॥ २७० ॥ सुषुप्ती-माजी कैकयी निमग्न ॥ जैसा पंकगैतैंत पाषाण ॥ पुत्र येऊनि दोघेजण ॥ दोहींकडे खेळताती ॥ ७१ ॥ दासी येऊन कैकयीप्रती ॥ थापटोनि जागी करिती ॥ दोघे पुत्र जन्मले निश्चितीं ॥ सावध होऊनि पाहें पां ॥ ७२ ॥ कैकयी पाहे पुत्रमुख ॥ तों मित्रें आणि मृगांक ॥ तेवीं दोघे खेळती बाळक ॥ देखतां सुख वाटलें ॥ ७३ ॥ रायें तेथेंही येऊन ॥ अवलोकिले दोघे नंदन ॥ सुखी केले याचकजन ॥ वस्त्राभरणेंकरूनियां ॥ ७४ ॥ बारा दिवसपर्यंत ॥ महोत्साह राव करीत ॥ मंगळतुरें गर्जत ॥ रात्रंदिवस राजगृहीं ॥ ७५ ॥ तेरावे दिवशीं वसिष्ठऋषी ॥ नामकरण ठेवी चौघांसी ॥ कौसल्येचा राम तेजोराशी ॥ जो वैकुंठवासी जगदात्मा ॥ ७६ ॥ सुमित्रेचा नंदन ॥ त्याचें नाम ठेविलें लक्ष्मण ॥ जो काद्रवेयकुलभूषणं ॥ विष्णु शयन ज्यावरी करी ॥ ७७ ॥ कैकयीचे जे कां सुत ॥ भरत शत्रुघ्न निश्चित ॥ चौघे दाशरथी जगविख्यात ॥ ऐका चरित्र तयांचें ॥ ७८ ॥ ज्यांची जन्मकर्मलीला ऐकतां ॥ पळ सुटे सर्व दुरितां ॥ जैसा महाप्रभंजनें सुटतां ॥ जलदजाळें वितळे पैं ॥ ७९ ॥ श्रीरामकथा मानससरोवर ॥ तुम्ही संत श्रोते राजहंस चतुर ॥ साहित्यमुक्तें सुढाळ थोर ॥ सेवा निरंतर आदरें ॥ २८० ॥ श्रीरामकथासुधारस ॥ तुम्ही पंडित श्रोते त्रिदशें ॥ प्राशन करा साव-काश ॥ अति सुरस ग्रंथ हा ॥ ८१ ॥ पुराणपुरुष परात्पर ॥ तो ब्रह्मानंद श्रीधरवर ॥ अयोध्येंत अवतरला साचार ॥ त्याचें चरित्र परिसा पुढें ॥ ८२ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ चतुर्थाध्याय गोड हा ॥ २८३ ॥ ॥ अध्याय ॥ ४ ॥ ॥ ओंव्या ॥ २८३ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥

---

६३ शेष. ६४ शोध. ६५ विश्वलाक्ष्या जावींत. ६६ सूर्य. ६७ चंद्र. ६८ कद्रुवंशकुलभूषण शेष. ६९ मोठा वारा. ७० मेघसमुदाय. ७१ देव.

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ श्रीरामकथा तेजःपुंज ॥ हेंचि विशाळ दिव्य जहाज ॥ जयासी नव खण सहज ॥ नवविधा भक्तीचे ॥ १ ॥ एकएका खणाआंत ॥ बैसले अनुतापी महाभक्त ॥ प्रेमाचें शीड वरी फडकत ॥ पालवीत मुमुक्षूतें ॥ २ ॥ येथें कर्णधार निश्चित ॥ स्वयें जाणिजे श्रीरघुनाथ ॥ तोचि पैलपारासी नेत ॥ निजदासां बैसवूनि ॥ ३ ॥ त्या श्रीरामाचें नाम गोड ॥ कथा ज्याची गगनाहूनि वाड ॥ जे लीला ऐकतां पुरे कोडें ॥ नलगे चाड आणिकांची ॥ ४ ॥ जों जों श्रोते कथेसी सादर ॥ तों तों रस चढे अपार ॥ जैसा पुष्करीं देखतां रोहिणीवर ॥ चंद्रकांता पाझर सुटे ॥ ५ ॥ बृहस्पतीसारिखा वक्ता ॥ मतिमंद मिळालिया श्रोता ॥ तैं व्यर्थ गेली ते कथा ॥ जों नाहीं सादरता श्रोतयांसी ॥ ६ ॥ जैसें काननामाजी रुदन ॥ कोणी न पुसे तयालागून ॥ तैसें मतिमंदाप्रति श्रवण ॥ करविणें त्याच प्रकारें ॥ ७ ॥ जैसीं अन्नें केलीं स्वादिष्ट ॥ परी जेवणार बैसले रोगिष्ट ॥ तरी ते सुगरणीचे कष्ट ॥ शून्यस्थानीं पडिले कीं ॥ ८ ॥ षड्रसअन्नें परिकर ॥ परी तों जेवूं जाणे काय खर ॥ पंकजगतेंत सुंदर ॥ हिरा नेऊन टाकिला ॥ ९ ॥ कवित्वसागरींचीं रत्नें दृष्टांत ॥ त्यांचे परीक्षक ज्ञाते पंडित ॥ मतिमंद कुटिल निश्चित ॥ त्यांस परीक्षा न कळे हे ॥ १० ॥ सुधा-रस उकिरडां ओतिला ॥ गर्भांधासी दर्पण दाविला ॥ कीं दिव्य मंचक घातला ॥ चिताभूमीस नेऊनियां ॥ ११ ॥ कीं काकासी सम-र्पिलीं अमृतफळें ॥ उष्ट्रापुढें सोलींव केळें ॥ कीं जे मृत्युप्राय निजेले ॥ त्यांसी पूजिलें व्यर्थ जेवीं ॥ १२ ॥ कीं अनर्घ्य रत्नमाळा ॥ घातली दिवाभीताचे गळां ॥ कीं कस्तूरीटिळक रेखिला ॥ सूकराचे ललाटीं ॥ १३ ॥ तैसी मतिमंदापुढें कथा ॥ वाग्विलासिनी संतापें बोलतां ॥ जैसी पद्मिणी राजदुहिता ॥ पंढाप्रती दीधली ॥ १४ ॥ भग्न पात्रामाजी नीर ॥ कदाकाळीं न राहे स्थिर ॥ तरी तुम्ही भक्तवरिष्ठ चतुर ॥ कथा सादर परिसा हो ॥ १५ ॥ आधींच मुक्ताफळ वरी सुवास ॥ आधीच हिरा त्यावरी परिस ॥ तैसा आधीं चतुर वरी प्रेमरस ॥ श्रीरामासी आवडे तो ॥ १६ ॥ असो चतुर्थाध्यायाचे अंतीं ॥ कथा सुरस परिसिली संतीं ॥ सांगितली श्रीरामाची जन्मस्थिती ॥ बंधूंसहित सर्वही ॥ १७ ॥ जो सरसिजोद्भवाचा पिता ॥ त्यासी दशरथ बाप कौसल्या माता ॥ भक्त तारावया तत्त्वतां ॥ अयोध्येमाजी प्रकटला ॥ १८ ॥ अहो दशरथाचें भाग्य थोर ॥ रत्नजडित पालखें सुंदर ॥ चारही लांबविले परिकर ॥ चौघे कुमर निजती तेथें ॥ १९ ॥ तेरावे दिवशीं पाळणां ॥ पहुडविला रामराणा ॥ जो अगम्य वेदपुराणां ॥ जो जो म्हणोनि हालविती ॥ २० ॥ जो सनकादिकांचें ध्यान ॥ मृडानीपतीचें चिंतन ॥ जो चतुरास्याचें देवतार्चन ॥ जो जो म्हणोनि हालविती ॥ २१ ॥ जो आदि-मायेचा निजवर ॥ जो पुराणपुरुष परात्पर ॥ जो मायाचक्रचाळक चतुर ॥ जो जो म्हणोनि हालविती ॥ २२ ॥ जो अगम्य दशशतव-दना ॥ प्रेमपाळणीं तो रामराणा ॥ जवळी ज्या उभ्या ललना ॥ सुवासिनी कोण त्या ऐका ॥ २३ ॥ निर्वाणदीक्षा स्वरूपस्थिती ॥

१ बोलावीत. २ नावाडी. ३ थोर, मोठी. ४ कौतुक, आवड. ५ आकाशांत. ६ चंद्र. ७ चंद्रकांतमण्याला. ८ सुगृहिणीचे. ९ समुद्राय. १० गाढव. ११ चिखलाच्या डबक्यांत. १२ अमृत. १३ आरसा. १४ स्मशानांत. १५ कावळ्याला. १६ उंटापुढें. १७ घुबडाचे. १८ डुकराच्या. १९ सरस्वती. २० फुटलेल्या. २१ ब्रह्मदेव. २२ पाळणे. २३ शंकराचें. २४ शेषाला.

मुमुक्षा निष्कामना प्रतीती ॥ सुलीनता समाधि सद्गती ॥ लीला गाती स्वानंदें ॥ २४ ॥ परा पश्यंती मध्यमा वैखरी ॥ गजरें गाती चौघी नारी ॥ चाऱ्ही मुक्ति निर्धारीं ॥ चहूं कोणीं तटस्थ ॥ २५ ॥ घरांत मुख्य ह्या सुंदरी ॥ इतर बैसल्या बाहेरी ॥ जागृति स्वप्न सुषुप्ति नारी ॥ त्यांसी रावणारी दिसेना ॥ २६ ॥ असंभावना विपरीतभावना ॥ विक्षेपता गतायाता जाणा ॥ तुर्या दावी शहाणपणा ॥ बहुत जाणती असें मी ॥ २७ ॥ बारा सोळा चौदा नारी ॥ गलबला करिती बाहेरी ॥ चौसष्टी दाविती कळाकुसरी ॥ परी अंतरीं प्रवेश नव्हेचि ॥ २८ ॥ असो सकळ [२६]नितंबिनी ॥ ओंटी कौसल्येची भरूनी ॥ वस्त्रें अलंकार समर्पूनी ॥ सदनीं गेल्या आपुलाल्या ॥ २९ ॥ अयोध्येसी जन्मतां रघुपती ॥ विघ्नें राक्षसां जाणवती ॥ प्रळयविजा कडकडून पडती ॥ लंकेवरी अकस्मात ॥ ३० ॥ कांपों लागलें लंकानगर ॥ भूकंप होत वारंवार ॥ उगेंच मोडलें राजछत्र ॥ सभा प्रेतवत दिसतसे ॥ ३१ ॥ महाद्वारीं भूमि उलंडे ॥ रावण जों भद्रीं चढत ॥ तों दाही मस्तकींचे पडत ॥ मुकुट खालीं उगेचि ॥ ३२ ॥ शैलकारि पाहे आरसा निर्मळ ॥ तों आंत न दिसे शिरकमळ ॥ राजमंदिरावरी अमंगळ ॥ दिवाभीतें बोभाती ॥ ३३ ॥ स्वप्न देखे मंदोदरी ॥ कीं मर्कटें तोडिली गळसरी ॥ विगतधवा ज्या कां नारी ॥ ओंटी भरिती धुळीनें ॥ ३४ ॥ ललाटशून्य सुलोचना ॥ देखती जाहली मयकन्या ॥ चिंता पडली रावणा ॥ म्हणे ईश्वर क्षोभला कीं ॥ ३५ ॥ ईश्वर जाहलिया पाठमोरा ॥ नसतीं विघ्नें येती घरा ॥ महारत्नें होती गारा ॥ कोणी न पुसती तयांतें ॥ ३६ ॥ आपुलें द्रव्य लोकांवरी ॥ तें बुडोन जाय न लाभे करीं ॥ ज्यांचें देणें ते द्वारीं ॥ बैसती आण घालोनी ॥ ३७ ॥ वैरियां करीं सांपडे वर्म ॥ अपयश येऊन बुडे धर्म ॥ विशेष वाढे क्रोध काम ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ३८ ॥ आपुले जे कां शत्रु पूर्ण ॥ ज्यांसी आपण पीडिलें दारुण ॥ अडल्या धरणें त्यांचे चरण ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ३९ ॥ लाभाकारणें निघे उदीमास ॥ तों हानीच होय दिवसेंदिवस ॥ पूज्यस्थानीं अपमान विशेष ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ४० ॥ सुहृदय आप्त द्वेष करिती ॥ नसते व्यवहार येऊन पडती ॥ सदा तळमळ वाटे चित्तीं ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ४१ ॥ आपुलें राज्य संपत्ति धन ॥ शत्रु भोगूं पाहे आपण ॥ देहीं पीडा व्याधिविण ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ४२ ॥ विद्या बहुत जवळी असे ॥ परी तयासी कोणी न पुसे ॥ बोलों जातां मति भ्रंशे ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ४३ ॥ ठेविला ठेवा न सांपडे ॥ नसतीच व्याधी अंगीं जडे ॥ सदा भय वाटे चहूंकडे ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ४४ ॥ वृद्धपणीं येई दरिद्र ॥ स्त्री मृत्यु पावे गेले नेत्र ॥ उपेक्षूनि हेळसिती पुत्र ॥ तरी देव क्षोभला जाणिजे ॥ ४५ ॥ असो लंकेमाजी रावण ॥ सांगे प्रधानासी बोलावून ॥ अहोरात्र सावधान ॥ लंकानगर रक्षावें ॥ ४६ ॥ अयोध्येसी राम जन्मतां तत्काळ ॥ वृक्ष विराजती सदाफळ ॥ गाई दुभती त्रिकाळ ॥ क्षीर तुंबळ न सांवरे ॥ ४७ ॥ औषिव्याधिरहित

२५ रावणाचा शत्रु राम. २६ स्त्रिया. २७ दुभंग झाली. २८ सिंहासनावर. २९ इंद्रशत्रु रावण. ३० घुबडें. ३१ ओरडतात. ३२ मंदोदरी. ३३ व्यापाराला. ३४ हेळसांड करिती. ३५ पुष्कळ. ३६ आधि = मनस्ताप.

लोक ॥ नाहीं चिंता दरिद्र दुःख ॥ शुष्क धरणी[३७] अपार पीक ॥ पिकों लागली तेधवां ॥ ४८ ॥ अवतरतांच जगज्जीवन ॥ जग जरा-रहित जाहले तरुण ॥ अविद्यापाप मुळींहून ॥ देशधडी जाहलें ॥ ४९ ॥ दरिद्री जाहले भाग्यवंत ॥ मूर्ख ते बोलके पंडित ॥ कुरूप ते स्वरूपवंत ॥ देदीप्यमान तेजस्वी ॥ ५० ॥ अवतरतांच श्रीराम ॥ निःशेष गेले क्रोध काम ॥ अयोध्यावासियां सुकाळ परम ॥ स्वानंदाचा जाहला ॥ ५१ ॥ गृहीं प्रकाशतां प्रभाकर[३८] ॥ मग कैंचा उरे अंधकार ॥ गृहस्वामी येतां तस्कर[३९] ॥ पळोनि जाती चहूंकडे ॥ ५२ ॥ कीं बोलतां ज्ञानी वेदांत ॥ सकळ मतें होती कुंठित ॥ कीं सद्विवेक होतां प्राप्त ॥ संसारदुःखें वितुळती ॥ ५३ ॥ कीं प्रवे-शतां वैराग्यशांती ॥ दुष्ट काम क्रोध पळती ॥ तैसा अवतरतां रघुपती ॥ दोष दुष्काळ निमाले[४०] ॥ ५४ ॥ असो दशरथाचे सुत ॥ एकामागें एक रांगत ॥ कौसल्या आणि दशरथ ॥ संतोषती पाहतां ॥ ५५ ॥ पाचुबंद अंगणांत ॥ हळुहळू चौघे चालत ॥ एकासी एक पाहून हांसत ॥ बाळभावेंकरोनियां ॥ ५६ ॥ कौसल्या उभी राहोनियां ॥ चौघांसी बोलवी जेवावया ॥ तंव ते दूर जाती पळो-नियां ॥ धांवोनि माया धरी मागें ॥ ५७ ॥ चौघांचीं मुखें धुवोनी ॥ भोजनासी बैसवी दटावुनी ॥ संतोष वाटे दशरथाचे मनीं ॥ चारही मूर्ती पाहतां ॥ ५८ ॥ म्हणे कोण पुण्याचे पर्वत ॥ मी पूर्वी आचरलों बहुत ॥ तरीच हे चौघे आदित्य[४१] ॥ अवतरले माझे पोटीं ॥ ५९ ॥ चिमण्या[४२] मूर्ती चिमणें ठाण ॥ चिमणीं धनुष्यें चिमणे बाण ॥ चिमणीं नूपुरें[४३] रुणझुण ॥ पायीं गर्जती चौघांचे ॥ ६० ॥ जाहले अष्टवर्षांचे सुंदर ॥ चौघांस समान वस्त्रालंकार ॥ चिमणीं धनुष्यें परिकर ॥ चिमणे शर सोडिती ॥ ६१ ॥ चिमणा पीतांबर कटिमेखळा ॥ चिमणीं पदकें मुक्तमाळा ॥ चिमण्या सेवकांचा पाळ्या[४४] ॥ रामाभोंवता शोभतसे ॥ ६२ ॥ उन्हांत खेळतां रघुपती ॥ सेवक मित्रपत्रें[४५] धरिती ॥ एक चौमरें[४६] वरी ढाळिती ॥ राजनीतीकरोनियां[४७] ॥ ६३ ॥ श्रीराम आधीं सोडी बाण ॥ सवेंचि शर सोडी लक्ष्मण ॥ त्यामागें भरत शत्रुघ्न ॥ भेदीत संधान तैसेंचि ॥ ६४ ॥ दुरून पाहे दशरथ वीर ॥ चौघे एकदांच टाकिती शर ॥ असुरप्रतिमा करोनि थोर ॥ शिर त्यांचें उडविती ॥ ६५ ॥ वेदांतींच्या दिव्य श्रुती ॥ सर्वांवरिष्ठ जेवीं गर्जती ॥ तैसे बाण सोडी रघुपती ॥ अचूक आणि चपळत्वें ॥ ६६ ॥ असो चौघांचें मौंजीबंधन ॥ गुरु वसिष्ठातें पुसोन ॥ मिळवूनि अपार ब्राह्मण ॥ अजनंदन करिता जाहला ॥ ६७ ॥ श्रीरामाचा व्रतबंध होत ॥ अष्टमा सिद्धि तेथें राबत ॥ चारही दिवसपर्यंत ॥ न्यून पदार्थ नसे कांहीं ॥ ६८ ॥ यज्ञभोक्ता रघुनाथ ॥ त्यास ब्राह्मण घालिती यज्ञोपवीत ॥ गायत्री मंत्र श्रीराम जपत ॥ वेदवंद्य महाराज जो ॥ ६९ ॥ ऐसें जाहलिया व्रतबंधन ॥ वसिष्ठा-पासीं अनुदिन ॥ चहूं वेदांचें अध्ययन ॥ केलें संपूर्ण चौघांहीं ॥ ७० ॥ ज्यासी वर्णितां वेद वेडे ॥ तो राम गुरूपाशीं वेद पढे ॥ अध्ययन सांगतां सांकडें[४८] ॥ गुरूसी न पडे सर्वथा ॥ ७१ ॥ यापरी द्वादश वर्षें तत्त्वतां ॥ संपूर्ण जाहलीं रघुनाथा ॥ मग पुसोनि वसिष्ठ-

३७ पृथ्वी. ३८ सूर्य. ३९ चोर. ४० नष्ट झाले. ४१ सूर्य. ४२ लहान, गोजिरवाण्या. ४३ तोरड्या. ४४ समुदाय, जमाव. ४५ छत्र्या. ४६ चवऱ्या. ४७ राजाकर नाचवीं तशीं. ४८ दैत्यांचे पुतळे. ४९ दशरथ. ५० संकट.

दशरथा ॥ श्रीराम तीर्था निघाला ॥ ७२ ॥ ब्रह्मचर्य तीर्थाटण ॥ करावें हें शास्त्रप्रमाण ॥ हें जाणोनि रघुनंदन ॥ तीर्थाटणासी निघाला ॥ ७३ ॥ तीर्थाटणा चौघे जण ॥ निघाले सर्वें अपार सैन्य ॥ सर्वें दिधला सुमंत प्रधान ॥ असंख्य धन वांटावया ॥ ७४ ॥ सवत्स गायींचे भार ॥ नानावस्त्रें अलंकार ॥ तीर्थीं वांटी श्रीरघुवीर ॥ याचकांसी सन्मानें ॥ ७५ ॥ ज्या तीर्थाचा महिमा जैसा पूर्ण ॥ श्रीराम करी तैसेंच विधान ॥ ज्याचेनि सकळ तीर्थें पावन ॥ तो रघुनंदन तीर्थें हिंडे ॥ ७६ ॥ लोकसंग्रहाकारण ॥ तीर्थें हिंडे रघुनंदन ॥ तीं तीर्थें करा श्रवण ॥ संत श्रोते सर्वही ॥ ७७ ॥ काशीविश्वेश्वर निर्मळ ॥ त्र्यंबक उज्जनी महाकाळ ॥ ओंकार महाबळेश्वर जाश्वनीळ ॥ बदरी-केदार घृष्णेश्वर पैं ॥ ७८ ॥ नागनाथ वैजनाथ थोर ॥ मल्लिकार्जुन भीमाशंकर ॥ सोमनाथ रामेश्वर ॥ ज्योतिर्लिंगें द्वादश हीं ॥ ७९ ॥ अयोध्या मथुरा हरिद्वार ॥ काशी कांची अवंतिका नगर ॥ द्वारावती गोमतीतीर ॥ सप्त पुऱ्या अनुक्रमें ॥ ८० ॥ तीर्थराज मुख्य त्रिवेणी ॥ पंचप्रयाग पुण्यखाणी ॥ ब्रह्मप्रयाग कर्णप्रयाग अँघहरणी ॥ गुप्तप्रयाग समर्थ ॥ ८१ ॥ देवप्रयाग शिवप्रयाग पापहरण ॥ नैमिषारण्य धर्मारण्य पंचकारण्य ॥ ब्रह्मारण्य वेदारण्य ॥ बदरिकाश्रम पावन तो ॥ ८२ ॥ यमुना सरस्वती भागीरथी ॥ गौतमी गोमती कृष्णा भीमरथी ॥ तापी नर्मदा भोगावती ॥ प्रवरा पुण्यवती मंदाकिनी ॥ ८३ ॥ आनंदवर्धनी पयोष्णी ॥ पिनाकी तुंगा कलिंष-नाशिनी ॥ कृतमाळा कावेरी पयस्विनी ॥ सुवर्णमुखी सुमाळा ॥ ८४ ॥ कपिला ताम्रपर्णी शरावती ॥ तुंगभद्रा सोमवती ॥ सावित्री रेवा कुंकुमवती ॥ वेण्णा वेदवती मलप्रहरा ॥ ८५ ॥ घटप्रहरा नंदिनी नलिनी ॥ गंडकी शरयू वैतरणी ॥ सोमनद शिवनद तापहरणी ॥ सोमभद्र नदेश्वर ॥ ८६ ॥ अरुणा वरुणा प्राची पुरंदरी ॥ वेत्रवती सप्तउरगा कर्णकुमरी ॥ स्वामिकार्तिकी पंचघृताची पृथ्वीवरी ॥ विख्यात प्रवाह जयांचे ॥ ८७ ॥ वज्रकाळिका श्रमहारिणी ॥ महेंद्रकाळी त्रिशूळी मंत्रवर्धिनी ॥ नीरावती सुरनदी शंखोद्धारिणी ॥ जयंती आणि अहिर्णवी ॥ ८८ ॥ नाटकी आणि अलकनंदा ॥ फल्गु सर्वांतका त्रिपदा ॥ शांता बाणनदी सुखदा ॥ अनुक्रमें नद्या सर्वही ॥ ८९ ॥ शेषाद्रि आणि ब्रह्माद्रि ॥ मूळपीठ पर्वत सिंहाद्रि ॥ विंध्याद्रि आणि हेमाद्रि ॥ मानससरोवरीं स्नान दान ॥ ९० ॥ अरुणाचळ आनंदवन ॥ कमलालया चिदंबरी पूर्ण ॥ अगस्त्याश्रम पावन ॥ श्रीरंगपट्टण शोभिवंत ॥ ९१ ॥ जनार्दन कन्याकुमारी ॥ शिवकांची विष्णुकांची सुंदरी ॥ मत्स्यतीर्थ पक्षितीर्थ पृथ्वीवरी ॥ शंखोद्धार वेदोद्धार ॥ ९२ ॥ हिरण्यनदी संध्यावट ॥ ब्रह्मावर्त धर्मस्तंभ सुभट ॥ ब्रह्मयोनि पृथूदक वरिष्ठ ॥ कुरुक्षेत्र बिंदुतीर्थ पैं ॥ ९३ ॥ धर्मालय कलापग्राम ॥ गंगासागर सिंधुसंगम ॥ कौंडिण्यपुर अंबिका परम ॥ प्रेमपूर मार्तंड ॥ ९४ ॥ बाळकल्होळा कमलेश्वरी ॥ विराटस्वरूपिणी रक्तांबरी ॥ भ्रमरांबिका ज्वाळामुखी सुंदरी ॥ पीतांबरी महाशक्ति ॥ ९५ ॥ जोग-लादेवी भैरवी ॥ करवीरवासिनी शांभवी ॥ सप्तशृंगी महारुद्रा देवी ॥ हिंगुळजा आणि कमळजा ॥ ९६ ॥ चांगदेव मोरेश्वर ॥ गुप्तकेदार वटेश्वर ॥ अक्षयवट कुशतीर्थ पवित्र ॥ त्रिकूटाचळ सुंदर पैं ॥ ९७ ॥ हरिहरेश्वर नृसिंहपूर ॥ मूळमाधव ज्ञानेश्वर ॥ चक्रपाणि कदंब भुलेश्वर ॥

५१ पापनाशक. ५२ अंबा. ५३ त्रिकूटपर्वत.

जुनाट नागेंद्र गौतमेश्वर तो ॥ ९८ ॥ सप्तयोजनें कोटेश्वर ॥ सिद्धवट घूतपाप रामेश्वर ॥ दक्षिणप्रयाग माधवेश्वर ॥ पूर्वसागर तीर्थ-राज ॥ ९९ ॥ वैराट पुष्कर महाबळेश्वर ॥ धूळखेटक शंकर नारायणपुर ॥ मलयेश्वर पांचाळेश्वर ॥ सत्यनाथ पूर्णालय ॥ १०० ॥ सिंधुपुर महामुंडेश्वर ॥ भीमाशंकर योगेश्वर ॥ सोरटीसोमनाथ लिंग थोर ॥ भीमचंडी पुण्यालयें ॥ १ ॥ शिवकांची[५४] विष्णुकांची ॥ गोरक्षमठ आश्रम काळ हरती ॥ वेदपुर गया अरुणावती ॥ उडूपी शेषशायी सर्वेश ॥ २ ॥ त्रिपती अहोबळ स्वामीकार्तिक सत्य ॥ सुब्रह्मण्य किष्किंधा मातंग पर्वत ॥ हंपीविरूपाक्ष मूर्तिमंत ॥ पंपासरोवर निर्मळ ॥ ३ ॥ चित्रकूट रुक्मकूट लोणार ॥ अंबु अयोध्या महंकापुर ॥ काळचंद्रिका अर्घोदय पवित्र ॥ गोकर्ण कृष्णासागर पैं ॥ ४ ॥ हरिहरतीर्थ जंबुकेश्वर ॥ अनंतशायी विमळेश्वर ॥ मथुरा विकर्ण प्रभाकर ॥ विश्रांतिवन तपोवन ॥ ५ ॥ कुंभकोण मंजरथ ॥ मातुलिंग धूळखेट त्रिविक्रम तीर्थ ॥ मुद्गल मांधाता अंवढ्या-नागनाथ ॥ पंढरीक्षेत्र चंद्रभागा ॥ ६ ॥ त्रिकोण आणि कर्णमूळ ॥ नागरगौर रंगजुगुळ ॥ आशापुरी नेपाळ त्रिमल्ल ॥ मंथनकाळे-श्वर कुशतर्पण ॥ ७ ॥ मीनाक्षी कामाक्षी मातुलिंग थोर ॥ सिता असिता चिदंबरेश्वर ॥ ब्रह्मकटाह हरिद्वार ॥ आदित्यवैश्वानर महातीर्थ ॥ ८ ॥ ब्रह्मानंद म्हणे श्रीकटाघर ॥ इतुकीं तीर्थें करूनि रघुवीर ॥ अयोध्येसी दीनोद्धार ॥ परतोनि आला गजरेंसीं ॥ ९ ॥ वसिष्ठासी साष्टांग नमन ॥ दशरथाचे चरण वंदून ॥ तिघी मातांसी रघुनंदन ॥ करी नमन अभेदत्वें ॥ ११० ॥ तीर्थें करोनि आलिया श्रीराम ॥ सदा विरक्त आणि निष्काम ॥ नावडे लौकिक संभ्रम ॥ वैराग्य पूर्ण बाणलें ॥ ११ ॥ षड्रस अन्न उत्तमासन ॥ हास्य विनोद शृंगार गायन ॥ नावडे मृगया गमनागमन ॥ एकांत पूर्ण आवडे ॥ १२ ॥ नावडे स्त्रियांशीं संभाषण ॥ नेणे कौमि-नींचें विलोकन ॥ नासाग्रीं दृष्टि ठेवून ॥ आनंदघन डोलत ॥ १३ ॥ याचि प्रकारें तिघे बंधू ॥ महाविरक्त निष्काम साधू ॥ श्रीराम-सेवा करितां आनंदू ॥ तिघांसही सर्वदा ॥ १४ ॥ तंव तो प्रतिसृष्टि करणार ॥ सिद्धाश्रमी गाधिपुत्र ॥ महातपस्वी विश्वामित्र ॥ अयोध्येसी पातला ॥ १५ ॥ आला ऐकोनि गाधिसुत ॥ सामोरा धांवे दशरथ ॥ साष्टांग करोनि प्रणिपात ॥ क्षेमालिंगन दीधलें ॥ १६ ॥ दृष्टीं देखोनि ब्राह्मण ॥ जो न उठे करी अपमान ॥ त्याच्या आयुष्या होय खंडण ॥ आलें मरण जवळी त्या ॥ १७ ॥ जो ब्राह्मणासी नेदी अभ्युत्थान ॥ तो दुसरे जन्मीं होय श्वान ॥ विप्रें शोधीत येती त्याचें सदन ॥ कोठें नांदतो म्हणोनियां ॥ १८ ॥ तैसा नव्हे राजा दशरथ ॥ महाराज केवळ ब्राह्मणभक्त ॥ कौशिकांचा धरोनि हात ॥ सिंहासनीं बैसविला ॥ १९ ॥ वस्त्रालंकारादि उपचार ॥ देऊनि पूजिला विश्वामित्र ॥ मानसीं भावी अजपुत्र ॥ धन्य दिवस आजिचा ॥ १२० ॥ ऋषीस म्हणे दशरथ ॥ आजि मज हर्ष वाटे बहुत ॥ तुझे पुरवीन मनोरथ ॥ कांहीं इच्छित माग आतां ॥ २१ ॥ म्हणोनि केला नमस्कार ॥ मग आशीर्वाद देत

---

५४ ह्या दोन्ही पूर्वी ९२ व्या ओवींत आल्या असून येथें पुनः घेतल्या आहेत. ५५ ठसलें. ५६ स्त्रियांचें. ५७ विश्वामित्र. ५८ सन्मानार्थ उठणें, इमें राहणें. ५९ कुशा. ६० दशरथ राजा.

विश्वामित्र ॥ सूर्यवंशभूषण तूं उदार ॥ अनंत कल्याण तुजला हो ॥ २२ ॥ तुष्टि पुष्टि तुजलागीं बहुत ॥ धर्म ऐश्वर्यवृद्धि अद्भुत ॥ सार्थकायुष्य[६१] सुख समस्त ॥ तुजप्रति हो दशरथा ॥ २३ ॥ विवेकज्ञानसमृद्धि बहुत ॥ विप्रविष्णुभक्ति घडो सतत ॥ प्रताप प्रज्ञा[६२] यशवंत ॥ सुभद्र[६३] अत्यंत तुजलागीं हो ॥ २४ ॥ तव शत्रुक्षय हो कां बहुत ॥ अक्षय कल्याणपद[६४] हो कां प्राप्त ॥ भूतदया घडो सतत ॥ कुळवृद्धि बहुत हो कां तूतें ॥ २५ ॥ चिंतित हो पूर्ण मनोरथ ॥ सर्व अरिष्ट हो कां शांत ॥ सर्वाभीष्टें[६४] हो तुज प्राप्त ॥ रविकुलेंअवतंसा ॥ २६ ॥ निर्दोष यश वाढो बहुत ॥ तव कीर्ति वर्णोत साधुसंत ॥ याचकांचे मनोरथ ॥ पुरोत सर्व तुझेनि ॥ २७ ॥ अनाचारीं नसो आदर ॥ संतभजनीं होईं तूं सादर ॥ माझे आशीर्वाद समग्र ॥ सुफळ होवोत तुज राया ॥ २८ ॥ सुबुद्धि उपजो तुझे हृदयीं ॥ ब्राह्मणांचे आशीर्वाद घेईं ॥ माझें चिंतित कार्य सर्वही ॥ हो तुझेनि समस्त ॥ २९ ॥ मी मागत नाहीं संपत्ति धन ॥ नलगे राज्य सिंहासन ॥ माझा मैंख[६६] मोडिती राक्षस येऊन ॥ देईं रघुनंदन रक्षावया ॥ १३० ॥ सिद्धि न पावे कदा यज्ञ ॥ मारीच सुबाहु ताटिका येऊन ॥ जाती होमद्रव्यें भक्षून ॥ देईं रघुनंदन रक्षावया ॥ ३१ ॥ कुंड वेदिका मोडून ॥ यज्ञपात्रें टाकिती फोडून ॥ मखेंमंडपासी लाविती अग्न ॥ देईं रघुनंदन रक्षावया ॥ ३२ ॥ मनुष्यांचें अस्थिमांस आणून ॥ अकस्मात टाकिती वरून ॥ गिळिले तिहीं असंख्य ब्राह्मण ॥ देईं रघुनंदन रक्षावया ॥ ३३ ॥ ऐकोनि ऋषीचा वचनार्थ ॥ भयभीत जाहला दशरथ ॥ वाटे अंगावरी कोसळला पर्वत ॥ कीं विद्युत्पात जाहला ॥ ३४ ॥ वाटे हृदयीं खोंचलें तप्त शस्त्र ॥ कीं अकस्मात गेले नेत्र ॥ कीं उभे ठाकले तस्कर[६८] ॥ धन हरावया कृपणाचें ॥ ३५ ॥ पाहे राजा अधोवदन ॥ कांहीं न बोले प्रतिवचन ॥ विवेकचातुर्य गेलें हरपोन ॥ भयेंकरोनि तेधवां ॥ ३६ ॥ बोले हळूचि भिवोन ॥ महाराक्षस मोडिती यज्ञ ॥ केवळ बाल रघुनंदन ॥ राजीवनयन[६९] सुकुमार ॥ ३७ ॥ लीलेंकार्मुक[७०] घेवोनि हातीं ॥ मजपुढें खेळे रघुपती ॥ नाहीं देखिली युद्धरीती ॥ अद्यापवरी श्रीरामें ॥ ३८ ॥ धनुर्विद्येचा अभ्यास ॥ अद्यापि नाहीं श्रीरामास ॥ कोमळ तनु डोळस ॥ कैसा युद्धासी देऊं तूतें ॥ ३९ ॥ राज्य संपत्ति गृह धन ॥ सर्व देईन तुजलागून ॥ परी नेदीं मी रघुनंदन ॥ राजीवनयनें[७१] सुकुमार जो ॥ १४० ॥ राक्षस मारावया समस्त ॥ मी सेनेसहित येतों तेथ ॥ तुझिया कार्या वेंचीन जीवित ॥ परी रघुनाथ न देववे ॥ ४१ ॥ कृपणासी न देववे धन ॥ मीनासी[७२] न सोडवे जीवेंन[७३] ॥ तैसा मज न देववे रघुनंदन ॥ युद्धकंदन करावया ॥ ४२ ॥ श्रीराम माझें तान्हें अत्यंत ॥ कधीं नेणे उष्ण वात ॥ ऐसें बोलतां अश्रुपात ॥ नेत्रीं रायाचे चालिले ॥ ४३ ॥ ऐसें बोलतां अजेंनंदन[७४] ॥ ऋषि जाहला कोपायमान ॥ म्हणे तूं बोलिलासी वचन ॥ इच्छित पूर्ण देईन ऐसें ॥ ४४ ॥ म्यां न मागतां निश्चित ॥ तूं बोलिलासी माग इच्छित ॥ अरे सूर्यवंशीं नृपनाथ ॥ डाग लाविला कुळासी ॥ ४५ ॥ येचि वंशीं हरिश्चंद्र

६१ कृतकृत्य. ६२ वृद्धि. ६३ कल्याण. ६४ सर्व इच्छित. ६५ सूर्यकुळाला भूषणभूत असणाऱ्या. ६६ यज्ञ. ६७ यज्ञमंडपाला. ६८ चोर. ६९ कमळनयन. ७० खेळांतलें धनुष्य. ७१ माशाला. ७२ पाणी. ७३ [illegible]रथ.

जाण ॥ लटिकें साच करोनि स्वप्न ॥ राज्य मज दिधलें दान ॥ घेतलें विकून डोंबाघरीं ॥ ४६ ॥ तेचि वंशीं तूं जन्मोन ॥ कैसें असत्य केलें वचन ॥ सूर्यवंशासी दूषण ॥ तुझेनि पूर्ण लागलें ॥ ४७ ॥ येचि वंशीं शिबिराव आपण ॥ कपोतपक्ष्याच्या समसमान ॥ आपुलें मांस तुकिलें[७४] पूर्ण ॥ मिथ्यावचन न करीच ॥ ४८ ॥ येचि वंशीं रुक्मांगद ॥ एकादशीव्रत साधो शुद्ध ॥ केला पुत्राचा शिरच्छेद ॥ मिथ्या शब्द न करीच ॥ ४९ ॥ पैलें शेजारीं श्रियाळ ॥ त्यासीं दान मागे जाश्वेनीळ[७५] ॥ केला पुत्रवध तत्काळ ॥ सत्वासी चळूं होऊं नेदी ॥ १५० ॥ तूं श्रीरामाचा महिमा नेणसी ॥ हा अवतरला वैकुंठवासी ॥ वृत्तांत पुसें वसिष्ठासी ॥ साच कीं मिथ्या असे तो ॥ ५१ ॥ जो काळासी शासनकर्ता ॥ जो आदिमायेचा निजभर्ता[७६] ॥ जो कमलोद्भवाचा पिता ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५२ ॥ जें नीलग्रीवाचें[७७] ध्यान ॥ जें सनकादिकांचें गुह्य ज्ञान ॥ ज्यासी शरण सहस्रनयन[७८] ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५३ ॥ वेदांतशास्त्रें सर्व निरसून ॥ स्थापिती परब्रह्म निर्गुण ॥ तो हा श्रीराम परिपूर्ण ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५४ ॥ मीमांसक कर्ममार्ग ॥ ज्याकारणें आचरती सांग ॥ तो हा भर्कहृदयारविंदभृंग[७९] ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५५ ॥ नैयायिक म्हणती जीव अनित्य ॥ ईश्वर कर्ता एक सत्य ॥ तो हा जगद्वंद्य रघुनाथ ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५६ ॥ व्याकरणकार साधिती शब्दार्थ ॥ ज्याच्या नामाचे करिती अनेक अर्थ ॥ तो हा अवतरला वैकुंठनाथ ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५७ ॥ प्रकृतिपुरुष विभाग ॥ सांख्यशास्त्रीं ज्ञानयोग ॥ तो हा राम अक्षय अभंग ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५८ ॥ पातंजलशास्त्रीं योगसाधन ॥ तो अष्टांगयोग आचरून ॥ ज्याचें पद पावती निर्वाण[८०] ॥ त्यासी बाळक म्हणसी तूं ॥ ५९ ॥ आतां कल्याण असो श्रीरामा ॥ मी जातों आपुल्या आश्रमा ॥ उल्लंघोन महाद्वारसीमा ॥ बाहेर गेला गाधिसुत[८१] ॥ १६० ॥ घाबरा जाहला नृपवर ॥ गृहांत जावोनि सत्वर ॥ वसिष्ठासी सांगे समाचार ॥ नमस्कार करोनियां ॥ ६१ ॥ म्हणे कोपला कीं गाधिसुत[८२] ॥ नेईन म्हणतो रघुनाथ ॥ महाराज तूं गुरु समर्थ ॥ सांग यथार्थ काय करूं ॥ ६२ ॥ तुझिया अनुग्रहाचें[८३] फळ ॥ महाराज राम तमालनीळ ॥ हा विश्वामित्र नव्हे काळ ॥ नेऊं आला राघवातें ॥ ६३ ॥ जें मागेल तें यास देईं ॥ समाधान करीं ये समयीं ॥ रामासी जीवदान लवलाहीं ॥ देईं आतां गुरुराजा ॥ ६४ ॥ मग वसिष्ठ बोले गोष्टी ॥ हा विश्वामित्र महाहठी ॥ येणें केली प्रतिसृष्टी ॥ परमेष्ठीस जिंकावया ॥ ६५ ॥ येणें लोहपिष्ट भक्षून ॥ साठ सहस्र वर्षें पुरश्चरण ॥ केलें गायत्रीचें आराधन ॥ त्रिभुवन भीतसे तयातें ॥ ६६ ॥ सदा जवळी धनुष्य बाण ॥ महायोद्धा गाधिनंदन ॥ तत्काळ उग्र शाप देऊन ॥ भस्म करील कुळातें ॥ ६७ ॥ तुज सांगतों यथार्थ वचन ॥ त्यास देईं रामलक्ष्मण ॥ भरत आणि शत्रुघ्न ॥ तुजपाशीं असों दे ॥ ६८ ॥ ऐसें बोलतां गुरुनाथ ॥ दीर्घस्वरें दशरथ रडत ॥ मग हृदयीं धरी ब्रह्मसुतें[८४] ॥ दशरथासी उठवोनी ॥ ६९ ॥ रायाचे मस्तकीं हस्त ठेवून ॥ म्हणे रामाकडे पाहें विलोकून ॥ तों शंखचक्रगदा-

७४ तोखलें. ७५ बुसरा. ७६ शंकर. ७७ भंग. ७८ चालक. ७९ इंद्र. ८० भक्तांच्या हृदयरूप कमळावरचा भ्रमर. ८१ मोक्ष. ८२ विश्वामित्र. ८३ कृपेचें. ८४ ब्रह्मदेवाला. ८५ वसिष्ठ.

मंडित पूर्ण ॥ आदिनारायण देखिला ॥ १७० ॥ सांगे कानीं मूळ कौंव्यार्थ ॥ हा अवतरला वैकुंठनाथ ॥ विश्वामित्र बोलिला जो जो अर्थ ॥ तो तो यथार्थ दशरथा ॥ ७१ ॥ सौमित्रें तो भोगींद्रनाथ ॥ ऐकोनि तोषला दशरथ ॥ गुरु म्हणे हे मानव सत्य ॥ सर्वथा नव्हेत राजेंद्रा ॥ ७२ ॥ यालागीं रामलक्ष्मण ॥ देईं त्यास पाचारून ॥ शिरीं वंदोनि गुरुचरण ॥ गेला धांवोनि तयापाशीं ॥ ७३ ॥ करूनि साष्टांग नमन ॥ म्हणे न्या जी रामलक्ष्मण ॥ ऐकोनि आनंदला गाधिनंदन ॥ काय वचन बोलत ॥ ७४ ॥ म्हणे मी मागत होतों रघुनंदन ॥ त्वां सवें दिधला लक्ष्मण ॥ माझें भाग्य परिपूर्ण ॥ लाभ द्विगुणित जाहला ॥ ७५ ॥ माझे पुण्याचे गिरिवरे ॥ मेरूहून वाढले अपार ॥ ते आजि फळा आले साचार ॥ रघुवीर प्राप्त जाहला ॥ ७६ ॥ विश्वामित्र आला परतोनी ॥ बैसला आपुले स्वस्थानीं ॥ बाहेर आला वसिष्ठमुनी ॥ सभास्थानीं बैसला ॥ ७७ ॥ सभेसी बैसले थोर महंत ॥ आनंदमय जाहला दशरथ ॥ विश्वामित्र म्हणे रघुनाथ ॥ मज आतांचि दाविजे ॥ ७८ ॥ आजि धन्य माझे नयन ॥ पाहीन श्रीरामाचें वदन ॥ ज्यावरोनि मीनकेतन ॥ कोट्यवधि ओंवाळिजे ॥ ७९ ॥ नृप सांगोनि पाठवी रामासी ॥ विश्वामित्र आला न्यावयासी ॥ आपण यावें सभेसी ॥ सुख सर्वांसी द्यावया ॥ १८० ॥ ऐसें ऐकतां त्रिभुवनसुंदर ॥ सभेसी चालिला रघुवीर ॥ विद्युत्प्राय प्रावरेण चीरें ॥ रुळती पदर मुक्तकेलग ॥ ८१ ॥ निशा संपतां तत्काळ ॥ उदयाचळावरी ये रविमंडळ ॥ तैसा राम तमालनीळ ॥ सभेमाजी पातला ॥ ८२ ॥ कौसल्याहृदयारविंदभ्रमर ॥ दृष्टीं देखोनि विश्वामित्र ॥ करोनियां जयजयकार ॥ भेटावया पुढारला ॥८३॥ विश्वामित्राचे चरण ॥ प्रेमें वंदितां रघुनंदन ॥ तों ऋषी हस्त धरून ॥ आलिंगनासी मिसळला ॥ ८४ ॥ नीलजीमूतवर्ण रघुवीर ॥ प्रेमें हृदयीं धरी विश्वामित्र ॥ म्हणे जन्माचें सार्थक समग्र ॥ आजि जाहलें संपूर्ण ॥ ८५ ॥ विश्वामित्रासी आलिंगुनी ॥ वसिष्ठा नमी चोपपाणी ॥ मग श्रीराम बैसला निजासनीं ॥ वेदपुराणीं वंद्य जो ॥ ८६ ॥ मग श्रीरामासी म्हणे विश्वामित्र ॥ माझा क्रतु विध्वंसिती असुर ॥ तुजवीण कोण रक्षणार ॥ दुजा न दिसे त्रिभुवनीं ॥ ८७ ॥ ऐकोनि विश्वामित्राचें वचन ॥ कमळ विकासे मित्रें देखोन ॥ तैसा रघुवीर सुहास्यवदन ॥ बोलता जाहला ते वेळीं ॥ ८८ ॥ ते कौतुककथा सुरस बहुत ॥ ऐकोत आतां साधुसंत ॥ जे कथा ऐकतां समस्त ॥ महापातकें नासती ॥८९॥ जैसें महावेदांतशास्त्र ॥ सर्वांसी मान्य करी पवित्र ॥ तैसा सहावे अध्यायीं साचार ॥ रस अपार वोतिला ॥ १९० ॥ केवळ जें वेदांतज्ञान ॥ रामासी उपदेशील ब्रह्मनंदन ॥ तें ऐकोत संतसज्जन ॥ आत्मज्ञान सुरस तें ॥ ९१ ॥ पुसेल आतां रघुवीर ॥ षष्ठाध्यायीं परम सुंदर ॥ वसिष्ठ ज्ञानाचा सागर ॥ वर्षेल उदार मेघ जैसा ॥९२॥ त्या वसिष्ठगोत्रीं उद्भवला पूर्ण ॥ ब्रह्मानंद स्वामी ज्ञानसंपन्न ॥ कीं वसिष्ठचि आपण ॥ कुळीं आपल्या अवतरला ॥९३॥ ऐसा महाराज ब्रह्मानंद ॥ तयाचें जें चरणारविंद ॥ तेथें श्रीधर होऊनि मिलिंदे ॥ दिव्य आमोद सेवीतसे ॥९४॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ पंचमोध्याय गोड हा ॥ १९५ ॥

८६ वाल्मीकीनें केलेलें रामायणांतील भविष्य. ८७ लक्ष्मण. ८८ शेष ८९ विश्वामित्र. ९० पर्वत. ९१ मदन. ९२ पांघरलेलें वस्त्र. ९३ मोत्यें लटकलेले. ९४ कृष्णमेघासारखा. ९५ धनुष्य हातीं घेतलेला राम. ९६ यज्ञ. ९७ सूर्य. ९८ वसिष्ठ. ९९ भ्रमर. १०० सुगंध.


६

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जय जय जगद्वंद्या [1]वेदसारा ॥ [2]अनंगदहनहृदयविहारा ॥ कमलोद्भवजनका परात्परा ॥ अगोचरा निरुपाधिका ॥ १ ॥ इच्छामात्रें प्रचंड ॥ मायेनें रचिलें ब्रह्मांड ॥ चौऱ्यायशीं लक्ष योनि उदंड ॥ जीव आंत भरियेले ॥ २ ॥ ते जीव विसरूनि तूतें ॥ भुलले देखोनि विषयांतें ॥ म्हणोनि विसरले निजपदातें ॥ अहंमतीनें भुलोनियां ॥ ३ ॥ शब्दविषय घेतां कानें ॥ [3]कुरंग [4]वेंचिला समूळ प्राणें ॥ स्पर्शविषय सेवितां [5]वारणें ॥ अंकुशें आकर्षोनि हिंडविती ॥ ४ ॥ रूपविषय देखतां पतंग ॥ करी आपला देहत्याग ॥ रसविषयें [6]मीन सवेग ॥ गळ गिळोनि मुके प्राणा ॥ ५ ॥ गंधविषयें [7]मिलिंद भुलोन ॥ कमळकोशीं वेंची प्राण ॥ ते पांचही विषय संपूर्ण ॥ भोगिती जाण मानव हे ॥ ६ ॥ तुज विसरोनि श्रीरामा ॥ जीव भुलले देहगेहधनकामा ॥ त्यांसी तारावया पूर्णब्रह्मा ॥ दशरथात्मज जाहलासी ॥ ७ ॥ पंचमाध्यायाचे अंतीं कथा ॥ दशरथें राम दिधला गाधिसुता ॥ यावरी वर्तलें तें तत्त्वतां ॥ ऐका आतां सावधान ॥ ८ ॥ गुरूसी शरण रिघाला रघुनाथ ॥ हे कथा वाल्मीकें कथिली अद्भुत ॥ तो बृहद्योगवासिष्ठग्रंथ ॥ बत्तीस सहस्र श्लोक पैं ॥ ९ ॥ समुद्राऐसा थोर ग्रंथ ॥ त्यांतील सार सांगों मुख्यार्थ ॥ जैसें भागीरथींतूनि तृषार्त ॥ पाणी सेवी अंजुळीनें ॥ १० ॥ सागरामाजी बुडी देऊन ॥ काढिती सतेज मुक्तें वेंचून ॥ कीं याचकासी सांपडे अपार धन ॥ परी यथाशक्ति मोटा बांधी ॥ ११ ॥ देखिला अन्नाचा पर्वत ॥ परी आपणापुरतेंच घे क्षुधार्त ॥ तैसा बृहद्योगवासिष्ठग्रंथ ॥ त्यांतील गुह्यार्थ ऐका हो ॥ १२ ॥ वाल्मीकाचीं उच्छिष्ट उत्तरें ॥ तींच परिसा तुम्ही सादरें ॥ श्रोते म्हणती उच्छिष्ट खरें ॥ तरी तेंच कां हो बोलतां ॥ १३ ॥ परावें उच्छिष्ट अंगीकार ॥ कदा न करिती श्रोते चतुर ॥ संदेहधनुष्य घेऊनि थोर ॥ प्रश्नाक्षरशर सोडिती ॥ १४ ॥ तों वक्त्यानें स्फूर्तिधनुष्य घेऊन ॥ शास्त्रसंमत टाकूनि बाण ॥ प्रश्नाक्षरशर निवारून ॥ संदेहधनुष्य छेदिलें ॥ १५ ॥ वक्ता म्हणे ऐका सावधान ॥ कोणतें उच्छिष्ट घेती सज्जन ॥ तरी तें मधुमक्षिकांचें उच्छिष्ट पूर्ण ॥ मधु आवडे देवांतें ॥ १६ ॥ वत्स आधीं करी दुग्धपान ॥ तें अवश्य घ्यावें न करितां अनमान ॥ भ्रमर आधीं जाय पुष्प सेवून ॥ परी तें शास्त्रज्ञ अंगीकारिती ॥ १७ ॥ मेघमुखींचें जीवन ॥ तें उच्छिष्ट नव्हे कदा जाण ॥ यागींचा पुरोडाश पूर्ण ॥ उच्छिष्ट कोण म्हणे त्यासी ॥ १८ ॥ गौतमें गोदा आणिली प्रार्थून ॥ तेणें आधीं केलें स्नानपान ॥ व्यासाचें उच्छिष्ट पुराण प्राचीन ॥ उच्छिष्ट पूर्ण नव्हे तें ॥ १९ ॥ विष्णुनैवेद्य पावन ॥ त्यास उच्छिष्ट म्हणेल कोण ॥ वाल्मीककाव्य म्हणोन ॥ उच्छिष्ट नव्हे सर्वथा ॥ २० ॥ व्याघ्रमृगचर्म गहन ॥ सूकरकेश [10]पट्ट[11]कूलें जाण ॥ हस्तिदंत गवा[12]भृंग पूर्ण ॥ इतुकीं ब्राह्मण पवित्र म्हणती ॥ २१ ॥ असो ऐका पूर्वानुसंधान ॥ यागरक्षणार्थ जातां रघुनंदन ॥ कौशिकाप्रति राजीव[13]नयन ॥ बोलता जाहला तेधवां ॥ २२ ॥ श्रीराम म्हणे महाऋषी ॥ मज तुम्ही नेतां युद्धासी ॥ क्षणभंगुरता देहासी ॥ आत्मप्राप्ति नाहीं मातें ॥ २३ ॥ आत्मप्राप्तीविण साधन ॥ जैसे अलंकार गळसरीविण ॥ कीं दीपाविण शून्य सदन ॥ जीवनाविण सरिता जैसी ॥ २४ ॥ कीं प्राणाविण कलेवर [14]॥ कीं आवडीविण आदर ॥ कीं इंद्रियनिग्रहाविण आचार ॥ अनाचार तोचि पैं ॥ २५ ॥

१ वेदांच्या तात्पर्यरूपा. २ मदनाला जाळणाऱ्या शिवाच्या हृदयांत रमणाऱ्या. ३ मृग, हरिण. ४ मुकला. ५ हत्तीनें. ६ मासा. ७ भुंगा. ८ गेह=घर. ९ योगवासिष्ठ. १० रानडुकराचे केस. ११ रेशमी वस्त्रें. १२ गाईचें शिंग. १३ कमलनयन. १४ शरीर.

कीं भ्रतारावि[17]णें कामिनी ॥ कीं अत्रिसु[18]तावि[16]ण रजनी ॥ तैसे आत्मप्राप्तीवांचूनी ॥ व्यर्थ प्राणी नाडले ॥ २६ ॥ आत्मप्राप्तीसी कारण ॥ धरावे श्रीगुरूचे चरण ॥ गुरुकृपेविण ज्ञान ॥ कल्पांतींही साधेना ॥ २७ ॥ पदार्थ न दिसे नेत्रेंविण ॥ गोड न वाटे जीव्हे[19]नाविण ॥ परिसाविण सुवर्ण ॥ लोहाचें नोहे कल्पांतीं ॥ २८ ॥ जो गुरुसेवेसी सादर ॥ आत्मज्ञान जोडोनि कर ॥ उभा त्यापुढें निरंतर ॥ अहोरात्र तिष्ठतसे ॥ २९ ॥ गुरुसेवा ज्यासी नावडे ॥ त्याचे ज्ञानासी पडले किडे ॥ जन्ममरणांचें सांकडें[20] ॥ न सरे त्याचें कल्पांतीं ॥ ३० ॥ ज्यासी नावडे गुरुसेवन ॥ तो जाहला चतुःषष्टिकळाप्रवीण ॥ साही शास्त्रें मुखोद्गत पूर्ण ॥ परी तें भाषण मद्यपियाचें ॥ ३१ ॥ तेणें केलें जरी कीर्तन ॥ दावी वरपां[21]गें डोलोन ॥ परी गुरुदास्य नावडे पूर्ण ॥ त्याचें बंधन चुकेना ॥ ३२ ॥ जळो जळो त्याचा प्रताप ॥ काय चाटावें कोरडें तप ॥ जैसें विगतधवे[22]चें स्वरूप ॥ यौवन काय जाळावें ॥ ३३ ॥ गर्भांधाचे विशाळ नेत्र ॥ अदांतियाचें उंच मंदिर ॥ कीं धनलुब्धाचा तत्त्वविचार ॥ कीं रम्य गृह अंत्य[23]जाचें ॥ ३४ ॥ भ्रष्टासी कायसें कुळगोत्र ॥ श्वान नेणे पवित्रापवित्र ॥ जैसें मद्यपियाचें पात्र ॥ श्रोत्रि[24]यें न शिवे सर्वथा ॥ ३५ ॥ तैसे गुरुकृपेविण जे नर ॥ व्यर्थ नरदेहा आले खरें[25] ॥ सदा विषयव्यापारीं सादर ॥ त्यांसी आपपर नाठवे ॥ ३६ ॥ उत्तम मनुष्यदेह पावोन ॥ तेथें साधावें आत्मज्ञान ॥ ज्ञानहीन ते मूढ पूर्ण ॥ गूढ नरक भोगिती ॥ ३७ ॥ रघुपतीचे बोल ऐकुनी ॥ सभासंत सुखावले मनीं ॥ विश्वामित्र तेव्हां आनंदोनी ॥ ब्रह्म[26]नंदनाप्रति बोले ॥ ३८ ॥ जगद्वंद्य रविकुलभूषण ॥ त्यास उपदेशी दिव्यज्ञान ॥ जो अनंतब्रह्मांडांची सांठवण ॥ लीलावेषधारक जो ॥ ३९ ॥ ते वेळे उठोनि रघुनाथ ॥ जो होय कमलोद्भवाचा तात ॥ तो वसिष्ठासी साष्टांग नमित ॥ शरणागत जाहला असे ॥ ४० ॥ म्हणे तनुमनधनेंसीं अनन्य ॥ श्रीवसिष्ठा तुज मी शरण ॥ ऐसें ऐकतां ब्रह्मनंदनें[27] ॥ हृदयीं धरी राघवातें ॥ ४१ ॥ म्हणे जगद्वंद्या श्रीरामा ॥ अवतारपुरुषा परब्रह्मा ॥ तूं सच्चिदानंदघन परमात्मा ॥ तुज मी काय उपदेशूं ॥ ४२ ॥ तूं आदिनारायण निष्कलंक ॥ भोगींद्र[28]ं जाहला तुझा तल्प[29]क ॥ वेदशास्त्रांसी पडलें टक[30]कें ॥ तुझें स्वरूप वर्णितां ॥ ४३ ॥ तुझें नाम जपतां सार ॥ शीतळ जाहला अपर्ण[31]वर ॥ गुरुमहिमा प्रगटवावया साचार ॥ शरण मज आलासी ॥ ४४ ॥ देव भक्तांची पूजा करी यथार्थ ॥ याचकांसी राजा दान मागत ॥ सागर जैसा स्तवन करीत ॥ सरोवराचें प्रीतीनें ॥ ४५ ॥ वाचस्पति[31] मुक्यासी पुसे विचार ॥ दीपप्रकाश इच्छी दिनकर[32] ॥ चकोरांसी म्हणे अत्रि[33]कुमर ॥ मज तृप्त करा तुम्ही ॥ ४६ ॥ कल्पतरु दुर्बळासी मागे दान ॥ जलद[34] चातकासी मागे जीवन ॥ चक्रवाकाचें दर्शन ॥ तरणि[32] इच्छी नवल हें ॥ ४७ ॥ प्रीतीनें माता बाळकासी म्हणत ॥ मी तुझें स्तनपान करीन सत्य ॥ कीं तृषाक्रांतासी मागत ॥ उदक जैसें जान्हवी ॥ ४८ ॥ वनस्पतींस म्हणे वसंत ॥ मज तुम्ही निववा समस्त ॥ तैसा तूं जगद्गुरु रघुनाथ ॥ गुरूसी शरण आलासी ॥ ४९ ॥ संतोषोनि ब्रह्मनंदन ॥ श्रीरामास सन्मुख बैसवून ॥ गुरुसंप्रदाय शास्त्रप्रमाण ॥ महावाक्य दीक्षाविधि ॥ ५० ॥ जो मायानियंता जगद्भूषण ॥ तो वसिष्ठापुढें ओढवी कर्ण ॥ चहूं वेदांचें जीवन ॥ तें महावाक्य ऋषि सांगे ॥ ५१ ॥

१७ स्त्री. १६ चंद्रावांचून. १७ पाण्याशिवाय. १८ संकट. १९ चौसष्टकलानिष्णात. २० वरवर. २१ तारुण्य. २२ दानधर्म न करणाऱ्याचें. २३ महाराचें. २४ विद्वान ब्राह्मण. २५ गर्दभ. २६ वसिष्ठाला. २७ शेष. २८ शय्या. २९ आश्चर्य, गूढ. ३० पार्वतीपती शंकर. ३१ बृहस्पति. ३२ सूर्य. ३३ चंद्र. ३४ मेघ.

वसिष्ठ म्हणे सप्रेम ॥ सर्वद्रष्टा तूं आत्माराम ॥ सर्वव्यापक तूं पूर्णब्रह्म ॥ अतींद्रिय वेगळा ॥ ५२ ॥ जेंगडंबराभास सकळ ॥ हा तुझे मायेचा खेळ ॥ मिथ्याभूत जैसें मृगजळ ॥ साच नव्हे सर्वथा ॥ ५३ ॥ तूं अलिप्त सर्वांसी तत्वतां ॥ जैसा सर्वाघटीं बिंबला सविता ॥ कीं काष्ठामाजी अग्नि पाहतां ॥ अलिप्त जैसा असोनि ॥ ५४ ॥ कीं वाद्यांमाजी ध्वनि उमटती ॥ कीं कंठीं राग उठती ॥ परी तेथें असोनि नसती ॥ तैसा सर्वाभूतीं राघवा तूं ॥५५॥ कीं दैर्पणींचीं स्वरूपें ॥ दिसती परी मिथ्यारूपें ॥ तैसा रामा तूं विश्वरूपें ॥ व्यापोनियां अलिप्त ॥ ५६ ॥ बीजामाजी तरुवर ॥ कीं तंतूमाजी वस्त्र ॥ कीं उदकीं तरंग अपार ॥ विश्व समग्र तुजमाजी ॥५७॥ अनंत ब्रह्मांडांच्या कोडी ॥ तुझी माया घडी मोडी ॥ जीवांस भुरळ घालोनि पाडी ॥ विषयावर्तीं सर्वदा ॥ ५८ ॥ मायेचे अवघे विकार ॥ ते मृगजळाचे दाटले पूर ॥ कीं गंधर्वनगर सविस्तर ॥ रचिलें दिसे परी मिथ्या ॥५९॥ हें वोडंबरीचें लेणें पूर्ण ॥ कीं स्वप्नींचें राज्यसिंहासन ॥ कीं चित्रींचा हुतांशन ॥ ज्वाळा अद्भुत दीसती ॥ ६० ॥ कीं दर्पणींचा दिव्य हार ॥ कीं मृगजळामाजी वंध्यापुत्र ॥ शुक्तिकारजताचें करोनि पात्र ॥ रात्रीस मीनें धरीतसे ॥ ६१ ॥ नयनांतील पुतळी ॥ गर्भधिं पदरीं धरिली ॥ कीं कल्पांतविजू गिळिली ॥ मशकें केवीं घडे हें ॥ ६२ ॥ पांगुळ धांवे अंतराळीं ॥ तेणें आकाशाची साल काढिलीं ॥ प्रभंजनाची चिंधी फाडिली ॥ साच बोली काय हे ॥ ६३ ॥ कीं कुहूचे काळोखें भरिलें ॥ तें दिवा दोहों प्रहरां वाळूं घातलें ॥ कीं उरगाचे पाय वांधिले ॥ सिकतातंतूकरूनियां ॥ ६४ ॥ काढोनि दीपाचा रंग ॥ वस्त्रें रंगवलीं सुरंग ॥ कीं वडवानळामाजी कोंग ॥ खेळती काय घडे हें ॥ ६५ ॥ हें सर्व जैसें असत्य ॥ तैसी माया मिथ्याभूत ॥ साच कीं लटकी इत्यर्थ ॥ ब्रह्मादिका नव्हेची ॥ ६६ ॥ मायेचें परम विंदाणें ॥ थोरथोरांसी न कळे पूर्ण ॥ तरी मायेची कथा सांगेन ॥ ऐक सावधान श्रीरामा ॥ ६७ ॥ जेणें न्यायशास्त्र निर्मिलें पूर्ण ॥ तो गौतम ऋषि परम प्रवीण ॥ त्याचा शिष्य सुजाण ॥ गाधि नाम तयाचें ॥ ६८ ॥ त्यास चोहों वेदांचें अध्ययन ॥ षट्शास्त्रीं परम निपुण ॥ तेणें केलें दिव्य अनुष्ठान ॥ जाहला प्रसन्न श्रीविष्णु ॥ ६९ ॥ मग बोले इंदिरानाथ ॥ प्रसन्न जाहलों माग इच्छित ॥ यावरी तो ब्राह्मण बोलत ॥ काय तें ऐक श्रीरामा ॥७०॥ गाधि म्हणे हृषीकेशी ॥ मज दावीं तुझी माया कैशी ॥ तिनें ठकविलें बहुतांसी ॥ मज वेगेंसीं पाहूं दे ॥ ७१ ॥ ऐकोनि हांसला नारायण ॥ मायापाश परम दारुण ॥ तोडीं म्हणोनि येती शरण ॥ तूं तीस पाहीन कां म्हणसी ॥७२॥ दिसतें तें अवघें असत्य ॥ हेंची मायेचें रूप यथार्थ ॥ जैसा दोरीवरी सर्प भासत ॥ कीं शुक्तिकेवरी रजत जैसें ॥७३॥ कीं खुंट तोचि चोर ॥ भ्रांतासी भासे साचार ॥ जैसें स्वप्नींचें सैन्य अपार ॥ जागृतींत मिथ्या तें ॥७४॥ गाधि म्हणे वैकुंठराया ॥ तूं मिथ्यारूप सांगसी माया ॥ तरी मार्कंडेयऋषिवर्या ॥ ब्रह्मादिकां भुलविलें ॥७५॥ तरी ते मज क्षणभरी ॥ सर्वोत्तमा दावीं नेत्रीं ॥ हांसतसे वैकुंठविहारी ॥ बोल ऐकोन तयाचे ॥ ७६ ॥ हरि म्हणे माया देखून ॥ समूळ जासी तूं भुलोन ॥ तुझे कासावीस होतील प्राण ॥ मग कोण सोडवील ॥ ७७ ॥ तुझी भ्रंशेलें सकळ मती ॥

३५ जगद्रूप दृश्य पसारा. ३६ आरशांतील. ३७ विषयांच्या फेऱ्यांत. ३८ गारुड्याचें. ३९ अग्नि. ४० मासे. ४१ वाऱ्याची. ४२ अमावास्येच्या. ४३ सर्पाचे. ४४ वाळूच्या दोरानें. ४५ काक. ४६ कुशळता. ४७ भ्रम होईल, भ्रम पावेल.

पडसील महा आवँर्ती ॥ मग गाधि म्हणे जगत्पती ॥ वर निश्चित देईं मातें ॥ ७८ ॥ मी कासावीस जेव्हां होईन ॥ तेव्हां तूं मज आठव दे येऊन ॥ तुझें करितांचि नामस्मरण ॥ पुढती भेटें ऐसाचि ॥ ७९ ॥ अवश्य म्हणोनि जगन्निवास ॥ जाता जाहला स्वस्थानास ॥ कांहीं एक लोटले दिवस ॥ ऐकें सर्वेशा राघवा ॥ ८० ॥ जान्हवीतीरीं अरण्यांत ॥ गाधि राहिला स्त्रियेसहित ॥ एकदां माध्यान्हा आला औंदित्य ॥ ऋषि जात स्नानार्तें ॥ ८१ ॥ प्रवेशतां गंगाजीवनीं ॥ मनांत म्हणे माया अझुनी ॥ मज कां न दावी चक्रपाणी ॥ कैसी करणी तयाची ॥८२॥ अघमर्षण करी ब्राह्मण ॥ तों मायेनें मांडिलें विंदाण ॥ गाधीस वाटे आलें मरण ॥ व्यथा दारुण जाहली ॥ ८३ ॥ तों पातले यमदूत ॥ तिहीं प्राण काढिले त्वरित ॥ यमापाशीं मारीत ॥ गाधि नेला तेधवां ॥ ८४ ॥ तों तेथें यम जाचणी दारुण ॥ कुंभीपाकीं घालिती नेऊन ॥ असिपत्रवनीं हिंडवून ॥ तप्तस्तंभासी बांधिती ॥ ८५ ॥ इतुकीं दुःखें विप्र भोगित ॥ परी आपण उभा जान्हवींत ॥ मग तो जन्मला चांडाळयोनींत ॥ कंटज नाम तयाचें ॥ ८६ ॥ पंचवीस वर्षेंपर्यंत ॥ स्त्रीपुत्र जाहले बहुत ॥ वाटा पौंडोन असंख्यात ॥ द्रव्य अपार जोडिलें ॥ ८७ ॥ नानापरींच्या हिंसा करी ॥ गोब्राह्मण जीवें मारी ॥ तों तेथें आली महामारी ॥ सर्वही मेलीं कुटुंबींचीं ॥ ८८ ॥ बाप माय स्त्री सुत ॥ एकदांचि पावलीं मृत्य ॥ कंटज विचारी मनांत ॥ होऊं विरक्त येथोनियां ॥ ८९ ॥ रडे कंटजनाम महार ॥ आतां न मिळे म्हणे संसार ॥ मग अतीतें होऊन दुराचार ॥ देशोदेशीं हिंडतसे ॥ ९० ॥ आला केरळदेशाप्रती ॥ तों तेथींचा मृत्यु पावला नृपती ॥ त्यास नाहीं पुत्रसंतती ॥ मग प्रधान करिती विचार ॥ ९१ ॥ मग शुंडादंडीं माळ देऊन ॥ शृंगारूनी हिंडविती हस्तीण ॥ तंव कंटजाचे कंठीं आणोन ॥ माळ घातली अकस्मात ॥ ९२ ॥ सहा वर्षें राज्य करून देख ॥ भ्रष्टविले सकळ लोक ॥ घरीं जेऊं घातले सकळिक ॥ सोइरे केले बहुतचि ॥ ९३ ॥ एके दिवशीं तो निर्लज्ज ॥ एकला जात बाहेर कंटज ॥ प्रधानादि सेवक सहज ॥ पाठीं धांवती रायाचे ॥ ९४ ॥ अवघियांस दटाविलें रागें ॥ म्हणे येऊं नका मज मागें ॥ प्रधान गुप्त पाहती वेगें ॥ कोठें जातो म्हणोनियां ॥ ९५ ॥ तों ते गांवींचे औंनामिक ॥ परम उन्मत्त मद्यप्राशक ॥ ते वाटेसी भेटले सकळिक ॥ कंटजासी तेधवां ॥ ९६ ॥ तिहीं कंटज ओळखिला सत्वरा ॥ म्हणती आमुचा हा सोयरा ॥ येणें लोक भ्रष्टविले एकसरा ॥ नाहीं कळलें कोणासी हें ॥ ९७ ॥ त्यांसी कंटज दटावी देखा ॥ म्हणे ही गोष्ट बोलूं नका ॥ नाहीं तरी तुम्हां सकळिकां॥शिक्षा करीन साँक्षेपें ॥ ९८ ॥ तें प्रधानवर्गीं ऐकिलें ॥ म्हणती राज्य समस्त बुडविलें ॥ कंटजासी मारून बाहेर घातलें॥ मग विचारीं बैसले समस्त॥ ९९ ॥ श्रेष्ठीं काढिला शास्त्रार्थ॥ घ्यावें देहांत प्रायश्चित्त ॥ मग अग्नि प्रवेश समस्त ॥ लोक करिती नगरींचे ॥ १०० ॥ प्रधानादि अष्टाधिकारी ॥ स्त्रीपुरुष ते अवसरीं ॥ भस्म जाहले अग्निभीतरीं ॥ बाळें नगरीं उरलीं तैं ॥ १ ॥ ऐसें कंटजें देखिलें ॥ म्हणे थोर पाप मज घडलें ॥ तेणेंही तेव्हां सरण रचिलें ॥ वरी आपण निजेला ॥ २ ॥ तों अग्निशिखा ते वेळीं ॥ वामांगीं येऊन झगटलीं ॥ कंटजें हांक फोडिली ॥ उडी घातली खालती ॥ ३ ॥ तों इकडे

४८ भोवऱ्यांत. ४९ सूर्य. ५० कौतुक. ५१ नरकविद्योपांत. ५२ तळवारीच्या धारेवरून. ५३ वाटमारेपणा करून. ५४ हत्या. ५५ भणंग. ५६ सोंडेमध्यें. ५७ अंत्यज, महार. ५८ खास. ५९ अग्निज्वाळा. ६० होपली.

गाधिब्राह्मण ॥ बाहेर निघाला हांक फोडून ॥ फोड आला तरतरोन ॥ वामांगीसी[61] देखिला ॥ ४ ॥ म्हणे मी गाधिब्राह्मण ॥ जोन्हवींत[62] करितां स्नान ॥ करीत असतां अघमर्षण[63] ॥ दुःखें दारुण भोगिलीं ॥ ५ ॥ सूर्यसुतें[64] मज गांजिलें ॥ चांडाळयोनींत जन्मविलें ॥ सहा वरुषें राज्य केलें ॥ लोक भ्रष्टविले सर्वही ॥ ६ ॥ मृत्यु पावले असंख्य जन ॥ जरी हें असत्य म्हणावें स्वप्न ॥ तरी फोड आला तरतरोन ॥ करी रुदन विप्र तो ॥ ७ ॥ विसरला तप अनुष्ठान ॥ नाठवे संध्या वेदाध्ययन ॥ आश्रमासी आला परतोन ॥ चिंतार्णवीं[65] पडियेला ॥ ८ ॥ स्त्री विनवी भ्रतारालागून ॥ तुमचे वामांगीं कां झोंबला अग्न ॥ तंव तो विलापें ब्राह्मण ॥ म्हणे माझेनि हें न सांगवे ॥ ९ ॥ तों गाधीचा गुरुबंधु अकस्मात ॥ आला तीर्थें करीत करीत ॥ गाधि तयासी क्षेम[66] देत ॥ म्हणे कृश कां बहुत जाहलासी ॥ ११० ॥ तेणें सांगितलें वर्तमान ॥ मज एक पाप घडलें दारुण ॥ केरळदेशीं एक नगर संपूर्ण ॥ बाळेंचि तेथें नांदती ॥ ११ ॥ एकाचे घरीं म्यां घेतलें अन्न ॥ मग त्यांसी पुशिलें वर्तमान ॥ ते म्हणती कंटज महार येऊन ॥ ग्राम आमुचा भ्रष्टविला ॥ १२ ॥ समस्तांचे घेऊन प्राण ॥ मग तो गेला येथून ॥ ऐसें पापी नगर तें पूर्ण ॥ तेथें भोजन घडलें मज ॥ १३ ॥ तो दोष जावया संपूर्ण ॥ द्वादश वर्षें करितों तीर्थाटन ॥ ऐसें तो गुरुबंधु सांगोन ॥ गेला पुढें वाराणसीं ॥ १४ ॥ प्रचीत[67] पहावया समस्त ॥ गेला आपण गाधि तेथ ॥ तों अवघ्या खुणा यथार्थ ॥ प्रत्यया आल्या सर्वही ॥ १५ ॥ आपण जेथें जन्मला होता महार ॥ तेथेंही घेतला समाचार ॥ तंव ते अनामिक[68] सांगती समग्र ॥ कंटज येथेंचि जन्मला ॥ १६ ॥ तेणें सहा वरुषें राज्य करोनी ॥ केरळ नगर भ्रष्टवूनी ॥ मग काळें तोंड घेवोनी ॥ गेला नेणों कोणीकडे ॥ १७ ॥ गाधि आश्रमासी आला परतोन ॥ घेतलें क्षितीवरी[69] घालून ॥ म्हणे आतां कैंचें ब्राह्मण-पण ॥ गेलों बुडोन रौरवीं[70] ॥ १८ ॥ शोकें कपाळ आदळी क्षितीं ॥ म्हणे मी गौतमशिष्य विख्यात जगतीं ॥ मज हे कैसी घडली गती ॥ कोणासी स्थिति पुसों हे ॥ १९ ॥ असत्य जरी म्हणावें वहिलें ॥ तरी सर्वही प्रत्ययास आलें ॥ जन्मकर्मदुष्कृतफळें ॥ पाहोनि आलों स्वनयनीं ॥ १२० ॥ सत्य कीं असत्य पूर्ण ॥ मज कोण सांगेल उकलोन ॥ कोणासी मी जाऊं शरण ॥ कैंचें ब्राह्मण्य मज आतां ॥ २१ ॥ म्हणे धांव धांव इंदिरावरा ॥ वैकुंठवासिया करुणाकरा ॥ पतितपावना सर्वेश्वरा ॥ राजीवनेत्रा[71] जगद्गुरो ॥ २२ ॥ तत्काळ प्रगटला जगज्जीवन ॥ म्हणे रे गाधि सावधान ॥ माझी माया परम गहन ॥ ब्रह्मादिकां अतर्क्य ॥ २३ ॥ तूं म्हणविसी सर्वज्ञ जाणता ॥ सत्य कीं असत्य माया सांग आतां ॥ बहुत ऋषी तर्क करितां ॥ निर्वाह सर्वथा नव्हेचि ॥ २४ ॥ जे कथिती सदासर्वदा ज्ञान ॥ सांगती माया लटकी म्हणोन ॥ तेही मायेंत गेले गुंफोन ॥ जाहले दीन सर्वही ॥ २५ ॥ तुज माया दाविली किंचित ॥ पुढें आणिक पाहें अद्भुत ॥ गाधि धांवोन चरण धरीत सोडवीं मज येथोनी ॥ २६ ॥ मग गाधि भगवंतें हृदयीं धरिला ॥ वरदहस्त मस्तकीं ठेविला ॥ निजात्मबोध प्रकट केला ॥ सावध जाहला ब्राह्मण ॥ २७ ॥ जैसा स्वप्न देखतां जागा होय ॥ कीं यामिनीअंतीं[72] उगवे सूर्य ॥ तैसा बोध प्रकटतां मोहभय ॥ विरोन गेलें सर्वही ॥ २८ ॥

६१ डाव्या बगलेला. ६२ गर्वेत. ६३ पापक्षालन. ६४ यमानें. ६५ चिंतारूपी समुद्रांत. ६६ आलिंगन. ६७ अनुभव. ६८ महार. ६९ भूमीवर (लोळण घेतली). ७० नरकांत. ७१ कमलनयना. ७२ रात्र सरली असतां.

असो गाधीचा उद्धार जाहला ॥ आपुले स्वरूपीं मेळविला ॥ हा इतिहास सांगितला ॥ मायेनिमित्त श्रीरामा ॥ २९ ॥ मग बोले रघुनंदन ॥ माया व्हावया काय कारण ॥ स्वरूप निर्विकार निर्गुण ॥ तेथें स्फुरण कां जाहलें ॥ १३० ॥ पिंड ब्रह्मांड नानायोनी ॥ नानावर्ण नानाखाणी ॥ हे मुळींहून मायेची करणी ॥ मिथ्याभूत सर्वही ॥ ३१ ॥ कीं निर्गुणा सगुण लागलें ॥ अव्यक्त तें व्यक्तीस आलें ॥ अनामास नाम ठेविलें ॥ कां अंग लाविलें अनंगाँ ॥ ३२ ॥ ऐकोन श्रीरामाचा प्रश्न ॥ आनंदला ब्रह्मनंदन ॥ म्हणे बा रे तूं परिपूर्ण चैतन्यघन ॥ जाणोन प्रश्न करितोसी ॥ ३३॥ रामा तुझेंचि दिव्य ज्ञान ॥ तुजलाचि सांगतों परतोन ॥ जैसें सुरतरूचें फळ घेऊन ॥ त्यासचि नैवेद्य दाविजे ॥३४॥ कीं कनकौद्रीचें सुवर्ण घेऊन ॥ त्यावरीच अलंकार घातले घडून ॥ कीं क्षीरसिंधूचें दुग्ध घेऊन ॥ पुन्हां त्यासीच समर्पिलें ॥ ३५ ॥ कीं सागरींचें उदक मेघ नेती ॥ मागुती सरिताँ आणूनि समर्पिती ॥ तैसा श्रीरामा तुजप्रती ॥ तुझेंच ज्ञान सांगतों ॥ ३६ ॥ तरी तुवां केला प्रश्न ॥ स्वरूपीं कां जाहलें स्फुरण ॥ तरी येविषयीं दृष्टांत सांगेन ॥ ऐक रामा निर्धारें ॥ ३७ ॥ जैसा कोणी पुरुष निद्रिस्थ ॥ पहुडला असे चिंतारहित ॥ तो स्वइच्छें होऊन जागृत ॥ कार्य कांहीं आठवी ॥ ३८ ॥ कीं समुद्रीं उठे लहरी ॥ तैसी ध्वनि उठे चिदंबरीं ॥ मी म्हणोन निर्धारीं ॥ हांक थोर जाहली ॥ ३९ ॥ एक असतां ब्रह्मानंद ॥ निःशब्दीं उठिला शब्द ॥ ते ध्वनि मायानाम प्रसिद्ध ॥ वेदांतशास्त्र गर्जतसे ॥ १४० ॥ जिचें नाम मूळप्रकृती ॥ जी आदिपुरुषाची चिच्छक्ती ॥ तिनें शेजे निजवोनि पती ॥ सृष्टिकार्य आरंभिलें ॥ ४१ ॥ येवढें ब्रह्मांड केलें निर्माण ॥ परी पतीस कळों नेदी वर्तमान ॥ ते परम कैवटाळीण ॥ नसतींच दैवतें उभीं केलीं ॥ ४२ ॥ विधि विष्णु उमाकांत ॥ हीं तिन्ही बाळें जिचे आझेंत ॥ नेत्र उघडोन निश्चित ॥ पाहों नेदी स्वरूपाकडे ॥ ४३ ॥ ब्रह्मसुखाचे समुद्रांत ॥ बुडाले हे जीव समस्त ॥ परी तेथींची गोडी किंचित ॥ चाखों नेदी कोणातें ॥ ४४ ॥ चैतन्य इनेंच झांकिलें ॥ इनें अरूप रूपासि आणिलें ॥ अनंत ब्रह्मांडींचे पुतळे ॥ एकेचि सूत्रें नाचवी ॥ ४५ ॥ इनें निर्गुणास गुण लाविले जाण ॥ अनामासी ठेविलें नामकरण ॥ निराकारासी आकारून ॥ जीवित्वासी आणिलें ॥ ४६ ॥ हे परम पतिव्रता साचार ॥ पतीस न कळतां जाहली गरोदर ॥ ब्रह्मांड रचिलें समग्र ॥ नानाविकारेंकरूनियां ॥ ४७ ॥ नानायोनी विकार भाव ॥ इनें फांसां पाडिले अवघे जीव ॥ गाधीस कैसें दाविलें लाँघव ॥ मिथ्या कर्तृत्व नसतेंचि ॥ ४८ ॥ कोणी मुरडे स्वरूपाकडे ॥ त्यासी नसतेंचि घाली सांकडें ॥ अथवा स्वर्गसुख रोकडें ॥ पुढें दावून भुलवी कीं ॥ ४९ ॥ निजात्मसुखगोडी निःसीम ॥ ती जीवासी केली कडू परम ॥ विषयविषरूप मोहभ्रम ॥ तेथें गोडी आणिली ॥ १५०॥ असो ऐसी ते आदिशक्ती ॥ तिनें इच्छा धरिली चित्तीं ॥ तिसीच गुणक्षोभिणी म्हणती ॥ त्रिगुण निश्चित केले इनें ॥ ५१ ॥ सत्व रज तम जाण ॥ तेचि विधि विष्णु ईशान ॥ त्रिशक्तिरूपें धरून ॥ तिहीं ठायीं आपण जाहली ॥ ५२ ॥ ज्ञानशक्तीच्या आधारेंकरून ॥ ज्ञानपंचक केलें निर्माण ॥ तें अंतःकरणचतुष्टय पूर्ण ॥ तत्त्वविद म्हणती ते ॥ ५३ ॥ क्रियाशक्तीच्या

७१ निर्गुण ब्रह्म. ७४ शरीररूपिताला. ७५ कल्पवृक्षाचें. ७६ मेरूचें. ७७ नग्न. ७८ चैतन्यरूप आकाशांत. ७९ कावेबाज. ८० कौशल्य. ८१ वळे. ८२ प्रत्यक्ष. ८३ तत्त्वज्ञ, तत्त्वज्ञानते.

आधारें रजोगुण ॥ प्रसवला तो पंचकें तीन ॥ एक ज्ञानेंद्रियपंचक पूर्ण ॥ कर्मेंद्रियपंचक दुसरें ॥ ५४ ॥ तिसरें जाणावें वायुपंचक ॥ आतां तमद्रव्यशक्तिआधारें देख ॥ विषयपंचक निर्मिलें सुरेख ॥ पंचतन्मात्रा म्हणती ज्यातें ॥ ५५ ॥ ऐसीं पंचवीस तत्त्वें निःशेष ॥ मग केला परें-स्परानुप्रवेश ॥ कर्दमें करूनि विशेष ॥ ब्रह्मांड हे रचियेलें ॥ ५६ ॥ ब्रह्मांड ही पेठ पूर्ण ॥ नाना रीतीं रची कमलासन ॥ चहूं खाणींचीं केणीं[८६] आणून ॥ चौऱ्यायशीं लक्ष जीव केले ॥ ५७ ॥ ऐसा ब्रह्मा पेठा भरीत ॥ विष्णु तयांचा प्रतिपाळ करीत ॥ दहा अवतारांच्या घिरट्या घेत ॥ संकटीं तारीत भक्तांतें ॥ ५८ ॥ सृष्टींत दोष होतां अपार ॥ परम क्रोधी तो अपर्णीवर ॥ तत्काळ करी संहार ॥ टाकी सर्व मोडोनियां ॥ ५९ ॥ विराट जें रचिलें ढिसाळें ॥ हें शिवाचें देह स्थूळ ॥ पायांचे तळवे तें पाताळ ॥ प्रपदें रसातळ जाणिजे ॥ १६० ॥ याचा सांगतों निर्णय ॥ ज्ञान जेणें प्राप्त होय ॥ सकळ संतांचे समुदाय ॥ ऐकोन बहुत आनंदती ॥ ६१ ॥ गुल्फद्वंय तें महातळ ॥ पोटरिया जानुयुगुळ ॥ तें तळातळ आणि वितळ ॥ विराटाचें जाण पां ॥ ६२ ॥ कटिप्रदेश तें महीतळ ॥ जाण नैर्ऋत्यलोक तें गुदस्थान ॥ दक्षप्रजापति तो शिश्न ॥ विराटाचें जाण पां ॥ ६३ ॥ जठरामाजी पोकळ ॥ तें हें अवघें नभमंडळ ॥ जठराग्नि तो वडवानळ ॥ महा कल्लोळ धडकतसे ॥ ६४ ॥ सप्तसमुद्र उदरीं सकळ ॥ ज्योतिर्लोक तें वक्षःस्थळ ॥ महर्लोक तें कंठनाळ ॥ वदनकमळ जनलोक ॥ ६५ ॥ वरुणलोक ते जिव्हा जाण ॥ यमलोक त्या दंतदाढा तीक्ष्ण अश्विनीदेव तें घ्राण ॥ भ्रुकुटिस्थान भूर्लोक ॥ ६६ ॥ तपोलोक तें कपाळ ॥ मस्तक ब्रह्मभुवन निर्मळ ॥ वासरमणि तो नेत्र तेजाळ ॥ प्रकाश-कल्लोळें ब्रह्मांड भरी ॥ ६७ ॥ पातीं उघडी त्या नांव दिवस ॥ झांकितां रात्र म्हणती त्यास ॥ उभयहस्तरूपें अमरेश ॥ कर्तव्य करी सर्वही ॥ ६८ ॥ चंद्रमा तयाचें मन ॥ वनस्पती रोमावळी पूर्ण ॥ त्वचा ते जाण प्रभंजन ॥ कर्दमें पूर्ण मांस तें ॥ ६९ ॥ नाडीचक्र गंगा निश्चितीं ॥ पृष्ठी तिकडे अधर्मरीती ॥ कनकाचळ तो सुमती ॥ शिरोभाग जाणिजे ॥ १७० ॥ अस्थि त्या जाण पाषाण ॥ फेण ती लाळ ओळखें खूण ॥ दाहिंवर तें मूत्र पूर्ण ॥ जळें तें रक्त जाणिजे ॥ ७१ ॥ पाषाणगर्भ मज्जा सत्य ॥ पर्जन्य तें शिवाचें रेत ॥ दुर्भिक्ष ती क्षुधा अद्भुत ॥ जलशोष अत्यंत तृषा पूर्ण ॥ ७२ ॥ आळस तो शीतकाळ ॥ पर्जन्यकाळ ती निद्रा सबळ ॥ उष्णकाळ तें मैथुन केवळ ॥ वृष्टि व्हावया तावीतसे ॥ ७३ ॥ झंझाट वायु तें धांवणें ॥ वाहाटुळी तयाचें वळणें ॥ दशदिशा पसरल्या संपूर्णें ॥ तें पसरण तयांचें ॥ ७४ ॥ स्तब्ध वायु तें आकुंचन ॥ उकाडा तो निरो-धन ॥ जळवृष्टीची इच्छा काम पूर्ण ॥ सृष्टिसंहारेंण क्रोध तो ॥ ७५ ॥ शोक तो महा अनर्थ ॥ मोह सृष्टिपालन यथार्थ ॥ भय तो मृत्यु ओळख सत्य ॥ विराटपुरुषाचें राघवा ॥ ७६ ॥ पीतवर्सेन तें अंतःकरण ॥ रमाबंधु तयाचें मन ॥ विरिंचि[१००] बुद्धि संपूर्ण ॥ चित्त नारायण जाणिजे ॥ ७७ ॥ देवदत्त तो मुख्य प्राण ॥ धनंजय पाताळीं आपण ॥ दिशा तयाचे कर्ण ॥ पवन संपूर्ण त्वचा त्याची ॥ ७८ ॥ अग्नि तयाचें वदन ॥ चरण पाताळीं वामन ॥ ऐसा विराटपुरुष संपूर्ण ॥ सप्तावरणमय असे ॥ ७९ ॥ भूगोल दशगुणें प्रबळ ॥ बाह्य ओळखें पृथ्वीमंडळ ॥

८४ पंचभूतांचें परस्परांत मिसळणें. ८५ चिखल. ८६ वस्तु. ८७ पार्वतीपती शंकर. ८८ मोडें. ८९ पायांचीं अग्रें. ९० दोन घोटे. ९१ जांघा. ९२ नाक. ९३ सूर्य. ९४ मोठा वायु. ९५ चिखल. ९६ पाणी. ९७ नाश करणें. ९८ पिवळा पीतांबर नेसणारा विष्णु. ९९ लक्ष्मीचा भाऊ चंद्र. १०० ब्रह्मा.

त्या दशगुणें समुद्रजळ ॥ असंभाव्य पसरलें ॥ ८० ॥ उदकाचे दशगुण ॥ धडाडीत महाअग्न ॥ त्या दशगुणें प्रभंजन ॥ आवरण पैं जाणिजे ॥ ८१ ॥ समीरा दशगुणें साचार ॥ वाढ असे हें अंबर ॥ नभा दशगुणें अहंकार ॥ वेष्टिलासे सघन पैं ॥ ८२ ॥ अहंकारा दशगुणें निश्चित ॥ व्यापिलें असे महत्तत्त्व ॥ त्या दशगुणें अद्भुत ॥ मायाआवरण शेवटीं ॥ ८३ ॥ मायेपलीकडे जें उरलें जाण ॥ तें केवळ स्वरूप निर्वाण ॥ तें इतुकें तितुकें थोर लहान ॥ व्यक्तिवर्ण नाहीं तेथें ॥ ८४ ॥ ऐसा मायेचा खेळ अचाट ॥ आतां ऐकें इचा शेवट ॥ पंच प्रळय स्पष्ट ॥ वेदांतशास्त्रीं निवडिले ॥ ८५ ॥ पिंडीं नित्यप्रळय संपूर्ण ॥ निद्रा म्हणती त्यालागून ॥ तत्त्वांसमवेत स्थूळलिंगदेह जाण ॥ बुडोन जाय निद्रार्णवीं ॥ ८६ ॥ हा नित्यप्रळय जाण ॥ आतां महाप्रळय तें मरण ॥ जाय स्थूळदेह संहारून ॥ सर्व जन देखती ॥ ८७ ॥ आतां ब्रह्मांडींचा प्रळय निश्चित ॥ चारही युगें सहस्र वेळां जात ॥ तोंवरी ब्रह्मा होय निद्रिस्थ ॥ मग राहतो सृष्टिक्रम ॥ ८८ ॥ अवघी सृष्टि जाय संहारुनी ॥ सर्व जळमय होय ते क्षणीं ॥ बत्तीस लक्ष गांव चढे पाणी ॥ जाय बुडोनी ब्रह्मांड ॥ ८९ ॥ सप्तचिरंजीव बुडोन जात ॥ सत्यलोकीं पाणी आदळत ॥ तेव्हां वटपत्रशायी भगवंत ॥ ब्रह्मा निद्रिस्थ नाभिकमळीं ॥ १९० ॥ मग कमलोद्भव होय जागृत ॥ जळ आटोनि समस्त ॥ यथापूर्व कल्प येत ॥ वेद निश्चित बोलतसे ॥ ९१ ॥ पूर्विल्यासारिखें होय सकळ ॥ मागुती अवतार धरी घननीळ ॥ अवतारचरित्र सकळ ॥ पूर्विल्या ऐसें दावीत ॥ ९२ ॥ हा नित्यप्रळय संपूर्ण ॥ आतां महाप्रळय ऐक दारुण ॥ आधीं शतसंवत्सर घन ॥ न वर्षेचि कदापि ॥ ९३ ॥ तेणें जीवसृष्टीचा संहार ॥ सर्वेंच उगवती द्वादश मित्रें ॥ वडवानळ तो महातीव्र ॥ भूमंडळ जाळीत पैं ॥ ९४ ॥ तापतांचि उर्वीमंडळ ॥ भोगींद्रमुखींचे निघती ज्वाळ ॥ तेणें सप्तपाताळ सकळ ॥ भस्म होती एकदांचि ॥ ९५ ॥ मग शतसंवत्सरपर्यंत ॥ शुंडाधारी मेघ वर्षत ॥ जैसी जळगार जळीं विरत ॥ जगती समस्त वितळे तेवीं ॥ ९६ ॥ उपरी महातेज अग्न ॥ जळ शोषी न लागतां क्षण ॥ तया तेजासी प्रभंजन ॥ टाकील ग्रासून क्षणमात्रें ॥ ९७ ॥ मग तो अद्भुत अनिळ ॥ क्षणें गिळील निराळ ॥ त्या गगनासी समूळ ॥ तमोगुण ग्रासील पैं ॥ ९८ ॥ तमासी ग्रासील रजोगुण ॥ रज सत्त्वीं होईल लीन ॥ सत्त्वास महत्तत्त्व मिळोन ॥ समरसेल मायेंत ॥ ९९ ॥ माया होय स्वरूपीं लीन ॥ स्वरूप स्वरूपीं समाधान ॥ जें ब्रह्मानंदपरिपूर्ण ॥ बोलतां मौन वेदशास्त्रां ॥ २०० ॥ निर्गुण निर्विकार निरुपम ॥ पूर्ण शांति योगक्षेम ॥ असतां पूर्ण जाहले निःसीम ॥ केला क्रम विस्मयें ॥ १ ॥ तें तूं स्वरूप निर्वाण ॥ राघवा नटलासी परिपूर्ण ॥ सच्चिदानंद सत्य जाण ॥ हेंही बोलणें न साहे ॥ २ ॥ आटोनि सर्व अलंकार ॥ एकरस जाहला निर्विकार ॥ आपलें पिंडब्रह्मांड समग्र ॥ तोचि तूं साचार श्रीरामा ॥ ३ ॥ कैंचें वैकुंठ कैंचें कैलास ॥ लोपला अवघा मायाविलास ॥ शेषशायी जगन्निवास ॥ हाही भास मावळला ॥ ४ ॥ वटपत्रशायी सर्वेश्वर ॥ हे नित्यकल्पींची गोष्ट साचार ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ स्वस्वरूपीं मिळाले ॥ ५ ॥ उरलें निर्विकार स्वरूप ॥ तें तूं राघवा निर्विकल्प ॥ अच्छेद्य अभेद्य अरूप ॥ आत्माराम परिपूर्ण ॥ ६ ॥

---

१ वायु. २ आकाश. ३. दाट. ४ वेणीमधील कमळावर. ५ भयंकर. ६ मेघ. ७ सूर्य. ८ वितुळते. ९ सामावेल. १०. ज्याला उपमा देण्याजोगी जगांत दुसरी वस्तु नाहीं असा.

स्वरूपनिर्धार होतां पूर्ण ॥ श्रीरामें झांकिले नयन ॥ ब्रह्मानंदसागरीं लीन ॥ रघुनंदन जाहला ॥ ७ ॥ वसिष्ठही आनंदें डुलत ॥ खुंटला बोल राहिली मात ॥ गुरुशिष्य देवभक्त ॥ एकरूप जाहले ॥ ८ ॥ विराल्या रघुनाथाच्या शक्ती ॥ स्वस्वरूपीं पावला विश्रांती ॥ वसिष्ठही आत्मस्थिती ॥ श्रीरघुनाथीं बिंबला ॥ ९ ॥ अठरा दिवसपर्यंत ॥ श्रीराम जाहला समाधिस्थ ॥ विसरला अवतारधारणहेत ॥ राम सेम-रसला आत्मरूपीं ॥ २१० ॥ शरीर जाहलें अचेतन ॥ हृदयीं आकर्षिले प्राण ॥ गेंजबजिलें दशरथाचें मन ॥ म्हणे अनर्थ पूर्ण जाहला ॥११॥ गजबजिला विश्वामित्र ॥ म्हणे काय संपला अवतार ॥ बंदीं पडले सुरवर ॥ मोडवील कोण तयांतें ॥ १२ ॥ आतां कैंचें यागरक्षण ॥ तत्काळ दशरथ देईल प्राण ॥ आजि जाहले अष्टादेश दिन ॥ रघुनंदन सावध नोहे ॥ १३ ॥ ऐकतां निर्वाणज्ञान थोर ॥ राम जाहला निर्विकार ॥ मग वसिष्ठासी विश्वामित्र ॥ घाली नमस्कार तेधवां ॥ १४ ॥ म्हणे महाराजा ब्रह्मसुता ॥ सावध करीं रघुनाथा ॥ पुढें अवतार-कार्य तत्त्वतां ॥ बहु असे तें जाणसी तूं ॥ १५ ॥ मग वसिष्ठ म्हणे श्रीरामा ॥ सावध होईं मेघश्यामा ॥ चिदानंदा पूर्णब्रह्मा ॥ याग-रक्षणा आतां जाइंजे ॥ १६ ॥ जाणोनियां स्वरूपातें ॥ सुखें धर्मरीतीं वर्तें ॥ पाळोनियां सज्जनातें ॥ दुष्ट क्षयातें पाववीं ॥ १७ ॥ जैसीं केश-नखें आंगीं वाढती ॥ आपुलीं आपणातें रुपती ॥ तीं छेदितां सुख निश्चिंतीं ॥ तैसे दुष्टमती वधावे ॥ १८ ॥ समाधि आणि व्युत्थान ॥ दोन्ही अंतरीं जिरवून ॥ तुर्यी उन्मनी ओलांडून ॥ आनंदघन वर्तावें ॥ १९ ॥ तटस्थता टाकोनि वेगीं ॥ रामा उघडी समाधि भोगीं ॥ श्रीरामा तूं राजयोगी ॥ सर्व संगीं निःसंग ॥ २२० ॥ जो आपुले ठायीं भ्रमें वर्तत ॥ तया जगही भ्रममय भासत ॥ भ्रमरूप ब्रह्मांड दिसत ॥ भ्रमेंचि मृत्यु जवळी ये ॥२१॥ ईश्वराचें स्वरूप निर्वाण ॥ भ्रमें नाकळे जाहला दीन ॥ आपण आहें कोणाचा कोण ॥ भ्रमें पूर्ण नोळखे ॥ २२ ॥ भ्रमेंकरूनि जन्ममरण ॥ भ्रमेंकरून अधःपतन ॥ तो भ्रम गेलिया संपूर्ण ॥ आपणाविण दुजें नसे ॥ २३ ॥ आपण ब्रह्मस्वरूप होतां पूर्ण ॥ ब्रह्मरूप दिसे त्रिभुवन ॥ शत्रु मित्र थोर लहान ॥ ब्रह्मरूप सर्व दिसे ॥ २४ ॥ घागरी मडकीं रांजण ॥ आंत बिंबला चंडकिरणें ॥ परी सूर्यासी स्त्रीपुरुषनपुंसकपण ॥ कल्पांतींही घडेना ॥ २५ ॥ सोनें साच लटिके अलंकार ॥ तरंग मिथ्या एक सागरें ॥ पटें मिथ्या तंतू निर्धार ॥ तैसें चराचर ब्रह्मरूप ॥ २६ ॥ नाना घट एक अंबरें ॥ नाना मणि एक सूत्र ॥ नाना मातृका एक ओंकार ॥ ब्रह्म सर्वत्र तैसेंचि ॥ २७ ॥ म्हणोन सुटतां हृदयग्रंथि ॥ सर्व संशयां होय निवृत्ति ॥ कर्मीच होय ब्रह्मप्राप्ति ॥ त्रिजगतीं ब्रह्मरूप ॥ २८ ॥ उभय पक्षांचे बळेंकरूनी ॥ विहंगमें संच-रती गगनीं ॥ तैसें कर्मब्रह्म ऐक्य करूनी ॥ स्वानंदवनीं विचरावें ॥ २९ ॥ जेथें निमाल्या सकळ औंधि ॥ श्रीरामा पूर्ण तेचि समाधि ॥ तट-स्थता हे उपाधि ॥ एकदेशी जाण पां ॥ २३० ॥ अंतरीं जाणोनि निर्वाणज्ञान ॥ बाहेर दाविजे भिन्नाभिन्न ॥ अंतरीं बोध परिपूर्ण ॥ बाहेर जडपण दाविजे ॥ ३१ ॥ अंतरीं करून पूर्ण त्याग ॥ बाहेर दाविजे लौकिक भाग ॥ अंतरीं होऊनि निःसंग ॥ विषयीं विरागें धरावा ॥ ३२ ॥

११ लीन झाला. १२ घाबरले. १३ यज्ञ पार पाडणे. १४ अठरा. १५ ब्रह्मज्ञान. १६ समाधिविसर्जन. १७ चौथी अवस्था. १८ पांचवी अवस्था. १९ सूर्य. २० समुद्र. २१ वस्त्र. २२ आकाश, पोकळी. २३ पक्षी. २४ मनांतील दुःखें. २५ विरक्ति धरावी.

बाहेर लटिकेंच कृपणपण ॥ परी अंतरीं समसमान ॥ रामा तोचि साधक पूर्ण ॥ लोकसंगविवर्जित ॥ ३३ ॥ जैसा बीजामधूनि वट थोर ॥ निघे अद्भुत पर्वताकार ॥ तैसें आत्मरूपां चराचर ॥ जाहलें जाणोनि वर्तावें ॥ ३४ ॥ तंतू आणि पेंट पूर्ण ॥ दोघांसी नव्हे वेगळेपण ॥ घट मृत्तिकेसी टाकून ॥ वेगळा नोहे सर्वथा ॥ ३५ ॥ तैसें जग आणि जगदीश्वर ॥ भिन्न नोहे साचार ॥ हें ज्ञान जाणोनि निर्विकार ॥ वर्तें सदा तूं राघवा ॥ ३६ ॥ अविद्या ही विवंशी वाडें ॥ निजात्मधनासी मध्यें आड ॥ तिचें गुरुकृपें छेदोनि बंड ॥ वर्तें अखंड राघवा ॥ ३७ ॥ प्रपंचसमुद्र नसतांचि दिसे ॥ गुरुकृपेचे नौवेंत बैसें ॥ निवृत्तितटीं समरसें ॥ आत्मप्रकाशेंकरूनियां ॥ ३८ ॥ अभ्यासेंविण विद्या सकळा ॥ तत्काळ होती राघवा विकळा ॥ तैसी नोहे ज्ञानकळा ॥ तारी अबळा निजस्पर्शें ॥ ३९ ॥ लोहीं झगटतां परिस पूर्ण ॥ मग तें जन्मवरी जाहलें सुवर्ण ॥ तैसें होतां आत्मज्ञान ॥ जन्ममरण त्यासी कैंचें ॥ २४० ॥ म्हणोन साधक जे सज्ञान ॥ तिहीं प्रतिपाळावें गुरुवचन ॥ सकळ अकार्या टाकून ॥ सन्मार्गेंच वर्तावें ॥ ४१ ॥ रामा तूं गुरु म्हणसील कोण ॥ जो तत्त्ववेत्ता अनुभवी पूर्ण ॥ शिष्य व्हावा ज्ञाननिपुण ॥ ऐसी मति जयासी ॥ ४२ ॥ साधकीं करावें हेंचि त्वरित ॥ बोधवज्र घेऊन निश्चित ॥ जन्ममरण-दुःखपर्वत ॥ चूर्ण करूनि टाकावे ॥ ४३ ॥ मोक्षतरूचें बीज हें सत्य ॥ अद्वैतज्ञान क्रियासहित ॥ सदा चालिजे धर्मपंथ ॥ सर्व कुमतें टाकोनियां ॥ ४४ ॥ ज्याचें शुद्ध मन तोचि शुचिष्मंत ॥ सद्विवेक वसे तोचि पंडित ॥ जो गुरुभक्तीसी नव्हे रत ॥ तरी विष यथार्थ तोचि प्याला ॥ ४५ ॥ कामया ग्रंथ शतसहस्र ॥ मुख्य धर्म तो परोपकार ॥ अधर्म नाम त्या साचार ॥ परपीडा करणें जे ॥ ४६ ॥ याकारणें वत्सा रघुनाथा ॥ तूं समाधि ग्रासोनियां आतां ॥ धनुष्य घेऊनिया तत्त्वतां ॥ मखरक्षणा जाइंजे ॥ ४७ ॥ ऐकतां सद्गुरूचें वचन ॥ श्रीराम तो सुहास्यवदन ॥ उघडी अमल राजीवनयन ॥ जे कां आकर्ण विकासले ॥ ४८ ॥ करूनि सद्गुरूसी नमस्कार ॥ करी प्रदक्षिणा त्रिवार ॥ सद्गद जाहलें अंतर ॥ अष्टभावेंकरोनियां ॥ ४९ ॥ मग म्हणे ब्रह्मपुत्र ॥ बा रे दावीं आतां लीलाचरित्र ॥ ते गुरुआज्ञा राजीवनेत्र ॥ मस्तकीं वंदोनि निघाला ॥ २५० ॥ दिव्य रथीं बैसला रघुनाथ ॥ सवें कौशिक आणि सुमित्रासुत ॥ लक्षोनि सिद्धाश्रमाचा पंथ ॥ सुमुहूर्तेंसीं चालिला ॥ ५१ ॥ दशरथ आणि ब्रह्मसुत ॥ भागीरथीपर्यंत बोळवीत ॥ जातां उत्तम शकुन बहुत ॥ श्रीरामासी जाहले ॥ ५२ ॥ त्या शकुनांचा करूनि अर्थ ॥ रायासी सांगे विरिंचिसुत ॥ विजयश्रियेसीं रघुनाथ ॥ अयोध्येसी येईल सुखें ॥ ५३ ॥ बोळवूनि तेव्हां रघुनाथ ॥ माघारे आले वसिष्ठ दशरथ ॥ पुढें कथा गोड बहुत ॥ अमृताहूनि विशेषें ॥ ५४ ॥ रामविजय वैरागर देख ॥ षष्ठाध्याय हिरा अलोलिक ॥ हृदयपदकीं जडोत सुरेख ॥ संत श्रोते अनुभवी ॥ ५५ ॥ ब्रह्मानंदा रामचंद्रा ॥ श्रीधरवरदा गुणसमुद्रा ॥ हा षष्ठाध्याय रघुवीरा ॥ सदा हृदयीं वसो माझ्या ॥ ५६ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत पंडित चतुर ॥ षष्ठाध्याय गोड हा ॥ २५७ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥

२६ वस्त्र. २७ राक्षसीण. २८ मोठी. २९ नौकेंत. ३० यज्ञरक्षणासाठी. ३१ कमलासारखे नेत्र ( असलेला राम ). ३२ विश्वामित्र. ३३ लक्ष्मण. ३४ वसिष्ठ. ३५ हिऱ्यांची खाण.



श्रीगणेशाय नमः ॥ [1]चंडकिरणसुकुलमंडना ॥ [2]अमलकमलाक्षा रघुनंदना ॥ [3]जलजोद्भवजनका [4]जगजीवना ॥ पतितपावना श्रीरामा ॥ १ ॥ [5]विद्वज्जनमानसमराळा ॥ कामांतकध्येया भक्तवत्सला ॥ अनंतवेषा त्रिभुवनपाळा ॥ दीनदयाळा रघुपते ॥ २ ॥ जय जय [6]अविद्या-विपिनदहना ॥ निजभक्तकौसल्यागर्भरत्ना ॥ जगदुद्धारा मुनिजनरंजना ॥ [7]दुर्जनभंजना राघवेशा ॥ ३ ॥ मागें षष्ठाध्यायीं कथन ॥ वसिष्ठें रामास उपदेशून ॥ मग विश्वामित्र चालिला घेऊन ॥ यागरक्षणाचेनि [8]कांजें ॥ ४ ॥ भागीरथींत करोनि स्नान ॥ कौशिकें राम लक्ष्मण ॥ सारोनियां नित्य अनुष्ठान ॥ सत्कर्माचरण वेदोक्त ॥ ५ ॥ मग धनुर्वेदयुक्ती नानामंत्र ॥ कोणे समयीं कैसें प्रेरावें अस्त्र ॥ तें रामासी अवघें मंत्रशास्त्र ॥ विश्वामित्र उपदेशी ॥ ६ ॥ युद्धाच्या नाना युक्ती कळा ॥ विश्वामित्रें सांगतांचि सकळा ॥ राघवें [9]आंकळिल्या त्या वेळा ॥ जैसा आंवळा करतळींचा ॥ ७ ॥ मूर्तिमंत अस्त्रदेवता ॥ रामचरणीं ठेविती माथा ॥ मग हृदयीं प्रवेशती तत्त्वतां ॥ जळीं [10]जेळगार जयापरी ॥ ८ ॥ पहावया श्रीरामाचें धैर्यमानस ॥ विश्वामित्र म्हणे तया समयास ॥ येणें मार्गें जे गेले सिद्धाश्रमास ॥ ताटिकेनें तयांस भक्षिलें ॥ ९ ॥ येणें मार्गें रघुपती ॥ जाऊं नये भय वाटे चित्तीं ॥ हा मार्ग चुकवून त्वरितगती ॥ जावें सिद्धाश्रमातें ॥ १० ॥ ऐकतां कौशिकाचें वचन ॥ श्रीराम बोले सुहास्यवदन ॥ जेणें विश्वमित्राचे कर्ण ॥ तृप्त होऊन सुखा-वती ॥ ११ ॥ स्वामी तुमचे कृपेंकरूनी ॥ महाकाळ उभाच फोडीन बाणीं ॥ तेथें ताटिकेसी कोण [11]गणी ॥ येच क्षणीं मारीन तीतें ॥ १२ ॥ कौशिकाचे मनीं संशय होता ॥ कीं हीं बाळकें केवीं झुंजतील आतां ॥ त्या संशयाची समूळ वार्ता ॥ रामवचनें निरसली ॥ १३ ॥ मग त्या रथावरी बैसोन ॥ ताटिकेचें हिंदोळिक वन ॥ त्याचि मार्गें निघे जण ॥ जाते जाहले तेधवां ॥ १४ ॥ [12]वातवेगें जात स्यंदनें ॥ की अपार भूमि टाकिली क्रमोन ॥ जैसें ऐकतां हरिकीर्तन ॥ पापें खंडोनि भस्म होती ॥ १५ ॥ पुढें देखिलें घोर अरण्य ॥ वृक्ष लागले परम [13]सघन ॥ चालावयासी स्यंदनें ॥ मार्ग पुढें फुटेना ॥ १६ ॥ रामासी म्हणे गाधिनंदन [14]॥ राघवा हेंचि ताटिकारण्य ॥ आतां येईल ती धांवोन ॥ वास काढून मनुष्यांचा ॥ १७ ॥ तों हांक फोडिली अकस्मात ॥ जे ऐकतां दचकेल [15]कृतांत ॥ विश्वामित्र जाहला भयभीत ॥ रक्षीं म्हणत राघवा ॥ १८ ॥ उन्मत्त दशसहस्र गजांचें बळ ॥ ऐसी ताटिका परम सबळ ॥ पर्वत सांठवती विशाळ ॥ ऐसें उदर तियेचें ॥ १९ ॥ ते कुंभकर्णाची भगिनी ॥ बहुत विशाळ राक्षसिणी ॥ शतांचीं शतें [16]गोद्विज धरोनी ॥ दाढेखालीं रगडी-तसे ॥ २० ॥ ताटिका मार्गीं जातां सहज ॥ मुखांत घालोनि रगडी द्विज ॥ वनोपवनीं शोधोनि द्विज ॥ नित्य भक्षी साक्षेपें ॥ २१ ॥

---

१ उत्तम अशा सूर्यवंशाला भूषण अशा. २ शुद्धकमलनेत्रा. ३ ब्रह्मदेवाच्या जनका. ४ जगताला वांचविणाऱ्या. ५ विद्वन्मनोरूप सरोवरांतील हंसा. ६ मदनाला जाळणाऱ्या शंकराचें ध्यान असणाऱ्या. ७ अविद्यारूपी अरण्य जाळणाऱ्या. ८ दुष्टांचा नाश करणाऱ्या. ९ कामासाठीं. १० विश्वामित्र. ११ समजून घेतल्या. १२ गोठलेलें पाणी, गार. १३ पर्वा करी. १४ वाऱ्याप्रमाणें. १५ रथ. १६ निबिड, दाट. १७ यम. १८ गाई व ब्राह्मण.

प्रेतरक्तें वस्त्रें भरलीं ॥ तींचि आपणाभोंवतीं वेष्टिलीं ॥ मनुष्यशिरें कर्णीं बांधिलीं ॥ बहु दाट वेळीनें[15] ॥ २२ ॥ नरशिरांच्या अपार माळा ॥ शोणितें[16] चर्चित[17] रुळती गळां ॥ कपाळीं सिंदूर चर्चिला ॥ बोंबरझोटी[18] मोकळिया ॥ २३ ॥ द्वादश गांव पसरलें वदन ॥ पांच गांव लांब एकेक स्तन ॥ अगणित राक्षसी संगें घेऊन ॥ रामावरी लोटली[19] ॥ २४ ॥ सखियांसी ताटिका म्हणे तेचि क्षणीं ॥ या पंथें येत मनुष्यांची घाणी ॥ नरमांसाची आजि धणी[20] ॥ तुम्हांस देईन निर्धारें ॥ २५ ॥ विश्वामित्र म्हणे चापपाणी ॥ हे वृक्ष विशाळ गेले गगनीं ॥ आंत गर्जतात राक्षसिणी ॥ ताटिकेसहित पाहें पां ॥ २६ ॥ राम काढी कोदंडाची[21] गवसणी ॥ जैसा याज्ञिकें कुंडाचा फुंकिला अग्नी ॥ कीं अकस्मात उगवला वासरमणी[22] ॥ यामिनीअंतीं[23] पूर्वेसी ॥ २७ ॥ तंव सिंतें[24] ओढितां आकर्ण ॥ कडकडाट घोष दारुण ॥ जाहला सवेंच योजिला बाण ॥ प्रळयचपळेसारिखा[25] ॥ २८ ॥ ज्या बाणाचें अर्धचंद्राकार वदन ॥ करी धांवत्या वायूचें खंडण ॥ रामें ओढूनि आकर्ण ॥ तो बाण सोडिला ते समयीं ॥ २९ ॥ वृक्षांसहित राक्षसिणी ॥ मुख्य ताटिका हृदयापासोनी ॥ छेदोन पाडिली ते क्षणीं ॥ घोष गगनीं न समाये ॥ ३० ॥ प्राण जातां राक्षसिणी ॥ ताटिका गर्जली ते क्षणीं ॥ तो घोष विमानीं ऐकोनी ॥ देव सर्व गजबजिले ॥ ३१ ॥ म्हणती विजयी विजयी श्रीरघुवीर ॥ वर्षती देव पुष्पांचे संभार ॥ ब्रह्मानंदें विश्वामित्र ॥ रामालागीं आलिंगी ॥ ३२ ॥ म्हणे रविकुळभूषणा रघुवीरा ॥ राजीवनेत्रा परम सुकुमारा ॥ तुझी धनुर्विद्या रामचंद्रा ॥ आजि म्यां दृष्टीं विलोकिली ॥ ३३ ॥ जैसें एकाचि नामेंकरून ॥ कोट्यवधि पापें जाती जळून ॥ तैसें ताटिकासहित हें वन ॥ एकाचि बाणें खंडिलें ॥ ३४ ॥ ताटिकेच्या रक्तेंकरूनी ॥ असंभाव्य तेव्हां रंगली मेदिनी[26] ॥ देव दुंदुभी वाजविती गगनीं ॥ आला चापपाणी[27] सिद्धाश्रमा ॥ ३५ ॥ जैसे वर्षाकाळीं[28] गंगेचे पूर ॥ तैसे चहूंकडून धांवती ऋषीश्वर ॥ समस्तांसी वंदोनि रघुवीर ॥ भेटता जाहला ते काळीं ॥ ३६ ॥ यज्ञमंडप शास्त्रप्रमाण ॥ कुंड वेदिका भूमि साधोन ॥ चारही द्वारें अष्टकोन ॥ करिती साधून विप्रें[29] तेव्हां ॥ ३७ ॥ सकळ सामग्री सिद्ध करून ॥ आरंभिला महायज्ञ ॥ श्रीरामासी म्हणे गाधिनंदन[30] ॥ मखरक्षण करीं आतां ॥ ३८ ॥ तुवां ताटिका वधिली हा समाचार ॥ ऐकोन धांवतील रजनीचर ॥ मारीच सुबाहु भयंकर ॥ प्रळय थोर करितील ॥ ३९ ॥ यालागीं नरवीरपंचानना ॥ सांभाळीं चहूंकडे रघुनंदना ॥ परम कपटी राक्षस जाणा ॥ पर्वतशिळा टाकितील ॥ ४० ॥ श्रीराम म्हणे महाऋषी ॥ तुम्हीं चिंता न करावी मानसीं ॥ शिक्षा लावीन कृतांतासी[31] ॥ विघ्नें करूं आलिया ॥ ४१ ॥ ऐकोनि श्रीरामाचें वचन ॥ उल्हासलें ऋषीचें मन ॥ मग दीक्षाग्रहणें[32] गाधिनंदन ॥ आरंभ करी यज्ञासी ॥ ४२ ॥ जैसा चंद्र वेष्टित तारागणें[33] ॥ कीं मित्रा[34] भोंवतीं जैसीं किरणें ॥ तैसा ऋषिवेष्टित गाधिनंदन ॥

१९ ओळीनें. २० रक्तानें. २१ माखलेली. २२ जटाकलाप. २३ सरसावली. २४ रेलचेल. २५ धनुष्याच्या आरुछादनाची पिशवी, खोळ. २६ सूर्य. २७ रात्रीच्या शेवटीं. २८ धनुष्याची दोरी. २९ कानापर्यंत. ३० प्रळयकाळच्या विजेसारखा. ३१ पृथ्वी. ३२ श्रीराम. ३३ पावसाळ्यांत. ३४ ब्राह्मण. ३५ विश्वामित्र. ३६ काळास. ३७ यज्ञकंकण बांधून. ३८ नक्षत्रसमूहानें. ३९ सूर्याभोंवतीं.

कुंडासमीप विराजे ॥ ४३ ॥ ओंकारासहित स्वाहाकार ॥ अंवदानें टाकिती सत्वर ॥ उठला मंत्रांचा गजर ॥ वषट्कारघोष पैं ॥ ४४ ॥ तों अस्ता गेला वासरमणी ॥ दोन प्रहर जाहली रजनी ॥ पिशितांशन आले धांवोनी ॥ ताटिकेच्या कैवारें ॥ ४५ ॥ वीस कोटी रजनीचर ॥ मुख्य मारीच सुबाहु असुर ॥ सिद्धाश्रमासमीप सत्वर ॥ हांक फोडीत पातले ॥ ४६ ॥ हांक ऐकोनि दारुण ॥ भयभीत जाहले ब्राह्मण ॥ गळती हातींचीं अंवदानें ॥ वंदनीं बोबडी वळतसे ॥ ४७ ॥ म्हणती रक्षीं रक्षीं रघुनंदना ॥ नरवीरश्रेष्ठा गोविप्रपाळणा ॥ श्रीराम म्हणे वो ब्राह्मणा ॥ चिंता कांहीं न करावी ॥ ४८ ॥ तंव एक म्हणे ब्राह्मण ॥ रक्षणार राम आणि लक्ष्मण ॥ पर्वताकार राक्षस संपूर्ण ॥ वीस कोटी पातले ॥ ४९ ॥ एक द्वार हे दोघे रक्षिती ॥ दुज्या द्वारें राक्षस संचरती ॥ आतां कैसी होईल गती ॥ पळावया निश्चितीं ठाव नाहीं ॥ ५० ॥ विश्वामित्र म्हणे स्वस्थ करा मन ॥ मानव नव्हे रघुनंदन ॥ पुराणपुरुष आदिनारायण ॥ राक्षस वधावया अवतरला ॥ ५१ ॥ तों पर्वत आणि पाषाण ॥ यज्ञमंडपावरी पडती येऊन ॥ हांक फोडिती दारुण ॥ मग रघुनंदन काय करी ॥ ५२ ॥ कोदंड ओढून आकर्ण ॥ सोडी बाणांपाठीं बाण ॥ राक्षसांचीं शिरें कर चरण ॥ तटतटां तुटताती ॥ ५३ ॥ राक्षस परम अंतुर्बळी ॥ ज्यांहीं सुरांचे मुकुट पाडिले तळीं ॥ हांक देती अंतराळीं ॥ यज्ञमंडप वेढिला ॥ ५४ ॥ एक उडती अंबरीं ॥ प्रेतें टाकिती यज्ञकुंडावरी ॥ मग रघूत्तम अयोध्याविहारी ॥ सर्वद्वारीं व्यापला ॥ ५५ ॥ जिकडे तिकडे रघुनंदन ॥ चारही द्वारें अष्ट कोन ॥ अष्टदिशा व्यापोन ॥ सोडी बाण श्रीराम ॥ ५६ ॥ मंडपाचिया कळसावरी ॥ उभा राम कोदंडधारी ॥ बाणांचा पर्जन्य तये अवसरीं ॥ चहूंकडोनि पाडीतसे ॥ ५७ ॥ रामरूपें असंख्यात ॥ यागमंडपाभोंवतीं वेष्टित ॥ बाणांचे पूर वर्षत ॥ संहार होत असुरांचा ॥ ५८ ॥ मंडपावर आणि खालतें ॥ सर्व व्यापिलें रघुनाथें ॥ तीळ ठेवावयापुरतें ॥ रामाविण रितें स्थळ नसे ॥ ५९ ॥ तूणीरांतूनि किती निघती शर ॥ शेषासी त्याचा न कळे पार ॥ कीं लेखकापासूनि अक्षरें ॥ किती निघती कळेना ॥ ६० ॥ कीं मुखांतूनि शब्द निघती ॥ त्यांची जैसी न होय गणती ॥ कीं मेघधारा वर्षती ॥ नाहीं गणती तयांची ॥ ६१ ॥ कीं महाकवींची पद्यरचना ॥ किती जाहली हें कळेना ॥ कीं कुबेरभांडारींची गणना ॥ कदा न कळे कोणातें ॥ ६२ ॥ मेरुपाठारीं रत्नखाणी निश्चितीं ॥ त्यांतून रत्नें जैसीं निघती ॥ कीं पृथ्वीवरी तृणांकुर किती ॥ नाहीं गणती तयांची ॥ ६३ ॥ कीं शास्त्रसंमतें अनेकार्थ ॥ असंख्य करिती निपुण पंडित ॥ तैसा रामबाणांसी नाहीं अंत ॥ तूणीर निश्चित रिता नोहे ॥ ६४ ॥ मेघ समुद्रजळ प्राशितां ॥ परी तो रिता नोहे तत्त्वतां ॥ कीं विष्णुमहिमा वर्णितां ॥ न सरे सर्वथा कल्पांतीं ॥ ६५ ॥ तैसा उणा नोहेचि तूणीर ॥ कोट्यनुकोटी निघती शर ॥ करील राक्षसांचा संहार ॥ समरधीर श्रीराम ॥ ६६ ॥ जैसी जाहलिया प्रभात ॥ वृक्षींहूनि पक्षी उडती बहुत ॥ तैसीं राक्षसशिरें अकस्मात ॥

४० आहुत्या. ४१ सूर्य. ४२ मांस भक्षण करणारे राक्षस. ४३. रात्री फिरणारे, राक्षस. ४४ तोंडांत. ४५ शिरतात. ४६ ठिकाण. ४७ भयंकर. ४८ अतिबलाढ्य. ४९ अयोध्येत राहणारा. ५० मोकळें. ५१ भात्यांतून. ५२ पुष्कळ अर्थ. ५३ भाता. ५४ युद्धांत शूर. ५५ सकाळ.

आकाशपंथें उसळती ॥६७॥ वीस कोटी राक्षस देख ॥ एकला राम अयोध्यानायक ॥ परी ते मृगेंद्रावरी जंबुक ॥ अपार जैसे उठावले ॥६८॥ दंदेंशूक मिळोनि अपार ॥ धरूं आले खगेश्वर ॥ कीं प्रळयाग्नीवरी पतंगभार ॥ विझवावया झेंपावती ॥६९॥ कीं बहुत मिळून खद्योत ॥ धरून आणूं म्हणती आदित्य ॥ कीं शैलभ मिळोनि समस्त ॥ महामेरु उचलूं म्हणती ॥ ७० ॥ एकलाचि फरशधर ॥ परी अवनी केली निर्वीर ॥ एकले नृसिंहें संभार ॥ आटिले पूर्वी दैत्यांचे ॥ ७१ ॥ असो राक्षससिरांच्या लाखोल्या ॥ रामें भूलिंगासी समर्पिल्या ॥ मारीच सुबाहु ते वेळां ॥ गदा घेऊन धांविन्नले ॥ ७२ ॥ रामें काढिला निर्वाणबाण ॥ ज्या शरमुखीं दैवत सूर्यनारायण ॥ सुबाहूचा कंठ लक्षून ॥ केलें संधान राघवें ॥७३॥ जैसा विहंगम वेगेंकरून ॥ धांवे वृक्षाग्रींचें फळ लक्षून ॥ तैसा सवेग गेला बाण ॥ शिर उडविलें सुबाहूचें ॥७४॥ त्या बाणाचा पिसारा किंचित ॥ मारीचास लागला अकस्मात ॥ त्या शरवातें अद्भुत ॥ मारीच उडोनि गेला पैं ॥ ७५ ॥ कीं खगेश्वराच्या पक्षफडत्कारीं ॥ अचळ उडोनि जाय दिगंतरीं ॥ तैसा मारीच समुद्राभीतरी ॥ जाऊनियां पडियेला ॥ ७६ ॥ परम होऊनियां भ्रमित ॥ लंकेसी गेला धाकें पळत ॥ वाटे पाठीसी लागला रघुनाथ ॥ परतोनि पहात घडीघडी ॥७७॥ लंकेंत राक्षस प्रवेशोन ॥ रौक्षसेंद्रातें सांगे वर्तमान ॥ म्हणे मानव नव्हे रघुनंदन ॥ आदिपुरुष अवतरला ॥ ७८ ॥ अवघा ऐकोन वृत्तांत ॥ रावण दचकला मनांत ॥ जैसा सुपर्णाचा ऐकतां पुरुषार्थ ॥ सर्प बहुत संतापती ॥ ७९ ॥ कीं ऐकोन संतांचें स्तवन ॥ मनांत कष्टी होय दुर्जन ॥ कीं पतिव्रतेचा धर्म परिसोन ॥ व्यभिचारिणी विटती पैं ॥ ८० ॥ असो समस्त आटोनि रजनीचर ॥ सिद्धाश्रमीं रणरंगधीर ॥ रणमंडळीं रघुवीर ॥ एकला कैसा शोभला ॥ ८१ ॥ जैसें महाकल्पीं सर्व संहारे ॥ मग एकलें परब्रह्म उरे ॥ कीं समस्त लोपोनि नक्षत्रें ॥ एकला दिनकर उगवे जैसा ॥ ८२ ॥ कीं शुक्तिकेवेगळें मुक्ताफळ ॥ दिसे जैसें परम तेजाळ ॥ कीं प्रपंच त्यागोनि निर्मळ ॥ योगेश्वर विलसे जेवीं ॥ ८३ ॥ जैसे रात्र निरसतां उठती जन ॥ तैसे यज्ञमंडपांतूनि उठती ब्राह्मण ॥ भेटती रामास जाऊन ॥ ब्रह्मानंदेंकरोनियां ॥ ८४ ॥ जठरीं अन्नपाक होय वेगें ॥ परी गर्भास ढका न लागे ॥ कीं ज्ञानी वेष्टित तापत्रयभोगें ॥ परी अंतर न भंगे सर्वथा ॥ ८५ ॥ तैसे यज्ञमंडपासहित विप्र ॥ रघूत्तमें राक्षिले साचार ॥ पूर्ण जाहला मख समग्र ॥ श्रीरघुवीरप्रतापें ॥ ८६ ॥ विश्वामित्रासी नावरे प्रेमा ॥ म्हणे वत्सा माझिया श्रीरामा ॥ सहस्रवदनास तुझा महिमा ॥ न वर्णवेचि सर्वथा ॥ ८७ ॥ कौशिकासी म्हणती ऋषिजन ॥ श्रीराममूर्ति धाकुटी सगुण ॥ पर्वताकार राक्षस संहारून ॥ कैसे क्षणमात्रें टाकिले ॥ ८८ ॥ विश्वामित्र हास्यवदन ॥ ऋषींप्रति बोले वचन ॥ म्हणे आदित्यमंडळ दिसे लहान ॥ परी पृथ्वीभरी प्रकाश ॥ ८९ ॥ धाकुटा दिसे कैलशोद्भव ॥ उदरीं सांठविला जलार्णव ॥ कीं वामनरूप धरी केशव ॥ परी दोन पाउलें ब्रह्मांड केलें ॥ ९० ॥ दिसे इंद्राचें वज्र

५६ सिंहावर. ५७ कोल्हे. ५८ सर्प. ५९ पक्षिश्रेष्ठ गरुड. ६० काजवे. ६१ सूर्य. ६२ टोळ. ६३ परशुधर परशुराम. ६४ पृथ्वी. ६५ पक्षी. ६६ पर्वत. ६७ रावणाला. ६८ ऐकून. ६९ सूर्य. ७० शिरपल्याशिवाय. ७१ मोती. ७२ संपतां. ७३ वेढले गेले. ७४ आध्यात्मिक, आधिदैविक, आधिभौतिक ह्या तिन्हीं तापांनीं. ७५ मन, अंतःकरण. ७६ यज्ञ. ७७ शोधला. ७८ मारून. ७९ कुंभयोनि अगस्ति ऋषि. ८० समुद्र.

लहान ॥ परी पर्वताचें केलें चूर्ण ॥ पंडितहृदयीं बुद्धि सर्षपप्रमाण ॥ परी आब्रह्मभुवन व्यापिलें ॥ ९१ ॥ तैसा राम धाकुटा दिसे तुम्हां ॥ परी ब्रह्मादिकां नेणवे महिमा ॥ पुराणपुरुष हा परमात्मा ॥ भक्तरक्षणा अवतरला ॥ ९२ ॥ असो भूतावळी पातल्या तेथें ॥ त्यांहीं भक्षिलीं राक्षसप्रेतें ॥ यज्ञमंडपाभोंवतें ॥ शुद्ध केलें भूमंडळ ॥ ९३ ॥ तों आलें मिथिलेश्वराचें पत्र ॥ तें स्वयें वाची विश्वामित्र ॥ सवें घेऊन समस्त विप्र ॥ स्वयंवरालागीं येइंजे ॥ ९४ ॥ ते दिवशीं बहुत सोहळा ॥ सिद्धाश्रमीं कौशिकें केला ॥ ब्राह्मणभोजन जाहलिया सकळां ॥ वस्त्रें अलंकार दीधले ॥ ९५ ॥ जेथें साह्य श्रीराम आपण ॥ तेथें कांहीं न दिसे अपूर्ण ॥ बहुत दक्षिणा देऊनि ब्राह्मण ॥ विश्वामित्रें तोषविले ॥ ९६ ॥ असो तेव्हां जाहलिया रजनी ॥ कौशिक निजला स्वशयनीं ॥ पुढें रामलक्ष्मण घेउनी ॥ सुखेंकरून पहुडला ॥ ९७ ॥ साक्षात् शेषनारायण ॥ कौशिक निजला पुढें घेऊन ॥ निद्रा नव्हे ते समाधि पूर्ण ॥ उन्मनी ओंवाळून टाकावी ॥ ९८ ॥ हृदयीं न धरितां रघुनाथा ॥ शेजे निजती जे तत्त्वतां ॥ मज गमे ऐसें पाहतां ॥ कीं पशूच केवळ पडियेले ॥ ९९ ॥ रामस्मरणेंविण भोजन ॥ जैसें भस्मीं घातलें अवदान ॥ तें यज्ञपुरुषासी न अर्पण ॥ वृथा भोजन तैसें तें ॥ १०० ॥ रामप्राप्तीविण कर्म देख ॥ नाशिती कुशें मृत्तिका उदक ॥ तरी ते पिशाच नर ओळख ॥ भुलले मूर्ख जाणिजे ॥ १ ॥ श्रीरामप्राप्तीविण ज्ञान ॥ त्याचें नांव म्हणिजे अज्ञान ॥ विद्या तेचि अविद्या पूर्ण ॥ धर्म तो अधर्म जाणिजे ॥ २ ॥ असो धन्य भाग्य कौशिकाचें ॥ पुढें निधान श्रीवैकुंठींचें ॥ घेऊन पहुडला साचें ॥ नाहीं चिंतेचें वास्तव्य ॥ ३ ॥ निद्रा लागली जों ऋषीस निश्चिंतीं ॥ तों जागे जाहले दोघे दाशरथी ॥ श्रीराम म्हणे सौमित्राप्रती ॥ परियेसीं एक जिवलगा ॥ ४ ॥ आम्ही कधीं जाऊं अयोध्येसी ॥ पाहूं दशरथाचा वदनशशी ॥ बोलतां श्रीरामाचे नेत्रांसी ॥ अश्रु आले तेधवां ॥ ५ ॥ तों शयनीं जागा जाहला गाधिसुत ॥ दोघांच्या ऐशा गोष्टी ऐकत ॥ स्फुंदस्फुंदोनि बोले रघुनाथ ॥ श्रीदशरथ देखों कधीं ॥ ६ ॥ सकळ रायांचे मुगुट एकसरीं ॥ नमस्कारिती ते अवसरीं ॥ पडती दशरथाचे प्रपदावरी ॥ किरणीं पडलीं चरणीं तेणें ॥ ७ ॥ ते चरण मी कधीं देखेन ॥ दशरथाच्या पादुका घेऊन ॥ दिव्यरत्नीं मंडित पूर्ण ॥ मी उभा ठाकेन कधीं पुढें ॥ ८ ॥ जे अयोध्याप्रभूची पट्टराणी ॥ कौसल्या आमुची जननी ॥ ते अत्यंत कृश होउनी ॥ वाट पाहत असेल कीं ॥ ९ ॥ ऐसें विश्वामित्रें ऐकिलें ॥ उठोनि रामासी हृदयीं धरिलें ॥ म्हणे बा रे जनकाचें पत्र आलें ॥ उदयीं जाऊं मिथिलेसी ॥ ११० ॥ तेथें केवळ विजयश्री सीता ॥ ते तुज माळ घालील रघुनाथा ॥ कौसल्येसहित दशरथा ॥ तेथेंचि तुज भेटवीन ॥ ११ ॥ तूं जगद्गुरु श्रीरामचंद्र ॥ दाविसी लौकिक लीलाचरित्र ॥ असो उदयाचळीं प्रकटलें रविचक्र ॥ विप्र सारिती नित्यनेम ॥ १२ ॥ घेऊन ऋषीश्वरांचे संभार ॥ श्रीराम आणि सौमित्र ॥ निघता जाहला विश्वामित्र ॥ मिथिलापंथें ते काळीं ॥ १३ ॥

८१ मोहरीएवढी. ८२ भूतांच्या रांगा,-पंक्ति. ८३ जमीन. ८४ जनकाचें. ८५ विश्वामित्रानें. ८६ रात्र. ८७ पांचवी अवस्था. ८८ आहुति. ८९ वर्म. ९० रत्नठेवा. ९१ पेक. ९२ पादाग्रावर. ९३ घट्टे.

चरणचालीं ऋषी चालती ॥ म्हणोनि रथ टाकोनि रघुपती ॥ चरणीं चालतां हो जगती ॥ धन्य जाहलें म्हणतसे ॥ १४ ॥ दोन्ही बाहीं विश्वामित्र आणि सौमित्र ॥ मध्यें जगद्वंद्य राजीवनेत्र[९५] ॥ तो घनश्याम चारुगात्र ॥ कैसा शोभला ते काळीं ॥ १५ ॥ पूर्वी मंथोनिया क्षीरसागर ॥ निघाला जेव्हां क्षीराब्धिजावर[९६] ॥ ते वेळीं कमलोद्भव आणि उमावर[९७] ॥ दोन्ही भागीं शोभले जेवीं ॥ १६ ॥ कीं शशिमंडळा दोहींकडे लखलखित ॥ शोभती भृगुतनय अंगिरासुत[९८] ॥ कीं शंख चक्र विराजत ॥ श्रीविष्णूच्या दोन्ही भागीं ॥ १७ ॥ असो ऐसा चालतां रघुनाथ ॥ ऋषी आपुलाले आश्रम दावित ॥ ठायीं ठायीं बैसवूनि रघुनाथ ॥ पूजा करिती आदरें ॥ १८ ॥ समस्तांचा करीत उद्धार ॥ पुढें चालत जगदुद्धार ॥ तों पुढें प्रचंड शिळा दुर्धर ॥ दृष्टीं देखिली राघवें ॥ १९ ॥ तों श्रीरामचरणरज ते वेळे ॥ वायुसंगें पुढें धांविन्नले ॥ शिळेवरी जाऊन पडले ॥ नवल वर्तलें अद्भुत ॥ १२० ॥ अहल्येसी लाविला चरण ॥ ऐसी कथा वर्णिती कविजन ॥ तरी अहल्या ब्रह्मकन्या पूर्ण ॥ गौतमाची निजपत्नी ॥ २१ ॥ ब्राह्मणपत्नी ते महासती ॥ तियेतें पाय लावील रघुपती ॥ हें न घडे कल्पांतीं ॥ बरवें संतीं विचारिजे ॥ २२ ॥ असो चरणरजेंचि ते वेळां ॥ कांपों लागली प्रचंड शिळा ॥ विश्वामित्राप्रति घनसांवळा[९९] ॥ पुसता जाहला वृत्तांत ॥ २३ ॥ म्हणे ऋषि हें नवल वर्तत ॥ थरथरां शिळा कांपत ॥ जैसा चंद्रोदय हळुहळू होत ॥ तैसें दिव्य रूप दिसत स्त्रियेचें ॥ २४ ॥ परम शोभती विद्रुमाधर ॥ जे चंपकवर्ण सुकुमार ॥ उर्वशी रंभा म्हणती सुंदर ॥ परी इजवरोनि ओंवाळिजे ॥ २५ ॥ मस्तकींचे रुळती कबरीभार ॥ वल्कलें वेष्टित सुंदर ॥ मज वाटतें इंद्रादि सुरवर ॥ इचे पोटीं जन्मले ॥ २६ ॥ कीं हे आदिभवानी साचार ॥ आम्हांस आली हो समोर ॥ कीं हे कोणी ऋषिपत्नी सुंदर ॥ निद्रा धेऊन उठली पैं ॥ २७ ॥ कीं पडली होती मूर्च्छा येउनी ॥ कीं निघाली पाताळाहुनी ॥ कोणीं टाकिली वधोनी ॥ प्राण येऊन उठली आतां ॥ २८ ॥ कीं कोणीं केलें शासन ॥ बैसली होती रुसोन ॥ कीं तुमची तपश्चर्या संपूर्ण ॥ येणें रूपें आकारली ॥ २९ ॥ मग विश्वामित्र म्हणे राजीवनेत्रा ॥ हे ब्रह्मकन्या परम पवित्रा ॥ पतीनें शापितां मदनारिमित्रा[१००] ॥ शिळारूप जाहली हे ॥ १३० ॥ श्रीराम म्हणे महाऋषी ॥ अहल्या शिळा जाहली कैसी ॥ तो वृत्तांत मजपाशीं ॥ कृपा करोनि सांगिजे ॥ ३१ ॥ ऋषि म्हणे विरिंचीनें ब्रह्मांड रचिलें ॥ चित्र विचित्ररूप विस्तारिलें ॥ सकळांमाजी विशेष केलें ॥ अहल्येचें स्वरूप पैं ॥ ३२ ॥ देखोन परम सुंदर ॥ तीस मागों येती बहुत वर ॥ कमलोद्भवासी पडला विचार ॥ स्वयंवर थोर मांडिलें ॥ ३३ ॥ ब्रह्मा बोले मानसींचा पण ॥ दों प्रहरांत पृथ्वीची प्रदक्षिण ॥ करून येईल पुढें पूर्ण ॥ त्यासी देईन हे अहल्या ॥ ३४ ॥ ऐकोनि ऐसिया पणासी ॥ धांवों लागले देव ऋषी ॥ यक्ष गंधर्व तापसी ॥ पृथ्वीप्रदक्षिणेसी चालिले ॥ ३५ ॥ यांत अवघ्यांपुढें अमरपती ॥ ऐरावतारूढ धांवे शीघ्रगती ॥ इतर लोकपाळही धांवती ॥ वाहनीं बैसोनि आपुलाल्या ॥ ३६ ॥

९४ कमळनयन. ९५ घुसळावयास. ९६ लक्ष्मीपति, विष्णु. ९७ ब्रह्मदेव. ९८ शंकर. ९९ शुक्र. १०० गुरु. १ श्रीराम. २ पोंवळ्यासारखे ओंठ. ३ चांफ्यासारखी. ४ केशकलाप. ५ कमलनयना रामा. ६ शंकराच्या सख्या श्रीरामा.

एक उर्ध्वपंथें वेगें जाती ॥ एक समीरगती धावती ॥ एक मार्गी अडखळून पडती ॥ सवेंचि पळती उठोनियां ॥ ३७ ॥ तंव इकडे गौतम मुनी ॥ जान्हवीजीवनीं स्नान करूनी ॥ बाहेर येतां नयनीं ॥ द्विमुखी[8] कपिला देखिली ॥ ३८ ॥ तंव गायत्रीमंत्र जपोन ॥ विधियुक्त केल्या प्रदक्षिणा तीन ॥ नित्यकर्म अनुष्ठान ॥ गौतमें केलें सावकाश ॥ ३९ ॥ सत्यलोकास आला परतोन ॥ ज्ञानीं पाहे कमलासन ॥ तों पृथ्वीप्रदक्षिणा तीन ॥ करोनी आला गौतम मुनी ॥ १४० ॥ विधि[9] म्हणे धन्य जाहलें ॥ अहल्येचें भाग्य फळासी आलें ॥ तत्काळ दोघांसी लग्न लाविलें ॥ यथाविधि पाणिग्रहण ॥ ४१ ॥ तों अवघियांपुढें अमरपती[10] ॥ धांवत आला शीघ्रगती ॥ वधूवरें देखोनि चित्तीं ॥ परम क्रोध संचरला ॥ ४२ ॥ विरिंचीसी[11] म्हणे सहस्रनयन[12] ॥ वृद्धास केलें कन्यादान ॥ तूं असत्यनाथ पूर्ण ॥ कळों आलें येथोनि आम्हां ॥ ४३ ॥ स्रष्टा म्हणे वज्रधरासी[13] ॥ मज असत्य तूं किमर्थ म्हणसी ॥ येणें तीन प्रदक्षिणा केल्या पृथ्वीसी ॥ पाहें मानसीं विचारूनी ॥ ४४ ॥ विचार न करितां बोले वचन ॥ सज्जनासी ठेवी नसतें दूषण ॥ वेदवाणी मानी अप्रमाण ॥ शतमूर्खाहूनि मूर्ख तो ॥ ४५ ॥ असो इंद्रें द्वेष धरूनि मानसीं ॥ म्हणे एक वेळ भोगीन अहल्येसी ॥ परतोन गेला स्वस्थानासी ॥ खेद अत्यंत पावोनियां ॥ ४६ ॥ घेऊनियां अहल्येसी ॥ गौतम आला निजाश्रमासी ॥ बहुत क्रमिलें कालासी ॥ परी इंद्र अहर्निशीं जपतसे ॥ ४७ ॥ तंव आलें सूर्यग्रहण ॥ गौतम अहल्या स्नान करून ॥ ऋषि ध्यानीं बसला तल्लीन ॥ अहल्या परतोन घरा आली ॥ ४८ ॥ ब्रह्मकन्या[14] एकली गृहांत ॥ जाणोनि शक्र आला धांवत ॥ गौतमाचा वेष धरीत ॥ सतीलागीं भोगावया ॥ ४९ ॥ कपाटें[15] देवोन गृहांतरीं ॥ आंत बैसली ब्रह्मकुमारी ॥ तों हा कपटवेषधारी ॥ येऊन द्वारीं उभा ठाके ॥ १५० ॥ म्हणे अहल्ये धांव धांव झडकरी ॥ म्हणोन आंग टाकिलें धरणीवरी ॥ येरी धांवोन आली द्वारीं[16] ॥ हृदयीं धरी तयातें ॥ ५१ ॥ कापट्य नेणे महासती ॥ हृदयीं निर्मळ जैसी भागीरथी ॥ परम खेद करी चित्तीं ॥ नयनीं वाहत अश्रुपात ॥ ५२ ॥ अहल्येनें वेगें उचलिला ॥ नेऊन मंचकावरी[17] पहुडविला ॥ म्हणे प्रिये प्राण चालला ॥ अंगसंग देईं वेगें ॥ ५३ ॥ येरी म्हणे स्वामी आजि ग्रहण ॥ माध्यान्हास आला चंडकिरण[18] ॥ महाराज तुम्ही शास्त्रज्ञ पूर्ण ॥ विचारून पाहावें ॥ ५४ ॥ येरू म्हणे तुज शास्त्रासीं काय कारण ॥ माझें वचन तुज प्रमाण ॥ तंव ते सतीशिरोरत्न ॥ अवश्य म्हणे ते काळीं ॥ ५५ ॥ अहल्या इंद्र दोघांजणीं ॥ शयन केलें एके शयनीं ॥ तंव गौतम नित्यनेम सारूनी ॥ आश्रमासी पातला ॥ ५६ ॥ म्हणे अहल्ये उघडीं वो द्वार ॥ येरी घाबरी सांवरी वस्त्र ॥ म्हणे तूं कोण रे दुराचार ॥ तो म्हणे अमरेंद्र[19] जाण मी ॥ ५७ ॥ म्हणे रे अपवित्रा काय केलें ॥ श्रोत्रियांचें[20] पात्र कां स्पर्शिलें ॥ तुझें थोरपण दग्ध झालें ॥ कर्म केलें विपरीत ॥ ५८ ॥ राति जाहली कीं परिपूर्ण ॥ वेगीं जाय तूं येथून ॥ मग अहल्या कपाट[21] उघडी धांवोन ॥

७ गंगाजळीं. ८ प्रसूत होत असतां वत्साचें मुख दिसत आहे अशी काळी गाय. ९ ब्रह्मदेव. १० इंद्र. ११ ब्रह्मदेवाला. १२ अहल्या. १३ वज्र लावून. १४ पलंगावर. १५ सूर्य. १६ वेदवेत्या ब्राह्मणाचें. १७ द्वार.

तंव गौतम दृष्टीं देखिला ॥ ५९ ॥ अहल्येस ऋषि कैसा भासला ॥ कीं कल्पांतींचा सूर्य प्रगटला ॥ कीं अपर्णावर कोपला ॥ तृतीय नेत्र उघडोनियां ॥ १६० ॥ तों इंद्र पळतां शापिलें वेगें ॥ तुझें अंगीं होतील सहस्र भगें ॥ नपुंसक होऊन वागें ॥ परदारिया पतिता तूं ॥ ६१ ॥ तंव ते अहल्या कामिनी ॥ थरथरां कांपे ऋषीस देखोनी ॥ जैसी महावातें कमळिणी ॥ उलथोन पडों पाहे कीं ॥ ६२ ॥ ग्रहणीं काळवंडे वासरमणी ॥ तैसी मुखींची कळा गेली उतरोनी ॥ परम कोपायमान मुनी ॥ अहल्येस शापीत ॥ ६३ ॥ हो तुझें शरीर शिळावत ॥ जड होऊन पडो अरण्यांत ॥ साठ सहस्रवर्षेपर्यंत ॥ राहें मूर्च्छित होऊनियां ॥ ६४ ॥ शाप ऐकतांच लवलाहें ॥ धांवोनि धरी ऋषीचे पाये ॥ म्हणे महाराजा विचारूनि पाहें ॥ कापट्य केलें चांडाळें ॥ ६५ ॥ जाणोनियां पाकशासन ॥ जरी म्यां दिधलें असेल भोगदान ॥ तरी माझें शरीर हो शतचूर्ण ॥ ठकविलें पूर्ण पतितानें ॥ ६६ ॥ ऋषी म्हणे तुवां जाणोन ॥ शापिला नाहीं पाकशासन ॥ रति झाली कीं परिपूर्ण ॥ जाय म्हणोन बोललीस ॥ ६७ ॥ येरी म्हणे नेणोनि घडलें पाप ॥ मज उपजला पश्चात्ताप ॥ तपोनिधि पुण्यरूप ॥ देईं उश्शाप सर्वथा ॥ ६८ ॥ अहल्या परम दीनवदन ॥ नेत्रीं वाहे अश्रुजीवन ॥ द्रवलें गौतमाचें मन ॥ काय वचन बोलिला ॥ ६९ ॥ म्हणे रविकुळीं अवतरेल नारायण ॥ कौसल्यात्मज रघुनंदन ॥ त्याच्या पदरजप्रतापेंकरून ॥ उद्धरोन मज पावसी ॥ १७० ॥ आतां होईं तूं चंडशिळा ॥ जड पाषाण परम सबळा ॥ वचन ऐकतांचि तत्काळा ॥ अहल्या मूर्च्छित पडियेली ॥ ७१ ॥ शरीर पडलें अचेतन ॥ अंग सर्व जाहलें पाषाण ॥ केश नेत्र नासिका स्तन ॥ जाहलें कठिनरूप तेव्हां ॥ ७२ ॥ प्राण गोळा होऊनि समस्त ॥ आकर्षोनि राहिली गुप्त ॥ गौतम आपुले दृष्टीं पाहत ॥ पाषाणवत अहल्या ॥ ७३ ॥ मग आठवूनि अहल्येचे गुण ॥ गौतमासी आलें रुदन ॥ म्हणे अहल्येऐसें गुणनिधान ॥ कैसें टाकून जाऊं मी ॥ ७४ ॥ तीस नेणोन घडलें पाप ॥ म्यां तर दिधला दीर्घ शाप ॥ आतां करावया जाईन तप ॥ इजसमीप कोणी नाहीं ॥ ७५ ॥ येथें सर्प व्याघ्रादि जीवजाती ॥ ईस शिळा देखोनि पीडा करिती ॥ चंपकेकळिका अहल्या सती ॥ परम खेद पावेल ॥ ७६ ॥ मग ऋषी शाप देत वनासी ॥ जे जीवमात्र येतील अहल्येपाशीं ॥ ते गतप्राण होतील निश्चयेसीं ॥ कोणीं शिळेसी न पाहावें ॥ ७७ ॥ ऐसें ऐकतां शापवचन ॥ एक वृक्ष वेगळे करून ॥ पिपीलिकादि गज व्याघ्र संपूर्ण ॥ गेले पळून ते काळीं ॥ ७८ ॥ मग महाऋषि गौतम ॥ सतीचा खेद करी परम ॥ पावला तो बद्रिकाश्रम ॥ अनुष्ठान करीत बैसला ॥ ७९ ॥ म्हणे कामें नाडिला पाकशासन ॥ मज क्रोधें नागविलें पूर्ण ॥ इंद्र अहल्येसी शापितां जाण ॥ तपक्षय जाहला ॥ १८० ॥ इकडे मयूर होऊन अरण्यांत ॥ अनुतापें हिंडे रुदन करीत ॥ मग समस्त देवीं अमरेनाथ ॥ गौतमापाशीं आणला ॥ ८१ ॥ सुरवरीं बहुत प्रार्थून ॥ केलें इंद्राचें शापमोचन ॥ गौतम बोले प्रसन्नवदन ॥ सहस्र-

१८ प्रळयींचा. १९ पार्वतीपति शंकर. २० काळा होतो. २१ सूर्य. २२ इंद्र. २३ चांफ्याची कळी. २४ कोणतेही प्राणी. २५ मरतील. २६ मुंग्या वगैरे. २७ मोर.

नयन तूं होशील ॥ ८२ ॥ शक्र सहस्रनेत्र जाहला ॥ निजपदा तत्काळ पावला ॥ तैंपासोन हे अहल्या शिळा ॥ आजवरी जाहली होती ॥ ८३ ॥ रामा तुझे पडतां चरणरज[२८] ॥ अहल्या दिव्यरूप जाहली सहज ॥ श्रीरामा पहावया तुज ॥ सजीव सतेज जाहली ॥ ८४ ॥ कौशिकें[२९] सांगतां हें पूर्वकथन ॥ आश्चर्य करी रघुनंदन ॥ कौशिकासी प्रतिवचन ॥ काय बोलता जाहला ॥ ८५ ॥ म्यां काय केलें असे आचरण ॥ माझ्या पदरजें उद्धरे पाषाण ॥ कौशिक म्हणे तुझे चरण ॥ त्यांचें वैभव रामा हें ॥ ८६ ॥ असो रघुवीर तये काळीं ॥ ऋषिसहित आला तियेजवळी ॥ पदर सांवरूनि उठली ॥ अहल्यादेवी तेधवां ॥ ८७ ॥ मस्तकींचे मोकळे कैंबरी[३०]-भार ॥ सांवरोनि वीरगुंठी[३१] बांधी सत्वर ॥ नेत्रीं न्याहाळित रघुवीर ॥ विधिसुता[३२] समोर पातली ॥ ८८ ॥ जो दशरथाचा महत्पुण्य-मेरु ॥ जो कां लावण्यामृतसागरु ॥ जो जगद्वंद्य जगद्गुरु ॥ अहल्येनें देखिला ॥ ८९ ॥ जो मृडानीपतीचें[३३] हृदयरत्न ॥ जो इंद्रादि देवांचें देवतार्चन ॥ जो जैलजोद्भवाचें[३४] ध्येय पूर्ण ॥ नारदादिकांचें गुह्य जें ॥ ९० ॥ जे सनकादिकांची आराध्य मूर्ती ॥ चौरी[३५] सोही[३६] वर्णिती ज्याची कीर्ती ॥ तो नेत्रीं देखिला रघुपती ॥ प्रेम चित्तीं न समाये ॥ ९१ ॥ अष्टभावें दाटोन ब्रह्मकन्या[३७] ॥ साष्टांग नमी राजीव-नयना ॥ तों श्रीराम बोले सुवचना ॥ माते ऊठ झडकरी ॥ ९२ ॥ ऐसें ऐकतां ते वेळीं ॥ कमलोद्भवकन्या ऊठली ॥ जैसी कोकिळा गर्जे वसंतकाळीं ॥ तैसी स्तवन करीतसे ॥ ९३ ॥ म्हणे जय जय रामा करुणासमुद्रा ॥ हे दाशरथे प्रतापरुद्रा ॥ हे जगद्गुरो श्रीराम-चंद्रा ॥ मज चकोरालागीं उदय तुझा ॥ ९४ ॥ हे राघवा पुराणपुरुषा ॥ हे जगत्पालका अनंतवेषा ॥ हे कौसल्यात्मजा चंडांशो[३८] ॥ निरसली निशा तव उदयीं ॥ ९५ ॥ हे विद्वज्जनमानसमांदुसरत्ना[३९] ॥ हे ताटिकांतक नरवीरपंचानना ॥ तुझ्या नामप्रतापाची ऐकतां गर्जना ॥ पापवारणा[४०] संहार ॥ ९६ ॥ श्रीरामा तूं भवरोगवैद्य सुजाण ॥ मात्रा देऊन निजचरणरेण ॥ दोषक्षयरोग दवडोन ॥ अक्षय केलें मजलागीं ॥ ९७ ॥ साठ सहस्रवर्षेंपर्यंत ॥ अहंदेहभूतें झडपिलें यथार्थ ॥ तूं पंचाक्षरी रघुनाथ ॥ भूतें समस्त पळालीं ॥ ९८ ॥ साठ सहस्र वर्षेंवरी ॥ जळतां चिंतेच्या वणव्याभीतरी ॥ तूं मेघ वर्षतां झडकरी ॥ आजि पूर्ण निवाल्यें ॥ ९९ ॥ माझ्या कुरळकेशें-करून ॥ राघवा झाडीन तुझे चरण ॥ तुजवरून ओंवाळून ॥ काया टाकीन माझी हे ॥ २०० ॥ असो गौतम पाहे ज्ञानीं ॥ तों उद्ध-रली आपुली कामिनी ॥ तत्काळ उभा ठाकला येऊनी ॥ वंदी चापपाणी तयातें ॥ १ ॥ श्रीराम उगवतां दिनमणी ॥ हीं चक्रवाकें मिळालीं दोन्ही ॥ असो सकळ ऋषि मिळोनी ॥ शेंसें भरिती उभयतांची ॥ २ ॥ अहल्या म्हणे हो श्रीरामा ॥ तुज अनंत कल्याण हो सर्वोत्तमा ॥ हिमनगजामातमनविश्रामा[४१] ॥ पूर्णब्रह्मा परात्परा ॥ ३ ॥ श्रीरामा सीता स्वयंवरीं ॥ तुजचि प्राप्त होईल ते नोवरी ॥

---

२८ पायांना लागलेल्या धुळीचे कण. २९ विश्वामित्रानें. ३० केशकलाप. ३१ गांठ. ३२ अहल्या. ३३ पार्वतीपती शंकराचें. ३४ ब्रह्मदेवाचें. ३५ चार वेद. ३६ साहा शास्त्रें. ३७ सूर्या. ३८ विद्वानांच्या मनोरूपी पेटींतलें रत्न. ३९ पापरूप हत्तीचा. ४० मंगलतिलक करणें. ४१ शिवाच्या मनाचें विश्रांतिस्थान अशा.

तुजवांचोनि आणिकास न वरी ॥ तुजचि वरी निर्धारें ॥ ४ ॥ अहल्या गौतम दोघांजणीं ॥ निजाश्रमीं पूजिला चापपाणी ॥ पुढें श्रीराम आज्ञा घेउनी ॥ मिथिलेजवळी पातले ॥ ५ ॥ शतानंद पुत्र अहल्येचा ॥ तो होय पुरोहित जनकाचा ॥ संग धरोनि श्रीरामाचा ॥ तोही निघाला ते वेळीं ॥ ६ ॥ मिथिलेबाहेर उपवनांत ॥ ऋषीसहित राहिला रघुनाथ ॥ तों नगरांतून आली मात ॥ स्वयंवरपणाची तेधवां ॥ ७ ॥ उमाकांतार्चे चाप दारुण ॥ त्यास जो बळिया वाहील गुण ॥ त्यास जानकीपाणिग्रहण ॥ हाचि पण स्वयंवरीं ॥ ८ ॥ श्रीराम म्हणे विश्वामित्रासी ॥ जानकी जन्म पावली कैसी ॥ पण केला धनुष्यासी ॥ तरी तें चाप कोणार्चे ॥ ९ ॥ कौशिकें सांगे पूर्वकथन ॥ पूर्वी राजा पद्माक्ष जाण ॥ तेणें कमला करून प्रसन्न ॥ हेंचि वरदान मागीतलें ॥ २१० ॥ कीं माझी कन्या होऊन घरीं ॥ खेळें माझिये अंकावरी ॥ मग ते वैकुंठपतीची अंतुरी ॥ काय बोले तेधवां ॥ ११ ॥ मी येतां तुझिया मंदिरा ॥ बरें तुज नव्हे नृपवरा ॥ नसतीं विघ्नें येतील घरा ॥ विचार बरवा नव्हे हा ॥ १२ ॥ नृप म्हणे निश्चयें माझे अंतरीं ॥ माते तूं होय माझी कुमरी ॥ इंदिरा म्हणे स्वामी मुरारी ॥ तया आधीन मी असें ॥ १३ ॥ मग प्रसन्न करून श्रीधर ॥ राजा पद्माक्ष मागे वर ॥ मज कन्या रमा देईं साचार ॥ ऐकतां मुरहर हांसिन्नला ॥ १४ ॥ मग मौतुलिंग फळ दिधलें ॥ तें रायें घरीं नवमास ठेविलें ॥ त्यांतून कन्यारत्न निघालें ॥ तेज प्रकटलें असंभाव्य ॥ १५ ॥ वाढतां वाढतां जाहली उपवर ॥ तीस मागों येती बहुत वर ॥ पद्माक्षासी सुख अपार ॥ कन्या सुंदर देखोनि ॥ १६ ॥ ऋषिगण गंधर्व नृपवर ॥ यक्ष चारण विद्याधर ॥ एक-वटले समग्र ॥ पद्माक्षाचे मंदिरीं ॥ १७ ॥ म्हणे पण करीं एक लागवेगीं ॥ कोप चढला पद्माक्षालागीं ॥ म्हणे नेंभसुनीळता जयाचे अंगीं ॥ त्यास कन्या देईन हे ॥ १८ ॥ ऐकोनि सर्वही कोपले ॥ म्हणती काय रे मिथ्या बोले ॥ एकसरिसे वीर खवळले ॥ युद्ध मांडलें असंभाव्य ॥ १९ ॥ अवघ्यां राजयांसीं एकला ॥ पद्माक्ष सप्तदिनें भांडला ॥ शेवटीं सर्वी मिळोनि मारिला ॥ पद्माक्षरावो रणामाजी ॥ २२० ॥ तों पद्माक्षी ते वेळीं ॥ अग्निकुंडीं गुप्त जाहली ॥ पद्माक्षाची संपदा लुटिली ॥ ग्राम विध्वंसूनि सर्व गेले ॥ २१ ॥ तया ब्रह्मारण्यामाझारी ॥ पद्माक्षी निघाली कुंडाबाहेरी ॥ रावण विमानारूढ ते अवसरी ॥ लावण्यसुंदरी देखिली ॥ २२ ॥ देखोन सौंदर्यरूपडें ॥ रावणाची उडी पडे ॥ येरी यज्ञकुंडामाजी दडे ॥ रावणें कुंड विझविलें ॥ २३ ॥ तेथें खणितां बहुत यत्नें ॥ त्यासी सांपडलीं पांच रत्नें ॥ घरा आणिलीं दशाननें ॥ संदुकेमाजी ठेविलीं ॥ २४ ॥ मग एकांतींचें अवसरीं ॥ रावण सांगे मंदोदरी ॥ अमोल रत्नें पृथ्वीवरी ॥ तुजलागीं सुंदरी आणिलीं ॥ २५ ॥ धांवोनि मंदोदरी उचली पेटी ॥ तंव न ढळेचि तिये गोरटी ॥ हांसोन दशवक्त्र शेवटीं ॥ आपण उठे उचलावया ॥ २६ ॥ तंव ती न ढळेचि विसां करीं ॥ आश्चर्य झालें ते अवसरीं ॥ प्रधान

४२ शंकराचें. ४३ विश्वामित्र. ४४ लक्ष्मी. ४५ मांडीवर. ४६ विष्णूची. ४७ पत्नी लक्ष्मी. ४८ विष्णु. ४९ माहाळुंग. ५० आकाशासारखा वर्ण. ५१ सात दिवस. ५२ संपत्ती. ५३ पेटींत. ५४ दशमुख.

आणि मंदोदरी ॥ पेटी उघडिती तेधवां ॥ २७ ॥ तंव षण्मासांचें कन्यारत्न ॥ देखता होय दशानन ॥ मंदोदरी म्हणे हें विघ्न ॥ राया घरासी आणिलें ॥ २८ ॥ जो मायेवरणावेगळा ॥ चैतन्यदेही घनसांवळा ॥ त्यासीच हे घालील माळा ॥ इतरां ज्वाळा अमीची हे ॥ २९ ॥ इनें निर्दाळिलीं पद्माक्ष नृपवर ॥ बहुत रायांचा केला संहार ॥ ही येथें असतां साचार ॥ लंकापुर नुरेचि ॥ २३० ॥ दशानना हें परम विघ्न ॥ इजसी आधीं बाहेर घालीं नेऊन ॥ मग बोलाविले सेवकजन ॥ संदुकें मस्तकीं दीधली ॥ ३१ ॥ पेटी उचलिली ते अवसरीं ॥ हळूच आंतून शब्द करी ॥ मी आणिक येईन लंकापुरीं ॥ रावण सहपरिवारीं वधावया ॥ ३२ ॥ ऐकोनियां ऐसें वचन ॥ रावणाचें दचकलें मन ॥ म्हणे इचा आतां वध करीन ॥ मयजा चरण धरी मग ॥ ३३ ॥ चरणीं दृढ ठेवोनि माथा ॥ म्हणे पुढील विघ्नें आतांचि कां आणितां ॥ मग शांत केलें पौलस्तिसुंता ॥ सकळीं मिळूनि तेधवां ॥ ३४ ॥ रावण सांगे सेवकांसी ॥ जनकराजा आहे मिथिलेसी ॥ त्याचिया गांवावरी हे विवेंसी ॥ धाडी नेऊन घाला रे ॥ ३५ ॥ मग रातोरातीं तत्काळीं ॥ पेटी पुरिली मिथिलेजवळी ॥ तें शेत कोणे एके काळीं ॥ जनकें ब्राह्मणासी दीधलें ॥ ३६ ॥ पद्माक्ष नृप पूर्वीचा पूर्ण ॥ पुन्हां अवतरला तो ब्राह्मण ॥ रायें वेदवक्ता म्हणोन ॥ क्षेत्रदान दीधलें ॥ ३७ ॥ मुमुहूर्त पाहोनि सुंदर ॥ ब्राह्मणें जुंपिला नांगर ॥ नांगरदांतीं परिकर ॥ पेटी अकस्मात लागली ॥ ३८ ॥ ब्राह्मण सत्य सन्मार्गी ॥ पेटी उचलिली लागवेगीं ॥ मग दाखविली जनकालागीं ॥ म्हणे राया ठेवणें घेईं आपुलें ॥ ३९ ॥ राव म्हणे काय आहे भीतरी ॥ विप्र म्हणे मी नेणें निर्धारीं ॥ जनकराजा आश्चर्य करी ॥ पेटी उघडिली तेधवां ॥ २४० ॥ भोंवते प्रधान पाहती सकळी ॥ तों पांच वर्षांची कन्या देखिली ॥ असंभाव्य प्रभा पडली ॥ आश्चर्य वाटलें सकळिकां ॥ ४१ ॥ जनकास उपजला स्नेहो ॥ म्हणे स्वामी हें कन्यारत्न मज द्या हो ॥ ब्राह्मण म्हणे महाबाहो ॥ तुझीच कन्या हे निर्धारें ॥ ४२ ॥ ऐसी ते जनकात्मजा सुंदर ॥ सकळ सौंदर्याचें माहेर ॥ जनकरायासी सुख अपार ॥ म्हणे इंदिरा साचार आली हे ॥ ४३ ॥ एकवीस वेळां निःक्षत्री ॥ परशुरामें केली धरित्री ॥ सहस्रार्जुन वधोनि क्षणमात्रीं ॥ सूड घेतला रेणुकेचा ॥ ४४ ॥ त्र्यंबकधनुष्य घेऊन हातीं ॥ आला जनकाचे गृहाप्रती ॥ षोडशोपचारें जनक नृपती ॥ भार्गवरामासी पूजीतसे ॥ ४५ ॥ भोजनासी बैसले गृहांतरीं ॥ शिवधनुष्य ठेवूनि बाहेरी ॥ तों जानकीनें ते अवसरीं ॥ घोडें केलें धनुष्याचें ॥ ४६ ॥ परशुराम भोजन करूनी ॥ सभेंत बैसला येवोनी ॥ तों कोदंडें न दिसे नयनीं ॥ भार्गव मनीं क्षोभला ॥ ४७ ॥ म्हणे गर्जेभारीं न लोटे धनुष्य ॥ त्याचा कोणीं केला अभिलाष ॥ परशुराम आणि मिथिलेश ॥ द्वाराबाहेर जों आले ॥ ४८ ॥ तों कोदंडाचें घोडें करूनी ॥ ज्यां ज्यां म्हणोनि ओढी मेदिनीं ॥ परशुरामें तें देखोनी ॥ अंगुळी वदनीं घातली ॥ ४९ ॥ पिता देखोनि जनकेंबाळी ॥ कोदंड सांडो-

५५ सहा महिन्यांचें. ५६ मायातीत. ५७ मारला. ५८ पेटी. ५९ मयकन्या. ६० रावणाला. ६१ पिशाची. ६२ लक्ष्मी. ६३ धनुष्य. ६४ हत्तींच्या समुदायानें. ६५ जमिनीवर. ६६ मुखामध्यें. ६७ सीता.

नियां पळाली ॥ धनुष्य पडलें ते स्थळीं ॥ तें न ढळेचि कवणातें ॥ २५० ॥ वीर लाविले प्रचंड ॥ परी नुचलेचि कोदंड ॥ भार्गव म्हणे हें वितंडें ॥ सीतेवेगळें उचलेना ॥ ५१ ॥ मग जनक म्हणे कुमारी ॥ मागुती चापाचें घोडें करीं ॥ सीतेनें बैसोनि झडकरी ॥ पूर्वस्थळासी आणिलें ॥ ५२ ॥ मग बोले फरशींधर ॥ आमुचें अवतारकृत्य जाहलें समग्र ॥ मग तेथें धनुष्य ठेवून साचार ॥ जनकाप्रति बोलतसे ॥ ५३ ॥ आतां राया हाचि पण ॥ जो या धनुष्या वाहीलें गुण ॥ त्यासी सीतेसीं पाणिग्रहणें ॥ हा तूं पण करीं मिथिलेशा ॥ ५४ ॥ ऐसें सांगोन जनकासी ॥ भार्गव गेला बदरिकाश्रमासी ॥ विश्वामित्र सांगे श्रीरामासी ॥ पूर्वकथा ऐसी हे ॥ ५५ ॥ कौशिक म्हणे श्रीरामा ऐकें ॥ तुझें चरित्र तुज ठाउकें ॥ परी बोलविसी आमुच्या मुखें ॥ जाणोनियां सर्वही ॥ ५६ ॥ रामविजय ग्रंथ सुंदर ॥ पुढें अष्टमाध्यायीं सीतास्वयंवर ॥ जेथें श्रीराम विजयी साचार ॥ त्याविण आणिका न वरीच ॥ ५७ ॥ ब्रह्मानंदा रघुवीरा ॥ कमलोद्भवजनका श्रीधरवरा ॥ पुराणपुरुषा परात्परा ॥ अक्षय कीर्तन दे तुझें ॥ ५८ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत श्रोते चतुर ॥ सप्तमाध्याय गोड हा ॥ २५९ ॥ ॥ अध्याय ॥ ७ ॥ ॥ ओंव्या ॥ २५९ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

६८ परशुराम. ६९ मवाडव्य. ७० परशुराम. ७१ दोरी चढवील. ७२ विवाह.


गोलिवडेकर.

॥ श्रीगणेशाय नमः ॥ धन्य धन्य तुम्ही संतसज्जन ॥ राममहिमार्णवींचे मीन[1] ॥ त्यांतील अनुभवमुक्तें[2] पूर्ण ॥ दृश्यमान सर्व तुम्ही ॥ १ ॥ राजभांडारींचीं रत्नें बहुत ॥ तीं भांडारियासी ठाउकीं समस्त ॥ कीं मित्रप्रभेचा अंत अद्भुत ॥ अरुण एक जाणे पैं ॥ २ ॥ कीं पृथ्वीचें किती वजन ॥ हें भोगींद्रें जाणे संपूर्ण ॥ कीं आकाशाचें थोरपण ॥ एक प्रभंजन[3] जाणतसे ॥ ३ ॥ कवीची पद्यरचना किती ॥ हें एक जाणे सरस्वती ॥ चंद्रामृत वानिजे बहुतीं ॥ परी महिमा जाणती चकोर ॥ ४ ॥ कीं प्रेमळ कळा गोड बहुत ॥ हें एक जाणती भोळे भक्त ॥ कीं श्रीरामकथेचा प्रांत ॥ वाल्मीक मुनि जाणतसे ॥ ५ ॥ रामनामाचा महिमा अद्भुत ॥ एक जाणे कैलासनाथ ॥ कीं चरणरजाचा प्रताप बहुत ॥ विरिंचितनया[4] जाणे पैं ॥ ६ ॥ म्हणोन कथा हे गोड बहुत ॥ येथींचा सुरस सेविती संत ॥ असो सप्तमाध्यायीं गतकथार्थ ॥ राम मिथिलेसमीप राहिला ॥ ७ ॥ देशोदेशींचे जे कां नृप ॥ त्यांसी मूळ धाडी मिथिलाधिप ॥ पृतनेसंहित अमूप ॥ राजे लवलाहीं पातले ॥ ८ ॥ मूळ धाडिलें दशरथा ॥ परी तो न येचि सर्वथा ॥ कौशिक घेऊनि गेला रघुनाथा ॥ वियोगव्यथा थोर त्यासी ॥ ९ ॥ माझे कुमर दोघे जण ॥ कौशिक गेला असे घेऊन ॥ माझिया श्रीरामाचें वदन ॥ कैं मी देखेन पूढती ॥ १० ॥ या वियोगानलेंकरून ॥ श्रावणारि[5] आहाळे[6] रात्रंदिन ॥ मिथिलेसी न यावया पूर्ण ॥ हेंचि कारण जाणिजे ॥ ११ ॥ इकडे ऋषींसहित कौशिक[7] ॥ आला ऐकोन राव जनक ॥ नगराबाहेर तात्काळिक ॥ सामोरा आला समारंभें ॥ १२ ॥ मूर्तिमंत सूर्यनारायण ॥ ऐसा एक एक दिव्य ब्राह्मण ॥ देखतां जनकें लोटांगण ॥ समस्तांसी घातलें ॥ १३ ॥ जनक म्हणे भाग्य अद्भुत ॥ जैं घरा आले साधुसंत ॥ आजि मी जहालों पुनीत ॥ पूर्वपुण्य फळासी आलें ॥ १४ ॥ नृप सादर पाहे विलोकून ॥ म्हणे श्यामसुंदर दोघे जण ॥ कौशिका हे कोणाचे कोण ॥ सुकुमार सगुण आणिले ॥ १५ ॥ कीं शशी आणि चंडकिरण ॥ कीं वाचस्पति[8] आणि सहस्रनयन[9] ॥ कीं रमापति उमापति दोघे जण ॥ सुवेष धरोनि पातले ॥ १६ ॥ वाटे यांचिया स्वरूपावरून ॥ कोट्यनुकोटी मीनकेतन[10] ॥ टाकावे कुरवंडी करून ॥ पाहतां मन उन्मन होय ॥ १७ ॥ जनकासी म्हणे विश्वामित्र ॥ हे राया दशरथाचे पुत्र ॥ यांचें वर्णावया चरित्र ॥ सहस्रवक्त्रांसी[11] शक्ति नोहे ॥ १८ ॥ येणें मार्गीं ताटिका वधून ॥ सिद्धीस पाविला माझा यज्ञ ॥ वीस कोटी पिशितांशन[12] ॥ सुबाहुसहित मारिले ॥ १९ ॥ मार्गीं चरणरजेंकरूनी ॥ उद्धरिली गौतमसिजोद्भववनंदिनी ॥ हरकोदंडें[13] पहावें नयनीं ॥ म्हणोनि येथें पातले ॥ २० ॥ साक्षात् शेषनारायण ॥ राया तुवां न करितां प्रयत्न ॥ घरा आले मूर्तिविण ॥ सभाग्य पूर्ण तूं एक ॥ २१ ॥ अवचितां जैसा निधि भेटला ॥ चिंतामणि येऊन पुढें पडला ॥ कीं कल्पद्रम स्वयें आला ॥ गृह शोधीत दुर्बळाचें ॥ २२ ॥ कीं निद्रिस्थाचे मुखांत ॥ अकस्मात पडलें अमृत ॥ कीं क्षुधितापुढें घांवत ॥ क्षीरसिंधु पातला ॥ २३ ॥ कीं शास्त्राभ्यासावांचून ॥ भाग्यें जाहलें अपरोक्ष-

१ राममाहात्म्यरूपी समुद्रांतील मासे. २ मोत्यें. ३ वजीमदारास. ४ सूर्याच्या तेजाचा. ५ शेष. ६ वायु. ७ अहल्या. ८ आमंत्रण. ९ सेनेसह. १० विरहाग्नीनें. ११ दशरथ. १२ सुके, करपे. १३ विश्वामित्र. १४ बृहस्पति. १५ इंद्र. १६ मदन. १७ शेषाला. १८ राक्षस. १९ शिवधनुष्य. २० तत्त्वज्ञान.

ज्ञान ॥ कीं मृत्तिका खणितां निधान ॥ अकस्मात लागलें ॥ २४ ॥ जें भाग्योदयें होय नृपती ॥ तरी घरींच्या दासी सिद्धि होती ॥ कल्पिलें फळ तत्काळ देती ॥ आंगणींचे वृक्ष जे कां ॥ २५ ॥ हातीं कांचमणि धरितां ॥ तो चिंतामणि होय तत्त्वतां ॥ तृणगृहें[२१] क्षण न लागतां ॥ सुवर्णमंदिरें पैं होती ॥ २६ ॥ खडोंणा[२२] गाई दुभती ॥ वैरी तेचि मित्र होती ॥ विशेष प्रकाशे निजमती[२३] ॥ राजे पूजिती येऊनि घरा ॥ २७ ॥ समयोचित होय स्फूर्ती ॥ दिगंतरा जाय कीर्ति ॥ पदोपदीं निश्चितीं ॥ यश जोडे तयातें ॥ २८ ॥ असो जनकासी म्हणे विश्वामित्र ॥ तुझा आजि उदय पावला भाग्यमित्र ॥ घरासी आला स्मरारिमित्र[२४] ॥ सकळ अमित्रां[२५] त्रासक जो ॥ २९ ॥ जनकें करूनि बहुत आदर ॥ विश्रामित्र श्रीराम सौमित्र ॥ निजसभेसी आणोनि सत्वर ॥ मान देऊन बैसविले ॥ ३० ॥ देशोदेशींचे नृपती ॥ राम पाहोनि आश्चर्य करिती ॥ सीता द्यावी हो याप्रती ॥ नोवरा रघुपति साजिरा ॥ ३१ ॥ एक म्हणती स्वयंवरीं केला पण ॥ भार्गवचापासी चढवावा गुण ॥ हें कार्य परम कठिण ॥ रामास केवीं आकळे ॥ ३२ ॥ मनांत म्हणे जनक नृपवर ॥ जरी जांवयी होईल रघुवीर ॥ तरी माझ्या भाग्यास नाहीं पार ॥ परी पण दुर्धर पुढें असे ॥ ३३ ॥ तंव तया मंडपांगणीं ॥ परम चतुर चपळ करिणी-[२६] ॥ वरी दिव्य चवरडोल[२७] जडितरत्नीं ॥ झळकतसे अत्यंत ॥ ३४ ॥ त्यामाजी बैसली जनकबाळा ॥ हातीं घेऊनियां दिव्य माळा ॥ विलोकित सकळ भूपाळां ॥ ऋषिवृंदांसहित पैं ॥ ३५ ॥ जवळी सखिया सकळ असती ॥ श्वेत चामरें वरी ढाळिती ॥ एक क्षणक्षणां शृंगार सांवरिती ॥ विड्या देती एक तेथें ॥ ३६ ॥ जे त्रिभुवनपतीची मुख्य राणी ॥ आदिमाया प्रेमवरूपिणी[२८] ॥ जे इच्छामात्रेंकरूनी ॥ ब्रह्मांड हें घडीमोडी ॥ ३७ ॥ ब्रह्मादिक बाळें आज्ञेंत ॥ आपुले निजगर्भीं पाळित ॥ तिचें स्वरूपलावण्य अद्भुत ॥ कवणालागीं न वर्णवे ॥ ३८ ॥ अनंत शक्ति कर जोडून ॥ जीपुढें ठाकती येऊन ॥ जिनें आदिपुरुषा जागें करून ॥ सगुणत्वासी आणिलें ॥ ३९ ॥ या ब्रह्मांडमंडपामाझारी ॥ जनकात्मजेऐसी सुंदरी ॥ उपमा द्यावया दुसरी ॥ कोणे अवतारीं नसेचि ॥ ४० ॥ जैसें जांबूनदसुवर्ण[२९] तप्त ॥ तैसें सर्वांग दिव्य विराजित ॥ आकर्ण नेत्र विकासित ॥ मुखमृगांक[३०] न वर्णवेचि ॥ ४१ ॥ मुखीं झळकती दंतपंक्ती ॥ बोलतां जिकडे पडे दीप्ती ॥ पाषाण ते पद्मराग होती ॥ वाटे रत्नें विखुरती बोलतां ॥ ४२ ॥ जानकीचे अंगींचा सुवास ॥ भेदोन जाय महदाकाश ॥ जिनें भुलविला आदिपुरुष ॥ आपुल्या स्वरूपविलासें ॥ ४३ ॥ पाय ठेवितां धरणीं ॥ पदमुद्रा उमटती जे स्थानीं ॥ तेथें वसंत येऊनी ॥ लोळत भुलोनि सुवासा ॥ ४४ ॥ चंद्रसूर्यांच्या गाळिल्या ज्योती ॥ तैसीं कर्णपुष्पें अत्यंत झळकती ॥ कर्णीं मुक्तघोंस ढाळ देती ॥ कृत्तिकापुंज जैसे कां ॥ ४५ ॥ आकर्णपर्यंत विशाळ नयन ॥ माजी विलसे सोगियांचें[३१] अंजन ॥ कपाळीं मृगमद[३२] रेखिला पूर्ण ॥ वरी बिजवरा झळकतसे ॥ ४६ ॥ शीत दाहकत्व सांडोनी ॥ शशांक आणि वासरमणी ॥ सदा विलसती दोन्ही ॥

२१ गवताच्या झोंपड्या. २२ भाकड झालेल्या. २३ स्वतांची बुद्धि. २४ मदनशत्रु शंकराचा मित्र श्रीराम. २५ शत्रूंना. २६ हत्तिणीवर. २७ अंबारी. २८ ओंकाररूप. २९ सोनें. ३० मुखचंद्रमा. ३१ सुरम्याचें अंजन. ३२ कस्तूरी.

मुक्तजाळीं[३३] गगनीं भगणें[३४] जैसीं ॥ ४७ ॥ विद्युत्प्राय दिव्यांबर ॥ मुक्तलग[३५] चोळी शोभे विचित्र ॥ वरी एकावळी मुक्ताहार ॥ पदकीं अपार तेज फांके ॥ ४८ ॥ दशांगुळीं मुद्रिका यंत्राकार ॥ वज्रचुडेमंडित कर ॥ कैटिकांचीवरी[३६] हिरे थोर ॥ जैसे दिनकर[३७] जडियेले ॥ ४९ ॥ वांकी नेपुरें दिव्य चरणीं ॥ रुणझुणती चालतां धरणीं ॥ जिचिया स्वरूपावरूनी ॥ कोटी अनंग[३८] ओंवाळिजे ॥ ५० ॥ असो ऐसी ते चित्कळी[३९] ॥ सकळ सभा विलोकी डोळां ॥ तों ऋषिपंक्तिमाजी घनसांवळा ॥ परब्रह्मपुतळा देखिला ॥ ५१ ॥ विजयानामें सखीप्रती ॥ सीता म्हणे पाहें ऋषिपंक्ती ॥ त्यांमाजी विलसे जी मूर्ती ॥ माझी प्रीति जडली तेथें ॥ ५२ ॥ धनश्याम सुंदर रूपडें ॥ देखतां कामाची मुरकुंडी पडे ॥ सखे मज वर जरी ऐसा जोडे ॥ तरीच धन्य मी संसारीं ॥ ५३ ॥ बहुत जन्मपर्यंत ॥ तप केलें असेल जरी अत्यंत ॥ तरीच हा मज होईल कांत ॥ विजये निश्चित जाण पां ॥ ५४ ॥ नवस करूं कवणाप्रती ॥ कोणती पावेल मज शक्ती ॥ रघुवीर जरी जोडेल पती ॥ तरी त्रिजगतीं धन्य मी ॥ ५५ ॥ राजीवनेत्र[४०] घनसांवळा ॥ स्वरूपठसा सर्वांत आगळा ॥ आपुले हातीं यासी घालीन माळा ॥ मग तो सोहळा न वर्णवे ॥ ५६ ॥ तों विश्वामित्र म्हणे जनकाप्रती ॥ आतां कोदंड आणावें शीघ्रगती ॥ मिळाले येथें सर्व नृपती ॥ जे कां पुरुषार्थी थोर थोर ॥ ५७ ॥ अष्टचक्रशकट[४१] प्रचंड ॥ त्यावरी ठेविलें चंडकोदंड ॥ सहस्रवीरांचे दोर्दंड[४२] ॥ ओढितां भागले न ढळेचि ॥ ५८ ॥ मग गजभार लाविले ॥ रंगमंडपीं ओढून आणिलें ॥ देखतां सर्व राजे दचकले ॥ म्हणती हें नुचले कोणासी ॥ ५९ ॥ एक म्हणती हें शिवचाप ॥ उचलील ऐसा न दिसे भूप ॥ एकांस सुटला चळकंप ॥ गेला बळदर्प गळोनियां ॥ ६० ॥ एक महावीर बोलत ॥ आम्ही कौतुक पाहावया आलों येथ ॥ एक म्हणती जनकाचा स्नेह बहुत ॥ म्हणोनि भेटीस पातलों ॥ ६१ ॥ जनक सांगे सकळांतें ॥ हें विरूपाक्षचाप[४३] घेऊन स्वहस्तें ॥ शिक्षा लाविली दक्षातें ॥ सहस्राक्षातें[४४] नुचले हें ॥ ६२ ॥ ऐसिया चापासी उचलोन ॥ जो राजेंद्र वाहील गुणें[४५] ॥ त्यासी हे जानकी गुणनिधान ॥ माळ घालील स्वहस्तें ॥ ६३ ॥ तटस्थ पाहती सकळ वीर ॥ कोणी न देती प्रत्युत्तर ॥ कोणी सांवरोनियां धीर ॥ चाप उचलूं भाविती ॥ ६४ ॥ तों मूळें[४६] न पाठवितां रावण ॥ प्रधानासहित आला धांवोन ॥ सभा गजबजली संपूर्ण ॥ म्हणती विघ्न आलें हें ॥ ६५ ॥ आतां गति येथें नव्हे बरी ॥ बळेंचि उचलोन नेईल नोवरी ॥ कोणी म्हणती क्षणाभीतरीं ॥ चंडीशचाप[४७] चढवील हा ॥ ६६ ॥ जनकासी म्हणे रावण ॥ तुवां धनुष्याचा केला पण ॥ तरी क्षणमात्रें तें मोडून ॥ कुटके करीन येथेंचि ॥ ६७ ॥ म्यां हालविला कैलास ॥ बंदीं घातले त्रिदशेश[४८] ॥ ऐरावतीसमवेत देवेश ॥ समरभूमीस उलथिला ॥ ६८ ॥ तो मी रावण प्रतापशूर ॥ चाप लावाया काय उशीर ॥ उपटोनियां मेरुमांदार ॥ कंदुका-[४९]ऐसे उडवीन ॥ ६९ ॥ पृथ्वी उचलोनि अकस्मात ॥ घालूं शकें मी समुद्रांत ॥ कीं घटोद्भवासारिखा सरितानाथ[५०] ॥ क्षणमात्रें शोषीन

३३ मोत्यांच्या समुदायांत. ३४ नक्षत्रसमुदाय. ३५ मोत्यांचे घोंस. ३६ कमरपट्टयावर. ३७ सूर्य. ३८ मदन. ३९ चिच्छक्ति. ४० कमलनेत्र राम. ४१ आठ चाकांचा गाडा. ४२ भुज, बाहु. ४३ शिवचाप. ४४ सतीचा ( पार्वतीचा ) पिता. ४५ इंद्राला. ४६ दोरी. ४७ बोलावणें. ४८ देव. ४९ चेंडूसारखे. ५० कुंभयोनि अगस्तिसारखा. ५१ समुद्र.

मी ॥ ७० ॥ तरी आतां हेचि प्रतिज्ञा पाहीं ॥ हें चाप मोडूनि लवलाहीं ॥ होईन जनकाचा जांवई ॥ सकळ रायांदेखतां ॥ ७१ ॥ वसनें भूषणें सांवरून ॥ चापाकडे चालिला रावण ॥ गजबजलें जानकीचें मन ॥ अति उद्विग्न जाहली ॥ ७२ ॥ म्हणे अपर्णापते त्रिनयना ॥ त्रिपुरांतका मदनदहना ॥ तुझें चाप नुचले रावणा ॥ गौजास्यजनका ऐसें करीं ॥ ७३ ॥ या दुर्जनाचें तोंड काळें ॥ सदाशिवा करीं शीघ्र वहिलें ॥ महादेवतें प्रचंड सबळें ॥ या धनुष्यावरी बैसवीं ॥ ७४ ॥ अहो अंबे मूळपीठनिवासिनी ॥ मंगळकारके आदिजननी ॥ या रावणाच्या शक्ती हिरोनी ॥ नेई मृडानी सत्वर ॥ ७५ ॥ ऐसें जानकीनें प्रार्थिलें ॥ तों दैवतें धांविन्नलीं सकळें ॥ गुप्तरूपें शीघ्रकाळें ॥ येऊन बैसलीं चापावरी ॥ ७६ ॥ नवकोटी कात्यायनी ॥ चौसष्ट कोटी योगिनी ॥ यांसहित कालिका येउनी ॥ धनुष्यावरी बैसत ॥ ७७ ॥ धनुष्य उचलूं गेला दशवक्त्र ॥ तंव तें न ढळेचि अणुमात्र ॥ बळें लाविले वीसही कर ॥ जाहलें शरीर निस्तेज पैं ॥ ७८ ॥ द्विजपंक्तीनें अधरप्रांत ॥ शोंकारिजनक बळें रगडित ॥ चाप उभें करितां त्वरित ॥ जाहलें विपरीत तेधवां ॥ ७९ ॥ जैसा महाद्रुम उन्मळे ॥ तैसें शिवचाप उलथलें ॥ रावण उताणा पडे ते वेळे ॥ हलकल्लोळ मांडला ॥ ८० ॥ जैसा पूर्वी गयासुर दैत्य ॥ त्यावरी ठेविला पर्वत ॥ तैसाचि पडला लंकानाथ ॥ धनुष्य अद्भुत उरावरी ॥ ८१ ॥ रावण पडतां भूतळीं ॥ सभेवरी उसळली धुळी ॥ दाहीं मुखीं मृत्तिका पडली ॥ आनंदली जानकी ॥ ८२ ॥ दाहीं मुखीं रुधिर वाहात ॥ कासावीस जाहला बहुत ॥ म्हणे धांवा धांवा समस्त ॥ धनुष्य त्वरित काढा हें ॥ ८३ ॥ रावण म्हणे जनकाप्रती ॥ माझे प्राण चालिले निश्चितीं ॥ परी इंद्रजित कुंभकर्ण असती ॥ तुज निर्दाळिती सहमुळीं ॥ ८४ ॥ गजबजली सभा समस्त ॥ म्हणती कोण आहे बळिवंत ॥ हें चाप उचलील अद्भुत ॥ महा अनर्थ ओढवला ॥ ८५ ॥ घाबरा झाला मिथिलेश्वर ॥ म्हणे पृथ्वी झाली निर्वीर ॥ क्षेत्री भार्गवें आटिले समग्र ॥ त्रिसप्तवेळां हिंडोनियां ॥ ८६ ॥ या सभेमाजी बळिवंत ॥ कोणी क्षेत्री नाहीं रणपंडित ॥ कौशिकें ऐसी ऐकतां मात ॥ खुणाविलें श्रीरामचंद्रा ॥ ८७ ॥ जैसा निद्रिस्थ सिंह जागा केला ॥ कीं याज्ञिकें जातवेद फुंकिला ॥ तैसा विश्वामित्रें ते वेळां ॥ खुणाविला रघुवीर ॥ ८८ ॥ म्हणे नरवीरपंचानना ॥ त्रिभुवनवंद्या राजीवनयना ॥ पुराणपुरुषा रघुनंदना ॥ अरिमर्दना ऊठ वेगीं ॥ ८९ ॥ कमलोद्भवजनका उदारा ॥ ताटिकांतका अहल्योद्धारा ॥ मखपाळका समरधीरा ॥ असुरसंहारका ऊठ वेगीं ॥ ९० ॥ जैसी निशा संपतां तत्काळ ॥ उदयाद्रीवरी ये रविमंडळ ॥ तैसा राम तमाळनीळ ॥ उठोनि उभा ठाकला ॥ ९१ ॥ कीं महायाग होतां पूर्णाहुती ॥ तत्काळ प्रकटे आराध्यमूर्ती ॥ तैसा उभा ठाकला रघुपती ॥ राजे पाहती टकमकां ॥ ९२ ॥ कीं प्रल्हादाकारणें झडकरी ॥ स्तंभांतूनि प्रगटे नरहरी ॥ कीं वेदांतज्ञान होतां अंतरीं ॥ निजबोध जेवीं प्रगटे पैं ॥ ९३ ॥ वंदोनियां गुरुचरणां ॥ सवेंचि नमिलें सकळ ब्राह्मणां ॥ पूर्णब्रह्मानंद राम-

५२ हे पार्वतीपते. ५३ गणपतीच्या जनका (शंकरा). ५४ पार्वती. ५५ दांतांच्या ओळींनीं. ५६ लालचा ओंठ. ५७ इंद्रजिताचा पिता रावण. ५८ मोठा वृक्ष. ५९ जनकराजा. ६० क्षत्रिय. ६१ परशुरामानें. ६२ एकवीस वेळां. ६३ अग्नि. ६४ यज्ञरक्षका.

राणा ॥ वेदपुराणां वंद्य जो ॥ ९४ ॥ श्रीराम विरक्त ब्रह्मचारी ॥ हे रमा आपणाविण कोणा न वरी ॥ यालागीं शैरयूतीरविहारी ॥ उठता जाहला तेधवां ॥ ९५ ॥ सभेस बैसले नृपवर ॥ केले नानापरींचे शृंगार ॥ परी सर्वांत श्रेष्ठ श्रीरामचंद्र ॥ रोहिणीवर[६५] भगणांत[६६] जिसा ॥ ९६ ॥ कीं शास्त्रांमाजी वेदांत ॥ कीं निर्जरांमाजी शचीनाथ[६७] ॥ तैसा श्रीराम समर्थ ॥ सभेंत मुख्य विराजे ॥ ॥ ९७ ॥ उठिला देखोनि श्रीरामचंद्र ॥ उचंबळला सीतेचा सुखसमुद्र ॥ नवमेघरंग रघुवीर ॥ रंगमंडपाप्रति आला ॥ ९८ ॥ कोटि अनंग ओंवाळून ॥ टाकावे ज्याच्या नखावरून ॥ जो अरिचक्रवारणपंचानन[६८] ॥ जात लक्षून धनुष्यातें ॥ ९९ ॥ देखतां राम सुकुमार ॥ घाबरलें सीतेचें अंतर ॥ म्हणे कोमळगात्र रघुवीर ॥ प्रचंड थोर धनुष्य हें ॥ १०० ॥ कूर्मपृष्ठी जैसी कठोर ॥ तैसें हें कोदंड प्रचंड थोर ॥ दशरथकुमर सुकुमार ॥ कैसें उचलेल तयातें ॥ १ ॥ मदनदहनाचें धनुष्य थोर ॥ रघुनाथमूर्ति मदनमनोहर ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार पण हा तुझा ॥ २ ॥ घनश्याम कोमळगात्र ॥ राजकुमार राजीवनेत्र ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार पण हा तुझा ॥ ३ ॥ बळहत केला दशकंधर ॥ परम कोमळ रघुपतीचे कर ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार पण हा तुझा ॥ ४ ॥ वाटे खुपती कोमळ कर ॥ ऐसी रामतनु सुकुमार ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार हा पण तुझा ॥ ५ ॥ मज गमेचि दुसरा वर ॥ तुज सत्य करणें पण साचार ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार पण हा तुझा ॥ ६ ॥ चंडीशकोदंड प्रचंड थोर ॥ लघुआकृति राम निर्विकार ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार पण हा तुझा ॥ ७ ॥ श्रीरामावांचून इतर ॥ पुरुष तुजसमान साचार ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार पण हा तुझा ॥ ८ ॥ दुजा वरावया येतां वर ॥ देहा त्यागीन हा निर्धार ॥ अहा तात परम दुस्तर ॥ अनिवार पण हा तुझा ॥ ९ ॥ सीता विजयेसी म्हणे अवधारीं ॥ बाप नव्हे हा वाटतो वैरी ॥ हा पण त्यजोनि निर्धारीं ॥ रामासी मज अर्पी ना ॥ ११० ॥ ऐसें सीतेचें अंतर ॥ जाणोनियां जगदुद्धार ॥ दंड पिटोनि प्रचंड थोर ॥ कोदंडासमीप पातला ॥ ११ ॥ दशरथमहाराज दिग्गज ॥ त्याचा छौंवा रघुराज ॥ धनुष्यइक्षु[६९] देखोनि सहज ॥ परम चपळ धांविन्नला ॥ १२ ॥ श्रीरामसव्यबाहु प्रचंड ॥ हाचि वरी केला शुंडादंड ॥ भवधनुष्यइक्षु द्विखंड ॥ करील आतां निर्धारें ॥ १३ ॥ दशकंधर हें पद्मकानन[७२] ॥ वीस हस्त द्विपंचवदन ॥ तीस कमळें हींच पूर्ण ॥ कोदंड जाण इक्षु तेथें ॥ १४ ॥ पद्मवनीं गज निघे लवलाहीं ॥ मग त्यासी कमळांची गणना काई ॥ तैसीं दशमुखाचीं हस्तकमळें पाहीं ॥ तुडवीत आला रघुवीर ॥ १५ ॥ तटस्थ पाहती सकळ जन ॥ म्हणती विजयी हो कां रघुनंदन ॥ सीतानवरी हे सगुण ॥ यासीच घालो निजमाळा ॥ १६ ॥ आनंदमय सकळ ब्राह्मण ॥ चिंतिती रामासी जयकल्याण ॥ म्हणती हें भवचाप मोडून ॥ टाको रघुवीर सत्वर ॥ १७ ॥ एक म्हणती राम सुकुमार ॥ नीलपंकजतनु वय किशोर[७६] ॥ भवकोदंड प्रचंड थोर ॥ उचलेल कैसें रामातें ॥ १८ ॥

६५ शरयू नदीच्या कांठीं क्रीडा करणारा. ६६ नक्षत्रांमध्यें चंद्र. ६७ देवांमध्यें. ६८ इंद्र. ६९ शत्रुसमुदायरूपी हत्तीला मारणारा सिंह. ७० पुत्र, बालक. ७१ धनुष्यरूपी ऊंस. ७२ पद्मवन. ७३ दशवदन. ७४ शिवाचें धनुष्य. ७५ निळ्या कमळासारख्या देहाचा. ७६ लहान.

एक म्हणती चिमणें रामाचें ठाण ॥ एक म्हणती सिंह दिसतो लहान ॥ परी पर्वताकार गज विदारून ॥ न लागतां क्षण टाकितो ॥ १९॥ घटोद्भव[७७] लहान दिसत ॥ परी क्षणें प्राशिला सरितांनाथ[७८] ॥ गगनीं सवितृ[७९] लघु भासत ॥ परी प्रभा अद्भुत न वर्णवे ॥ १२०॥ असो ते वेळे रघुवीर ॥ विद्युत्प्राय उत्तरीय[८०] चीर ॥ तें सरसावोनि सत्वर ॥ कटिप्रदेशीं वेष्टिलें ॥ २१ ॥ माथा जडितमुकुट झळकत ॥ आकर्णनेत्र आरक्त रेखांकित ॥ मस्तकींचे केश नाभीपर्यंत ॥ दोहींकडोनि उतरले ॥ २२ ॥ किशोर सुकुमारभूषण ॥ अलकसुवासें भरलें गगन ॥ त्या सुवासासी वेधून ॥ मिलिंदचक्र[८१] भ्रमतसे ॥ २३ ॥ श्रीरामतनूचा सुवास पूर्ण ॥ जात सप्तावरण भेदून ॥ असो तें शिवधनुष्य रघुनंदन ॥ करेंकरोनि स्पर्शीत ॥ २४ ॥ नीलवर्ण कुंतलें[८२] ते अवसरीं ॥ पडले दशकंठाचे हृदयावरी ॥ विषकंठवंद्य[८३] ते अवसरीं ॥ सांवरोनि मागें टाकित ॥ २५ ॥ शिवधनुष्यासी घंटा सतेज ॥ वरी विद्युत्प्राय झळके ध्वज ॥ त्यासमवेत रघुराज ॥ उचलिता जाहला ते काळीं ॥ २६ ॥ गज शुंडेनें आक्रमी इक्षुदंड ॥ तैसें रामें आकर्षिलें कोदंड ॥ पराक्रम परम प्रचंड ॥ दशमुंड[८४] विलोकीतसे ॥ २७ ॥ परम म्लान द्विपंचवदन[८५] ॥ दृष्टीं देखोनि गाधिनंदन[८६] ॥ म्हणे नरवीरश्रेष्ठा वेगेंकरून ॥ संशय हरणें सर्वांचा ॥ २८ ॥ जनक म्हणे कौशिकमुनी ॥ ज्या चापें दशकंठ घोळिला धरणीं ॥ तें धनुष्य रामाचेनी ॥ कैसें उचलेल नेणवे ॥ २९ ॥ जनकासी म्हणे ऋषि कौशिक ॥ श्रीराम हा वैकुंठनायक ॥ अद्भुत करील कौतुक ॥ पाहें नावेकें[८७] उगाचि ॥ १३० ॥ इकडे रामें धनुष्य उचलून ॥ क्षण न लागतां वाहिला गुण ॥ ओढी[८८] ओढिली आकर्ण ॥ सुहास्यवदनें तेधवां ॥ ३१ ॥ श्रीरामाचें बळ प्रचंड ॥ ओढीस न पुरेचि भवकोदंड ॥ तडाडिलें तेणें ब्रह्मांड ॥ चाप करकरलें तेधवां ॥ ३२ ॥ मुष्टीमाजी तडाडत ॥ जैशा सहस्र चपळा कडकडत ॥ विधि[८९] आणि वृत्रारि[९०] हडबडत ॥ वाटे कल्पांत जाहला ॥ ३३ ॥ उर्वीमंडळ डळमळत ॥ भोगींद्र मान सरसावित ॥ दंतबळें उचलोनि देत ॥ आदिवराह पाताळीं ॥ ३४ ॥ सभा सकळ मूर्च्छित जाहली ॥ महावीरांचीं शस्त्रें गळालीं ॥ राजे भावितो उर्वी चालिली ॥ रसातळा आजि कीं ॥ ३५ ॥ रामें चाप केलें द्विखंड ॥ प्रतापें भरलें ब्रह्मांड ॥ पुष्पसंभार उदंड ॥ वृंदारक[९१] वर्षती ॥ ३६ ॥ सभा अवघी जाहली मूर्च्छित ॥ परी एक चौघें सावध पाहत ॥ जनक आणि गाधिसुत ॥ सीता सौमित्र चौघें हीं ॥ ३७ ॥ असो भवकोदंड मोडोनी ॥ द्विखंडें रामें टाकिलीं धरणीं ॥ रावण उठोन ते क्षणीं ॥ अधोवदनें चालिला ॥ ३८ ॥ सभेस मारावया आणिती तस्कर[९२] ॥ तैसा म्लान दिसे दशवक्त्र ॥ कीं रणीं अपेश आलिया महावीर ॥ त्याचा मुखचंद्र उतरे जेवीं ॥ ३९ ॥ कीं दिव्य[९३] देतां खोटा होत ॥ मग तो मुख न दाखवी लोकांत ॥ तैसा प्रधानेंसीं लंकानाथ ॥ गेला त्वरित स्वस्थाना ॥ १४० ॥ पुण्य सरतां स्वर्गीहूनि खचला ॥ कीं याज्ञिकें अंत्यज बाहेर घातला ॥ कीं द्विजजाती भ्रष्ट जाहला ॥ तो जेवीं दवडिला पंडितीं ॥ ४१ ॥ याचि प्रकारें सभेंतूनी ॥ रावण गेला उठोनी ॥ जैसा केसरीच्या केवेंतूनी[९४] ॥ जंबूकें[९५] सुटला पूर्व-

७७ अगस्तिमुनि. ७८ समुद्र. ७९ सूर्य. ८० आंगावरचें वस्त्र. ८१ भ्रमरेला. ८२ केसांच्या परिमळानें. ८३ मुंग्यांचा समुदाय. ८४ कैस. ८५ शंकराचा धनु ज्यो श्रीराम. ८६ रावण (दहा मस्तकांचा). ८७ विश्वामित्र. ८८ क्षणभर. ८९ दोरी. ९० ब्रह्मदेव आणि इंद्र. ९१ देव. ९२ चोर. ९३ सत्य, शपथ. ९४ सिंहाच्या. ९५ कोल्हा. ९६ कोल्हा.

भाग्यें ॥ ४२ ॥ असो इकडे विजयी रघुनंदन ॥ जैसा निरभ्र नभीं चंडकिरणें ॥ सुकुमार नवघनतनु सगुण ॥ भक्तजन पाहती ॥ ४३ ॥ सर्वांचे नयनीं अश्रुपात ॥ ऋषिचक्र सद्गदित ॥ हा कोमलगात्र रघुनाथ ॥ कठिण चाप केवीं भंगिलें ॥ ४४ ॥ श्रीराम सौकुमार्याची राशी ॥ विश्वामित्रें धांवोनि वेगेंसीं ॥ रघुवीर आलिंगिला मानसीं ॥ प्रेमपूर न आवरे ॥ ४५ ॥ म्हणे आदिपुरुषा पूर्णब्रह्मा ॥ स्मरणारिमित्रा आत्मयारामा ॥ भक्तकामकल्पद्रुमा ॥ अद्भुत लीला दाविली ॥ ४६ ॥ तुझ्या करणीवरूनि लावण्यखाणी ॥ ओंवाळावी वाटे समग्र धरणी ॥ आणि या जिवाची कुरवंडी करोनी ॥ तुजवरोनि सांडावी ॥ ४७ ॥ इतुक्यांत करिणीवरोनें लावण्यखाणी ॥ खालीं उतरोनि तेच क्षणीं ॥ माळ घेऊन जनकनंदिनी ॥ हंसगमनी चमकत ॥ ४८ ॥ मेदिनी म्हणे मी धन्य ॥ माझी कन्या वरील रघुनंदन ॥ श्रीराम जामात सगुण ॥ मनमोहन जगद्वंद्य ॥ ४९ ॥ श्रीराम जगाचा जनिता ॥ जानकी सहजचि जगन्माता ॥ तारावयासी निजभक्तां ॥ आलीं उभयतां रूपासी ॥ १५० ॥ श्रीराम सच्चिदानंदघनतनु ॥ जो पुराणापुरुष पुरातनु ॥ जो पूर्णावतारी पूर्णब्रह्मेंधनु ॥ सकळ तनूंचा साक्षी पैं ॥ ५१ ॥ आदि मध्य जो अंतीं ॥ परी हाचि एक सीतेचा पती ॥ तुच्छ करून सकळ नृपती ॥ परी रघुपती प्रियकर ॥ ५२ ॥ हंसगती जानकी चालत ॥ पदभूषणें मधुर गर्जत ॥ रामगळां माळ घालूनि त्वरित ॥ मस्तक चरणीं ठेविला ॥ ५३ ॥ गळां घालितांचि माळ ॥ जाहला स्वानंदाचा सुकाळ ॥ वाद्यें वाजों लागलीं तुंबळ ॥ नादें निराळ दुमदुमलें ॥ ५४ ॥ संतोषला मिथिलेश्वर ॥ म्हणे माझे भाग्यास नाहीं पार ॥ जांवई जाहला रघुवीर ॥ भुवनसुंदर मेघश्याम ॥ ५५ ॥ जनकें आणि विश्वामित्रें ॥ लिहिलीं अयोध्येसी दिव्य पत्रें ॥ तीं घेऊनि दूत त्वरें ॥ अयोध्येसी पातले ॥ ५६ ॥ कुंकुममंडित पत्रें ॥ लिहिलीं होतीं विश्वामित्रें ॥ तीं उचलोनि अजराजपुत्रें ॥ वसिष्ठकरीं दीधलीं ॥ ५७ ॥ दोहींतील एकचि अभिप्राय ॥ गूढ परम लिहिलें चातुर्य ॥ त्याचा अर्थ करोनि ऋषिवर्य ॥ ब्रह्मकुमर सांगतसे ॥ ५८ ॥ हिमनगजामातसायकासन ॥ भंगूनि विजयी झाला बाणें ॥ तेव्हां थरथरिला पूर्ण ॥ आनंदघन रथस्वामी ॥ ५९ ॥ गुणें केली बहुत स्तुती ॥ आनंदें यश वर्णी सारथी ॥ जोंवरी रथचक्रें असती ॥ वोहोरें नांदोत तोंवरी ॥ १६० ॥ रथगर्भीं होतें जें निधान ॥ तेणें बाणप्रताप देखोन ॥ ऐक्य झालें चरणीं येऊन ॥ तुम्हीं त्वरेंकरून येइंजे ॥ ६१ ॥ अर्थ सांगे वसिष्ठमुनी ॥ साक्ष श्लोक असे महिम्नीं ॥ त्रिपुरवधीं जेव्हां शूलपाणी ॥ बाण चक्रपाणी जाहला ॥ ६२ ॥ पृथ्वीचा केला तेव्हां रथ ॥ चंद्रमित्र चाकें अद्भुत ॥ कनकाद्रि धनुष्य होत ॥ गुण तेथें फणींद्र पैं ॥ ६३ ॥ सारथि झाला कमलासन ॥ जानकी रथगर्भींचें रत्न ॥ बाण तोचि हा रघुनंदन ॥ शिवधनुष्य जेणें भंगिलें ॥ ६४ ॥ ऐसा अर्थ सांगे ब्रह्मसुत ॥ आनंदला राजा दशरथ ॥ दळभारें सिद्ध होत ॥ घाव देत निशाणीं ॥ ६५ ॥ सोळा पद्में दळभार ॥

९७ सूर्य. ९८ मदनशत्रु शंकराचा सखा. ९९ हत्तिणीवरून. १०० पूर्ण ब्रह्मरूपी घन. १ आकाश. २ दशरथानें. ३ शांकर धनुष्य. ४ राम. ५ शंकर. ६ शेषानें. ७ ब्रह्मदेव. ८ चंद्रसूर्य. ९ वधूवरें. १० ठेवा, जानकी. ११ महिम्नांतील 'रथः क्षोणी यंता' या श्लोकाचें तात्पर्य येथें वर्णिलें आहे.

चतुरंगदळ निघे सत्वर ॥ सुमंतादि प्रधान राजकुमर ॥ भरतशत्रुघ्न निघाले ॥ ६६ ॥ कौसल्या सुमित्रा कैकयी राणी ॥ निघाल्या आरूढोनि सुखासनीं ॥ दूत वेत्रे[१२]कनकपाणी ॥ सहस्रावधि धांवती पुढें ॥ ६७ ॥ सप्तशतें दशरथाच्या युवती ॥ त्याही रामलग्ना पाहों येती ॥ सुखासनीं बैसोनि जाती ॥ अनुक्रमेंकरूनियां ॥ ६८ ॥ प्रजालोक निघाले समस्त ॥ निजरथीं बैसे दशरथ ॥ लक्षोनियां मिथिलापंथ ॥ परम वेगें चालिले ॥ ६९ ॥ पृथ्वीपति राजा दशरथ ॥ मस्तकीं आतपत्रें[१३] विराजत ॥ मित्रेपत्रें[१४] परम शोभत ॥ दोन्ही भागीं समसमान ॥ १७० ॥ मृगांकवर्ण[१५] चामरें ॥ एकावरी विराजती तुंगारपत्रें ॥ एक उडविती लघु चिरें ॥ दोहींकडे श्वेतवर्ण ॥ ७१ ॥ मकरबिरुदें पुढें चालती ॥ नभचुंबित ध्वज विराजती ॥ वाद्यगजरेंकरूनि क्षिती ॥ दुमदुमली तेधवां ॥ ७२ ॥ पुढें शमदमांचें पायभार ॥ मागें सद्विवेकाचे तुरंग[१६] अपार ॥ त्यापाठीं निजबोधाचे कुंजर[१७] ॥ किंकाटती[१८] रामनामें ॥ ७३ ॥ निजानुभावाचे दिव्यरथ ॥ त्यांवरी आरूढले वऱ्हाडी समस्त ॥ वारू तेचि चारी पुरुषार्थ ॥ समानगती धांवती ॥ ७४ ॥ जागृति प्रथम पेणें[१९] सत्य ॥ स्थूळ परग्राम अद्भुत ॥ तेथें न राहे दशरथ ॥ चित्तीं रघुनाथ भरला असे ॥ ७५ ॥ पुढें स्वप्नावस्था सूक्ष्मनगर ॥ तेथें न राहे अजराजकुमर ॥ म्हणे जवळी करावा श्रीरघुवीर ॥ आड वस्ति करूं नका ॥ ७६ ॥ पुढें सुषुप्ति अवस्था कारणपुर ॥ सदा ओसें[२०] आणि अंधकार ॥ रामउपासक वऱ्हाडी थोर ॥ जाती सत्वर पुढेंचि ॥ ७७ ॥ मिथिलेबाहेर उपवन ॥ तुर्या अवस्था दिव्यज्ञान ॥ पुढें रघुनाथप्राप्तीचें चिन्ह ॥ राहिले लक्षोन तेथेंचि ॥ ७८ ॥ पुढें विराजे विदेहनगर[२१] ॥ ऐकों येत अनुहत वाद्यगजर ॥ निजभारेंसीं विदेहनृपवर ॥ आला सामोरा दशरथा ॥ ७९ ॥ असो दृष्टीं देखतां विदेहनृप ॥ आनंदें उठिला अयोध्याधिप ॥ क्षेम दीधलें सुखरूप ॥ अनुक्रमें सकळिकांसी ॥ १८० ॥ भरत शत्रुघ्न देखोन ॥ म्हणे आमुचे सदनींहून ॥ राम सौमित्र आले रुसोन ॥ जनक संदेहीं पडिलासे ॥ ८१ ॥ दशरथ म्हणे हे शत्रुघ्न भरत ॥ आश्चर्य करी मिथिलानाथ ॥ असो समस्त गजरेंसीं मिरवत ॥ निजमंडपांत आणिले ॥ ८२ ॥ चापखंडें देखतां ते वेळे ॥ वीरांसी रोमांच उभे ठाकले ॥ एकाचे नेत्रीं अश्रु आले ॥ कोंदंडखंडें देखतां ॥ ८३ ॥ तंव तो भक्तकामकल्पद्रुम ॥ कौसल्येनें जवळी देखिला राम ॥ धांवोनि आलिंगिला परम ॥ हृदयीं प्रेम न समाये ॥ ८४ ॥ मांडीवरी घेऊनि रघुवीर ॥ म्हणे रामा तूं कोमलांग सुकुमार ॥ चंडीशकोदंड परम कठोर ॥ कैसें चढवोनि मोडिलें ॥ ८५ ॥ दशरथें आलिंगिला राम ॥ जो सच्चिदानंद मेघश्याम ॥ भरत शत्रुघ्न परम सप्रेम ॥ श्रीरामचरण वंदिती ॥ ८६ ॥ असो जनकें दिव्य मंदिरें ॥ जानवशासी दीधलीं अपारें ॥ दोहींकडे मंडप उभविले[२२] त्वरें ॥ मंगळतुरें[२३] वाजती ॥ ८७ ॥ लक्ष्मण भरत शत्रुघ्न ॥ परम प्रतापी राजनंदन ॥ जनकरायें देखोन ॥ दशरथासी विनविलें ॥ ८८ म्हणे जानकी दिधली रघुनंदना ॥ ऊर्मिला देईन लक्ष्मणा ॥

१२ सोन्याची काठी हातांत घेतलेले. १३ छत्रें. १४ अबदागीर. १५ चंद्रकांति, शुभ्र. १६ अश्व. १७ हत्ती. १८ ओरडतात, किंकाळ्या मारतात. १९ मजल, मुक्काम. २० ओसाड. २१ जनकनगर. २२ उभारिले. २३ मंगल वाद्यें.

मांडवी श्रुतकीर्ति बंधुकन्या ॥ भरतशत्रुघ्नां देईन मी ॥ ८९ ॥ दशरथासी मानला विचार ॥ देवकप्रतिष्ठा केली सत्वर ॥ चौघीं कन्यांसी परिकर ॥ हरिद्रा लाविला तेधवां ॥ १९० ॥ सीतेची शेषहरिद्रीं ॥ ते पाठविली रामचंद्रा ॥ भरत शत्रुघ्न सौमित्रा ॥ शेष आलें तैसेंचि ॥ ९१ ॥ असो यथाविधि जाहलें नाहाण ॥ नोवरे बैसले चौघे जण ॥ तों जनक वऱ्हाडी वऱ्हाडिणी घेऊन ॥ मूळें आला वरांसी ॥ ९२ ॥ शांति क्षमा दया उन्मनी ॥ सद्बुद्धि सद्विद्या कामिनी ॥ तितिक्षा मुमुक्षा विलासिनी ॥ तुर्या आणि उपरती ॥ ९३ ॥ सुलीनता समाधि सद्गती ॥ परमसदनीं ह्या मिरवती ॥ तों वऱ्हाडी पातले निश्चितीं ॥ श्रीरामासी न्यावया आले ते ॥ ९४ ॥ बोध आनंद सद्विवेक ॥ ज्ञान वैराग्य परमार्थ देख ॥ निष्काम अक्रोध अनुताप चोख ॥ रघुनायक विलोकिती ॥ ९५ ॥ जनकें पूजोनि चौघे वर ॥ तुरंगीं बैसविले सत्वर ॥ पुढें होत वाद्यांचा गजर ॥ गगनीं सुरवर पाहती ॥ ९६ ॥ मिरवत आणिले चौघे जण ॥ मणिमय चौरंग समसमान ॥ मधुपर्कविधि वरपूजन ॥ यथासांग करी नृपनाथ ॥ ९७ ॥ रघुपतीचें पद सुंदर ॥ स्वयें क्षाळी मिथिलेश्वर ॥ सुमेधा घाली वरी नीर ॥ कनकझारी घेऊनियां ॥ ९८ ॥ वेदांचा निर्मिता रघुनाथ ॥ त्यासी घालिती यज्ञोपवीत ॥ रायें षोडशोपचारयुक्त ॥ पूजा केली तेधवां ॥ ९९ ॥ घटिका प्रतिष्ठिली अंतरीं ॥ देशिकें सर्वांसी सावध करी ॥ म्हणे वादविवादशब्दकुसरी ॥ टाकोन झडकरीं सावध व्हावें ॥ २०० ॥ चौघी कन्या आणिल्या बाहेरी ॥ डोरिल्या दिव्यवस्त्रालंकारीं ॥ क्षुधा देखोनि ते अवसरीं ॥ आश्चर्य करी दशरथ ॥ १ ॥ अंतरपट मध्यें धरून ॥ तो फेडावयासी विद्वज्जन ॥ सुरस मंगळाष्टकें म्हणोन ॥ सावधान म्हणताती ॥ २ ॥ जनकाची जे पट्टराणी ॥ सुमेधा नामें पुण्यखाणी ॥ चौघे जामात देखोनी ॥ आनंद मनीं न समाये ॥ ३ ॥ म्हणे श्रीरामाच्या मुखावरून ॥ कोटी कामें सांडावे ओंवाळून ॥ जानकीचें भाग्य धन्य ॥ ऐसें निधान जोडलें ॥ ४ ॥ असो मंगळाष्टकें म्हणती पंडित ॥ लग्नघटिका संपूर्ण भरत ॥ अंपुण्या आचार्य म्हणत ॥ तों अंतरपट फिटलासे ॥ ५ ॥ मंगळाकार चापपाणी ॥ त्याचे मस्तकीं मंगळभागिनी ॥ मंगळाक्षता घालोनी ॥ मस्तक चरणीं ठेविला ॥ ६ ॥ सीतेचे मस्तकीं रघुनाथ ॥ लग्नाक्षता घाली त्वरित ॥ तोंचि मस्तकीं ठेविला हस्त ॥ अक्षय कल्याणदायक जो ॥ ७ ॥ सीतेनें वरितां रघुनंदन ॥ ऊर्मिलेनें परिणिला लक्ष्मण ॥ मांडवीनें भरत सगुण ॥ श्रुतकीर्ति शत्रुघ्न वरीतसे ॥ ८ ॥ तों मंगळतूर्यांचा घोष आगळा ॥ परम जाहला ते वेळां ॥ तेथींचा वर्णावया सोहळा ॥ सहस्रवदना अशक्य ॥ ९ ॥ अक्षय भांडारें बहुत ॥ जनक वरदक्षिणा देत ॥ याचकजन समस्त ॥ तृप्त केले निजधनें ॥ २१० ॥ विवाहहोमालागीं निर्धारीं ॥ वेगीं चला बहुल्यावरी ॥ नोवऱ्या कडिये झडकरीं ॥ घेवोनियां चलावें ॥ ११ ॥ ऐकोनि हांसे रघुपती ॥ म्हणे प्रपंचाची विपरीत गती ॥ तों वसिष्ठ म्हणे रघुपती ॥ कडे घेई

२४ उद्दी हळद. २५ बोलावण्याला. २६ चौथी अवस्था. २७ सहनशक्ति. २८ मोक्षेच्छा. २९ जनकराजा. ३० स्थापिली. ३१ गुरु, उपाध्याय. ३२ शृंगारिल्या. ३३ सुना. ३४ मदन. ३५. सीता ३६ वरिला.

सीतेतें ॥ १२ ॥ सीता उचलितां श्रीरामें ॥ तैसेंच तिघे करिती अनुक्रमें ॥ बहुल्यावरी आनंदप्रेमें ॥ चौघे जण बैसले ॥ १३ ॥ लाजाहोमादि सर्व विधिसिद्ध ॥ करी अहल्यासुत शतानंद ॥ जनकासी जाहला परम आनंद ॥ तो आल्हाद न वर्णवे ॥ १४ ॥ तों अंतर्गृहीं रघुवीर ॥ पूजावया चालिला गौरीहर ॥ सीतेसी कडिये घेऊनि सत्वर ॥ रामचंद्र चालिला ॥ १५ ॥ गौरीहर पूजोनि त्वरें ॥ आंबा शिंपिती चौघें वोहरें[३७] ॥ निंबलोण निजकरें ॥ सुमेधा उतरी तेधवां ॥ १६ ॥ सुमेधेनें जाऊनि ते क्षणीं ॥ प्रार्थोनि आणिल्या तिघी विहिणी ॥ दिव्य वस्त्रालंकारें गौरवूनी ॥ मंडपांत बैसविल्या ॥ १७ ॥ देखोनियां चौघी सुना ॥ आनंद जाहला तिघींचिया मना ॥ इकडे जनक विनवी रघुनंदना ॥ विज्ञापना परिसावी ॥ १८ ॥ चार दिवसपर्यंत ॥ येथेंच क्रमावे माझा हेत ॥ साडे जाहलिया त्वरित ॥ मग अयोध्येसी जाइंजे ॥ १९ ॥ पुढील जाणोनि वर्तमान ॥ तें न मानीच रघुनंदन ॥ म्हणे आम्ही आतां येथून ॥ करूं गमन अयोध्येसी ॥ २२० ॥ कां त्वरा करितो रघुवीर ॥ आतां युद्धासी येईल फरशुधर[३९] ॥ तरी तो प्रचंड वीर अनिवार ॥ मिथिलानगर जाळील पैं ॥ २१ ॥ यालागीं स्वभारेंसीं[४०] बाहेर ॥ जावें इच्छी रघुवीर ॥ पुढें संहारावया दशकंधर ॥ जाणें सत्वर लंकेसी ॥ २२ ॥ धेंडा नाचवूं लंकेपुढें ॥ राक्षसांचीं अपार मुंडें ॥ ओंवाळणी पडतील कोडें ॥ करील साडे बिभीषण ॥ २३ ॥ ऐसें श्रीरामाचें मनोगत ॥ वसिष्ठ जाणोनि त्वरित ॥ जनकासी सांगे गुह्यार्थ ॥ वोहरें आतांचि बोळवीं ॥ २४ ॥ मग जे अयोध्यावासी जन ॥ समस्तांसीं दिधलें भोजन ॥ चौघें[३७] वोहरें आणि अंजनंदन[४४] ॥ राण्या समस्त जेविल्या ॥ २५ ॥ तत्काळ साडे करून ॥ वस्त्रालंकार सर्वांस अर्पून ॥ चौघां जणांसी आंदण ॥ अपार दिधलें तेधवां ॥ २६ ॥ अश्व गज दास दासी ॥ तन मन धन अर्पिलें श्रीरामासी ॥ जनक निघाला स्वभारेंसीं ॥ दशरथासी बोळवित ॥ २७ ॥ ऐसें देखोनि नारद ऋषी ॥ वेगें धांवि-न्नला बद्रिकाश्रमासी ॥ देखोनियां भृगुकुळटिळककासी[४१] ॥ म्हणे बैसलासी काय आतां ॥ २८ ॥ तूं द्विजकुळीं महाराज वीरेश ॥ आणि त्या रामें तुझें भंगिलें धनुष्य ॥ तुज थोर आलें अपयश ॥ रामें यश वाढविलें ॥ २९ ॥ मग बोले भृगुकुलदिवाकर[४२] ॥ आमुचें अवतारकृत्य जाहलें समग्र ॥ मग म्हणे कमलोद्भवपुत्र[४३] ॥ तुज अणुमात्र क्रोध न ये ॥ २३० ॥ जमदग्नीनें क्रोध टाकिला ॥ तो तत्काळचि मृत्यु पावला ॥ तुजही तैसीच आली वेळा ॥ दाशरथी तुजला न सोडी ॥ ३१ ॥ शिवें तुज दिधलें पिनाक जाण[४५] ॥ तेणें घेतले क्षत्रियांचे प्राण ॥ ऐसें बोलतां ब्रह्मनंदन ॥ जमदग्निसुत क्षोभला ॥ ३२ ॥ किंवा मृगेंद्रें[४३] निजेला ॥ तो पदघातें हाणोन जागा केला ॥ कीं नरसिंहचि प्रकटला ॥ स्तंभाबाहेर दुसऱ्यानें ॥ ३३ ॥ घृतें शिंपिला वैश्वानर[४४] ॥ कीं नासिकेवरी ताडिला व्याघ्र ॥ कीं बळेंचि खवळिला फणिवर ॥ कीं महारुद्र कोपविला ॥ ३४ ॥ मग विष्णुचाप चढविलें ॥ नारद भार्गव[३९] दोघे निघाले ॥

३७ जोडपीं, दंपत्यें. ३८ परशुराम. ३९ आपल्या सेनासमुदायासह. ४० दशरथ. ४१ नारद. ४२ महादेवाचें धनुष्य. ४३ सिंह. ४४ अग्नि.

श्रीरामासी आडवे आले ॥ मनोवेगेंकरूनियां ॥ ३५ ॥ सांवळा पुरुष देदीप्यमान ॥ विशाळनेत्र सुहास्यवदन ॥ जटामुकुट मस्तकीं पूर्ण ॥ यज्ञोपवीत झळकतसे ॥ ३६ ॥ कांसेसी विराजे पीतांबर ॥ तडित्प्राय उत्तरीयवस्त्र ॥ परम आरक्त दिसती नेत्र ॥ कीं सहस्रकर उतरला ॥ ३७ ॥ धनुष्यास बाण लावून ॥ मार्गीं उभा ठाकला येऊन ॥ सोळा पद्मे दळ संपूर्ण ॥ कंपायमान जाहलें ॥ ३८ ॥ तीन सप्तकें जेणें फिरोनी ॥ निर्वीर केली अवनी ॥ अवघे राजे टाकिले आटोनी ॥ कीं प्रळयाग्नि दूसरा ॥ ३९ ॥ ऐसा तो महाराज जामदग्न्य ॥ क्षत्रियजलदजालप्रभंजन ॥ कीं हा कुठारपाणि भृगुनंदन ॥ वीरकानन निर्मूळ केलें ॥ २४० ॥ मार्गीं देखतां महाव्याघ्र ॥ भयभीत होती अजांचे भार ॥ तैसा देखतां रेणुकापुत्र ॥ शस्त्रें गळालीं बहुतांचीं ॥ ४१ ॥ गजबजला दळभार समस्त ॥ मिथिलेश्वर होय भयभीत ॥ स्त्रियांमाजी दडाला दशरथ ॥ म्हणे अनर्थ थोर मांडला ॥ ४२ ॥ तों वैराग्यगजारूढ रघुनाथ ॥ वरी निर्धार चवरडोल शोभत ॥ पुढें अनुभव बैसला महावत ॥ विवेकांकुश घेऊनियां ॥ ४३ ॥ ज्ञानाचे ध्वज फडकती ॥ चपळेऐसे सतेज तळपती ॥ विज्ञानमकरबिरुदें निश्चिती ॥ पुढें चालती स्वानंदें ॥ ४४ ॥ निवृत्तीच्या पताका ॥ पालविती मुमुक्षुसाधका ॥ रामनाम चिन्हांकित देखा ॥ दयावार्तें फडकती ॥ ४५ ॥ मनपवनाचे अश्वभार चालिले ॥ अनुसंधानवाग्दोरे लाविले ॥ विरक्तिपाखरेनें झांकिले ॥ अनुभवाचे सोडिले मुक्तघोंस ॥ ४६ ॥ चिद्रत्नजडित दिव्य रथ ॥ चाऱ्ही वाचा चक्रें घडघडित ॥ घोडे जुंपिले चाऱ्ही पुरुषार्थ ॥ सारथि तेथें आनंद पैं ॥ ४७ ॥ नामशस्त्रें घेऊन हातीं ॥ सोहंशब्दें वीर गर्जती ॥ क्षणें प्रपंचदळ विध्वंसिती ॥ नाटोपती कळिकाळा ॥ ४८ ॥ रामावरी अद्वयछत्र ॥ स्वानंदाचें मित्रपत्र ॥ तन्मय चामरें परिकर ॥ प्रेमकुंचे वरी ढाळिती ॥ ४९ ॥ हडपेकेरी शुद्धसत्व ॥ निजभक्तीचे विडे देत ॥ अष्टभाव सेवक तेथ ॥ राघवापुढें धांवती ॥ २५० ॥ अनुतापलघुचीर घेउनी ॥ मायिक धुरोळा वारी ते क्षणीं ॥ तर्क पिकपात्र घरूनी ॥ मुख विलोकिती रामाचें ॥ ५१ ॥ सौमित्र भरत शत्रुघ्न बंधू ॥ हेचि सच्चिदानंद आनंदू ॥ स्वरूपप्राप्तीचे कुंजर अभेदू ॥ तयांवरी आरूढले ॥ ५२ ॥ हिरे जडले दांतोदांतीं ॥ वरी मुक्तजाळिया मिरवती ॥ कामक्रोधांचे तरू मोडिती ॥ सहज जातां निजपंथें ॥ ५३ ॥ आशा तृष्णा कल्पना भ्रांती ॥ वाटे जातां गुल्मे छेदिती ॥ शुंडा हाणोनियां दांतीं ॥ कडे फोडिती विषयांचे ॥ ५४ ॥ मदमत्सरदंभपर्वत ॥ रथचक्रातळीं पिष्ट होत ॥ कुमतें पाषाण पिष्ट करीत ॥ रगडोन जाती घडघडां ॥ ५५ ॥ धैर्यतुरंग अलोट चपळ ॥ मायारणांगणीं तळपती सबळ ॥ वरी रामउपासक निर्मळ ॥ कळिकाळासी न गणिती ॥ ५६ ॥ शमदमांचे पायभार ॥ निष्कामखंडें झेलिती समग्र ॥ भवदळभंजन प्रतापशूर ॥ आत्मस्थितीं चालती ॥ ५७ ॥ अनुहतवाद्यें वाजती ॥ ऐकतां कुतर्कपक्षी पळती ॥ कर्मजाळवनचरें निश्चिती ॥ टाकोन जाती स्वस्थाना ॥ ५८ ॥ चौंही

४५ विजेसारखें. ४६ उपरणें, अंगावरील वस्त्र. ४७ क्षत्रियरूप मेघसमुदायाचा नाशक असा वारा. ४८ परशुराम. ४९ खुणेनें बोलावितात. ५० भावूच्या तारांचें बोलण्याकरितां विणून जें आच्छादन करितात तें. ५१ अवधागीर. ५२ विडा देणारे. ५३ चार वेद.

सांही अठरा जण ॥ रामासी वानिती बंदीजन ॥ चाम्ही मुक्ति आनंदेंकरून ॥ नृत्य करिती राघवापुढें ॥ ५९ ॥ वाटेसी अविद्या वहाती सरिता ॥ ते कोरडी जाहली दळ चालतां ॥ भाव निश्चय तत्त्वतां ॥ वेत्रधारी पुढें धांवती ॥ २६० ॥ सोहंभाव गर्जत ॥ वाटेसी द्वैतजनांतें निवारित ॥ पुढें भक्त स्वानंदें नाचत ॥ गुण वर्णित राघवाचे ॥ ६१ ॥ एक जाहले निःशब्द मुके ॥ ऐकती रामचरित्र कौतुकें ॥ एक अत्यंत बोलके ॥ एक समाधिसुखें डोलती ॥ ६२ ॥ ऐसा निजभारेंसीं रघुनंदन ॥ जो कौसल्याहृदय-मांदुसरत्न ॥ निजभार थोकला देखोन ॥ गजारूढ पुढें झाला ॥ ६३ ॥ तंव तो क्षत्रियांतक महावीर ॥ वडील अवतार ऋषिपुत्र ॥ कर जोडोनि नमस्कार ॥ करी तयातें राघव ॥ ६४ ॥ किंचित निवाला फरशधर ॥ मग बोले पंकजोद्भवपुत्र ॥ तुज देखोनि राघवेंद्र ॥ गजाखालीं उतरेना ॥ ६५ ॥ तूं वीर आणि विशेषें ब्राह्मण ॥ हा तुज कांहींच नेदी मान ॥ यथार्थ म्हणे भृगुनंदन ॥ लाविला बाण चापासी ॥ ६६ ॥ रघुपतीस म्हणे भृगुनंदन ॥ तूं क्षत्रिय म्हणवितोसी दारुण ॥ अधमा ताटिका स्त्री वधून ॥ अधर्म केला साच पैं ॥ ६७ ॥ स्त्री रोगी मूर्ख बाळ ॥ योगी याचक अशक्त केवळ ॥ पंकगतेंत अंध पांगुळ ॥ वृद्ध ब्राह्मण गाय गुरु ॥ ६८ ॥ ज्येष्ठबंधु माता पिता ॥ जो कां शस्त्र टाकोनि होय पळता ॥ इतुक्यांवरी शस्त्र उचलितां ॥ महादोष बोलिला असे ॥ ६९ ॥ म्हणोनि तूं अधम वीर ॥ स्त्रीहत्या केली साचार ॥ त्यावरी जानकीहृत्पद्मभ्रमर ॥ काय बोलता जाहला ॥ २७० ॥ म्हणे ताटिका नव्हे माझी माता ॥ तुवां मातृवध केला जाणतां ॥ यापरीस काय अधमता ॥ उरली असे सांग पां ॥ ७१ ॥ उंचवर्ण तूं ब्राह्मण ॥ सांडून अनुष्ठान तपाचरण ॥ तुज शस्त्र धरावया काय कारण ॥ राजहिंसा केलिया ॥ ७२ ॥ तूं ब्राह्मण परम पवित्र ॥ तुजवरी आम्हीं धरावें शस्त्र ॥ हें कर्म आम्हां अपवित्र ॥ ऋषिपुत्रा जाण पां ॥ ७३ ॥ ऐसें ऐकतां फरशधर ॥ सोडी तत्काळ निर्वाणशर ॥ इकडे कोदंडासी बाण रघुवीर ॥ लाविला परी सोडीना ॥ ७४ ॥ कल्पांतचपळेसारिखे जाण ॥ येती भार्गवाचे तीक्ष्ण बाण ॥ ते दृष्टीनें पाहतां सीताजीवन ॥ जाती वितळोनि क्षणार्धें ॥ ७५ ॥ जैसा झेंगडतां चंडपवन ॥ दीप सर्व जाती विझोन ॥ कीं शिवदृष्टीपुढें मदन ॥ न लागतां क्षण भस्म होय ॥ ७६ ॥ कीं प्रकटतां निर्वाणज्ञान ॥ मद मत्सर जाती पळोन ॥ कीं अद्भुत वर्षतां घन ॥ वणवा विझोन जाय जैसा ॥ ७७ ॥ जें जें येतसे अस्त्रजाळ ॥ तें तें दृष्टीनेंचि विरे सकळ ॥ भार्गव म्हणे हा तेंमाळनीळ ॥ क्षीराब्धिवासी अवतरला ॥ ७८ ॥ आमुची सीमा जाहली येथून ॥ खालीं ठेवी धनुष्यबाण ॥ तो गजाखालीं उतरोन सीताजीवन ॥ भेटावया धांविन्नला ॥ ७९ ॥ जैशा क्षीराब्धीच्या लहरी धांवती ॥ एकासी एक प्रीतीनें भेटती ॥ कीं अद्वैतशास्त्रींच्या श्रुती ॥ दोन्ही येती ऐक्यासी ॥ २८० ॥ राम फरशधर जेव्हां भेटले ॥ एकरूप दोघांचें वोतिलें ॥ कीं दोन्ही दीप एकचि जाहले ॥ तैसेंचि भासलें

५४ सहा शास्त्रें. ५५ अठरा पुराणें. ५६ मांदुस=पेटी, कपाट. ५७ थांबला. ५८ परशुराम. ५९ नारद. ६० श्रीराम. ६१ कल्पांतींच्या विजेप्रमाणें. ६२ लागतां. ६३ अद्वैतज्ञान. ६४ विष्णु.

जनांसी ॥ ८१ ॥ एकस्वरूप दोघे जण ॥ कालत्रयीं न होती भिन्न ॥ भृंगुपति रघुपति अभिधान ॥ परी दुजेपण असेना ॥ ८२ ॥ जेणें निर्दाळिले सकळ क्षत्री ॥ ते क्रोधज्योति होती अंतरीं ॥ ती रघुपतीच्या मुखाभीतरी ॥ प्रवेशली अकस्मात ॥ ८३ ॥ मग भार्गवासी म्हणे रघुनंदन ॥ म्यां जो चापासी लाविला बाण ॥ यास सागें कांहीं कारण ॥ कोणीकडे टाकूं आतां ॥ ८४ ॥ परशुराम म्हणे स्वर्गमार्ग ॥ निरोधोनि टाकीं सवेग ॥ मी चिरंजीव होऊनि सांगे ॥ तपाचरण करीन ॥ ८५ ॥ तों निमिष न लागतां गेला बाण ॥ टाकिला स्वर्गमार्ग रोधून ॥ चिरंजीव केला भृंगुनंदन ॥ हे कथा पूर्ण नाटकीं असे ॥ ८६ ॥ असो आज्ञा घेऊनि ते वेळां ॥ भार्गव बद्रिकाश्रमीं गेला ॥ जनकासी निरोप दिधला ॥ तोही गेला मिथिलेसी ॥ ८७ ॥ इकडे नरवीरपंचानन ॥ देवाधिदेव रघुनंदन ॥ दळभारेंसीं संपूर्ण ॥ अयोध्येसी पातला ॥ ८८ ॥ नगरांतून धांवती जन ॥ दृष्टीभरी पाहिला रघुनंदन ॥ साक्षात शेष नारायण ॥ अयोध्येंत प्रवेशती ॥ ८९ ॥ जें आत्मप्राप्तीचें स्थान ॥ तें अयोध्यानगर देदीप्यमान ॥ प्रथम दुर्ग स्थूळदेह जाण ॥ सूक्ष्म आंतूनि दूसरें ॥ २९० ॥ कारणदुर्ग जाणिजे तिजें ॥ पुढें महाकारण दुर्ग विराजे ॥ षट्चक्रांचीं गोपुरें सतेजें ॥ ठायीं ठायीं झळकती ॥ ९१ ॥ असो नगराबाहेरूनी ॥ चारी अवस्था चारी अभिमानी ॥ हुंडे झळकती पाहतां दुरोनी ॥ दिव्य तेज तळपतसे ॥ ९२ ॥ स्थूळ सूक्ष्म तत्त्वें बहुत ॥ या चर्या दाट झळकत ॥ पंच प्राण दशेंद्रियें तेथ ॥ वीर गर्जती ठायीं ठायीं ॥ ९३ ॥ भू नीर अनळ अनिळ निराळ ॥ हेचि भांडीं वरी विशाळ ॥ शमदमांचे वृक्ष वरी निर्मळ ॥ सदा सफळ विराजती ॥ ९४ ॥ रज तम अविद्या केर ॥ नगरांत नाहीं अणुमात्र ॥ श्रवणचंदनसडे निरंतर ॥ चहूंकडे घातले ॥ ९५ ॥ मननाचिया रंगमाळा ॥ घरोघरीं घातल्या निर्मळा ॥ शांतिकस्तूरीचा सुवास आगळा ॥ चहूंकडे येतसे ॥ ९६ ॥ निजध्यास तोरणें बहुत ॥ साक्षात्कार कळस झळकत ॥ कर्दळीस्तंभ विराजत ॥ मनोजयाचे चहूंकडे ॥ ९७ ॥ पूर्णानंदाचे कुंभ ॥ निजबोधें भरले स्वयंभ ॥ आत्मप्रकाश दीप सुप्रभ ॥ चहूंकडे लखलखित ॥ ९८ ॥ अयोध्यावासियांच्या गळां ॥ सदा डोलती सुमनमाळा ॥ दयेचा तांबूल रंगला ॥ चौथा मोक्षविशेष ॥ ९९ ॥ समाधि आणि सुलीनता ॥ सर्वांसी लाविल्या गंधाक्षता ॥ शुद्धसत्ववस्त्रें समस्तां ॥ मळ तत्त्वतां नसेचि ॥ ३०० ॥ चारी चौबारें बारा बिदी ॥ सोळा बाजार बाहत्तर सांदी ॥ चौदा दासी त्रिशुद्धी ॥ पाणी वाहती अयोध्येंत ॥ १ ॥ निरभिमानी चौसष्ट जणी ॥ सदा विलसती श्रीरामसदनीं ॥ आणिक एक चारी आठ जणी ॥ प्रीतिकरोनि रावती ॥ २ ॥ अष्टभावमखरें कैंडोविकडी ॥ नव महाद्वारें तेथें उघडीं ॥ ऊर्ध्वमुख निजप्रौढीं ॥ दशमद्वार झांकिलें ॥ ३ ॥ अष्टांगयोगी रामभक्त ॥ तेचि त्या द्वारें

---

६५ भार्गवराम, परशुराम. ६६ वाल्मिकी रामायणात. ६७ शूरांच्या समुदायामध्यें सिंहासारखा. ६८ सुषुप्तीतील कारणदेह. ६९ तुरीयावस्थेतील साक्षी. ७० वाडे, किल्ले. ७१ कलश. ७२ सायुज्यता ही चौथी मुक्ति. ७३ जिकडे तिकडे.

येत जात ॥ आणिकांस तो न सांपडे पंथ ॥ असे गुप्त सर्वदा ॥ ४ ॥ चौंतुर्दश रत्नें साधोनि वृंत्रारी ॥ जैसा प्रवेशे अमरपुरीं ॥ कौसल्यात्मज ते अवसरीं ॥ तैसा अयोध्येंत प्रवेशला ॥ ५ ॥ सफळ देखोनि दिव्य द्रुमें ॥ बहुत धांवती विहंगम ॥ तैसा पहावया आत्माराम ॥ नगरजन धांवती ॥ ६ ॥ देव वर्षती सुमनसंभार ॥ घडकत वाद्यांचा गजर ॥ मंडपघसणी झाली थोर ॥ श्रीराम पाहावयाकारणें ॥ ७ ॥ देखोनियां रामचंद्र ॥ वेधले जननयनचकोर ॥ उचंबळला सुरसमुद्र ॥ प्रेमभरतें दाटलें ॥ ८ ॥ कीं श्रीराम देखतां दिनमणी ॥ टवटवल्या निजभक्तकमळिणी ॥ सकळ लोकां अलंकारलेणीं ॥ राघवेंद्रें दीधलीं ॥ ९ ॥ भांडारें फोडोनि दशरथें ॥ निजधन वांटिलें याचकांतें ॥ गजारूढ बंदीजन तेथें ॥ सूर्यवंश वाखाणिती ॥ ३१० ॥ निजात्मसदनीं रघुनाथ ॥ सीतेसहित प्रवेशे समर्थ ॥ तनमनधनेंसीं यथार्थ ॥ मूद वरोन ओंवाळिजे ॥ ११ ॥ रामविजय ग्रंथ प्रचंड ॥ येथें संपलें बालकांड ॥ पुढें अयोध्याकांड परम गोड ॥ श्रवणें कोड पुरवी पैं ॥ १२ ॥ अग्राकडोनि इक्षुदंडें ॥ मूळाकडे विशेष गोड ॥ सप्तकांड तैसा हा इक्षुदंड ॥ बहुत रसाळ पुढें पुढें ॥ १३ ॥ पापपर्वत जडभार ॥ रामविजय त्यावरी वज्र ॥ संतश्रोते पुरंदरें ॥ चूर्ण करिती निजबळें ॥ १४ ॥ श्रीमद्भीमातटविलासा ॥ ब्रह्मानंदा पंढरीशा ॥ श्रीधरवरदा पुराणपुरुषा ॥ अभंगा अविनाशा अक्षया ॥ १५ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत श्रोते चतुर ॥ अष्टमाध्याय गोडा हा ॥ ३१६ ॥ ॥ अध्याय ॥ ८ ॥ ॥ ओंव्या ॥ ३१६ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

## ॥ इति बालकांड ॥

७४ लक्ष्मी, कौस्तुममणि, परिजातक, सुरा, धन्वन्तरी, चंद्रमा, कामधेनु, ऐरावत, गज, रंभादि अप्सरा, सात मुखांचा घोडा, कालकूटविष, शार्ङ्गधनुष्य, शंख आणि अमृत ही चौदा रत्नें. ७५ वृत्रशत्रु इंद्र. ७६ वृक्ष. ७७ सूर्य. ७८ टोंकापेक्षां. ७९ ऊंस. ८० इंद्र.



श्रीगणेशाय नमः ॥ श्रीरामचंद्राय नमः ॥ श्रीगुरवे नमः ॥ श्रीदत्तात्रेयाय नमः ॥ नमूं श्रीगुरु ब्रह्मानंद ॥ जो जगदंकुरमूळकंद[१] ॥ जो निजजनतारक प्रसिद्ध ॥ कैवल्यदाता[२] सुखाब्धि ॥ १ ॥ जो योगद्वीपींचें[३] निधान ॥ जो वैराग्यवल्लीचें सुमन[४] ॥ कीं वेदांतसमुद्रींचा मीन[५] ॥ आत्मजीवनीं तळपतसे ॥ २ ॥ कीं तो धर्ममेरूचें शिखर ॥ कीं चिदाकाशींचा जलधर[६] ॥ कीं कृपासागरींचें सुंदर ॥ दिव्य रत्न प्रकटलें ॥ ३ ॥ कीं शांतीचें चंद्रमंडळ ॥ कीं सत्यतेजें सूर्य केवळ[७] ॥ कीं सत्वसरोवरींचें कमळ ॥ किंवा सुफळ आनंदवृक्ष ॥ ४ ॥ कीं क्षमामलयपर्वत पूर्ण ॥ कीं निर्विकार दिव्य चंदन ॥ मुमुक्षुफणिवर[८] वेष्टून ॥ सर्वदाही बैसले ॥ ५ ॥ कीं शुद्धब्रह्मभागीरथीजळ ॥ तेथींचा लोट अति निर्मळ ॥ भक्ति विरक्ति ज्ञान केवळ ॥ तीर्थराज अवतरला ॥ ६ ॥ ऐसा महाराज श्रीगुरुनाथ ॥ त्यासी परिसाचा देऊं दृष्टांत ॥ तो लोहाचें सुवर्ण करीत ॥ परी आपणाऐसें न करवे ॥ ७ ॥ सुरभि चिंतामणि साचार ॥ कल्पवृक्ष म्हणावा उदार ॥ तरी तो कल्पिलेंचि देणार ॥ परी आपणाऐसें न करवे ॥ ८ ॥ जनकजननींची उपमा कैसी ॥ द्यावी आतां सद्गुरूसी ॥ तीं जन्मदायक निश्चयेंसीं ॥ परी हा जन्ममरणासी दूर करी ॥ ९ ॥ चौऱ्यांयशीं लक्ष योनि अमूप ॥ सर्वांठायीं असती मायबाप ॥ परी सद्गुरु दुर्लभ चित्स्वरूप ॥ जन्मोजन्मीं कैंचा तो ॥ १० ॥ जो भवेंधनदाहक वैश्वानर[११] ॥ अज्ञानतिमिरच्छेदक दिवाकर[१२] ॥ कीं दुःखपर्वतभंजन पुरंदर[१३] ॥ बोधवज्र झळके वरी ॥ ११ ॥ ऐसा महाराज गुरुनाथ ॥ त्यासी शिष्य विरक्त शरणागत ॥ भ्रमर पद्मकोशीं[१४] बैसत ॥ तैसे लुटित चरणरज ॥ १२ ॥ कीं स्फुलिंग[१५] मिळे अर्मीत ॥ कीं जळबिंदु पडे सरोवरांत ॥ कीं सरिता[१६] सागरीं ऐक्य होत ॥ ऐसे भक्त गुरुचरणीं ॥ १३ ॥ कीं मुशींत आटिले अलंकार ॥ कीं जळीं विरे जळगार ॥ कीं तरंग मोडून साचार ॥ एक नीर[१७] उरे पैं ॥ १४ ॥ ऐसे गुरुचरणीं मिळोन ॥ गुरुदास्य करिती अनुदिन ॥ क्षीराब्धीमाजी उपमन्य[१८] ॥ विलसे जैसा सर्वदा ॥ १५ ॥ कीं जान्हवींत मणिकर्णिका तीर्थ ॥ कीं भीमेंत चंद्रभागा विख्यात ॥ तैसे भजनगंगेंत यथार्थ ॥ गुरुभक्त वंद्य पैं ॥ १६ ॥ ऐसें ऐकतां गुरुस्तवन ॥ परम आनंदले संतजन ॥ धन्य रे धन्य म्हणोन ॥ तर्जनी[१९] मस्तक डोलविती ॥ १७ ॥ ऐसें देखोनि श्रीधरें ॥ नमस्कार घातला प्रेमादरें ॥ म्हणे तुम्ही रामकथामृतपात्रें ॥ सादर श्रवणीं बैसलां ॥ १८ ॥ तुम्ही ज्ञानगंगेचे ओघ निर्मळ ॥ कीं विवेकभूमीचीं निधानें केवळ ॥ कीं कृपार्णवींचीं जहाजें सबळ ॥ क्षमाशीड वरी तळपे ॥ १९ ॥ कीं नवविध भक्तीचीं दिव्य द्वीपें सुंदरें ॥ कीं अनुभवशास्त्रींचीं मंदिरें ॥ कीं पिकलीं आनंदक्षेत्रें ॥ समसमान चहूंकडे ॥ २० ॥ परोपकारनभींचीं नक्षत्रें निर्मळ ॥ परम गुणप्रिय मुक्तमराळें[२०] ॥ कीं शब्दरत्नग्राहक सकळ ॥ या ग्रंथश्रवणीं मिळाले ॥ २१ ॥ कीं रामकथाकमळिणीचे

१ जगाच्या उत्पत्तीला मूळ कारण. २ मोक्ष देणारा. ३ अष्टांगयोगरूप बेटांतील ठेवा. ४ पुष्प. ५ मासा. ६ मेघ. ७ सूर्य. ८ कामधेनु. ९ सद्गुरु. १० संसाररूप काष्ठांना जाळणारा. ११ अग्नि. १२ सूर्य. १३ इंद्र. १४ कमळाच्या मध्यकर्णिकेंत. १५ ठिणगी. १६ नदी. १७ पाणी. १८ उपमन्यु, व्याघ्रपाद ऋषीचा ज्येष्ठ पुत्र, धौम्याचा थोरला भाऊ, ह्यानें ईश्वराराधन करून आकल्प आयुष्य व क्षीरसागराचें आधिपत्य अशीं संपादन केलीं. १९ आंगठ्याजवळचें बोट. २० मोत्याचा चारा खाणारे राजहंस.

भ्रमर ॥ कीं अवधानदाते[२१] जलधर[२२] ॥ माझे शब्द औरुष[२३] निर्धार ॥ परी तुम्हीं प्रीति ठेविली ॥ २२ ॥ रानपक्षी शुक यथार्थ ॥ त्याचे शब्द ऐकतां तटस्थ ॥ होती शास्त्रज्ञ पंडित ॥ तैसेंचि येथें जाहलें ॥ २३ ॥ कीं बोबडें बोलतां बालक ॥ अत्यंत संतोषे जनक ॥ तैसें शब्दांचें कौतुक ॥ संतजन करिती पैं ॥ २४ ॥ तरी आतां इतुकेंच करा सत्वर ॥ सादरता हे दिव्य अलंकार ॥ मजलागीं देऊन साचार ॥ संतजनीं गौरवावें ॥ २५ ॥ वक्त्रौं[२४]-क्षेत्र पिकलें पूर्ण ॥ परी सादरता पाहिजे वरी घन[२५] ॥ चित्तव्याकुळता हें अवर्षण ॥ तेणें मोडें[२६] करपती ॥ २६ ॥ बोलती संत श्रोते चतुर ॥ तुझीं वचनें हा सुधाकर[२७] ॥ येणें आमुचे कर्णचकोर ॥ तृप्त जाहले निर्धारें ॥ २७ ॥ असो आतां वाग्वल्ली[२८] सुंदरी ॥ चढे अयोध्याकांडमंडपावरी ॥ तेथींचीं फळें निर्धारीं ॥ भक्तचतुरीं सेविजे ॥ २८ ॥ मागें अष्टमाध्यायीं कथन ॥ जानकी परिणिली कोदंड भंगोन ॥ त्यावरी भृगुपती[२९]चा दर्प हरोन ॥ रघुपति आला अयोध्ये ॥ २९ ॥ कैकयीचा बंधु विख्यात ॥ परम प्रतापी संग्रामजित ॥ मान देऊनि बहुत ॥ लग्नासी आणिला दशरथें ॥ ३० ॥ मिथिलेचा लग्नसोहळा पाहून ॥ अयोध्येसी आला परतोन ॥ कैकयीस म्हणे भरत शत्रुघ्न ॥ नेऊं आपुले ग्रामातें ॥ ३१ ॥ ऐकोनि बंधूचें वचन ॥ येरी म्हणे अवश्य जा घेऊन ॥ परी रायातें पुसोन ॥ मग दोघांतें नेइंजे ॥ ३२ ॥ दशरथास पुसे संग्रामजित ॥ मास एक शत्रुघ्न आणि भरत ॥ स्वराज्यासी नेऊन त्वरित ॥ आणून मागुती पोंचवूं ॥ ३३ ॥ अवश्य म्हणोनि अजसुत[३०] ॥ कैकयी भरतासी सांगत ॥ तुवां मातुळगृहासी जावें त्वरित ॥ शत्रुघ्नासी घेऊनियां ॥ ३४ ॥ भरत म्हणे श्रीरामावांचून ॥ मज न गमे एकही क्षण ॥ रघुपतीचे सेवेविण ॥ न रुचे मज आन कांहीं ॥ ३५ ॥ श्रीराम चंद्र मी चकोर ॥ मी चातक रघुवीर अंबुधर[३१] ॥ राम सुरभि[३२] मी वत्स साचार ॥ वियोग सहसा सोसेना ॥ ३६ ॥ श्रीरामसेवा सांडोन ॥ इतर सुखें इच्छी कोण ॥ पीयूषतुल्य[३३] अन्न टाकून ॥ कोण वमन[३४] विलोकी ॥ ३७ ॥ मुक्ताफळें हंस टाकोन ॥ प्राणांतींही न भक्षी शेण ॥ कल्पद्रुमींचा विहंगम[३५] जाण ॥ बाभुळेवरी न बैसे ॥ ३८ ॥ घृतमधुदुग्धसरोवर ॥ जरी सुरसें भरलें अपार ॥ परी जीवन सांडूनि जळचर ॥ कदा तेथें न जाती ॥ ३९ ॥ ऐसें बोलतां भरत ॥ नेत्रीं आले अश्रुपात ॥ माता म्हणे एक मासपर्यंत ॥ क्रमोनि येईं सवेंचि ॥ ४० ॥ नुलंघवे मातृवचन ॥ भरत श्रीरामास पुसे येऊन ॥ मग बोले जानकीमनमोहन ॥ बा रे लौकरी येइंजे ॥ ४१ ॥ भरतशत्रुघ्नांनीं ते वेळे ॥ रघुवीरचरण वंदिले ॥ चतुरंग दळ[३६] सिद्ध जाहलें ॥ रथीं बैसले दोघेही ॥ ४२ ॥ राया दशरथाचे कुमर ॥ श्रीरामचरणाब्जभ्रमर[३७] ॥ मातुळग्रामासी सत्वर ॥ दळभारेंसीं पातले ॥ ४३ ॥ इकडे अयोध्येसी रामलक्ष्मण ॥ सर्वदा करिती गुरुसेवन ॥ तैसेचि दशरथार्चे भजन ॥ रघुनंदन करीतसे ॥ ४४ ॥ वसिष्ठमुखें नित्य विद्याश्रवण ॥ श्रीराम करीतसे आपण ॥ चतुःषष्टि[३८]कलाप्रवीण ॥ रघुनंदन जाहला ॥ ४५ ॥ मग धनुर्विद्येचा अभ्यास ॥

२१ अनुसंधान राखणारे. २२ मेघ. २३ प्राकृत. २४ वक्त्ररूपी शेत. २५ अंकुर. २६ चंद्र. २७ वाणीरूप वेल. २८ परशुरामाचा. २९ दशरथ. ३० कामधेनु. ३१ अमृतासमाणें. ३२ ओंकारी. ३३ पक्षी. ३४ सैन्य. ३५ श्रीरामचरणरूपी कमळांतील भुंगा. ३६ चौसष्ट.

करिता जाहला परमपुरुष ॥ रंगभूमि साधूनि विशेष ॥ युद्धकळा शिके तेथें ॥ ४६ ॥ वेणुमस्तकीं घालितां कुंठार[३७] ॥ चिरत जाय जैसा दूर ॥ तैशी श्रीरामबुद्धि तीव्र ॥ तर्क अपार पावतसे ॥ ४७ ॥ वसिष्ठ धनुष्यबाण घेऊन ॥ जें जें मांडून दावी ठाण ॥ त्याहून विशेष रघुनंदन ॥ दावी करून गुरूसी ॥ ४८ ॥ अस्त्रशस्त्रविद्याप्रवीण ॥ जाहले राम आणि लक्ष्मण ॥ ते परीक्षा पाहावया अंजनंदन[३८] ॥ रंगमंडपीं बैसला ॥ ४९ ॥ रंगमंडपाची रचना ॥ न वर्णवेचि सिंहस्थवदना[३९] ॥ तें तेज विलोकितां सिंहस्थकिरणा[४०] ॥ परमाश्चर्य वाटतसे ॥ ५० ॥ शशींकप्रभेसम पूर्ण[४१] ॥ कोरिले काश्मीर पाषाण ॥ त्यांची पोंवळी प्रभा घन ॥ सभोंवतीं रचियेली ॥ ५१ ॥ त्यामाजी सप्तरंगी पाषाण ॥ चक्रजाळ्या चौकटी पूर्ण ॥ माजी घातल्या दारुणं[४२] ॥ पाहतां आश्चर्य वाटतसे ॥ ५२ ॥ साधिलें पाचुबंद अंगण ॥ गरुडपाचूंचीं जोतीं पूर्ण ॥ निळ्याचे गज घडोन ॥ तेंचि तोळंबे लाविले ॥ ५३ ॥ त्यावरी हिरेयाचे स्तंभ ॥ वरी वैडूर्यउथाळीं स्वयंभ ॥ सुवर्णाचीं तुळवटें सुप्रभ ॥ लंबायमान पसरलीं ॥ ५४ ॥ गरुडपाचूचे दांडे विराजती ॥ आरक्त माणिकफिलचा झळकती ॥ चर्या शेषफणाकृती ॥ जैसे गर्भस्ती वळीनें[४३] ॥ ५५ ॥ एकावरी एक नवखण ॥ तेथें रात्रीस नाहीं कारण ॥ जेथें गरुडपाचूचे रावे[४४] पूर्ण ॥ शब्द करिती नवल हें ॥ ५६ ॥ निळ्याचे मयूर धांवती ॥ रत्नांचीं गोलें[४५]गुलें नाचती ॥ छप्पन्न देशींच्या नृपाकृती ॥ चित्रें भिंतीवरी पैं ॥ ५७ ॥ खांबसूत्रींच्या पुतळिया ॥ नाचती गिरक्या घेऊनियां ॥ नृसिंहमूर्ति स्तंभांतूनियां ॥ हुंकारती क्षणक्षणां ॥ ५८ ॥ ऐशिया रंगमंडपांत ॥ बैसता जाहला द्विपंचरथ[४६] ॥ वसिष्ठादि ऋषी समस्त ॥ अष्टाधिकारी आणि प्रजा ॥ ५९ ॥ मंडपजाळीवाटे तत्त्वतां ॥ पाहती कौसल्यादि माता ॥ श्रीरामें विद्या साधिल्या समस्ता ॥ देखावया आस्था सकळांची ॥ ६० ॥ जैसा नक्षत्रांमाजी अत्रिसुत[४७] ॥ तैसा सभेसी राजा दशरथ ॥ इंद्राजवळी बृहस्पति बुद्धिमंत ॥ तसा वसिष्ठ बैसला ॥ ६१ ॥ असो रंगमंडपापुढें दोघे जण ॥ श्रीराम आणि लक्ष्मण ॥ पाचुबंद अंगणीं येऊन ॥ उभे ठाकले तेधवां ॥ ६२ ॥ जैसे शशी आणि चंडकिरण ॥ कीं अपर्णावर आणि रमारमण ॥ कीं मेरुमांदार स्वरूपें धरून ॥ उभे ठाकले रणांगणीं ॥ ६३ ॥ साक्षात शेषनारायण ॥ अवतारपुरुष दोघे जण ॥ अनंत जन्मींचें तपाचरण ॥ दशरथाचें फळा आलें ॥ ६४ ॥ कोटिकंदर्पलावण्यखाणी[४८] ॥ तेजासी उणा वासरमणी[४९] ॥ कीं अनंत विजा पिळूनी ॥ रामरूप वोतलें ॥ ६५ ॥ तो लावण्यामृतसागर ॥ आजानुबाहु श्रीरघुवीर ॥ गुरु आणि पितयासी नमस्कार ॥ करोनि शस्त्रें वंदिलीं ॥ ६६ ॥ नानावाहनीं आरूढोनि रघुपती ॥ दावी युद्धाच्या अगाध रीती ॥ रथ फिरवी नानागतीं ॥ विस्मित पाहती जन सर्व ॥ ६७ ॥ मग दावी कुंजरयानफेरी[५०] ॥ सवेंचि तुरंगीं[५१]रूढ होय झडकरी ॥ रथचमक दावी नानापरी ॥ अलातचक्र[५२] जैसें कां ॥ ६८ ॥ चरणयुद्ध अस्त्रयुद्ध ॥ शस्त्ररीति नानाविध ॥ मल्लमेषकुंजर-

३७ कुऱ्हाड. ३८ दशरथ. ३९ शेषाला. ४० सूर्याला. ४१ चंद्र. ४२ बळकट. ४३ सूर्य. ४४ ओळीनें. ४५ पोपट. ४६ मर्कटें, एक जातीचें वानर. ४७ दशरथ. ४८ चंद्र. ४९ मदन. ५० सूर्य. ५१ हत्तीचे वाहनांतून फेरी. ५२ घोड्यावर स्वार. ५३ कोलीत चक्राकृति फिरविलें असतां चक्रासारखा आकार दिसतो तें.

युद्ध ॥ व्याघ्रसिंहयुद्धगती ॥ ६९ ॥ कूर्मवृषभनक्रयुद्ध ॥ जलमंडलयुद्ध विशद ॥ अंतरिक्ष भूमि गदा प्रसिद्ध ॥ सकळ कलायुद्ध दाविलें ॥ ७० ॥ शक्ति पाशुपत तोमर ॥ शूल परिघ लहुडी चक्र ॥ कंदुक भिंडिमाळा वज्र ॥ दावी रघुवीर गति त्यांची ॥ ७१ ॥ पाश असिलता मुद्गल ॥ शैंतघ्नी फरशांकुल कुंत सरळ ॥ यमदंष्ट्रा शब्दयुद्ध सबळ ॥ यंत्रमंत्रयुद्धगती ॥ ७२ ॥ नेत्र झांकोनि सोडी बाण ॥ पुढें पाहे मागें भेदी जाण ॥ दळसिंधुपरतटाकगमन ॥ राजीवनयन दावीतसे ॥ ७३ ॥ एक सोडितांचि बाण ॥ कोट्यवधि व्हावे त्यापासून ॥ सकळ चमूचें शिरच्छेदन ॥ एकाचि बाणें करावें ॥ ७४ ॥ अग्न्यस्त्र पर्जन्यास्त्र ॥ वात पर्वत आणि वज्र ॥ माया ब्रह्म माहेश्वर ॥ भूतास्त्र भैरवास्त्र पैं ॥ ७५ ॥ सिंह सर्प आणि गरुडास्त्र ॥ काम वैराग्य तारकासुर ॥ पाप नाम गंधर्वास्त्र ॥ दावी रघुवीर अस्त्रें हीं ॥ ७६ ॥ ब्रह्मशिरो विश्वजित ॥ या अस्त्रगती दावी रघुनाथ ॥ तैसेंच करी सुमित्रासुतें ॥ मान दशरथ डोलवी ॥ ७७ ॥ वसिष्ठ उठोनि ते अवसरीं ॥ श्रीरामसौमित्रांसी हृदयीं धरी ॥ दशरथाचा आनंद अंबरीं ॥ न समाये तेव्हां सर्वथा ॥ ७८ ॥ सभा विसर्जून दशरथ ॥ वसिष्ठ सौमित्र रघुनाथ ॥ प्रवेशते जाहले सदनांत ॥ आनंदयुक्त सर्वही ॥ ७९ ॥ यावरी एके दिवशीं अजनंदन ॥ दर्पणीं विलोकी निजवदन ॥ तों दाढींत शुभ्र केश देखोन ॥ काय बोलता जाहला ॥ ८० ॥ म्हणे शीघ्र बोलवा ब्रह्मनंदन ॥ अष्टाधिकारी ऋषी प्रजाजन ॥ सकळ व्यवहारी वैश्यजन ॥ विवेकसंपन्न थोर थोर ॥ ८१ ॥ सकळांसी बैसवोनि एकांतीं ॥ निजगुह्य पुसे कौसल्यापती ॥ म्हणे राज्य द्यावें रामाप्रती ॥ ऐसें चित्तीं वाटतसे ॥ ८२ ॥ राज्यासी योग्य रघुनायक ॥ जो गुणसमुद्र प्रतापार्क ॥ जो धीर वीर उदार देख ॥ लावण्यसागर श्रीराम ॥ ८३ ॥ अनंतजन्मींच्या तपाचें फळ ॥ तो हा श्रीराम तमालनीळ ॥ राज्य द्यावें हो तत्काळ ॥ सुमुहूर्त वेळ पाहोनियां ॥ ८४ ॥ ऐकोनि दशरथाचें वचन ॥ संतोषला ब्रह्मनंदन ॥ मानवले समस्त प्रजाजन ॥ म्हणती धन्य धन्य दशरथा ॥ ८५ ॥ वसिष्ठादि ऋषि समस्त ॥ पाहोनि उत्तम सुमुहूर्त ॥ चैत्रमास अतिविख्यात ॥ गुरुपुष्ययोग साधिला ॥ ८६ ॥ श्रीरामासी द्यावया राज्यपट ॥ सुमुहूर्त नेमिला अतिवरिष्ठ ॥ सर्व सामग्री वसिष्ठ ॥ सिद्ध करिता जाहला पैं ॥ ८७ श्वेतवर्ण चौदंती[६३] गज ॥ क्षीरवर्ण आणिला हयराज[६४] ॥ छत्रचामरें तेजःपुंज ॥ मृगांकवर्ण साजिरीं ॥ ८८ ॥ पंचपल्लव सप्तमृत्तिका परिकर ॥ चतुःसमुद्रींचें आणिलें नीर ॥ दिव्य सिंहासन पवित्र ॥ नूतन छत्र निर्मिलें ॥ ८९ ॥ दिव्य मंडप निर्मून ॥ तेथें मांडिलें सिंहासन ॥ जपासी बैसविले दिव्य ब्राह्मण ॥ वेदोनारायण साक्षात ॥ ९० ॥ छप्पन्न देशींचे राजेश्वर ॥ शाण्णव कुळींचे राजकुमर ॥ ते येते जाहले समग्र ॥ अपार करभार घेऊनियां ॥ ९१ ॥ आनंदमय अयोध्यानगर ॥ सदनें[६६] शृंगारिलीं सुंदर ॥ अयोध्यावासी नारी नर ॥ मंडित समग्र अलंकारें ॥ ९२ ॥ राजमंदिरें शृंगारिलीं विशेष ॥ वरी झळकती रत्नजडित

५४ तोफा. ५५ अस्त्रविद्या. ५६ सेनासमुद्र सोडून पार जाणें. ५७ लक्ष्मण. ५८ गगनांत. ५९ आरशांत. ६० वसिष्ठ. ६१ प्रतापाचा सूर्य. ६२ सिंहासन. ६३ चार दांतांचा. ६४ श्रेष्ठ घोडा. ६५ चंद्राप्रमाणें धवल. ६६ घरें.

कळस ॥ उर्णे आणिती उडुगणांस ॥ रजनीमाजी स्वतेजें ॥ ९३ ॥ एकांतीं बोलावूनि रघुनाथ ॥ गुह्य गोष्टी सांगे दशरथ ॥ म्हणे बा रे मज ग्रहपीडा आली बहुत ॥ काळ विपरीत पुढें दिसे ॥ ९४ ॥ अष्टमस्थानीं शनैश्चर निश्चितीं ॥ द्वादशस्थानीं जाण बृहस्पती ॥ बा रे मज मृत्युचिन्हें जाणवती ॥ बैसें रघुपति सिंहासनीं ॥ ९५ ॥ रामा तुझी मज वाटे खंती ॥ मज टाकोनियां रघुपती ॥ दूरी जाशील निश्चितीं ॥ हेंचि चित्तीं वाटतसे ॥ ९६ ॥ तरी लावण्यामृतसागरा ॥ तमालनीला राजीवनेत्रा ॥ श्रीरामा घनश्यामगात्रा ॥ राज्यभारा चालवीं ॥ ९७ ॥ श्रीरामें वंदिले पितृचरण ॥ म्हणे मज आज्ञाचि प्रमाण ॥ रामसीतेसी उपोषण ॥ करवी वसिष्ठ ते दिवशीं ॥ ९८ ॥ रघुनाथाहातीं दानें ॥ अपार करविलीं ब्रह्मनंदनें ॥ राम जानकी दोघें जणें ॥ कुशासनीं पैंहुडविलीं ॥ ९९ ॥ जो पुराणपुरुष परब्रह्म ॥ तयाहातीं ऋषि करवी होम ॥ आहुती घाली पुरुषोत्तम ॥ दृष्टांत उत्तम ऐका ते ॥ १०० ॥ चकोराचे मुखीं अमृतधार ॥ वर्षे जैसा रोहिणीवर ॥ कीं धेनु पान्हा घाली सत्वर ॥ वत्सासी तृप्त व्हावया ॥ १ ॥ कीं बाळकाचिया मुखांत ॥ माता स्तन्यानें करी तृप्त ॥ कीं जलद बिंदु टाकी अकस्मात ॥ चातकमुखीं कृपेनें ॥ २ ॥ ऐसीं अवदानें राम टाकित ॥ घूर्म्ये नेत्र जाहले आरक्त ॥ यज्ञनारायण जाहला तृप्त ॥ राघवहस्तेंकरोनियां ॥ ३ ॥ जैसी गौतमी आणि भागीरथी ॥ तैसी कौसल्या आणि सुमित्रा सती ॥ विप्रांसी दानें अपार देती ॥ आनंद चित्तीं न समाये ॥ ४ ॥ दशरथासी विनवी लक्ष्मण ॥ मी श्रीरामसेवा करीन ॥ ऐकोनि संतोषे अजनंदन ॥ कुरवाळी वदन सौमित्राचें ॥ ५ ॥ अयोध्यानगर वेष्टोनि जाणा ॥ उतरल्या राजयांच्या पृतना ॥ कोण करी तयांची गणना ॥ पाहतां नयनां भुलवणी ॥ ६ ॥ श्रीराम बैसे राज्यपदीं ॥ तो सोहळा पाहावया दृष्टीं ॥ सकळ सुरवरांच्या कोटी ॥ विमानारूढ पाहती ॥ ७ ॥ तंत वितंत घन सुस्वर ॥ चतुर्विध वाद्यांचे गजर ॥ नादें कोंदलें अंबर ॥ चिंतातुर सुर जाहले ॥ ८ ॥ निर्जर विनविती कमलोद्भवा ॥ दशरथ राज्य समर्पी राघवा ॥ आमुचे बंदिसुटकेचा बरवा ॥ विचार कांहीं दिसेना ॥ ९ ॥ इंद्रपदातुल्य राज्य अपूर्व ॥ तें सोडोनियां सीताधव ॥ कासया येईल दशग्रीव ॥ वधावयाकारणें ॥ ११० ॥ जरी तो मंगलभगिनीचा वर ॥ भक्तालागीं जाहला साकार ॥ तरी तपोवना येईल रघुवीर ॥ ऐसा विचार योजावा ॥ ११ ॥ मग विरिंचि सांगे विकल्पासी ॥ तुवां सत्वर जावें अयोध्येसी ॥ प्रवेशावें कैकयीच्या मानसीं ॥ विघ्न राज्यासी करावें ॥ १२ ॥ विकल्प म्हणे ते वेळां ॥ अयोध्येमाजी परम सोहळा ॥ दुःख द्यावयासी सकळां ॥ माझेनि तेथें न जावचे ॥ १३ ॥ माझा प्रवेश होतां तेथ ॥ बहुतांसी होईल प्राणांत ॥ मांडेल एकचि अनर्थ ॥ माझेनि तेथें न जावचे ॥ १४ ॥ शीतळ होइल वडवानळ ॥ मधुरता धरील हालाहळ ॥ परी मज विकल्पाचें बळ ॥ क्षीण नव्हे कल्पांतीं ॥ १५ ॥ देव म्हणती तुजविण ॥ हें कार्य साधील कवण ॥ आम्हां सोडवीं वंदींतून ॥

६७ नक्षत्रांना. ६८ कमललोचना. ६९ दर्भाच्या आस्तरणावर. ७० निजविलीं. ७१ चंद्र. ७२ मेघ. ७३ गोदावरी. ७४ सेना. ७५ आकाश. ७६ देव. ७७ सीतापति श्रीराम.

घेईं पुण्य तूं एवढें ॥ १६ ॥ ऐसें ऐकतांचि वचन ॥ विकल्प निघाला तेथून ॥ जवळ केलें अयोध्यापट्टण ॥ परी भीतरी न जाववेचि ॥ १७ ॥ अयोध्यावासी पुण्यशीळ ॥ सत्यवादी सात्त्विक प्रेमळ ॥ ज्यांकडे पाहों न शके काळ ॥ तेथें विकल्प प्रवेशेना ॥ १८ ॥ ज्यांसी वेदाज्ञा वाटे प्रमाण ॥ नेणती परांचे दोषगुण ॥ सदा सारासारविचारश्रवण ॥ तेथें विकल्प बाधेना ॥ १९ ॥ जे निःसीम गुरुभक्त ॥ जे मातापित्यांसी भजत ॥ जे अनन्य ब्राह्मणांसी वंदित ॥ तेथें विकल्प बाधेना ॥ १२० ॥ सदा आवडे हरिभजन ॥ श्रवण मनन हरिकीर्तन ॥ परद्रव्य ज्या तृणासमान ॥ तेथें विकल्प बाधेना ॥ २१ ॥ दया उपजे देखतां दीन ॥ अंध पंगु वृद्ध क्षीण ॥ त्यांसी पाववी वस्त्र अन्न ॥ तेथें विकल्प बाधेना ॥ २२ ॥ परललना मातृवत ॥ जे वादप्रतिवादीं मुके होत ॥ जे ईश्वररूप पाहती संत ॥ तेथें विकल्प बाधेना ॥ २३ ॥ सर्वांभूतीं एक रघुनाथ ॥ ऐसी जयांसी पूर्ण प्रचीतें ॥ प्रपंचीं वर्ततां विरक्त ॥ तेथें विकल्प बाधेना ॥ २४ ॥ जे ब्रह्मानंदीं पूर्ण धाले ॥ जे आपणां आपण विसरले ॥ तेथें विकल्पाचें बळ न चले ॥ कल्पांतींही सर्वथा ॥ २५ ॥ असो पुण्यवंत अयोध्येचे जन ॥ त्यांसी विकल्प पळे देखतां दुरून ॥ प्रवेशावया अयोध्यापट्टण ॥ सामर्थ्य नव्हे सहसाही ॥ २६ ॥ तों कैकयीची दासी मंथरा ॥ ते पूर्वीच द्वेषी रघुवीरा ॥ परम पापिणी सीतावरा ॥ सर्वदाही निंदीतसे ॥ २७ ॥ प्रातःकाळीं अहल्योद्धार ॥ सेजेसी असतां रामचंद्र ॥ झाडितां बळेंचि केर ॥ रामावरी घालित ॥ २८ ॥ तो अंगावरी येतां केर ॥ दैवेंहत होईल वज्रधर ॥ म्हणोनि ते दासी अपवित्र ॥ रामावरी रिंज उडवी ॥ २९ ॥ प्रत्यहीं ऐसेंचि करीत ॥ देखतां क्रोधावला जनकजामात ॥ म्हणे तूं कुब्जा होईं यथार्थ ॥ कुरूप वक्र सर्वांगीं ॥ १३० ॥ मग ते लागे श्रीरामपायीं ॥ म्हणे राघवा मज उच्छाप देईं ॥ मग जगदानंदकंद ते समयीं ॥ काय बोलता जाहला ॥ ३१ ॥ म्हणे पुढील अवतारीं पूर्ण ॥ कंसवधार्थ मथुरे येईन ॥ तेव्हां तुज उद्धरीन ॥ दिव्य करीन रूप तुझें ॥ ३२ ॥ असो अयोध्येबाहेर दूर ॥ पुष्पवाटिका परम सुंदर ॥ सदा सुफळ तरुवर ॥ विकल्प सत्वर आला तेथें ॥ ३३ ॥ जो भुवनच्छेदक कुंठार ॥ कीं स्नेहकर्पूरदाहक वैश्वानर ॥ कीं प्रीतिमेघविदारक सौमीर ॥ परम तीव्र स्वरूप ज्याचें ॥ ३४ ॥ हा भजनमार्गींचा मारक मांग ॥ परम दोषी विष्ठाभक्षक कौंग ॥ कीं द्वेषवारुळांतील भुजंग ॥ धुसधुसीत विकल्प हा ॥ ३५ ॥ तो मत्सरवनींचा वृंक थोर ॥ कीं निर्दयसमुद्रींचा नक्र ॥ कीं परनिंदाजल्पक खैर ॥ विकल्प साचार जाणिजे ॥ ३६ ॥ विकल्प नोहे तो श्वान ॥ धांवे भक्तांवरी वसवसोन ॥ आनंदरसपात्र उलंडोन ॥ न लगतां क्षण टाकी तो ॥ ३७ ॥ असो हिंवरवृक्षीं तो विकल्प ॥ बैसला असे सुखरूप ॥ तंव तेथें मंथरा पापरूप ॥ पुष्पें न्यावया पातली ॥ ३८ ॥ हिंवरछायेसी ते अवसरीं ॥ मंथरा बैसली क्षणभरी ॥ विकल्प प्रवेशला तिच्या अंतरीं ॥ अत्यंत कुपात्र देखोनियां ॥ ३९ ॥ जो कां निर्दय आचारहीन ॥

७८ दोषांचे समुदाय. ७९ परळी. ८० अनुभव. ८१ तृप्त झाले. ८२ दुर्दैवी. ८३ इंद्र. ८४ धूळ. ८५ कुऱ्हाड. ८६ अग्नि. ८७ वायु. ८८ काक. ८९ लांडगा. ९० मगर. ९१ गाढव.

नावडे हरिकथा पुराणश्रवण ॥ सदा जल्पत परदोषगण ॥ विकल्प येऊन राहे तेथें ॥ १४० ॥ साधु संत ब्राह्मण ॥ त्यांसी द्वेषी रात्रंदिन ॥ भूतदया नावडे मनांतून ॥ विकल्प येऊन राहे तेथें ॥ ४१ ॥ वेदविरुद्ध जे वर्तत ॥ नसतेंचि वाढविती कुमत ॥ कोठें विश्वास न धरी चित्त ॥ विकल्प येऊन राहे तेथें ॥ ४२ ॥ असो मंथरेचे मनीं ॥ विकल्प संचरला ते क्षणीं ॥ तों पक्क कौळिंगण[९२] देखोनि नयनीं ॥ प्रीतीकरोनि भक्षित ॥ ४३ ॥ पुष्पें वेंचितां कुश्वळ ॥ मनीं उठती द्वेषकल्लोळ ॥ गृहास परतली तत्काळ ॥ कलह प्रबळ लावावया ॥ ४४ ॥ तों कैकयीचे गृहीं सोहळा होत ॥ मंडप उभविले नभचुंबित ॥ जन अवघे आनंदभरित ॥ चिंताविरहित सर्वही ॥ ४५ ॥ ऐसें मंथरेनें देखतां ॥ परम द्वेष वाटे चित्ता ॥ जैशा वसंतीं कोकिळा गर्जतां ॥ दुःख वोंयसां[९३] उपजे पैं ॥ ४६ ॥ आम्र येतां पाँडास[९४] ॥ मुखरोग प्राप्त होय कोंगांस[९५] ॥ दृष्टीं देखतां राजहंस ॥ दुःख विशेष वाटे तयां ॥ ४७ ॥ कीं देखोन संतांच्या-मूर्ती ॥ निंदक संतापती चित्तीं ॥ कीं देखोन पंडितांची व्युत्पत्ती ॥ अयोग्या चित्तीं द्वेष वाटे ॥ ४८ ॥ कीं देखोन मृगेंद्रांचा[९६] प्रताप ॥ शृगाळांसी[९७] चढे संताप ॥ कीं देखोनि श्रीमंतार्चे स्वरूप ॥ जेवीं दुर्जन चरफडती ॥ ४९ ॥ कीं देखोन धार्मिकाची लीला ॥ अपवित्रासी खेद आगळा ॥ कीं पतिव्रता देखोनि डोळां ॥ व्यभिचारिणी वीटती ॥ १५० ॥ शशांक[९८] देखतां विटती तस्कर ॥ दिवाभीतां[९९] नावडे दिनकर[१००] ॥ कीं हिंसकांस तत्त्वविचार ॥ मनींहूनि नावडे ॥ ५१ ॥ तैसा सोहळा देखोनि मानसीं ॥ परप संता-पली ते दासी ॥ रामनिधानासी विवसी[१] ॥ आड आली साक्षेपें ॥ ५२ ॥ ते कलहपीठींची देवता ॥ कीं ते दुःखकल्लोळप्रवाह-सरिता ॥ गृहांत अग्नि लागे अवचिता ॥ तैसी आंत प्रवेशली ॥ ५३ ॥ अंगणीं शरीर टाकी तत्काळ ॥ धबधबां पिटी वक्षःस्थळ ॥ कैकयीस म्हणे तूं केवळ ॥ अभागीण सर्वस्वें ॥ ५४ ॥ अगे तूं बुद्धिहीन सर्वांत ॥ तुझें तुज न कळे हित ॥ मातुळगृहीं पाठविले तुझे सुत ॥ राज्यीं रघुनाथ स्थापिती ॥ ५५ ॥ तुज अवदशा आली यथार्थ ॥ सौभाग्य गेलें वाहात ॥ देशधडी केला भरत ॥ तुज अनर्थ समजेना ॥ ५६ ॥ राज्यीं बैसतां रघुनंदन ॥ तुझे पुत्र टाकील वधोन ॥ कैकयी तुज शिकवील कोण ॥ मजवांचूनि बुद्धि आतां ॥ ५७ ॥ मग तिजप्रति कैकयी बोलत ॥ मज भरत तैसाच रघुनाथ ॥ तूं हा खेद न करीं यथार्थ ॥ कदा अनर्थ करूं नये ॥ ५८ ॥ ऐसें बोलोनि सत्वर ॥ कंठींचें पदक आणि हार ॥ तिच्या गळ्यांत घाली परिकर ॥ दासी आपुली म्हणोनि ॥ ५९ ॥ पदक आणि मुक्तमाळा ॥ मंथरेनें तोडून टाकिल्या ॥ तोंड घेतलें ते वेळां ॥ राज्य बुडालें म्हणोनि ॥ १६० ॥ स्नेहें धांवोनि कैकयी ॥ तीस धरिती जाहली हृदयीं ॥ विकल्प प्रवेशला ते समयीं ॥ चित्तगृहीं[२] कैकयीच्या ॥ ६१ ॥ कैकयी तीस म्हणे ते समयीं ॥ बरी युक्ति योजिलीस लवलाहीं ॥ तूं माझी प्राणसखी होसी पाहीं ॥ करूं कायी सांग आतां ॥ ६२ ॥ भरत तों नाहीं जवळी ॥ रामासी

९२ कलिंगड. ९३ कावळ्यांना. ९४ भरास. ९५ सिंहाचा. ९६ कोल्ह्याला. ९७ चंद्र. ९८ घुबडांना. ९९ सूर्य. १०० जखीण. १ कलोळ=तरंग. २ मनांत, अंतःकरणांत.

राज्य देती प्रातःकाळीं ॥ अयोध्यावासी लोक सकळी ॥ श्रीरामाकडे मुरडले[3] ॥ ६३ ॥ वसिष्ठ आणि दशरथ ॥ यांसी प्राणाहून आवडे रघुनाथ ॥ ते तों माझा वचनार्थ ॥ न मानिती कदाही ॥ ६४ ॥ मंथरा म्हणे ऐक साचार ॥ पूर्वीचे मागें दोन वर ॥ तुवां रथ सांवरिला घालोनि कर ॥ शत्रूंचे युद्धसमयीं पैं ॥ ६५ ॥ ऐसें गांठीस असतां शस्त्र ॥ तुज भय नाहीं अणुमात्र ॥ राज्यीं स्थापूनि तुझा पुत्र ॥ रामचंद्र वना धाडीं ॥ ६६ ॥ मनुसंख्या संवत्सर ॥ वनासी धाडीं रघुवीर ॥ चतुर्दश वर्षांत तुझा पुत्र ॥ चवदा भुवनें जिंकील ॥ ६७ ॥ वना निघतां रामचंद्र ॥ समागमें जाईल सौमित्र ॥ काननीं राक्षस परम दुर्धर ॥ रामलक्ष्मणां भक्षितील ॥ ६८ ॥ राक्षसें भक्षिल्या रघुनंदन ॥ मग भरतासी सहजींच कल्याण ॥ यालागीं वर दोन्ही घे मागून ॥ रायापाशीं आतांचि ॥ ६९ ॥ वनासी निघतां रघुनाथ ॥ प्राण त्यागील दशरथ ॥ तेही गोष्टीचें तुजला हित ॥ राज्यीं भरत स्थापावया ॥ १७० ॥ रामाचे आवडते भक्त ॥ तेही बाहेर घालूं समस्त ॥ आतां येईल दशरथ ॥ करी अनर्थ येथेंचि ॥ ७१ ॥ ऐसीं ते दासीचीं वचनें ॥ हृदयीं धरिलीं कैकयीनें ॥ जैसें वमन होतांचि श्वानें ॥ उचलोनियां घेइजे ॥ ७२ ॥ कीं शिंदीवृक्षापासून ॥ किंचित निघतां मद्यजीवन[4] ॥ मद्यपी जैसा ओढवी वदन ॥ तैसेंचि वचन मानलें ॥ ७३ ॥ मर्कटासी मदिरारस[5] पाजिला ॥ त्यांत वृश्चिकें दंश केला ॥ त्यामाजी भूत-संचार जाहला ॥ कैकयीस जाहलें तैसेंचि ॥ ७४ ॥ अलंकार काढिले झडकरी ॥ तोडून टाकिली गळसरी ॥ केशमुक्त ऊर्वीवरी[6] ॥ निद्रा करी सक्रोध ॥ ७५ ॥ तंव ते भोगसमयाची वेळ ॥ कैकयीगृहा आला भूपाळ ॥ राजा मंथरेसी पुसे उताविळ ॥ राणी आमुची कोठें पैं ॥ ७६ ॥ तंव ते बोले पापखाणी ॥ पैल ते पडली तुमची राणी ॥ काय आहे तिचे मनीं ॥ तें तों न कळेचि आम्हांते ॥ ७७ ॥ मग कैकयीजवळी येऊन ॥ करें कुरवाळी राजा वदन ॥ दिधलें दशरथासी लोटून ॥ झिडकारूनि एकीकडे ॥ ७८ ॥ म्हणे परता होईं नृपनष्टा ॥ असत्यवादिया क्रियाभ्रष्टा ॥ तुझे अंतरींचा भाव खोटा ॥ सर्वही म्यां ओळखिला ॥ ७९ ॥ ऐसे शब्द ऐकतां तीव्र ॥ धकधकिलें रायाचें अंतर[7] ॥ चरण धरी तिचे सत्वर ॥ येरी लोटी परताचि ॥ १८० ॥ राजा म्हणे संभ्रमें[8] होत ॥ राज्यीं स्थापितों रघुनाथ ॥ तूं विघ्न न करीं येथ ॥ शरणागत तुझा मी ॥ ८१ ॥ वस्त्रें भूषणें अलंकार ॥ अपेक्षित देईन समग्र ॥ तुझ्या वचनालागीं निर्धार ॥ प्राण वेंचीन जाण पां ॥ ८२ ॥ मी असतां त्वां गळसरी ॥ तोडून टाकिली महीवरी ॥ मागुता जावोनि चरण धरी ॥ लोटी निजकरीं कैकयी ॥ ८३ ॥ स्त्रीलोभाचिये आवडी ॥ प्राणी नाडले[9] लक्षकोडी ॥ जन्ममरणांचिया ओढी-माजी पडले बहुतचि ॥ ८४ ॥ स्त्रीलोभ परम दारुण ॥ पूर्वी नाडले बहुत जण ॥ मूर्तिमंत भवव्याधि[10] कामिन[11] ॥ भुलवी सज्ञान जाणते ॥ ८५ ॥ संसारअनर्थांस मूळ ॥ तो स्त्रीसंबंध जाण केवळ ॥ स्त्रीलोभें पापें सकळ ॥ अंगीं येऊन झगटती[12] ॥ ८६ ॥ असो

३ वळले. ४ इंद्राचे. ५ चौदा. ६ ताडी. ७ दारू. ८ जमिनीवर. ९ थरथरले. १० गडबड. ११ फसले. १२ संसाररोग. १३ स्त्री. १४ जडतात.

तो राजा दशरथ ॥ स्त्रीलोभें जाहला भ्रांत[15] ॥ कैकयीस म्हणे माग इच्छित ॥ तें मी यथार्थ पुरवीन ॥ ८७ ॥ कैकयीस संकेत[16] दावी मंथरा ॥ सांडूं नको पूर्वील निर्धारा ॥ मागून घेईं दोन्ही वरां ॥ वना रघुवीरा पाठवीं ॥ ८८ ॥ कैकयी म्हणे नृपनायका ॥ माझ्या स्वर्गीच्या दोन्ही भाका[17] ॥ न द्याल तरी उणें देखा ॥ येईल वंशा तूमच्या ॥ ८९ ॥ राजा म्हणे माग सत्वर ॥ तुज दिधले अपेक्षित वर ॥ मग म्हणे वना धाडीं रघुवीर ॥ राज्य भरतासी समर्पीं ॥१९० ॥ जवळी असतां रघुनायक ॥ त्याकडे होतील सकळ लोक ॥ यालागीं दूर वनासी देख ॥ आतांचि शीघ्र पाठवावें ॥ ९१ ॥ मनुसंख्यासंवत्सर[18] ॥ राज्य करील माझा पुत्र ॥ मग तुम्हीं आणावा रघुवीर ॥ अथवा तिकडेच ठेविंजे ॥ ९२ ॥ ऐसें ऐकतांचि वचन ॥ गजबजलें रायाचें मन ॥ वाटे विद्युल्लता येऊन ॥ अंगावरी पडियेली ॥ ९३ ॥ कीं शरीर अग्नींत पडलें ॥ कीं काळिजीं कर्वत घातले ॥ कीं पर्वताचे कडे कोसळले ॥ अंगावरी अकस्मात ॥ ९४ ॥ कैकयीवचन प्रळयाम ॥ जाळीत चालिला आयुष्यकानन ॥ मग तिचे धांवोन धरी चरण ॥ पदर पसरून मागतसे ॥ ९५ ॥ जो जो मागसील पदार्थ ॥ तो तो पुरवीन समस्त ॥ परी सुकुमार माझा रघुनाथ ॥ वनाप्रति धाडूं नको ॥ ९६ ॥ मी पृथ्वीपति राजा दशरथ ॥ परी तुझा असें शरणागत ॥ सुकुमार माझा रघुनाथ ॥ वनाप्रति धाडूं नको ॥ ९७ ॥ पट्टराणिया समस्त ॥ तुझ्या सेवेसी लावीन यथार्थ ॥ परी सुकुमार माझा रघुनाथ ॥ वनाप्रति धाडूं नको ॥ ९८ ॥ जो लावण्यामृतसागर[19] ॥ उदार धीर गुणगंभीर ॥ कोमळगात्र रघुवीर ॥ वनाप्रति धाडूं नको ॥ ९९ ॥ काय रघूत्तमें अन्याय केला ॥ एवढा त्यावरी कोप धरिला ॥ डोळसं[20] तमालनीळ सांवळा ॥ वनाप्रति धाडूं नको ॥ २०० ॥ भरतापरीस रघुनंदन ॥ तुज प्रिय होता मनांतून ॥ आतां कां कठीण केलें मन ॥ मजलागून सांग तें ॥ १ ॥ कैकयीपुढें पसरी पदर ॥ वना धाडूं नको शतपत्रनेत्र[21] ॥ येरी म्हणे तूं अधम साचार ॥ माझीं वरदानें न देसी तूं ॥ २ ॥ तुझे पूर्वज संपूर्ण ॥ भाकेकारणें वेंचिती प्राण ॥ त्यांचिये वंशीं जन्मोन ॥ डाग लाविला कुळासी ॥ ३ ॥ कैकयीशब्दवज्र कठिण ॥ रायाचें हृदय जाहलें चूर्ण ॥ भूमीवरी मूर्च्छा येऊन ॥ निचेष्टित पडियेला ॥ ४ ॥ इतुका रात्रीं वर्तला वृत्तांत ॥ तों प्रातःकाळीं आला सुमंत ॥ रायासी करून प्रणिपात ॥ वचन बोलता जाहला ॥ ५ ॥ सर्व सामग्री जाहली पूर्ण ॥ वाट पाहत ब्रह्मनंदन[22] ॥ अरुणोदय जाहला चंडकिरण[23] ॥ उदय करूं पाहतो ॥ ६ ॥ तरी तुम्हीं येऊनियां तेथ ॥ राज्यीं स्थापावा रघुनाथ ॥ वचन न बोलतां दशरथ ॥ चकित सुमंत विलोकी ॥ ७ ॥ मनी विचारी अजसुत ॥ ही मात ऐकतां रघुनाथ ॥ वनास जाईल यथार्थ ॥ थोर अनर्थ ओढवला ॥ ८ ॥ कैकयी म्हणे सुमंता ॥ येथवरी आणीं रघुनाथा ॥ मी त्यासी सांगेन अवघी वार्ता ॥ जे जाहली कथा पूर्वीची ॥ ९ ॥ रायासी निद्रा लागली जाण ॥ यालागीं न बोलेचि वचन ॥

---

१५ भ्रमिष्ट. १६ खूण. १७ भाषा, मागण्या, वर. १८ चौदा वर्षे. १९ सौंदर्याचा समुद्र. २० गोजिरवाणा. २१ कमलपत्राक्ष राम. २२ वसिष्ठऋषि. २३ सूर्य.

तों इकडे ब्रह्मपुत्रें संपूर्ण ॥ सामग्री सिद्ध केली असे ॥ २१० ॥ सुमंत म्हणे कैकयीलागून ॥ रायें भूमीवरी कां केलें शयन ॥ तों दशरथ स्फुंदस्फुंदोन ॥ रुदन करूं लागला ॥ ११ ॥ म्हणे सुमंता ऐक वचन ॥ माझें जवळी आलें मरण ॥ येथवरी आणीं रघुनंदन ॥ कोणासी वर्तमान न सांगावें ॥ १२ ॥ सुमंत आज्ञा वंदून ॥ निघाला तेव्हां म्लानवदन ॥ जैसा सूर्य ग्रहणीं कळाहीन ॥ तैसें आननेंन दिसतसे ॥ १३ ॥ विचार करीत सुमंत ॥ रामधामाकडे जात ॥ जैसा मुमुक्षु संसारतापें संतप्त ॥ वेगें येत संतसदना ॥ १४ ॥ केवळ आत्मप्राप्तीचें स्थान ॥ तैसें दिसे रामसदनें ॥ चाऱ्ही महाद्वारें ओलांडून ॥ जाता जाहला तेधवां ॥ १५ ॥ दृष्टीं पहावया रघुवीर ॥ क्रमोनि गेला स्थूळदेहद्वार ॥ दुसरें सूक्ष्म सुंदर ॥ तत्त्वांसहित ओलांडिलें ॥ १६ ॥ पुढें क्रमोनियां कारण ॥ वेगें निघाला प्रधान ॥ तों महाकारण देदीप्यमान ॥ चौथें द्वार देखिलें ॥ १७ ॥ चतुर्थ द्वारींची पाहतां रचना ॥ ब्रह्मानंद जाहला मना ॥ तुर्येचा उंबरा ओलांडूनि जाणा ॥ पुढें सत्वर जातसे ॥ १८ ॥ तों मणिमयमंडपप्रभा घन ॥ त्यासी आठ पायऱ्या देदीप्यमान ॥ श्रवण कीर्तन स्मरण ॥ पादसेवन तें चौथें ॥ १९ ॥ अर्चन वंदन दास्य सख्य ॥ चढे सत्वर प्रधान देख ॥ तों स्वानंदचौकीवरी सीतानायक ॥ प्रधानोत्तमें विलोकिला ॥ २२० ॥ मग नवविधा भक्ति आत्मनिवेदन ॥ सुमंतें केलें साष्टांग नमन ॥ तंव तो कमलपत्राक्ष सुहास्यवदन ॥ काय तेव्हां बोलिला ॥ २१ ॥ सुमंता तूं मुख्य प्रधान ॥ आम्हांस ज्येष्ठबंधूसमान ॥ तुझे निर्मळ गुण पाहोन ॥ ब्रह्मानंद मज वाटे ॥ २२ ॥ मग तो जोडूनि दोन्ही कर ॥ उभा राहे राघवासमोर ॥ सांगे दशरथें सत्वर ॥ कैकयीसदनीं बोलाविलें ॥ २३ ॥ आतां कैकयीसदना श्रीराम ॥ कैसा जाईल पूर्णब्रह्म ॥ तें कथाकौतुक सप्रेम ॥ संत सज्जन ऐकोत पां ॥ २४ ॥ रामविजय ग्रंथ सुंदर ॥ भक्तिज्ञानवैराग्यभांडार ॥ दृष्टांतरत्नें अपार ॥ मौंजी सतेज झगमगती ॥ २५ ॥ ब्रह्मानंदा श्रीधरवरा ॥ श्रीमद्भीमातटविहारा ॥ पुराणपुरुषा निर्विकारा ॥ जगद्वंद्या अभंगा ॥ २२६ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत पंडित चतुर ॥ नवमाध्याय गोड हा ॥ २२७ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

---

२४ वसिष्ठानें. २५ मुख. २६ रामाच्या राजचाम्याकडे. २७ मध्यें.


१०

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ संतसज्जनांची मांदी मिळाली ॥ देखोनि वाग्देवी धांविन्नली ॥ शब्दरत्नांचीं भरणीं भरलीं ॥ वेगें आणिलीं भक्तिपेठे ॥ १ ॥ पाहोनि ग्राहकांची आवडी ॥ परीक्षक तैसेंचि रत्न काढी ॥ कीं सुगरणी जैसी वाढी ॥ अपेक्षा पाहूनियां क्षुधितांची ॥ २ ॥ गात्रें पाहून भूषणें ॥ लेववितो पैं शाहाणे ॥ कीं दिनमान पाहून उष्णकिरणें ॥ उदया जैसें पाविजे ॥ ३ ॥ कीं पाहूनियां समयघटिका ॥ उदय होय जेवीं शशांका ॥ कीं वर्षाकाळींचे देखा ॥ मेघ जैसे वर्षती ॥ ४ ॥ कीं ऋतुकाळीं येती फळें ॥ कीं उत्तम काळ पाहूनि भले ॥ सत्कर्में करिती सकळें ॥ निष्कामबुद्धीकरूनियां ॥ ५ ॥ कीं वेदांचें अंतर पाहूनि देख ॥ चालताती शास्त्रांचे तर्क ॥ कीं लवण पाहूनि उदक ॥ धांवे जैसें त्वरेनें ॥ ६ ॥ तैसें श्रोतयांचें जाणोनि अंतर ॥ रामकथा आरंभिली साचार ॥ बोलिला वाल्मीक ऋषीश्वर ॥ तेंचि चरित्र परिसा पां ॥ ७ ॥ शब्दभवाब्धि भरला अपार ॥ कवितालक्ष तारूं थोर ॥ स्फूर्तिवायूच्या बळें सत्वर ॥ जहाज चाले त्वरेनें ॥ ८ ॥ सद्गुरुकृपा हेंचि बंदर ॥ तेथें शब्दरत्नें भरलीं अपार ॥ संतपेठेसी आणिलीं साचार ॥ ग्राहक थोर म्हणोनिया ॥ ९ ॥ तरी सादरता देऊनी घन ॥ घ्या जी शब्दरत्नें परीक्षा करून ॥ असो पूर्वाध्यायीं सुमंत प्रधान ॥ श्रीराम-गृहासी पातला ॥ १० ॥ शोकाकुलित होउनी ॥ दशरथ पडिला कैकयीसदनीं ॥ कीं अग्निसंगेंकरूनी ॥ मुक्त जैसें आंहाळलें ॥ ११ ॥ ग्रहणकाळीं सूर्यचंद्र ॥ दिसती कळाहीन साचार ॥ कीं पंकेंगतेंत सुकुमार ॥ हंस जैसा रूतला ॥ १२ ॥ तैसा जाण द्विपेंचेरथ ॥ पडिला असे शोकग्रस्त ॥ सुमंत पाठविला त्वरित ॥ श्रीरामासी आणावया ॥ १३ ॥ असो सुमंत म्हणे जी श्रीरामा ॥ रायें बोलाविलें कैकयी-धामा ॥ पुराणपुरुष सर्वात्मा ॥ तत्काळ उठोनि चालिला ॥ १४ ॥ रथीं बैसला ते क्षणीं ॥ नवमेघरंग चापपाणी ॥ भक्तकैवारी कैवल्यदानी ॥ वेदपुराणीं वंद्य जो ॥ १५ ॥ वस्त्रालंकारमंडित पूर्ण ॥ पाहाती सर्व अयोध्याजन ॥ म्हणती कोट्यनुकोटी मीनकेतेंन ॥ श्रीरामावरूनि ओंवाळिजे ॥ १६ ॥ श्रीराममुकुटींची दिव्य कळा ॥ तेणें रविमंडप उजळला ॥ त्या तेजांत सूर्य बुचकळला ॥ प्रकाश पडला पृथ्वीवरी ॥ १७ ॥ मकराकार शोभती कुंडलें ॥ कीं प्रळयाग्नीनें नेत्र उघडिले ॥ कीं कल्पांतविजूचे उमाळे ॥ शीतळ जाहले सर्वांहि ॥ १८ ॥ अनंत बाळसूर्यांच्या कळा ॥ श्रीरामरूपीं लोपल्या सकळा ॥ कीं ब्रह्मानंद रस वोतला ॥ सगुणलीला घरूनियां ॥ १९ ॥ सुवर्णोदकनदी निर्मळ ॥ मेरुपाठारीं वाहे सदाकाळ ॥ तैसें केशरदिव्यतिलक भाल ॥ श्रीरामाचें शोभतसे ॥ २० ॥ अंगीं दिव्य चंदन चर्चित ॥ अयोध्येमाजी सुवास बैंहकत ॥ तेणें घ्राणदेवता नाचत ॥ निजानंदेंकरूनियां ॥ २१ ॥ गुणीं ओविलीं भंगणें सकळें ॥ तैसे मुक्तहार शोभती चांगले ॥ अनंत ब्रह्मांडें एकेचि वेळे ॥ एकसरें डोलती ॥ २२ ॥ अपार राहिले भक्त प्रेमळ ॥ म्हणोनि रुंदावलें वक्षःस्थळ ॥ दिव्य तेज पदक निर्मळ ॥ प्रभेनें निरोळ कोंदलें ॥ २३ ॥ आजानुबाहु रघुनंदन ॥ करीं विराजत चापबाण ॥

१ गर्दी, समुदाय. २ भांडारें. ३ सूर्यानें. ४ चंद्राला. ५ तात्पर्य. ६ उतरता प्रदेश. ७ ऐका. ८ कैकयीच्या घरीं. ९ मोतीं. १० विरघळलें, पोळलें. ११ चिखलाच्या डबक्यांत. १२ दशरथ. १३ मदन. १४ पसरत होता. १५ नासिकारूपी देवता. १६ नक्षत्रें. १७ आकाश.

कटीं मेखळा[१७] पीतवसन[१८] ॥ चपळेहून[१९] झळकतसे ॥ २४ ॥ असो ऐसा रघुनाथ ॥ रथारूढ विरिंचितात[२०] ॥ छप्पन्न देशींचे राजे समस्त ॥ देखोनियां आनंदले ॥ २५ ॥ पुढें चालत चतुरंग दळ ॥ धडकत वाद्यांचा कल्लोळ ॥ श्रीराम पाहावया सकळ ॥ उतावीळ जन जाहले ॥ २६ ॥ पाहतां श्रीरामाचें मुखकमळ ॥ राजे आनंदले सकळ ॥ म्हणती जन्म जाहला सुफळ ॥ तमालनील देखिला ॥ २७ ॥ धन्य धन्य तो दशरथ ॥ जयाच्या उदरीं अवतरला रघुनाथ ॥ यासी राज्यपद यथार्थ ॥ देईल आतां संभ्रमें ॥ २८ ॥ तो सोहळा पाहूनि नयनां ॥ जाऊं आपुल्या स्वस्थाना ॥ असो ऐसा मिरवत रामराणा ॥ कैकयीसदनासमीप आला ॥ २९ ॥ जवळी आला ऐकोनि रघुनाथ ॥ स्फुंदस्फुंदोनि रडे दशरथ ॥ लोकां बाहेर टाकोनि जात ॥ श्रीराम दशरथाजवळी पैं ॥ ३० ॥ लक्ष्मण आणि सुमंत ॥ यांसहित प्रवेशे रघुनाथ ॥ तों मूर्च्छित पडला दशरथ ॥ नयनीं वाहात अश्रुधारा ॥ ३१ ॥ रामें दशरथासी केलें नमन ॥ वंदिले कैकयीचे चरण ॥ येरी म्हणे विजयी पूर्ण ॥ सर्वदाही होसी तूं ॥ ३२ ॥ श्रीराम पुसे कैकयीसी ॥ काय व्यथा रायाचे मानसीं ॥ कां शयन केलें भूमीसी ॥ तें मजप्रती सांगिजे ॥ ३३ ॥ कैकयी सांगे समाचार ॥ रायें मज दिधले दोन वर ॥ ते मीं मागतां साचार ॥ दुःख थोर वाटलें ॥ ३४ ॥ मग बोले रघुनंदन ॥ ते भीक[२१] मी पुरवीन ॥ येरी म्हणे तूं वनासी करीं गमन ॥ चौदा[२२]तुर्दश वर्षेंपर्यंत ॥ ३५ ॥ सांगातें नेईं सौमित्रासुत[२३] ॥ राज्य करील माझा भरत ॥ तूं वनीं होसील यशवंत ॥ सीताकांत अवश्य म्हणे ॥ ३६ ॥ मातेची आज्ञा सर्वथा ॥ न मोडावी प्रमाण शास्त्रार्था ॥ संन्यास जरी घेतला तरी माता ॥ वंदावी हें साचार ॥ ३७ ॥ प्राणाहून पलीकडे ॥ माझा भरत मज आवडे ॥ त्यास राज्य देतां मज सौंकडें[२४] ॥ सर्वथाही वाटेना ॥ ३८ ॥ भूधर[२५] अवतरला लक्ष्मण ॥ परम क्रोधावला जाण ॥ भ्रुकुटीसी आंठी घालोन ॥ नेत्रयुगुळ[२६] वटारिलें ॥ ३९ ॥ जैसा विवेकबळेंकरून ॥ क्रोध आवरिती साधकजन ॥ तैसाचि उगा राहिला लक्ष्मण ॥ भीड धरून रामाची ॥ ४० ॥ असो कैकयीस नमून रामराणा ॥ आला कौसल्येच्या सदना ॥ परमानंद पावला मना ॥ तपोवना जावया ॥ ४१ ॥ कीं दैत्य वधावया जातां स्वानंद ॥ गजवदन[२७] आणि वीर स्कंद[२८] ॥ नमिलें अन्नपूर्णेचें[२९] चरणारविंद ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ४२ ॥ कीं करूं जातां अमृतहरण ॥ सुपर्णें[३०] वंदिले जननीचरण ॥ त्याचपरी रघुनंदन ॥ कौसल्येसी नमीतसे ॥ ४३ ॥ सांगीतलें सकळ वर्तमान ॥ घगघगलें कौसल्येचें मन ॥ भूमीस पडली मूर्च्छा येऊन ॥ वाटे प्राण चालिला ॥ ४४ ॥ किंवा हृदयीं शस्त्र खोंचलें ॥ कीं लोभियाचें धन हरवलें ॥ तैसें कौसल्येसी वाटलें ॥ आज्ञा मागतां श्रीरामें ॥ ४५ ॥ मग म्हणे घनःशामगात्रा ॥ रामा माझ्या राजीवनेत्रा ॥ मज सांडोनि पवित्रा ॥ कैसा वना जाशील ॥ ४६ ॥ माझे पुष्पवाटिकेआंत[३१] ॥ राहें चतुर्दश वर्षेंपर्यंत ॥ कोणासी तूं न भेटें यथार्थ ॥ राहें गुप्त राघवा ॥ ४७ ॥ श्रीराम म्हणे माते ॥ तैसें नव्हे जाणें वनातें ॥ सत्य करावया पितृवचनातें ॥

१८ कंबरपट्टा. १९ विजेहून. २० ब्रह्मदेवपिता, विष्णु. २१ देऊं केलेला शब्द. २२ चौदा. २३ लक्ष्मण. २४ संकट. २५ शेष. २६ दोन्हीं नेत्र. २७ गणपती. २८ कार्तिकस्वामी. २९ पार्वतीमातेचें. ३० गरुडानें. ३१ बागेंत.

दंडकारण्या जाईन मी ॥ ४८ ॥ पश्चिमेस उगवेल चंडकिरण[३२] ॥ परी मी न मोडीं पितृवचन ॥ होईन भाकेसी उत्तीर्ण[३३] ॥ नसे अनमान सर्वथा ॥ ४९ ॥ जन्मोनियां जनकपोटीं ॥ साच न करवे त्याची गोष्टी ॥ तरी अपकीर्तीनें सृष्टी ॥ भरोनियां उचंबळे ॥ ५० ॥ साच न करवे पितृवचन ॥ व्यर्थ काय जन्मास येऊन ॥ विगतधवेचें सुंदरपण ॥ किंवा ज्ञान दांभिकाचें[३४] ॥ ५१ ॥ कीं वोडंबरीचें[३५] शूरत्व जाण ॥ कीं अजाकंठीचे[३६] जैसे स्तन[३७] ॥ कीं नटांमधील कामिन[३८] ॥ कीं कंटकवन सघन पैं ॥ ५२ ॥ कीं जन्मांधाचे विशाळ नेत्र ॥ कीं मद्यपियाचें अपवित्र पात्र ॥ कीं अदात्याचें उंच मंदिर ॥ व्यर्थ काय जाळावें ॥ ५३ ॥ यालागीं पुत्र तोचि धन्य ॥ जो साच करी पितृवचन ॥ तरी मज वना जावयालागून ॥ आज्ञा देईं अंबे तूं ॥ ५४ ॥ म्हणोनि श्रीरामें धरिले चरण ॥ उभा राहिला कर जोडून ॥ धबधबां वक्षःस्थळ बडवून ॥ कौसल्येनें घेतलें ॥ ५५ ॥ नगरीं तेव्हां फुटली मात ॥ कीं वना जातो श्रीरघुनाथ ॥ वर्तला एकाचि आकांत ॥ पडिले मूर्च्छित लोक तेव्हां ॥ ५६ ॥ कौसल्या म्हणे रघुनंदना ॥ सुकुमारा जगन्मोहना ॥ माझी मोडोनियां आज्ञा ॥ कैसा वना जातोसी ॥ ५७ ॥ श्रीरामासी म्हणे लक्ष्मण ॥ मज आज्ञा देईं अणुप्रमाण[३९] ॥ कैकयीचें शिर छेदून ॥ संतोषवीन सकळांसी ॥ ५८ ॥ रघुपती तूं वना जातां यथार्थ ॥ प्राण त्यजील दशरथ ॥ राज्य बुडेल समस्त ॥ अयोध्या ओस होईल ॥ ५९ ॥ परम प्रेमळ बंधु भरत ॥ तो राज्य न करील यथार्थ ॥ इचा वध करितां सत्य ॥ तोही सुख पावेल ॥ ६० ॥ सकळ अनर्थांचें कारण ॥ कैकयी असत्याचें भाजन[४०] ॥ इजला टाकितां वधून ॥ सकळ जन आनंदती ॥ ६१ ॥ जैसी समूळ टाकितां दुर्वासना ॥ साधक पावती आत्मसदना ॥ कीं रजनी सरतां सकळ जनां ॥ सूर्योदयीं आनंद ॥ ६२ ॥ मग बोले श्रीराम ॥ प्राणांत जाहलिया विपरीत कर्म ॥ सहसा न करावें हें वर्म ॥ हृदयीं धरीं लक्ष्मणा ॥ ६३ ॥ कौसल्या सुमित्रा जैशा माता ॥ तैसीच कैकयी जाण तत्त्वतां ॥ तियेचा वध करितां ॥ मग यश केंचें आम्हांतें ॥ ६४ ॥ लक्ष्मण म्हणे श्रीरामातें ॥ तरी मज न्यावें सांगातें ॥ ॥ नाहीं तरी प्राण त्यागीन येथें ॥ मग तूं वना सुखें जाईं ॥ ६५ ॥ तों सुमित्रा म्हणे रघुनंदना ॥ माझा लक्ष्मण नेईं वना ॥ सेवील तुझिया निजचरणा ॥ प्रेमभावें करूनियां ॥ ६६ ॥ रामा तुजवेगळा एक क्षण ॥ सर्वथा न राहे लक्ष्मण ॥ वनीं फळें जीवन[४१] आणून ॥ शय्येसी तृण निजावया ॥ ६७ ॥ तुझी सेवा करील परिकर ॥ तेणें आनंद मज थोर ॥ ऐसें बोलतां सुमित्रेचे नेत्र ॥ प्रेमोदकें भरून आले ॥ ६८ ॥ मग ऊर्मिलेचें समाधान ॥ करूनियां लक्ष्मण ॥ सिद्ध जाहला प्रयाणें[४२] ॥ वनाप्रती करावया ॥ ६९ ॥ कौसल्या म्हणे रघुनंदना ॥ बा रे मज टाकूनी जासी वना ॥ कांटे पाषाण तुझिया चरणां ॥ चालतां रज खुपतील ॥ ७० ॥ जडितांबरें सर्व सांडोनी ॥ कैसा राहशील वल्कलें वेष्टूनी ॥ भ्रमरपर्यंक[४३] त्यजोनी ॥ भूमिशयन केवीं करिसी ॥ ७१ ॥ त्यजूनि रत्नजडित[४४] कोटीर ॥ कैसा राखिसी जटाभार ॥

३२ सूर्य. ३३ वचन पुरें करून दाखवीन. ३४ ढोंग्याचें. ३५ बहुरूप्याचें. ३६ शेळीच्या गळ्यांतील. ३७ आंचळ. ३८ स्त्रीवेष. ३९ किंचित. ४० पात्र. ४१ पाणी. ४२ प्रस्थान. ४३ मोहक पलंग. ४४ शिरोभूषणविशेष, चूडामणि, शिरोरत्न.

रामा तुझी तनु सुकुमार ॥ वातउष्णें श्रमेल कीं ॥ ७२ ॥ सुगंध परिमळ त्यजूनि परम ॥ कैसें आंगीं चर्चिसी भस्म ॥ वनीं राक्षस दुर्धर परम ॥ छळावया तुज येतील ॥ ७३ ॥ वनीं सांपडासी तूं जगजेठी ॥ मग तुझी कोण राखील पाठी ॥ शोकें कौसल्या हृदय पिटी ॥ म्हणे काय करूं आतां ॥ ७४ ॥ मग औषधी[४५] मोहरे[४६] अनेक आणुनी ॥ रामाचे दंडीं बांधी जननी ॥ रामासी पाणी लागेल वनीं ॥ औषधमणी[४७] कंबरीं[४६] बांधी ॥ ७५ वनीं दृष्टावेल रघुनाथ ॥ म्हणोनि मोहरे[४७] करीं बांधित ॥ कांहीं एक पीडा न होय यथार्थ ऐशा वस्तु देत माता ॥ ७६ ॥ ते आदिपुरुषाची जननी ॥ वनासी निघतां चापपाणी ॥ पंचभूतांसी कर जोडोनी ॥ प्रार्थना करी भावार्थें ॥ ७७ ॥ धरणीस कौसल्या विनवित ॥ माते तुझा श्रीराम जामात ॥ यासी रक्षीं यथार्थ ॥ निजस्नेहेंकरूनियां ॥ ७८ ॥ ज्या पंथें जाईल कमलपत्राक्ष ॥ त्याच पंथें असोत सुफल वृक्ष ॥ नाना संकटीं विरूपाक्ष[४८] ॥ रक्षो यासी सर्वदा ॥ ७९ ॥ रातोत्पल[४९] कमलें पूर्ण ॥ त्यांहून सुकुमार रामचरण ॥ त्याचिया चरणीं खडे पाषाण ॥ रुतों नेदीं अवनीये[५०] ॥ ८० ॥ उदकासी कौसल्या म्हणत ॥ रघुवीर होईल तृषाक्रांत[५१] ॥ नदी सरोवरें समस्त ॥ पूर्णोदकें ठेवीं कां ॥ ८१ ॥ म्हणे विश्वप्रकाश चंडकिरणा[५२] ॥ तूं रक्षीं आपले कुल-भूषणा ॥ तुझीं किरणें मनमोहना ॥ स्पर्शों नेदीं सर्वथा ॥ ८२ ॥ लोकप्राणेशा प्रभंजना[५३] ॥ लघु माझिया रघुनंदना ॥ तुझिया गुणें धुळी नयनां- ॥ माजी न जावी सर्वथा ॥ ८३ ॥ उष्णें शिणतां[५४] रघुनाथ ॥ तूं मंद मंद येईं मारुत ॥ जेणें सुखावे अवनिजाकांत ॥ करीं ऐसें प्राणेशा ॥ ८४ ॥ अंबरा तूं निर्विकार पाहीं ॥ शब्दविषय तुझे ठायीं ॥ मंजुळ शब्द तुझे हृदयीं ॥ अंडज[५५] करोत सर्वदा ॥ ८५ ॥ ब्रह्मा शिव इंदिरावर ॥ अष्ट दिक्पाल एकादश रुद्र ॥ नव ग्रह अष्ट वसु द्वादश मित्र ॥ माझा रघुवीर रक्षोत ॥ ८६ ॥ देव उपदेव कर्मज देव ॥ पाताळभोगी सर्प मानव ॥ जलचर जलार्णव ॥ माझा रघुवीर रक्षोत ॥ ८७ ॥ चराचर प्राणी जे वहिले ॥ चहूं खाणींमाजी जन्मले ॥ वेदशास्त्रें पुराणें सकळें ॥ ब्रह्म सांवळें रक्षोत ॥ ८८ ॥ कर जोडोनि कौसल्या सती ॥ चराचर जीवांसी झाली प्रार्थिती ॥ परी हा आदिपुरुष रघुपती ॥ नेणवेचि तियेतें ॥ ८९ ॥ जो दानवकुळवैश्वानर[५६] ॥ साधुहृत्पद्मभ्रमर ॥ अज्ञानतमच्छेदक दिवाकर ॥ नेणे साचार कौसल्या ॥ ९० ॥ जो अरिचक्रवारणपंचानन ॥ कीं दुःखपर्वतभंजन सहस्रकिरण ॥ कीं विघ्नफणिपाळ[५७] विदारून ॥ त्यावरी सुपर्ण[५८] रघुवीर ॥ ९१ ॥ तो सज्जनचकोरामृतकर[५९] ॥ भक्तचातकसजलजलधर ॥ कीं साधुनयनाब्जमित्र ॥ तो हा साचार अवतरला ॥ ९२ ॥ असो याउपरी कौसल्या म्हणत ॥ चतुर्दश वर्षेपर्यंत ॥ व्यर्थ देह हा प्रेतवत ॥ कैसा पाळूं मी आतां ॥ ९३ ॥ कैसें पूर्वकर्म गहन ॥ फळा आलें मुळींहून ॥ अमलदलराजीवनयन ॥ वनास जातो ये वेळे ९४ ॥ तूं वना जातोसी रघुनंदना ॥ स्तनीं दाटला प्रेमपान्हा ॥ माझ्या विसाविया मनमोहना ॥ गुणनिधाना जाऊं नको ॥ ९५ ॥ श्रीरामा भुवनसुंदरा ॥ डोळ्सा सुकुमारा

४५ साधारण औषधी मणी. ४६ कंबरांमध्यें. ४७ दृष्टीचे मणी, दृष्टमणि. ४८ शंकर. ४९ रक्तवर्ण. ५० हे पृथ्वी. ५१ तहानावलेला. ५२ हे सूर्या. ५३ हे वायो. ५४ थकला असतां. ५५ पक्षी. ५६ अग्नी. ५७ सूर्य. ५८ गरुड. ५९ चंद्र.

राजीवनेत्रा ॥ मुनिजनरंजना गुणसमुद्रा ॥ जाऊं नको वनातें ॥ ९६ ॥ हृदयीं नसतां रघुनंदन ॥ संपत्ती त्या विपत्ती जाण ॥ कळा त्या विकळा संपूर्ण ॥ विद्या होत अविद्या ॥ ९७ ॥ श्रीरामाविण करिती कर्म ॥ तोच तयास पडला भ्रम ॥ सच्चिदानंद मेघ-श्याम ॥ मज टाकूनी जातो कीं ॥ ९८ ॥ तंव देववाणी[६०] गर्जिन्नली पाहीं ॥ सर्वांठायीं राम विजयी ॥ कल्पांतीं तयासी भय नाहीं ॥ हा शेषशायी अवतरला ॥ ९९ ॥ जैसा जीव जातां वैद्य येऊन ॥ म्हणे मी तुज वांचवीन ॥ तैसें मायेस वाटलें पूर्ण ॥ आकाशवाणी ऐकतां ॥ १०० ॥ आदिपुरुष निर्विकार ॥ कौसल्येस घाली नमस्कार ॥ प्रदक्षिणा करूनि वारंवार ॥ मुख विलोकी जननीचें ॥ १ ॥ जो मायातीत अगोचर ॥ तेणें आसुवें भरलें नेत्र ॥ विमलांबुधारा[६१] पवित्र ॥ मुखावरून उतरल्या ॥ २ ॥ मायेनें धांवून तये वेळीं ॥ रामाचे गळां मिठी घातली ॥ तो शोक ऐकतां उर्वीमंडळीं[६२] ॥ कवींसी बोलीं न वर्णवे ॥ ३ ॥ म्हणे कमलपत्राक्षा रघुनंदना ॥ तुवां कैकयीची पाळिली आज्ञा ॥ मान दिधला पितृवचना ॥ माझी अवज्ञा कां करिसी ॥ ४ ॥ मग तो जगद्वंद्य रघुनायक ॥ मातेसी म्हणे न करीं शोक ॥ मी सत्वर परतोनि देख ॥ जननी येतों तुजपाशीं ॥ ५ ॥ असो सीतेचिया मंदिरांत ॥ प्रवेशला जनकजामात ॥ सीता जाहली आनंदभरित ॥ मूर्द[६३] ओंवाळी वरूनियां ॥ ६ ॥ मनीं जगन्माता विचारीत ॥ कां एकलेचि आले श्रीरघुनाथ ॥ संगें राजचिन्हें नाहींत ॥ चिंताक्रांत जानकी ॥ ७ ॥ वृत्तांत सांगे रघुनंदन ॥ आम्ही वनाप्रति करितों गमन ॥ तुवां कौसल्येची सेवा करून ॥ सुखें राहावें येथेंचि ॥ ८ ॥ सुमित्रा आणि कैकयी ॥ समान भजें सर्वांठायीं ॥ जनकगृहा न जाईं कदाही ॥ कुरंगनेत्रे[६४] जानकी ॥ ९ ॥ वनासी येसी तरी बहुत ॥ दंडकारण्य कठिण पंथ ॥ वात उष्ण शीत यथार्थ ॥ न सोसवे तुझेनि ॥ ११० ॥ तंव ते सुंदरशृंगारमरोळी[६५] ॥ गुणसरिता जनकबाळी ॥ सुकुमार राजस चंपककळी ॥ काय बोले तेधवां ॥ ११ ॥ अहा जगद्वंद्या श्रीरामा ॥ निजभक्तकामकल्पद्रुमा ॥ गजास्यजनकविश्रामा[६६] ॥ टाकूनि मजला नवजावें ॥ १२ ॥ जगज्जनका रघुवीरा ॥ जनकजामाता जगदुद्धारा ॥ जगरक्षका जलजनेत्रा ॥ जलदगात्रा रघुराजा ॥ १३ ॥ जलचरें जल सांडून ॥ वेगळीं होतां त्यजिती प्राण ॥ द्विजकुळांसी[६७] आकाशा-वांचून ॥ नव्हे भ्रमण कोठेंही ॥ १४ ॥ दीप सांडूनि निश्चितीं ॥ प्रभा न राहे कल्पांतीं ॥ कनकासी टाकूनि कांती ॥ कदा परती नव्हेचि ॥ १५ ॥ शिवावेगळी नोहे अंबिका[६८] ॥ किरणें न सोडिती कदा अर्का[६९] ॥ साधुहृदय सांडोनी सद्विवेका ॥ कोठें जाणें घडेना ॥ १६ ॥ रत्नावेगळी कळा ॥ गोडी न सोडी गुळा ॥ कस्तूरी न सोडी परिमळा ॥ तेवीं मी वेगळी नव्हेंचि ॥ १७ ॥ म्हणोनि रघुपती कोमळांगा ॥ दयाळा ममहृदयाब्जभृंगा[७०] ॥ ताटिकांतका नवमेघरंगा ॥ मज टाकूनि नवजावें ॥ १८ ॥ सिंह सखा असतां पाहीं ॥ मग कांतारीं हिंडतां भय नाहीं ॥ सीतेचे शब्द ऐकोनि हृदयीं ॥ जगदात्मा संतोषला ॥ १९ ॥ जानकीवचन सुधाकर[७१] ॥ तेणें तोषले

६० आकाशवाणी. ६१ शुभ्र अश्रुजलधारा. ६२ पृथ्वीवर. ६३ शिजलेल्या भाताची मूद. ६४ हरिणाक्षी. ६५ हंसी. ६६ गजवदनपित्या शंकराचे विश्रांतिस्थान ६७ पक्ष्यांना. ६८ पार्वती. ६९ सूर्याला. ७० माझ्या अंतःकरणरूपी कमळावरील भ्रमरा. ७१ चंद्र.

रामकर्णचकोर ॥ कीं वचनमेघ गर्जतां गंभीर ॥ मनमयूर नृत्य करी ॥ १२० ॥ रघुपती म्हणे इंदुवदनें ॥ श्रीवसिष्ठाचे चरण धरणें ॥ मज वनाप्रति पाठवणें ॥ हेंचि विनवीं तयाप्रती ॥ २१ ॥ तुज नेतां वनाप्रती ॥ नानाशब्दें लोक निंदिती ॥ यालागीं पुसोनि वनाप्रती ॥ समागमें निघावें ॥ २२ ॥ मग वसिष्ठाचिये चरणीं ॥ नमन करी जगज्जननी ॥ म्हणे मी राघवाची सांगातिणी[७३] ॥ वनवासी होईन ॥ २३ ॥ मग वसिष्ठ म्हणे रघुनाथा ॥ संगें नेईं जनकदुहिता ॥ सवें असों द्यावें सुमित्रासुता ॥ रक्षणार्थ तुम्हांतें ॥ २४ ॥ असो सौमित्रास म्हणे राघवेश ॥ वसिष्ठगृहीं आहे मम धनुष्य ॥ अक्षय भाते निःशेष ॥ वरद शस्त्रें आणावीं ॥ २५ ॥ आपलें संग्रहधन रघुवीर ॥ याचकां वांटी उदार ॥ गुरुगृहास द्रव्य अपार ॥ वस्त्रें भूषणें धाडिलीं ॥ २६ ॥ आणि नाना वस्तु संपत्ति ॥ पाठविल्या गुरुगृहाप्रती ॥ सद्गुरूसी जे न भजती ॥ अभागी निश्चितीं तेचि पैं ॥ २७ ॥ तनुमनधनेंसीं शरण ॥ श्रीगुरूसीं जो न जाय आपण ॥ तो जाहला जरी शास्त्रप्रवीण ॥ न करितां गुरुभजन तरेना ॥ २८ ॥ व्यर्थ गेलें तयाचें तप ॥ जळो जळो तयाचा जप ॥ व्यर्थ काय कोरडा प्रताप ॥ गुरुवचन नावडे जया ॥ २९ ॥ सद्गुरूचे घरीं आपदा[७४] ॥ आपण भोगी सर्व संपदा ॥ त्या अपवित्राचें मुख कदा ॥ दृष्टीं न पहावें कल्पांतीं ॥ १३० ॥ तरी तैसा नव्हे रघुवीर ॥ गुरुगृहाप्रति अपार ॥ द्रव्य वस्त्रें अलंकार ॥ पाठविलीं तेधवां ॥ ३१ ॥ गुरुपुत्र परम सुज्ञ ॥ आदरें आणिला बोलावून ॥ आपुलीं वस्त्रें भूषणें काढून ॥ तया संपूर्ण लेववियलीं ॥ ३२ ॥ सीतेनें वस्त्रें भूषणें अपार ॥ सुयेंज्ञासी[७५] दिधलीं सत्वर ॥ रथ देऊनियां गुरुपुत्र ॥ निजगृहास पाठविला ॥ ३३ ॥ सकळ ऋषींच्या गृहाप्रती ॥ द्रव्य पाठवी रघुपती ॥ चौदा वर्षें निश्चितीं ॥ पुरोन उरे अपार ॥ ३४ ॥ विश्वामित्र असित कण्व ॥ दुर्वास भृगु वामदेव ॥ अंगिराआदि द्विज सर्व ॥ द्रव्य राघव पाठवी त्यांतें ॥ ३५ ॥ कौसल्या सुमित्रा माता जाणा ॥ द्रव्य पाठवी तयांच्या सदनां ॥ रामें आपुले सेवकजनां ॥ द्रव्य अपार दीधलें ॥ ३६ ॥ दरिद्री दीन कुटुंबवत्सल ॥ अशक्त पंगु केवळ ॥ तयांसी द्रव्य तमालनील ॥ आणूनि देता जाहला ॥ ३७ ॥ इष्ट अत्यंत गौरवून ॥ सर्वांस म्हणे रघुनंदन ॥ स्नेह न सांडावा मजवरून ॥ सुखेंकरून नांदा हो ॥ ३८ ॥ मग कैकयीच्या गृहास ॥ येता जाहला जगन्निवास ॥ ते वेळे अयोध्येच्या लोकांस ॥ कल्पांतचि वाटला ॥ ३९ ॥ अयोध्येच्या नरनारी ॥ अश्रु वाहती तयांच्या नेत्रीं ॥ गोब्राह्मणांचा कैवारी ॥ वना जातो म्हणोनियां ॥ १४० ॥ इकडे कैकयीच्या सदनांत ॥ रामें नमिला दशरथ ॥ प्रदक्षिणा करोनी विलोकित ॥ वदनारविंद[७६] पितयाचें ॥ ४१ ॥ दशरथ म्हणे रघुनंदना ॥ राजीवनयना जातोसि वना ॥ मी न ठेवीं आपुल्या प्राणा ॥ कुलभूषणा रघुवीरा ॥ ४२ ॥ राजा म्हणे श्रीरामातें ॥ दळभार नेईं सांगातें ॥ वनामाजी सुखें वर्तें ॥ चौदा वर्षेंपर्यंत ॥ ४३ ॥ तों रामचंद्र बोले वचन ॥

७२ चंद्रासारखें तोंड आहे अशा सीते. ७३ सोबतीण. ७४ दुःख. ७५ गुरुपुत्राला. ७६ मुखकमल.

मी तपालागीं सेवितों कानन ॥ तेथें दळभाराचें कारण ॥ सर्वथाही नसेचि ॥ ४४ ॥ वल्कलें वेष्टूनि वनांत ॥ तप करीन मी यथार्थ ॥ ऐसी कैकयीनें ऐकोनि मात ॥ वल्कलें पुढें ठेविलीं ॥ ४५ ॥ तीं वेष्टूनि श्रीराम ॥ श्यामलांगीं लाविलें भस्म ॥ केशभार सुवास परम ॥ आकर्षोनि बांधिले ॥ ४६ ॥ सौमित्रें वल्कलें वेष्टून ॥ वंदिले दशरथाचे चरण ॥ तों कैकयी म्हणे सीते झडकरून ॥ वस्त्रें भूषणें फेडीं कां ॥ ४७ ॥ ऐसे ऐकतां जनकबाळी ॥ तडिदंबरभूषणें त्यागिलीं ॥ तीं सर्व कैकयीनें आवरिलीं ॥ वल्कलें दिधलीं नेसावया ॥ ४८ ॥ तंव वल्कलें कडकडीत कठिण ॥ नेसतां न येती सीतेलागून ॥ मग आपुलें करें रघुनंदन ॥ नेसवीत जानकीतें ॥ ४९ ॥ जानकी सुकुमार अत्यंत ॥ वल्कलें नेसतां अंगास रुपत ॥ तें देखोनि ब्रह्मसुंत ॥ निर्भर्त्सीत कैकयीतें ॥ ५० ॥ परम निर्दय तूं पापिणी ॥ धेसी सीतेचीं वस्त्रें हिरोनी ॥ तूं जाहालीस राज्य बुडवणी ॥ रामासी वनीं धाडिसी ॥ ५१ ॥ दशरथ म्हणे ते अवसरीं ॥ गृहांतूनि नीघ जा बाहेरी ॥ तीं विकावया मांडोनि बाजारीं ॥ धींगडी बैस आतांचि ॥ ५२ ॥ माझीं बाळें सुकुमार ॥ निर्दये घालिसी बाहेर ॥ मी भीकें बांधिलों साचार ॥ नाहीं तरी शिर छेदितों ॥ ५३ ॥ आडांत पडला मृगेंद्र ॥ कीं सांपळ्यांत गोंविला व्याघ्र ॥ कीं वणव्यांत सांपडला फणिवर ॥ तैसा साचार गुंतलों मी ॥ ५४ ॥ कीं गळीं सांपडला मीनें ॥ कीं पारधियें कोंडिलें हरिण ॥ कीं तस्करें वाटेसी सज्जन ॥ गोंवोनि हरिले सर्वस्वें ॥ ५५ ॥ ऐसें बोलतां नृपवर ॥ हृदयीं दाटला गहिंवर ॥ पोटासी धरून सीता सुंदर ॥ म्हणे बाळे शिणलीस ॥ ५६ ॥ सुकुमार तूं चंपककळी ॥ वातउष्णें शिणशील वेल्हाळी ॥ गुणसरिते जनकबाळी ॥ सांगसी शीर्ण कवणातें ॥ ५७ ॥ सुमंता सांगे राजेंद्र ॥ आणा दिव्य अलंकार ॥ सीतेसी देऊनि सत्वर ॥ जगन्माता गौरवीं ॥ ५८ ॥ त्यावरी ते मंगलभागिनी ॥ मस्तक ठेवी श्वशुरचरणीं ॥ वसिष्ठ नमिला स्नेहेंकरूनी ॥ म्हणे कृपा बहोत असों द्या ॥ ५९ ॥ जैसा द्वितीयेचा चंद्र ॥ दिवसेंदिवस होय थोर ॥ तैसा स्वामी स्नेहादर ॥ अपार वर्धमान होऊं दे ॥ ६० ॥ वसिष्ठ देत आशीर्वचन ॥ जोंवरी मृगांक चंडकिरण ॥ तोंवरी चिरंजीव दोघें जण ॥ अक्षयी राज्य करावें ॥ ६१ ॥ असो वसिष्ठ आणि दशरथ ॥ रामलक्ष्मण निघतां त्वरित ॥ सव्य घालूनि हात जोडित ॥ काननामाजी जावया ॥ ६२ ॥ सीतेसी मुनि म्हणे तूं पूर्ण सती ॥ त्रिभुवनीं वाढेल तुझी कीर्ती ॥ विजयी होईल रघुपती ॥ वनांतरीं जाऊनियां ॥ ६३ ॥ सैंशत राजयुवती ॥ तयां साष्टांग नमी रघुपती ॥ मातें वाढवावी प्रीती ॥ श्रीकौसल्येसमान सर्वदा ॥ ६४ ॥ तों एकचि हांक जाहली ते वेळे ॥ सर्व माता पिटिती वक्षःस्थळें ॥ एक मृत्तिका घेऊनि बळें ॥ मुखामाजी घालिती ॥ ६५ ॥ एक भूमीसी आपटिती शिरें ॥ एक केश तोडिती निजकरें ॥ एक हांक फोडिती एकसरें ॥ रामा राहें रे म्हणोनियां ॥ ६६ ॥ दशरथ म्हणे चापपाणी ॥ ग्रामांतून न जावें चरणीं ॥ जान्हवीपर्यंत षड्गुणी ॥ माझा रथ नेईं कां ॥ ६७ ॥

७७ अरण्य. ७८ विजेप्रमाणें चकाकणारें वस्त्र व दागिने. ७९ वसिष्ठ. ८० रांडके ! ८१ वचनानें. ८२ सिंह. ८३ श्रेष्ठ सर्प. ८४ मासा. ८५ गांठून. ८६ भ्रम. ८७ चंद्रमा. ८८ सूर्य. ८९ अरण्यांत. ९० खातरी.

अवश्य म्हणे रघुनाथ ॥ तत्काळ आणविला रथ ॥ कर जोडून सुमंत ॥ पुढें उभा ठाकला ॥ ६८ ॥ दशरथाचे चरणीं भाळ ॥ ठेवूनियां तमाळनील ॥ निघाला तेव्हां तत्काळ ॥ जाहला कोल्हाळ एकचि ॥ ६९ ॥ सीता रथावरी घेऊन ॥ निघती वेगें रामलक्ष्मण ॥ तेव्हां वक्षःस्थळ बडवून ॥ दशरथरायें धेतलें ॥ ७० ॥ उठोनि राव दशरथ ॥ द्वाराबाहेरी धांवत ॥ लोकांसी म्हणे रघुनाथ ॥ राहवा आतां लवकरी ॥ ७१ ॥ कोठें गेलें माझें पौंडस ॥ कोणीकडे गेला माझा राजहंस ॥ भेटावया आणा डोळस ॥ मी वनास जाऊं नेदीं ॥ ७२ ॥ मीं आपुली घालीन आण ॥ रथापुढें आडवा येऊन ॥ राघवापुढें पदर पसरून ॥ वनासी गमन करूं नेदीं ॥ ७३ ॥ गोपुरावरी चढे दशरथ ॥ चौंचरी जाय खालें पडत ॥ मागुतीं बिदोबिदीं धांवत ॥ दीनवदनेंकरूनियां ॥ ७४ ॥ लोकांसी पुसे दशरथ ॥ राम कोठें दावा त्वरित ॥ वाटेसी अडखळून पडत ॥ मस्तक पिटित अवनीये ॥ ७५ ॥ लोकांसी म्हणे म्लानवदन ॥ अयोध्येसी लावा रे अग्र ॥ माझा जाईल आतां प्राण ॥ दावा वदन रामाचें ॥ ७६ ॥ प्राणाविणें जैसें प्रेत ॥ तैसें अयोध्यापुर दिसत ॥ तरी अग्नि लावूनि त्वरित ॥ मजसहित भस्म करा ॥ ७७ ॥ दाही दिशा दिसती उदास ॥ अयोध्या नगर जाहलें ओसं ॥ राघव गेला वनवासास ॥ मुख लोकांस काय दावूं ॥ ७८ ॥ जाहलें माझें काळें वदन ॥ आतां माझा जड देह त्यागीन ॥ वायुवेगें जाईन ॥ कानेंनीं राम शोधावया ॥ ७९ ॥ लोकांसी म्हणे ते वेळां ॥ मज राघव दाखवा सांवळा ॥ स्त्रिया म्हणती वना गेला ॥ आज्ञा घेऊनि तुमची पैं ॥ १८० ॥ एक वदे वेशींत आहे रथ ॥ ऐकतां धावे दशरथ ॥ तों दूर गेला जनकजामात ॥ ध्वजही परतून दिसेना ॥ ८१ ॥ तों आरडत कौसल्या धांवे ॥ वरती करूनियां बाहे ॥ म्हणे कोमलांगा उभा राहें ॥ वदन तुझें पाहूं दे ॥ ८२ ॥ कैकयीभोंक आमावास्या थोर ॥ माजी न दिसे रामचंद्र ॥ त्यावियोगें आम्हीं चकोर ॥ चिंतामीत पडलों कीं ॥ ८३ ॥ कीं कैकयीवैरे केतु जाण ॥ राम झांकिला चंडकिरण ॥ चतुर्दश वर्षीं मुक्तस्थान ॥ तोंवरी उपोषण पडियेलें ॥ ८४ ॥ राम माझा मेघ पूर्ण ॥ कैकयीवर दुष्ट प्रभंजन ॥ दूर गेला झडपोन ॥ जीवनाविण सुकलों आम्ही ॥ ८५ ॥ मज अंधाची काठी हिरून ॥ कोणें वनीं टाकिली नेऊन ॥ मज दरिद्रियाची गांठ पूर्ण ॥ कोणें निर्दयें सोडिली ॥ ८६ ॥ माझें दवडिलें निधान ॥ चिंतामणि दिघला भिरकावून ॥ माझा परिस नेऊन ॥ कोण्या निर्दयें भिरकाविला ॥ ८७ ॥ मज पान्हा दाटला स्तनीं ॥ माझें तान्हें दावा हो नयनीं ॥ माझा सुकुमार घोर वनीं ॥ भोजन मागेल कोणासीं ॥ ८८ ॥ गेला वल्कलें वेष्टून ॥ कैंचें तया मंगलस्नान ॥ रातोत्पलाहून कोमल चरण ॥ कंटक पाषाण खुपतील ॥ ८९ ॥ आंघळें जातां वनांतरीं ॥ सांगाती टाकूनि गेला दूरी ॥ तें तळमळून शोक करी ॥ माझी परी तेवीं जाहली ॥ १९० ॥ कीं तान्हें टाकूनि परदेशीं ॥ माता जाय सहगमनासी ॥ तें तळमळी जेवीं परदेशी ॥ जाहलें तैसें रामाविण ॥ ९१ ॥ वनीं निघतां रविकुळमंडण ॥ दुःखें उलथती कठिण पाषाण ॥ गज तुरंग पशु पक्षी संपूर्ण ॥ तृण जीवनें न घेती ॥ ९२ ॥ वना

९१ मस्तक. ९२ आकांताची आरोळी. ९३ बालक. ९४ बोबडी वळणें. ९५ रस्तोरस्तीं, गल्लोगल्लीं. ९६ ओरड. ९७ अरण्यांत. ९८ हात. ९९ कैकेयीला दिलेला शब्द. १०० रककमलापेक्षां. १ सती. २ सूर्यकुलाला भूषणभूत ( रामचंद्र ). ३ पाणी.

जातां जनकजामात ॥ वनीं पक्षी रुदन करीत ॥ अयोध्येच्या प्रजा समस्त ॥ पाठीं धांवती रामाचे ॥ ९३ ॥ श्रीरामाचे आवडते ब्राह्मण ॥ भक्त मित्र सेवकजन ॥ चर्मकें[4] अनामिकें[5] आदिकरून ॥ कुटुंबें घेऊनि चाललें ॥ ९४ ॥ ओस पडलें अयोध्यापुर ॥ आबाल-वृद्ध धांवती समग्र ॥ म्हणती सेवूं कांतार[6] ॥ श्रीरामचंद्रासांगातें ॥ ९५ ॥ कैकयी चांडाळीण स्वरी ॥ सीतेचीं वस्त्रें भूषणें हरी ॥ तिजसवालीं दुराचारी ॥ कोण येथें नांदेल ॥ ९६ ॥ दशरथ आतां देईल प्राण ॥ ओस पडेल अयोध्यापट्टण ॥ कैकयीचें शिर वपन करून ॥ छत्र धरोत कोणीही ॥ ९७ ॥ एक म्हणती हा दशरथ ॥ दग्ध जाहला याचा पुरुषार्थ ॥ कैकयीस वधून रघुनाथ ॥ कां हो राज्यीं स्थापिना ॥ ९८ ॥ स्त्रीलोभें जाहला दीन ॥ वनासी पाठविलें श्रीरामनिधान ॥ एक म्हणती वनासी गमन ॥ करावें हा निर्धार ॥ ९९ ॥ दूर टाकिलें अयोध्यापुर ॥ धांवती नगरजनांचे संभार[7] ॥ माघारा पाहे रघुवीर ॥ तों लोक सत्वर धांवती ॥ २०० ॥ तात्काळ उभा केला रथ ॥ सकळ जनांसी हात जोडित ॥ म्हणे शिरीं आहे राजा दशरथ ॥ निजगृहीं स्वस्थ राहावें ॥ १ ॥ आम्हीं सेवितों घोर कानन[8] ॥ तुम्हांसी तेथें न घडे आगमन ॥ आम्हीं सत्वर येतों परतोन ॥ चतुर्दश वर्षें होतांचि ॥ २ ॥ ऐसें श्रीरामें विनविलें ॥ लोक भिडेनें अवघे परतले ॥ रुदन करीत अयोध्येस आले ॥ शोकें जाहले निस्तेज ॥ ३ ॥ तरी श्रीरामभक्त ब्राह्मण ॥ अग्निहोत्री पंडित सज्ञान ॥ त्यांवरी प्रळयचि वर्तला पूर्ण ॥ प्रियप्राण राघवाचे जे ॥ ४ ॥ ते सर्वथा न सोडिती रामातें ॥ म्हणती आम्ही येऊं काननातें ॥ बहुत प्रार्थिलें रघुनाथें ॥ परी कदा न राहती ॥ ५ ॥ रथासवालीं उतरून ॥ धरी ब्राह्मणांचे चरण ॥ ते म्हणती गेलिया प्राण ॥ तुज न सोडूं राघवा ॥ ६ ॥ रघुनाथासी म्हणे सुमित्रासुत[9] ॥ ब्राह्मण श्रम पावले समस्त ॥ आज यांसाठीं राहावें येथ ॥ अहल्यो-द्धारा राघवा ॥ ७ ॥ असो वासरमणि गेला अस्ता ॥ अयोध्येंत काय जाहली अवस्था ॥ स्त्रियांनीं धरून दशरथा ॥ कैकयीसदनाप्रति गेल्या ॥ ८ ॥ कौसल्या सुमित्रा आदिकरून ॥ बैसती दशरथासी वेष्टून ॥ सदनें समस्त दीपेंविण ॥ भणभणितें[10] दिसती पैं ॥ ९ ॥ बाहेर जातां रघुनाथ ॥ अवदशा[11] प्रवेशली नगरांत ॥ जैसा विवेक जातां यथार्थ ॥ अज्ञान हृदयीं प्रवेशे ॥ २१० ॥ राण्या आणि दशरथ ॥ प्राण द्यावया होऊनि उद्यत[12] ॥ महाविष आणिलें त्वरित ॥ जें स्पर्शतां घात करी प्राणाचा ॥ ११ ॥ तंव तो वसिष्ठ श्रीगुरुनाथ ॥ म्हणे सहसा न कीजे आत्मघात ॥ मग वाल्मीकाचा मूळकाव्यार्थ ॥ समस्तांसी सांगीतला ॥ १२ ॥ सहपरिवारें दशग्रीव[13] ॥ वधून बंदीचे सोडवील देव ॥ चतुर्दश वर्षांनीं राघव ॥ गजरें येईल स्वधामा ॥ १३ ॥ जरी मी असत्य बोलेन ॥ तरी रघुनाथाची आण ॥ गुरु-वचन मानूनि प्रमाण ॥ विषपान वर्जियेलें ॥ १४ ॥ इकडे वनीं राहिला जगदुद्धार ॥ तो पद्मोद्भवजनक[14] उदार ॥ स्मरारिमित्र[15] रघु-वीर ॥ सकळ विप्रवेष्टित ॥ १५ ॥ रात्र जाहली तीन प्रहर ॥ रथवेष्टित निजले द्विजवर ॥ जैसा उडुगणेंवेष्टित[16] रोहिणीवर[17] ॥ कीं

४ चांभार. ५ महार. ६ अरण्य. ७ तिच्या कारकीर्दीत. ८ नगरवासी लोकांचे. ९ लक्ष्मण. १० उजाड. ११ अवकळा. १२ तयार. १३ रावण. १४ ब्रह्मदेवाचा पिता. १५ शंकराचा सखा. १६ नक्षत्रसमुदायानें वेढलेला. १७ चंद्र.

किरणचक्रीं चंडांशु[१८] ॥ १६ ॥ निद्रार्णवीं निमग्न ब्राह्मण ॥ ऐसें जाणोनि सीतारमण ॥ सौमित्रासी म्हणे रथ वेगेंकरून ॥ येथोनिया काढीं कां ॥ १७ ॥ काया[२०] जैसी असोन ॥ केव्हां जाय न कळे प्राण ॥ तैसा रथारूढ रघुनंदन ॥ न लागतां क्षण पैं गेला ॥ १८ ॥ अयोध्येकडे दावूनि मार्ग[२१] ॥ मग रथ मुरडिला[२२] सवेग ॥ जैसा अमृतहरणीं स्वर्ग ॥ खगनायक[२३] आक्रमी ॥ १९ ॥ असो आकाशमार्गीं रथ ॥ शृंगवेरापाशीं उतरत ॥ मानससरोवरीं अकस्मात ॥ राजहंस बैसले जैसे ॥ २२० ॥ तेथें गुहकाचा आश्रम निर्मळ ॥ पुढें वाहे जान्हवीजळ ॥ देखोनियां प्रातःकाळ ॥ घननीळ स्नान करी ॥ २१ ॥ पाहूनियां भागीरथी ॥ म्हणे सूर्यवंशी भगीरथ नृपती ॥ तेणें प्रार्थूनि नाना रीतीं ॥ जगदुद्धारा आणिली ॥ २२ ॥ कीं शिवमुकुटींची शुभ्र माळा ॥ प्रसाद दिधला शीघ्रकाळा ॥ फोडून ब्रह्मकटाह[२४] सकळा ॥ परब्रह्मजळ लोटलें ॥ २३ ॥ ब्रह्मा पुरंदर[२५] उमावर ॥ ऋषिगण गंधर्व फणिवर ॥ देखतां जान्हवीचें नीर ॥ स्तुति अपार करिती पैं ॥ २४ ॥ दृष्टीं पाहतां जान्हवीनीर ॥ सहस्र जन्मींचें पातक समग्र ॥ शुष्क दग्ध वन वैश्वानर[२६] ॥ अघ सर्व जळे तेवीं ॥ २५ ॥ ऐसी ते सगरकुळतारिणी ॥ राम लक्ष्मण स्तवोनी ॥ स्नान करिती ते क्षणीं ॥ सीता सुमंत सर्वही ॥ २६ ॥ नित्यकर्म सारूनि सकळीं ॥ न्यग्रोध[२७]-वृक्षाचिये तळीं ॥ श्रीराम बैसे ते वेळीं ॥ तृणशेज घालूनियां ॥ २७ ॥ वैटदुग्ध[२८] घालोनि तये वेळीं ॥ रघुवीर मस्तकीं जटा वळी ॥ भस्मचर्चित चंद्रमौळी ॥ तैसा ते काळीं राम दिसे ॥ २८ ॥ असो इकडे ब्राह्मण समस्त ॥ जागे होऊनि जंव पाहत ॥ तों रथासहित रघुनाथ ॥ गेला निश्चित समजलें ॥ २९ ॥ परम खेद करिती ब्राह्मण ॥ निद्रा नव्हे हा अनर्थ पूर्ण ॥ हातींचा गेला रघुनंदन ॥ आनंदघन जगद्गुरु ॥ २३० ॥ अज्ञान पांघरूण पडलिया ॥ मग आत्माराम न ये प्रतीत्या[२९] ॥ न दिसे जवळ असोनियां ॥ दुर्घट माया पडली हे ॥ ३१ ॥ एक म्हणती राम करुणाघन ॥ दशरथ राव सोडील प्राण ॥ म्हणोनि गेला परतोन ॥ सीताजीवन जगदात्मा ॥ ३२ ॥ तों रथचक्रांचा मार्ग ॥ अयोध्येकडे दिसे सवेग ॥ ब्राह्मण धांवती काढिती माग ॥ परम आनंदले मनीं पैं ॥ ३३ ॥ हर्षयुक्त ब्राह्मण ॥ प्रवेशले अयोध्यापट्टण ॥ तों तेथें नाहीं रघुनंदन ॥ भवबंदनच्छेदक जो ॥ ३४ ॥ सकळ मंगळभोग वर्जूनी ॥ ब्राह्मण बैसले निरंजनीं[३०] ॥ म्हणती श्रीरामदर्शनावांचोनी ॥ प्रवेश सदनीं न करूंचि ॥ ३५ ॥ आतां जान्हवीजळ लंघून ॥ कैसा जाईल रघुनंदन ॥ ती कथा कौतुकें श्रवण ॥ सज्जन करोत आदरें ॥ ३६ ॥ अहो श्रीरामविजय ग्रंथ ॥ हें केवळ स्वानंदामृत ॥ संत हे निर्जर[३१] समस्त ॥ ब्रह्मानंदें सेविती ॥ ३७ ॥ रविकुलमंडणा राघवेंद्रा ॥ ब्रह्मानंदा ज्ञानसमुद्रा ॥ श्रीधरवरदा अतिउदारा ॥ निर्विकारा अभंगा ॥ ३८ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ दशमाध्याय गोड हा ॥ २३९ ॥ ॥

अध्याय ॥ १० ॥ ॥ ओंव्या ॥ २३९ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

१८ सूर्य. १९ देह. २० पावलट. २१ वळविला. २२ गरुड. २३ ब्रह्मांड. २४ इंद्र. २५ अग्नि. २६ वडाच्या झाडाखालीं. २७ वडाचा चीक. २८ अनुभवाला. २९ एकांतांत. ३० देव.

११

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ अध्यायापरीस अध्याय पैरिकर ॥ जैसा पळोपळें चढे दिनैकर ॥ कीं शुक्लपक्षींहूनि चंद्र- ॥ कळा विशेष वाढती ॥ १ ॥ कीं अभ्यास करितां वाढे ज्ञान ॥ कीं योगसाधनें समाधान ॥ कीं वटबीज विस्तारे पूर्ण ॥ दिवसें-दिवस अधिक पैं ॥ २ ॥ कीं बाळपणापासूनि पंडित ॥ अधिकाधिक व्युत्पत्ति वाढत ॥ कीं कृष्णावेणी सैंकीर्ण दिसत ॥ पुढें विशाळ होती जैशा ॥ ३ ॥ कीं अग्रापासूनि मुळाकडे ॥ इक्षुदंडाची गोडी वाढे ॥ कीं गुरुभजन करितां आतुडे ॥ ज्ञानकळा विशेष ॥ ४ ॥ जों जों नेम शुचिष्मंत ॥ तों तों तपश्चर्या वाढत ॥ कीं साधुसमागम करितां त्वरित ॥ क्षमा दया वाढती ॥ ५ ॥ कीं करितां निष्काम दान ॥ कीर्तीनें भरे त्रिभुवन ॥ कीं वीरश्रीची धरितां आंगवण ॥ प्रताप विशेष वाढे पैं ॥ ६ ॥ किंवा धरितां स्नेहादर ॥ मैत्री वाढे अपार ॥ किंवा करितां परोपकार ॥ यश विशेष वाढत ॥ ७ ॥ तैसी रामकथा गोड बहुत ॥ विशेष पुढें रस चढत ॥ कीं वर्षा-काळीं पूर येत ॥ गंगेस जैसा उल्हासें ॥ ८ ॥ गंगेचा पूर मागुता ओहटे ॥ हा दिवसेंदिवस अधिक वाटे ॥ चतुर प्रेमळ जरी श्रोता भेटे ॥ तरी वक्तयासी आनंद ॥ ९ ॥ श्रोता भेटलिया मतिमंद ॥ तरी मावळे व्युत्पत्तीचा आनंद ॥ जैसें सूर्य मावळतां अरविंद ॥ संकोचोनि जाय पैं ॥ १० ॥ असो दशमाध्यायीं कथन ॥ जान्हवीतीरीं रघुनंदन ॥ न्यग्रोधवृक्षातळीं जाण ॥ तृणशेजे पहुडला ॥ ११ ॥ त्यजोनियां मायाजाळ ॥ निरंजनीं योगी जैसा निश्चळ ॥ तैसा राम तमालनीळ ॥ जान्हवीतीरीं शोभला ॥ १२ ॥ तों तेथें गुहक भक्त थोर ॥ तयासी म्हणे राघवेंद्र ॥ परतीरासी सत्वर ॥ आम्हां आतां नेईं तूं ॥ १३ ॥ भवाब्धि तरावया दुस्तर ॥ नामनौका जयाची पवित्र ॥ तो रघुवीर राजीवनेत्र ॥ प्रार्थना करी गुहकाची ॥ १४ ॥ भेणगापुढें क्षीरसागर ॥ म्हणे मज भूक लागली थोर ॥ कीं वाचस्पति मूढास विचार ॥ पुसतसे साक्षेपें ॥ १५ ॥ कीं थिल्लरासी जन्हुकुमरी ॥ म्हणे माझी तृषा हरीं ॥ किंवा दरिद्रियाचे द्वारीं ॥ कल्पवृक्ष याचक ॥ १६ ॥ तैसा राम गुहकातें ॥ म्हणे परपारा नेईं मातें ॥ तंव तो जाणोनियां राघवातें ॥ पुसे कौतुकेंकरूनियां ॥ १७ ॥ म्हणे तुमचें नांव करूं श्रवण ॥ कोठें जातां काय कारण ॥ मग मेदिनीगर्भरत्नभूषण ॥ काय बोलता जाहला ॥ १८ ॥ रवि कुळमंडण दशरथ ॥ तो पिता आमुचा यथार्थ ॥ या देहास नाम रघुनाथ ॥ जन समस्त बोलती ॥ १९ ॥ ऐसें बोलतां रघुनंदन ॥ गुहकमाता करी रुदन ॥ म्हणे याचा नौकेसी लागतां चरण ॥ नौरी संपूर्ण होईल ॥ २० ॥ याचे चरणरज झगटतां ॥ शिळा उद्धरली मिथिलेसी जातां ॥ आम्हीं पूर्वीच ऐकिली कथा ॥ भक्तसंतांचेनि मुखें ॥ २१ ॥ कठिण पाषाण लागतां चरणीं ॥ इंदिरेतुल्य जाहली कामिनी ॥ नौका काष्ठाची तत्क्षणीं ॥ चरण लागतां होईल ॥ २२ ॥ वृद्धा म्हणे पुत्रा अवधारीं ॥ यासी न घालावें नावेवरी ॥

१ गोडी वाढविणारा. २ सूर्य. ३ विद्वत्ता, ज्ञान. ४ लहान. ५ उंसाची. ६ वाढे. ७ अत्यंत शुद्ध. ८ हव्यास. ९ कमल. १० वडाच्या झाडाखालीं. ११ गवताच्या शय्येवर. १२ शुद्ध चैतन्यामध्यें; एकांतवासांत. १३ दरिद्र्यापुढें. १४ बृहस्पति. १५ डबक्यांतल्या पाण्यास. १६ गंगा. १७ परतीरास. १८ भूमिकन्या जी सीता तिचें भूषण श्रीराम. १९ स्त्री. २० पायधूळ. २१ लक्ष्मीसारखी. २२ म्हातारी गुहकमाता.

नौकेची जाहलिया नारी ॥ कैसी जीविका तुझी होय ॥ २३ ॥ एक वनिता[२३] पोसितां ॥ तुज संकट होय तत्त्वतां ॥ नावेवरी रघुनाथा ॥ पुत्रा सर्वथा बैसवूं नको ॥ २४ ॥ मग गुहक म्हणे सर्वोत्तमा ॥ अगाध तुझे चरणांचा महिमा ॥ तरी ते चरण श्रीरामा ॥ मी प्रक्षाळीन स्वहस्तें ॥ २५ ॥ पाषाणाची जाहली नारी ॥ हे तों चरणरजांची थोरी ॥ तरी ते पद प्रक्षाळीन निर्धारीं ॥ मग नावेवरी बैसवीन ॥ २६ ॥ मग गुहकें आश्रमास नेऊन ॥ बैसविला जगन्मोहन[२४] ॥ जो मायातीत[२५] शुद्धचैतन्य[२६] ॥ पद्माक्षीरमण[२७] जगद्गुरु ॥ २७ ॥ विधि हर सहस्रनयन[२८] ॥ ज्याचे वांच्छिती रजःकण ॥ सनकादिकां दुर्लभ पूर्ण ॥ करितां साधन नातळे[२९] जो ॥ २८ ॥ जेथूनि जन्मली जन्हुकुमरी[३०] ॥ ते चरण प्रक्षाळीन स्वकरीं ॥ फळें मूळें आणूनि झडकरी ॥ जनकजामात[३१] पूजिला ॥ २९ ॥ ते वेळीं गुहकाचा हर्ष पाहें ॥ ब्रह्मांडामाजी न समाये[३२] ॥ दृढ धरून श्रीरामाचे पाय ॥ प्रेमेंकरून स्फुंदत ॥ ३० ॥ म्हणे स्वामी रविकुलतिका ॥ दयाब्धे मायाचक्रचालका ॥ अयोध्यापते ताटिकांतका ॥ झडकर येईं मागुती ॥ ३१ ॥ स्वामी तूं परतोन आलियाविण ॥ मी कदापि न भक्षीं अन्न ॥ नाना भोग मंगलस्नान ॥ न करीं येथून श्रीरामा ॥ ३२ ॥ जाणोनियां प्रेमळ भक्त ॥ श्रीराम त्यासी हृदयीं धरित ॥ मग नौका आणूनि त्वरित ॥ जनकजामात बैसविला ॥ ३३ ॥ सौमित्र आणि सीता सती ॥ तिघें नौकेवरी आरूढती ॥ मग सुमंताप्रती रघुपती ॥ आज्ञा देता जाहला ॥ ३४ ॥ सुमंता तूं जाईं वेगें ॥ सकळ वृत्तांत रायासी सांगें ॥ माझा नमस्कार साष्टांगें ॥ वसिष्ठदशरथांसी सांगें कां ॥ ३५ ॥ चतुर्दश वर्षें होतां पूर्ण ॥ मी सत्वर येतों परतोन ॥ सकळ लोकांचें समाधान ॥ करीं सुमंता जाऊनियां ॥ ३६ ॥ तुवां जाऊनियां त्वरित ॥ ग्रामासी आलिया बंधु भरत ॥ क्रोधेंकरून दशरथ ॥ वधील एकादा तयासी ॥ ३७ ॥ याकारणें तुवां सुमंता ॥ वेगें परतोनि जावें आतां ॥ सुमंत उतरून रथास्वालता ॥ चरणीं माथा ठेवीतसे ॥ ३८ ॥ नयनोदकेंकरून ॥ प्रक्षाळिले श्रीरामचरण ॥ सुमंत म्हणे माझेन ॥ आयोध्येस न जाववे ॥ ३९ ॥ मी समागमें येईन ॥ अथवा येथें प्राण देईन ॥ परी मी न जाईं परतोन ॥ दुःख द्यावया समस्तां ॥ ४० ॥ देखती जेव्हां रथ रिता ॥ दशरथ आणि कौसल्या माता ॥ त्यांची करावया हत्या ॥ माझेनि तेथें न जाववे ॥ ४१ ॥ वनीं सांडून तुज रघुनायका ॥ प्रवेशतां अयोध्येंत देखा ॥ मज म्हणती काळमुखा[३३] ॥ कां तूं येथें आलासी ॥ ४२ ॥ मग रघुनाथें धरिलें हृदयीं ॥ म्हणे बा रे चिंता न करीं कांहीं ॥ तूं अयोध्येसी शीघ्र जाईं ॥ आज्ञा माझी पाळीं कां ॥ ४३ ॥ माथां ठेविला वरदहस्त ॥ तेणें शोक समस्त जाहला शांत ॥ जैसा मेघ वर्षतां अद्भुत ॥ वणवा त्वरित विझोनि जाय ॥ ४४ ॥ मग आज्ञा घेऊनि सुमंत ॥ पैलतीरीं उभा अवलोकित ॥ नावेंत बैसला रघुनाथ ॥ गुहक पैलतीरा नेत पैं ॥ ४५ ॥ जैसा निवृत्तितटाकीं[३४] योगी पावत ॥ तैसा पैलतीरा उभा रघुनाथ ॥ सुमंतासी हातें पालवीत[३५] ॥ जाईं त्वरित माघारा ॥ ४६ ॥ यावरी पुढें पुष्करिणी[३६] ॥

२३ स्त्री. २४ श्रीराम. २५ मायेच्या पलीकडचा. २६ ब्रह्म. २७ सीतापति. २८ इंद्र. २९ मिळेना. ३० गंगा. ३१ रामचंद्र. ३२ काळतोंडया. ३३ निवृत्तिमार्गाच्या कडेला. ३४ खुणावीत. ३५ तळें.

तेथें क्रमिली एक रैंजनी ॥ मग प्रयागाप्रती चापपाणी ॥ येता जाहला ते वेळे ॥ ४७ ॥ दृष्टीं देखोनि रघुनंदन ॥ प्रयागही जाहला पावन ॥ पुढें भरद्वाजआश्रमा रघुनंदन ॥ येता जाहला साक्षेपें ॥ ४८ ॥ आला ऐकोनि रघुराज ॥ सामोरा धांवला भरद्वाज ॥ रामें नमस्कारिला द्विज ॥ क्षेमालिंगन दीधलें ॥ ४९ ॥ भरद्वाज बोले सप्रेम ॥ आजि माझा सुफळ जन्म ॥ त्रिभुवनपति श्रीराम ॥ गृहा आला म्हणोनियां ॥ ५० ॥ माझिया पुण्याचे गिरिवरँ ॥ भेदोनि गेले चिदंबरँ ॥ तरीच सीतावल्लभ रघुवीर ॥ मूळेंविण पातला ॥ ५१ ॥ सकळमंगलदायक रघुवीर ॥ जो मंगळभगिनीचा निजवर ॥ मंगळमातेचाँ उद्धार ॥ करावया जात प्रदक्षिणे ॥ ५२ ॥ जो पंचद्वयरथनंदन ॥ करावया सुरांचें बंधमोचन ॥ कमळिर्णामित्रकुंळभूषण ॥ येणें पंथें चालिला ॥ ५३ ॥ तों ऋषी धांवती अपार ॥ त्यांहीं कैसा वेष्टिला रघुवीर ॥ जैसा देवीं वेष्टिला सहस्रनेत्र ॥ कीं किरणांत मित्र विराजे ॥ ५४ ॥ कीं चंदनें वेष्टित मलयानिळ ॥ कीं विरक्तीं वेष्टिला जाश्वनीळ ॥ कीं वराभोंवते सकळ ॥ वऱ्हाडी जैसे मिरवती ॥ ५५ ॥ कीं साधक जैसे निधानाजवळी ॥ कीं रत्नाभोंवतीं परीक्षकमंडळी ॥ कीं कनकाद्रिभोंवतीं पाळी ॥ कुलाचलांची विराजे ॥ ५६ ॥ कीं नक्षत्रें वेष्टिला शशी ॥ कीं मानस वेष्टिलें राजहंसीं ॥ तैसा ऋषींनीं अयोध्यानिवासी ॥ भरद्वाजआश्रमीं वेष्टिला ॥ ५७ ॥ भरद्वाजें पूजिला रघुनंदन ॥ तेथें क्रमिला एक दिन ॥ ऋषी बोलती सुवचन ॥ अजनंदनपुत्राप्रती ॥ ५८ ॥ चतुर्दश वर्षेंपर्यंत ॥ श्रीरामा राहा येथें स्वस्थ ॥ दंडकारण्याप्रती व्यर्थ ॥ कासयासी जावें हो ॥ ५९ ॥ राघव म्हणे येथें राहतां ॥ अयोध्येच्या प्रजा येतील समस्ता ॥ ब्राह्मण आणि माझा पिता ॥ येतील भेटीस निश्चयें ॥ ६० ॥ आम्ही गुप्तरूपें येथुनी ॥ प्रवेशूं महाकाननीं ॥ पुढील भविष्यार्थ मनीं ॥ मुनी तुम्ही जाणतसां ॥ ६१ ॥ असो ऋषिआश्रमीं क्रमोनि एक दिवस ॥ ऋषींस पुसे अयोध्याधीश ॥ पुढें चालिला जगन्निवास ॥ मार्ग आम्हांस दाविजे जी ॥ ६२ ॥ भरद्वाज म्हणे चित्रकूटपर्वतीं ॥ विद्वज्जन बहुत राहती ॥ तुम्हीं तेथें करावी वस्ती ॥ कांहीं दिवस राघवा ॥ ६३ ॥ सिद्धवटपर्यंत ॥ भारद्वाजें बोळविला रघुनाथ ॥ आज्ञा घेऊनि त्वरित ॥ प्रयागासी परतला ॥ ६४ ॥ सिद्धवट देखोनि नमन ॥ करी पद्माक्षीरमणें ॥ त्या सिद्धवटीं सावित्री पूर्ण ॥ सीता देखोन नमस्कारी ॥ ६५ ॥ विजयी होऊनि रघुनंदन ॥ वनींहून आलिया परतोन ॥ दोन लक्ष गोदानें येथें देईन ॥ ब्राह्मणसंतर्पण यथाविधि ॥ ६६ ॥ पुढें चित्रकूटपर्वतावरी ॥ चढला शरयूतीरविहारी ॥ तेथें वाल्मीकऋषी तप करी ॥ बहुत ऋषींसमवेत ॥ ६७ ॥ जेणें नारदकृपेचेनि बळें ॥ अवतारभविष्य कथियेलें ॥ जैसें कमळाअगोदर भरिलें ॥ सरोवरीं जळ जेवीं ॥ ६८ ॥ अवताराआधीं जन्मपत्र ॥ केलें शतकोटी विस्तार ॥ तेणें दृष्टीं देखतां रघुवीर ॥ आश्रमाबाहेर धांवला ॥ ६९ ॥ वाल्मीकाचे निजचरणीं ॥ माथा ठेवी मोक्षदानी ॥ वाल्मीकें वरचेवर उचलोनी ॥ आलिंगन दीधलें ॥ ७० ॥ इतरां समस्त द्विजवरां ॥ भेटला परात्पर सोयरा ॥ सौमित्रें चित्रकूटीं ते अवसरा ॥

३६ रात्र. ३७ उंच पर्वत. ३८ हृदयाकाश. ३९ आमंत्रणावांचून. ४० भूमिपुत्र मंगळ ग्रह त्याची बहीण सीता-तिचा. ४१ भूमीचा. ४२ दशरथसुत. ४३ सूर्यकुलाला भूषणभूत. ४४ इंद्र. ४५ सूर्य. ४६ मलयपर्वतावरील वारा. ४७ महादेव. ४८ कुलपर्वतांची. ४९ या नांवाचें सरोवर. ५० रामाला. ५१ मोळ्या अरण्यांत. ५२ सीतापति राम. ५३ शरयूनदीच्या तीरावर (अयोध्येत) विहार करणारा श्रीराम.

पर्णकुटिका[५४] बांधिली ॥ ७१ ॥ ऋषिमंडळींत रघुवीर ॥ चित्रकूटीं राहिला जगदुद्धार ॥ गुहक पाठवून बाहेर ॥ समाचार नेला हो ॥ ७२ ॥ चित्रकूटीं राहिला रघुनायक ॥ सुमंतासी सांगे गुहक ॥ राघववियोगें दोघांसी दुःख ॥ अत्यंत जाहलें तेधवां ॥ ७३ ॥ गुहकें सुमंत घरासी नेला ॥ म्हणे मी आतां राम कैं[५५] देखेन डोळां ॥ असो रथासहित सुमंत परतला ॥ वेगें अयोध्येसी येतसे ॥ ७४ ॥ अयोध्या दिसे प्रेतवत ॥ रिती[५६] घेऊन प्रवेशला रथ ॥ सुमंत मुखावरी पल्लव[५७] घेत ॥ झांकोनि मुख चालिला ॥ ७५ ॥ सुमंत म्हणे आपुले मनीं ॥ श्रीराम टाकोनि आलों वनीं ॥ ऐशिया मज अभाग्यासी जननी ॥ काय व्यर्थ प्रसवली ॥ ७६ ॥ कैकयी-सदनासमोर ॥ सुमंतें सोडोनि रहंवर[५८] ॥ मंदिरांत प्रवेशे सत्वर ॥ अति मुखचंद्र उतरला ॥ ७७ ॥ रिता आणिला माघारा रथ ॥ अयोध्येंत समस्तांसी जाहलें श्रुत ॥ घरोघरीं एकचि आकांत ॥ सीताकांतवियोगें ॥ ७८ ॥ इकडे कंठीं प्राण धरून ॥ कैकयीसदनीं अजनंदन[५९] ॥ सुमंतें तयासी देखोन ॥ नमन करूं लाजतसे ॥ ७९ ॥ राजा म्हणे सुमंतप्रधाना ॥ कोठें टाकिलें राजीवनयना ॥ मज वाटतें माझिया प्राणा ॥ मूळ[६०] आलासी सत्वर ॥ ८० ॥ जगद्वंद्य माझी वस्तु जाण ॥ टाकिली कोणीं वनीं नेऊन ॥ श्रीराम माझें निधान ॥ कोणें चोरें चोरिलें ॥ ८१ ॥ राजहंस माझा रघुनंदन ॥ पंकगतेंत[६१] ठेविला रोवून ॥ माझें सुढाळें[६२] मुक्तें[६२] पूर्ण ॥ भिरकावून दिधलें कोठें ॥ ८२ ॥ अन्नपूर्णावरहृदयींचें[६३] रत्न ॥ म्यां तुझे हातीं दिधलें पूर्ण ॥ घोरवनीं तें टाकून ॥ कैसा आलासी माघारा ॥ ८३ ॥ मज अंधाची काठी बळें ॥ हिरूनि कोणीं नेली न कळे ॥ अरण्यामाजी माझीं बाळें ॥ उपवासी निराहारें ॥ ८४ ॥ सुंदर सुकुमार सुमनकळी ॥ माझी माउली जनकबाळी ॥ सुमंता रथाखालीं कैसी उतरली ॥ कैसी चालिली पंथीं सांग ॥ ८५ ॥ तिहीं भोजनें कोठें केलीं वनीं ॥ शयन केलें कोणे मेदिनीं[६४] ॥ सुमंता सांग मजलागुनी ॥ देह टाकूनि जाईन मी ॥ ८६ ॥ मग तो सुमंत म्लान-वदन ॥ सांगे सकळ वर्तमान ॥ तीन दिवस निराहार पूर्ण ॥ तिघें जणें पैं होतीं ॥ ८७ ॥ तृणासनीं राजीवनेत्र ॥ पहुडला घनश्याम-गात्र ॥ पांघरावया अंबर ॥ आपाद समस्त देखिला म्यां ॥ ८८ ॥ श्रृंगवेरपर्यंत ॥ म्यां बोळविला रघुनाथ ॥ ज्याचेनि नामें जग तरत ॥ तो गुहकें नेला परपारा ॥ ८९ ॥ मायानदी उल्लंघून ॥ संत स्वरूपीं होती लीन ॥ तैसा पैलतीरा रघुनंदन ॥ देदीप्यमान पाहिला म्यां ॥ ९० ॥ याउपरी करुणाकरें ॥ अयोध्येसी जातां त्वरें ॥ तेथोनियां जगदुद्धारें ॥ निजकरें मज पालविलें[६५] ॥ ९१ ॥ राघवें साष्टांग नमन ॥ घातलें मग तेथून ॥ पुढें चरणचालीं रघुनंदन ॥ करीत गमन वनवासा ॥ ९२ ॥ जैसा अस्ता गेला दिन-कर ॥ तैसा वनीं प्रवेशला रघुवीर ॥ याज्ञिककुंडामाजी वैश्वानर[६६] ॥ आच्छादित जैसा कां ॥ ९३ ॥ ऐसीं सुमंताचीं वचनें भूपाळ ॥ कर्णीं ऐकतांची तत्काळ ॥ धबधबा झाला वक्षःस्थल ॥ पिटोन घेतां ते समयीं ॥ ९४ ॥ सुमंता वनीं रघुनंदन ॥ कैसा परतलासी

५४ होंपडी. ५५ केव्हां. ५६ रिक्त, रिकामा. ५७ पदर, आच्छादान. ५८ रथ. ५९ दशरथ. ६० बोलावणें. ६१ चिखलाच्या खंदकांत. ६२ पाणीदार मोतीं. ६३ शंकराच्या हृदयांतील. ६४ जमिनीवर. ६५ खुणाविलें. ६६ अग्नि.

सोडून ॥ अरे तुझें हृदय निर्दय पूर्ण ॥ कैसा प्राण गेला नाहीं ॥ ९५ ॥ सुमंता तुझा थोर धीर ॥ वज्रापरी तुझें शरीर ॥ वनीं सांडोनि रघुवीर ॥ कैसा येथवरी आलासी ॥ ९६ ॥ गळामाजी गुंतला मीनि[६७] ॥ तैसा तळमळी अंजनंदन[६८] ॥ श्रीरामवियोगाचा अग्न ॥ जाळीत पूर्ण सर्वांगीं ॥ ९७ ॥ म्हणे धांव धांव बा रे रघुनंदना ॥ सरोजनेत्रा[६९] सुहास्यवदना ॥ कोमलांगा माझिया प्राणा ॥ गेलासी वना टाकूनि ॥ ९८ ॥ हांक फोडिली दशरथें ॥ धांव माउलिये रघुनाथे ॥ मज सांडोनि तान्हयातें ॥ गेलीस वना दूरदेशा ॥ ९९ ॥ रामा चालिला माझा प्राण ॥ अंतकाळीं दावीं तुझें वदन ॥ ऐसें बोलतां वटारिले नयन ॥ सोडिला प्राण रामस्मरणें ॥ १०० ॥ राम राम करितां दशरथ ॥ जाहला रामरूप यथार्थ ॥ खुंटला शोक समस्त हेत ॥ मौंत सर्व राहिली ॥ १ ॥ पहा शरीराचें कर्म गहन ॥ चौघे पुत्र दशरथास असोन ॥ एकही जवळी नसतां सोडिला प्राण ॥ मग सुमंत प्रधान धांवला ॥ २ ॥ तेणें उशासी मांडी दिधली ॥ सुमित्रा कौसल्या जवळी आली ॥ तेव्हां एकचि हांक जाहली ॥ महाशब्देंकरूनियां ॥ ३ ॥ सप्तशत राण्या सकळ ॥ दुःखें पिटिती वक्षःस्थळ ॥ हडबडलें अयोध्यापुर सकळ ॥ शोक तुंबळ लोकांतें ॥ ४ ॥ आक्रोशें कौसल्या सुमित्रा रडत ॥ रामवियोगें दुःख बहुत ॥ त्यांत मृत्यु पावला दशरथ ॥ नाहीं अंत शोकातें ॥ ५ ॥ जैसें पायांस डांखिजे[७०] महाव्यालें ॥ तों मस्तकीं वृश्चिकें ताडिलें ॥ कीं वणव्यांत प्राणी सांपडले ॥ त्यावरी तोडिलें तस्करांनीं[७१] ॥ ६ ॥ आधींच बहुत धाकेंकरून ॥ त्यावरी पडती पाषाण ॥ आधींच नवज्वरें गेला व्यापून ॥ त्यांत विषपान पैं झालें ॥ ७ ॥ आधींच गृहास लागला अग्न ॥ त्यावरी साह्य जाहला प्रभंजनें[७२] ॥ कीं पूरीं जातां बुडोन ॥ तों गळां पाषाण बांधिला ॥ ८ ॥ व्याघ्रभयें पळतां उठाउठी ॥ तों रिसें[७३] कंठीं घातली मिठी ॥ तैसी कौसल्येस जाहली गोष्टी ॥ ललाट पिटी अंवनीये[७४] ॥ ९ ॥ तों तेथें पातला ब्रह्मसुंत[७५] ॥ म्हणे शोक कां करितां व्यर्थ ॥ आतां वेगीं आणोनि भरत ॥ राज्यीं तया स्थापावें ॥ ११० ॥ एक राजा उभा राहिल्याविण ॥ करूं नये राजाचें दहन ॥ आणि समीप नसतां नंदन ॥ कदा अग्न देऊं नये ॥ ११ ॥ मग तैलद्रोणींत साचार[७६] ॥ घातलें दशरथाचें शरीर ॥ वसिष्ठ म्हणे सुमंता सत्वर ॥ रथ घेऊनि धांवें कां ॥ १२ ॥ सूर्योदय होतां येथें ॥ वेगीं घेऊनि यावें भरतातें ॥ त्याचे कर्णीं वोखटें तेथें ॥ सर्वथाही सांगूं नको ॥ १३ ॥ वनास गेला रघुनंदन ॥ अथवा दशरथें सोडिला प्राण ॥ हें गुह्य त्यासी न सांगोन ॥ वेगें घेऊन येइंजे ॥ १४ ॥ भरत केवळ श्रीरामभक्त ॥ ही गोष्ट ऐकतां विपरीत ॥ तत्काळ देह टाकील तेथ ॥ यालागीं श्रुत न करावें ॥ १५ ॥ भक्त विरक्त चतुर वरिष्ठ ॥ जो ज्ञानगंगेचा निर्मळ लोट ॥ जो विवेकरत्नांचा मुकुट ॥ एकनिष्ठ सुभट[७७] जो ॥ १६ ॥ वैराग्यवैरागर[७८] पूर्ण ॥ जो आनंदभूमीचें निधान ॥ जो विरक्तवल्लीचें सुमन[७९] ॥ जो समुद्र सत्याचा ॥ १७ ॥ जो शांतिवृक्षाचें पक्वफळ ॥ जो दयेचा आगर केवळ ॥ कीं उपरतीचा निर्मळ[८०] ॥ पूर्ण कुंभ उचंबळला ॥ १८ ॥

६७ मासा. ६८ दशरथ. ६९ कमलनयना. ७० गोष्ट. ७१ दंश करावा. ७२ मोठ्या सर्पानें. ७३ चोरांनीं. ७४ वायु. ७५ अस्वलानें. ७६ भूमीवर. ७७ वसिष्ठ. ७८ तेलाच्या डोणींत. ७९ वाईट. ८० थोर वीर. ८१ वैराग्यरूप द्विज्याची खाण. ८२ पुष्प. ८३ वैराग्याचा.

ऐसा सर्वगुणीं अलंकृत ॥ वेगीं घेऊन ये भरत ॥ तैसाचि निघाला सुमंत ॥ आचार्यचरण वंदूनी ॥ १९ ॥ वायुवेगें चालिला सुमंत ॥ स्वप्न देखे मातुँळीं भरत ॥ कृष्णवर्णवस्त्रवेष्टित ॥ नारी एक देखिली ॥ १२० ॥ तिनें घेऊनियां करीं ॥ तैल जिरवी आपुले शिरीं ॥ भरत जागा होऊनि झडकरी ॥ रुदन करी आक्रोशें ॥ २१ ॥ म्हणे स्वप्न नव्हे हा अनर्थ ॥ आम्ही चौघे बंधु आणि दशरथ ॥ पांचांमाजी जीवघात ॥ होईल एकाचा निर्धारें ॥ २२ ॥ आणि प्राणसखा अत्यंत ॥ तो अंतरेल दूर बहुत ॥ धरणीवरी मस्तक भरत ॥ आपटी शोकें तेधवां ॥ २३ ॥ आक्रंदोनिं हांक देत ॥ केवीं दृष्टीं देखेन रघुनाथ ॥ राजाधिराज दशरथ ॥ अंतरला ऐसें वाटतें ॥ २४ ॥ तों मातुँळ संग्रामजित ॥ भरतासी स्नेहें हृदयीं धरित ॥ शत्रुघ्नासी समजावित ॥ शोक व्यर्थ कां करितां ॥ २५ ॥ रजनी सरतां तत्काळ ॥ सिद्ध करोनि चतुरंगदळ ॥ अयोध्येप्रति उतावेळ ॥ देऊन पाठवितों तुम्हांतें ॥ २६ ॥ ऐसें बोलतां सरली रजनी ॥ भरत शत्रुघ्न उठोनी ॥ नगराबाहेर येऊनी ॥ मार्ग लक्षीत अयोध्येचा ॥ २७ ॥ उर्ध्ववदनेंकरूनि चकोर ॥ विलोकीत जैसा चंद्र ॥ कीं चक्रवाक चिंती दिवाकरँ ॥ किंवा मयूर मेघातें ॥ २८ ॥ ऐसा अयोध्येचा मार्ग लक्षीत ॥ तों एकाएकीं देखिला रथ ॥ वरी प्रधान सुमंत ॥ आरूढोनि येतसे ॥ २९ ॥ मंद मंद येत रहंवँर ॥ अश्वांचे नेत्रीं वाहे नीर ॥ ध्वजाचें विद्युत्प्राय चीर९० ॥ अति मलिन दिसतसे ॥ १३० ॥ वरी सुमंत म्लानवदन ॥ नेत्रीं वाहत अश्रुजीवन ॥ राघवलीला आठवून ॥ क्षणक्षणां स्फुंदतसे ॥ ३१ ॥ मागुती वस्त्रें नेत्र पुसीत ॥ तों शत्रुघ्न आणि भरत ॥ जवळी आले धांवोनि त्वरित ॥ चिन्हें विपरीत देखोनियां ॥ ३२ ॥ सुमंतें देखतांचि भरत ॥ वेगें रथाखालीं उतरत ॥ क्षेमालिंगन दोघां देत ॥ सांगे त्वरित बोलाविलें ॥ ३३ ॥ भरत सुमंताचें वदन ॥ क्षणक्षणां पाहे विलोकून ॥ म्हणे सरल्या तुझे आरक्त नयन ॥ शोकें झाले दिसती पैं ॥ ३४ ॥ काय अयोध्येचें वर्तमान ॥ सुखी आहे कीं रघुनंदन ॥ श्रीदशरथ क्षेम कल्याण ॥ सुखरूप आहे कीं ॥ ३५ ॥ सुमंत म्हणे सुखी रघुनंदन ॥ तुम्हांसी बोलाविलें त्वरेंकरून ॥ मग रथीं बैसत भरतशत्रुघ्न ॥ त्वरेनें शीघ्र चालिले ॥ ३६ ॥ पुढें धुरे बैसला सुमंत ॥ घडीघडी नेत्रांसी वस्त्र लावीत ॥ तेणें भरत होय सद्गदित ॥ तों पुढें देखत अयोध्या ॥ ३७ ॥ प्राणरहित जैसें शरीर ॥ तैसें दिसे अयोध्या नगर ॥ कीं जीवेंनेंविण सरोवर ॥ किंवा कांतोंर दग्ध जैसें ॥ ३८ ॥ कीं नारी जैसी भ्रताराविण ॥ कीं जननीविण तान्हें दीन ॥ कीं नासिकावांचोनि वदन ॥ अयोध्याभुवन तेवीं दिसे ॥ ३९॥ राजमंदिराचे ढळले कळस ॥ मंगलवाद्यांचा नाहीं घोष ॥ घरोघरीं नारी पुरुष ॥ शोक आक्रोशें करिताती ॥ १४० ॥ होतें दशरथाचें प्रेत ॥ सुमंतें तेथेंचि नेला रथ ॥ छत्र भंगलें देखतां भरत ॥ रथाखालीं पडियेला ॥ ४१ ॥ दशरथाचें प्रेत देखोनि ॥ भरत तेव्हां लोळे धरणीं ॥ अश्रुधारा वाहती नयनीं ॥ शोक गगनीं न समाये ॥ ४२ ॥ शोकसमुद्रीं निमग्न ॥ जाहला कैकयीनंदन ॥

८४ मातुलगृहीं. ८५ मामा. ८६ रात्र. ८७ सूर्य. ८८ रथ. ८९ विजेसारखें. ९० वस्त्र. ९१ जलरहित, शुष्क. ९२ अरण्य. ९३ पृथ्वीवर.

भोंवते सद्गद प्रजाजन ॥ दुःखेंकरून बोलती ॥ ४३ ॥ मग सुमंतप्रधानें सांवरूनी ॥ भरत बैसविला उठवोनी ॥ भरत विचार करी मनीं ॥ राम नयनीं पाहीन आतां ॥ ४४ ॥ संसारमाया सांडोन ॥ दशरथ पावला स्वर्गभुवन ॥ मी आतां रामचरण ॥ दृढ धरीन निजभावें ॥ ४५ ॥ विलोकितां श्रीरामवदन ॥ मी शोकावेगळा होईन ॥ प्रधानासी म्हणे मज नेऊन ॥ श्रीरामचरणांवरी घालावें ॥ ४६ ॥ वडिल बंधु रघुनाथ ॥ दशरथासम यथार्थ ॥ रामसदनाकडे भरत ॥ मुरडोनियां चालिला ॥ ४७ ॥ परी वनास गेला रघुनंदन ॥ हें कोणासी न बोलवे वचन ॥ एक म्हणती देईल प्राण ॥ सीतारमण न देखतां ॥ ४८ ॥ तों आरडत कौसल्यामाय ॥ भरत धांवोनि धरी दृढ पाय ॥ माये श्रीराम कोठें आहे ॥ तो लवलाहें दावीं कां ॥ ४९ ॥ तों कौसल्येसी आली मूर्च्छना ॥ बोलतां न बोलवे वचना ॥ बा रे राम गेला तपोवना ॥ मग रायें प्राण त्यजियेला ॥ १५० ॥ भरतें ऐसें ऐकिलें ॥ लल्लाटें[95] भूमीवरी आपटिलें ॥ तें दुःख नवजाये[96] वर्णिलें ॥ कल्पांत मांडला ते वेळीं ॥ ५१ ॥ आहा रघुवीरा राजीवनेत्रा ॥ नवमेघरंगा स्मरारिमित्रा[97] ॥ जगद्वंद्या कोमलगात्रा ॥ कां उपेक्षिलें आम्हातें ॥ ५२ ॥ ऐसें बोलोनियां भरत ॥ मेदिनीवरी[98] अंग घालित ॥ माझी माउली रघुनाथ ॥ गेली निश्चित टाकोनियां ॥ ५३ ॥ मेदिनीगर्भरत्नभूषण[99] ॥ वनासी निघतां रघुनंदन ॥ दशरथें जेवीं सोडिला प्राण ॥ तैसें मरण मज कां न ये ॥ ५४ ॥ अद्यापि न ये मजला मृत्यु ॥ कां मृत्यूच निमाला[100] यथार्थ ॥ रामवियोगाचें दुःख अत्यंत ॥ मृत्यूसीही न सोसवे ॥ ५५ ॥ धन्य धन्य राजा दशरथ ॥ कोमळहृदय प्रेमळ यथार्थ ॥ देह ठेवूनि विदेहजामात ॥ जवळ केला त्वरेनें ॥ ५६ ॥ तंव तो कमलोद्भवसुत[1] ॥ आचार्य पातला त्वरित ॥ भरत जाऊनि चरण धरीत ॥ मज रघुनाथ दाखवीं ॥ ५७ ॥ पहावया भरताचें मन ॥ वसिष्ठ काय बोले वचन ॥ तुज राज्य दिधल्याविण ॥ रायास अग्नि देऊं नये ॥ ५८ ॥ आणि तुझिया मातेच्या मनांत ॥ तुज राज्य व्हावें प्राप्त ॥ वनास गेला जनकजामात ॥ तेंच निमित्त जाण पां ॥ ५९ ॥ ऐसें ऐकतां ते अवसरीं ॥ परम दुःख पावला अंतरीं ॥ भरत आक्रंदत दीर्घस्वरीं ॥ राज्य करीं म्हणतांचि ॥ १६० ॥ सुकुमार चंपककळिकेवरी ॥ चपळा[2] पडतां न उरे उरी[3] ॥ कीं कर्पूरजननीचे[4] शिरीं ॥ शुंडाग्रहारीं ताडी गज ॥ ६१ ॥ कीं शस्त्रघायें तोडिलीं बाळें ॥ कीं वज्रघायीं चूर्ण कपाळें[5] ॥ कीं अमींत पडलीं मुक्ताफळें ॥ तैसें वाटलें भरतातें ॥ ६२ ॥ श्रीराम गेला वनांतरीं ॥ जरी मी येथें राज्य करीं ॥ तरी जितुके ब्राह्मण पृथ्वीवरी ॥ म्यां वधिले स्वहस्तें ॥ ६३ ॥ जगद्वंद्यास वनीं सांडोन ॥ जरी मी अंगीकारीं राज्यासन ॥ विगतधवा जे जारीण ॥ तिचें गर्भस्थळ मी पावें ॥ ६४ ॥ रजस्वलेच्या शोणितासमान ॥ राज्याभिषेकाचें उदक पूर्ण ॥ मी आपुल्या उदरीं शस्त्र घालीन ॥ राज्यासन घ्या म्हणतां ॥ ६५ ॥ ज्यासी मृडानीवर ध्याई मनीं ॥ ज्याची अयोध्या हे राजधानी ॥ ते मी भोगितांचि ये क्षणीं ॥ महाचांडाळ मी जाहलों ॥ ६६ ॥

९४ कपाळ. ९५ वर्णिलें जात नाहीं, अवर्णनीय. ९६ शंकराच्या सरख्या. ९७ पृथ्वीवर. ९८ श्रीराम, सीतापती. ९९ लुप्त झाला. १०० मृत्यूला. १ वसिष्ठ. २ विद्युल्लता. ३ अवशेष. ४ केळीचे. ५ शंकर.

रघुवीर सांडोन काननीं ॥ जरी मी भोगीन राजधानी ॥ तरी जिव्हा जावो झडोनी ॥ कीटक पडोन तत्काळ ॥ ६७ ॥ वनीं सांडोनि जगन्मोहन ॥ जरी मी घेईन राज्यासन ॥ तरी गुरुवध मद्यपान ॥ मात्रागमन घडे मज ॥ ६८ ॥ कलंक लागेल वासरमणी[6] ॥ पाप प्रवेशेल गंगाजीवनीं ॥ मृगजळीं घटोद्भवमुनी[7] ॥ जरी बुडोन जाईल ॥ ६९ ॥ चित्रकिरणाचियावरी[8] ॥ चढती मुंगियांच्या हारी ॥ कीं वडवानळाचे शिरीं ॥ नृत्य करी पतंग ॥ १७० ॥ कीं ऊर्णनाभीच्या[9] तंतुसूत्रीं ॥ जरी उचलेल धरित्री ॥ कीं तृणपाशें मेंढाकेसरी[10] ॥ जरी गुंतोन पडेल ॥ ७१ ॥ कीं मही उचलेल मशका ॥ जरी सुपर्णासी[11] बाधेल अळिकी[12] ॥ कीं दृष्टीं देखतां दीपका ॥ मृगांक[13] खालीं पडेल ॥ ७२ ॥ जरी हें घडेल ब्रह्मनंदना ॥ तरी मज होईल राज्यवासना ॥ ऐकोनि भरताच्या वचना ॥ वसिष्ठ जाहला सद्गद ॥ ७३ ॥ अहो तें भरताचें वचन ॥ वैराग्यवल्लीचें सुमन ॥ कीं विवेकनभींचे उडुगण[14] ॥ प्रेमतेजें झळकत ॥ ७४ ॥ कीं तें भक्तिपंथींचें सरोवर ॥ कीं निश्चयभावाचें दिव्य नगर ॥ कीं तें विश्रांतीचें मंदिर ॥ वचनरूप प्रत्यक्ष ॥ ७५ ॥ असो तो कैकयीनंदन ॥ म्हणे स्वामी शिवतों तुझें चरण ॥ श्रीरघुवीराची मज आण ॥ राज्याभिषेक करूं नेदीं ॥ ७६ ॥ कैकयीचें काळें वदन ॥ माता नव्हे ते लांव[15] पूर्ण ॥ तीस आवडे रांडपण ॥ पतीचा प्राण घेतला ॥ ७७ ॥ मग वसिष्ठें जें जें चिंतिलें ॥ तें तें भरतासी निवेदिलें ॥ मंथरा दासीचे बोलें ॥ कार्य नासलें सर्वही ॥ ७८ ॥ कलहकल्लोळसरिता ॥ ते ही मंथरा दासी तत्त्वतां ॥ कुबुद्धि शिकवूनि तुझी माता ॥ इनेंचि पाहें पां बोधिली ॥ ७९ ॥ ऐसी ऐकतांचि मात ॥ वेगें धांवे वीर भरत ॥ मंथरेची वेणी अकस्मात ॥ धरूनि शस्त्र काढिलें ॥ १८० ॥ मग धांवोनि ब्रह्मसुत ॥ भरताचा धरिला हात ॥ म्हणे स्त्री वधितां पाप अद्भुत ॥ कदा विपरीत करूं नको ॥ ८१ ॥ मग लत्ताप्रहारेंकरूनी ॥ भरतें ताडिलें तियेलागूनी ॥ त्रिवक्रकुब्जा[16] तेथूनी ॥ नाम तियेसी जाहलें ॥ ८२ ॥ असो ब्रह्मपुत्रें तये क्षणीं ॥ रामपादुका सिंहासनीं ॥ मणिमय जडित दिव्यरत्नीं ॥ सिंहासनीं स्थापिल्या ॥ ८३ ॥ त्यांवरी छत्र धरून ॥ मग राजदेह उचलोन ॥ अग्निमुखीं समर्पून ॥ उत्तरकर्म भरत करी ॥ ८४ ॥ सप्तशत रायाच्या युवती[17] ॥ अग्निप्रवेश तत्काळ करिती ॥ जैसीं सूर्यकिरणें सामावती ॥ सूर्यासरसीं अस्तमानीं ॥ ८५ ॥ सुमित्रा आणि कौसल्या ॥ प्राण द्यावया सिद्ध जाहल्या ॥ मग त्या वसिष्ठें वर्जिल्या ॥ शास्त्रप्रमाण रीतीनें ॥ ८६ ॥ पुत्रवंत्या स्त्रिया विशेष ॥ त्यांहीं न करावा अग्निप्रवेश ॥ तों कौसल्या म्हणे आम्हांस ॥ कशास व्यर्थ ठेवितां ॥ ८७ ॥ वनास गेला रघुनाथ ॥ परत्र[18] पावला दशरथ ॥ आतां काय वांचूनि व्यर्थ ॥ कोंया[19] अर्मीत निक्षेपूं ॥ ८८ ॥ मग वसिष्ठ सांगे वाहूनि आण ॥ तुम्हांस श्रीराम भेटवीन ॥ मग वनासी करील गमन ॥ पुढतीं आगमन करील पैं ॥ ८९ ॥ निवटोन असुर समस्त ॥ अयोध्येसी येईल रघुनाथ ॥ हा वाल्मीकाचा मूळ काव्यार्थ ॥ माना यथार्थ सर्वही ॥ १९० ॥ गुरुवचन मानूनि प्रमाण ॥

६ सूर्याला. ७ अगस्तिऋषि. ८ सूर्याचर. ९ कोळ्याच्या. १० सिंह. ११ गरुडास. १२ कीड. १३ चंद्र. १४ नक्षत्र. १५ जखीण. १६ तीन ठिकाणीं वांकडी. १७ स्त्रिया, राण्या. १८ स्वर्गलोक. १९ देह.

चित्रकूटीं भेटेल रघुनंदन ॥ अग्निप्रवेश म्हणून ॥ वर्ज केला ते काळीं ॥ ९१ ॥ असो रात्र जाहली दोन प्रहर ॥ कैकयी येऊन सत्वर ॥ भरतासी एकांत विचार ॥ सांगे कैसा ऐका तें ॥ ९२ ॥ म्हणे पुत्रा ऐक वहिलें ॥ संकटीं म्यां राज्य साधिलें ॥ रामासी वनवासा पाठविलें ॥ नानायत्नेंकरूनियां ॥ ९३ ॥ वना गेले रामलक्ष्मण ॥ हें तूं मानीं परम कल्याण ॥ सत्वर घेईं छत्रसिंहासन ॥ कांहीं अनमान करूं नको ॥ ९४ ॥ पितृवचन करावया प्रमाण ॥ वनास गेला रघुनंदन ॥ त्या शोकास्तव राव पावला मरण ॥ हेंही जाण बरें जाहलें ॥ ९५ ॥ सापत्नबंधु राम निर्धारें ॥ त्यासी वंचन करितां बरें ॥ देव दैत्य दाँयाद[२०] वैरें ॥ अद्यापिही वर्तती ॥ ९६ ॥ गरूड सर्प सोंपत्न[२१] ॥ वैरें वर्तती दोघेजण ॥ जरी तूं होसी माझा नंदन ॥ तरी वचन पाळीं हें ॥ ९७ ॥ भरतें ऐकतांचि तिची वाणी ॥ म्हणे उठें येथोनि चांडाळिणी ॥ तुझा वध केला असता ये क्षणीं ॥ परी माता म्हणोनि रक्षिली ॥ ९८ ॥ परम निर्दय तूं पापीण ॥ अमंगळ तूं लौंव[२२] पूर्ण ॥ घेतला दशरथाचा प्राण ॥ जानकीजीवन धाडिला वना ॥ ९९ ॥ तूं सर्पीण होसी यथार्थ ॥ डंखोनि[२३] मारिला दशरथ ॥ माझा सखा रघुनाथ ॥ दूर वनासी धाडिला ॥ २०० ॥ पिता बंधु दोघेजण ॥ गेले ज्या पंथेंकरून ॥ त्या मार्गें मीही जाईन ॥ ऊठ येथूनि पापरूपे ॥ १ ॥ असो कैकयी गेली उठोन ॥ तों उदय पावला चंडकिरण[२४] ॥ भरतें वल्कलें वेष्टून ॥ भस्म लाविलें सर्वांगीं ॥ २ ॥ सर्व अलंकार त्यागून ॥ वटदुग्धीं[२५] जटा वळून ॥ वनाप्रति कैकयीनंदन ॥ चरणचालीं चालिला ॥ ३ ॥ षोडशपद्मे दळभार ॥ नगरलोक निघाले सत्वर ॥ ओस पडिलें अयोध्यापुर ॥ जीवमात्र चालिले ॥ ४ ॥ कौसल्या सुमित्रा दोघीजणी ॥ शिबिकेंत[२६] बैसल्या ते क्षणीं ॥ वरी वस्त्रावरण[२७] घालुनी ॥ वाहनासहित झांकिल्या ॥ ५ ॥ वसिष्ठादि सकळ ब्राह्मण ॥ सवें निघाले चान्ही वर्ण ॥ अयोध्येंत कैकयीवांचून ॥ नाहीं कोणी राहिलें ॥ ६ ॥ जन म्हणती ओस नगर ॥ कैकयीचें वपन करूनि सत्वर ॥ तिजवरी धरावें छत्र ॥ परम अपवित्र पापिणी ॥ ७ ॥ तिचे पोटीं भरत जन्मला ॥ जैसा कागविष्ठेंत अश्वत्थ प्रकटला ॥ कीं कागिणीपोटीं कोकिळा ॥ निपजे अवचिता जैसी कां ॥ ८ ॥ असो भरत म्हणे सुमंतातें ॥ रघुवीर गेला कोण्या पंथें ॥ तोच मार्ग दावीं आम्हांतें ॥ तुझें अनुमतें चालूं आम्ही ॥ ९ ॥ मग भरतसमवेत दळभार ॥ गुहकाश्रमा पावले सत्वर ॥ वाजत वाद्यांचे गजर ॥ नादें अंबर[२८] कोंदलें ॥ २१० ॥ गुहक विलोकी दुरून ॥ म्हणे मातेनें धाडिले दोघेजण ॥ दळभार सिद्ध करून ॥ रामलक्ष्मण वधावया ॥ ११ ॥ मग सहस्रांचे सहस्र किरात[२९] ॥ गुहकें मेळविले समस्त ॥ धनुष्य ओढोनियां त्वरित ॥ जान्हवीतीर बळकाविलें ॥ १२ ॥ भरतासी सांगती सेवक ॥ संग्रामासी सिद्ध जाहला गुहक ॥ जन्हुकुमरीचें[३०] उदक ॥ स्पर्शों न देती कोणातें ॥ १३ ॥ मग शत्रुघ्न आणि दळपती[३१] ॥ भरतासंगें विचार करिती ॥ म्हणती आज्ञा द्यावी निश्चितीं ॥ शिक्षा लावूं तयांतें ॥ १४ ॥ भरत म्हणे गुहक रामभक्त ॥

२० भाऊबंदकीनें. २१ सावत्र. २२ जखीण, विवशी. २३ दंशून. २४ सूर्य. २५ वडाच्या चिकानें. २६ पालखींत. २७ बुरखा. २८ आकाश. २९ भिल्ल. ३० गंगेचें. ३१ सेनानायक.

म्यां ऐकिला होता वृत्तांत ॥ तरी समाचार न घेतां यथार्थ ॥ युद्ध त्यासीं न करावें ॥ १५ ॥ मग भरत पुढें होऊन ॥ गुहकाप्रती बोले वचन ॥ त्वां युद्ध आरंभिलें निर्वाणें[३३] ॥ काय कारण सांग तें ॥ १६ ॥ गुहक म्हणे घेऊन दळभार ॥ वधावया जातोसी रघुवीर ॥ तरी मी श्रीरामउपासक निर्धार ॥ वेंचीन प्राण स्वामिकाजीं ॥ १७ ॥ माझा स्वामी रघुनंदन ॥ निराहार वनीं निर्वाणें[३३] ॥ तुम्ही मारावया दोघेजण ॥ दळभारेंसीं चालिलां ॥ १८ ॥ परम निंदक दुर्जन खळ ॥ जे रघुनाथद्वेषी चांडाळ ॥ त्यांचीं शिरें छेदोनि तत्काळ ॥ पाठवीन यमलोका ॥ १९ ॥ मातेच्या बोलेंकरूनी ॥ श्रीराम वधूं पाहसी वनीं ॥ तरी तुम्हांस जान्हवीचें पाणी ॥ स्पर्शों नेदीं अणुमात्र ॥ २२० ॥ ऐकतां गुहकाचें वचन ॥ भरतासी आलें दीर्घ रुदन ॥ गुहकास म्हणे सोडूनि बाण ॥ माझें शिर छेदोनि टाकीं ॥ २१ ॥ मज पापियाचा देह त्वरित ॥ गुहका छेदीं यथार्थ ॥ कैकयीनें केला अनर्थ ॥ सीताकांत घाडिला वना ॥ २२ ॥ जन्मलों कैकयीचे उदरीं ॥ जन म्हणती हा रामचंद्राचा वैरी ॥ तरी गुहका आतां वेग करीं ॥ छेदीं झडकरी देह माझा ॥ २३ ॥ श्रीरामवियोगाचें दुःख ॥ मज न सोसवेचि अणुमात्र देख ॥ निर्वाणबाण सोडोनि एक ॥ मज रघुनायकपद दावीं तूं ॥ २४ ॥ भरताचें अंतरें[३४] ओळखून ॥ गुहक धांवोनि धरी चरण ॥ दोघांसी पडिलें आलिंगन ॥ गेले विसरून देहभाव ॥ २५ ॥ कंठ दाटला दोघांचा ॥ उभारणी जाहली रोमांचा ॥ दोघांचे नेत्रीं अश्रुधारांचा ॥ पूर पडत ते काळीं ॥ २६ ॥ दोघेही श्रीरामाचे भक्त ॥ दोघेही योगी विरक्त ॥ दोघेही श्रीरामास आवडत ॥ वल्कलें वेष्टित दोघेही ॥ २७ ॥ दोघांहीं केलें भस्मोद्धूलन[३५] ॥ दोघांहीं केलें जटावळण ॥ दोघेही न घेती अन्न ॥ रामदर्शनावांचोनि ॥ २८ ॥ गुहक म्हणे भरता वसिष्ठा ॥ श्रीराम गेला चित्रकूटा ॥ आतां चला जी उठा उठा ॥ वेगीं भेटा राघवातें ॥ २९ ॥ ऐकतां गुहकाचें वचन ॥ भरत धरूं धांवे चरण ॥ गुहक घाली लोटांगण ॥ प्रेमेंकरून सद्गद ॥ २३० ॥ भरतें स्नानसंध्या सारून ॥ गुहकासी म्हणे प्रीतीकरून ॥ श्रीराम राहिला एक दिन ॥ तें स्थळ मज दाविंजे ॥ ३१ ॥ गुहक म्हणे न्यग्रोधवृक्ष[३६] ॥ त्याखालीं राहिला कमलपत्राक्ष ॥ जयासी हृदयीं ध्यात विरूपाक्ष[३७] ॥ सहस्राक्ष[३८] शरण जयातें ॥ ३२ ॥ या तृणशेजेवरी जाण ॥ पद्मनयनें केलें शयन ॥ याच पंथें येऊन ॥ केलें स्नान जान्हवीचें[३९] ॥ ३३ ॥ सीतेच्या तिंगटवस्त्रांचे रज ॥ ते न झिंगटती तृणशेज[४१] ॥ देखतां भरत भक्तराज ॥ साष्टांग नमन करीतसे ॥ ३४ ॥ रघुनाथपदमुद्रा[४२] तेथ ॥ उमटल्या देखोनि भरत ॥ ते धुळी कपाळा लावीत ॥ सद्गदित होवोनि ॥ ३५ ॥ असो नौका आणोनि सहस्र ॥ उतरला सकळ दळभार ॥ प्रयागासी येऊन सत्वर ॥ भरद्वाजदर्शन घेतलें ॥ ३६ ॥ लक्षोनि चित्रकूटाचा पंथ ॥ चालती गुहक आणि भरत ॥ तों फळें वेंचावया सुमित्रासुत[४३] ॥ पर्वतातळीं उतरला ॥ ३७ ॥ तों पर्णकुटीमाजी रघुनंदन ॥ करावया बैसला हवन ॥ तेथें उपसामग्री आणोन ॥ जनकात्मजा देतसे ॥ ३८ ॥ चकोरमुखीं एकसरा[४४] ॥

३२ भयंकर. ३३ संकटांत. ३४ हृदय. ३५ भस्मलेपन. ३६ वटवृक्ष. ३७ शंकर. ३८ इंद्र. ३९ गंगेचें. ४० वल्कलवस्त्रांचे. ४१ लागती. ४२ पदतलाचीं शंख चक्र इत्यादि चिन्हें. ४३ लक्ष्मण. ४४ एकदम.

अत्रिसुंत[४५] सोडी अमृतधारा ॥ तैशा आहुती घाली वैश्वानर[४६] ॥ तृप्त होय रामहस्तें ॥ ३९ ॥ तेव्हां आश्रमाबाहेर जनकबाळी ॥ जे सुकुमार चंपककळी ॥ तों सुदर्शनगंधर्वें जातां निराळीं ॥ ते वेल्हाळी देखिली ॥ २४० ॥ जानकी देखोनि सुंदर ॥ चित्तीं जाहला कामातुर ॥ भय लज्जा समग्र ॥ सोडोनियां दिधली ॥ ४१ ॥ मंगळरूप ते मंगळभगिनी[४७] ॥ गंधर्व धांवला ते क्षणीं ॥ अमंगळ कागरूप[४८] धरूनी ॥ सीतेलागीं झडपीतसे ॥ ४२ ॥ जैसा पतंग दीप देखोन ॥ उडी घाली विसरून मरण ॥ कीं खदिरांगारासी[४९] वृश्चिक येऊन ॥ पुच्छेंकरून ताडी जेवीं ॥ ४३ ॥ कीं अंतर्गृहींचें दिव्यान्न ॥ स्पर्शों धांवे जैसें श्वान[५०] ॥ यज्ञशाळेमाजी मळिण ॥ अंत्यज जैसा पातला ॥ ४४ ॥ असो जानकीचें स्तनयुग ॥ धरूं पाहे पतित काग ॥ जगन्माता धांवली सवेग ॥ अंग घाली धरणीतें ॥ ४५ ॥ मग म्हणे धांव धांव रघुराया ॥ कागें विटंबिली माझी काया ॥ आक्रंदे[५१] परम जनकतनया ॥ रघुवर्या जाणवलें ॥ ४६ ॥ आहुती टाकी रघुनाथ ॥ जवळी नाहीं सुमित्रासुत ॥ मग दर्भ मंत्रोनि त्वरित ॥ रामचंद्रें प्रेरिला ॥ ४७ ॥ कल्पांतविजूसमान ॥ कागें दर्भ देखिला दुरून ॥ पळों लागला घेतलें रान ॥ पाठिसी बाण लागला असे ॥ ४८ ॥ गंधर्व भ्रमे सकळ सृष्टी ॥ परी कोणी न घाली तया पाठीं ॥ हिंडतां जाहला हिंपुंटी[५२] ॥ होय कष्टी दुरात्मा ॥ ४९ ॥ इंद्रादिक देवगण ॥ समस्तांसी गेला शरण ॥ ते म्हणती न दाखवीं वदन ॥ दुष्टा होईं माघारा ॥ २५० ॥ मग भेटला नारद मुनी ॥ काग लागला तयाचे चरणीं ॥ म्हणे पहा हो या त्रिभुवनीं ॥ ठाव नेदी कोणी मज ॥ ५१ ॥ माझी पाठ न सोडी बाण ॥ मग नारद बोलें वचन ॥ मूढा रामासी जाईं शरण ॥ तोचि मरण चुकवील ॥ ५२ ॥ मग म्हणे जगद्वंद्या रामचंद्रा ॥ मी तुज शरण कृपासागरा ॥ दीनरक्षका अतिउदारा ॥ मज पामरा न मारावें ॥ ५३ ॥ मजवरी टाकिला बाण ॥ हें लोकांत न दिसे थोरपण ॥ कमळावरी वज्र घेऊन ॥ घातल्या काय पुरुषार्थ ॥ ५४ ॥ सूक्ष्म आळिकीं[५३] धरी सुपर्ण[५४] ॥ वडवानळ जाळी तृण ॥ भोगींद्र उचली सुमनें[५५] ॥ हें काय अपूर्व बोलावें ॥ ५५ ॥ पर्जन्यें उठलें तृण ॥ अगस्ति प्याला किंचित जीवन ॥ मेघें निजप्रतापेंकरून ॥ घटीं जीवन भरियेलें ॥ ५६ ॥ सूर्यें दीपतेज झांकिलें ॥ गोवत्स विदारिला शार्दूलें[५६] ॥ रघुपति त्वां मज तैसें मारिलें ॥ तरी थोरपण प्रकटेना ॥ ५७ ॥ मातेचिया स्तनावरी ॥ बाळक हस्त ठेवूनि क्रीडा करी ॥ तरी काय माता जीवें मारी ॥ बाळकातें सांग पां ॥ ५८ ॥ महाराज रविकुळभूषणा ॥ ताटिकांतका अहल्योद्धरणा ॥ द्विपंचमुखेंदर्पहरणा[५७] ॥ शरणागता न मारावें ॥ ५९ ॥ मग बोले रघुपती ॥ माझा बाण असत्य कल्पांतीं ॥ नव्हेच जाण निश्चितीं ॥ महामलिना अपवित्रा ॥ २६० ॥ मग बाणासी आज्ञापी रघुनंदन ॥ याचा रक्षोनियां प्राण ॥ वेगें छेदावा सैन्य[५८] नयन ॥ शिक्षा यास जाण पैं ॥ ६१ ॥

---

४५ चंद्र. ४६ अग्नीत. ४७ जानकी. ४८ कावळ्याचें रूप. ४९ खैराच्या निखाऱ्यास. ५० कुत्रा. ५१ ओरडे. ५२ दुःखी. ५३ कीड. ५४ गरुड. ५५ फुल. ५६ वाघानें. ५७ रावणाचा गर्व हरणाऱ्या. ५८ डावा.

न लागतां पातयों[५९] पातें ॥ दभें छेदिलें नयनातें ॥ काग म्हणे रघूत्तमातें ॥ देईं वरातें मज कांहीं ॥ ६२ ॥ मग दोहींकडे एक बुबुळ ॥ खेळे ऐसें केलें चंचळ ॥ काकदृष्टी अवघ्यांत चपळ ॥ जन सकळ देखती ॥ ६३ ॥ सीतेसी द्यावया चुंबन ॥ तूं धांवलासी दुरात्मा पूर्ण ॥ तरी तूं करिसी विष्ठाभक्षण ॥ कनिष्ठ जाण पक्ष्यांत तूं ॥ ६४ ॥ तुज वर एक देतों जाण ॥ प्रेतपिंड तूं भक्षिल्याविण ॥ सर्वथा नोहे उद्धारण ॥ हें वरदान तुज दिधलें ॥ ६५ ॥ मग सुदर्शन गंधर्व तेव्हां ॥ साष्टांग नमोनि श्रीराघवा ॥ आपले स्वस्थळा-प्रति तेधवां ॥ जाता जाहला आनंदें ॥ ६६ ॥ भरत प्राणसखा आतां ॥ येऊनि भेटेल रघुनाथा ॥ श्रोतीं परिसावी तेचि कथा ॥ भवव्यथा नासे जेणें ॥ ६७ ॥ रामविजय ग्रंथ प्रचंड ॥ रसभरित अयोध्याकांड ॥ तें श्रवण करितां वितंड[६०] ॥ विघ्नें उदंड वितळती[६१] ॥ ६८ ॥ अयोध्याधीशा रामचंद्रा ॥ ब्रह्मानंदा ज्ञानसमुद्रा ॥ श्रीधरवरदा प्रतापरुद्रा ॥ मज नाममुद्रा अखंड देईं ॥ २६९ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ एकादशाध्याय गोड हा ॥ २७० ॥ ॥ अध्याय ॥ ११ ॥ ॥ ओंव्या ॥ २७० ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ ७ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

५९ डोळ्याच्या पात्याला पातें लागत नाहीं तोंच, क्षणांत, निमिषांत. ६० नास्तिकपणा. ६१ नाश पावतात.

१२



॥ श्रीगणेशाय नमः ॥ संतमंडळी बैसली थोर ॥ बृहस्पतीऐसे चतुर ॥ आतां साहित्यसुमनांचे हार ॥ गुंफोन गळां घालूं त्यांचे ॥ १ ॥ अनर्घ्य शब्दरत्नें प्रकाशवंत ॥ त्यांचे ग्राहक चतुर पंडित ॥ विशेषें रघुनाथभक्त विरक्त ॥ ते प्रेमभरें डुलती ॥ २ ॥ मतिमंद बैसतां श्रोता श्रवणीं ॥ तरी ग्रंथरस जाय वितळोनी ॥ जैसें भस्मामाँजी नेउनी ॥ व्यर्थ अवदान घालिजे ॥ ३ ॥ रत्नपरीक्षा करिती चतुर ॥ तेथें गर्भांध विटे साचार ॥ गायन ऐकती सज्ञान नर ॥ परी बधिर तेथें विटती पैं ॥ ४ ॥ कमळसुवास सेविती भ्रमर ॥ परी तो स्वाद न जाणे दर्दुर ॥ हंस घेती मुक्तांचा चार ॥ परी तो बकासी प्राप्त नाहीं ॥ ५ ॥ दुग्ध दोहोनि नेती इतर ॥ गोचिड तेथें अहोरात्र ॥ वसे परी प्राप्त त्यास रुधिर ॥ नेणे क्षीर मतिमंद तो ॥ ६ ॥ कीं वसंतकाळीं कोकिळा ॥ पंचमस्वरें आळविती रसाळा ॥ काकजाती तैशा सकळा ॥ परी तयां तो स्वर नव्हेचि ॥ ७ ॥ बलाहक गर्जना करिती गगनीं ॥ मयूर नाचती पिच्छें पसरूनी ॥ परी ते कळा वृषभांनीं ॥ नेणिजे जैसी सर्वथा ॥ ८ ॥ चकोर चंद्रामृत सेविती ॥ परी ते कळा कुक्कुट नेणती ॥ म्हणोनि श्रोता मंदमती ॥ सहसाही न भेटावा ॥ ९ ॥ श्रोता भेटलिया चतुर ॥ ग्रंथरस वाढे अपार ॥ जेवीं वीर संघटतां थोर ॥ रणचक्रीं रंग भरे ॥ १० ॥ असो एकादशाध्यायाचे अंतीं ॥ चित्रकूटीं राहिला रघुपती ॥ सुदर्शन गंधर्व निश्चितीं ॥ काकरूपी उद्धरिला ॥ ११ ॥ उपरी सिंहावलोकनें करूनि तत्त्वतां ॥ श्रोतीं परिसावी मागील कथा ॥ दळभारेंसीं भरत तत्त्वतां ॥ चित्रकूटासमीप आला ॥ १२ ॥ तंव तो भूधरअवतार ॥ चित्रकूटाखालीं सौमित्र ॥ फळें वेंचितां तो दळभार ॥ गजरें येतां देखिला ॥ १३ ॥ ओळखिला आपला ध्वजसंकेत ॥ आले कळलें शत्रुघ्न भरत ॥ म्हणे कैकयीनें पाठविले यथार्थ ॥ वनीं रघुनाथ वधावया ॥ १४ ॥ हे युद्धासी आले येथ ॥ जरी रघुनाथास करूं श्रुत ॥ तरी हेही गोष्ट अनुचित ॥ युद्ध अद्भुत करीन मी ॥ १५ ॥ माझा श्रीराम एकला वनीं ॥ हे आले दळभार सिद्ध करूनी ॥ तरी जैसा वणवा लागे वनीं ॥ तैसें जाळीन सैन्य हें ॥ १६ ॥ रवीच्या किरणांवरी देखा ॥ कैशा चढतील पिपीलिका ॥ कल्पांतविजूस मशक मुखा- ॥ माजी केवीं सांठवील ॥ १७ ॥ चढून प्रळयाग्नीचे शिरीं ॥ पन्नग कैसा नृत्य करी ॥ ऊर्णनाभीचे तंतुवाभीतरी ॥ वारण कैसा बांधवेल ॥ १८ ॥ तृणपाशेंकरून ॥ कैसा बांधवे पंचानन ॥ द्विजेंद्रासी अळिका धरून ॥ कैसी नेईल आकाशा ॥ १९ ॥ दीपाचें तेज देखोन ॥ कैसा आहळेल चंडकिरण ॥ तैसा मी वीर लक्ष्मण ॥ मज जिंकूं न शकती हे ॥ २० ॥ भार देखोनि समीप ॥ क्षण न लागतां चढविलें चाप ॥ बाण सोडिले अमूप ॥ संख्येरहित ते काळीं ॥ २१ ॥ वाटे गडगडितां महाव्याघ्र ॥ थोकती जेवीं अजांचे भार ॥ तैसा सोळा पद्मे दळभार ॥ भयभीत जाहला ॥ २२ ॥ त्या बाणांचें करावया निवारण ॥ वीर सर-

---

१ व्युत्पत्तीच्या अंगरूप पुष्पांचे. २ अमूल्य. ३ पाघळून. ४ राखेंत. ५ आहुति. ६ मोत्यांचा चारा. ७ गातात. ८ आम्रवृक्षावर. ९ मेघ. १० पिसारा. ११ एकवटले असतां. १२ रणांगणीं.१ ३ सिंह जात असतां मध्येंच मागें पाहतो त्या न्यायानें. १४ भूमीचा आधार, शेषावतार. १५ मुंग्या. १६ सर्प. १७ कोळ्याचे. १८ हत्ती. १९ सिंह. २० पक्षिराज गरुडाला. २१ भाजेल, पोळेल. २२ सूर्य.

सावला शत्रुघ्न ॥ दोघांचें समसमान संधान ॥ बाणें बाण तोडित ॥ २३ ॥ एक चंद्र एक मित्र ॥ कीं रमावर आणि उमावर ॥ किंवा ते मेरुमंदार ॥ युद्धालागीं मिसळले ॥ २४ ॥ एक समुद्र एक निराळे[31] ॥ एक दावाग्नि एक वडवानळ ॥ एक गदा एक चक्र निर्मळ ॥ विष्णुआयुधें भिडती कीं ॥ २५ ॥ एक वासुकी एक भोगींद्रें[32] ॥ एक वसिष्ठ एक विश्वामित्र ॥ तैसे शत्रुघ्न आणि सौमित्र ॥ बाण सोडित परस्परें ॥ २६ ॥ एकावरी एक सोडिती बाण ॥ ते वरचेवरी उडविती संपूर्ण ॥ बाणमंडप जाहला सघन ॥ चंडकिरण न दिसेचि ॥ २७ ॥ रामनामबीजांकित ॥ बाण सुटती सतेज मंडित ॥ रघुनाथनाम गर्जत ॥ सुसाटे[33] निघत येतांचि ॥ २८ ॥ वाटे ओढवला प्रळयकाळ ॥ वनचरां सर्वां सुटला पळ ॥ ऋषीश्वर पळती सकळ ॥ कडे वेंघिती[34] पर्वताचे ॥ २९ ॥ सांडोनि गुंफा[35] तपाचरण ॥ पळती आपुला जीव घेऊन ॥ एक धांवतां धापा दाटून ॥ मूर्च्छा येऊनि पडियेले ॥ ३० ॥ एक म्हणती राक्षसदळ ॥ आलें रामावरी तुंबळ ॥ येणें मखरक्षणीं राक्षस सबळ ॥ वीस कोटी निर्वंटिले[36] ॥ ३१ ॥ तें वैर स्मरोनि अंतरीं ॥ सत्य हे आले राघवावरी ॥ आतां सौमित्राची कैंची उरी[37] ॥ अनर्थ निर्घारीं ओढवला ॥ ३२ ॥ असो ऋषीश्वर समस्त ॥ आले जेथें रघुनाथ ॥ गोष्टी सांगतां बोबडी वळत ॥ संकेत दाविती एक करें ॥ ३३ ॥ एक रुदन करूनि फोडित हांका ॥ वेगें पळवीं जनककन्यका ॥ आतां गूढविवरीं[38] लपवीं कां ॥ रघुनायका ऊठ वेगीं ॥ ३४ ॥ न भरे जों अर्ध निमेष ॥ तों चढविलें श्रीरामें धनुष्य ॥ जैसा उगवतां चंडांशु[39] ॥ गुंफेबाहेर तैसा आला ॥ ३५ ॥ ऋषींस म्हणे अयोध्यानाथ ॥ तुम्हीं मनीं न व्हावें दुश्चित ॥ काळही विघ्न करूं आलिया येथ ॥ खंडविखंड करीन बाणीं ॥ ३६ ॥ पडत्या आकाशा देईन धीर ॥ रसातळा उर्वी[40] जातां करीन स्थिर ॥ तुम्ही समस्त बैसा धरूनि धीर ॥ तपश्चर्या करीत पैं ॥ ३७ ॥ अथवा करावें अध्ययन ॥ न्याय मीमांसा सांख्यज्ञान ॥ पातंजल अथवा व्याकरण ॥ यांची चर्चा करा जी ॥ ३८ ॥ असो पाठीसीं घालून ब्राह्मण ॥ पुढें चालिला रघुनंदन ॥ तों ध्वजचिन्हें ओळखिलीं पूर्ण ॥ शत्रुघ्न बाण टाकीतसे ॥ ३९ ॥ आपले भेटीकारणें उत्कंठित ॥ सद्गद जाहला भरत ॥ लक्ष्मणापाशीं सीतानाथ ॥ क्षण न लागतां पातला ॥ ४० ॥ मग म्हणे सौमित्रासी ॥ बा रे भरत आला भेटीसी ॥ तूं किमर्थ यासीं युद्ध करिसी ॥ पाहें मानसीं विचारूनि ॥ ४१ ॥ ऐसें बोलतां राजीवनेत्र ॥ परी वीरश्रियेनें वेष्टिला सौमित्र ॥ सोडितां न राहे शर ॥ मग रघुवीर काय करी ॥ ४२ ॥ हातींचें धनुष्य हिरूनी ॥ श्रीरामें घेतलें तये क्षणीं ॥ सौमित्र लागला श्रीरामचरणीं ॥ हास्यवदन करूनियां ॥ ४३ ॥ श्रीरामें वारितां फणिपाळ[41] ॥ अवघें वितळलें बाणजाळ ॥ जैसें निजज्ञान[42] ठसतां केवळ ॥ मायापडळ[43] जेवीं विरे ॥ ४४ ॥ भरतासहित अयोध्येचे जन ॥ सर्वीं विलोकिला रघुनंदन ॥ जैसा निशा संपतां चंडकिरण[44] ॥ उदयाचळीं विराजे ॥ ४५ ॥ तों भरतासी न धरवे धीर ॥ सप्रेम धांव घेतली सत्वर ॥ वाटेसी साष्टांग

२३ आकाश. २४ शेष. २५ वेगानें. २६ चढतात. २७ तपस्येचीं गुप्तस्थलें. २८ नाश केले. २९ छाती, धमक. ३० गुप्तगुहेमध्यें. ३१ सूर्य. ३२ तुकडे तुकडे. ३३ पृथ्वी. ३४ शेषावतार लक्ष्मण. ३५ आत्मज्ञान. ३६ मायेचें आवरण.

नमस्कार ॥ वारंवार घालीतसे ॥ ४६ ॥ कीं बहुत दिवस माता गेली ॥ ते बाळकें समीप देखिली ॥ कीं गाय वनींहूनि परतली ॥ वत्सें आटोपिली धांवूनियां ॥ ४७ ॥ कीं क्षीराब्धि देखोनि त्वरित ॥ धांव घेत क्षुधाक्रांत ॥ कीं मृगजळ देखोनि त्वरित ॥ मृग धांवती उष्णकाळीं ॥ ४८ ॥ कीं सफेंळ[३७] देखोनि दिव्य द्रुम[३८] ॥ झेंपावे जैसा विहंगमं[३९] ॥ भरतें धरूनि तैसा राम ॥ चरणसरोजीं स्पर्शिला ॥ ४९ ॥ जैसें लोभियाचें जीवित्व धन ॥ तैसे भरतें धरिले दृढ चरण ॥ नयनोदकेंकरून ॥ केलें क्षालन रामपायां ॥ ५० ॥ मग उचलोनियां दोहीं करीं ॥ बंधूसी आदरें हृदयीं धरी ॥ जैसा जैयंतपुत्र सैंहस्रनेत्रीं[४०] ॥ प्रीतीकरूनि आलिंगिला ॥ ५१ ॥ कीं क्षीरसागरीं लहरिया उठती ॥ त्या एकांत एक मिसळती ॥ कीं वेदांतशास्त्रीं श्रुती ॥ ऐक्या येती परस्परें ॥ ५२ ॥ तैसा आलिंगिला भरत ॥ तों शत्रुघ्न लोटांगण घालित ॥ परम प्रीतीं रघुनाथ ॥ आलिंगन देत तयातें ॥ ५३ ॥ सकळ अयोध्येचे ब्राह्मण ॥ रामासी भेटती प्रीतीकरून ॥ सर्व दळभार प्रजाजन ॥ करिती नमन रामासी ॥ ५४ ॥ लक्ष्मण भरत शत्रुघ्न ॥ परस्परें देती क्षेमालिंगन ॥ मग सुमंत प्रधानें येऊन ॥ श्रीरामचरण वंदिले ॥ ५५ ॥ मग सुमंत म्हणे रघुराया ॥ पैल वसिष्ठ आणि दोघी माया ॥ तंव त्या दशरथकुळवर्या ॥ धीर न धरवे ते काळीं ॥ ५६ ॥ सामोरा चालिला रघुनंदन ॥ भोंवते अपार अयोध्याजन ॥ जैसा कां वेदोनारायण ॥ अनेक श्रुतीं वेष्टिला ॥ ५७ ॥ येऊनियां वसिष्ठाजवळी ॥ रामें गुरुचरण वंदिले भाळीं ॥ जैसा मैंदनदहनाचे[४१] चरणकमळीं ॥ स्कैंद[४२] ठेवी मस्तक ॥ ५८ ॥ तों कौसल्या सुमित्रा माता ॥ त्यांचीं वहनें जवळी देखतां ॥ धांवूनि येतां रामसुमित्रासुतां[४३] ॥ उतरती खालत्या दोघीजणी ॥ ५९ ॥ कौसल्येचे चरणीं मस्तक ॥ ठेवूनि बोले रघुनायक ॥ म्हणे सुखी कीं मम जनक ॥ श्रीदशरथ दयाब्धि ॥ ६० ॥ तों जाहला एकचि कल्लोळ ॥ रुदन करिती लोक समग्र ॥ सुमित्राकौसल्येसी बहुसाल ॥ नाहीं पार तयातें ॥ ६१ ॥ वसिष्ठ म्हणे रघुनाथा ॥ तुझा वियोग न साहे दशरथा ॥ रामराम म्हणतां मोक्षपंथा ॥ गेला तत्काळ जाण पां ॥ ६२ ॥ वचन ऐसें ऐकतां कानीं ॥ करुणासागर मोक्षदानी ॥ विमलांबुधारा नयनीं ॥ तेच क्षणीं चालिल्या ॥ ६३ ॥ स्फुंदस्फुंदोनि विलाप थोर ॥ पितयालागीं करी रघुवीर ॥ म्हणे पूर्ण सत्याचा सागर ॥ श्रीदशरथ वीर जो ॥ ६४ ॥ ज्याचे युद्धाची ठेव ॥ पाहती मानव इंद्रादि देव ॥ वृषपर्वा शुक्रादि सर्व ॥ दैत्य युद्धीं जिंकिले ॥ ६५ ॥ श्रोते म्हणती नवल एथ ॥ जो पुराणपुरुष रघुनाथ ॥ तो शोकार्णवीं पडिला ही मात ॥ असंगत दिसतसे ॥ ६६ ॥ जो जगद्वंद्य आत्माराम ॥ जो विश्वबीजफैलांकित[४४] द्रुम ॥ तो शोकाकुलित परब्रह्म ॥ पितयालागीं कां जाहला ॥ ६७ ॥ विषकंठ[४५] आला कीं क्षीरसागरा ॥ उष्णता व्यापिली रोहिणीवरा[४६] ॥ पक्षिवर्या त्या खगेंद्रा ॥ सर्पबाधा केवीं जाहाली ॥ ६८ ॥ चिंतामणि दरिद्रें व्यापिला ॥ कल्पवृक्ष केवीं निष्फळ जाहला ॥ प्रळयाग्नीचे डोळां ॥ अंधत्व केवीं पातलें ॥ ६९ ॥ तंव वक्ता देत प्रत्युत्तर ॥

३७ फळांनीं भरलेला. ३८ वृक्ष. ३९ उडी घालतो. ४० पक्षी. ४१ इंद्राचा मुलगा. ४२ इंद्रानें. ४३ शिवाचे. ४४ कार्तिकस्वामी. ४५ राम व लक्ष्मण यांस. ४६ अखिल विश्वाचें मूळबीज ज्या फळांत त्या फळानें युक्त ( वृक्ष, राम ). ४७ शंकर. ४८ चंद्राला.

श्रोतीं ऐकिजे सादर ॥ पूर्ण ब्रह्मानंद रघुवीर ॥ मानवलोकीं अवतरला ॥ ७० ॥ जगद्गुरु देवाधिदेव ॥ दावी मायेचें लाघव ॥ अवतारकारणाची ठेव ॥ लौकिकभाव दाविला ॥ ७१ ॥ नट जो जो धरी वेष ॥ त्याची संपादणी करी विशेष ॥ यालागीं जगदात्मआदिपुरुष ॥ दाखवी आवेश मायेचा ॥ ७२ ॥ ऐसी उघडतां शब्दरत्नांदुस[४९] ॥ गुणग्राहक श्रोते पावले संतोष ॥ संदेहरहित निःशेष ॥ जेवीं तम नासे सूर्योदयीं ॥ ७३ ॥ कीं वैराग्यें निरसे काम ॥ ज्ञानें वितळे जेवीं भ्रम ॥ जैसा निधानांतूनि परम[५०] ॥ दारुण सर्प निघाला ॥ ७४ ॥ करितां संशयाचें निरसन ॥ मागें राहिलें अनुसंधान ॥ तरी हे गोष्टीस दूषण ॥ सर्वथाही न ठेवावें ॥ ७५ ॥ ग्रासामाजी लागला हरळ[५१] ॥ तो काढावया लागेल वेळ ॥ कीं अनध्यायामाजी रसाळ ॥ वेदाध्ययन राहिलें ॥ ७६ ॥ चोरवाटा चुकवावया पूर्ण ॥ अधिक लागला एक दिन ॥ तरी ते गोष्टींतें दूषण ॥ कदा सज्ञान न ठेविती ॥ ७७ ॥ रात्रीमाजी सत्कर्में राहती ॥ परी सूर्योदयीं सर्वेंचि चालती ॥ छायेस पांथिक बैसती ॥ सर्वेंच जाती निजमार्गें ॥ ७८ ॥ समुद्राचें भरतें ओहटे ॥ सर्वेंच मागुतीं विशेष दाटे ॥ कीं चपळ तुरंग[५२] चपेटे[५३] ॥ विसांवा घेऊनि मागुती ॥ ७९ ॥ तेवीं परिसा पुढील कथार्थ ॥ आठवोनि पिता दशरथ ॥ शोकाकुलित जनकजामात ॥ क्षण एक जाहला ॥ ८० ॥ मग वसिष्ठ म्हणे श्रीरामा ॥ प्रयागाप्रति जाऊनि गुणग्रामा ॥ उत्तरक्रिया करूनि निजधामा ॥ दशरथासी बोळविजे ॥ ८१ ॥ कित्येक प्राकृत कवि बोलत ॥ कीं पतनीं पडिला दशरथ ॥ परी हे गोष्टी असंमत ॥ बोलतां अनर्थ वाचेसी ॥ ८२ ॥ जयाचें नाम घेतां आवडीं ॥ जीव उद्धरले लक्षकोडी ॥ तो आपला पिता पतनीं पाडी ॥ काळत्रयीं न घडे हें ॥ ८३ ॥ असो गयेप्रति येऊन ॥ उत्तरक्रिया सर्व सारून ॥ पिता निजपदीं स्थापून ॥ आले परतोनि चित्रकूटा ॥ ८४ ॥ सकळ ऋषी आणि अयोध्याजन ॥ बैसले श्रीरामासी वेष्टून ॥ मग भरत घालोनि लोटांगण ॥ कर जोडूनि उभा ठाकला ॥ ८५ ॥ म्हणे जयजयाजी पुरुषोत्तमा ॥ मायाचक्रचालका पूर्णब्रह्मा ॥ विरिंचिजनका सुखविश्रामा ॥ मंगलधामा रघुराया ॥ ८६ ॥ हे राम करुणासमुद्रा ॥ हे रविकुलभूषणा राघवेंद्रा ॥ सर्वानंदसदना रामचंद्रा ॥ प्रतापरुद्रा जगद्गुरो ॥ ८७ ॥ हे राम रावणदर्पहरणा ॥ हे राम भवहृदयमोचना ॥ हे राम अहल्योद्धारणा ॥ मखरक्षणा सीताधवा ॥ ८८ ॥ हे राम कौसल्यागर्भरत्ना ॥ हे राम मायाअपारश्रममोचना ॥ सनकसनंदनमानसरंजना ॥ निरंजना निजरूपा ॥ ८९ ॥ दानवकाननवैश्वानरा[५४] ॥ मम हृदयारविंदभ्रमरा ॥ अज्ञानतिमिरच्छेदक दिवाकरा ॥ समरधीरा सर्वेशा ॥ ९० ॥ हे राम भक्तचातकजलधरा ॥ प्रेमचकोरवेधकचंद्रा ॥ संसारगजच्छेदकमृगेंद्रा[५५] ॥ अनंगमोहनो[५६] अनंगा ॥ ९१ ॥ उपवासी मरतां चकोर ॥ त्यार्चे धांवण्या धांवे चंद्र ॥ कीं अवर्षण पडतां जलधर ॥ चातकालागीं धांवे कां ॥ ९२ ॥ कीं चिंताक्रांतासी चिंतामणी ॥ सांपडे पूर्वभाग्येंकरूनी ॥ कीं दरिद्रियाचे अंगणीं ॥ कल्पवृक्ष उगवला ॥ ९३ ॥ कीं

४९ शब्दरूपी रत्नांची तिजोरी. ५० पुरुन ठेविलेल्या द्रव्यांतून. ५१ खडा. ५२ घोडा. ५३ चपळाई करतो. ५४ दानवरूप अरण्याला जाळणारा अग्नीच जणूं काय. ५५ संसाररूप हत्ती मारणारा सिंह. ५६ मदनमोहना.

पतिव्रतेसी प्राणनाथ भेटला ॥ कीं क्षुधितापुढें क्षीराब्धि आला ॥ कीं साधकासी निधि जोडला ॥ आनंद जाहला तैसा आम्हां ॥ ९४ ॥ हंसें देखिलें मानससरोवर ॥ कीं प्रेमळा भेटला उमावर ॥ कीं संकल्पीं द्रव्य अपार ॥ दुर्बळ ब्राह्मणासी दीधलें ॥ ९५ ॥ तैसा आनंद जाहला जनांसी ॥ आतां सत्वर चलावें अयोध्येसी ॥ सांभाळावें बंधुवा आम्हांसी ॥ श्रीदशरथाचेनि न्यायें ॥ ९६ ॥ आपुलें राज्य सांभाळावें ॥ गोब्राह्मणां प्रतिपाळावें ॥ आमुचे मनोरथ पूर्ण करावे ॥ आतां परतावें सत्वर ॥ ९७ ॥ जननी आमुची परम चतुर ॥ मज देत होती राज्यभार ॥ जैसें छेदोनियां शिर ॥ गुडघ्यास पूजा बांधिली ॥ ९८ ॥ पूज्यमूर्ति वोसंडूंन ॥ जैसे गुरवाचे धरी चरण ॥ राजकुमर सांडोन ॥ कन्या दिधली अजारक्षिका ॥ ९९ ॥ पाडोनि देवळाचें शिखर ॥ घातलें भोंवतें आवार ॥ नागवूनि यात्रा समग्र ॥ अन्नसत्र घातलें ॥ १०० ॥ फणस टाकोनि रसाळ ॥ प्रीतीनें घेतलें कनकफळ ॥ मुक्तें सांडोनि तेजाळ ॥ गुंज जैसी घेतली ॥ १ ॥ गार घेऊनि टाकिला हिरा ॥ अंधकार घेऊनि त्यजिलें दिनकरा ॥ पाच भिरकावूनि सत्वरा ॥ कांच बळें रक्षिली ॥ २ ॥ परिस त्यागून घेतला खडा ॥ पंडित दवडूनि आणिला वेडा ॥ चिंतामणि टाकोनि रोकडा ॥ पेंलांडु घेतला बळेंचि ॥ ३ ॥ अमृत टाकूनि घेतली कांजी ॥ कल्पवृक्ष तोडोनि लाविला भाजी ॥ कामधेनु दवडोनि सहजीं ॥ अंजा पूजी आदरें ॥ ४ ॥ निजसुख टाकोनि घेतलें दुःख ॥ कस्तूरी टाकूनि घेतली राख ॥ सोनें टाकूनि सुरेख ॥ शेण जैसें घेतलें ॥ ५ ॥ सांडोनियां रायकेळें ॥ आदरें भक्षी अर्कीफळें ॥ ज्ञान सांडोनि घेतलें ॥ अज्ञान जाण बळेंचि ॥ ६ ॥ तैसें कैकयीनें केलें साचार ॥ वना दवडोनि जगदुद्धार ॥ मज द्यावया राज्यभार ॥ सिद्ध जाहली साक्षेपें ॥ ७ ॥ सर्व अपराध करूनि क्षमा ॥ अयोध्येसी चलावें श्रीरामा ॥ याउपरी जगदात्मा ॥ काय बोलिला तें ऐका ॥ ८ ॥ सूर्य मार्ग चुके करितां भ्रमण ॥ नेत्रीं अंधत्व पावे अग्न ॥ मशकाची थैंडक लागून ॥ जरी मेरु पडेल ॥ ९ ॥ पाषाणप्रहार लागून ॥ वायु पडेल मोडोनि चरण ॥ कीं पिपीलिकां शोषी सिंधुजीवन ॥ विजूसी धांवूनि मशक धरी ॥ ११० ॥ धडधडीत अग्निज्वाळ ॥ कर्पूरतुषारें होय शीतळ ॥ हेंही घडेल एकवेळ ॥ परी वचनास चळ नोहे माझ्या ॥ ११ ॥ एकबाण एकवचन ॥ एकपत्नीव्रत पूर्ण ॥ चौदा वर्षें भरल्याविण ॥ कदापि आगमन घडेना ॥ १२ ॥ ऐसें निश्चयाचें वचन ॥ बोलता जाहला रघुनंदन ॥ अग्नीनें औंहाळे जैसें सुमन ॥ तैसें भरता जाहलें ॥ १३ ॥ मग भरतें चेतविला जातवेद ॥ प्राण द्यावया जाहला सिद्ध ॥ म्हणे हा देह करीन दग्ध ॥ रामवियोग मज न सोसवे ॥ १४ ॥ महाराज वाल्मीक मुनी ॥ भरतास एकांतीं नेउनी ॥ मूळकाव्यार्थ अवघा कानीं ॥ भविष्यार्थ सांगितला ॥ १५ ॥ तो ऐकतां कैकयीसुत ॥ उगाच राहिला निवांत ॥ मग येऊनि जनकजामात ॥ हृदयीं धरी भरतातें ॥ १६ ॥ आपुल्या हस्तेंकरून ॥ पुसिले भरताचे नयन ॥ करें कुरवाळिलें वदन ॥ समाधान करीतसे ॥ १७ ॥

५७ टाकून. ५८ धनगराला. ५९ धोतऱ्याचें फळ. ६० मोतीं. ६१ कांदा. ६२ शेळी. ६३ रुईचीं फळें. ६४ टक्कर. ६५ मुंगी. ६६ होरपळतें. ६७ फूल. ६८ अग्नि.

देव बंदींचे सोडवून ॥ चौदा वर्षांत येतों परतोन ॥ मग वरदहस्त उचलोन ॥ भाँष दिघली भरतातें ॥ १८ ॥ चौदा वर्षें चौदा दिन ॥ पंधरावे दिवशीं पूर्ण ॥ माध्यान्हा येतां चंडकिरण ॥ भेटेन येऊन तुजलागीं ॥ १९ ॥ भरत म्हणे हा नेम टळतां ॥ मग देह त्यागीन तत्त्वतां ॥ श्रीरामचरणीं ठेविला माथा ॥ प्रेमावस्था अधिक पैं ॥ १२० ॥ भरत मागुता उठोन ॥ विलोकी श्रीरामाचें वदन ॥ अँमलदल-राजीवनयन ॥ तैसाचि हृदयीं रेखिलेंला ॥ २१ ॥ भरत सद्गद बोले वचन ॥ मी अयोध्येसी न जाईं परतोन ॥ सकळ मंगलभोग स्नान ॥ त्यजूनि राहीन नंदिग्रामीं ॥ २२ ॥ अवश्य म्हणे रघुनायक ॥ मणिमँय पादुका सुरेख ॥ भरतासी दिधल्या शोकहारक ॥ येरें मस्तकीं वंदिल्या ॥ २३ ॥ शिवमस्तकीं विराजे चंद्र ॥ तैशा शिरीं पादुका सुंदर ॥ शोक हौरपला समग्र ॥ शरीर शीतळ जाहलें ॥ २४ ॥ जैसें कंठीं धरितां नामस्मरण ॥ शीतळ जाहला पार्वतीरमण ॥ तैसाचि प्रेमळ भरत जाण ॥ अंतरीं पूर्ण निवाला ॥ २५ ॥ शत्रुघ्नासी म्हणे रघुनाथ ॥ तूं आणि प्रधान सुमंत ॥ राज्यभार चालवा समस्त ॥ यथान्यायेंकरूनियां ॥ २६ ॥ सदा स्तवावे संतसज्जन ॥ श्रीगुरुभजनीं सावधान ॥ दूर त्यागावे दुर्जन ॥ त्यांचें अवलोकन न करावें ॥ २७ ॥ परँदारा आणि परधन ॥ तेथें कदा न ठेविजे मन ॥ वेदमर्यादा नुलंघावी पूर्ण ॥ प्राणांतही जाहलिया ॥ २८ ॥ जरी क्लेशँकाळ पातला बहुत ॥ परी धैर्य न सोडावें यथार्थ ॥ गुरु-भजन पुण्यपंथ ॥ न सोडावे सर्वथा ॥ २९ ॥ साधु संत गोब्राह्मण ॥ त्यांचें सदा करावें पाळण ॥ सकळ दुष्टांस दवडोन ॥ स्वधर्म पूर्ण रक्षावा ॥ १३० ॥ कथा कीर्तन पुराणश्रवण ॥ काळ क्रमावा येणेंकरून ॥ आपुला वर्णाश्रमधर्म पूर्ण ॥ सर्वथाही न त्यजावा ॥ ३१ ॥ संतांचा न करावा मानभंग ॥ हरिभजनीं झिजवावें अंग ॥ सांडोनि सर्व कुमार्ग ॥ सन्मार्गेंचि वर्तावें ॥ ३२ ॥ ऋषींचे आशीर्वाद घ्यावे ॥ वर्म कोणाचें न बोलावें ॥ विश्व अवघें जाणावें ॥ आत्मँरूपी निर्धारें ॥ ३३ ॥ सत्संग धरावा आधीं ॥ नाय-कावी दुर्जनाची बुद्धी ॥ कामक्रोधादिक वादी ॥ दमवावे निजपराक्रमें ॥ ३४ ॥ मी जाहलों सज्ञान ॥ हा न धरावा अभिमान ॥ विनोदेंही परावें छळण ॥ न करावें सहसाही ॥ ३५ ॥ शमदमादिक साधनें ॥ स्वीकारावीं साधकानें ॥ जन जाती आडवाटेनें ॥ त्यांसी सुमार्ग दाविजे ॥ ३६ ॥ शोकमोहांचे चपेटे[७७] पूर्ण ॥ अंगीं आदळती येऊन ॥ विवेकवोडँण पुढें करून ॥ ज्ञानशस्त्र योजावें ॥ ३७ ॥ काम क्रोध मद मत्सर ॥ हे गृहासी येऊं न द्यावे तस्कर ॥ आयुष्य क्षणिक जाणोनि साचार ॥ सारासार विचारावें ॥ ३८ ॥ क्षणिक जाणोनि संसार ॥ सोडावा विषयांवरील आदर ॥ सद्गुरुवचनीं सादर ॥ सदा चित्त ठेविजे ॥ ३९ ॥ दैवें आलें भाग्य थोर ॥ त्याचा गर्व न धरावा अणुमात्र ॥ एकदांचि गेलें जरी समग्र ॥ कदा धीर न सांडावा ॥ १४० ॥ कमलपत्राक्ष कृपानिधान ॥ वर्षत स्वातीजल पूर्ण ॥ तें सुमंत आणि शत्रुघ्न ॥ कर्णशुँक्तिकेंत सांठविती ॥ ४१ ॥ शब्दामृत वर्षे रामचंद्र ॥ निवाले भरतकर्णचकोर ॥

६९ प्रतिज्ञावचन. ७० कमलपत्राक्ष. ७१ सांठविला. ७२ रत्नजडित. ७३ नष्ट झाला. ७४ परस्त्री. ७५ संकटकाळ. ७६ ईश्वरस्वरूप. ७७ तडाके. ७८ विवेकाची ढाल. ७९ कर्णपुटांत.

कीं रामवचन क्षीरसागर ॥ उपमन्यु भरत साचार तेथें ॥ ४२ ॥ सूर्य उगवतां निरसे तमजाळ ॥ तैसें श्रीरामवचनें जाहलें हृदय निर्मळ ॥ मग भरत परतोनि तत्काळ ॥ नंदिग्रामीं राहिला ॥ ४३ ॥ करूनि मातेचें समाधान ॥ सकळ ब्राह्मण प्रजाजन ॥ सुमंत आणि शत्रुघ्न ॥ पाठवी परतोनि अयोध्ये ॥ ४४ ॥ श्रीरामपादुका सिंहासनीं ॥ शत्रुघ्न वरी छत्र धरूनी ॥ मग राज्य चालवी अनुदिनीं ॥ नामस्मरणीं सावध ॥ ४५ ॥ क्षणक्षणां येत नंदिग्रामासी ॥ मागुता जाय अयोध्येसी ॥ सकळ पृथ्वीच्या राजांसी ॥ धाक भरतशत्रुघ्नांचा ॥ ४६ ॥ प्रतिसंवसरी करभार ॥ भूपाला देती समग्र ॥ असो नंदिग्रामीं भरत वीर ॥ निर्विकार बैसला ॥ ४७ ॥ नंदिग्रामाजवळ अरण्यांत ॥ पर्णकुटी करून राहे भरत ॥ श्रीरामपादुका विराजित ॥ रात्रंदिवस मस्तकीं ॥ ४८ ॥ जे आवडते श्रीरामभक्त ॥ तेही भरताऐसे विरक्त ॥ कनक कामिनी गृह सुत ॥ त्याग करूनि बैसले ॥ ४९ ॥ वटदुग्धीं जटा वळूनी ॥ सकळ मंगलभोग त्यजोनी ॥ वल्कलें वेष्टोनि तृणासनीं ॥ बैसले ध्यानीं श्रीरामाचे ॥ १५० ॥ नक्षत्रांत जैसा चंद्र ॥ तैसा मध्यें भरत साचार ॥ रात्रंदिवस रामचरित्र ॥ भरत सांगे समस्तांतें ॥ ५१ ॥ किंवा मानससरोवरीं ॥ बैसती राजहंसांच्या हौरी ॥ भरतासभोंवते तेविपरी ॥ वेष्टूनियां बैसले ॥ ५२ ॥ श्रीधर म्हणे श्रोतयां समस्तां ॥ चित्त द्यावें पुढिल्या श्लोकार्था ॥ रघुनाथ चित्रकूटीं असतां ॥ काय कथा वर्तली ॥ ५३ ॥ कवीची शब्दरत्नमांदुसी ॥ उघडितां पंडित पावती संतोष ॥ इतर कुबुद्धि मतिमंदांस ॥ रत्नपरीक्षा न कळे हो ॥ ५४ ॥ असो चित्रकूटीं असतां रघुनंदन ॥ मिळोनि बहिर्मुखें ब्राह्मण ॥ म्हणती रामा तूं जाईं येथून ॥ आम्हांसी विघ्नें तुझेनि ॥ ५५ ॥ तुझी स्त्री परम सुंदर ॥ न्यावया जपती बहुत असुर ॥ वाल्मीकभविष्य साचार ॥ ऐसेंच असे जाण पां ॥ ५६ ॥ वनींहूनि वार्ता उठली साचार ॥ त्रिशिरा दूषण आणि खर ॥ दळभारेंसीं येथें येणार ॥ तुजकरितां रघुवीरा ॥ ५७ ॥ म्हणोनि सांगतों तुजशीं ॥ येथोनि जाईं निश्चियेंसी ॥ नाहीं तरी आम्ही स्वाश्रमासी ॥ त्यजोनि जाऊं निर्धारें ॥ ५८ ॥ श्रीराम म्हणे ब्राह्मणांलागुनी ॥ तुम्हीं निश्चिंत असावें अंतःकरणीं ॥ मी काळही फोडीन समरंगणीं ॥ राक्षसांतें गणी कोण ॥ ५९ ॥ परम अविश्वासी ब्राह्मण ॥ म्हणती विघ्नें येती येथें दारुण ॥ हा आपले स्त्रीस रक्षील जाण ॥ कीं आम्हासी रक्षील ॥ १६० ॥ हा त्यांसी न पुरे समरांगणीं ॥ चान्ही बाण जाती सरूनी ॥ याच्या बोलाचा विश्वास धरूनी ॥ कदा येथें न राहावें ॥ ६१ ॥ मग सकळीं करूनि एक विचार ॥ रात्रींच उठोनियां समग्र ॥ कुटुंबें घेऊनि सत्वर ॥ गेले विप्र पळोनियां ॥ ६२ ॥ उपरी प्रातःकाळीं उठोन ॥ श्रीराम पाहे ऋषिजन ॥ तंव ते रात्रींच गेले पळोन ॥ राजीवनयन काय करी ॥ ६३ ॥ एक वाल्मीक उरला पूर्ण ॥ तो महाराज तपोधन ॥ भूत भविष्य वर्तमान ॥ त्रिकालज्ञान जयासी ॥ ६४ ॥ वायुसंगें उडे तृण ॥ परी अंचळ न सोडी स्थान ॥ किंवा रणमंडळ सोडून ॥ रणशूर पळे ना ॥ ६५ ॥

८० व्याघ्रपादऋषीचा पुत्र, धौम्यऋषीचा ज्येष्ठ भ्राता, ह्यानें ईश्वराची आराधना करून क्षीरसागराचें आधिपत्य मिळविलें. ८१ धन. ८२ स्त्रिया. ८३ वडाच्या चिकानें. ८४ दर्भासनावर. ८५ रांगा ८६ पेटी. ८७ रामाचा महिमा न ओळखणारे. ८८ पर्वत.

तैसा वाल्मीक उरला जाण ॥ तेणें आर्षींच कथिलें रामायण ॥ इतर बहिर्मुख ब्राह्मण ॥ श्रीराम निधान नोळखती ॥ ६६ ॥ प्रत्यर्थी न येतां रघुवीर ॥ आचार तितका अनाचार ॥ कर्म तोच भ्रम थोर ॥ पिशाच नर तेचि पैं ॥ ६७ ॥ तेणें केलें वेदपठण ॥ करतलींमलक शास्त्रें प्रमाण ॥ परी तें मद्यपियाचें भाषण ॥ राघवा शरण न जातां ॥ ६८ ॥ जैसी मुग्धा बत्तीसलक्षणी ॥ परम सौंदर्यलावण्यखाणी ॥ परी मन नाहीं पतिभजनीं ॥ तरी तें सर्वही वृथा गेलें ॥ ६९ ॥ खैरपृष्ठीसी चंदन देख ॥ परी तो नेणे सुवाससुख ॥ षड्रसीं फिरवी जे दर्वी पाक- ॥ रसस्वाद नेणें ती ॥ १७० ॥ कृपा न करितां सीतावर ॥ कायसा व्यर्थ तत्त्वविचार ॥ त्याचें ज्ञान नव्हे साचार ॥ जैसे कीर अनुवादती ॥ ७१ ॥ तेणें केलें तीर्थाटण ॥ होय चौसष्टकळाप्रवीण ॥ तेणें केलें जरी कीर्तन ॥ तें जाण गायन गोरियाचें ॥ ७२ ॥ असो रघुपतीस सांडोन विप्र ॥ पळोन गेले समग्र ॥ जगद्वंद्य रघुवीर ॥ त्याचें स्वरूप नेणोनियां ॥ ७३ ॥ असो आतां बहु भाषण ॥ श्रीराम चित्रकूट त्यागोन ॥ वाल्मीकऋषीस नमून ॥ दंडकारण्या चालिला ॥ ७४ ॥ श्रीरामविजय ग्रंथ प्रचंड ॥ येथें संपलें अयोध्याकांड ॥ आतां अरण्यकांड इक्षुदंड ॥ अति अपूर्व सुरस पुढें ॥ ७५ ॥ रामविजय ग्रंथ क्षीरसागर ॥ दृष्टांतरत्नें निघती अपार ॥ संत श्रोते निर्जर ॥ अंगीकरोत सर्वदा ॥ ७६ ॥ ब्रह्मानंदा रविकुलभूषणा ॥ श्रीधरवरदा सीताजीवना ॥ पुढें अरण्यकांडरचना ॥ बोलवीं आतां येथोनि ॥ ७७ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ द्वादशाध्याय गोड हा ॥ १७८ ॥ ॥ अध्याय ॥ १२ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥

## ॥ इति अयोध्याकांड ॥

८९ अनुभवाला. ९० हातावरील आंवळ्यासारखीं अनुभवास येणारीं. ९१ स्त्री. ९२ गाढवाच्या पाठीवर. ९३ पळी. ९४ पोपट. ९५ बोलतात. ९६ फांसेपारध्याचें. ९७ ऊस. ९८ वार्धक्यरहित, देव.

१३
गोलिवडेकर—

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ संस्कृतापासोनि केवळ ॥ झाली प्राकृत भाषा रसाळ ॥ कीं स्वातीजळापासोनि मुक्ताफळ ॥ अतितेजाळ निपजे पैं ॥ १ ॥ चंद्राचे अंगीं निपजे चांदणें ॥ कीं दिनकरापासाव जेवीं किरणें ॥ कीं जंबुनदीपासाव सोनें ॥ बावनकसी निपजे पैं ॥ २ ॥ कीं दुग्धापासोनि नवनीत ॥ कीं अभ्यासापासोनि मति अद्भुत ॥ कीं इक्षुदंडापासोनि निपजत ॥ रसभरित शर्करा ॥ ३ ॥ कीं पुष्पापासोनि परिमळ ॥ कीं रंभेपासोनि कर्पूर शीतळ ॥ मृगापासोनि परिमळ ॥ मृगमद जेवीं निपजे पैं ॥ ४ ॥ कथालक्षण सरितानाथी ॥ साहित्यतरंग अपरिमित ॥ प्रेमळ लहरिया अद्भुत ॥ ऐक्या येत परस्परें ॥ ५ ॥ अमृताहून गोड अन्न ॥ परी रुचि न ये शाकेविण ॥ दृष्टांताविण ग्रंथ संपूर्ण ॥ रसीं न चढे सर्वथा ॥ ६ ॥ रत्नखाणी मेरुपाठारीं ॥ तैसे दृष्टांत कथांमाझारीं ॥ कमलावांचोनि सरोवरीं ॥ शोभा न ये सर्वथा ॥ ७ ॥ अलंकारें शोभे निंतंबिनी ॥ कीं गगन मंडित उडुगणीं ॥ कीं मानससरोवरा हंसांवांचोनी ॥ शोभा न येचि सर्वथा ॥ ८ ॥ कीं मननाविण श्रवण ॥ कीं सद्भावाविण कीर्तन ॥ कीं क्षेत्रीं जैसें बीजाविण ॥ दृष्टांतांविण ग्रंथ तैसा ॥ ९ ॥ कीं सभा जैसी पंडितांविण ॥ कीं सुस्वराविण गायन ॥ कीं शुचीविण तपाचरण ॥ दृष्टांतांविण ग्रंथ तैसा ॥ १० ॥ कीं विरक्तीविण ज्ञान ॥ कीं प्रेमाविण व्यर्थ भजन ॥ कीं दानाविण भाग्य पूर्ण ॥ दृष्टांतांविण ग्रंथ तैसा ॥ ११ ॥ अरण्यकांड अरण्यांत ॥ दृष्टांतवृक्ष विराजत ॥ तेथें आनंदफळें पंडित ॥ सदा सेवोत स्वानंदें ॥ १२ ॥ आतां अरण्यकांड वसंतवन ॥ तेथें वाग्देवी चिच्छक्ति पूर्ण ॥ क्रीडा करीत उल्हासेंकरून ॥ संतसज्जन परिसा तें ॥ १३ ॥ असो चित्रकूटाहूनि अयोध्यानाथ ॥ सीतासौमित्रांसमवेत ॥ निजभक्तांसी उद्धरित ॥ जगन्नाथ जातसे ॥ १४ ॥ दक्षिणपंथें जनकजामात ॥ सकळ ऋषींचे आश्रम पहात ॥ त्रयोदश वर्षेंपर्यंत ॥ रघुनाथ क्रमीत ऐसेंचि ॥ १५ ॥ कोठें वर्ष कोठें अयन ॥ कोठें मास कोठें पक्ष पूर्ण ॥ कोठें एक रात्र पक्ष त्रिदिन ॥ कोठें पंच रात्री क्रमियेल्या ॥ १६ ॥ मग अत्रीचिया आश्रमाप्रती ॥ येता झाला जनकजापती ॥ तों देखिली दत्तात्रेयमूर्ती ॥ अविनाशस्थिती जयाची ॥ १७ ॥ सह्याद्रीवरी श्रीराम ॥ अज अजित मेघश्याम ॥ श्रीदत्तात्रेय पूर्ण ब्रह्म ॥ देत क्षेम तयातें ॥ १८ ॥ क्षीरसागरींच्या लहरिया ॥ परस्परें समरसोनियां ॥ कीं जान्हवी आणि मित्रतनया ॥ एके ठायीं मिळताती ॥ १९ ॥ कीं नानावर्ण गाई ॥ परी दुग्धास दुजा वर्ण नाहीं ॥ तैसा जनकाचा जांवई ॥ आणि अत्रितनय मिसळले ॥ २० ॥ अवतारही उदंड होती ॥ सर्वांचि मागुती विलया जाती ॥ तैसी नव्हे श्रीदत्तात्रेयमूर्ती ॥ नाश कल्पांतीं असेना ॥ २१ ॥ पूर्णब्रह्म मुसावलें ॥ तें हें दत्तात्रेयरूप वोतिलें ॥ ज्याचे विलोकनमात्रें तरले ॥ जीव अपार त्रिभुवनीं ॥ २२ ॥ सकळ सिद्ध ऋषी निर्जरें ॥ विधि वाचस्पति शचीवर ॥ दत्तात्रेयदर्शना साचार ॥ त्रिकाळ येती निजभावें ॥ २३ ॥ अद्यापि सह्याद्रीपर्वतीं ॥ देवांचे भार उतरती ॥ सर्व ब्रह्मांडींचीं

१ सूर्यापासून. २ मेरूपर्वताच्या पार्श्वभागीं असणारी नदी, तीपासून. ३ लोणी. ४ केळीपासून. ५ कस्तूरी. ६ नदीपति समुद्र. ७ भाजीशिवाय. ८ महिला, स्त्री. ९ आकाश. १० नक्षत्रसमूहानें. ११ शेत. १२ पवित्र आचरणाशिवाय. १३ सहा महिने. १४ आलिंगन. १५ भागीरथी. १६ यमुना. १७ मुशींत ओतलें. १८ देव. १९ बृहस्पति. २० इंद्र.

दैवतें धांवती ॥ अवधूतमूर्ती[21] पहावया ॥ २४ ॥ घेतां दत्तात्रेयदर्शन ॥ देवांसी सामर्थ्य चढे पूर्ण ॥ मग ते इतरांसी होत प्रसन्न ॥ वरदान द्यावयातें ॥ २५ ॥ ज्यासी प्रयागीं प्रातःस्नान ॥ पांचाळेश्वरीं अनुष्ठान ॥ कैरवीरपुरांत[22] येऊन ॥ भिक्षाटण माध्यान्हीं ॥ २६ ॥ अस्ता जातां वासरमणी[23] ॥ सह्याद्रीस जाती परतोनी ॥ तों देवांचे भार कर जोडोनी ॥ वाट पाहती अगोदर ॥ २७ ॥ दृष्टीं देखतां दिगंबर ॥ एकचि होय जयजयकार ॥ असंख्य वाद्यांचे गजर ॥ अद्यापि भक्त ऐकती ॥ २८ ॥ दत्तात्रेयभक्त देखतां दृष्टीं ॥ सकळ दैवतें जीं जीं सृष्टीं ॥ त्याचे पायीं घालिती मिठी ॥ पुढें ठाकती कर जोडूनि ॥ २९ ॥ करितां दत्तात्रेयस्मरण ॥ भूतप्रेतें पळती उठोन ॥ मग उपसकांसी विघ्न ॥ कवण करूं शकेल ॥ ३० ॥ असो ऐसा स्वामी अवधूत ॥ जो अत्रीचा महापुण्यपर्वत ॥ तयासी वंदोनि रघुनाथ ॥ अत्रिदर्शन घेतलें ॥ ३१ ॥ तंव ते अनसूया सती ॥ सीता राम तियेसी वंदिती ॥ सीतेसी आलिंगूनि प्रीतीं ॥ वर देती जाहली ॥ ३२ ॥ आपुले निढळींचें कुंकुम काढिलें ॥ तें सीतेचे कपाळीं लाविलें ॥ अमलवस्त्र[24] नेसविलें ॥ जें न मळे न विटे कल्पांतीं ॥ ३३ ॥ गळां घातला सुमनहार[25] ॥ जो कधीं न सुके साचार ॥ जैसा नित्य नूतन दिनकर[26] ॥ तेज अणुमात्र ढळेना ॥ ३४ ॥ सीतेचें सुवास शरीर ॥ अनसूया करी निरंतर ॥ ज्या सुवासें अंबरीं[27] ॥ परिपूर्ण होय पैं ॥ ३५ ॥ भेटतां राक्षस दुर्धर ॥ सीतेसी भय न वाटे अणुमात्र ॥ ऐसा दिधला निर्भय वर ॥ अनसूयेनें तेधवां ॥ ३६ ॥ सर्वेंचि रेणुकेचें दर्शन ॥ घेत रविकुळभूषण ॥ जिच्या वरें भार्गवें पूर्ण ॥ निःक्षत्री केली धरित्री ॥ ३७ ॥ ते मूळपीठनिवासिनी शक्ती ॥ तीस वंदी अयोध्यापती ॥ ते श्रीरामाची मूळ-प्रकृती ॥ आदिमाया निर्धारें ॥ ३८ ॥ ते प्रथमअवताराची जननी ॥ तीच कौसल्या झाली दुसरेनी ॥ श्रीराम स्तवी म्हणोनी ॥ ऐका श्रवणीं सादर ॥ ३९ ॥ जय जय आदिकुमारिके ॥ जय जय मूळपीठनायिके ॥ सकळ कल्याणसौभाग्यदायिके ॥ जगदंबिके मूळप्रकृति ॥ ४० ॥ जय जय भार्गवप्रियभवानी ॥ भवनाशके भक्तवरदायिनी ॥ सुभद्रकारके[28] हिमनगनंदिनी ॥ त्रिपुरसुंदरी महामाये ॥ ४१ ॥ जय जय आनंदैकासारमराळिके[29] ॥ जय जय चातुर्यचंपककळिके ॥ जय जय शुंभनिशुंभदैत्यांतके ॥ सर्वव्यापके मृडानि ॥ ४२ ॥ जय जय शिवमानसकनकलतिके ॥ पद्मनयने दुरितवनपावके[30] ॥ जय जय त्रिविधतापमोचके ॥ निजजनपाळके अन्नपूर्णे ॥ ४३ ॥ तव मुख-कमलशोभा देखोनी ॥ इंदुबिंब गेलें विरोनी ॥ ब्रह्मादिकें बाळें तीन्ही ॥ स्वानंदसदनीं निजविसी ॥ ४४ ॥ जीव शिव[31] दोन्ही बाळकें ॥ अंबे तुवां निर्मिलीं कौतुकें ॥ जीव तुझें स्वरूप नोळखे ॥ म्हणोनि पडिला आवर्ती[32] ॥ ४५ ॥ शिव[33] तुझे स्मरणीं सावचित्त ॥ म्हणोनि तो नित्यमुक्त ॥ ब्रह्मानंदपद हाता येत ॥ तुझे कृपेनें जननीये ॥ ४६ ॥ मेळवूनि पंचभूतांचा मेळ ॥ तुवां रचिला ब्रह्मांडगोळ ॥ इच्छा परततां तत्काळ ॥ क्षणांत निर्मूळ करिसी तूं ॥ ४७ ॥ ऐसें स्तवोनि चापपाणी ॥ सह्याद्रीवरी दिनत्रय[33] क्रमोनी ॥ अत्रिऋषीची

२१ दत्तात्रेय. २२ कोल्हापुरांत. २३ सूर्य. २४ स्वच्छ. २५ पुष्पमाला. २६ सूर्य. २७ आकाश, २८ कल्याण-मंगल-कारक. २९ आनंदरूपसरोवरांतील राजहंसी. ३० पातकरूपी वनाला जाळणारा अग्नि तद्वत्. ३१ ईश्वर. ३२ भोंवऱ्यांत, जन्ममरणाच्या फेऱ्यांत. ३३ तीन दिवस.

आज्ञा घेऊनी ॥ दक्षिणपंथें चालिले ॥ ४८ ॥ अत्रि म्हणे गा रघुपती ॥ या वनीं राक्षस बहु वसती ॥ जतन करीं सीता सती ॥ क्षणही परती न कीजे[३४] ॥ ४९ ॥ अवश्य म्हणोनि जलजनेत्र ॥ पुढें चालिला स्मरारिमित्र[३५] ॥ पाठीसीं भोगींद्रअवतार ॥ वीर सौमित्र[३६] जातसे ॥ ५० ॥ त्यामागें मंगळभगिनी ॥ मंगळकारक विश्वजननी ॥ स्थिर स्थिर हंसगमनी ॥ मंगे[३७]ळजननीवरी चाले ॥ ५१ ॥ दुरावतां भूमिकन्या ॥ सौमित्र म्हणे राजीवनयना ॥ जानकी मागें राहिली मनमोहना ॥ उभा राहें क्षणभरी ॥ ५२ ॥ वचन ऐकतां जगन्नायक ॥ उभा राहिला क्षण एक ॥ परम उदार सुहास्यमुख ॥ परतोनि पाहे सीतेकडे ॥ ५३ ॥ तंव ते सुकुमार जनकबाळी ॥ हळू हळू आली जवळी ॥ जेवीं सारासारविचारनेहोळी[३८] ॥ आत्मसुखाची पाविजे ॥ ५४ ॥ असो ते पतिव्रतामंडन ॥ विलोकी श्रीरामाचें वदन ॥ जयावरून कोटी मदन ॥ ओंवाळून टाकावे ॥ ५५ ॥ परम सलज्ज होऊन ॥ केलें किंचित हास्यवदन ॥ जेणें निवती राघवकर्ण ॥ ऐसें वचन बोलली ॥ ५६ ॥ म्हणे जगद्वंद्या रविकुळभूषणा ॥ विषकंठहृदयी[३९] चिन्मयलोचना ॥ चरणीं चालतां रघुनंदना ॥ बहुत श्रम पावलेती ॥ ५७ ॥ परम सुकुमार लक्ष्मण ॥ चरणीं चालतां पावला शीण ॥ वृक्षच्छायेसी जाऊन ॥ गुणसागरा बैसावें ॥ ५८ ॥ रौंतोत्पल[४०] सुकुमार ॥ त्याहूनि पदें तुमचीं अरुवार[४१] ॥ अरुणसंध्यारागमित्र ॥ चरणतळवे सुरवाडले[४२] ॥ ५९ ॥ जें जान्हवीचें जन्मस्थान ॥ तें मी निजकेशीं झाडीन ॥ शीतोदकें धुवोन ॥ मग चुरीन क्षणभरी ॥ ६० ॥ आजिचें पेणें किती दूर ॥ आहे हें न कळे साचार ॥ ऐकतां पद्माक्षीचें उत्तर ॥ द्रवला रघुवीर अंतरीं ॥ ६१ ॥ म्हणे सुकुमार चंपककळी ॥ चरणीं चालतां बहु श्रमली ॥ ऐसें बोलतां नेत्रकमळीं ॥ अश्रु आले राघवाचे ॥ ६२ ॥ मग आपुले हस्तेंकरून ॥ कुरवाळिलें सीतेचें वदन ॥ मस्तकीं हस्त ठेवून ॥ श्रम संपूर्ण हरियेला ॥ ६३ ॥ परम सुखावली जनकनंदिनी ॥ श्रीरामाचीं पदें झाडूनी ॥ मग आपुल्या मुक्तकेशेंकरूनी ॥ प्रक्षाळूनि चरण चुरीतसे ॥ ६४ ॥ मग उठोनि चालिला रघुवीर ॥ पाठीसीं उभा भूधरावतार ॥ त्याचे मागें जनकजा सुंदर ॥ हंसगती चमकतसे ॥ ६५ ॥ वनचरें वैरभाव सांडोनी ॥ होतीं तीं पळती भयेंकरूनी ॥ विराध राक्षस ते क्षणीं ॥ आला धांवूनि अकस्मात ॥ ६६ ॥ महाभयानक विशाळ शरीर ॥ खदिरांगार तैसे नेत्र ॥ कपाळीं चर्चिला शेंदूर ॥ बोंबरझोटी[४३] मोकळीया ॥ ६७ ॥ जैसा अमीचा ओघ थोर ॥ तैसी जिव्हा लवलवित बाहेर ॥ काजळाचा पर्वत थोर ॥ तैसें शरीर दिसतसे ॥ ६८ ॥ गळां नरमुंडांच्या माळा ॥ हातीं शूल ऊर्ध्व धरिला ॥ सिंहगजवनचरांचा मेळा ॥ टोंचिल्या माळा शूलावरी ॥ ६९ ॥ शतांचे शत ब्राह्मण ॥ रगडी दाढेखालीं घालून ॥ वाटेसीं लत्ताप्रहारेंकरून ॥ वृक्ष पाडी समूळीं ॥ ७० ॥ पुढें जातसे रघुनाथ ॥ मागोनि विराध आला धांवत ॥ जानकी धरूनि अकस्मात ॥ जाता झाला ते वेळीं ॥ ७१ ॥ जैसा गृहीं तस्कर रिघोनी ॥ धनेंकुंभ जाय घेऊनी ॥ कीं अकस्मात व्याघ्र येवोनी ॥ नेत उचलोनि

३४ न करावी. ३५ श्रीराम. ३६ लक्ष्मण. ३७ पृथ्वीवर. ३८ निरखून पाहणारी, सदसद्विवेकी (सीता). ३९ शंकराचें हृदयच असा (राम). ४० रक्तकमल. ४१ कोमळ. ४२ शोभले. ४३ मोकळे सोडलेले मस्तकावरील केस. ४४ धनाचा घडा.

हरिणीतें ॥ ७२ ॥ कीं होमशाळेंत रिघे श्वान ॥ जाय चैरुपात्र घेऊन ॥ तैसा विराध दुर्जन ॥ जात वेगेंकरूनियां ॥ ७३ ॥ करुणा-स्वरेंकरूनि देखा ॥ जानकी म्हणे मित्रेकुळटिळका ॥ धांव धांव अयोध्यानायका ॥ जगव्यापका दीनबंधो ॥ ७४ ॥ परतोनि पाहे राजी-वाक्ष ॥ तों सैंघन लागले वनीं वृक्ष ॥ नयनीं न दिसे प्रत्यक्ष ॥ कोणीकडे गेला तो ॥ ७५ ॥ क्षण न लागतां लक्ष्मण ॥ धनुष्यासी योजिला अर्धचंद्र बाण ॥ तत्काळ वृक्ष छेदून ॥ केलें वन निर्मूळ ॥ ७६ ॥ धनुष्य चढवोनि जनकजामातें ॥ पाचारिलें तेव्हां विरा-धातें ॥ जैसा मृगेंद्र महागजातें ॥ तैसी लक्ष्मणें हांक फोडिली ॥ ७७ ॥ अरे राक्षसा घरीं घीर ॥ माझा बाण घेटोद्भव थोर ॥ तुझे आयुष्यसागराचें नीर ॥ प्राशील आतां निर्धारें ॥ ७८ ॥ महाव्याघ्राचा विभाग देख ॥ कैसा नेऊन वांचेल जंबुक ॥ आदित्याच्या कळा मशक ॥ तोडील कैसा निजांगें ॥ ७९ ॥ काळाचे हातींचा दंड अभंग ॥ केवीं नेऊं शके झोटिंग ॥ वांसुकीचा विषदंत सवेग ॥ दर्दुर केवीं पाडी पां ॥ ८० ॥ विराध म्हणे तूं मानव धीट ॥ गोष्टी सांगतोसी अचाट ॥ तरी तुझें करीन पिष्ट ॥ मुष्टिघातें आतांचि ॥ ८१ ॥ ऐसें राक्षस बोलून ॥ जानकीस खालीं ठेवून ॥ घांविन्नला पसरूनि वदन ॥ रामसौमित्रांवरी तेधवां ॥ ८२ ॥ करी धांवत्या वायूचें खंडण ॥ ऐसें रामें सोडिले दोन बाण ॥ त्यांहीं दोन्ही भुजा उडवून ॥ गेले घेवोन निराळपंथें ॥ ८३ ॥ सवेंचि सूर्यमुखशरें ॥ शिर छेदिलें कौसल्याकुमरें ॥ विमानीं देव जयजयकारें ॥ पुष्पसंभार वर्षती ॥ ८४ ॥ विराध पावला दिव्य शरीर ॥ रामासी विनवी जोडूनि कर ॥ म्हणे मी गंधर्व तुंबर ॥ नाम माझें रघुवीरा ॥ ८५ ॥ गायन करावया वहिलें ॥ यक्षपतीनें बोलाविलें ॥ तंव म्यां मद्यपान केलें ॥ भ्रांत झालें शरीर माझें ॥ ८६ ॥ कंठीं न उमटतां स्वर ॥ मग कुबेरें सोडिलें शापशस्त्र ॥ म्हणे तूं होय निशाचर ॥ महाघोर वनांतरीं ॥ ८७ ॥ मग म्यां करुणा भाकितां थोर ॥ उच्छाप बोलिला कुबेर ॥ तुज वनीं वधील रघुवीर ॥ तैं उद्धार होय तुझा ॥ ८८ ॥ राघवा वर्षें दहा सहस्र ॥ मी विचरें येथें रजनीचर ॥ माझ्या भेणें दशशिर ॥ चळचळां थोर कांपतसे ॥ ८९ ॥ असो माझा उद्धार झाला येथें ॥ म्हणोनि वंदिलें रघुनाथातें ॥ विमानीं बैसोनि त्वरितें ॥ स्वस्थानासी पावला ॥ ९० ॥ विराध रामें मारितां वनीं ॥ चहूंकडे पसरला कीर्तिध्वनि ॥ जैसें तैल पडतां जीवनीं ॥ जाय पसरोनि क्षणार्धें ॥ ९१ ॥ कीं सुपात्रीं दान देतां निर्मळ ॥ कीर्तीनें भरे भूमंडळ ॥ कीं दुर्जनासी गुह्य केवळ ॥ सांगतां पसरे चहूंकडे ॥ ९२ ॥ कीं कुलवंतासी उपकार ॥ करितां कीर्ति वाढे सविस्तर ॥ कीं संतसमागमें अपार ॥ दिव्य ज्ञान प्रकटे पैं ॥ ९३ ॥ असो जानकी येऊन ॥ वंदीं श्रीरामाचे चरण ॥ म्हणे तुमचा पराक्रम आणि संधान ॥ आजि म्यां दृष्टीं पाहिलें ॥ ९४ ॥ विराध उद्धरूनि जातां ॥ तेणें प्रार्थिलें रघुनाथा ॥ स्वामी तव दर्शनीं आस्था ॥ शरभंगऋषीनें धरिली असे ॥ ९५ ॥ हंसविमान घेऊनि इंद्र ॥ त्यासी मूळ आला साचार ॥ परी तुज पाहिल्याविण मुनीश्वर ॥ नव-

४५ पुरोडाशस्थाली. ४६ सूर्यवंशातिलका. ४७ दाट. ४८ रामानें. ४९ अगस्तिऋषि. ५० या नांवाच्या सर्पाचा. ५१ आकाशमार्गानें. ५२ लागलेंच, सत्वर. ५३ कुबेरानें. ५४ दहा मस्तकांचा रावण. ५५ पाण्यावर. ५६ हंसयुक्त देवयान. ५७ बोलावणें.

जायचि ब्रह्मपदा ॥ ९६ ॥ केव्हां उगवेल रोहिणीवर ॥ म्हणोनि इच्छिती चकोर ॥ तैसा दृष्टीं पहावया रामचंद्र ॥ शरभंग ऋषि इच्छीतसे ॥ ९७ ॥ ऐसें विराधें सांगून ॥ मग तो गेला उद्धरून ॥ त्याचे आश्रमासी रघुनंदन ॥ जाता झाला ते काळीं ॥ ९८ ॥ मग पुढें जात रघुनंदन ॥ मार्गे येत जानकीचिद्रत्न ॥ तिचे पाठीसीं लक्ष्मण ॥ चहूंकडे पहातसे ॥ ९९ ॥ आणीक येतील रैंजनीचर ॥ म्हणोनि चापाँसी लाविला शर ॥ बळिया सुमित्राकुमर ॥ पाठिराखा येतसे ॥ १०० ॥ तों वृक्षच्छायेसी क्षणक्षणां ॥ ठायीं ठायीं बैसे पैद्मनयना ॥ श्वास टाकोनी म्हणे लक्ष्मणा ॥ कां हो राहाना आजि कोठें ॥ १ ॥ तों वृक्षातळीं सर्वसाक्षी ॥ जो चराचरचित्त परीक्षी ॥ पद्माक्षीचा मार्ग लक्षी ॥ उभा राहूनि क्षणेक ॥ २ ॥ पुढें शरभंगाच्या आश्रमा रघुवीर ॥ येता झाला दयासागर ॥ चहूंकडोन धांवले ऋषीश्वर ॥ जैसे पूर गंगेचे ॥ ३ ॥ सांडोनि समाधि तपाचरण ॥ लगबगां धांवती ब्राह्मण ॥ शरभंग निघे वेगेंकरून ॥ रामदर्शना ते काळीं ॥ ४ ॥ शरभंग महाऋषी ॥ परी गलितकुष्ठ भरला त्यासी ॥ दिव्य शरीर धरूनि भेटीसी ॥ येता झाला श्रीरामाचे ॥ ५ ॥ पहिलें शरीर झांकून ॥ घरीं ठेवी तो ब्राह्मण ॥ क्षणभरी दिव्य रूप धरून ॥ रामदर्शना पातला ॥ ६ ॥ असो देखोन ऋषीश्वरांचे भार ॥ साष्टांग नमीत रामसौमित्र ॥ शरभंगासहित विप्र ॥ राघवेंद्रें आलिंगिले ॥ ७ ॥ शरभंगाच्या आश्रमांत ॥ राहते झाले रघुनाथ ॥ सीतासौमित्रसमवेत ॥ राम पूजिला शरभंगें ॥ ८ ॥ लक्ष्मण ऋषीतें पुसत ॥ कंथेखालीं[६१] काय कांपत ॥ शरभंग उघडोनि दावीत ॥ सौमित्रातें तेधवां ॥ ९ ॥ म्हणे हें कर्मशरीर भोगिल्याविण ॥ न तुटे कदा देहबंधन ॥ राजा रंक हो साधु सज्ञान ॥ कर्म गहन सोडीना ॥ ११० ॥ चिळस उपजली लक्ष्मणा ॥ म्हणे वर मागा जी रघुनंदना ॥ ऋषि म्हणे उष्णोदक स्नाना ॥ मज तें न मिळे सर्वथा ॥ ११ ॥ शीतोदकें स्नान नित्य ॥ तेणें शरीर हें उलंत[६२] ॥ ऐसें ऐकोनी अवनिजाकांत[६३] ॥ काय बोले ऋषीतें ॥ १२ ॥ असो तुम्हांसी उदक देऊन ॥ प्रातःकाळीं करूं गमन ॥ तों रात्री संपतां चंडकिरण[६४] ॥ उदयाचळीं उगवला ॥ १३ ॥ ऋषिआज्ञा घेऊनि त्वरित ॥ पुढें चालिले रघुनाथ ॥ ऋषिवचनाचा विसर पडत ॥ श्रीराम येत गौतमीतीरा[६५] ॥ १४ ॥ गौतमींत करितां स्नान ॥ तों आठवलें ऋषीचें वचन ॥ मग धनुष्यासी लावून अभिबाण ॥ सोडिला क्षण न लागतां ॥ १५ ॥ चपळेऐसा बाण आला ॥ ऋषिआश्रमापुढें कूप केला ॥ बाण प्रवेशला पाताळा ॥ कूप उचंबळला उष्णोदकें ॥ १६ ॥ तेथें एकेचि स्नानें साचार ॥ ऋषीचें झालें दिव्य शरीर ॥ मग विमानीं बैसवूनी विप्र ॥ शैंक्रें[६६] नेला अमरलोका ॥ १७ ॥ मग सुतीक्ष्णाच्या आश्रमाप्रती ॥ जाता झाला जनकजापती ॥ मार्गीं तापसी बहुत ऐकती ॥ श्रीरामाच्या समागमें ॥ १८ ॥ नानाप्रकारचे तापसी ॥ कित्येक ते वृक्षाग्रवासी ॥ एक वृद्ध अत्यंत वाचेसी ॥ शब्द न फुटे बोलतां ॥ १९ ॥ एक दंतहीन बहुसाल ॥

५८ राक्षस. ५९ धनुष्यास. ६० सीता. ६१ गोचडीखालीं. ६२ उकलतें. ६३ श्रीराम. ६४ सूर्य. ६५ गोदावरींत. ६६ इंद्रानें.

फळें ठेंचावया काखेसी उखळ ॥ नग्न मौनी जटाधारी सकळ ॥ दुग्धाहारी फळाहारी ॥ १२० ॥ असो सुतीक्ष्णआश्रमासी ॥ आला शरयू-तीरनिवासी ॥ मग परमानंद होत ऋषींसी ॥ रघुपतीसी भेटती ॥ २१ ॥ तेथें क्रमोनि तीन दिन ॥ त्रिनयनहृदयजीवन[६७] ॥ त्रिभुवनपति रघुनंदन ॥ पुढें तेथोनि चालिला ॥ २२ ॥ तों गौतमीतीर पावन ॥ पाहतां पांचाळेश्वर रम्य स्थान ॥ तेथें भूमींतून गायन ॥ राम-चंद्रें ऐकिलें ॥ २३ ॥ रघूत्तमातें सांगती तापसी ॥ येथें मंदकर्ण महाऋषी ॥ परम तपिया तेजोराशी ॥ जैसा आकाशीं भास्कर ॥ २४ ॥ क्षय करावया तपातें ॥ पांच अप्सरा अमरनाथें ॥ पाठवितां ऋषि त्यांतें ॥ देखोनियां भुलला[६८] ॥ २५ ॥ भूगर्भविवर कोरून ॥ त्यांचें सर्वदा ऐके गायन ॥ त्याकरितां उर्वीमधून[६९] ॥ ध्वनि उमटती राघवा ॥ २६ ॥ असो ऋषी पाहे ज्ञानी ॥ श्रीराम आला कळलें मनीं ॥ मग विवरद्वार उघडोनी ॥ बाहेर आला भेटावया ॥ २७ ॥ रामें वंदिले ऋषीचे चरण ॥ आदरें भेटले दोघेजण ॥ मग आश्रमातें नेऊन ॥ मित्रकुळभूषणा पूजिलें ॥ २८ ॥ तेथें क्रमोनि एक रात्र ॥ पुढें चालिला मदनारिमित्रें[७०] ॥ नवमेघरंग रघुवीर ॥ सुतीक्ष्ण-आश्रमा पावला ॥ २९ ॥ मग अगस्तीचें दर्शन ॥ घ्यावया उदित रघुनंदन ॥ तों महाऋषी सुतीक्ष्ण ॥ पुरुषार्थ सांगे अगस्तीचा ॥ १३० ॥ आतापी वातापी इल्वल ॥ तिघे दैत्य परम सबळ ॥ शिववरें महाखळ ॥ कापट्य सकळ जाणती ॥ ३१ ॥ अन्नरूप होय एक ॥ दुजा निजांगें होय उदक ॥ एक अन्नदाता देख ॥ होऊनि बैसले वनातरीं ॥ ३२ ॥ आतापी अन्नदाता पूर्ण ॥ प्रार्थूनि आणी ब्राह्मण ॥ पूजा करूनि उदकपान ॥ आदरेंसी समर्पिती ॥ ३३ ॥ मग आतापी बाँहे नाम घेऊन ॥ वातापी इल्वल दोघेजण ॥ मग ते विप्राचें पोट फोडून ॥ येती धांवून बाहेरी ॥ ३४ ॥ ऐसे असंख्यात द्विजगण ॥ भक्षिले तिहीं मारून ॥ मग कैलशोद्भवासी[७१] शरण ॥ सकळ ब्राह्मण गेले पैं ॥ ३५ ॥ मग तो महाराज घटोद्भव ॥ जयासी शरण स्वर्गींचे देव ॥ ऋषिकैवारी करुणार्णव ॥ दैत्यस्थाना पातला ॥ ३६ ॥ तंव तो घरी अगस्तीचे चरण ॥ म्हणे आश्रम करा जी पावन ॥ अन्न अथवा फळ सेवून ॥ शीतळ जीवन प्राशिजे ॥ ३७ ॥ मुखीं सदा वेदाध्ययन ॥ पाठीसी सदा धनुष्यबाण ॥ तंव आतापी ब्राह्मण ॥ कापट्यवेषें पातला ॥ ३८ ॥ शुभ्र धोत्रें यज्ञोपवीत ॥ टिळे कुशमुद्रा मिरवत ॥ धोत्रें ओलीं सरसावित ॥ क्षमा बहुत धरिलीसे ॥ ३९ ॥ लटिकाचि दावी आचार ॥ परी अंतरीं दुराचार ॥ वृंदावनफळ[७२] सुंदर ॥ अंतरीं काळकूट भरलेंसे ॥ १४० ॥ कीं वरीच जेवीं जारीण ॥ दावी व्रतारसेवा करून ॥ कीं शठमित्राचें[७३] लक्षण ॥ आरंभीं वचन गोड पैं ॥ ४१ ॥ कीं बचनाग मुखीं घालितां ॥ प्रथम गोड वाटे तत्त्वतां ॥ कीं साव चोर गांवीं असतां ॥ बहुत स्नेह वाढवी ॥ ४२ ॥ कीं विषकुंभ भरला समस्त ॥ वरी अमृत घातलें किंचित ॥ कीं दांभिक शिष्य दावीत ॥ गुरुसेवा वरी वरी ॥ ४३ ॥ कुसुंब्याचा आरक्त रंग ॥ आरंभीं दावी सुरंग ॥ किंवा नटें धरिलें सोंग ॥ विरक्ताचें व्यर्थ पैं ॥ ४४ ॥ तैसा आतापी

६७ शंकराच्या हृदयाचा आधार श्रीराम. ६८ भुलला. ६९ जमिनीतून. ७० ओरडे. ७१ अगस्तिऋषि. ७२ कंवडळ. ७३ कपटी मित्राचें.

मावकँर ॥ ऋषीस दावी बहुत ओदर ॥ वरी शब्द रसाळ फार ॥ अंतरीं कातँर दुरात्मा ॥ ४५ ॥ असो आतापी कापट्यवेषी ॥ आश्रमा नेत अगस्तीसी ॥ वातापी फळें वेगेंसीं ॥ होऊनियां बैसला ॥ ४६ ॥ अगस्तीनें भक्षिलीं फळें ॥ उदक नाहीं जों प्राशिलें ॥ तों कापट्य अवघें समजलें ॥ काय केलें कलशोद्भवें ॥ ४७ ॥ उदरावरी फिरवूनि हस्त ॥ दैत्य भस्म केला पोटांत ॥ दोघे नाम घेऊनि बाहत ॥ बाहेर त्वरित ये आतां ॥ ४८ ॥ तंव तो नेदी प्रत्युतर ॥ तंव दोघे रूप धरिती थोर ॥ महा विक्राळ भयंकर ॥ घांवले सत्वर ऋषीवरी ॥ ४९ ॥ धनुष्या चढवोनि गुण ॥ अगस्तीनें सोडिला बाण ॥ वातापीचें शिर छेदून ॥ नेलें उडवोनि आकाशीं ॥ १५० ॥ दोघे निमँाले देखोन ॥ इल्वल पळाला तेथून ॥ तंव तो घटोद्भँव क्रोधायमान ॥ पाठी लागला तयाचे ॥ ५१ ॥ पळतां सरली अवघी जगती ॥ परी पाठ न सोडी अगस्ती ॥ तंव तो उदक होऊनि कापट्यगती ॥ समुद्रजळीं मिसळला ॥ ५२ ॥ कोधायमान ऋषीश्वर ॥ तत्काळ पसरूनि दोन्ही कर ॥ आचमन करूनि सागर ॥ उदरामाजी सांठविला ॥ ५३ ॥ म्हणे उदारा रघुपती ॥ ऐसा पुरुषार्थी अगस्ती ॥ त्याची भेट घेऊनि निश्चितीं ॥ सीतापति पुढें जाय तूं ॥ ५४ ॥ मग सुतीक्ष्णाची आज्ञा ॥ घेऊनियां रामराणा ॥ चालिला कर्दळीवना ॥ अगस्तीच्या आश्रमाप्रति ॥ ५५ ॥ तों मार्गीं अगस्तीचा बंधु ॥ महामतिनाम तपसिंधु ॥ त्याचे आश्रमीं आनंद-कंदु ॥ सीतावल्लभ राहिला ॥ ५६ ॥ तेथें क्रमोनि एक दिन ॥ पुढें जात रविकुलभूषण ॥ तों देखिलें अगस्तीचें वन ॥ शोभायमान सदाफळ ॥ ५७ ॥ छाया शीतळ सघन ॥ माजी न दिसे सूर्यकिरण ॥ नारळी पोफळी रातांजँनँ ॥ गेले भेदोनि गगनातें ॥ ५८ ॥ अशोक वृक्ष उतोतियाँ ॥ रायआंवळे खिरणियाँ ॥ निंब वट पिंपळ वाढोनियां ॥ सुंदर डाहाळिया शोभती ॥ ५९ ॥ डाळिंबें सांवरी पारिजातक मांदार ॥ चंदन मोहवृक्ष अंजीर ॥ चंपक जाई जुई परिकर ॥ बकुळ मोगरे शोभती ॥ १६० ॥ तुळसी मंदार कोविदार ॥ शेवंती चंपावृक्ष परिकर ॥ कनकवेली नागवेली सुंदर ॥ पोंवळवेली आरक्त ॥ ६१ ॥ कल्पवृक्ष आणि चंदन ॥ गरुडवृक्ष आणि अर्जुन ॥ वाळियाचीं बेटें सुवासिक पूर्ण ॥ कर्पूरकर्दळी डोलती ॥ ६२ ॥ शाल तमाल पारिजातक ॥ शिरीष रायचंपक अशोक ॥ फणस निंबोळी मातुलिंग सुरेख ॥ अगर कृष्णागर सुवास ॥ ६३ ॥ मयूर बदकें चातकें ॥ कस्तूरीमृग जवँादी बिडँालकें ॥ राजहंस नकुल चक्रवाकें ॥ कोकिळा कौतुकें बाहती ॥ ६४ ॥ धन्य धन्य ऋषि अगस्ती ॥ श्वापदें निर्वैर विचरती ॥ पक्षी शास्त्रचर्चा करिती ॥ पंडित बोलती जे रीतीनें ॥ ६५ ॥ ठायीं ठायीं वनांत ॥ शिष्य वेदाध्ययन करीत ॥ न्याय मीमांसा सांख्य पढत ॥ तर्क घेत नानापरी ॥ ६६ ॥ पातंजल आणि व्याकरण ॥ एक वेदांतशास्त्रप्रवीण ॥ एक समाधिसुखीं तल्लीन ॥ एक मौन्येंच डुलती ॥ ६७ ॥ नाना ग्रंथींचें श्रवण ॥ ठायीं ठायीं होत पुराण ॥ अष्टांगयोगादि नाना साधन ॥ मनोजय करिताती ॥ ६८ ॥ असो शिष्य गेले घांवून ॥

७४ माया करणारा. ७५ घाताला उत्सुक. ७६ मेले. ७७ अगस्ति. ७८ रातांबे, सिंदरी. ७९ उतोतिया = आरक्तेची झाडें. खिरणी = आरक्ताची एक जात. ८० कस्तुरी - सुगंधी - मांजरें.

अगस्तीसी सांगती हर्षेंकरून ॥ श्रीराम सीता लक्ष्मण ॥ जवळी आले गुरुवर्या ॥ ६९ ॥ ऐसें ऐकतां ते अवसरीं ॥ ऋषीचा आनंद न माये अंबरीं ॥ सकळिकांसी म्हणे उठा झडकरी ॥ जाऊं राघवा सामोरे ॥ १७० ॥ समाधि जप तप अनुष्ठान ॥ करूनि पावावे जयाचे चरण ॥ तो राजीवनेत्र रघुनंदन ॥ आश्रमा आपण पातला ॥ ७१ ॥ जो जगद्वंद्य आदिसोयरा ॥ जो अगम्य विधिशक्र-कर्पूरगौरा ॥ मूळ न धाडितां आमुचे मंदिरा ॥ पूर्वभाग्यें पातला ॥ ७२ ॥ जैशा नद्या भरूनियां ॥ जाती नदेश्वरासी भेटावया ॥ तैसा अगस्ति लवलाह्या ॥ श्रीरामाजवळी पातला ॥ ७३ ॥ देखोनियां ऋषींचे भार ॥ राम सौमित्र घालिती नमस्कार ॥ घटोद्भवें पुढें धांवोनि सत्वर ॥ रघुवीर आलिंगिला ॥ ७४ ॥ रमापति आणि उमापति ॥ प्रीतीनें जैसे भेटती ॥ कीं इंद्र आणि बृहस्पती ॥ आलिंगिती परस्परें ॥ ७५ ॥ परम सद्गद ऋषीचें मन ॥ म्हणे धन्य धन्य आजिचा दिन ॥ कौसल्यागर्भ रघुनंदन ॥ नेत्रीं देखिला घणीवरी ॥ ७६ ॥ असो इतरही मुनीश्वरां ॥ भेटला अनादिसोयरा ॥ ब्राह्मणीं वेष्टिलें जनकजावरा ॥ याचकीं वेष्टिला दाता जेवीं ॥ ७७ ॥ कीं चंदन वेष्टित फणिवर ॥ कीं भूपतीभोंवता दळभार ॥ कीं ते बहुत मिळोनि चकोर ॥ ऋक्षपतीसी विलोकिती ॥ ७८ ॥ कीं विलोकितां सौदामिनीपंती ॥ नीळकंठ आनंदें नाचती ॥ कीं महावैद्य देखोनि धांवती ॥ व्यथाभिभूत जैसे कां ॥ ७९ ॥ कीं उग-वतां सहस्रकर ॥ चक्रवाकें तोषती अपार ॥ तैसा देखतां जगदुद्धार ॥ मुनीश्वर संतोषले ॥ १८० ॥ देखोनियां ऋषिमंडळी ॥ परम लज्जित जनकबाळी ॥ मग जाऊनि निराळी ॥ उभी ठाकली क्षण एक ॥ ८१ ॥ तंव ऋषिपत्न्या असंख्यात ॥ पहावया धांवल्या रघु-नाथ ॥ तो ऋषींमाजी सीताकांत ॥ कोण तो न ये प्रत्यया ॥ ८२ ॥ जगीं असोनि जगदीश्वर ॥ नेणती जैसे भ्रांत नर ॥ तैसा ऋषींत असोनि रामचंद्र ॥ ऋषिपत्न्यांसी दिसेना ॥ ८३ ॥ साधक शरण सद्गुरूशी ॥ तैशा त्या येती सीतेपाशीं ॥ म्हणती रघुवीर प्रत्ययासी ॥ आणूनि देईं आम्हांतें ॥ ८४ ॥ जैसी आदिमाया भगवती ॥ तीस वेष्टीत अनंत शक्ती ॥ तैशा ऋषिपत्न्या सीतासती ॥ वेष्टोनियां पुसती तियेतें ॥ ८५ ॥ पुराणपुरुष रघुनंदन ॥ ऋषिवृंदांत आहे पूर्ण ॥ परी अमुकचि राम म्हणोन ॥ दावीं आम्हांसी माउलिये ॥ ८६ ॥ अवघे जटाजूट तापसी ॥ एकाहूनि एक तेजोराशी ॥ परी तव नेत्रचकोरशशी ॥ दावीं आम्हांसी माउलिये ॥ ८७ ॥ जवळी असोनि राघवेंद्र ॥ नव्हे आम्हांसी कां गोचर ॥ परी मंगळभगिनी तुझा वर ॥ मंगळकारक दावीं आम्हां ॥ ८८ ॥ चौऱ्यायशीं लक्ष गर्भवास ॥ हिंडतां शिणलों बहुवस ॥ तरी तो मस्तपाळक सर्वेश ॥ आदिपुरुष दावीं कां ॥ ८९ ॥ मृगनाभीं असोनि मृगपद ॥ परी तो नेणेचि मतिमंद ॥ कीं जवळी रत्न असोनि गर्भांध ॥ नेणे जैसा अभाग्य ॥ १९० ॥ जो वेदवल्लीचें दिव्य फळ जाण ॥ जो सरसि-जोद्भवाचें अनादि धन ॥ जो नारदादिकांचें गुह्य पूर्ण ॥ ध्येय ध्यान विषकंठाचें ॥ ९१ ॥ ऐशा नानापरी पूसती ॥ परी न बोले सीतासती ॥ मग ऋषिस्त्रिया ध्यानें वर्णिती ॥ नाना ऋषींचीं ते वेळीं ॥ ९२ ॥ ज्या ज्या ऋषीचें वर्णिती ध्यान ॥ तों तों जानकी

८१ समुद्राला. ८२ तृप्ति होईपर्यंत. ८३ चंद्र, नक्षत्रपति. ८४ मेघ (विजेचा पति). ८५ मोर. ८५ सीते. ८७ यज्ञरक्षणकर्ता.

हालवी मान ॥ जैसा दृश्य पदार्थ संपूर्ण ॥ वेदश्रुती निरसिती ॥ ९३ ॥ जें जें दिसतें तें तें नाशिवंत ॥ तें चिन्मय नव्हे अशाश्वत ॥ ऋषिस्त्रिया स्वरूप वर्णीत ॥ मान हालवित सीता तेथें ॥ ९४ ॥ वेदशास्त्रां पडलें मौन ॥ तो केवीं बोलिजे शब्दें करून ॥ यालागीं न बोले वचन ॥ हालवी मान जानकी ॥ ९५ ॥ हस्तसंकेतें करून ॥ जरी दावावा रघुनंदन ॥ तरी तो एकदेशी नव्हे पूर्ण ॥ जो निर्गुण निर्विकारी ॥ ९६ ॥ योग याग साधनें अपार ॥ करितां शिणती साधक नर ॥ तेवीं ऋषिस्त्रिया शिणल्या थोर ॥ रूपें वर्णितां स्वचित्तीं ॥ ९७ ॥ जैसी वेदाचिये शेवटीं ॥ स्वरूपीं पडे ऐक्यमिठी ॥ तैसा श्रीराम देखिला दृष्टीं ॥ ऋषिस्त्रियांनीं अकस्मात ॥ ९८ ॥ म्हणती सजलजलदवर्ण ॥ आकर्णनेत्र सुहास्यवदन ॥ वाटे ब्रह्मानंदचि मुरोन ॥ मूर्ति वोतिली चिन्मय ॥ ९९ ॥ जटाजूटमुकुट पूर्ण ॥ आजानुबाहु वल्कलवसन ॥ हातीं विराजती चापबाण ॥ पति होय कीं हा तुझा ॥ २०० ॥ ऐसें ऐकतां वचन ॥ सीतेनें केलें हास्यवदन ॥ हालवितां राहिली मान ॥ उन्मीलित नयन जाहले ॥ १ ॥ ऋषिपत्न्यांतें कळली खूण ॥ प्रत्यया आला रघुनंदन ॥ विलोकितां राघवध्यान ॥ घाल्या पूर्ण ब्रह्मानंदें ॥ २ ॥ मग सीतेचिया चरणीं मिठी ॥ घालिती सकळ त्या गोरटी ॥ म्हणती माते धन्य सृष्टी ॥ राम जगजेठी दाविला ॥ ३ ॥ जैसा मौन धरूनि वेद ॥ संतांसी दावी ब्रह्मपद ॥ तैसा सीतेनें परमानंद ॥ ऋषिपत्न्यांसी दाविला ॥ ४ ॥ आतां असो हा पसार ॥ अगस्तीनें श्रीरामचंद्र ॥ आश्रमा नेऊनि साचार ॥ परमानंदें पूजिला ॥ ५ ॥ अक्षय चाप अक्षय भाते ॥ अक्षय कवच रघूत्तमातें ॥ शस्त्रें अस्त्रें मंत्रसामर्थ्यें ॥ दाशरथीतें दीधलीं ॥ ६ ॥ जैसा नवग्रहांत चंडकिरण ॥ तैसा दिधला एक बाण ॥ म्हणे याचि शरें रावण ॥ शेवटीं घाडीं निजधामा ॥ ७ ॥ एक मासपर्यंत ॥ तेथें काळ क्रमी रघुनाथ ॥ मग घटोद्भवासी पुसत ॥ आम्हीं आतां राहावें कोठें ॥ ८ ॥ अगस्ति म्हणे गोदातटीं ॥ वस्तीसी स्थान पंचवटी ॥ तेथें तूं राहें जगजेठी ॥ सीता गोरटी जतन करीं ॥ ९ ॥ आज्ञा घेऊनि ते वेळां ॥ पंचवटीसी श्रीराम चालिला ॥ वाटेसी जटायु देखिला ॥ राघवेंद्रें अकस्मात ॥ २१० ॥ पर्थीं बैसला जैसा पर्वत ॥ श्रीराम सौमित्रासी पुसत ॥ हा राक्षस होय यथार्थ ॥ आणीं त्वरित धनुष्य बाण ॥ ११ ॥ दोन्ही तूणीर घननीळें ॥ पाठीसी दोहींकडे आकर्षिले ॥ तंव तो जटायु ते वेळे ॥ काय बोले दुरूनियां ॥ १२ ॥ म्हणे तूं ये वनांतरीं कोण ॥ मजवरी टाकिसी बाण ॥ सांग तुझें नामाभिधान ॥ मग रघुनंदन बोलत ॥ १३ ॥ रविकुळमंडण दशरथ ॥ त्याचा पुत्र मी रघुनाथ ॥ ऐसी ऐकतांचि मात ॥ जटायु जवळी पातला ॥ १४,॥ म्हणे कश्यपसुत अरुण ॥ तो माझा जैनिता पूर्ण ॥ पितृव्यें माझा सुंपर्ण ॥ जटायु जाण नाम माझें ॥ १५ ॥ माझा ज्येष्ठबंधु संपाती ॥ तो दक्षिणसागरीं करी वस्ती ॥ तुझा पिता दशरथ नृपती ॥ मज बंधुत्वें मानीतसे ॥ १६ ॥ शुक्रासीं युद्ध करितां ॥ मी साह्य झालों दशरथा ॥ मज बंधुत्व मानी तत्त्वतां ॥ अजराजपुत्र ते काळीं ॥ १७ ॥ ऐसी ऐकतांचि मात ॥ सद्गदित झाला रघुनाथ ॥ जटायूचे कंठीं मिठी घालित ॥ म्हणे तूं निश्चित पितृव्य माझा ॥ १८ ॥

८८ विकसित, प्रफुल्लित. ८९ पिता. ९० चुलता. ९१ गरुड.

मग जटायूचे अनुमतें ॥ श्रीराम राहे पंचवटीतें ॥ पर्णशाळा सुमित्रासुतें ॥ विशाळ रचिल्या ते वेळे ॥ १९ ॥ फळें मूळें आणून ॥ नित्य देत सुमित्रानंदन ॥ आपण निराहार निर्वाण ॥ चतुर्दश वर्षेंपर्यंत ॥ २२० ॥ जानकी भावी ऐसें मनीं ॥ लक्ष्मण फळें भक्षितो वनीं ॥ मग आणितो आम्हांलागूनी ॥ फळें घ्या म्हणोनि म्हणतसे ॥ २१ ॥ सीतेचे आज्ञेविण ॥ सौमित्र न करी फळें भक्षण ॥ नित्य उपवासी निर्वाण ॥ तो लक्ष्मण महाराज ॥ २२ ॥ पुढील जाणोनि भविष्यार्थ ॥ फळें नेदी रघुनाथ ॥ याचि प्रकारें दिवस बहुत ॥ उपवास झाले तयासी ॥ २३ ॥ पर्णकुटीचा द्वारपाळ ॥ सर्वकाळ सुमित्राबाळ ॥ तो विष्णुशयन फणिपाळ ॥ सेवा प्रबळ करीतसे ॥ २४ ॥ रात्रीमाजी लक्ष्मण ॥ हातीं घेऊनि धनुष्य बाण ॥ राक्षस येतील म्हणून ॥ सावधान सर्वदा ॥ २५ ॥ निद्रा आणि आहार ॥ कधीं न स्पर्शे सौमित्र ॥ भक्तराज परम पवित्र ॥ जैसा निर्मळ मित्र सदा ॥ २६ ॥ पंचवटीसी राहिला रघुनाथ ॥ चहूंकडे प्रकटली मात ॥ तों वनभिल्लस्त्रिया मिळोनि बहुत ॥ म्हणती राघव पाहूं चला ॥ २७ ॥ अयोध्याधीश रघुपती ॥ बहुत ऐकतों त्याची कीर्ती ॥ एक-वचन एकपत्नीव्रती ॥ चला निश्चिती पाहूं तो ॥ २८ ॥ निरंजनीं राहिला रघुनाथ ॥ तो डोळेभरी पाहूं यथार्थ ॥ अरिदर्पहरण सीता-कांत ॥ पाहूं चला एकदां ॥ २९ ॥ जो निर्विकार परब्रह्म ॥ तो सगुण सुवेष श्रीराम ॥ ज्याचें श्रुती नेणती वर्म ॥ तो पूर्णकाम पाहूं चला ॥ २३० ॥ म्हणती परब्रह्म सांवळें ॥ भेटीसी न्यावीं अमृतफळें ॥ पूर्वपुण्य असेल आगळें ॥ ते गुण गाती रामाचे ॥ ३१ ॥ अपार मिळोनि भिल्लिणी ॥ उत्तम फळें वेंचिती वनीं ॥ नाचत नाचत कामिनी ॥ गुण गाती श्रीरामाचे ॥ ३२ ॥ ज्याचें नाम घेतां निर्मळ ॥ शीतळ जाहला जाश्वनीळ ॥ चरणरजें तत्काळ ॥ गौतमललना तारिली ॥ ३३ ॥ एक जानकी वेगळी करून ॥ सकळ स्त्रिया कौसल्ये-समान ॥ जो दशकंठदर्पहरण ॥ मखरक्षण मखभोक्ता ॥ ३४ ॥ अहो पूर्वकर्म निर्मळ ॥ पहावया परब्रह्म उतावेळ ॥ हेंचि उत्तम साचें फळ ॥ पंचवटीसी आलिया ॥ ३५ ॥ पंचभूतात्मक पंचवटी ॥ नरदेहासी आल्या गोरटी ॥ श्रीराम देखतां दृष्टीं ॥ घालिती सृष्टीं लोटांगण ॥ ३६ ॥ पूर्वफळें आणिलीं होतीं ॥ समस्त अर्पिलीं रघुपतीप्रती ॥ देखोनि तयांची भक्ती ॥ फळें भक्षीत सीताराम ॥ ३७ ॥ नित्यकाळ भिल्लिणी ॥ रामासी फळें देती आणोनी ॥ येथें कितीएक जनीं ॥ विपरीत वाणी बोलिजे ॥ ३८ ॥ म्हणती उच्छिष्ट फळें भक्षिलीं ॥ हे सर्वथा असत्य बोली ॥ तीं उत्तम फळें पाहोनि रक्षिलीं ॥ श्रीरामभेटीकारणें ॥ ३९ ॥ मूळ न पाहतां यथार्थ ॥ भलतेंचि करी जो स्थापित ॥ त्यासी बंधन यथार्थ ॥ चंद्रार्कवरी चुकेना ॥ २४० ॥ असो श्रीरामविजय ग्रंथ ॥ हाचि अमृतवृक्ष यथार्थ ॥ येथींचीं फळें रघुनाथभक्त ॥ सदा भक्षिती प्रीतीनें ॥ ४१ ॥ ब्रह्मानंदा जगदुद्धारा ॥ पंचवटीवासिया श्रीधरवरा ॥ आदिपुरुषा निर्विकारा ॥ अचळ अभंगा अक्षया ॥ ४२ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ त्रयोदशाध्याय गोड हा ॥ २४३ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ श्रीरस्तु ॥ इति त्रयोदशाध्याय समाप्त ॥


१४
गोलिवडेकर

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीरामकथा ऐकतां सादर ॥ सुख उपजे अपार ॥ शशांक देखोनि सागर ॥ पूर्ण जैसा उचंबळे ॥ १ ॥ सद्गुरु वर्षतां कृपाघन ॥ शिष्यसरितेसी ये स्वानंदजीवन ॥ कीं उगवतां सूर्यनारायण ॥ अरविंदें विकासतीं ॥ २ ॥ कीं दुर्बळासी सांपडे धन ॥ कीं वणव्यांत जळतां वर्षे घन ॥ कीं वसंतकाळ देखोन ॥ द्रुम जैसे फुलती पैं ॥ ३ ॥ ऐसी कथा ऐकतां उपजे सुख ॥ जे कथेसी भुलला कैलासनायक ॥ पार्वतीसह प्रेमें देख ॥ रामकथा हृदयीं धरिली ॥ ४ ॥ जे मोक्षतरूचें बीज देखा ॥ जे भवनदीमाजी तारक नौका ॥ जे अज्ञानतिमिरदीपिका ॥ वाल्मीकें हे पाजळली ॥ ५ ॥ कीं अविद्याकाननवैश्वानर ॥ कीं ऐश्वर्यपीठींची देवी सुंदर ॥ कीं मनोरथकल्पलता साचार ॥ कीं आनंदजळसरिता हे ॥ ६ ॥ कीं पुण्यवैराग्याची खाणी ॥ कीं धर्मार्थकाममोक्षांची जननी ॥ कीं पापतापभंजनी ॥ मंदाकिनी प्रत्यक्ष हे ॥ ७ ॥ ऐसी कथा अत्यंत पावन ॥ श्रवण करोत पंडितजन ॥ तेरावे अध्यायीं कथन ॥ आला रघुनंदन पंचवटीये ॥ ८ ॥ जो द्विपंचमुखदर्पहरण ॥ जो कमळिणीमित्रकुलभूषण ॥ मेदिनीगर्भरत्नजीवन ॥ पंचवटीये राहिला ॥ ९ ॥ जो भूधरावतार लक्ष्मण ॥ जो नरवीरांमाजी पंचानन ॥ सुरस फळें नित्य नूतन ॥ काननींहून आणीत ॥ १० ॥ ऐसें असतां कोणे एके काळीं ॥ लक्ष्मण विलोकितां वनस्थळी ॥ तों देखिली वंशजाळी ॥ सरळ गगनचुंबित ॥ ११ ॥ ते वंशजाळीभीतरीं ॥ दशकंठाचा भाचा शंबरी ॥ विषकंठाचें आराधन करी ॥ काळखड्गप्राप्तीतें ॥ १२ ॥ साठीसहस्रवर्षेपर्यंत ॥ तप दारुण करितां तेथ ॥ वंशजाळींत असे गुप्त ॥ बाहेर न दिसे कोणातें ॥ १३ ॥ माध्यान्हीं आला आदित्य ॥ तों काळखड्ग अकस्मात ॥ गगनपंथें उतरत ॥ सुमित्रासुतें देखिलें ॥ १४ ॥ तंव ते मनीं भावी शस्त्रदेवता ॥ मी नवजाय शंबरीच्या हाता ॥ शरण जाईन सुमित्रासुता ॥ हरीन जीविता शंबरीच्या ॥ १५ ॥ सभाग्यापुढें चिंतामणी ॥ पडे अकस्मात येऊनी ॥ तैसें काळशस्त्र ते क्षणीं ॥ सौमित्राजवळी पातलें ॥ १६ ॥ सौमित्रें हातीं घेतलें शस्त्र ॥ म्हणे कृपाळु तो त्रिनेत्र ॥ ऐसें बोलोनि अजंराजपौत्र ॥ परमानंदें तोषला ॥ १७ ॥ मग तो ऊर्मिलाप्राणाधार ॥ वस्त्रें पुशीत काळशस्त्र ॥ म्हणे याचा प्रताप दिसे अपार ॥ पाहूं धार कैसी ते ॥ १८ ॥ जेणें पुष्पप्राय धरिली धरणी ॥ तेणें निजबळें शस्त्र उचलोनी ॥ शंबरीसहित जाळी ते क्षणीं ॥ दुखंड केली तत्काळ ॥ १९ ॥ शोणिताचा चालिला पूर ॥ साशंकित पाहे ऊर्मिलावर ॥ म्हणे कवण होता येथें विप्र ॥ नेणोनि साचार वधिला म्यां ॥ २० ॥ चिंतातुर राघवानुज ॥ तपस्वी वधिला नेणोनि सहज ॥ आतां कोपेल रघुराज ॥ मुखांबुजें कोमाईलें ॥ २१ ॥ असो याउपरी परतला ॥ जानकी मार्ग लक्षी वेळोवेळां ॥ म्हणे माध्यान्हकाळ टळला ॥ सौमित्रें लाविला उशीर कां ॥ २२ ॥ ऐसें विलोकी क्षणक्षणां ॥ तों येतां देखिलें लक्ष्मणा ॥ शस्त्र देखोनि मृगनयना ॥ अहल्योद्धारणाप्रति बोले ॥ २३ ॥ म्हणे स्वामी आजि लक्ष्मण ॥ येत मंद मंद म्लानवदन ॥ तंव तो सर्वसाक्षी पूर्ण चैतन्यघन ॥ अंतरखुण जाणतसे ॥ २४ ॥ तंव तो पावला महावीर ॥ रघुपतीपुढें ठेविलें शस्त्र ॥ जोडोनियां दोन्ही कर ॥ समाचार सांगी-

१ कमळें. २ झाडें. ३ अज्ञानरूपी अरण्याला जाळणारा अग्नि. ४ पुण्यरत्नांची-हिऱ्यांची (खाण). ५ आकाशगंगा, स्वर्गंगा. ६ सूर्यकुलभूषण. ७ सीतेचा प्राण (राम). ८ वेळूचें बेट. ९ शिकायें. १० लक्ष्मण. ११ ऊर्मिलेचा पति लक्ष्मण. १२ रक्ताचा. १३ मुखकमल. १४ कोमेजलें.

तला ॥ २५ ॥ म्हणे अयोध्याधीशा समर्था ॥ आकस्मात खड्ग आलें हाता ॥ वंशजाळी हाणोनि पाहतां ॥ तपस्वी घात पावला ॥ २६ ॥ मग सुहास्यवदन जैनकजामात[15] ॥ म्हणे द्विज नव्हे तो राक्षस यथार्थ ॥ शूर्पणखेचा तो सुत ॥ भाचा जाण रावणाचा ॥ २७ ॥ तो बहुत दिवस तप करीत होता ॥ काळखड्ग यावें हाता ॥ मग इंद्रादिदेवां समस्तां ॥ अजिंक्य व्हावें समरांत[16] ॥ २८ ॥ दुजयाचा चिंतिती घात ॥ त्यांसी निर्दाळी उमाकांत ॥ ज्याची क्रिया त्यास बाधित ॥ अति अनर्थसूचक जे ॥ २९ ॥ जैसें खणूं जातां वारुळ ॥ महासर्पें डंखिलें तत्काळ ॥ कीं हातीं धरितां तप्तलोहगोळ ॥ भस्म होय तेधवां ॥ ३० ॥ जैसा शुष्ककाष्ठछिद्रीं चरण ॥ बळेंचि घालिजे नेऊन ॥ वरी खीळ बैसविली ठोकून ॥ मग करितां रुदन न निघेचि ॥ ३१ ॥ जे जे आपण क्रिया करावी ॥ ते ते सवेंचि लागे भोगावी ॥ परी सौमित्रा आतां सीता रक्षावी ॥ न विसंबावी क्षण एक ॥ ३२ ॥ आतां येथून मैंदाद्वंद्व[17] ॥ मांडेल असावें सावध ॥ राक्षसी मायावा[18] नानाविध ॥ ब्रह्मादिकां न कळती ॥ ३३ ॥ हें एक बरवें जाहलें ॥ जें काळखड्ग हातासी आलें ॥ ऐसें ऐकतां ते वेळे ॥ मन तोषलें सौमित्राचें ॥ ३४ ॥ तंव ते रावणाची भगिनी ॥ शूर्पणखा शंबरीची जननी ॥ रात्रीं दुष्ट स्वप्न देखोनी ॥ सावध जाहली तत्काळ ॥ ३५ ॥ मग विचार करून मानसीं ॥ सवें घेतल्या चौघी राक्षसी ॥ सवेग चालिली वनासी ॥ निजपुत्रासी पहावया ॥ ३६ ॥ लंकेबाहेर जों आली ॥ तों दिनकरें प्रभा केली ॥ मार्ग चालतां वेळोवेळीं ॥ वंशजाळी विलोकित ॥ ३७ ॥ तंव ते न दिसेचि पाहतां ॥ देखे गृध्र मंडेळ[19] घालितां ॥ धापा दाटली धांवतां ॥ स्थैळबीभत्सता[20] देखोनि ॥ ३८ ॥ जवळीं येऊनियां पाहे ॥ तों पुत्रासहित जाळी घायें ॥ द्विखंड होवोनि पडिली आहे ॥ रुधिर वाहे भडभडां ॥ ३९ ॥ मग धाय मोकेलोनि[21] केशी ॥ गडबडां लोळे भूमीसी ॥ जळावेगळी मासोळी जैशी ॥ चडफडी तैशी अतिशोकें ॥ ४० ॥ मग उठवोनि सखियांनीं ॥ बैसविली सावध करुनी ॥ म्हणती पुढील कार्य मनासी आणीं ॥ कोणें वनीं सुत वधियेला ॥ ४१ ॥ मग ते राक्षसी उठोन ॥ भोंवतें पाहे विलोकून ॥ तों मानवी पदमुद्रा देखोन ॥ विस्मय करी मानसीं ॥ ४२ ॥ शंबरीसहित जाळी ॥ एके घायें खंड केली ॥ तरी काय राक्षसांची सीमा जाहली ॥ आयुष्याची येथोनियां ॥ ४३ ॥ असो दहन करून शंबरीसी ॥ वन शोधिती तेव्हां राक्षसी ॥ तों दुरोनि देखिलें सौमित्रासी ॥ जैसा तेजस्वी चंडांशु[22] ॥ ४४ ॥ शूर्पणखा म्हणे हाचि काळ ॥ येणेंचि ग्रासिला माझा बाळ ॥ मग कापट्यवेष तत्काळ ॥ धरित्या जाहल्या राक्षसी ॥ ४५ ॥ रंभेहून सुंदर देखा ॥ स्वरूपें नटली शूर्पणखा ॥ सवें चौघीजणी सरळ्या ॥ भुले देखतां अनंगें[23] ॥ ४६ ॥ चौघीजणी दोहींकडे ॥ मध्यें शूर्पणखा दिव्य रूपडें ॥ जिच्या स्वरूपाचा प्रकाश पडे ॥ काननामाजी हिंडतां ॥ ४७ ॥ चौघींच्या स्कंधांवरी[24] हात ॥ पादुका पायीं रत्नखचित ॥ हावभाव कटाक्ष दावित ॥ गायन करीत मधुरस्वरें ॥ ४८ ॥ आल्हादकारक चंद्रवदन ॥ वदनीं बोलतां झळकेकैती[25] दशन ॥ चाले गजगती मोडोनि नयन ॥ ऊर्मिलाजीवन[26] देखोनियां ॥ ४९ ॥ हळूच सख्यांसी

१५ रामचंद्र. १६ युद्धांत. १७ मोठें युद्ध. १८ माया. १९ गिधाड. २० घिरट्या. २१ त्या आगेची घाईट स्थिति. २२ रडण्याची मोठी ओरड करून. २३ सूर्य. २४ मदन. २५ खांद्यांवर. २६ चकाकतात. २७ ऊर्मिलेचा पति लक्ष्मण.

बोलत ॥ येणेंचि वधिला गे माझा सुत ॥ तरी यासी सगळेंचि मुखांत ॥ घालोनि गिळीन निर्धारें ॥ ५० ॥ तों सौमित्र करीत रामस्मरण ॥ काननामाजी करी भ्रमण ॥ जैसे कमळावरी भ्रमर जाण ॥ ठायीं ठायीं रुणझुणती ॥ ५१ ॥ तों शूर्पणखा ते वेळीं ॥ सवेग पातली सौमित्रा-जवळी ॥ कामचेष्टा करी वेळोवेळीं ॥ वचनमाधुर्य बोलोनियां ॥ ५२ ॥ म्हणे वो अवधारा सुंदरा ॥ बहुत हिंडल्यें वसुंधरा ॥ परी न मज-योग्य मिळे नोवरा ॥ कुशळ चतुर प्रतापी ॥ ५३ ॥ तरी आजि माझें धन्य भाग्य ॥ पावल्यें स्वामीचें अर्धांग ॥ आजि तप फळलें सांग ॥ आली सवेग पुढेंचि ॥ ५४ ॥ घेऊनियां नवरत्नमाळा ॥ घालावया आली गळां ॥ तंव तो महाराज सत्वांगळा[28] ॥ जो अवतरला भोगींद्र ॥ ५५ ॥ गुणसिंधु जानकीजीवन ॥ त्याची कृपा जयावरी पूर्ण ॥ विषयसंगें त्याचें मन ॥ काळत्रयीं मळेना ॥ ५६ ॥ जेणें प्राशिला सुधा[29]-रस ॥ त्यासी काय बाधेल महाविष ॥ जो सूर्यासन्निध करील वास ॥ तम केवीं त्यासी बाधील ॥ ५७ ॥ कामधेनु ज्याचे मंदिरीं ॥ तो कधींच नव्हे दरिद्री ॥ जो पैहुंडला[30] आनंदसमुद्रीं ॥ कर्मबंधीं न पडे तो ॥ ५८ ॥ कल्पवृक्ष अंगणीं देख ॥ तो कासया मागेल भीक ॥ ज्यासी भेटला वैकुंठनायक ॥ तो न पूजी भूतें प्रेतें ॥ ५९ ॥ उर्वशीसमान ज्याची ललना[31] ॥ तो कदाही प्रेत कवेळीना[32] ॥ नंदनवनींचा भ्रमर जाणा ॥ अर्कावेरी[33] न बैसे ॥ ६० ॥ जो भ्रमर मंचकावरी ॥ पहुडणार अहोरात्रीं ॥ तो निजेल खदिरांगारीं ॥ हें काळत्रयीं घडेना ॥ ६१ ॥ ज्याचे अंगीं मृगमदाची[34] उटी ॥ तो काकविष्ठा न पाहे दृष्टीं ॥ जो बैसला क्षीराब्धीच्या तटीं ॥ तो कां कांजी इच्छील ॥ ६२ ॥ असो ऐसा लक्ष्मण ॥ जो आहाररहित निर्वाण ॥ तो शूर्पणखेसी प्रतिवचन ॥ बोलता जाहला तेधवां ॥ ६३ ॥ म्हणे वो सुंदरी राहें ॥ आम्हां सीताराम वडील आहे ॥ पैल वसती पंचवटीये ॥ उमामहेश्वर ज्यापरी ॥ ६४ ॥ माय बाप गुरु बंधु ॥ रघुवीर माझा कृपासिंधु ॥ त्याचे आज्ञेविण हा संबंधु ॥ काळत्रयीं घडेना ॥ ६५ ॥ शेष सांडील भूभार ॥ पूर्वेस मावळेल दिनकर ॥ तरी रामआज्ञेविण साचार ॥ तुज न वरीं निर्धारें ॥ ६६ ॥ तों शूर्पणखा बोले वचन ॥ तरी मी आणित्यें रामाची खूण ॥ अवश्य म्हणे लक्ष्मण ॥ येरी तेथोन चालिली ॥ ६७ ॥ सांगातें सखिया चौघीजणी ॥ विचार सांगे त्यांलागुनि ॥ राम लक्ष्मण सीता तीन्ही ॥ रात्रीं गिळोनि जाऊं लंके ॥ ६८ ॥ आमुची कार्यसिद्धि येथून ॥ सरल्या हो जाहली परिपूर्ण ॥ मग ये वनींचे ब्राह्मण ॥ भक्षूं शोधोनि साक्षेपें ॥ ६९ ॥ ऐसें विचारोनि मानसीं ॥ वेगें आली पंचवटीसी ॥ देखोनियां सीतारामांसी ॥ साष्टांग नमन पैं केलें ॥ ७० ॥ आजि माझें भाग्य पूर्ण ॥ देखिले भावें स्वामिचरण ॥ बाई मी तुम्हांसी शरण ॥ जाऊ जाहल्यें तुमची मी ॥ ७१ ॥ मजवरी स्नेह करावा बहुत ॥ भावोजींस प्रार्थोनि त्वरित ॥ मजजवळी द्यावें लिखित ॥ प्राणनाथ वरावया ॥ ७२ ॥ चरण त्यांचे कोमळ चांगले ॥ वनीं हिंडताती एकले ॥ तळहातीन[35] करकमळें ॥ सुमनशेजे[36] घालोनि ॥ ७३ ॥ भावोजींचे आज्ञेविण पाहें ॥ मज ते वरीत नाहीं करूं काये ॥ अहा त्यांचा वियोग न साहे ॥ विरहें जाय प्राण हा ॥ ७४ ॥ डोळां आसुवें

२८ सत्त्वास न टळणारा, थोर सत्त्वशील. २९ अमृतरस. ३० निजला. ३१ बायको. ३२ आलिंगीत नाहीं. ३३ रुईवर. ३४ कस्तुरीची. ३५ चुरीन, रगडीन. ३६ पुष्पशय्येवर,

आणिलीं लवलाहीं ॥ पतीस माझा विश्वास नाहीं ॥ पुढें जन्म कंठणें एके ठायीं ॥ भावोजींस बाई सांगा जी ॥ ७५ ॥ मी केवळ पतिव्रता साचार ॥ कर्णकुमारी परमपवित्र ॥ मज एकही पुरुषाचा पदर ॥ बाई लागला नाहींच ॥ ७६ ॥ त्याविण मज पुरुष इतर ॥ बंधूसमान साचार ॥ मागुती उदकें भरोनि नेत्र ॥ म्हणे सत्वर पत्र द्या आतां ॥ ७७ ॥ सीतेसी सुख वाटलें फार ॥ म्हणे बरवा जाहला विचार ॥ मज जाऊ मिळाली सुंदर ॥ ईस सौमित्र वर साजे ॥ ७८ ॥ मग म्हणे जी रघुराया ॥ ईस खूण द्यावी लवलाह्या ॥ स्वामी सौमित्रा योग्य जायाँ ॥ मिळाली जी निर्धारें ॥ ७९ ॥ मग तो सर्वात्मा रघुनायक ॥ चराचरचित्तपरीक्षक ॥ जो मायाचक्रचाळक ॥ कर्ता हर्ता पाळिता जो ॥ ८० ॥ तिच्या उफराट्या बाहुल्या नेत्रांत ॥ न्याहाळून पाहे जनकेजामात ॥ म्हणे हे निशाँचरी यथार्थ ॥ छळावया आली असे ॥ ८१ ॥ नेत्र-वक्त्रांचे तिचे विकार ॥ त्यांवरोनि समजलें अंतर ॥ सुमनौवरून सत्वर ॥ वृक्ष चतुर जाणती ॥ ८२ ॥ बोलावरोनि कळे चित्त ॥ आचरणावरून पूर्वार्जित ॥ क्रियेवरोनि वर्णाश्रम सत्य ॥ परीक्षक जाणती ॥ ८३ ॥ राहेणीवरून कळे परमार्थ ॥ शब्दावरूनि कळे पांडित्य ॥ प्रेमा-वरूनि भक्त ॥ परीक्षक जाणती ॥ ८४ ॥ दानावरूनि कळे उदार ॥ रणीं समजे प्रजा शूर ॥ लक्षणांवरूनि नृपवर ॥ जाणती चतुर परीक्षक ॥ ८५ ॥ वास येतां कळे काष्ठ ॥ स्वरावरोनि समजे कंठ ॥ कोंभावरून स्पष्ट ॥ भूमीचें मार्दव जाणिजे ॥ ८६ ॥ अंगणावरून समजे सदन ॥ भूतदयेवरून ब्रह्मज्ञान ॥ प्रभेवरूनि रत्न ॥ परीक्षक जाणती ॥ ८७ ॥ असो सर्वात्मा रघुवीर ॥ शूर्पणखेचें ओळखी अंतर ॥ आंत शठत्व मृदु शब्द बाहेर ॥ जाणे चतुर श्रीराम ॥ ८८ ॥ मुख शोभे जैसें कमळ ॥ शब्द चंदनाहून शीतळ ॥ परी अंतरीं धूर्त कुटिळ ॥ तमालनीळें ओळखिलें ॥ ८९ ॥ श्रीराम म्हणे ते अवसरीं ॥ लग्नपत्रिका लिहों दे पाठीवरी ॥ ऐकतां भयभीत निशाचरी ॥ विश्वास अंतरीं उपजेना ॥ ९० ॥ सीतेस म्हणे बाई एकदां ॥ भावोजींसमोर बोलतां ॥ मज लाज वाटे तत्त्वतां ॥ तुम्हीच प्रार्था तयांसी ॥ ९१ ॥ भावोजी चतुर आणि तरुण ॥ मी लज्जावेष्टित कामिन ॥ त्यांपुढें बैसतां जाण ॥ जाईल प्राण वाटतसे ॥ ९२ ॥ मग बोले रघुनंदन ॥ पृष्ठीवरी लिहि-ल्याविण ॥ आणिक आम्हांपाशीं खूण ॥ दुजी नाहीं सर्वथा ॥ ९३ ॥ मग शूर्पणखा बोले वचन ॥ तरी पृष्ठीवरी लिहावी खूण ॥ अवश्य म्हणे रघुनंदन ॥ केलें लेखन पृष्ठीवरी ॥ ९४ ॥ श्रीराम म्हणे जाईं सत्वर ॥ उशीर न लावीच सौमित्र ॥ ऐसें बोलतां शतेपत्रनेत्र ॥ पवनवेगें चालिली ॥ ९५ ॥ मग लक्ष्मणाजवळी येऊन ॥ सांगे परम हर्षेंकरून ॥ भावोजींनीं मज देवोनि मान ॥ मुखेवचनें सांगितलें ॥ ९६ ॥ अवश्य वरावें तुम्हांसी ॥ ऐसें सांगितलें मजपाशीं ॥ गांधर्व लग्न निश्चयेंसीं ॥ तत्काळचि लावावें ॥ ९७ ॥ मग बोले लक्ष्मण ॥ न देखतां श्रीरामाची खूण ॥ तुज न वरींच मी पूर्ण ॥ सत्य वचन हें माझें ॥ ९८ ॥ येरी म्हणे ते समयीं ॥ माझा विश्वास तुम्हांसी नाहीं ॥ पुढें जन्म कंठणें एके ठायीं ॥ दुजें कांहीं नसेचि ॥ ९९ ॥ मी येथें लटिकें बोलोन ॥ भावोजींस काय दावूं वदन ॥ मी तयांलागीं भेटोन ॥

३७ सत्वर, लवकर. ३८ भार्या, पत्नी. ३९ रामचंद्र. ४० राक्षसी. ४१ फुलावरून. ४२ बागणुकीवरून. ४३ पेरलेल्या बीजाच्या अंकुरावरून. ४४ कमळनेत्र, श्रीराम. ४५ तोंडी निरोपाने.

आल्यें आतां तत्त्वतां ॥ १०० ॥ भावोजी जलदवर्ण सुंदर ॥ बाई चंपककळिका सुकुमार ॥ जवळ लिहावया नव्हतें पत्र ॥ सांगितलें तुम्हां वरावें ॥ १ ॥ तुम्हांसी श्रम जाहले थोर ॥ चरण तळहातीन सुकुमार ॥ कीं सौख्यशयनीं दोघें साचार ॥ निद्रा करूं क्षणभरी ॥ २ ॥ परी न मानीच लक्ष्मण ॥ शूर्पणखा बोले हांसोन ॥ म्यां तों आणिली आहे खूण ॥ तुमचें मन पाहिलें म्यां ॥ ३ ॥ येरी खूण दाखवी पाठीची ॥ तों आज्ञा ऐसी श्रीरामाची ॥ शूर्पणखा भगिनी दशमुखाची ॥ इच्या नासिककर्णांची शांति करीं ॥ ४ ॥ कर्ण आणि नासिक सकळ ॥ सपाट करीं न लावीं वेळ ॥ नवरी शृंगारूनि अमंगळ ॥ लंकेकडे पाठवावी ॥ ५ ॥ स्त्रीवध न करावा जाण ॥ यालागीं राखावा इचा प्राण ॥ ऐसें लक्ष्मणें वाचून ॥ म्हणे जाऊं चला एकांतीं ॥ ६ ॥ दूरी केल्या चौघीजणी ॥ धरिली शूर्पणखेची वेणी ॥ सौमित्रें पाडिली धरणीं ॥ पापखाणी ते निशाचरी ॥ ७ ॥ मग म्हणे प्राणनाथा ॥ मी सिद्ध आहें या कार्यार्था ॥ झोंबोनि कासया पाडितां ॥ नवल मज वाटतसे ॥ ८ ॥ लक्ष्मणें न लागतां क्षणमात्र ॥ छेदिलें नासिक आणि श्रोत्र ॥ तों ते आक्रंदली अपवित्र ॥ विशाळ शरीर धरियेलें ॥ ९ ॥ अत्यंत विशाळ भयंकर ॥ कपाळीं चर्चिला शेंदूर ॥ नासिकापासोनि पूर ॥ अशुद्धाचा भडकतसे ॥ ११० ॥ चौघीजणी समवेत ॥ पळती वाटेसी शंख करीत ॥ म्हणे धांवा धांवा रे समस्त ॥ राक्षस हो शीघ्रकाळें ॥ ११ ॥ पळतां पाहे मागें पुढें ॥ तों सौमित्रचि दृष्टीं पडे ॥ भोंवता दिसे चहूंकडे ॥ कोणीकडे जाऊं म्हणे ॥ १२ ॥ अडखळोनि भूमीवरी पडती ॥ मुखीं नासिकीं भरे माती ॥ पद्मपुराजवळी येती ॥ शंख करिती पांचजणी ॥ १३ ॥ आक्रोश ऐकतां थोर ॥ त्रिशिरा आणि दूषण खर ॥ सिद्ध करोनि चतुरंग दळभार ॥ आले सत्वर बाहेरी ॥ १४ ॥ असुर पायींच नेटके ॥ पुढें चमकताती कौतुकें ॥ हातीं असिलिंता[46] करी खेटकें[47] ॥ कटीं झळके यमदंष्ट्री[48] ॥ १५ ॥ तों चालिले चतुरंग[49] भारें ॥ जैसीं चित्रें लिहिलीं चित्रकारें ॥ तयांहून अति साजिरे ॥ सर्वालंकारें डवरिलें[50] ॥ १६ ॥ वीर भयंकर रणरगडे ॥ जैसे काळाचे संवगडे ॥ एक धांवती एकापुढें ॥ सिंहनादें गर्जती ॥ १७ ॥ निघाले गजभार उन्मत्त ॥ कीं ते ऐरावतीचे सुत ॥ श्वेतवर्ण आणि चौदंत ॥ किंकाटंत[51] धांवती ॥ १८ ॥ जिंहीं युद्ध करोनि समरंगणीं ॥ सुरांचे मुकुट पाडिले धरणीं ॥ ते गजस्कंधावरी बैसोनी ॥ शस्त्रें तुळिती[52] आनंदें ॥ १९ ॥ त्यांमागें रथांचे भार ॥ वरी शस्त्रसामग्री अपार ॥ चौदा सहस्र महावीर ॥ एकवटले ते काळीं ॥ १२० ॥ त्रिशिरा आणि खर दूषण ॥ दळभारीं मुख्य तिघेजण ॥ तों शूर्पणखा पुढें येऊन ॥ शंख करीत उभी ठाके ॥ २१ ॥ जैसा शेंदुरें माखिला पर्वत ॥ तैसी रक्तें चर्चिली आरक्त ॥ म्हणे राक्षस आटिले समस्त ॥ आला रघुनाथ पंचवटिये ॥ २२ ॥ नवमेघरंग रघुवीर ॥ सौमित्र गौरवर्ण सुकुमार ॥ सीतेचें स्वरूप पहातां पंचेशर[53] ॥ ओंवाळूनि टाकिजे ॥ २३ ॥ तरी बहुत अरुवार[54] लक्ष्मण ॥ त्याचे नरडीचा घोट घेईन ॥ तुम्ही सांगातें या अवघे-

४६ सुरीन. ४७ रक्ताचा. ४८ तलवारी. ४९ ढाली. ५० कमरेला. ५१ यमाच्या दाढा. ५२ हत्ती, घोडे, रथ व पायदळ हीं चार अंगें. ५३ शोभविले. ५४ ओरडत. ५५ तोलतात. ५६ मदन. ५७ उद्भट.

जण रक्तपान करवा मज ॥ २४ ॥ जेणें माझें नासिक छेदिलें ॥ त्यासी मी गिळीन सगळें ॥ त्रिशिरा खर दूषण हांसले ॥ बीभत्स रूप देखोनि ॥ २५ ॥ म्हणती मानव तो रघुनंदन ॥ आम्हीं त्यावरी जावें हें नीचपण ॥ मग राक्षस चौदाजण ॥ निवडोनियां काढिले ॥ २६ ॥ ते शूर्पणखेसंगें देऊन ॥ म्हणती मारून रामलक्ष्मण ॥ ईस करवा रक्तपान ॥ समाधान होय तों ॥ २७ ॥ मग शूर्पणखा आणि राक्षस ॥ वेगें जाती पंचवटीस ॥ म्हणती घरूनि रामसौमित्रांस ॥ जितचि न्यावे खरापाशीं ॥ २८ ॥ एक म्हणती येथेंचि मारून ॥ आम्ही करूं मांसभक्षण ॥ आधीं करवावें रक्तपान ॥ शूर्पणखेसी साक्षेपें ॥ २९ ॥ जैसी मृगेंद्राची निंदा देख ॥ मागें करिती जंबुक ॥ अँळिका म्हणे खेंगनायक ॥ धरून आणूं क्षणार्धें ॥ १३० ॥ तृंणपुतळे मिळोनि बहुत ॥ वडवानळासी धरूं म्हणत ॥ कीं हृदयीं भाविती खद्योत ॥ आसडून आदित्य पाडूं खालीं ॥ ३१ ॥ शैलभ म्हणती मिळोनी ॥ कल्पांतविजू घालूं वदनीं ॥ तैसे राक्षस आले धांवोनी ॥ पंचवटीस तेधवां ॥ ३२ ॥ रघुपतीस जाणवी लक्ष्मण ॥ राक्षस आले चौदाजण ॥ ऐसें ऐकतां रविकुलभूषण ॥ वाँहात गुंण धनुष्यातें ॥ ३३ ॥ पर्वतदरीमधून ॥ अकस्मात निघे पंचानन ॥ तैसा कौशिकमखरक्षण गुंफेबाहेर पातला ॥ ३४ ॥ राम नरवीरपंचानन ॥ चतुर्दश गज लक्षिले दुरून ॥ कीं शार्दूलें लक्षिले हरिण ॥ रघुनंदन पाहे तैसा ॥ ३५ ॥ तों हांक देती निशाचर ॥ भोंवते तळपती भयंकर ॥ दारुण शस्त्रें अनिवार ॥ सोडिते जाहले तेधवां ॥ ३६ ॥ जैसें मूर्खाचें वाग्जाळ बहुत ॥ एकेचि शब्दें वारी पंडित ॥ तैशीं अरिशस्त्रें वारोनि समस्त ॥ केलें अद्भुत श्रीरामें ॥ ३७ ॥ ओढी ओढोनि आकर्ण ॥ सोडिला सूर्यमुख बाण ॥ चौदाजणांचीं शिरें छेदून ॥ उर्वीवरी पाडिलीं ॥ ३८ ॥ मृगेंद्रें विदारिजे वारण ॥ तैसे पाडिले चौदाजण ॥ कीं अँरुणानुजें दारुण ॥ भुजंग जैसे तोडिले ॥ ३९ ॥ राम राक्षसांतक प्रळयाम ॥ यासी चतुर्दश असुरांचें अवदान ॥ शूर्पणखेनें समर्पिलें आणून ॥ माघारी परतोनि पळतसे ॥ १४० ॥ सौमित्रें काढिला एक शर ॥ शूर्पणखेचें छेदावया शिर ॥ तंव ती म्हणे हा दावेदार ॥ अद्यापिही सोडीना ॥ ४१ ॥ श्रीराम म्हणे सुमित्रासुता ॥ इसी न वधावें तुवां आतां ॥ हे सांगोनि राक्षसां समस्तां ॥ आणील येथें वधावया ॥ ४२ ॥ असो निर्नासिका शंख करीत ॥ खरदूषणां येवोनि सांगत ॥ राक्षस मारिले समस्त ॥ तुम्हीं त्वरित चलावें ॥ ४३ ॥ ऐसें शूर्पणखा सांगोनि सरे ॥ तों रणतुरें वाजती गजरें ॥ भार निघाला बहु त्वरें ॥ पवनवेगेंकरोनियां ॥ ४४ ॥ खर तो केवळ खेंरमुख ॥ दूषणाचें पांढरें नाक ॥ शुभ्रकुष्ठ निःशंक ॥ दूषण नाम त्याकरितां ॥ ४५ ॥ त्रिशिराचीं शिरें तीन ॥ तीं व्हावया काय कारण ॥ त्याचे मातेनें वार्णे विस्तारून ॥ तिन्ही एकास दिधलीं ॥ ४६ ॥ त्याजकरितां तीन शिरें ॥ त्रिशिरास जाहलीं निर्धारें ॥ असो भार धांवती गजरें ॥ पंचवटीयेसमीप ॥ ४७ ॥ दूषणाचे पुत्र तिघेजण ॥ कपाली प्रमाथी स्थूललोचन ॥ वाटेसी जाहले अपशकुन ॥ विघ्नसूचक तेधवां ॥ ४८ ॥ सुटला अद्भुत प्रँभंजन ॥ सर्वांचे धुळीनें भरले नयन ॥

---

५८ कीड. ५९ गरुड. ६० गवताचे केलेले पुरुष. ६१ काजवे. ६२ पतंग. ६३ चढवी. ६४ दोरी. ६५ सिंह. ६६ श्रीराम. ६७ गाढवासारखें ज्याचें तोंड आहे असा. ६८ वारा.

रथध्वज पडला उन्मळून ॥ अपशकुन तोचि पैं ॥ ४९ ॥ रामें भार देखिला दूरी ॥ गगन गर्जे रणतुरीं ॥ नाद भरला दिशांतरीं ॥ कांपे धरित्री थरथरां ॥ १५० ॥ सौमित्रासी म्हणे रघुनंदन ॥ तूं आतां सीतेसी करीं जतन ॥ आज युद्ध करोनि निर्वाण ॥ वधीन दारुण राक्षसां ॥ ५१ ॥ तरी या पर्वतमस्तकीं जाण ॥ उभा राहें सीतेसहित एक क्षण ॥ आज्ञा वंदोनि लक्ष्मण ॥ चढे घेवोन जानकीतें ॥ ५२ ॥ पर्वतशिखरीं जनकनंदिनी ॥ जैसी मूळपीठीं आदिभवानी ॥ जवळी परशुराम कर जोडुनी ॥ सौमित्र ते क्षणीं तेवीं दिसे ॥ ५३ ॥ असो येरीकडे रघुनंदन ॥ धनुष्यासी चढवोनि गुण ॥ कानाडी ओढितां आकर्ण ॥ झणत्कारिती किंकिणी ॥ ५४ ॥ तों येरीकडे राक्षस ॥ सिंहनाद करिती कर्कश ॥ भोंवता वेढिला अयोध्याधीश ॥ पुराणपुरुष जगदात्मा ॥ ५५ ॥ राक्षसभारांत कडकडाट ॥ वाद्यांचा होत दणदणाट ॥ तेणें मंगळजननीचें पोट ॥ उलों पाहे ते काळीं ॥ ५६ ॥ अपार उठावले भार ॥ रणकर्कश भयंकर ॥ जैसा वृषभांनीं कोंडिला मृगेंद्र ॥ कीं द्विजेंद्रें उरगांनीं ॥ ५७ ॥ कीं देखोनि दीपिकेचा रंग ॥ झेंपावती बहुत पतंग ॥ कीं वासुकी महाभुजंग ॥ मूषकीं जैसा वेष्टिला ॥ ५८ ॥ श्रीराम रणरंगधीर ॥ कैसा लक्षीत शत्रुभार ॥ कैलशोद्भवें लक्षिला सागर ॥ सूर्यें अंधकार जैसा कीं ॥ ५९ ॥ कीं व्याघ्रें लक्षिले अजांचे कळप ॥ कीं कुठारपाणि विलोकी पोंदप ॥ कीं सुपर्णें लक्षिले सर्प ॥ अयोध्याधिप तेवीं पाहे ॥ १६० ॥ तों असुरीं ओढोनि ओढी ॥ सोडिल्या बाणांच्या कोडी ॥ कीं बैसलीसे सातवांकडी ॥ सायकांची ते वेळीं ॥ ६१ ॥ सिंहनाद करिती वेळोवेळां ॥ लोटला वांहिनीचा मेळा ॥ जैसा सागर खळबळिला ॥ प्रलयीं लोटला भूमीवरी ॥ ६२ ॥ जैशा जलदकलोळीं ॥ चपळा झळकती नभमंडळीं ॥ तैशा तळपती ते वेळीं ॥ असिलता सतेज ॥ ६३ ॥ शस्त्रास्त्रांचे संभार ॥ रघुपतीवरी येती अपार ॥ राक्षस म्हणती कैंचा रघुवीर ॥ खंडविखंड जाहला पैं ॥ ६४ ॥ एक म्हणती रक्तपान ॥ शूर्पणखा करील कोठून ॥ तिच्या तोंडीं मृत्तिका पूर्ण ॥ पडली ऐसें वाटतसे ॥ ६५ ॥ इतुका होत शस्त्रमार ॥ परी रणरंगधीर रघुवीर ॥ ठाण न चळेचि निर्धार ॥ ऐका चतुर हो दृष्टांत ॥ ६६ ॥ हाणतां कुठारप्रहार ॥ वैसंका न सांडी तरुवर ॥ कीं पर्जन्य वर्षतां अपार ॥ अचळ न चळे सर्वथा ॥ ६७ ॥ कीं निंदक निंदिती अपार ॥ न चळे साधूचें अंतर ॥ कीं प्रल्हादासी लावितां विखार ॥ परी साचार डळमळिना ॥ ६८ ॥ जयासी लाधलें अंतरसुख ॥ मग तो न मानी प्रपंचदुःख ॥ अयोध्याप्रभु तैसा देख ॥ ठाण सुरेख चळेना ॥ ६९ ॥ असो यापरी जानकीरंग ॥ ठाण मांडीत अभंग ॥ बाण सोडीत सवेग ॥ जैसे उरगपक्षांचे ॥ १७० ॥ आवेशें धांवती बाण ॥ जैसे सफळ तरुवर देखोन ॥ विहंगमांचे पोळे उडोन ॥ अकस्मात जेवीं येती ॥ ७१ ॥ जैसे कृषीवल एकसरें ॥ कणसें छेदिती अपारें ॥ तैशीं राक्षसांचीं शिरें ॥ अपार तेथें पाडिलीं ॥ ७२ ॥ वरी कोणी करितां हस्त ॥ ते भुजा तोडी शस्त्रासहित ॥

६९ उपटून. ७० घागऱ्या. ७१ भूमीचें. ७२ उघडों, फुटों. ७३ पक्षिश्रेष्ठ, गरुड. ७४ सर्पांनीं. ७५ अगस्तीनें. ७६ बोकडांचे. ७७ कुऱ्हाडवाला. ७८ वृक्ष. ७९ (बाणांचा) सात दिवस सतत वर्षाव. ८० सैन्याचा. ८१ मेघांच्या गडगडाटांत. ८२ विजा. ८३ तलवारी. ८४ आपली जागा. ८५ पर्वत. ८६ विष. ८७ झुंडींच्या झुंडी. ८८ शेतकरी.

लक्षानुलक्ष शर सुटत ॥ चापापासून ते वेळीं ॥ ७३ ॥ श्रीरामाचा तूणीर[८९] ॥ अक्षय भरलासे साचार ॥ कुंडामाजी वैश्वानर ॥ प्रदीप्त जैसा झांकिला ॥ ७४ ॥ कीं वासुकीचे मुखीं हाळाहळ ॥ कीं सरितापतीमाजी[९०] वडवानळ ॥ कीं मेघीं विद्युल्लता तेजाळ ॥ तूणीरांत शर त्यापरी ॥ ७५ ॥ कपटी राक्षस चवदाजण ॥ रामावरी आले सरसावून ॥ अमीस विझवावया रंभानंदनें[९१] ॥ आवेशेंकरून लोटला ॥ ७६ ॥ कीं वारणविदारणापुढें[९२] ॥ मार्जार दावूं आलें पवाडे ॥ कीं बृहस्पतीपुढें मूढें ॥ वाद करूं धांविन्नलीं ॥ ७७ ॥ कीं रासभांनीं ब्रीदें बांधोन ॥ गंधर्वसभेसी मांडिलें गायन ॥ तैसे राक्षस चौदाजण ॥ रामावरी लोटले ॥ ७८ ॥ क्षण न लागतां रणरंगधीरें ॥ छेदिलीं चवदाजणांचीं शिरें ॥ जैशीं कां तीक्ष्ण शस्त्रें ॥ अरविंदें[९३] वीर छेदिती ॥ ७९ ॥ ऐसें देखतां वीर दूषण ॥ पुढें धांविन्नला वर्षत बाण ॥ जैसा कां वर्षत घन ॥ युद्धीं निपुण राक्षस ॥ १८० ॥ दूषणाचें बाणजाळ थोर ॥ रामें निवारिलें साचार ॥ जैसा उगवतां दिनकर ॥ उडुगणें सर्व लोपती ॥ ८१ ॥ कीं अनुताप होतां अपार ॥ होय पापाचा संहार ॥ कीं वेदांतज्ञानें संसार- ॥ दुःख जैसें वितुळे पैं ॥ ८२ ॥ तैसे दूषणाचे शर तोडून ॥ अश्वांसहित तोडिला स्यंदनें[९४] ॥ मग राक्षस गदा घेऊन ॥ चरणचालीं धांविन्नला ॥ ८३ ॥ मग तो रावणदर्पहरणें[९५] ॥ वेगें सोडी अर्धचंद्रबाण ॥ गदा हातींची छेदून ॥ एकीकडे पाडिली ॥ ८४ ॥ मग परिघ वीरभद्रदत्त[९६] ॥ घेऊन दूषण धांवत ॥ देव जाहले चिंताक्रांत ॥ म्हणती अनर्थ मांडला ॥ ८५ ॥ या परिघाचें निवारण ॥ केवीं करील रघुनंदन ॥ श्रीरामें काढिला दिव्य बाण ॥ वायूचें खंडण करणार जो ॥ ८६ ॥ परिघासहित हात तेथें ॥ छेदून पाडिला रघुनाथें ॥ सवेंच एक बाण सीताकांतें ॥ चंडांशुमुख[९७] काढिला ॥ ८७ ॥ दूषणाचा कंठ लक्षून ॥ विषकंठवंद्यें[९८] सोडिला बाण ॥ शिर उडविलें न लगतां क्षण ॥ पडिला दूषण ते काळीं ॥ ८८ ॥ मग दूषणाचे तिघे सुत ॥ तिंहीं रण माजविलें बहुत ॥ पितयाचा सूड घेऊं यथार्थ ॥ ऐसा पुरुषार्थ धरियेला ॥ ८९ ॥ तिघेही करिती संधान ॥ राम नरवीरपंचानन ॥ बाणीं खिळिले तिघेजण ॥ परी ते आंगवेंण[९९] न सांडिती ॥ १९० ॥ बिळीं प्रवेशतां विखार[१] ॥ अर्धे दिसती बाहेर ॥ तैसे राक्षसांअंगीं शर ॥ श्रीरामाचे खडतरले[२] ॥ ९१ ॥ कीं पिच्छें पसरिती नीळकंठ[३] ॥ कीं फणसफळावरी कांटे दाट ॥ तैसे बाण रुतले सघट ॥ प्रताप उद्भट रामाचा ॥ ९२ ॥ असो तिघांची शिरें रघुनाथें ॥ उडवोनि धाडिलीं निराळपंथें[४] ॥ मग त्रिशिरा आवेशें बहुतें ॥ रामावरी लोटला ॥ ९३ ॥ रथारूढ निशाचर ॥ सोडी बहुत बाणांचा पूर ॥ ते रघुवीर तोडी जैसा समीरें[५] ॥ जलदजाळ विभांडी ॥ ९४ ॥ रघुपतीचे बाण तीक्ष्ण ॥ त्रिशिराचा छेदिला स्यंदन ॥ मग कुमारदत्त शक्ति घेऊन ॥ पिशिताशनें[६] धांविन्नला ॥ ९५ ॥ निजबळें शक्ति झोंकिली ॥ परी ते रामासी वश्य जाहली ॥ चरणांजवळ जावोनि पडली ॥ दासी तुमची म्हणोनियां ॥ ९६ ॥ रंभापर्णवर्त[७] ज्या बाणाचें मुख ॥ लक्षोनि सोडी तो अयोध्यानायक ॥ त्या बाणतेजें

८९. भाता. ९० समुद्रामध्यें. ९१ कापूर. ९२ सिंहापुढें. ९३ कमळें. ९४ रथ. ९५ श्रीराम. ९६ वीरभद्रानें दिलेला परिघ, एक शस्त्र. ९७ सूर्यमुख. ९८ श्रीरामानें. ९९ स्थिरपणा. १०० सर्प. १ घुसून राहिले. २ मोर. ३ आकाशमार्गानें. ४ वारा. ५ मेघसमुदाय. ६ रथ. ७ राक्षस. ८ केळीच्या पानासारखी.

सकळिक ॥ ब्रह्मकटाह उजळिलें ॥ ९७ ॥ त्रिशिराचीं तिन्ही शिरें ॥ तत्काळ छेदिलीं रघुवीरें ॥ ऐसें देखोनियां खरें ॥ धांवला त्वरें रथारूढ ॥ ९८ ॥ असंख्य बाण ते अवसरीं ॥ खरें सोडिले रामावरी ॥ श्रीराम एकला रणचक्रीं ॥ रजनीचरीं वेढिला ॥ ९९ ॥ चहूंकडोनि बाण ॥ रामावरी येती दारुण ॥ परी तितुक्यांचें संधान ॥ रघुनंदन छेदीतसे ॥ २०० ॥ जैसें योगेश्वरें मायाजाळ ॥ कीं सहस्रकिरणें[9] तमःमंडळ ॥ कीं अरुणानुजें[10] सर्पकुळ ॥ विदारून सांडिजे जैसें ॥ १ ॥ कीं शुष्कवना हुताशन[12] ॥ भस्म करी न लागतां क्षण ॥ कीं जलदजाल प्रभंजनें[13] ॥ विदारून सांडी जैसा ॥ २ ॥ खर बाण सोडित रणरंगीं ॥ अगस्तिदत्त कवच रामाचे आंगीं ॥ त्याचें बिरडें छेदोनि वेगीं ॥ खालीं पाडिलें राक्षसें ॥ ३ ॥ ऐसें विपरीत देखिलें ॥ विमानीं देव गजबजिले ॥ समस्तही चिंतूं लागले ॥ रघुवीरासी कल्याण ॥ ४ ॥ मग खरें मांडिलें निर्वाण ॥ शक्तिवरद चान्ही बाण ॥ सहस्रलक्षही[14] निवारण ॥ करूं न शके जयांचें ॥ ५ ॥ प्रळयींच्या चार सौदामिनी[15] ॥ तैसे बाण सुटले ते क्षणीं ॥ परी नवल जाहलें नयनीं ॥ भूचर खेचर पाहती ॥ ६ ॥ चान्ही बाण तये वेळे ॥ रघुपतीच्या भातां रिघाले ॥ ब्रह्मयाचे मुखीं प्रवेशले ॥ चान्ही वेद जैसे कां ॥ ७ ॥ कीं चान्ही नद्या समुद्रांत ॥ येऊन मिळती अकस्मात ॥ कीं आनंदवनींच्या कमळांत ॥ भ्रमर चान्ही बैसले ॥ ८ ॥ असो देव करिती जयजयकार ॥ पुढें असिलता घेऊन खर ॥ सुरकैवारियावरी[16] असुर ॥ चपळऐसा धांविन्नला ॥ ९ ॥ मग चंडीशकोदंडभंजन[17] ॥ प्रचंड दोर्दंडेंकरून ॥ सोडिला वसिष्ठदत्त बाण ॥ अनिवार अखंड जो ॥ २१० ॥ तेणें खराचें शिर छेदोन ॥ तत्काळ परतला दिव्य बाण ॥ श्रीरामतूणीरामाजी येऊन ॥ आपुले आपण प्रवेशला ॥ ११ ॥ विजयी जाहला रघुनंदन ॥ पुष्पें वर्षती देवगण ॥ विषकंठहृदय मखपालन ॥ निजभावेंसीं पूजिला ॥ १२ ॥ चौदासहस्र राक्षस अद्भुत ॥ त्यांत उरला नाहीं एक जीवंत ॥ रणीं एकला रघुनाथ ॥ सीता सौमित्र पाहती ॥ १३ ॥ महाप्रलयीं सर्व निरसून ॥ एक परब्रह्म उरे निर्वाण ॥ तैसा दशकंठदर्पहरण ॥ एकला रणीं विराजे ॥ १४ ॥ कीं सर्व निरसोन कर्मजाळ ॥ निवृत्तितटीं संत निश्चळ ॥ तैसा राम तमालनीळ ॥ एकला रणीं विराजे ॥ १५ ॥ कीं गिळोन सर्व नक्षत्रांसी ॥ एकला मित्रें[18] निरभ्राकाशीं ॥ त्यापरी सीतामनचकोरशशी ॥ एकला रणीं विराजे ॥ १६ ॥ बहुत काष्ठें जाळोनि अग्न ॥ एकला उरे देदीप्यमान ॥ त्याचपरी कौसल्यानंदन ॥ एकला रणीं विराजे ॥ १७ ॥ शब्दध्वनि निरसुनी ॥ एकलाचि अर्थ बैसे मनीं ॥ कीं जडत्व सांडोनी धरणी ॥ क्षमारूप उरे जेवीं ॥ १८ ॥ कीं शीतळत्व सांडोनि जळ ॥ जीवनत्व उरे निर्मळ ॥ दाहकत्व सांडोनि तेज समूळ ॥ प्रकाशरूपें उरे जैसें ॥ १९ ॥ कीं समीरें सांडोनि चंचळपण ॥ एक पवनत्व उरे पूर्ण ॥ कीं शून्यत्व सांडोनि गगन ॥ व्यापकत्व उरे जैसें ॥ २२० ॥ कीं शब्दजाल निरसोनि समस्त ॥ वेद स्वरूपीं होय समाधिस्थ ॥ तैसा असुर संहारोनि रघुनाथ ॥

९ सूर्यानें. १० अंधार. ११ गरुडानें. १२ अग्नि. १३ वायु. १४ इंद्र. १५ विजा. १६ श्रीरामावर. १७ शिवचाप मोडणारा श्रीराम. १८ मोठ्या. १९ सूर्य.

उभा निःशब्द उगाचि ॥ २१ ॥ काम क्रोध आणि मत्सर ॥ हेचि त्रिशिरा दूषण खर ॥ रणीं संहारोनि समग्र ॥ निजभक्त सुखी राखिले ॥ २२ ॥ दुर्वासना हेचि शूर्पणखा ॥ विरक्तिशस्त्रें घेवोनि देखा ॥ बोधलक्ष्मण रामसखा ॥ निर्नासिका केली तेणें ॥ २३ ॥ आशा मनशा[२०] कल्पना ॥ भ्रांति भुली इच्छा तृष्णा ॥ त्या देखोनि बोधलक्ष्मणा ॥ पळत्या जाहल्या राक्षसी ॥ २४ ॥ झाडलिया जैसा केर ॥ शुद्ध दिसे जेवीं मंदिर ॥ तैसें दंडकारण्य गोदातीर ॥ असुररहित जाहलें ॥ २५ ॥ स्थूळ लिंग आणि कारण ॥ निरसोनि उरे शुद्ध ज्ञान ॥ तैसे जनस्थानीं[२१] ब्राह्मण ॥ सुखें नांदों लागले ॥ २६ ॥ ब्राह्मण मारितील म्हणोनी ॥ शूर्पणखा घेऊन राक्षसिणी ॥ भेणें पळाली तेथूनी ॥ लंकेस जाऊन शंख करी ॥ २७ ॥ सेवक सांगती दशमुखा ॥ निर्नासिकी जाहली शूर्पणखा ॥ शंख करी तेणें लंका ॥ दुमदुमली समग्र ॥ २८ ॥ मग तीस पाचारोन रावण ॥ एकांतीं पुसे वर्तमान ॥ ती म्हणे राम लक्ष्मण ॥ जनस्थानीं आले रे ॥ २९ ॥ लक्ष्मणें गौरविलें मजलागुनी ॥ तुझी भगिनी म्हणोनि ॥ त्रिशिरा खर दूषण समरंगणीं ॥ सहपरिवारें वधियेले ॥ २३० ॥ शंबरीस वधोन सवेग ॥ सौमित्रें नेलें काळखड्ग ॥ चालों लागले सन्मार्ग ॥ याग जप तप आणि व्रतें ॥ ३१ ॥ गोदातीर जनस्थान ॥ तेथें सुखें नांदती ब्राह्मण ॥ अखंड करिती वेदाध्ययन ॥ निःशंक पूर्ण सर्वदा ॥ ३२ ॥ आतां तुझी लंका घेऊन ॥ हेही ब्राह्मणासी देईल दान ॥ जळो तुझी ओंगवण[२२] ॥ कासया वदन दाविसी ॥ ३३ ॥ तुझ्या उरावरी धनुष्य पडिलें ॥ तें क्षणमात्रें रामें भंगिलें ॥ तेव्हांच तुझें काळें वदन जाहलें ॥ सकळ रायांदेखतां ॥ ३४ ॥ सीतेसारिखी नोवरी ॥ नाहीं ब्रह्मांडमंडपामाझारी ॥ ते हातींची दवडोनि निर्धारीं ॥ पळोन येथें आलासी ॥ ३५ ॥ तरीच तुझा पुरुषार्थ जनीं ॥ जरी सीता आणिसी हिरोनी ॥ तिचें सौंदर्यरूप पाहोनी ॥ वनचरेंही भूलती ॥ ३६ ॥ ऐसी शूर्पणखा अनुवादली ॥ मग ते रावणें संबोखिलीं[२३] ॥ तेव्हां वनामाजी ते वेळीं ॥ युक्ति सुचविता पैं जाहला ॥ ३७ ॥ म्हणे मृगवेष धरूनि निर्मळ ॥ पाठवूं मारीच मातुळ[२४] ॥ मृग वधावया तत्काळ ॥ कौकुत्स्थ जाईल वनातें[२५] ॥ ३८ ॥ मग आणूं जानकीदिव्यरत्न ॥ ऐसें विचारी द्रिपंचवदन[२६] ॥ असो इकडे जानकी लक्ष्मण ॥ पर्वताखालीं उतरलीं ॥ ३९ ॥ सद्गद होवोनि जनकनंदिनी ॥ मिठी घाली रामचरणीं ॥ म्हणे धन्य लीला दाविली नयनीं ॥ अतर्क्य करणी वेदशास्त्रां ॥ २४० ॥ जाहले उदंड अवतार ॥ परी कोणाचे नाहीं परतले शर ॥ तों ऋषि धांवले समग्र ॥ श्रीरामचंद्र वेष्टिला ॥ ४१ ॥ म्हणती कौसल्यागर्भरत्ना ॥ जलदगात्रा[२७] शीतपत्रनयना[२८] ॥ ताटिकांतका मखपाळणा ॥ भवमोचना भवहृदया ॥ ४२ ॥ जयजयकार करिती ऋषीश्वर ॥ पूर्णब्रह्मानंद रघुवीर ॥ अभंग विजयी श्रीधर ॥ शरयूतीरविहारी जो ॥ ४३ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत पंडित चतुर ॥ चतुर्दशाध्याय गोड हा ॥ २४४ ॥ ओंव्या ॥ २४४ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ १४ ॥

२० मनीषा. २१ नाशिक क्षेत्रांत. २२ प्रतिष्ठा. २३ सांत्वन केलें. २४ मामा. २५ श्रीराम. २६ रावण. २७ मेघश्यामा. २८ कमलनेत्रा.




॥ ११ ॥

॥ श्रीगणेशाय नमः ॥ भवाब्धि भरला परम तुंबळ ॥ द्वैतभावाचें तटाक सबळ ॥ कुबुद्धीचे कल्लोळ ॥ मोहजाळ असंभाव्य ॥ १ ॥ मद मत्सर थोर आवर्त ॥ कामक्रोधादि मासे अद्भुत ॥ आशा तृष्णा भ्रांति तेथ ॥ मगरी थोर तळपती ॥ २ ॥ लोभ द्वेष नक्र थोर ॥ ममतेच्या लाटा अति दुस्तर ॥ दंभ आणि अहंकार ॥ विरोळे हे तळपती ॥ ३ ॥ अविवेक किरवे तत्त्वतां ॥ अविद्या भ्रांति जळदेवता ॥ पीडिती त्रिभुवनींच्या जीवां समस्तां ॥ इच्छा ममता कल्पना ॥ ४ ॥ ऐसा अगाध भवनिधि थोर ॥ तेथें रामकथाजहाज सुंदर ॥ शिल्पिकार वाल्मीक ऋषीश्वर ॥ तारूं तेणें निर्मिलें ॥ ५ ॥ नाना चरित्रें सुंदर ॥ याचि फळ्या दृढ थोर ॥ विवेकें जोडूनि समग्र ॥ अभेदत्व साधिलें ॥ ६ ॥ साहित्य लोह तगटबंद ॥ आनंदपद खिळे विविध ॥ दृष्टांतदोरे प्रसिद्ध ॥ ठायीं ठायीं आंवळिले ॥ ७ ॥ अर्थरस तेल निखिळ ॥ तेणें सांधे बुजिले सकळ ॥ रामप्रतापस्तंभ विशाळ ॥ कीर्तिशीड फडकतसे ॥ ८ ॥ सप्त कांडें सप्त खण ॥ लोटीत भावप्रभंजन ॥ निजबोध कर्णधार पूर्ण ॥ सकळ सुजाण देखणा ॥ ९ ॥ ज्ञान वैराग्य भक्ती ॥ हेचि आवलें आवलिती ॥ या जहाजावरी तेचि बैसती ॥ अद्भुत ग्रंथीं पुण्य ज्यांचे ॥ १० ॥ रामनामघोष थोर ॥ हेचि यंत्रांचें भडिमार ॥ नादें जलचरें समग्र ॥ भयभीत पळताती ॥ ११ ॥ ऐसें भवसागरीं तारूं थोर ॥ गुरुकृपेचें केणें अपार ॥ भरूनि मोक्षा द्वीपांतर ॥ लागवेगें पाविजे ॥ १२ ॥ तरी तुम्हीं श्रोते सज्जन ॥ या जहाजावरी बैसोन ॥ भवाब्धि हा उल्लंघून ॥ निवृत्तितटा जाइंजे ॥ १३ ॥ असो चौदावे अध्यायीं कथन ॥ वधिलें त्रिशिरा खर दूषण ॥ शूर्पणखेनें वर्तमान ॥ दशकंठासी श्रुत केलें ॥ १४ ॥ श्रीरामप्रताप अद्भुत ॥ ऐकतां सचिंत लंकानाथ ॥ सद्भक्तांची स्तुति ऐकोनि समस्त ॥ दुर्जन जैसे क्षोभती ॥ १५ ॥ पतिव्रतेची ऐकोनि राहाटी ॥ जारिणी होती जेवीं कष्टी ॥ कीं मृगेंद्रगर्जनीं ऐकतां पोटीं ॥ वारणें जैसे दचकती ॥ १६ ॥ कीं विष्णुमहिमा ऐकतां अद्भुत ॥ क्रोधावती जैसे दैत्य ॥ असो ते वेळे मयजोकांत ॥ मारीचगृहीं प्रवेशला ॥ १७ ॥ मारीचानें सन्मान देउनी ॥ रावणातें बैसविलें आसनीं ॥ याउपरी मधुरवचनीं ॥ दशकंठें बोलता जाहला ॥ १८ ॥ म्हणे पंचवटीस आला रघुनंदन ॥ मारिले त्रिशिरा खर दूषण ॥ शूर्पणखा विटंबून ॥ शंबरीही मारिला ॥ १९ ॥ शत्रु नागें कृशानें ॥ हे म्हणों नयेत लहान ॥ क्षणें हरितील प्राण ॥ सावधान असावें ॥ २० ॥ यालागीं मातुळा परियेस ॥ तुवां धरावा मृगवेष ॥ पंचवटीस जाऊन राघवास ॥ भुलवोनियां नेइंजे ॥ २१ ॥ राघव नेइंजे दूर वनीं ॥ मग पद्माक्षी आणीन काढूनी ॥ हें कार्य साधिल्या तुजलागोनी ॥ गौरवीन बहुसाल ॥ २२ ॥ जैसें मूढाचें वाग्जाळ ॥ पंडित छेदी तत्काळ ॥ तैसीं वचनें रसाळ ॥ बोले मातुळ रावणाचा ॥ २३ ॥ पूर्वी करितां यागरक्षण ॥ सुबाहु टाकिला मारून ॥ त्या बाणवातेंकरून ॥ मी पडलों सागरीं ॥ २४ ॥ वीस कोटी मारिले पिशिताशनें ॥ तो रामप्रताप आठवून ॥ मारीच पडला मूर्च्छा येऊन ॥ करी रावण

१ तीर. २ भोंवरे. ३ सुसरी. ४ पाण्यांतील निर्विष साप. ५ कुरली. ६ संसारसमुद्र. ७ नावाडी. ८ वल्ही. ९ माल. १० सिंहाची गर्जना. ११ हत्ती. १२ रावण. १३ सर्प. १४ अग्नि. १५ कमलनयना सीता. १६ बाणाच्या वाऱ्यानें. १७ राक्षस.

सावध तया ॥ २५ ॥ मारीच म्हणे रावणा ॥ अभिलाषी जो परांगना ॥ तो मुकला आपुलिया प्राणा ॥ सत्य जाण निर्धारें ॥ २६ ॥ सद्विवेक हृदयीं धरोन ॥ अनुचित कर्मीं न घालीं मन ॥ सद्गुरु सांगे तें वचन ॥ अवश्य हृदयीं धरावें ॥ २७ ॥ न करावें कोणाचें हेळण ॥ कदा न बोलिजे दुष्ट वचन ॥ पराची वेदना जाणून ॥ परोपकार करावा ॥ २८ ॥ सर्वां भूतीं एक भगवंत ॥ हा वेदशास्त्रीं श्रेष्ठार्थ ॥ म्हणोनि द्वेष न करावा सत्य ॥ साधिजे परमार्थ अवश्य ॥ २९ ॥ क्षणिक जाणोनि शरीर ॥ साधावा सारासारविचार ॥ मी भाग्यें ज्ञानें बहु थोर ॥ हा अभिमान न धरावा ॥ ३० ॥ काम क्रोध मद मत्सर ॥ हे शत्रु जिंकावे अनिवार ॥ दशमुखा तूं सज्ञान थोर ॥ सखा रघुवीर करीं वेगें ॥ ३१ ॥ सखा करितां चापपाणी ॥ मग सुखासी नाहीं वाणी ॥ जोंवरी शैशी[१७] आणि तैंरणी[१८] ॥ तोंवरी सुखें नांदसी ॥ ३२ ॥ राम केवळ परम पुरुष ॥ आदि नारायण सर्वेश ॥ तुझे उरावरी पडलें धनुष्य ॥ सीतास्वयंवरीं आठवीं कां ॥ ३३ ॥ तुझे चालिले जेव्हां प्राण ॥ मग उठिला रामपंचाननि[१९] ॥ चंडीशैशकोदंड[२०] भंगोन ॥ जीवदान तुज दिधलें ॥ ३४ ॥ तैं तुज रामें वांचविलें ॥ त्याचें काय हेंचि फळ जाहलें ॥ जेणें उपकार बहुत केले ॥ त्यासी मारिसी शस्त्र घेउनी ॥ ३५ ॥ जेणें पाजिला सुधारस ॥ त्यासीच पाजिलें महाविष ॥ जेणें रणींहून सोडविलें निःशेष ॥ त्याचिया गृहास अग्नि लाविसी ॥ ३६ ॥ जन्मूनि जेणें केलें पाळण ॥ आपत्काळीं रक्षिलें पूर्ण ॥ तो निद्रिस्थ असतां पाषाण ॥ कैसा वैरी घालावा ॥ ३७ ॥ नौका बुडतां कांसे लाविलें ॥ कीं जळत्या गृहींहूनि काढिलें ॥ कीं शिर छेदितां सोडविलें ॥ तो पितयातुल्य वेद म्हणे ॥ ३८ ॥ यालागीं दशकंठा तूं सुबुद्ध ॥ रामाशीं न करावा विरोध ॥ राम केवळ ब्रह्मानंद ॥ आनंदकंद जगद्गुरु ॥ ३९ ॥ तुझा स्वामी जो शंकर ॥ तोही रामभजनीं सादर ॥ ते रामभार्या तूं पामर ॥ हिरोनि आणूं इच्छितोसी ॥ ४० ॥ ऐसीं मातुळाचीं वचनें ॥ सुधारसाहूनि गोड गहनें ॥ कीं विवेकवैराग्यगिरींचीं[२३] रत्नें ॥ रावणाहातीं दीधलीं ॥ ४१ ॥ परम मतिमंद कुलांगार[२४] देख ॥ परीक्षा नेणेचि महामूर्ख ॥ रोगिष्ठापुढें अन्नें सुरेख ॥ व्यर्थ जैसीं वाढिलीं ॥ ४२ ॥ अवदानें[२५] समर्पिलें भस्मांत ॥ कीं उकरडां ओतिलें अमृत ॥ कीं जो मद्यपानी[२६] उन्मत्त ॥ त्यास परमार्थ कायसा ॥ ४३ ॥ असो परम क्रोधायमान ॥ रावण बोले तेव्हां तीक्ष्ण ॥ जैसें साधूचें छळण ॥ निंदक करी साक्षेपें ॥ ४४ ॥ माझिया प्रतापापुढें ॥ राम मनुष्य काय बापुडें ॥ मीं केलीं चूर्ण देवांचीं हाडें ॥ तुजदेखतां समरांगणीं ॥ ४५ ॥ त्याचा प्रताप तूं वानिसी ॥ तरी तुज वधीन निश्चयेंसीं ॥ म्हणोनि हस्त घातला शस्त्रासी ॥ मारीच मानसीं वीटला ॥ ४६ ॥ म्हणे अधम तूं परम दुर्जन ॥ होईं माघारा न बोलें वचन ॥ मी आतां मृगवेष धरून ॥ जातों शरण राघवेंद्रा ॥ ४७ ॥ रामबाणें होतां मरण ॥ मी अक्षयसुख भोगीन ॥ तुझे हातेंकरून ॥ अधःपतन पतितां[२७] ॥ ४८ ॥ आतां पंचवटीस चला लौकरी ॥ मग दोघे बैसोनि रथावरी ॥ वायुवेगें ते अवसरीं ॥ जनस्थानासी[२८] पातले

१८ तोटा, कमतरता. १९ चंद्र. २० सूर्य. २१ रामरूपी सिंह. २२ शिवधनुष्य. २३ विचारखाणींतील. २४ कुत्सित. २५ आहुति. २६ दारूबाज. २७ भ्रष्ट. २८ पंचवटीला.

॥ ४९ ॥ वनीं गुप्त उभा रावण ॥ मारीच निघे मृगवेष धरून ॥ अंतरीं करीत रामस्मरण ॥ म्हणे धन्य धन्य आजि मी ॥ ५० ॥ आला चमकत पंचवटी ॥ श्रीरामरूप न्याहाळी दृष्टीं ॥ हृदयीं जाहला परम संतुष्टी ॥ अंतरी कष्टी नव्हेचि ॥ ५१ ॥ जैसें सुवर्णतगटें[29] सुरंग ॥ तैसें मृगाचें दिसे अंग ॥ ऐसें देखतां सीतेंरंग[30] ॥ हात घाली धनुष्या ॥ ५२ ॥ मृग क्षणक्षणां परतोन ॥ पाहे राघवाकडे विलोकून ॥ तों ते पद्माक्षी बोले वचन ॥ पद्मजौतजनकाप्रति[31] ॥ ५३ ॥ म्हणे ऐसा मृग आजिपर्यंत ॥ आम्हीं देखिला नाहीं यथार्थ ॥ याचे त्वचेची कंचुकी सत्य ॥ उत्तम होईल केलिया ॥ ५४ ॥ अयोध्येसी प्रवेश करितां ॥ ते कंचुकी लेईन प्राणनाथा ॥ षण्मास उरले आतां ॥ मनुसंवत्सरांमाजी पै[32] ॥ ५५ ॥ सीतेची इच्छौसरिता[33] साचार ॥ कर्मजळाचा तुंबळ पूर ॥ दुःखसमुद्राप्रती साचार ॥ भेटावया जाऊं पाहे ॥ ५६ ॥ जाणूनि जानकीचें मानस ॥ आणि पुढील होणार भविष्य ॥ सत्वर चालिला अयोध्याधीश ॥ धनुष्यासी बाण लावूनियां ॥ ५७ ॥ म्हणे सौमित्रा सावधान ॥ रक्षीं जानकी चिद्रत्न ॥ परम कपटी पिशिताशेंन[34] ॥ नसतींच विघ्नें करितील ॥ ५८ ॥ असो गुंफेंत सीता चिद्रत्न ॥ द्वारीं रक्षपाळ लक्ष्मण ॥ जैसा महाभुजंग अनुदिन ॥ निधानकुंभ रक्षीतसे[35] ॥ ५९ ॥ पार्वतीजवळ जैसा कुमारें[36] ॥ कीं इंदिरेपाशीं खगेश्वर ॥ तैसा तो भूधरावतार[37] ॥ रक्षी द्वार गुंफेचें ॥ ६० ॥ इकडे मृगाचे पाठीं लागे ॥ राघव जात वातवेगें ॥ गौतमीतीराच्या पूर्वमार्गें ॥ केलें मृगें पलायन ॥ ६१ ॥ मनाहून वेग अत्यंत ॥ मनमोहन त्वरें जात ॥ ध्वजवज्ररेखांकित ॥ पदें उमटत धरेवरी ॥ ६२ ॥ पद्मोद्भव[38] आणि भोगींद्र ॥ नीलग्रीव[39] आणि वज्रधर[40] ॥ चरणरज इच्छिती निरंतर ॥ दुर्लभ साचार तयांसी ॥ ६३ ॥ असो मृगाचें वर्म लक्षून ॥ रामें सोडिला दिव्य बाण ॥ भूमीवरी पडिला हरिण ॥ अचूक संधान रघुपतीचें ॥ ६४ ॥ सादर पाहे रघुवीर ॥ तों पडलें राक्षसाचें शरीर ॥ श्रीरामबाणें निशाचर ॥ पावला परत्रें[41] निर्धारें ॥ ६५ ॥ आश्चर्य करी अयोध्याधीश ॥ म्हणे परम कपटी राक्षस ॥ असो अश्वत्थाखालीं पुराणपुरुष ॥ श्रमोनियां बैसला ॥ ६६ ॥ इकडे काय वर्तमान ॥ वनीं गुप्त उभा रावण ॥ गुंफाद्वारीं लक्ष्मण ॥ बैसला रक्षणा अग्यग्र ॥ ६७ ॥ शांतीजवळी परमार्थ ॥ कीं तपासी रक्षी शुचित्व ॥ तैसा द्वारीं सुमित्रासुत ॥ मग लंकानाथ काय करी ॥ ६८ ॥ श्रीरामासारखा शब्दध्वनी ॥ राक्षसें उठविला काननीं ॥ सौमित्रा धांव धांव म्हणोनी ॥ सीता कर्णीं आइकत ॥ ६९ ॥ सौमित्रा धांव धांव लौकरी ॥ वनीं वेष्टिलें रजनीचरीं ॥ संकट पडलें मजवरी ॥ तूं कैवारी पाठीराखा ॥ ७० ॥ रणभूमीस बंधूविण ॥ उडी घालील सांग कवण ॥ राक्षसीं घेतला माझा प्राण ॥ मग येऊन काय पाहसी ॥ ७१ ॥ ऐसें ऐकतां जनकनंदिनी ॥ परम घाबरली अंतःकरणीं ॥ म्हणे श्रीराम माझा पडिला वनीं ॥ करुणावाणी बोहती[42] तुम्हां ॥ ७२ ॥ रणीं बंधु संकटीं मित्र ॥ वृद्धापकाळीं ओळखिजे कैलत्र[43] ॥ विषमकाळीं सत्पुत्र ॥ सांभाळिती पितयातें ॥ ७३ ॥ कीं शस्त्रमार होतां अत्यंत ॥ करींचें

२९ सोन्याचें तगट. ३० राम. ३१ कमलोद्भव ब्रह्मदेवाचा पिता विष्णु, त्याचा अवतार त्या श्रीरामाला. ३२ चौदा वर्षांमध्यें. ३३ इच्छारूपी नदी. ३४ राक्षस. ३५ पुरून ठेवलेली द्रव्याची घागर. ३६ कार्तिकस्वामी. ३७ लक्ष्मण. ३८ ब्रह्मा. ३९ शंकर. ४० इंद्र. ४१ परलोकास. ४२ हांक मारितात. ४३ स्त्री.

८० थार घार. ८१ वरान्यरूप हरिण्याचा खाण. ८२ पुष्प. ८३ वरान्याचा.

वोडॅण पुढें होत ॥ कीं संसारतापें संतप्त ॥ साधु निववीत निजबोधें ॥ ७४ ॥ मग बोले लक्ष्मण ॥ जानकी हें कापट्यवचन ॥ संकटीं पडेल रघुनंदन ॥ हें कल्पांतीं घडेना ॥ ७५ ॥ तो देवाधिदेव रघूत्तम ॥ चराचरबीज सुफलांकित द्रुम ॥ त्यासी संकट पडेल दुर्गम ॥ हें कल्पांतींही घडेना ॥ ७६ ॥ जरी तेंमें झांकेल चंडांशें ॥ किंवा शीतज्वर बाधेल अमीस ॥ जगद्भक्षक काळास ॥ भूतबाधा जरी होय ॥ ७७ ॥ ऊर्णनाभीचे तंतूनें सहज ॥ जरी बांधिजेल महागज ॥ तरी संकटीं पडेल रघुराज ॥ जनकतनये जाण पां ॥ ७८ ॥ ऐसें बोलतां लक्ष्मण ॥ सीता जाहली क्रोधायमान ॥ तीक्ष्ण शब्दशस्त्रेंकरून ॥ लक्ष्मणासी ताडिलें ॥ ७९ ॥ म्हणे तुझें कळलें बंधुपण ॥ ओळखिली म्यां मनींची खूण ॥ माझा अभिलाष धरून पूर्ण ॥ काननाप्रती आलासी ॥ ८० ॥ राम राक्षसीं वधिलिया वनीं ॥ मग करूं इच्छिसी मातें पत्नी ॥ जैसा मेंदे क्षमा धरूनी ॥ सेवा करी साक्षेपें ॥ ८१ ॥ सन्मुख देखोनि रघुनाथा ॥ म्हणसी जानकी जगन्माता ॥ कीं वनीं राम वधावया तत्त्वतां ॥ तुज कैकयीनें धाडिलें ॥ ८२ ॥ तूं दोंयाद परम दुर्जन ॥ सौपत्नबंधु कपटी पूर्ण ॥ जळो तुझें काळें वदन ॥ कळलें ज्ञान वैराग्य तुझें ॥ ८३ ॥ रघुपतीस विपरीत होतां ॥ प्राण हा त्यजीन तत्त्वतां ॥ निर्दय पाहतां तुजपरता ॥ भुवनत्रयीं दिसेना ॥ ८४ ॥ माझा अभिलाष धरून ॥ रामासी इच्छितोसी मरण ॥ ऐसे जानकीनें वाग्बाण ॥ सौमित्रावरी सोडिले ॥ ८५ ॥ कीं तप्तशस्त्रांचे घाय पूर्ण ॥ त्याहूनि बोल ते तीक्ष्ण ॥ कीं पर्वताचे कडे जाण ॥ अंगावरी कोसळले ॥ ८६ ॥ वचनें नव्हत तीं निश्चित ॥ कीं दुःखवल्ली फळें यथार्थ ॥ परम दुःखी सुमित्रासुत ॥ प्रत्युत्तर देतसे ॥ ८७ ॥ म्हणे माते जनकनंदिनी ॥ मी निष्पाप बोलिलों वाणी ॥ कीं विजयी सदा चापपाणी ॥ दुःख वनीं त्यासी कैंचें ॥ ८८ ॥ पृथ्वी आप तेज वायु आकाश ॥ तुज साक्ष चंडांशें ॥ मी बोलिलों निर्दोष ॥ जैसें कां यश सोज्वळ ॥ ८९ ॥ मी बाळक तूं जननी ॥ हाचि भावार्थ माझे मनीं ॥ तुज फळेल करणी ॥ पडसी बंधनीं षण्मास ॥ ९० ॥ पुन्हां भेटे जों रघुनाथ ॥ तों भोगिसी महा अनर्थ ॥ ऐसें बोलोनि सुमित्रासुत ॥ चालिला त्वरित वनासी ॥ ९१ ॥ मग तो ऊर्मिलाप्राणनाथ ॥ जनकाचा कनिष्ठ जामात ॥ गुंफेद्वारीं रेखा ओढीत ॥ धनुष्यकोटीनें तेधवां ॥ ९२ ॥ म्हणे तूं या रेखेबाहेर जासी ॥ तरी परम अनर्थ पावसी ॥ जो रघुवीर अयोध्यावासी ॥ त्याचीच शपथ तुज असे ॥ ९३ ॥ शोधीत घोर अरण्य ॥ सौमित्र जातां करी रुदन ॥ म्हणे होतांचि रामदर्शन ॥ प्राण त्यागीन निर्धारें ॥ ९४ ॥ श्रीरामपदांकित मुद्रा दिसत ॥ ध्वजवज्रादि चिन्हें मंडित ॥ मार्ग काढीत सुमित्रासुत ॥ ऐका दृष्टांत येथें कैसा ॥ ९५ ॥ जैसे श्रुतीच्या आधारें निश्चित ॥ स्वस्वरूपीं प्रवेशती संत ॥ त्याचपरी सुमित्रासुत ॥ श्रीरघुनाथा पाहों जाय ॥ ९६ ॥ कीं संसारतापें संतप्त पूर्ण ॥ तो सद्गुरूसी जाई शरण ॥ कीं तृषित जान्हवी लक्षून ॥ जात धांवोन त्वरेनें ॥ ९७ ॥ तैसा सत्वर जात लक्ष्मण ॥ तों अश्वत्थाखालीं मनमोहन ॥

४४ ढाल. ४५ वृक्ष. ४६ अंधारानें. ४७ सूर्य. ४८ कोळ्याच्या. ४९ घातुक. ५० घारसदार, भाऊबंद. ५१ सावत्रभाऊ. ५२ भागीरथी. ५३ श्रीराम.

श्यामसुंदर देदीप्यमान ॥ मखपाळण बैसला असे ॥ ९८ ॥ कोमाइलें श्रीरामवदन ॥ तों येतां देखिला लक्ष्मण ॥ शोकें दिसे दीन-वदन ॥ येऊन लोटांगण घातलें ॥ ९९ ॥ कंठ जाहला सद्गदित ॥ नयनीं आले अश्रुपात ॥ श्रीरामचरण क्षाळीत ॥ पाहे तटस्थ रघुवीर ॥ १०० ॥ श्रीराम म्हणे लक्ष्मणा ॥ कां सीता टाकोनि आलासी वना ॥ येरू म्हणे रघुनंदना ॥ माझा वध करीं वेगें ॥ १ ॥ ऐसें वाटे माझे मनीं ॥ देह समर्पावा रामचरणीं ॥ रामें हृदयीं आलिंगूनी ॥ कायसा मनीं खेद सांगें ॥ २ ॥ सौमित्र सद्गदित होऊनि बोले ॥ सीतेनें वाग्बाण सोडिले ॥ तेणें सर्वांग माझें खोंचलें ॥ तें बोलिलें नवजाय ॥ ३ ॥ मग बहुत प्रकारेंकरून ॥ समाधान करी रघुनंदन ॥ तैसेच परतले दोघेजण ॥ आश्रमपंथ लक्षोनियां ॥ ४ ॥ इकडे कथानक काय जाहलें ॥ मागें दशग्रीवें काय केलें ॥ रूप अतीतांचें धरिलें ॥ कापट्य करूनि ते वेळे ॥ ५ ॥ जानकी चंद्रमंडळ सुंदर ॥ तेथें राहु आला दशकंधर ॥ उभा राहिला रेखे-बाहेर ॥ दुराचार पापात्मा ॥ ६ ॥ कीं हरिणी देखोनि सुकुमार ॥ न्यावया झेंपावे जेवीं व्याघ्र ॥ तैसा राक्षस रेखेबाहेर ॥ अतीतवेषें उभा असे ॥ ७ ॥ रावण परम भयभीत ॥ रेखा नुलंघवे यथार्थ ॥ जैसा वडवानळ अद्भुत ॥ शलभ ओलांडूं शकेना ॥ ८ ॥ पुढें उभा दशमुख ॥ परी जानकी निर्मळ निःशंक ॥ जैसा महेशापुढें मशक ॥ तैसा दशमुख उभा असे ॥ ९ ॥ इंद्रापुढें जैसा रंक ॥ कीं ज्ञानियापुढें महामूर्ख ॥ कीं केसरीपुढें जंबुक ॥ कीं सूर्यापुढें खद्योत पें ॥ ११० ॥ कीं अग्नीपुढें पतंग ॥ कीं खगेंद्रापुढें उरग ॥ कीं राजहंसासमोर काग ॥ तैसा खळ उभा तेथें ॥ ११ ॥ कीं नामापुढें पाप देख ॥ कीं वेदापुढें चार्वाक ॥ कीं शंकरापुढें मशक ॥ मीनकेतन जेवीं दिसे ॥ १२ ॥ कीं पंडितापुढें अजापाळक ॥ कीं श्रोत्रियापुढें हिंसक ॥ कीं वासुकीपुढें मंडूक ॥ लक्षण पाहूं पातला ॥ १३ ॥ कीं अग्नीपुढें जैसें तृण ॥ कीं ज्ञानापुढें अज्ञान ॥ कीं महावातापुढें जाण ॥ जळदजाळ जैसें कां ॥ १४ ॥ तैसा सीतेपुढें रावण ॥ न्याहाळोनि पाहे तिचें वदन ॥ मनीं म्हणे ऐसें निधान ॥ त्रिभुवनामाजी दिसेना ॥ १५ ॥ जगन्माता आदिशक्ती ॥ तिचा अभिलाष धरितां चित्तीं ॥ अवदसा आली रावणाप्रती ॥ झोळी हातीं घेतली ॥ १६ ॥ कामधेनु अभिलाषितां जाण ॥ क्षय पावला सहस्रार्जुन ॥ जालंधर पार्वतीलागून ॥ अभिलाषितां भस्म जाहला ॥ १७ ॥ तृणाचे वळईमाजी देखा ॥ कैसी उगी राहे दीपकलिका ॥ तैसें वाटे दशमुखा ॥ स्पर्श कदा न करवे ॥ १८ ॥ कापुराचा पुतळा ॥ केवीं गिळील अग्निज्वाळा ॥ तैसी न स्पर्शवे जनकबाळा ॥ रावणा-चेनि सर्वथा ॥ १९ ॥ सीतेप्रति पुसे रावण ॥ ये वनीं तूं कोणाची कोण ॥ कां सेविलें घोर विपिन ॥ काय कारण पुढें असे ॥ १२० ॥ मग जगन्माता बोले वचन ॥ अयोध्याप्रभु रघुनंदन ॥ मी त्याची ललना पूर्ण ॥ कन्यका जाण जनकाची ॥ २१ ॥ चंडीशकोदंड दारुण ॥ रामें भंगिलें न लागतां क्षण ॥ जो रावणबळदर्पहरण ॥ मखरक्षण ताटिकांतक ॥ २२ ॥ पाळावया पितृवचन ॥ वनासी आले

५४ रावणानें. ५५ अतिथीचें. ५६ उडी टाकतो. ५७ टोळ. ५८ सिंहापुढें. ५९ कोल्हा. ६० काजवा. ६१ गरुडापुढें. ६२ सर्प. ६३ नास्तिक. ६४ मदन. ६५ भनगड, मेंढपाळ. ६६ वेदवेत्त्यापुढें. ६७ मेघसमुदाय. ६८ सांवींत.

रघुनंदन ॥ शूर्पणखेसी विटंबून ॥ त्रिशिरा खर दूषण मारिले ॥ २३ ॥ आतां रावण आणि कुंभकर्ण ॥ या दोघां दुष्टांतें वधून ॥ बंदींचे वृंदारक सोडवून ॥ अयोध्येसी मग जाऊं ॥ २४ ॥ वना गेले रामलक्ष्मण ॥ ते आतां येतील न लागतां क्षण ॥ तोंवरी बैसावें आपण ॥ स्वस्थ मन करोनियां ॥ २५ ॥ स्वहस्तेंकरूनि जाण ॥ तुम्हांसी पूजिती रघुनंदन ॥ नावेकँ बैसावें म्हणोन ॥ तृणासन घातलें ॥ २६ ॥ भयभीत लंकानाथ ॥ प्रवेश न करवे गुंफेआंत ॥ सीता बाहेर न ये सत्य ॥ चापरेखा उल्लंघोनि ॥ २७ ॥ अतीत म्हणे हें राक्षसवन ॥ तूं एकली येथें कामिन ॥ बहुतेक आंहेस राक्षसीण ॥ आंत नेऊन गिळिसी मज ॥ २८ ॥ त्वां आसन घातलें गुंफेंत ॥ तरी मी आंत न यें यथार्थ ॥ मज तूं खासी हें निश्चित ॥ कळलें गत सर्व तुझें ॥ २९ ॥ सीता म्हणे शिव हर इर ॥ आम्ही राक्षस नव्हे जी साचार ॥ असों अतीतांचे किंकरँ ॥ सत्य निर्धार जाण पां ॥ १३० ॥ रावण विचारी अंतरीं ॥ ही न येचि गुंफेबाहेरी ॥ मग मूर्च्छा घेऊनि उर्वी-वरी ॥ लटिकाचि तो पडियेला ॥ ३१ ॥ म्हणे आतां फलाहाराविण ॥ माझा जातो येथें प्राण ॥ तूं गुंफेबाहेर येऊन ॥ वदनीं माझ्या फळ घालीं ॥ ३२ ॥ तों गुप्तरूपें देव समस्त ॥ जगन्मातेचें स्तवन करीत ॥ तूं लंकेस जाऊन त्वरित ॥ बंधमुक्त करीं आम्हां ॥ ३३ ॥ तुज स्पर्शतांचि रावण ॥ भस्म होईल न लागतां क्षण ॥ मग आम्हांस बंदींहून ॥ सर्वथा कोणी न सोडवी ॥ ३४ ॥ तुझें करोनि निमित्त ॥ लंकेस येईल रघुनाथ ॥ तरी मुख्यरूप अमींत ॥ करीं गुप्त जननीये ॥ ३५ ॥ तुझें प्रतिबिंबस्वरूप जाण ॥ स्वयें नटेल हुताशँन ॥ रावणवंश भस्म करून ॥ कार्यासिद्धि करील तो ॥ ३६ ॥ तरी मुख्यरूप गुप्त व्हावें ॥ छायारूप तेथें जावें ॥ ऐसें देव विनवीत आघवे ॥ अवश्य म्हणे जानकी ॥ ३७ ॥ असो इकडे रावण ॥ म्हणे घांव घांव जातो प्राण ॥ मग जगन्माता फळें घेऊन ॥ रेखेजवळी पातली ॥ ३८ ॥ भिक्षा घालावयासी कर ॥ सीतेनें केला रेखेबाहेर ॥ तैसीच ओढोनियां सत्वर ॥ निशाचरें उचलिली ॥ ३९ ॥ आपलें स्वरूप लंकेश ॥ दाविता जाहला जानकीस ॥ म्हणे म्यां बंदीं घातले त्रिदँश ॥ वरीं निःशंक मज आतां ॥ १४० ॥ सीतेलागीं आलिंगीन ॥ ऐसें मनीं भावी रावण ॥ सीता म्हणे जाशील भस्म होऊन ॥ न लागतां क्षण आतांचि ॥ ४१ ॥ अमीस ओळँबा केवीं लागे ॥ पतंगँ नुरे दीपासंगें ॥ तुझा मृत्यु जवळी वेगें ॥ आला जाण राक्षसा ॥ ४२ ॥ रामपंचाँननाची वस्तु पूर्ण ॥ जंबुकाँ तूं नेतोसी चोरून ॥ जैसें अँन्नसदनीं रिघे श्वान ॥ तैसा जाण तूं दशमुखा ॥ ४३ ॥ खदिरांगारासी वृश्चिक ॥ पुच्छ हाणूं जातां देख ॥ तैसा तूं भस्म होसी निःशंक ॥ सोडीं मज राक्षसा ॥ ४४ ॥ परी न सोडीच रावण ॥ घातली रथावरी नेऊन ॥ गुंफेभोंवतींचे ब्राह्मण ॥ भयेंकरून पळाले ॥ ४५ ॥ गृहस्थासी पडतां विषमकाळ ॥ आश्रित पळती जैसे सकळ ॥ तैसे ब्राह्मण रानोमाळ ॥ भयेंकरून पळताती ॥ ४६ ॥ सीता जाहली दीनवदन ॥ म्हणे कोठें रामलक्ष्मण ॥ करुणास्वरें हांक फोडून ॥ धांवा करी राघवाचा ॥ ४७ ॥ तों निरँाळमार्गें रथ ॥

६९ देव. ७० क्षणभर. ७१ अतिथीचे, पाहुण्याचे. ७२ सेवक. ७३ अग्नि. ७४ देव. ७५ बाळवी. ७६ शलभ. ७७ सिंहाची. ७८ कोल्ह्या. ७९ पाकशासनेंत. ८० आकाशमार्गानें.

पळवीत जाय लंकानाथ ॥ दीर्घस्वरें आक्रंदत ॥ जनकदुहिता ते काळीं ॥ ४८ ॥ नानावृक्षवनचरांप्रती ॥ हांक फोडून सीता सती ॥ म्हणे सत्वर सांगा रघुपती ॥ राक्षस नेतो म्हणोनियां ॥ ४९ ॥ सीतेची करुणा देखोन ॥ पशु पक्षी करिती रुदन ॥ वृक्ष आणि पाषाण ॥ दुःखेंकरून उलताती ॥ १५० ॥ सीता म्हणे श्रीरामा ॥ अपर्णावरमनविश्रामा पद्मजातजनका पूर्णब्रह्मा ॥ धांवें आतां लौकरी ॥ ५१ ॥ हे ताटिकांतका रघुवीरा ॥ हे मखपाळका समरधीरा ॥ अहल्योद्धारा परम उदारा ॥ धांवें सत्वर ये वेळे ॥ ५२ ॥ रावण हा सर्प दारुण ॥ जिव्हारीं झोंबला जातो प्राण ॥ तूं सुपर्णवहना गारुडी पूर्ण ॥ झडप घालोनि पाव वेगीं ॥ ५३ ॥ रावण नव्हे हा सबळ मौतंग ॥ पंचानना धांव तूं सवेग ॥ वियोगानळें जाळिलें सर्वांग ॥ करुणाघन वर्षें तूं ॥ ५४ ॥ जो परम साधु सुमित्रासुत ॥ ॥ पवित्र जैसा केवळ आदित्य ॥ त्यासी छळितां रघुनाथ ॥ मज अंतरला आतांचि ॥ ५५ ॥ जो करील साधूचें छळण ॥ नसतेंच ठेवी त्यासी दूषण ॥ तरी जन्मोजन्मीं वंशखंडण ॥ नरक दारुण भोगील तो ॥ ५६ ॥ साधुछळक दुराचारी ॥ त्याचे भारें कांपे धरित्री ॥ ईश्वर सर्व दोष क्षमा करी ॥ तारी भवसागरीं पतिता ॥ ५७ ॥ परी पतित जो संतछळक ॥ त्यासी दुःखें भोगवी अनेक ॥ त्या दुष्टाचें न पाहावें मुख ॥ पापी निष्टंक साधुद्रोही ॥ ५८ ॥ दरिद्र दुःख विघ्नें बहुत ॥ त्यावरीच कोसळती समस्त ॥ सध्यां मजचि आली प्रचीत ॥ राक्षस नेत धरोनियां ॥ ५९ ॥ जानकीचे विलाप ऐकोन ॥ चराचर जीव करिती रुदन ॥ जटायु धांविन्नला देखोन ॥ क्षोभला पूर्ण काळ जैसा ॥ १६० ॥ काया थोर गिरिसमान ॥ वज्रचंचू परम तीक्ष्ण ॥ तिखट नखें विद्रुमवर्ण ॥ रावणावरी कोसळला ॥ ६१ ॥ जटायु म्हणे रे दुर्जना ॥ महानिष्ठुरा खळा मलिना ॥ सांडीं वेगीं श्रीरामललना ॥ नाहीं तरी प्राणा मुकशील ॥ ६२ ॥ दीपाचे पोटीं होय काजळ ॥ तैसा ब्रह्मवंशीं तूं चांडाळ ॥ तुझें छेदिन शिरकमळ ॥ सांडीं वेल्हाळ जानकी ॥ ६३ ॥ कासया केलें वेदाध्ययन ॥ काय कोरडें ब्रह्मज्ञान ॥ जळो तुझें तपाचरण ॥ शिवभजन व्यर्थ गेलें ॥ ६४ ॥ जो जगद्वंद्य जगदुद्धार ॥ त्याची वस्तु नेसी तूं तस्कर ॥ तुझे कर्ण नासिक समग्र ॥ छेदोनि आजि टाकीन ॥ ६५ ॥ असो धनुष्य घेऊनि रावण ॥ जटायूवरी सोडी बाण ॥ येरू चंचुघातेंकरून ॥ शर मोडोन टाकीत ॥ ६६ ॥ तों रितो जाहला तूणीरँ ॥ जटायूस न लागे एक शर ॥ परम प्रतापी तो अरुणपुत्र ॥ केलें विचित्र ते काळीं ॥ ६७ ॥ चंचुघातें परम दारुण ॥ मारिले अश्व मोडिला स्यंदनँ ॥ सारथियाचें शिर छेदोन ॥ न लागतां क्षण पैं नेलें ॥ ६८ ॥ मुकुट धनुष्य तूणीर ॥ झडप घालोनि नेलें समग्र ॥ चूर्ण केले वस्त्रालंकार ॥ दशकंधर नग्न उभा ॥ ६९ ॥ रावणमस्तकींचे केश ॥ उपडोनि टाकिले निःशेष ॥ क्षीणपणक जैसा लंकेश ॥ निःशस्त्री नग्न उभा असे तो ॥ १७० ॥ गगनींहून अकस्मात ॥ रावणावर पडे जैसा पर्वत ॥ चंचुघातें समस्त ॥ मस्तकें दाही फोडिलीं ॥ ७१ ॥ रुधिरें जाहला बंबाळ ॥

८१ विरघळतात. ८२ मर्मस्थानीं. ८३ गरुडवाहना. ८४ हत्ती. ८५ पोंचवल्यासाठीं. ८६ रिकामा. ८७ माता. ८८ जटायु. ८९ रथ. ९० बौद्धमताचा साधु.

जैसा कुंकुमें माखिला शैलें ॥ सांडिली जानकी वेल्हाळ ॥ घेतला पळ रावणें ॥ ७२ ॥ हृदयीं बोध ठसावतां समग्र ॥ निःशेष पळे अहंकार ॥ सीता टाकोनि दशकंधर ॥ पळे तैसा भयेंचि ॥ ७३ ॥ मनीं विचारी लंकानाथ ॥ पांखरें मज गांजिलें बहुत ॥ मग उभा राहोनि तेथ ॥ पाचारीत जटायूतें ॥ ७४ ॥ म्हणे तुज रघुनाथाची आण ॥ सांगें तुझें मृत्यंग कोण ॥ मीही सांगतों आपुलें मरण ॥ युद्धकंदन मग करूं ॥ ७५ ॥ जटायु म्हणे पक्ष उपडितां ॥ मज मृत्यु तेव्हांच तत्त्वतां ॥ तुझें मरण लंकनाथा ॥ तैसेंच सांगें त्वरेनें ॥ ७६ ॥ येरू म्हणे चरणांगुष्ठ फोडितां ॥ मी मृत्यु पावेन क्षण न लागतां ॥ जटायु यावयासी हाता ॥ राक्षसेंच केला उपाय ॥ ७७ ॥ जटायूनें धांवूनि आंवळिला ॥ दशमुखाचा अंगुष्ठ फोडिला ॥ येरें झेंप घालोनि ते वेळां ॥ दोन्ही पक्ष उपडिले ॥ ७८ ॥ भडभडां चालिलें रुधिर ॥ कासावीस जाहला तो ढिंजेवर[९२] ॥ म्हणे केव्हां येईल रघुवीर ॥ हा समाचार सांगेन तया ॥ ७९ ॥ स्कंदेतातमित्रांगना[९३] ॥ स्कंधीं घेऊनि राक्षसराणा ॥ गति थोडी वाटे पवना ॥ निराळमार्गें तेवीं जाय ॥ १८० ॥ जटायुकारणें अत्यंत ॥ जनकतनया शोक करीत ॥ निजकरें ललाट पिटीत ॥ आक्रंदत दीर्घस्वरें ॥ ८१ ॥ म्हणे जटायु भक्त पूर्ण ॥ मजकारणें वेंचिला प्राण ॥ मी रामपितृव्य म्हणोन ॥ दशरथासमान मानिला ॥ ८२ ॥ ऐसी सीता शोक करीत ॥ रावण निराळमार्गें जात ॥ तों मातंगपर्वतावरी अद्भुत ॥ पांच वानर उभे असती ॥ ८३ ॥ सुग्रीव नळ नीळ जांबुवंत ॥ पांचवा महारुद्र हनुमंत ॥ ज्याचा बळप्रताप अद्भुत ॥ व्यासवाल्मीकीं वर्णिला ॥ ८४ ॥ उपजतांचि बाळपणीं ॥ क्षणें आकळिला जेणें तरणी[९४] ॥ इंद्रादिक निर्जर समरांगणीं ॥ जर्जर केले प्रतापें ॥ ८५ ॥ अंतरिक्षें जातां दशकंधर ॥ जानकी फाडी चीरेंपदर[९५] ॥ अलंकार बांधोनि समग्र ॥ मारुतीकडे टाकिले ॥ ८६ ॥ ते ग्रंथि घेऊन हनुमंतें ॥ निराळमार्गें पाहे वरुतें ॥ तों राक्षस जाय गगनपंथें ॥ जानकीतें घेवोनि ॥ ८७ ॥ हांक फोडीत सुंदरा ॥ धांव रामा राजीवनेत्रा ॥ घनश्यामा कोमळगात्रा ॥ वंद्य त्रिनेत्रा विधीतें ॥ ८८ ॥ हे राम जगदंकुरकंदा ॥ हे ताटिकांतका ब्रह्मानंदा ॥ हे राक्षसांतका जगद्वंद्या ॥ पाव एकदां मजलागीं ॥ ८९ ॥ ऐसें ऐकतां हनुमंत ॥ मनीं आवेशला अत्यंत ॥ म्हणे कोणा सभाग्याची वस्त ॥ राक्षस नेतो चोरूनि ॥ १९० ॥ मारोनियां रजनीचर ॥ सोडवूं आतां हे सुंदर ॥ तिचा शोधीत येईल भ्रतार ॥ देऊं तयासी साक्षेपें ॥ ९१ ॥ जैसा देखतां वारण ॥ अकस्मात पडे पंचानन ॥ भयभीत जहाला रावण ॥ म्हणे हें विघ्न दूसरें ॥ ९२ ॥ मारुतीचें उड्डाण अद्भुत ॥ गेला ध्रुवमंडळापर्यंत ॥ तों रावण प्रवेशला लंकेंत ॥ अदृश्य होत क्षणमात्रें ॥ ९३ ॥ काळाचे दाढेंत पडतां उरला ॥ सर्पमुखींचा मूषक पळाला ॥ मृगेंद्रकवेतूंन[९६] वांचला ॥ पूर्वभाग्यें जंबुकें[९७] ॥ ९४ ॥ व्यर्थ गेलें कपीचें उड्डाण ॥ मनीं म्हणे अंजनीनंदन ॥ पुढें याचा सूड घेईन ॥ बहुत गांजीन राक्षसां ॥ ९५ ॥ मग अवनिजेचे[९८] अलंकार ॥ अवनिगर्भी[९९] ठेवीत वानर ॥ इकडे लंकेंत दश-

९१ पर्वत. ९२ पक्षिश्रेष्ठ. ९३ कार्तिकस्वामीचा पिता जो शंकर त्याचा मित्र जो राम त्याची स्त्री सीता. ९४ सूर्य. ९५ वस्त्राचा पदर. ९६ सिंहाच्या मिठींतून. ९७ कोल्हा. ९८ सीतेचे. ९९ भूमीत.

कंधर ॥ काय करिता जाहला ॥ ९६ ॥ परम सबळ अठरा राक्षस ॥ त्यांसी आज्ञापी लंकेश ॥ म्हणे जाऊनि पंचवटीस ॥ शोधा रामासी साक्षेपें ॥ ९७ ॥ राघवा आणि लक्ष्मणा ॥ वधोनि यावें दोघांजणां ॥ त्यांहीं मस्तकीं वंदोनि आज्ञा ॥ उत्तरपंथें चालिले ॥ ९८ ॥ कीं काळें बोलावूं पाठविले ॥ आयुष्यसिंधूचें जळ आटलें ॥ कीं मृत्युपुरीस चालिले ॥ स्थळ पाहावया रावणा ॥ ९९ ॥ रावण सीतेस एकांतीं ॥ नेऊनी मग बहुत प्रार्थी ॥ पायीं लागे लंकापती ॥ काकुळती येतसे ॥ २०० ॥ वैभवसंपत्ति दावी समस्त ॥ वर्णी आपुला पुरुषार्थ ॥ म्यां बंदीं घातले देव समस्त ॥ मज त्वरित वरीं कां ॥ १ ॥ लाज न धरी कामातुर ॥ मरण नेणे प्रतापशूर ॥ मद्यपियास सारासार ॥ कांहीं विचार समजेना ॥ २ ॥ कैंमुकासी नव्हेचि विरक्ती ॥ मैंदासी[1] काय हरिभक्ती ॥ व्याघ्रासी उपजेल शांती ॥ काळत्रयीं घडेना ॥ ३ ॥ असो लाज सोडोनि दशवदन ॥ म्हणे जानकी ऐक वचन ॥ एकरा[2]शी रामरावण ॥ लावीं लग्न ऐक्यत्वें ॥ ४ ॥ चित्रा नक्षत्र तूळराशी ॥ समान रामरावणांसी ॥ तरी तूं अवज्ञा कां करिसी ॥ बोल वेगें शुभानने ॥ ५ ॥ जानकी म्हणे दशमुखा ॥ तस्करा महामलिना मूर्खा ॥ पतंग आलिंगितां दीपिका ॥ कैसा मग वांचेल ॥ ६ ॥ प्रळयामींत स्नान करूनी ॥ मशक केवीं येईल परतोन ॥ वासुकीचा विषदंत पाडूनी ॥ मूषक कैसा आणील ॥ ७ ॥ मृगेंद्रजिव्हेचें मांस देख ॥ तोडूनि केवीं वांचेल जंबुक ॥ आदित्यमंडळ मंडूक ॥ पाडील कैसें भूमीतें ॥ ८ ॥ सौदामणी आणि समुद्र ॥ दोन्ही एकराशी साचार ॥ वायस आणि वैनतेय पक्षींद्र ॥ एकराशी होतसे ॥ ९ ॥ सिंह आणि शृगाल जाण ॥ मशक महेश राशी समान ॥ तम आणि तरणि पूर्ण ॥ केवीं समान सांग पां ॥ २१० ॥ रजकु आणि रमावर ॥ कुक्कुट आणि कुंजर ॥ रजनीचर आणि रघुवीर ॥ केवीं समान सांग पां ॥ ११ ॥ कंटक आणि कंजलोचन ॥ कपटी आणि कमळासन ॥ तैसा राम आणि रावण ॥ राशिगुण कासया ॥ १२ ॥ मदनें सर्वांसी जिंकिलें ॥ परी शिवापुढें तें न चाले ॥ अग्नीनें सर्वांसी जाळिलें ॥ परी मेघापुढें काय तो ॥ १३ ॥ सर्वांसी गांजिसी तूं परम ॥ परी मज स्पर्शतां होसी भस्म ॥ आतां तुज वधावया रघूत्तम ॥ पूर्णकाम येईल ॥ १४ ॥ मनीं भावी रावण ॥ हिवें जों स्थिरावे मन ॥ तोंवरी अशोकवनीं नेऊन ॥ ठेवूं ईतें रक्षोनियां ॥ १५ ॥ मग त्रिजटेचेनि अनुमतें ॥ अशोकवनीं ठेवी जानकीतें ॥ भोंवतीं दृढ रक्षणें बहुतें ॥ ठायीं ठायीं ठेविलीं ॥ १६ ॥ अशोकवनाबाहेर ॥ पांच कोटी रजनीचर ॥ सावध बैसले अहोरात्र ॥ नव्हे संचार वायूचा ॥ १७ ॥ निधानाभोंवत्या भूतावळी ॥ रक्षिती जैशा सर्वकाळीं ॥ तैशा राक्षसी सीतेजवळी ॥ वेष्टोनियां बैसल्या ॥ १८ ॥ सत्वशीळ बिभीषण ॥ साधु पुण्यपरायण ॥ म्हणे सीता आणून संपूर्ण ॥ कुळक्षय मांडिला ॥ १९ ॥ रावण परम कामातुर ॥ जाहला उन्मत्त अविचार ॥ तप्त जाहलें शरीर ॥ नावडे उपचार विलास ॥ २२० ॥ ब्रह्यासी म्हणे रावण ॥ पुरे तुझें वेदाध्ययन ॥ अंगिरोपति तुझें

१०० कामातुराला. १ लुटारूला. २ राम आणि रावण यांचें एक नक्षत्र एक राशि आहे. ३ धोब्याचें पाण्याचें टांकें ४ काचळा. ५ गरुड. ६ सूर्य. ७ परीट. ८ इच्छी. ९ कमळनयन राम. १० बृहस्पती.

ज्ञान ॥ ठेवीं झांकोन क्षणभरी ॥ २१ ॥ किन्नर हो पुरे गायन ॥ नका चेतवूं पंचबाण ॥ सीतेच्या भोगालागीं प्राण ॥ कासाविस होताती ॥ २२ ॥ सकळ गंगा घरीं राबत ॥ तयांसी म्हणे लंकानाथ ॥ शीतळ उपचार बहुत ॥ करा आतां मजलागीं ॥ २३ ॥ बोलावूनि राक्षसिणी ॥ रावण सांगे त्यांचे कर्णीं ॥ सीतेसी तुम्ही भेडसावुनी ॥ मम शयनीं वश करा ॥ २४ ॥ अवश्य म्हणती निशाचरी ॥ अमंगळ घांविन्नल्या एकसरी ॥ म्हणती सीते तूं रावणासी वरीं ॥ नाहीं तरी तुज भक्षूं ॥ २५ ॥ विकट रूप विशाळ कर्ण ॥ एक वक्रमुख लंबस्तन ॥ बाबरझोटी आरक्तनयन ॥ भेडसाविती सीतेतें ॥ २६ ॥ खरमुख व्याघ्रवदन ॥ सूकरगजमुख लंबचरण ॥ ज्यांच्या नासिकांमाजी जाण ॥ खर तुरंग गुंतले ॥ २७ ॥ एकी स्तनचपेटेकरूनी ॥ झाडें टाकिती मोडूनी ॥ एकपदा द्विपदा त्रिचरणी ॥ खाऊं म्हणती सीतेतें ॥ २८ ॥ परम कुरूप कुत्सित वर्ण ॥ अमंगळ दुर्गंधि विटे मन ॥ एक म्हणे इचे नरडीं बैसोन ॥ घोट घेऊं आतांचि ॥ २९ ॥ एक म्हणती काढा शिरा ॥ दांत खाती करकरां ॥ डोळे वटारिती पुढारां ॥ हांका देती आक्रोशें ॥ २३० ॥ ऐसें करिती राक्षसिणी ॥ परी ते त्रिभुवनपतीची राणी ॥ निर्भय परम अंतःकरणीं ॥ कदा न गणी तयांसी ॥ ३१ ॥ संसारदुःखें नानागती ॥ ज्ञानियांचे अंगीं आदळती ॥ परी ते सहसा न गणिती ॥ सीता सती तैशीच ॥ ३२ ॥ बहुत भुंकती श्वान ॥ परी कदा न भी वारण ॥ कीं जंबुकहाकें पंचाननें ॥ कदा दचकोनि उठेना ॥ ३३ ॥ कीं सुटतां झंझामारुत ॥ धुळीनें तृण बहुत उडत ॥ परी बैसेंक न सोडी पर्वत ॥ निर्भय सत्य सीता तैसी ॥ ३४ ॥ जैसी कागांमाजी जाण कोकिळा ॥ तैसी त्रिजटा पुण्यशीळा ॥ राक्षसी दटावून सकळा ॥ दूर केल्या साक्षेपें ॥ ३५ ॥ त्रिजटा म्हणे जनकनंदिनी ॥ तूं चिंता न करीं मनीं ॥ तुज भेटेल कोदंडपाणी ॥ अल्पकाळेंकरूनियां ॥ ३६ ॥ वर्तमान अयोध्येपासोनी ॥ जें जें वर्तलें जनस्थानीं ॥ त्रिजटेप्रति जनकनंदिनी ॥ सांगे सकळ प्रीतीनें ॥ ३७ ॥ सिंहावलोकनेंकरून ॥ परिसा मागील चरित्र पूर्ण ॥ मृग वधोनि रामलक्ष्मण ॥ आश्रमासी पातले ॥ ३८ ॥ ते कथा गोड अत्यंत ॥ श्रवण करोत ज्ञाते पंडित ॥ रसिक रामविजय ग्रंथ ॥ श्रवणें समस्त कोडें पुरे ॥ ३९ ॥ अयोध्याधीशा ब्रह्मानंदा ॥ श्रीधरवरदा आनंदाकंदा ॥ अभंग अक्षय अभेदा ॥ वेदवंद्या सुखाब्धे ॥ ४० ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ पंचदशाध्याय गोड हा ॥ २४१ ॥ अध्याय ॥ १५ ॥ ओंव्या ॥ २४१ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

११ कैस पिंजारलेल्या. १२ हत्ती. १३ सिंह. १४ मापली वसण्याची जागा. १५ मनांतील इच्छा.

१६

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीरामकथा अति सुरस ॥ सकळ तीर्थांहूनि विशेष ॥ गंगेपरीस निर्दोष ॥ निजभक्तांसी प्रिय होय ॥ १ ॥ इहपरत्र-तीर साचार ॥ रघुवीरचरित्र निर्मळनीर ॥ दाटला पूर्ण प्रेमपूर ॥ गर्जे थोर रामघोषें ॥ २ ॥ गंगेमाजी वाहे जीवन ॥ कथासरिता ते जग-ज्जीवन ॥ चित्तवृत्तिजळेंचरें पूर्ण ॥ माजी निमग्न तळपती ॥ ३ ॥ तेथें घडिघडी डेहुळे[1] पाणी ॥ रामकथा निर्मळ अनुदिनीं ॥ ब्रह्मानंदें उचंब-ळोनी ॥ पुनीत करी त्रिभुवना ॥ ४ ॥ गंगेमाजी बुडतां मरावें ॥ येथें बुडी देतां तरावें ॥ हें विशेष कर्तृत्व स्वभावें ॥ गंगेहूनि अधिक ॥ ५ ॥ राम-कथा करितां श्रवण ॥ सकळही तीर्थीं केलें स्नान ॥ तें फळ आलें हाता पूर्ण ॥ विशेष जाण रामकथा ॥ ६ ॥ ऐसी रघुवीरकथा पावन ॥ परी संत-श्रोते सावधान ॥ तरी वक्तयाचा हर्ष पूर्ण ॥ गगनामाजी न समाये ॥ ७ ॥ पंधरावे अध्यायीं कथा सुंदर ॥ सीतेस घेऊन गेला दशवक्त्र ॥ मृग वधोनि रामसौमित्र ॥ पंचवटीये परतले ॥ ८ ॥ मार्गीं होती अपशकुन ॥ चालतां जड जाहले चरण ॥ आश्रमांत पाहती येऊन ॥ दिसे शून्य भणभणित ॥ ९ ॥ जैसें प्राणाविण कलेवर[2] ॥ कीं उदकेंविण सरोवर ॥ कीं नासिकाविण वक्त्र ॥ शोभिवंत दिसेना ॥ १० ॥ फळेंविण तरुवर ॥ कीं सैन्येंविण नृपवर ॥ कीं वंशीं नसतां कन्याकुमर ॥ व्यर्थ मंदिर ज्यापरी ॥ ११ ॥ कीं दयेवांचूनि ज्ञान ॥ कीं प्रेमेंविण कीर्तन ॥ कीं बुबुळेंविण नयन ॥ गुंफा शून्य तेवीं दिसे ॥ १२ ॥ ऋषींप्रति पुसावें वर्तमान ॥ तंव ते पळाले कुटुंबें घेऊन ॥ दशदिशा दिसती शून्य ॥ रघुनंदन गहिंवरला ॥ १३ ॥ नेत्रीं चालिल्या अश्रुधारा ॥ सीता सांग कोठें सौमित्रा ॥ ऐसें बोलतां नवपंकजनेत्रा[3] ॥ मूर्च्छना आली ते वेळीं ॥ १४ ॥ निचेष्टित पडे रघुनंदन ॥ वारा घाली लक्ष्मण ॥ नेत्रांस लावोनि जीवन[4] ॥ जगज्जीवन सावध केला ॥ १५ ॥ देवाधिदेव आत्माराम ॥ नीलग्रीव[5] जपे ज्याचें नाम ॥ त्यासी कां जाहला मोहभ्रम ॥ नवल परम हें वाटे ॥ १६ ॥ अंधकूपीं बुडाला दिनकर[6] ॥ प्रळयाग्नीस बाधी शीतकर[7] ॥ कल्पवृक्ष दारोदार ॥ मागेल भिक्षा कासया ॥ १७ ॥ काळासी भूतें झडपिंती ॥ मृगजळीं बुडाला गभस्ती[8] ॥ म्हणोनि सीतेसाठीं रघुपती ॥ करी खंती[9] नवल हें ॥ १८ ॥ तो पुराणपुरुष रघुनंदन ॥ मायातीत शुद्धचैतन्य ॥ परी मायेचा अभिमान पूर्ण ॥ मायामय लटिकाचि ॥ १९ ॥ दावी वर्तोनि जगद्गुरु ॥ करोनि मायामय पसारु[10] ॥ हें जगीं वोडंबर[11] दावी रघुवीरु ॥ मायामय लटिकेंचि ॥ २० ॥ असो वसिष्ठें उपदेशिलें ज्ञान ॥ कीं सर्वद्रष्टा एक आपण ॥ जैंगडंबर[12] भास पूर्ण ॥ मायामय लटिकाचि ॥ २१ ॥ जैशा स्वप्नींच्या जन्मपंक्ती ॥ यातना भोगी नानागती ॥ जागा होतां निश्चितीं ॥ मिथ्यामय सर्वही ॥ २२ ॥ स्वप्नामाजी पतिव्रता ॥ जैसें मरण देखे प्राणनाथा ॥ परी सवेंचि जागी होतां ॥ सौभाग्य पाहतां तैसेंचि ॥ २३ ॥ घट फुटतां चंद्रबिंब ॥ तैसेंचि असे स्वयंभ ॥ तरी अवतारलीला सीतावल्लभ ॥ संपादोनि दावीतसे ॥ २४ ॥ असो सौमित्रास म्हणे रघुनाथ ॥ भोंवतें वृक्ष आणि पर्वत ॥ यांसी पुसों यथार्थ ॥ सीताशुद्धी[13] ते सांगती ॥ २५ ॥ गिरिकंदरीं गिरिमाळे[14] ॥ शोधीत जात तमाळनीळ ॥ गोदातीरीं निर्मळ ॥ शोभी सकळ सौमित्र ॥ २६ ॥ वनोवनीं राम धांवत ॥ सीते सीते आळवीत ॥

१ चित्तवृत्ति हेच पाण्यांत राहणारे जीव. २ गठूळ होतें. ३ देह. ४ श्रीरामास. ५ पाणी. ६ शिव. ७ सूर्य. ८ चंद्र. ९ पछाडतात. १० खेद, शोक. ११ गारुडीविद्या. १२ जगाचा पसारा. १३ सीतेचा शोध, तपास. १४ पर्वतांची ओळ.

कुरंगनयने[15] भेट त्वरित ॥ शोकें बहुत व्यापलों ॥ २७ ॥ बदक चातक राजहंस ॥ मयूर रावे[16] साळ्या[17] सरस ॥ तयांसी पुसे अयोध्याधीश ॥ कोठें डोळस जानकी ॥ २८ ॥ मृग शार्दूळ सिंह उरगे[18] ॥ नकुळ[19] सूकर कस्तूरीमृग ॥ कोकिळा चक्रवाकें भृंग ॥ सीतारंग[20] पुसे तयां ॥ २९ ॥ कोणी न देती उत्तर ॥ त्यांवरी कोपला रघुवीर ॥ सौमित्रा आणीं धनुष्य शर ॥ छेदीन कांतार[21] सर्वही ॥ ३० ॥ सौमित्र म्हणे रघुनंदना ॥ हे केवीं जाणती तुझी अंगना ॥ यांवरी कोप राजीवनयना ॥ सहसाही न करावा ॥ ३१ ॥ सीताविरहें रघुनंदन ॥ भुलोनि बोले काय वचन ॥ लक्ष्मणासी पुसे तूं कोण ॥ काय कारण येथें उभा ॥ ३२ ॥ तेव्हां सौमित्र बोले वचन ॥ श्रीरामाचा बंधु मी पूर्ण ॥ मग बोले वेदवंद्य रघुनंदन ॥ राम तो कोण कोठील ॥ ३३ ॥ भवे[22]कोदंड भंगिलें थोर ॥ तोचि राम समरधीर ॥ मग बोले सीतावर ॥ धनुष्य कोठें भंगिलें ॥ ३४ ॥ जनकाचिया मंडपांत ॥ धनुष्य भंगिलें यथार्थ ॥ जनक कोणाचा निश्चित ॥ सांग मज आतांचि ॥ ३५ ॥ जानकीचा जो पिता ॥ तो जनक जाण रघुनाथा ॥ अहा जानकी गुणसरिता ॥ मज आतांचि दावीं रे ॥ ३६ ॥ सौमित्रासी म्हणे रघुवीर ॥ आमुचें कोठें ग्राम मंदिर ॥ येरू म्हणे अयोध्यापुर ॥ सेविलें कांतार[23] पितृआज्ञें ॥ ३७ ॥ वना आलों कोण कोण ॥ उत्तर देत सुमित्रानंदन ॥ तुम्ही आम्ही सीताचिद्रत्न ॥ तिघें जण आलों वना ॥ ३८ ॥ तरी जानकीं दावीं त्वरित ॥ ऐसें बोले रघुनाथ ॥ भूमीवरी मूर्च्छागत ॥ सौमित्र मग सांवरी ॥ ३९ ॥ तों अस्ता गेला दिनकर[24] ॥ रात्रीमाजी प्रगटे रोहिणीवर[25] ॥ राम म्हणे रे जाळितो मित्र[26] ॥ अति तीव्र बहुत कां ॥ ४० ॥ मग बोले सुमित्रासुत ॥ स्वामी हा चंद्र नव्हे आदित्य ॥ शीतळकिरण उष्ण वाटत ॥ सीताविरहेंकरूनियां ॥ ४१ ॥ श्रीरघुनाथ देवाधिदेव ॥ दावी इत्यादि बहुत भाव ॥ जो अज अजित स्वयमेव ॥ उमाधव ध्याय जया ॥ ४२ ॥ सीते सीते म्हणोन ॥ आलिंगीत वृक्ष पाषाण ॥ तों तत्काळ ते उद्धरोन ॥ जाती बैसोन विमानीं ॥ ४३ ॥ सौमित्रासी म्हणे रघुनंदन ॥ चला घेऊं अगस्तीचें दर्शन ॥ त्यासी सांगों वर्तमान ॥ बुद्धि तो पूर्ण सांगेल ॥ ४४ ॥ अगस्तीचे आश्रमाप्रती ॥ तत्काळ राम सौमित्र येती ॥ तों द्वारपाळ जाऊं न देती ॥ उभे करिती तयांतें ॥ ४५ ॥ कैलशोद्भवासी[27] वर्तमान ॥ सेवक सांगती जाऊन ॥ तों सीता गेला घेऊनि रावण ॥ ऋषीस ज्ञानीं समजलें ॥ ४६ ॥ अंतरीं विचारी मुनी ॥ राम राज्य सांडोनि हिंडे वनीं ॥ हारविली जनकनंदिनी ॥ शोकेंकरून व्यापिला ॥ ४७ ॥ स्त्रीविरहित रघुनंदन ॥ आतां न घ्यावें त्याचें दर्शन ॥ मग सेवकांहातीं सांगोन ॥ पाठविलें ते काळीं ॥ ४८ ॥ आजि दर्शन नाहीं तुम्हांतें ॥ मागुती जावें आलिया पंथें ॥ हांसें आलें रघूत्तमातें ॥ हृदय ऋषीचें जाणोनि ॥ ४९ ॥ परतोनि चालिला रघुवीर ॥ परम क्रोधावला सौमित्र ॥ म्हणे निर्दय कठिण विप्र ॥ जगदुद्धार परतविला ॥ ५० ॥ ज्योतिर्लिंग जाणोन ॥ लत्ताप्रहारें केलें ताडण ॥ कामधेनु आली आपण ॥ डांगेवरी[28] मारिली ॥ ५१ ॥ कल्पतरु द्वारीं उगवला ॥ तो देखतांचि अभाग्यें उपडिला ॥ परीस जाणोनि गोफणिलें[29] ॥ चिंतामणी घातला पायरीस ॥ ५२ ॥ अमृतकुंभ दैवें लाघला ॥ तो जाणोनि बळेंच

१५ जिचे नेत्र हरिणासारखे आहेत अशा हे सीते. १६ पोपट. १७ साळुंक्या. १८ वाघ. १९ सर्प. २० मुंगुस. २१ राम. २२ अरण्य. २३ शिवधनुष्य. २४ सूर्य. २५ चंद्र. २६ अगस्तीला. २७ दांड्यानें. २८ फेंकून दिला.

उलंडिला ॥ जगद्वंद्य घरासी आला ॥ माघारा दवडिला समजोनि ॥ ५३ ॥ मग बोले रघुनंदन ॥ अगस्ति परम सज्ञान ॥ तो सीतेविण माझें दर्शन ॥ सहसाही न घेचि ॥ ५४ ॥ मी निर्विकार निर्गुण ॥ सीता सर्वांसी कारण ॥ तिनें मज जागें करून ॥ सगुणत्वासी आणिलें ॥ ५५ ॥ तिनें निर्मून पंचभूतें ॥ त्रिगुणें[29] आणि तत्त्वें समस्तें ॥ अवतारखेळ कौतुकें बहुतें ॥ दावी जनां तेचि पैं ॥ ५६ ॥ मी अरूप अनाम निश्चितीं ॥ हें सर्व जाणे अगस्ती ॥ तो ऋषींमाजी केवळ गभस्ती[30] ॥ तपें ज्ञानें तेजस्वी जो ॥ ५७ ॥ असो श्रीराम जगजेठी ॥ परतोनि आला पंचवटीं ॥ वृक्ष गुल्म लता कवळी पोटीं ॥ सीता सीता म्हणोनियां ॥ ५८ ॥ पंचवटीचा त्याग करून ॥ तत्काळ चालिला रघुनंदन ॥ जैसी अहंदेहबुद्धि सांडोन ॥ योगी विचरे निरंजनीं[31] ॥ ५९ ॥ कीं प्राण त्यागिलिया काया जैसी ॥ कीं कोपत्यागें जमदग्नि ऋषी ॥ कीं संसारमाया निश्चयेंसीं ॥ विरक्त त्यागी मनींहूनि ॥ ६० ॥ जीर्ण देह त्यागोनि उरग[32] ॥ कीं तपोधन करी कामत्याग ॥ कीं पवित्र त्यागी कुमार्ग ॥ श्रेष्ठ कर्म जाणोनियां ॥ ६१ ॥ कीं परनिंदा सज्जन टाकिती ॥ आत्मस्तुति सांडिजे संतीं ॥ कीं अमंगळाची संगती ॥ न धरिती श्रोत्री[33] कदाही ॥ ६२ ॥ कीं संसारदुःखें दारुण ॥ विवेकी त्यागी जैसें वमन ॥ तैसी पंचवटी त्यागोन ॥ राम लक्ष्मण चालिले ॥ ६३ ॥ तों मग देखे रघुनंदन ॥ द्वादश हात लांब चरण ॥ चार हात रुंद पूर्ण ॥ राक्षसपाउलें उमटलीं ॥ ६४ ॥ त्यांजवळी कुंकुमांकित जाण ॥ सीतेचे उमटले चरण ॥ मुक्तें[34] विद्रुमें[35] पडलीं गळोन ॥ लक्ष्मण पाहे विस्मित ॥ ६५ ॥ कैमळिणीमित्रकुळभूषण[36] ॥ शोधीत जात घोर विपिन ॥ तों जटायु देखिला दुरोन ॥ रक्तेंकरून बंबाळ ॥ ६६ ॥ किंशुक[37] फुलला बहुत ॥ कीं दुरोन आरक्त दिसत ॥ तैसा जटायु पडला तेथ ॥ रामस्मरण करीतचि ॥ ६७ ॥ रघुनाथें भाते घेतले ॥ धनुष्य वेगीं चढविलें ॥ श्रीरामासी ऐसें भासलें ॥ कीं हा राक्षस बैसलासे ॥ ६८ ॥ भक्षोनियां जनकनंदिनी ॥ बैसलासे तृप्त होउनी ॥ रक्त वाहत चहूंकडोनी ॥ पर्वतीं जैसा पाझर ॥ ६९ ॥ जवळी आला चापपाणी ॥ तों रामनामाची मधुर ध्वनी ॥ ती रघूत्तमें ऐकोनि श्रवणीं ॥ येत धांवोनि समीप ॥ ७० ॥ तों डोळां उरलासे प्राण ॥ जटायु पडिला करीत स्मरण ॥ रघुनाथ तो भक्त देखोन ॥ हृदयीं पूर्ण गहिंवरला ॥ ७१ ॥ जटायूस पुढें घेऊन देख ॥ शोक करी अयोध्यानायक ॥ कीं एकुलतें मरतां बाळक ॥ माता तळमळे ज्यापरी ॥ ७२ ॥ कीं परम मित्र बंधु रणीं ॥ पडलिया वाटे जेवीं हानी ॥ त्याचपरी चापपाणी ॥ हृदयीं धरोनि विलपत ॥ ७३ ॥ परम खेद करी सौमित्र ॥ म्हणे जटायु भक्त आणि मित्र ॥ जो मित्रसारथियाचा[38] पुत्र ॥ ऐसा पवित्र नाढळे ॥ ७४ ॥ जटायूस म्हणे रघुवीर ॥ बा रे काय जाहला समाचार ॥ तो मज सांग अणुमात्र ॥ जरी शक्ति असेल बोलावया ॥ ७५ ॥ श्रीरामाचे कर्णयुगलीं ॥ हळूच जटायु सांगे ते वेळीं ॥ रावणें सीता लंकेसी नेली ॥ म्यां सोडविली होती येथें ॥ ७६ ॥ भोंवतें पाहे रघुनंदन ॥ तों अश्व सारथी आणि स्यंदन ॥ रावणाचीं वस्त्रें अलंकार पूर्ण ॥ चूर्ण होऊन पडियेलीं ॥ ७७ ॥ पाहतां जटायूचा पराक्रम ॥ पुढती गहिंवरे रघूत्तम ॥ सीताशोकाहून परम ॥ शोक वाटे जटायूचा ॥ ७८ ॥

२९ सत्त्व, रज आणि तम. ३० सूर्य. ३१ एकांतवासांत. ३२ सर्प. ३३ वेदवेत्ते, अग्निहोत्री. ३४ मोत्यें. ३५ पोंवळीं. ३६ श्रीराम. ३७ पळसाचें झाड. ३८ सूर्याचा सारथि जो अरुण त्याचा पुत्र.

जटायु बोले वचन ॥ रघुपति तुझी घालोनि आण ॥ राक्षसें घेतला माझा प्राण ॥ पक्ष उपडोनि टाकिले ॥ ७९ ॥ माझ्यानें आतां न बोलवे देख ॥ म्हणोनि पदीं ठेविला मस्तक ॥ श्रीरामाचें नेत्रोदक ॥ अभिषेक करी जटायूतें ॥ ८० ॥ मग बोले रघुनंदन ॥ जटायु तुज मी उठवीन ॥ मज तूं साह्य होईं पूर्ण ॥ दशरथाऐसा सत्वर ॥ ८१ ॥ मग बोले अरुणनंदन ॥ ऐसें मज पुढें न ये मरण ॥ तुझे अंकावरी जाण ॥ सोडीन प्राण आतांचि ॥ ८२ ॥ जटायु विलोकी रामवदन ॥ हृदयीं रेखिलें तैसेंचि ध्यान ॥ मुखें करीत नामस्मरण ॥ चालिला प्राण ते काळीं ॥ ८३ ॥ श्रीरामें तेव्हां हृदयीं धरिला ॥ तेथेंच जटायूनें प्राण सोडिला ॥ ब्रह्मा हंसविमान घेऊन आला ॥ वरी बैसविला जटायु ॥ ८४ ॥ जटायूस म्हणे रघुनंदन ॥ तुज स्वर्गीं भेटेल दशरथ जाण ॥ त्यासी सीता नेली हें वर्तमान ॥ सहसाही न सांगावें ॥ ८५ ॥ परम प्रतापी दशरथ पिता ॥ कर्मभूमीस येईल मागुता ॥ यालागीं न सांगावी हे वार्ता ॥ जाण तत्त्वतां जटायो ॥ ८६ ॥ मी रावणासी वधोनी ॥ पाठवीन स्वर्गभुवनीं ॥ मग तो स्वमुखेंकरूनी ॥ वृत्तांत सर्व सांगेल ॥ ८७ ॥ असो जटायु स्वर्गा पावला ॥ रघुनाथें तो पितृव्य मानिला ॥ दशरथें बंधु म्हणविला ॥ शंक्राचिया[४०] युद्धकाळीं ॥ ८८ ॥ यालागीं जनकजामातें ॥ पितृव्य मानिलें जटायूतें ॥ त्याचेनि संगें सीताकांतें ॥ पंचवटिये काळ क्रमियेला ॥ ८९ ॥ घडीघडी येवोनि बैसे ॥ श्रीराम त्यासी गोष्टी पुसे ॥ जटायु भक्त विशेषें ॥ रघुपतीचा आवडता ॥ ९० ॥ त्याची उत्तरक्रिया समस्त ॥ करिता जाहला कौसल्यासुत ॥ सौमित्रें काष्ठें मेळवून बहुत ॥ अग्नि दिधला तयासी ॥ ९१ ॥ ऐसा भक्तकरुणाकर ॥ शरणागतां वज्रपंजर[४१] ॥ पुढें चालिला राघवेंद्र ॥ सीता सुंदर शोधावया ॥ ९२ ॥ दक्षिणपंथें दंडकारण्यांत ॥ जेथें जेथें राहिला रघुनाथ ॥ शिवलिंग स्थापिलें तेथें ॥ बाणचिन्हांकित अद्यापि ॥ ९३ ॥ मयूरगिरि परम गहन ॥ तेथें आला अहल्योद्धारण ॥ हे सीते हे सीते म्हणोन ॥ वृक्षपाषाण आलिंगी ॥ ९४ ॥ तों कैलासीं वर्तलें नवल ॥ बैसला असतां जाश्वनीळ[४२] ॥ हातीं घेऊनि जपमाळ ॥ जपे कोमळ रामनाम ॥ ९५ ॥ जेणें शमलें हालाहळ ॥ तें सहस्रनामांहूनि निर्मळ ॥ चंद्रापरीस अति शीतळ ॥ अमृताहून गोड पैं ॥ ९६ ॥ जें दिनकरापरीस तेजाळ ॥ जें आकाशापरी विशाळ ॥ जें सकळ आनंदाचें मूळ ॥ नाम केवळ परब्रह्म ॥ ९७ ॥ रूप सगुण नाम निर्गुण ॥ रूप मायामय आनंदघन ॥ रूप झांके नाम पूर्ण ॥ अनंतयुगीं ठसावें ॥ ९८ ॥ रूप सर्वांचि नाम निर्वचे[४३] ॥ रूप क्षणिक नाम साच ॥ नामअर्थ करितां उगेच ॥ वेद तटस्थ राहिले ॥ ९९ ॥ असो तें नाम सर्वांत सार ॥ अखंड जपतां कर्पूरगौर[४४] ॥ तेथें हिमाद्रितनया जोडूनि कर ॥ विनवी सादर शिवातें ॥ १०० ॥ म्हणे स्वामी जप आणि ध्यान ॥ कवणाचें करितां रात्रंदिन ॥ कोण थोर असे तुम्हांहून ॥ मजलागोनि सांगा तें ॥ १ ॥ शिव म्हणे ऐकें शुभकल्याणी ॥ सकळगुणसरिते लावण्यखाणी ॥ जो रविकुळमुकुटदिव्यमणी ॥ मी ध्यातों मनीं तयातें ॥ २ ॥ जो राक्षसकाननवैश्वानर[४५] ॥ जो भक्तहृदयारविंदभ्रमर ॥ जो अज्ञानतमनाशक दिनकर ॥ जो उदार श्रीराम ॥ ३ ॥ जो त्रैलोक्यनगैरस्तंभ[४६] विशाळ ॥ जो निगमवल्लीचें पक्व फळ ॥ जो जगदंकुरकंद[४७]

३९ इंद्राच्या. ४० वज्राच्या पिंजऱ्यासारखा रक्षण करणारा. ४१ शंकर. ४२ नामाचें निर्वचन=कथन. ४३ पार्वती. ४४ दैत्यरूप अरण्याला अग्नि. ४५ त्रैलोक्याचा आधारस्तंभ. ४६ वेदरूपी वेलीचें. ४७ जगाचें उत्पत्तिकारण.

निर्मळ ॥ तो तमाळनीळ श्रीराम ॥ ४ ॥ जो द्विपंचमुखदर्पहरण ॥ जो भवगजदारक पंचानन ॥ जो जनकजामात मखपाळण ॥ त्याचें ध्यान करितों मी ॥ ५ ॥ ऐकतां हांसिन्नली भवानी ॥ तो राम हिंडतो वनीं ॥ सीता सीता म्हणोनी ॥ वृक्ष पाषाण आलिंगितो ॥ ६ ॥ रावणें नेली त्याची युवती ॥ स्त्रीवियोगें भ्रंशली मती ॥ त्याचें ध्यान अहोरात्रीं ॥ तुम्ही करितां नवल हें ॥ ७ ॥ शिव म्हणे तो रघुवीर ॥ लीलावतारी निर्विकार ॥ वेद आणि भोगींद्रं ॥ नेणती पार जयाचा ॥ ८ ॥ तो पूर्णब्रह्मानंद निर्गुण ॥ देवांची करावया सोडवण ॥ सगुणलीलावेष पूर्ण ॥ भक्तांलागीं दावीतसे ॥ ९ ॥ विश्वरूप एक रघुवीर ॥ जेवीं सुवर्ण एक बहु अलंकार ॥ कीं बहुत सदनें एक अंबर ॥ सीतावर व्यापक तैसा ॥ ११० ॥ कीं बहुत लहरिया एक सागर ॥ लोह एक शस्त्रें अपार ॥ पट दिसती चित्रविचित्र ॥ परी तंतु सर्वत्र एकचि ॥ ११ ॥ बहु बिंदु एक जलधर ॥ घृत एक कणिका अपार ॥ कीं अनेक वाद्यांत साचार ॥ एकचि नाद दुमदुमे ॥ १२ ॥ एक उर्वी बहुत वनस्पती ॥ एक वेद बहुत श्रुती ॥ कीं एकाच नभीं झळकती ॥ उडुगणें जैशीं अपार ॥ १३ ॥ तैसा राम व्यापक तत्त्वतां ॥ मग बोले हिमनगसुता ॥ तुम्ही एवढा महिमा वर्णितां ॥ त्या रघुनाथा भुलवीन मी ॥ १४ ॥ मग जानकीचें रूप धरूनी ॥ रामासन्मुख आली भवानी ॥ कांचनवर्णी सुहास्यवदनी ॥ पद्मनयनी सुरेख ॥ १५ ॥ बोलतां झळकती दंतपंक्ती ॥ तें तेज न लोपे गगनक्षितीं ॥ पदरजें हिरे होती ॥ अतर्क्य गति तियेची ॥ १६ ॥ अंगींचा मकरंद अपार ॥ त्या सुवासें तृप्त कांतार ॥ सुगंधासी वेधोनि समग्र ॥ षट्पदचक्रें धांवती ॥ १७ ॥ विद्युत्प्राय पीतवसन ॥ सर्वालंकारीं मंडित पूर्ण ॥ राघव तियेतें देखोन ॥ मुख मुरडोन चालिला ॥ १८ ॥ तिकडे न पाहेचि सर्वथा ॥ तंव ते पुढें ये गंजास्यमाता ॥ म्हणे स्वामी रघुनाथा ॥ आल्यें मी सीता पहा मज ॥ १९ ॥ मागुती तियेसी टाकून ॥ राम आलिंगी वृक्ष पाषाण ॥ आश्चर्य करी लक्ष्मण ॥ जानकी सुटोन आली कीं ॥ १२० ॥ मग म्हणे आत्मयारामा ॥ विषकंठहृदया पूर्णब्रह्मा ॥ जानकीलागीं पूर्णकामा ॥ आलिंगन द्यावें जी ॥ २१ ॥ व्याघ्राचिये कवेंतुनी ॥ पूर्वभाग्यें वांचे कुरंगिणी ॥ अयोध्यानाथा तुझी राणी ॥ आली सुटोनि तैशीचि ॥ २२ ॥ सुरवर पाहती गगनीं ॥ म्हणती जानकी जवळी असोनी ॥ तिकडे न पाहे मोक्षदानी ॥ कोप मनीं धरिला कां ॥ २३ ॥ सौमित्र म्हणे पद्मदलाक्षा ॥ मनमोहना निर्विकल्पवृक्षा ॥ सीतेसी आलिंगीं सर्वसाक्षा ॥ पुरवीं अपेक्षा तियेची ॥ २४ ॥ मग बोले रघुवीर ॥ तुम्हांसी नेणवे कापट्यविचार ॥ हे अपर्णादेवी साचार ॥ ठकवावया आली आम्हां ॥ २५ ॥ शिवासी करूनियां पण ॥ ठकवावया आली आपण ॥ तुम्हांस नेणवे हे खूण ॥ अंतर्ज्ञानकळेची ॥ २६ ॥ कैलासींच्या खुणा समस्त ॥ सौमित्रासी सांगे रघुनाथ ॥ स्कंदमाता जाहली तटस्थ ॥ म्हणे हा अजित पूर्णब्रह्म ॥ २७ ॥ मग ते मूळपीठनायिका ॥ प्रकट रूप दावी अंबिका ॥ विश्वजनकाचिया जनका ॥ वर द्यावया पुढें आली ॥ २८ ॥ श्रीराम म्हणे हो माते ॥ ज्ञानगंगे हिमनगसुते ॥ शिवआज्ञा मोडोनि येथें ॥ किमर्थ केलें आगमन ॥ २९ ॥ ऐसें बोलून कौसल्यासुत ॥ सीते सीते म्हणोनि बाहत ॥ तों वृक्ष

४८ दशानन रावणाचा गर्व हरण करणारा. ४९ सिंह. ५० शेष. ५१ आकाश. ५२ पृथ्वी. ५३ नक्षत्रें. ५४ सुवर्णासारख्या वर्णाची. ५५ अरण्य. ५६ भ्रमरसमुदाय. ५७ विजेसारिखें. ५८ गणपतीची आई. ५९ हरिणी. ६० पार्वती. ६१ आदिमाया. ६२ ब्रह्मदेवाच्या.

पाषाण ओ देत ॥ पाहे तटस्थ अंबिका ॥ १३० ॥ दुर्गा म्हणे रघुनंदना ॥ भार्गवजितो[६३] शिवमनरंजना ॥ नरवीरश्रेष्ठा आनंदसदना ॥ जगद्वंद्या जगद्गुरो ॥ ३१ ॥ तूं निर्विकार ज्ञानघन[६४] ॥ तरी कां आलिंगिसी वृक्ष पाषाण ॥ श्रीराम म्हणे हें वर्तमान ॥ पूस जावोनि शिवातें ॥ ३२ ॥ तुझे अंतरीं नाहीं विश्वास ॥ नेणसी अध्यात्मज्ञानलेश ॥ मी कां आलिंगितों वृक्षांस ॥ परमपुरुष शिव जाणे ॥ ३३ ॥ मग अंबिका बोले वचन ॥ तुम्ही एकरूप दोघे जण ॥ एक एकाची अंतरखूण ॥ परस्परें जाणतसां ॥ ३४ ॥ आकाशाचें थोरपण ॥ एकची जाणे प्रभंजन[६५] ॥ कीं समीराचें[६६] सर्वत्र गमन ॥ अंबरें[६७] पूर्ण जाणतसे ॥ ३५ ॥ सर्व सोडून अभिमान ॥ विरिंचिजनका तुज मी शरण ॥ कां आलिंगितां वृक्ष पाषाण ॥ सांगा स्वूण एवढी ॥ ३६ ॥ मग अंपर्णेचे[६८] हृदयीं पूर्ण ॥ रामें प्रकटविलें दिव्यज्ञान ॥ म्हणे आतां वृक्ष पाषाण ॥ पाहें निरखोनि कोण हे ॥ ३७ ॥ सावध पाहे भवानी ॥ तों ते महाऋषि बैसले ध्यानीं ॥ श्रीराम त्यांसी आलिंगोनी ॥ कैवल्यपदा[६९] पाववी ॥ ३८ ॥ सीतेचें करूनि मिस ॥ उद्धरिले रामें तापस ॥ मग म्हणे हा पुराणपुरुष ॥ लीलावेष दावीतसे ॥ ३९ ॥ असो अंबिकेचें पूजन ॥ स्वयें करी रविकुळभूषण ॥ मग देवीनें वरदान ॥ रघुवीरास दीधलें ॥ १४० ॥ म्हणे राजीवाक्षा रघुनंदना ॥ तूं सत्वर वधिशील दशानना ॥ जानकी घेऊनि निजसदना ॥ अयोध्येसी येशील ॥ ४१ ॥ अहो तेचि हे रामवरदायिनी ॥ अंबा तुळजापुरवासिनी ॥ रघुनाथ पुढें चालिला तेथुनी ॥ दक्षिणपंथें शोधीत ॥ ४२ ॥ तों पुढें देखिली कृष्णावेणी ॥ दोष नुरे जिच्या स्मरणीं ॥ तिचे तटीं कोदंडपाणी ॥ क्षण एक बैसला ॥ ४३ ॥ स्नान करावया रघुनंदन ॥ कृष्णेंत प्रवेशला जगन्मोहन ॥ देखोन सखोल जीवन ॥ जगज्जीवन बुडी देत ॥ ४४ ॥ विष्णुतनु कृष्णा साचार ॥ देखोनियां राजीवनेत्र ॥ क्षणें उदकमय जाहलें शरीर ॥ कडे सौमित्र पाहतसे ॥ ४५ ॥ तनु जाहली उदकमय ॥ तंव सौमित्र तेथें घाबरा होय ॥ घटका एक वाट पाहे ॥ म्हणे काय करूं आतां ॥ ४६ ॥ काय जाहली मूर्ति सांवळी ॥ कोठें गेली अनाथाची माउली ॥ श्रीरामा तूं जगाची साउली ॥ माझी केली कां उपेक्षा ॥ ४७ ॥ सौमित्रें अंग धरातलें[७०] धरणीं ॥ म्हणे रामा धांव धांव ये क्षणीं ॥ तूं माझी जनकजननी ॥ वनीं मज सांडिलें कीं ॥ ४८ ॥ राघवा मज उबगलासी ॥ सांडिलें मज घोर वनासी ॥ मी अतां त्यागीन प्राणासी ॥ निश्चयेंसीं राघवेंद्रा ॥ ४९ ॥ जानकीमाता उबगली ॥ तीही मज टाकोन गेली ॥ रघुपति तुझी आशा धरिली ॥ तुवांही केली उपेक्षा ॥ १५० ॥ मग उठोनि सुमित्रासुत ॥ चहूंकडे पाहे तटस्थ ॥ धनुष्य बाण करीं घेत ॥ क्रोध अद्भुत नावरे ॥ ५१ ॥ म्हणे कृष्णे तुज उगमापासूनी ॥ निर्जळ करीन ये क्षणीं ॥ बाण काढिला विचारूनी ॥ मुखीं प्रळयाग्नि जयाचे ॥ ५२ ॥ आणोनि दे माझा रघुवीर ॥ नवमेघरंग राजीवनेत्र ॥ हें जाणोनि अहल्योद्धार ॥ निघे बाहेर ते काळीं ॥ ५३ ॥ सौमित्र चरणीं लागला ॥ ते स्थळीं शंकर स्थापिला ॥ बाहोक्षेत्र म्हणती तयाला ॥ पुढें चालिला रामचंद्र ॥ ५४ ॥ आठ राक्षस रावणें पाठविले ॥

६३ परशुरामास जिंकणाऱ्या. ६४ पूर्ण ज्ञानी. ६५ वायु. ६६ आकाश. ६७ पार्वतीच्या. ६८ मोक्षाला. ६९ भूमीवर निचेष्ट पडला. ७० कंटाळलास.

रामासी वधूनि या सत्वर वहिले ॥ कबंधाचे कैंवे सांपडले ॥ तेही गिळिले क्षणार्धें ॥ ५५ ॥ त्या कबंधाचे कवेआंत ॥ सांपडले सौमित्र रघुनाथ ॥ सांचळें ऐकतां कबंध ॥ पसरोनि आवरिले ॥ ५६ ॥ द्वादश योजनें दोन्ही हस्त ॥ जैसे आड पडिले पर्वत ॥ शिर उतरलें हृदयांत ॥ वज्राघातेंकरूनियां ॥ ५७ ॥ नाहीं तयासी चरण ॥ बैसला दोन्ही हस्त पसरून ॥ त्याचे कवेंत रामलक्ष्मण ॥ अकस्मात सांपडले ॥ ५८ ॥ बळ जाणोनि अद्भुत ॥ धनुष्य सज्जोनि अयोध्यानाथ ॥ तीक्ष्ण शरें दोन्ही हात ॥ छेदोनियां पाडिले ॥ ५९ ॥ श्रीरामबाणें उद्धरला ॥ कबंध दिव्य देह पावला ॥ रघुपतीच्या चरणीं लागला ॥ उभा राहिला कर जोडूनि ॥ १६० ॥ मी दनूचे उदरीं कश्यपसुत ॥ मद्यपानी महा उन्मत्त ॥ स्थूलशिरा ऋषि तप करीत ॥ सेविलें एकांत कानन ॥ ६१ ॥ त्यासी म्यां हांक फोडून ॥ भेडसाविला तपोधन ॥ तेणें शापशस्त्रेंकरून ॥ मज ताडिलें ते काळीं ॥ ६२ ॥ म्हणे तूं चांडाळ पापखाणी ॥ कबंध होऊन पडें वनीं ॥ मग मी लागलों त्याचे चरणीं ॥ उच्छापवाणी बोलिला ॥ ६३ ॥ दशरथसुत दंडकारण्यांत ॥ दशमुख वधावया जातां सत्य ॥ दशा तुझी उजळेल यथार्थ ॥ दनुपुत्रा जाण पां ॥ ६४ ॥ इंद्रपद घ्यावयासी जाण ॥ मी जपत होतों बहुत दिन ॥ वज्रघरें वज्र उचलोन ॥ मस्तकीं माझे ताडिलें ॥ ६५ ॥ मस्तक उदरांत उतरलें ॥ दोन्ही चरण छेदिले ॥ पूर्वकर्म फळासी आलें ॥ कष्ट भोगिले बहुवस ॥ ६६ ॥ जाहला माझा उद्धार ॥ रामा पडिलें माझें शरीर ॥ यासी देवोनि वैश्वानरें ॥ भस्म करीं आतांचि ॥ ६७ ॥ काष्ठें मेळवून सौमित्र ॥ अर्मीत घातलें कलेवर ॥ मग तो पावोनि पुण्यशरीर ॥ विमानांत बैसला ॥ ६८ ॥ परीस झेंगटतां जाण ॥ होय लोहाचें सुवर्ण ॥ तैसा कबंध उद्धरोन ॥ वैकुंठधामा चालिला ॥ ६९ ॥ शंखचक्रादिचिन्हांकित ॥ चतुर्भुज विष्णुभक्त ॥ कबंध उद्धरोनि यथार्थ ॥ तोही जाहला तैसाचि ॥ १७० ॥ मग विमानीं बैसोनि जातां ॥ म्हणे अयोध्याप्रभु रघुनाथा ॥ सुग्रीवासीं मैत्री तत्त्वतां ॥ करीं तूं आतां येथोनि ॥ ७१ ॥ जगद्वंद्या जनकजामाता ॥ जलदगात्रा जन्मरहिता ॥ जलजनेत्रा जलजासनताता ॥ जनार्दना जगद्गुरो ॥ ७२ ॥ असो नमस्कारोनि रघूत्तमा ॥ कबंध पावला निजधामीं ॥ पुढें शबरीचिया आश्रमा ॥ जगदात्मा येता जाहला ॥ ७३ ॥ परम तपस्वी शबरी ॥ तप करितां जाहली म्हातारी ॥ तिच्या आश्रमीं रावणारी ॥ राहता जाहला दिनत्रय ॥ ७४ ॥ तिनें फळें मुळें आणून ॥ भावें अर्चिला रघुनंदन ॥ म्हणे तप जाहलें पूर्ण ॥ राजीवनयन देखिला ॥ ७५ ॥ शबरीसी उपदेशिलें ज्ञान ॥ ती तत्काळ गेली उद्धरोन ॥ शरीर सांडोनि कैवल्यसदन ॥ पावली पूर्ण तत्काळीं ॥ ७६ ॥ सौमित्र म्हणे पुराणपुरुषा ॥ जगदुद्धारा अयोध्याधीशा ॥ मज निजज्ञानें सर्वेशा ॥ कृपा करूनि उपदेशीं ॥ ७७ ॥ मग रामगीता जें आत्मज्ञान ॥ सारासारविचारनिरूपण ॥ लक्ष्मणाप्रति सांगोन ॥ निःसंशय तो केला ॥ ७८ ॥ मायिक जगदाभास पूर्ण ॥ सत्य शाश्वतरूप निर्वाण ॥ ते चिन्मयवस्तु आपण ॥ निजज्ञान या नामें ॥ ७९ ॥ असो यावरी रघुपती ॥ आला हंपीविरूपाक्षाप्रती ॥ पुढें पंपासरोवर निश्चितीं ॥ विश्रांतिस्थान शिवाचें ॥ १८० ॥ दिव्य वल्ली दिव्य द्रुम ॥ सदा सफळ भेदीत व्योमें ॥ तेथें स्फटिकगुहा उत्तम ॥ परम आरामस्थळ जें कां ॥ ८१ ॥

७१ वेंगेत. ७२ चाहुल. ७३ दनू नांवाची स्त्री. ७४ इंद्रानें. ७५ अग्नि. ७६ स्पर्श होतांच. ७७ मोक्षपद. ७८ तत्त्वज्ञान. ७९ मोक्ष. ८० आकाश.

स्फटिकशिळेवरी श्रीराम ॥ बैसला तेव्हां घनश्याम ॥ जेवीं कैलासीं द्यावया क्षेम ॥ बलाहक उतरला ॥ ८२ ॥ सौमित्राचे मांडीवरी ॥ शिर ठेवून रावणारी ॥ श्रमोनियां निद्रा करी ॥ निर्विकारी अजित जो ॥ ८३ ॥ शेषशायी नारायण ॥ तोचि राम इंदिरारमण ॥ सौमित्राचे अंकीं शिर ठेवून ॥ त्याचपरी शोभला ॥ ८४ ॥ असो ते समयीं रघुनाथा ॥ चित्तीं आठवे जनकदुहिता ॥ श्वासोच्छ्वास जगत्पिता ॥ घालोन बोले ते समयीं ॥ ८५ ॥ अहा जानकी मृगांकवदने ॥ गुणसरिते पद्मनयने ॥ सकळ लावण्यगुणनिधाने ॥ कधीं भेटसी मज आतां ॥ ८६ ॥ रामासी जाहला विरहज्वर ॥ तंव कोकिळा बाहती सुस्वर ॥ तयांसी म्हणे त्रिभुवनेश्वर ॥ खुंटो स्वर सदा तूमचा ॥ ८७ ॥ ते वेळीं तमालनीळा ॥ शरण आल्या सर्व कोकिळा ॥ राम म्हणे वसंतकाळा- ॥ माजी शब्द फुटेल ॥ ८८ ॥ मृगमृगींस म्हणे रघुनाथ ॥ तुम्हां संघटतां पारधी वधील सत्य ॥ तंव तीं जाहलीं शरणागत ॥ उच्छाप देत तयांसी ॥ ८९ ॥ तो तुम्हांस रात्रीस वधील सत्य ॥ वरकड दिवस तुम्हांस मुक्त ॥ तंव देखिलीं गजगंजी रमत ॥ काय बोलत तयांसी ॥ १९० ॥ दोघांसी योग होतां यथार्थ ॥ गज पडेल मूर्च्छागत ॥ सात दिवसपर्यंत ॥ अचेतन प्रेतापरी ॥९१॥ तंव तीं आलीं शरण ॥ उच्छाप बोले राजीवनयन ॥ जळांत करितां मैथुन ॥ मूर्च्छा न ये सहसाही ॥ ९२ ॥ मयूरासी म्हणे रघुनायक ॥ तुम्ही व्हारे नपुंसक ॥ तंव तीं शरण येती देख ॥ काय बोले जगद्गुरु ॥ ९३ ॥ नयनीं जे अश्रु स्रवती ॥ तेणेंचि वाढेल तुमची संतती ॥ चक्रवाकांस म्हणे रघुपती ॥ सूर्योदयीं भेट तुम्हां ॥ ९४ ॥ रात्रीं होय तुम्हांस वियोग ॥ तों दृष्टीं देखे कागिणीकाग ॥ त्यांसी म्हणे जन्मांत संग ॥ एकदांच संसारीं ॥ ९५ ॥ मी सीतेविण भ्रमतों देख ॥ तुम्ही भोगितां रतिसुख ॥ यालागीं दंड हाचि निःशंक ॥ तुम्हांसी केला निर्धारें ॥ ९६ ॥ सीतावियोगें रघुनाथ ॥ म्हणे राक्षस येऊन बहुत ॥ यांच्या स्त्रिया हरोनि समस्त ॥ नेईनात सीतेऐशा ॥ ९७ ॥ रतिचेष्टा मजसमोर ॥ कां हो करिती वारंवार ॥ माझी जानकी सुकुमार ॥ मज भेटली नाहीं जों ॥ ९८ ॥ इत्यादि भाव ते समयीं ॥ दावी जनकाचा जांवई ॥ इचे गुणांस गणना नाहीं ॥ कोटि वर्षें शोधितां ॥ ९९ ॥ असो ऋष्यमूकपर्वतावरूनि ॥ वानर विलोकिती चापपाणी ॥ नळ नीळ जांबुवंत तैंरणि- ॥ कुमर पाहे सुग्रीव ॥ २०० ॥ आणि पांचवा तो हनुमंत ॥ जो अवतरला उमाकांत ॥ त्याचें जन्मकर्म अद्भुत ॥ तृतीयाध्यायीं वर्णिलें ॥ १ ॥ रामविजयग्रंथराशी ॥ हेचि केवळ वाराणसी ॥ रामकथा विश्वेश्वरासी ॥ प्रिय म्हणून राहिला ॥ २ ॥ कष्ट न होतां अपार ॥ यात्रेसी धांवती मुमुक्षु नर ॥ श्रवणीं बैसती सादर ॥ संसार कार्य टाकूनि ॥ ३ ॥ येथोनि अरण्यकांड संपलें ॥ पुढे किष्किंधाकांड आरंभिलें ॥ जैसें रत्नाहून रत्न आगळें ॥ वैरागेंरीं निपजे पैं ॥ ४ ॥ याचे परीक्षक संतजन ॥ जे ब्रह्मानंदें परिपूर्ण ॥ श्रीधर तयांसी अनन्यशरण ॥ अभंग अक्षय सर्वदा ॥ ५ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ षोडशाध्याय गोड हा ॥ २०६ ॥ अ० ॥ १६ ॥ ओं० ॥ २०६ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

८१ मेघ. ८२ हत्ती-हरीण. ८३ कावळी-कावळा. ८४ सूर्यपुत्र सुग्रीव. ८५ हिऱ्यांच्या रत्नांच्या-खाणींत.

॥ इति अरण्यकांड ॥

१७

॥ श्रीगणेशाय नमः ॥ संत आणि इतर जन ॥ दिसती समसमान ॥ परी संत सदा आनंदघन ॥ ब्रह्मानंदें डुलती ॥ १ ॥ बकासंगें असतां मराळ ॥ दिसती सारिखे शुद्ध धवळ ॥ परी क्षीर आणि जळ ॥ करिती वेगळें हंसचि ॥ २ ॥ वायसांत वसे कोकिळ ॥ त्यांच्या सारखा दिसे केवळ ॥ परी प्रवर्ततां वसंतकाळ ॥ पंचमस्वरें आळवी तो ॥ ३ ॥ जंबुकवनांत वाढला केसरी ॥ परी त्याची कैसी पावेल सरी ॥ क्षणमात्रें गज विदारी ॥ हांकें भरी निराळें ॥ ४ ॥ स्फटिकांत मुक्ताफळ जाण ॥ दिसे सारिखें समसमान ॥ मुक्त जोहरी काढिती निवडोन ॥ करिती जतन जीवेंसीं ॥ ५ ॥ पाषाणांत परीस असे पूर्ण ॥ दिसे तैसाचि जड कठिण ॥ परी तो लोहाचें करी सुवर्ण ॥ कृष्णवर्ण लपवोनि ॥ ६ ॥ कस्तूरी आणि मृत्तिका ॥ दिसे रंग एकसारिखा ॥ परी मृगमद सुवासें सकळिकां ॥ श्रीमंतांसी निवेदी पैं ॥ ७ ॥ तक्र दुग्ध एकवर्ण ॥ परी दुग्ध गोड सकळांसी मान्य ॥ तैसीं संतांचीं रूपें जाण ॥ इतरांसमान न म्हणावीं ॥ ८ ॥ ऐसे संत आनंदघन ॥ रामविजय परम पावन ॥ करावया बैसले श्रवण ॥ अति आदरेंकरोनियां ॥ ९ ॥ आतां किष्किंधाकांडकमळावरी ॥ क्रीडेल वाग्देवीभ्रमरी ॥ तरी तो सुरस अंतरीं ॥ सदा चतुरीं सांठविजे ॥ १० ॥ षोडशाध्यायीं कथा परिकर ॥ पंपासरोवरासी रघुवीर ॥ आला सजलजलदगात्र ॥ ध्याय त्रिनेत्रें जयातें ॥ ११ ॥ तों ऋष्यमूक पर्वतावरी ॥ उभे पांच वानर ते अवसरीं ॥ किंवा ते पंच केसरी ॥ स्वलीला उभे ठाकले ॥ १२ ॥ कीं कनकाद्रीचीं रत्नें मंडित ॥ पंचशृंगें विराजित ॥ कीं उगवले पंच आदित्य ॥ उदयाचळीं एकदां ॥ १३ ॥ कीं साह्य व्हावया रघूत्तमातें ॥ अवतरलीं पंचमहाभूतें ॥ कीं तें पंचायतन शोभतें ॥ ऋष्यमूक पर्वतावरी ॥ १४ ॥ ते पंपासरोवराचे तीरीं ॥ श्रीराम स्फटिकशिळेवरी ॥ सौमित्राचे मांडीवरी ॥ शिर ठेवून पहुडला ॥ १५ ॥ देखतां सौमित्र राघव ॥ भयभीत जाहला सुग्रीव ॥ म्हणे वाळीनें हे दोघे मानव ॥ वीर येथें पाठविले ॥ १६ ॥ माझा घात करावया ॥ शत्रूनें दिधले पाठवूनियां ॥ म्हणोनि सुग्रीव तेथोनियां ॥ जाता झाला सत्वर ॥ १७ ॥ चौघांस न पुसतां तेथून ॥ पळे वेगें मित्रनंदन ॥ वनोपवनें लंघोन ॥ समीरवेगें चालिला ॥ १८ ॥ मग सवेग धांवोनि हनुमंत ॥ उभा केला सूर्यसुत ॥ म्हणे तूं कां भीतोसी येथ ॥ काय विपरीत देखिलें ॥ १९ ॥ सुग्रीव म्हणे दोघे धनुर्धर ॥ दिसती परम प्रचंड वीर ॥ त्यांसी विलोकितां भय अपार ॥ माझे हृदयीं संचरलें ॥ २० ॥ आजि म्यां स्वप्न देखिलें ॥ दोघे धनुर्धर साह्य जाहले ॥ वाळीस वधोनि राज्य दिधलें ॥ किष्किंधेचें मजलागीं ॥ २१ ॥ अरुणोदयीं देखिलें स्वप्न ॥ सवेंचि पातले दोघेजण ॥ परी मज धीर न धरवे जाण ॥ भयेंकरून व्यापिलों ॥ २२ ॥ यावरी बोले वायुनंदन ॥ आम्ही असतां चौघे प्रधान ॥ कृतांतासी शिक्षा लावून ॥ तुजला रक्षूं सर्वदा ॥ २३ ॥ तरी हे पंपातीरीं दोघे जण ॥ बैसले वीर देदीप्यमान ॥ कीं बृहस्पति आणि सहस्रनयन ॥ तैसे दोघे दीसती ॥ २४ ॥ कीं एक तपस्वी एक उदास ॥ एक औदार्य एक

१ हंस. २ कावळ्यांमध्यें. ३ कोल्ह्यांमध्यें. ४ सिंह. ५ आकाश. ६ मोतीं. ७ रत्नपारखी. ८ कस्तूरी. ९ सुवासिते. १० मेघकांति. ११ शंकर. १२ सिंह. १३ मेरूचीं. १४ सूर्यपुत्र सुग्रीव. १५ वायुवेगानें. १६ यमाला. १७ इंद्र.

धैर्यविशेष ॥ कीं एक पुण्य एक यश ॥ तैसे दोघे दीसती ॥ २५ ॥ कीं एक ज्ञान एक विज्ञान ॥ एक आनंद एक समाधान ॥ कीं एक सगुण एक निर्गुण ॥ दोन्ही स्वरूपें हरीचीं ॥ २६ ॥ एक साधक एक सिद्ध ॥ एक वैराग्य एक बोध ॥ एक मोक्ष एक ब्रह्मानंद ॥ तैसे दोघे दीसती ॥ २७ ॥ यांचिया आगमनें पाहीं ॥ आनंद दाटला माझे हृदयीं ॥ यांचा समाचार लवलाहीं ॥ जाऊन आतां आणितों ॥ २८ ॥ त्यांचिया बोलावरून ॥ कळेल त्यांचें अंतःकरण ॥ स्वाद घेतां रस पूर्ण ॥ चतुर जैसा ओळखे ॥ २९ ॥ अरुणोदयावरून ॥ रजनी सरली कळे ज्ञान ॥ कीं दंभकत्व निरसतां अभ्र ॥ शांत जाहला जाणिजे ॥ ३० ॥ कीं संकटसमयावरून ॥ जाणिजे बंधु मित्रजन ॥ कीं इंद्रियनियमनें पूर्ण ॥ योगाचरण जाणिजे ॥ ३१ ॥ कीं दयेवरून कळे शांती ॥ कीं तर्कावरून कळे धृती ॥ कीं वेदांतश्रवणें निवृत्ती- ॥ दशा बाणली जाणिजे ॥ ३२ ॥ कीं प्रेमरसावरून भक्ती ॥ कीं निरपेक्षेवरून विरक्ती ॥ कीं पावला अद्वय मुक्ती ॥ इहपरत्रीं जाणिजे ॥ ३३ ॥ तैसें त्यांचें अंतर समस्त ॥ मी आणितों तूं राहें स्वस्थ ॥ जरी तेथें असेल विपरीत ॥ हस्तसंकेत दावीन तूतें ॥ ३४ ॥ ऐसें बोलोनि हनुमंत ॥ पंपातीरासी आला त्वरित ॥ वटवृक्षातळीं रघुनाथ ॥ पहुडलासे श्रमोनियां ॥ ३५ ॥ स्फटिकशिळा देदीप्यमान ॥ जेवीं शेषतल्पैक शुभ्रवर्ण ॥ त्यावरी श्रावणारिनंदन ॥ विराजमान दिसतसे ॥ ३६ ॥ तंव त्या वटावरी हनुमंत ॥ कौतुकेंकरोनि उड्डाण करीत ॥ लक्षोनियां रघुनाथ ॥ हर्षें दावी वांकुल्यां ॥ ३७ ॥ ऐसा देखोनि वानर ॥ सौमित्रासी दावी रघुवीर ॥ पैल पाहें तो कपिवर ॥ पंचशैर तोडरीं असे ॥ ३८ ॥ झळकताहे हेमकौपीन ॥ वज्रबंधनें न चळे मदन ॥ माझें चित्त स्नेहेंकरून ॥ यासी देखोन भरलें असे ॥ ३९ ॥ मातेचें वचन हनुमंत ॥ आठवी तेव्हां हृदयांत ॥ जो ओळखे कौपीन गुप्त ॥ तोचि स्वामी तुझा असे ॥ ४० ॥ तो प्रत्यया आला सकळ ॥ परी माझें अद्भुत बळ ॥ हा दिसतसे कोमळ ॥ तमालनीळ साजिरा ॥ ४१ ॥ शिष्यापरीस आगळें बळ ॥ गुरूस असावें बहुसाल ॥ मग वटशाखा मोडोनि सबळ ॥ रामावरी टाकिली ॥ ४२ ॥ तें देखतां ऊर्मिलाजीवनें ॥ चापासी वेगें चढविला गुण ॥ मग बोले कौसल्यानंदन ॥ स्थिर राहें नावेक ॥ ४३ ॥ बाळकौतुक पाहें साचार ॥ त्यावरी काय टाकिसी शर ॥ तों उताणा पहुडला रघुवीर ॥ तंव शाखा सत्वर आली वरी ॥ ४४ ॥ वरी कोदंडदंडें ते अवसरीं ॥ शाखा ताडिली वरच्यावरी ॥ ते उडोनि गेली अंबरीं ॥ तृणतुल्य तेधवां ॥ ४५ ॥ आणीकही वृक्ष पाषाण ॥ वरी टाकी वायुनंदन ॥ तेही कौसल्यागर्भरत्न ॥ कोदंडेंकरून उडवीत ॥ ४६ ॥ मग गर्जोनियां हनुमंत ॥ सोडी तेव्हां पंच पर्वत ॥ परी न उठेचि रघुनाथ ॥ कौतुकें हांसे ते काळीं ॥ ४७ ॥ मग रघुनाथें एक बाण ॥ चापासी लाविला न लागतां क्षण ॥ पांच पर्वत पिष्ट करून ॥ बाणें गगन भेदीत ॥ ४८ ॥ शरपिसारा लागला किंचित ॥ तेणें उडोनि गेला हनुमंत ॥ गगनीं गरगरां भोंवत ॥ प्राण होय कासा-

१८ भडका. १९ धैर्य. २० वैराग्य. २१ ह्या लोकीं व परलोकीं. २२ शेषाचा बिछाना. २३ श्रीराम. २४ माकडचेष्टा. २५ मदन. २६ पायांतील दागिन्यांत, स्वाधीन. २७ सुवर्णाची लंगोटी. २८ बळकट आसन. २९ अत्यंत. ३० लक्ष्मण. ३१ क्षणभर. ३२ मारुती.

विस ॥ ४९ ॥ [३३]वातचक्रीं पडतां तृण ॥ तें भूमीस न पडे मागुतेन ॥ त्यापरी वायुनंदन ॥ कासावीस होतसे ॥ ५० ॥ [३४]जनक [३५]पवन धांवे ते समयीं ॥ आत्मज धरिला दृढ हृदयीं ॥ म्हणे बा रे शरण लवलाहीं ॥ रामचंद्रासी जाईं कां ॥ ५१ ॥ हा अवतरला शेषशायी ॥ जाण क्षीराब्धीचा जांवई ॥ दृढ लागें त्याचे पायीं ॥ कायावाचामानसें ॥ ५२ ॥ मग श्रीरामासी हनुमंत ॥ येवोनि लोटांगण घालित ॥ मागुती उठोनि धरित ॥ श्रीरामचरण सप्रेमें ॥ ५३ ॥ उठोनियां रघुवीर ॥ हृदयीं धरिला वायुकुमर ॥ एक जाहले हरिहर ॥ जयजयकार करिताती ॥ ५४ ॥ श्रीराम म्हणे हनुमंता ॥ जोंवरी [३६]शशी आणि [३७]सवितॉं ॥ तोंवरी अक्षयी होईं तत्त्वतां ॥ बलार्णव [३८]अद्भुत तूं ॥ ५५ ॥ कैकयीहस्तींचा पूर्ण पिंड ॥ अंजनीहातीं पडला अखंड ॥ तो हा वीर जन्मला प्रचंड ॥ राघवाहून पूर्वीच ॥ ५६ ॥ असो जोडोनि दोन्ही कर ॥ हनुमंत उभा राहे समोर ॥ म्हणे हे राम करुणासमुद्र ॥ जगदुद्धार दीनबंधो ॥ ५७ ॥ हे राम भुवनसुंदरा ॥ हे राम जनकजावरा ॥ हे राम नवपंकजनेत्रा ॥ पुराणपुरुषा जगदात्मया ॥ ५८ ॥ परम भक्त जाणोन ॥ हनुमंतासी भेटला लक्ष्मण ॥ करीं धरून वायुनंदन ॥ सीतावल्लभें बैसविला ॥ ५९ ॥ रामचरण चुरी मारुती ॥ म्हणे रघुवीरा ऐक एक विनंती ॥ पैल ऋष्यमूक पर्वतीं ॥ वसे कपिपती सुग्रीव ॥ ६० ॥ अभयवर देशील त्यातें ॥ तरी आतां भेटवीन तयातें ॥ बहुत कार्य तयाचेनि हातें ॥ पुढें साधेल श्रीरामा ॥ ६१ ॥ मग बोले रघुनंदन ॥ सुग्रीव हा कोणाचा कोण ॥ हनुमंत सांगे पूर्वकथन ॥ सावधान परिसावें ॥ ६२ ॥ कमलोद्भव [३९]करितां ध्यान ॥ प्रेमोदकबिंदु नेत्रींहून ॥ अंजुळींत पडतांचि पूर्ण ॥ [४०]ऋक्षरजा जन्मला ॥ ६३ ॥ तो ब्रह्मयाचा प्रियनंदन ॥ वानरवेष बळ गहन ॥ हिंडतां वनोपवन ॥ शिवलोकाप्रती गेला ॥ ६४ ॥ तंव देखिलें रम्य सरोवर ॥ भोंवते सदाफळ तरुवर ॥ परी तेथें शाप दुर्धर ॥ अपर्णेचा [४१]होता पूर्वी ॥ ६५ ॥ जो नर सेवील येथींचें पाणी ॥ तो नारी होईल तत्क्षणीं ॥ हें ऋक्षरजें नेणोनी ॥ उडी जीवनीं घातली ॥ ६६ ॥ स्नान करून निघतां बाहेर ॥ जाहलें स्त्रियेचें शरीर ॥ रंभेहून परम सुंदर ॥ होय विचित्र ते काळीं ॥ ६७ ॥ तों मित्र इंद्र दोघेजण ॥ आले सुंदर स्त्री वरूं म्हणोन ॥ तंव तो ब्रह्मपुत्र लाजोन ॥ स्त्री होऊन बैसला ॥ ६८ ॥ न घडे तयेसीं सुरत ॥ मग दोघीं त्यागिलें रेत ॥ आधीं शक्रवीर्य मस्तकीं पडत ॥ वाळी तेथें जन्मला ॥ ६९ ॥ मागून सूर्यवीर्य पडलें ग्रीवेवरी [४२]॥ तेथें सुग्रीव जन्मला ते अवसरीं ॥ विरिंचि[४२] पातला झडकरी ॥ तों पुत्र नारी जाहला असे ॥ ७० ॥ मग तेणें प्रार्थोनि पार्वती ॥ उच्छाप मागे पुत्राप्रती ॥ कामिनीभाव हरोनि मागुती ॥ पुत्र केला पूर्ववत ॥ ७१ ॥ दोघे पौत्र आणि सुत ॥ घेवोनि चालिला [४३]पद्मजात ॥ मग मृत्युलोकीं अद्भुत ॥ किष्किंधा नगर रचियेलें ॥ ७२ ॥ धाकुटा सुग्रीव वडील वाळी ॥ ऋक्षरजा घेऊनि ते काळीं ॥ किष्किंधाराज्य भूमंडळीं ॥ केलें तेणें बहुकाळ ॥ ७३ ॥ वाळीसुग्रीवांसी तत्त्वतां ॥ ऋक्षरजा मातापिता ॥ पुढें वाळीस

३३ वावटळींत. ३४ मारुतीचा पिता. ३५ वायु. ३६ चंद्र. ३७ सूर्य. ३८ बलाचा सागर. ३९ ब्रह्मदेव. ४० हा शब्द प्रत्येक छापील पुस्तकांत 'ऋक्षराज' असा आहे; परंतु तो वाल्मीकरामायण उत्तरार्ध प्रक्षिप्त सर्ग १ यांत 'ऋक्षरजा' असा आहे. ४१ पार्वतीचा. ४२ मानेवर. ४३ ब्रह्मदेव.

देऊन राज्यार्था ॥ धरिलें छत्र सुमुहूर्तें ॥ ७४ ॥ करोनियां योगसाधन ॥ ऋक्षरजा पावला ब्रह्मसदन ॥ पुढें वाळी सुग्रीव दोघेजण ॥ बंधु समान सारिखे ॥ ७५ ॥ इंद्रें वाळीस विजयमाळ ॥ दिघली म्हणोनि तो सबळ ॥ समरीं शत्रु होय निर्बळ ॥ वाळीप्रताप देखतां ॥ ७६ ॥ सूर्यें सुग्रीव करीं धरिला ॥ आणोन माझे हातीं दीधला ॥ तूं सांभाळीं यासी दयाळा ॥ म्हणोनियां प्रार्थिलें ॥ ७७ ॥ सुग्रीव आणि वाळीमध्यें ॥ वैर लागलें राज्यसंबंधें ॥ पुढें वाळी सुग्रीवासी क्रोधें ॥ वधावयासी धांविन्नला ॥ ७८ ॥ सुग्रीवाची स्त्री रुमा रूपवंत ॥ वाळीनें घातली घरांत ॥ सुग्रीवें धरिला ऋष्यमूक पर्वत ॥ युद्ध होत षण्मासां ॥ ७९ ॥ माझी सूर्यें घेतली भार्कें ॥ तूं सुग्रीवाची पाठी राख ॥ ऐसें ऐकतां अयोध्यानायक ॥ काय बोलता जाहला ॥ ८० ॥ हनुमंता भार्कें घे पूर्ण ॥ मज अत्यंत प्रिय सूर्यनंदनें ॥ सत्वर आणीं बोलावून ॥ भेटीस मन उतावीळ ॥ ८१ ॥ तयाचा शत्रु वधोन ॥ त्यासी देईन छत्र सिंहासन ॥ याउपरी जानकीचिद्रत्न ॥ शोधोनि काढूं सांक्षेपें ॥ ८२ ॥ ऐसें बोलतां जेंनकजामात ॥ तेथून उडाला हनुमंत ॥ येऊनि सुग्रीवास सांगत ॥ भाग्य अद्भुत उदेलें ॥ ८३ ॥ सीतावियोगें दुःखी रघुराज ॥ रुमावियोगें दुःखी तूं सहज ॥ तरी एकमेकांचें पूर्ण काज ॥ करा आतां परस्परें ॥ ८४ ॥ ऐकोनि मारुतीचें वचन ॥ आनंदें नाचे सूर्यनंदनें ॥ हनुमंतातें आलिंगून ॥ पाठी हातें थापटी ॥ ८५ ॥ रघुनाथप्राप्तीसी तत्त्वतां ॥ तूं सद्गुरु झालासी हनुमंता ॥ उतराई काय होऊं आतां ॥ उपकार तत्त्वतां न विसरें ॥ ८६ ॥ दशरथात्मज रघुपती ॥ त्याची किर्ति पूर्वी ऐकिली होती ॥ पंचवटीस करोनि वस्ती ॥ पिशिताँशन मारिले ॥ ८७ ॥ असो घेऊन वानरांचे भार ॥ नळ नील जांबुवंत वीर ॥ सुग्रीव आला जेथें रघुवीर ॥ त्रिभुवनसुंदर देखिला ॥ ८८ ॥ कोट्यनुकोटी मीनकेतनें ॥ ज्यावरून सांडावे ओंवाळून ॥ तमालनीळ स्वरूप सगुण ॥ सुग्रीवें नेत्रीं विलोकिलें ॥ ८९ ॥ लोटांगण घाली सुग्रीव ॥ नळनीळादि वानर सर्व ॥ ऐसें देखोन सीताधवँ ॥ पुढें धांवत भेटावया ॥ ९० ॥ धरोनियां दोन्ही कर ॥ उठविला स्वयें भानुकुँमर ॥ हृदयीं धरितां रघुवीर ॥ सुख अपार सुग्रीवा ॥ ९१ ॥ अत्यंत जाहला क्षुधातुर ॥ तया भेटला क्षीरसागर ॥ कीं दरिद्रियासी अपार ॥ द्रव्य घरीं सांपडलें ॥ ९२ ॥ कीं आळशाचें गृह शोधीत ॥ कल्पवृक्ष आला अकस्मात ॥ कीं चुकलें बाळक भेटत ॥ जननियेसी प्रीतीनें ॥ ९३ ॥ कीं तृषाक्रांत पडिला वनीं ॥ त्यापुढें लोटे मंदाकिनी ॥ तैसा सुग्रीवाचे मनीं ॥ ब्रह्मानंद उचंबळला ॥ ९४ ॥ जीव शिव एक भाव ॥ तैसें भेटीचें वैभव ॥ तेव्हां विमानारूढ देव ॥ सुमनसंभार वर्षती ॥ ९५ ॥ नळ नील जांबुवंत ॥ आणिक वानर समस्त ॥ तयांसी रघूत्तम आलिंगीत ॥ आनंद गगनीं न समाये ॥ ९६ ॥ हनुमंतें तये वेळे ॥ पसरिले वृक्षडाहाळे ॥ मध्यें अमीसी साक्ष ठेविलें ॥ दोहींकडे बैसविले दोघेजण ॥ ९७ ॥ सुग्रीव आणि रघुनाथ ॥ उभयतांस म्हणे हनुमंत ॥ एकमेकांचा कार्यार्थ ॥ साह्य होवोनि साधावा ॥ ९८ ॥ रघुवीर

---

४४ प्रतिज्ञावचन. ४५ सुग्रीव. ४६ निश्चयानें. ४७ श्रीराम. ४८ राक्षस. ४९ मदन. ५० गंगा. ५१ पुष्पसमुदाय. ५२ झाडांच्या फांद्या.

म्हणे राज्य आणि दारा ॥ सोडवूनि देतों रविकुमरा ॥ हा माझा निर्धार खरा ॥ उदयीकचि पाहाल ॥ ९९ ॥ अर्कज म्हणे जेणें नेली सीता ॥ त्यासी संहारून तत्त्वतां ॥ अयोध्येसी नेईन रघुनाथा ॥ मंगळभगिनीसहितें पें ॥ १०० ॥ ऐसें ऐकतां उत्तर ॥ भुभुःकारें गर्जती वानर ॥ तेणें नादें अंबर ॥ दणाणलें ते समयीं ॥ १ ॥ सुग्रीव म्हणे रघुनंदना ॥ कालचि एक सुंदर ललना ॥ राक्षस घेऊन गेला जाणा ॥ निराळ्यामार्गें त्वरेनें ॥ २ ॥ आम्हीं समस्तीं देखिली नयनीं ॥ आक्रंदत करुणावचनीं ॥ म्हणे रामा धांव निर्वाणीं ॥ चापपाणी करुणाकरा ॥ ३ ॥ क्षणभरी म्हणे सौमित्रा ॥ धांव धांव परम पवित्रा ॥ मागुती म्हणे स्मरारिमित्रा ॥ राजीवनेत्रा धांव वेगीं ॥ ४ ॥ तिनें उत्तरीय वस्त्र फाडोनी ॥ आभरणें टाकिलीं बांधोनी ॥ आम्हीं तीं ठेविलीं जतन करूनी ॥ राम ऐकोनि विस्मित ॥ ५ ॥ म्हणे नवल सांगती वानर ॥ सत्वर आणिले अलंकार ॥ घेऊनि आला वायुकुमर ॥ देत रघुवीराकरीं तेव्हां ॥ ६ ॥ तंव लक्ष्मणें ग्रंथि सोडीत ॥ आभरणें ओळखिलीं समस्त ॥ अहा प्रिये म्हणोनि रघुनाथ ॥ शरीर टाकी धरणीवरी ॥ ७ ॥ हृदयीं धरोनि अलंकार ॥ शोकार्णवीं पडिला रघुवीर ॥ सद्गद होती समस्त वानर ॥ नयनीं नीर लोटलें ॥ ८ ॥ आठवोनि सीतेचे गुण ॥ विलाप करी रघुनंदन ॥ धांवोनियां लक्ष्मण ॥ धरी चरण रघुपतीचे ॥ ९ ॥ लक्ष्मणासी म्हणे रघुवीर ॥ सखया ओळखें अलंकार ॥ राम म्हणे निरंतर ॥ जनकजा-अंगीं होते ते ॥ ११० ॥ सौमित्र अलंकार घेउनी ॥ सादर होऊनि पाहे नयनीं ॥ म्हणे हीं नेपुरें सीतेचे चरणीं ॥ ओळखिलीं म्यां साच पें ॥ ११ ॥ नेपुरें ओळखिलीं साचार ॥ वरकंड नेणें मी अलंकार ॥ राम म्हणे निरंतर ॥ जनकात्मजा लेतें होती ॥ १२ ॥ सौमित्र म्हणे सीता माउली ॥ म्यां कधीं नाहीं विलोकिली ॥ त्रिकाळ नमनाचे वेळीं ॥ नेपुरें चरणीं देखिलीं म्यां ॥ १३ ॥ ऐसें बोलतां लक्ष्मण ॥ आनंदला रघुनंदन ॥ म्हणे बा रे तूं दिव्य रत्न ॥ वैराग्यवैरागरींचें ॥ १४ ॥ तूं भक्तसरोवरींचा राजहंस ॥ कीं ज्ञानमुक्ताफळमांदुस ॥ कीं शत्रुविपिनहुताश ॥ सदा निर्दोष सूर्य जैसा ॥ १५ ॥ सुग्रीव म्हणे रविकुळमंडणा ॥ जरी जानकी तुज भेटवीना ॥ तरी मी भोगीन यमयातना ॥ कल्पपर्यंत निर्धारें ॥ १६ ॥ नळ नीळ जांबुवंत ॥ माझे प्रधान जगविख्यात ॥ भूगोळ हा क्षण न लागत ॥ उचलोनि घालिती पालथा ॥ १७ ॥ आतां रघुपति तुझी आण ॥ स्वर्ग मृत्यु पाताळ शोधून ॥ जानकी आणीन हें प्रमाण ॥ सत्य सत्य त्रिवाचा ॥ १८ ॥ मग बोले मखपाळण ॥ तुज तारीं राज्य दिधल्यावांचून ॥ सीताशुद्धि न करीं आण ॥ श्रावणारीची जाण पां ॥ १९ ॥ तुझें कार्य न होतां आधीं ॥ कदा न करीं मी सीताशुद्धी ॥ ही माझी प्रतिज्ञा त्रिशुद्धी ॥ ती काळत्रयीं टळेना ॥ १२० ॥ गुरुकृपेविण ज्ञान ॥ कीं आवडीविण भजन ॥ कीं प्रेमाविण कीर्तन ॥ स्नानेंविण अनुष्ठान जैसें ॥ २१ ॥ कीं अतिथीविण भोजन ॥ कीं वीरश्रीविण रणांगण ॥ कीं विप्र जैसा विद्येविण ॥ सर्व जन निंदिती ॥ २२ ॥ तैसें तुझें कार्य न होतां ॥

५२ पत्नी. ५३ सुग्रीव. ५४ सीतेसहित. ५५ आकाश. ५६ आकाशमार्गानें. ५७ प्राणसंकटांत. ५८ श्रीरामा. ५९ सत्वर. ६० पैंजण. ६१ इतर. ६२ बाजीत. ६३ मांदुस = पेटी ६४ हुताश = अग्नि. ६५ वालीची स्त्री. ६६ दशरथाची.

सीताशुद्धि न घें सर्वथा ॥ ऐसें बोलतां रघुनाथा ॥ वीरश्री अंगीं दाटली ॥ २३ ॥ चढविला चापासी गुण ॥ म्हणे बोलावीं शक्रनंदन ॥ सुग्रीव धांवोनि धरी चरण ॥ कर जोडून विनवीत ॥ २४ ॥ म्हणे वाळीचा मार अनिवार ॥ आपण युद्ध न करावें समोर ॥ अकस्मात टाकील शर ॥ तरी संहार होय पैं ॥ २५ ॥ मंगळजननीजामात ॥ सुग्रीवासी पुसे वृत्तांत ॥ वाळीसी तुज वैर अद्भुत ॥ काय कारण पडावया ॥ २६ ॥ सुग्रीव सांगे पूर्ववृत्तांत ॥ म्हैसासुर नाम दैत्य अद्भुत ॥ त्याचा दुंदुभि वीर्यजात ॥ परम बलिष्ठ जन्मला ॥ २७ ॥ महा उन्मत्त मद्यपानी ॥ कलह माजवावया हिंडे वनीं ॥ परी त्यासी समरांगणीं ॥ युद्धा कोणी भेटेना ॥ २८ ॥ मग दैत्य गेला यमाजवळी ॥ म्हणे मजसीं मांडीं युद्धफळी ॥ येरू म्हणे किष्किंधेसी वाळी ॥ त्याजवळी जाईं वेगीं ॥ २९ ॥ ऐकोनि आला किष्किंधेजवळी ॥ जैसा मूषक निघे व्यालबिळीं ॥ कीं व्याघ्राची पहावया जाळी ॥ जंबुक जैसा पातला ॥ १३० ॥ दैत्य हांक फोडी तये वेळीं ॥ ऐकतां धांविन्नला वीर वाळी ॥ जैसा मृगेंद्र कैंव घाली ॥ मातंग दूरी देखतां ॥ ३१ ॥ शतयोजनें शरीर विशाळ ॥ वाळीनें पदीं धरिला तत्काळ ॥ भूमीवरी आपटिला सबळ ॥ भूमंडळ दणाणलें ॥ ३२ ॥ कायेंतूनि गेला प्राण ॥ मग प्रेत त्याचें भवंडोन ॥ रागें दिधलें भिरकावून ॥ ऋष्यमूक पर्वतावरी ॥ ३३ ॥ शतयोजनें कलेवर ॥ ऋषींचे आश्रम मोडले समग्र ॥ तेथें मुख्य मातंग ऋषीश्वर ॥ तेणें शाप दीधला ॥ ३४ ॥ या पर्वता स्पर्शतां शक्रनंदन ॥ तत्काळ जाईल त्याचा प्राण ॥ दुंदुभीचें प्रेत जाण ॥ पडलें आहे अद्यापि ॥ ३५ ॥ मग मयासुर दुंदुभीचा सुत ॥ पितृसूड घ्यावया त्वरित ॥ कीं पतंग अग्नीस मागत ॥ सूड खांडववनाचा ॥ ३६ ॥ सर्पाचा सूड समूळीं ॥ सुपर्णासीं मागे अळी ॥ तैसा मयासुर ते काळीं ॥ बाहे वाळीस युद्धातें ॥ ३७ ॥ शक्रसुत धांविन्नला त्वरित ॥ जैसें पर्वतावरी वज्र पडत ॥ तैसा मयासुर मुष्टिघात ॥ देतां वमत रक्तासी ॥ ३८ ॥ पाताळविवरद्वारें ॥ मयासुर पळाला त्वरें ॥ त्याचे पाठीमागें शक्रकुमरें ॥ धांव घेतली पाताळा ॥ ३९ ॥ विवरद्वारीं मी रक्षण ॥ राघवा बैसलों बहुत दिन ॥ तों यक्ष गंधर्व मिळून ॥ किष्किंधा घेऊं धांविन्नले ॥ १४० ॥ रायाविण कोण राखे पुरी ॥ धार्के दुर्ग ओलांडिलें वानरीं ॥ प्रधान प्रजा ते अवसरीं ॥ मज सांगती गान्हाणें ॥ ४१ ॥ मग विवरमुखीं ठेविला पर्वत ॥ किष्किंधेस पातलों त्वरित ॥ शत्रु आटोनि समस्त ॥ प्रजा सुखी राहिल्या ॥ ४२ ॥ विंशति[७५] मासपर्यंत ॥ वाळी विवरीं जाहला गुप्त ॥ मग प्रधान प्रजा समस्त ॥ म्हणती शक्रसुत निमाला[७६] ॥ ४३ ॥ सकळीं आग्रह करून बळें ॥ राज्यछत्र मज दिधलें ॥ तों मयाचें शिर घेऊनि ते वेळे ॥ वाळी वीर पातला ॥ ४४ ॥ वीस मास तो निराहार ॥ दृष्टीं न दिसे विवरद्वार ॥ परम उतरला मुखचंद्र ॥ घाबरा वीर जाहला ॥ ४५ ॥ उगवला असतां उष्णकर ॥

६७ वाली. ६८ श्रीराम. ६९ पुत्र. ७० झडप. ७१ हत्ती. ७२ गरुडाजवळ. ७३ कीड. ७४ बोलावी. ७५ वीस. ७६ मरण पावला. ७७ सूर्य.

किंचित दिसों लागलें द्वार ॥ मग नखाग्रेंच नग समग्र ॥ उलथोनियां पाडिला ॥ ४६ ॥ हर्षें गर्जना केली थोर ॥ तेणें नादावलें अंबर ॥ परी मजलागीं चिंता अपार ॥ बहु जाहली ते काळीं ॥ ४७ ॥ म्हणे बंधु दैत्यांनीं मारिला ॥ घाबरा किष्किंधेसी पातला ॥ तों मज राज्यपदीं देखिलें डोळां ॥ परम क्षोभला ते काळीं ॥ ४८ ॥ गुरु त्यजिजे ज्ञानहीन ॥ प्रीतीविणें मित्रजन ॥ ऐसें बोलोनि शक्रनंदन ॥ शस्त्र घेवोनि धांविन्नला ॥ ४९ ॥ मग हे नळ नीळ जांबुवंत ॥ प्राणसखा माझा हनुमंत ॥ मज घेऊन पळाले त्वरित ॥ ठाव निश्चित नेदी कोणी ॥ १५० ॥ हिरोन घेतली बळेंचि दाँरा ॥ नित्य येऊनि करी मारा ॥ मग ऋष्यमूकपर्वतीं सीतावरा ॥ केला थारा आम्हीं येथें ॥ ५१ ॥ वाळीस असे येथें शाप ॥ यालागीं राहों सुखरूप ॥ सामाँसां युद्ध अमूप ॥ दोघांसीं होत रघूत्तमा ॥ ५२ ॥ आम्हां दोघां समान बळ ॥ परी त्याचे गळां विजयमाळ ॥ तेणें त्याचा प्रताप सबळ ॥ शत्रूसी पळ सुटतसे ॥ ५३ ॥ विकट विषम ताल सात ॥ एकेच बाणें जो छेदी निमिषांत ॥ त्याचे हातें वाळीस मृत्य ॥ भविष्य पूर्वी केलें हें ॥ ५४ ॥ ऐसें बोलतां सूँर्य-सुत ॥ धनुष्य योजी अवनिजाँकांत ॥ अर्धचंद्र बाण त्वरित ॥ आकर्णवरी ओढिला ॥ ५५ ॥ मांडी दृढ देहुँडे ठाण ॥ पाठीसीं उभा लक्ष्मण ॥ त्याचा चरणांगुष्ठ रघुनंदन ॥ पायांखालीं रगडीत ॥ ५६ ॥ दडापितां शेषचरणांगुष्ठ ॥ सप्तही ताड जाहले नीट ॥ एकाचि बाणें सपाट ॥ सातही केले राघवें ॥ ५७ ॥ सात ताड शेषपृष्ठीवरी ॥ यालागीं नीटावले झडकरी ॥ तों दुंदुभीचें प्रेत ते अवसरीं मित्रसुतें दाखविलें ॥ ५८ ॥ हें जो उचलील पुरुषार्थी ॥ वाळीचा मृत्य त्याचे हातीं ॥ चरणांगुष्ठें रघुपती ॥ प्रेत ढकली तेधवां ॥ ५९ ॥ तेंही तृणप्राय उडोन ॥ पडिलें दिगंतरीं जाण ॥ अद्भुत प्रताप देखोन ॥ सुग्रीव चरणीं लागला ॥ १६० ॥ मग म्हणे चाप-पाणी ॥ सुग्रीवा तूं किष्किंधेसी जाऊनी ॥ वाळीतें पाचारूनि आणीं ॥ समरांगणीं युद्धातें ॥ ६१ ॥ ऐसें ऐकोनि यथार्थ ॥ सुग्रीवासी आवेश बहुत ॥ म्हणे त्यासी वधील हा निश्चित ॥ यदर्थीं संशय असेना ॥ ६२ ॥ कमलदँलाक्ष कृपाघन ॥ वर्षे स्वानंदामृतजीवन ॥ तें कर्णद्वारें सेवून ॥ सूर्यसुत तृप्त जाहला ॥ ६३ ॥ रामचंद्रें अमृतबिंदु टाकिले ॥ तेणें सुग्रीवकर्णचकोर घाले ॥ कीं ते कर्णयाचक तृप्त जाहले ॥ श्रीरामवचननिधानें ॥ ६४ ॥ मग तो वाँसरमणीचा सुत ॥ दशकंठरिपूस विनवीत ॥ म्हणे विषकंठवंद्या एक हेत ॥ पूर्ण माझा करीं कां ॥ ६५ ॥ तरी अकस्मात टाकोनि बाण ॥ घ्यावा जी वाळीचा प्राण ॥ अवश्य म्हणे जगन्मोहन ॥ भक्तवचन-पाळक जो ॥ ६६ ॥ मग किष्किंधेसमीप सूर्यकुमर ॥ करीत थोर भुभुःकार ॥ दणाणलें अवघें नगर ॥ इंद्रपुत्र दचकला ॥ ६७ ॥ गळां घालोनि विजयमाळ ॥ वेगीं धांविन्नला वाळी सबळ ॥ म्हणे अरीचा आजि थोर कलोळ ॥ कोण साह्य जाहला असे ॥ ६८ ॥ तारा म्हणे स्वामी परियेसीं ॥ अंगद गेला होता पारधीसी ॥ तेथें बोलत होते ऋषी ॥ राम सुग्रीवा साह्य जाहला ॥ ६९ ॥ तरी

७८ स्त्री, रमा. ७९ सदा महिन्यांनीं. ८० सुग्रीव. ८१ सीतापति राम. ८२ उमा असतां उजवा पाय वाकवून गुडघ्यावर ठेवणें. ८३ कमलपत्रासारखे ज्याचे डोळे आहेत असा राम. ८४ सूर्याचा. ८५ शंकराला वैद्य असा श्रीराम.

राजेंद्रा अवधारा ॥ आपण न जावें समरा ॥ म्हणोन चरणां लागली तारा ॥ परी शक्रकुमरा न माने तें ॥ १७० ॥ ऐकोनि कुंजरौंचें गर्जन ॥ कैसा उगा राहे पंचौंनन ॥ मृग बळेंचि आला चालोन ॥ मग शार्दूळें कैसा स्थिरावे ॥ ७१ ॥ शुष्क काननीं प्रळयाग्न ॥ कैसा राहील शांति धरून ॥ असो सहस्रौक्षनंदन ॥ तारेप्रति बोलिला ॥ ७२ ॥ म्हणे प्राणप्रिये परियेसीं ॥ ॥ षण्मासां येतो युद्धासी ॥ आजि आला तिसरे दिवसीं ॥ उल्हासेंसीं गर्जत ॥ ७३ ॥ घायीं शरीर त्याचें जर्जर ॥ तैसें माझेंही जाहलें चूर ॥ त्यासी साह्य वायुकुमर ॥ तेणें वीर आणिला कोणी ॥ ७४ ॥ तरी तारे तूं आणि अंगद ॥ सुखें भोगा राज्यपद ॥ आजि सुग्रीवाचा करीन वध ॥ तरीच येईन माघारा ॥ ७५ ॥ नाहीं तरी भेट हेची ॥ बोलोन वाळी उठे तैसाची ॥ जैसी उडी पंचौंननाची ॥ मातंगासी लक्षोनियां ॥ ७६ ॥ जैसा पर्वतावरी पर्वत पडला ॥ तैसा सुग्रीवावरी आदळला ॥ आवेशें झगडती ते वेळां ॥ कांपों लागली धरित्री ॥ ७७ ॥ मल्लयुद्ध होतां अनिवार ॥ गुप्त पाहे अंवनिजावर ॥ तों दोघे सारिखे दिसती वीर ॥ कोणावरी शर टाकावा ॥ ७८ ॥ मारुती म्हणे अयोध्यापती ॥ हे दोघे सारखे दिसती ॥ मग सुमनहार त्वरित गतीं ॥ सैमीरसुतें गुंफिला ॥ ७९ ॥ सुग्रीवाचे गळां घाली ते क्षणीं ॥ विलोकित कैवल्यदौंनी ॥ दोघे हांक देत गगगीं ॥ प्रनिध्वनी उठताती ॥ १८० ॥ वज्राऐसे कठोर ॥ हाणिती तेव्हां मुष्टिप्रहार ॥ भूगोळ कांपत समग्र ॥ दणाणत पातालें ॥ ८१ ॥ शत योजनें झाडें उपडोनी ॥ निजबळें घालिती उचलोनी ॥ उसळें तरू धांवती गगनीं ॥ विमानें पळविती देव पैं ॥ ८२ ॥ चक्राकार फिरविती पर्वत ॥ न कळतां टाकिती अकस्मात ॥ क्षणक्षणां भूकंप होत ॥ ग्रीवौं सरसावी भोगींद्र ॥ ८३ ॥ हृदयीं समर्पित वज्रमुष्टी ॥ तेणें उंडुगणांची होत वृष्टी ॥ गगनीं देवांचिया थौंटी ॥ युद्ध दृष्टीं विलोकिती ॥ ८४ ॥ असो सहस्राक्षाचा सुत ॥ सुग्रीवासी हाणी मुष्टिघात ॥ कासावीस सूर्यसुत ॥ मागें पाहात रामाकडे ॥ ८५ ॥ वीर सांपडत रणमंडळीं ॥ बंधूची वाट पाहे ते वेळीं ॥ तैसा सुग्रीव हृदयकमळीं ॥ दीनबंधूतें आठवी ॥ ८६ ॥ म्हणे कां न सरे माझा भोग ॥ कृपा न करी अवनिजारंग ॥ जो विषकंठहृदयैंपद्मभृंग ॥ दशकंठदर्पदमन जो ॥ ८७ ॥ असो इकडे कौसल्यानंदन ॥ तूणीरांतून ओढी दिव्य बाण ॥ जैसी कल्पांतमेघांतून ॥ चपळा बाहेर निघे पैं ॥ ८८ ॥ धनुष्यावरी लावून बाण ॥ लक्ष साधिलें दुरोन ॥ वाळीचे हृदयीं येऊन ॥ अकस्मात खडतरला ॥ ८९ ॥ बाण लागला सतेज ॥ जैसी गिरीवरी पडे वीज ॥ कीं कौंद्रवेय देखतां अंरुणानुज ॥ येऊन झडपी जैसा कां ॥ १९० ॥ कीं अभाग्यावरी धाड पडे ॥ कीं राहुमुखीं शशी सांपडे ॥ कीं तपस्वियावरी सौंकडें ॥ व्यसन नसतेंचि आदळे ॥ ९१ ॥ कीं तृतीयनेत्रींचा अग्न ॥ मन्मथावरी पडे येऊन ॥ तैसा वाळीचे हृदयीं बाण ॥ एकाएकीं संचरला ॥ ९२ ॥ महावृक्ष उन्मळिला ॥ कीं पर्वत भूमीवरी आदळला ॥ तैसा वाळीनें देह टाकिला ॥ भूमंडळीं ते काळीं ॥ ९३ ॥

८६ हत्तीचें. ८७ सिंह. ८८ वाघ. ९१ वाळी. ९० श्रीराम. ९१ वायुपुत्र मारुतीनें. ९२ मोक्षदाता (राम). ९३ मान. ९४ नक्षत्रांची. ९५ पंक्ति. ९६ शिवाच्या हृदयरूपी कमळावरील भ्रमर. ९७ कद्रूचे पुत्र, साप. ९८ गरुड. ८९ संकट. १०० मदनावर.

वाळीचा देहांत जाणोनी ॥ जवळी आला चापपाणी ॥ इंद्रतनुज ते क्षणीं ॥ काय बोलता जाहला ॥ ९४ ॥ तूं क्षत्रिय एकपत्नीव्रती ॥ दुसरी वरिली कां अपकीर्ती ॥ अन्याय नसतां रघुपती ॥ बाण व्यर्थ कां टाकिला ॥ ९५ ॥ तूं सत्यवचनी यशवंत ॥ महाप्रतापी रणपंडित ॥ तुझी अपकीर्ति त्रिभुवनांत ॥ जाहली सत्य राघवेशा ॥ ९६ ॥ न हटकितां टाकिला शर ॥ मग बोले जानकीवर ॥ मर्कटा तूं केवळ वनचर ॥ तुज कासया हटकावें ॥ ९७ ॥ वीर असेल त्यासी हटकावें ॥ वनचरांसी गुप्तचि वधावें ॥ पारधियें मृग साधावे ॥ पाचारावें कासया ॥ ९८ ॥ तूं परम अन्यायी वानर ॥ बंधुस्त्रीअभिलाषी अनाचार ॥ म्यां दुष्ट दंडावया अवतार ॥ घेतला असे मर्कटा ॥ ९९ ॥ ऐसें ऐकतां ते काळीं ॥ हृदयीं सद्गद जाहला वाळी ॥ म्हणे मी पावन जाहलों ये वेळीं ॥ तुझेनि हस्तें राघवा ॥ २०० ॥ थोर सुकृताचे पर्वत ॥ दृष्टीभरी देखिला रघुनाथ ॥ माझें सार्थक जाहलें यथार्थ ॥ नाहीं अंत निजभाग्या ॥ १ ॥ येच मार्गीं जनकनंदिनी ॥ दशग्रीव गेला घेउनी ॥ मी त्यासी आणितों बांधोनी ॥ एक क्षण न लागतां ॥ २ ॥ कक्षेमाजी[2] दाटून ॥ चतुःसमुद्रीं केलें स्नान ॥ पैलस्थावरी[3] आणून ॥ अंगदाच्या बांधिला ॥ ३ ॥ मग पौलस्तीनें[4] भिक्षा मागोन ॥ नेला दशकंठ सोडवून ॥ त्या मशकाचा पाड कोण ॥ काय उशीर आणावया ॥ ४ ॥ माझें कर्म परम बळी ॥ तुझी सेवा नाहीं घडली ॥ राजीवाक्ष[5] ते वेळीं ॥ स्नेहाळपणें बोलिला ॥ ५ ॥ तुझे हृदयींचा उपटोनि बाण ॥ आतां तुज सावध करीन ॥ मग म्हणे इंद्रनंदन ॥ ऐसें मरण पुढें न ये ॥ ६ ॥ तुझेनि हातें देहांत ॥ तूं दृष्टीपुढें रघुनाथ ॥ ऐसें बोलतां शक्रसुत ॥ सुग्रीव जवळी पातला ॥ ७ ॥ नेत्रीं स्रवती जळबिंदु ॥ उचंबळला शोकसिंधु ॥ मग वाळीनें तो कनिष्ठ बंधु ॥ प्रीतीनें जवळी बैसविला ॥ ८ ॥ काढोनियां विजयमाळा ॥ घातली सुग्रीवाचे गळां ॥ म्हणे धन्य धन्य अनुजा[6] वेल्हाळा ॥ दृष्टीं दाविला श्रीराम ॥ ९ ॥ धन्य धन्य तुझें वैर ॥ अंतीं दाविला रघुवीर ॥ वैर नव्हे हा स्नेह थोर ॥ मजलागीं तुवां केला ॥ २१० ॥ आतां रघुनाथसेवा प्रीतीं ॥ तुम्हीं करावी अहोरातीं ॥ साह्य होवोनि सर्वार्थीं ॥ सीतासती सोडविंजे ॥ ११ ॥ ऐसें शक्रतनुजें बोलोन ॥ विलोकिलें राघवध्यान ॥ तत्काळ देह सोडून ॥ वाळी जाहला विदेही ॥ १२ ॥ विष्णुदूत येऊन ॥ नेला विमानीं बैसवून ॥ याउपरी तारेचें समाधान ॥ रघुनंदन करील पैं ॥ १३ ॥ ते सुरस कथा अपार ॥ संतीं परिसावी सादर ॥ ब्रह्मानंद श्रीधरवर ॥ अभंग चरित्र वर्णीलं हें ॥ १४ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ सप्तदशाध्याय गोड हा ॥ २१५ ॥ ओंवीसंख्या ॥ २१५ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ १७ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

---

१ वाळी. २ काखेमध्यें पकडून. ३ पाळण्यावर. ४ रावणाच्या पित्यानें. ५ राम. ६ कनिष्ठ भ्रात्या.

१८

श्रीगणेशाय नमः ॥ अखिलरघुनाथगुणसमुद्र ॥ रामउपासक तेथें जळचर ॥ ब्रह्मानंदें क्रीडती साचार ॥ प्रेमबळें मातोनियां ॥ १ ॥ स्वानंदाचे उमाळे देती ॥ सारासारविचारें तळपती ॥ जीवनावांचोनि गती ॥ दुजी नसे तयांतें ॥ २ ॥ अविद्याविपिन[1] शुष्क बहुत ॥ कांहींच वासना न करी तेथ ॥ नंदनवनींचा मिलिंद[2] सत्य ॥ अर्कीपुष्पीं[3] बैसेना ॥ ३ ॥ जो करी सुधारसपान ॥ तो कंटाळे देखोनि वमन ॥ जेणें आत्मशयनीं केलें शयन ॥ तो भवकानन कां सेवी ॥ ४ ॥ कल्पद्रुम ज्याचे अंगणीं ॥ नित्य सुरभी दुभे सदनीं ॥ तो तृणबीज काढोनी ॥ कदाकाळीं भक्षीना ॥ ५ ॥ प्रारब्धभोगें वावरे शरीर ॥ तेविषयीं न धरिती आदर ॥ तैसे रघुवीरभजनीं सादर ॥ हेंही नेणती कदा ते ॥ ६ ॥ सतरावे अध्यायीं गतकथार्थ ॥ श्रीरामें मारिला शक्रसुत ॥ सुग्रीव उसां मांडी देत ॥ देहांतसमयीं वाळीच्या ॥ ७ ॥ तों अंगदसमवेत तारा सती ॥ सत्वर पावली जेथें पती ॥ मग म्हणे अयोध्यापती ॥ काय ऐसें केलें तुवां ॥ ८ ॥ आतां टाकोनि एक बाण ॥ राघवा घेईं माझा प्राण ॥ मी पतिसमागमें जाईन ॥ काय वांचोनी व्यर्थ आतां ॥ ९ ॥ कवळोनि वाळीचें प्रेत ॥ तारा अत्यंत शोक करीत ॥ ऐसें जाणोनि जनकजामात ॥ काय बोले तें ऐका ॥ १० ॥ कोण्या अर्थालागीं देख ॥ तारे तूं करिसी शोक ॥ येरी म्हणे पतिवियोगपावक ॥ तेणें दग्ध जाहल्यें मी ॥ ११ ॥ ताटिकांतक म्हणे ते काळीं ॥ कलेवराचें नाम वाळी ॥ तरी तें पडलें तुजजवळी ॥ जैसें तैसें संचलें ॥ १२ ॥ ज्यालागीं शोक करिसी बहुत ॥ तरी तें पडलें वाळीचें प्रेत ॥ येरी म्हणे हृदयस्थ ॥ आत्मा गेला निघोनियां ॥ १३ ॥ मग बोले अयोध्याविहारी ॥ तूं काय आत्म्याची अंतुरी ॥ कीं शरीराची निर्धारीं ॥ सांगें मज विचारूनि ॥ १४ ॥ शरीर तंव नाशवंत ॥ आत्मा अविनाश शाश्वत ॥ तरी शोक करावा किमर्थ ॥ पाहें बरवें विचारोनि ॥ १५ ॥ जैसा घटीं आणि रांजणीं ॥ एक बिंबला वासरमणी[4] ॥ तैसा स्त्रीपुरुष अभिधानीं ॥ आत्मा एक अव्यंग ॥ १६ ॥ घट मठ मोडतां निःशेष ॥ जेवीं न मोडेचि आकाश ॥ कीं तरंग मोडतां सागरास ॥ नाश नसे सहसाही ॥ १७ ॥ मायामय लटिका खेळ ॥ जैसें नसतांचि दिसे मृगजळ[5] ॥ कीं गंधर्वनगर केवळ ॥ मिथ्याभास आभासे ॥ १८ ॥ सुधापानी स्वर्गीं असती ॥ तेही नाश पावती कल्पांतीं ॥ जें जें दिसे आकाररीतीं ॥ नाश निश्चितीं असे तेथें ॥ १९ ॥ भग्नपात्रींचें गेलें नीर ॥ माजी बिंबला रोहिणीवर[6] ॥ तो न दिसे म्हणोनि अपार ॥ शोक करी अज्ञानी ॥ २० ॥ मळे पिकवीन अपार ॥ यालागीं इच्छी रोहिणीनीर[7] ॥ तें अदृश्य होतां साचार ॥ शोक करिती मूर्खत्वें ॥ २१ ॥ सकळ पिंडांसमवेत ॥ ब्रह्मांड अवघें मिथ्याभूत ॥ आत्मा अक्षय शाश्वत ॥ शोक किमर्थ करिसी तूं ॥ २२ ॥ ऐशीं रावणारीचीं वचनें ॥ अमृताहून गोड गहनें ॥ कीं बोधसमुद्रींचीं चिद्रत्नें ॥ तारेलागीं दीधलीं ॥ २३ ॥ कीं तीं विश्रांतीचीं मंदिरें ॥ कीं अनुभवनभींचीं नक्षत्रें ॥ कीं स्वानंदाचीं पात्रें ॥ मुखावरी उचंबळती ॥ २४ ॥ कीं रामवचन अगस्ति थोर ॥ शोषिला तिचा शोकसागर ॥ कीं वचनरूपें दिनकर ॥ अज्ञानतिमिरनाशक ॥ २५ ॥ मदनारिमित्राचे[8] चरण ॥ तारेनें धरिलें प्रीतीकरून ॥ श्वासोच्छ्वास टाकून ॥ तटस्थरूपें राहिली ॥ २६ ॥ श्रीराम म्हणे तारेलागून ॥ माझें वचन मानीं प्रमाण ॥

१ मायारूपी अरण्य. २ भ्रमर. ३ रुईच्या फुलावर. ४ पत्नी. ५ सूर्य. ६ चंद्र. ७ मृगजळ. ८ शंकराचा सखा जो राम त्याचे.

सुग्रीवासी माळ घालून ॥ सुखेंकरोनि वर्तावें ॥ २७ ॥ तारा म्हणे चापपाणी ॥ हे वेदविरुद्ध दिसे करणी ॥ मग म्हणे कैवल्यदानी[९] ॥ वचन मानीं माझें हें ॥ २८ ॥ तूं पतिव्रतांमाजी विख्यात ॥ तारे होसी यथार्थ ॥ अघटित घडवी रघुनाथ ॥ महिमा अद्भुत जयाचा ॥ २९ ॥ देवाचें अघटित आचरण ॥ तें मानव करूं म्हणती आपण ॥ तरी तें नरकासी कारण ॥ होईल निश्चयें जाण पां ॥ ३० ॥ अघटित घडवी रघुनंदन ॥ स्तंभाविण राहिलें गगन ॥ उदकावरी पृथ्वी संपूर्ण ॥ न बुडे जाण सहसाही ॥ ३१ ॥ त्याचें कर्तृत्व करिती इतर ॥ तरी अनर्थासी नाहीं पार ॥ स्वेच्छा वर्ते सर्वेश्वर ॥ नव्हे म्हणे कोण त्यातें ॥ ३२ ॥ यावरी उत्तरक्रिया समस्त ॥ वाळीची करी सूर्यसुतें ॥ अंगदावरी रघुनाथ ॥ प्रीति अत्यंत करीत पैं ॥ ३३ ॥ असो ते तारा सुंदरी ॥ रामें बोधिली ऐशियापरी ॥ सुग्रीवासी दिधली निर्धारीं ॥ शेंसेंपाट[१०] भरोनियां ॥ ३४ ॥ यावरी तारेनें माळ ॥ सुग्रीवासी घातली तत्काळ ॥ जेणें प्रसन्न होय तमालनीळ ॥ आचरण तेंचि उत्तम ॥ ३५ ॥ सकळ कपी जयजयकारें ॥ गर्जना करिती लव्हानथोरें ॥ नभ नादावलें भुभुःकारें ॥ महागजरें दुमदुमत ॥ ३६ ॥ राघव म्हणे सुग्रीवास ॥ आम्ही येथें राहिलों चार मास ॥ तुम्हीं भोगोनि राज्यविलास ॥ सत्वर परतोनि येइंजे ॥ ३७ ॥ अंकर्ज[११] म्हणे रघुनाथा ॥ आपण किष्किंधेसी चलावें आतां ॥ श्रीराम म्हणे माझिया भरता- ॥ कारणें मी व्रतस्थ ॥ ३८ ॥ माझिया जिवलगाविण ॥ न करीं मी मंगलस्नान ॥ आठवोनि भरताचे गुण ॥ रघुनंदन गहिंवरला ॥ ३९ ॥ मी चित्रकूटींहूनि निघतां ॥ भरतासी जाहली जे अवस्था ॥ ते सुग्रीवा न ये सांगतां ॥ धीर चित्ता न धरवे ॥ ४० ॥ जैसें बाळक परदेशीं ॥ माता टाकोनि जाय तयासी ॥ मजविणें माझ्या भरतासी ॥ तैसें जाहलें असेल ॥ ४१ ॥ सांगतां भरताचे गुण ॥ सद्गद जाहला रघुनंदन ॥ सुग्रीव धांवोनि धरी चरण ॥ लक्ष्मणही गहिंवरला ॥ ४२ ॥ असो यावरी राजीवनेत्र[१२] ॥ बोलता जाहला नीरदगात्र[१३] ॥ म्हणे सुग्रीवावरी धरीं छत्र ॥ सौमित्रा सत्वर जाऊनियां ॥ ४३ ॥ रघुपतीचें चरणांबुज ॥ वंदी तेव्हां सुमित्रातनुज ॥ आशीर्वाद देत भरताग्रज ॥ विजयी होईं सर्वदा ॥ ४४ ॥ मग सौमित्रें जावोनि सत्वर ॥ सुग्रीवावरी धरिलें छत्र ॥ अमात्यपद पवित्र ॥ वाळिपुत्रासी दीधलें ॥ ४५ ॥ सवेंच परतोन लक्ष्मण ॥ आला जेथें जानकीजीवन ॥ जवळी उभा वायुनंदन ॥ कर जोडोनी सर्वदा ॥ ४६ ॥ किष्किंधेसी नित्य जाऊन ॥ राघवापाशीं येई परतोन ॥ तों चतुर्मास लोटले पूर्ण ॥ सुग्रीवासी स्मरण नव्हेचि ॥ ४७ ॥ देखोनियां शरत्काळ ॥ बोलता जाहला तमालनीळ ॥ म्हणे सुग्रीव जाहला सबळ ॥ राज्यमदेंकरूनियां ॥ ४८ ॥ विषयसंगें रमलें मन ॥ धनविद्यामदें गेला भुलोन ॥ परी सज्जनीं त्यास दंडोन ॥ सन्मार्गातें लावावें ॥ ४९ ॥ तरी किष्किंधेसी जाईं लक्ष्मणा ॥ आठव देईं सूर्यनंदना ॥ तो जरी न मानी माझिया वचना ॥ तरी वधोनि त्यासी येइंजे ॥ ५० ॥ तारा रुमा दोघी घेऊन ॥ नित्य करी मद्यपान ॥ जो न करी माझें स्मरण ॥ त्यास अवश्य दंडावें ॥ ५१ ॥ जो ब्राह्मण देखोनि उपहास करी ॥ संतभक्तांचा द्वेष धरी ॥ सद्गुरुवचन अव्हेरी ॥ त्यासी अवश्य दंडावें ॥ ५२ ॥ निंदी हरिहरांचीं चरित्रें ॥ अपमानी जो संतपात्रें[१४] ॥ अपूज्य पूजी आदरें ॥ त्यासी अवश्य दंडावें ॥ ५३ ॥

९ मोक्षदाता. १० सुग्रीव. ११ शोज भरून व घरचें देऊन. १२ कमलनयन. १३ मेघवर्ण देहाचा. १४ संतसज्जन.

कायावाचामनें ॥ ज्यासी परपीडा अगत्य करणें ॥ आणि वेदविरुद्ध ज्यासी वर्तणें ॥ त्यासी अवश्य दंडावें ॥ ५४ ॥ ऐश्वर्यमदें जे मातले ॥ हिंसा करितां न कंटाळले ॥ धर्मपथ ज्यांनीं मोडिले ॥ त्यांसी अवश्य दंडावें ॥ ५५ ॥ कमळा आणि चक्रपाणी ॥ भेटों इच्छिती धर्मसदनीं ॥ कार्पण्यलोभें विघडी दोन्ही ॥ त्यासी अवश्य दंडावें ॥ ५६ ॥ यावरी वीरचूडामणी ॥ किष्किंधेसी जाईं ये क्षणीं ॥ तो जरी माझें वचन अवगणी ॥ तरी तेचि क्षणीं वधावा ॥ ५७ ॥ वाळी निर्दाळिला ज्या बाणें ॥ त्याच शरें त्याचा प्राण घेणें ॥ ऐसें ऐकतां लक्ष्मणें ॥ राघवचरण वंदिले ॥ ५८ ॥ धनुष्यासी चढवूनि गुण ॥ वेगें चालिला उर्मिलाजीवन ॥ किष्किंधेसमीप येऊन ॥ लाविला बाण चापासी ॥ ५९ ॥ तों इकडे सूचना मारुती ॥ जाणवीत सुग्रीवाप्रती ॥ म्हणे एकला वनीं रघुपती ॥ चला वेगीं दर्शना ॥ ६० ॥ सीताशुद्धीसी त्वरित ॥ वानर धाडावे निश्चित ॥ तूं जाहलासी उन्मत्त बहुत ॥ रामकार्यार्थ नाठवे ॥ ६१ ॥ तारुण्यमदें आधींच उन्मत्त ॥ त्यावरी मद्यपानीं रत ॥ उपरी धनमद दाटला बहुत ॥ मान विशेष त्यावरी ॥ ६२ ॥ जाणे अत्यंत वाचाळपण ॥ कोणासी बोलों नेदी वचन ॥ जैसें मद्यपियाचें भाषण ॥ सैंव्यापसव्य नेणेचि ॥ ६३ ॥ तैसा तूं जाहलासी निश्चित ॥ स्त्रियांच्या संगें उन्मत्त ॥ विसरलासी स्वामिकार्यार्थ ॥ सूर्यसुत मग बोले ॥ ६४ ॥ जाहले घूर्णितें लोचन ॥ बोले उदासीन वचन ॥ म्हणे वानरसेना मेळवून ॥ सिद्ध करा हळू हळू ॥ ६५ ॥ ऐसें बोलोनि सूर्यसुत ॥ राणिवसामाजी प्रवेशत ॥ तों नगरद्वारीं ऊर्मिलानाथ ॥ येवोनि उभा ठाकला ॥ ६६ ॥ धनुष्यासी लावूनि बाण ॥ क्षोभे जैसा प्रळयाग्न ॥ पळों लागले वानरगण ॥ येती शरण सुग्रीवा ॥ ६७ ॥ सुग्रीव तेव्हां गजबजिला ॥ म्हणे हनुमंता रक्षीं मला ॥ येरू म्हणे सुमित्र कोपला ॥ तो नाटोपे कवणातें ॥ ६८ ॥ उभयदारांसमवेत ॥ शरण येत सूर्यसुत ॥ आणिक वानरभार समस्त ॥ सांगे हनुमंत समस्तां ॥ ६९ ॥ म्हणे हो नम्रता धरून ॥ अवघे घाला लोटांगण ॥ तैसेंच करिती वानरगण ॥ सुग्रीवासहित तेधवां ॥ ७० ॥ तारा रुमा पुढें होऊन ॥ सौमित्रासीं मागती चुडेदान ॥ सुग्रीव धरी दृढ चरण ॥ ऊर्मिलापतीचे तेधवां ॥ ७१ ॥ सौमित्र म्हणे क्रोधायमान ॥ ऐसे तुम्ही निर्दय पूर्ण ॥ श्रीराम सच्चिदानंदघन ॥ वनीं सांडोन राज्य करितां ॥ ७२ ॥ तो अनंतब्रह्मांडनायक ॥ अयोध्यानाथ पुण्यश्लोक ॥ त्यास वनीं सांडोनि राज्यसुख ॥ गोड कैसें वाटलें ॥ ७३ ॥ हनुमंत बोले वचन ॥ सर्व अपराध क्षमा करून ॥ उठवावा सूर्यनंदन ॥ प्रीतींकरोन ये समयीं ॥ ७४ ॥ मग उठवोनि सूर्यसुत ॥ राघवानुज आलिंगीत ॥ तंव वानरभार अद्भुत ॥ चहूंकडोन धांविन्नले ॥ ७५ ॥ वानरचमूसमवेत ॥ चालिला तेव्हां तमारिसुत ॥ जैसी नदी उचंबळोन बहुत ॥ मिळूं जाय जलार्णवा ॥ ७६ ॥ आवेशें वानरगण धांवत ॥ जैसें गोकुळ तृषाक्रांत ॥ सरितातीर्थें जळपानार्थ ॥ चपळत्वेंकरून लोटत ॥ ७७ ॥ कीं दात्याचें गृह लक्षून ॥ धांवती वेगें याचकजन ॥ कीं पहावया सद्गुरुचरण ॥ सच्छिष्य येती त्वरेनें ॥ ७८ ॥ कीं लग्नघडी उरली थोडी ॥ देखोनि धांवती वऱ्हाडी ॥ कीं मिळिंदेचकें धांवती तांतडी ॥ पद्म-

१५ सव्य = डावें, अपसव्य = उजवें. १६ गरगर फिरणारे ( मद्यपानानें ). १७ स्त्रियांचे महालांत. १८ तारा व रुमा ह्या दोघी स्त्रियांसह. १९ वानरसैन्यासहित. २० सूर्यपुत्र सुग्रीव. २१ सागराला. २२ भ्रमरसमुदाय.

मकरंद[23] सेवावया ॥ ७९ ॥ तैसे आले रघुपतीजवळी ॥ लोटांगणें घालिती सकळी ॥ रामें आलिंगिला हृदयकमळीं ॥ मित्रतनुज[24] आदरें ॥८०॥ आणिकही सकळ वानरां ॥ भेटला परत्रींचा[25] सोयरा ॥ कर जोडोनि पुढारां ॥ किष्किंधेश स्तवीतसे ॥ ८१ ॥ जय निगमागमवंद्या रघुवीरा ॥ भक्तकैवारिया आनंदसमुद्रा ॥ पंचकर्दमरथपुत्रा[26] ॥ विश्वनेत्रा विश्वपाळा ॥ ८२ ॥ शरणागतासी तूं वज्रपंजर[27] ॥ कदा नुपेक्षीं शार्ङ्गधर ॥ जैसें सबळ काष्ठ तारी नीरें[28] ॥ आपण वाढविलें म्हणोनी ॥ ८३ ॥ तिळभर पाषाण न तरे जळीं ॥ वृक्षां तारी सर्वकाळीं ॥ शरणागतांची माउली ॥ तैसाचि तूं श्रीरामा ॥ ८४ ॥ पद्मासी ढका न लावी भ्रमर ॥ काष्ठें तत्काळ करी चूर ॥ तेवीं भक्तपाळ अभक्तसंहार ॥ सीतावल्लभा करिसी तूं ॥ ८५ ॥ असो भूरत्नशुद्धीसी[29] वानर ॥ जावया इच्छिती सर्वत्र ॥ मग बोले विषकंठमित्र ॥ जाऊं द्या सत्वर चहूंकडे ॥ ८६ ॥ अर्कसुतें[30] पाठवून दूत ॥ वानर आणविले समस्त ॥ अष्टादश पद्मे बल अद्भुत ॥ समरीं कृतांता जिंकिती ॥ ८७ ॥ सुग्रीवें घालोन आण ॥ आणिले वेगें सप्तद्वीपींचे हरिगण[31] ॥ समस्तांसी म्हणे सूर्यनंदन ॥ ऐका वचन सत्य माझें ॥ ८८ ॥ सीताशुद्धि करून तत्त्वतां ॥ जानकी भेटवूं रघुनाथा ॥ हें कार्य सिद्धीस न पावतां ॥ निजनगरासी न जावें ॥ ८९ ॥ सीता न भेटवितां रघुवीरा ॥ जो कोणी जाईल माघारा ॥ तो मात्रागमनी अवधारा ॥ ब्रह्महत्यारी पापिष्ठ ॥ ९० ॥ त्यासी रौसभावरी[32] बैसवून ॥ तत्काळ छेदीन नासिका कर्ण ॥ पृथ्वीवरी फिरवीन ॥ स्वामिद्रोही म्हणोनियां ॥ ९१ ॥ सीताशुद्धि नोहे म्हणोन ॥ जो कोणी येईल परतोन ॥ त्यासी मी स्वहस्तें दंडीन ॥ छेदीन कर चरण तयाचे ॥ ९२ ॥ तंव द्वीपद्वीपींचे वानर ॥ गिरिकंदरीं जे राहणार ॥ मेरुपाठारवासी[33] समग्र ॥ देत भुभुःकार पातले ॥ ९३ ॥ नाद न मायेचि गगनीं ॥ चालतां दणाणे मंगळजननी[34] ॥ शेष कूर्म दचकले मनीं ॥ भुभुःकारध्वनि ऐकोनियां ॥ ९४ ॥ एक हरी[35] पर्वत उचलोनी ॥ कंदुकवत[36] घाडी गगनीं ॥ एक वरचेवर झेलोनी ॥ भिरकावितो दुसरीकडे ॥ ९५ ॥ एक महावृक्ष उपडोनि बळें ॥ झोडोनियां भक्षिती फळें ॥ पृथ्वी अंबर[37] समग्र भरलें ॥ रीसवानरीं[38] तेधवां ॥ ९६ ॥ एक गगनपंथें उडिया घेती ॥ स्वालीं पाडूं पाहती गगभस्ती[39] ॥ खुंटली समीरांची[40] गती ॥ वाट न फुटे चालावया ॥ ९७ ॥ एक पश्चिमसमुद्रा धांवती ॥ तों अस्तासी गेला दिनपती ॥ एक समुद्रीं पुच्छें बुडविती ॥ ओढून काढिती जलचरें ॥ ९८ ॥ दश लक्ष योनी उदकांत ॥ नानाजातींचे जीव बहुत ॥ आणोनि राघवासी दावित ॥ चतुःसमुद्र धुंडोनियां ॥ ९९ ॥ नानाजातींचे वानर ॥ बहुत रंग बहुत विकार ॥ एक उभे राघवासमोर ॥ वांकुल्या दाविती विनोदें ॥ १०० ॥ अति विशाळ घरोनि द्रुम[41] ॥ आनंदें नाचती प्लवंगम ॥ एक गायन करिती सप्रेम ॥ डुलत राम ऐकोनियां ॥ १ ॥ राग उपराग भार्येसहित ॥ मूर्च्छना शरीर कंपित ॥ सप्त ताल अति संगीत ॥ गीत प्रबंध खंडरचना ॥ २ ॥ गद्यपद्यछंदगती ॥ ऐकतां तटस्थ होय गभस्ती[42] ॥ ठायींच्या ठायीं शिळा विरती ॥

२३ कमळांतील मध. रस. २४ सूर्यपुत्र सुग्रीव. २५ परलोकींचा सखा ( राम ). २६ दशरथपुत्रा. २७ वज्राप्रमाणें अभेद्य पिंजरा. २८ पाण्यांतून. २९ सीताशुद्धीला. ३० वानरांचे समुदाय. ३१ गाढवावर. ३२ मेरुपर्वताच्या पृष्ठभागीं राहणारे. ३३ भूमि. ३४ वानर. ३५ चेंडूप्रमाणें. ३६ आकाश. ३७ रीस-आस्वलें. ३८ सूर्य. ३९ वायूची. ४० वृक्ष. ४१ वानर.

गायन ऐकतां तयांचें ॥ ३ ॥ असो यावरी मित्रपुत्र ॥ मित्रकुलमंडनातें समग्र ॥ दावीतसे सकळ भार ॥ पृथ्वी अंबर भरलें तें ॥ ४ ॥ जैसे कां जळतरंग ॥ सागरीं तळपती सवेग ॥ परी तो पाहतांचि सांगें ॥ सागरचि एकला ॥ ५ ॥ तैसा ब्रह्मानंदसागर रघुवीर ॥ तेथींच्या लहरी ते वानर ॥ असो पृथ्वी दिशा अंबर ॥ वानरमय दिसतसे ॥ ६ ॥ ते रघुनाथाची मनोवृत्ती ॥ सकळ सुर अवतरले क्षितीं ॥ वानरवेषें अपार शक्ती ॥ उचलूं भविती भूगोळ ॥ ७ ॥ नळ केला दळाधीश ॥ अठरा पद्मे वानर विशेष ॥ बाहात्तर कोटी रीसें ॥ छप्पन्न कोटी गोलांगुलें ॥ ८ ॥ सीतावल्लभ म्हणे किष्किंधानाथा ॥ मज वाटते बहुत चिंता ॥ अन्न वस्त्रें या समस्तां ॥ कोठून आतां पुरवावीं ॥ ९ ॥ अर्कजे म्हणे जनकजावरा ॥ यांसीं फळ मूळ कंद आहारा ॥ न मिळे तरी भक्षिती समीरा ॥ तेणेंचि तृप्त होती हे ॥ १० ॥ अंबर तरी हे दिगंबर ॥ शस्त्रें पर्वत किंवा तरुवर ॥ ऐकतां मंगळभगिनीचा वर ॥ परम आश्चर्य मानीत ॥ ११ ॥ सुग्रीव म्हणे राजीवनेत्रा ॥ हा खेळ तुझा कोमलगात्रा ॥ जाणोनि पुससी विचारा ॥ पदवी वानरां देऊनियां ॥ १२ ॥ असो यावरी ताराकांत ॥ सकळ वानरां आज्ञापीत ॥ त्रिभुवन धुंडोनि समस्त ॥ सीताशुद्धि करावी ॥ १३ ॥ महीतळ अतळ वितळ ॥ सुतळ तळातळ महातळ ॥ सातवें तें रसातळ ॥ शोधावया धाडिले ॥ १४ ॥ विलोकावे चतुर्दश लोक ॥ वैकुंठ कैलासादि सकळिक ॥ धुंडोनियां आवश्यक ॥ सीताशोध करावा ॥ १५ ॥ कैलासादि ब्रह्मलोक ॥ इंद्रचंद्रसूर्यलोक ॥ जनलोक तपोलोक ॥ सकळ शोधूं धाडिले ॥ १६ ॥ वरुणलोक भूलोक ॥ यमलोक पितृलोक ॥ मृत्युलोकासी विशेष देख ॥ लोक चतुर्दश धुंडावे ॥ १७ ॥ भरतखंड रमणकखंड ॥ हरित सत्य विधिविशेष प्रचंड ॥ केतु सुवर्ण द्राक्ष वितंड ॥ हरिखंड नववें पैं ॥ १८ ॥ जंबुद्वीप शाकद्वीप ॥ शाल्मली क्रौंच द्राक्षाद्वीप ॥ अंगवंगादि दक्षद्वीप ॥ छप्पन्न देश शोधिले ॥ १९ ॥ वनें उपवनें पर्वत ॥ ऋषिआश्रम विवरें बहुत ॥ भक्तांचीं स्थानें मठ बहुत ॥ शोधावया धाडिले ॥ १२० ॥ तीर्थें क्षेत्रें शोधिलीं नाना ॥ परी रामांगना कोठें दिसेना ॥ सीतेचें स्वरूप समजेना ॥ कष्टती हे बहुसाल ॥ २१ ॥ सीता रामाची ज्ञानशक्ती ॥ तिची कैसी आहे स्थिती ॥ न पुसतां व्यर्थचि भ्रमती ॥ अहंमतीं भुलोनियां ॥ २२ ॥ सद्गुरूसी न रिघतां शरण ॥ कदापि नोहे आत्मज्ञान ॥ नवनीत मंथनावांचून ॥ हाता न चढे सर्वथा ॥ २३ ॥ व्यर्थ हिंडतां भागले वानर ॥ दृष्टी न पडे सीता सुंदर ॥ परतोनि येती समग्र ॥ अधोवदन लज्जित ॥ २४ ॥ मग तयांचें समाधान ॥ स्वयें करीत रघुनंदन ॥ दक्षिणदिशेसी कोण कोण ॥ गेले तेंचि ऐका हो ॥ २५ ॥ मुख्य अंगद वाळीसुत ॥ नळ नीळ ऋषभ जांबुवंत ॥ पांचवा तो हनुमंत ॥ जो उमाकांत अवतरला ॥ २६ ॥ आणिक एक शत वानरगण ॥ रघुपतीची आज्ञा घेऊन ॥ आक्रमिलें सकळीं गगन ॥ वायुवेगेंकरोनियां ॥ २७ ॥ तंव तो कृतांतासी शिक्षा करणार ॥ महाराज जो रुद्रावतार ॥ अंगदासी म्हणे क्षण एक स्थिर ॥ तुम्हीं रहावें समस्तीं ॥ २८ ॥ कांहीं आठवलें मानसीं ॥ पुसोनि येतों रघुपतीसी ॥ ऐसें बोलोनि तयांसी ॥ वायुसुत परतला ॥ २९ ॥ एकाएकीं येऊन ॥ दृढ धरिले रामचरण ॥ उभा ठाकला कर जोडून ॥

४२ सुग्रीव. ४३ रविकुलभूषण श्रीरामाला. ४४ संपूर्ण. ४५ आस्वलें. ४६ काळ्या रंगाचे व गायीच्या शेपटासारखें शेपूट असलेले. ४७ सीतापती. ४८ वायु. ४९ अहंकारानें.

जैसा सुँपर्ण विष्णूजवळी ॥ १३० ॥ तो बोले मंजुळ उत्तरीं ॥ म्हणे भार्गवेंजिता अवधारीं ॥ सीताशुद्धि वानरीं ॥ कैसी करावी तें सांगा ॥ ३१ ॥ सीतेचें स्वरूप कैसें स्वामी ॥ केवीं ओळखिजे प्रुँवंगमीं ॥ रूपरेखा कैसी आम्हीं ॥ जाणावी जी राघवा ॥ ३२ ॥ ऐसें हनुमंत बोलतां ॥ संतोषला कमलोद्भवपिता ॥ म्हणे तुझिया बुद्धीस तुळितां ॥ वाचस्पति हळुवट ॥ ३३ ॥ तुवां पुसिलें सीतास्वरूप ॥ तरी तें जाण माझेंचि रूप ॥ जैसी प्रभा आणि दीप ॥ एकरूप दोहींचें ॥ ३४ ॥ जैसी कनक आणि कांती ॥ कीं रत्न आणि त्याची दीप्ती ॥ तैसी जाण सीता सती ॥ स्वरूप माझें अभेद ॥ ३५ ॥ सीतेच्या अंगींचा सुवास ॥ मृगमदौंहूनि विशेष ॥ अर्धयोजन आसपास ॥ घ्राँण-देवीसी संघटे ॥ ३६ ॥ खूण ऐकावी मारुती ॥ मुखीं कर्पूराची वसे दीप्ती ॥ माझें स्मरण अहोरातीं ॥ सीता सती करीतसे ॥ ३७ ॥ द्वादश-हस्तप्रमाण साचार ॥ सीतेसमीप पाषाण तरुवर ॥ त्यांसी माझें स्मरण निरंतर ॥ खूण साचार ओळखें ॥ ३८ ॥ अंतरखूण सांग सीतेतें ॥ कैकयीगृहीं म्यां स्वहस्तें ॥ वल्कलें नेसविलीं तियेतें ॥ वनवासासी निघतां पैं ॥ ३९ ॥ मग विनवी समीरात्मँज ॥ ऐसी खूण द्यावी मज ॥ जेणें अवनिँजा मानी सहज ॥ दास मी तुमचा सत्य कीं ॥ १४० ॥ ऐकोनि मारुतीचें वचन ॥ तोषलें रघुनाथाचें मन ॥ धन्य धन्य म्हण-वून ॥ शब्दरत्नें गौरविला ॥ ४१ ॥ धन्य ते अंजनी सज्ञान ॥ ऐसें प्रसवली निधान ॥ ज्याच्या प्रतापाखालीं संपूर्ण ॥ ब्रह्मांड ठेंगणें होय कीं ॥ ४२ ॥ प्रेम नावरे रघुनाथा ॥ हृदयीं आलिंगिलें हनुमंता ॥ वरदहस्त ठेवोन माथां ॥ करीं मुद्रिकाँ घातली ॥ ४३ ॥ खूण दिधली अवतारमुद्रिका ॥ जेणें मानी जनककन्यका ॥ मग साष्टांगें रघुनायका ॥ हनुमंत वंदी ते काळीं ॥ ४४ ॥ पुढती विलोकी रामवदन ॥ हृदयीं रेखिलें तैसेंचि ध्यान ॥ श्रीराम सद्गद होऊन ॥ बोलता जाहला ते काळीं ॥ ४५ ॥ कधीं येशील परतोन ॥ मग म्हणे वायुनंदन ॥ एक मास सरतां पूर्ण ॥ सीतादर्शन घेऊनि येतों ॥ ४६ ॥ ऐसें बोलून हनुमंत ॥ यशस्वी पूर्ण अयोध्यानाथ ॥ आनंदें गर्जोनि अक-स्मात ॥ गगनपंथें उडाला ॥ ४७ ॥ जैसा योगभ्रष्ट जन्म पावत ॥ मागुती स्वरूपीं ऐक्य होत ॥ तैसे कपी वाट पाहात ॥ वायुसुत आला तेथें ॥ ४८ ॥ रामस्मरणें अवघे गर्जती ॥ सँपक्ष नग जैसे उडती ॥ तैसे निरोँळमार्गें सर्व जाती ॥ अगस्तिँदिशा लक्षोनि ॥ ४९ ॥ चपळ पाणिद्वय चरण ॥ गगनीं झेंपावती हरिगँण ॥ यशस्वी अयोध्याप्रभु म्हणोन ॥ वारंवार गर्जती ॥ १५० ॥ अंतरिक्षीं जाती कपि-गण ॥ तों देखिलें शापदग्ध वन ॥ वानरांचीं किरँणें अडखळून ॥ मुरकुंडी वळोन पडियेले ॥ ५१ ॥ मागुती उड्डाण घेऊं जाती ॥ समस्तांच्या आकर्षिल्या शक्ती ॥ एकाकडे एक पाहाती ॥ तटस्थ मारुती जाहला ॥ ५२ ॥ ऐसें काय कारण व्हावयासी ॥ तरी तेथें पूर्वी दंडक ऋषी ॥ महातापसी तेजोराशी ॥ पुत्र त्यासी एक होता ॥ ५३ ॥ अष्टादश वरुषांचा सुत ॥ वनीं क्रीडतां अकस्मात ॥ वनदेवता अद्भुत ॥ भयानक घांविन्नली ॥ ५४ ॥ तिनें भक्षिला ऋषिनंदन ॥ दंडक ऋषीनें तें जाणोन ॥ शापिलें तेव्हां तें कानन ॥

५० गरुड. ५१ परशुरामाला जिंकणाऱ्या रामा. ५२ वानरांनीं. ५३ कस्तूरीपेक्षां. ५४ नासिकेला, नाकाला. ५५ वायुसुत मारुती. ५६ भूमिकन्या सीता. ५७ मांगठी. ५८ पंखांसहित पर्वत. ५९ आकाशमार्गानें. ६० दक्षिणदिशा. ६१ वानरसमुदाय. ६२ किरण, किराण, किलाण – उडी.

महाक्रोधेंकरूनियां ॥ ५५ ॥ जो या वनीं संचरेल प्राणी ॥ तो मरण पावेल तेचि क्षणीं ॥ कपी सावध रामस्मरणीं ॥ म्हणोनि प्राण वांचले ॥ ५६ ॥ असो तो दंडकाचा नंदन ॥ विशाळ ब्रह्मराक्षस होऊन ॥ नित्य भक्षी जीव मारून ॥ द्वादश योजनें भोंवते ॥ ५७ ॥ तेणें देखोन वानर ॥ मुख पसरोन भयंकर ॥ भक्षावया आला सत्वर ॥ कपिवीर गजबजिले ॥ ५८ ॥ ऐसें देखोन वालिकुमर ॥ परम-प्रतापी प्रचंडवीर ॥ निःशंक धांवोनि सत्वर ॥ राक्षस चरणीं धरियेला ॥ ५९ ॥ गगनीं गरगरां भोवंडिला ॥ उर्वीवरी आपटिला ॥ शरीर चूर जाहलें ते वेळां ॥ मृन्मयघटशकलासारिखें ॥ १६० ॥ ऐसा तो दंडकाचा पुत्र ॥ पावला तत्काळ पूर्वशरीर ॥ मग तेणें आपुला समाचार ॥ वानरांसी सांगितला ॥ ६१ ॥ वंदोनियां वानरगणा ॥ तत्काळ गेला पितृदर्शना ॥ पुढें रामदूतां पंथ सुचेना ॥ दिशा समजेना कोणती ॥ ६२ ॥ वृक्ष फळ ना जळ ॥ दग्ध वन दिसे सकळ ॥ क्षुधेतृषेनें विकळ ॥ वानर तेव्हां चरफडती ॥ ६३ ॥ ओढ-वलें परम कठिण ॥ शोधिती शुष्क विपिन ॥ तंव एका विवरांतून ॥ पक्षी फळें आणिती ॥ ६४ ॥ त्या विवरद्वारीं येऊन ॥ थोकले तेव्हां वानरगण ॥ एक योजन लंबायमान ॥ तमें करून पूर्ण तें ॥ ६५ ॥ पुढें जाहला वायुकुमर ॥ मागें येती समस्त वानर ॥ जैसी संतांची कांस मुमुक्षु नर ॥ धरिती आत्मसाधनासी ॥ ६६ ॥ कीं वेदाध्ययनेंकरून ॥ वर्तती जैसे विद्वज्जन ॥ कीं खेंड्गधारें तीर्थस्नान ॥ करूनि स्वर्गस्थ होती तैसे ॥ ६७ ॥ हनुमंताच्या आधारें समस्त ॥ तैसे वानर विराजत ॥ परी कासावीस जाहले तेथ ॥ मूर्च्छा येऊनि पडती पैं ॥ ६८ ॥ श्वासोच्छ्वास कोंडोन ॥ आकर्षले सर्वांचे प्राण ॥ मग हनुमंतें पुच्छेंकरून ॥ सकळ बांधोन उचलिले ॥ ६९ ॥ योजन एक क्रमोनि विवर ॥ मारुती गेला सत्वर ॥ पुढें प्रकाश देखिला अपार ॥ वन सुंदर सफळ तें ॥ १७० ॥ पुष्पफळभारें द्रुम ॥ वाढि-न्नले भेदीत व्योमें ॥ त्या वृक्षांवरी प्लवंगम ॥ चढावया शकती ना ॥ ७१ ॥ शरीर जाहलें परम क्षीण ॥ यालागीं ऊर्ध्व न होती किरणें ॥ तों सुप्रभा खेचरी येऊन ॥ उभी ठाकली तेधवां ॥ ७२ ॥ तियेप्रती पुसे वायुनंदन ॥ हेममय नगर पूर्ण ॥ फळें उदक अमृतासमान ॥ कवणें हें स्थान निर्मिलें ॥ ७३ ॥ सुप्रभा सांगे पूर्ववृत्तांत ॥ ये स्थळीं होता मय दैत्य ॥ तेणें तप करून अद्भुत ॥ विष्णुसुत प्रसन्न केला ॥ ७४ ॥ त्याकारणें हें स्थान ॥ विरिंचीनें निर्मिलें येऊन ॥ त्यासी दिधलें वरदान ॥ विवरामाजी चिरंजीव तूं ॥ ७५ ॥ विवराबाहेर येतां जाण ॥ तत्काळचि पावसी मरण ॥ तो नानाकौटिल्यविंदाण ॥ मंत्रहवन जाणतसे ॥ ७६ ॥ बहुत तप आचरोन ॥ दैत्यांचें इच्छी कल्याण ॥ मग इंद्रें विधीस प्रार्थून ॥ हेमा नारी निर्मिली ॥ ७७ ॥ स्वरूपें लावण्यें आगळी ॥ त्या विवरांत प्रवेशली ॥ मयदैत्यें देखिली ते वेळीं ॥ देखोनि तियेसी भूलला ॥ ७८ ॥ म्हणे मज तूं वरीं वो सुंदरी ॥ ते म्हणे चाल विवराबाहेरी ॥ मरण विसरोन दुराचारी ॥ उर्वी-वरी पातला ॥ ७९ ॥ तों इंद्रें घालोनि वज्रप्रहार ॥ तेथेंचि मारिला मयासुर ॥ मग हेमेलागीं नगर ॥ ब्रह्मदेवें दीधलें ॥ १८० ॥ मग कित्येक काळ क्रमोनि देखा ॥ हेमा गेली सत्यलोका ॥ मी तिची परिचारिका ॥ वननगर रक्षीतसें ॥ ८१ ॥ देवां दुर्गम हें स्थान ॥ मज

६३ भूमीवर. ६४ मातीच्या घड्याच्या आपराप्रमाणें. ६५ तळवारीच्या धारेनें. ६६ माकाशा. ६७ उष्मा, उष्ण. ६८ मप्सरा. ६९ सोन्याचें. ७० ब्रह्मदेव.

हेमा बोलिली वचन ॥ येथें येतील वानरगण ॥ तुज उद्धरोनि जाती ते ॥ ८२ ॥ हनुमंत सांगे पूर्ववृत्तांत ॥ सीताशुद्धीसी जातों समस्त ॥ क्षुधाक्रांत तृषाक्रांत ॥ या विवरांत प्रवेशलों ॥ ८३ ॥ मग तिनें घातला नमस्कार ॥ फळें पुष्पें आणोनि सत्वर ॥ वानरांसहित वायुकुमर ॥ षोडशोपचारीं पूजिला ॥ ८४ ॥ फळें उदक सेवून ॥ तृप्त जाहले वानरगण ॥ मग परतले तेथून ॥ परी विवरद्वार न सांपडे ॥ ८५ ॥ मग सुप्रभेसी म्हणे हनुमंत ॥ माते आम्हां दावीं शुद्ध पंथ ॥ तेव्हां ते स्वैचेरी बोलत ॥ नेत्र समस्त झांका तुम्ही ॥ ८६ ॥ ऐसें ऐकतां वचन ॥ समस्तीं विवरीं झांकिले नयन ॥ सुमुहूर्तीं एक मंत्र जपोन ॥ काय तेव्हां बोलिली ॥ ८७ ॥ मग म्हणे उघडा नेत्र ॥ तों समुद्रतीरीं उभे वानर ॥ सुप्रभा न दिसे साचार ॥ नवल थोर वर्तलें ॥ ८८ ॥ कपी आश्चर्य करिती ते क्षणीं ॥ जैसे संसारदुःखें वेष्टिले प्राणी ॥ त्यांसी निजज्ञानें उपदेशूनी ॥ सद्गुरु काढी बाहेर ॥ ८९ ॥ कीं जळते घरींहून काढिलें ॥ कीं पूरीं बुडतां वांचविलें ॥ कीं शिर छेदितां सोडविलें ॥ तैसें केलें सुप्रभेनें ॥ १९० ॥ कृपालु तो रविकुळभूषण ॥ तेणेंच ते दिघली घाडोन ॥ समुद्रतीरीं वानरगण ॥ ब्रह्मानंदें नाचती ॥ ९१ ॥ इकडे तें विवर त्यजूनि सुप्रभा ॥ किष्किंधेसी जाऊन सीतावल्लभा ॥ भेटली कौसल्यागर्भा ॥ दृष्टीभरोनि न्याहाळित ॥ ९२ ॥ म्हणे ब्रह्मानंदा आत्मयारामा ॥ मज पावन करीं मेघश्यामा ॥ तीस ज्ञान सांगोन बदरिकाश्रमा ॥ राघवेंद्रें पाठविली ॥ ९३ ॥ काळांतरें बदरिकाश्रमीं ॥ देह ठेवोनि कैवल्यधामीं ॥ जैसा आर्द्र घट मिळे भूमीं ॥ तैसीच स्वरूपीं समरसली ॥ ९४ ॥ इकडे समुद्रतीरीं वानर ॥ चिंताक्रांत करिती विचार ॥ म्हणती शुद्धि न लागे अणुमात्र ॥ कैसा प्रकार करावा ॥ ९५ ॥ एक म्हणती परतोनि जावें ॥ काय रघुवीरासी सांगावें ॥ आमुचेनि हे कदा नोहे ॥ सीताशुद्धि म्हणोनियां ॥ ९६ ॥ तरी आतां द्यावे जी प्राण ॥ परी नव जावें परतोन ॥ व्यर्थ काय वांचोन ॥ प्रेतवत संसारीं ॥ ९७ ॥ मग आणोन काष्ठभार ॥ ढीग रचिले पर्वताकार ॥ तत्काळचि वैश्वानर ॥ वानरवीरीं चेतविला ॥ ९८ ॥ तों जांबुवंत बोले वचन ॥ मीच आधीं सेवीन कृशान ॥ यावरी अंजनीगर्भरत्न ॥ ऋक्षपतीप्रति बोले ॥ ९९ ॥ म्हणे जांबुवंता सर्वज्ञा ॥ मजप्रति द्यावी आधीं आज्ञा ॥ यावरी तो ऋक्षराणा ॥ प्रत्युत्तर देतसे ॥ २०० ॥ मी बहु वडील तुम्हांहून ॥ मज आधीं देइजे हा मान ॥ मग बोले वायुनंदन ॥ वडील आयुष्यें मी असें ॥ १ ॥ जयाचे गांठीं आयुष्य फार ॥ तोचि वृद्ध म्हणावा साचार ॥ ज्याचें मरण जवळी निर्धार ॥ तोच धाकुटा बोलिजे ॥ २ ॥ तुझें आयुष्य मागें सरलें ॥ माझें बहुत पुढें उरलें ॥ ज्याचे गांठीचें धन वेंचलें ॥ तरी भाग्यवंत नव्हे तो ॥ ३ ॥ असो मग जांबुवंताप्रती ॥ समस्त वानर विनविती ॥ श्रीराममुद्रांकित मारुती ॥ त्यासी आज्ञा देइंजे ॥ ४ ॥ मग हनुमंतें झांकून नेत्र ॥ हृदयीं आठविला कामांतकेंमित्र ॥ जो जीमूतवर्ण कोमलगात्र ॥ अति पवित्र नाम ज्याचें ॥ ५ ॥ स्मरण करून हनुमंत ॥ लोटला तेव्हां अग्निआंत ॥ उडीसरसा अग्नि शांत ॥ परम अद्भुत वर्तलें ॥ ६ ॥ वानर म्हणती

७१ अप्सरा. ७२ आत्मज्ञान. ७३ ऐक्य पावली. ७४ अग्नि. ७५ शिवाचा मित्र (राम). ७६ मेघासारखा श्याम वर्ण आहे ज्याचा असा राम.

कचें जाहले ॥ काष्ठढीग पुढती रचिले ॥ आकाश कवळिलें ज्वालें ॥ दिशा घूमें दाटल्या ॥ ७ ॥ सपक्ष नँग येत अकस्मात ॥ तैसा लोटला हनुमंत ॥ तत्काळ जाहला अग्नि शांत ॥ न दिसे किंचित कोठें पैं ॥ ८ ॥ ऐसेंच केलें तीन वेळ ॥ परी न मरे अंजनीबाळ ॥ आश्चर्य करिती कपी सकळ ॥ वर्णिती बळ मारुतीचें ॥ ९ ॥ कपी म्हणती हनुमंता ॥ आम्हांसी मरों दे तरी आतां ॥ येरू म्हणे सागरीं तत्त्वतां ॥ प्राण देऊं चला हो ॥ २१० ॥ तेथोन निघाले वानर ॥ तों समीप देखिला सरितेश्वर ॥ चिंताक्रांत वायुकुमर ॥ ध्यानस्थ बैसला एकीकडे ॥ ११ ॥ वरकड ते वानरगण ॥ चिंतातुर करिती शयन ॥ तों संपाती मुख पसरून ॥ भक्षावया पातला ॥ १२ ॥ अरुणपुत्र तो पक्षी थोर ॥ जटायूचा ज्येष्ठ सहोदर ॥ मुख पसरोनि भयंकर ॥ वानरांसी भेडसावी ॥ १३ ॥ जवळ देखोनि संपाती ॥ कपी एकमेकां बोलती ॥ जटायूसारिखा निश्चितीं ॥ दिसतसे द्विजराज हा ॥ १४ ॥ म्हणती अनायासेंकरून ॥ आम्हांसी आलें जवळीं मरण ॥ मग आठवून रघुनंदन ॥ नामस्मरणें गर्जती ॥ १५ ॥ ज्याचें नाम घेतां संकटीं ॥ निर्विघ्न होय सकळ सृष्टी ॥ अपाय ते उपाय शेवटीं ॥ दुःख तें सुख होय ॥ १६ ॥ असो नामघोषें कपी गर्जती ॥ तों पक्ष फुटले संपातीप्रती ॥ तेणें लोटांगण घातलें क्षितीं ॥ जयजयकारेंकरूनियां ॥ १७ ॥ म्हणे धन्य धन्य तुम्ही वानर ॥ केला माझा आजि उद्धार ॥ कोठें आहे रघुवीर ॥ माझा सहोदर तेथें असे ॥ १८ ॥ बहुत दिवस जाहले ॥ परी त्याचा समाचार न कळे ॥ तों कपिवीर बोलिले ॥ जटायु मारिला रावणें ॥ १९ ॥ पितृव्य म्हणोनि रघुनाथ ॥ जटायूसी होता मानित ॥ त्याची उत्तरक्रिया समस्त ॥ राघवें केली निजांगें ॥ २२० ॥ जटायूचें सार्थक केलें ॥ संपातीनें अंग धरणीवरी टाकिलें ॥ म्हणे अहा ओखेंटें जाहलें ॥ दिशा शून्य बंधूविणें ॥ २१ ॥ सूर्यमंडळ पहावयालागोनी ॥ दोघे गेलों होतों उडोनी ॥ तैं म्यां पक्षाखालीं घालूनी ॥ जिवलग आपुला वांचविला ॥ २२ ॥ माझे पक्ष दग्ध जाहले ते वेळीं ॥ मग म्यां भयें हांक फोडिली ॥ सूर्यरथीं अरुणें ऐकिली ॥ स्नेहेंकरूनि कळवळला ॥ २३ ॥ मग सूर्यासी प्रार्थून ॥ वर दिधला मजलागून ॥ रामदूतांचें होतां दर्शन ॥ पक्ष संपूर्ण फुटतील ॥ २४ ॥ जैसा पक्षहीन पर्वत ॥ तैसा दडलों होतों येथ ॥ आजि पक्ष आले अकस्मात ॥ तुमच्या प्रतापेंकरूनियां ॥ २५ ॥ हा चंद्रगिरि पर्वत ॥ एथें चंद्रनामा आहे महंत ॥ तो सद्गुरु माझा यथार्थ ॥ मज वेदांतज्ञान सांगे ॥ २६ ॥ असो संपाती पुसे वानरांतें ॥ कोठें जातां येणें पंथें ॥ कपी म्हणती सीताशुद्धीतें ॥ करूं जातों पक्षींद्रा ॥ २७ ॥ संपाती मग बोलत ॥ पैल ते लंका दिसत ॥ सीता सती अशोकवनांत ॥ बैसली असे ध्यानस्थ ॥ २८ ॥ तरी तुम्हीं समस्त वानरीं ॥ बैसावें माझिये पृष्ठीवरी ॥ नेऊन घालीन पैलपारीं ॥ लंकेमाजी येघवां ॥ २९ ॥ अथवा एकोत्तरशत माझे सुत ॥ पृथक् बैसा समस्त ॥ मग म्हणे जांबुवंत ॥ मार्गाचि सांग आम्हांतें ॥ २३० ॥ संपाती बोले वचन ॥ ऐलतीरीं मलयागिरिचंदन ॥ त्याची शाखा शतयोजन ॥ लंकेमाजी प्रवेशली ॥ ३१ ॥ परी तेथें कृष्णसर्प असती ॥ म्हणोनि तुमची न चले गती ॥

७७ पर्वत. ७८ नदीपति समुद्र. ७९ सख्खा भाऊ. ८० घाईट. ८१ एकशें एक.

शतयोजन सरितापती ॥ लंकेसी परिधि आडवा ॥ ३२ ॥ नमस्कारोनि वानरांसी ॥ संपाती गेला निजाश्रमासी ॥ मग कपी बैसले विचारासी ॥ जांबुवंतासहित पैं ॥ ३३ ॥ सागराचें जीवन ॥ रुंद असे शतयोजन ॥ उडावया सामर्थ्य पूर्ण ॥ कोणा किती सांगा तें ॥ ३४ ॥ परस्परें ते वानर ॥ करिती उडावयाचा विचार ॥ शतयोजनें समुद्र ॥ उडवे कोणासी एकदां ॥ ३५ ॥ जांबुवंत म्हणे मी जाईन ॥ परी भागले माझे चरण ॥ मी आणि वैद्य सुषेण ॥ दोघेजण श्रमलों बहु ॥ ३६ ॥ बळीचिया घरीं अद्भुत ॥ त्रिविक्रम जाहला वैकुंठनाथ ॥ सात प्रदक्षिणा एके दिवसांत ॥ केल्या आम्हीं साक्षेपें ॥ ३७ ॥ तेणें भागले बहुत चरण ॥ त्याहीवरी वृद्धपण ॥ आणिक एकदां मेरूवरून ॥ उडी घातली म्यां तळवटीं ॥ ३८ ॥ तेव्हां सूर्यरथींचें चक्र ॥ मांडीस झगटलें जेवीं वज्र ॥ तेणें व्यथा अहोरात्र ॥ वृद्धपणीं जाचीतसे ॥ ३९ ॥ याकरितां नव जाय उड्डाण ॥ मग बोले वालिनंदन ॥ मी तेथें जाईन उडोन ॥ परी बाळ नेणतें ॥ २४० ॥ वानर म्हणती करावें काय ॥ या पैलतीरा कोण जाय ॥ जांबुवंत म्हणे वायुतनय ॥ याचे पाय धरा आतां ॥ ४१ ॥ तंव तो अंजनीचा नंदन ॥ करीत बैसला रामध्यान ॥ वानर घालिती लोटांगण ॥ करिती स्तवन मारुतीचें ॥ ४२ ॥ वानर म्हणती हनुमंतासी ॥ तूं सांग सखया किती उडसी ॥ हेंसें आलें मारुतीसी ॥ काय तयांसी बोलिला ॥ ४३ ॥ अंजनी जैं मज प्रसवली ॥ बाळभूक बहु लागली ॥ तैं लक्षयोजनें उडी घातली ॥ गैभस्तीवरी अकस्मात ॥ ४४ ॥ ऐसें वचन ऐकिलें ॥ वानर चरणांसी लागले ॥ राघवें बळ संपूर्ण ओळखिलें ॥ तरीच मुद्रा दीधली ॥ ४५ ॥ तरी आपुलें कार्य आतां ॥ सत्वर साधीं हनुमंता ॥ ऐसें म्हणतां कपिनाथा ॥ स्फुरण आलें ते काळीं ॥ ४६ ॥ हनुमंत म्हणे वानरांसी ॥ तुम्ही पर्वत धरा पोटेंसीं ॥ माझिया अंगवातें घंघोटेंसीं ॥ समुद्रांत पडाल कीं ॥ ४७ ॥ झाडें खोडें वानर कवळीत ॥ महेंद्रपर्वतीं चढे हनुमंत ॥ जांबुवंतादि वानर समस्त ॥ कौतुक पाहती मारुतीचें ॥ ४८ ॥ अवघे जे कां वानर ॥ त्यांसी पुसोन वायुकुमर ॥ आधीं पुच्छाचा फडत्कार ॥ गाजविला हनुमंतें ॥ ४९ ॥ हृदयीं केलें श्रीरामस्मरण ॥ शक्तिदाता तूं म्हणोन ॥ अहंकर्ताभाव गाळून ॥ मन निमग्न रघुनाथीं ॥ २५० ॥ तो परात्पर राजहंस ॥ जो रविकुळदिनेश ॥ ब्रह्मानंद पुराणपुरुष ॥ हृदयीं आठविला मारुतीनें ॥ ५१ ॥ रामविजय ग्रंथ वरिष्ठ ॥ षड्सान्नांचें भरलें ताट ॥ ज्यांसी श्रवणाची क्षुधा उत्कट ॥ ते जेवोत आदरें ॥ ५२ ॥ किष्किंधाकांड येथें संपलें ॥ पुढें सुंदरकांड आरंभिलें ॥ ग्रंथाचें पूर्वार्ध जाहलें ॥ उत्तरार्ध परिसा आतां ॥ ५३ ॥ ब्रह्मानंदा जानकीजीवना ॥ श्रीधरवरदा जगद्भूषणा ॥ अज अजिता अव्यय निर्गुणा ॥ अक्षय अभंग अव्यया ॥ ५४ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ अष्टादशाध्याय गोड हा ॥ २५५ ॥ ओंव्या ॥ ॥ २५५ ॥ ॥ अध्याय ॥ ॥ १८ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

॥ इति किष्किंधाकांड ॥

८२ खंदक. ८३ सूर्याचर. ८४ आंगठी. ८५ सोसाट्यासारखे.


१९
गोलिटेका

॥ श्रीगणेशाय नमः ॥ अद्भुत रामकथेचा महिमा ॥ देऊं गोदावरीची उपमा ॥ स्नान करितां कर्मा अकर्मा- ॥ पासोनि मुक्त होइजे ॥ १ ॥ उभयलोकीं इच्छा अधिक ॥ हींचि तटाकें सुरेख ॥ मनोरम प्रवाह देख ॥ उचंबळेल ब्रह्मानंदें ॥ २ ॥ रामकथामृतजीवन ॥ प्रेमळ तेथें जळचरें पूर्ण ॥ देव गंधर्व मुनिजन ॥ तटीं सघन तरू हेचि ॥ ३ ॥ अनेक चरित्रें तत्त्वतां ॥ त्याचि येथें मिळाल्या सरिता ॥ भक्ति ज्ञान वैराग्य पाहतां ॥ ऊर्मी येथें विलसती ॥ ४ ॥ ओघ चालिला अद्भुत ॥ फोडोनियां पापपर्वत ॥ सप्तकांड सप्तमुखें मिळत ॥ भक्तहृदयसागरीं ॥ ५ ॥ जे त्रिविधतापें तापले ॥ जे तीर्थव्रतें करितां भागले ॥ ते येथें स्नान करितां निवाले ॥ नाहीं परतले संसारा ॥ ६ ॥ या गंगेंत करितां स्नान ॥ अंगीं संचरे भक्तिज्ञान ॥ सकळ चातुर्यें एकवटोन ॥ पायां लागती अपार ॥ ७ ॥ सुंदरकांड इंद्रभुवन ॥ प्रेमरस तो सहस्रनयनें ॥ वाग्देवी हे रंभा पूर्ण ॥ नृत्य करी कुशलत्वें ॥ ८ ॥ अंतरीं उघडोनि श्रवणें ॥ श्रवण करोत पंडित जन ॥ सप्तकांडोत्तर संपूर्ण ॥ सुंदरकांड रसभरित ॥ ९ ॥ अठरावे अध्यायीं कथा अद्भुत ॥ समुद्रतीरीं उभा हनुमंत ॥ लंकेसी जावया उद्युक्त ॥ वानर समस्त पाहती ॥ १० ॥ लोकप्राणेशसुत ते वेळां ॥ महेंद्राचळीं उभा ठाकला ॥ परम भुभुःकारें गर्जिन्नला ॥ तेणें डळमळला भूगोळ ॥ ११ ॥ सुटला जातां अंगवात ॥ म्हणोनि वानर भयभीत ॥ पोटाशीं धरोनि पर्वत ॥ अगोदर बैसले ॥ १२ ॥ यशस्वी रघुवीर म्हणोन ॥ समीरात्मजें केलें उड्डाण ॥ त्याचे अंगवातेंकरून ॥ प्रळय वर्तला सर्वांसी ॥ १३ ॥ महातरुवर उन्मळोनी ॥ द्विजांऐसे फिरती गगनीं ॥ अचळ चळती ठायींहूनी ॥ भुभुःकारध्वनीसरिसेचि ॥ १४ ॥ नक्षत्रें रिचवती भूमंडळीं ॥ बैसली मेघांची दांतखिळी ॥ कृतांतासही ते वेळीं ॥ भय अत्यंत वाटलें ॥ १५ ॥ उचंबळलें समुद्रजळ ॥ डळमळलें उर्वीमंडळ ॥ हेलावती सप्तपाताळ ॥ अंगवातेंकरूनियां ॥ १६ ॥ भोगींद्रें दचकला अंतरीं ॥ कूर्म निजपृष्ठी सांवरी ॥ यज्ञवराह धरित्री ॥ उचलोनि देत दाढेसी ॥ १७ ॥ दिग्गज चळचळां कांपती ॥ मेरुमांदार डळमळती ॥ सुधापाणी परम चित्तीं ॥ भय पावले तेधवां ॥ १८ ॥ शचीवर मनीं दचकला ॥ अपर्णा पडे शिवाचे गळां ॥ भयभीत जाहली कमळा ॥ विष्णु तीतें सांवरी ॥ १९ ॥ विरिंचि सांगे सकळांप्रती ॥ सीताशुद्धीस जातो मारुती ॥ सुर विमानीं बैसोनि येती ॥ अद्भुत कौतुक पाहावया ॥ २० ॥ कौतुक विलोकिती सुर सकळ ॥ प्रतापरुद्र अंजनीबाळ ॥ कीं तो वासरमणि निर्मळ ॥ वानरवेषें जातसे ॥ २१ ॥ कल्पांतविजूचे उमाळे भडकती ॥ तैशीं कुंडलें कर्णीं तळपती ॥ वज्रकौपीन निश्चितीं ॥ कटिप्रदेशीं मुंजी झळके ॥ २२ ॥ त्रिगुणरूप कल्पांतचपळा ॥ तेवीं यज्ञोपवीत रुळे गळां ॥ उर्णें आणिलें दिव्य प्रवाळा ॥ मुखीं पुच्छाग्रीं रंग तैसा ॥ २३ ॥ अंगींच्या रोमावळी पिंजारत ॥ भुभुःकारें नभ गर्जत ॥ दिग्गजांचीं टाळीं बैसत ॥ आंदोळत ब्रह्मांड ॥ २४ ॥ गाजवी पुच्छाचा फडत्कार ॥ प्रतिशब्द देत अंबर ॥ दणाणत लंकानगर ॥ दशवदन हडबडला ॥ २५ ॥

१ लाटा. २ वाल्मीकिरामायणाचीं सात कांडें,–विभाग. ३ इंद्र. ४ श्रवणेंद्रिय अंतर्मुख करून. ५ वायुपुत्र मारुति. ६ पर्व्यांप्रमाणें. ७ पर्वत. ८ पहूं लागलीं. ९ भूगोळ. १० शेष. ११ देव. १२ पार्वती. १३ लक्ष्मी. १४ इंद्र. १५ सूर्य.

चपळ पदद्वय आणि पाणी ॥ झेंपावत धांवे गगनीं ॥ उड्डाणावरी उड्डाण घेऊनी ॥ रुद्रावतार जातसे ॥ २६ ॥ अंतरिक्षीं जाय सपक्ष पर्वत ॥ कीं क्षीराब्धिशायीप्रती द्विजेंद्र[१६] धांवत ॥ कीं मानस लक्षोनियां जात ॥ राजहंस ज्यापरी ॥ २७ ॥ कीं चिंतामणिवारु सवेग ॥ चपळत्वें क्रमी नभमार्ग ॥ अंजनीहृदयारविंदभृंग[१७] ॥ जात चपळ तैसाचि ॥ २८ ॥ पितयाचें बहुत गमन ॥ तयाहूनि सवेग कपीचें उड्डाण ॥ किंवा रघुनाथाचा बाण ॥ चापापासून सूटला ॥ २९ ॥ कीं मनाचें चंचळपण ॥ पावे जैसें चिंतिलें स्थान ॥ तैसा लोकैं-प्राणेशनंदन ॥ यमदिशा[१८] लक्षोनि जातसे ॥ ३० ॥ ऐसा अंतरिक्ष जातां हनुमंत ॥ आश्चर्य करिती देव समस्त ॥ म्हणती पाहों याचें सामर्थ्य ॥ रंभा त्वरित पाठविली ॥ ३१ ॥ साधितां परमार्थज्ञान ॥ आडवें येत मायाविघ्न ॥ कीं साधूं जातां निधानें[१९] ॥ विवशी[२०] येत आडवी ॥ ३२ ॥ तैसी रंभा देवीं धाडिली ॥ मुख पसरोनि उभी ठाकली ॥ तिच्या वदनांत उडी पडली ॥ हनुमंताची अकस्मात ॥ ३३ ॥ तिच्या कर्णद्वारें मारुती ॥ सर्वेंचि निघाला त्वरितगती ॥ तिनें हनुमंत स्तविला प्रीतीं ॥ स्वर्गाप्रती गेली मग ॥ ३४ ॥ समुद्रें पाठविला पर्वत ॥ मैनाकनामें अद्भुत ॥ तो ऊर्ध्वपंथें आडवा येत ॥ हनुमंतासी ते काळीं ॥ ३५ ॥ जों जों वाढे पर्वत ॥ तों तों उंच जाय हनुमंत ॥ मग तो अचैळ[२१] प्रार्थीत ॥ हनुमंतासी ते काळीं ॥ ३६ ॥ म्हणे महापुरुषा मजवरी ॥ विश्रांति घेईं क्षणभरी ॥ मग एकाच हस्तें भारीं ॥ नेंग[२२] पाताळीं घातला ॥ ३७ ॥ जो शांतिसुखें डोलत ॥ त्यास देखोन क्रोध पळत ॥ तैसा हस्तभारें पर्वत ॥ सागरांत दडपिला ॥ ३८ ॥ तेथोन उड्डाण पुढें चालिलें ॥ तों सिंहिकेनें वदन पसरिलें ॥ छायासूत्र[२३] साधिलें ॥ कापट्य केलें अद्भुत ॥ ३९ ॥ राहुकेतूंची जे माता ॥ तेचि सिंहिका जाण तत्त्वतां ॥ ती ग्रासावया हनुमंता ॥ पूर्वींच तेथें जपत होती ॥ ४० ॥ उताणी समुद्रांत निजोन ॥ बारा योजनें पसारिलें वदन ॥ छाया पडतांचि वायुनंदन ॥ तिच्या वदनांत कोसळला ॥ ४१ ॥ स्वर्गींचा हुंडा[२४] अकस्मात ॥ उर्वीवरी जेवीं पडत ॥ सिंहिकेच्या वदनीं हनुमंत ॥ पडिला सत्य त्यापरी ॥ ४२ ॥ ते दांतांसी दांत मेळवीत ॥ तों उद-रांत गेला हनुमंत ॥ पोट फाडून त्वरित ॥ आला बाहेर ते काळीं ॥ ४३ ॥ विषयपाश तोडोनि समस्त ॥ पैरमार्था[२५] निघे जेवीं विरक्त ॥ तैसा बाहेर आला हनुमंत ॥ सिंहिका तेथेंच निर्मौली[२६] ॥ ४४ ॥ पुढें चालिलें उड्डाण ॥ तों लंकादेवी आली धांवोन ॥ तिनें आडवा पाय घालून ॥ हनुमंतासी पाडिलें ॥ ४५ ॥ करितां श्रीरामभजन ॥ नसतीं विघ्नें येती धांवोन ॥ परी साधक तितुकीं लोटून ॥ साव-धान स्मरण करी ॥ ४६ ॥ असो लंकादेवीस मुष्टिप्रहार ॥ वज्रप्राय देत वायुकुमर ॥ तिनें स्तवन केलें अपार ॥ म्हणे मज न मारावें ॥ ४७ ॥ तूं विजयी होशील साचार ॥ तंव पुढें उडी जात अपार ॥ पैंडलंकेसी[२७] सत्वर ॥ उडी जावोन पडियेली ॥ ४८ ॥ उडी-सरसी ते वेळीं ॥ पडलंका ते दणाणली ॥ क्रौंचा असे तये स्थळीं ॥ कनिष्ठ भगिनी रावणाची ॥ ४९ ॥ तिचा घर्घरनामें भ्रतार ॥

१६ गरुड. १७ मारुति. १८ दक्षिण. १९ ठेवा. २० पिशाचिका. २१ पर्वत. २२ सांवली पकडून खालीं ओढणें. २३ बुरुज. २४ मोक्षसाधनासाठीं. २५ मरण पावली. २६ लंकेच्या बाहेरचें नगर, उपनगर.

इंद्रें मारिला तो असुर ॥ यालागीं क्रौंचेसी दशोंकंधर ॥ पडलंकेसी स्थापीत ॥ ५० ॥ असो तें दणाणलें लंकानगर ॥ म्हणोनि क्रौंचा घेत समाचार ॥ असुंरी[27] पाठविल्या अपार ॥ धरिला वानर ते काळीं ॥ ५१ ॥ तों हनुमंतें ते वेळे ॥ संकीर्ण[29] रूप धरिलें कोंवळें ॥ क्रौंचेनें डोळां देखिलें ॥ हातीं धरिलें दृढ तेव्हां ॥ ५२ ॥ म्हणे हा चिरा गे वानर ॥ पाक करोनि आणा सत्वर ॥ हनुमंत म्हणे माझें शरीर ॥ उदकमय सर्वही ॥ ५३ ॥ पाक करितां नुरेंचि कांहीं ॥ यालागीं तूं सगळाचि खाईं ॥ असुरीनें उचलोन लवलाहीं ॥ मुखांत घातला हनुमंत ॥ ५४ ॥ दांतांसी दांत मिळवी येरी ॥ तंव तो प्रवेशला अंतरीं ॥ काळिज धरोनि उभय करीं ॥ झोळकंबा घेत मारुती ॥ ५५ ॥ तंव ते चडफडे ते वेळे ॥ भोवंडी तेव्हां नेत्रबुबुळें ॥ गडबडां भूमीवरी लोळे ॥ वांचवा म्हणे मज आतां ॥ ५६ ॥ सूकरविष्ठा आणोन बहुत ॥ असुरी क्रौंचेसी पाजीत ॥ हनुमंत आंत कंटाळत ॥ निघों पाहत बाहेरी ॥ ५७ ॥ तिच्या नासिकद्वारें हनुमंत ॥ पुच्छाग्र बाहेर दावीत ॥ असुरी धरोनि वोढीत ॥ रोगबीज म्हणोनियां ॥ ५८ ॥ ओढी ओढितां अपार ॥ पुच्छरोगाचे पडले ढिगार ॥ मग हनुमंतें असुरी समग्र ॥ बांधोनियां आसुडिल्या ॥ ५९ ॥ हनुमंताचें अद्भुत बळ ॥ क्रौंचेचीं आंतडीं तोडिलीं सकळ ॥ उदर फाडोन तत्काळ ॥ बाहेर आला गर्जोनियां ॥ ६० ॥ असंख्यात राक्षसिणी ॥ भारा बांधोनि आपटिल्या धरणीं ॥ भिरकावीत समुद्रजीवनीं ॥ जाहलीं पारणीं जळचरांचीं ॥ ६१ ॥ जैसा मनाच्या अनंत वृत्ती ॥ मनोजयें योगी आकर्षिती ॥ तैशा असुरी संहारूनि मारुती ॥ विजयी जाहला पडलंके ॥ ६२ ॥ अत्यंत वृद्धा असुरी ॥ उरल्या होत्या नगरांतरीं ॥ तयांसी म्हणे रुद्रावतारी ॥ लंका कोणती दावा गे ॥ ६३ ॥ नाहीं तरी तुम्हांसी भक्षीन ॥ म्हणोन पसरिलें तेव्हां वदन ॥ वृद्धा बोलती भिऊन ॥ पैल ते लंका दिसतसे ॥ ६४ ॥ तों अस्ता गेला दिनकर ॥ निकुंभिलेंत प्रवेशला वायुकुमर ॥ शोधीत चालिला सीता सुंदर ॥ धांडोळीतें[31] सर्वही ॥ ६५ ॥ केरामाजी पडलें मुक्त[33] ॥ तें झोंरा[32] युक्तीनें निवडीत ॥ कीं सारासारविचार शोधीत ॥ साधक[33] आत्मप्राप्तीतें ॥ ६६ ॥ कीं यात्रेंत चुकली जननी ॥ सत्पुत्र काढी शोधूनी ॥ कीं महावैद्य कौंननीं[34] ॥ संजीविनी[35] शोधूं निघे ॥ ६७ ॥ समुद्रांत नेले वेद ॥ ते मत्स्यरूपी शोधी मुकुंद ॥ तैसा राघवचरणाब्जमिलिंद ॥ निकुंभिलेंत सीता शोधी ॥ ६८ ॥ तों देखिलें शैक्रजिताचें[36] मंदिर ॥ हेमरत्नमय अति सुंदर ॥ त्यांत प्रवेशला वानर ॥ राघवप्रिया पाहावया ॥ ६९ ॥ शक्रजित सुलोचना उभयतां ॥ शेजे पहुडलीं होय देखता ॥ मग म्हणे हेच होईल सीता ॥ रत जाहली परपुरुषाशीं ॥ ७० ॥ आतां घालोनि पाषाण ॥ घेईन दोघांचाही प्राण ॥ मग म्हणे ऐकावें भाषण ॥ बोलती काय परस्परें ॥ ७१ ॥ तंव ते शेषकन्या स्वभावें तेथ ॥ इंद्रजितासी बोलत ॥ तुमचा पिता लंकानाथ ॥ अनुचित वर्तत असे ॥ ७२ ॥ अणुमात्रहि वैर नसतां ॥ व्यर्थ आणिली जनकदुहिता ॥ कुळक्षयास तत्त्वतां ॥ कारण केलें गमताहे ॥ ७३ ॥

२७ रावण. २८ राक्षसिणी. २९ सूक्ष्म. ३० हुडकीत. ३१ मोतीं. ३२ सोनाराच्या दुकानांतील केरकचरा विकत घेऊन त्यांतून सुवर्णकण चाळून काढणारा. ३३ मुमुक्षु ३४ अरण्यांत ३५ प्राण वांचविणारी औषधी. ३६ इंद्रजिताचें.

परसतीचा अभिलाष करी ॥ साधुसंतांचा द्वेष घरी ॥ गुरुद्रोह ज्यामाझारी ॥ अल्पायुषी तो साच ॥ ७४ ॥ मातापित्यांचा करी तिरस्कार ॥ ब्राह्मणांसी निंदी निरंतर ॥ जो हिंसक दुष्ट दुराचार ॥ अल्पायुषी तोचि पैं ॥ ७५ ॥ हरिचरित्रें उच्छेदित ॥ निंदी महापुरुषांचे ग्रंथ ॥ नसतेंच काढी पाखंड मत ॥ अल्पायुषी तो साच ॥ ७६ ॥ म्हणोनि श्रावणीं[३७]रितनयवनिता ॥ आणोनि अनर्थ केला वृथा ॥ आतां लंकेची गति तत्त्वतां ॥ न दिसे पाहतां बरी कांहीं ॥ ७७ ॥ ऐकतां ऐसी मात ॥ लंकेंत प्रवेशे हनुमंत ॥ बिभीषणाचे मंदिरांत ॥ वायुसुत संचरला ॥ ७८ ॥ सत्वशील बिभीषण ॥ करीत श्रीविष्णूचें उपासन ॥ सदा होत हरिकीर्तन ॥ तेणें सदन दुमदुमलें ॥ ७९ ॥ नाहीं रजतमांची वार्ता ॥ न दिसे द्वेष हिंसा तत्त्वतां ॥ पुराणश्रवण हरिकथा ॥ याविण चर्चा नसेचि ॥ ८० ॥ दया क्षमा आणि शांती ॥ बिभीषणाचे हृदयीं नांदती ॥ असो तेथें कीर्तनीं मारुती ॥ निजानंदें नाचतसे ॥ ८१ ॥ कीर्तनकल्लोळरंगांत ॥ गडबडां लोळे हनुमंत ॥ कंठ होऊन सद्गदित ॥ ब्रह्मानंदें डुल्लतसे ॥ ८२ ॥ घेऊन भक्तांचे चरणरज ॥ कपाळीं लावी वायु[३९]तनुज ॥ म्हणे होय राक्षसवंशज ॥ परी भक्तराज सात्विक हा ॥ ८३ ॥ वायसांत[४०] कोकिळा वसत ॥ कीं दैत्यकुळीं प्रल्हाद भक्त ॥ कीं कागविष्ठेंत अश्वत्थ ॥ तें वास्तव्यस्थळ विष्णूचें ॥ ८४ ॥ कीं परिस जैसा पाषाणांत ॥ कीं शुक्तीमाँजी[४१] दिव्य मुक्त ॥ तैसा राक्षसकुळीं हा भक्त ॥ अलंकृत उत्तम गुणीं ॥ ८५ ॥ लंकेस आलिया रघुनंदन ॥ सहपरिवारें मारूनि रावण ॥ मग रघुपतीस प्रार्थोन ॥ राज्य संपूर्ण देईन यासी ॥ ८६ ॥ जैसे दवडोन मत्सर काम क्रोध ॥ साधु करिती निजबोध ॥ तैसा बिभीषण भक्त प्रसिद्ध ॥ अक्षय स्थापीन लंकेसी ॥ ८७ ॥ बिभीषणाचे मंदिरांत ॥ परम संतोषला हनुमंत ॥ जैसें तृषेनें पीडितां बहुत ॥ गंगा अकस्मात देखिली ॥ ८८ ॥ चकोरा पावे रोहिणीवँर[४२] ॥ कीं चातकां वोळ्ळला अंबुधर[४३] ॥ तैसें देखोनि बिभीषणाचें मंदिर ॥ वायुपुत्र आनंदला ॥ ८९ ॥ मग चालिला पुढारा ॥ देखे कुंभकर्णाचे मंदिरा ॥ तों दुर्गंधि आली एकसरां ॥ कंटाळे मन मारुतीचें ॥ ९० ॥ जैसा मेघ गडगडत ॥ तैसा कुंभकर्ण घोरत ॥ कुंजर[४४] म्हैसे खर[४५] बहुत ॥ नासिकाबिळांत गुंतले ॥ ९१ ॥ श्वासासरसे बाहेरी ॥ आरडत पडती एकसरीं ॥ कीं तो मंदराचळ पृथ्वीवरी ॥ निद्रिस्त होवोन पडियेला ॥ ९२ ॥ मातेचिया उदरांतून ॥ जेव्हां पडला कुंभकर्ण ॥ तेव्हां पसरोनि विशाळ वदन ॥ तीस सहस्र स्त्रिया गिळ्ळियेल्या ॥ ९३ ॥ असो देखोनं कुंभकर्ण ॥ आश्चर्य करी वायुनंदन ॥ म्हणे हा वृथा पुष्ट जन्मोन ॥ व्यर्थ येथें पडियेला ॥ ९४ ॥ देखोन अंत्यजांचें[४६] घर ॥ पळे जैसा श्रोत्रियँ[४७] पवित्र ॥ तैसा अंजनीचा पुत्र ॥ सांडोन चालिला पुढारा ॥ ९५ ॥ जो कल्पद्रुमीं द्विजँ[४८] राहणार ॥ तो बाभुळेवरी न बैसे साचार ॥ तैसें अव्हेरूनि घटँश्रोत्रांचें[४९] घर ॥ रामकिंकर पुढें जाय ॥ ९६ ॥ कोठें नुमगे मंगळभगिनी ॥ मारुती विचार करी मनीं ॥ कोणतें स्वरूप धरूनी ॥ लंकेमाजी हिंडावें

३७ आवणारि दशरथ त्याचा तनय श्रीराम त्याची वनिता=स्त्री, सीता. ३८ मारुती. ३९ कावळ्यांमध्यें. ४० शिंपल्यांत. ४१ चंद्र. ४२ वर्षला. ४३ मेघ. ४४ हत्ती. ४५ ४६ चांडाळाचें. ४७ वेदविद् ब्राह्मण. ४८ पक्षी. ४९ कुंभकर्णाचें.

॥ ९७ ॥ वानररूपेंकरूनी ॥ जरी विचरावें लंकाभुवनीं ॥ तरी राक्षस विनोदें घरूनी ॥ नाना चेष्टा करितील ॥ ९८ ॥ राक्षसरूप धरावें क्रूर ॥ तरी करवितील मांसाहार ॥ द्विजमांस भक्षितां साचार ॥ पुण्य समग्र भस्म होय ॥ ९९ ॥ कीं करूं जाऊं शिष्टाई ॥ तरी रावण न मानी काळत्रयीं ॥ राक्षसांसीं भेद करितां पाहीं ॥ विनोद माझा करितील ॥ १०० ॥ असो वानररूप पालटोनी ॥ अणुप्रमाण वेष धरूनी ॥ न खुपे मुंगीचे नयनीं ॥ घरोघरीं हिंडतसे ॥ १ ॥ जैसा जनीं असोनि जनार्दन ॥ जीवांसी नव्हे दृश्यमान ॥ तैसा निरालोट[५०]वनंदन ॥ व्यक्त न दिसे कोणासी ॥ २ ॥ घरोघरीं चर्या पाहत ॥ तों अवघे देखिले अधर्मरत ॥ वरिवरी आचार दावीत ॥ जैसा मेंद[५१] शांति घरी ॥ ३ ॥ घरोघरीं अग्निहोत्रें पूर्ण ॥ मुखीं सदा वेदाध्ययन ॥ परी दृष्टीं देखतां गोब्राह्मण ॥ मुखीं घालोन रगडिती ॥ ४ ॥ जारकर्मरत नारी नर ॥ रुद्राक्षमाळा घेऊन थोर ॥ जपती सदा कौटिल्यमंत्र ॥ जारण मारण मोहनादि ॥ ५ ॥ लटिकेचि डोळे झांकून ॥ दाविती शांति अवलंबून ॥ मांस रक्त मद्यपान ॥ घूर्णित[५२]नयन डुलती ॥ ६ ॥ हृदयीं मद मत्सर दुमदुमती ॥ वाचाबळें जनांसी गोंविती ॥ आम्ही कर्मातीत जाहलों म्हणती ॥ सदाचारभ्रष्ट क्रिया ॥ ७ ॥ आम्ही ज्ञानी सदा मुक्त ॥ झालों लोककर्मविरहित ॥ मना आवडे तो भोग भोगीत ॥ महा उन्मत्त विषयांध ॥ ८ ॥ व्यर्थ राक्षसांचा आचार ॥ जैसे स्नान करून आले कुं[५३]जर ॥ कीं भस्मांत लोळती खें[५४]र ॥ त्यांसी योगीश्वर कोण म्हणे ॥ ९ ॥ एक राक्षस संन्यास घेऊन ॥ करिती गोमांसभक्षण ॥ सवेंच संपादोनि आचमन ॥ कर्ता कोण म्हणती पें ॥ ११० ॥ विरजा[५५]होम करून ॥ तीळ तूप गेलें जळोन ॥ कामक्रोधादि साही जण ॥ अधिकाधिक माजले ॥ ११ ॥ नाना जीवजाती भक्षोनी ॥ म्हणती आम्हांतें शिवूं नका कोणी ॥ एक गोचर्म पांघरोनी ॥ जटाधारी बैसला ॥ १२ ॥ वनांत हिंडती वानप्रस्थ ॥ गोहननालागीं बैसती गुप्त ॥ ब्राह्मणांसी मारून भक्षीत ॥ कर्ता येथें कोण म्हणती ॥ १३ ॥ आम्ही ब्रह्मचारी विरक्त ॥ म्हणोन इंद्रियें ठेविलीं मुं[५६]क्त ॥ गृहस्थ पडले गृहगर्तींत ॥ पापें अमित जोडिती ॥ १४ ॥ क्षत्रिय अधर्म तेथें सर्व वसती ॥ समरीं पाठी देऊन पळती ॥ वां[५७]ढिवेच्या गोष्टी बोलती ॥ घाय घालिती अधर्में ॥ १५ ॥ वैश्यांचें अधर्मी चित्त ॥ जोखोन दुसऱ्यासी नाडीत ॥ शुद्ध धर्मवाढ पाडीत ॥ विप्रसेवा सांडोनियां ॥ १६ ॥ वाण्यांनीं उदीम तळासी आणिला ॥ सर्वत्रांचा गुंडाळा केला ॥ सोनारीं वरें[५८]कोल घातला ॥ सर्व जिरविले अलंकार ॥ १७ ॥ सोनार ठकठक करिती ॥ तेथें नाहीं सीता सती ॥ नो[५९]ळी झांतणी कांसार विकती ॥ चिच्छक्ती तेथें कैंची ॥ १८ ॥ व्यवहारें कालांतरीं प्राप्ती ॥ लक्षूनि परहस्तीं समर्पिती ॥ खें[६०]त हातीं लिहून घेती ॥ पाहोन रडती जन्मवरी ॥ १९ ॥ तेली भोंवे घाण्याभोंवता ॥ तेथें कैंची सती सीता ॥ साळी कोष्टी पांजें[६१]णी करितां ॥ जन्म वृथा पें गेला ॥ १२० ॥ गारींत निघाले जीवें जीत ॥ तांबोळी शायशीं पंचायशीं

५० आकाशापासून झालेल्या वायूचा पुत्र, मारुती. ५१ लुटारू. ५२ चंचल नेत्र असलेले. ५३ हत्ती. ५४ गर्दभ. ५५ संन्याशानें करण्याचा होम. ५६ स्वेच्छ. ५७ चढाओढीच्या. ५८ कसोटी. ५९ भांडीं. ६० कर्जपत्र. ६१ माग चालविणें.

करीत शिंपी अखंड तें खंडीत ॥ सीता निश्चित तेथें कैंची ॥ २१ ॥ रंगारी जें वस्त्र श्वेत ॥ तें काळें करिती निश्चित ॥ नमतेचि ठसे लावीत ॥ शुद्धावरी मूर्ख पैं ॥ २२ ॥ भुसाऱ्यांनीं धान्यसंग्रह केला ॥ मोजितां व्यर्थ जन्म गेला ॥ तेथें नाहीं जनकबाळा ॥ ते चित्कळा अवतरली ॥ २३ ॥ वेद पढती वेदपाठक ॥ तेथें निष्ठा न धरिती अभाविक ॥ प्रतिग्रहाग्रहाखालीं[६२] जन्म देख ॥ गेला निश्चित तयांचा ॥ २४ ॥ इंद भवति इदं न भवति ॥ पंडित हेंचि खटपटती ॥ सदा परनिंदा जल्पती ॥ सीता सती तेथें कैंची ॥ २५ ॥ ताठले सदा गायक ॥ अभिमानें हुंबती अधिक ॥ प्रेम सांडोनि गाती शृंगारिक ॥ सीता सती तेथें कैंची ॥ २६ ॥ ज्योतिषी गोंविले ग्रहगतीं ॥ गृहांत पडले ते न निघती ॥ आपण कोण हें नेणती ॥ सीता सती तेथें कैंची ॥ २७ ॥ प्रहस्तादि प्रधानघरें ॥ शोधिलीं सर्व अंतःपुरें ॥ पद्मिणीसम स्वरूपें सुंदरें ॥ पदनखा भृंग रुणझुणती ॥ २८ ॥ हनुमंत नाना तर्क करी ॥ कोठें नुमगे जनककुमरी ॥ म्हणे योगगतीनें निर्धारीं ॥ प्राण दिधला जानकीनें ॥ २९ ॥ कीं सरितापतीमाजी[६३] बुडाली ॥ कीं रावणें सक्रोध भक्षिली ॥ अंतरिक्षाहूनि खालीं पडली ॥ गेली चूर होऊनियां ॥ १३० ॥ कीं रावणें दृढ धरिली ॥ कळ लागोन सुकुमार मेली ॥ कीं रावणपत्न्यांनीं मारिली ॥ सवतीमत्सर करोनियां ॥ ३१ ॥ हनुमंत दुःखें गडबडां लोळे ॥ आंसुवें पूर्ण भरले डोळे ॥ म्हणे वृथा समुद्रलंघन केलें ॥ शून्य पडलें सर्व कार्य ॥ ३२ ॥ अहा सीते सीते करून ॥ वृथा आलिंगी राजीवनयन[६४] ॥ सीतेचें रूप म्हणोन ॥ हृदयीं पाषाण धरीतसे ॥ ३३ ॥ मी गेलिया रघुनाथ ॥ प्राण त्यागील यथार्थ ॥ सुग्रीव नळ नीळ जांबुवंत ॥ सुमित्रासुत न वांचती ॥ ३४ ॥ जाईल अयोध्येसी समाचार ॥ भक्तशिरोमणि भरत वीर ॥ शत्रुघ्न आणि माता समग्र ॥ प्राण देतील निर्धारें ॥ ३५ ॥ वृथा कष्ट गेले मुळींहूनी ॥ ठायीं न पडे जनकनंदिनी ॥ नव जाय मी परतोनी ॥ चापपाणी वाट पाहेल ॥ ३६ ॥ करितां रघुपतीचें स्मरण ॥ विघ्नें पळती मुळींहून ॥ जैसा सुटतां अद्भुत प्रभंजनें[६५] ॥ जळदजाळ[६६] क्षणीं वितळे ॥ ३७ ॥ पडतां किंचित अग्न ॥ तृण पर्वतींचें जाय जळोन ॥ कीं गृहस्वामी जागा देखोन ॥ तस्कर जेवीं पळती पैं ॥ ३८ ॥ कीं उगवतां दिनपती[६७] ॥ भगणें[६८] सर्व लोपती ॥ कीं मृगेंद्र[६९] देखतां निश्चितीं ॥ अचेतन होती वारुण[७०] ॥ ३९ ॥ तैसें रघुपतीचें करितां स्मरण ॥ विघ्नें सर्व पळती उठोन ॥ करोनि लंकेचें कंदन[७१] ॥ पालथी घालीन सागरीं ॥ १४० ॥ ऐसें बोलोन हनुमंत ॥ कलह माजविला लंकेंत ॥ घरोघरीं लोकांत आकांत ॥ ओढविला वायुसुतें ॥ ४१ ॥ रत्नजडित गोपुरें[७२] देखा ॥ विद्युत्प्राय झळकती पताका ॥ कनककळसां नाहीं संख्या ॥ दिव्य लंकानगर तें ॥ ४२ ॥ अंजनीसुत मत्तवारण ॥ पुच्छ हें वज्रशुंडा जाण ॥ सकळ गोपुरें ओढून ॥ अकस्मात पाडीत ॥ ४३ ॥ मध्यरात्र जाहली पूर्ण ॥ निद्रार्णवीं लोक निमग्न ॥ तों अकस्मात घरें कोसळून ॥ पडोनि जन दडपती ॥ ४४ ॥

६२ दान घेण्यांत. ६३ समुद्रांत. ६४ कमलनयन राम. ६५ वारा. ६६ मेघांची पंक्ति. ६७ सूर्य. ६८ नक्षत्रसमूह. ६९ सिंह. ७० हत्ती. ७१ समूळ नाश. ७२ वेशीचे दरवाज्यावरील बंगले.

जैसे पर्वताचे कडे खचती ॥ तैशीं गोपुरें खालीं पडती ॥ महाद्वारें ओढूनि मारुती ॥ झुगारीत गगनपंथें ॥ ४५ ॥ गवाँक्षद्वारें पुच्छ घालून ॥ गृहस्तंभ पाडी आकर्षून ॥ लत्ताप्रहारेंकरून ॥ कपाटें फोडोन टाकीत ॥ ४६ ॥ नगरतळ दणाणत ॥ भयंकर घोषें किंकाटत ॥ वृक्ष उन्मळी अकस्मात ॥ भयभीत लोक जाहले ॥ ४७ ॥ एकचि नगरीं कोल्हाळ झाला ॥ एक म्हणती पळा रे पळा ॥ ऐसें बोलतां अकस्मात शिळा ॥ येऊन पडती मस्तकीं ॥ ४८ ॥ राक्षसिणींचीं बाळें घरूनी ॥ भिरकावून देत गगनीं ॥ राक्षसी वक्षस्थळें बडवूनी ॥ हांका फोडिती आक्रोशें ॥ ४९ ॥ स्त्रीपुरुष दोघे नग्न ॥ एकांतीं केलें शयन ॥ तीं जागीं न होतां उचलून ॥ बिदीसँ शेज ठेवीत ॥ १५० ॥ भांडारगृह फोडून ॥ नाना वस्तूंच्या मांदुँसा आणोन ॥ रौंजबिदीस टाकी पूर्ण ॥ एकेच ठायीं सर्वांच्या ॥ ५१ ॥ पुच्छाचे चपेटे थोर ॥ रात्रीं वाजवी वारंवार ॥ भयभीत जाहले अवघे असुर ॥ बोलों उत्तर न शकती ॥ ५२ ॥ ऐसें नगर गांजोनि पूर्ण ॥ मग राजद्वारावरी जाऊन ॥ बैसला अंजनीनंदन ॥ कलह पूर्ण माजवावया ॥ ५३ ॥ हृदयीं पुच्छ धरोनि हनुमंत ॥ वारंवार तया चुंबीत ॥ डोळे मोडोन वांकुँल्या दावीत ॥ घुँलकावीत मान पैं ॥ ५४ ॥ तों नरनारी असंख्यात ॥ कलश घेऊन उदक आणीत ॥ पुच्छ गोंवूँन अकस्मात ॥ कपी फोडीत एकदांचि ॥ ५५ ॥ नारी दचकल्या समस्त ॥ कोण गे येथें घागरी फोडीत ॥ त्यांचे कर्णनासिकीं हनुमंत ॥ पुच्छ घालीत हळूचि ॥ ५६ ॥ तेणें दुश्चित नारी दचकती ॥ एक फडफडां शिंकती ॥ भरला घट मारुती ॥ जाऊं नेदी नगरांत ॥ ५७ ॥ घटस्फोट जाहले राजद्वारीं ॥ शिव्या देती नगरींच्या असुरी ॥ दशमुखा तुझी न उरे उरी ॥ जनककुमारी क्षोभली ॥ ५८ ॥ सीतेनें चेतँविलें भूत ॥ तें नगरांत हिंडे गुप्त ॥ हें लंकेचा करील निःपात ॥ दशकंठ यथार्थ निमेल ॥ ५९ ॥ तों राजदर्शनासी महावीर ॥ तुरंगारूँढ जाती सत्वर ॥ ऐसें देखोनि कपिवर ॥ काय करिता जाहला ॥ १६० ॥ मागिले पायीं तुरंग धरूनी ॥ गरगरां भोवंडोनि आपटी मेदिनीं[२] ॥ एकावरी एक उचलोनी ॥ अश्वासहित स्वार टाकी ॥ ६१ ॥ तों गजभार आले उन्मत्त ॥ त्यांचे पुच्छें उपडोनियां दांत ॥ वरी बैसले असुर समस्त ॥ दंतघायें झोडिले ॥ ६२ ॥ गुँढारांसहित गज उचलोनी ॥ भिरकावीत समुद्रजीवनीं ॥ तों रथारूढ होउनी ॥ राजकुमार पातले ॥ ६३ ॥ तंत वितंत घन सुस्वर ॥ वाजवीत वाद्यांचे गजर ॥ देखतां क्षोभला वानर ॥ पुच्छ सत्वर सोडिलें ॥ ६४ ॥ शतांचे शत रथ ओढोनी ॥ कुमार पालथे पाडिले मेदिनीं ॥ सारथी भिरकाविले गगनीं ॥ घोडे मारून टाकिले ॥ ६५ ॥ पुच्छघायेंकरूनी ॥ वाजंत्री झोडिले ते क्षणीं ॥ वाद्यें गेलीं सकळ गळोनी ॥ शंख करीत पळती ते ॥ ६६ ॥ तों पालखींत बैसोन प्रधान ॥ आले देखोनि वायुनंदन ॥ सूक्ष्म पुच्छ करून ॥ भोयांचे कानीं सूदिलें ॥ ६७ ॥ भोई दचकले एकाएकीं ॥ खालती आपटिली पालखी ॥ त्यांतें प्रधान धरोनि जवळिकीं ॥ ताडण करिती बहुसाल ॥ ६८ ॥ ते म्हणती

७३ खिडक्यांच्या झरोक्यांतून. ७४ गल्लींत. ७५ तिजोऱ्या. ७६ हमरस्त्यावर. ७७ माकडचेष्टा. ७८ डोलवतो. ७९ रोंवून. ८० पिसाळविलें. ८१ घोड्यावर बसून. ८२ भूमीवर. ८३ दोघांतील लोकांसह.

कां मारितां व्यर्थ ॥ श्रावणारिस्तुषेनें चेतविलें भूत ॥ तें तुमचा अपमान करीत ॥ शिबिका बहुत मोडिल्या ॥ ६९ ॥ पालख्या रथ गज घोडे ॥ झोडून पाडिले एकीकडे ॥ कोणी न ये राजद्वाराकडे ॥ जो तो दडे सांधींकोनीं ॥ १७० ॥ सर्वेंच उठोनि मारुती ॥ घरोघरीं घेत पाळेंती ॥ सीतेची गोष्ट कोणे रीती ॥ कैसें बोलती म्हणोनियां ॥ ७१ ॥ असो अस्ता गेला चंडकिरणें ॥ सभामंडपीं बैसला रावण ॥ तये सभेंत अंजनीनंदन ॥ प्रवेशता पैं जाहला ॥ ७२ ॥ सिंहासनीं बैसला लंकानाथ ॥ पाठीसी उभा रामदूत ॥ तों सभेस घरटीकार सांगत ॥ रावणासन्मुख वर्तलें तें ॥ ७३ ॥ म्हणती शत्रुरिजनका अवधारीं ॥ दुष्टें विघ्नें उदेलीं नगरीं ॥ लक्षांचे लक्ष फुटल्या घागरी ॥ नगरद्वारीं लंकेशा ॥ ७४ ॥ उगीच पडती गोपुरें[९०] ॥ बहुसाल रिचवेंती मंदिरें ॥ गगनमार्गीं टाकिलीं लेंकुरें ॥ कपाटें समग्र मोडिलीं ॥ ७५ ॥ वीर पडले म्हणताती ॥ निद्रिस्त जन वोसणेंती ॥ दुश्चिन्हें बहुत लंकापती ॥ शंका वाटे सांगतां ॥ ७६ ॥ ताटिकांतकाची कांतों झडकरी ॥ नेऊन सोडावी कांतोरीं ॥ इतुकेन स्वस्थ लंकापुरी ॥ चिरकाळ नांदेल ॥ ७७ ॥ ऐसें बोलतां घरटीकार ॥ क्रोधावला दिपंचवक्त्र ॥ म्हणे याची जिव्हा आणि श्रोत्र ॥ छेदूनियां टाका रे ॥ ७८ ॥ नसतें कल्पित दुश्चिन्ह ॥ सांगतो मूर्ख आम्हांलागून ॥ ऐसें ऐकतां वचन ॥ राघवप्रियकर क्षोभला ॥ ७९ ॥ म्हणे लटिकें दुश्चिन्ह ॥ यासीच दावूं खरें करून ॥ माझे पुच्छासी होवा बहु कल्याण ॥ करीन कदन सभेचें ॥ १८० ॥ तों रावणापुढें नापिक येत ॥ शस्त्रें श्मश्रु नीट करीत ॥ तों नापिकाचे कर्णीं हनुमंत ॥ पुच्छ घाली हळूचि ॥ ८१ ॥ तों नापिक भयें दचकला ॥ तेणें हात चांचरी[९७] गेला ॥ मिशी भादरली ते वेळां ॥ एकीकडील अवघीच ॥ ८२ ॥ तेणें क्षोभला लंकानाथ ॥ हस्तें ताडिला नापिक ॥ रावणाचे पृष्ठीवरी देख ॥ हनुमंतें मुष्टी ओपिली ॥ ८३ ॥ वमहस्तचपेटेकरूनी ॥ दाही छत्रें पाडिलीं धरणीं ॥ सवेंच दाही मुकुट हाणोनी ॥ सव्यहस्तें पाडिले ॥ ८४ ॥ छत्रदंड घेवोनि करीं ॥ घाली रावणाचे अंपानद्वारीं ॥ येरू मागें पाहे ते अवसरीं ॥ तों दंड माझारी खंडिला ॥ ८५ ॥ चौदा गांवें मंडप विस्तीर्ण ॥ सुगंधस्नेहें दीप शोभायमान ॥ चौदा सहस्र लाविले पूर्ण ॥ ठायीं ठायीं सुरेख ॥ ८६ ॥ कर्पूरदीप सतेज थोर ॥ आठ लक्ष सभेसमोर ॥ पाजळोन उभे असती असुर ॥ विशाळ शरीरें जयांचीं ॥ ८७ ॥ पुच्छवातें वायुकुमरें ॥ दीपिका विझविल्या एकसरें ॥ दीप तेथें एकही न उरे ॥ जाहले घाबरे सभालोक ॥ ८८ ॥ अंधार पडतांचि तेथ ॥ नागवूं लागला हनुमंत ॥ शस्त्रवस्त्रादि समस्त ॥ अलंकार घेत हिरोनि ॥ ८९ ॥ मुकुट घेऊन सत्वर ॥ मस्तकीं हाणी मुष्टिप्रहार ॥ जैसा सपक्षनगावरी पुरंदरें[१००] ॥ वज्र बळें प्रेरी पैं ॥ १९० ॥ बोटें तोडोनि मुद्रिका सकळ ॥ काढून घेत अंजनीबाळ ॥ कंठ पिळोन काढी माळ ॥ करिती कल्होळ असुर तेव्हां ॥ ९१ ॥ मुष्टि-

८४ दशरथाच्या सुनेनें. ८५ शोध. ८६ सूर्य. ८७ मारुती. ८८ गस्तीदार. ८९ इंद्रजिताच्या पित्या रावणा. ९० पुरद्वारें. ९१ एकमेकांवर आदळून पडतात. ९२ निद्रेत शब्द करून उठतात. ९३ सीता. ९४ अरण्यांत. ९५ दशमुख रावण. ९६ दाढी. ९७ कांपला. ९८ गुदद्वारांत. ९९ पंख असलेल्या पर्वतांवर. १०० इंद्र.

घातें हृदय फोडूनी ॥ मग घेत पदक काढूनी ॥ पादप्रहारें मांज मोडूनी ॥ मग ओढीत कडदोरा ॥ ९२ ॥ नेसलीं वस्त्रें घेत हिरोनी ॥ सर्वेंच लिंग टाकी तोडोनी ॥ एक वस्त्रें फेडोनी ॥ अगोदर टाकिती ॥ ९३ ॥ एक म्हणती आयुष्य जाहलें जरी ॥ वस्त्रालंकार देखों संसारीं ॥ परी लिंगाविण जन्मवरी ॥ काय म्हणोनि कंठावें ॥ ९४ ॥ राक्षसांचे चरण मोडूनी ॥ मग त्रीदें[1] घेतलीं काढूनी ॥ एक हांक फोडती ते क्षणीं ॥ घ्राणें[2] छेदोनी टाकीत ॥ ९५ ॥ एकासी एक दाविती खूण ॥ बोलूं नका रे वांचवा प्राण ॥ एक म्हणती निर्मूळ करावया पूर्ण ॥ महद्भूत उदेलें ॥ ९६ ॥ आणिली श्रीरामाची कांता ॥ सतियां शिरोमणी पतिव्रता ॥ तिनेंच हें भूत चेतविताँ ॥ प्रळय जाहला लंकेसी ॥ ९७ ॥ अंधार पडला दारुण ॥ सुटला अद्भुत प्रभंजन ॥ दीपिकां[3] आणितां जाती विझोन ॥ अनर्थ पूर्ण ओढवला ॥ ९८ ॥ एक म्हणती कोठें लंकानाथ ॥ एक म्हणती मेला कीं जित ॥ जवळ असतां न कळे मात ॥ थोर प्राणांत ओढवला ॥ ९९ ॥ देवांतक नरांतक राजसुत ॥ अतिकाय इंद्रजित ॥ मत्त महामत्त युद्धोन्मत्त ॥ प्रहस्तादि नागविले[4] ॥ २०० ॥ उघडोनियां सभाद्वार ॥ कोणी जाऊं न शके बाहेर ॥ होत पुच्छाचा घोर मार ॥ दडती असुर ठायीं ठायीं ॥ १ ॥ भयभीत दशकंधर ॥ म्हणे सत्य बोलिला घरटीकारें[5] ॥ प्रचंड विघ्न हें दुस्तर ॥ आलें साचार प्रत्यया ॥ २ ॥ रावणाचे पृष्ठीवरी मार ॥ वज्रप्राय होत थोर ॥ बोलूं न शके अणुमात्र ॥ घ्राण छेदील म्हणोन ॥ ३ ॥ रावणाचे कानीं हनुमंत ॥ हळूच जावोनि सांगे मात ॥ जनकजापतीचा मी दूत ॥ त्रासीन नगर समस्त हें ॥ ४ ॥ तुझीं छेदोनि दाही शिरें ॥ किष्किंधेसी नेईन क्षणमात्रें ॥ परी त्या अयोध्याधीशें उदारें ॥ आज्ञा नाहीं दीधली ॥ ५ ॥ ऐसें सांगतां वायुनंदन ॥ मनीं भ्रमित जाहला द्विपंचवदन[6] ॥ कर्णीं सांगीतलें वर्तमान ॥ कळलें नाहीं रावणा ॥ ६ ॥ ऐसा प्रळय करूनि थोर ॥ निघोन गेला वायुपुत्र ॥ नागविले प्रतापें वीर ॥ दशवक्त्रादिकरोनियां ॥ ७ ॥ दीपिका आणिल्या तात्काळ ॥ तों नागवेचि असुर सकळ ॥ कित्येक मूर्च्छा येऊनि विकळ ॥ बहुत पडिले धरणीये ॥ ८ ॥ कित्येकांचे मोडिले करचरण ॥ बहुतांचे तोडिले कर्ण घ्राण ॥ एक लिंग तोडिलें म्हणोन ॥ रावणासी दाखविती ॥ ९ ॥ दुःखें व्याप्त पिशिताशन[7] ॥ स्वसदना गेले उठोन ॥ चिंताक्रांत दशवदन ॥ राणिवसांत प्रवेशला ॥ २१० ॥ रामविजय ग्रंथ सुंदर ॥ हें विश्रांतीचें दिव्य मंदिर ॥ येथें पहुडले सज्ञान नर ॥ जे रघुवीर उपासक ॥ ११ ॥ जे मतिमंद अज्ञानी जन ॥ सेवितातीं अविद्यारण्य ॥ त्यांसी हें रामविजयसदन ॥ प्राप्त नोहे सहसाही ॥ १२ ॥ विषकंठहृदया[8] रघुनंदना ॥ श्रीरामा दशकंठदर्पहरणा ॥ श्रीधरवरदा जगद्भूषणा ॥ ब्रह्मानंदा सुखाब्धे ॥ १३ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ एकोनविंशतितमाध्याय गोड हा ॥ २१४ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ १९ ॥ ओंवीसंख्या ॥ २१४ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

१ कंबरडें. २ नाक. ३ विद्युत्प्रायवत्. ४ इंद्रजीत. ५ विवटया. ६ नग्न केले. ७ गरुडाचा. ८ सर्वतोपरी अनुभवाला. ९ नाक. १० रावण. ११ राक्षस. १२ शंकराचें हृदयच, आशा रामा.

२०

श्रीगणेशाय नमः ॥ जैसे दुर्बळाचिया गृहाप्रती ॥ समर्थ सोयरे आदरें येती ॥ त्यांसी पाहुणेर करावया निश्चितीं ॥ नाहीं शक्ति तयातें ॥ १ ॥ मग तो कंदमूळें आणून ॥ पुढें ठेवी प्रीतीकरून ॥ तैसे हे प्राकृत बोल पूर्ण ॥ संतांपुढें समर्पिले ॥ २ ॥ पयोब्धीपुढें ठेविलें तक्र ॥ कीं सुरभीपुढें अजाक्षीर ॥ कीं अमृतापुढें साखर ॥ नेऊनियां समर्पिली ॥ ३ ॥ कुबेरापुढें कवडी जाण ॥ रेकें ठेविली नेऊन ॥ शीतळ व्हावया रोहिणीरमण ॥ नवनीत पुढें ठेविलें ॥ ४ ॥ कल्पद्रुमापुढें बदरीफळ ॥ वैरागराचे कंठीं स्फटिकमाळ ॥ मलयगिरीसी गंध शीतळ ॥ निंबकाष्ठाचें चर्चिलें ॥ ५ ॥ जो ब्रह्मांडप्रकाशक गभस्ती ॥ त्यासी ओंवाळिजे एकारती ॥ परी तो घेत देखोन भक्ती ॥ ऐसेंचि येथें संतीं केलें ॥ ६ ॥ तैसे बोल हे हीन जाण ॥ परी संतांसी आवडती पूर्ण ॥ एकुणिसावे अध्यायीं कथन ॥ काय जाहलें तें परिसा हो ॥ ७ ॥ असुरांतें देखोनि हनुमंत ॥ सभा नागवूनि समस्त ॥ पुरुषार्थ करोनि अद्भुत ॥ गेला गुप्तरूपेंचि ॥ ८ ॥ लंकेचीं मंदिरें समस्त ॥ सीतेलागीं शोधी हनुमंत ॥ जैसा रत्नपरीक्षक निरीक्षीत ॥ रत्न आपुलें हारपलें ॥ ९ ॥ धांडोळिली लंकानगरी ॥ कोठें नुमगे जनककुमरी ॥ जेथें होतीं रावण-मंदोदरी ॥ तेथें हनुमंत पातला ॥ १० ॥ तंव तो शौक्रारिजनक ॥ हवन करी विघ्ननाशक ॥ शेजेवरी निजली निःशंक ॥ पट्टराणी मंदोदरी ॥ ११ ॥ उपरमाडियां गोपुरें ॥ राणिवसाचीं दामोदरें ॥ ऐशीं सहस्र अंतःपुरें ॥ सीतेलागीं शोधिलीं ॥ १२ ॥ सकळ स्त्रियांचे मंदिरांत ॥ रिघोन पाहे हनुमंत ॥ जो महाराज इंद्रियजित ॥ काम रुळत तोडरीं ॥ १३ ॥ रावणें आणिल्या नारी ॥ नागिणी पद्मिणी किन्नरी ॥ ज्यांचिया पदनखांवरी ॥ भ्रमर रुंजी घालिती ॥ १४ ॥ ऐशा सुंदरी देखत ॥ परी काममोहित नव्हे हनुमंत ॥ तो राघवप्रिय अतिविरक्त ॥ ऊर्ध्वरेता वज्रदेही ॥ १५ ॥ घटमठांमाजी व्यापून ॥ वेगळें असे जैसें गगन ॥ तैसाच अंजनीनंदन ॥ लोकांत वर्तूनि वेगळा ॥ १६ ॥ स्त्रिया शोधिल्या समस्त ॥ तंव मंदोदरी जेथें निद्रिस्त ॥ तेथें येऊनि हनुमंत ॥ उभा राहिला क्षणभरी ॥ १७ ॥ सुरूप देखोनि मंदोदरी ॥ म्हणे हेचि होय विदेहकुमरी ॥ निजेली पवित्रपणें शेजेवरी ॥ पतिव्रता म्हणोनियां ॥ १८ ॥ सतियां शिरोरत्न सीता सती ॥ परमपुरुषाची चिच्छक्ती ॥ मज आजि भेटली निश्चितीं ॥ म्हणोन मारुती नाचत ॥ १९ ॥ तों होमविधि संपादून ॥ तेथें आला द्विपंचवदन ॥ तों मंदोदरी उठोन ॥ पाय धूत पतीचे ॥ २० ॥ ऐसें देखोन हनुमंत ॥ क्षोभला जैसा प्रळयकृतांत ॥ म्हणे जानकी होय यथार्थ ॥ वश्य जाहली रावणातें ॥ २१ ॥ रामवचन आठवी मारुति ॥ सीतेचे वदनीं कर्पूरदीप्ती ॥ मग मुखाजवळी त्वरितगती ॥ मंदोदरीच्या पातला ॥ २२ ॥ मुख तिचें अवघ्राणिलें ॥ तों दुर्गंधीनें मन विटलें ॥ म्हणे मद्यपान आहे केलें ॥ उभयवर्गीं मिळोनियां ॥ २३ ॥ भिंतीस लावितां कान ॥ होत

१ क्षीरसमुद्रापुढें. २ ताक. ३ कामधेनूच्या पुढें. ४ शेळीचें दूध. ५ चंद्र. ६ लोणी. ७ बोर. ८ रत्नाच्या खाणीच्या. ९ चंदनपर्वताला. १० सूर्य. ११ नंगी करून. १२ सांपडेना. १३ रावण. १४ माडीघरच्या माड्या, घरचे मजले. १५ जनानखान्यांचीं घरें. १६ पायांत. १७ वास घेतला. १८ उभयतांनीं.

नाहीं रामस्मरण ॥ हे रावणासी मानिली पूर्ण ॥ तेथें स्मरण कायसें ॥ २४ ॥ तों रावण आणि मंदोदरी ॥ दोघें निजेलीं शेजेवरी ॥ सुषुप्तिअवस्थेमाझारी ॥ निमग्न जाहलीं ते वेळे ॥ २५ ॥ मनीं विचारी हनुमंत ॥ या दोघांसी उचलोनि त्वरित ॥ किष्किंधेसी न्यावीं यथार्थ ॥ पाहील रघुनाथ दोघांतें ॥ २६ ॥ किंवा घालून चंड पाषाण ॥ दोघांचे येथेंच घेऊं प्राण ॥ ऐसें विचारी वायुनंदन ॥ तंव अपूर्व वर्तलें ॥ २७ ॥ अकस्मात गजबजोनी ॥ मंदोदरी बैसली उठोनी ॥ आक्रोशें हांक फोडोनी ॥ वक्षःस्थळ बडवीत ॥ २८ ॥ सवेंचि महाशंख करीत ॥ दशकंठ धरी तिचे हात ॥ मैयजा म्हणे अतित्वरित ॥ सीता द्या हो रामाची ॥ २९ ॥ आजि विलोकिलें दुष्ट स्वप्न ॥ माझी गळसरी गेली जळोन ॥ एक बाळिया वानर येऊन ॥ अशोकवन विध्वंसिलें ॥ ३० ॥ तेणें वधिला अक्षया सुत ॥ समरीं गांजिला इंद्रजित ॥ घेऊन आला जनकजामात ॥ हरिदळ अद्भुत न वर्णवे ॥ ३१ ॥ शिळीं बुजोनियां सेरितानाथ ॥ सुवेळेसी आला अवनिजाकांतें ॥ रावण कुंभकर्ण शक्रजित ॥ वधोनि विजयी जाहला असे ॥ ३२ ॥ स्वप्न नव्हे हें ब्रह्मवचन ॥ तरी मंगळभगिनी द्या नेऊन ॥ मंगळदायक रघुनंदन ॥ त्यासी शरण जावें जी ॥ ३३ ॥ करितां परदाराअभिलाष ॥ कोण पावला मागें यश ॥ मानव नव्हे राघवेश ॥ पुराणपुरुष अवतरला ॥ ३४ ॥ उदरीं बांधोन दृढ पाषाण ॥ केवीं तरेल अगाध जीवेंन ॥ बळेंचि केलें विषप्राशन ॥ त्यासी कल्याण मग कैंचें ॥ ३५ ॥ खदिरांगारांचे शेजेवरी ॥ कैसा प्राणी निद्रा करी ॥ महासर्पाचे मुखाभीतरी ॥ हस्त घालितां उरे कैसा ॥ ३६ ॥ शार्दूळें करूं गेला पलाटण ॥ त्याचे जाळीमाजी जाऊन ॥ नांदेन म्हणे क्षेमकल्याण ॥ तो प्राणी कैसा वांचेल ॥ ३७ ॥ तुम्हीं जरी सर्वांसी जिंकिलें ॥ परी राघवेंद्रा तैसें नचले ॥ पूर्णब्रह्म अवतरलें ॥ भक्तजन रक्षावया ॥ ३८ ॥ यालागीं द्विपंचवदना ॥ मी शरण जात्यें रघुनंदना ॥ देवोनि तयाची अंगना ॥ चुडेदान मागेन ॥ ३९ ॥ मनीं विचारी लंकापती ॥ इचें वचन सर्व मानिती ॥ नेऊन देईल सीता अवचितीं ॥ भलत्यासी आज्ञा करूनियां ॥ ४० ॥ रावण म्हणे मंदोदरी ॥ तूं सर्वथा चिंता न करीं ॥ उदयीक नेऊनि जनककुमरी ॥ जनकजामाता देईन ॥ ४१ ॥ पांचकोटी राक्षसगण ॥ अशोकवनाभोंवते रक्षण ॥ तयांसी सांगोन पाठवी रावण ॥ रात्रंदिवस सावध असावें ॥ ४२ ॥ बिभीषण कुंभकर्ण इंद्रजित ॥ हे मैयजेसी मानिती बहुत ॥ यांचा विश्वास न धरावा यथार्थ ॥ नेऊनि देतील जानकीतें ॥ ४३ ॥ ऐसें समस्त वर्तमान ॥ वायुसुतें केलें श्रवण ॥ म्हणे मंदोदरी सती धन्य ॥ इच्या स्मरणें दोष नुरे ॥ ४४ ॥ तों दूतीस म्हणे दशकंधर ॥ अशोकवना जाऊनि सत्वर ॥ जनकात्मजेचा समाचार ॥ घेऊन येईं त्वरेनें ॥ ४५ ॥ तत्काळ चालिली दूती ॥ तयेमागें जाय मारुती ॥ आला अशोकवनाप्रती ॥ आनंद चित्तीं न समाये ॥ ४६ ॥ तों अशोकवृक्षाचे तळीं ॥ ध्यानस्थ बैसली मैथिली ॥ दूती परतली तत्काळीं ॥ हनुमंत तेथें राहिला ॥ ४७ ॥ जय जय रघुवीर अयोध्यानाथ ॥

१९ वश झाली. २० झोंपेच्या भरांत. २१ मंदोदरी. २२ वानरसैन्य. २३ पाषाणांनीं पुरून. २४ समुद्र. २५ श्रीराम. २६ सीता. २७ सागर. २८ बोराच्या इंगळ्यांवर, निखाऱ्यांवर. २९ वाघ. ३० फेरफटका. ३१ दशवदना.

म्हणोनि नाचों लागला हनुमंत ॥ म्हणे धन्य मी आजि येथ ॥ जगन्माता देखिली ॥ ४८ ॥ पुच्छ नाचवी कडोविकडी ॥ तोंड विटोवी[32] डोळे मोडी ॥ चक्राकार मारी उडी ॥ रामनाम गर्जोनियां ॥ ४९ ॥ चहूंकडे पाहे मारुती ॥ तों रामनामें वृक्ष गर्जती ॥ पंचभूतें पक्षी घुमती ॥ रामस्मरणेंकरूनियां ॥ ५० ॥ म्हणे हे होय सीता सती ॥ पुराणपुरुषाची[33] चिच्छक्ती[34] ॥ सुटली कर्पूराची दीसी ॥ पाषाण स्मरती रामनाम ॥ ५१ ॥ मृगमदाहोनि[35] विशेष ॥ सीतेच्या अंगींचा सुवास ॥ अशोकवन आसपास ॥ दुमदुमलें तेणेंचि ॥ ५२ ॥ तेथें रक्षण असे त्रिजटा ॥ तिनें राघवीं धरिली निष्ठा ॥ सत्संगाचा महिमा मोठा ॥ दुष्ट पापिष्ठा सद्भाव उपजे ॥ ५३ ॥ यावरी अंजनीहृदयरत्न ॥ गुप्तरूपें जवळ येऊन ॥ जानकीचे वंदोनि चरण ॥ मुद्रिका पुढें ठेविली ॥ ५४ ॥ ध्यानस्थ बैसली सीता सती ॥ मानसीं चिंती रघुपती ॥ पुढें उभा असे मारुती ॥ बद्धांजली करूनियां ॥ ५५ ॥ इंदिरेपाशीं[36] स्वर्गेंद्र[37] ॥ कीं अपर्णेसमीप[38] नंदिकेश्वर[39] ॥ कीं शचीपुढें जयंत पुत्र ॥ उभा ठाके प्रीतीनें ॥ ५६ ॥ असो कनकदंड पडे पृथ्वीवरी ॥ तैसा जानकीसी नमस्कारी ॥ मग त्या अशोकवृक्षावरी ॥ राघवप्रिय ओळंघली[40] ॥ ५७ ॥ इकडे तंमालनील सांवळा ॥ ध्यानीं विलोकीत जनकबाळा ॥ तों अवतारमुद्रिका ते वेळां ॥ सव्यकरांगुळीं दिसेना ॥ ५८ ॥ मुद्रिका न दिसे म्हणोन ॥ श्रावणारिस्नुषा[41] उघडी नयन ॥ तों मुद्रिका पुढेंचि जाण ॥ देदीप्यमान पडली असे ॥ ५९ ॥ मुद्रिका देखतां ते वेळीं ॥ हृदयीं आलिंगी जनकबाळी ॥ विमलांबुघारा नेत्रकमळीं ॥ जानकीच्या सूटल्या ॥ ६० ॥ म्हणे सांडोनि रघूत्तमातें ॥ माये कैसी आलीस येथें ॥ राम आणि सौमित्रातें ॥ त्यजोनि कोठें आलीस ॥ ६१ ॥ जगद्वंद्य तो श्रीराम ॥ जो चराचरफैलांकितद्रुम[42] ॥ त्याची वार्ता स्वस्तिक्षेम ॥ सांग मुद्रिके मजपासीं ॥ ६२ ॥ तों त्या वनीं निशाचरी ॥ तेथें होत्या दुराचारी ॥ विक्राळरूपें ते अवसरीं ॥ सीतेजवळी धांविन्नल्या ॥ ६३ ॥ कां गे रडतीस म्हणोन ॥ पसरोनि आल्या विक्राळ वदन ॥ तुज आम्ही भक्षूं तोडून ॥ कुटके[43] करोन तिळप्राय ॥ ६४ ॥ कैंचा राम तमाळनीळ ॥ तूं रावणासी घालीं माळ ॥ राक्षसिणी करिती कोल्हाळ ॥ सीतेभोंवत्या मिळोनियां ॥ ६५ ॥ बाँबरझोटी[44] भयंकर ॥ कपाळीं चर्चिला शेंदूर ॥ लंब स्तनें विशाळ उदर ॥ पर्वत माजी सांठवती ॥ ६६ ॥ असो ऐसें देखोन हनुमंत ॥ पुच्छ सोडी अकस्मात ॥ राक्षसिणी झोडिल्या समस्त ॥ प्राणांसी बहुत मूकल्या ॥ ६७ ॥ राक्षसिणी फिरविती डोळे ॥ पुच्छें आंवळिले दृढ गळे ॥ एक म्हणती जनकबाळे ॥ रक्षीं माते आम्हांसी ॥ ६८ ॥ निर्मिल्या[45] बहुत राक्षसिणी ॥ उरल्या लागती सीतेचे चरणीं ॥ कित्येक गेल्या पळोनी ॥ दशकंठातें सांगावया ॥ ६९ ॥ हृदयीं बोध[46] प्रकटतां जाणा ॥ भ्रांति भुली इच्छा वासना ॥ आशा मनशा तृष्णा कल्पना ॥ पळती जैशा क्षणार्धें ॥ ७० ॥ तैशा पळाल्या निशाचरी ॥ जानकी मुद्रिकेतें विचारी ॥ शरयूतीरविहारी[47] ॥ कोठें

३२ शब्द करितात. ३३ आदिनारायणाची. ३४ माया. ३५ कस्तूरीपेक्षां. ३६ लक्ष्मीजवळ. ३७ पक्षीश्रेष्ठ गरुड. ३८ पार्वतीपाशीं. ३९ श्रेष्ठ नंदी. ४० इंद्राणी. ४१ चढला. ४२ स्थावर आणि जंगम वस्तु हींच आहेत फळें ज्याचीं असें झाड. ४३ तुकडे. ४४ मोकळे सोडलेले केश. ४५ मेल्या. ४६ आत्मज्ञान. ४७ श्रीराम.

सांग मुद्रिके ॥ ७१ ॥ मज आलिंगितां श्रीरामचंद्र ॥ तेव्हां कंठीं न सोसेचि हार ॥ आतां गिरी कानन समुद्र ॥ दोघांमध्यें पडियेले ॥ ७२ ॥ वाल्मीकानें भविष्य कथिलें ॥ तें काय सर्व व्यर्थ गेलें ॥ एक कपि बळिया येऊन बळें ॥ लंकानगर जाळील ॥ ७३ ॥ मज देऊनि समाधान ॥ सवेंचि आणील रघुनंदन ॥ पाषाणीं समुद्र बुजवोनि[४८] ॥ दशवदनासी मारील पैं ॥ ७४ ॥ तों मुद्रिका नेदी प्रतिवचन ॥ म्हणे मज कळली खूण ॥ माझ्या विरहेंकरून ॥ देह राघवें त्यागिला ॥ ७५ ॥ कीं योगियांचे ध्यानीं गुंतला ॥ कीं भक्तधांवण्या धांवला ॥ कीं सौमित्रें माघारा नेला ॥ म्यां छळिलें म्हणोनियां ॥ ७६ ॥ कृपा न करवे मजवरी ॥ तरी येऊन माझा वध करीं ॥ मी बुडाल्यें चिंतासमुद्रीं ॥ काढीं बाहेरी त्वरेनें ॥ ७७ ॥ अहा रामा राजीवनेत्रा ॥ दशकंठरिपु[४९] विषकंठमित्रा[५०] ॥ पुढें पाठविली कां हे मुद्रा ॥ कोण्या विचारें-करूनियां ॥ ७८ ॥ मृगत्वचेची[५१] कंचुकी इच्छिली ॥ हाच अन्याय घडला मुळीं ॥ म्यां पापिणीनें ते वेळीं ॥ सौमित्र वीर छळियेला ॥ ७९ ॥ म्यां साधुछळण केलें ॥ म्हणोनि राक्षसाहातीं सांपडलें ॥ मजला वियोगदुःख घडलें ॥ त्याच दोषेंकरूनियां ॥ ८० ॥ जे साधुछळण करिती ॥ ते मजऐसें दुःख पावती ॥ अंतीं जाती अधोगती ॥ महाअनर्थी पडती ते ॥ ८१ ॥ इत्यादि भाव तये क्षणीं ॥ दावी त्रिभुवनपतीची राणी ॥ म्हणे हा देह ठेवूनी ॥ काय कारण पैं असे ॥ ८२ ॥ सीता देखोन विव्हळ ॥ वृक्षगभीं अंजनीबाळ ॥ गायन आरंभी रसाळ ॥ राघवलीला निर्मळ जे ॥ ८३ ॥ तो साक्षात् रुद्रावतार ॥ रुद्रवीणा जैसा सुस्वर ॥ तैसा कंठ अतिमधुर ॥ कंपस्वर गातसे ॥ ८४ ॥ कपीचें गायन रसाळ ॥ तटस्थ जाहलें रविमंडळ ॥ पाताळ सांडोन फणिपोळ[५२] ॥ येऊं भावी तेथें पैं ॥ ८५ ॥ तटस्थ जाहला प्रभंजन[५३] ॥ वेधला चंद्राचा हरीण ॥ आशोकवनींचे द्विजगण[५४] ॥ चारा घेऊं विसरले ॥ ८६ ॥ अयोध्यापतीची राणी ॥ तल्लीन होऊनि ऐके श्रवणीं ॥ अशोकवृक्षामधूनी ॥ मंजुळ ध्वनि उमटत ॥ ८७ ॥ जो अज अजित निर्गुण ॥ कमलमित्रकुलभूषण[५५] ॥ भक्त-हृदयमिलिंदे[५६] पूर्ण ॥ जलदवर्ण जलजाक्ष ॥ ८८ ॥ जो मंगलधाम मंगलकारक ॥ जो मंगळभगिनीप्राणनायक[५७] ॥ मंळजननीउद्धारक[५८] ॥ प्रतापार्क श्रीराम ॥ ८९ ॥ जो द्विपंचमुखदर्पहरण ॥ जो चंडीशकोदंडप्रभंजन ॥ भवगजविदारण पंचानन ॥ नरवीरांतक जो ॥ ९० ॥ जानकी जयाची चित्कळा ॥ रची अनंत ब्रह्मांडमाळा ॥ तो रघुवीर परब्रह्मपुतळा ॥ अतर्क्य लीला जयाची ॥ ९१ ॥ सच्चिदानंदतनु निष्कलंक ॥ पितृआज्ञाप्रतिपालक ॥ जो मायाचक्रचालक ॥ जगद्वंद्य जगद्गुरु ॥ ९२ ॥ जो पंचमहाभूतांवेगळा साचार ॥ तो पंचवटी-वासी रघुवीर ॥ तेथें द्विपंचवदन सत्वर ॥ कपटमृग धेवोनि गेला ॥ ९३ ॥ तों द्विपंचवदन दुराचार ॥ पर्णकुटींत प्रवेशला तस्कर ॥ भूगर्भीचें रत्न सुंदर ॥ हरोनि नेलें क्षण न लागतां ॥ ९४ ॥ त्या तस्कराचा माग काढीत ॥ किष्किंधेसी आला जनकजामात ॥ शक्रे-सुत[५९] वधोनि अकस्मात ॥ अर्कजें[६०] राज्यीं स्थापिला ॥ ९५ ॥ त्या सीतावल्लभाचा किंकर ॥ दासानुदास एक वानर ॥ तेणें गांजोनि

४८ बांधून. ४९ रावणाच्या शत्रो. ५० शंकराच्या मित्रा. ५१ हरिणाच्या कातड्याची. ५२ वासुकी. ५३ वायु. ५४ पक्षी. ५५ सूर्यवंशालंकार. ५६ भक्तांच्या हृदयांतील भ्रमर. ५७ जीवलगति. ५८ भूमीचा उद्धार करणारा. ५९ इंद्रपुत्र वाली. ६० सूर्यपुत्र सुग्रीव.

लंकानगर ॥ अशोकवना आला असे ॥ ९६ ॥ ऐसें ऐकतां गायन ॥ आनंदमय भूतनयेचें मन ॥ मग वृक्षाजवळी उभी राहून ॥ करी नमन तयातें ॥ ९७ ॥ म्हणे धन्य धन्य तूं तरुवरा पूर्ण ॥ कोण तुजमाजी कीर्तन ॥ त्याचें पाहीन मी वदन ॥ धरीन चरण आदरें ॥ ९८ ॥ जो करितो तुजमाजी कीर्तन ॥ त्याची जननी धन्य धन्य ॥ त्यासी सदा असो कल्याण ॥ नलगे विघ्न कल्पांतीं ॥ ९९ ॥ ज्यासी रामकीर्तन आवडे ॥ त्यासी सेंकडें कदा न पडे ॥ चारही मुक्ती तयापुढें ॥ दासी होऊनि राबती ॥ १०० ॥ ऐसें जगन्माता बोलत ॥ तों उगाचि राहिला हनुमंत ॥ न बोले कांहींच मात ॥ पाहे तटस्थ जानकी ॥ १ ॥ म्हणे येथें कापट्य पूर्ण ॥ कोण करितो न कळे कीर्तन ॥ बाहेर न भेटे येऊन ॥ तरी आतां प्राण सांडीन मी ॥ २ ॥ अत्यंत कृश जाहली गोरटी ॥ मुद्रिका घातली मैनगटीं ॥ म्हणे अयोध्यापते जगजेठी ॥ नव्हे भेटी तुझी आतां ॥ ३ ॥ मग जनकात्मजेनें ते वेळां ॥ वेणीदंड वेगें काढिला ॥ त्याचा गळां पाश घातला ॥ प्राणत्यागाकारणें ॥ ४ ॥ म्हणे अयोध्यापते तुजविण ॥ मी क्षण एक न ठेवीं प्राण ॥ ऐसें बोलोनियां वचन ॥ जनकात्मजा सरसावली ॥ ५ ॥ वेणीदंड काढोनी ॥ वृक्षडाहाळिये बांधी तये क्षणीं ॥ रौंघवप्रिय तें देखोनी ॥ बहुत मनीं गजबजला ॥ ६ ॥ जानकी त्यागील प्राणा ॥ मग काय सांगों रघुनंदना ॥ भरताग्रजा जगन्मोहना ॥ धांवें लौकरी ये वेळे ॥ ७ ॥ अंतरीं आठविले रामचरण ॥ बुद्धिप्रवर्तक म्हणोन ॥ मग तैसेंचि केलें उड्डाण ॥ गगनपंथें ते वेळां ॥ ८ ॥ अंजनीआत्मज ते वेळां ॥ गर्जोनि म्हणे पैलें श्रीराम आला ॥ ऐसें बोलतां जनकबाळा ॥ ऊर्ध्वपंथें विलोकी ॥ ९ ॥ मारुती खालीं उतरून ॥ करिता जाहला साष्टांग नमन ॥ जगन्माता बोले वचन ॥ हो कल्याण चंद्रार्कवरी ॥ ११० ॥ जोडोनियां दोन्ही कर ॥ उभा राहिला समोर ॥ म्हणे कल्याणरूप रघुवीर ॥ किष्किंधेसी सुखी असे ॥ ११ ॥ मी श्रीरामाचा अनुचर ॥ हनुमंतनामा वायुकुमर ॥ माते तुजकारणें लंका-नगर ॥ धांडोळिलें सर्वही ॥ १२ ॥ सीतेसी आनंद जाहला थोर ॥ जैसा बहुत दिवस गेला कुमर ॥ तो भेटतां हर्ष अपार ॥ तैसी निर्भय जाहली ॥ १३ ॥ अवृष्टीं वर्षे घन ॥ कीं मृत्युसमयीं सुधारसपान ॥ कीं दुष्काळिया दर्शन ॥ क्षीरसिंधूचें जाहलें ॥ १४ ॥ असो पंचवटीपासोन वर्तमान ॥ रामें लीला केली जी पूर्ण ॥ ती सीतासतीस वायुनंदन ॥ कथिता जाहला ते वेळीं ॥ १५ ॥ जटायु उद्धरोनि कबंध वधिला ॥ वाळी मारोनि सुग्रीव स्थापिला ॥ तो अपार मेळवून हरिमेळा ॥ साह्य जाहला श्रीरामा ॥ १६ ॥ आठवोन तव गुण स्वरूप ॥ राम सर्वदा करी विलाप ॥ श्वापदें पाषाण पार्दैप ॥ सीता म्हणोनि आलिंगी ॥ १७ ॥ तुवां जे अलंकार टाकिले ॥ ते म्यां श्रीरामापुढें ठेविले ॥ रामें शोक केला ते वेळे ॥ तो मज सर्वथा न वर्णवे ॥ १८ ॥ तुजकारणें सौमित्र ॥ दुःखभरित अहोरात्र ॥ जैशी मातेची वाट निरंतर ॥ बाळक पाहे प्रीतीनें ॥ १९ ॥ ऐसा ऐकतां समाचार ॥ जानकीस दाटला गहिंवर ॥ म्हणे परम कृपाळु

६१ सीतेचें. ६२ संकट. ६३ हातांत. ६४ मारुती. ६५ समुद्रापलीकडे. ६६ चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत. ६७ सेवक. ६८ कपींचा – वानरांचा – समुदाय. ६९ वृक्ष.

रघुवीर ॥ मजकारणें शिणतँसे ॥ १२० ॥ अयोध्येहून येतां हनुमंता ॥ मी मागें राहें चालतां ॥ श्रीराम तरूखालीं तत्त्वतां ॥ उभे राहतां मजकारणें ॥ २१ ॥ बहु श्रमलीस म्हणोन ॥ राम कुरवाळी माझें वदन ॥ बोलतां सीतेसी आलें रुदन ॥ सद्गद होऊन स्फुंदतसे ॥ २२ ॥ जानकीस म्हणे हनुमंत ॥ आतां शोक करिसी किमर्थ ॥ सत्वर येईल रघुनाथ ॥ दशमुखासी वधावया ॥ २३ ॥ तूं आदिपुरुषाची चिच्छक्ति[७१] ॥ प्रणवरूपिणी मूळप्रकृती[७२] ॥ तुझे आज्ञेनें वर्तती ॥ विरिंची[७३] रुद्र इंद्रादि ॥ २४ ॥ भक्त तारावया निर्धारीं ॥ दोघें अवतरलां पृथ्वीवरी ॥ आधीं वियोग दोघांभीतरी ॥ जाहलाचि नाहीं तत्त्वतां ॥ २५ ॥ यावरी भूमिजा[७४] बोले वचन ॥ तूं श्रीरामाचा विश्वासी पूर्ण ॥ तरी तुजप्रति अंतरखूण ॥ राघवें काय सांगितली ॥ २६ ॥ येरू म्हणे कैकयीगृहांतरीं ॥ ताटिकांतकें आपुले करीं ॥ तुज वल्कलें नेसविलीं निर्धारीं ॥ खूण साचार ओळखें ही ॥ २७ ॥ ऐसें ऐकतां जनकदुहिता ॥ म्हणे सखया हनुमंता ॥ तूं श्रीरामाचा पूर्ण आवडता ॥ कोटिगुणें अससी कीं ॥ २८ ॥ परी तूं दिससी सूक्ष्म ॥ ऐसेच असतील प्लवंगम[७५] ॥ तरी हें लंकानगर दुर्गम ॥ तुम्हांस कैसें आटोपे ॥ २९ ॥ ऐसें सीतेचें वचन ऐकिलें ॥ हनुमंतें भीमरूप[७६] प्रकट केलें ॥ मंदराचळातुल्य देखिलें ॥ विशाळरूप मारुतीचें ॥ १३० ॥ कीं महामेरूचि अद्भुत ॥ कीं राक्षस वधावया समस्त ॥ अवतरला प्रळयकृतांत ॥ वानरवेष धरोनियां ॥ ३१ ॥ ऐसा देखोनि रुद्रावतार ॥ सीता म्हणे हा केवळ ईश्वर ॥ रामकार्यालागीं निर्धार ॥ अवतरला येणें रूपें ॥ ३२ ॥ हनुमंत म्हणे महासती ॥ हे लंका घालीन पालथी ॥ परी कोपेल त्रिभुवनपती ॥ आज्ञा दिघली नाहीं मज ॥ ३३ ॥ जगन्माते मंगळभगिनी ॥ मजहूनियां प्रतापतरणी[७७] ॥ ऐसे वानर किष्किंधाभुवनीं ॥ रामाजवळी आहेत ॥ ३४ ॥ जांबुवंत नळ नीळ रविकुमर ॥ रणपंडित प्रतापशूर ॥ काळासी शिक्षा करणार ॥ राघवासवें असती पैं ॥ ३५ ॥ सीता म्हणे हनुमंतासी ॥ एवढा सागर कैसा तरलासी ॥ येरू म्हणे मुद्रेनें अनायासीं ॥ आणिलें मज ऐलतीरीं ॥ ३६ ॥ मार्गीं जाहले श्रम बहुत ॥ तुझे दर्शनें हरले समस्त ॥ परी जाहलों असें क्षुधाकांत ॥ फळें येथें दिसती बहु ॥ ३७ ॥ परहस्त ज्यास स्पर्शित ॥ तें सर्वथा नेघें मी निश्चित ॥ आतां आज्ञा दीजे त्वरित ॥ निजहस्तें घेईन मी ॥ ३८ ॥ उपरी बोले श्रीरामललना ॥ समीर स्पर्शों न शके या वना ॥ साठी सहस्र राक्षस रक्षणा ॥ ठेविले येथें लंकेशें ॥ ३९ ॥ हनुमंत ऐकतां ते अवसरीं ॥ गडबडां लोळे धरणीवरी ॥ फळआहाराविण बाहेरी ॥ निघों पाहती प्राण माझें ॥ १४० ॥ अहा मर्ध्यंच आलें मरण ॥ अंतरले रघुपतीचे चरण ॥ आतां सीताशुद्धि सांगेल कोण ॥ कौसल्यात्मजासी जाऊनियां ॥ ४१ ॥ सफळ वृक्ष देखोन दृष्टीं ॥ माझें चित्त होतसे कष्टी ॥ ऐसें वाटतसे पोटीं ॥ वनचि अवघें सांठवावें ॥ ४२ ॥ ऐसें बोलतां हनुमंत ॥ क्षण एक पडला निचेष्टित ॥ नेत्र गरगरां भोवंडीत ॥ मुख पसरीत फळांलागीं ॥ ४३ ॥ ऐसें देखोनि ते वेळीं ॥ जगन्माता सद्गदित जाहली ॥ अहा म्हणोन

७० कष्ट भोगतो. ७१ चैतन्यशक्ति. ७२ ॐकाररूप. ७३ ब्रह्मदेव. ७४ सीता. ७५ वानर. ७६ भयंकर स्वरूप. ७७ प्रतापाविषयीं केवळ सूर्य. ७८ सुग्रीव. ७९ आंगठीनें. ८० या कांठीं. ८१ वायु.

घांवित्नली ॥ कुरवाळीत कृपाकरें ॥ ४४ ॥ म्हणे कपींद्रा उठीं उठीं ॥ पडलीं फळें तरुतळ्वटीं ॥ तीं पाहोनि एक मुष्टी ॥ घेईं उदरतृप्ती-पुरतींच ॥ ४५ ॥ बा रे वरी चढसी जाण ॥ तरी तुज माझी असे आण ॥ पडलीं फळें तीं वेंचून ॥ उदरनिर्वाह करीं कां ॥ ४६ ॥ ऐसें सीता बोलतां वचन ॥ मारुती उठला झडकरून ॥ चरण धरी धांवोन ॥ म्हणे प्रमाण आज्ञा तुझी ॥ ४७ ॥ मग जे वृक्ष करिती राम-स्मरण ॥ सीतेवरी छाया केली सघन ॥ ते रामउपासक पूर्ण ॥ करी वंदन कपि त्यांतें ॥ ४८ ॥ जो रामउपासक निर्मळ ॥ त्यासी विघ्न करूं न शके काळ ॥ म्हणोनि अंजनीचा बाळ ॥ तरू ते सकळ रक्षीत ॥ ४९ ॥ जे तरू न करिती रामस्मरण ॥ तेच उपटिले मूळीं-हून ॥ भुजाबळें त्राहाट्टून ॥ उर्वीवरी झोडिले ॥ १५० ॥ मग पडलीं फळें एकवटोनी ॥ हस्तद्वयें टाकी वदनीं ॥ हनुवटी हाले ते क्षणीं ॥ फळें तांतडीं चावितां ॥ ५१ ॥ चंचळ दृष्टी करून ॥ मागें पुढें पाहे अवलोकून ॥ तंव ते वनरक्षक संपूर्ण ॥ निद्रार्णवीं बुडाले ॥ ५२ ॥ राक्षसांनीं मद्य प्राशिलें ॥ हनुमंतें वन विध्वंसिलें ॥ पुढें पुच्छें उपडोनि आणिले ॥ वृक्ष भोंवते सर्वही ॥ ५३ ॥ हनुमंत बैसे फलाहारासी ॥ पुच्छ पोंहुणेर करी तयासी ॥ न सोडी बैसल्या ठायासी ॥ आपोशन मोडे म्हणोनि ॥ ५४ ॥ पुच्छासी हनुमंत बोले ॥ गोड गोड आणीं कां फळें ॥ आजि त्वां तृप्त आम्हां केलें ॥ चिरंजीव राहें तूं ॥ ५५ ॥ नंदनवनाहून सुंदर ॥ अशोकवनींचे तरुवर ॥ फणस इक्षुदंड लवंग परिकरें ॥ उपडी समग्र एकदांचि ॥ ५६ ॥ केळी नारळी देवदार ॥ जंबू कपित्थ अंजीर ॥ ज्यांचे रस लागती मधुर ॥ हनुमंतवीर सेवीतसे ॥ ५७ ॥ असो तरुवर लक्षकोडी ॥ भुजाबळें उर्वीवरी झोडी ॥ राघवस्मरणें तांतडी ॥ फळें वदनीं टाकी-तसे ॥ ५८ ॥ हनुमंत करीत यैंजन ॥ रामनाममंत्रेंकरून ॥ वदनकुंडीं आहुती पूर्ण ॥ घालोनि जठराग्नि तृप्त करी ॥ ५९ ॥ सीतेनें घातली आपुली आण ॥ वृक्षावरी न चढावें पूर्ण ॥ यालागीं वृक्ष झोडोन ॥ फळें पाडी धरणीये ॥ १६० ॥ जैसी कां चपळा कडाडी ॥ तैसें पुच्छ वृक्ष मोडी ॥ तों राक्षस उठले तांतडी ॥ भीम कोल्हाळ करीतचि ॥ ६१ ॥ चक्रें डांगा भिंडिमाळा ॥ घेऊन धांवले एक-वेळां ॥ सीताशोकहरण कोंडिला ॥ सकळीं मिळोन एकदांचि ॥ ६२ ॥ वृषभीं कोंडिला महाव्याघ्र ॥ कीं बहुत विखारीं खगेंद्र ॥ कीं शृंगालीं वेढिला भृंगेंद्र ॥ खद्योतें दिनकरा धरूं म्हणती ॥ ६३ ॥ कीं मंथूनि सागर द्विज ॥ धरूं म्हणती प्रळयवीज ॥ कीं आर्द्रमृत्ति-केचे गज ॥ प्राशूं म्हणती जळसिंधु ॥ ६४ ॥ कर्पूरपुतळे म्हणती एक वेळां ॥ धरोनि आणूं वडवानळा ॥ मक्षिका मिळोनि सकळा ॥ भूगोल उचलूं भाविती ॥ ६५ ॥ उष्ट्रांनीं ब्रीद बांधोन ॥ तुंबरापुढें मांडिलें गायन ॥ कीं वृश्चिक पुच्छेंकरून ॥ ताडीन म्हणे वज्रातें ॥ ६६ ॥ तैसे हनुमंतावरी वनरक्षक ॥ एकदांच धांवले सकळिक ॥ यावरी लोकप्राणेशबाळेंक ॥ काय करिता जाहला ॥ ६७ ॥ विशाळ वृक्ष उपडोनी ॥ सव्य करीं घेत तेच क्षणीं ॥ जैसा पार्वेक शुष्कवनीं ॥ संहारी तैसा राक्षसां ॥ ६८ ॥ साठी सहस्र वनपाळ ॥ पुच्छें

८२ हालवून. ८३ भूमीवर.. ८४ घाईने. ८५ पोंहुणचार. ८६ समुदाय. ८७ पृथ्वीवर. ८८ होम. ८९ छड्या. ९० भाला, बरची. ९१ सर्पांनीं. ९२ गरुड. ९३ कोल्ह्यांनीं. ९४ सिंह. ९५ काजवे. ९६ उंटांनीं. ९७ वायुपुत्र हनुमंत. ९८ अग्नि.

भारे बांधिले सकळ ॥ फिरवूनियां तत्काळ ॥ भूमीवरी आपटिले ॥ ६९ ॥ जैसी तुंबिनीचीं[९९] ओलीं फळें ॥ बळें आपटितां होती शकलें ॥ तैसे वनरक्षक ते वेळे ॥ चूर्ण जाहले सकळही ॥ १७० ॥ सवेंच समुद्रजीवनीं ॥ प्रेतें देत भिरकावूनी ॥ भुभुःकारें गर्जे तो ध्वनी ॥ गगनगर्भी न समाये ॥ ७१ ॥ घायाळें उरलीं किंचित ॥ तीं रावणासमीप आलीं धांवत ॥ म्हणती एक वानर अद्भुत ॥ अशोकवनीं प्रकटला ॥ ७२ ॥ सकळ वन विध्वंसून ॥ वनरक्षक मारिले संपूर्ण ॥ ऐसें राक्षसेंद्र परिसोन ॥ परम विषाद पावला ॥ ७३ ॥ तेव्हां ऐशीं सहस्र महावीर ॥ प्रेरिता जाहला दशकंधर ॥ म्हणे धरोनि आणा रे वानर ॥ नानयत्नेंकरूनियां ॥ ७४ ॥ जरी नाटोपे तुम्हांलागून ॥ तरी मज दावूं नका वदन ॥ ऐशीं सहस्र पिशिताशन ॥ गर्जत वना पातले ॥ ७५ ॥ नानाशस्त्रें घेतलीं हातीं ॥ हाकें निरोंळ गाजविती ॥ ऐसें देखोन मारुती ॥ विशाळरूप जाहला ॥ ७६ ॥ जैसा मंदराचळ विशाळ ॥ तैसा दिसे अंजनीबाळ ॥ वासुकी-ऐसें पुच्छ सबळ ॥ लंबायमान सोडिलें ॥ ७७ ॥ लंकेचे महाद्वारींची अर्गळा ॥ लोहबंदी वेष्टिली ते वेळां ॥ मारुति मारीत उठिला ॥ सिंहनादें गर्जत ॥ ७८ ॥ वृक्षावरील पक्षी उडोनी ॥ प्रातःकाळीं भरती गगनीं ॥ तैशीं अरिमस्तकें तुटोनी ॥ उसळोन धरणीं पडताती ॥ ७९ ॥ बांधोन शत्रुसमुदायभार ॥ गगनीं फिरवी वायुकुमर ॥ आपटितां होती चूर ॥ करचरणादि अवयव ॥ १८० ॥ तों त्यांत मुख्य जंबुमाळी ॥ हांका देत पातला ते वेळीं ॥ म्हणे वानरा रणमंडळीं ॥ तुज आजि मारीन ॥ ८१ ॥ शूल घेवोनि ते वेळां ॥ बळें मारुतीवरी धांविन्नला ॥ तों हनुमंतें लत्ताप्रहार दिधला ॥ कोथळा फुटला तयाचा ॥ ८२ ॥ जैसें शस्त्र बैसतां प्रबळ ॥ चूर्ण होय फणसफळ ॥ कीं वज्रघातें महाशैल ॥ चूर्ण जैसा होय पैं ॥ ८३ ॥ ऐसा जंबुमाळी पडला ॥ चिरोन हनुमंतें भिरकाविला ॥ दशमुखास समाचार कळला ॥ अत्यंत कोपला ते काळीं ॥ ८४ ॥ मग पाठविले लक्ष वीर ॥ पांच सेनाधीश मुख्य थोर ॥ मल्ल प्रतिमल्ल-नामें असुर ॥ प्रचंड चंड जघन पैं ॥ ८५ ॥ रावणाची आज्ञा घेऊन ॥ वेगें पावले अशोकवन ॥ हें देखोनि वायुनंदन ॥ अर्गळा हातीं तुळीतसे ॥ ८६ ॥ करोनि पुच्छाचें उखळ ॥ हातीं घेऊनि लोहमुसळ ॥ कांडीतसे लंकेशाचें दळ ॥ साळीऐसें तेधवां ॥ ८७ ॥ असुर-देह पडती अचेतन ॥ हाचि साळींचा कोंडा झाडून ॥ सूक्ष्मदेह तांदूळ पूर्ण ॥ जात उद्धरोन कपिहस्तें ॥ ८८ ॥ करकरां कपि दाढा खात ॥ नेत्र गरगरां भोवंडीत ॥ शस्त्रास्त्रें अवघे वर्षत ॥ पिशिताशन ऊठती ॥ ८९ ॥ मेरूऐसा सबळ ॥ जातां अंजनीचा बाळ ॥ तों तेथें देखिलें देऊळ ॥ सहस्रस्तंभमंडित ॥ १९० ॥ तेथें रावणें देवी स्थापिली ॥ ब्राह्मणाचा देत नित्य बळी ॥ वायुसुतें ते वेळीं ॥ तें विदारिलें देवालय ॥ ९१ ॥ पायासकट उपडोन ॥ आकाशपंथें देत भिरकावून ॥ दशदिशांसी गेले पाषाण ॥ पक्ष्यांऐसे उडोनियां ॥ ९२ ॥ असो यावरी हनुमंतें ॥ लोहार्गळा घेवोनि हातें ॥ मांडिलें वीरकंदनातें ॥ गीत रामाचें गातसे ॥ ९३ ॥ अशोकवन तेंचि

९९ मोपळ्याचीं. १०० आकाश. १ अडसर. २ मारुती. ३ झेलतो. ४ पिशित = मांस, त्याचें अशन = भक्षण करणारे. ५ मोडून टाकलें.

खळें ॥ माजी वीरधान्य रगडिलें ॥ हनुमंत तिवडा मध्यें बळें ॥ पुच्छ पोंथी फिरवीतसे ॥ ९४ ॥ तया खळियाजवळी ॥ खेचरदेवी जनकबाळी ॥ महावीरांचे दिधले बळी ॥ राशी केल्या शिरांच्या ॥ ९५ ॥ रेणुकेच्या कैवारें फरशधरें ॥ सर्व क्षत्रियांचीं छेदिलीं शिरें ॥ तैसे सीतेकारणें राघवकिंकरें ॥ संहारिले यामिनीचरें ॥ ९६ ॥ असो हनुमंत ते वेळां ॥ असुर पुच्छें करूनि गोळा ॥ आपटोनि समुद्रजळा-॥ माजीं निक्षेपी साक्षेपें ॥ ९७ ॥ लक्ष वीर संहारिले ॥ मग सात पुत्र पाठविले ॥ तेही हनुमंतें चूर्ण केले ॥ अर्गळाघातेंकरूनियां ॥ ९८ ॥ हांक गेली रावणापाशीं ॥ वानरें संहारिलें समस्तांसी ॥ मग पाठविलें अक्षयासी ॥ दळभारेंसीं तेधवां ॥ ९९ ॥ अक्षया देखोनि हनुमंत ॥ लोहार्गळा घेऊन नाचत ॥ गदगदां हंसूनि बोलत ॥ लंकेशात्मजासी तेधवां ॥ २०० ॥ अरे अक्षया तुझें नाम व्यर्थ ॥ जैसे अजागळींचे स्तन यथार्थ ॥ कीं मूर्खासी अलंकार घातले सत्य ॥ बधिराचे श्रोत्र जैसे कां ॥१॥ कीं गर्भांधाचे नयन ॥ व्यर्थ काय विशाळ दिसोन ॥ कीं नासिकाविण वदन ॥ नामकरण तैसें तुझें ॥ २ ॥ रासभासी भद्रासन ॥ श्वानासी अग्रपूजामान ॥ कीं दिव्यांबर परिधान ॥ व्यर्थ प्रेतास करविलें ॥ ३ ॥ तैसें अक्षया नाम दशमुखें ॥ तुज ठेविलें व्यर्थ शतमूखें ॥ आतां अक्षया तुझा क्षणें एकें ॥ क्षय करीन जाण पां ॥ ४ ॥ मग अक्षया धनुष्य घेऊन ॥ सोडी बाणांपाठीं बाण ॥ क्षण एक वायुनंदन ॥ उगाच उभा राहिला ॥ ५ ॥ काडिया पडतां बहुत ॥ बैसका न सांडी पर्वत ॥ कीं सुमनवृष्टीनें गज मदोन्मत्त ॥ खेद सहसा न मानी ॥ ६ ॥ तैसे अक्षयाचे बाण ॥ येतां न भंगे वायुनंदन ॥ मग लोहार्गळा घेऊन ॥ कृतांतवेत धांविन्नला ॥ ७ ॥ बैसतां लोहार्गळेचे घाय ॥ अक्षयाचा जाहला क्षय ॥ समीरात्मज पावला जय ॥ सुरसमुदाय आनंदला ॥ ८ ॥ ऐकोनि अक्षयाचा समाचार ॥ शोकार्णवीं पडला लंकेश्वर ॥ आसाळी राक्षसी भयंकर ॥ अशोकवना धाडिली ॥ ९ ॥ दहा सहस्र गजांचें बळ ॥ उदरांत सांठवी अचळ ॥ एक योजन मुख विशाळ ॥ पसरोनियां धाविन्नली ॥ २१० ॥ कपाळीं चर्चिला शेंदूर ॥ बोंबरझोटी भयंकर ॥ तिनें धांवोनि सत्वर ॥ वायुसुत धरियेला ॥ ११ ॥ उचलोनि घातला मुखांत ॥ दांतांसी दांत जों मेळवीत ॥ तंव तो उतरला उदरांत ॥ क्षणमात्र न लागतां ॥ १२ ॥ लंकेशासी सांगती हेर ॥ आसाळीनें गिळिला वानर ॥ ऐकतां आनंदला दशशिर ॥ असुरसभेसहित पैं ॥ १३ ॥ रावण शर्करा वांटीत ॥ तों दूत आले शंख करीत ॥ आसाळीचा जाहला अंत ॥ हनुमंतें पोट फोडिलें ॥ १४ ॥ तिनें चाविला नसतां वानर ॥ सगळाचि गिळिला सत्वर ॥ यालागीं जितचि वीर ॥ उदर फोडोनि निघाला ॥ १५ ॥ शोकाकुलित द्रिपंचवदन ॥ म्हणे हें अद्भुत प्रकटलें विघ्न ॥ यावरी शक्रजित जाऊन ॥ युद्ध करील परिसा तें ॥ १६ ॥ रामविजय ग्रंथ सुरस ॥ सुंदरकांडकौतुक विशेष ॥ श्रवण करोत सावकाश ॥ रघुवीरभक्त आदरें ॥ १७ ॥ रविकुळमंडणा पुराणपुरुषा ॥ श्रीमद्भीमातटनिवासा ॥ ब्रह्मानंदा अविनाशा ॥ श्रीधरवरदा जगदुरो ॥ १८ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ विंशतितमाध्याय गोड हा ॥ २१९ ॥ ॥ अध्याय ॥ २० ॥ ओंव्या ॥ २१९ ॥ ॥ ७ ॥

३ मळणी काढण्याचा शेतकरी. ७ बकऱ्यावरील केसांची रांग. ८ दुर्गादेवी. ९ पक्ष्युपमानें. १० राक्षिचर, राक्षस. ११ अक्षया. १२ बलवत्तरत्वात १३ पर्वत. १४ शिजवलेल्या भाताचा

२१
गोलिंबडेकर -

॥ श्रीगणेशाय नमः ॥ क्षीराब्धितटीं बैसला सर्वकाळ ॥ त्यासी क्षुधा कासया बाधील ॥ दीपाची चिंता कां लागेल ॥ दिनमणि समीप असतां पैं ॥ १ ॥ राहतां कल्पतरूतळीं ॥ कां डंखील कामनाव्यालि ॥ गंगाजळीं शेज केली ॥ त्यासी वणवा करील काय ॥ २ ॥ वारणेंविदारकाचे संगतीं ॥ जो बैसला अहोरात्रीं ॥ त्यासी जंबूक बाधा करिती ॥ हें कल्पांतींही घडेना ॥ ३ ॥ जो नित्य करी सुधारसपान ॥ त्यासी विष बाधील काय दारुण ॥ स्वरूपीं जो सदा सावधान ॥ दुष्कृतें कैंची त्यापाशीं ॥ ४ ॥ कामधेनु घरीं असतां ॥ कल्पना न बाधी तत्त्वतां ॥ हुंताशनतेज धडकतां ॥ शीत कैंचें उरेल ॥ ५ ॥ तैसी रघुवीरकृपा ज्यासी पूर्ण ॥ त्यासी न बाधी विषयहुताशन ॥ रामचरित्रीं गुंतलें मन ॥ इतर श्रवण नावडे तया ॥ ६ ॥ असो विसावा अध्याय संपतां तेथें ॥ आसाळी विदारिली हनुमंतें ॥ यावरी इंद्रजितासी लंकानाथें ॥ आज्ञा केली सत्वर ॥ ७ ॥ तों नम्र कुमारी शिंके पाठीसी ॥ रावण शकुन पुसे ब्रह्मयासी ॥ विधि म्हणे दोघांतून एकासी ॥ अपयश येईल दिसतसे ॥ ८ ॥ रावण पाहे क्रोधयुक्त ॥ विधी म्हणे वानर होईल हस्तगत ॥ तैसाचि चालला इंद्रजित ॥ अशोकवना ते वेळे ॥ ९ ॥ सवें घेऊन चतुरंगसेना ॥ शत्रुकारि निघाला अशोकवना ॥ शायशीं अयुतें गज जाणा ॥ रथतुरंगमां गणना नाहीं ॥ १० ॥ देव बैसोनि विमानीं ॥ कौतुक पाहती तेच क्षणीं ॥ अशोकवनांत रावणी ॥ निजभारेंसी पातला ॥ ११ ॥ तों पाठमोरा हनुमंत ॥ बैसलासे फळें झेलीत ॥ असुर गर्जती बहुत ॥ परी तो तिकडे न पाहे ॥ १२ ॥ क्षणक्षणां पाठी कुरवाळीत ॥ मागें परतोन वांकुल्या दावीत ॥ राक्षस शस्त्रें असंख्यात ॥ वर्षते जाहले कपीवरी ॥ १३ ॥ इंद्रजितें शर टाकिले ॥ हनुमंतें वरिचेवरी झेलिले ॥ मुष्टीमाजी जमा केले ॥ बहुसाल तेधवां ॥ १४ ॥ अकस्मात पुच्छ सोडिलें ॥ रावणीचें धनुष्य हरिलें ॥ हनुमंतें आकर्ण ओढिलें ॥ बाण लावून ते समयीं ॥ ॥ १५ ॥ अचुक मारुतीचें संधान ॥ सोडिता जाहला असंख्य बाण ॥ जैसे शब्दामागें शब्द पूर्ण ॥ मुखांतून निघती पैं ॥ १६ ॥ तों विमानारूढ सुधापानी ॥ पुष्पें वर्षती क्षणक्षणीं ॥ म्हणती मारुति धन्य अंजनी ॥ तुजचि एक प्रसवली ॥ १७ ॥ राक्षसांची शिरें ते काळीं ॥ हनुमंतें असंभाव्य उडविलीं ॥ रावणीचा मुकुट तळीं ॥ छेदोनियां पाडिला ॥ १८ ॥ बाण सरले तये वेळां ॥ सवेंच घेतली लोहार्गळा ॥ वायुवेगें धांविन्नला ॥ शत्रुकारीचे रथापाशीं ॥ १९ ॥ अर्गळा घालोनि ते वेळां ॥ अश्वांसहित रथ भंगिला ॥ इंद्रजित विरथ जाहला ॥ घाबरला पाहतसे ॥ २० ॥ लोहार्गळेचे घाय सबळ ॥ झोडिलें इंद्रजितार्चे दळ ॥ वाहती रक्ताचे खळाळ ॥ समुद्रा जाती भेटावया ॥ २१ ॥ जैसें अलातचक्र फिरे ॥ तैसा हनुमंत असुरांत वावरे ॥ रावणीस अर्गळाप्रहारें ॥ झोडिता जाहला तेधवां ॥ २२ ॥ रावणात्मजें ते अवसरीं ॥ पाश टाकिला हनुमंतावरी ॥ तों मारुति होय मोहरी ॥ उडोनि जाय एकीकडे ॥ २३ ॥ मागुती लाहान पाश करून ॥ कपीवरी टाकी आणून ॥ पर्वता-

१ दुग्धसागराच्या कांठीं. २ सूर्य. ३ दंशील. ४ इच्छारूपी नागीण. ५ सिंहाच्या. ६ आत्मविचारांत. ७ अग्निज्वाळा. ८ संसारविषयरूपी अग्नि. ९ भयंकर राक्षसी. १० रावणपुत्र इंद्रजित. ११ अमृत पिणारे देवगण. १२ लोखंडाचा अडसर. १३ इंद्रजिताचें १४ जळतें लांकूड. १५ मोहरीएवढा सूक्ष्म.

कार सीताशोकहरण ॥ होऊन पाश तोडीतसे ॥ २४ ॥ शस्त्रास्त्रें बहुसाल ॥ टाकितां नाटोपे कपि सबळ ॥ यावरी अंजनीचा बाळ ॥ इंद्राजितावरी लोटला ॥ २५ ॥ मल्लयुद्धासी प्रवर्तला ॥ इंद्रजित बळें आपटिला ॥ नम करून भिरकाविला ॥ चरणीं धरून हनुमंतें ॥ २६ ॥ इंद्रजित तेव्हां रडत ॥ म्हणे मज आला काय मृत्य ॥ दळही संहारिलें समस्त ॥ न दिसे येथें कोणीही ॥ २७ ॥ म्हणे मज निराहारियाचे[16] हातें मरण ॥ हा तों करी फळभक्षण ॥ परी रामापाशीं नेईल धरून ॥ विटंबील नानापरी ॥ २८ ॥ सुटे जों जनकनंदिनी ॥ तों मज घालील बंदिखानीं ॥ जैसें रावणासी धरूनी ॥ पांच पाट काढिले ॥ २९ ॥ मग इंद्रजित पळाला ॥ विवराम[17]माजी तो दडाला ॥ कपीनें द्वारीं पाषाण लाविला ॥ विवरीं कोंडिला राक्षस ॥ ३० ॥ इंद्रजित कासावीस होय ॥ म्हणे कां मरण मज न ये ॥ शस्त्र जवळी नाहीं करूं काये ॥ प्राणत्याग करावा ॥ ३१ ॥ विवरीं कोंडिला इंद्रजित ॥ हें दशकंठासी जाहलें श्रुत ॥ परम जाहला भयभीत ॥ विनवीतसे विरिंचीतें ॥ ३२ ॥ म्हणे तुझें वचन साचार ॥ हस्तगत नव्हे कां वानर ॥ तरी तुवां जाऊनि सत्वर ॥ धरून कपि देईं आम्हां ॥ ३३ ॥ तरी तूं तेथवरी जाऊन ॥ मज द्यावें पुत्रदान ॥ काळरूप तो वानर जाण ॥ तुजविण कोणा नाटोपे ॥ ३४ मग कमलोद्भव पातला तेथ ॥ तंव तो नमवि इंद्रजित ॥ दडाला असे विवरांत ॥ भयभीत मुंसमुसी ॥ ३५ ॥ मग रावणी बोले करुणावचन ॥ आतां मज सोडवीं येथून ॥ त्या वानरासी धरिल्याविण ॥ मी विवराबाहेर न येंचि ॥ ३६ ॥ कैंमळासन म्हणे ते अवसरीं ॥ आतां निघें विवराबाहेरी ॥ ब्रह्मपाश घालोनि झडकरी ॥ कपि बळिया धरावा ॥ ३७ ॥ रावणी देत प्रत्युत्तर ॥ ब्रह्मपाशास नावरे वानर ॥ विरिंचि म्हणे तूं अपवित्र ॥ तुज अस्त्र हें न चाले ॥ ३८ ॥ मग विष्णुसुतें ते वेळीं ॥ रौंघवप्रियाची स्तुति केली ॥ तूं वज्रशरीरी महाबळी ॥ निशाचर कांपती तूतें ॥ ३९ ॥ आमुचें वचन साच करावें ॥ ब्रह्मपाशीं त्वां सांपडावें ॥ सभेपर्यंत उगेंच यावें ॥ मग दावावें पराक्रमा ॥ ४० ॥ ऐसें कमलोद्भवें विनविलें ॥ समीरात्मजें मान्य केलें ॥ मग विरिंचीनें पाश प्रेरिले ॥ माजी बांधिलें हनुमंता ॥ ४१ ॥ हनुमंत बांधिला पाशीं ॥ शैंक्कारि धांवला वेगेंसीं ॥ दृढ बांधिता जाहला कपीसी ॥ निजहस्तेंकरूनियां ॥ ४२ ॥ एक तृंणवेंटीनें पाय बांधिती ॥ एक वृक्षसालीनें आंवळिती ॥ एक दोर आणावया धांवती ॥ नगरामाजी सत्वर ॥ ४३ ॥ हनुमंत दिसे बांधिला ॥ परी तो सर्वदाही मोकळा ॥ जैसा ज्ञानी संसारीं गुंतला ॥ परी तो सर्वदा मुक्त असे ॥ ४४ ॥ नलिनीपैत्र[21] जळीं खेळे ॥ परी त्यावरी बिंदु नातळे ॥ कीं शीतोष्ण धुळीनें न मळे ॥ निरोळ[22] जैसें सर्वदा ॥ ४५ ॥ कीं सैंमीर[23] सर्वांवरून जात ॥ परी कोठेंचि नव्हे लिप्त ॥ तैसाचि वीर हनुमंत ॥ बंधमोक्षातीत जो ॥ ४६ ॥ असो परमेष्ठी आणि इंद्रजित ॥ सभेसी आणिती हनुमंत ॥ वाटेसी राक्षस टोंचीत ॥ नाना शस्त्रें घेऊनियां ॥ ४७ ॥ शस्त्रें भंगलीं समग्र ॥ वज्रशरीरी तो वानर ॥ असुरीं उचलोनि तो

१६ अन्न न खाणाऱ्याच्या. उपोषिताच्या. १७ गुप्तांत. १८ छिद्रमुसलेला. १९. ब्रह्मदेवानें. २० मायेतीची. २१ इंद्रजित. २२ गवताच्या दोरीनें. २३ कमलिनीचें पान. २४ आकाश. २५ वारा.

सत्वर ॥ सभेसमोर आणिला ॥ ४८ ॥ दृष्टीं देखतां हनुमंत ॥ रावण करकरां दांत खात ॥ याउपरी रघुनाथदूत ॥ काय करिता जाहला ॥ ४९ ॥ बंधनें तोडूनि समस्त ॥ पुच्छासनीं बैसला हनुमंत ॥ रावणाहून एक हस्त ॥ उंच आसन मारुतीचें ॥ ५० ॥ मग पुसे प्रधान प्रहस्त ॥ तूं कोणाचा आहेस दूत ॥ परी तो न बोले हनुमंत ॥ पाहे चकित उगाचि ॥ ५१ ॥ मग पुसे द्विपंचवदन[२६] ॥ मर्कटा तूं कोणाचा कोण ॥ यावरी जनकजाशोकहरण ॥ काय वचन बोलत ॥ ५२ ॥ म्हणे रे मशका रजनीचरा ॥ महामळिणा दुर्जना पामरा ॥ मी कोण आहें तुज तस्करा[२७] ॥ कळलें नाहीं अद्यापि ॥ ५३ ॥ जेणें स्वयंवरीं तुज वांचविलें ॥ उरावरोनि चाप काढिलें ॥ त्याचा दास जाण वहिलें ॥ शिरकमळें छेदीन तुझीं ॥ ५४ ॥ जेणें ताटिका सुबाहु मारून ॥ केलें कौशिकमखपाळण ॥ मूढा त्याचा दास मी आहें पूर्ण ॥ करीन दहन लंकेचें ॥ ५५ ॥ तुझे भगिनीचें नासिक छेदिलें ॥ खर दूषण त्रिशिरा मारिले ॥ त्याचा दूत मी आलों बळें ॥ शिक्षा तुज लावावया ॥ ५६ ॥ जैसें अन्नसदनीं रिघे श्वान ॥ तैसा पंचवटीस येऊन ॥ चोरिलें जानकी-चिद्रत्न ॥ महामलिना अपवित्रा ॥ ५७ ॥ रामपंचाननाची वस्तु ॥ कैसा ठेवशील तूं बस्तु[२९] ॥ पाडून वासुकीचा दांतु ॥ मंडूक[३०] वांचेल कैसा पां ॥ ५८ ॥ व्याघ्र असतां निद्रिस्त ॥ बाहेर जिव्हा लळलळित ॥ ती तोडोनि जंबुक यथार्थ ॥ कैसा वांचेल सांग पां ॥ ५९ ॥ तुझा अक्षया मारून ॥ विध्वंसिलें म्यां अशोकवन ॥ तुझें दळ अवघें मर्दून ॥ इंद्रजित गांजिला ॥ ६० ॥ राक्षसकुळवैश्वा-नर[३१] ॥ अयोध्याप्रभु कौसल्याकुमर ॥ तुझें छेदावया शिर ॥ समरधीर येत आतां ॥ ६१ ॥ तो विषकंठवंद्य[३२] रघुनंदन ॥ तुझे दशकंठ छेदून ॥ दशदिशांसी बळी देऊन ॥ सीता घेऊन जाईल ॥ ६२ ॥ ऐसें ऐकतां द्विपंचवदन[२६] ॥ जाहला परम क्रोधायमान ॥ म्हणे याचें पुच्छ नासिक कर्ण ॥ जिव्हा छेदून टाका रे ॥ ६३ ॥ ऐसें बोलतां लंकेश ॥ चौताळले महाराक्षस ॥ पुच्छावरी आसमास ॥ शस्त्रघाय मारिती ॥ ६४ ॥ घापा दाटती हाणतां वैभवें ॥ परी त्याचे रोमही वक्र नोव्हे ॥ भय घेतलें दशग्रीवें ॥ म्हणे बरवें दिसेना ॥ ६५ ॥ मग विचारी निजमनीं ॥ हा रामउपासक सत्यवचनी ॥ तरी याचा मृत्यु कैसेनी ॥ आण घालूनि विचारूं ॥ ६६ ॥ मग म्हणे तुज रघुपतीची आण ॥ सत्य सांग तुझें मृत्यांग[३३] कोण ॥ येरू म्हणे मज नाहीं मरण ॥ ऐकोन रावण हांसत ॥ ६७ ॥ ब्रह्मयासही आहे मरण ॥ तेथें तुझा कीटका पाड कोण ॥ येरू म्हणे पुच्छ होईल दहन ॥ तैंच मरण आम्हांसी ॥ ६८ ॥ तैलें वस्त्रें भिजवून ॥ पुच्छ गुंडाळूनि लावा अग्न ॥ क्षणामाजी भस्म होऊन ॥ सर्व जाईल निर्धारें ॥ ६९ ॥ वस्त्रें गुंडाळा बहुत ॥ तेणें अग्नि चेतेल[३४] अद्भुत ॥ क्षणामध्यें होईल अंत ॥ उशीर येथें न लगेचि ॥ ७० ॥ रावण म्हणे हें साचार ॥ मग स्नेहेंसहित[३५] वस्त्रभार ॥ पुच्छा गुंडाळिती समग्र ॥ वायुकुमर काय बोले ॥ ७१ ॥ म्हणे पुच्छ उघडें राहतां ॥ मग मज नाटोपे हें तत्त्वतां ॥ राक्षस भागले वस्त्रें गुंडाळितां ॥ पुच्छ सर्वथा

२६ दशानन, रावण. २७ चोरा २८ राम हाच सिंह, त्याची. २९ बोकड. ३० बेडूक. ३१ अग्नि. ३२ शंकराला प्रिय. ३३ मृत्यु येणारें अंग. ३४ पेटेल. ३५ तेलांत भिजवून.

न सरेचि ॥ ७२ ॥ वस्त्रराशी आटल्या समग्र ॥ अधिकाधिक वाढे पुच्छाग्र ॥ जैसा पंडितबुद्धीचा प्रसर ॥ बोलतां बहुत न सरेचि ॥ ७३ ॥ कीं महाकवीची पद्यरचना ॥ अपार लिहितां ते सरेना ॥ रामगुणांची वर्णना ॥ वर्णितां शेषा नाटोपे ॥ ७४ ॥ तैसें मारुतीचें पुच्छ अद्भुत ॥ राक्षसांसी नव्हे गणित ॥ जैसा [३५]अंजारक्षकांसी निश्चित ॥ वेदार्थपार समजेना ॥ ७५ ॥ असो सरल्या वस्त्रांच्या राशी ॥ शेवटीं नग्न केले नगरवासी ॥ कोठें न मिळे एक दशी ॥ बहुत प्रयासें शोधितां ॥ ७६ ॥ राणिवसा नग्न केला ॥ तरी पुच्छभाग उघडा राहिला ॥ निःशेष तंतु[३६]मात्र उरला ॥ नाहीं कोठें नगरांत ॥ ७७ ॥ हनुमंत म्हणे अणुमात्र रितें ॥ राहतां बोल नाहीं मातें ॥ एक काढूनि यज्ञोपवीतें ॥ भर्ये पुच्छासी गुंडाळिती ॥ ७८ ॥ तैल घृत नवनीत ॥ शोधितां न मिळे निश्चित ॥ विंशति[३७]चक्षूसी सांगती दूत ॥ स्नेह[३९] वस्त्रें न मिळती कोठें ॥ ७९ ॥ राजसेवक फिरती नग्न ॥ उभय द्वारें मुक्त सोडून ॥ नगरींचें लज्जेनें जन ॥ कपाटें झांकून बैसले ॥ ८० ॥ एक बैसले अंधारीं ॥ एक निघाले विवरीं[४०] ॥ एकीं नेत्र लावून निशा[४१] थोरी ॥ दिवस असतां केली हो ॥ ८१ ॥ वृद्ध वृद्ध एक बोलती ॥ पुढें न दिसे बरवी गती ॥ हें लंकानगर अंतीं ॥ भस्म होईल दिसतसे ॥ ८२ ॥ असो वस्त्रें न मिळती निश्चित ॥ पुच्छ उघडें एक हस्त ॥ रावण म्हणे अशोकवनांत ॥ वस्त्रें असती सीतेपाशीं ॥ ८३ ॥ ऐकतां तयाच्या उत्तरा ॥ हनुमंत आवरी पुच्छाग्रा ॥ दूत सांगती दशकंधरा ॥ अणुमात्र पुच्छ उरलें नसे ॥ ८४ ॥ तेथें कासया पाहिजे वस्त्र ॥ लंकेश म्हणे लावा रे वैश्वानरें[४२] ॥ चुडी लाविती रजनीचर ॥ अनळ[४३] साचार स्पर्शेना ॥ ८५ ॥ नाना उपाय योजिती ॥ परी न लागेचि अग्निज्योती ॥ रावण पुसे मारुती ॥ अनळ कां रे स्पर्शेना ॥ ८६ ॥ मग बोले अशोकवनारी ॥ पुच्छयज्ञ होतो तुझे घरीं ॥ तरी सेवकाहातीं निर्धारीं ॥ मूर्खा किमर्थ फुंकविसी ॥ ८७ ॥ तरी तूं स्वमुखेंकरून ॥ चेतवीं सत्वर कृशानु[४३] ॥ न लगतां एक क्षण ॥ ज्वाला येथें ऊठती ॥ ८८ ॥ ऐसें बोलतां अंजनीसुतें ॥ तें मानलें दशमुखातें ॥ परी अंतरीं पावला भयातें ॥ मग धैर्य धरूनि उठियेला ॥ ८९ ॥ ते वेळे निजमुखें दाहके[४३] ॥ बळें फुंकी लंकानायक ॥ हनुमंतें बंधु आणि जनक ॥ अनळ[४३] अनिळ[४४] स्मरियेला ॥ ९० ॥ तों एकाएकीं अग्नि धडकला ॥ दाही मुखीं झोंबती ज्वाळा ॥ दाढ्या मिशा तेव्हां सकळा ॥ भस्म केल्या जाळूनि ॥ ९१ ॥ रावणें पाप केलें बहुत ॥ पुढें रामबाणें यासी देहांत ॥ यालागीं अगोदर प्रायश्चित्त ॥ राघवप्रियें दिधलें कीं ॥ ९२ ॥ दशमुखीं पोळला दशकंधर ॥ दिसे जैसा दग्धकांतारें[४५] ॥ असो मुखासी लावूनियां वस्त्र ॥ निजासनीं बैसला ॥ ९३ ॥ तंव धडकला पुच्छवन्ही ॥ हनुमंत गडबडा लोळे धरणीं ॥ काकुळती ये म्हणे सोडा कोणी ॥ असुर मनीं आनंदले ॥ ९४ ॥ म्हणती हें बरवें जाहलें ॥ अक्षयादिकांसी येणें मारिलें ॥ मर्कटें बहुतांसी संहारिलें ॥ विटंबिलें इंद्रजिता ॥ ९५ ॥ मग विरिंचीनें धरिला युक्तीं ॥ दशमुखें योजिली बरवी गती ॥ अग्न लाविला

३६ मेंढपाळांना. ३७ धागा सुद्धां. ३८ वीस डोळ्यांच्या रावणाला. ३९ तेल. ४० भुयारांत. ४१ रात्र. ४२ अग्नि. ४३ वायु. ४४ दहा माना असलेला रावण. ४५ वणव्यानें होरपळलेलें अरण्य.

पुच्छाप्रती ॥ मरेल निश्चितीं आतांचि ॥ ९६ ॥ येरू चडफडी तडफडी ॥ उडे पडे भूमीसी गडबडी ॥ आपली मांडी थापटोनि दाढी ॥ रावणाची गेला धरावया ॥ ९७ ॥ तों दाढीच नाहीं निःशेष ॥ तेणें रावणासी बसला दचक ॥ देखोन करी हास्यमुख ॥ म्हणे अनर्थ दिसतो पुढें ॥ ९८ ॥ हनुमंत म्हणे असुरांप्रती ॥ मज सोडवावें समस्तीं ॥ ऐका माझी एक विनंती ॥ धांवे मारुति पुढोंचि ॥ ९९ ॥ तंव ते पळती दूरदूर ॥ पुच्छ आकर्षूनि असुर ॥ दाट्या जाळियेल्या समग्र ॥ प्रळय थोर मांडला ॥ १०० ॥ गरगरां पुच्छ तये वेळां ॥ भवंडितां झळकती प्रळयज्वाळा ॥ राक्षस करूनियां गोळा ॥ पुच्छामींत भस्म करी ॥ १ ॥ सभा सांडोनि पळती असुर ॥ हनुमंत म्हणे उभे स्थिर ॥ मज सोडवा तुम्ही समग्र ॥ म्हणोनि भेटे तयांतें ॥ २ ॥ शतांचीं शतें ते क्षणीं ॥ यामिनीचेंर पुच्छें बांधोनी ॥ रावणापाशीं आणी ओढोनी ॥ म्हणे कां हे पळताती ॥ ३ ॥ असो सीतेसी राक्षसी सांगत ॥ तुझा वानर मेला गे यथार्थ ॥ ऐकतां जानकी शोक करीत ॥ म्हणे विपरीत केवीं घडे ॥ ४ ॥ मशकें सागर शोषिला ॥ जंबुकांनीं सिंह केवीं धरिला ॥ खद्योतांनीं सूर्य पाडिला ॥ खालीं कैसा आसडोनी ॥ ५ ॥ वज्र भंगलें लागतां कमळ ॥ पतंगें ग्रासिला वडवानळ ॥ भोगींद्राचें फणिमंडळ ॥ वटबीज-भारें दडपलें ॥ ६ ॥ मैंक्षिकेच्या पक्षवातेंकरूनी ॥ प्रळयमेघ गेला विदारूनी ॥ पिपीलिकाभारें कोसळोनी ॥ कनकाद्रि कैसा पडि-येला ॥ ७ ॥ पुष्पप्रहार पडतां सृष्टीं ॥ केवीं दणाणे कूर्मपृष्ठी ॥ चित्रींच्या लेपें उठाउठी ॥ प्रळयचपळा ग्रासिली ॥ ८ ॥ असो रुद्रा-वतार हनुमंत ॥ तो राक्षसीं जाळिला अमींत ॥ कैसी घडली ही मात ॥ विचारीत राघवप्रिया ॥ ९ ॥ जठराग्नीस सीता पुसत ॥ तो म्हणे क्षेम आहे हनुमंत ॥ नगर मी जाळीन समस्त ॥ बंधुसाह्याकारणें ॥ ११० ॥ असो इकडे समस्त असुर ॥ हनुमंतावरी करिती शस्त्रमार ॥ तों पुच्छाग्नी धडकला थोर ॥ पळती असुर चहूंकडे ॥ ११ ॥ नानाशस्त्रें बाण शक्ती ॥ दुरोनि कपींद्रावरी टाकिती ॥ मग मिष घेऊन मारुती ॥ गतप्राण पडियेला ॥ १२ ॥ मूर्च्छित पडतांची वानर ॥ जवळी धांविन्नले असुर ॥ जो तो म्हणे म्यां घाय थोर ॥ वर्मीं पाहून दिधला ॥ १३ ॥ म्हणोनि मेला हा वानर ॥ जो तो म्हणे हा प्रचंड वीर ॥ सांगती रावणासी बडिवार ॥ सुखें निद्रा करीं आतां ॥ १४ ॥ मेलियासारखें मिष घेउनी ॥ दोन घटिका पडिला मेदिनीं ॥ राक्षस बहुत मिळोनी ॥ सभोंवते विलोकिती ॥ १५ ॥ फेंस वाहतसे वदनीं ॥ वैद्य नाडी पाहती विलोकुनी ॥ म्हणती केवढा पुरुषार्थ करूनी ॥ वानर शेवटीं मेला हो ॥ १६ ॥ ऐसें समस्त जों पाहत ॥ तों हनुमंत उडाला अकस्मात ॥ पुच्छें बांधिलें समस्त ॥ राक्षस जळत धडधडां ॥ १७ ॥ कित्येक पळाले असुर ॥ एकला उरला दशकंधर ॥ त्यासी म्हणें रक्षणार ॥ तुज कोण असे आतां ॥ १८ ॥ शौंकारीस म्हणे रावण ॥ यावरी लोह-पाश घालून ॥ ग्रीवा हस्त बांधोन ॥ लंकेमाजी फिरविजे ॥ १९ ॥ मग इंद्रजितें पाश घालून ॥ बांधिला तेव्हां वायुनंदन ॥ नगरा-

४६ राक्षसांना. ४७ दैत्य. ४८ कोल्ह्यांनीं. ४९ काजव्यांनीं. ५० माशीच्या. ५१ पंखाच्या वाऱ्यानें. ५२ मुंगीच्या भारानें. ५३ मेरुपर्वत. ५४ प्रळयकाळींचो वीज. ५५ बढाई. ५६ इंद्रजितास.

माजी नेऊन ॥ हिंडविती हनुमंता ॥ १२० ॥ जैसें पुंटीं पडतां सुवर्ण ॥ तेजस्वी दिसे देदीप्यमान ॥ त्यापरी सीताशोकहरण ॥ अग्नि-संगें शुद्ध दिसे ॥ २१ ॥ आळोआळीं फिरवीत ॥ हनुमंत सहज पाळेंती घेत ॥ निंदकांचीं तोंडें लोंसीत ॥ लोक पळती बिदोबिदी[६०] ॥ २२ ॥ जाहला एकचि हाहाकार ॥ भलती स्त्री म्हणे तूं माझा भ्रतार ॥ मज येथून काढीं बाहेर ॥ लावील वानर अग्नि आतां ॥ २३ ॥ हनुमंत म्हणे समस्त असुरां ॥ मज तुम्ही आतां दृढ धरा ॥ मर्षपप्राय[६१] होऊनि सत्वरा ॥ निघोनि गेला क्षणमात्रें ॥ २४ ॥ हनुमंत गदगदां हांसत ॥ राक्षसांसी वांकुल्या दावीत ॥ लंकेसी अग्नि लावीत ॥ सुटला अद्भुत प्रभंजनें[६२] ॥ २५ ॥ माड्या गोपुरें धवेळारें[६३] ॥ राणिवसाँचीं[६४] सुंदर मंदिरें ॥ सकळ नगर महाद्वारें ॥ एकसरें धडकलीं ॥ २६ ॥ कपीनें मांडिलें लंकादहन ॥ त्यासी साह्य जाहला पवनें[६५] ॥ नग्न होऊनि नगरजन ॥ सदनें सोडून पळाले ॥ २७ ॥ थोर विषयी संसारीं धन ॥ त्याहूनि आगळें अपत्य पूर्ण ॥ त्याहून दारा[६६] विशेष जाण ॥ त्याहून आस्था प्राणांची ॥ २८ ॥ त्याहून विशेष निजप्राणत्याग ॥ इंद्रियांवरी उदास मग ॥ देहममता धरी निःसंग ॥ विषयभोग सांडिलिया ॥ २९ ॥ ज्यासी न झगटे मोहममता ॥ मग इतर जनांची काय कथा ॥ न करी कोणी कोणाची आस्था ॥ पळती जीव घेऊनियां ॥ १३० ॥ पुरुषावीण मोहें अत्यंत नारी ॥ उडी घालिती जळते घरीं ॥ बळें ओढून काढितां बाहेरी ॥ जीवित्वावरी उदास त्या ॥ ३१ ॥ असंभाव्य दाटल्या ज्वाळा ॥ ग्रासूं इच्छिती नभमंडळा ॥ कीं कल्पांतरुद्र क्षोभला ॥ रावणावरी ते काळीं ॥ ३२ ॥ धूम्र दशदिशांतें दाटी ॥ कोणी कोणास न दिसे दृष्टी ॥ वंशनळे[६७] नभाच्या पोटीं ॥ असंख्यात उडती पैं ॥ ३३ ॥ आतां असो बहुत बोली ॥ तृतीयभाग लंका जाळिली ॥ परी ते सुवर्णमय जाहली ॥ श्रीरामभक्तप्रतापें ॥ ३४ ॥ लोहघणें परिस फोडिला ॥ परी तो अवघाचि सुवर्ण जाहला ॥ तेवीं लंकानगर ते वेळां ॥ हेममय ओतिलें ॥ ३५ ॥ हनुमंतें लंकादहन केलियावरी ॥ निजमानसीं विचार करी ॥ श्रीरामदर्शनासी झडकरी ॥ जावें आतां त्वरेनें ॥ ३६ ॥ मग उडाला वायुकुमर ॥ समुद्रतीरा आला सत्वर ॥ पुच्छ विझवितां नदीश्वर[६८] ॥ काकुळती बहु आला ॥ ३७ ॥ जलचरें उकडोनि मरती ॥ तूं कडेस बैसें गा मारुती ॥ याउपरी अवनिजापती[६९]- ॥ दास तीरीं बैसला ॥ ३८ ॥ सरितापतीनें निजबळें ॥ निजलाटेनें पुच्छ विझविलें ॥ कीं याजकें अग्नीस आच्छादिलें ॥ कुंडमंडपामाझारी ॥ ३९ ॥ कपाळींचा स्वेद पुसोनि टाकिला ॥ तो पुढें मकरध्वज जन्मला ॥ असो कपि मागें पाहूं लागला ॥ तों लंका भडभडां जळतसे ॥ १४० ॥ असंभाव्य चेतला अग्न ॥ जनकजा जाईल भस्म होऊन ॥ कार्य नासेल म्हणून ॥ वायुनंदन शोक करी ॥ ४१ ॥ मग म्हणे करितां रामस्मरण ॥ मज न बाधी प्रळयाग्न ॥ माझे जगन्मातेसी विघ्न ॥ केवीं क्लेशान करूं शके ॥ ४२ ॥ स्मरतां रघुवीरनाम निर्मळ ॥ शिवकंठींचें हालाहळ ॥ शीतळ जाहलें तत्काळ ॥ नामाभ्रतेंकरूनियां ॥ ४३ ॥ तों वायुदेव सांगे ते

५७ मुर्शीत. ५८ टेंडेळणी. ५९ पोळीत. ६० गडबोगडी. ६१ मोहरीसारखा. ६२ वारा. ६३ गच्च्या. ६४ जनानखान्याचीं. ६५ पत्नी. ६६ बांबूचे नळे [ पेटल्यामुळें ]. ६७ नदीपति समुद्र. ६८ मारुती. ६९ अग्नि.

वळां ॥ सुखी आहे जनकबाळा ॥ जे त्रिभुवनपतीची चित्कळा ॥ ब्रह्मांडमाळा घडी मोडी ॥ ४४ ॥ यावरी लोकप्राणेशनंदन ॥ म्हणे क्षुधित जाहले नयन ॥ मित्रेंकुळभूषणाचे चरण ॥ पाहावयालागीं उदित ॥ ४५ ॥ तो मंगळजननीजाँजीवन ॥ मज पुसेल वर्तमान ॥ तरी कीर्ति स्वमुखेंकरून ॥ वर्णितां दूषण लागेल ॥ ४६ ॥ यश धर्म विद्या पुरुषार्थ ॥ बळ पराक्रम आणि तीर्थ[७२] ॥ हें स्वमुखें जो वर्णीत ॥ तया हानि सत्य शास्त्र म्हणे ॥ ४७ ॥ मग गुप्तरूपें वायुनंदन ॥ घेत परेंमेष्ठीचें दर्शन ॥ म्हणे मी अयोध्यापतीचे चरण ॥ पाहावया जातसें ॥ ४८ ॥ तरी येथें वर्तला जो वृत्तांत ॥ तो पत्रीं लिहावा साद्यंत ॥ ऐकतां विष्णुंनाभसुत ॥ ब्रह्मानंदें उचंबळला ॥ ४९ ॥ म्हणे धन्य हनुमंता तुझें ज्ञान ॥ मजही तुवां केलें पावन ॥ मग तत्काळ पत्र लिहून ॥ हनुमंतापाशीं दीधलें ॥ १५० ॥ ब्रह्मयाची आज्ञा घेउनी ॥ प्रवेशला अशोकवनीं ॥ साष्टांगेंसीं जनकनंदिनी ॥ सद्गद होऊनि नमियेली ॥ ५१ ॥ मग बोले जनकबाळा ॥ आतां कधीं येशील वेल्हाळा ॥ विमळांबुधारा ते वेळां ॥ नेत्रीं आल्या जानकीच्या ॥ ५२ ॥ जो दशरथाचा महापुण्यमेरू ॥ तो ब्रह्मांडनायक जगद्गुरू ॥ जो भक्तमंदिरांगणमाँदारू ॥ तयाचे दर्शना जातों मी ॥ ५३ ॥ हनुमंत म्हणे जगन्माते ॥ राघववल्लभे गुँणसरिते ॥ कमळप्रिये कमलोद्भूते ॥ चिंता न करीं सर्वथा ॥ ५४ ॥ माते उदयीक जाण दोनप्रहरां ॥ राघव आणितों समुद्रतीरा ॥ तो राक्षसांसहित दैत्येंद्रा ॥ वधून तुज सोडवील ॥ ५५ ॥ मज कांहीं खूण द्यावी यथार्थ ॥ जेणें मज धन्य म्हणेल रघुनाथ ॥ मग वेणीचा मणि देदीप्यवंत ॥ मारुतीचे हातीं ओपिला ॥ ५६ ॥ मागुती अंजनीहृदयरत्न ॥ म्हणे कांहीं सांग अंतरखूण ॥ तो ताटिकांतक मखपाळण ॥ जेणेंकरूनि संतोषे ॥ ५७ ॥ जानकी म्हणे चित्रकूटपर्वतीं ॥ आम्हीं काळ क्रमिला जैं मारुती ॥ सुमित्रात्मज वनाप्रती ॥ गेला होता एकदां ॥ ५८ ॥ एकांतींचे अवसरीं ॥ रघुपतीच्या अंकावरी ॥ शिर ठेवूनि निर्धारीं ॥ हनुमंता मी नेजल्यें पैं ॥ ५९ ॥ प्रीतीकरून तमालनील ॥ परम सुवास जो मँनसीळ ॥ तो उगाळून स्वकरें तत्काळ ॥ टिळक रेखिला भाळीं माझे ॥ १६० ॥ हे गोष्टी जाणे रघुनंदन ॥ मारुति सांगें हे अंतरखूण ॥ ऐसें ऐकतां वायुनंदन ॥ परम हर्ष पावला ॥ ६१ ॥ जानकी म्हणे समुद्रजळ ॥ शतयोजनें भरलें तुंबळ ॥ असंख्यात वानरदळ ॥ कैसें येईल ऐलतीरा ॥ ६२ ॥ येरू म्हणे राघव शरीं ॥ सेतु बांधील समुद्रनीरावरी ॥ अथवा माझिया पुच्छेंकरीं ॥ सेतु बांधील अभंग ॥ ६३ ॥ नातरी राघवबाण वडवानळ ॥ शोषून टाकील समुद्रजळ ॥ अथवा उड्डाण करून सकळ ॥ सुवेळेसी पैं येऊं ॥ ६४ ॥ जेणें स्तंभाविणें धरिलें नभ ॥ जीवनावरी पृथ्वी ठेवी स्वयंभ ॥ तो जानकी तुझा वल्लभ ॥ काय एक करूं न शके ॥ ६५ ॥ जननीचे जठरकुहरीं ॥ प्राणी वसे नवमासवरी ॥ तेथें रक्षी नानापरी ॥ तो काय एक करूं न शके ॥ ६६ ॥ बाहेर उपजतांच अवधारा ॥ मातेचे स्तनीं दुग्धधारा ॥ लावितो परात्पर सोयरा ॥ तो काय

७० श्रीरामाचे. ७१ मंगळाची आई पृथ्वी, तिची कन्या सीता, तिचा पति श्रीराम. ७२ गुरु. ७३ ब्रह्मदेवाचें. ७४ गुणांनीं भरून वाहणारी नदी. ७५ एक तांबूस रंगाचा औषधी धातु.

एक करूं न शके ॥ ६७ ॥ क्षणें एवढें ब्रह्मांड दावी ॥ सर्वेंच मागुतें लपवी ॥ तो राम त्रिभुवनगोसावी ॥ काय एक करूं न शके ॥ ६८ ॥ जैसा गगनीं एकचि मित्र ॥ परी प्रकाश करी सर्वत्र ॥ तैसा जगद्व्यापक रघुवीर ॥ काय एक करूं न शके ॥ ६९ ॥ वपु नवविच्छिद्रमय भर्मे ॥ परी मर्यादेवेगळा न जाय प्राण ॥ तैसा अयोध्यानाथ जगन्मोहन ॥ काय एक करूं न शके ॥ १७० ॥ गोष्टी असोत बहुत आतां ॥ वेद शिणले कीर्ति गातां ॥ उदयीक दोनप्रहरां रघुनाथा ॥ समुद्रतीरा आणितों ॥ ७१ ॥ तुज मी आतांच नेतों माते ॥ परी शुद्धी सांगितली रघुनाथें ॥ पुढील भविष्याचीं मतें ॥ ठाऊक नसती जननीये ॥ ७२ ॥ असो सीतेची आज्ञा घेऊन ॥ साष्टांगें नमी वायुनंदन ॥ यशस्वी रघुनाथ म्हणोन ॥ गगनपंथें उडाला ॥ ७३ ॥ सकळ देव म्हणती हनुमंता ॥ त्वरितगतीं आणावें रघुनाथा ॥ तूं आमुचा प्राणदाता ॥ सोडवीं येथून आम्हांसी ॥ ७४ ॥ हनुमंत म्हणे देवांसी ॥ नका चिंता करूं मानसीं ॥ उदयीक राम समुद्रतीरासी ॥ निर्धारेंसीं आणितों ॥ ७५ ॥ यावरी लंकागिरिशिखरीं ॥ उभा राहिला वानरकेसरी ॥ भुभुःकार केला ऐलतीरीं ॥ सकळ वानरीं ऐकिला ॥ ७६ ॥ लंकागिरीहूनि उडाला ॥ योजनद्वय पाठार दडपिला ॥ उड्डाणासरसा समुद्र भ्याला ॥ मारुति आला ऐलतीरा ॥ ७७ ॥ निशांतीं उगवे चंडकिरण ॥ कीं वैकुंठींहून उतरे सुपर्ण ॥ कीं मानसतीर लक्षून ॥ राजहंस उतरला ॥ ७८ ॥ महेंद्रपर्वतावरी हनुमंत ॥ उभा ठाकला अकस्मात ॥ जांबुवंतादि वानर समस्त ॥ भेटावया धांविन्नले ॥ ७९ ॥ थोर थोर वानर भेटती ॥ एक जंघनासी आलिंगिती ॥ एक जानु जंघीं कवळिती ॥ एक लागती पायांतें ॥ १८० ॥ एक पुच्छासी देती आलिंगन ॥ एक पुच्छाग्रीं देती चुंबन ॥ एक मान घुलकावून ॥ वांकुल्या दाविती ऊर्ध्वपंथें ॥ ८१ ॥ एक टाळ्या वाजवून कोडें ॥ नृत्य करिती मारुतीपुढें ॥ एक चक्राकार उडे ॥ वर्णिती पवाडे श्रीरामाचे ॥ ८२ ॥ एक करिती थोर भुभुःकार ॥ एक साष्टांग घालिती नमस्कार ॥ एक म्हणती श्रीरामचंद्र ॥ तेथें सत्वर जाऊं चला ॥ ८३ ॥ पुष्पें आणूनी ते अवसरीं ॥ हनुमंत पूजिला वानरीं ॥ जैसा सकळ सुरवरीं ॥ अपर्णावर पूजियेला ॥ ८४ ॥ मारुतीचे अंगावरील मळ ॥ देखोन कपी पुसती सकळ ॥ लंकेंत प्रताप केला समूळ ॥ सांग आम्हां हनुमंता ॥ ८५ ॥ परी कदा न सांगे मारुती ॥ ब्रह्मलिखित देत हातीं ॥ परी ते वानर न उकलिती ॥ विरिंचिमुद्रांकित जें ॥ ८६ ॥ मग म्हणती वानर ॥ कळेल किष्किंधेसी समाचार ॥ येथें उकलूनि पाहतां पत्र ॥ तरी चतुर हांसती ॥ ८७ ॥ असो मारुतीसह वानरगण ॥ किष्किंधेसी आले न लागतां क्षण ॥ सुग्रीवाचें मधुवन ॥ मोडिलें तेव्हां क्षणमात्रें ॥ ८८ ॥ सुग्रीवासी सांगती वानरगण ॥ वानरांसह आला वायुनंदन ॥ तुझें आवडतें क्रीडास्थान ॥ तें मधुवन मोडिलें ॥ ८९ ॥

७६ शरीर. ७७ दोन कान, दोन नेत्र, दोन नाकपुड्या, एक तोंड, एक शिश्न, आणि एक गुद, अशा नऊ छिद्रांनीं युक्त. ७८ फुटकें. ७९ वानरश्रेष्ठ, मारुति. ८० दोन योजनें म्हणजे आठ कोस. ८१ राम संपल्यावर. ८२ गरुड. ८३ कमरेचा पुढील भाग. ८४ गुडघे. ८५ मांड्या. ८६ पार्वतीपति शंकर.

ऐकतां सीतापति तारापती ॥ म्हणती विजयी झाला मारुती ॥ तरीच मधुवन मोडिती ॥ वानर आनंदेंकरूनियां ॥ १९० ॥ असो मधुवनींहून अंजनीसुत ॥ वानरांसह उडाला अकस्मात ॥ पंपासरोवरीं असे रघुनाथ ॥ आला तेथें स्वानंदें ॥ ९१ ॥ सपक्ष उतरला पर्वत ॥ कीं भूमीवरी आला आदित्य ॥ कीं मायाचक्र निरसोनि पावत ॥ योगी जैसा स्वरूपातें ॥ ९२ ॥ लंकेमाजी विजयी जाहला ॥ म्हणून दक्षिणबाहू उभारिला ॥ रघुनाथें हनुमंत देखिला ॥ प्रसन्नवदन ते काळीं ॥ ९३ ॥ साधक साधूनी महानिधान ॥ दिसे तैसा सुप्रसन्न ॥ कीं सुधारस हरिलिया सुपर्ण ॥ विराजमान परते जैसा ॥ ९४ ॥ कीं अमृतसंजीवनी अद्भुत ॥ साधूनि आला गुँरुसुत ॥ सहस्राक्ष जैसा आनंदत ॥ सीतानाथ तोषला तैसा ॥ ९५ ॥ अयोध्यापति किष्किंधापती ॥ आसन सोडून पुढें धांवती ॥ तों लोटांगण घाली मारुती ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ९६ ॥ परम स्नेहाळू रघुनंदन ॥ मारुतीतें हस्तें उचलोन ॥ देता जाहला क्षेमालिंगन ॥ भरलें गगन आनंदें ॥ ९७ ॥ प्राणसखा हनुमंत ॥ हृदयीं धरी रघुनाथ ॥ पुढतीं सोडावा हा हेत ॥ मनामाजी उपजेना ॥ ९८ ॥ असो हनुमंतासी क्षेम देउनी ॥ सकळ कपींसी भेटे चापपाणी ॥ जांबुवंत अंगद प्रीतीकरूनी ॥ हृदयीं धरिले रघूत्तमें ॥ ९९ ॥ सुग्रीवें धांवोनियां प्रीतीं ॥ हृदयीं धरिला मारुती ॥ कीं इंद्रासी भेटला बृहस्पती ॥ आलिंगन शोभलें तैसें ॥ २०० ॥ मग राजाधिराज समर्थ ॥ सभा करूनि बैसला रघुनाथ ॥ तेव्हां मणि आणि ब्रह्मलिखितें ॥ पुढें ठेविलें हनुमंतें ॥ १ ॥ मग आनंदें सकळ वर्तमान ॥ दंडीऋषिपुत्रापासून ॥ पुढें सुप्रभेचें उद्धरण ॥ तेंही कथिलें तेधवां ॥ २ ॥ पुढें समुद्रतीरपर्यंत ॥ अंगदें कथिलें समस्त ॥ शुद्धी नव्हे म्हणोनी अद्भुत ॥ अग्नि चेतविला वानरीं ॥ ३ ॥ प्राण देतां अग्नीमाझारी ॥ हनुमंतें रक्षिलें ते अवसरीं ॥ मग संपाती भेटला समुद्रतीरीं ॥ तेणें शुँद्धी सांगितली ॥ ४ ॥ याउपरी वायुकुमर ॥ शतयोजनें उडाला सागर ॥ पुढें लंकेंत झाला जो समाचार ॥ तो हनुमंत न सांगेचि ॥ ५ ॥ मग रामें हनुमंताकडे पाहिलें ॥ तंव येरू म्हणे जें वर्तमान जाहलें ॥ तें विरिंचीनें असे पत्रीं लिहिलें ॥ निजहस्तेंकरूनियां ॥ ६ ॥ जगद्वंद्या अयोध्यापती ॥ सुखरूप आहे सीता सती ॥ मणि खूण दिधला माझे हातीं ॥ परम सद्गद होऊनियां ॥ ७ ॥ अंतरखूण सांगितली ॥ मनसीळ लाविला माझिये भाळीं ॥ रघूत्तमें ऐकतां हृदयकमळीं ॥ तये काळीं गहिंवरला ॥ ८ ॥ मणि हृदयीं धरून रघुनाथ ॥ अत्यंत जाहला शोकाकुलित ॥ अहा सीता म्हणोनि बोलत ॥ देखतां अर्केंज गहिंवरला ॥ ९ ॥ हनुमंत म्हणे रघुराजा ॥ सुखी आहे जनकात्मजा ॥ परी तुझ्या वियोगें भरताग्रजा ॥ अत्यंत कृश जाहली असे ॥ २१० ॥ म्यां मुद्रिका दिधली नेऊन ॥ ते मनगटीं खेळे जैसें कंकण ॥ मग म्हणे रघुनंदन ॥ केवीं प्राण उरला असे ॥ ११ ॥ रघुपती तुझें नामामृत ॥ तेणें जानकी वांचली सत्य ॥ जैसा शशांक राहुग्रस्त ॥ चिंतेनें तैसी झांकिली ॥ १२ ॥ मग बोले तमालनील ॥ कैसा तरलासी समुद्रजळ ॥ यावरी

८७ बृहस्पतीचा पुत्र कच. ८८ इंद्र. ८९ ब्रह्मदेवाचें पत्र. ९० शोध. ९१ सुग्रीव.

अंजनीचा बाळ ॥ काय बोलता जाहला ॥ १३ ॥ तुझिये मुद्रिकेचें अद्भुत बळ ॥ क्षणें जिंकवेल कळिकाळ ॥ नखाग्रीं समुद्रजळ ॥ सांठविजेल सर्वही ॥ १४ ॥ मग विरिंचीचें लिखितपत्र ॥ सौमित्राजवळी देत राजीवनेत्र ॥ वाचिता जाहला भोगींद्र ॥ सावधान वानर ऐकती ॥ १५ ॥ स्थिर राहिला समीर ॥ ऐकावया विरिंचिपत्र ॥ सौमित्रें उकलिलें साचार ॥ जेवीं चंद्र पौर्णिमेचा ॥ १६ ॥ जो सरस्वतीचा जनिता ॥ त्याचिया अक्षराची कौशल्यता ॥ कोणासी न वर्णवे तत्त्वतां ॥ तें श्रोतीं आतां परिसावें ॥ १७ ॥ परब्रह्म केवळ रघुवीर ॥ त्यासी ब्रह्मदेवें लिहिलें पत्र ॥ तें ब्रह्मानंदकृपें श्रीधर ॥ अति पवित्र वर्णीलें पैं ॥ १८ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ एकविंशतितमाध्याय गोड हा ॥ २१९ ॥ अध्याय ॥ २१ ॥ ओंव्या ॥ २१९ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

---

९२ समर्थ. ९३ वायु.

२२

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ उकलोनी कमलोद्भवाचें पत्र ॥ वाचिता जाहला सौमित्र ॥ सावध ऐके राजीवनेत्रें ॥ सूर्यपुत्रादि कपी सर्वही ॥ १ ॥ अनंतकोटिब्रह्मांडनायका ॥ हे दयार्णवा विश्वपाळका ॥ वैकुंठपते विश्वव्यापका ॥ मम जनका श्रीवल्लभा ॥ २ ॥ हे राम सकळबंधच्छेदका ॥ हे राम साधुप्रतिपाळका ॥ दुष्टरजनीचरसंहारका ॥ जानकीनायका जगद्गुरो ॥ ३ ॥ हे राम जगदंकुरमूळकंदा ॥ साधुहृदयारविंदमिलिंदा ॥ निजजनचातकजलदा ॥ ब्रह्मानंदा परात्परा ॥ ४ ॥ संसारगजविदारक मृगेंद्रा ॥ दुःखपर्वतभंजन वज्रधरा ॥ निजभक्तचकोरसुधाकरा ॥ अतिउदारा सीताधवा ॥ ५ ॥ त्रिभुवनजनका दुःखहरणा ॥ जनकजामाता जनपाळणा ॥ जनकजापते जलजनयना ॥ जलदवर्णा जगत्पते ॥ ६ ॥ जय जय राम वेदोद्धारका ॥ कमठरूपा सृष्टिपाळका ॥ नमो सकळदैत्यांतका ॥ वराहवेषा दीनबंधो ॥ ७ ॥ नमो हिरण्यकश्यपमर्दना ॥ नमो त्रिविक्रमा बलिबंधना ॥ नमो ब्राह्मणकुळपाळणा ॥ भार्गवकुळदिवाकरा ॥ ८ ॥ नमो पौलस्तिकुळविपिनदहना ॥ मीनकेतनारिहृदयजीवना ॥ नमो चतुर्दशलोकपाळणा ॥ मखरक्षणा रघुवीरा ॥ ९ ॥ जय जय विश्वपाळणा ॥ विश्वव्यापका विश्वकारणा ॥ विश्वमतिचाळका विश्वजीवना ॥ विश्वरक्षणा विश्वेशा ॥ १० ॥ नमो मायाचक्रचाळका ॥ नमो अज्ञानतिमिरांतका ॥ नमो वेदरूपा वेदपाळका ॥ वेदस्थापका वेदवंद्या ॥ ११ ॥ नमो कमलनाभा कमलजीवना ॥ नमो पापारण्यकुठारतीक्ष्णा ॥ नमो त्रिविधदाहतापशमना ॥ अनंतशयना अनंता ॥ १२ ॥ नमो दशावतारचरित्रचाळका ॥ नमो अनंतब्रह्मांडनायका ॥ नमो अनंतवेषकारका ॥ ताटिकांतका पापहरणा ॥ १३ ॥ नमो जननमरणरोगवैद्या ॥ सच्चिदानंदा स्वसंवेद्या ॥ मायातीता जगद्वंद्या ॥ भेदाभेदातीत तूं ॥ १४ ॥ नमो सर्गस्थित्यंतकारका ॥ कैवल्यपददायका ॥ अज अजित सर्वात्मका ॥ करुणालया सुखाब्धे ॥ १५ ॥ जय जय षड्विकाररहिता ॥ नमो षड्गुणअलंकृता ॥ अरिषड्वर्गच्छेदप्रतापवंता ॥ शब्दातीता निरंजना ॥ १६ ॥ तूं निर्विकार निरंजन ॥ आम्हांलागीं जाहलासि सगुण ॥ बंदीचे सोडवावे सुरगण ॥ पिशिताशनें वधोनियां ॥ १७ ॥ पितृवचनाचें करूनि व्याज ॥ कानना आलासी रघुराज ॥ पंचवटीस राहून सहज ॥ बहुत राक्षस वधियेले ॥ १८ ॥ दश मुखें केलें सीताहरण ॥ त्याचें करावया गवेषण ॥ म्हणोनि किष्किंधेसी आगमन ॥ जाहलें तुझें श्रीरामचंद्रा ॥ १९ ॥ शुद्धीलागीं रुद्रावतार ॥ अंजनीहृदयारविंदभ्रमर ॥ जो ब्रह्मांडासी देणार धीर ॥ तरला सागर निमिषार्धें ॥ २० ॥ अगाध मारुतीचें उड्डाण ॥ बहुतीं वाटेस केलें विघ्न ॥ परी तो अनिवारकिराण ॥ कोणासही नाटोपे ॥ २१ ॥ पडलंवेसी येऊन हनुमंत ॥ राक्षसी संहारिल्या बहुत ॥ प्रवेशला क्रौंचेच्या मुखांत ॥ दांतांसी दांत मेळवी जों ॥ २२ ॥ उदर फोडोनि आला बाहेर ॥ मग शोधिलें निकुंभिलानगर ॥

१ ब्रह्मदेवाचें. २ श्रीराम. ३ राक्षस. ४ जगद्रूप अंकुराचा मूलभूत कंद. ५ साधूंच्या हृदयकमलावरील भ्रमर. ६ स्वभक्तरूप चातकाला जलद=मेघ. ७ वज्र धारण करणारा इंद्र. ८ स्वभक्तरूप चकोराला सुधाकर=चंद्र. ९ मेघश्याम. १० कूर्म, कांसव. ११ बळीराजाजवळ तीन पावलें भूमीची याचना करणारा वामन. १२ भार्गवकुलदीपक सूर्य--परशुराम. १३ पौलस्तिकुळरूपी अरण्य जाळणारा अग्नि राम. १४ मदनांतक शंकराच्या हृदयाचा आधार (रामनाम). १५ कामक्रोधादि षड्रिपूंचा संहारक. १६ राक्षस. १७ निमित्त. १८ शोधन. १९ ज्याची गति अकुंठित आहे असा. २० लंकेच्या पश्चिमेकडलें स्थान.

सुलोचना[२१] देखोनि सुंदर ॥ म्हणे हेचि होय जानकी ॥ २३ ॥ तिजवरी घालावया पाषाण ॥ सिद्ध झाला वायुनंदन ॥ मग तिचे शब्द परिसतां[२२] पूर्ण ॥ सीता नव्हे कळलें हें ॥ २४ ॥ मग अणुप्रमाण होऊन ॥ प्रवेशला लंकाभुवन ॥ विटंबिले सकळ जन ॥ करूनि नग्न बिदीसी[२३] ॥ २५ ॥ पत्र ऐकतां जनकजापती ॥ म्हणे धन्य धन्य वीर मारुती ॥ अद्भुत कर्तव्य अगाध शक्ती ॥ त्रिजगतीं[२४] ऐसा नाहीं ॥ २६ ॥ ऐकोनियां विनोदरीती ॥ वानर गदगदां हांसती ॥ एकावरी एक पडती ॥ मुरकुंड्या वळती ऐकतां ॥ २७ ॥ नाना वस्तू उत्तम आणून ॥ वानर टाकिती ओंवाळून ॥ एक सप्रेम हृदयीं धरून ॥ म्हणती धन्य बलाढ्य तूं ॥ २८ ॥ पत्र वाचितां लक्ष्मण ॥ क्षणक्षणां करी हास्यवदन ॥ मागुती तटस्थ झाले हरिगणं[२५] ॥ पत्र पुढें परिसती ॥ २९ ॥ शोधिलें बिभीषणाचें घर ॥ कीर्तन ऐकोनि झाला निर्भर[२६] ॥ मग कुंभकर्णाचें मंदिर ॥ देखोनियां कंटाळला ॥ ३० ॥ रावणस्त्रिया ऐशीं सहस्र ॥ तितुक्या शोधूनि वायुकुमर ॥ राक्षससभा विटंबिली समग्र ॥ तें अगाध चरित्र न वर्णवे ॥ ३१ ॥ रावणशेजे मंदोदरी ॥ म्हणे हीच होईल सीता सुंदरी ॥ तंव ते झाली घाबरी ॥ दुष्ट स्वप्न देखोनियां ॥ ३२ ॥ दशकंठास सांगे वर्तमान ॥ विषकंठप्रियं[२७] रघुनंदन ॥ त्याची सीता द्या हो सोडून ॥ परी रावण न मानी तें ॥ ३३ ॥ सीता पहावया पाठविली दूती ॥ तिच्या मागून गेला मारुती ॥ तों अशोकवृक्षातळीं सीता सती ॥ देखोनि कपि नमीतसे ॥ ३४ ॥ पुढें मुद्रिका ठेवून ॥ वृक्षावरी बैसला एक क्षण ॥ अपार राक्षसी झोडून ॥ पाडिल्या तेथें पराक्रमें ॥ ३५ ॥ मुद्रिका देखोन सीता सती ॥ शोकसमुद्रीं करी वस्ती ॥ मग पुढें येऊन मारुती ॥ प्रत्यक्ष भेटला तेधवां ॥ ३६ ॥ सांगितलें सकळ वर्तमान ॥ मग क्षुधेचें मिषें[२८] करून ॥ विध्वंसिलें अशोकवन ॥ जें विस्तीर्ण तीस योजनें ॥ ३७ ॥ रावणें पाठविला दळभार ॥ त्याचा तत्क्षणीं केला संहार ॥ मारूनि रावणाचे पुत्र ॥ शक्रजित विटंबिला ॥ ३८ ॥ मग म्यां हनुमंतासी प्रार्थून ॥ ब्रह्मपाशें नेला बांधोन ॥ रावणासी शब्दशस्त्रेंकरून ॥ सभेसी निर्भर्त्सिलें हनुमंतें ॥ ३९ ॥ मारुतीस मारावया सत्वर ॥ पुच्छासी लाविला वैश्वानर[२९] ॥ स्नेहेंसहितं[३०] वस्त्रें अपार ॥ गुंडाळोनि साक्षेपें ॥ ४० ॥ पुच्छ पेटतां सत्वर ॥ उडोनि गेला वायुपुत्र ॥ तृतीय भाग लंकानगर ॥ जाळिलें क्षण न लागतां ॥ ४१ ॥ परी नवल वर्तलें अद्भुत ॥ लंका सुवर्णमय जाहली समस्त ॥ धन्य तो लोकप्राणेशसुत ॥ थोर सामर्थ्य दाविलें ॥ ४२ ॥ मग सागरीं पुच्छ विझवून ॥ पुन्हां घेतलें जानकीचें दर्शन ॥ जैसें बाळ खेळतां श्रमून ॥ जननीपाशीं येत पैं ॥ ४३ ॥ ऐसें पत्र वाचितांचि सौमित्र ॥ ऐकतां घनश्यामगात्र ॥ गमें धांवूनि वायुपुत्र ॥ हृदयीं धरिला सप्रेम ॥ ४४ ॥ धन्य धन्य ते अंजनी ॥ ऐसें रत्न प्रसवली सद्गुणी ॥ मारुतीचें मुख कुरवाळोनी ॥ निजासनीं राम बैसे ॥ ४५ ॥ किष्किंधेहूनि रत्नें आणूनी ॥ ओंवाळिती मारुतीवरूनी ॥ म्हणे धन्य मारुतात्मज अवतरानी ॥ ब्रह्मांड भरिलें कीर्तीनें ॥ ४६ ॥ धन्य धन्य तो दिवस ॥

२१ इंद्रजिताची स्त्री. २२ ऐकतां. २३ गळोन. २४ तिन्ही लोकांमध्यें. २५ वानरसमुदाय. २६ लीन. २७ शंकराचा आवडता. २८ निमित्त. २९ अग्नि. ३० तेलानें भिजलेलीं.

स्वामी स्वमुखें गौरवी विशेष ॥ तुच्छ त्यापुढें सुधारस ॥ स्वर्गभोग सर्वही ॥ ४७ ॥ असो यावरी चापपाणी ॥ हृदयीं धरी दिव्य-मणी ॥ श्रीरामासी वाटलें ते क्षणीं ॥ कीं जनकजा आणिली हनुमंतें ॥ ४८ म्हणे धन्य मारुति स्नेहाळा ॥ मज भेटविली जनक-बाळा ॥ तुझा प्रताप उजळ[३१]ला ॥ निरा[३२]ळमंडपीं अवघाचि ॥ ४९ ॥ एवढा सागर उलंघूनी ॥ जानकी आलासी शोधूनी ॥ तुवां उप-कारऋणेंकरूनी ॥ मज बांधिलें हनुमंता ॥ ५० ॥ हनुमंत विचारी मनीं ॥ म्यां खूण आणिला सीतेचा मणी ॥ यालागीं कोदंडपाणी ॥ आनंदला अत्यंत ॥ ५१ ॥ मज थोर चुकी पडली तेथें ॥ जरी सीताचि आणितों येथें ॥ तरी आनंदें श्रा[३३]वणारिसुतें ॥ भरलें असतें ब्रह्मांड ॥ ५२ ॥ मग मनीं विचारी सीताशोकहरणें[३४] ॥ आतां काय माझें बळ क्षीण ॥ न लोटतां यो[३५]मार्ध पूर्ण ॥ घेऊन येईन पद्माक्षी ॥ ५३ ॥ मग म्हणे जी रघुनाथा ॥ क्षण एक धीर धरीं आतां ॥ घेऊन येतों जनकदुहिता ॥ सकळ राक्षसां निवटोनी[३६] ॥ ५४ ॥ हनुमंत करी उड्डाण ॥ सावध जाहला सीतारमण ॥ म्हणे हनुमंता न करीं गमन ॥ आहे कारण बहु पुढें ॥ ५५ ॥ आवेशें निघाला मारुती ॥ नाटोपेच तो कवणाप्रती ॥ मग स्वयें धांवूनि रघुपती ॥ आवरीत हनुमंता ॥ ५६ ॥ उचलोनियां रघुनाथ ॥ निजस्कंधीं वाहे हनुमंत ॥ म्हणे लंकेसी नेतों त्वरित ॥ रावणासी वधावया ॥ ५७ ॥ तों उर्मिलापति[३७] आणि अर्कसुत[३८] ॥ धांवविन्नले अंगद जांबुवंत ॥ चौघे हनुमंतासी आवरीत[३९] ॥ परी सर्वथा नाटोपे ॥ ५८ ॥ चौघांसही उचलून ॥ उडों पाहे सीताशोकहरण ॥ म्हणे इतुकेच लंकेसी जाऊन ॥ असुर मर्दून येऊं आतां ॥ ५९ ॥ वरकड न्यावे जरी वानर ॥ तरी ते कैसे तरतील सागर ॥ यालागीं निवडक थोर थोर ॥ पांचजण नेऊं हे ॥ ६० ॥ पांचजणांसी उचलून ॥ स्कंधीं वाहे वायुनंदन ॥ कीं तो पंचशृंगांचा पूर्ण ॥ नगोत्तमचि शोभला ॥ ६१ ॥ कीं पंच फळें लागलीं वृक्षासी ॥ तीं जड कदा न होती तयासी ॥ कीं उदयाद्रीवरी तेजोराशी ॥ पंच सूर्य उगवले ॥ ६२ ॥ असो घेऊनि पांचजण ॥ हनुमंत करूं पाहे गमन ॥ यावरी मंगलभगिनीचा[४०]रमण ॥ हनुमंतासी विनवीतसे ॥ ६३ ॥ मारुती ऐकें प्राणसखया ॥ विचाराविणें भलती क्रिया ॥ न करावी कदा हे चर्या[४१] ॥ श्रेष्ठांची असे पूर्वीहून ॥ ६४ ॥ ऐसें विनवितां रघुनंदन ॥ मग उतरले पांचहीजण ॥ जनकजापतीचे चरण ॥ सप्रेम धरिले हनुमंतें ॥ ६५ ॥ सुग्रीव जांबुवंत नळ नीळ ॥ वर्णिती अनिलात्मजाचें बळ ॥ यावरी तो तमालनीळ ॥ सभा करूनी बैसला ॥ ६६ ॥ श्रीराम पुसे मारुतीप्रती ॥ कैसी असे लंकेची गती ॥ राक्षस वर्तती कोणे रीतीं ॥ काय आचरती पुण्यक्रिया ॥ ६७ ॥ यावरी चातुर्यरत्नाकर ॥ बोले लोकप्राणेशकुमर ॥ जैसा शक्र आणि अंगिरा[४२]-कुमर ॥ करिती विचार एकांतीं ॥ ६८ ॥ तीनशें गांव लांब लंका ॥ रेखोनि दाविली रघुनायका ॥ सकळ सदनांची करून संख्या ॥ ठायीं ठायीं दाखविली ॥ ६९ ॥ जे कां मर्गज पा[४३]षाण ॥ त्यांचीं पांच लक्ष गृहें जाण ॥ सात लक्ष देदीप्यमान ॥ विटबंदी मंदिरें

३१ प्रकाशला. ३२ आकाशांत. ३३ रामानें. ३४ मारुती. ३५ अर्धा प्रहर. ३६ ठार करून. ३७ लक्ष्मण. ३८ सुग्रीव. ३९ हटवूं लागले. ४० राम. ४१ रीत. ४२ बृहस्पति. ४३ पाचूचे दगड.

॥ ७० ॥ ताम्र आणि कांसें निखिळ ॥ तयांचीं पांच कोटी सदनें निर्मळ ॥ सुवर्णाचीं अत्यंत सबळ ॥ सात कोटी राघवेंद्रा ॥ ७१ ॥ हेमरत्नीं अलंकृत ॥ नवकोटी शिवालयें तेथ ॥ रुद्राभिषेक नैवेद्य बहुत ॥ त्रिकाळ चालविती राक्षस ॥ ७२ ॥ असुरांच्या गृहीं पूर्ण ॥ अग्निहोत्र वेदाध्ययन ॥ रुद्राक्षमाळा भूषण ॥ विभूतिचर्चन करिती पैं ॥ ७३ ॥ मुख्य रावणें सुबुद्धीं पूर्ण ॥ टाकिलीं वेदांचीं खंडें करून ॥ तप आचरती दारुण ॥ ठायीं ठायीं राक्षस ॥ ७४ ॥ ऐसें बोलतां वायुनंदन ॥ रघुनाथ जाहला उद्विग्न ॥ ऐसी लंका पुण्यपरायण ॥ ते मज सर्वथा नाटोपे ॥ ७५ ॥ ऐसें जेथें सत्कर्माचरण ॥ तेथें नांदे यशःकीर्ति कल्याण ॥ तरी तें हाता न ये लंकाभुवन ॥ बहु यत्न करितांही ॥ ७६ ॥ तेव्हां क्षण एक रघुनाथ ॥ निवांत न बोले चिंताक्रांत ॥ भोंवते वानर तटस्थ ॥ पाहूं लागले ते काळीं ॥ ७७ ॥ मग श्रीराम म्हणे मारुती ॥ तुवां सांगितली राक्षसांची स्थिती ॥ परी दया क्षमा उपरती ॥ शांति विरक्ति मुख्य जया ॥ ७८ ॥ शौच आणि धर्म दान ॥ असुर करिती कीं अनुदिन ॥ यावरी सीतासंतापहरण ॥ काय वचन बोलिला ॥ ७९ ॥ क्षमा दया शुद्ध अंतर[४४] ॥ शौच दान धर्म पवित्र ॥ हें लंकेमाजी अणुमात्र ॥ सर्वथाही नसेचि ॥ ८० ॥ परम अधर्मी निर्दय असुर ॥ कापट्यचर्या तपें क्रूर ॥ अत्यंत खळ दुराचार ॥ मद्यप्राशक उन्मत्त ते ॥ ८१ ॥ मारुतीचें वचन ऐकूनी ॥ हास्यमुख होय चापपाणी ॥ तरी लंका नेईन ये क्षणीं ॥ पापखाणी वसती तेथें ॥ ८२ ॥ अंतरीं दया क्षमा नाहीं ॥ मग व्रतें तपें जाळिसी काई ॥ तो जरी पढला शास्त्रें साही ॥ व्यर्थ काय ते वटवट ॥ ८३ ॥ नटांमाजील कामिण ॥ कीं कोलाटियाचें शूरत्व पूर्ण ॥ कीं भ्रष्टाचें तत्त्वज्ञान ॥ कीं शांति पूर्ण सर्पाची ॥ ८४ ॥ कीं विधवेचें नवयौवन ॥ कीं ग्रामथिल्लरींचें जीवन[४५] ॥ कीं अनौमिकाचें रम्य सदन ॥ कीं मुखमंडण वेश्येचें ॥ ८५ ॥ कीं गर्भांधाचे विशाळ नयन ॥ कीं बधिराचे शोभायमान कर्ण ॥ कीं अजाकंठींचे स्तन ॥ कीं आचरण जाराचें ॥ ८६ ॥ कीं सावचोराचे गोड बोल ॥ कीं मेंदांची शांति खोल ॥ वाटपाडे निर्मळ ॥ निरंजनीं बैसले ॥ ८७ ॥ कीं दाट लागलें कंटकवन ॥ कीं दांभिकांचें व्यर्थ भजन ॥ तैसें भूतदयेवांचून ॥ ज्ञान ध्यान व्यर्थचि ॥ ८८ ॥ त्याचा एकांत व्यर्थ देख ॥ जैसे बिळीं बैसले मूषक ॥ शांति त्याची जैसा बक ॥ मत्स्यहरणार्थ बैसला ॥ ८९ ॥ भस्म अंगीं चर्चित साचार ॥ जैसा उकरडां लोळे खैर ॥ कीं अरण्यांत वसती निरंतर ॥ वृक व्याघ्र जैसे का ॥ ९० ॥ तेणें तीर्थीं केला वास ॥ तरी काय थोडे आहेत वायस ॥ कीं तीर्थजळीं मंडूक विशेष ॥ वटवटती विशेषें ॥ ९१ ॥ तेणें पाहिल्या चौसष्ट कळा ॥ परी तितुक्या जाणाव्या विकळा ॥ दया क्षमेचा नसतां जिव्हाळा ॥ कळा त्या विकळा जाणिजे ॥ ९२ ॥ तेणें केलें वेदाध्ययन ॥ जैसा खरावरी वाहिला चंदन ॥ षड्सपाकीं दर्वी पूर्ण ॥ व्यर्थ जैसी फिरूनियां ॥ ९३ ॥ त्याचें वरिवरी कीर्तन ॥ कीं गोरियाचें गायन ॥ कीं मद्यपियाचें भाषण ॥ शब्दज्ञान तैसें त्याचें

४४ मन. ४५ डबक्यांतील सांचलेलें थोडें पाणी. ४६ मद्याराचें. ४७ शुद्ध ब्रह्मविचारामध्यें. ४८ गर्दभ. ४९ लांडगे. ५० पळी. ५१ फांसेपारध्याचें.

॥ ९४ ॥ जैसें वृंदावनींफळ ॥ वरिवरी दिसे निर्मळ ॥ कीं घोत्राफळ रसाळ ॥ फणसासम दिसे पैं ॥ ९५ ॥ अवघा वेळ चुना मथितां ॥ परी नवनीत नलगे हाता ॥ सिकताहरळ शिजवितां ॥ मवाळें नव्हे कल्पांतीं ॥ ९६ ॥ तुंबिणीचें अत्यंत कडू फळ ॥ शर्करेंत ठेविल्या सर्वकाळ ॥ परी तें अंतरीं गोड होईल ॥ हें कल्पांतींही घडेना ॥ ९७ ॥ चुना माखोनि वायस ॥ बळेंचि जाहला राजहंस ॥ परी जाय विष्ठा शोधावयास ॥ व्यर्थ वेष कासया ॥ ९८ ॥ यालागीं ऐक हनुमंता ॥ दया क्षमा हृदयीं नसतां ॥ जप तप ध्यान तत्त्वतां ॥ व्यर्थ गेलें निर्धारें ॥ ९९ ॥ तरी जे लंकावासी असुर ॥ करीन अवध्यांचा संहार ॥ ऐकतां आनंदले वानर ॥ देती भुभुःकार एकदांचि ॥ १०० ॥ असो ब्रह्मपत्र मागें वाचिलें ॥ तें विरिंचीनें होतें लिहिलें ॥ हनुमंतें लंकादहन केलें ॥ परी नगर झालें सुवर्णाचें ॥ १ ॥ ते ऐकोनियां मात ॥ आश्चर्य करी कौसल्यासुत ॥ मग जांबुवंतासी पुसत ॥ हा वृत्तांत कैसा असे ॥ २ ॥ तूं बहुकाळाचा पुरुष ॥ देखिलें ऐकिलें बहुवस ॥ तो ब्रह्मयाचा अंश ॥ अयोध्याधीश म्हणोनि पुसे ॥ ३ ॥ वयें गुणें तपें बहुत ॥ वडील असे जांबुवंत ॥ सांगे पूर्वील वृत्तांत ॥ जैं लंका नगर वसत पैं ॥ ४ ॥ जैं केलें गजेंद्रोद्धारण ॥ वेगें परतला रमारमण ॥ तों कर जोडूनि सुपर्ण ॥ क्षुधेनें बहु व्यापिला ॥ ५ ॥ मग बोले श्रीकरधर ॥ गजेंद्रनक्रांचीं कलेवरें थोर ॥ तीं भक्षून येईं सत्वर ॥ ऐकोनि पक्षींद्र उडाला ॥ ६ ॥ नक्रगजेंद्रांचीं कलेवरें दोनी ॥ उरगारि घेऊन उडे गगनीं ॥ तों भृंभंग पक्षी येऊनी ॥ विभाग मागे खगेंद्रा ॥ ७ ॥ गरुडें नलगतां क्षण ॥ भृभंगाचा घेतला प्राण ॥ जंबूवृक्षाची शाखा पाहून ॥ वैनतेय बैसला ॥ ८ ॥ तों साठसहस्र वालखिल्यें ॥ तिहीं त्या शाखेसी टांगून घेतलें ॥ अरुणानुजें बळ तुळिलें ॥ तों शाखा विशाळ मोडिली ॥ ९ ॥ शतयोजनें शाखा थोर ॥ पडतां मृत्यु पावतील विप्र ॥ शाखा हातीं मुखीं गजनक्र ॥ कश्यपसुत उडाला ॥ ११० ॥ मग बोले विष्णुवहन ॥ म्हणे मी कोणास जाऊं शरण ॥ शाखा सोडितां ब्राह्मण ॥ साठ सहस्र मरतील ॥ ११ ॥ कश्यप बैसला अनुष्ठानीं ॥ त्यावरी पक्षीं छाया धरिली गगनीं ॥ तो वरुतें पाहे विलोकूनी ॥ तंव सुत संकटीं पडियेला ॥ १२ ॥ तेव्हां कश्यप ऋषीनें प्रार्थून ॥ खालीं उतरविले ब्राह्मण ॥ मग कश्यप म्हणे पुत्रालागून ॥ शाखा येथें न ठेवीं ॥ १३ ॥ या शाखेकारणें पूर्ण ॥ मानव घेतील एकमेकांचा प्राण ॥ मग विहंगोत्तमें शाखा उचलून ॥ लंकागिरीवरी आला ॥ १४ ॥ तिवेंडा पाय त्याचा रुतला ॥ तोच हा त्रिकूटाचल जाहला ॥ गरुडें आहार तेथें घेतला ॥ टाकूनि गेला शाखा तेथें ॥ १५ ॥ त्यावरी मग लंका वसिन्नली ॥ ते सुवर्णशाखा असे तळीं ॥ हनुमंतें लंका जाळिली ॥ मूस ओतली शाखेची ॥ १६ ॥ यालागीं सुवर्णाची लंका ॥ जाहली जाण अयोध्यानायका ॥ तों अर्कज म्हणे मुहूर्त निका ॥ ये समयीं असे पैं ॥ १७ ॥ विजयादशमी नक्षत्र श्रवण ॥ ते दिवशीं निघाला रघुनंदन ॥ पूर्वी रघू हाचि मुहूर्त पाहून ॥ दिग्विज-

५२ कंवडळ. ५३ लोणी. ५४ वाळु. ५५ मृदु. ५६ पांढरा भोपळा. ५७ भगवान विष्णु. ५८ गरुड. ५९ सर्पशत्रु गरुड. ६० या नांवाचा पक्षी. ६१ सूक्ष्म आकृतीचे ६०००० ऋषि. ६२ तिरपा. ६३ सुग्रीव. ६४ चांगला.

यासी गेला होता ॥ १८ ॥ सर्व शुभ योग ते क्षणीं ॥ जयतिथी माळा घेऊनी ॥ दशकंठरिपूचे चरणीं ॥ मिठी घाली तेधवां ॥ १९ ॥ साह्य सुग्रीव किष्किंधेश्वर ॥ उठले अठरा पद्मे वानर ॥ बहात्तर कोटी रीस वीर ॥ त्यांचा नृपवर जांबुवंत ॥ १२० ॥ छप्पन्न कोटी गोलांगूलें ॥ भुभुःकार देती एकचि वेळ ॥ दणाणलें उर्वीमंडळ ॥ धाकें निराळ कांपतसे ॥ २१ ॥ काद्रवेयकुळभूषण तेव्हां ॥ सरसावीत खालती ग्रीवा ॥ यज्ञवराहें दंत बरवा ॥ दृढ धरिला उचलोनी ॥ २२ ॥ कूर्म पृष्ठी सरसावीत ॥ दिग्गज जाहले भयभीत ॥ मंगळजननी कांपत ॥ भुभुःकार कानीं ऐकतां ॥ २३ ॥ वनचर आणि खेचर ॥ भयभीत जाहले थोर ॥ धडके वाद्यांचा गजर ॥ नादें अंबर कोंदलें ॥ २४ ॥ रथारूढ जैसा सहस्रकर ॥ कीं सोपर्ण श्रीकरधर ॥ हनुमंतस्कंधीं रघुवीर ॥ तैसा शोभला ते काळीं ॥ २५ ॥ नंदीवरी बैसे कर्पूरगौर ॥ कीं ऐरावतारूढ सहस्रनेत्र ॥ अंगदस्कंधावरी सौमित्र ॥ त्याचपरी शोभला ॥ २६ ॥ किरणचक्रीं विराजे तमारी ॥ कीं कुळाचळांमाजी कनकाद्री ॥ कीं निजगणांमाजी स्मरारी ॥ तैसा वानरीं राम वेष्टिला ॥ २७ ॥ कीं मंथावया क्षीरसागर ॥ मिळोनि निघाले सुरासुर ॥ तैसेच गर्जत वानर ॥ दक्षिणपंथें चालिले ॥ २८ ॥ विशाल वृक्ष उपडिती ॥ छत्र रामावरी धरिती ॥ वृक्षपल्लव घेऊन हातीं ॥ चवरें वीजिती रामावरी ॥ २९ ॥ दशयोजन रुंद सेना जातां ॥ मार्गी वानर म्हणती रघुनाथा ॥ आजी रावण घालूं पालथा ॥ जनकदुहिता भेटवूं तुम्हां ॥ १३० ॥ एक बोले वानर वीर ॥ मी जाऊन मारीन दशवक्त्र ॥ एक वदे नलगतां क्षणमात्र ॥ मोट बांधून आणीन ॥ ३१ ॥ एक म्हणे स्वामी रघुनंदना ॥ ऐसें वाटतें माझिया मना ॥ रावणाच्या नासिककर्णां ॥ छेदून येईन झडकरी ॥ ३२ ॥ एक म्हणे एकलाचि जाईन ॥ लंका पालथी घालीन ॥ ऐकोनि सुखावे रघुनंदन ॥ म्हणे हे सुरगण अवतरले ॥ ३३ ॥ दक्षिणपंथें भार जात ॥ मार्गी कपी उचलिती पर्वत ॥ कंदुकाऐसे झेलीत ॥ धांवतचि आवेशें ॥ ३४ ॥ समुद्रतीरास आले भार ॥ भुभुःकार देती वानर ॥ तेणें भयभीत नदीश्वर ॥ जाहला परम ते काळीं ॥ ३५ ॥ जैसा वेद बोलत गेला अद्भुत ॥ स्वरूप देखोनि जाहला तटस्थ ॥ तैसे वानरवीर समस्त ॥ समुद्रतीरीं स्थिरावले ॥ ३६ ॥ कीं राजहंसांच्या येऊन हारी ॥ स्थिरावती मानससरोवरीं ॥ तैसे ते समुद्रतीरीं ॥ कपिकेसरी तटस्थ ॥ ३७ ॥ दशयोजनें अद्भुत ॥ सेना उतरली ओतप्रोत ॥ असो लंकेमाजी वृत्तांत ॥ वर्तला तोचि परिसावा ॥ ३८ ॥ कपिसहित अयोध्याविहारी ॥ पातला सागराचे पैलतीरीं ॥ ऐसी ध्वनि लंकेमाझारी ॥ राक्षसेंद्रें आकर्णिली ॥ ३९ ॥ शक्रजितादि सकळ कुमर ॥ प्रहस्तादि प्रधान थोर थोर ॥ त्यांसहित विंशतिनेत्रें ॥ बैसे विचार करावया ॥ १४० ॥ परम सचिंत द्विपंचवदन ॥ म्हणे शत्रु दंदशूक कृशान ॥ हे सर्वथा न म्हणावे लहान ॥ नलगतां क्षण विघ्न करिती ॥ ४१ ॥ तरी सहपरिवारें येऊन ॥ परतीरीं उतरला रघुनंदन ॥ हा आकळे ऐसा मंत्र कोण ॥ विचारूनि सांगा

६५ वानरसैन्य. ६६ शेष. ६७ आकाश. ६८ दुमदुमले. ६९ सूर्य. ७० गरुड. ७१ काळोखाचा शत्रु सूर्य. ७२ मेरुपर्वत. ७३ शंकर. ७४ समुद्र. ७५ रावण. ७६ सर्प. ७७ अग्नि.

आतां ॥ ४२ ॥ एकला येऊनि वानर ॥ जाळून गेला लंकानगर ॥ शुद्धी सांगोनि रामचंद्र ॥ घेऊन आला वेगेंसीं ॥ ४३ ॥ ऐसें बोलतां द्विपंचवदन ॥ सकळ कुमर आणि प्रधान ॥ जाहले परम क्रोधायमान ॥ शस्त्रें तुंळोनि बोलती ॥ ४४ ॥ ते नर वानर आणि ऋक्ष ॥ सहज आले आमुचे भक्ष ॥ कृपाळू आम्हांवरी विरूपाक्ष ॥ तेणेंच धाडोनि दीधले ॥ ४५ ॥ तुम्हीं चिंता न करावी साचार ॥ तुमचे शत्रूचा करूं संहार ॥ आम्ही येऊं नलगतां क्षणमात्र ॥ म्हणोनि शस्त्रें झाडिती ॥ ४६ ॥ शक्रजित अतिकायादि कुमर ॥ देवांतक नरांतक महोदर ॥ धूम्राक्ष वज्रदंष्ट्री असुर ॥ म्हणती नर वानर क्षणें जिंकूं ॥ ४७ ॥ दूर असतां मृंगनायक ॥ मागें निंदा जल्पती जंबुक ॥ कीं मिळोनि बहुत मंडूक ॥ वासुकीसी जिंकूं म्हणती ॥ ४८ ॥ तंव ते सभेमाजी बिभीषण ॥ येता झाला सभा देखोन ॥ जैसा वायससभेंत येऊन ॥ राजहंस बैसला ॥ ४९ ॥ जो विवेकरत्नांचा किरीट ॥ कीं सद्गुणगंगेचा लोट ॥ कीं भाववैरागरींचा सुभट ॥ दिव्य हिरा प्रकाशला ॥ १५० ॥ विवेकभूमीचें निधान ॥ कीं भक्तिसमुद्राचें भरतें पूर्ण ॥ कीं तें परमार्थवनींचें सुमन ॥ अम्लान सुंदर विकासलें ॥ ५१ ॥ असो ऐसा बिभीषण थोर ॥ न्यायसिंधु सत्यसमुद्र ॥ सकळ खळांसी प्रत्युत्तर ॥ देता जाहला ते वेळे ॥ ५२ ॥ म्हणे वाचाळ तुम्ही परम दुर्जन ॥ महाकपटी अंतरमलिन ॥ दशमुखाभोंवते मिळोन ॥ नानाकुतर्क करीतसां ॥ ५३ ॥ यश धैर्य सकळ सद्गुण ॥ सभाग्याची करणी ऐकोन ॥ परम खेद मानिती दुर्जन ॥ नसतें दूषण लाविती ॥ ५४ ॥ परम कुमति जो बळहीन ॥ मागें निंदा जल्पे रात्रंदिन ॥ समरभूमीसी पळे उठोन ॥ हें तों लक्षण श्वानाचें ॥ ५५ ॥ सकळ दळासमवेत ॥ जिंकूं म्हणतां अयोध्यानाथ ॥ तरी येथें एकलाचि हनुमंत ॥ आला होता निजबळें ॥ ५६ ॥ जैसें करतळींचें आचमन ॥ कीं गोवत्सपदींचें जीवन ॥ तैसा ज्याचे दृष्टी समुद्र पूर्ण ॥ लंघोनि क्षणें आला तो ॥ ५७ ॥ तेणें विध्वंसिलें सकळ नगर ॥ रावणसभा नागविली समग्र ॥ कोट्यनुकोटी निशाचर ॥ अशोकवनीं संहारिले ॥ ५८ ॥ राजसुत मारिले समस्त ॥ विवरीं कोंडिला शक्रजित ॥ लंका जाळून अद्भुत ॥ पुरुषार्थ तेणें दाविला ॥ ५९ ॥ ते वेळे तुमचें बळ ॥ काय जाहलें होतें विकळ ॥ आतां रावणाभोंवते सकळ ॥ पुरुषार्थ आपुला सांगतां ॥ १६० ॥ नानापाखंडी दुर्जन यवन ॥ इंहीं वेदांसी ठेविलें दूषण ॥ परी वंदिती कीं विद्वज्जन ॥ ज्ञानसंपन्न धर्मात्मे ॥ ६१ ॥ कमळासी निंदिती दर्दुर[८७] ॥ परी सहसा न विटेचि भ्रमर ॥ चंद्रासी निंदिती तस्कर ॥ परी ते चकोर आनंदती ॥ ६२ ॥ खळ ते निंदिती पंडित ॥ परी कुशल वंदिती समस्त ॥ वायस मुक्तें वोसंडिती ॥ परी मराळें न वीटती ॥ ६३ ॥ मूढासी न कळे कस्तूरी ॥ पंकें म्हणोनि टाकिती दूरी ॥ परी श्रीमंत अहोरात्रीं ॥ हृदयीं शिरीं धरिताती ॥ ६४ ॥ दिवो-

७८ हातीं झेलून. ७९ शंकर. ८० सिंह. ८१ कोल्हे. ८२ कावळ्यांमध्यें. ८३ सद्भावकप चाणींतील. ८४ ठेवा. ८५ सतेज पुष्प. ८६ उदक. ८७ बेडूक. ८८ फेंकून देतात. ८९ हंस. ९० चिखल. ९१ धुवडाला.

भीता नावडे अर्क ॥ परी आनंदती चक्रवाक ॥ अंधें टाकिलें रत्न सुरेख ॥ परी परीक्षक संरक्षिती ॥ ६५ ॥ तैसा जगद्वंद्य रघुवीर ॥ जयासी हृदयीं ध्याय उमावर ॥ कमलोद्भव सहस्रनेत्र ॥ सहस्रवक्त्र स्तवी जया ॥ ६६ ॥ सनकादिक हृदयीं ध्याती ॥ जो वेदउदयाचळींचा गभस्ती ॥ तो हा पुराणपुरुष आला व्यक्ती ॥ मूळप्रकृतीसमवेत ॥ ६७ ॥ ब्रह्मांडनगरस्तंभ अद्भुत ॥ मायाचक्रचाळक शाश्वत ॥ दशरथाचा पुण्यपर्वत ॥ श्रीरामरूपें प्रगटला ॥ ६८ ॥ तैसा वेदवंद्य रघुवीर ॥ त्यासी तुम्ही निंदितां पामर ॥ रावणासी झोंबला कामविखार ॥ भुलला साचार म्हणोनि ॥ ६९ ॥ कार्तवीर्याचे बंदीं जाऊन ॥ पडिला होता द्विपंचवदन ॥ परम पुरुषार्थी सहस्रार्जुन ॥ भृगुनंदनें वधिलें त्यासी ॥ १७० ॥ जो क्षत्रियांतक प्रळयरुद्र ॥ त्यास जिंकी हा रामचंद्र ॥ मतिहीन झाला विंशतिनेत्र ॥ नोळखे स्वरूप तयाचें ॥ ७१ ॥ वनचर न होती द्रुमपर्णी ॥ अवघे अवतरले सुधापानी ॥ अजून तरी हें मनीं जाणोनी ॥ जानकी द्यावी रामचंद्रा ॥ ७२ ॥ चंड कोदंड अद्भुत ॥ रावणासी नुचले जड बहुत ॥ तें दुखंड करी रघुनाथ ॥ सकळ रायांदेखतां ॥ ७३ ॥ यालागीं सागरपैलपारीं ॥ रामचंद्र जों आहे दूरी ॥ तों मंगळजननीची कुमरी ॥ राघवेंद्रा समर्पावी ॥ ७४ ॥ ऊर्मिलाजीवनाचीं चापरेखा ॥ नुलंघवेचि तुज दशमुखा ॥ यालागीं त्रिभुवननायका ॥ जानकी नेऊन भेटवीं ॥ ७५ ॥ जानकीस भेटवा रघुनंदन ॥ बंदीचे सोडावे सुरगण ॥ मग चंद्रार्कवरी कल्याण ॥ पुत्रपौत्रीं नांदसी ॥ ७६ ॥ माझीं वचनें वाटती कठीण ॥ परी पुढें गोड अमृताहून ॥ औषध आधीं कटुवट पूर्ण ॥ परी रोगहरण पुढें करी ॥ ७७ ॥ गोड अत्यंत नावडी साखर ॥ मुखीं घालितां कडकड फार ॥ परी गोडी ते अपार ॥ तैसीं साचार वचनें माझीं ॥ ७८ ॥ तुरट वाटे आमलक ॥ परी पुढें गोडी दे अधिक ॥ तैसीं माझीं वचनें दुःखमोचक ॥ हृदयीं धरीं दशकंधरा ॥ ७९ ॥ पिता पढवी पुत्रालागून ॥ त्यास वाटे विषासमान ॥ परी पुढें गोड सुधेहून ॥ महिमा पूर्ण वाढे जेव्हां ॥ १८० ॥ अशुभ चिन्हें अत्यंत ॥ लंकेमाजी होती बहुत ॥ क्षणक्षणां उल्कापात ॥ नभ थरथरतें वाटतसे ॥ ८१ ॥ जलदजाल नसे किंचित ॥ रुधिरधारा मेघ वर्षत ॥ दुष्ट स्वप्नें अत्यंत ॥ मंदोदरीस जाणवती ॥ ८२ ॥ विगतधवा स्त्रिया येऊन ॥ ओंटी भरिती मृत्तिका घेऊन ॥ मंगळसूत्र तोडून ॥ कृष्णवस्त्र पुरुष नेतसे ॥ ८३ ॥ यालागीं दशवदना तूं सज्ञान ॥ टाकिलीं वेदांचीं खंडें करून ॥ तरी जाणत जाणतां कृशानु ॥ पदरीं कैसा बांधिसी ॥ ८४ ॥ समजोनियां विष दारुण ॥ कां करावें बळें प्राशन ॥ दंदशूक ओळखून ॥ मग कां उशीं करावा ॥ ८५ ॥ खदिरांगार जाणोन ॥ मग कां वरी करावें शयन ॥ उदरीं पाषाण बांधोन ॥ महाडोहीं कां निघावें ॥ ८६ ॥ ऐसें बोलतां बिभीषण ॥ तटस्थ जाहले सभाजन ॥ क्रोधें व्याप्त रावण ॥ मौन धरून उगाचि

९२ सूर्य. ९३ शोष. ९४ अवतरला, साकार झाला. ९५ माकडें. ९६ वृक्ष उपटून हातांत घेणारे. ९७ देव. ९८ शिवधनुष्य. ९९ पृथ्वीची. १०० लक्ष्मणाची. १ धनुष्यानें केलेली रेघ. २ खडीसाखर. ३ मांचळा. ४ तारे पडणें. ५ अग्नि. ६ सर्प.

॥ ८७ ॥ बिभीषणासी म्हणे प्रहस्त ॥ उगेच बैसा हो निश्चित ॥ सभेंत बोलतां अनुचित ॥ मृत्यु पावाल निर्धारें ॥ ८८ ॥ तुम्हीं राजबंधु म्हणवितां जाण ॥ परी शतमूर्खांहूनि बुद्धिहीन ॥ तुम्हांस नाहीं चातुर्यज्ञान ॥ तरी उठोन गृहा जावें ॥ ८९ ॥ सक्रोध बोले इंद्रजित ॥ तूं अनुचित बोललासी सभेंत ॥ तुज आतांचि वधितों यथार्थ ॥ परी पितृव्य म्हणोनि शंकलों ॥ १९० ॥ शक्रजित म्हणे दशमुखा ॥ हा तुमचा बंधु सखा ॥ परी हा शत्रूचा पक्षपाती देखा ॥ अनर्थकारक दिसतसे ॥ ९१ ॥ बिभीषण म्हणे तूं चांडाळ ॥ महाकपटी कृतघ्न खळ ॥ तुमचे संगतीनें भूपाळ ॥ मतिमंद जाहला ॥ ९२ ॥ अंकुशें आकर्षिजे वारण ॥ भुजंग आकळिजे मंत्रेंकरून ॥ राजमती आकळिती प्रधान ॥ परम सज्ञान चतुर जे ॥ ९३ ॥ माजला अत्यंत कृशान ॥ तों विझविजे जळेंकरून ॥ कीं क्रोधोर्मी अति दारुण ॥ सद्विवेकें आकर्षिजे ॥ ९४ ॥ नृपें करितां अनुचित करणी ॥ तत्काळ आवरिजे प्रधानीं ॥ परी तुम्ही अवघे पापखाणी ॥ निर्दय आणि कृतघ्न ॥ ९५ ॥ राजा आधींच अत्यंत खळ ॥ प्रधान मिळाला अमंगळ ॥ मग अविवेक वाढे प्रबळ ॥ कुबुद्धिकल्लोळ उठती पैं ॥ ९६ ॥ शंख करावयाची हौस गहन ॥ त्यांत पातला मास फाल्गुन ॥ कीं स्त्रीराज्यांतील पारिपत्य पूर्ण ॥ जारासी प्राप्त जाहलें ॥ ९७ ॥ आधींच चाहाड तस्कर ॥ त्यावरी पाठिराखा नृपवर ॥ कीं उन्मत्तासी सरोवर ॥ प्राप्त जाहलें मद्याचें ॥ ९८ ॥ तैसा कुबुद्धीनें वेष्टिला दशवदन ॥ तैसेच तुम्ही मिळालां प्रधान ॥ जैसें वृकाच्यां सदनीं श्वान ॥ कारभारी जाहलें ॥ ९९ ॥ अरे तुझें मरण आलें जवळी ॥ म्हणोनि आणिली जनकबाळी ॥ अयोध्याप्रभु प्रतापबळी ॥ आला निकट काळ तुझा ॥ २०० ॥ रावणें अनुचित कर्म मांडिलें ॥ म्हणोनि मातेनें मज प्रेरिलें ॥ यालागीं तुम्हांतें बोलिलें ॥ मनीं धराल म्हणोनी ॥ १ ॥ परी होणार बळिवंत ॥ तुम्ही नायकाचि उन्मत्त ॥ सीता न द्याल तरी निश्चित ॥ कुलक्षय होईल तुमचा ॥ २ ॥ ऐसें ऐकतां रावण ॥ क्रोधें व्यापिला परिपूर्ण ॥ बिभीषणावरी शस्त्र घेऊन ॥ परम आवेशें धांविन्नला ॥ ३ ॥ बिभीषण केवळ परम भक्त ॥ तयासी रक्षिता रघुनाथ ॥ तों रावणाचा उपटला हात ॥ शस्त्र पडलें धरेवरी ॥ ४ ॥ मागुता धांवे रावण ॥ इंद्रजितें धरिला आवरून ॥ मग झाडिला वाम चरण ॥ तो लागला बिभीषणासी ॥ ५ ॥ बिभीषण केवळ शांत ॥ निर्मत्सर भेदरहित ॥ रावणासी मागुती म्हणत ॥ सखा रघुनाथ करीं कां रे ॥ ६ ॥ बिभीषण क्षमाशील पूर्ण ॥ वानिती सकळ राक्षसगण ॥ तों माता कैकसी येऊन ॥ सांगे हित बिभीषणा ॥ ७ ॥ म्हणे पुत्रासी तूं ऊठ आतां ॥ शरण जाईं रघुनाथा ॥ जो वज्रपंजरें शरणागता ॥ भवव्यथा वारील तो ॥ ८ ॥ माझे उदरा आलासी साचार ॥ तरी करीं माझा उद्धार ॥ तनुमनधनेंसीं सत्वर ॥ शरण जाईं रघुवीरा ॥ ९ ॥ सांडोनि सकळ मायाचिंता ॥ शरण जावें जानकीनाथा ॥ रावणें क्षय केला तत्त्वतां ॥ तूं जाईं परता येथूनि ॥ २१० ॥ जे बळेंचि विष भक्षिती ॥ शाहाणे न

७ चुलता. ८ लांडग्याच्या. ९ कुत्रा. १० वज्राचा पिंजरा.

बैसती त्यांचे पंक्ती ॥ तरी तूं सखा करीं रघुपती ॥ नाश कल्पांतीं नव्हे तूतें ॥ ११ ॥ ऐकोनि मातेचें वचन ॥ बिभीषणें केलें साष्टांग नमन ॥ घेऊनि चौघे प्रधान ॥ उभा ठाकला ते काळीं ॥ १२ ॥ रावणासी म्हणे बिभीषण ॥ मी श्रीरामासी जातों शरण ॥ तूं ज्येष्ठ बंधु म्हणोन ॥ पुसतों तुज मागुती ॥ १३ ॥ ऐसें बोलोनि त्वरित ॥ बिभीषण उडाला अकस्मात ॥ चौघां प्रधानांसमवेत ॥ सर्वां-देखतां ते काळीं ॥ १४ ॥ जैसें कलेवर[11] सांडून ॥ एकदांच निघती पंचप्राण ॥ कीं पांचही दिवाकर[12] मिळोन ॥ अस्ताचळावरी चालिले ॥ १५ ॥ कीं कल्पांतीं पंचमहाभूतें ॥ जाती स्वरूपास[13] मिळावयातें ॥ तैसे शरण जनकजापतीतें ॥ पांचही जाती त्वरेनें ॥ १६ ॥ श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ हाचि केवळ रामेश्वर ॥ आवडीच्या कावडी भरोनि सत्वर ॥ सद्भक्त नर घांवती ॥ १७ ॥ भावप्रयागींचें प्रेमोदक ॥ जे या रामेश्वरावरी करिती अभिषेक ॥ त्यांचे मनोरथ अयोध्यानायक ॥ सत्य परिपूर्ण करील ॥ १८ ॥ अयोध्याधीशा ब्रह्मानंदा ॥ श्रीधरवरदा वेदवंद्या ॥ छेदोनियां अविद्याभेदा ॥ अभंग[14] पदा देशी कीं ॥ १९ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत पंडित चतुर ॥ द्वाविंशतितमाध्याय गोड हा ॥ २२० ॥ अध्याय ॥ २२ ॥ ओंव्या ॥ २२० ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥ ॥ ७ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

११ शरीर. १२ सूर्य. १३ आत्मतत्त्वास. १४ कायमचें, शाश्वत.


२३
गोलेवडेकर

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ दुर्धर अहंकारदशानन ॥ अहंदेहबुद्धि लंका गहन ॥ तेथें वास्तव्य अनुदिन ॥ क्रोध कुंभकर्ण बंधू सखा ॥ १ ॥ अनर्थकारक काम इंद्रजित ॥ मद हा मुख्य प्रधान प्रहस्त ॥ मत्सर दंभ ते निश्चित ॥ देवांतक नरांतक पैं ॥ २ ॥ शोक मोह आणि अनर्थ ॥ भेदवादी असुर बहुत ॥ खळ कुटिल कुतर्क समस्त ॥ देहलंकेंत दुमदुमती ॥ ३ ॥ यांचे बळें माजोनि रावण ॥ बंदीं घातले सुरगण ॥ आदिदैवत अध्यात्म होऊन ॥ देहलंकेत बंदीं पडलें ॥ ४ ॥ रमेश तो अंतःकरण ॥ रमाबंधू तोचि मन ॥ बुद्धि विरिंचि चित्त नारायण ॥ रावणें बंदीं घातलीं ॥ ५ ॥ चक्षूच्या ठायीं सूर्यनारायण ॥ रसना ते रसनायक वरुण ॥ अश्विनौ देव दोघे घ्राणें ॥ रावणें बंदीं घातले ॥ ६ ॥ वाचा केवळ वैश्वानर ॥ पाणी ते जाण पुरंदर ॥ असो देव आकळोनि समग्र ॥ सेवक करूनि रक्षिले ॥ ७ ॥ मायामृग छेदावयालागून ॥ निरंजनीं प्रवेशे रघुनंदन ॥ कापट्यशब्द उठवून ॥ विवेकलक्ष्मण दवडिला ॥ ८ ॥ सद्बुद्धिजानकीचें हरण ॥ अहंकारें केलें न लागतां क्षण ॥ अहंदेह लंकेंत आणून ॥ दुराचारें कोंडिलें ॥ ९ ॥ मग धांविन्नला वैराग्यहनुमंत ॥ तेणें देहलंका जाळून समस्त ॥ कामक्रोधादि राक्षसांसहित ॥ अहंलंकानाथ गांजिला ॥ १० ॥ सद्बुद्धीचें करून समाधान ॥ घेऊन आला रघुनंदन ॥ तो केवळ सद्भावबिभीषण ॥ रावणें त्रासिला सभास्थानीं ॥ ११ ॥ आत्माराम सद्गुरु पूर्ण ॥ त्यास शरण चालिला बिभीषण ॥ बाविसावे अध्यायीं जाण ॥ हेंचि कथन सांगीतलें ॥ १२ ॥ देखोनि वायसांचा मेळ ॥ त्रासोनि निघे मराळ ॥ कीं देखोनि दुष्ट निंदक खळ ॥ साधू उठे तेथोनियां ॥ १३ ॥ तैसा प्रधानांसह बिभीषण ॥ ऊर्ध्वपंथें क्रमीत गगन ॥ भवसिंधू उल्लंघोनि चरण ॥ गुणसिंधूचे पाहूं इच्छी ॥ १४ ॥ हिरण्यकशिपूनें गांजिला प्रल्हाद ॥ तेणें हृदयीं धरिला मुकुंद ॥ तैसाचि जानकीहृदयमिलिंद ॥ बिभीषणें जवळ केला पैं ॥ १५ ॥ वानर अंतरिक्षें विलोकिती ॥ तों पांचही असुर उतरले क्षितीं ॥ सेनाप्रदेशीं उभे राहती ॥ हस्त जोडुनि तेधवां ॥ १६ ॥ कित्येक धांवले वानरगण ॥ घेऊनियां वृक्ष पाषाण ॥ तों बिभीषण म्हणे मी तुम्हांसी शरण ॥ दावा चरण रघुपतीचे ॥ १७ ॥ रावणबंधू मी बिभीषण ॥ तेणें अपमानिलें मजलागून ॥ आलों सीतावल्लभासी शरण ॥ त्याचे चरण मज दावा ॥ १८ ॥ जे सनकादिकांची ध्येय मूर्ती ॥ नारदादि गाती ज्याची कीर्ती ॥ तो ब्रह्मानंद अयोध्यापती ॥ त्याचे चरण मज दावा ॥ १९ ॥ जें निगमवल्लीचें पक्व फळ पूर्ण ॥ जो विषकंठमनमांदुसरत्न ॥ जें पद्मोद्भवाचें देवतार्चन ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २० ॥ प्रतापमित्र रघुनंदन ॥ जो अरिचक्रवारणपंचानन ॥ जो खरदूषणप्राणहरण ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २१ ॥ वेदांती म्हणती परब्रह्म ॥ अज अजित पूर्णकाम ॥ तोचि हा दशरथात्मज राम ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २२ ॥ व्याकरणकार शब्द साधिती ॥ त्याच्या नामाचे अनेक अर्थ करिती ॥ तोचि हा मंगळभगिनीचा पती ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २३ ॥ पातंजल योग साधून ॥ योगी

१ चंद्र. २ नाकपुड्या. ३ अग्नि. ४ हात. ५ अहंकाररूप रावण. ६ राजहंस. ७ जानकीच्या हृदयरूप कमलावरील भ्रमर रामचंद्र. ८ वेदरूपी वेलीचें. ९ महादेवाच्या मनोरूपी पेटींतील रत्न. १० ब्रह्मदेवाचें.

पावती निरंजनें[11] ॥ तोचि हा चंडकिरणकुळभूषण[12] ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २४ ॥ प्रकृति पुरुष सांगत ॥ सांख्यशास्त्र असे गर्जत ॥ तोचि हा जानकीनाथ ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २५ ॥ नैयायिक म्हणती कर्ता ईश्वर ॥ जीवासी न कळे त्याचा पार ॥ तो हा अजराजपुत्रकुमर ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २६ ॥ मीमांसक स्थापिती कर्म ॥ कर्माचरणें पाविजे परब्रह्म ॥ तो परात्पर विश्रांतिधाम ॥ त्याचे चरण मज दावा ॥ २७ ॥ ऐसीं बिभीषणाचीं शब्दरत्नें ॥ कीं तीं भक्तिनभींचीं उडुगणें ॥ कीं तीं वैराग्यवल्लीचीं सुमनें ॥ प्रेम-सुवासें विकासती ॥ २८ ॥ श्रीरामसुग्रीवांसी जाऊन ॥ कित्येक सांगती वर्तमान ॥ चौघां प्रधानांसह शरण ॥ राक्षस एक आला असे ॥ २९ ॥ आपुला ज्येष्ठ बंधू रावण ॥ आपुलें नाम सांगे बिभीषण ॥ ऐसें ऐकतां जानकीजीवन ॥ सुग्रीवाकडे पाहात ॥ ३० ॥ तों अर्कज[13] बोले उत्तर ॥ वरी भाविक दिसतो निशाचर ॥ परी नोळखतां तयाचें अंतर ॥ जवळी सहसा ठेवूं नये ॥ ३१ ॥ दिवाभीतांची[14] सेवा करून ॥ कार्गे लाविला जैसा अग्न ॥ तैसा जरी गेला करून ॥ तरी मग काय विचार ॥ ३२ ॥ जांबुवंत म्हणे मारूनि वाळी ॥ किष्किंधा तुम्हीं सुग्रीवा दिधली ॥ हे कीर्ति ऐकोनि तत्काळीं ॥ शरण आला तुम्हांतें ॥ ३३ ॥ मारूनियां रावणा ॥ लंकाराज्य द्यावें आपणा ॥ हेचि मनीं धरूनि वासना ॥ शरण आला तुम्हांतें ॥ ३४ ॥ सुषेण म्हणे समय कठिण ॥ देखोनि साह्य करिती बंधुजन ॥ हा रावणासी सोडून आला शरण ॥ हेंच नवल वाटतें ॥ ३५ ॥ बहु तर्क बहु विचार ॥ करिते झाले तेव्हां वानर ॥ मग तो शेवटीं रुद्रावतार ॥ निश्चयवचन बोलिला ॥ ३६ ॥ लंकेंत शोधितां जनककुमारी ॥ मी प्रवेशलों याचे मंदिरीं ॥ महासाधू निष्कपट अंतरीं ॥ तेच समयीं ओळखिला ॥ ३७ ॥ वरी तुम्हांस दिसतो राक्षस ॥ परी अंतरीं प्रेमळ निर्दोष ॥ कंटकमय दिसतो फणस ॥ परी अंतरीं सुरस जैसा ॥ ३८ ॥ शरणागतांसी वज्रपंजर[15] ॥ रामा तुझें ब्रीद साचार ॥ जवळी बोलावून असुर ॥ अभय तयातें देइंजे ॥ ३९॥ इतर शास्त्रांचे बोल बहुत ॥ एका वचनें दावी वेदांत ॥ तैसें बोलिला हनुमंत ॥ तेंच समस्तां मानलें ॥ ४० ॥ अंगदासी भूसंकेत ॥ दावीत तेव्हां ताराकांत[16] ॥ बिभीषणास आणावया त्वरित ॥ येरू निघाला वायुवेगें ॥ ४१ ॥ बिभीषणासी म्हणे वाळिपुत्र ॥ उदेला तुझा भाग्यमित्र ॥ तुज पाचारितो स्मरारिमित्र[17] ॥ राजीवनेत्रें[18] अजित जो ॥ ४२ ॥ बिभीषणाचा धरूनि हस्त ॥ रामाजवळी आला तारासुत ॥ जेवीं साधकासी[19] सद्विवेक दावीत ॥ स्वरूपनिर्धार निश्चयें ॥ ४३ ॥ असो बिभीषणें पाहिला श्रीराम ॥ जो चराचरफलां-कितद्रुम ॥ जयजयकार करून परम ॥ लोटांगण घातलें ॥ ४४ ॥ दृष्टीं पाहूनि श्रीरामचंद्र ॥ उचंबळे बिभीषणभाव समुद्र ॥ प्रेमाचें भरतें अपार ॥ दाटतें झालें तेधवां ॥ ४५ ॥ श्रीरामचरणारविंदसुगंध ॥ तेथें बिभीषण जाहला मिलिंद[20] ॥ अष्टभावें होऊन सद्गद ॥ आनंदमय जाहला ॥ ४६ ॥ रामचरणीं ठेवितां मस्तक ॥ संतोषोनि ब्रह्मांडनायक ॥ शिरीं ठेविला वरद हस्त ॥ अक्षय कल्याण-

११ मायातीत परमात्मा. १२ सूर्यकुलाचें भूषण असा ( राम ). १३ सुग्रीव. १४ घुबडांची. १५ वज्ररूपी पिंजरा. १६ रामचंद्र. १७ कमलाक्ष. १८ मुमुक्षूला. १९ भ्रमर.

दायक जो ॥ ४७ ॥ म्हणे जोंवरी शैंशी आणि तैंरणी ॥ जोंवरी रामकथा आणि धरणी ॥ तोंवरी राज्य करीं लंकाभुवनीं ॥ बळी-ध्रुवांसारिखें ॥ ४८ ॥ जेवीं चिरंजीव वायुनंदन ॥ त्याचपरी राहें तूं बिभीषण ॥ कळिकाळा तोडैंरीं बांधोन ॥ लंकेंत सुखें नांदें कां ॥ ४९ ॥ ऐसा आशीर्वाद देऊन ॥ रामें उठविला बिभीषण ॥ सप्रेम दिधलें आलिंगन ॥ वानरगण आनंदले ॥ ५० ॥ मग सौमित्र आणि अष्ट दिक्पती ॥ तेही बिभीषणासी भेटती ॥ पुष्पवर्षाव करिती ॥ वृंदारैंक तेधवां ॥ ५१ ॥ मग बिभीषण जोडूनि कर ॥ उभा राहिला श्रीरामासमोर ॥ म्हणे जय जय राम करुणासमुद्र ॥ जगदुद्धारा दीनबंधो ॥ ५२ ॥ जय जय राम कमळपत्राक्षा ॥ हे ताटि-कांतका सर्वसाक्षा ॥ मखपाळका निर्विकल्पवृक्षा ॥ कर्माध्यक्षा कर्ममोचका ॥ ५३ ॥ जय राम चंडीशैंकोदंडभंजना ॥ हे राम दशकंठदर्प-हरणा ॥ हे राम विषकंठदाहशमना ॥ भक्तरंजना जगद्वंद्या ॥ ५४ ॥ हे राम पैंद्मजातजनका ॥ हे राम विबुधबंधच्छेदका ॥ हे राम दुष्टअसुरांतका ॥ सहस्रमुखा न वर्णवेचि ॥ ५५ ॥ ऐसी बिभीषणें करितां स्तुती ॥ मग तयासी हातीं धरूनि सीतापती ॥ आपणा-जवळी बैसवी प्रीतीं ॥ बहुत मान देऊनियां ॥ ५६ ॥ संतोषोनि बोले रघुनंदन ॥ आमुचा पांचवा बंधू बिभीषण ॥ वानर म्हणती धन्य धन्य ॥ भाग्य रावणानुजाचें ॥ ५७ ॥ मग चतुःसमुद्रींचीं उदकें आणुनी ॥ बिभीषणासी रामें बैसवूनी ॥ लंकापति हा म्हणूनी ॥ अभिषेक केला यथाविधि ॥ ५८ ॥ लंकानगरींचा नृप पूर्ण ॥ येथून अक्षयी बिभीषण ॥ यावरी लोकप्राणैंशनंदन ॥ काय करिता जाहला ॥ ५९ ॥ वाळूची लंका विशाळ केली ॥ कपींचीं किरैंणें बाहेर पडलीं ॥ ते बिभीषणाजवळी गहाण ठेविली ॥ राघवेंद्रें तेधवां ॥ ६० ॥ माझ्या हनुमंताच्या लंकेवरून ॥ ते लंका सांडीन ओंवाळून ॥ परम प्रीतीं सीताजीवन ॥ लंका विलोकी मारुतीची ॥ ६१ ॥ असो यावरी बिभीषणाप्रती ॥ विचारीत जनकजापती ॥ म्हणे सागर तरावया निश्चितीं ॥ काय उपाय करावा ॥ ६२ ॥ यावरी बोले बिभीषण ॥ सागराची पूजा करून ॥ मागावा मार्ग प्रार्थून ॥ वानरदळ उतरावया ॥ ६३ ॥ मग समुद्रतीरीं रघुनंदन ॥ बैसला दर्भासन घालून ॥ पूजा सागरीं समर्पून ॥ मित्रकुळभूषण मार्ग मागे ॥ ६४ ॥ फळ तोय वर्जूनि समस्त ॥ निरा-हार बैसला सीताकांत ॥ हिमाचळीं हिमनगजामात ॥ तप करी जयापरी ॥ ६५ ॥ तों तेथें रावणाचा हेर[२८] ॥ शार्दूळनामा होता असुर ॥ लंकापतीपुढें जाऊन सत्वर ॥ वार्ता सांगे ते काळीं ॥ ६६ ॥ म्हणे कमळिणीप्रियैंकुळभूषण ॥ अगाध वानरसमुदाय घेऊन ॥ प्रतापसिंधू रघुनंदन ॥ जळसिंधुतीरीं राहिला ॥ ६७ ॥ ऐसा समाचार ऐकतां साचार ॥ चिंतेनें व्यापिला दशकंधर ॥ मग शुकनामें असुर ॥ दशकंधर त्यासी सांगे ॥ ६८ ॥ तूं आमुचा बंधू होसी ॥ जाऊन सांग सुग्रीवासी ॥ तुज काय कारण सीतेसीं ॥ परतोन जाईं माघारा ॥ ६९ ॥ मग तो शुक शुकैंरूप जाहला ॥ क्षणें सिंधु उल्लंघूनि आला ॥ अंतरिक्षीं उभा राहिला ॥ बोलों लागला धीटपणें

२० चंद्र. २१ सूर्य. २२ पायांखालीं तुडवून. २३ देव. २४ महादेवाचें धनुष्य मोडणाऱ्या. २५ ब्रह्मदेवाचा बाप. २६ मारुती. २७ झुंडी. २८ दूत. २९ श्रीराम. ३० पोपटाच्या रूपाचा.

॥ ७० ॥ म्हणे मज पाठविलें रावणें ॥ वानरेश्वरा[३१] तूं ऐक वचनें ॥ तुवां शीघ्र परतोन जाणें ॥ मर्कटसेना घेऊनियां ॥ ७१ ॥ आम्हीं जानकी आणिली हिरून ॥ तरी तुम्हांसी यावया काय कारण ॥ व्यर्थ वेंचूं नका प्राण ॥ जावें परतोन किष्किंधे ॥ ७२ ॥ जरी तुम्ही न जाल परतोन ॥ तरी मी शुक स्वकर्मेंकरून ॥ तुमचीं शिरकमळें छेदून ॥ नेईन आतां लंकेसी ॥ ७३ ॥ ऐसें बोलतां शुक निशाचर ॥ परम क्रोधावले वानर ॥ बहुत घांविन्नले वीर ॥ आसड्डन[३२] खालीं पाडिला ॥ ७४ ॥ बहुत मिळोनी कुंजर[३३] ॥ ताडिती जैसें एक मार्जार ॥ पाणिप्रहारें तैसा असुर ॥ वानरवीरीं ताडिला ॥ ७५ ॥ परम कासावीस होऊन ॥ म्हणे मज राघवा सोडवीं येथून ॥ कृपासागर रघुनंदन ॥ पाहे विलोकून त्याकडे ॥ ७६ ॥ सुमित्रासुत[३४] म्हणे सोडा सत्वर ॥ तत्काळ मुक्त करिती वानर ॥ सर्वांचि गगनीं उडोनि असुर ॥ मागुती बोले निंद्योत्तरें ॥ ७७ ॥ म्हणे येथून जाईं तूं किष्किंधापती ॥ न धरीं रामाची संगती ॥ जैसा देवांचे बुद्धीं छळितां उमापती ॥ पुष्पचाप[३५] भस्म झाला ॥ ७८ ॥ तुम्हांसी मारावया देख ॥ घेऊन आला रघुनायक ॥ तुम्ही वानर शतमूर्ख ॥ नेणा हित आपुलें ॥ ७९ ॥ ऋषभ म्हणे रे शुका ॥ दुर्बुद्धि मलिना मशका ॥ जाऊनि सांगें दशमुखा ॥ जनकात्मजा सोडीं वेगीं ॥ ८० ॥ तूं आमुचा शत्रु साचार ॥ तुज वधावया आला रघुवीर ॥ तुझीं दाही शिरें छेदून सत्वर ॥ बळी देईल दश दिशां ॥ ८१ ॥ शुक म्हणे सीता गोरटी ॥ पुन्हां न पडे तुमचे दृष्टी ॥ मार्कट हो व्यर्थ कष्टी ॥ कासया होतां उगेचि ॥ ८२ ॥ ऐसें ऐकतां वालिनंदन[३६] ॥ म्हणे धरा धरा मागुतेन ॥ तों तत्काळ वानरीं आसड्डन[३३] ॥ केलें ताडण ते वेळां ॥ ८३ ॥ मग कर चरण बांधोन ॥ शुक ठेविला रक्षून ॥ असो इकडे रघुनंदन ॥ समुद्रासीं मार्ग मागे ॥ ८४ ॥ तीन दिवसपर्यंत ॥ गुणसमुद्र रघुनाथ ॥ समुद्राची वाट पाहात ॥ परी तो उन्मत्त सर्वदा ॥ ८५ ॥ परम क्षोभला रघुनाथ ॥ म्हणे हा समय न ओळखे यथार्थ ॥ यास मीं मान दिधला बहुत ॥ सगरनिर्मित[३७] म्हणोनियां ॥ ८६ ॥ लवणजळविषेंकरून ॥ सर्प हा पसरला लंबायमान ॥ आतां यावरी बाणसुपर्ण[३८] ॥ सोडितां भक्षील क्षणार्धें ॥ ८७ ॥ माझा बाण वडवानळ ॥ क्षणें शोषिल समुद्रजळ ॥ जैसें ज्ञान प्रवेशतां सकळ ॥ अज्ञान जाय निरसोनियां ॥ ८८ ॥ कीं माझा बाण कलशोद्भवे[३९] ॥ क्षणें शोषील जलार्णव ॥ सूर्य उगवतां तम सर्व ॥ जाय जैसें निरसूनी ॥ ८९ ॥ मागुती क्षण एक वाट पाहून ॥ उभा ठाकला रघुनंदन ॥ धनुष्यावरी योजिला बाण ॥ अर्ध क्षण न लागतां ॥ ९० ॥ बाणाचे मुखीं ब्रह्मास्त्र ॥ स्थापिता जाहला राजीवनेत्र ॥ कीं क्षोभला प्रळयरुद्र ॥ अक्षय सागर देखतां ॥ ९१ ॥ आकर्ण चाप ओढितां प्रचंड ॥ भयें तडाडी विरिंचि[४०]-अंड ॥ जळचरें खेचरें उदंड ॥ मूर्च्छना येऊन पडियेलीं ॥ ९२ ॥ निशा संपतां समग्र ॥ उदयाद्रीवरी ये मित्रचक्र[४१] ॥ तैसा दिव्यरूप समुद्र ॥ सरितांसहित प्रगटला ॥ ९३ ॥ यागीं होतां पूर्णाहुती ॥ तत्काळ प्रगटे आराध्यमूर्ती ॥ तैसा प्रगटला

३१ सुग्रीवा. ३२ ओढून. ३३ हत्ती. ३४ लक्ष्मण. ३५ मदन. ३६ अंगद. ३७ सगरराजाच्या पुत्रांनीं निर्माण केलेला. ३८ बाणरूपी गरुड. ३९ अगस्ति मुनि. ४० ब्रह्मांड. ४१ सूर्य.

सरितापतीं ॥ परिवारेंसी तेधवां ॥ ९४ ॥ वंदूनियां रघुवीरचरणां ॥ म्हणे राजीवाक्षा रघुनंदना ॥ स्मरारिमित्रा आनंदसदना ॥ जानकीजीवना रघुपते ॥ ९५ ॥ तूं कृपासमुद्र रघुवीर ॥ कां हे लहरी आली क्रूर ॥ माझा अन्याय नसतां शर ॥ धनुष्यावरी घातला ॥ ९६ ॥ माझा स्वभाव रघुनंदना ॥ सर्वदाही करावी गर्जना ॥ तुजसीं गर्व गर्वहरणा ॥ सर्वथाही केला नाहीं ॥ ९७ ॥ मग म्हणे रघुनंदन ॥ म्यां शरासनीं योजिला बाण ॥ पुन्हां काढितां न ये पूर्ण ॥ यासी कारण सांग कांहीं ॥ ९८ ॥ यावरी बोले सरितानाथ ॥ पश्चिमेस असे मरु दैत्य ॥ तो माझीं जळचरें भक्षीत ॥ सदा पीडितो गोब्राह्मणां ॥ ९९ ॥ त्यावरी टाकूनियां बाण ॥ मरूचा तत्काळ घ्यावा जी प्राण ॥ तों शर गेला न लागतां क्षण ॥ कल्पांतचपलेसारिखा ॥ १०० ॥ जळीं जीव वधितां मरु दैत्य ॥ शिर छेदलें अकस्मात ॥ जीवेंन शोषिलें तेथें बहुत ॥ मारवाडदेश वसिन्नला ॥ १ ॥ अद्यापि तिकडे अल्प जळ ॥ परी वृक्षवली सदा सुफळ ॥ असो सागरें तमालनीळ ॥ जामात म्हणोनि पूजिला ॥ २ ॥ मग सर्व पूजा आणून ॥ घनश्यामगात्र रघुनंदन ॥ अर्पणेंवरांचें मनरंजन ॥ हर्षें पूजी श्रीरामचंद्रा ॥ ३ ॥ दिव्यालंकार दिव्य वस्त्रें ॥ अमोलिक रत्नें प्रभाकरें ॥ राघवापुढें नदीश्वरें ॥ समर्पिलीं ते काळीं ॥ ४ ॥ सागर म्हणे अयोध्यानाथा ॥ वस्त्रें भूषणें लेई समर्था ॥ नृपास वल्कलें तत्त्वतां ॥ रिपुसन्मुख योग्य नव्हे ॥ ५ ॥ अयोध्यानाथा नृपवरा ॥ करूनि यांच्या अंगीकारा ॥ मग समरंगणीं दशकंधरा ॥ खंड विखंड करावें ॥ ६ ॥ बैसावया दिव्य रथ ॥ समरीं पाठवील शचीनाथ ॥ वानर सुग्रीवादि समस्त ॥ विनविती तेव्हां रघूत्तमा ॥ ७ ॥ स्वामी आम्हां समस्तांचे मनीं ॥ वस्त्रें भूषणें घ्यावीं ये क्षणीं ॥ भक्तवचनें चापपाणी ॥ मानिता जाहला ते वेळे ॥ ८ ॥ कल्पांतचपळेसमान ॥ राघव नेसला पीतवसन ॥ उत्तरीय प्रावरण देदीप्यमान ॥ कीं चंडकिरण प्रकाशला ॥ ९ ॥ सांवरूनि जटाभार ॥ वरी मुकुट घातला सुंदर ॥ तेज तळपतसे अपार ॥ दिक्चक्रामाजी न समाये ॥ ११० ॥ प्रळयचपळेचे उमाळे उठती ॥ तेवीं दिव्य कुंडलें तळपती ॥ कीं कविं आणि अंगिरापती ॥ कर्णी शोभती साचार ॥ ११ ॥ मुक्ताफळमाळा बहुत ॥ रघुपतीच्या गळां डोलत ॥ कीं मुक्तारूपें समस्त ॥ अनंत ब्रह्मांडें गुंफिलीं ॥ १२ ॥ मुक्ताफळांचें तेज गहन ॥ परी त्यांचा पालटला वर्ण ॥ दिसती इंद्रनीलासमान ॥ श्यामलांगीं रघुपतीच्या ॥ १३ ॥ जेवीं निष्कलंक मृगांक ॥ तेवीं हृदयीं झळके पदक ॥ कटीमेखळेचें तेज अधिक ॥ देखतां अर्क भुले पैं ॥ १४ ॥ वेदांच्या श्रुती गहन ॥ अर्थ बोलती जेवीं शोधून ॥ तैशा क्षुद्रघंटा रुणझुण ॥ शब्द करिती रसाळ ॥ १५ ॥ तीक्ष्ण प्रभेचीं चक्रें तळपती ॥ तैशा मुद्रिका करीं झळकती ॥ पदीं नेपुरें गर्जती ॥ असुरांवरी प्रतापें ॥ १६ ॥ नीळ गगनावरी सुंदर ॥ मंदाकिनीओघ दिसे शुभ्र ॥ तैसा अम्लान सुमनहार ॥ श्यामलांगीं शोभतसे ॥ १७ ॥ असो दिव्यगंधीं दिव्यसुमनीं ॥ सागरें पूजिला चापपाणी ॥ तैसाचि लक्ष्मण तये

४२ समुद्र. ४३ धनुष्याला. ४४ दुसरें स्थल. ४५ पाणी. ४६ विष्णु. ४७ शंकराचें. ४८ इंद्र. ४९ पीतांबर. ५० उपरणें. ५१ दिशाचक्रामध्यें. ५२ शुक्राचार्य. ५३ बृहस्पति. ५४ सूर्य. ५५ सुंदर पुष्पांनीं.

क्षणीं ॥ वस्त्रालंकारें गौरविला ॥ १८ ॥ देव करिती जयजयकार ॥ वर्षती दिव्य पुष्पसंभार ॥ भुभुःकारें गर्जती वानर ॥ तेणें अंबर कोंदलें ॥ १९ ॥ असो जगदात्मा रघुवीर ॥ जो कां सर्वानंदमंदिर ॥ सागराप्रती राजीवनेत्र ॥ काय बोलता जाहला ॥ १२० ॥ म्हणे सुवेळेसी[५६] जावया दळभार ॥ उपाय सांगें कांहीं सत्वर ॥ सागर म्हणे नळ वानर ॥ ऋषीचा वर त्यास असे ॥ २१ ॥ नळ कपि बाळपणीं ॥ शालिग्राम टाकी जळीं नेउनी ॥ मग ऋषी म्हणती जीवनीं ॥ पाषाण तरोत तव हस्तें ॥ २२ ॥ यालागीं सुवेळेपर्यंतु[५७] ॥ नळाचे हातें बांधीं सेतु ॥ असो आज्ञा मागोनि सरितानाथु ॥ जाहला गुप्त स्वस्थानीं ॥ २३ ॥ याउपरी कौसल्यानंदन ॥ नळ कपी जवळी बोलावून ॥ म्हणे धन्य तुझें वरदान ॥ जळीं पाषाण तारीं आतां ॥ २४ ॥ धन्य धन्य तुझी माउली ॥ तुजऐसें रत्न प्रसवली ॥ तरी सखया ये काळीं ॥ प्रगट करीं सामर्थ्य तुझें ॥ २५ ॥ ऐसें बोलतां रघुवीर ॥ भुभुःकारें गर्जती वानर ॥ पाषाण पर्वत अपार ॥ समुद्रजळीं टाकिती ॥ २६ ॥ लागतां नळाचा वरद हस्त ॥ समुद्रीं तरती काष्ठवत ॥ कीं तुंबिनीफळें[५८] तरत ॥ पाषाण पोंहत त्यापरी ॥ २७ ॥ कीं सद्गुरूचे कृपेंकरूनी ॥ भवजळीं तरती बहुत प्राणी ॥ तैसीच नळाची करणी ॥ पाषाण जळीं तरले हो ॥ २८ ॥ इकडे अठरा पद्मे वानर ॥ बाहात्तर कोटी रीस वीर ॥ पर्वत पाषाण तरुवर ॥ संख्यारहित आणिती ॥ २९ ॥ असंभाव्य उचलिती पर्वत ॥ वरी ग्राम गंगातटाकासहित ॥ ऐशा नगांच्या उतरडी बहुत ॥ धांवताती घेऊनि ॥ १३० ॥ भारें[५९] वानरांचे धांवती ॥ चालतां न दिसे खालीं क्षिती[६०] ॥ लक्षांचे लक्ष पर्वत टाकिती ॥ नव्हे गणती शेषातें ॥ ३१ ॥ त्याहीमाजी हनुमंत ॥ विशाळ रूप धरी अद्भुत ॥ कीं मंदराचळचि धांवत ॥ रामकार्याकारणें ॥ ३२ ॥ तरी तो महाराज हनुमंत ॥ तेणें किती वाहिले पर्वत ॥ मूळ काव्यामाजी गणित ॥ केलें असे ऐका तें ॥ ३३ ॥ वेदसंख्यालक्ष[६१] पर्वत ॥ पुच्छें वेष्टित आधीं हनुमंत ॥ शास्त्रसंख्यालक्ष[६२] शिरीं ठेवीत ॥ हातीं घेत लक्षद्वय ॥ ३४ ॥ बहुत नगांच्या[६३] पंक्ती ॥ स्कंधीं बैसवी हो मारुती ॥ मागें सांडोनि समीरगती ॥ आकाशपंथें धांवतसे ॥ ३५ ॥ वानर श्रमले असंख्यात ॥ ठायीं ठायीं पडती निद्रिस्त ॥ परी श्रमरहित हनुमंत ॥ असंख्यात खेपा करी ॥ ३६ ॥ आश्चर्य करी अयोध्या-पाळ ॥ म्हणे धन्य मारुतीचें बळ ॥ संख्यारहित अचळ ॥ रिचवी[६४] नेऊन सागरीं ॥ ३७ ॥ प्रथमदिवशीं नळें अद्भुत ॥ चौदा गांवें बांधिला सेतु[६५] ॥ परी अभिमान धरिला बहुत ॥ माझेनि तरती पाषाण हे ॥ ३८ ॥ तंव निमेषामाजी एक मीनें[६६] आला ॥ तेणें सर्व सेतु गिळिला ॥ सर्वेंच दिनमणि उगवला ॥ तों सेतु नाहीं त्या स्थळीं ॥ ३९ ॥ सुग्रीवादि वानर तर्क करिती ॥ रावणें नेला सेतु म्हणती ॥ मग रघुपतीस जाणविती ॥ सेतु नाहीं म्हणूनियां ॥ १४० ॥ मग श्रीरामें शरभासी सांगुनी ॥ तिमिंगिलें[६७] मत्स्य आणविला ते क्षणीं ॥ शरभ म्हणे सेतु शोधूनी ॥ वेगें आणूनि देइंजे ॥ ४१ ॥ नाहीं तरी अयोध्यानाथ ॥ तुम्हांस शिक्षा करील बहुत ॥ यावरी

५६ लंकेतील त्रिकूट नांवाड्या पर्वतापर्यंत. ५७ मोंपळे. ५८ समुदाय. ५९ पृथ्वी. ६० चार लक्ष. ६१ सहा लक्ष. ६२ पर्वतांच्या. ६३ घाली. ६४ पूल. ६५ मासा. ६६ एका प्रकारचा मोठा मासा.

तिमिंगिल बोलत ॥ राघवापुढें ते वेळां ॥ ४२ ॥ मी दर्शनास येतेवेळे ॥ मागें येत होतीं लघु बाळें ॥ त्यांहीं गिळिला शीघ्रकाळें ॥ बाळभावेंकरूनियां ॥ ४३ ॥ तयां हातीं बांधवीन क्षणांत ॥ अथवा स्वपृष्ठीचा करीन सेत ॥ हास्यवदन करी रघुनाथ ॥ म्हणे करणी अद्भुत बाळांची ॥ ४४ ॥ गर्वहत नळ होऊन ॥ खालीं पाहे अधोवदन ॥ असो मत्स्यशिशूनें सेतू उगळूंन ॥ आणून ठेविला पूर्व-स्थळीं ॥ ४५ ॥ मग त्यापुढें कपी नळ ॥ सेतू बांधिता जाहला विशाळ ॥ परी जळीं पडतां ते अर्चेळ ॥ मत्स्य गिळिती सवेग ॥ ४६ ॥ मत्स्य गिळिती अचळ ॥ उगाचि तटस्थ पाहे नळ ॥ तों मत्स्यरूपी केशेव विशाळ ॥ जळचरांप्रती सांगतसे ॥ ४७ ॥ म्हणे मी आणि रघुवीर ॥ दोघे एकरूप साचार ॥ सेतुबंधनासी निर्धार ॥ विघ्न कांहीं न करावें ॥ ४८ ॥ नळासी साह्य होऊन ॥ तळीं पृष्ठी द्या अवघे जण ॥ असो पर्वत गिळितां राहिले मीन ॥ नवल जाहलें ते वेळीं ॥ ४९ ॥ परी पर्वतशिळा उसळोन ॥ दूर जाती वाहून ॥ नळाची विकळ मति होऊन ॥ तटस्थरूप जाहला ॥ १५० ॥ मग नळासी म्हणे हनुमंत ॥ सखया गर्व न धरीं किंचित ॥ अवघा कर्ता रघुनाथ ॥ अभिमान तेथें कायसा ॥ ५१ ॥ स्तंभावीण आकाश धरी ॥ उदकावरी तारी धरित्री ॥ मित्र शशी उडुगणें निर्धारीं ॥ वायुचक्रीं चालवी जो ॥ ५२ ॥ अनंत ब्रह्मांडें मोडून ॥ सवेंचि निर्मी न लगतां क्षण ॥ त्या रामापुढें अभिमान ॥ कोठें चालेल जीवांचा ॥ ५३ ॥ जैसा उगवतां वासरमणी ॥ मृगांकतेजें लोपे ते क्षणीं ॥ तेथें खद्योत स्वतेजेंकरूनी ॥ उजळील काय नभातें ॥ ५४ ॥ यालागीं गर्व सांडोनी ॥ सांगतों तें वर्म धरीं मनीं ॥ रकारें एक शिला रेखोनी ॥ काना देऊनि करीं गुरू ॥ ५५ ॥ दुजे शिळेवरी रेखीं मकार ॥ दोहींस करीं एकंकार ॥ तूं म्हणसी रामनाम पवित्र ॥ सेतूवरी केवीं लिहूं ॥ ५६ ॥ कपी देतील वरी चरण ॥ हा संशय धरी तुझें मन ॥ बा रे मुख्य भेदासी कारण ॥ तो अभिमान सोडीं कां ॥ ५७ ॥ मुख्य रामनाम पाहीं ॥ हृदयीं अभेद रुंळे सदाही ॥ मग ते पाषाण सहसाही ॥ भेदभाव न धरिती ॥ ५८ ॥ हनुमंतवचन तीक्ष्ण कुठार ॥ समूळ छेदिला अभि-मानतरुवर ॥ मग निरभिमानें नळवीर ॥ तैसेंच करिता जाहला ॥ ५९ ॥ करितांच श्रीरामस्मरण ॥ नळ कपी जोडी पाषाण ॥ तों तेथें सम विषम थोर लहान ॥ भेदाभेद न दिसेचि ॥ १६० ॥ हनुमंतकाव्यांतील हृद्गत ॥ चतुरीं जाणिजे हा भावार्थ ॥ सेतुपंथें नाम यथार्थ ॥ नळें नाहीं रेखिलें तें ॥ ६१ ॥ दुजयासी पाषाण जे बुडवीत ॥ ते सागरीं तरती तारुंवत ॥ हा नळाचा गुण निश्चित ॥ महिमा अद्भुत रामाचा ॥ ६२ ॥ सेतू बांधावया कारण ॥ नळ रामेंचि केला निर्माण ॥ भक्तवत्सल रघुनंदन ॥ महिमा वाढवी दासांचा ॥ ६३ ॥ असो बाणसंख्या दिवसांत ॥ सुवेळेपर्यंत बांधिला सेत ॥ शतयोजनें लांब गणित ॥ दशयोजनें रुंद पैं ॥ ६४ ॥ गगनीं पाहती सुरवर ॥ सेतू दिसे जैसा भोगींद्रं ॥ रघुपतीतें सांगती वानर ॥ सेतू संपूर्ण केला नळें ॥ ६५ ॥ नळास बोलावून रघुनंदनें ॥

६७ ओकून. ६८ पर्वत. ६९ नारायण, विष्णु. ७० सूर्य. ७१ चंद्राचा प्रकाश. ७२ काजवा. ७३ शोभे. ७४ नावेप्रमाणें. ७५ पांच दिवसांत. ७६ त्रिकूटापर्यंत. ७७ वासुकी.

हृदयीं धरिला परम प्रीतीनें ॥ म्हणे धन्य धन्य तुझें जिणें ॥ भरिलें त्रिभुवन कीर्तीनें ॥ ६६ ॥ सखया त्वां अद्भुत कार्य केलें ॥ अघटित तेंचि घडविलें ॥ असो रघुवीर म्हणे ते वेळे ॥ चला सुवेळे जाऊं आतां ॥ ६७ ॥ कुंचीं फिरविला वीरें नळें ॥ तत्काळ उठलीं कपिदळें ॥ भुभुःकारनादें ते वेळे ॥ डळमळला भूगोळ ॥ ६८ ॥ सुमुहूर्तवेळा पाहून ॥ उठोनि चालिले रामलक्ष्मण ॥ दशैंयोजनें रुंद प्रमाण ॥ सेना दाटली चालतां ॥ ६९ ॥ कडेचे कोसळती वानर ॥ सवेंच उडी घेती चक्राकार ॥ वरी येऊन सत्वर ॥ सेतुपंथें चालती ॥ ७० ॥ रघुवीर चरणचालीं जात ॥ धांवती सुग्रीव हनुमंत ॥ म्हणती रघूत्तमा विपरीत ॥ होईल ऐसें वाटतें ॥ ७१ ॥ तुमचें पद लागतां ये वेळा ॥ उद्धरतील सेतूच्या शिळा ॥ होतील अहल्येऐशा अबेंळा ॥ पडतील गळां कपींच्या ॥ ७२ ॥ कुटिल भाव सोडून ॥ विनोदें हांसे सूर्यनंदनें ॥ मग हनुमंतस्कंधीं रघुनंदन ॥ आरूढला ते वेळां ॥ ७३ ॥ अंगदाच्या स्कंधावरी ॥ सौमित्रें बैसे ते अवसरीं ॥ बाळ सूर्य उदयाद्रीवरी ॥ त्याचपरी शोभतसे ॥ ७४ ॥ न भरतां अर्धप्रहर ॥ सुवेळेसी आला रघुवीर ॥ सेना उतरली अपार ॥ लंकानगर गजबजलें ॥ ७५ ॥ शुकास केलें होतें बंधन ॥ तो राघवें दिधला सोडून ॥ तेणें रघुपतीचे वंदोनि चरण ॥ लंकेमाजी प्रवेशला ॥ ७६ ॥ मग रावणापुढें अद्भुत ॥ राघवप्रताप शुक सांगत ॥ म्हणे जयासी समुद्र सरितांसहित ॥ मूर्तिमंत भेटला ॥ ७७ ॥ धन्य प्रतापी रघुनंदन ॥ जळीं तारिले पाषाण ॥ परमशक्ति वानरगण ॥ कळिकाळासी न गणिती ॥ ७८ ॥ तुम्हीं निरोप जे सांगितले ॥ तितुके मित्रपुत्रांसी कथिले ॥ तंव तिन्हीं धांवोनि मजला धरिलें ॥ बांधोनि पाडिलें आजिवरी ॥ ७९ ॥ करुणासागर रघुनंदन ॥ तेणें आज दिधलें सोडून ॥ आतां राजा जानकी नेऊन ॥ सत्वर रामासी समर्पावी ॥ १८० ॥ सखा करितां रघुनंदन ॥ तेणें चंद्रार्कवंशीं कल्याण ॥ ऐकतां क्षोभला रावण ॥ म्हणे केलें ताडण तिहीं तुज ॥ ८१ ॥ भय घेतलें मानसीं ॥ म्हणोनि भलतें वाचाळेसी ॥ शत्रुप्रताप मजपुढें वानिसी ॥ तरी मृत्यु पावसी निर्धारें ॥ ८२ ॥ मग शुक आणि सारण ॥ दोघां सांगे दशवदन ॥ म्हणे सुवेळेसी जाऊन ॥ सैन्य गणोनि या वेगीं ॥ ८३ ॥ मुख्य मुख्य कोण वानर ॥ कोणासवें किती भार ॥ ऐसें पाहूनि सत्वर ॥ परता रक्षूनि आपणा ॥ ८४ ॥ आज्ञा वंदूनि दोघांजणीं ॥ कपिसेनेंत आले ते क्षणीं ॥ वानरवेष धरूनी ॥ सैरावैरा हिंडती ॥ ८५ ॥ सेना धुंडोनि सकळ ॥ मग जेथें असे अयोध्यापाळ ॥ लक्षीत तें सभामंडळ ॥ उभे दूर राहूनियां ॥ ८६ ॥ तों बिभीषणाची दृष्टि ते काळीं ॥ अकस्मात दोघांवरी पडली ॥ धांवोनि धरिले ते वेळीं ॥ राघवाजवळी आणिले ॥ ८७ ॥ म्हणे हे रावणाचे हेर ॥ इंहीं सेना गणिली समग्र ॥ वेष पालटोनी वानर ॥ होऊन हिंडती स्वइच्छा ॥ ८८ ॥ चुना माखोनि वायस ॥ जाहले जैसे राजहंस ॥ कीं धरूनि ब्राह्मणांचा वेष ॥ मैंदें जैसे हिंडती ॥ ८९ ॥ कीं खोटें नाटें करून ॥ स्वन्यांत मेळविती कुजन ॥ मग परीक्षक काढिती

७८ निशाण. ७९ चाळीस कोस. ८० स्त्रिया. ८१ सुग्रीव. ८२ लक्ष्मण. ८३ सूर्यवंशीय रामाला. ८४ चंद्रसूर्य आहेत तोंपर्यंत. ८५ बडबडतोस. ८६ येथेच्छ. ८७ लोकांस मोहपाशांत घालून लुटणारे.

निवडोन ॥ दोघेजण तैसे धरिले ॥ १९० ॥ मग राजाधिराज रघुनंदन ॥ सुहास्यवदन बोले वचन ॥ म्हणे या दोघांस करीं धरून ॥ दाखवा सैन्य समस्तही ॥ ९१ ॥ सकळ वृत्तांत आणूनि मना ॥ जाऊनि श्रुत करा दशवदना ॥ तंव ते म्हणती रघुनंदना ॥ मख-पाळका विश्वेशा ॥ ९२ ॥ आम्हीं महिमा ऐकिला कर्णीं ॥ तो राम आजि देखिला नयनीं ॥ असो श्रीरामाची आज्ञा घेउनी ॥ दोघे परतले लंकेसी ॥ ९३ ॥ आले देखोन दोघे हेर[८८] ॥ षोडश खणांचें गोपुर ॥ त्यावरी चढला दशकंधर ॥ सेवक अपार भोंवते ॥ ९४ ॥ हेरांप्रति पुसे रावण ॥ सांगा येथून कोणाचे कोण ॥ मग ते दाविती दोघेजण ॥ संकेतवर्ण लक्षूनियां ॥ ९५ ॥ वानरसेना दश योजन ॥ सभोंवतीं उतरली विस्तीर्ण ॥ एक एक वीर देदीप्यमान ॥ बळवंत आणि प्रतापी ॥ ९६ ॥ वानरसिंधूचें मध्यमंडळ ॥ जुंत्पति[८९] उभे भोंवते सकळ ॥ त्या मध्यभागीं तेंमालनीळ ॥ वस्त्राभरणीं मंडित दिसे ॥ ९७ ॥ कनकहरिणचर्मीं पूर्ण ॥ पेंहुडलासे[९०] रघु-नंदन ॥ सुग्रीवाचे मांडीवरी शिर ठेवून ॥ गोष्टी सांगे कौतुकें ॥ ९८ ॥ जाळूनि गेला लंकानगर ॥ सवेंच घेऊन आला रघुवीर ॥ तो हनुमंत वायुकुमर ॥ चरण चुरी रामाचे ॥ ९९ ॥ तुमचा बंधु बिभीषण ॥ रघुनाथानिकट बैसोन ॥ जें जें झालें वर्तमान ॥ गोष्टी सांगे रामकर्णीं ॥ २०० ॥ देदीप्यमान दिनकर ॥ तैसा रामाचे पाठीसीं सौमित्र ॥ पैलें[९१] अंगद महावीर ॥ क्रोधें पाहे आम्हांकडे ॥ १ ॥ पैल सुषेण वैद्य महावीर ॥ हा सूर्यसुतासी होय श्वशुर ॥ वीस कोटी वानरभार ॥ त्यासांगातें पुरुषार्थी ॥ २ ॥ पैल जांबुवंत ऋक्ष[९२]-वीर ॥ तयाचा बाहात्तर कोटी दळभार ॥ पैल सेनाधिपति नीळ वीर ॥ सामर्थ्य अपार पैं त्याचें ॥ ३ ॥ जेणें शिळीं बांधिला सागर ॥ नळ नाम बळसमुद्र ॥ शरभ ऋषभ पर्वताकार ॥ युद्धसमय वांच्छिती ॥ ४ ॥ असो आतां वानरगण ॥ त्यांचीं नामें सांगतां पूर्ण ॥ उर्वी[९३] न पुरे करितां लेखन ॥ बेलार्णव[९४] सर्वही ॥ ५ ॥ यालागीं दशकंधरा अवधारीं ॥ त्यांसीं युद्ध करितां समरीं ॥ काळाचीही न उरे उरी ॥ मग इतर तेथें कायसे ॥ ६ ॥ ऐसें बोलतां शुक सारण ॥ अत्यंत क्रोधावला रावण ॥ म्हणे तुमचा शिरच्छेद करून ॥ टाकावा ऐसें वाटतसे ॥ ७ ॥ येरू म्हणती आम्ही तुमचे हेर ॥ सत्य सांगावा समाचार ॥ असत्य बोलूं तरी साचार ॥ दंड करावा आम्हांतें ॥ ८ ॥ असो इकडे बिभीषण ॥ समस्तांसी दावी तर्जनी उचलून ॥ म्हणे पैल पाहा रावण ॥ गोपुरावरी चढलासे ॥ ९ ॥ दाहा शिरांवरी दाहा छत्रें ॥ दाहा विलसती मित्रेपत्रें[९५] ॥ सेवक करीं ढाळिती चामरें ॥ एकीं पीकपात्रें[९७] धरियेलीं ॥ २१० ॥ जैसा मेघ उतरे पर्वतशिखरीं ॥ तैसा रावण भासे गोपुरीं ॥ अलंकारदीप्ति महीवरी ॥ विद्युत्प्रायें[९८] झळकतसे ॥ ११ ॥ ऐसी आपुली संपदा पूर्ण ॥ शत्रूलागीं दाखवी रावण ॥ छत्रछायेखालीं रामसैन्य ॥ झांकून गेलें ते समयीं ॥ १२ ॥ जैसें उठतां मेघडंबर ॥ खालीं आच्छादे जग समग्र ॥ सेनेसहित रामचंद्र ॥ छत्रछायेतळीं तैसा ॥ १३ ॥ ऐसा देखोनि लंकापती ॥ कपिवीर क्षोभले चित्तीं ॥ सौमित्रें चाप[९९] घेतलें

८८ दूत. ८९ मल्ल. ९० श्रीराम. ९१ झोंपला. ९२ पलीकडे. ९३ आस्वल. ९४ पृथ्वी. ९५ सेनासागर. ९६ अब्दागीर. ९७ पिकदाण्या. ९८ विजेसारखी. ९९ धनुष्य.

हातीं ॥ निमेषार्धें न लागतां ॥ १४ ॥ लाविला अर्धचंद्र बाण ॥ ओढी ओढिली आकर्ण ॥ कल्पांतचपळेसमान ॥ चापापासूनि सूटला ॥ १५ ॥ मुकुट छत्रें ते अवसरीं ॥ तोडून पाडिलीं धरणीवरी ॥ रावण घाबरला अंतरीं ॥ खालीं झडकरी उतरला ॥ १६ ॥ म्हणे कोण्या वीराचें संधान ॥ पाडिलीं दहाही छत्रें खंडून ॥ अन्न पान शयन ॥ गोड न लागे रावणातें ॥ १७ ॥ कपाळशूळें आरंबळे व्याघ्र ॥ कीं वणव्यांत आहाळे अजगर ॥ तैसा दुःखें व्याप्त दशकंधर ॥ चिंताक्रांत सर्वदा ॥ १८ ॥ रामविजय ग्रंथ सुंदर ॥ हाचि केवळ क्षीरसागर ॥ साहित्य शेषशयन अरुवार ॥ वरी सर्वेश्वर पहुडला ॥ १९ ॥ तेथें सप्रेम कळा लक्ष्मी ॥ सदा विलसे पादपद्मीं ॥ तरी सद्भाविक श्रोते तुम्ही ॥ पार्षदगण हरीचे ॥ २२० ॥ सुंदरकांड संपलें येथोन ॥ युद्धकांड सुरस पूर्ण ॥ तें रसभरित भक्तजन ॥ करोत श्रवण सर्वदा ॥ २१ ॥ जो अयोध्यापती रघुनंदन ॥ तेणेंच टाकून धनुष्यबाण ॥ दोन्ही कर जघनीं ठेवून ॥ भीमातटीं उभा असे ॥ २२ ॥ श्रीधरवरदा ब्रह्मानंदा ॥ पांडुरंगा पुंडलीकवरदा ॥ भक्तहृदयारविंदमिलिंदा ॥ अभंगा अभेदा जगद्गुरो ॥ २३ ॥ स्वस्ति श्रीराम-विजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ त्रयोविंशाध्याय गोड हा ॥ २२४ ॥ अध्याय ॥ २३ ॥

१०० डोळ्याची पापणी लवण्याइतका वेळ. १ दोरी. २ ओरडे. ३ होरपळे. ४ मृदु. ५ आजूबाजूचे लोक, सेवक. ६ कटीवर, कंबरेवर.

॥ इति सुंदरकांड ॥

२४
गोलिवडेकर

श्रीगणेशाय नमः ॥ कळेल समुद्राचा अंत ॥ सांपडेल अंबराचें गणित ॥ त्याहून रामकथा अद्भुत ॥ न लगे अंत कवणातें ॥ १ ॥ अद्भुत धांवे प्रभंजन ॥ त्याची मोट बांधवेल आकर्षून ॥ परी या रघुपतीचे चरण ॥ वर्णितां अंत न कळेचि ॥ २ ॥ सहस्रवदनेंकरून ॥ वर्णी कौद्रवेयकुळभूषण ॥ नेति नेति म्हणोन ॥ वेदही तेथें तटस्थ ॥ ३ ॥ रघुवीरगुणांची सरोवरपाळ ॥ तेथें व्यास वाल्मीक हे मराळ ॥ ज्यांच्या मतीमाजी सकळ ॥ ब्रह्मांड हें ठेंगणें ॥ ४ ॥ त्यांहीं गुण वर्णितां अपार ॥ अंत न कळेचि साचार ॥ तेथें मानवशलभ पामर ॥ गुणांबर केवीं क्रमी ॥ ५ ॥ तरी सांडोनि अभिमान ॥ वर्णावे रघुपतीचे गुण ॥ गंगाप्रदेश म्हणोन ॥ तृषाक्रांता केवीं सोसवे ॥ ६ ॥ तैसे सीतावल्लभाचे गुण ॥ वर्णावे यथामतीकरोन ॥ असो पूर्वाध्यायीं अनुसंधान ॥ आला रघुवीर सुवेळे ॥ ७ ॥ आतां वाग्देवी परम डोळस ॥ उघडी युद्धकांडमांदुस ॥ त्यांतील साहित्यरत्नें विशेष ॥ ग्राहक पंडित तयांचे ॥ ८ ॥ रावणाचीं दाही छत्रें ॥ छेदोन् पाडिलीं सौमित्रें ॥ परम म्लान दाही वक्त्रें ॥ मयजाँपतीचीं जाहलीं ॥ ९ ॥ सकळ प्रधानांसहित ॥ विचारा बैसला लंकानाथ ॥ माझे तरी दोन हेत ॥ कैसे पुरती नेणें मी ॥ १० ॥ रामलक्ष्मणां संहारूनी ॥ वश्य व्हावी जनकनंदिनी ॥ यांवेगळी माझे मनीं ॥ चिंता तिसरी नसेचि ॥ ११ ॥ तंव वज्रदंष्ट्र म्हणे लंकानाथा ॥ सीतेची भीड कासया धरितां ॥ बळेंचि आणोनि तत्वतां ॥ कामना आपुली पुरविजे ॥ १२ ॥ मग बोले दशकंधर ॥ मज विरंचीचा शाप थोर ॥ परस्त्रीवर करितां बलात्कार ॥ शतचूर्ण तनु होय पैं ॥ १३ ॥ मृगपतीचे फुटले नयन ॥ कीं व्याघ्राचे हस्त टाकिले तोडोन ॥ की भुजंगाचे दांत पाडून ॥ केला दीन गारुडियें ॥ १४ ॥ वनीं सर्वांत श्रेष्ठ वारणं ॥ परी सिंह देखतां तत्काळ मरण ॥ तैसा मी शापबंधनें पूर्ण ॥ बळक्षीण जाहलों ॥ १५ ॥ तरी ते जनकजा मनींहूनी ॥ आपणचि वश्य होईल शयनीं ॥ ऐसी करणी करा कोणी ॥ राघवीं मन विटे तिचें ॥ १६ ॥ मग विद्युज्जिव्ह प्रधान ॥ जो कापट्यविद्येमाजी प्रवीण ॥ तो म्हणे मी निर्मीन ॥ रघूत्तमाचें शिरकमळ ॥ १७ ॥ आणि राघवहस्तींचें कोदंड ॥ मायामय निर्मीन प्रचंड ॥ तेणें सीतेचें हृदयखंड ॥ असत्य न वाटे सहसाही ॥ १८ ॥ ऐसें ऐकतांचि लंकापती ॥ परम संतोष पावला चित्तीं ॥ जैसा मद्यपी पाहतां पंथीं ॥ तंव शिंदीवेंन देखिलें ॥ १९ ॥ आधींच जारकर्मी रत ॥ त्यांत स्त्रीराज्य जाहलें प्राप्त ॥ कीं श्वानें वमन अकस्मात ॥ दृष्टीं देखिलें तेधवां ॥ २० ॥ कीं निंबोळ्यां देखतां बहुवस ॥ परम संतोषे वायस ॥ तैसा हर्षला लंकेश ॥ वचन ऐकतां तयाचें ॥ २१ ॥ विद्युज्जिव्हासी म्हणे लंकापती ॥ आम्हांमध्यें तूं केवळ बृहस्पती ॥ तरी शीघ्र शिरधनुष्यांप्रती ॥ घेवोनि येईं अशोकवना ॥ २२ ॥ कापट्यवेषी विद्युज्जिव्हा ॥ वस्त्राभरणीं गौरविलें तेव्हां ॥ कृत्रिम निर्मिलें तेधवां ॥ तर्क करितां नेणवेचि ॥ २३ ॥ इकडे आधीं लंकानाथ ॥ प्रवेशला अशोकवनांत ॥ तों अधोवदनें तटस्थ ॥ जगन्माता बैसली ॥ २४ ॥ सीतेजवळी उभा रावण ॥ जैसा

१ आकाशाचें. २ वायु. ३ सर्पकुलभूषण (शेष). ४ हंस. ५ गुणरूपी आकाश. ६ युद्धकांडरूपी पेटी. ७ रावणाचीं. ८ ब्रह्मदेवाचा. ९ सिंहाचे. १० गज. ११ शिंदीचें रान. १२ कडूनिंब.

कमळिणीसमीप वारण[१३] ॥ कीं हरिणीजवळी येऊन ॥ व्याघ्र उभा ठाकला ॥ २५ ॥ याउपरी राक्षसपाळ ॥ सीतेजवळी बोले अमंगळ ॥ म्हणे तुवां धैर्य धरिलेंसे सबळ ॥ परी तें निष्फळ जाहलें ॥ २६ ॥ मजलागीं तूं आतां वरीं ॥ तुझे सेवेसी मंदोदरी ॥ तुझे आज्ञेंत लंकानगरी ॥ वर्तवीन जानकीये ॥ २७ ॥ तुझिया पतीस जाहलें मरण ॥ आधीं तें ऐकें वर्तमान ॥ सागरीं सेतू बांधोन ॥ सुवेळेसी सर्व आले ॥ २८ ॥ तंव आमचा प्रधान प्रहस्त ॥ निमेषामाजी गेला सेनेसमवेत ॥ राम सौमित्र होते निद्रिस्त ॥ तंव घाला त्यांहीं घातला ॥ २९ ॥ तुझिया पतीचें शिरकमळ ॥ प्रहस्तें छेदिलें तत्काळ ॥ सांवळें कबंध विशाळ ॥ सुवेळेसी पडियेलें ॥ ३० ॥ वधावा जों लक्ष्मण ॥ तंव तो अयोध्येसी गेला पळोन ॥ आमचा बंधु बिभीषण ॥ तोही तेथेंचि पडियेला ॥ ३१ ॥ सुग्रीव आणि अंगद ॥ त्यांचाही केला शिरच्छेद ॥ जांबुवंत आणि मैंद ॥ यांचे जानुचरण खंडिले ॥ ३२ ॥ नळ नीळ अंजनीसुत ॥ निजलेठायीं केले चूर्ण-वत ॥ वरकड मर्कटें सैन्य बहुत ॥ राक्षसीं सर्व गिळियेलीं ॥ ३३ ॥ सेतू पाडिला समग्र ॥ मग कोठें पळतील वानर ॥ शोणिताचे वाहती पूर ॥ जाती भेटों सागरातें ॥ ३४ ॥ हें जरी तूं असत्य मानिसी ॥ तरी आतांचि येईल प्रत्यैयासी ॥ विद्युज्जिव्ह वेगेंसीं ॥ शिर घेवोनि पातला ॥ ३५ ॥ तेणें धनुष्य आणि शिर ते वेळे ॥ रामवल्लभेपुढें आणोनि ठेविलें ॥ मुख राजस सांवळें ॥ शोणितें माखलें ते काळीं ॥ ३६ ॥ किरीटकुंडलमंडित वदन ॥ सरळ नासिका झळकती दशन ॥ कपाळीं केशर आकर्ण नयन ॥ आरक्त रेखांकित जें ॥ ३७ ॥ ऐसें देखतां जनकनंदिनी ॥ मूर्च्छना येवोन पडे धरणीं ॥ कीं अर्भीत पडली कमळिणी ॥ जाय करपोनी जयापरी ॥ ३८ ॥ तंव ते दशकंठरिपूंची[१४] प्रिया ॥ उठे मूर्च्छना सांवरूनियां ॥ हृदयीं शिरकमळ धरोनियां ॥ शोक करी अद्भुत ॥ ३९ ॥ अहो ते त्रिभुवनपतीची राणी ॥ शोकार्णवीं बुडाली ते क्षणीं ॥ तो शोक सांगतां उलथे धरणी ॥ कवीची वाणी कुंठित ॥ ४० ॥ म्हणे राजीवाक्षा रघुनंदना ॥ स्मरारिमित्रा जगन्मोहना ॥ अनंतगुणसंपन्ना ॥ काय ऐसें हें केलें ॥ ४१ ॥ चतुर्दश वर्षेपर्यंत[१५] ॥ रघुवीरा श्रमलेति वनांत ॥ कोमल चरणीं बहुत ॥ कंटक हरळे[१६] रुतले ॥ ४२ ॥ मजकारणें श्रमलां काननीं ॥ अहा सीता म्हणवोनी ॥ तृण पाषाण हृदयीं धरोनी ॥ उद्धरिले कीं रघुपते ॥ ४३ ॥ मजकारणें वाली मारिला ॥ सूर्यसुत मित्र केला ॥ हनुमंत शुद्धीसी धाडिला ॥ शिळीं बांधिला सागर ॥ ४४ ॥ सुवेळे येवोनि सत्वर ॥ वैरियांसी यश दिधलें अपार ॥ कां संपविला अवतार ॥ मज भवपूरीं लोटिलें ॥ ४५ ॥ रविकुलावतंस श्रावणारी[१७] ॥ त्याची स्नुषा मी जनककुमारी ॥ अयोध्याधीशा तुझी अंतुरी[१८] ॥ सोडवील आतां मज कवण ॥ ४६ ॥ मी परदेशीं ये दीन ॥ रघुवीरा कोणासी जाऊं शरण ॥ सूर्यवंशीं संपूर्ण ॥ डाग लागला यावरी ॥ ४७ ॥ वाल्मीकानें भविष्य केलें ॥ तें अवघेंचि आजि बुडालें ॥ जंबुकें जाऊनि मारिलें ॥ पंचाननासी[१९] नवल हें ॥ ४८ ॥ अजाखुरींच्या[२०] जीवनीं ॥ सिंह अडखळोनि

१३ हत्ती. १४ मनुभवाला. १५ रामाची. १६ दगड. १७ दशरथ. १८ पत्नी. १९ सिंहाला. २० शेळीच्या पावलाच्या बळग्यांतील सांठलेल्या पाण्यांत.

पडला कैसेनी ॥ कीं मूषकाचिये वदनीं ॥ पंचाननं[21] सांठवे ॥ ४९ ॥ कर्पूराचे पुतळे केवळ ॥ त्यांहीं उभा ग्रासिला वडवानळ ॥ जग-द्भक्षक जो जगीं काळ ॥ त्यासी भूतानें ग्रासिलें ॥ ५० ॥ मशकाची झेंप लागतां ॥ कनकाद्रि पडला खालता ॥ शृंगालांनीं[22] तत्त्वतां ॥ बांधिला कैसा ऐरावत ॥ ५१ ॥ सैंघो[23]नें केंकरोनी ॥ कैसें ब्रह्मांड गेलें आहळोनी[24] ॥ पिपीलिकाउदरीं[25] जाऊनी ॥ सिंह कैसा सांठवला ॥ ५२ ॥ लागतां मक्षिकेचा पक्षवात ॥ भयभीत पाहला भोगिनाथें[26] ॥ चित्रींच्या सर्पें[27] अकस्मात ॥ अरुणानुज[28] गिळियेला ॥ ५३ ॥ तैसें अघ-टित घडलें येथ ॥ राक्षसें जिंकिला रघुनाथ ॥ कर्माची गति गहन बहुत ॥ कैसा अनर्थ करूं आतां ॥ ५४ ॥ भूधरावतार लक्ष्मण[29] ॥ कैसा रामासि गेला टाकोन ॥ तों अयोध्येसी जाऊन ॥ काय सांगेल भरतातें ॥ ५५ ॥ तत्काळ कौसल्या त्यजील प्राण ॥ होईल कैकयीचें समाधान ॥ लागेल सूर्यवंशासी दूषण ॥ जाहलें खंडन वंशाचें ॥ ५६ ॥ ऐसा शोक करी मंगलभगिनी[30] ॥ मुखावरी कर ठेवूनी ॥ अश्रुधारा स्रवती नयनीं ॥ भिजे अवनी ते काळीं ॥ ५७ ॥ असो जानकी म्हणे दशमुखा ॥ हे होणार न चुके कर्मरेखा ॥ तरी मिथिलानाथ जनका- ॥ समान मज अससी तूं ॥ ५८ ॥ आतां माहेर इतकेंच करीं ॥ वन्हिशेज[31] रचोनि झडकरी ॥ या शिरा-समवेत निर्धारीं ॥ अग्नीमाजी प्रवेशेन ॥ ५९ ॥ सत्व न सांडी जनकनंदिनी ॥ हें रावणासी कळलें मनीं ॥ परम म्लानमुख होउनी ॥ गेला निघोन सभेंत ॥ ६० ॥ रावण गेलिया जनकनंदिनी ॥ बुडाली शोकार्णवजीवनीं ॥ तंव ते बिभीषणाची राणी ॥ सरमा आली गुप्तरूपें ॥ ६१ ॥ ते क्षणक्षणां येऊन ॥ घेत जानकीचें दर्शन ॥ सांगे सकळ वर्तमान ॥ जें जें लंकेंत वर्तलें ॥ ६२ ॥ रघुपतीचें जें कां हित ॥ तें बिभीषणासी करणें अगत्य ॥ तैसीच सरमा येऊन तेथ ॥ सांभाळीत जानकीतें ॥ ६३ ॥ नानासूक्ष्म रूप धरीत ॥ राक्षस-कापट्यही जाणत ॥ तितकें जानकीस श्रुत करीत ॥ क्षणक्षणां येऊनियां ॥ ६४ ॥ असो सरमा म्हणे जानकीसी ॥ माये शोक किमर्थ करिसी ॥ राम सुखी आहे सुवेळेसी ॥ सकळ सेनेसहित पैं ॥ ६५ ॥ तुज वश करावया ये क्षणीं ॥ रावणें कृत्रिम केली करणी ॥ बरवें पाहें विचारूनी ॥ मूळ दृष्टी घालोनियां ॥ ६६ ॥ जनकात्मजे तव स्वयंवरीं ॥ चाप बैसलें रावणाचे उरीं ॥ तें तुझ्या पतीनें झडकरी ॥ द्विखंड करूनी टाकिलें ॥ ६७ ॥ त्याहूनि चाप जड ये वेळे ॥ प्रहस्तें जाऊन कैसें आणिलें ॥ कृत्रिमधनु मुंड आणिलें ॥ निर्मून त्याचसारिखें ॥ ६८ ॥ ऐसें सरमा जों बोलत ॥ तों धनुष्य शिर जाहलें गुप्त ॥ जैसा वात लागतां अकस्मात ॥ दीप जाय विझोनी ॥ ६९ ॥ कीं जलद-जालाभीतरी[32] ॥ इंद्रधनुष्य उमटे क्षणभरी ॥ तैसें कोदंडेंही[33] झडकरी ॥ गुप्त जाहलें तेधवां ॥ ७० ॥ असो जानकी म्हणे सरमेप्रती ॥ धन्य हो माये तुझी मती ॥ राक्षसांच्या कापट्यगती ॥ तुज समजती सर्वही ॥ ७१ ॥ मग अयोध्यापतीची राणी ॥ सरमेसी जवळी बोलावूनी ॥ हृदयीं धरीत प्रीतीकरूनी ॥ म्हणे स्वामिनी होसी लंकेची ॥ ७२ ॥ तों देववाणी जाहली अकस्मात ॥ सुखरूप आहे

२१ सिंह. २२ कोल्हांनीं. २३ काजव्याच्या प्रकाशानें. २४ करपून. २५ मुंगीच्या पोटांत. २६ शेष. २७ गरुड. २८ शेषाचा अवतार. २९ सीता. ३० चिंता. ३१ ढगांमध्यें ३२ धनुष्य.

अयोध्यानाथ ॥ सीतेचा आनंद अद्भुत ॥ अंबरामाजी न समाये ॥ ७३ ॥ असो इकडे लंकापती ॥ परम चिंताक्रांत एकांतीं ॥ बोलतसे मंदोदरीप्रती ॥ तेंच श्रोतीं परिसिजे ॥ ७४ ॥ मंदोदरी परम सज्ञान ॥ पतिव्रतागुणसंपन्न ॥ जिचें सौंदर्य पाहून ॥ मीनकेतन तटस्थ ॥ ७५ ॥ मयजेचें इच्छीत मन ॥ घ्यावें जानकीचें दर्शन ॥ तों मंदोदरीस दशवदन ॥ बोलता जाहला ते वेळे ॥ ७६ ॥ रावण म्हणे शुभकल्याणी ॥ तुवां जाऊनि अशोकवनीं ॥ बोधोनियां जनकनंदिनी ॥ मज शयनीं वश करीं ॥ ७७ ॥ तूं पतिव्रतांमाजी मंडणें ॥ एवढें कार्य दे साधून ॥ तंव ते मंदोदरी हास्यवदन ॥ अवश्य म्हणोनि ऊठली ॥ ७८ ॥ चंद्राचे ठायीं कलंक ॥ त्याहूनि विशेष मयजेचें मुख ॥ अशोकवना तात्काळिक ॥ येती जाहली पतिव्रता ॥ ७९ ॥ त्रिजटा म्हणे भूमिकुमरी ॥ तव दर्शना आली मंदोदरी ॥ ऐसें ऐकतां अंतरीं ॥ परम संतोषली जगन्माता ॥ ८० ॥ ते चातुर्यसरोवरमराळिका ॥ मयजा सुगंधचंपककळिका ॥ जैसी सिंहस्थीं जान्हवी देखा ॥ भेटों जाय गौतमीतें ॥ ८१ ॥ सीतेचिया चरणांवरी ॥ मयजा जों नमस्कार करी ॥ तों सीतेनें धरूनि झडकरी ॥ हृदयीं धरिली प्रीतीनें ॥ ८२ ॥ कीं त्या सिंधु असितों ॥ एके ठायीं मीनल्या तत्त्वतां ॥ कीं इंदिरा आणि शिवकांता ॥ एकीस एक भेटती ॥ ८३ ॥ एक शची एक सरस्वती ॥ एक कृष्णा एक गोमती ॥ एक मंदाकिनी एक भोगावती ॥ मूर्तिमंत पातल्या ॥ ८४ ॥ असो वरद भाक विसरून ॥ स्वानंदसमुद्रीं जाहल्या लीन ॥ चतुःषष्टी अंतःकरण ॥ विरून गेलें रघुनाथीं ॥ ८५ ॥ कीं वेदशास्त्रींच्या श्रुती ॥ ऐक्यत्वीं ऐक्यास येती ॥ तैशा आलिंगोनि बैसती ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ८६ ॥ जे कां विषकंठवंद्यप्रियेंसी ॥ तिजप्रति बोले दशकंठजाया ॥ आजि सुदिन म्हणोनियां ॥ दर्शन जाहलें माये तुझें ॥ ८७ ॥ क्षण एक निवांत राहून ॥ मयजा बोले सुवचन ॥ म्हणे सर्वांभूतीं समसमान ॥ रघुनंदन एक असे ॥ ८८ ॥ अनेक तरंग एक सागर ॥ बहुत घरें एक अंबर ॥ अनेक मणी एक सूत्र ॥ तैसा रघुवीर व्यापक असे ॥ ८९ ॥ एक सुवर्ण बहु अलंकार ॥ बहुत तरंग एक नीर ॥ बहुत मातृका एक ओंकार ॥ तैसा रघुवीर व्यापकत्वें ॥ ९० ॥ एक शरीर अवयव अपार ॥ बहुत पत्रें एक तरुवर ॥ बहु जळचर एक नीर ॥ तैसा रघुवीर व्यापक असे ॥ ९१ ॥ एक चराचर सर्वांभूतीं ॥ तोच नांदे अयोध्यापती ॥ तरी दशमुखाची केलिया प्रीती ॥ काय स्थिति उणी होय ॥ ९२ ॥ सकळ देहीं अयोध्याधीश ॥ तरी वेगळा कां भाविसी लंकेश ॥ सीता दुराग्रह विशेष ॥ व्यर्थ कां करिसी सांग पां ॥ ९३ ॥ मयजेचा शब्द ऐकूनी ॥ हंसून बोले जनकनंदिनी ॥ अभेद एक चापपाणी ॥ सर्वांभूतीं भरलासे ॥ ९४ ॥ सर्वही घट मठ जाण ॥ काय फोडून घातलें गगन ॥ अभेद एक रघुनंदन ॥ दुजेपण तेथें कैचें ॥ ९५ ॥ मायिक भासे जगडंबर ॥ जैसा मृगजळाचा मिथ्या पूर ॥ वंध्यावल्लीचें पक्व फळ विचित्र ॥ मिथ्यामय लटिकेंचि ॥ ९६ ॥ स्वप्नींची संपदा पूर्ण ॥ किंवा आरशांतील धन ॥

३३ आकाशांत मावेना. ३४ मदन. ३५ मंदोदरीचें. ३६ भूषण. ३७ गंगा. ३८ यमुना. ३९ मिळाल्या. ४० सीता.

कीं दरिद्रियाचे मनोरथ पूर्ण ॥ मिथ्यामय सर्वचि ॥ ९७ ॥ मिथ्या अलंकार एक सुवर्ण ॥ मिथ्या तरंग एक जीवन ॥ अभेद एक रघुनंदन ॥ तेथें रावण कोण कैंचा ॥ ९८ ॥ ब्रह्मानंदस्वरूपावरी ॥ न दिसे दुजेपणाची कुंसरी ॥ तेथें सीता आणि मंदोदरी ॥ मिथ्या भास लटिकाचि ॥ ९९ ॥ कैंची पृथ्वी कैंचें गगन ॥ कैंचें आप तेज पवन ॥ मिथ्या माया कैंचे त्रिगुण ॥ तेथें रावण कोठें आहे ॥ १०० ॥ जितकें थोर ब्रह्मांड ॥ तैसेंच आकाश प्रचंड ॥ तेथें घट मठ हें बंड ॥ वेगळें व्यर्थ भावावें ॥ १ ॥ तैसा निर्विकार जगजेठी ॥ न चलती द्वैतभावाच्या गोष्टी ॥ तेथें कैंची रावणाची भेटी ॥ बाह्यदृष्टी त्यजीं कां ॥ २ ॥ मैंयजा म्हणे जानकीसी ॥ सर्वव्यापक अयोध्यावासी ॥ किंवा आहे एकदेशी ॥ सांग मजपासीं निश्चयें ॥ ३ ॥ यावरी त्रिभुवनपतीची राणी ॥ बोले विदेहराजनंदिनी ॥ म्हणे त्रिपुटी गेल्या जेथें विरूनी ॥ तटस्थ वाणी निगमांची ॥ ४ ॥ ध्येय ध्याता ध्यान ॥ ज्ञेय ज्ञाता ज्ञान ॥ नुरे भजक भज्य भजन ॥ सांग रावण तेथें कैंचा ॥ ५ ॥ जें जें दिसे तें तें नाशिवंत ॥ वस्तु एक अभेद शाश्वत ॥ मंदोदरी आणि सीता तेथ ॥ कोणीकडे पाहाव्या ॥ ६ ॥ दोरावरी दिसे विस्तार ॥ शुक्तिकेचे ठायीं रजत साचार ॥ तैसाच मायेचा प्रकार ॥ मिथ्याविकार जाण पां ॥ ७ ॥ मयकन्या सावध होय ॥ दृष्टीनें सर्व पाहे अद्वय ॥ निर्विकार वस्तु निरामय ॥ हाही न साहे शब्द जेथें ॥ ८ ॥ वस्तु अव्यक्त अनाम ॥ तेथें राम हेंही न साहे नाम ॥ ऐसें जयासी कळे वर्म ॥ आत्माराम तोचि पैं ॥ ९ ॥ ऐसा जो जाहला परिपूर्ण ॥ त्यास समाधि आणि विधान ॥ बोलणें आणि मौन ॥ दोन्ही त्याचीं विरालीं ॥ ११० ॥ ऐसें जगन्माता बोलत ॥ मयजा ब्रह्मानंदें डुलत ॥ समाधि ग्रासोनि तटस्थ ॥ विराला हेत सर्वही ॥ ११ ॥ बोलणें आणि संवाद ॥ खुंटोनि जाहला अभेद ॥ ओतला एक ब्रह्मानंद ॥ आनंदकंद जगद्गुरू ॥ १२ ॥ आनंद जिरवून अंतरीं ॥ सावध जाहली मंदोदरी ॥ जगन्मातेचे चरण धरी ॥ सद्गद अंतरीं होऊनियां ॥ १३ ॥ म्हणे संशय निरसला पूर्ण ॥ धन्य धन्य आजिचा दिन ॥ विदेहकन्येचे चरण ॥ वारंवार धरी मग ॥ १४ ॥ ब्रह्मानंदें म्हणे श्रीधर ॥ धन्य तो दिवस साचार ॥ सत्संगें आत्मविचार ॥ सारासार होय पैं ॥ १५ ॥ भागीरथी सर्वत्र पवित्र ॥ परी प्रयागमहिमा अपार ॥ तैसा रामविजय परिकर ॥ मंदोदरीसंवाद हा ॥ १६ ॥ सर्वत्र सुलभ ते भीमा ॥ परी पंढरीस अगाध महिमा ॥ स्नान करितां कर्माकर्मा- ॥ पासूनि मुक्त होइजे ॥ १७ ॥ असो सीतेची आज्ञा घेउनी ॥ स्वधामा गेली मयनंदिनी ॥ रावणाप्रती जाउनी ॥ वर्तमान सांगतसे ॥ १८ ॥ तप्तलोहावरी उदक पडलें ॥ तें माघारें निघे एक वेळे ॥ परी जानकी कदाकाळें ॥ वश नव्हे तुम्हांसी ॥ १९ ॥ मृगजळीं बुडेल अगस्ती ॥ तमकूपीं पडेल गंभस्ती ॥ हेंही घडे परी सीता सती ॥ वश नोहे तुम्हांतें ॥ १२० ॥ जे गोष्टीनें होय अनर्थ ॥ आपुले कुळाचा होय घात ॥ ऐशिया बुद्धीनें पंडित ॥ कालत्रयीं न वर्तती ॥ २१ ॥ हातींचें टाकूनि सुवर्ण ॥ कां बळेंच घ्यावें शेण ॥

४१ प्रकार. ४२ मंदोदरी. ४३ ज्ञाता, ज्ञान आणि ज्ञेय; पूजक, पूजा आणि पूज्य, इत्यादि. ४४ वेदांची. ४५ भजण्याला योग्य. ४६ सर्प. ४७ शिंपला. ४८ रुपें. ४९ मापल्या घरीं. ५० सूर्य.

गोड शर्करा ओसंड्डेन ॥ राख कां मुखीं घालावी ॥ २२ ॥ मुक्तें सांडोनि परिकरें ॥ कां पदरीं बांधावीं खापरें ॥ ओसंडोनि रायकेळें आदरें ॥ अर्कीफळें कां भक्षावीं ॥ २३ ॥ याकरितां द्रिपंचवदना ॥ सोडावी रामाची अंगना ॥ कायावाचामनें जाणा ॥ रघुनंदना शरण रिघावें ॥ २४ ॥ परसतीचा अभिलाष ॥ महापुरुषास ठेवणें दोष ॥ बळवंतावरी बांधणें कास ॥ मग अनर्थास काय उणें ॥ २५ ॥ विवेंसी हे परम सीता ॥ अनर्थकारक घोर वनिता ॥ हे नेऊनि द्यावी रघुनाथा ॥ तरीच तुम्हां कल्याण ॥ २६ ॥ महासर्प उशीं घेऊनी ॥ कैसा निजेल सुखशयनीं ॥ बळेंच गृहास लाविल्या अग्नी ॥ मग अनर्थासी काय उणें ॥ २७ ॥ परद्रव्याचा अभिलाष ॥ जाणोनि प्राशन करणें विष ॥ करितां परनिंदा द्वेष ॥ मग अनर्थासी काय उणें ॥ २८ ॥ परम साधु बिभीषण ॥ तुमचा अविवेक देखोन ॥ अयोध्यापतीस गेला शरण ॥ जन्ममरण चुकविलें ॥ २९ ॥ परम प्रतापी रघुनंदन ॥ उदधीवरी तारिले पाषाण ॥ हा प्रताप तुम्ही जाणून ॥ द्वेषबुद्धि कां धरितां ॥ १३० ॥ ऐशिया शब्दसुमनींकरून ॥ मयजेनें पूजिला रावण ॥ मग प्रत्युत्तर हांसोन ॥ देता जाहला ते काळीं ॥ ३१ ॥ प्रिये तूं बोलसी वचनें ॥ तीं मज मानलीं बहुत गुणें ॥ परी आपुला पुरुषार्थ टाकणें ॥ तरी जिणें व्यर्थ लोकीं ॥ ३२ ॥ चिरंजीव जाहला बिभीषण ॥ प्रळयीं तरी पावेल मरण ॥ तोंवरी देहलोभ धरून ॥ बैसतां काय सार्थक ॥ ३३ ॥ कल्पपर्यंत जीवूनी ॥ पांडिलें शरीर बंदिखानीं ॥ या पुरुषार्थासी शुभ कल्याणी ॥ मानी कोण सांग पां ॥ ३४ ॥ आदि पुरुष रघुनंदन ॥ हें मी जाणें सर्व वर्तमान ॥ तो मजसीं युद्धकामना धरून ॥ सागर उतरूनि आला आहे ॥ ३५ ॥ त्याची वासना न पुरवितां ॥ कदा माघारी नेदीं सीता ॥ तरी मी आपुल्या पुरुषार्था ॥ दावोनि राघवा जिंकीन ॥ ३६ ॥ ऐसें ऐकोनि ते अवसरीं ॥ चिंताक्रांत होऊनि मंदोदरी ॥ प्रवेशली निजमंदिरीं ॥ क्लेशचक्रीं पडियेली ॥ ३७ ॥ असो आतां यावरी ॥ रावण चढला गोपुरीं ॥ जैसा बलाहक पर्वतशिखरीं ॥ कृष्णवर्ण उतरला ॥ ३८ ॥ चपळेहून तेज आगळें ॥ अंगीं अलंकार मिरवले ॥ दाही छत्रें ते वेळे ॥ मस्तकावरी विराजती ॥ ३९ ॥ भोंवते सेवकजन बहुत ॥ उपभोग देती समस्त ॥ इकडे बिभीषण रामासी दावीत ॥ रावण गोपुरीं चढला तो ॥ १४० ॥ श्रीराम म्हणे ते अवसरीं ॥ हा परम उंच सुवेळागिरी ॥ अवघे वेंळघोनियां वरी ॥ लंकापुरी पाहूं चला ॥ ४१ ॥ ऐसें बोलतां अयोध्याधीश ॥ उठले तत्काळ कपिपुरुष ॥ सुवेळाचळीं आसपास ॥ चढले तेव्हां वायुवेगें ॥ ४२ ॥ जैशा कनकाचळावरी ॥ चढल्या निर्जरांच्या हारी ॥ तैसा वानरांसह ते अवसरीं ॥ अयोध्याविहारी चढतसे ॥ ४३ ॥ रघुपतीचे दोन्ही कर ॥ धरिती बिभीषण सूर्यकुमर ॥ सुवेळाचळीं रघुवीर ॥ कैसा शोभला ते काळीं ॥ ४४ ॥ उदयाचळावरी बाळमित्र ॥ ऐरावतावरी सहस्रनेत्र ॥ कैलासावरी कर्पूरगौर ॥ त्रिभुवनेश्वर दिसे तेवीं ॥ ४५ ॥ जो लावण्यामृतसागर ॥ स्मरारिमित्र मनोहर ॥ झळ-

५१ टाकून. ५२ मोत्यें. ५३ समुदायानें असलेलीं. ५४ रुईचीं फळें. ५५ विघ्नदेवता. ५६ शब्दरूपी फुलांनीं. ५७ दरवाजाच्या गच्चीवर. ५८ मेघ. ५९ विजेपेक्षांहि. ६० चढून. ६१ देवांच्या.

कती समुद्रदत्त अलंकार ॥ चपळेहूनि तेजागळे ॥ ४६ ॥ तेणें शोभला अयोध्यानाथ ॥ दिव्य पीतवसन विराजत ॥ असो गोपुरावरी लंकानाथ ॥ विलोकीत रामाकडे ॥ ४७ ॥ वानरांसहित रावणारी ॥ शोभतसे सुवेळाद्रीवरी ॥ जैसा इंद्रादि सकळ सुरवरीं ॥ वैकुंठपती वेष्टिला ॥ ४८ ॥ कीं अनंत श्रुत्यर्थसमवेत ॥ तो वेदोनारायण विराजत ॥ किंबहुना वृक्षांसहित ॥ कल्पद्रुम विराजे ॥ ४९ ॥ तैसा महावीरीं वेष्टित ॥ शोभतसे सीताकांत ॥ परी ते समयीं सूर्यसुत ॥ कर्म अद्भुत करिता जाहला ॥ १५० ॥ कुंजर दृष्टीं देखोन ॥ उगा न राहे पंचानन ॥ कोणास न पुसतां मित्रनंदन ॥ अकस्मात उडाला ॥ ५१ ॥ वज्र पडे पर्वतशिखरीं ॥ तैसा सुग्रीव ते अवसरीं ॥ येऊन आदळला रावणावरी ॥ परमावेशेंकरूनियां ॥ ५२ ॥ सव्यहस्तचपेटेतळीं ॥ दाही छत्रें खालीं पाडिलीं ॥ वामहस्तघायें तळीं ॥ मुगुट सर्व पाडिले ॥ ५३ ॥ जैसी विंध्याद्रीवरी अकस्मात ॥ विद्युल्लता येऊन पडत ॥ तैसें अर्कजें केलें विपरीत ॥ लंकानाथ घाबरला ॥ ५४ ॥ मग लत्ताप्रहार ते वेळां ॥ सुग्रीवानें समर्पिला ॥ सवेंच हृदयीं दिधला ॥ मुष्टिघात ते वेळीं ॥ ५५ ॥ मल्लयुद्ध परम अद्भुत ॥ जाहलें एक घटिकापर्यंत ॥ रावण म्हणे वालीऐसें त्वरित ॥ धरून नेईल सुग्रीव हा ॥ ५६ ॥ रामापासीं नेऊन त्वरित ॥ विटंबील सूर्यसुत ॥ पळावयासी निश्चित ॥ मार्ग कोठें दिसेना ॥ ५७ ॥ षोडशखणांचें गोपुर ॥ तयावरूनि महावीर ॥ कोसळले तेव्हां लंकानगर ॥ गजबजलें एकदांचि ॥ ५८ ॥ एक म्हणती आला हनुमंत ॥ नगर जाळावया समस्त ॥ एक म्हणती समुद्रांत ॥ लंका घालील पालथी ॥ ५९ ॥ असो तेव्हां दशकंधर ॥ चुकवोनियां पैं सत्वर ॥ पळाला वेगें जैसा तस्कर[६२] ॥ जागा होतां गृहस्वामी ॥ १६० ॥ मृगेंद्राचे कवेंतून[६३] देख ॥ पूर्वभाग्यें सुटला जंबुक ॥ कीं भुजंगकवेंतूनि मूषक ॥ पळोनि जाय स्वस्थळा ॥ ६१ ॥ असो सुग्रीव तेथोनि उडाला ॥ सुवेळागिरीं पावला ॥ एकच जयजयकार जाहला ॥ हृदयीं धरिला रघुनाथें ॥ ६२ ॥ वृंदारक[६४] गगनींहूनी ॥ पुष्पें वर्षती ते क्षणीं ॥ धन्य सुग्रीव म्हणोनी ॥ तैजनी[६५] मस्तक डोलविती ॥ ६३ ॥ श्रीराम म्हणे सूर्यकुमरा ॥ आजी बृहस्पती चेवला[६६] विचारा ॥ तैसें तूं महावीरा ॥ केलें होतेंच विपरीत ॥ ६४ ॥ समीप असतां सर्व दळें ॥ पुढें उडी न घालावी भूपाळें ॥ असो जय पावला शीघ्रकाळें ॥ हाच लाभ थोर आम्हां ॥ ६५ ॥ तेव्हां आणोनी पुष्पजाती ॥ वानरीं पूजिला किष्किंधापती ॥ दळभारेंसीं सीतापती ॥ पूर्वस्थळास उतरला ॥ ६६ ॥ सकळ जुंत्पतींसह[६७] रघुनंदन ॥ बैसला तेव्हां सभा करून ॥ सुग्रीव आणि बिभीषण ॥ अवघे जवळी बैसले ॥ ६७ ॥ राजाधिराज रामचंद्र ॥ जो चातुर्यगुणसमुद्र ॥ राजनीति बहुविचार ॥ करिता जाहला ते समयीं ॥ ६८ ॥ म्हणे आतां द्विपंचवदन[६८] ॥ सीता नेदी युद्धावीण ॥ यावरी मग बिभीषण ॥ बोलता जाहला तेधवां ॥ ६९ ॥ म्हणे साम दान भेद दंड करून ॥ शत्रु कीजे आपणाआधीन ॥ ओळखूनि समयाचें चिन्ह ॥ तैसें चतुरीं वर्तावें ॥१७०॥ मंत्रें आकर्षिजे विखार[६९] ॥

६२ चोर. ६३ मिठींतून. ६४ देव. ६५ आंगठ्याजवळचें बोट. ६६ चळला. ६७ मल्लांसह. ६८ रावण. ६९ सर्प.

उदकें शांतविजे वैश्वानर ॥ वेदांतज्ञानें भावसमुद्र ॥ उतरूनि जावें पैलतीरा ॥ ७१ ॥ कामक्रोधादि शत्रु थोर ॥ विवेकें जिंकावे साचार ॥ भक्तिबळें सर्वेश्वर ॥ आपणाधीन करावा ॥ ७२ ॥ शमदमबळेंकरून ॥ मनोजय करिती सज्ञान ॥ व्युत्पत्तीच्या बळेंकरून ॥ अर्थ काढिती पंडित ॥ ७३ ॥ पाषाणाखालीं सांपडे हात ॥ तो युक्तीनें काढावा अकस्मात ॥ बळेंकरून ओढितां प्राप्त ॥ व्यथा मात्र होय पैं ॥ ७४ ॥ तैसें आधीं साम करून ॥ वश करावा द्विपंचवदन ॥ समयोचित जाणे ज्ञान ॥ ऐसा शिष्टाईस पाठवावा ॥ ७५ ॥ सभेसी बैसतां जाऊन ॥ दिसे जैसा बृहस्पति प्रवीण ॥ सरस्वती जयासी प्रसन्न ॥ समयोचित शब्द देत ॥ ७६ ॥ वेद शास्त्र पुराण ॥ हें जयासी करतलामलक पूर्ण ॥ तेजस्वी जैसा चंडकिरण ॥ सभास्थानीं तेवीं दिसे ॥ ७७ ॥ जरी वरी लोटले शत्रु समस्त ॥ ते समयीं जैसा वैवस्वत ॥ जैसा कलशोद्भव निश्चित ॥ शत्रुसागर प्राशावया ॥ ७८ ॥ हृदय निर्मळ कपटरहित ॥ भोळा जैसा उमाकांत ॥ श्रेष्ठत्वें सभेंत विराजत ॥ शचीनाथ ज्यापरी ॥ ७९ ॥ ईश्वरीं जयाचें प्रेम ॥ संतांसीं मित्रभाव परम ॥ आचरे सदा सत्कर्म ॥ क्रोध काम दवडोनियां ॥ १८० ॥ यालागीं जगद्वंद्या राघवा ॥ या चिन्हीं मंडित बरवा ॥ ऐसा शिष्टाईस पाठवावा ॥ मयजाधवाजवळिकें ॥ ८१ ॥ तरी नर वानर रीस ॥ कोणास पाठवूं शिष्टाईस ॥ तुम्हीं आम्हीं किष्किंधाधीश ॥ विचार एक काढावा ॥ ८२ ॥ वारणचक्रांत रिघोन ॥ स्वकार्य साधी पंचानन ॥ कीं एकलाचि जाऊन सुपर्ण ॥ अमृतकुंभ घेऊन आला ॥ ८३ ॥ एकलाच जाऊन गुरुपुत्र ॥ साधून आला संजीवनीमंत्र ॥ कीं सागर उडोनि रुद्रावतार ॥ शुद्धि करूनि पातला ॥ ८४ ॥ तैसेंचि कार्य साधून ॥ सत्वर येई परतोन ॥ ऐसा पाठवावा निवडोन ॥ शीघ्रकाळीं तत्त्वतां ॥ ८५ ॥ ऐसें बोलतां बिभीषण ॥ परम संतोषला रघुनंदन ॥ म्हणे धन्य तुझें ज्ञान ॥ सकळकळाप्रवीण होसी ॥ ८५ ॥ रत्नराशी पडल्या अपार ॥ त्यांत अनर्घ्य रत्न प्रभाकर ॥ परीक्षक निवडिती तैसा वीर ॥ वालिपुत्र काढिला ॥ ८७ ॥ बिभीषण म्हणे राजीवनेत्रा ॥ जलदवर्णा चारुगात्रा ॥ पद्मोद्भवजनका स्मरारिमित्रा ॥ अंगदासी पाठवावें ॥ ८८ ॥ हा सर्व लक्षणीं आहे चतुर ॥ जैसा नवग्रहांत दिनकर ॥ कीं विखारांत धरणीधर ॥ तैसा वानरांत अंगद हा ॥ ८९ ॥ कीं शास्त्रांमाजी वेदांत ॥ शस्त्रांत सुदर्शन लखलखित ॥ कीं पक्ष्यांमाजी विनतासुत ॥ बळें अद्भुत तैसा हा ॥ १९० ॥ ऐकतां तोषला रघुनंदन ॥ म्हणे हें तुम्हीं उत्तम निवडिलें रत्न ॥ तंव तो अंगद कर जोडून ॥ रघुपतीप्रती बोलत ॥ ९१ ॥ म्हणे पुराणपुरुषा परमानंदा ॥ भक्तहृत्पद्मकोशामिलिंदा ॥ जगदंकुरमूळकंदा ॥ आज्ञा काय ते मज द्यावी ॥ ९२ ॥ राजीवाक्षा रणरंगधीरा ॥ असुरकाननवैश्वानरा ॥ जनकजामाता अति उदारा ॥ आज्ञा काय ती मज सांग ॥ ९३ ॥ चराचरफलांकितद्रुमा ॥ विशाळभाळा पूर्णकामा ॥ अज अजित आत्मारामा ॥ आज्ञा काय ती मज सांगा ॥ ९४ ॥ रावण आणि कुंभकर्ण ॥ ये क्षणीं येथें आणूं बांधोन ॥ कीं हे लंका उचलून ॥

७० अग्नि. ७१ रावण. ७२ तळहातांतला आंवळा. ७३ सूर्य. ७४ यम. ७५ अगस्ति. ७६ इंद्र. ७७ रावणापाशीं. ७८ हर्षांच्या झुडींत. ७९ सिंह. ८० गरुड. ८१ कन्या. ८२ मारुती. ८३ अमोल. ८४ अंगद. ८५ मेघश्याम. ८६ सर्पांमध्यें. ८७ शेष. ८८ भ्रमर.

घालूं पालथी सागरीं ॥ ९५ ॥ ऐकोन अंगदाचे बोल ॥ संतोषला तमालनीळ ॥ म्हणे धन्य तो वालि पुण्यशील ॥ अद्भुत बळ तयाचें ॥ ९६ ॥ कक्षेसीं दाटोनि रावण ॥ चतुःसमुद्रीं केलें स्नान ॥ त्याचे पोटीं पुत्र निधान ॥ बळ गहन तैसेंच तुझें ॥ ९७ ॥ तरी लंकेसी जाऊन ये समयीं ॥ रावणासी करीं शिष्टाई ॥ म्हणावें जानकीस देईं ॥ सामोपचारेंकरूनियां ॥ ९८ ॥ तुवां मज न कळतां येऊन ॥ चोरिलें जानकीचिद्रत्न ॥ तरी एकदा क्षमा केली पूर्ण ॥ देईं आणोनि झडकरी ॥ ९९ ॥ सीता देतांचि तत्काळ ॥ तूं लंकेसी नांदसी अचळ ॥ नाहीं तरी निर्मूळ कुळ ॥ तुझें करीन निर्धारें ॥ २०० ॥ ऐसें ऐकतां वालिसुत ॥ नमस्कारीत जनकजामात ॥ आज्ञा घेऊन त्वरित ॥ गगनपंथें उडाला हो ॥ १ ॥ दशमुखाचे सभेआंत ॥ उतरता जाहला अकस्मात ॥ कीं वानररूपें जैसा आदित्य ॥ एकाएकीं प्रगटला ॥ २ ॥ कां वैकुंठाहूनि सेंपारी ॥ अवचितां येत उर्वीवरी ॥ कीं कर्मभूमीस निर्धारीं ॥ योगभ्रष्ट उतरला ॥ ३ ॥ दृष्टीं देखतां अंगदवीर ॥ चमकले सभेचे असुर ॥ शस्त्रें उभारूनि समग्र ॥ सरसावले ठायीं ठायीं ॥ ४ ॥ म्हणती एकचि आला वानर ॥ तेणें पूर्वी जाळिलें लंकानगर ॥ सुग्रीवें गोपुरीं येऊनि समग्र ॥ छत्रें पाडिलीं रावणाचीं ॥ ५ ॥ हा निर्भय निःशंक बहुत ॥ एकलाचि आला सभेआंत ॥ असो चहूंकडे तारासुत ॥ पाहे न्याहाळोनि सभेतें ॥ ६ ॥ मग बोले वालिनंदन ॥ सभेस आला जो परस्थळींहून ॥ त्यासी न पुसती सभाजन ॥ तरी ते शतमूर्ख जाणावे ॥ ७ ॥ शृगालसभेंत पंचानन ॥ येतां दचकती अवघे जन ॥ कीं देखतां विनतानंदन ॥ विखार जैसे दचकती ॥ ८ ॥ कीं उदया येतां दिनकर ॥ दिवाभीतें विटती समग्र ॥ कीं इंदु विलोकितां तस्कर ॥ कंटाळती जैसे कां ॥ ९ ॥ कीं पंडित येतां सभेप्रती ॥ मनीं विटती अल्पमती ॥ कीं ते कोकिळ गर्जती वसंतीं ॥ वायस मानिती संताप ॥ २१० ॥ दृष्टीं देखतां संतभक्त ॥ निंदक विटती समस्त ॥ तैसे तुम्ही राक्षस उन्मत्त ॥ मज देखतां त्रासलेती ॥ २१ ॥ मग सभास्तंभ पृष्ठीं घालून ॥ पुच्छासनीं बैसे वालिनंदन ॥ उंच दिसे रावणाहून ॥ तेजेंकरूनी विशेष ॥ १२ ॥ म्हणे गर्विष्ठा दशवदना ॥ मीं आलों असें कवण्या कारणा ॥ तें कां न पुससी मलिनीं ॥ कोणें विचारें सांग पां ॥ १३ ॥ मी आहें शक्रांत्मजसुत ॥ अयोध्यापतीचा असें दूत ॥ तरी मी शिष्टाईस आलों येथ ॥ अंतरें तुझें पाहावया ॥ १४ ॥ याउपरी वीर अंगद ॥ रावणासी करील बोध ॥ तें संतीं परिसावें विशद ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ १५ ॥ रविकुळभूषण रघुवीर ॥ जो साधुहृदयपंकजकीर ॥ तो ब्रह्मानंद श्रीधरवर ॥ अभंग साचार न विटे कदा ॥ १६ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ चतुर्विंशतितमोध्याय गोड हा ॥ २१७ ॥ ॥ अध्याय ॥ २४ ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

---

८९ राम. ९० काजेंत. ९१ गरुड. ९२ अकस्मात. ९३ अंगद. ९४ सर्प. ९५ कंटाळतात. ९६ पाप्या. ९७ अंगद. ९८ मन. ९९ कीर=पोपट.

२५
-जोशी-अडेकर-

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ पूर्वी क्षीरसिंधु मंथूनी ॥ चतुर्दश रत्नें काढिलीं निवडूनी ॥ तैसा रामकथार्णव शोधूनी ॥ रामविजय काढिला ॥ १ ॥ दह्यांचे पोटीं निघे नवनीत ॥ कीं स्वातीतोयापासाव मुक्त ॥ तैसा दशरथापासाव रघुनाथ ॥ महिमा अद्भुत तयाचा ॥ २ ॥ कीं ज्ञानापासोनि शांती ॥ कीं शांतीपासोनि विरक्ती ॥ कीं विरक्तीपासोनि निवृत्ती- ॥ पद विशेष पाविजे ॥ ३ ॥ तैसा वाल्मीकमतीचा विस्तार ॥ तो हा रामकथाब्धि साचार ॥ याचा पावावया पैल पार ॥ वक्त्यासी शक्ती नव्हेचि ॥ ४ ॥ जो पीडिला दरिद्रेंकरून ॥ त्यास मार्गी सांपडे बहुत धन ॥ परी तो यथाशक्तिकरून ॥ मोट बांधी जैसी कां ॥ ५ ॥ तैसा यथामतीकरून ॥ रामविजय निवडिला पूर्ण ॥ असो पूर्वाध्यायीं वाँलिनंदन ॥ रावणासन्मुख बैसला ॥ ६ ॥ मुकुटावरी शोभे दिव्य मणी ॥ तैसा अंगद विराजे पुच्छासनीं ॥ म्हणे दशमुखा ऐकें श्रवणीं ॥ शब्दरत्नें अति सुरस ॥ ७ ॥ नरदेहासी येऊन पाहीं ॥ कीर्ति उरवावी भुवनत्रयीं ॥ जेणें धन्य धन्य सर्वही ॥ बहुकाळ मागें म्हणतील ॥ ८ ॥ विवेकसद्बुद्धीच्या बळें ॥ दुर्बुद्धि त्यजावी कुशळें ॥ संतसंगतीं रसाळें ॥ वचनें हृदयीं धरावीं ॥ ९ ॥ कोणाचें हेळण न करावें ॥ दुष्ट वचन न बोलावें ॥ पराचे गुण जाणोनि बरवे ॥ परोपकार करावा ॥ १० ॥ ज्याची वर्तणूक देखोन ॥ संतुष्ट होती ब्राह्मण ॥ ते सदा चिंतिती कल्याण ॥ तरीच धन्य संसारीं ॥ ११ ॥ सर्वांभूतीं जगन्निवास ॥ यास्तव न कीजे कवणाचा द्वेष ॥ वँर्मस्पर्शाचे शब्द सदोष ॥ सहसा कोणा न बोलावे ॥ १२ ॥ काम क्रोध मद मत्सर ॥ हे शत्रु घालावे बाहेर ॥ नाशिवंत जाणोनि शरीर ॥ सारासार विचारिजे ॥ १३ ॥ सकळ सत्कर्माचरण ॥ करावें वेदाधारेंकरून ॥ मी कर्ता हा अभिमान ॥ सहसाही न धरावा ॥ १४ ॥ जैसें जळावरी जँलजपत्र ॥ परी न भिजे अणुमात्र ॥ तैसीं सत्कर्में करूनि सर्वत्र ॥ न लिंपावें कोठेंही ॥ १५ ॥ मँनोजयकरणी करूनी ॥ मति योजावी भगवद्भजनीं ॥ जँगदाभास मिथ्या मानोनी ॥ आत्मस्वरूपीं रमावें ॥ १६ ॥ परधन आणि पँरदारा ॥ तेथें चित्त न घालीं राक्षसेंद्रा ॥ सद्भाव धरिंजे बरा ॥ सद्गुरुवचनीं सर्वदा ॥ १७ ॥ सत्समागमीं चित्त ठेवून ॥ दूर त्यागावे दुर्जन ॥ क्लेशकाळ आलिया पूर्ण ॥ स्वधर्माचरण न सांडावें ॥ १८ ॥ यथान्याय राज्य करीं ॥ दुष्ट तितुके आधीं संहारी ॥ मग सद्भजनीं अहोरात्रीं ॥ तनू आपुली झिजवावी ॥ १९ ॥ शम दम उपरती ॥ दया क्षमा तितिक्षा शांती ॥ ह्या जवळी रक्षाव्या नृपती ॥ अहोरात्र प्रीतीनें ॥ २० ॥ भक्ति वैराग्य ज्ञान ॥ आनंद सद्विद्या समाधान ॥ हीं जवळ रक्षावीं अँनुदिन ॥ आत्मप्राप्तीकारणें ॥ २१ ॥ दैवें भाग्य विद्या होय अपार ॥ त्याचा गर्व न धरावा अणुमात्र ॥ अथवा कालांतरीं आलिया दरिद्र ॥ परी धीर न सांडावा ॥ २२ ॥ यालागीं दशमुखा अवधारीं ॥ माझीं शब्दरत्नें हृदयीं धरीं ॥ तरी अयोध्याप्रभूसीं मैत्री ॥ सर्वभावें करावी ॥ २३ ॥ श्रीराम केवळ गुणनिधान ॥ दुजयाचे अपार दोषगुण ॥ तत्काळ जाय विसरून ॥

१ लोणी. २ मोती. ३ मोक्षपद. ४ अंगद. ५ मर्ममेदक. ६ कमळिणीचें पान. ७ चित्ताची एकाग्रता करून. ८ जगाचा दृश्य पसारा. ९ परस्त्री. १० दररोज.

अंतःकरण शुद्ध सदा ॥ २४ ॥ पराचे ऐकोनि सद्गुण ॥ स्वयें वाखाणी रघुनंदन ॥ एकबाण एकवचन ॥ एकपत्नीव्रती जो ॥ २५ ॥ त्या रघुपतीसीं सख्य करूनी ॥ अर्पीं आतां जनकनंदिनी ॥ मग तूं अक्षयी लंकाभुवनीं ॥ चंद्रार्कवरी नांदें कां ॥ २६ ॥ तूं जयाचा म्हणविसी भक्त ॥ तो शिव रघुपतीसी ध्यात ॥ त्यासीं वैर करितां यथार्थ ॥ स्वामिद्रोही होसी तूं ॥ २७ ॥ सनक सनंदन सनत्कुमार ॥ मुख्य विरिंचि आणि पुरंदर ॥ हे रघुपतीचे आज्ञाधार ॥ तरी तो मित्र करीं तूं ॥ २८ ॥ जो वेदउदयाचळींचा दिनकर ॥ जो महामायेचा निजवर ॥ तो हा अयोध्यानाथ उदार ॥ तरी तो मित्र करीं तूं ॥ २९ ॥ जो सुनीळ चिद्घनगर्भ ॥ जो अनंत ब्रह्मांडांचा आरंभ ॥ गुणसागर सीतावल्लभ ॥ तरी तो मित्र करीं तूं ॥ ३० ॥ कमलोद्भव कमलाकार ॥ कपालधर[11] ज्याचे आज्ञाधर[12] ॥ तो हा जगद्वंद्य रघुवीर ॥ तरी तो मित्र करीं तूं ॥ ३१ ॥ वेद शास्त्र पुराण जाण ॥ नारदादि गाती जयाचे गुण ॥ तो हा देशशतमुखांगशयन[13] ॥ तरी तो मित्र करीं तूं ॥ ३२ ॥ शतकोटी अपराध करून ॥ तो जरी परतोन आला शरण ॥ तरी तयावरी रघुनंदन ॥ सर्वांहून प्रीति करी ॥ ३३ ॥ भक्तिभावें अर्पितां तीळ ॥ राम मानी जैसा कनकाचळ[14] ॥ जो भक्तांचा होऊन द्वारपाळ ॥ अंतर्बाह्य रक्षीत पैं ॥ ३४ ॥ तरी त्या द्विपंचरथनंदना[15] ॥ शरण जाईं द्विपंचवंदना[16] ॥ जनकजा हे मम कन्या ॥ भावूनि अर्पीं रघूत्तमा ॥ ३५ ॥ दशकंठा तूं परम सज्ञान ॥ टाकिलीं वेदांचीं खंडें करून ॥ तरी पद्मिणीपतिकुळभूषण[17] ॥ सखा करीं सर्वस्वें ॥ ३६ ॥ ऐसीं अंगदाचीं वचनें ॥ जीं विवेकभूमीचीं निधानें ॥ कीं भक्तिसागरींचीं रत्नें ॥ दशकंठासी समर्पिलीं ॥ ३७ ॥ यावरी तो दशकंठधर ॥ परम दुर्बुद्धि अविचार ॥ घृतें शिंपिजे वैश्वानर ॥ तैसा क्षोभला ते काळीं ॥ ३८ ॥ साधूचें वर्म लक्षून ॥ छळिती जेवीं दुर्जन ॥ तैसा अंगदाप्रती रावण ॥ बोलता झाला ते काळीं ॥ ३९ ॥ म्हणे रे मर्कटा अविचारा ॥ कोणाचा तूं पालेखाईरा[18] ॥ मज रावणासीं पामरा ॥ शिष्टाई करूं आलासी ॥ ४० ॥ मशका अमीपुढें तृण ॥ कीं शिवापुढें पंचबाणें ॥ कीं मृगेंद्रासी गुण ॥ जंबुक शिकवूं पातला ॥ ४१ ॥ मर्कटा तुझा पिता कोण ॥ तो सांगें मजलागून ॥ यावरी तारा[19]हृदयरत्न ॥ प्रतिवचन देतसे ॥ ४२ ॥ माझा पिता आहे कोण ॥ तो तूं नेणसी दुर्जना अझून ॥ जेणें कक्षेंत तुज दाटून ॥ केलें स्नान चतुःसमुद्रीं ॥ ४३ ॥ मग माझे पालखांवरी[20] देख ॥ तुज बांधिला जैसा मशक ॥ तुझ्या दाढ्या मिशा सकळिक ॥ म्यांच उपडिल्या बाळपणीं ॥ ४४ ॥ माझ्या मूत्रोदकेंकरून ॥ मशका तुझें कंटाळलें मन ॥ मग तुझा पिता येऊन ॥ भिक्षा मागे वाळीसी ॥ ४५ ॥ तुझे मुखांसी मसी लावून ॥ शिरीं पांच पाट काढून ॥ लंकेंत दिघला तुज भिरकावून ॥ पायीं धरून ते काळीं ॥ ४६ ॥ ऐसा शक्रसुत[21] महाबळी ॥ तूं गुंतलासी ज्याचे कक्षेतळीं[22] ॥ तयाचा मी सुत ये काळीं ॥ शिक्षा तुज करूं आलों ॥ ४७ ॥ आतां पुससी कवणाचा दूत ॥ अयोध्यापती जो रघुनाथ ॥ तुझ्या उरावरील

११ शंकर. १२ शेषशायी. १३ क्षीरसागरांत असलेला शेषनाग. १४ सोन्याचा पर्वत. १५ दशरथपुत्रास. १६ दशवदना. १७ सूर्यवंशाला अलंकार असा राम. १८ पाला खाणारा, वानर. १९ ताऱ्याचा पुत्र. २० पाळण्यावर. २१ वाळी. २२ कांखेत.

चाप अद्भुत ॥ जेणें उचलोनि मोडिलें ॥ ४८ ॥ जेणें ताटिका मर्दून ॥ वीस कोटी पिशिताशन ॥ त्यांसहित सुबाहू मारून ॥ मारीच उडविला बाणवातें ॥ ४९ ॥ तुझी भगिनी शूर्पणखा ॥ जेणें केली निर्नासिका ॥ तो सौमित्राग्रज स्मरारिसखा ॥ त्याचा दूत मी असें ॥ ५० ॥ वधोनियां खर दूषण ॥ निष्कंटक केलें जनस्थान ॥ त्या रामपंचाननाची[२३] वस्तु चोरून ॥ घेऊन आलासी जंबुका ॥ ५१ ॥ होमशाळेंत रिघोन श्वान ॥ पळे पुरोडाश घेऊन ॥ कीं देवगृहांत मलिन ॥ हिंसक जैसा संचरे ॥ ५२ ॥ कीं गृहीं नसतां मुख्य धनी ॥ तस्कर रिघे कोशसदनीं ॥ तैसी जानकी उचलोनी ॥ आलासि घेऊन पतिता ॥ ५३ ॥ त्या तुज चोराचा काढीत माग ॥ सुवेळेसी[२४] आला सीतारंग ॥ तुझे आयुष्याची भरली सीगें[२५] ॥ तें तूं नेणसी शतमूर्खा ॥ ५४ ॥ पुच्छीं पाय पडतां देख ॥ खवळे जैसा दंदशूक[२६] ॥ तैसा प्रतिउत्तर दशमुख ॥ अंगदासी देतसे ॥ ५५ ॥ म्हणे रे मर्कटा मी दशवदन ॥ वानरासहित रामलक्ष्मण ॥ क्षणें टाकवीन गिळोन ॥ कुंभकर्णातें सांगोनियां ॥ ५६ ॥ सुरांसहित सहस्रनेत्रेंन[२७] ॥ बंदीं घातला आकळून ॥ तेथें काय मानव रामलक्ष्मण ॥ जीतचि आणीन धरूनी ॥ ५७ ॥ गरुडें सर्पमस्तकींचा मणि ॥ नेला तो जरी देईल आणोनी ॥ तरी तुम्हांस जनकनंदिनी ॥ प्राप्त होईल माघारी ॥ ५८ ॥ गजमस्तक विदारून ॥ मुक्तें घेऊन गेला पंचानन ॥ तो भिऊन देईल जरी परतोन ॥ तरी जानकी देईन मी ॥ ५९ ॥ अरे इंद्र माळा गुंफोन ॥ नित्य देई मजलागून ॥ छत्र धरी रोहिणीरमण[२८] ॥ सहस्रकिरण[२९] दीपिका धरी ॥ ६० ॥ रसनायक[३०] वाहे पाणी ॥ वस्त्रें धूत सदा अग्नी ॥ गृहींचा केर काढूनी ॥ लोकप्राणेश[३१] टाकीतसे ॥ ६१ ॥ ऐसा मी समर्थ दशवक्त्र ॥ तेथें कायसे नरवानर ॥ मागें एक पालेखाइर[३२] ॥ चोरून लंकेंत आला होता ॥ ६२ ॥ तेणें उपडितां अशोकवन ॥ आम्हीं सभेसी आणिलें धरून ॥ पुच्छास लावतां अग्न ॥ नगर जाळूनी पळाला ॥ ६३ ॥ तो पुन्हां भेटेल जरी वानर ॥ तरी तत्काळचि करीन चूर ॥ मग म्हणे वाळिपुत्र ॥ ऐक मशका राक्षसा ॥ ६४ ॥ तुझें असंख्य दळ संहारून ॥ टाकिले सात पुत्र मारून ॥ इंद्रजित विवरीं कोंडून ॥ अशोकवन विध्वंसिलें ॥ ६५ ॥ तैं तुझें बळ रावणा ॥ कोठें गेलें होतें खळा मलिना ॥ तुज शिक्षा करावया दुर्जना ॥ पुनः मारुती आला आहे ॥ ६६ ॥ त्रिभुवनपति सीतावल्लभ ॥ जो त्रैलोक्यनगरारंभस्तंभ[३३] ॥ त्यास मनुष्य म्हणसी तूं रासभ ॥ दशमुखा यथार्थ तूं ॥ ६७ ॥ इतर ओहळ आणि भागीरथी ॥ वैरकड[३४] गज आणि ऐरावती ॥ उच्चैःश्रवा जो सूर्यरथीं ॥ इतर अश्वांसमान नोहे ॥ ६८ ॥ खद्योत आणि चंडकिरण ॥ किंवा काग आणि सुपर्ण ॥ तैसा वानर आणि वायुनंदन ॥ नव्हती समान राक्षसा ॥ ६९ ॥ परिस आणि इतर पाषाण ॥ वैरकड[३५] पशू आणि शिववहन[३६] ॥ भगणें[३७] आणि रोहिणीरमणें[३८] ॥ नव्हे समान राक्षसा ॥ ७० ॥ इतर पर्वत आणि कनकाचळ ॥ इतर किरडें आणि फणिपाळ[३९] ॥ तैसा मनुष्यासमान तमालनीळ ॥ अपवित्रा तूं केवीं म्हणसी

२३ रामरूपी सिंहाची. २४ त्रिकूटपर्वतावर. २५ अवधि. २६ सर्प. २७ इंद्र. २८ चंद्र. २९ सूर्य. ३० वरुण. ३१ वारा. ३२ वानर. ३३ त्रैलोक्यरूपी नगराचा मूळस्तंभ. ३४ सामान्य, इतर. ३५ नंदिकेश्वर. ३६ नक्षत्रें. ३७ चंद्र. ३८ शेष. ३९ श्रीरामचंद्र.

॥ ७१ ॥ तूं दशमुखांचा बर्‍हंत होसी ॥ शिववरें मातलासी ॥ सीतादेवी निश्चयेंसीं ॥ आदिमाया भवानी ॥ ७२ ॥ रणमंडळ हें होमकुंड ॥ राक्षस आहुती पडतील उदंड ॥ शेवटीं पूर्णाहुती प्रचंड ॥ तुझी पडेल दशमुखा ॥ ७३ ॥ तुवां केलें वेदाध्ययन ॥ जैसा रासभावरी[४४] वाहिला चंदन ॥ कीं षड्रसांमाजी नेऊन ॥ दर्वी[४५] जेवीं फिरविजे ॥ ७४ ॥ तूं दशमुखांचें वनचर[४६] ॥ तुज वधावया पारधी रघुवीर ॥ सुवेळाचळीं[४७] समरधीर ॥ येऊन उभा ठाकला ॥ ७५ ॥ अंगदशब्द परम कठीण ॥ हृदयीं खोंचती जैसे बाण ॥ परम क्रोधें रावण ॥ वाळिनंदनाप्रती बोले ॥ ७६ ॥ म्हणे रे मर्कटा वनचरा ॥ तूं भूभार झालासि पामरा ॥ तुझा पिता मारूनि तारा ॥ सुग्रीवासी दीधली ॥ ७७ ॥ पितृसूड न घेववे तुझेनी ॥ तरी प्राण देईं समुद्रजीवनीं ॥ अथवा माझे पाठीसी येऊनी ॥ रिघें वेगीं मशका रे ॥ ७८ ॥ वधोनि सुग्रीव रघुनंदन ॥ तुज किष्किंधेचें राज्य देईन ॥ तुझी माता व्यभिचारीण ॥ सुग्रीवासी तिनें वरिलें ॥ ७९ ॥ सुग्रीव आणि रघुवीर ॥ तुझे मुख्य शत्रु साचार ॥ अंगद म्हणे शौक्रकुमर[४८] ॥ रामबाणें मुक्त जाहला ॥ ८० ॥ राघव-प्रसादेंकरूनी ॥ वाळी अक्षय्य सायुज्यसदनीं ॥ दशमुखा तुज ये क्षणीं ॥ शिक्षा करीन पाहें पां ॥ ८१ ॥ माझिया पाणिप्रहारेंकरूनी[४९] ॥ दशमुखें तुझीं टाकीन फोडूनी ॥ तुझा पुरुषार्थ त्रिभुवनीं ॥ सर्व जाणतों अपवित्रा ॥ ८२ ॥ सहस्रार्जुनाचे बंदीं जाऊन ॥ पडला होतासी तूं कित्येक दिन ॥ तो तूं आजि येथें वदन ॥ दाखवितां न लाजसी ॥ ८३ ॥ मग बळीचे गृहा जाऊन देखा ॥ बंदीं पडिलासी तूं मशका ॥ तेथें तुज दासी झेलिती कीटका ॥ कक्षेसी[५०] दाटिती घडी घडी ॥ ८४ ॥ ऐसा पुरुषार्थी तूं देख ॥ न लाजसी दाखवितां मुख ॥ तुझे छेदावया दहाही मस्तक ॥ रघुवीर सिद्ध जाहलासे ॥ ८५ ॥ ऐसें ऐकोनि दशकंधर ॥ द्विजपंक्तीनें[५१] चावी अधर ॥ सवेग ओढिलें शस्त्र ॥ विद्युत्प्राय ते काळीं ॥ ८६ ॥ सेवकांसी म्हणे दशकंठ ॥ धरा रे वेगीं मर्कट ॥ तों चौघे राक्षस बळकट ॥ धांवोनियां धरिते जाहले ॥ ८७ ॥ अंगद दंडीं दृढ धरिला ॥ वाळिपुत्रें देखोनि ते वेळां ॥ अद्भुत पराक्रम प्रकट केला ॥ क्षणमात्र न लागतां ॥ ८८ ॥ कृतांतकिंकाळीसमान[५२] ॥ हांकेसरसें गाजवी गगन ॥ रावणाचे हृदयीं पूर्ण ॥ पुच्छघाय दीधला ॥ ८९ ॥ रावणमस्तकींचा मुकुट तेजाळ ॥ पदांगुष्ठें उडविला तत्काळ ॥ ऊर्ध्व उडाला सबळ ॥ मंडप मस्तकीं बैसला ॥ ९० ॥ चौदा गांवें जो विस्तीर्ण ॥ प्रभेस उणा चंडकिरण ॥ तो घेऊन वाळिनंदन ॥ गेला क्षण न लागतां ॥ ९१ ॥ भुजीं जडले चौघे जण ॥ त्यांचे अंतराळीं गेले प्राण ॥ लोंबती प्रेतें होऊन ॥ वाळिनंदन जातसे ॥ ९२ ॥ आला देखोनि वाळिसुत ॥ आश्चर्य करी जनकजामात ॥ अंगद उतरला अकस्मात ॥ कपिनाथ हर्षले ॥ ९३ ॥ दंडींचीं प्रेतें सोडवूनी ॥ मंडप तेव्हां ठेविला धरणीं ॥ त्रिभुवनपतीचे चरणीं[५३] ॥ मस्तक अंगदें ठेविला ॥ ९४ ॥ प्रीतीनें येऊनि मिलिंदे[५४] ॥ सेवी पद्मकोशींचा सुगंध ॥ तैसाच वीर अंगद ॥ रघुवीरपदाब्जीं मीनला[५५] ॥ ९५ ॥ मग तो जगदा-

४० बोकड. ४१ गर्दभावर. ४२ पळी. ४३ जनावर. ४४ त्रिकूटावर. ४५ वाळी. ४६ झाडाच्या तडाक्यानें. ४७ कांबेत. ४८ दांतांनीं. ४९ यमाच्या किंकाळीसारखी. ५० रामाचे. ५१ भ्रमर.

नंदकंद ॥ आलिंगी हृदयीं प्रेमें अंगद ॥ सकळ कपींसी आनंद ॥ वाळिपुत्रासी भेटतां ॥ ९६ ॥ रावणाचा मुकुट ते वेळां ॥ अंगदें रामापुढें ठेविला ॥ तो बिभीषणाचे मस्तकीं घातला ॥ दशरथात्मजें ते वेळीं ॥ ९७ ॥ अंगदास म्हणे रघुनंदन ॥ मंडप येथें आणिला उचलोन ॥ पुढें कोठें बैसेल बिभीषण ॥ सिंहासन घालूनियां ॥ ९८ ॥ ऐसें वाळिसुतें ऐकोनी ॥ मंडप उचलिला ते क्षणीं ॥ शेष मस्तकीं धरी अवनी[५२] ॥ तैसा घेऊन जातसे ॥ ९९ ॥ जेथींचा तेथें मंडप ठेविला ॥ सुवेळेसी परतोन आला ॥ राक्षससमुदाय ते वेळां ॥ आश्चर्य परम मानीत ॥ १०० ॥ केवढा पुरुषार्थ करूनी ॥ राक्षसेंद्रासी गांजोनी ॥ मंडप गेला घेऊनी ॥ सवेंच आणून ठेविला ॥ १ ॥ असो राघवापुढें वाळिनंदन ॥ सांगे लंकेचें वर्तमान ॥ नानापरी बोधिला रावण ॥ परी तो नायके दुष्टात्मा ॥ २ ॥ गिरिमस्तकीं वर्षे जलधर ॥ परी तेथें न राहे अणुमात्र नीर ॥ तैसा बोधिला दशकंधर ॥ स्थिर नोहे बोध तेथें ॥ ३ ॥ नित्य दुग्धें न्हाणिला वायस ॥ परी तो कदा न होय राजहंस ॥ दह्यांमाजी कोळसा बहुवस ॥ घालितां उजळ नव्हेचि ॥ ४ ॥ सिकता[५३] शिजविली बहुकाळ ॥ परी ते कदा नव्हे मवाळ ॥ कीं परीस नेऊन तत्काळ ॥ खापरासी व्यर्थ लाविला ॥ ५ ॥ जन्मांधापुढें दीप जाणा ॥ कीं बधिरापुढें वाजविला रुद्रवीणा ॥ सारासार समजेना ॥ शतमूर्खा जैसा कां ॥ ६ ॥ कीं शर्करेमाजी नेऊन ॥ कडू दुधियाँ[५४] ठेविला बहुदिन ॥ परी त्याचें अंतर पूर्ण ॥ गोड नव्हे अणुमात्र ॥ ७ ॥ षोडशोपचारें पूजिलें प्रेत ॥ परी तें गेलें जैसें व्यर्थ ॥ तैसा बोधिला लंकानाथ ॥ परी तो नायके सर्वथा ॥ ८ ॥ जोंवरी शीतांशी[५५] चंडकिरण[५६] ॥ तोंवरी केला राजा बिभीषण ॥ एकवचनी तूं सीतारमण ॥ तुझें वचन व्यर्थ नव्हे ॥ ९ ॥ युद्ध केलियावांचोनी ॥ कदा नेदी जनकनंदिनी ॥ राघवेंद्रें ऐसें ऐकोनी ॥ चंडदोर्दंड[५७] पीटिले ॥ ११० ॥ जैसा रजनीअंतीं वासरमणी ॥ अकस्मात पूर्वेस देखिजे जनीं ॥ तैसी कोदंडाची गवसणी ॥ नरवीरोत्तमें काढिली ॥ ११ ॥ कीं ते मेघांतूनि वेगळी ॥ प्रळयचपळा निवडिली ॥ तैसी गवसणी काढितां प्रभा पडली ॥ कोदंडाची अकस्मात ॥ १२ ॥ क्षण न लागतां चढविला गुण ॥ उभा ठाकला सीतारमण ॥ ओढी ओढितां आकर्ण ॥ थरारलीं सप्त द्वीपें ॥ १३ ॥ काळाचे मनीं बैसे दचक ॥ तैसी सुग्रीवें दिधली हांक ॥ अठरा पद्मे वानर देख ॥ गर्जना करीत उठले पैं ॥ १४ ॥ बाहात्तर कोटी रीस ॥ हांकेसरिसे भरिती आकाश ॥ पृथ्वी डळमळितां नागेशं[५८] ॥ ग्रीवा खालीं सरसावी ॥ १५ ॥ दिग्गजांचीं बैसलीं टाळीं ॥ कूर्मपृष्ठी तेव्हां थरारिली ॥ यज्ञवराह पृथ्वीतळीं ॥ सांवरीत दंतानें ॥ १६ ॥ एकदांचि कपींचे भुभुःकार ॥ ऐकतां दचकले निर्जर ॥ धुळीनें दिशा दाटल्या समग्र ॥ मेरुमांदार कांपती ॥ १७ ॥ वीस कोटी वानर घेऊन ॥ लंकेवरी धांवला सुषेण ॥ जेवीं वारणेंचक्रावरी पंचाननें[५९] ॥ गर्जत धांवे निःशंक ॥ १८ ॥ सकळ पापासी रामनाम ॥ जैसें जाळूनि करी भस्म ॥ तैसा तो वानरोत्तम ॥ अंजनीतनय धांविन्नला ॥ १९ ॥ सकळ वान-

५२ पृथ्वी. ५३ वालू. ५४ भोपळा. ५५ चंद्र. ५६ सूर्य. ५७ स्फुरण पावलेले मसे मोठे बाहुदंड. ५८ शेष. ५९ हत्तींच्या समुदायावर. ६० सिंह.

रांसीं सेनापती ॥ नीळ घांवित्नला समीरगती ॥ धुळीनें लोपला गभस्ती ॥ वाटे कल्पांत मांडला ॥ १२० ॥ झाला एकचि हाहाकार ॥ गजबजिलें लंकानगर ॥ वेळा सांडोनि नंदेश्वर ॥ बुडवूं पाहे उर्वीतें ॥ २१ ॥ उदकावरी तुंबिनीफळ ॥ तैसें डळमळे भूमंडळ ॥ वरी आसुडती निराळ ॥ भेंगणें भडभडां रिचवती ॥ २२ ॥ मेरूऐसे लंकेचे हुडे ॥ वरी रचिले शस्त्रांचे जुंबाडे ॥ प्रळयविजूचेनि पाडें ॥ नग शस्त्रें झळकती ॥ २३ ॥ लंकादुर्गावरी सत्वर ॥ बळें चढती प्रतापशूर ॥ केशीं धरूनि रजनीचर ॥ आसुडोनि खालीं पाडिती ॥ ॥ २४ ॥ उल्हाटयंत्रांचे भडिमार ॥ कोट्यनुकोटी करिती असुर ॥ भिंडिमाळा शस्त्रें अपार ॥ राक्षस वरून भिरकाविती ॥ २५ ॥ कोट्यनुकोटी पर्वत थोर ॥ एकदांच झोंकिती वानर ॥ वरिले यंत्रें होती चूर ॥ रजनीचरांसहित पैं ॥ २६ ॥ दुर्गावरूनि राक्षस पाहीं ॥ वानर झोडिती शस्त्रघाईं ॥ दुर्गपरिघ ते समयीं ॥ राक्षसप्रेतांनीं बुजियेले ॥ २७ ॥ पुच्छ दोराकार टाकोनी ॥ असुरांचे ग्रीवेसैं गोंवुनी ॥ एकदांच पाडिती आसुडोनी ॥ खंदकामाजी प्रेतवत ॥ २८ ॥ एक अकस्मात वानर उडोनी ॥ राक्षसांस पायीं धरूनी ॥ गरगरां भिरकाविती गगनीं ॥ आपटोनि धरणीं मारिती ॥ २९ ॥ एक राक्षसांचीं पोटें फोडिती ॥ एक चरणकरनासिकें तोडिती ॥ एक प्रेत उचलोनि मागुती ॥ भिरकाविती लंकेंत ॥ १३० ॥ आटले बहुत रजनीचर ॥ गोपुरावरूनी दशकंधर ॥ विलोकीत दिशा अंबर ॥ तों वानरमय दिसतसे ॥ ३१ ॥ स्वसैन्यासी दशकंधर ॥ म्हणे काय पाहतां निघा बाहेर ॥ आटोनि समस्त वानर ॥ माजवा समरभूमि वेगें ॥ ३२ ॥ चतुरंग दळसागर ॥ निघे लंकेंतून बाहेर ॥ कोट्यनुकोटी असुर ॥ पायींचे पुढें तळपती ॥ ३३ ॥ पर्वतासमान रजनीचर ॥ विक्राळ तोंडें भाळीं शेंदूर ॥ बाबरझोटी दाढा शुभ्र ॥ जिव्हा आरक्त लळलळित ॥ ३४ ॥ खदिरांगार लखलखित ॥ तैसे नेत्र त्यांचे आरक्त ॥ मद्यपानें झाले मस्त ॥ शस्त्रें घेऊन तूळती ॥ ३५ ॥ सुरांचीं शिरें रेखूनी ॥ त्रीदें बांधिलीं चरणीं ॥ यमदंष्ट्रा झळकती जघनीं ॥ आवेशेंकरून गर्जती ॥ ३६ ॥ वोडण असिलतां शक्ती ॥ शूळ तोमर घेऊनि हातीं ॥ गदा परिघ चक्रें झळकती ॥ दंडीं पिंजारिती चामरें ॥ ३७ ॥ वानरांचे करून पुतळे ॥ रुळत चरणीं घातले ॥ हांका देती परम बळें ॥ एकदांची सर्वही ॥ ३८ ॥ दणाणत उर्वीमंडळ ॥ म्हणती देवांनो धांवा सकळ ॥ तुमच्या रामासहित दळ ॥ रणांगणीं ग्रासिलें ॥ ३९ ॥ तयांपाठीं अश्वभार ॥ नानाजातींचे मनोहर ॥ वरी बैसले राऊत असुर ॥ असिलतां घेऊनियां ॥ १४० ॥ तयांपाठीं गजभार ॥ ऐरावतीसमान थोर ॥ वरी शूळ घेऊनि बैसले असुर ॥ ध्वजीं अंबर भेदिती ॥ ४१ ॥ तयां पाठीसी चालिले रथ ॥ रत्नजडित चाकें झळकत ॥ तुरंग जुंपिले चपळ बहुत ॥ गगनचुंबित ध्वज बहु ॥ ४२ ॥ संग्रामसंकेत भेरी ॥ असुरीं ठोकिल्या ते अवसरीं ॥ रणतुरें आणि मोहरी ॥ तेथें धडकती विशाळ ॥ ४३ ॥ वैरियांचीं आणि स्वदळें ॥ एकवटलीं दोन्ही दळें ॥ एकचि घनचक्र मांडिलें ॥

६१ समुद्र. ६२ पृथ्वीला. ६३ भोंपळा. ६४ आकाश. ६५ नक्षत्रें. ६६ बुरुज. ६७ राशी. ६८ तोफांचे. ६९ गोफणी. ७० माना. ७१ केसाच्या झिंजोट्या. ७२ ढाल. ७३ तलवार. ७४ भाला. ७५ लोखंडी कांटे लाविलेला सोटा ( अस्त्रविशेष ). ७६ स्वार. ७७ रणवाद्यें. ७८ अलगुज.

नादें कोंदलें अंबर ॥ ४४ ॥ जय यशस्वी अयोध्यानृपवर ॥ म्हणोनि धांवती वानरवीर ॥ वृक्षघायें रजनीचर ॥ झोडोनि समरीं पाडिती ॥ ४५ ॥ कृतांतवेंत धांवती वानर ॥ टाकिती पर्वत पाषाण अपार ॥ असुरांचे अस्थिपंजर ॥ चूर होती लागतां ॥ ४६ ॥ उठावले राक्षस बळें ॥ तोडिती कपींचीं शिरकमळें ॥ कीं उसळती नारिळें ॥ कोट्यनुकोटी आकाशीं ॥ ४७ ॥ जैसीं इक्षुदंडांचीं खंडें ॥ तैसीं करचरणांचीं दुखंडें ॥ एकदांच पडती प्रचंडें ॥ असुरहस्तेंकरूनियां ॥ ४८ ॥ खेटकौंआड असुर दडती ॥ कुंतशक्तीनें बळें खोंचिती ॥ वानरां विदारून पाडिती ॥ ठायीं ठायीं असंख्य ॥ ४९ ॥ अकस्मात कपी धांवती ॥ काळिजें राक्षसांचीं काढिती ॥ प्रेतें तेथें पडलीं किती ॥ नव्हे गणती कोणातें ॥ ५० ॥ आवेशें कपी शिळा टाकिती ॥ असुरांचे मुखांवरी आदळती ॥ रक्तें भड-भडां उसळती ॥ मस्तकें उडती तडतडां ॥ ५१ ॥ ऊर्ध्वपंथें शिरें उडती ॥ स्वर्गपंथा भेदीत जाती ॥ नाशिवंत म्हणोनि उतरती ॥ सीतापती पाहावया ॥ ५२ ॥ समरभूमीसी धडें नाचती ॥ दोन्ही हस्तें टाळी वाजविती ॥ आम्हांसी येथेंचि आहे गती ॥ नृत्य करिती म्हणूनियां ॥ ५३ ॥ रणीं भ्याडें जे तयांप्रती ॥ तुटलीं शिरें गदगदां हांसती ॥ आम्हीं पावलों मोक्षगती ॥ तुम्हांस नाहीं हो सर्वथा ॥ ५४ ॥ असो वानरवीर प्रचंड ॥ तों गजभार लोटले उदंड ॥ कपी ओढूनि शुंडादंड ॥ आकाशपंथें भोवंडिती ॥ ५५ ॥ गर्जदंत मोडोनि लवलाहें ॥ वरिल्यां ताडिती त्यांचि घायें ॥ शुंडा पिळोनियां पाहें ॥ कुंभस्थळें फोडिती ॥ ५६ ॥ पुच्छीं धरूनियां वारण ॥ गगनीं देती भिरकावून ॥ त्यांचें लक्ष धरून ॥ दुसरा गज भिरकाविती ॥ ५७ ॥ ऐसे लक्षांचे लक्ष वारण ॥ गगनीं करिताती भ्रमण ॥ एक तुरंग पायीं धरून ॥ स्वारांसहित आपटिती ॥ ५८ ॥ वृक्षमंडित पर्वत ॥ रथांवरी टाकिती अकस्मात ॥ रथ सारथियां-समवेत ॥ पिष्ट होती तया घायें ॥ ५९ ॥ असो तीन रात्री तीन दिवस ॥ युद्ध झालें आसमांस ॥ सुरांचे अवतार किंपुरुष ॥ लोटिले राक्षस माघारे ॥ १६० ॥ ऐसें देखोनि वीर धूम्राक्ष ॥ रथारूढ धांवे रणदक्ष ॥ तेणें निजबाणीं लक्षानुलक्ष ॥ वानरवीर पाडिले ॥ ६१ ॥ शिळा पर्वत एकसरीं ॥ कपी टाकिती धूम्राक्षावरी ॥ परी तो चपळ बाणधारीं ॥ पिष्ट करूनी टाकीत ॥ ६२ ॥ असंख्यात वानरगण ॥ धूम्राक्षें मारिला न लागतां क्षण ॥ कपींचे भार पळोन ॥ पराजय पावले ॥ ६३ ॥ उर्णे देखतांचि सत्वर ॥ वेगें धांवला रुद्रावतार ॥ उचलोनियां गिरिवर ॥ धूम्राक्षावरी टाकिला ॥ ६४ ॥ अश्व सारथी रथ चूर्ण ॥ पर्वताखालीं जाहले जाण ॥ धूम्राक्ष चपळ उड्डाण ॥ करूनि गेला एकीकडे ॥ ६५ ॥ मग शूळ घेऊनि ते अवसरीं ॥ धूम्राक्ष धांविन्नला मारुतीवरी ॥ मारावया सर्पारी ॥ अळिका जैसी चपेटे ॥ ६६ ॥ वारणावरी धांवे मृगेंद्र ॥ तैसा आवेशे वायुपुत्र ॥ मुष्टिघातें त्यांचें शिर ॥ मृत्तिकाघटवत चूर्ण केलें ॥ ६७ ॥ गजासी पर्वतपात जाहला ॥ कीं महावृक्ष उन्मळला ॥ तैसा धूम्राक्ष पडला ॥ गतप्राण होऊनियां ॥ ६८ ॥ धूम्राक्ष पड-

७९ यमासारखे. ८० ढालीचे आड. ८१ भाल्यानें. ८२ भित्रे. ८३ हत्तीचे दांत. ८४ हत्तीवर बसलेल्याला. ८५ घोडे. ८६ पराकाष्ठेचें. ८७ वानर. ८८ माकडी. ८९ हत्तीवर. ९० उपटिला.

तांचि तत्काळ ॥ पळों लागले घायाळ ॥ जैसें मन आकळितां बळ ॥ इंद्रियांचें न चले कांहीं ॥ ६९ ॥ जेथोनि मन उडे निश्चितीं ॥ तेथें कैंची राहिली प्रीती ॥ कीं देखणियाची गती ॥ नेत्र गेलिया मावळे ॥ १७० ॥ तैसा धूम्राक्ष पडतां ते काळीं ॥ घायाळें लंकेंत प्रवेशलीं ॥ रावणें वार्ता ऐकिली ॥ हृदयीं वाढली परम चिंता ॥ ७१ ॥ मग दळभारेंसी वज्रदंष्ट्री ॥ दशमुख तयासी आज्ञा करी ॥ तो समरभूमीसी झडकरी ॥ येता झाला वातवेगें ॥ ७२ ॥ वानर राक्षस ते समयीं ॥ मिसळले एके ठायीं ॥ वानरवीरीं राक्षस मेंहीं ॥ प्रेतें करूनि पाडिले ॥ ७३ ॥ रथारूढ वज्रदंष्ट्री ॥ हरिदळीं मिसळला झडकरी ॥ दोन लक्ष कपी भूमीवरी ॥ प्रेतें होऊन पडियेले ॥ ७४ ॥ ऐसें देखोनि वाळिसुत ॥ वेगें धांवला कृतांतवत ॥ शतांचीं शतें पर्वत ॥ उचलोनि टाकी अरीवरी ॥ ७५ ॥ पर्वतासरी ते क्षणीं ॥ राक्षस मारिले एक अक्षौहिणी ॥ अशुद्धेंकरूनि धरणी ॥ पूर वाहाती भडभडां ॥ ७६ ॥ मग तारातनयें ते अवसरीं ॥ उचलिला बहुभृंगांचा गिरी ॥ भिरकाविला वज्रदंष्ट्रीवरी ॥ परमावेशें तेधवां ॥ ७७ ॥ तों राक्षसें सोडोनियां बाण ॥ क्षण न लागतां केला चूर्ण ॥ ऐसें अंगदें देखोन ॥ महावृक्ष उन्मळिला ॥ ७८ ॥ परम प्रतापी वाळिनंदन ॥ भुभुःकारें गर्जवीत गगन ॥ वृक्षघायासरसा प्राण ॥ वज्रदंष्ट्रीचा घेतला ॥ ७९ ॥ शरीर जाहलें शतचूर्ण ॥ मही भिजली अशुद्धेंकरून ॥ जैसा रगडितां मत्कुंण ॥ न उरेच कांहीं उरी ॥ १८० ॥ तो अकंपनें दळभारेंकरून ॥ रणासी आला न लागतां क्षण ॥ तेणें सोडिले असंख्य बाण ॥ कपिचक्रावरी पैं ॥ ८१ ॥ सिंहचपेटे देखोनि वारण ॥ तेवीं पातला सीतेशोकहरण ॥ वृक्षघातेंकरून ॥ रणीं अकंपन विदारिला ॥ ८२ ॥ राक्षसदळीं हाहाकार ॥ शोकार्णवीं मग्न दशकंधर ॥ मग तयास शांतवी ज्येष्ठ कुमर ॥ शक्रजित नाम जया ॥ ८३ ॥ म्हणे राया तूं चिंता न करीं ॥ तुझे शत्रु समरभूमीवरी ॥ आजि पहुडवीन निर्धारीं ॥ शक्रजित तरी नाम ॥ ८४ ॥ नाहीं तरी मी जैसा जंत ॥ पोटासी आलों यथार्थ ॥ मग असंख्य दळासहित इंद्रजित ॥ जनका नमोनि निघाला ॥ ८५ ॥ असंभाव्य सेनासागर ॥ रणमंडळासी आला सत्वर ॥ तंव ते अपार वानर वीर ॥ रणपंडित प्रतापी ॥ ८६ ॥ घेऊन शिळा तरुवर ॥ असुरांत मिसळले वानर ॥ जैसे वायसांमाजी सुंदर ॥ राजहंस मिसळले ॥ ८७ ॥ किंवा गारांमाजी हिरे ॥ मिसळती जैसे एकसरें ॥ तैसे वानर प्रतापें थोरें ॥ असुरदळीं चौताळती ॥ ८८ ॥ कपींचा प्रताप आगळा ॥ देखोनि इंद्रजितें रथ लोटिला ॥ तों वाळिपुत्र धांविन्नला ॥ महापर्वत घेऊनियां ॥ ८९ ॥ जंबुमाळी प्रतापी वीर ॥ त्यावरी धांवला वायुकुमर ॥ विद्युन्माळी यावरी श्वशुर ॥ सुग्रीवाचा उठावला ॥ १९० ॥ जंघनामें असुर प्रबळ ॥ त्यावरी धांवे वीर नळ ॥ परम मांडलें रणमंडळ ॥ हांकें निरोंळ गर्जतसे ॥ ९१ ॥ वानरराक्षसांचीं प्रेतें ॥ एके ठायीं पडलीं अगणितें ॥ जैसे खडे आणि मुक्तें ॥ एके ठायीं विखुरलीं ॥ ९२ ॥ हनुमंतें पायांतळीं ॥ घालोनि चिरिला जंबु-

९१ भूमीवर. ९२ वानरसैन्यांत. ९३ भंगद. ९४ पर्वतासारखे. ९५ रक्तानें. ९६ उपटिला. ९७ ढेकूण. ९८ या नांवाचा एक राक्षस. ९९ माखति. १०० आकाश.

माळी ॥ विद्युन्माळी ते काळीं ॥ सुषेणें आपटोनि मारिला ॥ ९३ ॥ नीळें जंघ मारिला ते क्षणीं ॥ तों अस्ता गेला वासरमणी ॥ अंधारें कोंदली रजनी ॥ कोणासी कोणी न देखे ॥ ९४ ॥ कोण रे कोण असुर पुसत ॥ कपी म्हणती आम्ही रामदूत ॥ असुरवीर अकस्मात ॥ घाय हाणिती सैरिसाचि ॥ ९५ ॥ कोण रे कोण पुसती वानर ॥ जे म्हणती आम्ही असुर ॥ घायें हाणोनि कपिवर ॥ करिती चूर राक्षसांचा ॥ ९६ ॥ सवेंच उदय पावे अत्रिपुत्र ॥ आनंदले सकळांचे नेत्र ॥ परी वानरवीर अनिवार ॥ आटिले असुर पराक्रमें ॥ ९७ ॥ मग तो शक्रजित ते वेळां ॥ रथासहित सेनेंतून उडाला ॥ जलदजाळांत लपाला ॥ वर्षों लागला सर्पबाण ॥ ॥ ९८ ॥ राक्षसांचें कापट्य अद्भुत ॥ बाण तेच सर्प होत ॥ कपींचे अंगीं संचरत ॥ विकळ पडती वीर तेणें ॥ ९९ ॥ मग राम-लक्ष्मणांवरी ॥ सर्पबाण सोडी शक्रारी ॥ अयोध्यानाथ ते अवसरीं ॥ चहूंकडे पाहे तटस्थ ॥ २०० ॥ म्हणे बाण येतात कोठोनी ॥ संधान-कर्ता न दिसे नयनीं ॥ जरी प्रकट दिसे समरांगणीं ॥ तरी बाणीं वरी फोडीन ॥ १ ॥ ओढवलें परम दुस्तर ॥ कित्येक उडाले ऊर्ध्व वानर ॥ शोधिलें बहुत अंबर ॥ परी तो वीर दिसेना ॥ २ ॥ वानर आले परतोन ॥ अवघे पाहती म्लानवदन ॥ रामलक्ष्मणांसी बाण ॥ बहुसाल खडतरले ॥ ३ ॥ ते समयीं मूर्च्छा येऊन ॥ भूमीवरी पडले दोघेजण ॥ तों इंद्रजित बोले वरून ॥ कां निवांत राहिलां ॥ ४ ॥ मारूनियां दूषण खर ॥ शिळीं बांधिला सागर ॥ म्हणवितां क्षत्रिय राजकुमर ॥ कां रे शर सोडाना ॥ ५ ॥ वरकड कपींवर बाण ॥ शक्रजितें टाकिले वरून ॥ तरू उन्मळती मुळींहून ॥ हरिगण तैसे पडियेले ॥ ६ ॥ किंशुक फुलतां बहुत ॥ सिंदूर-वर्ण दिसे पर्वत ॥ तैसीं कपींचीं शरीरें आरक्त ॥ असंख्यात पडियेलीं ॥ ७ ॥ शक्रजित खालीं उतरून ॥ मुख्य जे पडले राक्षस-गण ॥ त्यांचीं कुंणपें उचलून ॥ लंकेसी नेता जाहला ॥ ८ ॥ जयवाद्यांचा होतां घोष ॥ परम आनंदला लंकेश ॥ हृदयीं आलिंगोनि पुत्रास ॥ म्हणे धन्य मी तुझेनि ॥ ९ ॥ त्रिजटेस म्हणे रावण ॥ पुष्पकीं सीतेसी बैसवून ॥ दृष्टीस दावीं सकळ रण ॥ रामसौमित्रां-समवेत ॥ २१० ॥ त्यांचीं विलोकितां प्रेतें ॥ मग ती वश होईल आम्हांतें ॥ अवश्य म्हणोनि जानकीतें ॥ विमानीं बैसवी त्रिजटा ॥ ११ ॥ सकळ मंडळ विलोकीत ॥ तों अनुजासहित रघुनाथ ॥ दृष्टीं देखतां मूर्च्छित ॥ जनकात्मजा पडियेली ॥ १२ ॥ मग त्रिजटेनें सीता धरूनी ॥ उठवोनि बैसविली सांवरूनी ॥ म्हणे माये धैर्य धरीं मनीं ॥ चापपाणी उठेल आतां ॥ १३ ॥ तंव ते बिभीषणाची राणी ॥ सरमा जवळी गुप्त येऊनी ॥ विदेहतनयेचे कर्णीं ॥ निजगुज सांगतसे ॥ १४ ॥ म्हणे जगन्माते धरीं धीर ॥ आतां उठतील रामसौमित्र ॥ संहारतील सकळ असुर ॥ आन विचार येथें नाहीं ॥ १५ ॥ मी अनृत बोलेन साचार ॥ तरी माझें खालीं पडेल शिर ॥ माझे पूर्वज अपार ॥ नरक भोगितील आकल्पवरी ॥ १६ ॥ त्रिजटा म्हणे जानकीसी ॥ माते चिंता न करीं मानसीं ॥

१ रात्र. २ तात्काळ. ३ चंद्र. ४ मेघसमुदायांत. ५ पुष्कळ. ६ वानरसमुदाय. ७ प्रेतें. ८ या नांवाचे विमानांत. ९ सीतेच्या. १० अन्य, दुसरा. ११ खोटें. १२ कल्पपर्यंत.

पुष्पक अशोकवनासी ॥ वेगेंकरून पातलें ॥ १७ ॥ सीतेस बैसवून स्वस्थानीं ॥ त्रिजटा सांगे रावणालागुनी ॥ म्हणे सीतेचिया सत्वा हानी ॥ कल्पांतींही नव्हेचि ॥ १८ ॥ मग त्रिजटा परतोनी ॥ सीतेपासीं बैसे येउनी ॥ जैसी चित्तवृत्ति मुरडोनी ॥ स्वरूपीं पावे विश्राम ॥ १९ ॥ सरमा म्हणे जनकनंदिनी ॥ तूं चिंता कांहीं न करीं मनीं ॥ पुराणपुरुष चापपाणी ॥ त्याची करणी जाणसी तूं ॥ २२० ॥ आपुला प्रताप विशेष ॥ वाढवावया अयोध्याधीश ॥ आधीं शत्रूस दिधलें यश ॥ कांहीं एक आरंभीं ॥ २१ ॥ हें ब्रह्मांड सकळिक ॥ बाणीं जाळील रघुनायक ॥ तेथें इंद्रजित मशक ॥ उशीर काय वधावया ॥ २२ ॥ रावण कुंभकर्ण इंद्रजित ॥ तोचि हीं बाहुलीं निर्मित ॥ खेळ मांडिला जो अद्भुत ॥ जाणसी समस्त तुझें तूं ॥ २३ ॥ निशा संपतां चंडकिरण ॥ उगवे कीं नुगवे म्हणोन ॥ या चिंतेचें कारण ॥ कांहीं नाहीं जाण पां ॥ २४ ॥ करितां रामनामस्मरण ॥ पापें जाती न जाती जळोन ॥ या संदेहाचें कारण ॥ कांहींच नसे जाण पां ॥ २५ ॥ हृदयीं प्रगटतां शुद्ध ज्ञान ॥ चुके कीं न चुके जन्ममरण ॥ या चिंतेचें कारण ॥ कांहींच नाहीं जाण पां ॥ २६ ॥ क्षमा शांति धरितां जाण ॥ कलह होय न होय म्हणोन ॥ या चिंतेचें कारण ॥ कांहींच नसे जाण पां ॥ २७ ॥ अयोध्यानाथ रघुनंदन ॥ यासी जय कीं अपजय म्हणोन ॥ या चिंतेचें कारण ॥ कांहींच नसे जाण पां ॥ २८ ॥ ज्या रामाचें करितां स्मरण ॥ भक्त पावती जयकल्याण ॥ तो जगदानंद पूर्ण ॥ विजयी असे जानकी ॥ २९ ॥ असो इकडे बिभीषण ॥ सूर्यसुतासी बोले वचन ॥ म्हणे राक्षस पर्वत आणून ॥ रामावरी टाकितील ॥ २३० ॥ उदय पावे जंव गभस्ती ॥ तंव जतन कराव्या दोन्ही मूर्ती ॥ बोल बोलतां अश्रु स्रवती ॥ रावणानुजाचे तेधवां ॥ ३१ ॥ मग जीवंत होते जे वानर ॥ त्यांहीं पुच्छमंडप करूनि सत्वर ॥ दोन्ही स्वरूपें सुकुमार ॥ रक्षिलीं तेव्हां अंतरीं ॥ ३२ ॥ कीं पुंच्छपेटी करून ॥ ब्रह्मादि देवांचें देवतार्चन ॥ वानर बैसले सांठवून ॥ सभोंवते सद्गद ॥ ३३ ॥ सूर्यवंशमंडण दशरथ ॥ त्याचे महत्पुण्याचा पर्वत ॥ तो वानरीं वेष्टूनि बहुत ॥ चिंताक्रांत बैसले ॥ ३४ ॥ मारुति बिभीषण रण शोधीत ॥ तों महावीर पडले बहुत ॥ एक नेत्र उघडोनि पुसत ॥ बिभीषणाप्रती ते काळीं ॥ ३५ ॥ म्हणती या चराचराचें जीवन ॥ तो सुखी आहे कीं रघुनंदन ॥ सद्गद होऊन बिभीषण ॥ म्हणे चिंता न करावी ॥ ३६ ॥ तों घायें जांबुवंत विव्हळत ॥ बिभीषणासी जवळी बोलावीत ॥ पुसे क्षेम आहे कीं रघुनाथ ॥ पुराणपुरुष जगदात्मा ॥ ३७ ॥ स्फुंदस्फुंदोनि सांगे बिभीषण ॥ नागपाशीं बांधिले दोघेजण ॥ तों मूर्च्छना सांवरून सुषेण ॥ नेत्र उघडोनि बोलत ॥ ३८ ॥ म्हणे द्रोणाचळीं औषधी बहुत ॥ जरी कोणी आणील बळवंत ॥ तरी रामसौमित्रांसहित ॥ दळ अवघें उठवीन ॥ ३९ ॥ मग बोले बिभीषण ॥ ऐसा बळिया आहे कोण ॥ रात्रीमाजी जाऊन ॥ औषधी येथें आणील ॥ २४० ॥ जांबुवंत बोले वचन ॥ एक सीताशोकहरण ॥ त्यावांचूनि

१३ पातिव्रत्याची. १४ अंतर्मुख होऊन. १५ ब्रह्मामध्यें. १६ सुग्रीवाला. १७ सूर्य. १८ कपडांची पेटी. १९ मारुती.

गिरिद्रोण ॥ आणूं कोणी शकेना ॥ ४१ ॥ मग सुषेण आणि जांबुवंत ॥ बिभीषण तयांस हातीं धरीत ॥ श्रीरामापासीं बोलत बोलत ॥ येते जाहले तेधवां ॥ ४२ ॥ तंव रण शोधूनि हनुमंत ॥ तोही तिकडोनि आला त्वरित ॥ याउपरी किष्किंधा-नाथ ॥ बोलता जाहला ते काळीं ॥ ४३ ॥ म्हणे रामसौमित्रांसीं उचलून ॥ जा तुम्ही किष्किंधेसीं घेऊन ॥ मी रावणा सह-कुळीं मारून ॥ घेऊन येईन जानकी ॥ ४४ ॥ राज्यीं स्थापीन बिभीषण ॥ बंदीचे सोडवीन सुरगण ॥ राहूं मी आणि वायुनंदन ॥ सर्वी परतोन जावें आतां ॥ ४५ ॥ तेव्हां आकाशीं वदे देववाणी ॥ आतांचि उठेल चापपाणी ॥ नेत्र उघडिले तये क्षणीं ॥ अयोध्या-धीशें सत्वर ॥ ४६ ॥ भोंवते पाहे राघवेश ॥ तों निकट बैसले निजदास ॥ मानस वेष्टोनि राजहंस ॥ बैसती जैसे प्रीतीनें ॥ ४७ ॥ कीं कमळ वेष्टीत भ्रमर ॥ कीं अंही वेष्टीत मेलयागर ॥ कीं दिव्य मुक्ताभोंवतें चतुर ॥ परीक्षक जेवीं मिळती ॥ ४८ ॥ असो सुग्री-वास म्हणे रघुनंदन ॥ बा रे तूं आपुला दळभार घेऊन ॥ किष्किंधेसी जाईं परतोन ॥ येथें दोघे राहूं आम्ही ॥ ४९ ॥ ऐसें उदास बोले रघुनाथ ॥ सर्वांसीं आले अश्रुपात ॥ सुग्रीव सद्गद बोलत ॥ म्हणे विपरीत केवीं घडे ॥ २५० ॥ सांडोनियां दिनपती ॥ किरणें कोणीकडे जाती ॥ कैंनकावेगळी कांती ॥ कल्पांतींही नव्हेचि ॥ ५१ ॥ घटास मृत्तिका सांडूनी ॥ कोणीकडे राहील भिन्न ॥ पटास तंतु त्यागोन ॥ वेगळा नोहेच सर्वथा ॥ ५२ ॥ लहरी सागरासी सांडूनी ॥ काय वैसतील काननीं ॥ तुज सांडून चापपाणी ॥ आम्ही केवीं राहावें ॥ ५३ ॥ बिभीषण म्हणे अयोध्यापती ॥ जरी तेंमकूपीं पडेल गैंभस्ती ॥ शेषही सांडील जगती ॥ परी सामर्थ्य तुझें उणें नोहे ॥ ५४ ॥ रसहीन बोलसी मात ॥ जे न मानिती रणपंडित ॥ तों नवल वर्तलें अद्भुत ॥ वायु गुप्तरूपें पैं आला ॥ ५५ ॥ सीतावल्लभाचे कर्णी ॥ गरुडमंत्र गेला सांगोनी ॥ रघुवीरें जपतांचि ते क्षणीं ॥ सुंपर्ण वेगें धांविन्नला ॥ ५६ ॥ जैसे अंगीं केश अमूप ॥ तैसे रामासी जडले सर्प ॥ तो विष्णुवहनप्रताप ॥ देखतां सर्प पळाले ॥ ५७ ॥ तत्काळ उठले रामसौमित्र ॥ अष्टादशपद्मे वानर ॥ उठोनि करिती भुभुःकार ॥ तेणें लंकानगर दणाणिलें ॥ ५८ ॥ निरभ्र नभीं दिसे दिनकर ॥ तैसे देदीप्यमान रामसौमित्र ॥ देव करिती जयजयकार ॥ सुमनसंभार वर्षती ॥ ५९ ॥ सुग्रीवादि कपी बोलती ॥ आजि लंका घालूं पालथी ॥ कोदंड चढवूनि सीतापती ॥ अरिपेंथें लक्षीतसे ॥ २६० ॥ युद्धकांड रसभरित ॥ जेथें वीररसचि अद्भुत ॥ ते कथा ऐकतां समस्त ॥ शत्रुक्षय होय पैं ॥ ६१ ॥ ब्रह्मानंदा श्रीरघुवीरा ॥ दशमुखांतका समरधीरा ॥ भक्तपाळका श्रीधरवरा ॥ निर्विकारा अभंगा ॥ ६२ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ पंचविंशतितमोध्याय गोड हा ॥ २६३ ॥ अध्याय ॥ २५ ॥ ॥ ओंव्या ॥ २६३ ॥ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ श्रीमज्जगदीश्वरार्पणमस्तु ॥ ॥

२० सुग्रीव. २१ या नांवाचें सरोवर. २२ सर्प. २३ चंदन. २४ सोन्यापासून भिन्न. २५ काळोखरूपी विहिरींत. २६ सूर्य. २७ गरुड. २८ शत्रूचा मार्ग.


२६

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ जय जय सुभद्रकारक भवानी ॥ मूळपीठ अयोध्यावासिनी ॥ आदिमायेची कुळस्वामिनी ॥ प्रणवरूपिणी रघुनाथे ॥ १ ॥ नारद व्यास वाल्मीक ॥ विरिंचि अमरेंद्र सनकादिक ॥ वेदशास्त्रें सहस्रमुख ॥ कीर्ति गाती अंबे तुझी ॥ २ ॥ सुग्रीव नळ नील जांबुवंत ॥ बिभीषण अंगद हनुमंत ॥ तेही दिवटे नाचती समस्त ॥ प्रतापदीपिका घेऊनियां ॥ ३ ॥ अठरा पद्मे वानरगण ॥ त्या भूतावळिया संगें घेऊन ॥ सुवेळाचळीं येऊन ॥ गोंधळ मांडिला स्वानंदें ॥ ४ ॥ रणमंडळ हें होमकुंड ॥ द्वेषाग्नि प्रज्वळतां प्रचंड ॥ राक्षस बैस्त उदंड ॥ आहुतीमाजी पडताती ॥ ५ ॥ देवांतक नरांतक महोदर ॥ प्रहस्त अतिकाय घटश्रोत्र ॥ इंद्रजित आणि दशवक्त्र ॥ आहुती समग्र देती ह्या ॥ ६ ॥ निजदास दिवटा बिभीषण ॥ अक्षयी लंकेसी स्थापून ॥ निजभक्ति जानकी घेऊन ॥ मूळपीठ अयोध्येसी जासील ॥ ७ ॥ हनुमंत दिवटा तुझा बळी ॥ बळें पुच्छपोत पाजळी ॥ क्षणांत लंका जाळिली ॥ केली होळी बहुसाल ॥ ८ ॥ ऐसे तुझे दिवटे अपार ॥ त्यांमाजी दासानुदास श्रीधर ॥ तेणें रामविजयदीपिका परिकर ॥ पाजळिली यथामती ॥ ९ ॥ बाळ भोळे भक्त अज्ञान ॥ प्रपंचरजनींत पडिले जाण ॥ त्यांस हे ग्रंथदीपिका पाजळून ॥ मार्ग सुगम दाविला ॥ १० ॥ असो पूर्वाध्यायीं रामलक्ष्मण ॥ इंद्रजितें नागपाश घालून ॥ आकळिले मग वायुदेवें येऊन ॥ सावध केले सवेंच ॥ ११ ॥ यावरी तो रणरंगधीर ॥ प्रतापार्क श्रीरघुवीर ॥ धनुष्य सैंजोनि सत्वर ॥ वाट पाहे शत्रूची ॥ १२ ॥ तों कोट्यनुकोटी वानरगण ॥ सिंहनादें गर्जती पूर्ण ॥ तेणें लंकेचे पिशिताशन ॥ गजबजिले भयेंचि ॥ १३ ॥ निर्मळ देखोनि श्रीरामचंद्र ॥ उचंबळला वानरसमुद्र ॥ भरतें लोटलें अपार ॥ लंकादुर्गपर्यंत पैं ॥ १४ ॥ उचलोनि पाषाण पर्वत ॥ कपी भिरकाविती लंकेंत ॥ राक्षसांचीं मंदिरें मोडित ॥ प्रळय बहुत वर्तला ॥ १५ ॥ रावणास सांगती समाचार ॥ दुर्गासी झगटले वानर ॥ रणीं उभे रामसौमित्र ॥ शशिमित्र जयापरी ॥ १६ ॥ प्रहस्तासी म्हणे लंकानाथ ॥ पुत्रें शत्रुवन जाळिलें समस्त ॥ पुनरपि अंकुर तेथ ॥ पूर्ववत फुटले पैं ॥ १७ ॥ बीज भाजून दग्ध केलें ॥ तें पुनरपि अंकुरलें ॥ मृत्यूनें गिळून उगळिलें ॥ अघटित घडलें प्रहस्ता ॥ १८ ॥ मग तो प्रधान प्रहस्त ॥ तोचि सेनापति प्रतापवंत ॥ रावणासीं आज्ञा मागत ॥ शत्रु समस्त आटीन बाणीं ॥ १९ ॥ कायसे ते नर वानर ॥ माझे केवीं साहाती शर ॥ ऐस ऐकतां विंशतिनेत्र ॥ परम संतोष पावला ॥ २० ॥ उत्तम वस्त्रें भूषणें ॥ प्रहस्तासी दिधलीं रावणें ॥ तयासी गौरवून म्हणे ॥ विजयी होईं रणांगणीं ॥ २१ ॥ स्वामी गौरवी स्वमुखेंकरून ॥ धन्य धन्य तोचि दिन ॥ असो वीस अक्षौहिणी दळ घेऊन ॥ प्रहस्त प्रधान निघाला ॥ २२ ॥ चतुरंग सेनासमुद्र ॥ उत्तरद्वारें लोटला समग्र ॥ तंव अद्भुत सुटला समीर ॥ धुळीनें नेत्र दाटले ॥ २३ ॥ प्रहस्तरथींचा ध्वज उन्मळला ॥ शोणितचर्चित भुज खंडला ॥ प्रहस्तापुढें आणूनि टाकिला ॥

१ अति कल्याण करणारी. २ पार्वती. ३ ओंकार. ४ दिवे-मशाली-घेणारे. ५ त्रिकूटपर्वतावर. ६ बोकड. ७ सज्ज करून. ८ फेकिती. ९ हत्ती २१८७०, रथ २१८७०, घोडे ६५६१० आणि पायदळ १०९३५० एकूण २१८७०० सैन्याची एक अक्षौहिणी. १० वारा.

निरोळपंथें[11] पक्ष्यांनीं ॥ २४ ॥ मनांत दचकला प्रहस्त ॥ परी वीरश्रीनें वेष्टित ॥ अपशकुनांची खंत ॥ टाकूनियां चालिला ॥ २५ ॥ दृष्टीं देखोनि राक्षसभार ॥ सिंहनादें गर्जती वानर ॥ तेणें स्वर्गींचे हुडे[12] समग्र ॥ येऊं पाहाती धरणीये ॥ २६ ॥ दोन्ही दळें एकवटलीं ॥ संग्रामाची झड लागली ॥ शस्त्रास्त्रें तये काळीं ॥ यौमिनीचर[13] वर्षती ॥ २७ ॥ क्षौणप्रभा[14] नभोमंडळीं ॥ तेवीं असिलेता[15] झळकती ते काळीं ॥ गदापाशशक्तिशूळीं ॥ खोंचिती बळें कपींतें ॥ २८ ॥ साहून वानरांचा मार ॥ कपिसेनेवरी अपार ॥ पिशिताशन[16] अनिवार ॥ येऊनियां कोसळती ॥ २९ ॥ तंव ते प्रतापमित्रें[17] हरिगणें[18] ॥ पर्वत आणि वृक्ष पाषाण ॥ बळें देती भिरकावून ॥ होती चूर्ण रैजनीचर[19] ॥ ३० ॥ जैसा अग्नि लागे पर्वतीं ॥ त्यावरी पतंग असंख्य झेंपावती ॥ तैसे राक्षस मिसळती ॥ वानरचमूंत येऊनियां ॥ ३१ ॥ वानर चतुर रणपंडित ॥ निशाचर आटिले बहुत ॥ मग तो सेनापति प्रहस्त ॥ रथ लोटी वायुवेगें ॥ ३२ ॥ जैसी पर्वतीं वीज पडत ॥ तैसा कपींत आला अकस्मात ॥ बाण सोडिले अद्भुत ॥ नाहीं गणित तयांसी ॥ ३३ ॥ तंव तो बिभीषण लंकापती ॥ बोलता जाहला रामाप्रती ॥ म्हणे प्रहस्त सेनापती ॥ मुख्य पट्टप्रधान रावणाचा ॥ ३४ ॥ तरी यासी सेनापति नीळ ॥ प्रतियोद्धा धाडावा सबळ ॥ तों इकडे प्रहस्तें वानरदळ ॥ बहुत आटिलें ते काळीं ॥ ३५ ॥ अनिवार प्रहस्ताचा मार ॥ साहों न शकती वानर ॥ महा योद्धे समरधीर ॥ माघारले ते काळीं ॥ ३६ ॥ दृष्टीं देखोनि रघुनाथ ॥ प्रहस्तें बळें लोटिला रथ ॥ ऐसें देखोनि जनकजामात ॥ घालीत हस्त चापासी ॥ ३७ ॥ क्षण न लागतां चढविला गुण ॥ तों रामापुढें नीळ येऊन ॥ विनवीतसे कर जोडून ॥ वानरगण ऐकती ॥ ३८ ॥ म्हणे जगद्वंद्या जगद्दुःखहरणा ॥ जनकजापते जगन्मोहना ॥ मायाचक्रचाळका निरंजना ॥ मज आज्ञा देइंजे ॥ ३९ ॥ न लागतां एक क्षण ॥ प्रहस्ताचा घेईन प्राण ॥ अवश्य म्हणे सीतारमण ॥ विजयी होऊन येईं पां ॥ ४० ॥ घेऊनियां महापर्वत ॥ नीळ धांवे अकस्मात ॥ जैसा पाँखंडियांसीं पंडित ॥ सरसावला बोलावया ॥ ४१ ॥ प्रहस्तासी म्हणे नीळ वीर ॥ तुम्ही म्हणवितां झुंझार[20] ॥ शस्त्रें जवळी रक्षितां अपार ॥ मिथ्यावेष कासया ॥ ४२ ॥ बाह्यवृत्ति व्याघ्राची असे ॥ अंतरीं जंबुकां[21] भीतसे ॥ जेवीं नट विरक्ताचें सोंग घेतसे ॥ परी अंतरीं त्याग[22] नोहे ॥ ४३ ॥ वरी वैराग्य मिथ्या दावीत ॥ परी मनीं तृष्णा वाढवीत ॥ जैसें वृंदावन[23] भासत ॥ रेखांकित उत्तम वरी ॥ ४४ ॥ तैसा तूं सेनापति प्रहस्त ॥ मृत्यूनें तुज आणिलें येथ ॥ तुझे पितृगण समस्त ॥ काय करिती यमपुरीं ॥ ४५ ॥ त्यांचा समाचार घ्यावयासी ॥ तुज पाठवितों यमपुरीसी ॥ आतां परतोन लंकेसी ॥ कैसा जासील पाहें पां ॥ ४६ ॥ शतमूर्ख दशमुख तत्त्वतां ॥ पैञ्जजातजनकाची कांता ॥ ती आणूनियां वृथा ॥ कुळक्षय केला रे ॥ ४७ ॥ प्रहस्त म्हणे मर्कटा नीळा ॥ तुज मृत्युकाळीं फांटा फुटला ॥ ऐसें बोलून लाविला ॥ बाण चापासी प्रहस्तें ॥ ४८ ॥ नीळें हस्तींचा पर्वत ॥ प्रह-

११ आकाशमार्गाने. १२ धूमकेतू. १३ राक्षस. १४ वीज. १५ तलवारी. १६ सूर्य. १७ वानरसमुदाय. १८ नास्तिकांपाशीं. १९ लढाऊ. २० कोल्ह्याला. २१ विषयाचा तिरस्कार. २२ कंवडळ. २३ ब्रह्मदेवपिता विष्णु, त्याचा अवतार राम, त्याची.

स्तावरी टाकिला अकस्मात ॥ तेणें बाण सोडिले अद्भुत ॥ अंचळ फोडिला क्षणार्धें ॥ ४९ ॥ सवेंच शैल सबळ ॥ प्रहस्तावरी टाकी नीळ ॥ तेणें फोडूनि तत्काळ ॥ पिष्टवत पैं केला ॥ ५० ॥ एकामागें एक अद्भुत ॥ नीलें टाकिले शत पर्वत ॥ तितुकेही छेदी प्रहस्त ॥ सीतानाथ पाहातसे ॥ ५१ ॥ प्रहस्ताचें बळ सबळ ॥ सर्वांगीं खिळिला वीर नीळ ॥ परी तो वैश्वानराचा बाळ ॥ भिडतां मागें सरेना ॥ ५२ ॥ याउपरी नीळ दक्ष ॥ शतयोजनें ताडवृक्ष ॥ मोडूनि धांवे जेवीं विरूपाक्ष ॥ कल्पांतकाळीं क्षोभला ॥ ५३ ॥ भुजाबळें भोंवंडून ॥ वृक्ष घातला उचलोन ॥ रथासहित प्रहस्त चूर्ण ॥ रणमंडळीं जाहला ॥ ५४ ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ सुमनवृष्टि करिती सुरवर ॥ रावणापासीं सत्वर ॥ धायाळ जाऊन सांगती ॥ ५५ ॥ पडिला ऐकतां प्रहस्त ॥ शोक करी लंकानाथ ॥ म्हणे व्याघ्र प्रतापवंत ॥ गोवत्सांनीं मारियेला ॥ ५६ ॥ कमळगर्भींचा घेऊन तंत ॥ मशकें बांधिला ऐरावत ॥ खद्योतें तेजें आदित्य ॥ आहाळिला कैसा आजि तो ॥ ५७ ॥ सैन्यकोंसी म्हणे लंकानाथ ॥ सेना सिद्ध करावी त्वरित ॥ आजि मी युद्ध करीन अद्भुत ॥ जिंकीन रघुनाथा कपींसीं ॥ ५८ ॥ घावें निशाणीं दिधले सत्वर ॥ दणाणलें लंकानगर ॥ कोट्यनुकोटी महावीर ॥ सिद्ध जाहाले शस्त्रास्त्रीं ॥ ५९ ॥ तों लंकापतीची पट्टराणी ॥ मंदोदरी विवेकखाणी ॥ तियेचे दूत सभास्थानीं ॥ परम धूर्त बैसले होते ॥ ६० ॥ समय देखोनि विपरीत ॥ स्वामिणीपासीं गेले त्वरित ॥ वर्षाकाळीं धांवत ॥ सरितापूर जैसे कां ॥ ६१ ॥ कीं शरासनापासोन ॥ सायक धांवती त्वरेंकरून ॥ कीं अस्ता जातां उष्णकिरण ॥ पक्षी आश्रमा धांवती ॥ ६२ ॥ तैसे स्वामिणीपासीं येऊन ॥ पाणी जोडून करिती नमन ॥ मग अधोदृष्टीनें वर्तमान ॥ सांगती सकळ सभेचें ॥ ६३ ॥ रणीं पडला प्रहस्त प्रधान ॥ म्हणोनियां दशानन ॥ सकळ सेना सिद्ध करून ॥ आतांचि जातो संग्रामा ॥ ६४ ॥ ऐसा समाचार ऐकोनीं ॥ मंदोदरी लावण्यखाणी ॥ जिच्या स्वरूपावरूनी ॥ रतिवरें ओंवाळिजे ॥ ६५ ॥ जिची मुखशोभा देखोनी ॥ विधुबिंब गेलें विरूनी ॥ चंपककळिका गौरवर्णी ॥ सुकुमार त्याहूनि बहुत ॥ ६६ ॥ अंगींची प्रभा अत्यंत ॥ तेणें अलंकार शोभत ॥ कीं त्रिभुवन हिंडोनि रतिकांत ॥ श्रमोन तेथें विसांवला ॥ ६७ ॥ हास्य करितां कौतुकें ॥ दंततेज मंदिरीं झळके ॥ बोलतां रत्नें अनेकें ॥ भूमीवरी विखुरती ॥ ६८ ॥ अंगींचे सुवासें करून ॥ कोंदलें असे अवघें सदन ॥ तडिदंबरें वेष्टिलें पूर्ण ॥ सुवास मृदु निर्मळ ॥ ६९ ॥ चपळेचा प्रकाश पडे ॥ तैसे झळकती हातींचे चुडे ॥ वीस नेत्र होऊनि वेडे ॥ रावणाचे पाहती ॥ ७० ॥ ते लावण्यसागरींची लहरी ॥ दूतवार्ता ऐकोनि मंदोदरी ॥ सुखासनीं बैसोन झडकरी ॥ सभेसी तेव्हां चालिली ॥ ७१ ॥ भोंवतें दासींचें चक्र ॥ जाणविती नाना उपचार ॥ सवें माल्यवंत प्रधान चतुर ॥ बहुत वृद्ध जाणता ॥ ७२ ॥ आणि अतिकाय कुमर ॥ जैसा पार्वतीसी स्कंद सुंदर ॥ कीं शचीजवळी जयंत पुत्र ॥ अति-

२४ पर्वत. २५ अग्नीचा. २६ रुद्र. २७ काजव्याच्या प्रकाशानें. २८ पोळला. २९ सेनापति. ३० युद्धाचा बावटा उभारला, नगारा वाजला. ३१ धनुष्यापासून. ३२ मदन. ३३ चंद्र. ३४ विजेसारखें वस्त्र. ३५ विजेचा.

काय शोभे तैसा ॥ ७३ ॥ सहस्रांचे सहस्र दूत ॥ कनकवेत्रपाणी पुढें धांवत ॥ जन वारूनि समस्त ॥ वाट करिती चालावया ॥ ७४ ॥ अंगींच्या प्रभा फांकती ॥ तेणें गोपुरेंचर्या उजळती ॥ असो ते मंदोदरी सती ॥ सभाद्वारा प्रवेशे ॥ ७५ ॥ अधोवदनें तेव्हां जन ॥ सकळ परते गेले उठोन ॥ तेव्हां मंदोदरीनें येऊन ॥ पतीचीं पदें नमियेलीं ॥ ७६ ॥ दशमुख बोले हांसोन ॥ आपुलें कां झालें आगमन ॥ मग क्षण एक निवांत बैसोन ॥ मयजा वचन बोलत ॥ ७७ ॥ टाकोनियां शुद्ध पंथ ॥ आडमार्गें जो गमन करीत ॥ तया अपाय येती बहुत ॥ यास संदेह नाहींचि ॥ ७८ ॥ सर्वांसीं विरोध करून ॥ आपुलें व्हावें म्हणे कल्याण ॥ तो अनर्थी पडेल पूर्ण ॥ यासी संदेह नाहींचि ॥ ७९ ॥ वेदशास्त्रीं जें अनुचित ॥ तेथें बळें घाली चित्त ॥ तेणें आपुला केला घात ॥ यासी संदेह नाहींचि ॥ ८० ॥ विवेकसद्बुद्धीचे बळें ॥ अनर्थ तितुके टाळावे कुशळें ॥ वचनें संतांचीं निर्मळें ॥ हृदयीं सदा धरावीं ॥ ८१ ॥ राया पुरुषार्थ हाचि पूर्ण ॥ परदारा आणि परधन ॥ येथें जो न घाली मन ॥ तोचि धन्य शास्त्र म्हणे ॥ ८२ ॥ नंदनवनींचा मिलिंदें ॥ दिव्यसुमनांचा घेत सुगंध ॥ त्यासी पलांडुपुष्पीं लागला वेध ॥ नवल थोर वाटे हें ॥ ८३ ॥ सुरतरूच्या सुमनांवरी ॥ जो निद्रा करी अमरमंदिरीं ॥ तो निजों इच्छी खदिरांगारीं ॥ नवल परम वाटे हें ॥ ८४ ॥ ज्याची ललना सुंदर बहुत ॥ जीतें अष्टनायिका लाजत ॥ तो पुरुष अैन्य आलिंगूं इच्छीत ॥ नवल परम वाटे हें ॥ ८५ ॥ सुरभि सुरतरु चिंतामणी ॥ इच्छिलें तें पुरवी सदनीं ॥ तो कोरान्न इच्छीत मनीं ॥ नवल परम वाटे हें ॥ ८६ ॥ अंतरीं जाणूनि यथार्थ ॥ अन्यथा बळें प्रतिपादीत ॥ न करावें तें बळेंचि करीत ॥ तरी अनर्थ जवळी आला ॥ ८७ ॥ मी जाणता सर्वज्ञ ॥ ऐसा पोटीं वाहे अभिमान ॥ शतमूर्खांहूनि न्यून ॥ कर्म आचरे बळेंचि ॥ ८८ ॥ याचिलागीं लंकेश्वरा ॥ कामासी कदा नेदीं थारा ॥ कामासंगें थोरथोरां ॥ अनर्थी पूर्वीं पाडिलें ॥ ८९ ॥ तुमचा स्वामी त्रिनेत्र ॥ त्याचा शत्रु काम अपवित्र ॥ तो तुम्हीं केला मित्र ॥ तरी उमावर क्षोभला ॥ ९० ॥ स्मरारिमित्र रामचंद्र ॥ त्यासीं सख्य करा साचार ॥ मग तो संतोषूनि कर्पूरगौर ॥ अक्षयी पद देईल ॥ ९१ ॥ सीता परम पतिव्रता ॥ हे रामापासींच बरी गुणभरिता ॥ कैंलहकल्लोळसरिता ॥ आणिकांचे गृहीं हे ॥ ९२ ॥ हे काळानळाची तीव्र ज्वाळा ॥ क्षणें जाळील ब्रह्मांडमाळा ॥ लंकेसी आणितां क्षय कुळा ॥ करील आमुच्या निर्धारें ॥ ९३ ॥ सहस्रार्जुनें नेऊन बळें ॥ राया तुम्हां बंदीं रक्षिलें ॥ त्यास भृगुपतीनें मारिलें ॥ त्यासही जिंकिलें राघवें ॥ ९४ ॥ ऐसा बळियाँ रघुनंदन ॥ जेणें जळीं तारिले पाषाण ॥ तरी त्यासीं सख्य करून ॥ आपणाधीन करावा ॥ ९५ ॥ हिरण्यकश्यपा नाटोपे हरी ॥ प्रल्हाद जन्मला त्याचे उदरीं ॥ तेणें सख्य करून मुरारी ॥ आपणाधीन पैं केला ॥ ९६ ॥ चिरंजीव करूनि कुळवल्ली ॥ जगीं कीर्ति वाढविली ॥ तैसा राम सखा ये काळीं ॥ करून वाढवा सत्कीर्ति ॥ ९७ ॥ तुम्हांस धरिलें

३६ सोन्याच्या काठ्या हातीं घेतलेले चोपदार. ३७ नगरद्वारें. ३८ भ्रमर. ३९ परस्त्री. ४० भांडणरूपी नदी. ४१ परशुरामानें. ४२ बळवंत. ४३ नरसिंह. ४४ वंशाचा वेलविस्तार.

ज्या वाळीनें ॥ तो जेणें निवटिला एकबाणें ॥ त्यासीं आतां सख्य करणें ॥ मनीं धरूनि हे गोष्टी ॥ ९८ ॥ भक्तिवेगळा रघुनाथ ॥ तुम्हांस वश नव्हे यथार्थ ॥ सीता देऊन सीताकांत ॥ आपणाधीन करावा ॥ ९९ ॥ ज्यांहीं पुरुषार्थ करूनी ॥ सुरांचे मुकुट पाडिले धरणीं ॥ ते राक्षस पाडिले रणीं ॥ कोट्यनुकोटी पाहें पां ॥ १०० ॥ महाबळी भक्तराज परम ॥ तेणें वश केला पुरुषोत्तम ॥ तैसाच तुम्हीं श्रीराम ॥ आपणाधीन करावा ॥ १ ॥ यावरी म्हणे दशकंधर ॥ प्रिये बोलसी सारांशोत्तर ॥ परी मी पुरुषार्थी असुरेश्वर ॥ राम मित्र कदा न करीं ॥ २ ॥ आतां जाऊन समरांगणीं ॥ नर वानर आटीन रणीं ॥ तेव्हां तूं ऐकशील कर्णीं ॥ पुरुषार्थ माझा कैसा तो ॥ ३ ॥ कैलास हालविला बळें ॥ बंदीस सकळ देव घातले ॥ आतां पाहें शिरकमळें ॥ शत्रूंचीं आजि आणीन ॥ ४ ॥ मयजा म्हणे जी उदारा ॥ बळेंच अनर्थ आणितां घरा ॥ हिरा सांडोनियां गारा ॥ संग्रहीतां कासया ॥ ५ ॥ कल्पवृक्ष उपडून ॥ कां वाढवितां कंटकवन ॥ राजहंस दवडून ॥ दिवाभीतें कां पाळावीं ॥ ६ ॥ सुधारस सांडोनि देख ॥ काँजी पितां काय सार्थक ॥ सुरभि दवडूनि सुरेख ॥ अजा कासया पाळावी ॥ ७ ॥ वृंदावन दिसे सुंदर वहिलें ॥ परी काळकूट आंत भरलें ॥ तरी तें न सेविजे कदा काळें ॥ विवेकियानें सहसाही ॥ ८ ॥ फणसफळासमान ॥ कनकफळ दिसे पूर्ण ॥ परी तें भुलीस कारण ॥ विवेकियानें ओळखावें ॥ ९ ॥ सर्पमस्तकींचा मणी ॥ घेऊं जातां प्राणहानी ॥ तैसी श्रीरामाची राणी ॥ समूळ कुळ निर्दाळील ॥ ११० ॥ मग बोले लंकापती ॥ तमकूपीं पडेल गभस्ती ॥ मृगजळीं बुडेल अगस्ती ॥ कल्पांतींही घडेना ॥ ११ ॥ क्रोधें खवळला मृगनायक ॥ त्यासी केवीं मारील जंबुक ॥ वडवानळासी मशक ॥ विझवी घृत घेऊनियां ॥ १२ ॥ तरी आतां वल्लभे आपण ॥ गृहाप्रती जावें उठोन ॥ स्वस्थ असों द्यावें मन ॥ चिंता कांहीं न करावी ॥ १३ ॥ मंदोदरीचीं सारवचनें ॥ जीं विवेकदिनभींचीं भगिनें ॥ सुबुद्धिसागरींचीं रत्नें ॥ परी तीं रावणें उपेक्षिलीं ॥ १४ ॥ कमळसुवास परम सुंदर ॥ परी तो काय जाणे दर्दुर ॥ मुक्ताफळांचा आहार ॥ बक काय घेऊं जाणे ॥ १५ ॥ कस्तूरीचा अत्यंत सुवास ॥ परी काय सेवूं जाणे वायस ॥ तत्त्वविचार मद्यपियास ॥ काय व्यर्थ सांगून ॥ १६ ॥ जन्मांधापुढें नेऊन ॥ व्यर्थ काय रत्नें ठेवून ॥ कीं उत्तम सुस्वर गायन ॥ बधिरापुढें व्यर्थ जैसें ॥ १७ ॥ पतिव्रतेचे धर्म सकळ ॥ जारिणीस काय सांगोनि फळ ॥ धर्मशास्त्रश्रवण रसाळ ॥ वाटपाड्यासी कायसें ॥ १८ ॥ तैसीं मयजेचीं उत्तरें ॥ उपेक्षिलीं पौलस्तिपुत्रें ॥ मग ते पतिव्रता त्वरें ॥ निजगृहासी चालिली ॥ १९ ॥ चित्तीं झोंबला चिंताम ॥ गोड न वाटे भोजन शयन ॥ भूषणें भोग विलास संपूर्ण ॥ वोसंडून टाकीत ॥ १२० ॥ असो संग्रामसंकेतभेरी ॥ परम घडकल्या ते अवसरीं ॥ दशकंठ सहपरिवारीं ॥ युद्धालागीं निघाला ॥ २१ ॥ सर्वे प्रधान आणि कुमर ॥ अवघा लंकेंतील दळभार ॥ निघतां जाहला अपार ॥ सेनासमुद्र ते काळीं ॥ २२ ।

४५ घुबडें. ४६ अमृत. ४७ पेज. ४८ चाममच्छु. ४९ शेळी. ५० कंवडळ. ५१ धोतऱ्याचें फळ. ५२ काळोखाच्या विहिरींत. ५३ सूर्य. ५४ विचारकपी आकाशांतील. ५५ नक्षत्रें. ५६ वेडूक. ५७ मंदोदरीचीं. ५८ चावून.

लंकेचीं महाद्वारें ॥ तीं उघडिलीं एकसरें ॥ दळ चालिलें थोर गजरें ॥ जेवीं प्रळयीं समुद्र फुटे ॥ २३ ॥ पायदळ निघालें अपार ॥ पर्वतासमान प्रचंड वीर ॥ कांसा घातल्या विचित्र ॥ अभेद्यकवचें अंगीं त्रीदें[५९] ॥ २४ ॥ आपादमस्तकपर्यंत ॥ खेटकें विशाळ झळकत ॥ असिलता शक्ति कुंत बहुत ॥ शूल तोमर आयुधें ॥ २५ ॥ लोहार्गळा खड्गें मुद्गल ॥ कोयते कांबिटें गदा विशाळ ॥ फरश यमदंष्ट्रा भिंडिमाळ[६०] ॥ घेऊनि चपळ धांवती ॥ २६ ॥ तयांप्राठीं विचित्र ॥ लोटले तुरंगांचे भार ॥ कीं तें अश्वरत्नांचें भांडार ॥ एकसरें उघडिलें ॥ २७ ॥ असंख्य अश्व श्यामसुंदर ॥ पुच्छ पिंवळे आरक्त खुर ॥ डोळे ताम्रवर्ण सुंदर ॥ तीन्ही लोकीं गति जयां ॥ २८ ॥ सूर्यरथीं चिंतामणी ॥ त्याचि वेगें क्रमिती अवनी ॥ एक नीळ पिंवळे हिंसेती[६१] गगनीं ॥ प्रतिशब्द उठताती ॥ २९ ॥ एक पारवे परम चपळ ॥ एक माणिकाऐसे तेजाळ ॥ सांवळे निळे चपळ ॥ चांदणें पडे अंगतेजें ॥ १३० ॥ एक सिंहमुख सुंदर ॥ चकोरें चंद्रवर्ण सुकुमार ॥ क्षीर केशर कुंकुम शेंदूर ॥ वर्णांचे एक धांवती ॥ ३१ ॥ जांबुळवर्ण परम चपळ ॥ हें जंबुद्वीपींच निपजती सकळ ॥ क्रौंचद्वीपींचे श्वेत वेगाळ ॥ शशिवर्ण हंसत ते ॥ ३२ ॥ शाल्मलिद्वीपींचे सुकुमार ॥ शाकलद्वीपींचे चित्रविचित्र ॥ नागद्वीपींचे परिकर ॥ कुशद्वीपींचे सबळ पैं ॥ ३३ ॥ पुष्करींचे श्यामकर्ण ॥ ते उदकावरी जाती जैसे पवन ॥ जबडा रुंद आंखूड मान ॥ ते बदकश्याम निघाले ॥ ३४ ॥ रणांगणीं परमधीर ॥ ते आरबी वारू सुंदर ॥ कपिचंचळ सुकुमार ॥ समरीं धीर धरिती जे ॥ ३५ ॥ खगेश्वरासमान गती ॥ पक्ष्यांऐसे अंतरिक्षीं उडती ॥ खुणावितां प्रवेशती ॥ परदळीं पवनासारिखे ॥ ३६ ॥ जैसीं कां अलातचक्रें[६३] ॥ तैसे राऊत फिरती त्वरें ॥ असिलता झळकती एकसरें ॥ चपळेऐशा तळपती ॥ ३७ ॥ अश्व खड्ग क्षेत्री पूर्ण ॥ तिहींचें होय एक मन ॥ रावणाचें तैसेंचि सैन्य पूर्ण ॥ असंख्य वारू चालिले ॥ ३८ ॥ अश्वपंजरीं पाखरिले[६४] बहुत ॥ अलंकार घातले रत्नखचित ॥ विशाळमुक्तघोंस झळकत ॥ जाती नाचत रणभूमीं ॥ ३९ ॥ नेपुरें गर्जती चरणीं ॥ पुढील खूर न लागती अवनीं ॥ रत्नखचित मोहोळी[६५] वदनीं ॥ झळकती चपळेसमान ॥ १४० ॥ वज्रकवचेंसीं बळिवंत ॥ वरी आरूढले चपळ राऊत ॥ त्यांचे पाठीसीं उन्मत्त ॥ गजभार खिंकाटती ॥ ४१ ॥ जैसे ऐरावतीचे सुत ॥ चपळ श्वेत आणि चौदंत ॥ झुली घातल्या रत्नजडित ॥ पृष्ठ उदरीं आंवळिले ॥ ४२ ॥ रत्नजडित चंवरडोल ॥ ध्वज भेदिती निराळ[६६] ॥ घंटा वाजती सबळ ॥ चामरें थोर रुळती पैं ॥ ४३ ॥ वरी गजआकर्षक[६७] बैसले ॥ सुपर्णचंचुवत अंकुश करीं घेतले ॥ संकेत दावितां चपळबळें ॥ परचमूंत मिसळती ॥ ४४ ॥ त्यांचे पाठीं दिव्य रथ ॥ चपळेऐसीं चक्रें झळकत ॥ वरी ध्वज गगनचुंबित ॥ नानावर्णी तळपती ॥ ४५ ॥ धनुष्यें शक्ती नाना शस्त्रें ॥ रथावरी रचिलीं अपारें ॥ कुशल सूत[६८] बैसले धुरे[६९] ॥ वाग्दोरे हातीं धरूनियां ॥ ४६ ॥ असो सुवेळपंथें[७०] अपार ॥ चालिले चतुरंग दळभार ॥ तेथें रणवाद्यें परम ॥

५९ चिरुद्दावळी. ६० खिलखतें. ६१ गोफणी. ६२ खिंकाळतात. ६३ मशाली. ६४ पसरले. ६५ लगाम. ६६ आकाश. ६७ महात. ६८ सारथी. ६९ गाडा अथवा गाडी इत्यादिकांचा अग्रभाग. ७० त्रिकूटाच्या रोखानें.

घोर ॥ एकदांचि [61]खोंकाती ॥ ४७ ॥ शशिवदना भेरी धडकती ॥ वाटे नादें उलेलें[62] जगती ॥ शंख वाजतां दुमदुमती ॥ दिशांचीं उदरें तेधवां ॥ ४८ ॥ ढोल गिडबिडी कैताळ[63] ॥ त्यांत सनया गर्जती रसाळ ॥ शृंगें बुरंगें काहळ[64] ॥ दौंडकीं दुटाळ[65] वाजती ॥ ४९ ॥ रामास दावी बिभीषण ॥ आजि सकळ सेना घेऊन ॥ युद्धासी आला जी रावण ॥ पुत्रपौत्रांसहित पैं ॥ १५० ॥ एक लक्ष पुत्रसंतती ॥ सवालक्ष पौत्रगणंती[66] ॥ धन्य रावणाची संपत्ती ॥ कपी पाहती आदरें ॥ ५१ ॥ सकळ पुत्रप्रधानांचीं नामें ॥ बिभीषण सांगे अनुक्रमें ॥ दृष्टीं देखोन रघूत्तमें ॥ आश्चर्य केलें ते समयीं ॥ ५२ ॥ मध्यें रावणाचा रथ ॥ प्रभेस न्यून सहस्र आदित्य ॥ विरिंचि-हस्तें निर्मित ॥ तो दिव्य अनुपम ॥ ५३ ॥ त्या रथाचा जोडा दुजा रथ ॥ नसे त्रिभुवनीं यथार्थ ॥ त्यावरी मंदोदरीकांत ॥ दिसे मंडित वस्त्राभरणीं ॥ ५४ ॥ वरी त्राहाटिलीं दाही छत्रें ॥ झळकती चामरें मित्रपुत्रें ॥ ऐसें देखोनि मित्रपुत्रें ॥ द्विजें[67] अधर रगडिले ॥ ५५ ॥ शत्रूचें वैभव अगाध ॥ देखोनि सुग्रीवा नावरे क्रोध ॥ ऐकोनि वारणाचा शब्द ॥ जैसा मृगेंद्र हुंकारे ॥ ५६ ॥ तृणपर्वत संघटतां जवळी ॥ कैसा उगा राहे ज्वाळामाळी[68] ॥ मृगेंद्र दृष्टीं न्याहाळी ॥ मग गज केवीं स्थिरावे ॥ ५७ ॥ असो तैसा किष्किंधा-नाथ ॥ धांवे घेऊन पर्वत ॥ रावणावरी अकस्मात ॥ परम आवेशें टाकिला ॥ ५८ ॥ तों दशमुखें सोडोनि बाण ॥ पिष्ट केला पर्वत जाण ॥ सवेंच सोडिले दश बाण ॥ सुग्रीव हृदयीं खिळियेला ॥ ५९ ॥ क्रोधावला सूर्यसुत ॥ सवेंचि उपडोनि विशाळ पर्वत ॥ राव-णावरी अकस्मात ॥ गगनपंथें टाकिला ॥ १६० ॥ तोही रावणें फोडिला ॥ मग शतबाणीं[69] सुग्रीव खिळिला ॥ रक्तधारा तये वेळां ॥ भडभडां सूटल्या ॥ ६१ ॥ मूर्च्छा येऊन तये क्षणीं ॥ सुग्रीव स्वीकारूं पाहे धरणी ॥ मग वानर अठरा अक्षौहिणी ॥ एकदांचि उठा-वले ॥ ६२ ॥ शिळा वृक्ष पाषाण ॥ कपींनीं यांचा पाडिला पर्जन्य ॥ परी तितुक्यांसी रावण ॥ एकलाच पुरवला ॥ ६३ ॥ जैसा पाखांडी कुतर्क घेतां ॥ नावरेच बहु पंडितां ॥ तेवीं सकळ कपी भिडतां ॥ लंकानाथ न गणीच ॥ ६४ ॥ असंख्यात सोडूनि शर ॥ घायीं जर्जर केले वानर ॥ तों थोर थोर कपीश्वर ॥ उभे होते रामापाशीं ॥ ६५ ॥ त्यांमाजी सात जण ॥ धांवती जैसे पंचानन ॥ शरभ गवय गंधमादन ॥ मैंद कुमुद द्विविद ॥ ६६ ॥ गवाक्ष सातवा वीर ॥ पर्वत घेऊनि सत्वर ॥ हांकें गर्जवीत अंबर ॥ रावणा-वरी टाकिले ॥ ६७ ॥ रावणें पर्वत फोडोनि समस्त ॥ शरीं खिळिले वानर सप्त ॥ भूमीसी पडले आक्रंदत ॥ परम अनर्थ ओढवला ॥ ६८ ॥ अनिवार दशमुखाचा मार ॥ देखोनि पळती कपिभार ॥ तें पाहून राम रणरंगधीर ॥ चाप सत्वर चढवीतसे ॥ ६९ ॥ तंव विनवी ऊर्मिलापती[70] ॥ माझे बाहु बहु स्फुरती ॥ आज्ञा द्यावी मजप्रती ॥ शिक्षा लावीन दशमुखा ॥ १७० ॥ अवश्य म्हणे रघुनंदन ॥ सौमित्रें सजोनियां बाण ॥ जैसा उठे पंचानन ॥ रावणासन्मुख लोटला ॥ ७१ ॥ म्हणे रे तस्करा दशमुखा ॥ बुद्धिहीना शतमूर्खा ॥

७१ दुमदुमूं लागलीं. ७२ उकलेल. ७३ हातांच्या तालानें, करताळ. ७४ डफ, शाहिरांचें एक वाद्य. ७५ भेरी. ७६ वाद्यें. ७७ वाद्यें. ७८ नातू. ७९ अबदागिरें. ८० सुग्रीवानें. ८१ दांतांनीं. ८२ ओंठ. ८३ सिंह. ८४ अग्नि. ८५ शंभर बाणांनीं. ८६ लक्ष्मण.

आणूनियां जनककन्यका ॥ कुळक्षय केला रे ॥ ७२ ॥ कृतांताचे दाढेसी ॥ सांपडलासी निश्चयेंसी ॥ आतां कोणीकडे पळसी ॥ जीव घेऊन माघारा ॥ ७३ ॥ ऐसें बोले लक्ष्मण ॥ तों विशाळ पर्वत घेऊन ॥ धांवे निर्रौंळोद्भवनंदन ॥ द्विर्दशनेत्रावरी तेधवां ॥ ७४ ॥ जैसी कडकडोनि पडे चपळी ॥ तैसा पर्वत रावणावरी टाकिला ॥ रावणें फोडोनि ते वेळां ॥ पिष्ट केला अंतरिक्षीं ॥ ७५ ॥ रथावरी चढला हनुमंत ॥ रावणें झाडिली सबळ लाथ ॥ मूर्च्छना सांवरून वायुसुत ॥ उसनें घेता जाहला ॥ ७६ ॥ रावणहृदयीं ते काळीं ॥ कपीनें वज्रमुष्टी दिधली ॥ रावणासी गिरकी आली ॥ मूर्च्छा सांवरी सवेंचि ॥ ७७ ॥ मग सबळ मुष्टिघात ॥ मारुतीसी मारी लंकानाथ ॥ तों विशाळ घेऊन पर्वत ॥ नळ वानर घांविन्नला ॥ ७८ ॥ पर्वत टाकिला रावणावरी ॥ तेणें पिष्ट केला अंबरीं ॥ नळ खिळिला पंचशरीं ॥ हृदयावरी तेधवां ॥ ७९ ॥ तों नळें केलें अद्भुत ॥ मंत्र जपे ब्रह्मदत्त ॥ कोट्यनुकोटी नळ तेथ ॥ प्रकट झाले तेधवां ॥ १८० ॥ घेऊन पाषाण पर्वत ॥ रावणावरी टाकिती समस्त ॥ दोन्ही दळें झालीं विस्मित ॥ सीतानाथ नवल करी ॥ ८१ ॥ ऐसें जाहलें एक मुहूर्त ॥ मग ब्रह्मास्त्र प्रेरी लंकानाथ ॥ नळ मावळले समस्त ॥ जेवीं नक्षत्रें सूर्योदयीं ॥ ८२ ॥ कीं पोंर दाची रेवा फुटली ॥ एकत्र येऊनि कोठी जाहली ॥ मुख्य नळ ते वेळीं ॥ रणांगणीं उरलासे ॥ ८३ ॥ असो सिंहनादें गर्जोन ॥ पुढें-धांवे लक्ष्मण ॥ तयाप्रती रावण ॥ बोलता जाहला अति गर्वें ॥ ८४ ॥ म्हणे तूं मनुष्याचा कुमर ॥ अजून माथांचा ओला जोंर ॥ तुवां संग्राम तरी निर्धार ॥ कोठें केला सांग पां ॥ ८५ ॥ सौमित्र म्हणे रे मशका ॥ माझा संग्राम पाहें कीटका ॥ तुझें आयुष्य सरलें मूर्खा ॥ लंका दिधली बिभीषणासी ॥ ८६ ॥ सिंहदरीतें आला कुंजरें ॥ तो केवीं जिवंत जाईल बाहेर ॥ सुंपर्णें धरिला फणिवर ॥ तो केवीं प्रवेशे वारुळीं ॥ ८७ ॥ भुजंगें धरिला मूषक दांतीं ॥ तो कैसा सुटेल पुढती ॥ समुद्रतीरीं अगस्ती ॥ उगाचि कैसा बैसेल ॥ ८८ ॥ तृतीयनेत्रींचा प्रळयाग्नि ॥ चालिला रतिपतीस लक्षून ॥ मग राहील विझोन ॥ हें काळत्रयीं घडेना ॥ ८९ ॥ तैसा श्रीराम लावण्यराशी ॥ चालोन आला लंकेसी ॥ तूं पुत्रपौत्रें नांदसी ॥ हें काळत्रयीं घडेना ॥ १९० ॥ ऐसें बोलोन लक्ष्मण ॥ सोडी बाणां-पाठीं बाण ॥ शब्दामागें शब्द पूर्ण ॥ वदनींहून जेवीं निघती पैं ॥ ९१ ॥ चपळ लेखकापासाव एकसरें ॥ निघती अक्षरांपासाव अक्षरें ॥ तैसे बाण सुमित्राकुमरें ॥ रावणावरी सोडिले ॥ ९२ ॥ रावणाचे अंगीं ते वेळे ॥ बळें सर्पक्षें बाण रुतले ॥ पांच बाण रावणें सोडिले ॥ सौमित्रावरी तेधवां ॥ ९३ ॥ जैशा पंच विद्युल्लता ॥ तैसे सौमित्रें देखिले शर येतां ॥ मग ते वरचेवरीच तत्त्वतां ॥ निज-शरें पिष्ट केले ॥ ९४ ॥ परम क्रोधें दशमौळी ॥ ब्रह्मशक्ति बाहेर काढिली ॥ अभिमंत्रोन सोडिली ॥ राघवानुजा लक्षूनियां ॥ ९५ ॥ ते अनिवार शक्ति पूर्ण ॥ सुमित्रासुतें सोडिला बाण ॥ अर्ध टाकिली खंडोन ॥ अर्ध हृदयीं बैसली ॥ ९६ ॥ तेणें निचेष्टित सौमित्र

८७ वायुपुत्र मारुति. ८८ रावणावर. ८९ बीज. ९० पाऱ्याचा. ९१ सूक्ष्म कण. ९२ तालू. ९३ हत्ती. ९४ गरुडानें. ९५ पिसाऱ्यांसह.. ९६ रावण.

पडिला ॥ श्वासोछ्वास बंद जाहला ॥ ऐसें देखोनि रावण धांविन्नला ॥ रथास्तालीं उतरूनियां ॥ ९७ ॥ निचेष्टित असतां सौमित्र ॥ वरी हाणी मुष्टिप्रहार ॥ जैसे निजल्यावरी तस्कर ॥ बहुत घाय घालिती ॥ ९८ ॥ तें मारुतीनें देखोन डोळां ॥ कृतांतापरी धांविन्नला ॥ लत्ताप्रहार ते वेळां ॥ सबळ दिधला रावणा ॥ ९९ ॥ पौंदरक्षेचे घायीं देख ॥ लोक ताडिती वृश्चिक ॥ कीं दंदशूकांचें मुख ॥ पाषाणें चूर्ण करिती पैं ॥ २०० ॥ तैसें लत्ताप्रहारेंकरून ॥ असुरहृदय केलें चूर्ण ॥ रक्त ओकीत रावण ॥ रथावर गेला आपुल्या ॥ १ ॥ तों सावध जाहला लक्ष्मण ॥ वेगें सोडी निर्वाणें बाण ॥ रावणाचें हृदय फोडून ॥ पलीकडे शर गेला ॥ २ ॥ व्यथा सौमित्राची देखोन ॥ क्षोभे जैसा प्रळयाग्न ॥ अनुज पाठीसीं घालून ॥ पुढें जाहला रघुवीर ॥ ३ ॥ रावण आरूढला रथावरी ॥ जैसा जलंद नगशिखरीं ॥ ऐसा देखतां रावणारी ॥ काय करिता जाहला ॥ ४ ॥ हनुमंतस्कंधावरी रघुवीर ॥ उभा ठाके रावणासमोर ॥ जैसा उदयाचळीं दिनकर ॥ किंवा श्रीधर गरुडावरी ॥ ५ ॥ ऐरावतारूढ शचीनायक ॥ कीं नंदीवरी मदनांतक ॥ तयापरी अयोध्यानायक ॥ हनुमंतस्कंधीं शोभला ॥ ६ ॥ क्रोधायमान रघुनंदन ॥ प्रथम सोडी एक बाण ॥ रावणाचीं दाही छत्रें छेदून ॥ अकस्मात पाडिलीं ॥ ७ ॥ मित्रपत्रें आणि चामरें ॥ सर्वांचि छेदिलीं दुज्या शरें ॥ मुकुट भूमीसी एकसरें ॥ चूर करून पाडिले ॥ ८ ॥ सर्वेंच भाते दहाही धनुष्यें ॥ छेदोनि पाडिलीं अयोध्याधीशें ॥ विचित्र केलें परमपुरुषें ॥ प्रथमारंभीं ते काळीं ॥ ९ ॥ राघव बोले गर्जोनी ॥ दशमुखा तुज सोडिलें रणीं ॥ आज श्रमलासी रणांगणीं ॥ जाईं सत्वर माघारा ॥ २१० ॥ आपली संपदा भोगून ॥ सकळ स्त्रियांस येईं पुसोन ॥ पुत्र पौत्र आप्तजन ॥ निरोप घेऊनि येईं त्यांचा ॥ ११ ॥ मग झुंजतां समरांगणीं ॥ तुझा देह खंडविखंड करूनी ॥ तत्काळ पाडीन धरणीं ॥ निश्चय मनीं जाण पां ॥ १२ ॥ इतुकी जवळी असतां सेना ॥ तूं कां आलासी समरांगणा ॥ दुर्जना बुद्धिहीना मलिना ॥ मुख येथें न दाखवीं ॥ १३ ॥ ऐसें बोलतां जानकीजीवन ॥ दशमुख जाहला दर्पभग्न ॥ अजासर्पन्यायें करून ॥ उगाचि तटस्थ पाहतसे ॥ १४ ॥ जो पीडे दरिद्रेंकरून ॥ तो देश त्यागी जाय उठोन ॥ तैसा रावण रण सांडून ॥ लंकेमाजी प्रवेशला ॥ १५ ॥ कीं जो यातींतून भ्रष्ट जाहला ॥ तो जेवीं ब्राह्मणीं दवडिला ॥ कीं दिव्यें देतां खोटा जाहला ॥ तो लाजोनि जाय पैं ॥ १६ ॥ असो आतां नानाप्रयत्न करून ॥ कुंभकर्णास उठवील रावण ॥ ती कौतुककथा गहन ॥ श्रवण करोत पंडित ॥ १७ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ अंबरं ॥ नानादृष्टांत भंगणें सुंदर ॥ तेथें उदय पावला रामचंद्र ॥ निष्कलंक अक्षयी ॥ १८ ॥ ब्रह्मानंद श्रीरामचंद्र ॥ जो निर्मळशीतळ उदार ॥ तेथें अनन्य श्रीधर चकोर ॥ स्वानंदामृत सेवीतसे ॥ १९ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ षड्विंशतितमाध्याय गोड हा ॥ २२० ॥ अ० ॥ २६ ॥ ओ० ॥ २२० ॥ श्रीरामचं०

९७ वाहाणेचे, जोड्याचे. ९८ सर्पाचें. ९९ आणीबाणीचा. १०० मेघ. १ पर्वताबर. २ श्रीराम. ३ शंकर. ४ अबदागीर. ५ चौऱ्या. ६ शेळी सापाकडे तटस्थ पाहते तद्वत. ७ प्रमाण शास्त्र आकाश. ९ नक्षत्रें.

२७

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ आळसी कदा उदीम न करी ॥ नव जाय मंदिराबाहेरी ॥ तों जगन्निवास साहाकारी ॥ घरींच निर्धारीं भाग्यें आला ॥ १ ॥ मृत्तिका खणावया जात ॥ तों मेंदुस सांपडे अकस्मात ॥ तैसें आम्हांसी जाहलें यथार्थ ॥ सद्गुरुनाथप्रसादें ॥ २ ॥ अभ्यास न करितां बहुवस ॥ सांपडली रामविजयमांदुस ॥ मग गगनीं न माय हर्ष ॥ उपरती जाहली ॥ ३ ॥ मांदुस उघडोनि जों न्याहाळीं ॥ तों आंत होतीं सात कोहळीं ॥ तीं हीं सप्तकांडें रसाळीं ॥ एकाहूनि एक विशेष ॥ ४ ॥ कोहळीं न्याहाळून जंव पाहात ॥ तंव दिव्य नाणीं दीप्तियुत ॥ भक्ति ज्ञान वैराग्ययुक्त ॥ घवघवीत विराजती ॥ ५ ॥ चतुर श्रोते ज्ञानसंपन्न ॥ ते बंधु आले जवळी धांवोन ॥ म्हणती आम्हांस वांटा दे समान ॥ मांडलें भांडण प्रेमभरें ॥ ६ ॥ म्हणती हीं वाल्मीकाचीं कोहळीं ॥ तुज पूर्वभाग्यें लाधलीं ॥ तरी वांटा आम्हांस ये वेळीं ॥ देईं सर्वांसी सारिखा ॥ ७ ॥ मग चतुर संतजन ॥ श्रवणपंक्तीं बैसले समान ॥ कोहळीं त्यांपुढें नेऊन ॥ एकसरें रिचविलीं ॥ ८ ॥ मग त्यांहीं कर्णद्वारें उघडोन ॥ हृदयभांडारीं सांठविलें धन ॥ श्रोते वक्ते सावधान ॥ निजसुख पूर्ण पावले ॥ ९ ॥ पांच कोहळीं दाविलीं फोडून ॥ साहावें युद्धकांड विशाळ गहन ॥ असो गताध्यायीं कथानिरूपण ॥ राघवें रावण निर्भर्त्सिला ॥ १० ॥ छत्र मुकुट टाकिले छेदून ॥ अपमान पावला रावण ॥ मग लंकेंत परतोन ॥ चिंतार्णवीं बुडाला ॥ ११ ॥ जैसा राहुग्रस्त निशाकर ॥ कीं काळवंडे दग्धकांतार ॥ कपाळशूळें महाव्याघ्र ॥ तैसा दशकंठ उतरला ॥ १२ ॥ नावडे छत्र सिंहासन ॥ जें जें पाहूं जाय रावण ॥ तें तें रामरूप दिसे पूर्ण ॥ नाठवे आन पदार्थ ॥ १३ ॥ सभेसी बैसला रावण ॥ अत्यंत दिसे कळाहीन ॥ मंदोदराप्रती वचन ॥ बोलता जाहला ते वेळां ॥ १४ ॥ म्हणे कैसा विपरीत काळ ॥ मक्षिकेनें हालविला भूगोळ ॥ चित्रींच्या सर्पें खगपाळ ॥ गिळिला नवल वाटतें ॥ १५ ॥ खद्योततेजेंकरून ॥ आहाळोनि गेला चंडकिरण ॥ तैसा मी आजि रावण ॥ युद्धीं पावलों पराजय ॥ १६ ॥ मग बोलती प्रधान ॥ आतां उठवावा कुंभकर्ण ॥ तो रामसौमित्रांसहित सैन्य ॥ गिळील क्षण न लागतां ॥ १७ ॥ ती रावणासी मानली मात ॥ म्हणे घटश्रोत्रांसी उठवा त्वरित ॥ मग विरूपाक्ष महोदर निघत ॥ दहा सहस्र राक्षस घेऊनियां ॥ १८ ॥ मद्यपखाला चार सहस्र ॥ कुंजेरीं घातल्या सत्वर ॥ तैसेच पशू घेतले अपार ॥ अन्नाचे पर्वत घेऊनियां ॥ १९ ॥ वाद्यें वाजविती भेयासुर ॥ गजरेंसीं पावले सत्वर ॥ देखोनि भयानक शरीर ॥ कंप सुटला राक्षसा ॥ २० ॥ वनगज म्हैसे तरस ॥ नासिकांत गुंतले बहुवस ॥ टाकितां श्वासोच्छ्वास ॥ निर्गम नव्हे तयांसी ॥ २१ ॥ सवालक्ष गांवें खोल ॥ सरितापतीचें तुंबळ जळ ॥ तें नाभिप्रमाण केवळ ॥ कुंभकर्णासी होय पैं ॥ २२ ॥ असो राक्षस सर्व मिळती ॥ द्वारीं एकदांचि हांका फोडिती ॥ सकळ वापी कूप आटती ॥ महागजरेंकरूनिया ॥ २३ ॥ स्वर्गापर्यंत ऐकों जाती ॥ ऐशा कर्णी भेरी त्राहा-

१ मदतगार. २ रत्नांनीं भरलेली पेटी. ३ वैरस्य. ४ मोतिलीं. ५ जळलेलें अरण्य. ६ दुसरा. ७ या नांवाच्या एका राक्षसास. ८ गडद. ९ होरपळून. १० कुंभकर्णास. ११ मद्याचे मोठे घडे. १२ हत्तीवर. १३ भयंकर. १४ समुद्राचें. १५ मोठे नगारे.

टिती ॥ उरावरी गज चालविती ॥ परी जागा नोहे सर्वथा ॥ २४ ॥ एक गगनचुंबित वंशी[१६] घेऊन ॥ नासिकीं चढविती पूर्ण ॥ एक नाकपुडी अवरोधून ॥ श्वासोच्छ्वास कोंडिती ॥ २५ ॥ एक वृक्ष पाषाण घेती ॥ वर्मस्थळीं बळें ताडिती ॥ कडू तीक्ष्ण औषधें ओतिती ॥ नासिकापुटीं नेऊनियां ॥ २६ ॥ उपाय केले बहुत पूर्ण ॥ परी जागा नोहेच कुंभकर्ण ॥ मग विरूपाक्षें[१७] किन्नरी[१८] आणून ॥ कर्णामाजी बैसविल्या ॥ २७ ॥ त्यांचें परम सुस्वर गायन ॥ ऐकतां शेष येईल धांवोन ॥ मग जागा होऊन कुंभकर्ण ॥ सावधान बैसला ॥ २८ ॥ जांभई दिघली भयानक ॥ मद्य प्राशिलें सकळिक ॥ दाढेखालीं पशू देख ॥ अपार घालून रगडिले ॥ २९ ॥ अन्नमांसांचे पर्वत ॥ गिळिले राक्षसें तेव्हां बहुत ॥ मग नेत्र पुसोन पाहात ॥ प्रधानांकडे ते काळीं ॥ ३० ॥ तंव ते प्रणिपात करून ॥ सांगते झाले सर्व वर्तमान ॥ सीता आणिली हिरून ॥ तेथून सर्व कथियेलें ॥ ३१ ॥ हनुमंत लंका जाळून ॥ रामसौमित्रां आला घेऊन ॥ कालचे युद्धीं रावण ॥ पराजय पावला ॥ ३२ ॥ रावण परम चिंताक्रांत ॥ यालागीं तुम्हां उठविलें त्वरित ॥ मांडला बहुत कल्पांत ॥ आटले समस्त राक्षस ॥ ३३ ॥ उभा ठाकला कुंभकर्ण ॥ म्हणे ऐसाचि रणा जाईन ॥ मग विनविती प्रधान ॥ राजदर्शन घेइंजे ॥ ३४ ॥ सभेसी चालिला कुंभकर्ण ॥ लंकेदुर्ग[१९] त्यासी गुंल्फप्रमाण[२०] ॥ वाटे आकाशासी लाविलें टेंकण ॥ विमानें सुरगण पळविती ॥ ३५ ॥ लंकावेष्टित जे वानर ॥ ते तेथून पळाले समग्र ॥ देखोनि कुंभकर्णाचें शरीर ॥ कपी मूर्च्छित पडियेले ॥ ३६ ॥ रामासी म्हणे बिभीषण ॥ स्वामी हा उठविला कुंभकर्ण ॥ आश्चर्य करी रघुनंदन ॥ शरीर देखोन तयाचें ॥ ३७ ॥ बिभीषण म्हणे ते काळीं ॥ रामा याचिया जन्मकाळीं ॥ प्रळय वर्तला भूमंडळीं ॥ हांक वाजली चहूंकडे ॥ ३८ ॥ मातेचिया उदरांतून ॥ भूमीसी पडला कुंभकर्ण ॥ तीस सहस्र स्त्रिया जाण ॥ वदन पसरून गिळियेल्या ॥ ३९ ॥ इंद्राचा ऐरावत घरूनी ॥ येणें आपटिला धरणीं ॥ ऐरावतीचे दांत मोडूनी ॥ इंद्रासी येणें ताडिलें ॥ ४० ॥ शक्रें वज्र उचलोनि घातलें ॥ यांचें रोम नाहीं वांकें[२१] जाहलें ॥ यासी निद्रा[२२]आवरण पडलें ॥ म्हणोनि लोक वांचले हे ॥ ४१ ॥ असो कुंभकर्ण दृष्टीं देखोन ॥ हिमज्वरें[२३] व्यापले वानरगण ॥ एकां मुरकुंडी वळून ॥ दांतखिळ्या बैसल्या ॥ ४२ ॥ भोंवतें पाहे चापपाणी ॥ तों भयभीत वानरवाहिनी ॥ सर्वांचें अंतर जाणोनी ॥ मारुतीकडे पाहिलें ॥ ४३ ॥ तों निमिषांत हनुमंत ॥ अकस्मात गेला लंकेंत ॥ कुंभकर्ण सभेसी जात ॥ तंव अद्भुत केलें वायुसुतें ॥ ४४ ॥ कुंभकर्ण तये वेळां ॥ कटीपर्यंत उचलिला ॥ राम आणि कपी डोळां ॥ तटस्थ होऊन पाहाती ॥ ४५ ॥ मद्यपानें कुंभकर्ण ॥ अत्यंत गेलासे भुलून ॥ आपणास उचलितो कोण ॥ हेंही त्यासी नेणवे ॥ ४६ ॥ मग तो सीताशोकहरण[२४] ॥ पुढती उचलून कुंभकर्ण ॥ भुजाबळें भोंवंडून ॥ टाकीत होता सुवेळेसी[२५] ॥ ४७ ॥ मागुती केलें अनुमान[२६] ॥ म्हणे गगनीं देऊं भिरकावून ॥ कीं लंकेवरी आपटून ॥ चूर्ण करूं सकळ-

१६ वांबू, वेळू. १७ या नांवाचा दैत्य. १८ किन्नरांच्या स्त्रिया. १९ किल्ला. २० गुडघ्याइतका. २१ वांकडे. २२ निद्रारूपी आच्छादन. २३ हिंवतापानें. २४ सेना. २५ मारुती. २६ त्रिकूटाकडे. २७ अंदाज.

ही ॥ ४८ ॥ मग म्हणे नव्हे हा विचार ॥ लंका चूर्ण होईल समग्र ॥ मग तो बिभीषण नृपवर ॥ नांदेल कैसा ये स्थळीं ॥ ४९ ॥ सुवेळेसी द्यावा टाकून ॥ तरी वानर होतील चूर्ण ॥ भूमंडळीं आपटूं धरून ॥ तरी धरौं जाईल पाताळा ॥ ५० ॥ ऊर्ध्वपंथेंचि ठेवून ॥ भुजाबळें भोंवंडून ॥ वृक्षावरी घातला नेऊन ॥ राघवापासीं परतला ॥ ५१ ॥ भय आणि शाहारे पूर्ण ॥ गेलें कपींचें निघोन ॥ जैसा उगवतां सहस्रकिरण ॥ तम जाय निरसोनि ॥ ५२ ॥ कीं हनुमंतें बळ दावून ॥ वानरांसी दिधलें रसायन ॥ हिमज्वरभय दारुण ॥ निघोन गेलें सर्वही ॥ ५३ ॥ असो श्रीरामचरणीं भाळ ॥ ठेवी अंजनीचा बाळ ॥ मग सुग्रीवादि कपी सकळ ॥ धांवोन भेटती हनुमंता ॥ ५४ ॥ शब्दसुमनें स्तुतिमाळा ॥ कपि घालिती मारुतीच्या गळां ॥ म्हणती कुंभकर्ण कवेंत सांपडला ॥ तरी कां सोडिला कळेना ॥ ५५ ॥ मारुतीचा अंतरार्थ ॥ कपींतें सांगे रघुनाथ ॥ त्यास माझे हातीं मृत्य ॥ हें हनुमंत जाणतसे ॥ ५६ ॥ सिंहावलोकनें निश्चितीं ॥ मागील कथा परिसावी श्रोतीं ॥ कुंभकर्ण जात सभेप्रती ॥ रावणासी भेटावया ॥ ५७ ॥ बंधु संमुख देखोन ॥ हरुषें कोंदला दशानन ॥ कुंभकर्ण प्रणिपात करून ॥ निजस्थानीं बैसला ॥ ५८ ॥ जेवीं मेघ करी गर्जन ॥ तेवीं बोले कुंभकर्ण ॥ काय संकट पडलें येऊन ॥ म्हणोनि मज जागविलें ॥ ५९ ॥ महाप्रलय मांडला ॥ कीं उर्वी जात होती रसातळा ॥ किंवा कृतांत चालून आला ॥ म्हणोनि मज जागविलें ॥ ६० ॥ सांगे रावण वर्तमान ॥ जानकी आणिली हिरून ॥ यालागीं वानरदळ घेऊन ॥ सुवेळेसी राम आला ॥ ६१ ॥ धूम्राक्ष आणि वज्रदंष्ट्री ॥ प्रहस्त प्रधान पडला समरीं ॥ मग मी युद्धा गेलों झडकरी ॥ परी पावलों पराजय ॥ ६२ ॥ मज परम संकट पडलें ॥ म्हणोनि बंधो तुज जागविलें ॥ मज चिंताव्याधीनें पीडिलें ॥ त्यासी औषध देईं तूं ॥ ६३ ॥ संकटीं बंधु पावे साचार ॥ दरिद्रकाळीं जाणिजे मित्र ॥ संशय निरसावया समग्र ॥ सद्गुरुचरण धरावे ॥ ६४ ॥ तम दाटलें जरी घोर ॥ तरी दीपिका पाजळाव्या सत्वर ॥ येतां वैरियाचें शस्त्र ॥ वोडण पुढें करावें ॥ ६५ ॥ दुष्काळ पडतां अत्यंत ॥ दात्यापासीं जावें त्वरित ॥ संकट आम्हां पडलें बहुत ॥ म्हणोनि तुज जागविलें ॥ ६६ ॥ यावरी बोले कुंभकर्ण ॥ बुद्धि कर्मानुसारिणी पूर्ण ॥ जानकी व्यर्थ आणून ॥ कुळक्षय आरंभिला ॥ ६७ ॥ राम हा वैकुंठवासी नारायण ॥ सुरांचे अवतार वानर पूर्ण ॥ हें नारदें वर्तमान ॥ पूर्वीच मज सांगितलें ॥६८॥ असो जें शुभाशुभ कर्म होत ॥ तें भोगिल्याविण न चुकत ॥ पुढील होणार भविष्यार्थ ॥ तो न चुके कदाही ॥ ६९ ॥ करूं नये तें त्वां राया केलें ॥ शेवटीं सीतेस तरी भोगिलें ॥ येरू म्हणे बहुत यत्न केले ॥ परी ते वश न होय ॥ ७० ॥ ती रामावेगळी तत्त्वतां ॥ आणिकां वश नव्हे सर्वथा ॥ कुंभकर्ण म्हणे लंकानाथा ॥ राघवरूप धरीं तूं ॥ ७१ ॥ जपोनियां कापट्यमंत्र ॥ होईं सुंदर रघुवीर ॥ सीता होईल वश साचार ॥ क्षणमात्र न लागतां ॥ ७२ ॥ मग बोले लंकेश्वर ॥ मी जैं निजांगें होईन रघुवीर ॥ तेव्हां दुर्वासना समग्र ॥ मावळेल

२८ पृथ्वी. २९ औषध. ३० स्तुतिशब्दरूप पुष्पहार. ३१ सिंह वाटेनें जात असतां मध्येंच मागें पाहातो त्या न्यायानें. ३२ यम. ३३ ढाल. ३४ मथितव्याप्रमाणें.

माझी समूळीं ॥ ७३ ॥ घरासी येतां वैंसरमणी ॥ तम न उरे ते क्षणीं ॥ कीं गरुड येतां सर्पश्रेणी ॥ पळती उठोनि जीवभयें ॥ ७४ ॥ तैसा मी राम होतांचि जाण ॥ वाटे परनारी मातेसमान ॥ एकवचन एकबाण ॥ एकपत्नीव्रती होतों ॥ ७५ ॥ याचिलागीं बंधु जाण ॥ राम सौमित्र वानरगण ॥ यांसी संहारिल्याविण ॥ वश नोहे जानकी ॥ ७६ ॥ यावरी बोले कुंभकर्ण ॥ आतां गिळीन सकळ सैन्य ॥ क्षणांत राम लक्ष्मण ॥ घरून आणीन पुरुषार्थें ॥ ७७ ॥ अपार सैन्यसमुद्र ॥ सवें देत दशकंधर ॥ रावणासी नमून सत्वर ॥ कुंभकर्ण निघाला ॥ ७८ ॥ रणा येतां कुंभकर्ण ॥ तेथें होते वानरगण ॥ ते अवघे गेले पळोन ॥ रामचंद्रासी सांगावया ॥ ७९ ॥ कुंभकर्ण विचारी अंतरीं ॥ मी काय लोट्टं वानरांवरी ॥ जंबुकांवरी जैसा केसैंरी ॥ धांवतां पुरुषार्थ दिसेना ॥ ८० ॥ पिपीलिकांवरी धांवे गज ॥ कीं अळिकेवेरी द्विजैराज ॥ मूढसभेंत तेजःपुंज ॥ पंडित शोभा न पावे ॥ ८१ ॥ आरंभीं राक्षसदळ तुंबळ ॥ वानरांवरी धांवलें चपळ ॥ कपी उठावले सकळ ॥ शिळा वृक्ष घेऊनियां ॥ ८२ ॥ युद्ध झालें अपार ॥ लोटले अशुद्धाचे पूर ॥ परी ते न मानी घटश्रोत्र ॥ म्हणे हें युद्ध कायसें ॥ ८३ ॥ मूढ अपार बोलती ॥ परी तें न भरे पंडिताचे चित्तीं ॥ जैसे वृषभ परस्परें भांडती ॥ महाव्याघ्रासी न माने तें ॥ ८४ ॥ असो तेव्हां मुद्गर घेऊन ॥ रामावरी लोटला कुंभकर्ण ॥ अठरा पद्मे वानरगण ॥ पर्वत पाषाण भिरकाविती ॥ ८५ ॥ पर्वतावरी पर्जन्य पडत ॥ परी तो व्यथा न मानी किंचित ॥ कीं कूर्मपृष्ठीवरी बहुत ॥ सुमनें वर्षतां न ढळेचि ॥ ८६ ॥ तों शतशृंगमंडित पर्वत ॥ घेऊन भिरकावी हनुमंत ॥ तो मुष्टिघातें त्वरित ॥ फोडून टाकी कुंभकर्ण ॥ ८७ ॥ म्हणे रे मर्कटा घरीं धीर ॥ तुवां जाळिलें माझें नगर ॥ म्हणोनि घांवे घटश्रोत्र ॥ हनुमंतावरी तेधवां ॥ ८८ ॥ बळें शूळ भोंवंडोनी ॥ मारुतीवरी घाली उचलूनी ॥ ते वेळे वायुसुत धरणीं ॥ मूर्च्छा येऊन पडियेला ॥ ८९ ॥ तें देखोन वाहिनीपती ॥ नीळ धांवे समीरगती ॥ कुंभकर्णाची युद्धगती ॥ देव पाहाती विमानीं ॥ ९० ॥ नीळें पर्वत वरी टाकिला ॥ तो मुष्टिघातें चूर्ण केला ॥ नीळासी मुष्टिघात दीधला ॥ मूर्च्छित पाडिला धरणीये ॥ ९१ ॥ तों धांवले चौघे वानर ॥ जे काळासीही शिक्षा करणार ॥ ऋषभ शरभ गवाक्ष वीर ॥ गंधमादन चवथा तो ॥ ९२ ॥ चौघांजणीं चार पर्वत ॥ टाकिले पैं अकस्मात ॥ ते मुष्टिघातें पिष्टवत ॥ करूनियां टाकिले ॥ ९३ ॥ शरभ गवाक्ष धरणीवरी ॥ कुंभकर्णें आपटिले स्वकरीं ॥ दोघे भिरकाविले अंबरीं ॥ जगतीवरी पडियेले ॥ ९४ ॥ मग अट्टहासें गर्जे कुंभकर्ण ॥ वाटे ब्रह्मांड जाय उलोन ॥ मग वानरांतें देखोन ॥ ग्रासावया धांवला ॥ ९५ ॥ कैंव घालोनि अकस्मात ॥ एकदांच वानर धरी बहुत ॥ मुखीं घालूनि चावीत ॥ गिळिले गणित ऐका तें ॥ ९६ ॥ ऐशीं सहस्र द्रुमपाणी ॥ असुरें गिळिले मुख पसरूनी ॥ कित्येक कर्णरंध्रांतून निघोनी ॥ पळते जाहले एकसरें ॥ ९७ ॥ उरले वानर ते वेळे ॥ रण सांडोनि पळाले ॥ गिरिकंदरी

३५ सूर्य. ३६ सर्पांच्या पंक्तीला. ३७ सिंह. ३८ मुंग्यांवर. ३९ किडीवर. ४० गरुड. ४१ रक्षाचे. ४२ कुंभकर्ण. ४३ शस्त्रविशेष, मोगर. ४४ कांसवाच्या पाठीवर. ४५ सेनापती. ४६ वायुवेगानें. ४७ झडप. ४८ ज्यांत वृक्ष घेतलेले वानर.

दडाले ॥ जीवभयेंकरूनियां ॥ ९८ ॥ कित्येक तेव्हां वानरगण ॥ सूर्यसुतासी गेले शरण ॥ ते वेळीं पर्वत घेऊन ॥ सुग्रीववीर धांविन्नला ॥ ९९ ॥ विशाळ पर्वत टाकिला ॥ येरें मुद्गरें चूर्ण केला ॥ सुग्रीव म्हणे अमंगळा ॥ वृथा पुष्ट राक्षसा ॥ १०० ॥ तुझें नासिक आणि कर्ण ॥ क्षण न लागतां छेदीन ॥ विमानीं वृंदारकगण ॥ जेणेंकरून तोषती ॥ १ ॥ तुझा अग्रज दशकंधर ॥ पंचवटीस येऊनि तैस्कर ॥ जानकी चिद्रत्न सुंदर ॥ घेऊनि आला चोरूनियां ॥ २ ॥ तरी तस्करातें दंड हाचि पूर्ण ॥ छेदावें नासिक आणि कर्ण ॥ तूं रावणानुज कुंभकर्ण ॥ शिक्षा लावीन तुज आतां ॥ ३ ॥ कुंभकर्ण म्हणे सुग्रीवासी ॥ मशक औंगळें बहुत बोलसी ॥ जैसा पतंग वडवानळासी ॥ विझवावया धांवत ॥ ४ ॥ मशक जाहलें क्रोधायमान ॥ म्हणे सगळा पर्वत गिळीन ॥ वृश्चिक स्वपुच्छेंकरून ॥ ताडीन म्हणे खदिरांगारा ॥ ५ ॥ ऊर्णनाभीचा उंदरतंतु ॥ तेणें केवीं बांधिजे ऐरावतु ॥ सूर्यमंडळ घगधगितु ॥ खद्योत केवीं गिळील पां ॥ ६ ॥ तैसा तूं बळहीन वानर ॥ रागें आलासी मजसमोर ॥ मेंत्कुणप्राय शरीर ॥ चूर्ण करीन तुझें आतां ॥ ७ ॥ ऐसें बोलतां रावणानुज ॥ पर्वत घेऊनि धांवे अर्केंजे ॥ कुंभकर्णाचे हृदयीं सहज ॥ येऊनियां आदळला ॥ ८ ॥ पर्वत गेला चूर्ण होऊन ॥ क्रोधें धांवे कुंभकर्ण ॥ सुग्रीवासी चरणीं धरून ॥ भोंवंडिला गरगरां ॥ ९ ॥ पृथ्वीवरी आपटूं पाहत ॥ तों प्रतापी सूर्यसुत ॥ पिळूनि कुंभकर्णाचा हात ॥ ऊर्ध्वपंथें उडाला ॥ ११० ॥ ब्रह्मंडळपर्यंत ॥ उडोनि गेला कपिनाथ ॥ त्याहून कुंभकर्णाचा हात ॥ उंचावला ते काळीं ॥ ११ ॥ मागुती वानरेश्वर धरिला ॥ बळेंच कक्षेंत दाटिला ॥ कक्षेमाजी गुंडाळला ॥ कंटाळला दुर्गंधीनें ॥ १२ ॥ म्हणे वाळीनें रावण ॥ कक्षेंत घालोनि केलें स्नान ॥ तो सूड आजि घेतला जाण ॥ टाकीन रगडोनी मर्कटा ॥ १३ ॥ जयवाद्यांचा गजर ॥ होता जाहला पैं अपार ॥ रणीं आजि साधिला वानरेश्वर ॥ मग घटश्रोत्र परतला ॥ १४ ॥ संसारजाळें परम थोर ॥ त्यांत गुंतला साधक नर ॥ तो पळावया पाहे बाहेर ॥ तेवीं वानरेश्वर निघों इच्छी ॥ १५ ॥ दुर्गंधींत पडलें मुक्ताफळ ॥ कीं पंकेंगतेंत मराळ ॥ कीं ब्राह्मण श्रोत्री निर्मळ ॥ हिंसकगृहीं कोंडिला ॥ १६ ॥ असो मस्त जाहला कुंभकर्ण ॥ नसे तया देहस्मरण ॥ तों कक्षेंतून सूर्यनंदन ॥ न लागतां क्षण निसटला ॥ १७ ॥ नेत्रपातें जंव देलावत ॥ इतुक्यांत साधिलें कृत्य ॥ कुंभकर्णस्कंधीं उभा ठाकत ॥ तोंरानाथ तेधवां ॥ १८ ॥ दोन्ही विशाळ कर्ण ते वेळे ॥ दोन्ही करीं दृढ धरिले ॥ दंतसंधींत सांपडविलें ॥ नासिक कुंभकर्णाचें ॥ १९ ॥ कर्ण नासिक उपडोनी ॥ सुग्रीव उडाला गगनीं ॥ रामचरणांवरी येऊनी ॥ मस्तक ठेवी सप्रेम ॥ १२० ॥ एकचि जाहला जयजयकार ॥ देव वर्षती सुमनसंभार ॥ यशस्वी जाहला सूर्यकुमर ॥ आलिंगी रघुवीर तयातें ॥ २१ ॥ घ्राण कर्ण नेले सूर्यसुतें ॥ परी शुद्धि नाहीं कुंभकर्णातें ॥ वर्तमान कळलें रावणातें ॥ घटश्रोत्रातें विटंबिलें ॥ २२ ॥ परम चिंताक्रांत रावण ॥ नापिक दीघला पाठवून ॥ गगनचुंबितें

४९ सुग्रीवाला. ५० देवांचे समुदाय. ५१ चोर. ५२ मोठें. ५३ कोळी, सुतेरा, त्याच्या. ५४ पोटांतून उत्पन्न होणारा तंतू. ५५ डेंकूण. ५६ चिखलाच्या खळग्यांत. ५७ आकाशापर्यंत पोंचेल असा.

वंशें[५७] घेऊन ॥ तयासी दर्पण[५८] बांधिला ॥ २३ ॥ सप्तखणी महाद्वार देख ॥ त्यावरी उभा ठाके नापिक ॥ कुंभकर्णाचें संमुख ॥ आदर्श तेव्हां दाविला ॥ २४ ॥ छेदोनि नेले नासिक कर्ण ॥ दर्पणीं देखे कुंभकर्ण ॥ सुग्रीव गेला कक्षेंतूनं[५९] ॥ झालें स्मरण ते काळीं ॥ २५ ॥ जैसा किंशुकीं[६०] फुलला पर्वत ॥ तैसा दिसे कुंभकर्ण आरक्त ॥ परम विटला मनांत ॥ स्वरूप आपलें देखतां ॥ २६ ॥ मनांत ह्मणे कुंभकर्ण ॥ आतां व्यर्थ काय वांचून ॥ दशग्रीवास परतोन ॥ काय हें वदन दाखवूं ॥ २७ ॥ कपींसहित रामलक्ष्मण ॥ गिळीन रणीं न लागतां क्षण ॥ पृथ्वी पालथी घालीन ॥ निर्दाळीन देव सर्व ॥ २८ ॥ कुंभकर्ण परतला दळीं ॥ दांतें रगडी अधरपाळी[६१] ॥ कृतांत-वत हांक दीधली ॥ डळमळली उर्वी[६२] तेव्हां ॥ २९ ॥ परतला देखोनि कुंभकर्ण ॥ पळों लागले वानरगण ॥ आले रघुपतीस शरण ॥ रक्षीं रक्षीं म्हणूनियां ॥ १३० ॥ दृष्टीं लक्षूनि राघव ॥ कुंभकर्णें घेतली धांव ॥ तंव तो सौमित्रें[६३] बैलार्णव[६४] ॥ पाचारीत तयातें ॥ ३१ ॥ म्हणे उभा राहें एक क्षण ॥ पाहें माझें शरसंधान ॥ परी तो न मानी कुंभकर्ण ॥ रामाकडे धांविन्नला ॥ ३२ ॥ परम कोपें सुमित्रा-कुमर ॥ कुंभकर्णावरी टाकी सप्त शर ॥ ते सपक्ष बुडाले समग्र ॥ मर्ध्येंच गुप्त जाहले ॥ ३३ ॥ सौमित्रें टाकिले बहुत बाण ॥ परी ते न मानी कुंभकर्ण ॥ जेवीं पर्वतावरी पुष्पें येऊन ॥ पडतां आसन न चळेचि ॥ ३४ ॥ पंडितवचनें रसाळीं ॥ पाखांडी न मानी कदाकाळीं ॥ तैसा कुंभकर्ण ते वेळीं ॥ न गणी शर सौमित्राचे ॥ ३५ ॥ तों गदा घेऊनि बिभीषण ॥ बंधूवरी आला धांवोन ॥ म्हणे निर्नासिका एक क्षण ॥ मजसीं आतां युद्ध करीं ॥ ३६ ॥ म्यां पूर्वीं बोधिला दशवक्त्र ॥ परी त्यासी झोंबला कामविखार[६५] ॥ तेणें भुलला तो समग्र ॥ शुद्धि अणुमात्र नसेचि ॥ ३७ ॥ गोड वचनें कडू वाटती ॥ कडू तें गोड वाटे चित्तीं ॥ ऐश्वर्यमद झेंडू निश्चितीं ॥ कंठीं दाटला तयाचे ॥ ३८ ॥ रावणदुष्कृतवल्लीचीं फळें ॥ तुम्हां प्राप्त जाहलीं शीघ्रकाळें ॥ त्याचें प्रत्युत्तर ते वेळे ॥ कुंभकर्ण देतसे ॥ ३९ ॥ म्हणे बिभीषणा शतमूर्खा ॥ हांससी माझ्या कर्णनासिका ॥ मी कोण हें तुज देखा ॥ नाहीं कळलें अद्यापि ॥ १४० ॥ कुळक्षयास कारण ॥ तूं मिळालास इकडे येऊन ॥ मजपुढें दावूं नको वदन ॥ क्षणें प्राण घेईन तुझा ॥ ४१ ॥ राक्षससिंहांमाजी देख ॥ तूं एक जन्मलासी जंबुक[६६] ॥ कपटिया न दाखवीं मुख ॥ कुळवना पावक[६७] तूं ॥ ४२ ॥ तुझीं शतखंडें करितां ये वेळीं ॥ परी आम्हांसी द्यावया तिळांजळी ॥ तुज रक्षिलें ये काळीं ॥ कुलोत्पत्तीकारणें ॥ ४३ ॥ होईं माघारा वेगेंसीं ॥ निघें रामाचे पाठीसीं ॥ आजि कपिसेना निश्चयेंसीं ॥ मी ग्रासीन क्षणार्धें ॥ ४४ ॥ ऐकूनि बंधूचें वचन ॥ माघारला बिभीषण ॥ पुढें रामावरी कुंभकर्ण ॥ मुद्गर घेऊनि धांवि-न्नला ॥ ४५ ॥ श्रीराम म्हणे कुंभकर्णा ॥ आजि तूं पात्र[६८] जाहलासी माझिया बाणा ॥ तुम्हीं पीडिलें त्रिभुवना ॥ जाणोनि ऐसें अव-तरलों ॥ ४६ ॥ तुवां जे गिळिले वानरगण ॥ ते फोडोनि बाहेर काढीन ॥ तुझें जवळी आलें मरण ॥ पाहें सावधान मजकडे

५८ बांबू. ५९ आरसा. ६० कांखेतून. ६१ पळसांनीं. ६२ ओंठ. ६३ पृथ्वी. ६४ लक्ष्मण. ६५ बळाचा समुद्र. ६६ मदनरूपी सर्प. ६७ कोल्हा. ६८ अग्नि. ६९ योग्य.

॥ ४७ ॥ ऐसें बोलोनि दिनकरकुळदीप ॥ क्षण न लागतां चढवी चाप ॥ जो आदिपुरुष त्याचा प्रताप ॥ न वर्णवेचि वेदशास्त्रां ॥ ४८ ॥ रणरंगधीर[७०] रघुवीर ॥ उभा राहिला कुंभकर्णासमोर ॥ कीं निशा संपतां दिनकर ॥ उदयाचळीं विराजे ॥ ४९ ॥ म्हणे मृत्युपुरीस राहें जाऊन ॥ सर्वेंच पाठवितों रावण ॥ लंकेस स्थापिला बिभीषण ॥ चंद्रार्क भ्रमती गगनीं जों ॥ १५० ॥ यावरी बोले कुंभकर्ण ॥ तूं जन्मांतरींचा शत्रु पूर्ण ॥ हें आम्हांसी आहे ज्ञान ॥ मूळची खूण सर्वही ॥ ५१ ॥ आपुलें सामर्थ्य वर्णिलें ॥ परी मजपुढें कदा न चाले ॥ कपिदळ गिळीन सगळें ॥ दांतांसी दांत न लावितां ॥ ५२ ॥ तुवां वधिले खर त्रिशिरा दूषण ॥ वाळी मारिला कपटेंकरून ॥ परी मजपुढें तो अभिमान ॥ न चले कदा मानवीया ॥ ५३ ॥ अरे निद्रौर्णवीं[७१] जाहलों निमग्न ॥ नातरी नुरतें त्रिभुवन ॥ तुज वीर म्हणतां जाण ॥ हांसें मज येतसे ॥ ५४ ॥ वनचरांसी पीडी कुंजरें[७२] ॥ परी मृगेंद्रापुढें[७३] जर्जर ॥ कीं मेघापुढें वणवा अपार ॥ विझोनि जाय क्षणार्धें ॥ ५५ ॥ तैसें तुज येथें करीन ॥ सोडीं तुझे निर्वाण बाण ॥ हें ऐकोनि रघुनंदन ॥ ओढी आकर्ण शर तेव्हां ॥ ५६ ॥ जैशा प्रळयविजा अनिवार ॥ तैसे राघवाचे येती शर ॥ असुरें मुख पसरिलें थोर ॥ गिळी अपार बाणांतें ॥ ५७ ॥ भयभीत वानर तेथें ॥ विलोकिती कुंभकर्णाचे सामर्थ्यातें ॥ बाण गिळिले असंख्यातें ॥ नव्हे गणित तयांचें ॥ ५८ ॥ सागरीं मिळती गंगापूर ॥ तैसे मुखीं सांठवी शर ॥ मग हातीं घेऊन मुद्गर ॥ रामावरी धांविन्नला ॥ ५९ ॥ हांक फोडिली प्रचंड ॥ तेणें डळमळलें ब्रह्मांड ॥ जळचर वनचर उदंड ॥ गतप्राण जाहले ॥ १६० ॥ मुद्गर भोंवंडी चक्राकार ॥ रामावरी घालूं पाहे असुर ॥ मग तो रणरंगधीर ॥ दिव्यशर काढीत ॥ ६१ ॥ मंत्राच्या आवृत्ति करूनी ॥ बाणाग्रीं स्थापिला प्रळयामी ॥ आकर्ण ओढी ओढूनी ॥ बाण सोडी राघव ॥ ६२ ॥ मुद्गरासहित हस्त ॥ बाणें तोडिला अकस्मात ॥ भेदीत गेला गगनपंथ ॥ सपक्ष उरगें[७४] जयापरी ॥ ६३ ॥ रामबाण हाचि सुपर्ण[७५] ॥ गेला हस्तसर्प घेऊन ॥ सर्वेंच सूर्यबीज जपोन ॥ रघुनंदन शर सोडी ॥ ६४ ॥ तेणें खंडिला दुजा हस्त ॥ गेला गगनीं अकस्मात ॥ दोन्ही भुजा भूमीवरी पडत ॥ विंध्याचळाचिया परी ॥ ६५ ॥ परी भुजा होऊनि जित ॥ जाती कपींचे भार रगडीत ॥ वानर उचलोनि पर्वत ॥ हस्त ठेंचिती असुराचे ॥ ६६ ॥ सांडूनि संग्रामाची भूमी ॥ वानर पळती गिरिवृक्षगुल्मीं ॥ परी अचळ ठाण संग्रामीं ॥ रघूत्तमाचें चळेना ॥ ६७ ॥ मग काढिले दोर शर ॥ गुणीं योजोनियां सोडी सत्वर ॥ त्यांहीं दोन्ही चरण समग्र ॥ कटीपासूनि खंडिले ॥ ६८ ॥ चरणगडबडाट थोर ॥ खालीं पाषाण होती चूर ॥ महावृक्ष घेऊनि वानर ॥ ताडिती बळें ठायीं ठायीं ॥ ६९ ॥ असो मुख पसरोनि ते काळीं ॥ राक्षस धांवे पोटचाळीं[७६] ॥ विमानीं सुरवर ते वेळीं ॥ आश्चर्य करिती तयाचें ॥ १७० ॥ नासिकीं लोचनीं वदनीं ॥ ज्वाळा सोडी क्रोधेंकरूनी ॥ इकडे भीमकाळास्त्र बाणीं ॥ अयोध्यानाथें स्थापिलें ॥ ७१ ॥ करी वायूचें खंडण ॥ ऐसा राघ-

---

७० श्रीरामचंद्र. ७१ युद्धरंगांत धैर्यवान. ७२ निद्रासमुद्रांत. ७३ हत्ती. ७४ सिंहापुढें. ७५ सर्प. ७६ गरुड. ७७ पोटामधें सरपटत.

वाचा दिव्य बाण ॥ आकर्ण ओढी ओढून ॥ न लागतां क्षण सोडिला ॥ ७२ ॥ वज्रें तुटे शैलशिखर ॥ तैसें बाणें उडविलें शिर ॥ भेदीत गेलें अंबरें ॥ करीत प्रळयगर्जना ॥ ७३ ॥ विमानें घेऊनि पळती सुरवर ॥ भयभीत शशिदिनकर ॥ तों शिर उतरोनि सत्वर ॥ लंकेवरी पडियेलें ॥ ७४ ॥ बहुत सदनें मोडून ॥ कित्येक असुर पावले मरण ॥ ते वेळीं वृंदारकगण ॥ पुष्पें वर्षती श्रीरामावरी ॥ ७५ ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ विजयी जाहला रघुवीर ॥ दुंदुभि वाजवी सुरेश्वर ॥ आनंद अंबरीं न समाये ॥ ७६ ॥ धांवती सकळ वानरगण ॥ वंदिती रघुपतीचे चरण ॥ कुंभकर्णाचें उरलें सैन्य ॥ लंकेमाजी प्रवेशलें ॥ ७७ ॥ सभेसी येऊनि घायाळ ॥ वर्तमान सांगती सकळ ॥ ऐकतां रावण पडला विकळ ॥ सिंहासनावरूनि ॥ ७८ ॥ म्हणे गेलें कुंभकर्णनिधान ॥ बंधूविणें दिशा शून्य ॥ ऐसा शोकसमुद्रीं पडतां रावण ॥ आला धांवूनि इंद्रजित ॥ ७९ ॥ रावणासी सावरून ॥ म्हणे राया पाहें विचारून ॥ या मृत्युलोकासी येऊन ॥ चिरंजीव कोण राहिला ॥ १८० ॥ यावरी आमुचा विपरीत काळ ॥ वानर मारिती राक्षसदळ ॥ खद्योतें गिळिलें सूर्यमंडळ मशक भूगोळा हालवी ॥ ८१ ॥ पतंगपक्षवातेंकरूनी ॥ कैसा विझाला प्रळयाग्नी ॥ भूतांनीं काळ नेऊनी ॥ कुटके करून भक्षिला ॥ ८२ ॥ कुंभकर्ण वीरकेसरी ॥ रणीं मारिला नरवानरीं ॥ विपरीत काळाची परी ॥ ऐसीच असे विचारा ॥ ८३ ॥ रावणाचे विंशति नेत्र ॥ पाझरती दुःखें नीर ॥ त्या काळीं साहा जण वीर ॥ उभे ठाकले संग्रामा ॥ ८४ ॥ रामविजयग्रंथ विशेष ॥ युद्धकांड माजला वीररस ॥ तो श्रवण करा सावकाश ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ८५ ॥ रणरंगधीर रघुवीर ॥ भक्तवत्सल परम उदार ॥ अभंग अक्षय श्रीधरवर ॥ विजयी साचार सर्वदा ॥ ८६ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ सप्तविंशतितमोध्याय गोडा हा ॥ १८७ ॥ श्रीसीतारामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ अध्याय ॥ २७ ॥ ॥ ओंव्या ॥ १८७ ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

७८ आकाश. ७९. देवांचे समुदाय. ८० निश्चेष्टित. ८१ खद्योत. ८२ तुकडे तुकडे.


२८
गोलिवडेकर

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ श्रीरामचरित्र अति सुरस ॥ परिसतां अंतःकरणीं उल्हास ॥ सांडोनि आठव-विसरास ॥ राममय जाहलें ॥ १ ॥ रघुवीरमहिमा विशेष ॥ शोधावया धांविन्नलें मानस ॥ तंव तें उन्मन होऊनि निःशेष ॥ राममय जाहलें ॥ २ ॥ बुद्धि धांवली वेगेंकरून ॥ गणावया जगद्वंद्याचे गुण ॥ तंव ते बौद्धरूप होऊन ॥ राममय जाहली ॥ ३ ॥ तों चित्तास आला आवेश ॥ धणीभरी वर्णावया अयोध्याधीश ॥ तें चैतन्यरूप होऊनि विशेष ॥ राममय जाहलें ॥ ४ ॥ कास घाली अहंकार ॥ पावेन रामकथाब्धीचा पार ॥ तो ब्रह्मानंदीं बुडाला साचार ॥ निरहंकार होऊनियां ॥ ५ ॥ ऐकतां रघुनाथचरित ॥ श्रवण होऊनि ठेले चकित ॥ त्वचा आनंदमय होत ॥ इतर स्पर्श टाकूनियां ॥ ६ ॥ राम पाहावया वेळोवेळीं ॥ चक्षूंनीं घेतली आळी ॥ रसना आनंदें नाचों लागली ॥ रामचरित्र वर्णावया ॥ ७ ॥ रामचरणकमळींचा आमोद ॥ सेवावया घ्राण झालें मिलिंद ॥ एवं सर्व इंद्रिय-वृंद ॥ रघुनाथीं लीन जाहला ॥ ८ ॥ वक्ता म्हणे दश इंद्रियांतें ॥ जिव्हेसी भाग्य आलें अद्भुतें ॥ रघुपतीचे गुण वर्णी ते ॥ ब्रह्मानंदें-करूनियां ॥ ९ ॥ श्रोते म्हणती आमुचे श्रवण ॥ दश इंद्रियांमाजी धन्य ॥ पुढें बोलें कथानुसंधान ॥ युद्धकांड सुरस तें ॥ १० ॥ सत्ताविसावे अध्यायीं कथन ॥ रामें वधिला कुंभकर्ण ॥ उद्विग्न जाहला रावण ॥ तों वीर सहा जण ऊठिले ॥ ११ ॥ महापार्श्व आणि महोदर ॥ देवांतक नरांतक त्रिशिर ॥ अतिकाय राजपुत्र ॥ शक्रजिताचा कनिष्ठ बंधु ॥ १२ ॥ घेऊनि चतुरंग सेना ॥ साही चालिले रणांगणा ॥ रणवाद्यें वाजती नाना ॥ ऐकतां मना भय उपजे ॥ १३ ॥ महाद्वार उल्लंघून ॥ बाहेर निघाले साही जण ॥ तों साही रथांवरी आगून ॥ शिरें टाकिलीं गृध्रांनीं ॥ १४ ॥ ऐसा होतां अपशकुन ॥ मनीं विराले साही जण ॥ परी वीरश्री नावरे पूर्ण ॥ वेगें रणांगणीं पातले ॥ १५ ॥ देखतां अमित्रांचे भार ॥ स्मरारिमित्राचे उठिले वीर ॥ घेऊन पर्वत तरुवर ॥ समरांगणीं मिसळले ॥ १६ ॥ राक्षसांचे झाले अस्थिपंजर ॥ क्षणें माघारले असुर ॥ तंव तो नरांतक राजपुत्र ॥ तुरंगारूढ धांविन्नला ॥ १७ ॥ अनिवार कपींचा मार ॥ बळें विदारिती वानर ॥ मृत्तिकाघटवत फोडिती शिर ॥ कीं पूगीफळ चूर्ण केलें ॥ १८ ॥ तो तुरंग श्यामकर्ण ॥ क्षीरार्णवाचें हृदयरत्न ॥ कीं मुसेंत आटोनि चंद्रकिरण ॥ तुरंगोत्तम वोतिला ॥ १९ ॥ कीं जान्हवीचे तोयें घडिला ॥ कीं उच्चैःश्रव्याचा बंधु आला ॥ सुपर्णाहून वेगें आगळा ॥ ऐसा प्रवेशला परदळीं ॥ २० ॥ जैसी प्रळयविद्युल्लता ॥ तैसी झळके असिलता ॥ अलातचक्र जेवीं फिरतां ॥ दृष्टी न दिसे कवणातें ॥ २१ ॥ अश्व स्वर्ग क्षत्री पाहीं ॥ तीन्ही मिळालीं एके ठायीं ॥ नरांतकें ते समयीं ॥ ख्याती केली अद्भुत ॥ २२ ॥ अठरा लक्ष ते क्षणीं ॥ वानर मारिले रणांगणीं ॥ किंचित माघारले द्रुमपाणी ॥ तें अंगदें दुरोनि लक्षिलें ॥ २३ ॥ अनिवार नरांतकाचा मार ॥ वानर वीर होतां समोर ॥ सहस्रांचे सहस्र ॥ घायासरिसे पाडीतसे ॥ २४ ॥ धांवे जैसा

१ संकल्प विकल्प सुटलेले. २ मौनी. ३ ब्रह्मात्मक. ४ राहिले. ५ छंद, हट्ट. अळी. ६ जीभ. ७ नाक. ८ भ्रमर. ९ इंद्रियांचा समुदाय. १० शत्रूंचे. ११ मदनांतक शंकराच्या मित्राचे, श्रीरामाचे. १२ सुपारी. १३ सूर्याचा घोडा. १४ अग्निचक्र. १५ खड्ग, तलवार.

कृतांत ॥ तैसा पेटला वोळिसुत ॥ कीं वृक्षावरी अकस्मात ॥ सौदामिनी पडियेली ॥ २५ ॥ तैसा अंगद अकस्मात आला ॥ कठोर पाणिप्रहार दीधला ॥ नरांतकाचा अंत जाहला ॥ अश्वासहित ते काळीं ॥ २६ ॥ नरांतक पडतां चौघे जण ॥ अंगदावरी धांवले चहूंकडून ॥ महापार्श्व महोदर जाण ॥ देवांतक आणि त्रिशिर ॥ २७ ॥ दोन पर्वत करीं घेऊन ॥ उभा ठाकला वाळिनंदन ॥ चौघांसीं युद्ध करितां पूर्ण ॥ अंगद संकटीं पडियेला ॥ २८ ॥ तंव ते धांवती तिघे जण ॥ वृषभ नळ वायुनंदन ॥ नळें पर्वतधायेंकरून ॥ महोदर रणीं मारिला ॥ २९ ॥ देवांतकासमीप हनुमंत ॥ येऊन तयासी बोलत ॥ तुज देवांतक नाम सत्य ॥ कोण्या मूढें ठेविलें ॥ ३० ॥ निर्नासिकासी नाम रतिकांत ॥ कीं जारासी नाम ब्रह्मचारी म्हणत ॥ कीं ज्याचें नांव आदित्य ॥ तो अंधारीं पडियेला ॥ ३१ ॥ जंबुकें दृष्टीं देखतां पळे ॥ त्यासी केसरी नाम ठेविलें ॥ दोन्ही नेत्र संकोच जाहले ॥ कमळनेत्र नाम तया ॥ ३२ ॥ अमंगळा नाम भार्गारथी ॥ अनुसूया नाम जारिणीप्रती ॥ कीं बाळविधवेसी निश्चिती ॥ जन्मसावित्री हें नाम ॥ ३३ ॥ कोरान्न मागतां न मिळे कण ॥ तयासी इंद्र नाम ठेविलें पूर्ण ॥ जया क्षीरसिंधु नामाभिधान ॥ परी तक्रही न मिळे प्राशना ॥ ३४ ॥ अजारक्षका नाम पंडित ॥ काष्ठवाहका नाम नृपनाथ ॥ कीं दरिद्रियासी नाम प्राप्त ॥ कुबेर ऐसें जाहलें ॥ ३५ ॥ जैसे अजागळींचे स्तन ॥ कीं मुखमंडण बधिरकर्ण ॥ गर्भांधाचे विशाळ नयन ॥ तैसें जाण नाम तुझें ॥ ३६ ॥ वृषभासी सिंहासन ॥ श्वानासी अगरजालेपन पूर्ण ॥ कीं दिव्यांबरपरिधान ॥ जैसें उष्ट्रासी करविलें ॥ ३७ ॥ कनकवृक्ष धोत्रियासी म्हणती ॥ कीं चर्माचा केला हस्ती ॥ पक्ष्यासी भारद्वाज म्हणती ॥ देवांतक तव नाम तैसें ॥ ३८ ॥ ऐसें बोलून वायुकुमर ॥ हृदयीं देतसे लत्ताप्रहार ॥ संपला देवांतकाचा संसार ॥ तों त्रिशिरा सत्वर धांविन्नला ॥ ३९ ॥ हनुमंतें वृक्ष घेऊन ॥ त्रिशिरा मारिला न लागतां क्षण ॥ ऋषभें पर्वत घेऊन ॥ महापार्श्व मारिला ॥ ४० ॥ अतिकाय ऐसें देखोन ॥ सारथियासी म्हणे प्रेरीं स्यंदन ॥ सर्वांसी अलक्ष करून ॥ रामावरी धांविन्नला ॥ ४१ ॥ सहस्र घोडे ज्याचे रथीं ॥ एके सूत्रें आवरी सारथी ॥ अरुणासही न टिके गती ॥ नवल कपी करिती पैं ॥ ४२ ॥ अतिकायाचें स्थूळ शरीर ॥ इंद्रजिताऐसा प्रचंड वीर ॥ तयासमोर जाहले पांच वानर ॥ पर्वत हातीं घेऊनियां ॥ ४३ ॥ गवय गवाक्ष कुमुद ॥ शरभ आणि पांचवा मैंद ॥ पर्वत टाकिती सुबद्ध ॥ एकदांच ते काळीं ॥ ४४ ॥ अतिकायें सोडिले बाण ॥ पर्वत टाकिले पिष्ट करून ॥ शरीं खिळिले पांचही जण ॥ आरंबळत पडियेले ॥ ४५ ॥ बिभीषणासी पुसे रघुनंदन ॥ अहो हा आहे कोणाचा कोण ॥ येरू म्हणे रावणाचा नंदन ॥ नामाभिधान अतिकाय ॥ ४६ ॥ हा दिव्यरथ तेजागळा ॥ ब्रह्मदेवें यासी दिधला ॥ हा अनिवार असे झाला ॥ पुरुषार्थ यात्रा अद्भुत ॥ ४७ ॥ हा कोणास नाटोपे पूर्ण ॥ तुम्हींच उठावें घेऊन धनुष्यबाण ॥ कीं पाठवावा ऊर्मिलाजीवन ॥ याचा

१६ अंगद. १७ वीज. १८ मदन. १९ सूर्य. २० कालहा. २१ सिंह. २२ भिक्षा. २३ कुत्र्याला. २४ सुवासिक उटणें लावणें. २५ उत्तम वस्त्र नेसणें. २६ उंटास. २७ न पाहिलेंसे. २८ हाय हाय करीत. २९ लक्ष्मण.

प्राण घ्यावया ॥ ४८ ॥ काढिली चापाची गवसणी ॥ जेवीं निशांतीं प्रकटे तरणी[30] ॥ कीं कुंडांतील महा अग्नी ॥ याज्ञिकें फुंकोनि चेतविली[31] ॥ ४९ ॥ तों विनवी सुमित्रानंदन[32] ॥ मी अतिकायासीं युद्ध करीन ॥ अवश्य म्हणे सीताजीवन ॥ विजयी होई रणांगणीं ॥ ५० ॥ चाप चढवून सत्वर ॥ पुढें धांवे सुमित्राकुमर ॥ म्हणे रे अतिकाया तुझें स्थूळ शरीर ॥ विटंबीन आजि घातें ॥ ५१ ॥ तुझे शरें स्थूल सूक्ष्म देह दोन्ही ॥ वेगळे करीन समरांगणीं ॥ आतां लंकेंत परतोनी ॥ कैसा जाशील माघारा ॥ ५२ ॥ कृतांताचिया[33] मुखांत ॥ सांपडला राक्षस समस्त ॥ कुंजर[34] गेला सिंहदरींत ॥ तो कैसा येईल माघारा ॥ ५३ ॥ काळें पाश घालूनी ॥ ओढून तुज आणिलें रणीं ॥ भुजंगाचे कवेंतूनी ॥ ॥ मूषक कैसा जाईल ॥ ५४ ॥ अतिकाय म्हणे ते समयीं ॥ तूं वीर म्हणविशी पाहीं ॥ महाव्याघ्राचें सींग पाहीं ॥ जंबुकें जेंसें धरियेलें ॥ ५५ ॥ नट[35] नृप जाहला वेष धरून ॥ परी त्या न भीती कोणी जन ॥ वरी वैराग्य दावी पूर्ण ॥ अंतरीं मन तळमळी ॥ ५६ ॥ अयोध्या सांडोनि लवलाहीं ॥ प्रारब्धें आणिलें ये ठायीं ॥ आतां कोणाचे पायीं ॥ जाल तुम्ही येऊनियां ॥ ५७ ॥ स्वर्गीं तुमचे पितृगण ॥ काय करिती तेथें बैसोन ॥ त्यांचा समाचार आणावया पाठवीन ॥ तुम्हांस आतां ये काळीं ॥ ५८ ॥ ऐसें ऐकोन अतिकायाचें वचन ॥ सौमित्र म्हणे सावधान ॥ आतां सांभाळीं माझे बाण ॥ तुझे प्राणहर्ते जे ॥ ५९ ॥ तों अतिकाय लोटी स्यंदन[36] ॥ जो शतखणीं मंडित पूर्ण ॥ मित्रकरसंख्या[37] वारू जाण ॥ श्वेतवर्ण योजिले ॥ ६० ॥ सौमित्र सोडी पांच बाण ॥ नेणों पंच चपळा[38] निघाल्या मेघांतून ॥ लंकेशपुत्रें देखोन ॥ योजिला बाण ते काळीं ॥ ६१ ॥ चापापासून सुटतां बाण ॥ तेणें पांच शर टाकिले खंडून ॥ मग सोडीत सहस्र बाण ॥ सुमित्रानंदन ते काळीं ॥ ६२ ॥ परम चपळ अतिकाया ॥ तितुके शर तोडी लवलाह्या ॥ प्रळयमेघापरी गर्जोनियां ॥ सहस्र बाण सोडिले ॥ ६३ ॥ मग लक्षांचे लक्ष बाण ॥ सोडी सुमित्रानंदन ॥ कीं बाणांचाच पर्जन्य ॥ वर्षतसे ते काळीं ॥ ६४ ॥ तेथें गजमस्तकें विराजत ॥ मुक्तें त्यात्रि गारा उसळत ॥ शक्ति विद्युल्लता अद्भुत ॥ पूर वाहात अशुद्धाचे[39] ॥ ६५ ॥ तेथें शस्त्रें जाती वोसंन[40] ॥ प्रेतें वृक्ष जाती वाहोन ॥ वीरांचे हस्त विरोळे[41] पूर्ण ॥ तळपताती ठायीं ठायीं ॥ ६६ ॥ वीरांचे दंत विखुरले बहुत ॥ तेचि वाळू असंख्यात ॥ खेटकें[42] वरी तरत ॥ तेचि कूर्म जाणावे ॥ ६७ ॥ गजशुंडा वाहाती ॥ तींचि नाडे[43] सावजें तळपती ॥ असो ऐशी सौमित्रें केली ख्याति ॥ मान तुकविती वानर ॥ ६८ ॥ बहुत अस्त्रें नाना शस्त्रें ॥ सौमित्रावरी लंकेशपुत्रें ॥ टाकिलीं परी सौमित्रें ॥ छेदोनियां पाडिलीं ॥ ६९ ॥ मग सौमित्रें काढिला दिव्य बाण ॥ मुखीं ब्रह्मास्त्र स्थापून ॥ कल्पांतविजेसमान ॥ चापापासून सोडिला ॥ ७० ॥ निमिष न लागतां सत्वर ॥ छेदिलें अतिकायाचें शिर ॥ झाला एकचि जयजयकार ॥ सुमनें सुरवर वर्षती ॥ ७१ ॥ बहुसाल आटलें दळ ॥ लंकेंत प्रवेशले घायाळ ॥ रावणापुढें सकळ ॥ समाचार सांगती

३० सूर्य. ३१ प्रदीप्त केला. ३२ लक्ष्मण. ३३ यमाच्या. ३४ हत्ती. ३५ बहुरूपी. ३६ रथ. ३७ सहस्र. ३८ विजा. ३९ रक्ताचे. ४० फुकट. ४१ कुल्ल्या. ४२ ढाली. ४३ सुसरी, मगरी.

॥ ७२ ॥ सिंहासनावरून रावण ॥ खालीं पडे मूर्च्छा येऊन ॥ मग इंद्रजितें धांवोन ॥ सांवरून बैसविला ॥ ७३ ॥ म्हणे माझीं साही निधानें गेलीं ॥ पुनः परतोन नाहीं देखिलीं ॥ अतिकायासारिखा बळी ॥ पाठिराखा तुझा गेला ॥ ७४ ॥ इंद्रजित म्हणे रायाप्रती ॥ होणार न चुके कल्पांतीं ॥ आतां युद्धासी जातों मी निश्चितीं ॥ शत्रुक्षय करावया ॥ ७५ ॥ चतुरंग दळेंसीं झडकरी ॥ रणमंडळीं आला शक्रारी ॥ सेनादुर्ग ते अवसरीं ॥ आपणाभोंवते रचियेले ॥ ७६ ॥ रक्तें करूनियां स्नान ॥ रक्तवर्ण वस्त्रें नेसून ॥ बिभीतकैंसमिधा आणोन ॥ सर्षपधान्यसंयुक्त ॥ ७७ ॥ रणमंडळीं केलें हवन ॥ आंतून निघाला स्यंदन ॥ धनुष्य तूणीर शस्त्रें पूर्ण ॥ सारथिअश्वांसमवेत ॥ ७८ ॥ त्या रथीं बैसोन झडकरी ॥ मेघाआड गेला शक्रारी ॥ दुर्धर शर ते अवसरीं ॥ वर्षता जाहला अपार ॥ ७९ ॥ ते बाण नव्हती संपूर्ण ॥ वर्षत विजांचा पर्जन्य ॥ शिरें आणि कर चरण ॥ कपींचीं तुटती तटतटां ॥ ८० ॥ कोट्यनुकोटी पडिले वानर ॥ जाहला एकचि हाहाकार ॥ एकाखालीं एक दडपती वीर ॥ परम दुस्तर ओढवलें ॥ ८१ ॥ एक पळावया योजिती ॥ तत्काळ कर चरण खंडती ॥ रामसौमित्र तटस्थ पाहती ॥ अंगीं आदळती सायक ॥ ८२ ॥ धनुष्यें हातींचीं गळोनी ॥ रामसौमित्र पडले धरणीं ॥ लीलावतारी चापपाणी ॥ दाखवी करणी शत्रूची ॥ ८३ ॥ शतबाणें इंद्रजितें ॥ खिळिलें रामसौमित्रांतें ॥ पुराणसंख्यौ बाणीं अर्कजौंतें ॥ विंधोनि भूमीं पाडिलें ॥ ८४ ॥ शशिसंख्याबाणीं ॥ गंधमादन पाडिला रणीं ॥ रविसंख्येनें धरणीं ॥ ऋषभ मैंद पाडिला ॥ ८५ ॥ चंद्रकळासंख्या बाणीं नीळ ॥ सागरसंख्यें ऋक्षपाळ ॥ स्कंदमुखसंख्येनें नळ ॥ प्रेतवत पडिला ॥ ८६ ॥ ऋत्वर्धदिवससंख्यौबाणीं ॥ अंगद पाडिला समरांगणीं ॥ गवय गवाक्ष शरभ तीन्ही ॥ संवत्सरसंख्यांनीं खिळिले पैं ॥ ८७ ॥ सोडून कळासंरव्याबाण ॥ खिळिला दधिमुख पावकलोचन ॥ विद्यासंख्यौ सायक पूर्ण ॥ सुषेणावरी घातले ॥ ८८ ॥ रुद्रनेत्रसंख्यौं टाकून शर ॥ खिळिले गज केसरी वानर ॥ हेमकूट गौरमुख वीर ॥ युगसंख्यौंनीं खिळियेले ॥ ८९ ॥ सुमुख दुर्मुख ज्योतिर्मुख ॥ यांवरी अवतारसंख्यासौंयक ॥ वरकड वानर जे असंख्य ॥ ते बाणसंख्यांनीं खिळियेले ॥ ९० ॥ ऐसा करूनियां अनर्थ ॥ खालीं उतरे इंद्रजित ॥ जयवाद्यें वाजवीत ॥ लंकेमाजी प्रवेशला ॥ ९१ ॥ परम हर्षयुक्त रावण ॥ पुत्रासी देत आलिंगन ॥ म्हणे माझा प्रताप वाढविला पूर्ण ॥ तुवां एकें पुत्रराया ॥ ९२ ॥ असो वानर पडिले सर्व ॥ परी दोघे उरले चिरंजीव ॥ बिभीषण हनुमंत बलार्णव ॥ प्रियप्राण राघवाचे ॥ ९३ ॥ दोघे अत्यंत म्लानवदन ॥ स्फुंदस्फुंदोनि करिती रुदन ॥ म्हणती काळ कैसा कठिण ॥ आतां विचार कोण करावा ॥ ९४ ॥ अस्ता गेला वासरमणी ॥ प्रवर्तली घोर रजनी ॥ मग चुडिया पाजळोनि ते क्षणीं ॥ रण शोधूं निघाले ॥ ९५ ॥ महावृक्ष उन्मळले ॥ तैसे ठायीं ठायीं वीर पडले ॥ रण घुमत असे ते वेळे ॥ दोघे जण देखती ॥ ९६ ॥ तंव तो वीर

४४ बेहेड्याच्या. ४५ मोहऱ्या. ४६ मठरा. ४७ सुग्रीवाला. ४८ सह्या. ४९ बारा. ५० सोळा. ५१ चार. ५२ साही. ५३ तीस. ५४ साठ. ५५ चौसष्ट. ५६ चौदा. ५७ तीन. ५८ चार. ५९ दहा. ६० पांच.

जांबुवंत ॥ पडलासे आरंबळ्त[61] ॥ मग तया सांवरूनि हनुमंत ॥ बैसविता जाहला ॥ ९७ ॥ जांबुवंत बोले वचन ॥ या चराचराचा निज-प्राण ॥ तो सुखी असे कीं रघुनंदन ॥ अनुजासहित सांग पां ॥ ९८ ॥ स्फुंदस्फुंदोनि[62] सांगे बिभीषण ॥ निचेष्टित पडले रामलक्ष्मण ॥ त्याचपरी सकळ सैन्य ॥ प्राणहीन पडलें असे ॥ ९९ ॥ मग बोले ऋक्षपाळ[63] ॥ कोणी आणील द्रोणाचळ ॥ तरी त्या वलीसुवासें सकळ ॥ वीर आतां उठतील ॥ १०० ॥ उगवला नसतां वासरमणी ॥ औषधी आणाव्या त्वरेंकरूनी ॥ ऐसें ऐकतां तये क्षणीं ॥ मारुतात्मज[64] आवेशला ॥ १ ॥ क्षीराब्धीचे पैलतीरीं ॥ चार कोटी योजनें दूरी ॥ मारुति म्हणे तृतीय प्रहरीं ॥ औषधी वेगीं आणितों ॥ २ ॥ बिभीषणासी हनुमंत ॥ बोले होऊन सद्गदित ॥ जतन करावा रघुनाथ ॥ सौमित्रासहित जीवेंसीं ॥ ३ ॥ ऐसें बोलोनि हनु-मंत ॥ वेगें उडाला आकाशपंथ ॥ म्हणे यशस्वी अयोध्यानाथ ॥ शक्तिदाता होईं कीं ॥ ४ ॥ चपळ पाणिद्वय चरण ॥ घेत उड्डाण-वरी उड्डाण ॥ कीं क्षीराब्धीप्रती सुपर्ण[65] ॥ वैकुंठींहून जातसे ॥ ५ ॥ लक्षून मानससरोवर ॥ मेराळ[66] झेंपावे सत्वर ॥ त्याचपरी अंजनी-कुमर ॥ सप्तद्वीपें ओलांडी ॥ ६ ॥ सप्तसमुद्र ओलांडून ॥ द्रोणाचळाजवळी येऊन ॥ जनकजाशोकहरण[67] ॥ उभा ठाकला ते वेळीं ॥ ७ ॥ अगस्ति सागराचे तीरीं ॥ कीं त्रिविक्रम बळीचे द्वारीं ॥ कीं नृपाचिया भांडारीं ॥ तस्कर जैसा संचरे ॥ ८ ॥ कीं तरू-जवळी येऊनी ॥ उभा ठाकला कुठारपाणी ॥ कीं निधानापाशीं प्रीतिकरूनी ॥ सावध उभा ठाकला ॥ ९ ॥ असो कर जोडूनि हनुमंत ॥ द्रोणाचळातें स्तवीत ॥ म्हणे तूं परोपकारी पर्वत ॥ पुण्यरूप नांदसी ॥ ११० ॥ तुझें करितांचि स्मरण ॥ सकळ रोग जाती पळोन ॥ तरी शरजालीं रामलक्ष्मण ॥ इंद्रजितें पाडियेले ॥ ११ ॥ तूं जीवदानदाता सत्य ॥ त्रिभुवनामाजी यथार्थ ॥ कीर्ति ऐकोनियां धांवत ॥ मी याचक आलों असें ॥ १२ ॥ औषधी देऊनियां निर्मळ ॥ मज बोळवावें तत्काळ ॥ तंव तो प्रत्यक्ष मूर्तिमंत शैल[68] ॥ बोलता झाला कपीसी ॥ १३ ॥ म्हणे मर्कटा आलासी कोठून ॥ कैंचा राम कैंचा लक्ष्मण ॥ देवांस औषधी दुर्लभ जाण ॥ तुज कोठून प्राप्त होती ॥ १४ ॥ धरूनि माझा आश्रय ॥ मर्कटा तूं येथेंचि राहें ॥ त्यावरी तो राघवप्रिय ॥ काय बोलता जाहला ॥ १५ ॥ म्हणे पाषाणहृदयी तूं द्रोण ॥ मंदबुद्धि मूढ मलिन ॥ कार्याकार्य तुजलागोन ॥ निर्दया कैसें समजेना ॥ १६ ॥ वायसा काय मुक्ता-हार ॥ मद्यपियास काय तत्त्वविचार ॥ निर्दयासी धर्मशास्त्र ॥ सारासार समजेना ॥ १७ ॥ मांसभक्षकास नुपजे दया ॥ हिंसकास कैंची माया ॥ उंपरति पैशून्यवादिया[69] ॥ कदाकाळीं नसेचि ॥ १८ ॥ कृपणासी नावडे धर्म ॥ जारासी नावडे सत्कर्म ॥ निंदकासी नावडे प्रेम ॥ भजनमार्ग कदाही ॥ १९ ॥ कीर्तन नावडे भूतप्रेतां ॥ दुग्ध नावडे नवज्वरिता ॥ टवाळासी पैं तत्त्वतां ॥ तपानुष्ठान नावडे ॥ १२० ॥ तैसा तूं अत्यंत निष्ठुर ॥ रामभजन नेणसी पामर ॥ तुज न लागतां क्षणमात्र ॥ उचलोनि नेतों लंकेसी ॥ २१ ॥

---

६१ विव्हळत. ६२ रडत रडत. ६३ जांबुवंत. ६४ मारुति. ६५ गरुड. ६६ हंस. ६७ वामन. ६८ रत्नांच्या ठेवीजवळ. ६९ पर्वत. ७० विरक्ति. ७१ दुष्टवाणीच्या माणसाला.

शेषाकार पुच्छ पसरून ॥ द्रोणाचळ बांधिला आंवळून ॥ तत्काळचि उपडोन ॥ करतळीं घेऊनि चालला ॥ २२ ॥ उगवल्या असंख्यात सौदामिनी ॥ तैसा पर्वत दिसे दुरूनी ॥ कीं करीं घेऊनियां तरणी ॥ हनुमंत वीर जातसे ॥ २३ ॥ कीं सुधारसघट नेतां सुपर्ण ॥ लीलाकमल उचली पूर्ण ॥ कीं सहस्रवदनें उर्वी उचलोन ॥ सर्षपप्राय धरिली शिरीं ॥ २४ ॥ कीं कनकताट द्रोणाचळ ॥ वल्या तेचि दीप तेजाळ ॥ पाजळूनियां अंजनीबाळ ॥ ओंवाळूं येत रामातें ॥ २५ ॥ चतुर्थ प्रहरीं ब्रह्मीं मुहूर्तीं ॥ सुवेळेसी आला मारुती ॥ तंव तो नूतनलंकापती ॥ सामोरा धांवे आनंदें ॥ २६ ॥ तों सुटला शीतळ प्रभंजन ॥ चालिला वल्लींचा सुवास घेऊन ॥ त्या वातस्पर्शें रामलक्ष्मण ॥ सेनेसहित ऊठिले ॥ २७ ॥ रजनी संपतां तत्काळ ॥ किरणांसहित उगवे रविमंडळ ॥ तैसा राम तमालनीळ ॥ वानरांसमवेत ऊठला ॥ २८ ॥ कोणाचे तनूवरी साचार ॥ घाय न दिसे अणुमात्र ॥ असो द्रोणाचळासी वायुपुत्र ॥ घेऊन मागुती उडाला ॥ २९ ॥ लीला कंदुक खेळे बाळ ॥ तैसा पर्वत झेली विशाळ ॥ पूर्वस्थळीं ठेवून तत्काळ ॥ सुवेळेसी पातला ॥ १३० ॥ देवांसहित शक्र बैसत ॥ तैसा कपिवेष्टित रघुनाथ ॥ सद्गद होऊनि हनुमंत ॥ रामचरणीं लागला ॥ ३१ ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ प्रेमें दाटला रघुवीर ॥ हृदयीं धरिला वायुकुमर ॥ तो न सोडीच सर्वथा ॥ ३२ ॥ स्कंदासी भेटे उमावर ॥ कीं इंद्रा आलिंगी जयंत पुत्र ॥ कीं संजीवनी साधितां पवित्र ॥ गुरु कचासी आलिंगी ॥ ३३ ॥ हनुमंतार्चे निजवदन ॥ क्षणक्षणां कुरवाळीत रघुनंदन ॥ धन्य धन्य आजिचा दिन ॥ स्वामिगौरव लाहिजे तुवां ॥ ३४ ॥ श्रीराम म्हणे मारुतीसी ॥ सर्वांचा प्राणदाता तूं होसी ॥ सरली नाहीं जों निशी ॥ पर्वत तुवां आणिला ॥ ३५ ॥ बाळक होतां व्यथाभूत ॥ जनक जाऊनि औषधें आणीत ॥ बा रे तैसेंच केलें निश्चित ॥ प्रताप अद्भुत न वर्णवे ॥ ३६ ॥ ऐसें बोलतां रघुनंदन ॥ सकळ कपी म्हणती धन्य धन्य ॥ स्वामिगौरवापुढें पूर्ण ॥ सुधारसपान तुच्छ पैं ॥ ३७ ॥ सुग्रीवादि कपी धांवती ॥ हनुमंतासी दृढ हृदयीं धरिती ॥ वानरांसी म्हणे किष्किंधापती ॥ यावरी काय पाहतां ॥ ३८ ॥ आतां लंकेवरी जाऊन ॥ सकळ सदना लावा अग्न ॥ अष्टादशपद्मे वानर घेऊन ॥ नळ नीळ मारुति धांविन्नले ॥ ३९ ॥ गगनचुंबित तैलकाष्ठें ॥ कपींनीं चुडी पाजळिल्या नेटें ॥ कीं ते रामभवानींचे दिवटे ॥ गोंधळ घालिती रणांगणीं ॥ १४० ॥ चुडी घेऊनि समग्र ॥ भुभुःकारें गर्जविलें अंबर ॥ जय जय यशस्वी रघुवीर ॥ म्हणोनि धांवती सर्वही ॥ ४१ ॥ लंकादुर्ग ओलांडून ॥ आंत प्रवेशले वानरगण ॥ तों अद्भुत सुटला प्रभंजन ॥ चुडिया लाविती एकसरें ॥ ४२ ॥ वायूचे अद्भुत कल्होळ ॥ आकाशपंथें चालिली ज्वाळ ॥ लंकेमाजी हलकल्लोळ ॥ पळती लोक सर्व पैं ॥ ४३ ॥ घूर अद्भुत दाटलासे ॥ तेथें कोणा कोणी न दिसे ॥ ज्वाळा धांवती आवेशें ॥ लंका सर्व ग्रासावया ॥ ४४ ॥ कोट्यवधि घरें जळती ॥

७२ विजा. ७३ सूर्य. ७४ अमृतघट. ७५ गरुड. ७६ मोहरीसारखी. ७७ पहाटेच्या चार घटिका रात्रीस. ७८ बिभीषण. ७९ वारा. ८० कार्तिकस्वामीस. ८१ बृहस्पती. ८२ सुग्रीव. ८३ लंकेच्या महाद्वारावरचा बुरूज.

राक्षस स्त्रियांसह ओंहाळती ॥ आळोआळीं उभे असती ॥ चुडी घेऊन वानर ॥ ४५ ॥ दृष्टीं देखतां रजनीचर ॥ चुडींनीं भाजिती वानर ॥ तो दशमुखासी समाचार ॥ दूत सत्वर सांगती ॥ ४६ ॥ हनुमंतें आणोनि द्रोणाचळ ॥ सजीव केले वैरी सकळ ॥ लंकेंत प्रवेशलें कपिदळ ॥ जाळिलीं सकळ मंदिरें ॥ ४७ ॥ मग जंग प्रजंग क्रोधन ॥ विरूपाक्ष शोणिताक्ष राजनंदन ॥ कुंभनिकुंभांप्रति रावण ॥ म्हणे धांवा रे सत्वर ॥ ४८ ॥ सिद्ध करूनियां दळभार ॥ कुंभ निकुंभ धांवती सत्वर ॥ घालोनियां पर्जन्यास्त्र ॥ अग्नि समग्र विझविला ॥ ४९ ॥ जैसे कलेवरें सांडोनि जाति प्राण ॥ तैसे लंकेबाहेर आले कपिगण ॥ रणभूमीसी सर्व मिळोन ॥ युद्धालागीं सरसावले ॥ १५० ॥ आले देखोनि असुरभार ॥ सेनामुखीं होता वाळिकुमर ॥ तो पर्वत घेऊन सत्वर ॥ क्रोधनावरी धांविन्नला ॥ ५१ ॥ बळें पर्वत दिधला टाकून ॥ रथासहित चूर्ण जाहला क्रोधन ॥ तों जंघ प्रजंघ विरूपाक्ष दारुण ॥ आले धांवूनि अंगदावरी ॥ ५२ ॥ अंगदें विशाळ वृक्ष उपडोनी ॥ दोघे झोडून पाडिले धरणीं ॥ मग विरूपाक्षें निजबाणीं ॥ वानर बहुत खिळियले ॥ ५३ ॥ तों मैंद पर्वत घेऊनि धांविन्नला ॥ अकस्मात विरूपाक्षावरी टाकिला ॥ विरूपाक्ष प्राणासी मुकला ॥ शरभें वधिला शोणिताक्ष ॥ ५४ ॥ मग तो कुंभकर्णाचा नंदन ॥ कुंभ पुढें आला धांवोन ॥ धनुष्य ओढूनि आकर्ण ॥ नव बाण सोडिले ॥ ५५ ॥ त्या नवशरप्रहारेंकरूनी ॥ मैंद कपि खिळिला समरांगणीं ॥ शरभ विंधिला दोन बाणीं ॥ मूर्च्छित धरणीं पडियेला ॥ ५६ ॥ तों धांवे वाळिसुत ॥ घेऊन विशाळ पर्वत ॥ त्याचे कुंभें खिळिले हस्त ॥ अचैंळासहित रणभूमीं ॥ ५७ ॥ संकट पडिलें बहुत ॥ अंगद राहिला तटस्थ ॥ वानरीं हांक केली त्वरित ॥ राघवापासीं ते काळीं ॥ ५८ ॥ ऐकोनि गजकिंकाट देख ॥ आवेशें चेंपटे मृगेनायक ॥ यापरी किष्किंधापाळक ॥ कुंभहृदयीं आदळला ॥ ५९ ॥ कुंभाचें चाप घेतलें हिरून ॥ मोडून कुटके केले पूर्ण ॥ मल्लयुद्धास दोघे जण ॥ प्रवर्तले ते काळीं ॥ १६० ॥ एक मुहूर्तपर्यंत ॥ मल्लयुद्ध दोघांशीं अद्भुत ॥ अैकर्कजें हृदयीं मुष्टिघात ॥ कुंभासी बळें दीधला ॥ ६१ ॥ तेणें हृदय जाहलें शतचूर्ण ॥ कुंभाचा तत्काळ गेला प्राण ॥ तंव तो निकुंभ आवेशोन ॥ सुग्रीवावरी धांविन्नला ॥ ६२ ॥ तों पर्वत सबळ उचलून ॥ वेगें धांवे सीताशोकहरण ॥ अचल दिधला भिरकावून ॥ निकुंभें तो चूर्ण केला ॥ ६३ ॥ तेणें हनुमंत परम क्षोभला ॥ विशाळ तरु त्यावरी टाकिला ॥ तोही निकुंभें तोडिला ॥ क्षणमात्र न लागतां ॥ ६४ ॥ निकुंभें परिघें लवलाहीं ॥ घेऊन ताडिला मारुति हृदयीं ॥ पळमात्र मूर्च्छना ते समयीं ॥ आली हनुमंतास ते काळीं ॥ ६५ ॥ सर्वांचि धांवे अंजनीबाळ ॥ शतशृंगांचा उपटिला अचळ ॥ निकुंभावरी टाकिला तत्काळ ॥ चूर्ण जाहला निकुंभ ॥ ६६ ॥ घायाळें पळती लंकेंत ॥ रावणासी वर्तमान करिती श्रुत ॥ ऐकतांचि तो चिंताक्रांत ॥ दशवक्त्र जाहला पैं ॥ ६७ ॥ मग विंशतिनेत्रें पाचारी वीर ॥ परम प्रतपी समरधीर ॥ खराक्ष

८४ होरपळतात. ८५ शरीर. ८६ अंगद. ८७ पर्वतासह. ८८ पंजा मारितो. ८९ सिंह. ९० दोन घटिकांपर्यंत. ९१ सुग्रीवानें. ९२ मारुति. ९३ गदा. ९४ रावण.

विशालाक्ष असुर ॥ मकराक्ष तो तिसरा ॥ ६८ ॥ तिघांसी म्हणे दशवदन ॥ तुम्हीं माजवावें रण ॥ ते तत्काळ रथारूढ होऊन ॥ सेनेसहित निघाले ॥ ६९ ॥ रणतुरें गर्जती अपार ॥ रणमंडळीं पातले सत्वर ॥ तों शिळा द्रुम घेऊन वानर ॥ एकदांचि उठावले ॥ १७० ॥ येरयेरां पाचारिती ॥ उसणे घाय सवेंच देती ॥ असुरांचीं पोटें फाडिती ॥ वानर नखें घालोनियां ॥ ७१ ॥ कुंतें असिलेंता परिघें ॥ असुर टाकिती शस्त्रें सवेग ॥ तेणें विदारूनि अंग ॥ कपी पडती समरांगणीं ॥ ७२ ॥ कपिवीरीं केलें आगळें ॥ असुरभार मागें लोटले ॥ देखोन मकराक्ष ते वेळे ॥ बाण वर्षत धांवला ॥ ७३ ॥ जैशा पर्जन्यधारा अपार ॥ तैसा मकराक्ष वर्षे शर ॥ अपार भंगले वानर ॥ पाहे रघुवीर दुरूनी ॥ ७४ ॥ मान तुकावी सीतारमण ॥ म्हणे हा वीर प्रवीण ॥ कोदंड चढवोनि आपण ॥ जगद्वंद्य ऊठिला ॥ ७५ ॥ कोदंड ओढितां तये क्षणीं ॥ झणत्कारिल्या लघुकिंकिणी ॥ एकचि बाण ते क्षणीं ॥ दशकंठरिपूनें सोडिला ॥ ७६ ॥ मकराक्षाचें बाण-जाळ ॥ एकेंचि शरें छेदिलें तत्काळ ॥ जेवीं उगवतां सूर्यमंडळ ॥ भगणें सकळ लोपती ॥ ७७ ॥ एक उठतां विनायक ॥ असंख्य विघ्नें पळती देख ॥ कीं सुटतां चंडवात सन्मुख ॥ जलदजाल वितुळे पैं ॥ ७८ ॥ एक विष्णुनामेंकरून ॥ असंख्य दुरितें जाती जळोन ॥ कीं चेततां कृशान ॥ असंख्य वनें दग्ध होती ॥ ७९ ॥ कीं मूर्खाचे शब्द बहुत ॥ एकाच शब्दें खंडी पंडित ॥ कीं सिंहनादें गज समस्त ॥ गतप्राण होती पैं ॥ १८० ॥ हृदयीं प्रकटतां बोध ॥ सहज पळे काम क्रोध ॥ कीं प्रत्यया येतां ब्रह्मानंद ॥ क्षुद्रानंद सर्व विरती ॥ ८१ ॥ तेवीं रामबाणें एकेंचि सबळ ॥ तोडिलें मकराक्षाचें शरजाळ ॥ मग त्यास मुक्ति द्यावया तत्काळ ॥ दिव्यशर काढिला ॥ ८२ ॥ मकराक्षाचा कंठ लक्षून ॥ शर चालिला जैसा सुपर्ण ॥ क्षणमात्रें कंठ छेदून ॥ आकाशपंथें उडविला ॥ ८३ ॥ तों विशालाक्ष आणि खराक्ष ॥ त्यांहीं पाचारिला कैमलदलाक्ष ॥ जो सर्वात्मा सर्वसाक्ष ॥ विरूपाक्ष ध्याय जया ॥ ८४ ॥ असुर धांवती लवलाहें ॥ म्हणती सर्वदा तुज कैंचा जय ॥ अकस्मात काकतालन्याय ॥ मकराक्ष तुवां मारिला ॥ ८५ ॥ ऐसें बोलून दोघे जण ॥ सोडिती रामा-वरी प्रचंड बाण ॥ जैसें मृगेंद्रापुढें येऊन ॥ मांडिलें ठाण मार्जारें ॥ ८६ ॥ कीं सज्ञान पंडितापुढें ॥ बोलावया आलीं मूढें ॥ कीं जंबुक आपले पवाडे ॥ व्याघ्रापुढें दावीतसे ॥ ८७ ॥ कीं उष्ट्रांनीं ब्रीद बांधोन ॥ तुंबेरापुढें मांडिलें गायन ॥ तैसें राक्षसीं संधान ॥ रामापुढें आरंभिलें ॥ ८८ ॥ दोघांहीं शर सोडिले अपार ॥ तितुके निवारूनि श्रीरघुवीर ॥ प्रळयचपळेऐसे थोर ॥ दोन शर काढिले ॥ ८९ ॥ ते धनुष्यावरी योजून ॥ अकस्मात सोडी रघुनंदन ॥ दोघांचीं कंठनाळें छेदून ॥ निराळेमार्गें पैं नेलीं ॥ १९० ॥ कळला रावणासी समाचार ॥ पैरत्र पावले त्रय असुर ॥ तत्काळ महावीर ॥ सेनेसहित धांविन्नला ॥ ९१ ॥ होम करून रणमंडळीं ॥

९५ भाला, तरवार, गदा. ९६ क्षुद्रघंटा, घुंगुर. ९७ नक्षत्रें. ९८ मेघसमुदाय. ९९ राम. १०० शंकर. १ कावळा बसण्यास आणि तालवृक्षाचें फळ मोडण्यास गांठ पडावी तसा अकल्पितपणें. २ या नांवाच्या गंधर्वापुढें. ३ आकाशमार्गानें. ४ परलोकाला. ५ तीन. ६ इंद्रजित.

त्यांतून एक कृत्या निघाली ॥ रथीं बैसोन ते वेळीं ॥ अकस्मात उडाली ॥ ९२ ॥ त्या कृत्येआड बैसोन ॥ शक्रारि सोडी तेव्हां बाण ॥ म्हणे सर्वांसी खिळीन ॥ वानरगण भयभीत ॥ ९३ ॥ मग लोकप्राणेश येऊनी ॥ सांगे जगद्वंद्याचे कर्णीं ॥ म्हणे अंगिरास्त्रेंकरूनी ॥ कृत्या छेदोन टाकिंजे ॥ ९४ ॥ कृत्येआड बैसोन ॥ इंद्रजित करी संधान ॥ रामें तत्काळ मंत्र जपोन ॥ अंगिरास्त्र सोडिलें ॥ ९५ ॥ तेणें कृत्या भस्म झाली झडकरी ॥ जैसा बोध प्रवेशतां अंतरीं ॥ दुर्वासना पळे बाहेरी ॥ तृष्णा कल्पना घेऊनियां ॥ ९६ ॥ कीं प्रकटतां वासरमणी ॥ तम निरसे मूळींहूनी ॥ तैसी कृत्या छेदितां घरणीं ॥ इंद्रजित उतरला ॥ ९७ ॥ रणीं प्रकट उभा राहूनी ॥ अपार शर सोडी रावणी ॥ तो दुरात्मा देखोनि तत्क्षणीं ॥ वानर सर्व क्षोभले ॥ ९८ ॥ घेऊनियां महापर्वत ॥ रागें धांवे अंजनीसुत ॥ गदा घेऊनियां त्वरित ॥ बिभीषण चवताळला ॥ ९९ ॥ परिघ हातीं घेऊनी ॥ मैंद धांवे क्रोधेंकरूनी ॥ कौमोदकी आकळोनी ॥ धन्वंतरी पुढें जाहला ॥ २०० ॥ शतघ्नी घेऊन सत्वर ॥ धांवे तो ऋषभ वानर ॥ शरभ धांवे घेऊनि चक्र ॥ गंधमादन शक्ति पैं ॥ १ ॥ जांबुवंत घेऊनि गिरि थोर ॥ अंगदें उपडिला महातरुवर ॥ नीळ घेऊनियां तोमर ॥ शत्रूवरी धांविन्नला ॥ २ ॥ नळें उचलोनि महाशिळा ॥ सुग्रीव पर्वत घेऊन धांविन्नला ॥ कुमुद हांक देऊनि पुढें जाहला ॥ लोहपट्टिश घेऊनियां ॥ ३ ॥ सौमित्रें चाप ओढून ॥ टाकिले तेव्हां तीन बाण ॥ शत शर दारुण ॥ रघूत्तमें टाकिले ॥ ४ ॥ इतुकी शस्त्रवृष्टी होत ॥ परी ते न गणीच इंद्रजित ॥ शस्त्रें तोडून समस्त ॥ बाण बहुत सोडिले ॥ ५ ॥ अष्टादश पद्मे वानर ॥ निजबाणीं केले जर्जर ॥ लक्षोनियां रामसौमित्र ॥ दारुण शर सोडिले ॥ ६ ॥ रामलक्ष्मणांसहित सकळ ॥ कपिदळ इंद्रजितें केलें विकळ ॥ पुरुषार्थ करून तत्काळ ॥ इंद्रजित परतला ॥ ७ ॥ जयवाद्यें वाजवीत ॥ लंकेंत प्रवेशे शक्रजित ॥ पितयास करूनि प्रणिपात ॥ वार्ता समूळ सांगीतली ॥ ८ ॥ रावण म्हणे शक्रजितासी ॥ तूं क्षणक्षणां शत्रु गारिसी ॥ दिनांतीं नक्षत्रें आकाशीं ॥ मागुती तैसे ऊठती ॥ ९ ॥ वरी वरी जळे तृण ॥ परी अंकुर फुटती भूमींतून ॥ त्यावरी शक्रजित प्रतिवचन ॥ काय बोलता जाहला ॥ २१० ॥ म्हणे आतां रामलक्ष्मण ॥ सेनेसहित येतों वधून ॥ तरीच तुम्हां दावीन वदन ॥ प्रतिज्ञा पूर्ण माझी हे ॥ ११ ॥ हे न घडे जरी गोष्टी ॥ तरी तुमची आमुची हेचि भेटी ॥ मग पितयासी नमून उठाउठीं ॥ इंद्रजित चालिला ॥ १२ ॥ सिद्ध करूनि चतुरंग दळ ॥ युद्धासी चालिला उतावीळ ॥ जैसा सरितापूर तुंबळ ॥ वर्षाकाळीं धांवतसे ॥ १३ ॥ तीन वेळ संग्राम करूनी ॥ इंद्रजित गेला जय घेऊनी ॥ मागुती आला चौथेनी ॥ रणमेदिनी माजवावया ॥ १४ ॥ युद्धकांड परम सुरस ॥ जेथें थोर माजे वीररस ॥ तें चतुर श्रोते सावकाश ॥ अत्यादरें परिसोत ॥ १५ ॥ रणरंगधीरा रामचंद्रा ॥ सुवेळाचळवासी प्रतापरुद्रा ॥ श्रीधरवरदा आनंदसमुद्रा ॥ ब्रह्मानंदा जगद्गुरो ॥ २१६ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ अष्टाविंशतितमाध्याय गोड हा ॥ २१७ ॥ अध्याय ॥ २८ ॥ ओंव्या ॥ २१७ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ छ ॥ ॥ छ ॥

७ अग्नि-अस्त्राने. ८ त्रिकूट पर्वताचर असणारा.


२९

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ रामकथा परम पावन ॥ सुधारसाहूनि गोड गहन ॥ देव करिती सुधारसपान ॥ परी कल्पांतीं मरण न चुकेचि ॥ १ ॥ अमृत गोड लागे रसनेसी ॥ तें तृप्त न करी कर्णनेत्रांसी ॥ रामकथा नव्हे तैसी ॥ सर्व इंद्रियांसी तृप्त करी ॥ २ ॥ सुधारस सेवितां मद चढे ॥ कथामृतें मद मत्सर झडे ॥ त्रिविधतापदुःख सांकडें ॥ सहसा न पडे सद्भक्तां ॥ ३ ॥ कथामृत करितां श्रवण ॥ जे करणार सुधारसपान ॥ त्यांचिये मस्तकीं ठेवूनि चरण ॥ कथा नेत पलीकडे ॥ ४ ॥ अमृत सदा इंद्र भक्षीत ॥ सर्व लोकीं रामकथामृत ॥ स्वर्गी राहणार समस्त ॥ सदा इच्छिती रामकथा ॥ ५ ॥ कथासुधारसपान ॥ श्रवण करा तुम्ही भक्तजन ॥ गतकथाध्यायीं रावणी येऊन ॥ रणमंडळीं उभा ठाकला ॥ ६ ॥ घेऊनि शिळा तरुवर ॥ वर्षों लागले रीस वानर ॥ सेनामुखीं रुद्रावतार ॥ उभा देखिला इंद्रजितें ॥ ७ ॥ परम दुरात्मा तो रावणी ॥ अंतरीं कापट्यविद्या स्मरूनी ॥ कृत्रिम जानकी निर्मूनी ॥ रथावरी बैसविली ॥ ८ ॥ तप्तकांचनवर्णी ते वेल्हाळ ॥ वस्त्राभरणीं मंडित सकळ ॥ मुखशशांक अति निर्मळ ॥ विराजे सर्व लक्षणीं ॥ ९ ॥ हें कृत्रिम रूप निर्मिलें ॥ जें कोणासी कदा न कळे ॥ बहु विचक्षण जरी आले ॥ तेही साच मानिती ॥ १० ॥ असो कृत्रिम रूप निर्मोनी ॥ इंद्रजित म्हणे मारुतीलागुनी ॥ अरे पाहा हे जनकनंदिनी ॥ तुझी स्वामिणी कीं वानरा ॥ ११ ॥ हे रामाची अंगना होय ॥ इनें आमुचा केला कुलक्षय ॥ त्रेतायुगामाजी पाहें ॥ कृत्या केवळ जन्मली ॥ १२ ॥ पंचवटीपासून साचार ॥ इजकरितां संहरिले असुर ॥ प्रहस्त अतिकाय महोदर ॥ देवांतक नरांतक ॥ १३ ॥ कुंभकर्णादि यामिनीचर ॥ इनेंचि ते ग्रासिले समग्र ॥ हे अत्यंत सुंदर ॥ म्हणोनि रायें आणिली ॥ १४ ॥ वृंदावनफळ दिसे सुढाळ ॥ फणस म्हणोनि घेतलें कनकफळ ॥ मुक्ताहार म्हणोनि शंखपाळ ॥ सर्प हातीं धरियेला ॥ १५ ॥ कीं रत्नें सुंदर म्हणोन ॥ खदिरांगार घेतले भरून ॥ कीं नक्षत्रबिंबें जळीं देखोन ॥ व्यर्थ जाळें पसरिलें ॥ १६ ॥ ऐसेतें लंकेसी आणून ॥ व्यर्थ कष्टला दशानन ॥ हे पापिणी कलहा कारण ॥ राक्षसवन जाळिलें ॥ १७ ॥ ऐसी ही परम चांडाळीण ॥ इसी काय व्यर्थ ठेवून ॥ तत्काळ शस्त्र काढून ॥ कृत्रिमसीता वधिली ॥ १८ ॥ सीतेचें शिर खंडून ॥ दाखवी मारुतीलागून ॥ म्हणे रामासी सांग जाऊन ॥ जाईं उठून अयोध्ये ॥ १९ ॥ ऐसें बोलून इंद्रजित ॥ निकुंभिलेसी गेला त्वरित ॥ हवन आरंभिलें अद्भुत ॥ अक्षय्य रथ काढावया ॥ २० ॥ असो इकडे अंजनीनंदन ॥ जानकी वधिली हें देखून ॥ वक्षःस्थळ बडवून ॥ मूर्च्छित पडे धरणीये ॥ २१ ॥ घटिका एकपर्यंत ॥ निचेष्टित पडिला हनुमंत ॥ सावध होऊनि किंचित ॥ शोक करिता जाहला ॥ २२ ॥ स्फुंदस्फुंदोनि रडे मारुति ॥ आतां काय सांगूं मी राघवाप्रती ॥ सीतेकारणें अहोरात्रीं ॥ स्वामी माझा कष्टतसे ॥ २३ ॥ सीतेचें स्वरूप म्हणोन ॥ हृदयीं धरी वृक्ष पाषाण ॥ मित्रसुत मित्र करून ॥ शक्रसुत

१ जिंकेला. २ अमृत. ३ इंद्रजित. ४ मारुति. ५ तापलेल्या सुवर्णाप्रमाणें. ६ चाणाक्ष. ७ राक्षस. ८ कंबडळ. ९ गोमटें, सुंदर. १० घोड्याचें फळ. ११ दिला, सीतेला. १२ सुग्रीव. १३ वाली.

वधियेला ॥ २४ ॥ प्रयत्न करूनियां बहुत ॥ म्यां सीता शोधिली यथार्थ ॥ वार्ता सांगोनि रघुनाथ ॥ सुखी केला ते काळीं ॥ २५ ॥ तेंपासोनि सीताशोकहरण ॥ मज नाम ठेवी रघुनंदन ॥ तो हौं मी समाचार घेऊन ॥ कैसा जाऊं स्वामीपासीं ॥ २६ ॥ शरजाळीं पाडिलें शक्रजितें ॥ तैं घेऊन आलों द्रोणपर्वतातें ॥ संतोषोनि रघुनाथें ॥ मज बहुत गौरविलें ॥ २७ ॥ ते कष्ट सर्व गेले व्यर्थ ॥ मी अभागी होय यथार्थ ॥ वार्ता ऐकतां रघुनाथ ॥ काय करील कळेना ॥ २८ ॥ म्यां पूर्वी सांगितलें रघुनाथा ॥ सुखी आहे जनकदुहिता ॥ आतां जानकी वधियेली ही वार्ता ॥ रामचंद्रासी केवीं सांगूं ॥ २९ ॥ जेणें पूर्वी दिधलें बहुत धन ॥ तेणेंचि पुढें घेतलें हिरून ॥ जेणें केलें बहुत पाळण ॥ तेणेंचि शिर छेदिलें ॥ ३० ॥ सुख दिधलें जन्मवरी ॥ तेणेंचि लोटिलें दुःखसमुद्रीं ॥ जळत घरांतून काढिलें बाहेरी ॥ तेणेंचि शिर छेदिलें ॥ ३१ ॥ तृषाक्रांत प्राणी पडियेला ॥ तया जीवन देऊन वांचविला ॥ सवेंच त्याचा वध केला ॥ शस्त्र घेऊनि स्वहस्तें ॥ ३२ ॥ तैसा मी रामाप्रति जाऊन ॥ कैसें सांगूं हें वर्तमान ॥ मध्येंच गोष्टी ठेवितां झांकोन ॥ तरी दूषण लागतसे ॥ ३३ ॥ ऐसें विचारी हनुमंत ॥ सत्वर आला जेथें रघुनाथ ॥ अधोवदनीं स्फुंदत ॥ भयभीत कपी जाहले ॥ ३४ ॥ गजबजले रामलक्ष्मण ॥ मारुतीस पुसती वर्तमान ॥ हनुमंत वक्षःस्थळ बडवून ॥ आक्रंदोनी सांगतसे ॥ ३५ ॥ जानकी आणूनि रणांगणीं ॥ इंद्रजितें टाकिली वधोनी ॥ ऐसें ऐकतां चापपाणी ॥ दुःखेंकरूनि उचंबळे ॥ ३६ ॥ आकर्णनयन चांगले ॥ ते अश्रु स्रवों लागले ॥ हाहाकार ते वेळे ॥ रामसेनेंत जाहला ॥ ३७ ॥ मंगळरूप तो रघुनंदन ॥ मंगळभगिनीचे आठवूनि गुण ॥ विलाप करितां लक्ष्मण ॥ येऊनि चरणीं लागला ॥ ३८ ॥ आकर्णनयन चांगले ॥ परब्रह्म मूस ओतलें ॥ त्या जगद्वंद्याचीं चरणकमलें ॥ सौमित्रबाळें वंदिलीं ॥ ३९ ॥ म्हणे ब्रह्मांडनायका रघुपती ॥ मिथ्या मायेची कायसी खंती ॥ आकारा आलें तें पुढती ॥ नाश पावेल निर्धारें ॥ ४० ॥ विवेकवज्र घेऊन ॥ मोहपर्वत करावा चूर्ण ॥ सद्गुरुवासिष्ठें शिकवण ॥ हेच पूर्वी शिकविली ॥ ४१ ॥ तूं देवाधिदेव परब्रह्म ॥ अंज अजितें आत्माराम ॥ तुझे मायेचा हा संभ्रम ॥ मिथ्यामय लटिकाचि ॥ ४२ ॥ जानकी पावली मरण ॥ तुज कोठें जाईल टाकोन ॥ दीपासी प्रभा वोसंडोनें ॥ जाईल हें तों घडेना ॥ ४३ ॥ कनकासी टाकूनि कांती ॥ जाऊन राहील केउंती ॥ रत्नांस सांडूनि दीप्ती ॥ कोठें परती जाईल ॥ ४४ ॥ अनादि तूं तिचा नाथ ॥ तुजचि ते पावेल यथार्थ ॥ जैसा पार्वतीनें कैलासनाथ ॥ पुनः उपजोनि वरियेला ॥ ४५ ॥ आतां यावरी ऐसें करीन ॥ सहपरिवारें वधीन रावण ॥ बंदीचे देव सोडवीन ॥ बिभीषण स्थापीन लंकेसी ॥ ४६ ॥ ऐसें बोलतां लक्ष्मण ॥ राम पाहे अधोवदन ॥ चिंताक्रांत वानरगण ॥ तटस्थरूप पाहाती ॥ ४७ ॥ तों बिभीषणाचे दोघे प्रधान ॥ आले जानकीची शुद्धि घेऊन ॥

१४ सीतावधरूपी. १५ तहानेनें व्याकुळ. १६ पाणी. १७ अपेक्षा. १८ कर्णापर्यंत. १९ सीतेचे. २० जन्मरहित. २१ अजिंक्य. २२ टाकून. २३ कोठें.

हांसतचि बिभीषण ॥ आला रामास सांगावया ॥ ४८ ॥ म्हणे जगद्वंद्या चापपाणी ॥ सुखी आहे जनकनंदिनी ॥ म्यां लंकेसी दूत पाठवूनी ॥ समाचार आतां आणविला ॥ ४९ ॥ इंद्रजित परमकपटी ॥ लटिकीच वधिली सीता गोरटी ॥ हनुमंत निष्कपट पोटीं ॥ त्यासी सत्यचि वाटलें ॥ ५० ॥ ऐकतां बिभीषणाचें वचन ॥ जयजयकारें गर्जती कपिगण ॥ वदनें टवटवलीं पूर्ण ॥ आनंद गगनीं न समाये ॥ ५१ ॥ उदयाचळीं उगवे गैंभस्ती[२४] ॥ एकदांचि निघे तैंमाची बुंथी[२५] ॥ तैसी जाहली दुःखनिवृत्ती ॥ बिभीषणें वार्ता सांगतां ॥ ५२ ॥ कीं हृदयीं प्रकटतां वेदांतज्ञान ॥ सहपरिवारें जाय अज्ञान ॥ कीं गृहस्वामी उठतां देखोन ॥ तस्कर पळती अवघेचि ॥ ५३ ॥ कीं क्षुधित पडला अन्नाविण ॥ तों क्षीराब्धि पुढें आला धांवोन ॥ कीं वारणें[२७] गांजितां पंचाननें[२८] ॥ हांक फोडोनि धांविन्नला ॥ ५४ ॥ रोगें व्यापिला बहुवस ॥ तों वैद्यें पाजिला सुधारसें[२९] ॥ तैसें बिभीषण बोलतां रामास ॥ मिथ्या दुःख वितळलें ॥ ५५ ॥ बिभीषण वचन पौर्णिमा थोर ॥ कळायुक्त दिसे रामचंद्र ॥ उचंबळला कपिसमुद्र ॥ सुखभरतें दाटलें ॥ ५६ ॥ बिभीषणास म्हणे रघुनंदन ॥ तुझे उपकारा मी नव्हें उत्तीर्ण[३०] ॥ क्षणक्षणां आम्हांलागून ॥ सांभाळिसी प्राणसखया ॥ ५७ ॥ असो श्रीरामाचिये कर्णीं ॥ बिभीषण सांगे तेचि क्षणीं ॥ इंद्रजितें निकुंभिलाभुवनीं ॥ कपटहोम आरंभिला ॥ ५८ ॥ होमधूमें कोंदलें[३१] निराळें[३२] ॥ होमाहुतीचे दाटले परिमळ ॥ अग्नींतून रथ तेजाळ ॥ अर्ध बाहेर निघाला ॥ ५९ ॥ अश्व सारथि धनुष्य बाण ॥ यांसह तो निघे स्यंदन ॥ कार्यसिद्धि जाहालिया पूर्ण ॥ मग रावणी[३३] नाटोपे ॥ ६० ॥ तो चार वेळां येऊन ॥ रणीं गेला जय घेऊन ॥ आतां तो होम विध्वंसून ॥ आधीं सत्वर टाकावा ॥ ६१ ॥ विलंब करितांचि येथ ॥ तिकडे निघेल अवघा रथ ॥ रथ निघाल्या इंद्रजित ॥ कालत्रयीं नाटोपे ॥ ६२ ॥ द्वादश वर्षें निराहारी ॥ असेल जो ब्रह्मचारी ॥ तयाचेनि हातें शैकारी[३४] ॥ मरेल ऐसें भविष्य असे ॥ ६३ ॥ ऐसें ऐकता रघुनंदन ॥ सौमित्राकडे पाहे विलोकून ॥ धनुष्य चढवूनि गुण ॥ वेगें लक्ष्मण उभा ठाकला ॥ ६४ ॥ बंधूची बाल्यदशा देखोनी ॥ स्नेहभरित होय चापपाणी ॥ अनुजासी हृदयीं कवळूनी ॥ मंत्र कर्णीं सांगतसे ॥ ६५ ॥ कोण्या मंत्रें कोण अस्त्र ॥ कोण्या समयीं प्रेरावें कोणतें शस्त्र ॥ तें तें सर्वही राजीवनेत्रें[३५] ॥ सौमित्रासी देता जाहला ॥ ६६ ॥ मस्तकीं ठेविला कृपाहस्त ॥ म्हणे सत्वर वधोनि इंद्रजित ॥ जयलाभ घेऊनि अद्भुत ॥ कल्याणरूप येईंजे ॥ ६७ ॥ सवें मारुति बिभीषण ॥ परम बुद्धिमंत कळाप्रवीण ॥ रामें धरूनि लक्ष्मण ॥ तयांचे हातीं दीधला ॥ ६८ ॥ नळ नीळ जांबुवंत अंगद ॥ गवय गवाक्ष ऋषभ मैंद ॥ पनस केसरी दधिमुख द्विविद ॥ वीर अगाध निघाले ॥ ६९ ॥ आणि असंख्य निघती वानरगण ॥ पुढें मार्ग दावी बिभीषण ॥ निकुंभिला गैंड परम कठिण ॥ लंकेहूनि अगाध ॥ ७० ॥ अंगदस्कंधीं लक्ष्मण ॥ जैसा गजेंद्रावरी सहस्रनयन[३६] ॥ पुढें कडे लागले कठिण ॥ मग बिभीषण बोलत ॥ ७१ ॥ म्हणे घ्या अवघे

२४ सूर्य. २५ अंधाराचा घुंगट, समुदाय. २६ हत्तीने. २७ सिंह. २८ अमृत. २९ उतराई. ३० व्यापलें. ३१ आकाश. ३२ इंद्रजित. ३३ कमलनयन राम. ३४ किल्ला. ३५ ऐरावतावर. ३६ इंद्र.

उड्डाण ॥ निकुंभिला दुर्ग ओलांडून ॥ शत्रुजित करी हवन ॥ आधीं विध्वंसोनि टाका तें ॥ ७२ ॥ मग निराळेपंथें ते वेळे ॥ निकुंभिलेंत प्रवेशले ॥ तों सैन्यें दुर्ग सबळ बळें ॥ सात भोंवते रक्षिती ॥ ७३ ॥ ऋषभ गवय हनुमंत ॥ घेऊनियां शिळा पर्वत ॥ जेथें हवन करी इंद्रजित ॥ त्या विवरांत प्रवेशले ॥ ७४ ॥ तों सभोंवतीं भूतें रक्षिती ॥ तितुकीं झोडून पळवी मारुती ॥ तंव तो इंद्रजित पापमूर्ती ॥ वज्रासनीं बैसला ॥ ७५ ॥ रक्तोदकें स्नान करूनी ॥ रक्त वस्त्रें नेसला रावणी ॥ सप्त प्रेतें पसरूनी ॥ त्यांवरी आसन घातलें ॥ ७६ ॥ पिंगट जटा मोकळ्या दिसती ॥ रक्तें थबथबां गळती ॥ नेत्र लावूनि आहुती ॥ टाकीतसे त्वरेनें ॥ ७७ ॥ ब्राह्मणांचीं शिरें बहुत ॥ त्यांचा जवळी पडिला पर्वत ॥ अस्थिमाळा गळां डोलत ॥ उरग मृत शिरीं वेष्टिले ॥ ७८ ॥ द्विजदंतांच्या लाह्या करूनी ॥ साजुक रक्त मांस घाली हवनीं ॥ रथ निघाला अग्नीतूनी ॥ तरणीहूनि तेजागळा ॥ ७९ ॥ प्राप्त होतां दिव्य निधान ॥ जैसें अभाग्यावरी पडे विघ्न ॥ तैसें हनुमंतें पर्वत टाकून ॥ होमकुंड विध्वंसिलें ॥ ८० ॥ अग्नि चहूंकडे विखुरत ॥ गेलें परतोनि आराध्यदैवत ॥ अग्नीनें गिळिला माघारीं रथ ॥ परम अनर्थ जाहला ॥ ८१ ॥ इंद्रजिताच्या पृष्ठीवरी ॥ ऋषभ देहधर्मातें करी ॥ यज्ञपात्रें फोडोनि झडकरी ॥ होमद्रव्यें उलंडीत ॥ ८२ ॥ गजर कानीं पडतां बहुत ॥ सावध जाहला शत्रुजित ॥ देखोनियां तें विपरीत ॥ परम दुश्चित ते वेळे ॥ ८३ ॥ म्हणे दैवत क्षोभलें सबळ ॥ कैसी वैरियांनीं साधिली वेळ ॥ माझें आयुष्यसिंधुजळ ॥ आजपासूनि आटलें ॥ ८४ ॥ वानर तेथें गेले समस्त ॥ परम कोपला इंद्रजित ॥ वेगें आगूनि दिव्य रथ ॥ वरी आरूढे ते काळीं ॥ ८५ ॥ अद्भुत दळ घेऊनि ते वेळां ॥ निकुंभिलेबाहेर युद्धासी आला ॥ तों कपिभारेंसीं उभा ठाकला ॥ सौमित्र देखिला शत्रुजितें ॥ ८६ ॥ भगणांमाजी रोहिणीवरें ॥ कीं किरणचक्रीं दिवाकर ॥ तैसा वानरांत सौमित्र वीर ॥ युद्धासी सिद्ध उभा असे ॥ ८७ ॥ जैसा कुळाचळांत मेरु अद्भुत ॥ तैसा रथारूढ दिसे इंद्रजित ॥ तों राक्षसदळ लोटलें समस्त ॥ वानरांवरी ते काळीं ॥ ८८ ॥ शिळा दुर्में पर्वत घेऊनी ॥ करी घांवले ते क्षणीं ॥ राक्षसदळा होत आटणी ॥ प्रेतें अवनीं पडताती ॥ ८९ ॥ शूल असिलता शक्ती ॥ हीं आयुधें घेऊनि हातीं ॥ वानरांसी असुर खोंचिती ॥ कपी पडती विकळ तेणें ॥ ९० ॥ तों नळ नीळ जांबुवंत ॥ प्रतापरुद्र अंजनीसुत ॥ यांचा मार अति अद्भुत ॥ आटले बहुत निशाचर ॥ ९१ ॥ अरिप्रताप देखोनि अत्यद्भुत ॥ परम क्रोधावला इंद्रजित ॥ होम विध्वंसिला त्या विषादें बहुत ॥ दांत खात करकरां ॥ ९२ ॥ लातेनें ताडितां उरग ॥ कीं खवळे शुंडा पिळितां मातंग ॥ कीं नासिकीं ताडितां सवेग ॥ महाव्याघ्र जेवीं खवळे ॥ ९३ ॥ कीं महातपस्वी अपमानिला ॥ कीं हुताशन घृतें शिंपिला ॥ तैसा इंद्रजित क्षोभला ॥ वेगें लोटिला रथ पुढें ॥ ९४ ॥ दृष्टीं देखतां वारण ॥ खवळे जैसा पंचानन ॥ तैसा क्षोभला लक्ष्मण ॥ जो भोगींद्र पूर्ण अवतरला ॥ ९५ ॥

३७ आकाशमार्गाने. ३८ सैनेचे बंदे. ३९ सर्प. ४० सूर्याहून. ४१ पसरला. ४२ शरविधी. ४३ आयुष्यरूपी समुद्राचे पाणी. ४४ नक्षत्रांमध्ये. ४५ चंद्र. ४६ सूर्य. ४७ कुलपर्वतांत. ४८ वृक्ष. ४९ नाश. ५० तलवार. ५१ हत्ती. ५२ सिंह.

विद्युत्प्रौय चाप चढवून ॥ त्यावरी योजिला दिव्य बाण ॥ सिंहनादें गर्जोन ॥ रामानुंज सरसावला ॥ ९६ ॥ मांडिलें तेव्हां वज्र-ठाण ॥ कौतुक पाहती सुरगण ॥ सौमित्रासी होवो कल्याण ॥ हेंच देव चिंतिती ॥ ९७ ॥ इंद्रजित म्हणे सौमित्रासी ॥ मजसीं युद्ध करूं पाहसी ॥ जैसा हरिण शार्दूलासीं ॥ झोंबी घ्यावया पातला ॥ ९८ ॥ सुपर्णावरी घांवे अळिकें ॥ कीं मातंगावरी गोवत्स देखा ॥ कीं बळें घांवे पिपीलिकें ॥ कनकाचळ उचलावया ॥ ९९ ॥ ऊर्णनाभी भावी मनीं ॥ स्वतंतूनीं शांकीन मेदिनी[61] ॥ वृश्चिक नांगी उभारूनी ॥ ताडीन म्हणे खदिरांगारा ॥ १०० ॥ सूर्य जिंकीन म्हणे खद्योतें ॥ मक्षिका भूगोळ हालवूं इच्छीत ॥ वडवानळ घगधगित ॥ पतंग घांवे ग्रासावया ॥ १ ॥ मजसीं तैसा युद्धासी ॥ मानववंशीं तूं आलासी ॥ माझे बाण केवीं साहासी ॥ समरांगणीं न कळे हें ॥ २ ॥ यावरी बोले लक्ष्मण ॥ तुझे दृष्टीसी दिसतों लहान ॥ भस्में आच्छादिला हुताशन ॥ क्षणें काननन जाळील ॥ ३ ॥ दृष्टीस न भरे केसरी ॥ परी क्षणें महागज विदारी ॥ वज्र धाकुटें परी करी ॥ चूर्ण सकळ नगांचें ॥ ४ ॥ खुजट दिसे वामन ॥ परी ढेंगेंत आटिलें त्रिभुवन ॥ घटोद्भवाची तनू सान ॥ परी सागर संपूर्ण ग्राशिला ॥ ५ ॥ चिमणाच दिसे चंडांशु ॥ परी मेदिनी[61] भरी प्रकाश ॥ तेवीं नरवीर राघवेश ॥ त्याचा दास मी असें ॥ ६ ॥ तुज आजि मी समरांगणीं ॥ खंडविखंड करीन बाणीं ॥ इंद्रादि देव पाहती गगनीं ॥ मनोरथ पुरवीन तयांचे ॥ ७ ॥ ऐकतां क्षोभला शक्रारी ॥ दिव्य बाण ते अवसरीं ॥ सोडी रामानुजावरी ॥ प्रळयचपळेसारिखा ॥ ८ ॥ जैसें सद्विवेकेंकरून ॥ ज्ञानी क्रोध टाकी खंडोन ॥ तैसा सौमित्रें तोडिला बाण ॥ निजशरेंकरूनियां ॥ ९ ॥ परम क्षोभला इंद्रजित ॥ बाणांचा पर्जन्य पाडीत ॥ एके बाणेंच सुमित्रासुत ॥ पिष्ट करून टाकीतसे ॥ ११० ॥ उगवतां वासरमणी ॥ भगणें लोपती जेवीं गगनीं ॥ कीं जलदजाल तत्क्षणीं ॥ प्रभंजन विध्वंसी ॥ ११ ॥ बोध प्रकटतां अंतरीं ॥ बहुत पातकें संहारी ॥ कीं आत्मज्ञान जेवीं हरी ॥ संसारदुःखें अनेक ॥ १२ ॥ तैसे इंद्रजिताचे शर पाहीं ॥ जो जनकाचा कनिष्ठ जांवई ॥ बाण सर्व छेदूनि लवलाहीं ॥ पाडीतसे एकीकडे ॥ १३ ॥ सौमित्र सोडी एक शर ॥ त्यापासूनि बाण निघती अपार ॥ जैसा एकुलता एक पुत्र ॥ वाढे संतति बहु त्याची ॥ १४ ॥ कीं तैलबिंदु जळीं पडतां ॥ पसरे चहूंकडे तत्त्वतां ॥ कीं सत्पात्रीं दान देतां ॥ कीर्ति प्रकटे सर्वत्र ॥ १५ ॥ कुलवंतावरी उपकार करितां ॥ तें यश प्रकटे न सांगतां ॥ तैसा एक बाण सोडितां ॥ पसरती बहु चहूंकडे ॥ १६ ॥ लक्षांचे लक्ष बाण ॥ सोडितसे सुमित्रानंदन ॥ इंद्रजित तितुके छेदून ॥ एकीकडे पाडी पैं ॥ १७ ॥ इंद्रजित तुकावी मान ॥ म्हणे धन्य वीर लक्ष्मण ॥ रणधीर न ढळे ठाण ॥ योद्धा निपुण होय हा ॥ १८ ॥ असो इंद्रजितें जपोनि मंत्र ॥ सोडिलें तेव्हां पर्जन्यअस्त्र ॥ हस्तिशुंडेऐसी धार ॥ मेघ अपार वर्षती ॥ १९ ॥ ऐसें देखोनि लक्ष्मण ॥ वायुास्त्र जपोनि उडवी पर्जन्य ॥

५३ विजेसारखें. ५४ लक्ष्मण. ५५ वाघाशीं. ५६ गरुडावर. ५७ कोंड. ५८ मुंगी. ५९ कोळी. ६० मानतो. ६१ पृथ्वी. ६२ काजवा. ६३ अग्नि. ६४ अरण्य. ६५ सिंह. ६६ अगस्तीचा. ६७ लहान. ६८ सूर्य. ६९ मेघजाळ. ७० वारा. ७१ वायूचें अस्त्र.

जैसें वैराग्य प्रकटतां संपूर्ण ॥ संसारदुःखें वितुळती पैं ॥ १२० ॥ परी वात सुटला अद्भुत ॥ इंद्रजितायें कटक उडत ॥ रावणीनें महापर्वत ॥ आड घातले वायूसी ॥ २१ ॥ जैसें मायाजाळ अद्भुत ॥ तैसे आड दिसती पर्वत ॥ मग सौमित्रें वज्रें बहुत ॥ सोडोनि नग फोडिले ॥ २२ ॥ करितां सारासार श्रवण ॥ काम क्रोध जाती वितळोन ॥ तैसे पर्वत फोडून ॥ पिष्टवत पैं केले ॥ २३ ॥ मग तो सुलोचनावर ॥ सोडी वडवानळास्त्र ॥ त्यावरी दाशरथी वीर ॥ सागरास्त्र सोडीतसे ॥ २४ ॥ सागर अद्भुत देखोनी ॥ अगस्तिमंत्र जपे रावणी ॥ तत्काळ समुद्र आटोनि ॥ क्षणमात्रें टाकिला ॥ २५ ॥ पाशास्त्र सोडी इंद्रजित ॥ नाममंत्र जपे सुमित्रासुत ॥ माहेश्वरें रावणी प्रेरीत ॥ सौमित्र जपे ब्रह्मास्त्र ॥ २६ ॥ ब्रह्मास्त्र श्रेष्ठ सर्वांत ॥ तेणें माहेश्वर ग्रासिलें समस्त ॥ जांबुवंत आणि हनुमंत ॥ तटस्थ कौतुक पाहती ॥ २७ ॥ परम कोपा चढला रावणी ॥ पांच बाण काढी निवडोनी ॥ कीं पांचही सौदामिनी ॥ मेघाबाहेर निघाल्या ॥ २८ ॥ ते अनिवार पांच बाण ॥ सोडिले आकर्णवरी ओढून ॥ अकस्मात येऊन ॥ सौमित्राचे हृदयीं भरले ॥ २९ ॥ मेरु मांदार होती चूर्ण ॥ ऐसे ते कठोर पांच बाण ॥ भोगींद्रावतार लक्ष्मण ॥ तेणेंचि व्यथा साहिली ॥ १३० ॥ सवेंचि वीर लक्ष्मण ॥ सोडिता जाहला नव बाण ॥ इंद्रजिताचें कपाळ फोडून ॥ आंत संपूर्ण रुतले पैं ॥ ३१ ॥ इंद्रजित योद्धा दारुण ॥ बाल्यदशावेष्टित लक्ष्मण ॥ स्नेहें दाटोनि बिभीषण ॥ गदा झेलीत पुढें आला ॥ ३२ ॥ गदा फिरवूनि ते वेळीं ॥ इंद्रजितावरी टाकिली ॥ येरें शर सोडोनि पाडिली ॥ एकीकडे आडवी ते ॥ ३३ ॥ मेघनादें सोडोनि पंच बाण ॥ हृदयीं खिळिला बिभीषण ॥ जांबुवंतें तें देखोन ॥ पुढें धांवे काळ जैसा ॥ ३४ ॥ पर्वतीं वज्र पडे अकस्मात ॥ तैसा रावणीवरी जांबुवंत ॥ हस्तचपेटें त्याचा रथ ॥ अश्वांसहित चूर्ण केला ॥ ३५ ॥ विरथ होऊन इंद्रजित ॥ भूमीवरी उभा युद्ध करीत ॥ तों हनुमंतें विशाळ पर्वत ॥ रावणीवरी टाकिला ॥ ३६ ॥ नळ नील ऋषभ अंगद ॥ शरभ गवय गवाक्ष कुमुद ॥ केसरी पावकलोचन मैंद ॥ एकदांचि उठावले ॥ ३७ ॥ शिळा पर्वत ते अवसरीं ॥ टाकिती बळेंचि शक्रारीवरी ॥ देव पाहती अंबरीं ॥ कौतुक परम युद्धाचें ॥ ३८ ॥ इंद्रजित चतुर बहुत ॥ परम पराक्रमी रणपंडित ॥ तितुक्यांचे फोडी पर्वत ॥ बाणजाळ घालूनियां ॥ ३९ ॥ तंव इंद्रजित उडाला ॥ मेघाआड जाऊनि ते वेळां ॥ तेथोनियां वर्षों लागला ॥ बाणजाळ फार कपींवरी ॥ १४० ॥ सौमित्राचें ठाणें गोजिरें ॥ मग काय केलें वायुकुमरें ॥ तळहातीं सौमित्र त्वरें ॥ उभा करूनि उडाला ॥ ४१ ॥ द्वादश गांवें इंद्रजित ॥ शतयोजनें उंच हनुमंत ॥ संग्राम केला अद्भुत ॥ उतरे इंद्रजित पृथ्वीवरी ॥ ४२ ॥ खालीं उतरला लक्ष्मण ॥ तों समस्त देव ऋषिगण ॥ सौमित्रास चिंतिती कल्याण ॥ विजयी पूर्ण हो आजि ॥ ४३ ॥ पाठीसी वानरांचे भार ॥ आवेशें गर्जती वारंवार ॥ मांडलें परम घनचक्र ॥ अनि-

७२ सैन्य. ७३ इंद्रजिताने. ७४ समुद्रांतील अग्नि. ७५ शंकराचें अस्त्रविशेष. ७६ ब्रह्मदेवाचें अस्त्रविशेष. ७७ आकाशांत. ७८ उभें राहण्याचें स्थान.

वार वीर दोघेही ॥ ४४ ॥ सिंहनादेंकरून ॥ दोघेही गर्जविती गगन ॥ महाआवेशें संपूर्ण ॥ ब्रह्मांड ग्रासूं भाविती ॥ ४५ ॥ दोघांचे अंगीं रुतले शर ॥ जैसीं पिच्छें पसरिती मयूर ॥ कीं पर्वतासी फुटले तृणांकुर ॥ तैसे वीर दीसती ॥ ४६ ॥ याउपरी सौमित्र वीर ॥ तूंणीरांतून काढी दिव्य शर ॥ जैसा तृतीयनेत्रींचा वैश्वानर ॥ अकस्मात प्रकटला ॥ ४७ ॥ जैसा माध्यान्हीचा गभस्ती ॥ तैसीं बाणांचीं मुखें दिसती ॥ तयांचीं किरणें प्रकाशलीं क्षितीं ॥ न लक्षवे कोणातें ॥ ४८ ॥ रामनाममुद्रांकित ॥ देदीप्यमान बाण समर्थ ॥ सुमित्रासुताचे मनोरथ ॥ पूर्णकर्ता निधारें ॥ ४९ ॥ तो बाण धनुष्यावरी ॥ सौमित्रें योजिला झडकरी ॥ आकर्ण ओढोनि अंतरीं ॥ काय चिंतिता जाहला ॥ १५० ॥ म्हणे पूर्णब्रह्म सनातन ॥ मायातीत शुद्धचैतन्य ॥ तो सूर्यवंशीं रघुनंदन ॥ जरी हें साच असेल ॥ ५१ ॥ मी स्त्री असोनि ब्रह्मचारी ॥ चतुर्दश वर्षें निराहारी ॥ कायावाचामनें अंतरीं ॥ रामउपासक जरी असें ॥ ५२ ॥ मंगळभोगिनी जगन्माता ॥ सत्य असेल पतिव्रता ॥ रामदासत्व हनुमंता ॥ जरी साच घडलें असेल ॥ ५३ ॥ शिवकंठींचें हालाहल ॥ नामें शमलें असेल सकळ ॥ तरी या बाणें शिरकमळ ॥ इंद्रजितार्चे खंडेल ॥ ५४ ॥ ऐसें चिंतोनि निजमनीं ॥ बाण सोडिला तत्क्षणीं ॥ शत्रूरीचा कंठ लक्षोनी ॥ गगनमार्गें जातसे ॥ ५५ ॥ यावरी विंशतिनेत्रपुत्रें ॥ बाण देखोनि परम तीव्र ॥ मग स्वयें निर्वाण शर ॥ योजूनि आकर्ण ओढिला ॥ ५६ ॥ तंव इतुक्यांत अकस्मात ॥ बाण पावला कृतांतवत ॥ तेणें कंठ आणि भुजा त्वरित ॥ छेदोनि नेलीं गगनमार्गें ॥ ५७ ॥ वर्क्ष सुरीनें त्वरित ॥ कुंपीवल कणसें छेदित ॥ तैसें शिर भुजेसहित ॥ बाणें नेलें ते काळीं ॥ ५८ ॥ भुज उसळून अद्भुत ॥ लंकेवरी जाऊनि पडत ॥ शिर भूमंडळीं उतरत ॥ कंदुकवत ते काळीं ॥ ५९ ॥ तों ऋषभें धांवोनि सत्वर ॥ वरिच्यावरी झेलिलें शिर ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ सुमनसंभार देव वर्षती ॥ ६० ॥ इंद्र संतोषला बहुत ॥ म्हणे आजि माझें भाग्य उदित ॥ दिशा पावलों यथार्थ ॥ सुमित्रासुतप्रसादें ॥ ६१ ॥ शक्राचा हर्ष ते काळीं ॥ न मायेचि नभमंडळीं ॥ दुंदुभींची घाई लागली ॥ ऋषिमंडळी आनंदत ॥ ६२ ॥ पुष्पवृष्टि वारंवार ॥ सौमित्रावरी करी देवेंद्र ॥ इंद्राचा उजळला मुखचंद्र ॥ निष्कलंक क्षयरहित ॥ ६३ ॥ इंद्रजित पडिला मेदिनीं ॥ दीनवदन पळे वाहिनी ॥ प्राण जातां तेचि क्षणीं ॥ इंद्रियें जैसीं निस्तेज ॥ ६४ ॥ दीप गेलिया प्रभा हारपे ॥ कीं शशी मावळतां चांदणें लोपे ॥ कीं गायन राहतां संपे ॥ स्वर करणें सर्वही ॥ ६५ ॥ कीं वृक्ष उन्मळतां क्षितीं ॥ अंडज नीडें सांडूनि पळती ॥ शक्रारि पडतां ते रीतीं ॥ सेनासमुदाय फुटला ॥ ६६ ॥ जय पावून संपूर्ण ॥ परतला वीर लक्ष्मण ॥ वारंवार बिभीषण ॥ स्तुति करी सौमित्राची ॥ ६७ ॥ मग हनुमंताचे स्कंधावरी ॥ सौमित्र बैसला ते अवसरीं ॥ तनु जर्जर शरप्रहारीं ॥ जाहली असे तेधवां ॥ ६८ ॥ सुवेळो-

७९ मोठ्या ज्वलनें. ८० मात्र्यांतून. ८१ अग्नि. ८२ सूर्य. ८३ पृथ्वीवर. ८४ सीतादेवी, ८५ इंद्रजित. ८६ वांकड्या, ८७ शेतकरी. ८८ सेना. ८९ नाश पावे. ९० घरटीं. ९१ त्रिकूट पर्वत.

गिरी लक्षून ॥ चालिले तेव्हां वानरगण ॥ समस्तां सांगे बिभीषण ॥ आल्या पंथें चलावें ॥ ६९ ॥ इंद्रजिताचें विशाळ शिर ॥ झेलीत नेत ऋषभ वानर ॥ दृष्टीनें पाहील रघुवीर ॥ म्हणोनि संगें घेतलें ॥ १७० ॥ असो इकडे श्रीराम ॥ जो स्कंदतौतमनविश्राम ॥ सौमित्रा-कारणें परम ॥ चिंताक्रांत जाहला ॥ ७१ ॥ सुग्रीवाप्रती रघुनंदन ॥ म्हणे निकुंभिलेसी गेला लक्ष्मण ॥ तेथें कैसें वर्तमान ॥ जाहलें असेल कळेना ॥ ७२ ॥ इंद्रजिताचें युद्ध कठिण ॥ आम्हांसी नागपाशीं बांधिलें जाण ॥ शरजाळीं सेना संपूर्ण ॥ खिळोनियां पाडिली ॥ ७३ ॥ योद्धा इंद्रजित विशेष ॥ बाळदशा सौमित्रास ॥ ऐसें बोलोनि अयोध्याधीश ॥ अश्रु नयनीं आणिले ॥ ७४ ॥ सुग्रीव म्हणे रघुपती ॥ आपण खेद न करावा चित्तीं ॥ इंद्रजितासी वधोनि त्वरितगती ॥ आतां येईल सौमित्र ॥ ७५ ॥ ऐसी चिंता करितां अकस्मात ॥ तों वानर आले पुढें धांवत ॥ सांगती आला सुमित्रासुत ॥ इंद्रजिता वधोनियां ॥ ७६ ॥ परम आनंदला रघुवीर ॥ सामोरा धांवे मित्रकुमर ॥ तों समीप देखिला सौमित्र ॥ बाळसूर्य जयापरी ॥ ७७ ॥ हनुमंताचे स्कंधावरून ॥ खालीं उतरला लक्ष्मण ॥ सुग्रीव आणि बिभीषण ॥ हस्त धरूनि चालत ॥ ७८ ॥ हळू हळू चाले लक्ष्मण ॥ शर अंगीं रुतले तीक्ष्ण ॥ दृष्टीं देखोनि रघुनंदन ॥ केलें नमन साष्टांगीं ॥ ७९ ॥ मग उठोनि रौंजीवनेत्र ॥ प्रीतीनें हृदयीं धरी सौमित्र ॥ वृत्र वधितां सहस्रनेत्र ॥ गुरु जैसा आलिंगी ॥ १८० ॥ श्रीराम म्हणे सौमित्रातें ॥ तुवां वधोनि इंद्रजितातें ॥ ब्रह्मांड भरिलें पुरुषार्थें ॥ पराक्रम करूनियां ॥ ८१ ॥ कोणासी नाटोपे रावणी ॥ तो त्वां वधिला समरांगणीं ॥ देवां-सहित वज्रपाणी ॥ आनंदमय जाहला ॥ ८२ ॥ ऐसें बोलोनि रघुनाथ ॥ सौमित्रमस्तकीं ठेवी हस्त ॥ तेणें श्रम हारपला समस्त ॥ आनंद-भरित लक्ष्मण ॥ ८३ ॥ बिभीषण जांबुवंत ॥ समस्तांसी भेटला रघुनाथ ॥ शब्दरत्नें गौरवीत ॥ धन्य पुरुषार्थ तुमचा पैं ॥ ८४ ॥ पुढें ठेवून शत्रूचें शिर ॥ ऋषभें केला नमस्कार ॥ मग म्हणे सीतामनोहर ॥ धन्य धन्य ऋषभा तूं ॥ ८५ ॥ आरक्त पुष्पें पूजा करून ॥ हें शिर ठेवावें जतन ॥ मागों येईल त्यालागून ॥ द्यावें लागेल शिर हें ॥८६॥ सुषेणासी म्हणे रघुवीर ॥ तूं वैद्य आणि प्रतापशूर ॥ तरी सौमित्रासी करावा उपचार ॥ देह जर्जर बाणीं जाहला ॥ ८७ ॥ मग सुषेणें औषधी आगून ॥ दिव्यदेही केला लक्ष्मण ॥ असो यावरी बिभीषण ॥ वर्तमान सर्व सांगे ॥ ८८ ॥ कैसा जाहला संग्राम ॥ वीरद्वयाचा पराक्रम ॥ तें ऐकोनि मेघश्याम ॥ आश्चर्य परम करीतसे ॥ ८९ ॥ म्हणे धन्य धन्य इंद्रजित वीर ॥ पुरुषार्थासी नाहीं पार ॥ दीन करून देव समग्र ॥ बंदीं जेणें घातले ॥ १९० ॥ याउपरी सुलोचना ॥ शिर मागों येईल राजीवनयना ॥ ते सुरस कथा ऐकतां श्रवणां ॥ सौख्य होईल अत्यंत ॥ ९१ ॥ रामविजय ग्रंथ प्रचंड ॥ त्यांत रसभरित युद्धकांड ॥ श्रवणें पुरे सर्व कोड ॥ नलगे चाड आणिकांची ॥ ९२ ॥ ब्रह्मानंदा श्रीरामा ॥ जगद्वंद्या पूर्णब्रह्मा ॥ श्रीधरवरदा अनामा ॥ पूर्णकामा अभंगा ॥ ९३ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्तचतुर ॥ एकोनत्रिंशतितमोध्याय गोड हा ॥ १९४ ॥ अ० २९ ॥ ओं० ॥ १९४ ॥

९२ शंकराचें चित्तविश्रांतिस्थान असा राम. ९३ सुग्रीव. ९४ कमलनयन श्रीराम. ९५ इंद्र. ९६ श्रीराम. ९७ खंडविखंड.

३०
गोलिवडेकर

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जो पद्मिनीवल्लभकुलभूषण ॥ जो पद्मजातजनक पद्मलोचन ॥ विषकंठहृदय दशकंठदलन ॥ सच्चिदानंदतनु जो ॥ १ ॥ जो रघुकुलकमलदिवाकर ॥ अजित भ्रांतिविपिनवैश्वानर ॥ जो भक्तहृदयाब्जभ्रमर ॥ लीलावतार धरी जो ॥ २ ॥ सद्गुणैश्वर्यसंपन्न ॥ यश श्री कीर्ति विज्ञान ॥ जो औदार्यवैराग्यपरिपूर्ण ॥ सत्यज्ञान शाश्वत जो ॥ ३ ॥ जो कां निर्विकल्प अनंत ॥ हेतुदृष्टांतविवर्जित ॥ तो सुवेळाचळीं रघुनाथ ॥ राक्षसवधार्थ पातला ॥ ४ ॥ जो भवगजविदारक मृगनायक ॥ मोक्षफळाचा परिपाक ॥ तो राम ताटिकांतक ॥ सुरपाळ जगद्गुरु ॥ ५ ॥ गतकथाध्यायीं निरूपण ॥ गुणसिंधूचा बंधू लक्ष्मण ॥ इंद्रजिताचा वध करून ॥ शिर घेऊन पैं गेला ॥ ६ ॥ शरीराचें प्राक्तन विचित्र ॥ ऋषभें सुवेळेसी नेलें शिर ॥ धड रणीं भुजा सत्वर ॥ लंकेवरी पडियेली ॥ ७ ॥ भुजा आपटोनि मागुती उडत ॥ जैसा कंदुक आदळोनि उसळत ॥ तैसा भुजदंड अकस्मात ॥ निकुंभिलेंत पडियेला ॥ ८ ॥ सुलोचनेचे अंगणीं ॥ भुजदंड पडिला ते क्षणीं ॥ तों रावणस्नुषा अंतरसदनीं ॥ सुखरूप बैसली असे ॥ ९ ॥ ते दशशतवदनाची कुमरी ॥ कीं लावण्यसागरींची लहरी ॥ ज्येष्ठ स्नुषा निर्धारीं ॥ राघवारीची ती होय ॥ १० ॥ जे नगारिशत्रूची राणी ॥ यामिनाचरांची स्वामिणी ॥ जिचें स्वरूपलावण्य देखोनि ॥ सुरांगना होती लज्जित ॥ ११ ॥ देवगणगंधर्वराजकुमरी ॥ सेवा करिती अहोरात्रीं ॥ सहस्रनेत्राची अंतुरी ॥ न पवे सरी जियेची ॥ १२ ॥ अंगींचा सुवास अद्भुत ॥ धांवे एक कोशपर्यंत ॥ विषकंठरिपूंची कांता यथार्थ ॥ तुळितां न पुरे इयेसीं ॥ ॥ १३ ॥ नैषधजाया परम सुंदर ॥ वर्णिती काव्यकर्ते चतुर ॥ परी शेषकन्येसी साचार ॥ उपमा द्यावया पुरेना ॥ १४ ॥ अंगींच्या प्रभेनें भूषणें ॥ झळकती अत्यंत दिव्य रत्नें ॥ किन्नरकन्या गायनें ॥ मधुरस्वरें जवळ करिती ॥ १५ ॥ एक शृंगार सांवरिती ॥ एक चामरें घेऊनि वारिती ॥ एक उपभोग आणोनि देती ॥ संतोषविती नानाशब्दें ॥ १६ ॥ सुलोचनेचे गृहीं आनंदु ॥ तो अभ्रतीं पडे विषबिंदु ॥ तैसा तो भुज सुबद्धु ॥ अंगणीं येऊन पडियेला ॥ १७ ॥ भुज पडतांचि धरणी ॥ दणाणली तये क्षणीं ॥ दूती कित्येक धांवूनी ॥ पहावया बाहेर आल्या ॥ १८ ॥ ते पाचबंद अंगणांत ॥ वीरपाणी पडिला अद्भुत ॥ देखोनि दासी भयभीत ॥ आल्या शंकित सांगावया ॥ १९ ॥ म्हणती नवल वर्तलें वो साजणी ॥ महावीराचा तुटोनि पोंणी ॥ येऊन पडिलासे अंगणीं ॥ निरोळमार्गें अकस्मात ॥ २० ॥ एकोनि दासींचें वचन ॥ दचकलें सुलोचनेचें मन ॥ रत्नपादुका त्वरेंकरून ॥ अंघ्रियुगुळीं लेइल्या ॥ २१ ॥ तडित्प्राय झळके अंबर ॥ अंगणांत आली सत्वर ॥ उतरला तेव्हां मुखचंद्र ॥ विव्हळ नेत्र जाहले ॥ २२ ॥ अंग जाहलेंसे विकळ ॥ पुढें न घालवेचि पाऊल ॥ वदनींचें काढोनि तांबूल ॥ एकीकडे भिरकावितें ॥ २३ ॥ सखियांसी म्हणे सुलोचना ॥ प्राणपति आज गेले रणा ॥ सीतेलागीं अयोध्याराणा ॥ सुवेळाचळीं बैसला ॥ २४ ॥ ऐसें बोलतां शेषनंदिनी ॥ भुजेसमीप येतां ते क्षणीं ॥ तंव तो

१ सूर्यवंशाला अलंकार. २ ब्रह्मदेवाचा पिता ३ सिंह. ४ शेषाची. ५ रावणाची. ६ इंद्रजिताचा. ७ राक्षसांची. ८ स्त्री. ९ मंदनाची. १० दमयंती. ११ हात. १२ आकाशमार्गे.

शक्रजिताचा पाणी ॥ पतिव्रतेनें ओळखिला ॥ २५ ॥ पंचांगुळीं मुद्रिकामंडित ॥ वीरकंकणें दिव्य विराजित ॥ दंडीं कीर्तिमुखें झळकत ॥ चपळेहूनि विशेष पैं ॥ २६ ॥ आजि माझें जहाज बुडालें ॥ म्हणोनि वदन हातीं पिटिलें ॥ परम आकांत ते वेळे ॥ वाटे बुडालें ब्रह्मांड ॥ २७ ॥ सुमनकळिकेवरी सौदामिनी ॥ पडतां उरी न उरे क्षणीं ॥ तैसी निस्तेज होउनी ॥ भोगींद्रनंदिनी पडियेली ॥ २८ ॥ लोभियाचें गेलें धन ॥ कीं जळचरें जीवनावांचून ॥ तैसी पतिवियोगेंकरून ॥ सुलोचना तळमळे ॥ २९ ॥ म्हणे विपरीत काळाची गती ॥ मृगजळीं बुडाला अगस्ती ॥ दीपतेजें रोहिणीपती[13] ॥ आहाळोनि खालीं पडियेला ॥ ३० ॥ तमकूपीं बुडाला तरणी[14] ॥ पोंडसें सिंह धरिला वनीं ॥ पिपीलिकेनें मुखीं घालोनी ॥ मेरु कैसा रगडिला ॥ ३१ ॥ अळिकेनें[15] गिळिला सुपर्ण[16] ॥ मशकीं ग्रासिला महाअग्न ॥ भूतांनीं काळ धरून ॥ समरांगणीं मारिला ॥ ३२ ॥ मग सुलोचनेसी उचलोनि ॥ सखिया बैसविती सांवरूनी ॥ पतीची भुजा हृदयीं धरूनी ॥ आक्रंदत सुलोचना ॥ ३३ ॥ मग भुजेप्रति बोले वचन ॥ कैसें प्राणपतीस आलें मरण ॥ तरी तें सर्व वर्तमान ॥ लिहून मज विदित करीं ॥ ३४ ॥ पतिचरणीं माझें मन ॥ जरी असेल रात्रंदिन ॥ तरीच पत्रीं लिहून ॥ वर्तमान दृश्य करीं ॥ ३५ ॥ हाटकरंसपात्र[17] पुढें ठेविलें ॥ भूर्जपत्र[18] उकलोनि पसरिलें ॥ लेखनी हातीं देतां शीघ्रकाळें ॥ भुजेनें लिहिलें ते समयीं ॥ ३६ ॥ नवल अद्भुत वर्तलें ॥ सर्व वर्तमान पत्रीं लिहिलें ॥ सुलोचनेनें पत्र घेतलें ॥ मस्तकीं वंदिलें ते वेळे ॥ ३७ ॥ नयनीं लोटले अश्रुपात ॥ शेषकन्या पत्र वाचीत ॥ भोंवत्या ललना समस्त ॥ ऐकती निवांत ते काळीं ॥ ३८ ॥ ऐकें दशशतमुखकन्यके[19] ॥ सुकुमारे चंपककलिके ॥ मम मानससरोवरमरालिके[20] ॥ प्राणवल्लभे सुलोचने ॥ ३९ ॥ जयआशा अंतरीं धरून ॥ गूढस्थळीं करितां हवन ॥ अर्मीतून दिव्य स्यंदन ॥ निघाला पूर्ण राजसे ॥ ४० ॥ फळप्राप्तीचा समय लक्षून ॥ शत्रू आले तेथें धांवून ॥ चंड शिळा वरी घालोन ॥ आराध्यदैवत क्षोभविलें ॥ ४१ ॥ पर्वत चढला संपूर्ण ॥ शिखरींहून दिधला ढकलून ॥ कीं नदी अवघी उतरून ॥ तीरासमीप बुडाला ॥ ४२ ॥ प्रकटतां वैराग्यज्ञान ॥ वरी विषयघाला पडे येऊन ॥ कीं प्राप्त होतां निधान ॥ विवसी येऊनि वरी पडे ॥ ४३ ॥ कष्टें करितां वेदाध्ययन ॥ वरी घाड घाली अभिमान ॥ सूर्य सर्व अंबर क्रमून ॥ राहुमुखीं सांपडे जेवीं ॥ ४४ ॥ वल्लभे तैसेंच येथें जाहलें ॥ शत्रूंनीं शेवटीं वैर साधिलें ॥ प्रारब्धबळ उणें पडलें ॥ होणार न टळे कल्पांतीं ॥ ४५ ॥ पुढें दारुण संग्राम मांडिला ॥ परी जय आम्हांस पारखा जाहला ॥ जाऊनि सौमित्रासी मिळाला ॥ शत्रूचा वाढला पराक्रम ॥ ४६ ॥ सौमित्र परम निधडा[21] वीर ॥ धनुर्विद्या त्याची अपार ॥ देखोनि उचित दिधलें शिर ॥ राम मित्र जोडिला ॥ ४७ ॥ देहआशा जीवीं धरून ॥ भयें शरण गेला बिभीषण ॥ म्यां देहत्रय निरसून ॥ विदेहजामात[22] मित्र केला ॥ ४८ ॥ सौमित्र तपस्वी पूर्ण पवित्र ॥ बहुत दिवस निराहार ॥ उतरू-

१३ चंद्र. १४ सूर्य. १५ हरिणाच्या बालकानें. १६ किडीनें. १७ गरुड. १८ सोनेरी शाईची दौत. १९ एक प्रकारच्या वृक्षाची पातळ साल. २० शेषकन्ये, सुलोचने. २१ हंसी. २२ घाडसी. २३ श्रीराम.

नियां सिंधु समग्र ॥ मागावया शिर पातला ॥ ४९ ॥ मग मी कृपणता टाकून ॥ निजशिराचें केलें दान ॥ तेणें रामचरणीं नेऊन ॥ शिर माझें समर्पिलें ॥ ५० ॥ शरीर उभें आहे रणीं ॥ शिर पाहूं गेलें चापपाणी ॥ तुज मूर्ख[24] धाडिला पोणी[25] ॥ वेगेंकरून येई कां ॥ ५१ ॥ मायानदी उल्लंघूनि दुर्घट ॥ पाहें पैलतीरीं तुझी वाट ॥ प्राणवल्लभे येऊनि भेट ॥ सत्वर आतां मजलागीं ॥ ५२ ॥ दुःखरूप परम संसार ॥ रामचरणीं सुख अपार ॥ हें जाणोनि धाडिला कर ॥ येई सत्वर प्राणप्रिये ॥ ५३ ॥ असो ते धैर्याधरकुमरी[26] ॥ पत्र वाचूनि ते अवसरीं ॥ शरीर टाकूनि धरित्रीवरी ॥ शोक करी अपार ॥ ५४ ॥ आजि बळाचा समुद्र आटला ॥ कीं धैर्याचा मेरु खचला ॥ प्रतापवृक्ष उन्मळला ॥ समरभूमीसीं अकस्मात ॥ ५५ ॥ इंद्रजितसूर्याच्या किरणें ॥ मावळती शत्रुतारागणें ॥ तो आजि सौमित्रराहूनें ॥ ग्रास केला समूळीं ॥ ५६ ॥ रणसरोवरीं शत्रुकमळें ॥ तूं वारणें छेदिलीं निजबळें ॥ सौमित्रसिंहें कुंजरा बळें ॥ विदारून नेलें शिरमुक्त ॥ ५७ ॥ ऐरावतीसमवेत पौंकशासन[27] ॥ समरीं पाडिला उलथोन ॥ तो आजि मानव लक्ष्मण ॥ तेणें रणीं मारिलासे ॥ ५८ ॥ माझें सौभाग्यभांडार ॥ त्यावरी सौमित्र पडिला तस्कर ॥ माझिया भाग्याचा समुद्र ॥ सौमित्र अगस्तीनें प्राशिला ॥ ५९ ॥ इंद्रजित माझा रोहिणीवर ॥ सौमित्रप्रतापराहु थोर ॥ कलांसहित न दिसे चंद्र ॥ पुन्हां मागुता सहसाही ॥ ६० ॥ वृत्रारि[28]-शत्रूची अंतुरी ॥ नानाप्रकारें विलाप करी ॥ पशु पक्षी ते अवसरीं ॥ रुदती करुणा ऐकोनियां ॥ ६१ ॥ सखिया म्हणती सुलोचने ॥ आतां किमर्थ शोक करणें ॥ आपुलें पैत्र[29]साधन देखणें ॥ संसारमाया त्यजोनियां ॥ ६२ ॥ जें जें दिसे तें तें नाशिवंत ॥ मुळीं मिथ्या अहिकुंडलैंवत[30] ॥ पदीं नेपुरें बांधोनि नाचत ॥ मीनें[31] भूमीसी मिथ्या पैं ॥ ६३ ॥ उदिमा गेला वंध्यासुत ॥ रात्रीं मृगजळीं मत्स्य धरीत ॥ गंधर्वनगर[32] वाटत ॥ मिथ्या समस्त तैसें हें ॥ ६४ ॥ असो नगारिशत्रूची[33] गृहिणी ॥ प्रवेशोनि आत्मसदनीं ॥ नाना-संपत्ति देखोनी ॥ मनीं विटे तत्काळ ॥ ६५ ॥ परापवादें विटती सज्जन ॥ कीं चिळसी ये देखतां वमन ॥ कीं सुंदर ललना देखोन ॥ विटे जैसा विरक्त ॥ ६६ ॥ तैसी नाना संपदा देखतां ॥ विटली शर्क्रारीची[34] कांता ॥ शुकपिकादि द्विजां[35] समस्तां ॥ मुक्त केलें स्वहस्तें ॥ ६७ ॥ सदनासी नमन करूनी ॥ शिबिकेंत[36] भ्रतारहस्त घालोनी ॥ चपळ अश्विनीवरी बैसोनी ॥ लंकेसी तेव्हां चालिली ॥ ६८ ॥ तों पुढें दूत येऊन ॥ सांगती सर्व वर्तमान ॥ मग लघु कपाटें उघडून ॥ सुलोचना प्रवेशली ॥ ६९ ॥ अस्ता गेला वासरमणी ॥ प्रवर्तली घोर रजनी ॥ रचनीचर ते क्षणीं ॥ नगरदुर्गीचे गजबजले ॥ ७० ॥ सभेस बैसला लंकानाथ ॥ तों स्नुषा देखे अकस्मात ॥ गजबजला मयजानाथ[37] ॥ चिन्ह विपरीत देखोनियां ॥ ७१ ॥ सुलोचना सद्गद होउनी ॥ मस्तक ठेवी श्वशुरचरणीं ॥ रावण म्हणे वो

२४ बोलावणें. २५ हात. २६ शेषकन्या. २७ इंद्र. २८ इंद्रजिताची. २९ परलोकाचें साधन. ३० रज्जूवर भासणाऱ्या सापाच्या वेंटोळ्याप्रमाणें. ३१ मासा. ३२ आकाशांत क्षणभर नगरासारिखें दिसतें तें. ३३ पक्ष्यांना. ३४ पालखींत. ३५ रावण.

साजणी ॥ माये किमर्थ आलीस ॥ ७२ ॥ तों भुजेसहित पत्र ॥ श्वशुरापुढें ठेविलें सत्वर ॥ म्हणे स्वर्गा गेले भ्रतार ॥ त्यांसमागमें जाईन मी ॥ ७३ ॥ ऐसें ऐकतांचि रावण ॥ घेत वक्षःस्थळ बडवून ॥ खालें पडे सिंहासनावरून ॥ महाद्रुम[३६] उन्मळे जेवीं ॥ ७४ ॥ मृत्तिका घेऊनि लंकानाथ ॥ दाही मुखीं तेव्हां घालीत ॥ वर्तला एकचि आकांत ॥ नाहीं अंत महाशब्दा ॥ ७५ ॥ गजर ऐकोनि तये वेळीं ॥ मयकन्या[३७] तेथें पातली ॥ वार्ता पुत्राची ऐकिली ॥ मूर्च्छित पडली धरणीये ॥ ७६ ॥ ऐशीं सहस्र राजअंगना ॥ आल्या महामंडपस्थाना ॥ शोकार्णवीं पडली मयकन्या ॥ सर्वही तियेसी सांवरिती ॥ ७७ ॥ मंदोदरी म्हणे स्नेहाळा ॥ मेघनादा माझिया बाळा ॥ मज न पुसतां रणमंडळा ॥ सखया कैसा गेलासी ॥ ७८ ॥ त्रिभुवन शोधितां समग्र ॥ न देखों तुजऐसा धनुर्धर ॥ बंदीं घातले समस्त सुरवर ॥ शत्रू समग्र खिळिले शरीं ॥ ७९ ॥ पूर्वीं मी व्रतें तपें आचरलें ॥ पूर्ण न होतां मध्यें सांडिलें ॥ म्हणूनि तुजऐसें निधान गेलें ॥ आड ठाकलें[३८] पूर्वकर्म ॥ ८० ॥ कीं म्यां केला पंक्तिभेद ॥ संतांस बोलिल्यें दोषशब्द ॥ कीं शिव आणि मुकुंद ॥ वेगळे दोघे भाविले ॥ ८१ ॥ हरिकीर्तनरंग मोडिला ॥ क्षुधार्थी पात्रींचा उठविला ॥ कीं परद्रव्याचा अभिलाष केला ॥ किंवा घडला गुरुद्रोह ॥ ८२ ॥ कीं परलाभाची केली हानी ॥ कीं दोष ठेविला गंगेलागूनी ॥ कीं कुरंगिणी[३९] पौंडसा[३९] वनीं ॥ बिघड पूर्वी म्यां केला ॥ ८३ ॥ कीं भिक्षा न घालितां साचार ॥ द्वारींचा दवडिला यतीश्वर ॥ म्हणोनि इंद्रजिताऐसा पुत्र ॥ गेला निश्चित त्या दोषें ॥ ८४ ॥ असो कौंद्रवेयकुलभूषणकुमारी ॥ दशकंठजाया तिसी हृदयीं धरी ॥ दोघी शोक करिती तेणें धरित्री ॥ कंपित झाली तेधवां ॥ ८५ ॥ मग शेषकन्या बोले वचन ॥ मज द्यावें आजि शिर आणून ॥ वाट पाहातां पतीचे नयन ॥ शिणले जाईन सांगातीं ॥ ८६ ॥ ऐसें बोलतां सुलोचना ॥ परम क्रोध चढला दशवदना ॥ घाव घातला निशाणा ॥ म्हणे सत्वर सेना सिद्ध करा ॥ ८७ ॥ आजि संग्राम करीन निर्वाण ॥ रामसौमित्रांचीं शिरें आणीन ॥ अथवा पुत्रपंथ लक्षून ॥ मी जाईन आतांचि ॥ ८८ ॥ दशमुख कोपला देखोनी ॥ मयजा सांगे सुनेच्या कर्णीं ॥ म्हणे तूंचि तेथें जाउनी ॥ शिर मागून घेईं कां ॥ ८९ ॥ मंगळजननीकुमरीवर[४१] ॥ तयापासीं तूं मागें शिर ॥ तो भक्तवत्सल परम उदार ॥ दयासिंधु दीनबंधु ॥ ९० ॥ जो या चराचरार्चे जीवन ॥ जनकजा वेगळी करून ॥ सकळ स्त्रिया मातेसमान ॥ एकबाणी एकवचनी ॥ ९१ ॥ दुःखामाजी हें सुख थोर ॥ दृष्टीं पाहें वैदेहीवर ॥ इतुकेन तुझा सार्थक संसार ॥ इहे परत्र[४२] सर्वही ॥ ९२ ॥ पुण्यपरायण श्रीरामभक्त ॥ सुग्रीव जांबुवंत हनुमंत ॥ न्यायसिंधु बिभीषण तेथ ॥ पाठिराखे सर्वस्वें ॥ ९३ ॥ ऐसें बोलतां मयकन्या ॥ आलें सुलोचनेचिया मना ॥ मग श्वशुरासीं मागे आज्ञा ॥ सुवेळाचळीं जावया ॥ ९४ ॥ दशद्व्ययनेत्र[४३] बोले ॥ तुज जरी त्यांहीं ठेवून घेतलें ॥ कैसें करावें तये वेळे ॥ सांग वहिलें आम्हांतें ॥ ९५ ॥ उरग[४४] बैसला धुसधुसित ॥

३६ मोठा वृक्ष. ३७ मंदोदरी. ३८ प्राक्तन उभें राहिलें. ३९ हरणीचा व तिच्या पाडसाचा. ४० सुलोचना. ४१ श्रीरामचंद्र. ४२ या लोकीं व परलोकीं. ४३ रावण. ४४ सर्प.

तया मुखीं केवीं घालिजे हात ॥ यावरी शेषकन्या बोलत ॥ दशकंठासी तें ऐका ॥ ९६ ॥ परसतीचा अभिलाष समूळ ॥ करी ऐसा कोण चांडाळ ॥ त्याचा वंश भस्म होईल ॥ विपरीत कर्म आचरतां ॥ ९७ ॥ पतिव्रतेचा अभिलाष धरून ॥ कोण पावला जय कल्याण ॥ रावण बोले अधोवदन ॥ तरी अवश्य जाइंजे ॥ ९८ ॥ तुजसीं विपरीत करितां जाण ॥ शत्रू अवघे भस्म करीन ॥ शेषतनया खरें म्हणून ॥ तत्काळ तेन्हां निघाली ॥ ९९ ॥ बृहस्पतीऐसे विचक्षण ॥ घेतले शिष्ट आणि बंदीजनें ॥ सहस्रार्ध दासी घेऊन ॥ अश्विनीवरी आरूढली ॥ १०० ॥ संसारमाया टाकून ॥ संत स्वरूपीं होती लीन ॥ तैसी लंका उपेक्षून ॥ चालिली शरण रामचंद्रा ॥ ॥ १ ॥ परम वेगें ते वेळीं ॥ आली श्रीरामसभेजवळी ॥ कृपाब्धीस भेटों आली ॥ पुण्यगंगा सुलोचना ॥ २ ॥ कीं संतांचिया गृहाप्रती ॥ विश्रांतीस येई शांती ॥ तैसी शेषकन्या झाली येती ॥ सीतापति लक्ष्मीनियां ॥ ३ ॥ कनकाद्रीभोंवते तरुवर ॥ तैसे राघवा वेष्टीत वानर ॥ कोटिकंदर्पलावण्यसुंदर ॥ अवनिजावर देखिला ॥ ४ ॥ भोंवते कपी यंत्राकार ॥ उभे असती जोडूनि कर ॥ मध्ये रघुनाथपीठ पवित्र ॥ विराजमान घवघवित ॥ ५ ॥ अवनीखालीं उतरूनि जाणा ॥ मनीं आठवी कैलासराणा ॥ हंसगती चाले सुलोचना ॥ शेषकन्या चतुर जे ॥ ६ ॥ एक घांवोनि वानर येती ॥ हर्षें श्रीरामासी सांगती ॥ रावणें पाठविली सीता सती ॥ भयभीत होऊनियां ॥ ७ ॥ मग बोले चापपाणी ॥ रावण पडिला नाहीं जों रणीं ॥ तोंवरी जनकनंदिनी ॥ दृष्टीं न पडे तुमच्या पैं ॥ ८ ॥ शेषकुमरी जवळी देखोन ॥ बिभीषणाकडे पाहे रघुनंदन ॥ तों तेणें आंसुवें भरिले नयन ॥ सद्गद कंठ जाहला ॥ ९ ॥ म्हणे जगद्वंद्या राजीवनेत्रा ॥ ही शक्रजितलल्लना परम पवित्रा ॥ इचें नाम घेतां विषकंठमित्रों ॥ सर्व दोष हरतील ॥ ११० ॥ कर्मगती परम गहन ॥ जिचे अंगुष्ठीं न पडे सूर्यकिरण ॥ शेषकन्या सुकुमार पूर्ण ॥ आली घांवून शिरालागीं ॥ ११ ॥ तों सुलोचननें जवळ येऊन ॥ विलोकून श्रीरामध्यान ॥ जयजयकारें लोटांगण ॥ राघवचरणीं घातलें ॥ १२ ॥ श्रीरामचरणकमळावरी ॥ शेषकन्या जाहली भ्रमरी ॥ ज्याचे चरणरजें निर्धारीं ॥ पद्मजातनया उद्धरली ॥ १३ ॥ दरिद्रियास सांपडे धन ॥ कीं जन्मांधासी आले नयन ॥ कीं जलेंद ओळतां देखोन ॥ मयूर जैसा आनंदे ॥ १४ ॥ कीं पूरीं वाहोन जातसे ॥ त्यास प्राणसखा लावी कांसे ॥ कीं योगी पावे वृत्तिदेशे ॥ निजमन जिंकोनियां ॥ १५ ॥ तैसा देखोन श्रीरामचंद्र ॥ उल्हासे सुलोचनाचित्तचकोर ॥ कीं रघुनाथ होय दिनकर ॥ कमळिणी ते सुलोचना ॥ १६ ॥ संसारतापें तापोनी ॥ दृढ जडली श्रीरामचरणीं ॥ तेथोनि उठावयासी मनीं ॥ आळस येतसे सुलोचने ॥ १७ ॥ आतां हें सुख सांडोनी ॥ पुढती काय पाहावें नयनीं ॥ सुलोचना मस्तक म्हणोनी ॥ पायांवरूनि उचलीना ॥ १८ ॥ जैसा सुधारस गाळी इंदु ॥ तैसा बोले कृपासिंधु ॥ जो जगदीश दीनबंधु ॥ लाविला वेधु त्रिनेत्रासी ॥ १९ ॥ म्हणे माते

४५ स्तुतिपाठक. ४६ घोडीवर. ४७ ब्रह्मामध्यें. ४८ मदन. ४९ शंकर. ५० श्रीरामा. ५१ अहल्या. ५२ पर्जन्य पडतां. ५३ समाधि अवस्थेत.

उठीं वो झडकरी ॥ परम श्रमलीस संसारीं ॥ आतां सुखी राहें पैरत्रीं ॥ अक्षय सुख भोगीं तूं ॥ १२० ॥ ऐसें ऐकोनि झडकरी ॥ उभी ठाकली शेषकुमरी ॥ पाणिद्वय जोडूनि ते अवसरीं ॥ स्तवन करी सद्भावें ॥ २१ ॥ म्हणे जय जय रामा विषकंठमित्रा ॥ रघूत्तमा राजीवनेत्रा ॥ जलदवर्णा चारुगात्रा ॥ मित्रकुळमुकुटमणे ॥ २२ ॥ जगद्वंद्या जगन्नायका ॥ जनकजापते जगद्रक्षका ॥ जन्ममरणभयमोचका ॥ जनकजामाता जगद्गुरो ॥ २३ ॥ जामदग्न्यजिता जलजनयना ॥ जगदीश्वरा जलदवर्णा ॥ जगद्व्यापका दुःखहरणा ॥ जन्मजरारहित तूं ॥ २४ ॥ पुराणपुरुषा रघुनंदना ॥ भक्तवत्सला जगन्मोहना ॥ मायाचक्रचालका निरंजना ॥ निष्कलंका निर्गुण तूं ॥ २५ ॥ आनंदअयोध्यापुरविहारा ॥ वेदवंद्या वेदसारा ॥ परम उदारा रघुवीरा ॥ अहल्योद्धारा मखपाळका ॥ २६ ॥ जय जय रामा विश्वपाळणा ॥ विश्वव्यापका विश्वकरणा ॥ विश्वचाळका जगज्जीवना ॥ विश्वरक्षणा विश्वेशा ॥ २७ ॥ विबुधललाटपटलेखनी ॥ सनकसनंदनमनरंजना ॥ हे रघुवीर दानवदलना ॥ भवभंजना भवहृदया ॥ २८ ॥ मंगलरूपा मंगलकारका ॥ जय मंगलजननीउद्धारका ॥ मंगलभगिनीप्राणनायका ॥ मंगलसहिता मंगलधामा ॥ २९ ॥ कमलोद्भवजनका कमलनयना ॥ कमलानायका कमलशयना ॥ कमलनाभा कमलवदना ॥ कमलसदना कमलप्रिया ॥ १३० ॥ नमो भववारणपंचानना ॥ नमो पापारण्यकुठारतीक्ष्णा ॥ हे श्रीरामा त्रिविधतापशमना ॥ अनंतशयना अनंता ॥ ३१ ॥ तुज स्तवावया चापपाणी ॥ न चले सहस्रवदनाची वाणी ॥ नेति नेति म्हणूनी ॥ आगम जेथें तटस्थ ॥ ३२ ॥ तेथें एक जिव्हेचें स्तवन ॥ मांडेल माझें कोठोन ॥ जैसें भागीरथीसीं मज्जन ॥ थिल्लरोदकें मांडिलें ॥ ३३ ॥ पितळेचें पुष्प नेऊन ॥ केलें कनकाद्रीचें पूजन ॥ कीं जलार्णवासी अर्घ्यदान ॥ कूपोदकें करावें ॥ ३४ ॥ अर्कास वाहिलें अर्कीसुमन ॥ मलयानिलासी अंचलपवन ॥ किंवा क्षीराब्धीपुढें नेऊन ॥ तक्र जैसें समर्पिलें ॥ ३५ ॥ केवीं होय धरेचें वजन ॥ स्तंभ कैंचा टेंकावया गगन ॥ सप्तसमुद्रींचें जीवन ॥ टिटवीस केवीं मोजवे ॥ ३६ ॥ सकळप्रकाशनिशाकर ॥ त्यास दशी वाहिली अणुमात्र ॥ कीं धत्तूरपुष्पीं उमावर ॥ दरिद्रियानें पूजिला ॥ ३७ ॥ तुझे देखतांचि चरण ॥ तुटलें देहत्रयबंधन ॥ मन होऊन ठेलें उन्मन ॥ जन्ममरण तुटलें असे ॥ ३८ ॥ घागरीं आणि रांजणीं ॥ एकचि बिंबला वासरमणी ॥ तैसा स्त्रीपुरुषअभिधानी ॥ चापपाणी व्यापक तूं ॥ ३९ ॥ तरी या स्त्रीदेहाची आकृती ॥ शक्रजिताची अंगना म्हणती ॥ पतिशिरासवें रघुपती ॥ अमीमाजी घालिजे ॥ १४० ॥ तूं अयोध्याधीश उदारा ॥ अनाथ याचक मी मागें शिरा ॥ मी चातक तूं जलधरा ॥ कृपानिधि वर्षें कां ॥ ४१ ॥ जेव्हां उदया पावे गभस्ती ॥ तेव्हां चक्रवाकें मिळती ॥ तैसेंच आतां करीं रघुपती ॥ मित्रकुळप्रकाशका ॥ ४२ ॥ क्षीर आणि जळ ॥ वेगळें काढिती मराळ ॥ तैसा श्रीराम तमालनील ॥ भवपुरींहूनि

५४ परलोकीं. ५५ परशुरामास जिंकणारा. ५६ देवांच्या कपाळीं सुखदुःख लिहिण्याच्या. ५७ शेषाची. ५८ उपनिषदें. ५९ डबक्यांतील पाण्यानें. ६० सूर्यास. ६१ रुईचें फूल. ६२ पद्मराज जरा. ६३ पृथ्वीचें.

काढीं कां ॥ ४३ ॥ पतीचें ऐकिलें वर्तमान ॥ तेव्हांच गेले माझे पंचप्राण ॥ परी शिराचें निमित्त करून ॥ तुझे चरण पाहूं आल्यें ॥ ४४ ॥ तूं चित्तपरीक्षक रघुनाथ ॥ जाणसी सर्वांचें मनोगत ॥ ऐसें सुलोचना म्हणत ॥ जगन्नायक तटस्थ जाहला ॥ ४५ ॥ म्हणे धन्य धन्य सहस्रवदन ॥ ऐसें उदरीं जन्मलें रत्न ॥ कीं भोगींद्राचें तप पूर्ण ॥ कन्यारूपें प्रकटलें ॥ ४६ ॥ सुलोचनेचें चातुर्य देखोन ॥ कपी सकळ तुकाविती मान ॥ श्रीरामासी म्हणे मित्रनंदन ॥ ईतें शिर देऊनि बोळवा ॥ ४७ ॥ जांबुवंत म्हणे हे पुण्यसरिता ॥ अंगद म्हणे धन्य पतिव्रता ॥ मारुति म्हणे इचें नाम घेतां ॥ पाप नुरे सहसाही ॥ ४८ ॥ सायुज्यतामुक्तीसमवेत ॥ इयेसी शिर द्यावें जी त्वरित ॥ असो यावरी जनकजामात ॥ पुसे दशकंठस्नुषेतें ॥ ४९ ॥ आम्हीं येथें आणिलें शिर ॥ तुज केवीं कळला समाचार ॥ येरी म्हणे पतीच्या करें ॥ पत्र लिहून दीधलें ॥ १५० ॥ भूजपत्र दाविलें त्वरित ॥ आश्चर्य करी कौसल्यासुत ॥ तों वानर म्हणती समस्त ॥ आम्हांसी सत्य न वाटे ॥ ५१ ॥ निर्जीव हस्तें लिहिलें पत्र ॥ तरीच आम्ही मानूं साचार ॥ जरी हे हांसवील शिर ॥ आपुल्या पतीचें ये काळीं ॥ ५२ ॥ राम म्हणे इचा महिमा थोर ॥ काय एक न करी निर्धार ॥ तवं ऋषभाहातीं आणविलें शिर ॥ अर्कपुत्रें ते काळीं ॥ ५३ ॥ महाविशाल भयंकर ॥ जिव्हा लोळे मुखाबाहेर ॥ झांकिला असे सव्य नेत्र ॥ भाळीं शेंदूर चर्चिलासे ॥ ५४ ॥ बांबरझोटी धरूनी ॥ ऋषभें ठेविलें आणोनी ॥ तें सुलोचनेनें धरूनी ॥ हृदयीं तेव्हां आलिंगिलें ॥ ५५ ॥ स्फुंदस्फुंदोनि सती रडत ॥ त्रिभुवनीं बळिया इंद्रजित ॥ त्यांचें शिर पडिलें एथ ॥ कर्म विचित्र पूर्वीचें ॥ ५६ ॥ स्वाळीं पसरी उत्तरीय वस्त्र ॥ त्यावरी बैसविलें तेव्हां शिर ॥ सतीनें करूनि नमस्कार ॥ विनवीतसे कर जोडोनियां ॥ ५७ ॥ अयोध्यानाथ श्रीरामचंद्र ॥ पाहती स्वर्गींचे सुरवर ॥ तरी तुम्हीं हास्य करावें सत्वर ॥ जेणें श्रीराम धन्य म्हणे ॥ ५८ ॥ मजसीं विनोद नाना रीती ॥ करीतसां प्राणपती ॥ तरी आजि क्रोध चित्तीं ॥ काय म्हणोनि धरियेला ॥ ५९ ॥ आजि अपराध समस्त ॥ समर्थें घालावे पोटांत ॥ माझा पतिव्रताधर्म बहुत ॥ रघुपतीसी दाविंजे ॥ १६० ॥ होम विध्वंसिला म्हणोन ॥ तेणें क्रोधें धरिलें मौन ॥ कीं समरीं जय न देखोन ॥ म्हणोनि खेद वाटला ॥ ६१ ॥ कीं रामदर्शना शिर आणिलें ॥ सायुज्यपद प्राप्त जाहलें ॥ म्हणोनि बोलणें खुंटलें ॥ जन्ममरण तुटलें पैं ॥ ६२ ॥ इत्यादि भाव ते अवसरीं ॥ बोलिली फणिपाळकुमरी ॥ किंचित विनोदही करी ॥ सुलोचना हांसवावया ॥ ६३ ॥ शूर्पणखा तुमची आत ॥ ते जनस्थानीं गौरविली बहुत ॥ कर्ण नासिक सुमित्रासुत ॥ घेऊनि गेला आरंभीं ॥ ६४ ॥ भगिनीचें देखोनि भूषण ॥ आनंदला पितृव्य कुंभकर्ण ॥ तेणें नासिक आणि कर्ण ॥ सुग्रीवासी समर्पिले ॥ ६५ ॥ ऐसा विनोद करितां ॥ परी शिर न हांसे तत्त्वतां ॥ मग सहस्रवदनदुहिता ॥ खेद परम करीतसे ॥ ६६ ॥ म्हणे मी पूर्वी चुकल्यें यथार्थ ॥ जरी पितयासी

६४ शोष. ६५ सुप्रोष. ६६ उजवा डोळा. ६७ केसांच्या झिंजोट्या. ६८ ईश्वराशीं आणि जीवाशीं अभेद होतो ते पद, मुक्ति. ६९ नाशिकाजवळ. ७० सुलोचना.

साह्य आणित्यें येथ ॥ तरी तुमचे शत्रु समस्त ॥ पराभविता क्षणार्धें ॥ ६७ ॥ ऐसी ऐकतांचि मात ॥ गदगदां तेव्हां शिर हांसत ॥ सव्य नेत्र उघडोनि पाहात ॥ जेवीं विकासे कमळिणी ॥ ६८ ॥ श्रीरामास पुसती वानर ॥ काय गोष्टीस हांसलें शिर ॥ याउपरी राजीवनेत्र ॥ काय बोलता जाहला ॥ ६९ ॥ म्हणे इचा पिता सहस्रवंदन ॥ तोचि अवतरला लक्ष्मण ॥ त्या श्वशुरें मज मारिलें म्हणोन ॥ शिर हांसलें गदगदां ॥ १७० ॥ अज्ञानरूप वामनयन ॥ मी त्यास न दिसें सगुण ॥ ज्ञानमय सव्य नयन ॥ उघडोनि मज विलोकी ॥ ७१ ॥ वानर डोलविती मान ॥ सुलोचना देवी धन्य धन्य ॥ सकळ सतियांमाजी निधान ॥ शिर अचेतनें हांसविलें ॥ ७२ ॥ तंव तो वीर लक्ष्मण ॥ व्यापिला मायामोहेंकरून ॥ सुलोचनेकडे पाहोन ॥ आंसुवें नयन भरियेले ॥ ७३ ॥ रघूत्तमाप्रती बोलत ॥ अन्याय केला म्यां यथार्थ ॥ प्रत्यक्ष मारून जामात ॥ कन्या सुलोचना श्रमविली ॥ ७४ ॥ ऐसा शोकार्णवीं लक्ष्मण ॥ पडतां देखोनि रघुनंदन ॥ म्हणे बा रे क्षत्रियधर्म दारुण ॥ देवें पूर्वीच निर्मिला ॥ ७५ ॥ बंधु अथवा पिता पुत्र ॥ समरीं आलिया समोर ॥ त्यासी वधितां अणुमात्र ॥ दोष नसे सहसाही ॥ ७६ ॥ सौमित्र म्हणे श्रीरामा ॥ विश्वफलांकितद्रुमा ॥ अज अजित पूर्णकामा ॥ तुम्ही बोलिलां तें सत्य सर्व ॥ ७७ ॥ मायाचक्र महा दुर्गम ॥ प्रियावियोगें वाटे श्रम ॥ सीतेलागीं तुम्हीं कष्टोनि परम ॥ वृक्ष पाषाण आलिंगिले ॥ ७८ ॥ ऐसी ऐकतांचि मात ॥ कृपेनें द्रवला रघुनाथ ॥ म्हणे मी उठवीन इंद्रजित ॥ करीन ऐक्य उभयांसी ॥ ७९ ॥ इंद्रकरीं आणोनि अमृत ॥ आतांचि उठवीन शेषजामात ॥ ऐकतां महावीर तेथ ॥ गजबजले ते काळीं ॥ १८० ॥ खूण दावी सूर्यनंदन ॥ हें मनीं न धरावें आपण ॥ विमानीं देव संपूर्ण ॥ भयभीत जाहले ॥ ८१ ॥ अंगद दावी करपल्लवीं ॥ बिभीषण किंचित मान हालवी ॥ जांबुवंत नेत्रसंकेत दावी ॥ नका हें करूं अघटित ॥ ८२ ॥ मग निर्भीडपणें वायुतनय ॥ बोलिला जो सर्वांसी प्रिय ॥ म्हणे तुमचें ठेवा औदार्य ॥ एकीकडे नेऊनियां ॥ ८३ ॥ अजा म्हणोनि न पाळिजे वृक ॥ मित्र म्हणों नये दंदशूक ॥ विषतरूचें काय सार्थक ॥ दुग्ध घालोनि वाढवितां ॥ ८४ ॥ इंद्रजिताचे बळें देव ॥ रावणें घातले बंदीं सर्व ॥ यार्चे कापट्य वासव ॥ तोही नेणे सर्वथा ॥ ८५ ॥ सौमित्र बोलिला वचन ॥ जेणें होय सर्वांचें समाधान ॥ तैसें करावें आपण ॥ रघुनंदन यथार्थ म्हणे ॥ ८६ ॥ सुलोचनेसी म्हणे मित्रपुत्र ॥ पतीचें शिर घेऊनि जाईं सत्वर ॥ निराशा ऐकोनि उत्तर ॥ सती सुलोचना बोलतसे ॥ ८७ ॥ दृष्टीं देखिला रघुनाथ ॥ इतुकेन सर्व कृतकृत्य ॥ म्हणोनि रामचरणीं ठेवित ॥ मस्तक पुन्हां सुलोचना ॥ ८८ ॥ सव्य घालोनि रघुवीर ॥ मागुता घाली नमस्कार ॥ उभी राहिली जोडोनि कर ॥ काय उत्तर बोलिली ॥ ८९ ॥ म्हणे आदिपुरुषा वैकुंठनायका ॥ मत्स्यरूपा वेदोद्धारका ॥ कमठरूपा सृष्टिपाळका ॥ आदिवराहस्वरूप तूं ॥ १९० ॥ तो तूं स्तंभोद्भव नरहरी ॥ वामनरूप मधुकैटभारी ॥ तीन सप्तकें धरित्री

७१ शेष. ७२ निर्जीव. ७३ स्त्री, पुत्र, इत्यादि मायेनें रचित चक्र. ७४ पत्नीविरहानें. ७५ सुग्रीव ७६ मारुती. ७७ लांडगा. ७८ सर्प. ७९ इंद्र. ८० कूर्मरूपा. ८१ खांबांतून प्रकट झालेला.

केली निक्षत्री तुवांचि ॥ ९१ ॥ तोचि तूं आतां रघुनाथ ॥ कौसल्यात्मज जनकजामात ॥ माता पिता बंधु सर्व गोत ॥ तूंचि माझें जगद्वंद्या ॥ ९२ ॥ मदनशत्रुहृदयआरामा ॥ परत्रींचा सोयरा तूं श्रीरामा ॥ दीनबंधु सर्वोत्तमा ॥ पूर्णब्रह्मा जगद्गुरो ॥ ९३ ॥ लंकेकडे आजि तत्त्वतां ॥ कपी न धाडावे सर्वथा ॥ मज अग्निप्रवेश करितां ॥ विक्षेप कोणीं न करावा ॥ ९४ ॥ अवश्य म्हणोनि जगदुद्धार ॥ सतीचे मस्तकीं ठेविला कर ॥ सुलोचना वारंवार ॥ करी नमस्कार राघवा ॥ ९५ ॥ नेत्रद्वारें न्याहाळून ॥ हृदयीं रेखिला रघुनंदन ॥ जय जय राम म्हणोन ॥ शिर घेऊनि चालिली ॥ ९६ ॥ मग रणमंडळीं येऊन सत्वर ॥ घेतलें पतीचें शरीर ॥ समुद्रतीरीं भयंकर ॥ विस्तीर्ण कुंड रचियेलें ॥ ९७ ॥ मंदोदरीसहित लंकानाथ ॥ सहपरिवारें पातला तेथ ॥ विमानीं देव समस्त ॥ पाहती कौतुक सतीचें ॥ ९८ ॥ सुलोचननेनें करूनि स्नान ॥ सौभाग्यकारक देत वाण ॥ कुंडीं पतीची तनु घालून ॥ महाअग्नि चेतविला ॥ ९९ ॥ कुंडासी प्रदक्षिणा करूनि येरी ॥ धर्मशिळेवरी शेषकुमरी ॥ उभी ठाकोनि ते अवसरीं ॥ पाहे अंबरीं न्याहाळूनि ॥ २०० ॥ धडकत दुंदुभींचे ध्वनी ॥ सुरांची दाटी झाली विमानीं ॥ सकळ सुरांगना गगनीं ॥ अक्षय्य वाणें घेऊनि उभ्या ॥ १ ॥ तंव दिव्य शरीर पावोनी ॥ इंद्रजित देखिला विमानीं ॥ ऐसें देखतांचि नयनीं ॥ प्राण जाहला कासाविस ॥ २ ॥ शरीर टाकूनि त्वरितगती ॥ आंतून निघाली आत्मज्योती ॥ दिव्य देह पावोनि निश्चितीं ॥ पतीपाशीं पावली ॥ ३ ॥ मग शरीर उलंडोन ॥ अग्निमुखीं घातलें नेऊन ॥ तेव्हां मंदोदरी आणि रावण ॥ शोक करिती अत्यंत ॥ ४ ॥ सिंधुसंगमीं करूनि स्नान ॥ सहपरिवारें परतला रावण ॥ मंदोदरीसहित करीत रुदन ॥ लंकेमाजी प्रवेशला ॥ ५ ॥ घरोघरीं लोक वानीत ॥ म्हणती यशस्वी अयोध्यानाथ ॥ एकपत्नीव्रत सत्य ॥ केलें सार्थक सुलोचनेचें ॥ ६ ॥ परिसोत सर्व पंडित ॥ अग्निपुराणीं सत्यवतीसुत ॥ बोलिला कथा हे यथार्थ ॥ नाहीं विपरीत सर्वथा ॥ ७ ॥ कथा रसिक बहु पाहीं ॥ म्हणोनि योजिली श्रीरामविजयीं ॥ श्रोते धरोन सदा हृदयीं ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ८ ॥ पुढें कथा गोड गहन ॥ अहिरावण महिरावणाख्यान ॥ पाताळासी रामलक्ष्मण ॥ चोरूनियां नेतील ॥ ९ ॥ तेथें धांवण्या धांवेल हनुमंत ॥ ते कथा ऐकोत प्रेमळ भक्त ॥ ब्रह्मानंद अत्यद्भुत ॥ हृदयीं तेणें ठसावे ॥ २१० ॥ श्रीधरवरदा ब्रह्मानंदा ॥ पुराणपुरुषा अनादिसिद्धा ॥ निर्गुणा जगदंकुरकंदा ॥ जगद्वंद्या अभंगा ॥ ११ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ त्रिंशत्तमाध्याय गोड हा ॥ २१२ ॥ ॥ ओंव्या ॥ २१२ ॥ ॥ अध्याय ॥ ३० ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

---

८२ शिवाच्या चित्तास रमविणाऱ्या. ८३ परलोकींचा. ८४ प्रदीप्त केला. ८५ वेदव्यास.

३१

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ जो रणरंगधीर रघुवीर ॥ रविकुळमंडण राजीवनेत्र ॥ रजनीचरांतक रमणीयगात्र ॥ राजेश्वर रमापति ॥ १ ॥ आत्माराम अयोध्यानाथ ॥ आनंदरूप अक्षय अव्यक्त ॥ परात्पर अमल नित्य ॥ आद्य अनंत अनादि जो ॥ २ ॥ जो कर्ममोचक कैवल्यदानी ॥ करुणासमुद्र कार्मुकपाणी ॥ बंधच्छेदक कल्मष जाळूनी ॥ करी कल्याण भक्तांचें ॥ ३ ॥ परमानंदा पुराणपुरुषा ॥ पद्मजातजनका पयोनिधिवासा ॥ पंकजनेत्रा परमहंसा ॥ पशुपतिहृदयजीवना ॥ ४ ॥ मनमोहना मंगलधामा ॥ मुनिजनहृदया मेघश्यामा ॥ मायातीता मनविश्रामा ॥ मानववेषधारका ॥ ५ ॥ दीनदयाळा दशरथनंदना ॥ दशमुखांतका दुष्टदलना ॥ दानवरिपुदरिद्रच्छेदना ॥ दशावतारवेषधारका ॥ ६ ॥ तिसावे अध्यायीं अनुसंधान ॥ सुलोचना प्रवेशली अग्र ॥ यावरी विंशतिनयन ॥ चिंताक्रांत शोक करी ॥ ७ ॥ बंधु पुत्र पडिले रणीं ॥ आतां पाठिराखा न दिसे कोणी ॥ तों विद्युज्जिव्ह ते क्षणीं ॥ प्रधान बोलता जाहला ॥ ८ ॥ म्हणे अहिरावण महिरावण ॥ पाताळीं राहती दोघे जण ॥ ते कापट्यविद्येंकरून ॥ रामसौमित्रां नेतील ॥ ९ ॥ कालिकेपुढें तत्काळीं ॥ समर्पितील दोघांचे बळी ॥ ऐसें ऐकतां दशमौळी ॥ परम संतोष पावला ॥ १० ॥ रावणें पत्र पाठविलें लिहून ॥ तत्काळ प्रकटले दोघे जण ॥ कीं ते कामक्रोधचि येऊन ॥ अहंकारासी भेटले ॥ ११ ॥ त्या दोघांसी आलिंगून ॥ मयजापति करी रुदन ॥ इंद्रजिताचें वर्तमान ॥ दोघांप्रति निवेदिलें ॥ १२ ॥ यावरी ते दोघे बोलत ॥ आतां गत शोक ते बहु असोत ॥ सौमित्र आणि रघुनाथ ॥ रजनीमाजी नेऊं तयां ॥ १३ ॥ मग वरकड सेनेचा संहार ॥ करावया तुम्हां काय उशीर ॥ ऐकतां दशकंधरनेत्र ॥ परम संतोष पावला ॥ १४ ॥ तों बिभीषणाचे दोघे प्रधान ॥ गुप्तरूपें गोष्टी ऐकून ॥ तिंहीं पवनवेगें जाऊन ॥ कथिलें रावणानुजासी ॥ १५ ॥ तेणें नळ नीळ जांबुवंत ॥ मारुती यांसी केलें श्रुत ॥ हनुमंतें पुच्छदुर्ग अद्भुत ॥ सेनेभोंवता रचियेला ॥ १६ ॥ वेढियावरी वेढे घालूनी ॥ वज्रदुर्ग उंचविला गगनीं ॥ वरी ठायीं ठायीं द्रुमपाणी ॥ गात बैसले सावध ॥ १७ ॥ निशा गहन ते काळीं ॥ कीं काळपुरुषाची कांबळी ॥ कीं जगावरी खोळ घातली ॥ अज्ञानाची अविद्येनें ॥ १८ ॥ निशीमाजी पक्षी बहुत ॥ वृक्षीं नाना शब्द करीत ॥ रिसें वडवाघुळें तेथ ॥ लोळकंबती शाखेवरी ॥ १९ ॥ भूतें आणि यक्षिणी ॥ गोंधळ घालिती महावनीं ॥ महाज्वाळरूप दावूनी ॥ गुप्त होती अप्सरा ॥ २० ॥ स्मशानीं मातले प्रेतगण ॥ भयानक रूपें दारुण ॥ छळिती अपवित्रालागोन ॥ पवित्र देखोनि पळती ते ॥ २१ ॥ पिंगळे[13] थोर किलबिलती ॥ भालवा दिवाभीतें बोभाती ॥ चक्रवाकांचे शब्द उमटती ॥ टिटवे बोलती ते वनीं ॥ २२ ॥ कुमुदीं मिलिंद मिळती सवेग ॥ मस्तकमणी निघती उरग ॥ निधानें प्रकटलीं सांग ॥ येऊं म्हणती सभाग्या ॥ २३ ॥ असो ऐसी निशा दाटली थोर ॥ तों पातले दोघे असुर ॥ दुर्गावरी गर्जती वानर ॥ मार्ग अणुमात्र दिसेना ॥ २४ ॥ असुरकरीं तीक्ष्ण शूळ ॥ फोडूं पाहती दुर्ग सबळ ॥ तों

१ मोक्षदाता. २ पातक. ३ ब्रह्मदेवाचा पिता. ४ क्षीरान्धिशायी. ५ कमलनेत्र. ६ शंकरप्रिया. ७ श्रीराम. ८ दानवरिपु=देव. ९ दीस डोक्यांचा रावण. १० रात्री. ११ हातीं वृक्ष घेतलेले वानर. १२ एक पक्षी.

शूळ मोडले तत्काळ ॥ कोट अचळ वज्राहूनी ॥ २५ ॥ मग ते ऊर्ध्वपंथें उडोनी ॥ दुर्गमर्यादा ओलांडूनी ॥ जेथें निजले लक्ष्मण-कोदंडपाणी[13] ॥ उतरले तेथें अकस्मात ॥ २६ ॥ तों कनकेंहरिणचर्मावरी[14] ॥ निद्रिस्थ दोघे लीलावतारी ॥ कीं शिव आणि विष्णु शेजारीं ॥ अवनीवरी निजेले ॥ २७ ॥ आधींच निद्रासुख घन ॥ वरी राक्षसें घातलें मौन ॥ शय्येसहित उचलोन ॥ मस्तकीं घेऊन चालिले ॥ २८ ॥ तेथेंच कोरिलें विवर ॥ लांब योजनें सप्त सहस्र ॥ सप्त घटिकेंत यामिनीचर ॥ घेऊन गेले दोघांसी ॥ २९ ॥ पुढें तेरा सहस्र योजन ॥ दधिसमुद्र ओलांडून ॥ तेथें महिकावती नगर पूर्ण ॥ लंकेहूनि विशेष ॥ ३० ॥ काम क्रोध दोघे जण ॥ आत्मेंयासी[15] घालिती आवरण ॥ तैसे निशाचरीं रामलक्ष्मण ॥ सदनीं दृढ रक्षिले ॥ ३१ ॥ नगरमध्यभागीं देऊळ ॥ एकवीस योजनें उंच सबळ ॥ तें भद्रकालीचें मुख्य स्थळ ॥ महाविशाळ भयानक ॥ ३२ ॥ असो दधिसमुद्रतीरीं जाण ॥ वीस कोटी पिशिताशन ॥ मकरध्वज बलाढ्य पूर्ण ॥ दृढ रक्षणा ठेविला ॥ ३३ ॥ महिकावतींत रामलक्ष्मण ॥ निद्रिस्थ आणि वरी मोहन ॥ त्यावरी नागपाशीं बांधोन ॥ बैसती रक्षण अहिमही ॥ ३४ ॥ असो इकडे सुवेळेसी जाण ॥ काय जाहलें वर्तमान ॥ निशी संपतां चंडकिरण ॥ उदयाचळा पातला ॥ ३५ ॥ घ्यावया रघुनाथदर्शन ॥ समस्त पावले वानरगण ॥ तों शय्येसहित पूर्ण ॥ दोन्ही निघानें न दिसती ॥ ३६ ॥ तंव देखिलें भयानक विवर ॥ घाबरे पाहती वानर ॥ सुग्रीवादिक कपी समग्र ॥ गजबजिले देखोनियां ॥ ३७ ॥ मग पाहती वानर ॥ तों द्वादश गांवें पाय थोर ॥ असुरांचे उमटले भयंकर ॥ रघुवीरभक्त पाहती ॥ ३८ ॥ या चराचराचें जीवन ॥ जें कमलोद्भवाचें देवतार्चन ॥ चोरीं चोरिलें म्हणोन ॥ हृदय पिटी सुग्रीव ॥ ३९ ॥ सकळ वानर तैं आक्रंदती ॥ धरणीवरी अंगें घालिती ॥ एक नाम घेऊनि हांका फोडिती ॥ घांव रघुपते म्हणोनियां ॥ ४० ॥ जगद्वंद्या राजीवनेत्रा ॥ कां उबगलासी[16] आम्हां वानरां ॥ तूं परात्पर आदिसोयरा ॥ कोठें गेलासी उपेक्षोनि ॥ ४१ ॥ तों बिभीषण आला धांवोन ॥ म्हणे स्थिर असा अवघे जण ॥ ही गोष्ट जातां बाहेर पूर्ण ॥ येईल रावण युद्धासी ॥ ४२ ॥ रामाविण सेना समग्र ॥ जैसें प्राणाविण शरीर ॥ तरी फुटों न द्यावा समाचार ॥ पुढें विचार करा आतां ॥ ४३ ॥ पिंडब्रह्मांडतत्त्वांसहित ॥ शोधी जैसा सद्गुरुनाथ ॥ मग वस्तु निवडी शाश्वत ॥ सीताकांत शोधा तैसा ॥ ४४ ॥ कीं धुळींत हारपलें मुक्त ॥ झारी निवडी सावचित्त ॥ कीं वेदांतींचा अर्थ पंडित ॥ उकलोनियां काढी जेवीं ॥ ४५ ॥ कीं समुद्रीं पडले वेद ॥ ते मत्स्यरूपें शोधी मुकुंद ॥ तैसा सीताहृदयाब्जमिलिंदे[17] ॥ शोधोनियां काढावा ॥ ४६ ॥ तुम्ही रघुपतीचे प्राणमित्र ॥ भगीरथप्रयत्नें[18] करूनि थोर ॥ तुमचा प्रतापरोहिणीवर ॥ निष्कलंक उदय पावूं द्या ॥ ४७ ॥ तुमचे भाग्यासी नाहीं पार ॥ सुखरूप आहे वायुकुमर ॥ तो क्षणमात्रें रघुवीर ॥ काढील आतां शोधूनियां ॥ ४८ ॥ मग मारुतीपुढें वानर ॥ घालिती कित्येक नमस्कार ॥ म्हणती तुजविण रघुवीर ॥ ठायीं न पडे

१३ श्रीराम. १४ सुवर्णवर्णाच्या हरिणाच्या कातड्यावर. १५ आत्मरूपास. १६ कंटाळलास. १७ भगीरथ राजाचा भागीरथी भाणावयाचा जो प्रयत्न, तसा. १८ मारुति.

सर्वथा ॥ ४९ ॥ रामप्राप्तीसी कारण ॥ तूं सद्गुरु आम्हांसी पूर्ण ॥ काम क्रोध अहिमही निवटून ॥ आत्माराम दाखवीं ॥ ५० ॥ पूर्वी सीताशुद्धि केली पाहीं ॥ आतां रामासी पाडीं ठायीं ॥ ऐसें ऐकतां ते समयीं ॥ राघवप्रिय बोलत ॥ ५१ ॥ म्हणे न लगतां एक क्षण ॥ विरिंचि[19]-गोळ हा शोधीन ॥ बंधूसहित सीतारमण ॥ सुवेळेसी आणितों ॥ ५२ ॥ मग म्हणे सुग्रीवा बिभीषणा ॥ तुम्हीं रक्षावी कपिसेना ॥ विजय-श्रियेशीं अयोध्याराणा ॥ असुर निवटूनि आणितों ॥ ५३ ॥ नळ नीळ अंगद जांबुवंत ॥ घेऊनि प्रवेशे विवरांत ॥ सात सहस्र योजनें तेथ ॥ अंधकार घोर पैं ॥ ५४ ॥ चौघे कासाविस होऊन ॥ मार्गीं पडिले मूर्च्छा येऊन ॥ मग ते मारुतीनें बांधोन ॥ आणिले उचलोनि बाहेरी ॥ ५५ ॥ लागतांचि शीतळ पवन ॥ सावध जाहले चौघे जण ॥ प्रकाश देखोनियां नयन ॥ उघडिते जाहले ते काळीं ॥ ५६ ॥ तंव वीस कोटी राक्षस घेऊन ॥ मकरध्वज बैसला रक्षण ॥ मग पांचेंही वेष पालटून ॥ कावडी[21] होऊनि चालिले ॥ ५७ ॥ तंव दटाविती असुर तयांतें ॥ कोठें रे जातां येणें पंथें ॥ येरू म्हणती जातों तीर्थातें ॥ महिकावती पाहावया ॥५८॥ अंतरिक्ष करोनि उड्डाण ॥ घेऊं कालि-केचें दर्शन ॥ ऐसें ऐकतांचि वचन ॥ सर्व राक्षस क्षोभले ॥५९॥ सबळ दंड उचलून ॥ कपींसी करिती ताडण ॥ मग हनुमंतें पायीं धरून ॥ मारिले आपटून तत्काळीं ॥ ६० ॥ ऐसें देखतां विपरीत ॥ राक्षस धांवले समस्त ॥ प्रतापरुद्र हनुमंत ॥ जैसा कृतांत क्षोभला ॥ ६१ ॥ असं-ख्यात कुंजरभारीं[22] ॥ प्रवेशती पांच केसरी[23] ॥ तैसे पांचांनीं ते अवसरीं ॥ राक्षस सर्व मारिले ॥६२॥ वीस कोटी पिशिताशन[24] ॥ पांच वीरीं भारे बांधोन ॥ पृथ्वीवरी आपटून ॥ समुद्रांत भिरकाविले ॥६३॥ तों मकरध्वज धांवोन ॥ भिडला मारुतीसीं येऊन ॥ मुष्टिप्रहारेंकरून ॥ एकमेकासी ताडिती ॥ ६४ ॥ सप्त पाताळें दणाणत ॥ परम क्षोभला हनुमंत ॥ हृदयीं देऊनि मुष्टिघात ॥ मकरध्वज पाडिला ॥ ६५ ॥ वक्षस्थळीं मारुति बैसोन ॥ म्हणे तुज आतां सोडवील कोण ॥ येरू म्हणे अंजनीनंदन ॥ जवळी नाहीं ये काळीं ॥६६॥ तो जरी येता धांवोन ॥ तरी तुज करता शतचूर्ण ॥ तोचि माझा पिता जाण ॥ ऐकोनि मारुती शंकला ॥ ६७ ॥ मग तयासी हातीं धरून ॥ म्हणे सांग कैसें वर्तमान ॥ ब्रह्मचारी हनु-मंत पूर्ण ॥ तूं सुत कैसा जाहलासी ॥ ६८ ॥ मीच हनुमंत रुद्रावतार ॥ तूं म्हणवितोसी माझा कुमर ॥ सांगाती हांसती साचार ॥ सांग प्रकार कैसा तो ॥ ६९ ॥ येरू म्हणे लंकादहन ॥ करून येतां वायुनंदन ॥ स्वेदें[25] शरीर संपूर्ण ॥ ओलावलें ते काळीं ॥ ७० ॥ तो स्वेद निपटोन ॥ कपाळींचा टाकिला जाण ॥ तो समुद्रीं पडतां मगरीनें ॥ गिळिला तोचि मी जन्मलों ॥ ७१ ॥ ऐसा वृत्तांत सांगूनी ॥ पुत्रें मस्तक ठेविला चरणीं ॥ तों मगरी आली धांवोनी ॥ वल्लभासी पाहावया ॥ ७२ ॥ म्हणे स्वरूप दिसतें लहान ॥ जेव्हां केलें लंकादहन ॥ त्या काळींचें स्वरूप पूर्ण ॥ प्रकटून संशय फेडावा ॥ ७३ ॥ मग भीमरूप धरिलें ते क्षणीं ॥ मगरी लागली दृढ चरणीं ॥ म्हणे चिंता न करावी मनीं ॥ अयोध्यानाथ सुखी असे ॥ ७४ ॥ अहिमही कपटी दोघे जण ॥ घेऊनि आले रामलक्ष्मण ॥ उदयीक

१९ ब्रह्मांड. २० नळ, नील, अंगद, जांबुवंत आणि मारुति हे. २१ कावडवाले यात्रेकरू. २२ हत्तींच्या समुदायांत. २३ सिंह. २४ दैत्य. २५ घामानें.

देवीपुढें नेऊन ॥ बळी समर्पितील दोनप्रहरां ॥ ७५ ॥ आपण देउळांत जाऊन ॥ बैसावें गुप्तरूपेंकरून ॥ ते स्थळीं राम लक्ष्मण ॥ भेटतील तुम्हांसी ॥ ७६ ॥ ऐसें ऐकतां सीताशोकहरण ॥ बोलता जाहला संतोषोन ॥ म्हणे असुरांतें वधोन ॥ तुझा नंदन[२६] स्थापीन त्या स्थळीं ॥ ७७ ॥ येरी म्हणे महिकावती नगर ॥ त्रयोदश सहस्र योजनें दूर ॥ आडवा समुद्र दुस्तर ॥ तरी विचार माझा एक ऐका ॥ ७८ ॥ तुम्हीं पांचही बलवंत ॥ बसावें माझे वदनीं[२७] नौकेंत ॥ महिकावतीस[२८] नेऊन त्वरित ॥ पुढती आणीन या स्थळीं ॥ ७९ ॥ नळ नील अंगद जांबुवंत ॥ ऐकतां जाहले भयभीत ॥ म्हणती मगरमिठी अद्भुत ॥ भक्षील उदकांत नेऊनियां ॥ ८० ॥ तरी मारुति ऐकें वचन ॥ आम्ही रक्षितों हें स्थान ॥ तुजवांचोनि सिंधुलंघन ॥ सर्वथा नव्हे कोणासी ॥ ८१ ॥ मग तेथें उभा राहोन ॥ हनुमंतें चिंतिले श्रीरामचरण ॥ जय यशस्वी श्रीराम म्हणोन ॥ अकस्मात उडाला ॥ ८२ ॥ मनोवेगें हनुमंत ॥ आला तेव्हां महिकावतींत ॥ एकवीस दुर्गे रक्षकांसहित ॥ कोणासी न कळत ओलांडिलीं ॥ ८३ ॥ अणुरेणूहूनि लहान ॥ जाहला सीताशोकहरण ॥ भद्रकालीचें देवालय देखोन ॥ आंत संचरला ते काळीं ॥ ८४ ॥ कापट्य अनुष्ठानें बहुत ॥ राक्षस करिती देवळांत ॥ मद्य मांस विप्रप्रेत ॥ पूजनासी ठेविलें ॥ ८५ ॥ भ्रष्ट ह्रीं काढिती ॥ एकासी एक वचन देती ॥ ऐसें करितां मोक्षप्राप्ती ॥ प्रमाण ग्रंथीं लिहिलें असे ॥ ८६ ॥ ऐसें ऐकतां रामभक्त ॥ म्हणे यांसी कैंचा मोक्ष प्राप्त ॥ आतां कपाळमोक्ष त्वरित ॥ पावती हस्तें माझिया ॥ ८७ ॥ असो देवालयीं जाऊनि महारुद्र ॥ देवी उचलोनि सत्वर ॥ नाहाणींत टाकूनि द्वार ॥ दृढ झांकिलें हनुमंतें ॥ ८८ ॥ वज्रकपाटें[२९] देऊनी ॥ आपण बैसला देवीस्थानीं ॥ सर्वांगीं शेंदूर चर्चूनी ॥ जाहला भवानी हनुमंत ॥ ८९ ॥ देवी मारुतीकडे पाहात ॥ तों भयानक रूप दिसे अद्भुत ॥ जैसा हरिणीचे गृहांत ॥ महाव्याघ्र प्रवेशला ॥ ९० ॥ तों येरीकडे असुर बहुत ॥ षड्रस अन्नांचे पर्वत ॥ पूजासामुग्री अद्भुत ॥ घेऊनि अहिमही तेथें पातले ॥ ९१ ॥ तों वज्रकपाटें दीधलीं ॥ तीं न उघडती कदाकाळीं ॥ एक म्हणती देवी क्षोभली ॥ म्हणूनि स्तुति करिताती ॥ ९२ ॥ ऐसा लोटला एक मुहूर्त ॥ तों रुद्ररूपिणी आंत बोलत ॥ म्हणे धन्य तुम्ही भक्त ॥ बळीसी रघुनाथ आणिला ॥ ९३ ॥ लंकेपुढें बहुतांचे प्राण ॥ मींच घेतले सत्यवचन ॥ तुमचें करावया भोजन ॥ येथें साक्षेपें पातलें ॥ ९४ ॥ माझें रूप बहुत तीव्र ॥ पाहतां जातील तुमचे नेत्र ॥ तरी पाडूनि गवाक्षद्वार[३०] ॥ पूजा आधीं समर्पा ॥ ९५ ॥ ऐसें देवी बोले आंतूनी ॥ अहिमही हर्षले ते क्षणीं ॥ म्हणती धन्य आम्ही त्रिभुवनीं ॥ भक्तशिरोमणी दोघेही ॥ ९६ ॥ मग देऊळमस्तकीं विशाळ ॥ गवाक्ष[३१] पडिलें तत्काळ ॥ पंचामृताचे घट सजळ ॥ स्नानालागीं ओतिले ॥ ९७ ॥ तों मुख पसरूनि हनुमंत ॥ घटघटां प्राशी पंचामृत ॥ पाठीं शुद्धोदक ओतीत ॥ प्रक्षाळिलें मुख तेणें ॥ ९८ ॥ धूप दीप वास ते समयीं ॥ देवीस म्हणे हें तूं घेईं ॥ सवेंच म्हणे भक्तां लवलाहीं ॥ नैवेद्य

२६ मकरध्वज. २७ मुखरूपी नावेत. २८ राक्षसांच्या नगरीस. २९ वज्रासारखीं दृढ दरवाजाचीं झडपें. ३० झरोखा, छिद्र. ३१ धुतलें.

झडकरी येऊं द्या ॥ ९९ ॥ मग भरोनि विशाळ पात्रें ॥ अन्नें ओतिती एकसरें ॥ जय जय देवी म्हणोनि गजरें ॥ असुर सर्व गर्जती ॥ १०० ॥ सव्य अपसव्य हस्तेंकरूनी ॥ स्वाहा करीत रुद्ररूपिणी ॥ जैसा दावाग्नि चेतला वनीं ॥ तो नाना काष्ठें भक्षीत ॥ १ ॥ पंचभक्ष्य परमान्न ॥ बहुत रंगाचें ओदन ॥ शाखा लवणशाखा आणोन ॥ असंख्यात रिचविती ॥ २ ॥ दधि दुग्ध घृत नवनीत ॥ यांचे पाट सोडिले बहुत ॥ जैशा वर्षाकाळीं सरिता धांवत ॥ समुद्रासी भेटावया ॥ ३ ॥ पूजारे लोहदंडें घेउनी ॥ मोकळी करिती तेव्हां नव्हेणी ॥ प्रसाद बाहेर यावा म्हणोनी ॥ प्रयत्न करिती बहुसाल ॥ ४ ॥ तंव तेथें देवी बैसली भयभीत ॥ तिजवरी लोहदंड आदळत ॥ ती म्हणे संकट बहुत ॥ मज येथें ओढवलें ॥ ५ ॥ असुरीं आणिले दशरथसुत ॥ नैवेद्य ग्रासितो हनुमंत ॥ मज ताडण होय येथ ॥ कोणासी अनर्थ सांगों हा ॥ ६ ॥ असो नाहाणी मोकळी करिती असुर ॥ परी कांहींच न ये बाहेर ॥ म्हणती आजि देवीनें समग्र ॥ ग्रासिलें हाचि निर्धार पैं ॥ ७ ॥ वृद्ध वृद्ध असुर बोलत ॥ कैंची देवी मांडिला अनर्थ ॥ इंहीं चोरूनि आणिला रघुनाथ ॥ बरवा अर्थ दिसेना ॥ ८ ॥ रावणें चोरिली सीता सुंदर ॥ तेथें अकस्मात आला एक वानर ॥ तेणें नगर जाळूनि समग्र ॥ केला संहार बहुतांचा ॥ ९ ॥ तैसेंच मांडलें येथ ॥ ऐसें बोलोनि बुद्धिवंत ॥ निजस्थानासीं त्वरित ॥ जाते जाहले ते काळीं ॥ ११० ॥ असो इकडे अन्नाचे पर्वत ॥ ओतितां असुर भागले समस्त ॥ परी देवी नव्हेच तृप्त ॥ पुरे न म्हणे सर्वथा ॥ ११ ॥ मग घातलें शुद्ध जळ ॥ सर्वेंचि अर्पिले तांबूल ॥ तेव्हां हांक फोडूनि प्रबळ ॥ रुद्ररूपिणी बोलतसे ॥ १२ ॥ म्हणे मी तुष्टल्यें आजि पूर्ण ॥ तुम्हांसी अक्षयपद देईन ॥ तुम्ही आणि लंकापति रावण ॥ करीन समान दोहींचें ॥ १३ ॥ माझी प्रसन्नता लवलाह्या ॥ आतांच येईल प्रत्यया ॥ ऐसे शब्द देवीचे परिसोनियां ॥ शाहाणे चालिले गृहासी ॥ १४ ॥ देवी म्हणे या-उपरी ॥ राम सौमित्र आणा झडकरी ॥ सगळेचि घाला देउळाभीतरीं ॥ याउपरी कौतुक पाहा ॥ १५ ॥ सच्चिदानंद रघुवीर ॥ ज्याचिया स्वरूपा नाहीं पार ॥ जो वेदशास्त्रांसीं अगोचर ॥ त्यास गिळीन सगळाचि ॥ १६ ॥ ऐसे शब्द देवीचे ऐकोन ॥ हर्षले अहिमही दोघे-जण ॥ वीस असुर चालिले घेऊन ॥ रामलक्षमण आणावया ॥ १७ ॥ रविकुळींचीं निधानें दोन्ही ॥ ठेविलीं नागपाशीं आकर्षूनी ॥ तीं सोडोनियां ते क्षणीं ॥ रथासी दृढ बांधिले ॥ १८ ॥ मग काढिलें मोहनास्त्र ॥ सावध जाहले रामसौमित्र ॥ राजीवाक्ष उघडीं नेत्र ॥ तों सभोंवते असुर दाटले ॥ १९ ॥ श्रीराम सौमित्रासी बोले ॥ बा रे शत्रूंनीं आपणासी आणिलें ॥ आमुचे धनुष्यबाण हिरोनि नेले ॥ रथीं बांधिलें दृढ आम्हां ॥ १२० ॥ जानकीसारिखें चिद्रत्न ॥ गेलें दुःखसागरीं बुडोन ॥ भरत त्यागील आतां प्राण ॥ हें वर्तमान जातांचि ॥ २१ ॥ कौसल्या सुमित्रा दोघीजणी ॥ प्राण देतील ऐकतांक्षणीं ॥ वसिष्ठादि महामुनी ॥ दुःखचक्रीं पडतील ॥ २२ ॥ बिभीषण सुग्रीव हनुमंत ॥ नळ नीळ अंगद जांबुवंत ॥ माझे प्राणसखे समस्त ॥ प्राण देतील ऐकतां ॥ २३ ॥ देव समस्त बंदीं पडले ॥ त्यांचे

३२ पेटका. ३३ अर्पिती. ३४ लोणी. ३५ मोरी. ३६ पानसुपारीचा विडा. ३७ ज्यास नाश नाहीं तें. ३८ प्रत्यक्ष न दिसणारा. ३९ अस्त्रविशेष, नागाकृति एक बंधनाचें साधन.

धैर्यदुर्ग आजि खचले ॥ क्षुधित पात्रावरूनि उठविले ॥ तैसें झाले देवांसी ॥ २४ ॥ आतां असावें धैर्य धरून ॥ जरी संकटीं पावेल उमारमण ॥ तरी हें क्षणमात्रें विघ्न ॥ निरसोनि जाईल सौमित्रा ॥ २५ ॥ जो साक्षात रुद्रावतार ॥ तो आमुचा हनुमंत साचार ॥ येथें जरी पातला सत्वर ॥ तरी असुर संहरिता ॥ २६ ॥ साक्षात शेष नारायण ॥ अवतारी पुरुष रामलक्ष्मण ॥ समयासारिखें वर्तमान ॥ दावेती स्वूण जाणिजे ॥ २७ ॥ असो राक्षसीं रामसौमित्र ॥ रथीं बांधिले दृढ सत्वर ॥ सिंदूरवर्ण पुष्पहार ॥ गळां घातले तेधवां ॥ २८ ॥ वरी उधळिती शेंदूर ॥ पुढें होतसे वाद्यांचा गजर ॥ नम शस्त्रें करून समग्र ॥ असुर हांका फोडिती ॥ २९ ॥ चालविले तेव्हां मिरवत ॥ तंव नगरलोक आले समस्त ॥ पाहावया श्रीरघुनाथ ॥ एक चढती गोपुरीं ॥ १३० ॥ देखतां दोघे सुकुमार ॥ लोकांसी न घरवे गहिंवर ॥ नेत्रीं स्रवों लागलें नीर ॥ हाहाकार जाहला ॥ ३१ ॥ नरनारी आक्रंदत ॥ एकचि वर्तला आकांत ॥ चराचर जीव समस्त ॥ पाहूनि रघुनाथ शोक करिती ॥ ३२ ॥ तीन प्रदक्षिणा करून ॥ देउळीं आणिले दोघेजण ॥ देवीचीं कपाटें उघडून ॥ आंत लोटोनि दीघले ॥ ३३ ॥ कपाटें देऊनि पुढतीं ॥ राक्षस गोंधळ घालिती ॥ हातीं दिवट्या घेऊनि नाचती ॥ मद्य प्राशिती उन्मत्त ॥ ३४ ॥ इकडे देउळांत रामलक्ष्मण ॥ पाहती देवीसी विलोकून ॥ तंव तिनें पसरिलें वदन ॥ मुख जेंसें काळाचें ॥ ३५ ॥ हांक दीधली भयंकर ॥ म्हणे तुम्ही दोघे राजपुत्र ॥ तुम्हांसी गिळीन सत्वर ॥ तरी स्मरण करा कुळदैवत ॥ ३६ ॥ तुमचा प्राणसखा असेल पाहीं ॥ त्यासी चिंतावें देहांतसमयीं ॥ यावरी तो जैनकजांवई ॥ काय बोलता जाहला ॥ ३७ ॥ जरी अनर्थीं पडिले भक्त ॥ तरी माझें स्मरण करीत ॥ तो मी आजि रघुनाथ ॥ संकटीं स्मरूं कोणासी ॥ ३८ ॥ तरी माझिया प्राणांचा प्राण ॥ जिवलग सखा वायुनंदन ॥ तो असता तरी विघ्न ॥ कदा न लागतें आम्हांसी ॥ ३९ ॥ आतां मारुतीऐसा स्नेह विशेष ॥ माये तूंचि करीं कां आम्हांस ॥ कीं जननी पाळी बाळकांस ॥ प्रीति बहुत धरूनियां ॥ १४० ॥ ऐकतां रघुपतीचें वचन ॥ कपीचे नेत्रीं लोटलें जीवन ॥ स्फुंदस्फुंदोनि वायुनंदन ॥ धरी चरण रामाचे ॥ ४१ ॥ तेणें नयनोदकेंकरून ॥ प्रक्षाळिले रामचरण ॥ मग तो सीताशोकहरण ॥ रूप आपुलें प्रकट करी ॥ ४२ ॥ दृष्टीं देखतां हनुमंत ॥ प्रेमे दाटला रघुनाथ ॥ उठोनि हृदयीं आलिंगीत ॥ काय दृष्टांत देऊं तेथें ॥ ४३ ॥ कवींनीं तर्क केले बहुत ॥ परी त्या सुखास नाहीं दृष्टांत ॥ पाठिराखा कैवारी भक्त ॥ मारुतीऐसा नव्हेचि ॥ ४४ ॥ मारुतीस म्हणे रघुवीर ॥ म्यां घेतले अनंत अवतार ॥ परी तुझे न विसरें उपकार ॥ कल्पांतींही हनुमंता ॥ ४५ ॥ तुझिया उपकारा नाहीं मिती ॥ काय काय आठवूं मारुती ॥ असो यावरी ऊर्मिलापती ॥ हनुमंतासी भेटला ॥ ४६ ॥ श्रीराम म्हणे हनुमंता ॥ कैसे शत्रु वधावे आतां ॥ येरू म्हणे तुम्हीं चिंता ॥ न करावी कांहीं मानसीं ॥ ४७ ॥ तुम्ही मागें असा लपोन ॥ एकेक असुर बोलावून ॥ तयांचीं शिरें छेदून ॥

४० उंच माडीवर. ४१ सजीव व निर्जीव जें सर्व पदार्थमात्र तें. ४२ बंद करून. ४३ भीषम. ४४ मारुती. ४५ लक्ष्मण.

करीन चूर्ण येथेंचि ॥ ४८ ॥ राम म्हणे माझे धनुष्यबाण ॥ जरी देशील मज आणून ॥ तरी हे असुर संहारीन ॥ क्षणमात्र न लागतां ॥ ४९ ॥ तंव बोले वायुनंदन ॥ मी मारीन अहिरावण ॥ मग कपाटें उघडोन ॥ महीरावण वधा तुम्ही ॥ १५० ॥ तेव्हां गुप्तरूपें हनुमंतें जाऊन ॥ दोघांचे आणिले धनुष्यबाण ॥ पाठीसी लपवूनि रामलक्ष्मण ॥ आपण देवी होऊनि बैसला ॥ ५१ ॥ मग म्हणे अहिरावण ॥ तूं आधीं घेईं माझ्या दर्शना ॥ ऐकतांचि ऐशा वचना ॥ येरू प्रवेशे देऊळीं ॥ ५२ ॥ जैसा पंचाननाचे दरींत ॥ वारण प्रवेशे उन्मत्त ॥ कीं व्याघ्राचिये जाळींत ॥ मृग अकस्मात संचरे ॥ ५३ ॥ कीं भुजंगाचे बिळीं देख ॥ प्रवेशला जैसा मूषक ॥ कीं मरण नेणोनि पतंग ॥ ५४ ॥ दीपासी भेटों पातला ॥ ५४ ॥ तैसा प्रवेशे अहिरावण ॥ भयानक देवी देखोन ॥ धाकें धाकेंचि नमन ॥ करिता जाहला तेधवां ॥ ५५ ॥ देवीचरणीं मस्तक ठेविला ॥ देखोनि महारुद्र क्षोभला ॥ असुर पायीं रगडिला ॥ शतचूर्ण केला मस्तक ॥ ५६ ॥ हस्त पाद झाडी ते क्षणीं ॥ तेणें दणाणली मंगळजननी ॥ तो दणाण भयंकर ऐकोनी ॥ शाहाणे उठोनि पळाले ॥ ५७ ॥ अहिरावणाचा गेला प्राण ॥ मग महिरावण बोले वचन ॥ म्हणे चार घटिका जाहल्या पूर्ण ॥ बंधु बाहेरी न येचि ॥ ५८ ॥ काय तो पहावया वृत्तांत ॥ पूजारी जाय देउळांत ॥ तयाचा दादयादही जात ॥ त्याचे पाठीं हळू हळू ॥ ५९ ॥ देउळीं अन्नप्रसाद समूळ ॥ तोच अवघा पैं नेईल ॥ म्हणोनियां उतावेळ ॥ तो देउळीं प्रवेशला ॥ १६० ॥ पुढील काळें ओढिला ॥ देवी नमावया गेला ॥ मेंकुणप्राय रगडिला ॥ पायांतळीं हनुमंतें ॥ ६१ ॥ ऐसें देखोनि विपरीत ॥ दुसरा चळचळां कांपत ॥ म्हणे हा होय हनुमंत ॥ लंका जेणें जाळिली ॥ ६२ ॥ अंगीं मुरकुंडी वळोन ॥ दारांत आपटला येऊन ॥ दोन्ही हस्तेंकरून ॥ शंख करी आकोशें ॥ ६३ ॥ म्हणे जेणें लंका जाळिली ॥ तोच काळ बैसला देउळीं ॥ देवी मोरींत दांटिली ॥ पूजा घेतली सर्व तेणें ॥ ६४ ॥ पूजारियासहित अहिरावण ॥ यमपुरीस पाठविला पूर्ण ॥ पिशिताशन नाम ऐकतां जाण ॥ पळों लागले चहूंकडे ॥ ६५ ॥ राक्षसां जाहला आकांत ॥ एक एकांतें धरूनि हनुमंत ॥ तेथेंचि पाववी मृत्य ॥ दिशा लंघोनि एक जाती ॥ ६६ ॥ मग शस्त्रें कवचें बांधोन ॥ सेनासागर एकवटून ॥ सिद्ध जाहला महिरावण ॥ युद्धालागीं ते काळीं ॥ ६७ ॥ म्हणे बाहेर येईं रे मर्कटा ॥ कोठें प्रवेशलासी महाधीटा ॥ आजि मृत्युपुरींचिया वाटा ॥ रामासहित लावीन तूतें ॥ ६८ ॥ तों देउळामाजी वायुपुत्र ॥ स्कंधीं घेत राम सौमित्र ॥ कीं ते विष्णु कर्पूरगौर ॥ एका वहनीं बैसले ॥ ६९ ॥ कीं शशी आणि दिनपती ॥ बैसले दिसती एकरथीं ॥ कीं इंद्र आणि वाचस्पती ॥ एकवाहनीं आरूढले ॥ १७० ॥ तैसे दोघे स्कंधीं घेऊन ॥ बाहेर निघे वायुनंदन ॥ पादप्रहारेंकरून ॥ कपाटें फोडिलीं तत्काळीं ॥ ७१ बाहेर प्रकटतां तत्काळ ॥ पुच्छें उडवूनियां देऊळ ॥ आकाशीं भिरकाविलें सकळ ॥ जेवीं बाळ कंदुक टाकी ॥ ७२ ॥ देवालय विदारूनी ॥ देवीसहित समुद्रजीवनीं ॥ टाकितां राक्षसीं

४६ दरवाजे. ४७ सिंहाचे. ४८ हत्ती. ४९ द्रव्याचा विभाग घेणारा भाईबंद. ५० ढेकणासारखा. ५१ चोंदून ठेविली. ५२ राक्षस. ५३ खाटेस. ५४ शंकर. ५५ चेंडू.

मिळूनी ॥ अंजनीतनय वेढिला ॥ ७३ ॥ खालीं राम सौमित्र उतरले ॥ श्रीरामें कोदंड चढविलें ॥ अचळ ठाण मांडिलें ॥ बाण लाविला चापासी ॥ ७४ ॥ महिरावणास म्हणे रघुनंदन ॥ कपटिया साहें माझे बाण ॥ तुझी वाट पाहतो अहिरावण ॥ तुज धाडीन त्याजपासीं ॥ ७५ ॥ तों राक्षसें धनुष्य ओढून ॥ रामावरी सोडिले बाण ॥ रघुनाथें शिर छेदोन ॥ क्षणमात्रें टाकिलें ॥ ७६ ॥ नरवीरश्रेष्ठ रघुनंदन ॥ मेंहीवरी सोडीत शत बाण ॥ त्याचे ललाटीं जाऊन ॥ एकपंक्तीं बैसले ॥ ७७ ॥ परी नवल वर्तलें अद्भुत ॥ रुधिरबिंदु खालीं पडत ॥ त्याचे महिरावण होत ॥ एकसारिखे सर्वही ॥ ७८ ॥ लक्षांच्या लक्ष महिरावण ॥ त्यांवरी राम टाकी बाण ॥ त्यांचिया रक्तबिंदूंपासून ॥ कोट्यनुकोटी निपजती ॥ ७९ ॥ तितकेही रामावरी असुर ॥ करिते जाहले शस्त्रमार ॥ मग घायें टाळीत रघुवीर ॥ चकित पाहे चहूंकडे ॥ १८० ॥ मग बोले चापपाणी ॥ वैरी वधावे शस्त्रेंकरूनी ॥ तंव आगळेचि होती ते क्षणीं ॥ न कळे करणी कैसी हे ॥ ८१ ॥ तंव तो निर्वाणींचा भक्त ॥ वज्रदेही वीर हनुमंत ॥ दृष्टीं देखोनि विपरीत ॥ चिंताक्रांत पडियेला ॥ ८२ ॥ मग तो लोकप्राणेशनंदन ॥ मगरीपासीं आला उठोन ॥ तीस पुसे वर्तमान ॥ समूळ महिरावणाचें ॥ ८३ ॥ ती म्हणे रंभा देवांगना ॥ जात होती इंद्रभुवना ॥ तंव भृगुऋषि जाणा ॥ तिनें अकस्मात देखिला ॥ ८४ ॥ त्यासी नाहीं केलें नमन ॥ म्हणे हा कुरूप वृद्ध ब्राह्मण ॥ तंव तो महाराज तपोधन ॥ दीधला शाप दारुण तीतें ॥ ८५ ॥ म्हणे तूं सर्पिणी होऊनी ॥ विचरें सदा घोरवनीं ॥ धांवून येरी लागे चरणीं ॥ म्हणे मज उच्छाप देइंजे ॥ ८६ ॥ येरू म्हणे तूं होशील सर्पिणी ॥ क्षण एक दिससी पद्मिणी ॥ एकदां सूर्यरेत पडतांक्षणीं ॥ जाशी उद्धरून निजपदा ॥ ८७ ॥ मग अहिरूप हिंडे वनीं ॥ क्षण एक जाहली असे पद्मिणी ॥ तों सूर्याचें वीर्य वरूनी ॥ अकस्मात वर्षलें ॥ ८८ ॥ अहीचे मुखीं वीर्य पडत ॥ तो अहिरावण जाहला अद्भुत ॥ महीवरी पडलें जें रेत ॥ महिरावण तोचि जाहला ॥ ८९ ॥ रंभा गेली उद्धरून ॥ परी रक्तबिंदूचे होती महिरावण ॥ हें चंद्रसेनेस वर्तमान ॥ जाऊनियां पुसावें ॥ १९० ॥ अहिरावणाची पत्नी ॥ चंद्रसेना ते सत्यवचनी ॥ हें हनुमंतें ऐकोनी ॥ उडे गगनीं अकस्मात ॥ ९१ ॥ महिकावतीस येउनी ॥ प्रवेशला तेव्हां राजसदनीं ॥ तों चंद्रसेना बैसली ध्यानीं ॥ चापपाणी आठवीत ॥ ९२ ॥ दृष्टीं देखोनि रघुवीर ॥ तीस वाढला कामज्वर ॥ म्हणे श्रीरामाऐसा भ्रतार ॥ जन्मोजन्मीं भोगावा ॥ ९३ ॥ त्याचि वेधेंकरून जाण ॥ तीस लागलें श्रीरामध्यान ॥ सकळ विसरली देहभान ॥ गुंतलें मन राघवीं ॥ ९४ ॥ तंव तीजवळी आला हनुमंत ॥ बळें हस्तटाळिया वाजवीत ॥ येरी नेत्र उघडोनि पाहत ॥ तंव तो रामदूत देखिला ॥ ९५ ॥ हनुमंत करूनि नमन ॥ सांगे सर्व वर्तमान ॥ पुराणपुरुष रघुनंदन ॥ परम संकटीं पडिलेला ॥ ९६ ॥ येरी म्हणे हें वर्तमान ॥ तुज अवघें मी सांगेन ॥ माझा मनोरथ पूर्ण ॥ जरी तूं सिद्धी पावविसी ॥ ९७ ॥ रामप्रिय

५६ महिरावणावर. ५७ त्यांचे प्रहार. ५८ भयंकर. ५९ स्त्रियांच्या चार प्रकारच्या जातींतील एक. ६० विष्णु, आदिनारायण.

म्हणे अवश्य ॥ येरी म्हणे देईं भाष ॥ पुढील कार्य जाणोनि विशेष ॥ प्रमाण[61] दिधलें हनुमंतें ॥ ९८ ॥ येरी म्हणे ऐक वचन ॥ सुरतसुखें रघुनंदन ॥ एकदां तरी भोगीन ॥ म्हणोनि भाष घेतली ॥ ९९ ॥ आतां रामासी होईल जय प्राप्त ॥ तो ऐका सावध वृत्तांत ॥ महिरावणें तप अद्भुत ॥ करूनि शिव तोषविला ॥ २०० ॥ हा वर मागितला त्वरित ॥ युद्धसमयीं वर्षावें अमृत ॥ ऐक्य होतां सुधारसरक्त ॥ उद्भवती महिरावण ॥ १ ॥ भ्रमरमाळा शिवकंठीं ॥ ते मिलिंद पाताळा जाती उठाउठी ॥ अमृत चंचू भरूनि वृष्टी ॥ रक्तावरी करिती त्या ॥ २ ॥ एकत्र होतां रक्त अमृत ॥ महिरावण निपजती तेथ ॥ ऐसें ऐकतांचि हनुमंत ॥ पाताळ धुंडीत गेला असे ॥ ३ ॥ तों अमृतकुंड परम गहन ॥ तेथें लोकपाळांचें रक्षण ॥ तें तोडीत वायुनंदन ॥ अमृताजवळी पातला ॥ ४ ॥ तों चंचू भरूनि अपार ॥ असंख्यात जाती भ्रमर ॥ पर्वताऐसें तयांचें शरीर ॥ केले चूर सर्वही ॥ ५ ॥ त्यांमाजी श्रेष्ठ भ्रमर ॥ मेरुपर्वताऐसें त्याचें शरीर ॥ क्रोधें धांविन्नला सत्वर ॥ वायुकुमर लक्ष्मणियां ॥ ६ ॥ हनुमंतें मुष्टिघात दीधला ॥ भ्रमर पृथ्वीवरी पाडिला ॥ पक्ष उपडितां ते वेळां ॥ काकुळती आला मारुतीसी ॥ ७ ॥ मज देईं प्राणदान ॥ मी तुझ्या कार्यासी येईन ॥ हनुमंतें भाष[62] घेऊन ॥ तेव्हां भ्रमर सोडिला ॥ ८ ॥ सवेंच उडाला तेथून ॥ राघवाजवळी येऊन ॥ म्हणे आतां ब्रह्मास्त्र घालोन ॥ वैरी एकदांचि आटावे ॥ ९ ॥ ऐसें बोलतां वायुसुत ॥ रघुनाथ बाणीं ब्रह्मास्त्र स्थापीत ॥ शर सुटतांच समस्त ॥ भस्म जाहले महिरावण ॥ २१० ॥ जैसी होतां ब्रह्मप्राप्ती ॥ संसारदुःखें वितळती ॥ कीं उगवतां गभस्ती[63] ॥ जेवीं लपती तारागणें ॥ ११ ॥ तैसें सुटतां ब्रह्मास्त्र ॥ मुख्य रूपसहित असुर ॥ भस्म जाहले समग्र ॥ जयजयकार सुर करिती ॥ १२ ॥ पडली हाक मुख्य धुरें[64] ॥ पळों लागले ते असुर ॥ हनुमंतें पुच्छ समग्र ॥ सेनेभोंवतें वेष्टिलें ॥ १३ ॥ मग लोहांर्गळा[65] घेउनी ॥ सैन्य झोडी तये क्षणीं ॥ कित्येक अंतरिक्ष उडोनी ॥ राक्षस पळती तेधवां ॥ १४ ॥ तों वरून पुच्छें सत्वर ॥ बांधिले सर्व निशाचर ॥ सागरीं बुडविले समग्र ॥ पुच्छें घुसळूनि आणिले ॥ १५ ॥ एक जाती दिशा लंघून ॥ तों पुच्छ येत तिकडून ॥ ब्रह्मांड व्यापिलें संपूर्ण ॥ पुच्छेंकरूनि हनुमंत[66] ॥ १६ ॥ मारुति केवळ ईश्वर ॥ त्याचे पुच्छासी नाहीं पार ॥ ब्रह्मांडाबाहेरून समग्र ॥ आढेवेढे करी पुच्छ ॥ १७ ॥ असो दश दिशा धुंडोन ॥ पुच्छें असुर आणिले ओढून ॥ महिकावतीस जाऊन ॥ पुच्छ रिघे घरोघरीं ॥ १८ ॥ पुरुष ओढोनि काढी बाहेरी ॥ अर्गळाघायें चूर्ण करी ॥ भ्रतारा लपवोनि नारी ॥ दारीं उभ्या राहाती ॥ १९ ॥ परी पुच्छ न सोडी साचार ॥ गूढ स्थळाहून काढी असुर ॥ आक्रांत वर्तला थोर ॥ सांगती हेरें[67] चंद्रसेनेसी ॥ २२० ॥ ती म्हणे घाला जानकीची आण ॥ तेणें निरसेल हें विघ्न ॥ मग त्याचि युक्ती करून ॥ जन सकळ वांचले ॥ २१ ॥ जयजयकार करून सुर ॥ वर्षती पुष्पसंभार ॥ रामसौमित्र वायुकुमर ॥ एके ठायीं मिळाले ॥ २२ ॥ शत्रुक्षयाचें कारण ॥ कैसा निमाला महिरावण ॥ सौमित्रासी म्हणे सीतारमण ॥ तेणें प्रत्युत्तर दीधलें ॥ २३ ॥ म्हणे हनुमंतें जाऊन ॥ शत्रु-

६१ प्रतिज्ञेचा खरा शब्द, ६२ भाक, प्रमाण. ६३ सूर्य. ६४ धुरेसारखा मुख्य आधार. ६५ दाराचा लोखंडी अडसर. ६६ विवक्षित स्थळीं वर्तमान कळविणारे दूत.

क्षय होय पूर्ण ॥ तें साधून आला कारण ॥ त्यास वर्तमान पुसा हें ॥ २४ ॥ मग मारुतीचे गळां सप्रेम ॥ मिठी घाली श्रीराम ॥ तंव तो चिंताचक्रीं परम ॥ पडला असे मारुती ॥ २५ ॥ मग राम म्हणे प्राणसखया ॥ कां मुख गेलें उतरोनियां ॥ तें मज सांग लवलाह्या ॥ म्हणोन वदन कुरवाळिलें ॥ २६ ॥ मग हनुमंत वर्तमान ॥ रामासी सांगे मुळींहून ॥ चंद्रसेनेसी भाँषदान ॥ दृढ देउनि मी आलों ॥ २७ ॥ ऐकोनि हांसे रामचंद्र ॥ म्हणे बा रे तूं चातुर्यसमुद्र ॥ मी एकपत्नीव्रती वीर ॥ हें तुज काय न ठाउकें ॥ २८ ॥ तुझी भाष नव्हे अप्रमाँण ॥ मजही न गमे दुर्व्यसन ॥ तूं चैंतुरमुकुटरत्न ॥ युक्ति करून वारीं हें ॥ २९ ॥ मग चंद्रसेनेच्या गृहाप्रती ॥ आला तत्काळ मारुती ॥ म्हणे आणितों अयोध्यापती ॥ मंचँक दृढ घालीं कां ॥ २३० ॥ चंद्रसेना हर्षली चित्तीं ॥ दृढ मंचक घातला एकांतीं ॥ सुँमनसेज रचूनि युक्तीं ॥ नाना उपभोग ठेविले ॥ ३१ ॥ मग बोले हनुमंत ॥ मंचक मोडतां अकस्मात ॥ तरी न बैसे रघुनाथ ॥ बोल मग मज नाहीं ॥ ३२ ॥ चंद्रसेना म्हणे हनुमंता ॥ मंचक न मोडे हा तत्त्वतां ॥ मग जो भ्रमर रक्षिला होता ॥ तो आणिला गुप्तरूपें ॥ ३३ ॥ रंभाँपत्रप्रमाण पूर्ण ॥ मंचक आंत अवघा दे कोरून ॥ तेणें तत्काळ आज्ञा वंदून ॥ तैसाचि केला ते काळीं ॥ ३४ ॥ चंद्रसेनेच्या गृहीं सत्वर ॥ हनुमंतें आणिला रघुवीर ॥ मंचकीं बैसतां जगदुद्धार ॥ तत्काळ चूर्ण जाहला ॥ ३५ ॥ उठोनि चालिला रघुनंदन ॥ येरी विलोकी दीनवदन ॥ वाँयुसुताकडे पाहून ॥ चंद्रसेना बोलतसे ॥ ३६ ॥ म्हणे कपटी तूं वानर देख ॥ तुवांचि कोरविला मंचक ॥ शेवटीं नेतोसी रघुनायक ॥ मनोरथ माझे न पुरतां ॥ ३७ ॥ मी तुज शाप देईन आतां ॥ ऐकतां कृपा उपजली रघुनाथा ॥ हस्त ठेवीत तिचे माथां ॥ म्हणे चिंता न करावी ॥ ३८ ॥ माझी ध्यानमूर्ति सुंदर ॥ हृदयीं भोगीं निरंतर ॥ पुढें सत्यभामा चतुर ॥ कृष्णावतारीं होसी तूं ॥ ३९ ॥ ऐसें बोलतां रघुनाथ ॥ ती तेथेंचि जाहली समाधिस्थ ॥ पुढें महिकावर्तीत नृपनाथ ॥ मकरध्वज स्थापिला ॥ २४० ॥ स्कंधीं वाहून रामलक्ष्मण ॥ हनुमंतें केलें उड्डाण ॥ नळ नीळ अंगद जांबुवंत पूर्ण ॥ तेही पुढें भेटले ॥ ४१ ॥ जैसा उदय पावे आदित्य ॥ तैसा सुवेळेसी येत हनुमंत ॥ बिभीषण आणि किष्किंधानाथ ॥ सामोरे धांवती दळभारेंसीं ॥ ४२ ॥ सप्रेमें सुग्रीव बिभीषण ॥ आले हनुमंतासी देखोन ॥ म्हणती बा रे हा देह ओंवाळून ॥ तुजवरून टाकावा ॥ ४३ ॥ सुग्रीव आणि बिभीषण ॥ आश्चर्य करिती दोघेजण ॥ म्हणती धन्य धन्य वायुनंदन ॥ भरिलें त्रिभुवन प्रतापें ॥ ४४ ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ सर्वांसी भेटला रघुवीर ॥ हनुमंताचा प्रताप समग्र ॥ राजीवनेत्र स्वयें वर्णी ॥ ४५ ॥ या ब्रह्मांडमंडपांत ॥ मारुतीऐसा नाहीं भक्त ॥ याचे प्रतापें आम्ही समस्त ॥ वानर धन्य जाहलों ॥४६ ॥ ब्रह्मानंद म्हणे श्रीधर ॥ अग्निपुराणीं हे कथा सुंदर ॥ बोलिला सत्यवतीकुमर ॥ तेंचि सार कथियेलें ॥ ४७ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत पंडित चतुर ॥ एकत्रिंशत्तमोध्याय गोड हा ॥ २४८ ॥ अध्यायः ॥ ३१ ॥

६७ श्रीरामाला तुह्यापाशीं आणतों ह्मणून वचन. ६८ मिथ्या. ६९ एकपत्नीव्रतभंग. ७० शाह्याण्यांत शिरोमणि. ७१ पलंग. ७२ पुष्पशय्या. ७३ केळीच्या पानासारखा. ७४ मारुतीकडे.

३२



॥ श्रीगणेशाय नमः ॥ भक्तवत्सल त्रिभुवनेश्वर ॥ सुवेळाचळीं रणरंगणधीर ॥ जैसा निरभ्र नभीं पूर्णचंद्र ॥ तैसा रघुवीर शोभतसे ॥ १ ॥ रावणासी कळला समाचार ॥ करूनि अहिमहींचा संहार ॥ सुवेळेसी आला रघुवीर ॥ गर्जती वानर जयजयकारें ॥ २ ॥ रावण परम चिंताक्रांत ॥ हृदयीं आठवला इंद्रजित ॥ तळमळ वाटे मनांत ॥ म्हणे काय व्यर्थ वांचोनि ॥ ३ ॥ दीपेंविण जैसें सदन ॥ कीं नासिकाविण वदन ॥ कीं बुबुळाविण नयन ॥ व्यर्थ जैसे न शोभती ॥ ४ ॥ इंद्रजिताविण लंका ॥ तैसी शून्य दिसे देखा ॥ ऐसें बोलतां राक्षसनायका ॥ आवेश बहुत चढियेला ॥ ५ ॥ म्हणे लंकेमाजी दळ ॥ अवघें सिद्ध करा सकळ ॥ ऐसी आज्ञा होतां प्रबळ ॥ रणतुरें वाजों लागलीं ॥ ६ ॥ सवें निघाले उरले प्रधान ॥ जैसा भगणीं वेष्टिला रोहिणीरमण ॥ चतुरंगदळेंसीं रावण ॥ लंकेबाहेर निघाला ॥ ७ ॥ पादातिदळ अश्व रथ ॥ यांचें कोण करील गणित ॥ पर्वतासमान गज अद्भुत ॥ कोट्यनुकोटी चालिले ॥ ८ ॥ सहस्र सूर्यांचें तेज लोपत ॥ तैसा रावणाचा मुख्य रथ ॥ त्यावरी शस्त्रास्त्रमंडित ॥ लंकानाथ बैसला ॥ ९ ॥ रणासी आला दशकंधर ॥ देखतां क्रोधावले वानर ॥ घेऊन शिळा तरुवर ॥ हांका देत धांविन्नले ॥ १० ॥ रावणें चापासी लावूनियां गुण ॥ करिता जाहला घोर संधान ॥ वानरीं अरिसैन्यावरी पर्जन्य ॥ पर्वतांचा पाडिला ॥ ११ ॥ असंख्यात सोडिले बाण ॥ तितुकेही पर्वत फोडून ॥ यर्वपिष्टवत करून ॥ सैन्याबाहेर पाडिले ॥ १२ ॥ चपळेहून बाण तीक्ष्ण ॥ दशमुखें सोडिले दारुण ॥ सोडोनि संग्रामाचें ठाण ॥ वानरगण माघारले ॥ १३ ॥ ऐसें देखोनि रणरंगधीर ॥ अयोध्यानाथ प्रचंड वीर ॥ कोदंड चढवून सत्वर ॥ लाविला शर ते काळीं ॥ १४ ॥ अग्नीसीं झगटला कर्पूर ॥ मग उगा न राहे वैश्वानर ॥ वृषभ चालोन येतां व्याघ्र ॥ सहसा स्थिर न राहे ॥ १५ ॥ तैसा प्रतापार्क रघुनंदन ॥ विषकंठवंद्य जगन्मोहन ॥ दशकंठासी लक्षून ॥ सोडिले बाण ते काळीं ॥ १६ ॥ असंभाव्य रामाचे बाण ॥ सुटले अमोघ चापापासून ॥ जैसे चतुराचे मुखांतून ॥ अपार शब्द निघती पैं १७ ॥ कीं मेघाहून अवघारा ॥ अपार पडती तोयधारा ॥ किंवा ओंकारापासूनि अपारा ॥ ध्वनि जैसे उमटती ॥ १८ ॥ कीं मूळमायेपासूनि एकसरें ॥ असंख्य जीवसृष्टि उभारे ॥ तैसा एक बाणापासूनि त्वरें ॥ असंख्य शर निघती पैं ॥ १९ ॥ सुटतां अद्भुत प्रभंजन ॥ जलदजाल जाय वितळोन ॥ तैसे राक्षस छिन्नभिन्न ॥ बहुत जाहले ते काळीं ॥ २० ॥ ऐसें देखतां दशकंधरें ॥ प्रेरिलीं तेव्हां असंख्य शस्त्रें ॥ परी तितुकींही राजीवनेत्रें ॥ हेळामात्रें निवारिलीं ॥ २१ ॥ जें जें शस्त्र टाकी दशकंधर ॥ त्याहूनि विशेष रघुवीर ॥ जैसा प्रवृत्तिशास्त्रींचा विचार ॥ वेदांती उडवी एकाच शब्दें ॥ २२ ॥ कीं लहरियांसमवेत सरितापती ॥ एकदांच प्राशी अगस्ती ॥ कीं तिमिरजाळाची वस्ती ॥ उगवतां गंभस्ति जेवीं नुरे ॥ २३ ॥ जैसा मेघ वर्षतां अपार ॥ वणवा विझूनि जाय समग्र ॥ तैसें रामापुढें न चले शस्त्र ॥ दशकंधर तटस्थ पाहे ॥ २४ ॥

१ पायदळ. २ अवांच्या पिठासारखे. ३ विजेहून. ४ ओंकारापासून सर्व अक्षराची व आवाजाची उत्पत्ति होते. ५ मेघसमुदाय ६ रामचंद्राने. ७ सहज. ८ लोकव्यवहारांतील शास्त्रादिकांचा विचार. ९. समुद्र. १० सूर्य.

भूतें चेष्टा बहुत करिती ॥ परी कृतांतासीं न चलती ॥ कीं सुटतां मारुतगती ॥ मेघपडळ केवीं बाधे ॥ २५ ॥ ऐसें देखोनि रावण ॥ कोपारूढ जाहला दारुण ॥ विचारूनि काढिले पांच बाण ॥ कीं ते पंचबाण कृतांताचे ॥ २६ ॥ कीं पंचाग्नीचीं स्वरूपें तत्त्वतां ॥ किंवा पांच काढिल्या विद्युल्लता ॥ लक्षोनियां जनकजामाता ॥ सोडिता जाहला रावण ॥ २७ ॥ राघवें योजिलें निवारण ॥ तों अकस्मात आले पंचबाण ॥ सच्चिदानंदतनु भेदोन ॥ पलीकडे रूतले ॥ २८ ॥ पंचशर भेदोनि गेले ॥ परी रामाचें वज्रठाण न चळे ॥ जैसा पंचबाणाचेनि मेळें[11] ॥ मारुति न ढळे कल्पांतीं ॥ २९ ॥ हाणितां कुठार तीक्ष्ण ॥ वृक्ष न जाय सोडोनि स्थान ॥ कीं वर्षतां अपार घन ॥ अंचळ बैसकौं[13] सोडीना ॥ ३० ॥ निंदक निंदिती अपार ॥ न ढळे साधूचें अंतर ॥ कीं प्रल्हादासी लावितां विखार ॥ परी तो धीर सोडीना ॥ ३१ ॥ तैसें रामठाण अति गंभीर ॥ चळलें नाहीं अणुमात्र ॥ रामासी भेदले पांच शर ॥ म्हणोनि रावण तोषला ॥ ३२ ॥ यावरी राजाधिराज रघुनाथ ॥ परम चतुर रणपंडित ॥ चापासी बाण लावूनि सप्त ॥ दशकंठावरी सोडिले ॥ ३३ ॥ दशमुखाचें हृदय फोडून ॥ पलीकडे लंकेसी गेले सप्त बाण ॥ त्या व्यथेनें रावण ॥ मूर्च्छा येऊन पडों पाहे ॥ ३४ ॥ राघवतनु परम सुकुमार ॥ भेदोनि गेले पंच शर ॥ तें देखोनि सौमित्र ॥ स्नेहेंकरून उचंबळला ॥ ३५ ॥ पाठीसीं घालूनि रघुनंदन ॥ सौमित्र मांडोनि वज्रठाण ॥ सोडोनि अर्धचंद्रबाण ॥ सारथि मारिला रावणाचा ॥ ३६ ॥ आणिक सोडिले दश बाण ॥ दाही धनुष्यें पाडिलीं छेदून ॥ तों पुढें धांवोनि बिभीषण ॥ अष्ट बाण सोडिले ॥ ३७ ॥ रावणारथीं अष्ट तुरंग ॥ बिभीषणें मारिले सवेग ॥ सवेंची एक बाणें अव्यंग ॥ ध्वजेही[14] खालीं पाडिला ॥ ३८ ॥ दुसरा आणोनि स्यंदनें[15] ॥ त्यावरी बैसला रावण ॥ क्षोभला जैसा प्रळयाग्न ॥ तप्त पूर्ण तेवीं जाहला ॥ ३९ ॥ मग ब्रह्मशक्ति[16] परम दारुण ॥ बिभीषणावरी प्रेरी दशानन ॥ अनिवार शक्ति जाणून ॥ लक्ष्मण पुढें जाहला ॥ ४० ॥ जैसें शस्त्र पडतां दारुण ॥ पुढें होय करींचें ओडणें[17] ॥ तैसा तो ऊर्मिलाजीवन[18] ॥ बिभीषणापुढें जाहला ॥ ४१ ॥ शक्ति येत जैसी सौदामिनी[20] ॥ राघवानुजें बाण सोडोनी ॥ गगनीं भाग त्रय करूनी ॥ असुरवाहिनीवैरी[21] पाडिली ॥ ४२ ॥ जैसा अविधीनें जपतां मंत्र ॥ होय जेवीं आपला संहार ॥ तैसी शक्ति पडतां असुर ॥ दग्ध बहुत जाहले ॥ ४३ ॥ शक्ति व्यर्थ गेली जाणोन ॥ बिभीषणासी बोले रावण ॥ सौमित्राचे पाठीसीं दडोन ॥ कां रे संग्राम करितोसी ॥ ४४ ॥ रामासी भेटोनि मूर्खा ॥ संकट भेदावया देखा ॥ दीन वचनें बोलिलासी नेटका ॥ प्राण आपुला रक्षिला ॥ ४५ ॥ आम्ही राक्षस मृगनायक[22] ॥ आम्हांत जन्मलासी तूं जंबुक ॥ कुळाभिमान सांडूनि देख ॥ शरण गेलासी शत्रूतें ॥ ४६ ॥ आम्हीं पाळिलें तुज इतुके दिन ॥ जैसें भस्मांत घातलें अवदानें[23] ॥ किंवा प्रेत शृंगारून ॥ व्यर्थ जैसें मिरविलें ॥ ४७ ॥ कीं नारी सुंदर पद्मिण ॥ षंढासी दिधली नेऊन ॥ तैसें तुझें पाळण ॥ व्यर्थ आम्हीं

११ यमाचे. १२ मद्नाचे. १३ पर्वत. १४ बैठक, जागा. १५ निशाण. १६ रथ. १७ अस्त्रविशेष, ब्रह्मदेवानें दिलेली. १८ ढाल. १९ लक्ष्मण. २० वीज. २१ सेनेचवर. २२ सिंह. २३ आहुता.

केलें रे ॥ ४८ ॥ अरे बिभीषणा शतमूर्खा ॥ वैरियाचा जाहलासी सखा ॥ दीनवचन बोलोनि कीटका ॥ कुळक्षय केला रे ॥ ४९ ॥ बिभीषण म्हणे रे बुद्धिहीना ॥ दशग्रीवा कपटिया मलिना ॥ मी शरण आलों रघुनंदना ॥ जन्ममरणातीत जाहलों ॥ ५० ॥ मीं तुज सांगितलें हित ॥ परी तूं नायकसी उन्मत्त ॥ कुळक्षय जाहला समस्त ॥ तुजही रघुनाथ वधील पैं ॥ ५१ ॥ ऐसें बिभीषण बोलत ॥ रावण जाहला क्रोधयुक्त ॥ करकरां खाऊनि दांत ॥ श्वासोच्छ्वास टाकीतसे ॥ ५२ ॥ तुज राखीतसे सौमित्र ॥ तरी त्यासी करीन चूर ॥ माझा इंद्रजित विजयी पुत्र ॥ येणेंचि गिळिला निकुंभिले ॥ ५३ ॥ अतिकायाऐसें निधान ॥ येणेंचि गिळिलें न लागतां क्षण ॥ तरी या सौमित्राचा आजि प्राण ॥ समरांगणीं घेईन मी ॥ ५४ ॥ ऐसें बोलोनि लंकापती ॥ घगघगित काढिली शक्ति ॥ गवसणी काढितांचि जगतीं ॥ तेज अद्भुत पसरलें ॥ ५५ ॥ कीं उगवले सहस्र मार्तंड[२४] ॥ तैसी शक्ति दिसे प्रचंड ॥ किंवा उभारिला काळदंड ॥ संहारावया विश्वातें ॥ ५६ ॥ कीं प्रळयाग्निशिखा प्रबळ ॥ किंवा कृतांतजिव्हौं[२५] तेजाळ ॥ कीं ती प्रळयमेघांतील ॥ मुख्य चपळा[२६] निवडिली ॥ ५७ ॥ कीं सप्तकोटिमंत्रतेज पाहीं ॥ एकवटलें शक्तीचे ठायीं ॥ ते मर्यें दशग्रीव जांवई ॥ म्हणोनि उचित दीघली ॥ ५८ ॥ ते मयशक्ति काढून पाहीं ॥ कधीं कोणावर घातली नाहीं ॥ ते सौमित्रावरी ते समयीं ॥ रावण प्रेरिता जाहला ॥ ५९ ॥ न्यासासहित जपोनि मंत्र ॥ सोडोनि दिधली सत्वर ॥ नक्षखंडधरित्री अंबर ॥ तडाडलें ते काळीं ॥ ६० ॥ सहस्र विजा कडकडती ॥ तैसी अनिवार धांवे शक्ती ॥ भर्यें व्यापिला सरितापती[२७] ॥ अंग टाकों पाहाती दिग्गज[२८] ॥ ६१ ॥ देव विमानें पळविती ॥ गिरिकंदरीं वानर दडती ॥ एक मूर्च्छा येऊनि पडती ॥ न उठती मागुती ॥ ६२ ॥ दोन्ही दळें भयातुर ॥ पळों लागले महावीर ॥ तों ब्रह्मांडासी देणार धीर ॥ रुद्रावतार धांविन्नला ॥ ६३ ॥ मारुती बळिया जगजेठी ॥ तेणें धरिली वाममुष्टीं ॥ मोडावी तों उठाउठीं ॥ दिव्य स्त्रीरूप जाहली ॥ ६४ ॥ मग ते म्हणे मारुतीसी ॥ ब्रह्मचारी तूं म्हणविसी ॥ परस्त्रियेसीं कां झोंबसी ॥ सोडीं वेगेंसी जाऊं दे ॥ ६५ ॥ मी रावणकन्या साचार ॥ आजि वरीन सौमित्र वीर ॥ सोडीं जाऊं दे सत्वर ॥ मुहूर्तवेळा जातसे ॥ ६६ ॥ मारुति योगी इंद्रियजित ॥ स्त्री म्हणोनि सोडिली अकस्मात ॥ तंव ती जाहली पूर्ववत ॥ प्रळय करीत चालली ॥ ६७ ॥ वानरदळीं मांडला आकांत ॥ देव जाहले भयभीत ॥ म्हणती मयशक्ति[२९] अद्भुत ॥ कोणावरी पडेल हे ॥ ६८ ॥ तंव लक्ष्मण लक्षीत ॥ मनोवेगें शक्ति येत ॥ ते छेदावया सुमित्रासुत ॥ बाण आकर्ण ओढीतसे ॥ ६९ ॥ जैसी चपळा ये कडकडोनी ॥ तैसी हृदयीं बैसे येउनी ॥ वक्षःस्थळ[३०] चूर्ण करूनी ॥ जाय निर्वूनि पृष्ठीद्वारें ॥ ७० ॥ पृथ्वी फोडूनि शक्ति गेली ॥ पाताळोदकीं ते विझाली ॥ असो सौमित्राची तनु पडली ॥ भूमीवरी निवेटित[३१] ॥ ७१ ॥ मृत्तिकाघट[३२] जेवीं होय चूर्ण ॥ फणस पडे पेंवनें[३३] विदारून ॥ तैसा सुमित्रानंदन ॥ छिन्नभिन्न जाहला ॥ ७२ ॥

२४ सूर्य. २५ कांळाचीं जीभ. २६ वीज. २७ नदापति समुद्र. २८ हत्ती, आठ दिशांस क्रमानें आहेत तं. २९ मयासुरानें दिलेली शक्ति. ३० छाती. ३१ मातीची घागर. ३२ घाऱ्यानें.

मग एकचि जाहला हाहाकार ॥ देव गजबजिले समग्र ॥ रणीं पडला सौमित्र ॥ वानरदळ शोक करी ॥ ७३ ॥ तंव हांक फोडी बिभीषण ॥ गजबजले सुग्रीव रघुनंदन ॥ सौमित्राजवळी धांवोन ॥ येते जाहले ते काळीं ॥ ७४ ॥ अंगद नळ नीळ जांबुवंत ॥ सुषेण शरभ गवय हनुमंत ॥ धांविन्नले वानर समस्त ॥ हृदय पिटीत ते काळीं ॥ ७५ ॥ एकचि वर्तला आकांत ॥ मिळाले सौमित्रा वेष्टीत ॥ निकट बैसोनि रघुनाथ ॥ पाहता जाहला ते काळीं ॥ ७६ ॥ तों हृदय विदारलें अत्यंत ॥ पृष्ठीद्वारें वाहे रक्त ॥ नासिकासी जों लाविला हस्त ॥ तों श्वासोच्छ्वास राहिला ॥ ७७ ॥ आरक्त जाहले हस्त नयन ॥ बाण तैसाचि ओढिला आकर्ण ॥ कानाडी-सहित लक्ष्मण ॥ निचेष्टित पडिलासे ॥ ७८ ॥ प्राण न दिसे अणुमात्र ॥ ऐसें देखोनि राजीवनेत्र ॥ वक्षःस्थळ पिटोनि शरीर ॥ भूमीवरी टाकिलें ॥ ७९ ॥ सवें बिभीषणें सांवरून ॥ बैसविला सीतारमण ॥ सौमित्रा मांडीवरी घेऊन ॥ राम बैसला ते काळीं ॥ ८० ॥ मुखावरी ठेवून मुख ॥ शोक करी अयोध्यानायक ॥ म्हणे प्राणसखया गोष्ट एक ॥ मजसीं बोलें एकदां ॥ ८१ ॥ बा रे नेत्र उघडून ॥ पाहें मजकडे विलोकून ॥ तूं सुकुमार बाळ पूर्ण ॥ भरिलें त्रिभुवन प्रतापें ॥ ८२ ॥ चतुर्दश वर्षें वनवासी ॥ बा रे फळें पुरविलीं आम्हांसी ॥ म्यां मारिलें उपवासी ॥ एक दिवसीं पुसिलें नाहीं ॥ ८३ ॥ तोचि राग धरूनि मनीं ॥ सखया जातोसी रुसोनी ॥ मी आपुला प्राण त्यजूनी ॥ येईन तुजसमागमें ॥ ८४ ॥ मी अयोध्येसी जातां जाण ॥ सुमित्रा पुसेल मजलागून ॥ तीतें काय सांगों वचन ॥ नेत्र उघडून पाहें पां ॥ ८५ ॥ त्रिभुवन जिंकिलें इंद्रजितें ॥ जो नावरे कोणातें ॥ तो रावणी तुवां शरपंथें ॥ जर्जर करूनी मारिला ॥ ८६ ॥ तुज देव चिंतिती कल्याण ॥ आजि समरीं केलें शयन ॥ तुजलागीं भरत शत्रुघ्न ॥ त्यजितील प्राण सौमित्रा ॥ ८७ ॥ ऐसा शोक करितां रघुवीर ॥ जाहला एकचि हाहाकार ॥ तंव तो रावणानुज भक्त थोर ॥ बोलता जाहला ते काळीं ॥ ८८ ॥ शत्रु समोर उभा रणीं ॥ शोक करितां जी ये क्षणीं ॥ हा क्षात्रधर्म चापपाणी ॥ सहसा नव्हे विचारिजे ॥ ८९ ॥ वैरी उभा असे समोर ॥ त्यासी पराभवावा सत्वर ॥ मग सौमित्राचा विचार ॥ कळेल तैसा करावा ॥ ९० ॥ नरवीरश्रेष्ठा रघुनंदना ॥ सर्वथा भय नाहीं लक्ष्मणा ॥ शरधारीं छेदीं रावणा ॥ म्हणोनि चाप बाण दीधले ॥ ९१ ॥ उभा राहिला रणरंगधीर ॥ जो राक्षसकुळवैश्वानर ॥ कीं ग्रासावया ब्रह्मांड समग्र ॥ कृतांत क्षोभला कल्पांतीं ॥ ९२ ॥ चाप टणत्कारिलें ते वेळीं ॥ झणत्कारल्या घंटा सकळी ॥ उर्वीसह शेष डळमळी ॥ गजबजलीं सप्त पाताळें ॥ ९३ ॥ क्रोध श्रीरामाचा देखोन ॥ गज सिंह शार्दूल भूतगण ॥ गतप्राण बहुत होऊन ॥ काननामाजी पडियेले ॥ ९४ ॥ दाशरथीचे हृदयांत ॥ क्रोधसागर हेलावत ॥ वज्रपाठाण मांडी रघुनाथ ॥ जें कृतांत पाहूं न शके ॥ ९५ ॥ रावणासी म्हणे रघुनंदन ॥ सौमित्रावरी शक्ति टाकून ॥ कोठें जासी तूं पळून ॥ करीन चूर्ण बाणघातें ॥ ९६ ॥ सौमित्र

---

३३ स्वर्ग, मृत्यु, पाताळ हे तीन लोक. ३४ बिभीषण. ३५ मनुष्यांत श्रेष्ठ. ३६ युद्धांत शूर राम. ३७ अग्नि. ३८ खलबळला. ३९ मजाप्रमाणें बळकट स्थान.

पडिला म्हणवून ॥ संतोषे दशमुखवारिण ॥ त्यावरी रामपंचानन ॥ सरसावोनि घांविन्नला ॥ ९७ ॥ भातां शर भरले सबळ ॥ जैसें शेषमुखीं हाळाहळ ॥ कीं समुद्रामाजी वडवानळ ॥ मेघीं चपळा जयापरी ॥ ९८ ॥ ते शर सोडीत रघुपती ॥ एका शराचे कोटी होती ॥ तटतटां तुटोनी पडती ॥ राक्षसशिरें ते काळीं ॥ ९९ ॥ बिळीं निघतां विखार ॥ तैसे रावणासी रुपती शर ॥ कीं पिच्छें पसरी मयूर ॥ कीं तृणांकुर पर्वतीं ॥ १०० ॥ कनकफळावरी कंटक स्पष्ट ॥ तैसे शर रुतले सघट ॥ रावणही सोडी शर तिखट ॥ परी निष्फळ होती ते ॥ १ ॥ मातेचिया कैवारें ॥ क्षत्रिय संहारिले फरेंशधरें ॥ तैसा सौमित्र पडतां रघुवीरें ॥ असुरदळ तेव्हां संहारिलें ॥ २ ॥ उरग संहारिले वैनतेयें ॥ कीं शंकरें जाळिलें त्रिपुरातें ॥ कीं प्रळयाग्नीनें सृष्टीतें ॥ कल्पांतकाळीं जाळिलें ॥ ३ ॥ कीं तारकासुराचें दळ ॥ षडाननें मारिलें सकळ ॥ कीं मार्तंडें तिमिरजाळ ॥ विध्वंसोनि टाकिलें ॥ ४ ॥ कीं शक्रें केले नग चूर ॥ कीं ज्ञानें हरे भवभय समग्र ॥ कीं नामें पापसंहार ॥ जैसा होय एकदांचि ॥ ५ ॥ तैसीं प्रतापाकें रघुनंदनें ॥ विध्वंसिलीं अरितारागणें ॥ जेवीं प्रयागीं एका स्नानें ॥ कोटिजन्मांचीं पापें जळती ॥ ६ ॥ प्रभंजन राम तमालनील ॥ विदारिलें रिपुजलदजाल ॥ तेव्हां किती पडलें राक्षसदळ ॥ गणीत केलें वाल्मीकें ॥ ७ ॥ दहा सहस्र वारण उन्मत्त ॥ नियुत तुरंग स्वारांसहित ॥ पन्नास सहस्र महारथ ॥ रथियांसहित पडियेले ॥ ८ ॥ शतकोटी पडे पायदळ ॥ तेव्हां एक कबंध उठे सबळ ॥ ऐशीं कोटी कबंधें विशाळ ॥ तेव्हां नाचती रणांगणीं ॥ ९ ॥ तेव्हां रामधनुष्याची किंकिणी ॥ एकदां वाजे तये क्षणीं ॥ चौदाही घंटा रणांगणीं ॥ वाजों लागल्या तेधवां ॥ ११० ॥ एक अर्धयामपर्यंत ॥ घंटा घणाघणां वाजत ॥ तेव्हां राक्षस पडिले अगणित ॥ शेषातेंही न गणवे ॥ ११ ॥ वेदातशास्त्र गर्जे प्रचंड ॥ तैसें झणत्कारे रामकोदंड ॥ पाखंडी तर्क घेती वितंड ॥ रावणचाप तेवीं वाजे ॥ १२ ॥ जैसे सन्मार्गीं वर्तती संत ॥ तैसे श्रीरामाचे बाण जात ॥ वाल्मीक कोळी अभक्त ॥ तैसे शर येती रावणाचे ॥ १३ ॥ असो रामें घालितां बाणजाळ ॥ तटस्थ जाहला राक्षसपाळ ॥ तों रामरूप सकळ ॥ दोन्ही दळें दिसों लागलीं ॥ १४ ॥ कोट्यनुकोटी रघुवीर ॥ मोकलिती बाणांचे पूर ॥ दशदिशा विलोकी दशवक्त्र ॥ दशरथकुमर दीसती ॥ १५ ॥ मागें पुढें सव्य वाम ॥ दिसती धनुर्धर श्रीराम ॥ राम राक्षस वानर घनश्याम ॥ स्वरूपें दिसती ते काळीं ॥ १६ ॥ अंतरीं पाहे जों रावण ॥ तों उभा असे जगन्मोहन ॥ मन बुद्धि चित्त अंतःकरण ॥ रामरूप जाहलें ॥ १७ ॥ दश इंद्रियें पंच प्राण ॥ पंचभूतें पंच विषय जाण ॥ चौंरही देह अवस्था भोग स्थान ॥ श्रीरामरूप जाहलें ॥ १८ ॥ ऐसा रामरूप दिसे सर्वत्र ॥ रावण उघडोनि पाहे नेत्र ॥ तों रथ सारथि ध्वज चाप शर ॥ रघुवीर रूप दीसती ॥ १९ ॥ रथाजवळी रामरूप संघटलें ॥ रथावरी चढोनि आलें ॥ अंतर्बाह्य रामें व्यापिलें ॥ ठाव न दिसे पळावया ॥ १२० ॥ अणुरेणूपासूनि ब्रह्म-

४० हत्ती. ४१ सर्प. ४२ परशुरामानें. ४३ गरुडानें. ४४ त्रिपुरासुरदैत्यास. ४५ शत्रुरूप मेघजाळ. ४६ दहा सहस्र. ४७ धड. ४८ पृथ्वी, उदक, तेज, वायु, आकाश. ४९ शब्द, स्पर्श, रूप, रस, गंध. ५० स्थूल, सूक्ष्म, कारण, महाकारण.

पर्यंत ॥ अवघा व्यापिला रघुनाथ ॥ शस्त्र सोडुनि मयजौमात ॥ रथाखालीं उडी टाकी ॥ २१ ॥ तों रामरूप दिसे धरणी ॥ भयें पळत ते क्षणीं ॥ मागें पाहे तों राक्षसवाहिनी ॥ धांवतचि येतसे ॥ २२ ॥ अरे हे राम आले म्हणोन ॥ भयें हांक फोडी रावण ॥ पुढें पाहे जों विलाकून ॥ तों लंका रामरूप दिसतसे ॥ २३ ॥ दुर्गहुड्यांचे जे कळस ॥ त्यांवरी उभा अयोध्याधीश ॥ अडखळून पडे लंकेश ॥ उठोनि पळे मागुती ॥ २४ ॥ असो रावण मंदिरांत ॥ पळोनि गेला पिशाचवत ॥ मंदोदरीजवळ बैसत ॥ सांगे सकळ समाचार ॥ २५ ॥ म्हणे प्रिये म्यां पुरुषार्थ करून ॥ रणीं मारिला लक्ष्मण ॥ मग रामें व्यापिलें जनवन ॥ मी पळून येथें पातलों ॥ २६ ॥ माझिये आंगींचें भयवारें ॥ अजूनि न जाय सुंदरे ॥ जेवीं करंड्यांतील कस्तूरी सरे ॥ परी मागें उरे मकरंद ॥ २७ ॥ कीं शुभाशुभकर्मे करिती ॥ मागें उरे जैसी कीर्ती ॥ कीं सायंकाळीं बुडतां गभस्ती ॥ आरक्तता मागें उरे ॥ २८ ॥ कीं प्रचंड मारुत ओसरे ॥ परी तरूवरी हेलावा उरे ॥ कीं नदी उतरतां एकसरें ॥ मागें थारे बरवटी जैसी ॥ २९ ॥ असो असुरगुरु जो कां शुक्र ॥ तेणें मृत्युंजय मंत्र ॥ मज दिघला असे परम पवित्र ॥ करीन त्याचें अनुष्ठान ॥ १३० ॥ मंदोदरी म्हणे दशमुखा ॥ व्यर्थ अनुष्ठान करूं नका ॥ अद्यापि तरी मदनांतकेसखा ॥ मित्र करा आपुला ॥ ३१ ॥ अथवा समरीं घालोनि कास ॥ युद्धचि करा बहुवस ॥ परी तें न मानी लंकेश ॥ घोर कर्मास प्रवर्तला ॥ ३२ ॥ होम करावया ते काळीं ॥ भूमींत गुहा गुप्त कोरिली ॥ त्यामाजी बैसला दशमौळी ॥ सामग्री सकळ घेऊनियां ॥ ३३ ॥ कालनेमी निशाचर ॥ त्यातें आज्ञापी दशकंधर ॥ द्रोणाद्रि आणील वायुकुमर ॥ तरी तूं सत्वर जाईं पुढें ॥ ३४ ॥ त्यातें वाटेसी विघ्न करून ॥ हिरून घेईं गिरि द्रोण ॥ अथवा हनुमंतासी मारून ॥ वाटेंत टाकीं पुरुषार्थें ॥ ३५ ॥ नाना यत्न करून ॥ वाटेसी गोवावा वायुनंदन ॥ निशांतीं उगवतां चंडकिरण ॥ जाईल प्राण सौमित्राचा ॥ ३६ ॥ यावरी कालनेमी निघाला तेच वेळां ॥ घेऊनि राक्षसांचा मेळा ॥ वाटेसी जाऊन बैसला ॥ विप्रवेष धरूनियां ॥ ३७ ॥ असो इकडे रघुनंदन ॥ सौमित्राजवळी येऊन ॥ टाकूनियां धनुष्य बाण ॥ शोक घोर आरंभिला ॥ ३८ ॥ तंव तो वैद्यराज सुषेण ॥ विलोकी सौमित्राचें चिन्ह ॥ म्हणे सूर्य उगवतां प्राण ॥ निश्चयें याचा जाईल ॥ ३९ ॥ द्रोणाचळीं पीयूषवल्ली ॥ कोणी जरी आणील ये वेळीं ॥ तरी सौमित्र याच काळीं ॥ उठेल जैसा पूर्ववत ॥ १४० ॥ चार कोटी योजनें जाऊन ॥ रात्रीं पर्वत आणावा पूर्ण ॥ ऐसें ऐकतां रघुनंदन ॥ विलोकी सर्व कपींतें ॥ ४१ ॥ कार्य न साधे म्हणून ॥ वानर पाहती अधोवदन ॥ तटस्थ पाहे सीतारमण ॥ नेत्रीं जीवन पाझरे ॥ ४२ ॥ समय देखोनियां परम कठिण ॥ जो निर्वाणींचा सखा पूर्ण ॥ भूगर्भरत्न-शोकहरण ॥ उभा ठाकला ते काळीं ॥ ४३ ॥ साष्टांग नमूनि जनकजामाता ॥ म्हणे त्रिभुवनपते न करावी चिंता ॥ तृतीय प्रहर

५१ रावण. ५२ पृथ्वी. ५३ दैत्यसेना. ५४ सुवासू. ५५ सूर्य. ५६ वायु. ५७ आंदोलन. ५८ चिखल. ५९ श्रीराम. ६० गुंतवा. ६१ अमृतवल्ली. ६२ सीतेचा शोक हरण करणारा.

( भरतां ॥ द्रोणाचळ आणितों ॥ ४४ ॥ श्रीराम म्हणे आनंदोन ॥ सौमित्र[६३] तुझा याचक पूर्ण ॥ यासी देऊनि प्राणदान ॥ झड-
करी उठवीं स्नेहाळा ॥ ४५ ॥ ऐसें ऐकतां हनुमंत ॥ जय जय यशस्वी अयोध्यानाथ ॥ म्हणोनि उडाला अकस्मात ॥ उत्तरपंथ
लक्षूनियां ॥ ४६ ॥ मनासी प्रार्थूनि तये क्षणीं ॥ ठेवियेलें श्रीरामचरणीं ॥ जैसें प्राणमित्राचे सदनीं ॥ प्रिय ठेवणें ठेविलें ॥ ४७ ॥
सागरामाजी मिळे लवण ॥ कीं नभीं लीन होय पवन[६४] ॥ तैसें रामपदीं ठेवूनि मन ॥ वायुनंदन धांविन्नला ॥ ४८ ॥ पित्याची गति
सांडून मागें ॥ हनुमंत नभीं झेंपावे वेगें ॥ कीं तो उरगारि[६५] लगबगें ॥ क्षीराब्धीप्रति जातसे ॥ ४९ ॥ मस्तकीं लांगूल[६६] वाहून ॥ घेत
उड्डाणावरी उड्डाण ॥ जय जय रघुराज म्हणोन ॥ वारंवार स्मरण करी ॥ १५० ॥ एक घटिका न भरतां पूर्ण ॥ गेला सप्तद्वीपें ओलां-
डून ॥ तों द्रोणाचळाआलीकडे जाण ॥ मंदराचळ देखिला ॥ ५१ ॥ प्रभा त्याची चंद्रासमान ॥ कीं कैलासपीठ श्वेतवर्ण ॥ कीं तो
कर्पूराचा संपूर्ण ॥ घडिला असे शीतळ ॥ ५२ ॥ कीं क्षीरसागर मंथोनि सबळ ॥ काढिला हा नवनीत गोळ ॥ कीं शेषशायी तमाल-
नील ॥ तेणें ठेवणें ठेविलें ॥ ५३ ॥ कीं निर्दोष यश आपुलें ॥ क्षीरसिंधूनें तेथें ठेविलें ॥ कीं पृथ्वींतून नूतन उगवलें ॥ श्वेतोत्पल[६७]
जयापरी ॥ ५४ ॥ असो त्याआलीकडे एक योजन ॥ कालनेमी जाहला ब्राह्मण ॥ राक्षसांतें शिष्य करून ॥ आश्रम तेथें रचियेला
॥ ५५ ॥ वृक्ष अवघे सदाफळ ॥ सरोवर भरलें असे निर्मळ ॥ यज्ञशाळा तेथें विशाळ ॥ कुंड वेदिका यथाविधि ॥ ५६ ॥ यज्ञपात्रें
असती बहुत ॥ कुंडाभोंवतीं विराजित ॥ समिधा दर्भ यथायुक्त ॥ करूनि सिद्ध ठेविलें ॥ ५७ ॥ घातलें असे अन्नसत्र ॥ ऐसा तो
कालनेमी निशाचर ॥ बकध्यान धरून साचार ॥ वाट पाहे मारुतीची ॥ ५८ ॥ वरिवरि शोभे वृंदावन[६८] ॥ कीं दांभिकाचें शुष्क ज्ञान ॥
कीं कांसारें प्रतिमा[६९] ठेवून ॥ विकावया बैसला ॥ ५९ ॥ तों इतक्यांत वायुसुत ॥ तृषाक्रांत पातला तेथ ॥ तंव तो कपटी पुढें धांवत
येत ॥ नमन करीतसे कपीसी ॥ १६० ॥ म्हणे माझें भाग्य धन्य ॥ जाहलें महापुरुषाचें दर्शन ॥ म्हणे स्वामी दया करून ॥ आजि
येथें क्रमावें ॥ ६१ ॥ आजि तुमचें दर्शन दुर्लभ सत्य ॥ राहावें एक दिनपर्यंत ॥ अथवा निरंतर राहावें एथ ॥ ऐकतां हनुमंत संतो-
षला ॥ ६२ ॥ हनुमंत बोले रसाळ ॥ पुढें कार्य आहे बहुसाल ॥ आतां उदक द्या जी शीतळ ॥ सकळ उपचार पावले ॥ ६३ ॥
कालनेमी बहुत प्रार्थी ॥ परी कदा न राहे मारुती ॥ [७०]विटोनियां परम चित्तीं ॥ शिष्यांप्रति सांगतसे ॥ ६४ ॥ म्हणे उदक द्या रे मर्क-
टासी ॥ दुसरें न मागे कोणासी ॥ तों सरोवर दाविती मारुतीसी ॥ जेथें विवंसी[७१] वसतसे ॥ ६५ ॥ ते विवसी परम दारुण ॥ देह
तिचा पर्वतासमान ॥ करूं जातां जलप्राशन ॥ बहुत जीव भक्षिले ॥ ६६ ॥ तेथें उदक घ्यावया पूर्ण ॥ बैसला अवनिजाशोकहरण[७२] ॥
तंव जळदेवता येऊन ॥ पाय धरी मारुतीचा ॥ ६७ ॥ हनुमंतें कंठीं धरून ॥ बाहेर काढिली ओढून ॥ लत्ताप्रहार हृदयीं देऊन ॥

६३ लक्ष्मण. ६४ वायु. ६५ गरुड. ६६ शेंपुट. ६७ पांढरें कमळ. ६८ कवंडळ. ६९ मूर्ति. ७० कंटाळून. ७१ विघ्नदेवता. ७२ सीताशोकहरण मारुति.

मारिली तेथें ते काळीं ॥ ६८ ॥ तिच्या शरीरांतून ते वेळीं ॥ दिव्य देवांगना निघाली ॥ मारुतीचे चरणीं लागली ॥ वार्ता आपुली सांगतसे ॥ ६९ ॥ म्हणे मी स्वर्गींची देवांगना ॥ रूपाभिमानें न मानीं कोणा ॥ हांसलें मी एका तपोधना ॥ तेणें मज शापिलें ॥ १७० ॥ म्हणे तूं विवँसी होईं पापमती ॥ मग उच्छाप मागतां तयाप्रती ॥ तो म्हणे द्रोणाचळ न्यावया मारुती ॥ रातोरातीं येईल ॥ ७१ ॥ तो तुज उद्धरील निश्चितीं ॥ ते आजि आली प्रचीती ॥ आणिक गोष्ट असे मारुती ॥ ती तुजप्रति सांगत्यें ॥ ७२ ॥ सहसा नव्हे हा मुनीश्वर ॥ कपटी कालनेमी असुर ॥ रावणें प्रेरिला साचार ॥ त्याचा संहार करीं तूं ॥ ७३ ॥ ऐसें मारुतीस सांगोन ॥ स्वर्गपंथें गेली उद्धरून ॥ मारुती आला परतोन ॥ कालनेमीजवळी पैं ॥ ७४ ॥ मनांत म्हणे हनुमंत ॥ हा दुरात्मा बैसला येथ ॥ याचा करावा निःपाँत ॥ तों कपटी बोले तेधवां ॥ ७५ ॥ म्हणे आम्हां भल्या ब्राह्मणा ॥ काय देतोसी गुरुदक्षिणा ॥ हनुमंतें मुष्टी वळोनि जाणा ॥ हृदयावरी दिधली ॥ ७६ ॥ तों पांच योजनें शरीर ॥ उभा ठाकला युद्धासी असुर ॥ कपि म्हणे आतां उशीर ॥ कासया येथें लावावा ॥ ७७ ॥ पायीं धरून आपटिला ॥ कालनेमी प्राणासी मुकला ॥ वरकड शिष्य ते वेळां ॥ पळून गेले लंकेसी ॥ ७८ ॥ कालनेमी आपटितां तो ध्वनी ॥ गंधर्वीं ऐकतांच श्रवणीं ॥ चौदासहस्र धांवूनी ॥ हनुमंतावरी लोटले ॥ ७९ ॥ कौंग मिळोनयां बहुत ॥ घरावया धांवती आदित्य ॥ कीं मूर्ख मिळून समस्त ॥ वाँचस्पतीसी जिंकूं म्हणती ॥ १८० ॥ असो हनुमंतें तये क्षणीं ॥ गंधर्वांचा भारा बांधोनी ॥ फिरवून आपटिले मेदिनीं ॥ प्रेतें करून टाकिले ॥ ८१ ॥ तेथून उडाला हनुमंत ॥ सौमित्राची मनीं चिंता बहुत ॥ द्रोणाद्रीसमीप त्वरित ॥ त्वरेंकरून पातला ॥ ८२ ॥ जैसें बावनकसी सुवर्ण ॥ तैसा द्रोणाद्रिपर्वताचा वर्ण ॥ वरी वल्ली देदीप्यमान ॥ तेजें गगन उजळलें ॥ ८३ ॥ दृष्टीं देखतां हनुमंत ॥ द्रोणाद्रि जाहला भयभीत ॥ म्हणे हा मागुती आला येथ ॥ मजलागीं न्यावया ॥ ८४ ॥ कैंचा राम कैंचा रावण ॥ एकदां गेला घेऊन ॥ मागुती उभा ठाकला येऊन ॥ आयुष्यांतीं मृत्यु जैसा ॥ ८५ ॥ उपाधीच्या गुणें बहुत ॥ नसतीं विघ्नें दाँटून येत ॥ वल्लीयोगें हा अनर्थ ॥ क्षणक्षणां होतसे ॥ ८६ ॥ असो हनुमंतें पर्वतासी नमून ॥ प्रार्थीत उभा कर जोडून ॥ म्हणे शक्तीनें भेदला लक्ष्मण ॥ आकांत पूर्ण मांडला ॥ ८७ ॥ त्रिभुवननायक रावणारी ॥ त्यावरी तूं उपकार करीं ॥ औषधी दे झडकरी ॥ अथवा तेथवरी तूं चाल ॥ ८८ ॥ संतोषेल अयोध्याधीश ॥ त्रिभुवनीं वाढेल तुझें यश ॥ बोलतां आतां विशेष ॥ उशीर कार्या होतसे ॥ ८९ ॥ द्रोण म्हणे मर्कटा पामरा ॥ कां करिसी घडिघडी येरझारा ॥ औषधी नेदीं वानरा ॥ मी तंव तेथें न येंचि ॥ १९० ॥ हनुमंत म्हणे रे गिरि द्रोणा ॥ निर्दया खळा महामलिना ॥ तुज क्षणांत बुद्धिहीना ॥ उचलोनि नेईन लंकेसी ॥ ९१ ॥ पुच्छ पसरूनि ते वेळे ॥ पर्वतातें तीन वेढे घातले ॥ उपडोनियां निजबळें ॥ तोलोनि हातीं घेतला

७३ विघ्नकर्मी. ७४ फडशा. ७५ कावळे. ७६ बृहस्पतीला. ७७ उद्भवून. ७८ श्रीराम.

॥ ९२ ॥ अंतरिक्ष जातां हनुमंत ॥ चंद्र पाहे चकित ॥ म्हणे काय हें अद्भुत ॥ आकाशमार्गें जात असे ॥ ९३ ॥ तों नंदिग्रामीं भरतें जाण ॥ देखिलें परम दुष्ट स्वप्न ॥ एक काळपुरुष येऊन ॥ दक्षिणबाहु गिळियेला ॥ ९४ ॥ गजबजोनि उठिला भरत ॥ म्हणे विपरीत जाहला दृष्टांत ॥ क्षेम असो रघुनाथ ॥ सीतासौमित्रांसहित पैं ॥ ९५ ॥ गुरु म्हणे दुष्ट स्वप्न ॥ करावें शांतिक हवन ॥ तत्काळ होमद्रव्यें आणून ॥ कैकयीनंदन हवन करी ॥ ९६ ॥ आहुती टाकी जों भरत ॥ तों अंतरिक्षें जात हनुमंत ॥ केवळ अग्निकल्लोळ पर्वत ॥ पडेल वाटे खालता ॥ ९७ ॥ वसिष्ठ जाहला भयभीत ॥ त्यास धीर देत भरित ॥ म्हणे हें अनिष्ट अकस्मात ॥ विंधोनि पाडितों एकीकडे ॥ ९८ ॥ तुम्ही स्वस्थ असावें समस्तीं ॥ कीजे हवनाची पूर्णाहुती ॥ ऐसें बोलून त्वरितगती ॥ चाप भरतें चढविलें ॥ ९९ ॥ ज्याचे बाण सतेज बहुत ॥ रामनामबीजांकित ॥ आकर्ण ओढूनि त्वरित ॥ सोडिता जाहला तत्काळीं ॥ २०० ॥ कड-कडूनि निघे चैंपळा ॥ तैसा ऊर्ध्वपंथें बाण गेला ॥ पर्वतासहित बाणीं खिळिला ॥ हनुमंताचा हस्त पैं ॥ १ ॥ महागजासी पर्वतपात ॥ तैसा भूमीवरी हनुमंत ॥ कोसळला रामस्मरण करीत ॥ आरंबळंत पडियेला ॥ २ ॥ रामनामस्मरणाचा ध्वनि ऐकून ॥ धांवोनि आला कैकयीनंदन ॥ तों महापर्वत घेऊन ॥ वानर अद्भुत पडियेला ॥ ३ ॥ भरत प्रेमें बोले वचन ॥ सखया तूं कोणाचा कोण ॥ मज स्नेह उपजे तुज देखोन ॥ रामनाम जपतोसी ॥ ४ ॥ हाहाकार करी वायुनंदन ॥ म्हणे आतां कैंचा वांचेल लक्ष्मण ॥ प्राण त्यजील रघुनंदन ॥ सूर्योदय होतांचि ॥ ५ ॥ ऐसें आक्रोशें बोले हनुमंत ॥ भूमीं तनु टाकी भरत ॥ म्हणे प्राणसखया सांग यथार्थ ॥ वार्ता विपरीत बोलसी ॥ ६ ॥ तयासी पुसे हनुमंत ॥ येरू म्हणे मी रामाचा दास भरत ॥ मारुति म्हणे केला अनर्थ ॥ रावणाहूनि आगळा तूं ॥ ७ ॥ मग भरतासी वर्तमान सकळ ॥ सांगे अंजनीचा बाळ ॥ दशमुखाचे शक्तीनें विकळ ॥ वीर सौमित्रि पडियेला ॥ ८ ॥ त्यासी जीववावया निश्चित ॥ नेत होतों द्रोणपर्वत ॥ तुवां विघ्न करोनि पाडिलें येथ ॥ हें तों त्यासी कळेना ॥ ९ ॥ आतां नुगवतां आदित्य ॥ तेथें कोण नेईल पर्वत ॥ वाट पाहतसे रघुनाथ ॥ श्रमेल समर्थ कृपाळु ॥ २१० ॥ मग बोले भरत वीर ॥ मज वाटतें तूं केवळ ईश्वर ॥ चारी कोटी योजनें दूर ॥ पर्वत घेऊनि आलासी ॥ ११ ॥ आतां न उगवतां दिनकर ॥ लंकेसी नग न्यावा सत्वर ॥ नाहीं तरी अनर्थ थोर ॥ सांगतोसी कपीश्वरा ॥ १२ ॥ तुजसमवेत पर्वतास ॥ न भरतां एक निमेषें ॥ नेऊनि ठेवीन लंकेस ॥ तरीच दास श्रीरामाचा ॥ १३ ॥ हें जरी नव्हे माझें कृत्य ॥ तरी सूर्यवंशीं जन्मोनि व्यर्थ ॥ जननी श्रमविली यथार्थ ॥ हांसेल दशरथ वैकुंठीं ॥ १४ ॥ पर्वतासहित हनुमंता ॥ बाणाग्रीं बैस आतां ॥ कार्मुक वोढूनि तत्त्वतां ॥ सुवेळेसी पाठवितों ॥ १५ ॥ ऐसें बोलतांचि भरत ॥ मनीं आश्चर्य करी हनुमंत ॥ म्हणे होय रामबंधु यथार्थ ॥ पुरुषार्थ अद्भुत न वर्णवे ॥ १६ ॥ मग हनुमंत उठोन ॥ वंदिले भरताचे

७२ ज्वाळा निघणारा. ८० बीज. ८१ ओरडत. ८२ लक्ष्मण. ८३ डोळ्याची पापणी मिटण्याइतका काळ.

चरण ॥ म्हणे वंश तुझा धन्य ॥ भरलें त्रिभुवन कीर्तीनें ॥ १७ ॥ महाराज बोलिला यथार्थ ॥ परी मी रामदास हनुमंत ॥ माझें बळ आणि पुरुषार्थ ॥ श्रीरघुनाथ जाणत असे ॥ १८ ॥ हें ब्रह्मांड उचलून ॥ कंदुकऐसें झेलीन ॥ तुमचा रामनामांकित बाण ॥ त्यासी मान दीधला ॥ १९ ॥ पश्चिमेस उगवेल चंडकिरण ॥ मेरु मांदार सोडिती स्थान ॥ परी रामदास्य करितां पूर्ण ॥ सामर्थ्य माझें न भंगे ॥ २२० ॥ आतां आज्ञा द्यावी सत्वर ॥ उदय करूं पाहे दिनकर ॥ मग बोले भरत वीर ॥ विजयी होईं सर्वथा ॥ २१ ॥ रघुपतीसी माझें साष्टांग नमन ॥ करूनि सांगें वर्तमान ॥ सौमित्रसीतेसहित आपण ॥ अयोध्येसी शीघ्र येइंजे ॥ २२ ॥ अवश्य म्हणे हनुमंत ॥ करतळीं घेऊन पर्वत ॥ जय जय यशस्वी सीताकांत ॥ म्हणोनियां उडाला ॥ २३ ॥ अमृतघट घेऊनियां हातीं ॥ पूर्वी गेला स्वर्गपती ॥ तैसाचि जातसे मारुती ॥ देव पाहती विमानीं ॥ २४ ॥ तों इकडे जानकीनाथ ॥ चिंता करी वानरांसहित ॥ म्हणे कां न येचि हनुमंत ॥ उशीर बहुत जाहला ॥ २५ ॥ तों उगवे जैसा आदित्य ॥ तैसा दुरोनि देखिला पर्वत ॥ रघुपतीसी वानर सांगत ॥ स्वामी मित्र उदय पावला ॥ २६ ॥ ऐसें जंव वानर बोलत ॥ तंव कोपला सीताकांत ॥ म्हणे हा कुळघातकी यथार्थ ॥ उत्तरेसी उदय पावला ॥ २७ ॥ साहा घटिका असे रजनी ॥ आजी पूर्वदिशा सांडोनी ॥ लवकरीच कां तरणी ॥ उत्तरेसी उगवला ॥ २८ ॥ धनुष्य चढविलें सत्वर ॥ राहुमुख काढिला शर ॥ म्हणे हा लोकआयुष्यचोर ॥ रजनीचरासी मिळाला ॥ २९ ॥ तंव तो सुषेण वीर बोलत ॥ सूर्य नव्हे हा आला हनुमंत ॥ ऐसें बोलतां सीताकांत ॥ परम आनंदें उचंबळला ॥ २३० ॥ पुरुषार्थी अंजनीचा बाळ ॥ ॐवलीळें उचलिजे अद्भुत फळ ॥ तैसा घेऊनियां अचळ ॥ रामदर्शना येतसे ॥ ३१ ॥ कीं अंधकार पडला सघन ॥ रावण पळाला जीव घेऊन ॥ यालागीं अनंत दीपिकां उफाळून ॥ शोधूं आला हनुमंत ॥ ३२ ॥ कीं अमृतकुंभचि आणिला ॥ कीं यशाचा ध्वज उभारिला ॥ कीं सौमित्राचा प्राण परतला ॥ रुसोनि जात होता तो ॥ ३३ ॥ असो सुग्रीवादि वानर ॥ करूनियां जयजयकार ॥ वेगें धांवती समोर ॥ पर्वत खालीं उतरावया ॥ ३४ ॥ गिरि उतरतांचि हनुमंत ॥ स्वामीस लोटांगण घालीत ॥ आसनींहूनि रघुनाथ ॥ पुढें धांवे उठवावया ॥ ३५ ॥ हनुमंतासी उचलोन ॥ हृदयीं धरी रघुनंदन ॥ रामें नेत्रोदकेंकरून ॥ अभिषेकिला मारुती ॥ ३६ ॥ हनुमंताचा वदनचंद्र ॥ स्वकरें कुरवाळी रघुवीर ॥ असो वैद्य सुषेण सत्वर ॥ पर्वताजवळी पातला ॥ ३७ ॥ नमस्कारूनि पर्वत ॥ मंत्रोनि औषधीवरी टाकी अक्षत ॥ चारही वली घेऊनि त्वरित ॥ एकांतीं रस काढिला ॥ ३८ ॥ हर्षभरित सुषेण ॥ चारही रसपात्रें भरून ॥ लक्ष्मणापासीं धांवोन ॥ येता जाहला ते काळीं ॥ ३९ ॥ संजीवनीचा रस काढिला ॥ तो आधीं मुखीं ओतिला ॥ घायामाजी ते वेळां ॥ संधिनीरस घालीत ॥ २४० ॥ विशल्या लावितां जाण ॥ कोठें न दिसे घायव्रण ॥ सुवर्णकांति संपूर्ण ॥ दिव्यदेह जाहला ॥ ४१ ॥

८४ चेंडूप्रमाणें. ८५ सूर्य. ८६ पक्षिराज गरुड. ८७ सहज, लीलेनें. ८८ मशाली. ८९ वांचविणाऱ्या वनस्पतीचा. ९० सांधणारी. ९१ शरीरांतील शल्यें काढणारी औषधी.

निजेला उठे अकस्मात ॥ तैसा उभा ठेला सुमित्रासुत ॥ बाण तैसा आकर्णपर्यंत ॥ घे घे म्हणोनि धांविन्नला ॥ ४२ ॥ पुसे कोठें आहे रावण ॥ त्यासी बाणें करीन चूर्ण ॥ तों रघुनाथें करीं धरून ॥ लक्ष्मणासी आलिंगिलें ॥ ४३ ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ देव वर्षती पुष्पसंभार ॥ मग सुषेणें उरले वानर ॥ तेही उठविले ते काळीं ॥ ४४ ॥ सागर उद्धरावया भागीरथी ॥ भगीरथें आणिली ये क्षितीं ॥ परी असंख्य जीव उद्धरती ॥ बिंदुमात्र झगटतां ॥ ४५ ॥ चक्रवाकालागीं रवि धांवत ॥ परी सर्वांवरी प्रकाश पडत ॥ कीं चकोरासी शशी[९२] पावत ॥ रसभरित औषधी होती ॥ ४६ ॥ चातकांलागीं मेघ वर्षती ॥ परी आर्द्र होय सर्व जगती ॥ कीं वराचिया पंक्तीं ॥ वन्हाडी होती तृप्त जैसे ॥ ४७ ॥ तैसें सौमित्राकारणें सत्वर ॥ औषधी आणी वायुकुमर ॥ तेणेंच असंख्य वानर ॥ सजीव केले ते काळीं ॥ ४८ ॥ मारुतीचें यशवैभव ॥ क्षणक्षणां वर्णीत राघव ॥ विमानीं इंद्रादि देव ॥ कीर्ति गाती मारुतीची ॥ ४९ ॥ असो पर्वत उचलोनी ते वेळां ॥ मारुति माघारा चालिला ॥ दशमुखासी[९३] समाचार कळला ॥ सौमित्र उठिला म्हणोनी ॥ २५० ॥ शत राक्षस निवडून ॥ तयांप्रति सांगे रावण ॥ म्हणे हिरोनें[९४] घ्यारे गिरी द्रोण ॥ मारुतीसी आडवोनियां ॥ ५१ ॥ असुर पाठी लागती ॥ वानरा पर्वत टाकीं म्हणती ॥ पर्वत धरूनि एके हातीं ॥ परते मारुति तयांवरी ॥ ५२ ॥ करचरणघातेंकरून ॥ शतही टाकिले मारून ॥ स्वस्थळीं ठेवूनि गिरि द्रोण ॥ सुवेळेसी पातला ॥ ५३ ॥ तों उगवलें सूर्यमंडळ ॥ सूर्यकुळभूषणाचें[९५] चरणकमळ ॥ हनुमंतें वंदोनि तत्काळ ॥ कर जोडून उभा ठाके ॥ ५४ ॥ मग नंदिग्रामींचें वर्तमान ॥ रघुपतीसी सांगे वायुनंदन ॥ भरतें सोडूनि दिव्य बाण ॥ द्रोणाचळ पाडिला होता ॥ ५५ ॥ मी क्षणभरी पाहिला अंत ॥ तरी परम प्रतापी वीर भरत ॥ मजसमवेत पर्वत ॥ बाणाग्रीं स्थापीत होता पैं ॥ ५६ ॥ ऐसें बोलतां मारुती ॥ आश्चर्य करिती सकळ जुत्पती[९६] ॥ सद्गद होऊनि रघुपती ॥ बोलता जाहला प्रीतीनें ॥ ५७ ॥ म्हणे आतां रावण वधोनियां ॥ जाईन भरतासी भेटावया ॥ हनुमंतें चरण वंदोनियां ॥ राघवाप्रति बोलत ॥ ५८ ॥ स्वामी निःसीम भरताचें भजन ॥ सप्रेम वैराग्य अद्भुत ज्ञान ॥ चकोर इच्छी रोहिणीरमण[९७] ॥ तैसी वाट पाहतसे ॥ ५९ ॥ कीं वनास धेनु गेली दूरी ॥ तान्हें वत्स वाट पाहे घरीं ॥ कीं उर्ध्वमुखें निर्धारीं ॥ चातक इच्छी घनबिंदु ॥ २६० ॥ सर्व मंगलभोग करोनि दूरी ॥ भरत वाट पाहे अहोरात्रीं ॥ ऐसें मारुति बोलतां अंतरीं ॥ आत्माराम संतोषला ॥ ६१ ॥ रामविजय ग्रंथ सुंदर ॥ हा कल्पवृक्ष उदार ॥ दृष्टांतफळीं समग्र ॥ लवोनि[९८] आला पडिभरें ॥ ६२ ॥ श्रीधरवरदा आदिपुरुषा ॥ श्रीमद्भीमातटविलासा ॥ ब्रह्मानंदा पंढरीशा ॥ अभंग भजन देईं तुझें ॥ ६३ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ द्वात्रिंशत्तमोध्याय गोड हा ॥ २६४ ॥ ॥ अध्याय ॥ ३२ ॥ ॥ ओंव्या ॥ २६४ ॥ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

९२ चंद्र. ९३ रावणाला. ९४ हिसकून. ९५ श्रीरामाचें. ९६ मुख्य वानर. ९७ वांकला. ९८ भरानें. वहरानें.

३३
गोलिवडेकर

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ जानकीनेत्रसरोजमित्रा ॥ मित्रकुळभूषण स्कंदतातमित्रा ॥ मित्रकुळकैवारिया भूसुरमित्रा ॥ सौमित्राग्रजा श्रीरामा ॥ १ ॥ भक्तमानसचकोरचंद्रा ॥ त्रिविधतापशमना आनंदसमुद्रा ॥ भरतहृदयारविंदभ्रमरा ॥ भवभयहरा राजीवाक्षा ॥ २ ॥ मुमुक्षुचातकनवमेघरंगा ॥ सकळरंगातीत अनंगा ॥ आनंदमय अमला निःसंगा ॥ अक्षय अभंगा निरुपाधिका ॥ ३ ॥ रणरंगधीरा रघुनंदना ॥ बोलवीं पुढें ग्रंथरचना ॥ हनुमंतें द्रोणाद्रि आणून जाणा ॥ सौमित्रप्राणा वांचविलें ॥ ४ ॥ यावरी बोले बिभीषण ॥ बाहेर युद्धा न ये रावण ॥ शक्रजिताऐसें हवन ॥ गुप्त तेणें मांडिलें ॥ ५ ॥ सुटले आहुतींचे परिमळ ॥ धूम्रें कोंदलें नभमंडळ ॥ अग्नींतून रथ तेजाळ ॥ अर्घा बाहेर निघाला ॥ ६ ॥ पूर्णाहुती होतां पूर्ण ॥ संपूर्ण निघेल स्यंदन ॥ तरी अगोदरचि जाऊन ॥ विघ्न तेथें करावें ॥ ७ ॥ ऐसें बोलतां बिभीषण ॥ मुख्य कपी उठिले दहाजण ॥ नळ नीळ जांबुवंत वालिनंदन ॥ सीताशोकहरण पांचवा ॥ ८ ॥ गवय गवाक्ष गंधमादन ॥ शरभ केसरी पावकलोचन ॥ दशरथात्मजासी वंदून ॥ दहाजण वीर उठिले ॥ ९ ॥ ते दहाही पराक्रमेंकरून ॥ दशदिशा जिंकिती नलगतां क्षण ॥ अकस्मात ऊर्ध्वपंथें उडोन ॥ दशमुखावरी चालिले ॥ १० ॥ जैसे विहंगम उडती गगनीं ॥ तैसे लंकेंत आले तये क्षणीं ॥ घरोघरीं रिघोनी ॥ रावणा शोधिती तेधवां ॥ ११ ॥ जे जे भेटती राक्षस ॥ त्यांतें करिती ताडणास ॥ कोठें बैसला लंकेश ॥ दावा आम्हांस वेगेंसीं ॥ १२ ॥ शोधिलें अवघें लंकाभुवन ॥ परी ठायीं न पडेचि रावण ॥ तों बिभीषणाची राणी येऊन ॥ दावी खूण गुप्तत्वें ॥ १३ ॥ सरमा सांगे सत्वर ॥ नगरदुर्गाखालीं विवर ॥ त्यांत बैसला दशकंधर ॥ दुराचारी कपटिया ॥ १४ ॥ ऐसें ऐकतां ते वेळां ॥ विवरमुखीं होती शिळा ॥ वानरीं फोडूनि मोकळा ॥ मार्ग केला ते समयीं ॥ १५ ॥ तेथें राक्षस होते दारुण ॥ ते वधिले नलगतां क्षण ॥ आंत प्रवेशले वानरगण ॥ विवर विस्तीर्ण देखिलें ॥ १६ ॥ तों तेथें शिवालय प्रचंड ॥ पुढें प्रज्वळिलें होमकुंड ॥ आहुती टाकी दशमुंड ॥ नेत्र वीसही झांकोनियां ॥ १७ ॥ रक्तमद्यमांसपर्वत ॥ नरशिरें पडलीं असंख्यात ॥ रक्तें स्नान करूनि लंकानाथ ॥ वज्रासनीं बैसला ॥ १८ ॥ आश्चर्य करिती वानरगण ॥ अजून न सांडीच हा प्रयत्न ॥ कुळक्षय जाहला संपूर्ण ॥ तरी जयआशा धरीतसे ॥ १९ ॥ असो वानरीं शिळा घेऊनि प्रचंड ॥ विध्वंसिलें होमकुंड ॥ सामग्री नासोनि उदंड ॥ यज्ञपात्रें फोडिलीं ॥ २० ॥ सावध नव्हेचि रावण ॥ वस्त्रें फेडूनि केला नग्न ॥ दाही मुखांमाजी संपूर्ण ॥ धुळी घालिती वानर ॥ २१ ॥ एक वर्मस्थळीं शिळा हाणिती ॥ एक वक्षःस्थळीं ताडिती ॥ तरी सावध नव्हे लंकापती ॥ नाना प्रयत्न केलिया ॥ २२ ॥ मग तेथोनि उडाला वालिसुंत ॥ प्रवेशला राणिवसांत ॥ मंदोदरीस उचलोनि अकस्मात ॥ रावणापाशीं आणिली ॥ २३ ॥ परम सुंदर सुकुमार ॥ रावणावरी लोटिती वानर ॥ चीरें कंचुकी अलंकार ॥ केले चूर वानरीं ॥ २४ ॥

१ जानकीचे नेत्रकमळांना सूर्यासमानें. २ सूर्यकुळ. ३ ब्राह्मणमित्रा. ४ रथ. ५ मारुति. ६ पक्षी. ७ तटबंदीतळीं. ८ भुयार. ९ अंगद. १० स्त्रीमहालांत. ११ वस्त्र.

मंदोदरी म्हणे दशवदना ॥ आग लागो तुझिया अनुष्ठाना ॥ वानरीं विटंबिली अंगना ॥ लाज कैसी नाहीं तूतें ॥ २५ ॥ ते पतिव्रता करूनि नम ॥ रावणावरी देती ढकलून ॥ मयजा आक्रंदे दारुण ॥ ऐकतां रावण उघडी नेत्र ॥ २६ ॥ तों मंदोदरी आक्रंदत ॥ होम विध्वंसिला समस्त ॥ क्रोधें उठोनि लंकानाथ ॥ वानरांवरी धांविन्नला ॥ २७ ॥ बहुत वानर ते वेळे ॥ पायीं धरूनि आपटिले ॥ अंगदमारुतींसी दिघले ॥ मुष्टिघात बहुत पैं ॥ २८ ॥ सकळही वानर निघोन ॥ सुवेळेसी आले परतोन ॥ म्हणती उठविला रावण ॥ युद्धालागीं येईल पैं ॥ २९ ॥ सभा मोडूनि रघुवीर ॥ कोदंड चढविलें सत्वर ॥ म्हणे मयजेचें सौभाग्य समग्र ॥ आजपासोनि खंडलें ॥ ३० ॥ इकडे मंदोदरीचें समाधान ॥ करिता जाहला रावण ॥ वस्त्रें भूषणें देऊन ॥ हृदयीं दृढ धरियेली ॥ ३१ ॥ म्हणे प्राक्तनभोग दारुण ॥ प्रिये न सुटे भोगिल्याविण ॥ आतां गृहा जावें आपण ॥ समाधानें असावें ॥ ३२ ॥ आजि मी झुंजेनें[13] निर्वाण ॥ शत्रुशिरें आणीन छेदून ॥ नाहीं तरी प्रिये येथून ॥ तुमची आमची हेचि भेटी ॥ ३३ ॥ गृहा पाठविली मंदोदरी ॥ वस्त्रें भूषणें देऊन झडकरी ॥ रावण निघाला बाहेरी ॥ ठोकिल्या भेरी एकसरें ॥ ३४ ॥ राक्षसदळ जितकें उरलें ॥ तें अवघें सांगातें घेतलें ॥ अपार रणतुरें ते वेळे ॥ वाजों लागली भयंकर ॥ ३५ ॥ पदातिदळ पुढें जात ॥ त्यापाठीं स्वार चवताळत ॥ त्यामागें गज उन्मत्त ॥ गुढा[14]रांसहित धांवती ॥ ३६ ॥ त्यांचे पाठीं रथ जाती ॥ रथीं बैसला लंकापती ॥ छत्रें मित्रेंपत्रें झळकती ॥ पुढें पढती भाट ब्रीदें ॥ ३७ ॥ रावण रणनोवरा सत्य ॥ मुक्ति नोवरी वरूं जात ॥ वऱ्हाडी पुढें गेले बहुत ॥ उरले ते सर्व घेत संगें ॥ ३८ ॥ मागें बंधु बिभीषण लंकेसी ठेवील रक्षण ॥ असो रणभूमीस रावण ॥ वायुवेगें पातला ॥ ३९ ॥ तों शिळा वृक्ष घेऊन ॥ वेगें धांवले वानरगण ॥ जैसा प्रळयांतीं पडे पर्जन्य ॥ तैसा पाडिला पर्वतांचा ॥ ४० ॥ दश धनुष्यां लावूनि बाण ॥ एकदांच सोडी रावण ॥ सर्वही पर्वत फोडून ॥ सैन्य बाहेर काढिलें ॥ ४१ ॥ प्रचंड पराक्रमी लंकानाथ ॥ शरीं वानर [15]खिळिले समस्त ॥ ऐसें देखोनि रघुनाथ ॥ पुढें जाहला ते क्षणीं ॥ ४२ ॥ रघुनाथ म्हणे दशकंधरा ॥ मलिना शतमूर्खा पामरा ॥ सीता आणूनि तस्करा ॥ कुलक्षय केला व्यर्थचि ॥ ४३ ॥ संतति संपत्ति विद्या धन ॥ टाकिलीं वेदांचीं खंडें करून ॥ रौंसभासी चर्चिलें चंदन ॥ तैसें ज्ञान असुरा तुझें ॥ ४४ ॥ आजि समरांगणीं जाण ॥ तुज खंडविखंड करीन ॥ पुढील अवतारीं मुक्ति देईन ॥ असुरा जाण तुज निश्चयें ॥ ४५ ॥ तव प्राणहतें माझे शर ॥ आले सावध होई सत्वर ॥ यावरी दशैंद्रयनेत्र ॥ प्रत्युत्तर देत असे ॥ ४६ ॥ तूं म्हणविसी रामचंद्र ॥ परी मी राहू असें भयंकर ॥ आजि स्वग्रास करीन समग्र ॥ समरीं तुझा मानवीया ॥ ४७ ॥ माझे समरीं सुटतां बाण ॥ मेरु मांदार होती चूर्ण ॥ तूं सुकुमार मानवनंदन ॥ कैसे साहसी पाहेन ते ॥ ४८ ॥ सीता सुंदर अत्यंत ॥ कष्टत होती अरण्यांत ॥ म्यां आणिली ते तुज प्राप्त ॥ पुनः न

१२ युद्ध करीन. १३ गुढार = हत्तीच्या पाठीवरील हौदा. १४ अबदागीर. १५ रावणाचे पराक्रम. १६ व्यापिले. १७ गाढवाला. १८ रावण.

होय सर्वथा ॥ ४९ ॥ पश्चिमेस उगवेल तरणी ॥ जरी मशक उचलील धरणी ॥ गजमस्तकींचें मोतीं भिवोनी ॥ सिंह देईल जंबुका ॥ ५० ॥ पाषाणघायेंकरून ॥ जरी दुःख पावे प्रभंजन ॥ गरुड सर्पासी येईल शरण ॥ पतंग अमीस गिळील जरी ५१ ॥ हेंही एक वेळ घडे ॥ परी तुज जानकी दृष्टी न पडे ॥ रावण बोलतां गडाडे ॥ मेघ जैसा आकाशीं ॥ ५२ ॥ रघूत्तम म्हणे दशकंठा ॥ तुज मृत्युसमयीं फुटला फांटा ॥ माझे बाणांचा प्रताप मोठा ॥ साहें आजि समरांगणीं ॥ ५३ ॥ रामें चाप टणत्कारून[२२] प्रचंड ॥ शर सोडी जैसा काळदंड ॥ दोघे वीर परम प्रचंड ॥ रण वितंड माजविलें ॥ ५४ ॥ मांडिलें एकचि घनचक्र ॥ रणतुरें वाजती अपार ॥ सीताजननी[२३] थरथर ॥ कंपित होय क्षणक्षणां ॥ ५५ ॥ अलातचक्रें जेवीं फिरती ॥ तेवीं उभय चापें झळकती ॥ चपळेऐशा तळपती ॥ मुद्रिका हातीं दोघांचे ॥ ५६ ॥ भुजंगअस्त्राचा प्रयोग ॥ रावण करी तेव्हां सवेग ॥ दशदिशा फुटोनि पन्नग[२४] ॥ कपिकटकावरी येती ॥ ५७ ॥ जैसें निबिड जलदजाल ॥ तैसें सर्पीं व्यापिलें सकळ ॥ ऐसें देखोनि तमालनीळ ॥ गरुडास्त्रबाण योजिला ॥ ५८ ॥ सोडितां सुपर्णास्त्रबाण ॥ पृथ्वी आणि आकाश फोडून ॥ असंख्य धांवती विनतानंदन[२४] ॥ सर्प संपूर्ण भक्षिले ॥ ५९ ॥ सर्प संहारून समस्त ॥ गरुड सवेंचि झाले गुप्त ॥ जातवेदास्त्र[२५] दैदीप्त ॥ विंशतिनेत्रें सोडिलें ॥ ६० ॥ पाखंड उच्छेदी पंडित ॥ तेवीं जलदास्त्र[२६] प्रेरी रघुनाथ ॥ रावणें वातास्त्र अद्भुत ॥ तयावरी प्रेरिलें ॥ ६१ ॥ रामें आड घालून पर्वत ॥ प्रभंजन कोंडिला समस्त ॥ वज्रास्त्र प्रेरी लंकानाथ ॥ फोडिले पर्वत तत्काळीं ॥ ६२ ॥ मग असंभाव्य शस्त्रजाळ ॥ रावणें प्रेरिलें तत्काळ ॥ एकाचि बाणें अयोध्यापाळ ॥ छेदोनियां टाकीतसे ॥ ६३ ॥ रावणें योजिला एक शर ॥ दिनकरमुख[२७] तेज अपार ॥ तो चापीं योजोनि सत्वर ॥ राघवावरी सोडिला ॥ ६४ ॥ रघूत्तमें केलें संधान ॥ परी तो अनिवार शर पूर्ण ॥ श्रीरामचरणातें लागला येऊन ॥ भेदून गेला पलीकडे ॥ ६५ ॥ राघवचरण सुकुमार ॥ वामपाद फोडूनि गेला शर ॥ ऐसें देखोनि वानर वीर ॥ उठिले सर्व एकदांचि ॥ ६६ ॥ रणीं पडिलीं होतीं शस्त्रें ॥ तीं वानरीं घेतलीं अपारें ॥ मारीत उठले एकसरें ॥ अनिवार काळासी जे ॥ ६७ ॥ परमार्थबळेंकरूनि सबळ ॥ ज्ञानी विध्वंसिती प्रपंचदळ ॥ तैसे रामउपासक निर्मळ ॥ असुर सकळ रगडती ॥ ६८ ॥ अभिमानाचे मुकुट थोर ॥ परमार्थबाणें केले चूर ॥ त्रयावस्थांचीं कवचें अपार ॥ सूर्यखड्गें तोडिलीं ॥ ६९ ॥ समवृत्तीचीं शस्त्रें घेऊन ॥ द्वेषधनुष्यें छेदिलीं पूर्ण ॥ नैराश्यचक्रेंकरून ॥ लोभभाते उडविले ॥ ७० ॥ स्वरूपसाक्षात्कारबाणीं ॥ सिद्ध पातका सांडी खंडूनी ॥ बोधफरशेंकरूनी ॥ मोहध्वज छेदिले ॥ ७१ ॥ अनुसंधानपरिघ घेऊन ॥ अविद्यारथ केला चूर्ण ॥ द्वैतरथांग छेदून ॥ अभेदपट्टिश टाकिलें ॥ ७२ ॥ निवृत्तिअस्त्रें घालून ॥ प्रवृत्तिशस्त्रें केलीं चूर्ण ॥ विरक्तिगदा घेऊन ॥ कामकुंजर विदारिले ॥ ७३ ॥ क्रोध मद मत्सर अहंकार ॥ हे पुढें होते पायभार ॥ शम

१९ सूर्य. २० धनुष्याच्या दोरीचा शब्द करून. २१ पृथ्वी. २२ कोलित फिरविलें असतां चक्रासारखा आकार दिसतो तशीं. २३ सर्प. २४ गरुड. २५ अग्निअस्त्र. २६ मेघास्त्र. २७ सूर्यमुख.

दम अस्त्रें अनिवार ॥ त्यांनीं चूर्ण केले ते ॥ ७४ ॥ संकल्प द्वेष कुटिल ॥ हे असुरांचे तुरंग सबळ ॥ हे समाधानशक्तीनें सबळ ॥ विदारून पाडिले ॥ ७५ ॥ आशा मनशा कामना पूर्ण ॥ ह्या भिंदिमाळा येती दारुण ॥ मनोजयाचें पुढें वोडंण ॥ रामभक्त करिती हो ॥ ७६ ॥ आतां असो पाल्हाळ ॥ वानरीं रगडिलें असुरदळ ॥ रावण घाली बाणजाळ ॥ मायापेंडळ जयापरी ॥ ७७ ॥ रथारूढ लंकानायक ॥ जैसा नगमस्तकीं बलाहक ॥ पृथ्वीवरी अयोध्यापालक ॥ ठाण मांडून उभा असे ॥ ७८ ॥ वाचस्पतीसी म्हणे इंद्र ॥ राजाधिराज श्रीरामचंद्र ॥ त्रिभुवनेश्वर गुणसमुद्र ॥ उदार धीर गुणाब्धि ॥ ७९ ॥ सीतेचें करूनि निमित्त ॥ आम्हां करावया बंधनमुक्त ॥ युद्ध करीत रघुनाथ ॥ धाडावा रथ ये समयीं ॥ ८० ॥ मातली सारथि चतुर जाण ॥ तयासी सांगे सहस्रनयन ॥ शस्त्रास्त्रीं भरून स्यंदन ॥ अश्वरत्नें दिव्य जीं ॥ ८१ ॥ माझा रथ तेजागळा ॥ सत्वर नेईं सुवेळाचळा ॥ मातली आज्ञा वंदोनि ते वेळां ॥ निघाला परम वेगेंसीं ॥ ८२ ॥ त्रुटी न वाजतां तत्काळीं ॥ रथ आणी रामाजवळी ॥ खालीं उतरून ते काळीं ॥ वंदी मातली रामातें ॥ ८३ ॥ म्हणे राजीवाक्षा तमालनीला ॥ सहस्राक्षें रथ पाठविला ॥ यावरुतें आरूढोनी ये वेळां ॥ मग युद्धासी प्रवर्तावें ॥ ८४ ॥ माझें नाम मातली ॥ रथ फिरवीन रणमंडळीं ॥ ऐसें ऐकतां ते वेळीं ॥ जगदात्मा संतोषला ॥ ८५ ॥ म्हणे धन्य धन्य शचीनाथ ॥ समय पाहून केलें उचित ॥ जैसा क्षुधित देखोनि अत्यंत ॥ भोजन त्यासी देइजे ॥ ८६ ॥ कीं तृषितासी जीवन शीतळ ॥ की रोगियासी रसराज निर्मळ ॥ कीं मरतयासी तत्काळ ॥ सुधारस पाठविला ॥ ८७ ॥ दुर्बलासी दीजे धन ॥ कीं रणीं पाठिराखा ये धांवोन ॥ तैसा पुरंदरें स्यंदन ॥ समयोचित पाठविला ॥ ८८ ॥ मग प्रदक्षिणा करून ॥ रथीं चढला रघुनंदन ॥ उदयाचळी सहस्रकिरण ॥ कीं नारायण सुपर्णीं ॥ ८९ ॥ जगद्वंद्य तो दाशरथी ॥ रणमंडळीं जाहला महारथी ॥ पुढें मातली चपळ सारथी ॥ त्वरें धुरेसी बैसला ॥ ९० ॥ रघुनाथ रथीं बैसला देखोन ॥ आनंदले वानरगण ॥ म्हणती धन्य शचीरमण ॥ पाठिराखा पूर्ण होय ॥ ९१ ॥ रामासी देवेंद्रें धाडिला रथ ॥ दृष्टीं देखोनि लंकानाथ ॥ दुःखें दाटला अत्यंत ॥ दांत खात करकरां ॥ ९२ ॥ दृष्टीं देखोनि राजहंस ॥ परम संतोषे वायस ॥ कीं सभाग्य देखोनि दुर्जनांस ॥ महाद्वेष उपजे पैं ॥ ९३ ॥ कीं देखोनि संतांची लीला ॥ निंदकांसी उपजे कंटाळा ॥ शिवप्रतिमा देखोन डोळां ॥ म्लेच्छ जैसे संतापती ॥ ९४ ॥ कीं हरिकीर्तन ऐकोन ॥ विटे भूतप्रेतांचें मन ॥ तैसा क्षोभला रावण ॥ रथ देखोनि ते काळीं ॥ ९५ ॥ इंद्रजित पडिला रणीं ॥ त्याहून दुःख वाटलें मनीं ॥ मंदोदरी विटंबिली वानरगणीं ॥ दुःख त्याहून हें वाटे ॥ ९६ ॥ असो परमक्रोधें रावण ॥ सोडी बाणापाठीं बाण ॥ अचूक रामाचें संधान ॥ करी चूर्ण सर्वांचि ॥ ९७ ॥ सिंहासारिखे दोघेजण ॥ घे घे शब्द करिती दारुण ॥ एकमेकांवरी टाकिती बाण ॥ मंडप वरी घातला ॥ ९८ ॥

---

९८ झाक. ९९ झाकेचा पडदा. ३० पर्वताकार. ३१ मेघ. ३२ बृहस्पतीचा. ३३ इंद्र. ३४ डबलजीत. ३५ चुटकी. ३६ त्रैलोक्यचिंतामणीची माला. ३७ गदाकार.

भयभीत त्रिभुवन ॥ आकाश न दिसे बाणेंकरून ॥ विमानें सोडोनि सुरगण ॥ पळों लागले तेधवां ॥ ९९ ॥ बाण दाटले अद्भुत ॥ न चालती शशिमित्ररथ[३८] ॥ वायूस फिरावया तेथ ॥ रीघ सर्वथा नसेचि ॥ १०० ॥ रुधिरधारा मेघ वर्षती ॥ नक्षत्रें खळखळां रिचे-[३९]वती ॥ विद्युल्लता बहुत पडती ॥ कांपे जेंगती[४०] चळचळां ॥ १ ॥ सप्त पाताळें आंदोळती ॥ शेष कूर्म दचकले चित्तीं ॥ राक्षस वानर कांपती ॥ युद्ध पाहतां दोघांचें ॥ २ ॥ एक काळ एक महाकाळ ॥ एक दावामि एक वडवानळ ॥ क्रोधेंकरून भूमंडळ ॥ दोघेही गिळूं भाविती ॥ ३ ॥ पदैक्रमवर्णक्रमेंकरून[४१] ॥ पंडित करिती वेदाध्ययन ॥ तैसे रघुनाथाचे बाण ॥ परमवेगें सूटती ॥ ४ ॥ दोन्ही रथ घडाडले ॥ समरीं एके ठायीं मिळाले ॥ अश्व अश्वांसहित संघटले ॥ उभे राहिले दोन्ही चरणीं ॥ ५ ॥ सारथी सारथिया म्हणत ॥ रणधुमाळी मांडली अद्भुत ॥ दोन्ही दळीं एकचि आकांत ॥ कोल्हाळ करिती वीर तेव्हां ॥ ६ ॥ सारथी परम चतुर ॥ माघारे सारिले रहंवरें[४२] ॥ जैसे पंडित वाद करोनि अपार ॥ क्षण एक स्थिरावती ॥ ७ ॥ तैसे रथ माघारे करून ॥ सवेंच बाण सोडिती सघनें[४३] ॥ पर्जन्य जैसा ओसरोन ॥ सवेंच मागुती वृष्टि करी ॥ ८ ॥ कीं सागरा भरतें ओहटत ॥ सवेंच मागुती विशेष लोटत ॥ तैसे बाणांचे पर्वत ॥ एकावरी एक टाकिती ॥ ९ ॥ सप्त दिन अहोरात्र ॥ होत युद्धाचें घनचक्र ॥ परी रामरावणीं क्षणमात्र ॥ विसांवा घेतलाच नाहीं ॥ ११० ॥ रामें काढिले चार बाण ॥ सोडिले चापासी लावून ॥ रथींचे चारही वारू छेदून ॥ अकस्मात टाकिले ॥ ११ ॥ तंव रावणें नलगतां क्षण ॥ नूतन तुरंग जुंपिले पूर्ण ॥ मग नरवीरश्रेष्ठ रघुनंदन ॥ काय करिता जाहला ॥ १२ ॥ काढिला अर्धचंद्र बाण ॥ जैसा नवग्रहांत चंडकिरण ॥ तो शरासनावरी योजून ॥ मनोवेगें सोडिला ॥ १३ ॥ सवेंच रावणें नलगतां क्षण ॥ अर्धचंद्रबाण टाकावा तोडून ॥ म्हणून तीक्ष्ण शक्ति योजिली पूर्ण ॥ तों बाण हृदयीं आदळला ॥ १४ ॥ त्या बाणें जाऊन एकसरें ॥ पाडिलीं रावणाचीं दाही शिरें ॥ परी सवेंच निघालीं परिकरें ॥ पूर्विल्याऐसीं तेधवां ॥ १५ ॥ सवेंचि रविचक्रवंदेन[४४] शर ॥ रामें सोडिला अनि-वार ॥ शिरें छेदिलीं समग्र ॥ मागुती तैसींच उद्भवलीं ॥ १६ ॥ देव आणि वानर ॥ अवघे जाहले चिंतातुर ॥ आतां कैसा मरेल दश-कंधर ॥ वारंवार शिरें निघती ॥ १७ ॥ राजाधिराज रघुनाथ ॥ क्षणेंक जाहला चिंताक्रांत ॥ तंव तो मातली सारथी बोलत ॥ राघवाप्रति ते काळीं ॥ १८ ॥ म्हणे अनंतब्रह्मांडनायका ॥ सकळचित्तपरीक्षका ॥ आधीं फोडोनि अमृतकूपिका ॥ मग मस्तकां पाडीं धरणीवरी ॥ १९ ॥ ऐसें मातली बोलत ॥ तयासी गौरवी जनकजामात ॥ मग बाण काढिला त्वरित ॥ अगस्तिदत्त मुख्य जो ॥ १२० ॥ जैसा देवांमाजी सहस्रनेयन[४५] ॥ कीं अंडजांमाजी विष्णुवेहन[४६] ॥ कांद्रवेयांत सहस्रवंदन[४७] ॥ तैसा बाण समर्थ तो ॥ २१ ॥ कीं वानरांमाजी हनुमंत ॥ कीं शास्त्रांमाजी वेदांत ॥ कीं नक्षत्रांसी झांकी औदित्य[४८] ॥ तैसा बाण समर्थ तो ॥ २२ ॥ शस्त्रांमाजी सुदर्शन ॥ तीर्थांमाजी प्रयाग

३८ चंद्रसूर्यांचे रथ. ३९ पहूं लागलीं. ४० पृथ्वी. ४१ अक्षरांचा जो क्रम तो. ४२ रथ. ४३ निबिड. ४४ सूर्यचक्राप्रमाणें तीक्ष्णाग्र. ४५ इंद्र. ४६ गरुड. ४७ कद्रूच्या पुत्रांत, सर्पांत. ४८ शेष. ४९ सूर्य.

पूर्ण ॥ नक्षत्रांमाजी अँत्रिनंदन ॥ तैसा बाण समर्थ तो ॥ २३ ॥ शेष कूर्म वराह धरणी ॥ सप्तसमुद्र शशी तरणी ॥ इतुक्यांचीं सत्वें काढूनी ॥ त्या बाणाठायीं ठेविलीं ॥ २४ ॥ अग्नि वायु शचीरमण ॥ चंडांशु कुबेर यम वरुण ॥ त्रिदशौक[५१]ऋषींचीं सामर्थ्यें पूर्ण ॥ त्या बाणाग्रीं वसती हो ॥ २५ ॥ तो तूणीरांतून काढितांचि बाण ॥ झांकले समस्तांचे नयन ॥ सहस्रसूर्यांचा प्रकाश पूर्ण ॥ भूमंडळीं दाटला ॥ २६ ॥ त्या बाणमुखीं ब्रह्मास्त्र ॥ स्थापिता जाहला राजीवनेत्र ॥ चापासी लाविला शर ॥ विषकंठवंद्यें ते समयीं ॥ २७ ॥ सीताधवें ते वेळां ॥ वरी आकर्ण[५२] बाण ओढिला ॥ ते वेळीं वाटलें लोकां सकळां ॥ काय मांडला कल्पांत ॥ २८ ॥ ऐसा बाण तो सबळ ॥ अत्यंत तेजाचा कल्लोळ ॥ शशी सूर्य लोपले सकळ ॥ सुरवर विमानें पळविती ॥ २९ ॥ जळीं रिता घट डळमळी ॥ तैसी पृथ्वी तेव्हां हेलावली[५३] ॥ प्रचंड वीर ते वेळीं ॥ मूर्च्छित पडों लागले ॥ १३० ॥ जगद्वंद्याचे कर्णीं वचन ॥ सांगतसे तेव्हां बाण ॥ कुपीसमवेत प्राण ॥ नेतों स्वामी दशकंठाचा ॥ ३१ ॥ असो रावणाचें वक्षःस्थळ ॥ लक्षोनियां तमालनीळ ॥ बाण सोडी तत्काळ ॥ ब्रह्मांडगोळ उचंबळला ॥ ३२ ॥ मिळोनियां असंख्य चेंपळा[५४] ॥ एकदांचि कड-कडोनि पडिल्या ॥ तैसाच बाण ते वेळां ॥ हृदयीं संचरला रावणाचे ॥ ३३ ॥ कुपीसहित वक्षःस्थळ ॥ बाण फोडोनि गेला तत्काळ ॥ हृदयीं छिद्र पडिलें विशाळ ॥ गवाक्षद्वारा[५५]सारिखें ॥ ३४ ॥ सवेंच परतला तो बाण ॥ रावणाचीं तीन शिरें छेदून ॥ रघुपतीचे भातां येऊन ॥ आपले आपण रिघाला ॥ ३५ ॥ उरलीं शिरें छेदावयातें ॥ आणिक शर काढिला रघुनाथें ॥ प्रार्थिलें तेव्हां ऊर्मिलाकांतें[५६] ॥ युद्ध आतां पुरे जी ॥ ३६ ॥ रावणें सोडिला प्राण ॥ त्यासी न शिवती तुझे बाण ॥ आतां जवळी जाऊन अवघेजण ॥ प्रेत पाहूं तयाचें ॥ ३७ ॥ धनुष्य तूणीरासहित ॥ सौमित्राजवळी राम देत ॥ आमुचे अवतारांचें कृत्य समस्त ॥ आजपासूनि संपलें ॥ ३८ ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ जयवाद्यें वाजविती सुरेश्वर ॥ दुंदुभींच्या नादें समग्र ॥ ब्रह्मांड तेव्हां दणाणलें ॥ ३९ ॥ रघुपतीवरी ते वेळां ॥ अद्भुत पुष्पवर्षाव जाहला ॥ गण गंधर्व किन्नरमेळां[५७] ॥ सुवेळाचळीं धांवत ॥ १४ ॥ संतोषले सकळ ऋषीश्वर ॥ आनंदें नाचती वानर ॥ त्रिभुवन आनंदलें थोर ॥ रामें रावण वधियेला ॥ ४१ ॥ रघुनाथाचे वीर सकळ ॥ रावणाभोंवते मिळाले तत्काळ ॥ जैसा वृक्ष उन्मळे समूळ ॥ तैसा विशाल पडियेला ॥ ४२ ॥ मुखावरी गृध्र बैसोन ॥ रावणाचे फोडिती नयन ॥ रक्त जातसे वाहून ॥ सैरावैरा चहूंकडे ॥ ४३ ॥ मुखीं शिरीं पडली धुळी ॥ मुकुट लोळती भूमंडळीं ॥ असो समस्त पाहती ते वेळीं ॥ बिभीषण दुःखें उचंबळला ॥ ४४ ॥ शरीर टाकिलें धरणीवरी ॥ हृदय पिटी दोन्ही करीं ॥ म्हणे दिशा शून्य याउपरी ॥ माझ्या पडल्या निर्धारें ॥ ४५ ॥ अगाध जयाचें प्रतापबळ ॥ क्रोधें जैसा वडवानळ ॥ चातुर्याचा सागर केवळ ॥ खंडे केलीं वेदांचीं ॥ ४६ ॥ परम जयाचें तप दारुण ॥ संतति संपत्तियुक्त पूर्ण ॥ जेणें देवांचे गर्व हरून ॥ बंदीं सर्व घातले ॥ ४७ ॥ जयाकारणें आदिपुरुषें ॥ अवतार घरिला राघवेशें ॥

५० चंद्र. ५१ देवऋषींचीं. ५२ कानापर्यंत. ५३ हालली. ५४ विजा. ५५ लहान खिडकीप्रमाणें. ५६ लक्ष्मणानें. ५७ देवांचे गवई. ५८ देवयोनिविशेष, कुबेरदूत.

अद्भुत कर्तव्य केलें लंकेशें ॥ निर्गुण आणिलें सगुणत्वा ॥ ४८ ॥ जो परम पुरुष निर्विकार ॥ तो प्रत्यक्ष दाविला साकार ॥ जानकी आणून उपकार ॥ केला आम्हांवरी रावणें ॥ ४९ ॥ जो वेदवंद्य राजीवनेत्र ॥ तो आमुचा जाहला प्राणमित्र ॥ हा रावणें केला उपकार ॥ सुग्रीवासहित आम्हांवरी ॥ १५० ॥ तो श्रीराम परब्रह्म चित्स्वरूप ॥ त्याचिया अवतारायें केलें रूप ॥ आपुला वाढविला प्रताप ॥ चंद्रार्कवरी रावणें ॥ ५१ ॥ श्रीराम म्हणे बिभीषणाप्रती ॥ तूं केवळ विवेकमूर्ती ॥ नाशिवंताचा शोक चित्तीं ॥ कायनिमित्त धरियेला ॥ ५२ ॥ हा जगडंबर पसारा केवळ ॥ मायिक जैसें मृगजळ ॥ कीं वंध्यावल्लीचें फळ ॥ मुळापासूनि लटिकेंचि ॥ ५३ ॥ पिंड ब्रह्मांड नाशिवंत ॥ आकार तेथें विकार सत्य ॥ तरी मुळींच जें अशाश्वत ॥ त्याचा शोक कासया ॥ ५४ ॥ ऐसें बोलतां रघुनंदन ॥ उगाच राहे बिभीषण ॥ तों सकळ स्त्रियांसहित धांवोन ॥ मंदोदरीही तेथें आली ॥ ५५ ॥ कवळूनियां पतीचें प्रेत ॥ मंदोदरी शोक करीत ॥ ऐशीं सहस्र स्त्रिया आल्या पिटीत ॥ वक्षःस्थळ धबधबां ॥ ५६ ॥ मंदोदरी म्हणे प्राणनाथा ॥ तुजविण आम्ही सर्व अनाथा ॥ जयलक्ष्मी देऊन रघुनाथा ॥ राम जामात पैं केला ॥ ५७ ॥ लंकागजमस्तकीं अद्भुत ॥ केसरी चढला हा रघुनाथ ॥ काढोनियां दिव्य मुक्त ॥ रणमंडळीं टाकिलें ॥ ५८ ॥ सौभाग्यतारूं लंकानाथ ॥ आजि बुडालें अकस्मात ॥ कीं वेदांचें सांठवण समस्त ॥ फुटलें आजि रणांगणीं ॥ ५९ ॥ सीतेच्या मिषेंकरून ॥ जवळी आणिला रघुनंदन ॥ बाहेर विरोध अंतरीं भजन ॥ दशकंधरें पैं केलें ॥ १६० ॥ फणसासी कांटे दिसती वरी ॥ परी अत्यंत गोड अंतरीं ॥ तैसीच रावणें केली परी ॥ विरोध बाहेर दाऊनियां ॥ ६१ ॥ ऐसी मंदोदरी शोक करीत ॥ भोंवते विलोकिती समस्त ॥ मग बिभीषणासी रघुनाथ ॥ काय बोलता जाहला ॥ ६२ ॥ ज्येष्ठबंधूची राणी ॥ मंदोदरी हे ज्ञानखाणी ॥ पतिव्रतांमाजी शिरोमणी ॥ इचे स्मरणीं दोष नुरे ॥ ६३ ॥ इचें प्रातःकाळीं करितां स्मरण ॥ उद्धरतील पापीजन ॥ बिभीषण तूं करीं धरून ॥ निजमंदिराप्रति धाडीं ॥ ६४ ॥ ऐसें बोलतां रघुनंदन ॥ मयजेपासीं आला बिभीषण ॥ तियेतें स्वकरीं धरून ॥ म्हणे माये चाल सदनाप्रति ॥ ६५ ॥ मयजेस म्हणे चापपाणी ॥ माये तूं ज्ञानविचारखाणी ॥ मुळीं दृष्टी घालोनी ॥ अद्वयज्ञानें पाहें पां ॥ ६६ ॥ अहंकार तितुका नाशिवंत ॥ आत्मस्वरूप पूर्ण शाश्वत ॥ ऐसें जाणोन किमर्थ ॥ शोक व्यर्थ करावा ॥ ६७ ॥ ऐसें बोलतां सच्चिदानंद ॥ मयकन्या राहिली उगीच स्तब्ध ॥ नमोनि रामचरणारविंद ॥ निजधामा चालिली ॥ ६८ ॥ मयकन्येसह सर्व अंगना ॥ बिभीषणें पाठविल्या सदना ॥ मग पुसोनि रघुनंदना ॥ राजदेह उचलिला ॥ ६९ ॥ सर्वांत सरितापावन - ॥ सिंधुसंगमीं प्रेत नेऊन ॥ प्रळयवन्हि चेतवून ॥ आंत घातलें कलेवरा ॥ १७० ॥ तेथेंच उत्तरक्रिया समस्त ॥ स्वयें ब्रह्मदेव सांगत ॥ तैसी बिभीषण करीत ॥ शास्त्ररीतीप्रमाणें ॥ ७१ ॥ असो त्यावरी बिभीषण ॥ सुवेळेसी आला परतोन ॥ तों लंकेचे प्रजाजन ॥ बिभीषणासी भेटों आले ॥ ७२ ॥ विद्युज्जिव्ह प्रधान ॥ उरलें सकळ राक्षससैन्य ॥ श्रीरामापुढें येऊन ॥

लोटांगणें घालिती ॥ ७३ ॥ काष्ठ भस्म होतां समग्र ॥ विझोनि जाय वैश्वानर ॥ तैसें समस्त विरालें वैर ॥ रावण रणीं पडतांचि ॥ ७४ ॥ सूर्योदयीं निरसे तम ॥ ज्ञानोदयीं निरसे अज्ञान ॥ तैसा पडतांचि रावण ॥ अणुमात्र वैर नसे ॥ ७५ ॥ सुवेळेसी आले रजनीचर ॥ म्हणती आम्ही बिभीषणाचे आज्ञाधार ॥ लंकेंत जाऊन वानर ॥ पाहती नगर चहूंकडे ॥ ७६ ॥ असो यावरी बिभीषण ॥ श्रीरामापुढें कर जोडून ॥ मृदु मंजुळ वचन ॥ प्रेमयुक्त बोलतसे ॥ ७७ ॥ म्हणे राजीवदलनयना ॥ पुराणपुरुषा सीतारमणा ॥ ब्रह्मांडनायका गुणसंपन्ना ॥ लंकेसी आतां चलावें ॥ ७८ ॥ विरिंचिहस्तेनिर्मित[५९] नगर ॥ आपण दृष्टीं पाहावें समग्र ॥ मग घेऊनि सीता सुंदर ॥ अयोध्येसी जाइंजे ॥ ७९ ॥ ऐसें बिभीषण बोले वचन ॥ तो जगद्गुरु सुहास्यवदन ॥ म्हणे तुज लंका दिधली दान ॥ तेथें आगमन आमुचें नव्हे ॥ १८० ॥ जैसें केलिया कन्यादान ॥ तियेचे गृहीं न घेती अन्न ॥ विप्रासी दिधलें दिव्य सदन ॥ तेथें आपण न जावें ॥ ८१ ॥ सत्पात्रीं दिधलें गोदान ॥ मग तिचें दुग्ध घ्यावें काढून ॥ तैसें लंकेंत माझें आगमन ॥ सर्वाथही न घडेचि ॥ ८२ ॥ त्यावरी भरतभेटीविण ॥ मी न करींच मंगलस्नान ॥ नानाभोग तांबूल भोजन ॥ व्रत संपूर्ण धरिलें असे ॥ ८३ ॥ मग सौमित्र आणि मित्रपुत्र[६०] ॥ तयांस म्हणे शीतपत्रनेत्र[६१] ॥ तुम्हीं वानर घेऊन सर्वत्र ॥ लंकेप्रति जाइंजे ॥ ८४ ॥ सुमुहूर्त पाहूनि सत्वर ॥ धरावें बिभीषणावरी छत्र ॥ बंदींचे राजे देव समग्र ॥ मान देऊनि मुक्त करावे ॥ ८५ ॥ बहुतांचिया वस्तु हरूनी ॥ रावणें ठेविल्या लंकाभुवनीं ॥ ज्यांच्या वस्तु त्यांलागूनी ॥ देऊनि सर्वां सुखी करा ॥ ८६ ॥ ऐशी आज्ञा होतां सत्वर ॥ चालिले सुग्रीव सौमित्र ॥ बिभीषण नमस्कार ॥ घाली साष्टांग रामातें ॥ ८७ ॥ श्रीराम बोले आशीर्वचन ॥ जैसा बळी ध्रुव उपमन्य ॥ त्यांचे पंक्तींत तूं बिभीषण ॥ चिरंजीव राहें सुखी ॥ ८८ ॥ आज्ञा घेऊन ते अवसरीं ॥ प्रवेशले लंकेभीतरी ॥ मुहूर्त पाहून झडकरी ॥ सर्व सामग्री सिद्ध केली ॥ ८९ ॥ वेदघोषमंत्रेंकरून ॥ सिंहासनीं बैसविला बिभीषण ॥ दिव्य छत्रें वरी धरून ॥ सोहळा बहुत केला हो ॥ १९० ॥ बहुत वस्त्रें भूषणें देऊन ॥ गौरविले सुग्रीव लक्ष्मण ॥ यावरी सकळ वानरसैन्य ॥ वस्त्राभरणीं गौरविलें ॥ ९१ ॥ मग लंकेची समस्त रचना ॥ दाविली सुग्रीवलक्ष्मणां ॥ पाहतां धणी[६२] न पुरे नयना ॥ आनंद मना जाहला ॥ ९२ ॥ असो आज्ञा मागोनि बिभीषणासी ॥ परतोन आले सुवेळेसी ॥ जाहलें वर्तमान रामासी ॥ सांगते झाले तेधवां ॥ ९३ ॥ तों इंद्र आणि ब्रह्मा रुद्र ॥ तेतीस कोटी देव समग्र ॥ दृष्टीं पहावया रघुवीर ॥ सुवेळाचळीं उतरले ॥ ९४ ॥ अष्ट वसु एकादश रुद्र ॥ मरुद्गणादि[६३] द्वादश मित्र ॥ गण गंधर्व यक्ष[६४] किंनर ॥ सिद्धचारण[६५] उतरले ॥ ९५ ॥ अष्ट नायिका अष्ट दिक्पाळ ॥ अठ्ठ्यायशीं सहस्र ऋषिमंडळ ॥ छप्पन्न देशींचे भूपाळ ॥ रामदर्शना धांविन्नले ॥ ९६ ॥ सप्तद्वीपनवखंडींचे जन ॥ पाताळवासी कौंद्रवेयगण[६६] ॥ उपदेव कर्मदेव संपूर्ण ॥ सुवेळेसी पातले ॥ ९७ ॥ असंख्य वाद्यांचा गजर ॥ दिशा दणाणती समग्र ॥ असो

५९ अग्नि. ६० ब्रह्मदेवानें आपल्या हातीं निर्माण केलेलें. ६१ सुग्रीव. ६२ कमलनेत्र राम. ६३ तृप्ति. ६४ मरुद्गण ४९ माहेत. ६५ कुबेरदूत. ६६ देवांचे स्तुतिपाठक. ६७ सर्पांचे समुदाय.

सुवेळेसी सुरेश्वर ॥ चहूंकडून मिळाले ॥ ९८ ॥ देवभारीं[६८] मुरुय तिघेजण ॥ ब्रह्मा इंद्र आणि ईशान[६९] ॥ परी कोणी कैसा रघुनंदन ॥ देखिला तें सांगतों ॥ ९९ ॥ दृष्टीं देखतां रघुवीर ॥ मनांत भावी अंपर्णावर[७०] ॥ माझे हृदयीं तो सीतावर ॥ नामें शीतळ जाहलों मी ॥२००॥ त्यावरी सत्यलोकनायक ॥ तेणें देखोन रावणांतक ॥ त्यास भासला हा माझा जनक ॥ क्षीराब्धिवासी जगदात्मा ॥ १ ॥ इंद्रासी वाटलें ते अवसरीं ॥ पाठिराखा आमुचा कैवारी ॥ ऋषी भाविती अंतरीं ॥ आराध्य दैवत आमुचें ॥ २ ॥ कोटी कंदर्पांचा जनिता[७१] ॥ ऐसें सुरगण भाविती तत्त्वतां ॥ पूर्ण ब्रह्म हें तद्भक्तां ॥ हृदयीं भासलेंसे ते काळीं ॥ ३ ॥ असो सदाशिव देखोनी ॥ सीतानाथ आनंदला मनीं ॥ आसन सोडूनि चापपाणी ॥ सामोरा पुढें धांवत ॥ ४ ॥ त्रिपुरारीच्या चरणांवरी ॥ नमन जों करी रावणारी ॥ तों शिवें धरूनि वरच्यावरी ॥ दृढ हृदयीं आलिंगिला ॥ ५ ॥ श्रीराम[७२] जिमूतनीलवर्ण[७३] ॥ कर्पूरगौर त्रिलोचन ॥ इंदुमंडळीं दिसे मृगचिन्ह ॥ तैसे शोभले ते काळीं ॥ ६ ॥ क्षीराब्धीमाजी नीलवर्ण ॥ शोभे जेवीं आदिनारायण ॥ कीं जान्हवीजळीं यमुनाजीवन ॥ कृष्णवर्ण मिसळलें ॥ ७ ॥ कीं भक्तांचे संपुष्टांत[७४] ॥ शालिग्राममूर्ति शोभत ॥ तैसे शिव आणि सीतानाथ ॥ शोभले तेव्हां आलिंगनीं ॥ ८ ॥ सेवावया सितोत्पलमकरंद[७५] ॥ प्रीतीनें संघटे जैसा मिलिंद ॥ तैसा शिव आनंदकंद ॥ सिताजीवनें आलिंगिला ॥ ९ ॥ ते एक असती दोघेजण ॥ शिव विष्णु नामेंचि भिन्न ॥ अभेद अनाम निर्गुण ॥ तेथींचे कोंभ असती हे ॥ २१० ॥ असो यावरी कमलासन ॥ देता जाहला आलिंगन ॥ माझा पिता हा नारायण ॥ म्हणूनि हृदयीं धरियेला ॥ ११ ॥ याउपरी[७६] दशशतनेत्र ॥ घाली साष्टांग नमस्कार ॥ तप्तकांचनवर्ण सुंदर ॥ रघुवीर उठवी तयातें ॥ १२ ॥ सहस्रनेत्रासी चापपाणी ॥ हृदयीं धरी प्रीतीकरूनी ॥ मग सुरांस कैवल्यदानी ॥ भेटता जाहला आनंदें ॥ १३ ॥ असंख्य स्वरूपें देखोन ॥ देव ऋषी थोर लहान ॥ समस्तांसीं सीताजीवन ॥ समसमान भेटत ॥ १४ ॥ असो सकळ देवांसमवेत ॥ सभेसी बैसला रघुनाथ ॥ एकचि वाद्यांचा गजर होत ॥ अष्टनायिका नाचती ॥ १५ ॥ वीणा घेऊन सत्वर ॥ गाती नारद आणि तुंबर[७७] ॥ सामगायन परिकर ॥ ऐके रघुवीर सादरें ॥ १६ ॥ रामविजय ग्रंथ पावन ॥ युद्धकांड संपलें येथून ॥ उत्तरकांड गहन ॥ आतां येथोनि अवधारा ॥ १७॥ मुकुटावरी मणि शोभत ॥ तेवीं उत्तरकांड गोड बहुत ॥ कीं देवालयावरी झळकत ॥ कळस जैसा सतेज ॥ १८ ॥ भोजनांतीं दध्योदन[७८] ॥ कीं श्रवणांतीं मनन ॥ तपाचे अंतीं फळ पूर्ण ॥ उत्तरकांड रसिक तैसें ॥ १९ ॥ आरंभीं कथा सुरस तेथ ॥ भेटतील जानकीरघुनाथ ॥ मूळें जाईल हनुमंत ॥ राघवआज्ञा सेवूनियां ॥ २२० ॥ ती कथा गोड बहुत ॥ श्रवण करोत श्रीरामभक्त ॥ जे ब्रह्मानंदें डुलत ॥ प्रेमळ चित्त जयांचें ॥ २१ ॥ श्रीमद्भीमातटविलासिया ॥ ब्रह्मानंदागुरुवर्या ॥ श्रीधर अनन्यशरण पायां ॥ कायावाचामनेंसीं ॥ २२ ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत पंडित चतुर ॥ त्रयस्त्रिंशत्तमोध्याय गोड हा ॥ २२३ ॥ अ० ॥ ३३ ॥ इति युद्धकांड समाप्त ॥

६८ देवसमुदायांत. ६९ महादेव. ७० पार्वतीपति शंकर. ७१ मदनांचा. ७२ पिता. ७३ मेघासारखा श्यामवर्ण. ७४ पूजेच्या मूर्ति ठेवलेल्या पेटींत. ७५ पांढऱ्या कमळाचा सुगंध. ७६ इंद्र. ७७ गंधर्वविशेष, देवांचा गवई. ७८ दहींभात. ७९ आमंत्रण.


३४

श्रीगणेशाय नमः ॥ जय जय जगद्वंद्या वेदसारा ॥ प्रणवरूपा विश्वंभरा ॥ करुणार्णवा परम उदारा ॥ राघवेंद्रा श्रीरामा ॥ १ ॥ मन्मथदहनहृदयरत्ना ॥ चतुरास्यजनका जनरंजना ॥ मंगलभगिनीमनमोहना ॥ जगज्जीवना भक्तवरदा ॥ २ ॥ लागतां प्रळयरूप आघात ॥ शरीरप्रारब्धें येती अनर्थ ॥ तेथें खेद न मानी चित्त ॥ सीतावल्लभा करीं ऐसें ॥ ३ ॥ बोध वसो हृदयीं अनुदिनी ॥ शांति क्षमा दया उन्मनी ॥ या विलसोत मानससदनीं ॥ ऐसें करी श्रीरामा ॥ ४ ॥ विविध आकृती चराचररचना ॥ तुझीं स्वरूपें भासोत नयना ॥ वमन देखोन वीट ये मना ॥ विषयीं वासना न रमो तैसी ॥ ५ ॥ श्रवणकीर्तनादिं नवविधा भक्ती ॥ सत्समागम घडो अहोरात्रीं ॥ तुझीं लीलाचरित्रें ऐकतां सीतापती ॥ चित्तवृत्ति आनंदो ॥ ६ ॥ माझें मन आणि बुद्धि पाहीं ॥ वांकी नेपुरें होऊत पायीं ॥ प्रेमपीतांबर सर्वदाही ॥ जघनीं विलसो तूझिया ॥ ७ ॥ माझें स्थूल देहलिंग देखा ॥ तुझे पायीं विलसोत पादुका ॥ ताटिकांतका अयोध्यानायका ॥ सर्वदा करीं ऐसेंचि ॥ ८ ॥ माझिया पंचप्राणांचा मेळा ॥ यांचीं कुंडलें पदकमाळा ॥ ब्रह्मानंदा भक्तवत्सला ॥ सर्वदा करीं ऐसेंचि ॥ ९ ॥ उत्तरकांड हेचि भागीरथी ॥ प्रवाहरूपें चाले सरस्वती ॥ तरी दृष्टांतक्षेत्रें विराजती ॥ एकाहून एक विशेष ॥ १० ॥ असो गतकथाध्यायीं दशकंधर ॥ वधोनि विजयी जाहला रघुवीर ॥ याउपरी सकळ सुरवर ॥ श्रीरामदर्शना पातले ॥ ११ ॥ सुरांची दाटी जाहली बहुत ॥ मुकुटांसी मुकुट आदळत ॥ रत्नें झळकती अमित ॥ भगणांहुनी तेजागळीं ॥ १२ ॥ गण गंधर्व यक्ष किन्नर ॥ सुरासुर नर वानर ॥ सुवेळाचळीं जाहले एकत्र ॥ गजर थोर होतसे ॥ १३ ॥ तों मारुतीचे मनांत ॥ केव्हां आज्ञा देईल रघुनाथ ॥ कीं जानकी आणावी त्वरित ॥ रावणांतक वदेल केव्हां ॥ १४ ॥ क्षणक्षणांत वायुकुमर ॥ विलोकी राघववदनचंद्र ॥ तों मारुतीसी अयोध्याविहार ॥ आज्ञापिता जाहला ॥ १५ ॥ म्हणे प्राणसखया हनुमंता ॥ सत्वर जाऊन गुणभरिता ॥ जानकी सौभाग्यसरिता ॥ भेटवीं आतां मजलागीं ॥ १६ ॥ बिभीषणासी सांगून ॥ सीतेसी घालिंजे मंगलस्नान ॥ वस्त्रें अलंकार देऊन ॥ सुखासनारूढ आणिंजे ॥ १७ ॥ ऐसें ऐकतां हनुमंत ॥ निराळपंथें चालिला त्वरित ॥ जैसें तान्हें वत्स काननांत ॥ जाय शोधीत धेनूसी ॥ १८ ॥ मानसाप्रति मरांळ जात ॥ कीं जीवन शोधी तृषाक्रांत ॥ कीं झेंपावे विनतासुत ॥ दर्शना जातां इंदिरे"च्या ॥ १९ ॥ तैसाच अशोकवनांत ॥ प्रवेशता जाहला हनुमंत ॥ साष्टांगें शीघ्र प्रणिपात ॥ जानकीस घातला ॥ २० ॥ तान्हें बाळ चुकोनि गेलें ॥ तें जननीतें अकस्मात भेटलें ॥ कीं हरपलें रत्न सांपडलें ॥ तैसें वाटलें जानकीतें ॥ २१ ॥ कीं प्राण जातां निःशेष ॥ वदनीं घालिजे सुधारस ॥ तैसी देखतां मारुतीस ॥ सीता परम संतोषली ॥ २२ ॥ कर जोडोनि हनुमंत ॥ सीतेपुढें उभा राहत ॥ म्हणे सुखी आहे अयोध्यानाथ ॥ सेनेसहित सुवेळे ॥ २३ ॥ कंटक दशकंठ वधून ॥ राज्यीं स्थापिला बिभीषण ॥ बंदींचे

१ ओंकाररूपा. २ मदनाला जाळणाऱ्या शंकराच्या हृदयांतील रत्ना, श्रीरामा. ३ ब्रह्मदेवाचा पिता. ४ देहप्रारब्धानें. ५ पांचवी अवस्था. ६ नक्षत्रसमुदाय. ७ शुभकारक ज्ञान. ८ पालखींतून. ९ आकाशमार्गें. १० हंस. ११ लक्ष्मीच्या.

देव सुटून ॥ भेटों आले रघुत्तमा ॥ २४ ॥ ऐसे सांगतां हनुमंत ॥ जगन्माता काय बोलत ॥ बा रे वचन तुझें गोड बहुत ॥ अमृताहून आगळे ॥ २५ ॥ प्राणसखया तूं यथार्थ ॥ मजकारणें श्रमलासी बहुत ॥ तुझे उपकार अमित ॥ अयोध्यानाथ जाणतसे ॥ २६ ॥ षण्मास मीं कंठिलें अद्भुत ॥ आतां भेटवीं रघुनाथ ॥ ऐसें ऐकतां हनुमंत ॥ बिभीषणसदनीं प्रवेशला ॥ २७ ॥ सांगे सकळ वर्तमान ॥ सीतेसी करवून मंगलस्नान ॥ वस्त्रें भूषणें देऊन ॥ चाल घेऊन सुवेळे ॥ २८ ॥ ऐकोनि आनंदे बिभीषण ॥ मारुतीसी करीं धरून ॥ प्रवेशला अशोकवन ॥ सीतादर्शन घ्यावया ॥ २९ ॥ चिरंजीव दोघेजण ॥ रघुपतीचे प्रियप्राण ॥ जानकीजवळ येऊन ॥ बिभीषणें लोटांगण घातलें ॥ ३० ॥ जगन्माता बोले वचन ॥ जोंवरी शशी चंडकिरण ॥ तोंवरी चिरंजीव होऊन ॥ राज्य करीं लंकेचें ॥ ३१ ॥ बिभीषण जोडूनि कर ॥ उभा राहे सीतेसमोर ॥ जैसा अपर्णेजवळी कुमारें[१२] ॥ कीं फरशधर[१३] रेणुकेपासीं ॥ ३२ ॥ बिभीषण म्हणे जगन्माते ॥ प्रणवरूपिणि[१४] सद्गुणसरिते ॥ अनादिसिद्धे अपरिमिते ॥ आदिमाये इंदिरे ॥ ३३ ॥ तुवां आदिपुरुष[१५] जागा करून ॥ अनंत ब्रह्मांडें रचिलीं पूर्ण ॥ ब्रह्मा विष्णु उमारमण ॥ तुझीं बाळें तिन्हीं हीं ॥ ३४ ॥ उत्पत्ति स्थिति पालन ॥ करविसी तिघांकडोन ॥ इच्छा परततां पूर्ण ॥ सवेंचि गोळा करिसी तूं ॥ ३५ ॥ तुझें तुजचि सर्व ठाउकें ॥ नेणतपण धरिलें कौतुकें ॥ रावणें तुज आणिलें लंके ॥ हेही इच्छा तुझीच पैं ॥ ३६ ॥ बंदीचे सुटले सुरवर[१६] ॥ मारुति सुग्रीवादि वानर ॥ आम्हां सर्वां जाहला राम मित्र ॥ हा तों उपकार तुझाचि ॥ ३७ ॥ यावरी करून मंगलस्नान ॥ वस्त्रें भूषणें अंगीकारून ॥ सुवेळेसी पाहावया रघुनंदन ॥ शीघ्र आतां चलावें ॥ ३८ ॥ जगन्माता बोले वचन ॥ रामें न करितां मंगलस्नान ॥ म्यां आधीं करितां पूर्ण ॥ वाटे दूषण परम हें ॥ ३९ ॥ पतिव्रतेचा ऐसा होय धर्म ॥ पतीविण न करावा कार्यउपक्रम[१७] ॥ रघुपतीची आज्ञा नसतां अधर्म ॥ होय सर्व आम्हांसीं ॥ ४० ॥ मारुति म्हणे जगन्माते ॥ आज्ञा दिघली रघुनाथें ॥ दुजें बिभीषणवचनातें ॥ मान दिधला पाहिजे ॥ ४१ ॥ अवश्य म्हणे जनकनंदिनी ॥ तंव ते बिभीषणाची राणी ॥ सकळ उपचार[१८] घेउनी ॥ अशोकवना पातली ॥ ४२ ॥ सरमा त्रिजटा दोघीजणी ॥ सीतेच्या प्राणसांगातिणी ॥ दोघींनीं जानकीची वेणी ॥ उकलिली तेधवां ॥ ४३ ॥ हनुमंत आणि बिभीषण ॥ बैसले एकीकडे जाऊन ॥ सरमेनें जानकीचें पूजन ॥ आरंभिलें स्वहस्तें ॥ ४४ ॥ उत्तम पट्टदुकूल[१९] आणूनी ॥ सीतेसी दिधली पडदणी ॥ मणिमय चौरंग घालोनी ॥ पाय धूतले सरमेनें ॥ ४५ ॥ सुगंध तेल ते वेळीं ॥ त्रिजटा सीतेचे मस्तकीं घाली ॥ आशीर्वाद वचनें बोलिली ॥ स्नेहआदरेंकरूनि ॥ ४६ ॥ अनंत कल्याण कल्पपर्यंत ॥ दोघें नांदा आनंदभरित ॥ मृगमदाचें[२०] उटणें लावीत ॥ सरमा आपण स्वहस्तें ॥ ४७ ॥ मळी काढितां म्हणे माये ॥ कृश जाहलीस जनकतनये ॥ असो उष्णोदक लवलाहें ॥ स्नानालागीं आणिलें ॥ ४८ ॥ त्रिजटा उदक घाली

१२ कार्तिकस्वामी, शिवपुत्र. १३ परशुराम. १४ ओंकार. १५ ईश्वर, परमात्मा. १६ देव. १७ आरंभ. १८ साहित्य. १९ पाटाचे. पीतांबर इत्यादि उंची रेशमी वस्त्र. २० कस्तूरीचें. ४८० धार धार. ८१ वैराग्यरूप हिऱ्याचीं खाण. ८२ पुष्प. ८३ वैराग्याचा.

सवेग ॥ सरमा घांसी सीतेचें अंग ॥ बिभीषणें अलंकार सुरंग ॥ अमोलिक पाठविले ॥ ४९ ॥ प्रळयविजेहून तेजागळी ॥ [२१]चीर नेसली जनकबाळी ॥ दिव्य अलंकार लेइली ॥ जे त्रिभुवनीं दुर्लभ ॥ ५० ॥ सूर्यमंडलातुल्य सुरेख ॥ कर्णी [२२]वोप देती [२३]तांटंक ॥ सर्व अलंकारांची अधिक ॥ कांति फांके दशदिशां ॥ ५१ ॥ कुंकुममळवट लाविला भाळीं ॥ मध्यें सुवास कस्तूरी रेखिली ॥ दिव्य सुगंध ते काळीं ॥ सर्वांगीं चर्ची त्रिजटा ॥ ५२ ॥ दिव्य फळांनीं ते काळीं ॥ जानकीची ओटी भरिली ॥ सरमा म्हणे मुखीं घालीं ॥ जननी फळ एक आतां ॥ ५३ ॥ मग तें अमृतफळ सुस्वाद ॥ सुंदर आणि बहु सुगंध ॥ बिभीषण-मारुतींस प्रसाद ॥ जानकीनें दीधला ॥ ५४ ॥ सरमा आणि त्रिजटेप्रती ॥ फळें दिघलीं परम प्रीती ॥ मग एक फळ घेऊनि हातीं ॥ वदनीं घातलें जानकीनें ॥ ५५ ॥ सवेंच प्रक्षाळिलें वदन ॥ तों जवळी आला बिभीषण ॥ दिव्य मणिमय हार आणून ॥ जानकीपुढें ठेविला ॥ ५६ ॥ त्रिभुवनमोल एक मणी ॥ रावणें ठेविला होता कोशसदनीं ॥ तो बिभीषणें देतां प्रीतीकरूनी ॥ गळां घाली जगन्माता ॥ ५७ ॥ तों लंकेचें सकळ दळ ॥ सिद्ध जाहलें तत्काळ ॥ अठरा अक्षौहिणी वाद्यें प्रबळ ॥ वाजों लागलीं तेधवां ॥ ५८ ॥ रत्नजडित शिबिका आणोनी ॥ सीतेपुढें ठेविली ते क्षणीं ॥ बिभीषण मारुती लागती चरणीं ॥ [२४]सुखासनीं बैसावें ॥ ५९ ॥ सरमा त्रिजटा यांचे कंठीं ॥ जानकी घाली दृढ मिठी ॥ म्हणे प्राणसख्यांनो दृष्टीं ॥ तुम्हांस कधीं मी देखेन ॥ ६० ॥ सरमा त्रिजटेचे नयनीं ॥ अश्रु आले ते क्षणीं ॥ रुदन करिती स्फुंदस्फुंदोनी ॥ चरणीं मिठी घालिती ॥ ६१ ॥ मग आपुले [२५]कुरळ केशोंकरून ॥ झाडिले जानकीचे चरण ॥ पालखींत बैसविती नेऊन ॥ सद्गद होऊनि बोलती ॥ ६२ ॥ अवो प्राणसखये जनकनंदिनी ॥ आम्हां न विसरावें मनींहूनी ॥ सीता म्हणे उपकार साजणी ॥ तुमचे न विसरें कदाही ॥ ६३ ॥ तों शिबिकेवरी आवरण ॥ बिभीषणें घातलें पूर्ण ॥ जैसा परीक्षक दिव्य रत्न ॥ पेटीमाजी रक्षीतसे ॥ ६४ ॥ कीं हृदयींचें ज्ञान संत ॥ बाहेर न दाविती लोकांत ॥ कीं धनाढ्य जैसा आच्छादीत ॥ निजधन आपुलें सर्वदा ॥ ६५ ॥ अति उल्हासें वायुसुत ॥ सव्यभागीं जवळी चालत ॥ मध्यभागीं लंकानाथ ॥ बिभीषण जात त्वरेनें ॥ ६६ ॥ वहनवाहक बहुत वेगें ॥ चालिले सुवेळेचे मार्गें ॥ बिभीषण हनुमंत दोघे ॥ हात लाविती वहनासी ॥ ६७ ॥ सेना चालिली अद्भुत ॥ पुढें वेत्रें-[२६]पाणी धांवत ॥ वाद्यांचा गजर होत ॥ दाटी बहुत जाहली ॥ ६८ ॥ स्कंद आणि गजवदन ॥ [२७]अंपर्णेजवळी दोघेजण ॥ तैसे मारुती आणि बिभीषण ॥ प्रेमरंगें धांवती ॥ ६९ ॥ रामसेनेंत प्रवेशले सत्वर ॥ तों जाहला एकचि गजर ॥ पाहावया धांवती वानर ॥ त्यांस वेत्रधार मारिती ॥ ७० ॥ [२८]लंकापतीसी अयोध्याविहारी ॥ सांगून पाठवी ते अवसरीं ॥ आपुले वेत्रधार आवरीं ॥ वानरांतें मारिती जे ॥ ७१ ॥ या सीतेलागीं कष्ट ॥ वानरीं केले उत्कृष्ट ॥ वहन उघडोनि स्पष्ट ॥ सीता कपींसी पाहूं द्या ॥ ७२ ॥ जवळी असतां प्राण-

२१ नाजुक वस्त्र, पैठणी. २२ तेज. २३ कर्णभूषणें, तानवडें. २४ शिबिकेंत. २५ जो नीट केला असतां त्याचें वेंटाळें होतें असा सुशोभित केस. २६ छडीदार. २७ पार्वतीजवळ. २८ बिभीषणाला.

नाथ ॥ स्त्री उघडी सर्व जनांत ॥ वागतां दोष यथार्थ ॥ सर्वथा नाहीं तियेसी ॥ ७३ ॥ ऐसी आज्ञा होतां ते काळीं ॥ शिबिका उतरिली भूमंडळीं ॥ आवरण काढितां जनकबाळी ॥ सर्वांनीं देखिली एकदां ॥ ७४ ॥ वहनाबाहेर निघोनी ॥ त्रिभुवनपतीची ते राणी ॥ उघडली जैसी रत्नखाणी ॥ वैदेहतनयेसी उभी तैसी ॥ ७५ ॥ पाहतां जियेचे मुखकमळा ॥ लोपती कोटी मृगांककळा ॥ कीं लावण्यसागरींचा उमाळा ॥ रूपा आला ते ठायीं ॥ ७६ ॥ यावरी ते जगज्जननी ॥ आदिमाया विश्वखाणी ॥ पाहते जाहले भक्तशिरोमणी ॥ जे कां अवतार देवांचे ॥ ७७ ॥ जानकी देखतां साचार ॥ देवगण गंधर्व असुर ॥ मानसीं विकल्प साचार ॥ करिते जाहले तेधवा ॥ ७८ ॥ एवढें जिचें स्वरूप सुंदर ॥ परम दुरात्मा दशकंधर ॥ षण्मासपर्यंत दुराचार ॥ उगा कैसा असेल ॥ ७९ ॥ तो जगदात्मा रघुवीर ॥ जाणोनि सर्वांचें अंतर ॥ जानकीप्रती उत्तर ॥ काय बोलता जाहला ॥ ८० ॥ वाद्यें वाजतां राहिलीं ॥ तटस्थ जाहली सुरमंडळी ॥ रीस वानर सकळी ॥ निवांतरूप ऐकती ॥ ८१ ॥ व्यंकटी भृकुटी करूनि क्रूर ॥ सीतेसी विलोकी रघुवीर ॥ म्हणे आपुला तूंचि विचार ॥ पाहें सत्वर येथोनी ॥ ८२ ॥ तुज घेऊन गेला असुर ॥ हा अपवाद वाढला दुर्धर ॥ तो निरसला समग्र ॥ सोडवून तुज आणिलें ॥ ८३ ॥ उरावरील उतरला पाषाण ॥ कीं रोग गुल्म गेले विरोन ॥ कीं जन्मांधासी आले नयन ॥ तेवीं आजि सुख वाटे ॥ ८४ ॥ तुज आम्ही सोडवून ॥ साच केलें आपुलें वचन ॥ आतां करावें वेगें गमन ॥ मना आवडे तिकडेचि ॥ ८५ ॥ मी सर्व संग सोडोनी ॥ उदास विचरेन काननीं ॥ कामकामना कांहीं मनीं ॥ उरली नाहीं आमुच्या ॥ ८६ ॥ आमुची वार्ता टाकोनि समस्त ॥ मना आवडे तो धरीं पंथ ॥ अथवा भलता नृपनाथ ॥ वरीं तुज आवडे तो ॥ ८७ ॥ उभें राहून व्यर्थ कायी ॥ तूं विचरें भलते ठायीं ॥ मोकळ्या तुज दिशा दाही ॥ केल्या आम्ही एघवां ॥ ८८ ॥ मज कैकयीनें घातलें बाहेर ॥ नाहीं सिंहासन आतपत्र ॥ सेवूनियां घोर कांतारें ॥ वनेचर सखे केले म्यां ॥ ८९ ॥ भक्षावया न मिळे अन्न ॥ राहें कंदमूळें सेवून ॥ वल्कलें परिधान करून ॥ तृणासनीं निजतसें ॥ ९० ॥ याकरितां सीते पाहीं ॥ आमुचे संगतीं सुख नाहीं ॥ तरी तूं भलते पंथें जाई ॥ व्यर्थ काय राहूनियां ॥ ९१ ॥ सकळ उपाधि टाकून ॥ मी राहिलों निरंजनीं येऊन ॥ आम्हांसी नावडे दुजेपण ॥ प्रपंचवासना नसेचि ॥ ९२ ॥ ऐसें बोलतां रघुनाथ ॥ सीतेसी वाटला कल्पांत ॥ कीं शब्दरूपें शस्त्र तप्त ॥ अकस्मात जेवीं खोंचलें ॥ ९३ ॥ शब्द नव्हे ते सौदामिनी ॥ अंगावरी पडे ते क्षणीं ॥ कीं शब्दसांडसेंकरूनी ॥ तोडिलें वाटे शरीर ॥ ९४ ॥ परम गर्हिवरें दाटोनी ॥ बोले तेव्हां मंगळभंगिनी ॥ अग्नींत करपे कमळिणी ॥ तैसें तेज उतरलें ॥ ९५ ॥ नयनीं सुटल्या अश्रुधारा ॥ म्हणे जगद्वंद्या श्रीरामचंद्रा ॥ आनंदकंदा गुणसमुद्रा ॥ करा माझा वध आतां ॥ ९६ ॥ षण्मास कष्टी होऊन ॥ आजि दृष्टीं देखिले

२९ सीता. ३० चंद्राच्या कळा. ३१ वांकडो. ३२ आंगीं दुगण नसतां जो खोटा आरोप येतो तो. ३३ विषयभोगवासना. ३४ फीर. ३५ अरण्य. ३६ वानर. ३७ वृक्षाच्या साली. ३८ पक्षांतीं. अरण्यांत. ३९ बीज.

रामचरण ॥ तों पूर्वकर्म माझें गहन ॥ आडवें विघ्न हें आलें ॥ ९७ ॥ आनंदाचा उगवला दिन ॥ म्हणोनि वाटलें समाधान ॥ परी कर्मांचें थोर विंदान ॥ पुढें आलें आजि पैं ॥ ९८ ॥ कामधेनूची काढितां धार ॥ शेराच्या चिकें भरलें पात्र ॥ अमृताच्या घटीं घातला कर ॥ तों विष दुर्धर भरलें असे ॥ ९९ ॥ परिसाच्या देवास येऊन ॥ लोहाचा भक्त भेटला पूर्ण ॥ परी तो कदा नव्हे सुवर्ण ॥ कर्म गहन पूर्वीचें ॥ १०० ॥ मृगेंद्रें ज्यासी करीं धरिलें ॥ त्यासी जंबुकें येऊन फाडिलें ॥ सुपर्णगृहीं प्राणी राहिले ॥ त्यांसी डंखिलें विखारीं ॥ १ ॥ याचक लवलाहें धांवला ॥ कल्पतरूखालीं आला ॥ त्यासी तेणें मार दिघला ॥ शुष्क काष्ठ घेऊनियां ॥ २ ॥ व्याघ्र मारूनि लवलाहें ॥ धन्यानें सोडविली गाय ॥ मग काष्ठप्रहारें तीस पाहें ॥ कां हो व्यर्थ मारावें ॥ ३ ॥ गंगापूरीं बुडतां प्राणी ॥ कडेस काढिला धांवोनी ॥ मग त्यासी शस्त्रेंकरूनी ॥ कां हो व्यर्थ वधावें ॥ ४ ॥ भागीरथी भरूनि लवलाहीं ॥ सागरा शरण गेली पाहीं ॥ तो जरी म्हणे कीं ठाव नाहीं ॥ तरी गति तियेसी काय पुढें ॥ ५ ॥ जळचरां ठाव नेदी नीर ॥ पुढें त्यांचा काय विचार ॥ पक्षियांवरी कोपे अंबर ॥ तरी त्यांहीं जावें कोठें पां ॥ ६ ॥ जळत्या गृहाहूनि काढिलें ॥ मागुती वणव्यांत टाकिलें ॥ करुणासागरासी आलें ॥ भरतें क्रूर नवल हें ॥ ७ ॥ मातेनें बाळास दिघलें विष ॥ पित्यानें वधिलें पुत्रास ॥ धन्यानें दंडिलें दासीस ॥ कोणाचें तेथें काय चाले ॥ ८ ॥ कांसेसी लाविलें कृपा करून ॥ मध्येंच दिघलें सोडून ॥ तेणें कोणासी जावें शरण ॥ तयावेगळें सांग पां ॥ ९ ॥ अन्नार्थी पात्रीं बैसले ॥ ते दातयानें दवडिले ॥ तरी त्यांचें बळ कांहीं न चाले ॥ तैसें जाहलें येथें हो ॥ ११० ॥ सूर्य कोपला किरणांवरी ॥ समुद्र लहरींवरी दावा करी ॥ अमृत मधुरता बाहेरी ॥ आपली घालूं इच्छीतसे ॥ ११ ॥ आपल्या शाखेसीं अबोला ॥ कल्पद्रुमें जैसा घरिला ॥ चंद्रें कळंचा त्याग केला ॥ मेरु कोपला शिखरांवरी ॥ १२ ॥ जैसी भागीरथी दोषविहीन ॥ कीं सर्वदा शुचि जैसा अग्न ॥ तैसी बोलतां मी जाण ॥ शुचिष्मंत निजांगें ॥ १३ ॥ दशकंधर गेला घेऊन ॥ मोहरीहून अन्याय सान ॥ मेरूइतका दंड पूर्ण ॥ समर्थें हा आरंभिला ॥ १४ ॥ वातें कांपे कमळिणी ॥ तीवरी वज्र टाकी उचलोनी ॥ अन्याय नसतां कुरंगिणी ॥ व्यर्थ वनीं कां मारिजे ॥ १५ ॥ कीं डागाअंगीं सुवर्ण ॥ हें अग्निसंगें कळे पूर्ण ॥ तरी मी आतां दिव्य घेईन ॥ सर्वांदेखतां येथेंचि ॥ १६ ॥ नयनीं वाहती अश्रुपात ॥ जानकी वानरां आज्ञापित ॥ म्हणे कुंड करून अद्भुत ॥ अग्नि सत्वर पाजळा ॥ १७ ॥ तत्काळ विस्तीर्ण केलें कुंड ॥ काष्ठपर्वत घातले उदंड ॥ अग्निज्वाळा माजल्या प्रचंड ॥ निराळे ग्रासूं धांवती ॥ १८ ॥ जगन्माता बोले वचन ॥ जरी मी शुद्ध असेन ॥ तरीच येईन परतोन ॥ पाहावया चरण स्वामींचे ॥ १९ ॥ जरी मी दोषी असेन पूर्ण ॥ तरी भस्म करील हा अग्नि ॥ ऐसें तेव्हां बोलून ॥ सरसावली जगन्माता ॥ १२० ॥ सुरासुर वानर ऋक्ष मुनीश्वर ॥ अवघे

४० दुष्कर्माचें छळण. ४१ कुंपणाला लावलेल्या विकाच्या झाडाच्या. ४२ सिंहानें. ४३ गवत. ४४ सर्पांनीं. ४५ पाणी. ४६ आकाश. ४७ निर्मळ. ४८ हरिणी. ४९ शपथ, अग्नीवरून चालणें. ५० देवदैत्य.

जाहले चिंतातुर ॥ म्हणती हा अनर्थ थोर ॥ सुखामाजी ओढवला ॥ २१ ॥ असो रण माजलें देखोनी ॥ वीर निर्भय अंतःकरणीं ॥ तैसी अग्नीसमोर [५१]विदेहनंदिनी ॥ निर्भय मनीं सर्वदा ॥ २२ ॥ कुंडासी करून प्रदक्षिणा ॥ दृष्टीभरी पाहिलें रघुनंदना ॥ कंठींचा सुमनहार काढूनि जाणा ॥ अग्नीवरी टाकिला ॥ २३ ॥ सत्य जय सत्य म्हणोनी ॥ त्रिवार गर्जे त्रिजगज्जननी ॥ अग्निकुंडीं तये क्षणीं ॥ उडी घातली अकस्मात ॥ २४ ॥ मंगळजननीचें हृदयरत्न ॥ अग्नीमाजी पडतांचि जाण ॥ कन्या गांजिली म्हणून ॥ पृथ्वी कांपे थरथरां ॥ २५ ॥ जाहली एकचि आरोळी ॥ शोकार्णवीं पडली कपिमंडळी ॥ सकळ सुरवर व्याकुळीं ॥ प्रळयकाळ भाविती ॥ २६ ॥ दशदिशांमाजी दाटला धूर ॥ कढों लागले सप्त समुद्र ॥ वैकुंठकैलासपदें समग्र ॥ डोलों लागलीं तेधवां ॥ २७ ॥ थरथरां कांपे अंबर[५३] ॥ नक्षत्रें रिचवंती अपार ॥ सौमित्रादि वायुकुमर ॥ नेत्रोदकें ढाळिती ॥ २८ ॥ म्हणती अग्निमुखींहूनि पुढती ॥ पुन्हां कैंची देखों सीता सती ॥ बोलती सर्व कर्मगती ॥ परम दुर्धर वाटतसे ॥ २९ ॥ एक घटिकापर्यंत ॥ अग्नीमाजी जानकी गुप्त ॥ तों मस्तकीं पुष्पें घवघवीत ॥ अकस्मात निघाली ॥ १३० ॥ पहिल्या रूपाहून आगळें ॥ शतगुणी रूप जाहलें ॥ प्रभेनें भूमंडळ भरिलें ॥ आश्चर्य जाहलें ते वेळीं ॥ ३१ ॥ मागें अरण्यकांडीं कथा ॥ रेखेंत जाहली गुप्त सीता ॥ तें स्वरूप प्रकटलें आतां ॥ मिष दिव्यांचें[५६] करूनियां ॥ ३२ ॥ सीतास्वरूप जाहला होता अग्न ॥ तेणें राक्षसवन जाळून ॥ आपुल्या स्वरूपें येऊन ॥ दिव्यमिषें मिळाला ॥ ३३ ॥ सीता रामाची चिच्छक्ती[५७] ॥ ती गेलीच नाहीं लंकेप्रती ॥ हे खूण साधु संत जाणती ॥ जे कां वेदांती सज्ञान ॥ ३४ ॥ असो जानकी देखतां साचार ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ अष्टादशपद्मीं वानर ॥ नमस्कार घालिती ॥ ३५ ॥ मग पुष्पांचे संभार ॥ सीतेवरी टाकिती सुरवर ॥ म्हणती सीता सती पवित्र ॥ सर्व नमस्कार घालिती ॥ ३६ ॥ सौमित्र सुग्रीव बिभीषण ॥ जानकीस घालिती लोटांगण ॥ हनुमंत नमून चरण ॥ आनंदें पूर्ण नाचतसे ॥ ३७ ॥ असो श्रीरामाकडे सीता सती ॥ चालिली तेव्हां हंसगती ॥ मग उठोनियां रघुपती ॥ उभा ठाकला ते वेळे ॥ ३८ ॥ श्रीराममुख विलोकून ॥ सीता करी हास्यवदन ॥ घांवोनि दृढ धरिले चरण ॥ जगद्गुरूचे ते काळीं ॥ ३९ ॥ मग जानकीस उठवोनी ॥ क्षेमें देतसे कोदंडपाणी ॥ वामांकावरी मग घेउनी ॥ रघुनाथ तेव्हां बैसला ॥ १४० ॥ नवमेघरंग रघुनाथ ॥ जानकी विद्युल्लता तळपत ॥ सीताराम देखोनि समस्त ॥ जयजयकार करिती तेधवां ॥ ४१ ॥ असुरांचीं वाद्यें ते काळीं ॥ महागजरें गर्जों लागलीं ॥ आज्ञा घ्यावया ते काळीं ॥ देव उदित जाहले ॥ ४२ ॥ सदाशिव म्हणे रघूत्तमा ॥ पुराणपुरुषा पूर्णब्रह्मा ॥ आनंदकंदा निजसुखधामा ॥ पूर्णकामा सर्वेशा ॥ ४३ ॥ रविकुळभूषणा जलजनेत्रा ॥ जनकजामात नीलगात्रा[६०] ॥ सच्चिदानंदा सुहास्यवक्त्रा ॥ धन्य लीला दाविली ॥ ४४ ॥ चराचरजीवचित्तचाळका ॥ अनंतब्रह्मांडपाळका ॥

---

५१ सीता. ५२ तिन्ही जगांची माता सीता. ५३ आकाश. ५४ पडूं लागली. ५५ प्रफुल्लित. ५६ शपथेचें. ५७ ज्ञानशक्ति. ५८ आलिंगन. ५९ डाव्या मांडीवर. ६० श्यामवर्ण शरीर.

राक्षस मर्दूनि सकळिकां ॥ निजभक्तां तारिलें ॥ ४५ ॥ युगानुयुगीं धरूनि अवतार ॥ मर्दिले पापी दुष्ट असुर ॥ परी ये अवतारींचें चरित्र ॥ अगाध दाविलें श्रीरामा ॥ ४६ ॥ माझिये मनींचें आर्त बहुत ॥ केव्हां मी देखेन रघुनाथ ॥ तुझे नामें सकळ शांत ॥ हाळाहळ[६१] जाहलें ॥ ४७ ॥ आतां सीतेसहित रामचंद्रा ॥ सत्वर जावें अयोध्यापुरा ॥ ऐसें बोलतां कर्पूरगौरा[६२] ॥ राघव काय बोलत ॥ ४८ ॥ म्हणे माझें तूं आराध्य दैवत ॥ अनादिसिद्ध कैलासनाथ ॥ विश्वंभर तूं विश्वातीत ॥ करणी अद्भुत दाविसी ॥ ४९ ॥ ब्रह्मांड जाळी हाळाहळ ॥ तें तुवां कंठीं धरिलें तत्काळ ॥ लोक सुखी रक्षिले सकळ ॥ परम दयाळू तूं होसी ॥ १५० ॥ माझी स्तुति मांडिली दयाळा ॥ परी मी काय तुजवेगळा ॥ ऐसें श्रीराम बोलतां ते वेळां ॥ वदता जाहला कैमळोद्भव[६३] ॥ ५१ ॥ म्हणे क्षीराब्धि-वासिया नारायणा ॥ मधुकैटभारे[६४] भवभंजना[६५] ॥ अनंतवेषा अनंतवदना ॥ अनंतनयना अनंता ॥ ५२ ॥ परमात्मया तूं माझा तात ॥ नाभिकमळीं जन्मलों यथार्थ ॥ सृष्टि रचिली हे अद्भुत ॥ तुझे आज्ञेकरूनियां ॥ ५३ ॥ सृष्टीमाजी माजले असुर ॥ रावणकुंभकर्णादि क्रूर ॥ मग तुवां धरिला अवतार ॥ अयोध्येमाजी या रूपें ॥ ५४ ॥ पितृआज्ञेचें करूनि मिष ॥ वना आलासी परमपुरुष ॥ सीतेचे निमित्तें राक्षसांस ॥ वधोनि भक्त रक्षिले ॥ ५५ ॥ राघव म्हणे कमळासना ॥ विश्वजनका वेदपाळणा ॥ सकळ[६६]ललाटपट्टलेखना ॥ जाणसी खुणा सर्वांहि तूं ॥ ५६ ॥ तुम्हांआम्हांसीं वेगळेपण ॥ मुळापासूनि नाहीं पूर्ण ॥ परस्परें ठाउकी खूण ॥ तरी बाहेर स्तुति किमर्थ ॥ ५७ ॥ पौर्णिमेस उचंबळे समुद्र ॥ तैसा बोलता जाहला देवेंद्र ॥ हे अयोध्यानाथा जगदुद्धार ॥ ब्रह्मानंदा परात्परा ॥ ५८ ॥ आम्हांसी उपकार केले बहुत ॥ तें वेदांसही नव्हे गणित ॥ बंधच्छेदक तूं रघुनाथ ॥ अपरिमित गुण तुझे ॥ ५९ ॥ तरी माझे मनीं एक आर्त ॥ तें तूं पूर्णकर्ता रघुनाथ ॥ कांहीं आज्ञा मज त्वरित ॥ केली पाहिजे ये काळीं ॥ १६० ॥ मी दासानुदास अनन्य ॥ मज कांहीं सांगावें कारण ॥ तुझी आज्ञा मस्तकीं वंदीन ॥ मुकुटमणि जयापरी ॥ ६१ ॥ ऐसें बोलतां देवेंद्र ॥ परम सुखावला रामचंद्र ॥ म्हणे सहस्राक्षा तूं चतुर ॥ समयीं उपकार केलासी ॥ ६२ ॥ रणीं पाठविला दिव्य रथ ॥ तो आम्हांसी उपकार बहुत ॥ आम्ही जय पावलों अद्भुत ॥ त्याच रथीं बैसोनियां ॥ ६३ ॥ इंद्र म्हणे श्रीरामा ॥ भक्तकामकल्पद्रुमा ॥ तुझिया प्रसादें मंगलधामा ॥ आम्ही स्वपदीं सुखी असों ॥ ६४ ॥ रथ पाठविला समयासी ॥ म्हणोनि उपकार मानिसी ॥ चकोरांनीं काय चंद्रासी ॥ तृप्त करावें कवण्या गुणें ॥ ६५ ॥ चातकें तृप्त केला जलधर ॥ चक्रवाकांनीं दिवाकर[६७] ॥ समुद्राची तृप्ति थिल्लर[६८] ॥ कोण्या गुणें करील पैं ॥ ६६ ॥ वैरागरापुढें ठेविली गार ॥ क्षीराब्धीपुढें ठेविलें तक्र ॥ परम धनाढ्य कुबेर ॥ त्यासी कवडी समर्पिली ॥ ६७ ॥ आतां असो हे शब्दरचना ॥ मज कांहीं करावी आज्ञा ॥ म्हणोनि इंद्र लागला चरणा ॥ प्रेमादरेंकरूनियां ॥ ६८ ॥ मग इंद्रास तेव्हां उठवून ॥ बोले रामचंद्र सुहास्यवदन ॥

६१ विष. ६२ शंकर. ६३ ब्रह्मदेव. ६४ मधु व कैटभ या दैत्यांस मारणाऱ्या. ६५ संसारनाशना. ६६ सर्वांच्या कपाळावर शुभाशुभ लिहिणाऱ्या. ६७ सूर्य. ६८ उदकाचें डबकें. ६९ डिऱ्यांची खाण.

जेणेंकरूनि कर्ण ॥ तृप्त होती सकळांचे ॥ ६९ ॥ म्हणे वेदशास्त्रें बहुत ॥ धर्माधर्मीं निवडिती पंडित ॥ परी एकचि गोष्टींत समस्त ॥ पापपुण्य निवडिलें ॥ १७० ॥ परोपकार तें पुण्य अद्भुत ॥ परपीडा तेंचि पाप यथार्थ ॥ शोधावे कितमर्थ ग्रंथ बहुत ॥ मुख्य इत्यर्थ हाचि पैं ॥ ७१ ॥ तरी ऐसा जो परोपकार ॥ वानरां घडला अपार ॥ मज साह्य होऊनि समग्र ॥ यश बहुत जोडिलें ॥ ७२ ॥ समरांगणीं दिधले प्राण ॥ असंख्य पडले प्रेतें होऊन ॥ परी त्यांचीं कुटुंबें आप्तजन ॥ शोकार्णवीं बुडतील ॥ ७३ ॥ तरी ते माझे सखे वानर ॥ पुनः जीववावे समग्र ॥ कोणाचे अंगावरी अणुमात्र ॥ घाय क्षत न दिसावें ॥ ७४ ॥ अवघे आरोग्य होऊन ॥ सुखी असोत बहुत दिन ॥ त्यांचें जें वसतें वन ॥ सदा सुफल तें असो ॥ ७५ ॥ तरी हीच आज्ञा सत्वरा ॥ सिद्धी पाववीं अमरेभ्रँरा ऐसें बोलतां पैंरात्परसोयरा ॥ आनंद जाहला समस्तांसी ॥ ७६ ॥ इंद्रें चरणीं माथा ठेवून ॥ म्हणे जीवितें न लगतां क्षण ॥ याउपरी सीतारमण ॥ आज्ञा देत सकळांसी ॥ ७७ ॥ देव बैसोनि चालिले विमानीं ॥ घडकती दुंदुभीच्यिा ध्वनि ॥ दिव्य घंटा वाजती गगनीं ॥ आनंद मनीं न समाये ॥ ७८ ॥ शक्रआज्ञा होतां सत्वरी ॥ पीयूषमेघ वोळंबला अंबरीं ॥ गंभीर गर्जना ते अवसरीं ॥ करिता जाहला बलाहक ॥ ७९ ॥ पश्चिमेचा ढग उठत ॥ तैशा सौदामिनी लखलखत ॥ रणमंडळ लक्षोनि समस्त ॥ पीयूषवृष्टि जाहली ॥ १८० ॥ एक घटिकापर्यंत ॥ अपार वर्षलें अमृत ॥ वानर उठविले समस्त ॥ निद्रिस्थ जागे होत जैसे ॥ ८१ ॥ श्रीरामापुढें जाऊन ॥ समस्त घालिती लोटांगण ॥ पर्जन्य गेला उघडोन ॥ सहस्रनयनआज्ञेनें ॥ ८२ ॥ आक्षेप घेती श्रोते चतुर ॥ वानर आणि रजनीचर ॥ एके ठायीं पडिले समग्र ॥ तरी असुर कां न उठवी ॥ ८३ ॥ वक्ता म्हणे नाटकरामायण ॥ तेथें ही कथा संपूर्ण ॥ स्वयें बोलिला अंजनीनंदन ॥ अप्रमाण कोण म्हणे ॥ ८४ ॥ तें समस्त पाहूनि साचार ॥ प्रत्युत्तर देत श्रीधर ॥ तरी शंकरें भूतावळी समग्र ॥ आधींच होत्या पाठविल्या ॥ ८५ ॥ त्यांसी आज्ञापिलें शंकरें ॥ न भक्षावीं कपींचीं शिरें ॥ परी राक्षसांचींच कलेवरें ॥ तुम्ही निवडून भक्षिंजे ॥ ८६ ॥ खोब्यांतून खरें निवडे ॥ कीं तांदुळांतून काढिले खडे ॥ हिऱ्यांमधूनि गारतुकडे ॥ परीक्षक निवडिती ॥ ८७ ॥ तैसी भूतावळी निश्चिती ॥ राक्षसकलेवरें भक्षिती ॥ सागरीं भिरकाविल्या अस्थि ॥ न उरे क्षितीं कांहींच ॥ ८८ ॥ पीयूषवृष्टि होतां अपार ॥ उठिले अवघेही वानर ॥ ऐसें ऐकतां प्रत्युत्तर ॥ श्रोते पंडित सुखावती ॥ ८९ ॥ म्हणती वक्ता होय अति चतुर ॥ शोधक दृष्टि तुझी अपार ॥ संशय निरसला समग्र ॥ जैसा अंधार सूर्योदयें ॥ १९० ॥ ग्रासांमाजी हैंरळ काढून ॥ पुढें चाले जैसें भोजन ॥ तैसा संशय निरसला पूर्ण ॥ अनुसंधान ऐका पुढें ॥ ९१ ॥ रघुनाथ म्हणे बिभीषणा ॥ आतां आम्हांस देईं आज्ञा ॥ ऐसें बोलतां रामराणा ॥ बिभीषण दाटला गहिंवरें ॥ ९२ ॥ तो नूतन लंकानाथ ॥ स्फुंदस्फुंदोन तेव्हां रडत ॥ श्रीरामचरणीं मिठी

७० इंद्रा. ७१ सर्वोत्तम, उत्तमापेक्षांहि उत्तम. ७२ नौबद, मोठा नगारा. ७३ अमृताचा मेघ. ७४ माश्चर्यकारक प्रश्न हरकत. ७५ बारीक खडे. ७६ आख्यान.

घालीत ॥ पद क्षाळीत नयनोदकें ॥ ९३ ॥ म्हणे लंकाराज्य मज देऊन ॥ श्रीरामा तूं जातोसी टाकून ॥ अनंत राज्यें ओंवाळून ॥ चरणावरूनि टाकावीं ॥ ९४ ॥ तुझिया भजनावरून ॥ मोक्ष सांडावा ओंवाळून ॥ तेथें लंकेचें राज्य तृण ॥ मज काय हें करावें ॥ ९५ ॥ मी अयोध्येसी येईन सांगातें ॥ सेवा करून राहीन तेथें ॥ ऐसें बोलता रघुनाथें ॥ हृदयीं धरिलें बिभीषणा ॥ ९६ ॥ प्राण-सखया तुझे हृदयीं ॥ मी वसतों सर्वदाही ॥ परी तूं अयोध्येस येईं ॥ समागमें बोळवीत ॥ ९७ ॥ अयोध्येचा सोहळा पाहून ॥ तूं आणि मित्रनंदनें ॥ मग तेथून परता दोघेजण ॥ आपापल्या राज्यांसी ॥ ९८ ॥ परम संतोषे बिभीषण ॥ आणविलें पुष्पक विमान ॥ अत्यंत विशाळ गुणगहन ॥ आज्ञा पाळीन प्रभूची ॥ ९९ ॥ चंद्राहूनि प्रभा अत्यंत ॥ मुख्य सिंहासन विराजत ॥ दिव्य नवरत्नीं मंडित ॥ झाँलरी शोभत मुक्तांची ॥ २०० ॥ पृथ्वी सांठवे संपूर्ण ॥ ऐसें क्षणें होय विस्तीर्ण ॥ इच्छा होतांचि संकीर्ण ॥ घाकुटें होय तेव्हांचि ॥ १ ॥ ऐसें विमान ते काळीं ॥ सेवकें आणिलें रामाजवळी ॥ तर्जनी लावूनियां भाळीं ॥ रघूत्तमें वंदिलें ॥ २ ॥ सीतेची अंगुली धरून ॥ दिव्य हिऱ्यांचें सोपाँन ॥ त्याचि मार्गें रघुनंदन ॥ वरी चढला ते काळीं ॥ ३ ॥ सीतेसमवेत रघुनाथ ॥ मुख्य सिंहासनीं बैसत ॥ अष्टादशपद्मीं समस्त ॥ वानर वरी चढिन्नले ॥ ४ ॥ छपन्नकोटी गोलांगूल ॥ बाहात्तर कोटी रीस सकळ ॥ बिभीषणाचें असंख्य दळ ॥ वरी आरूढलें तेधवां ॥ ५ ॥ अष्टादश महाअक्षौहिणी ॥ लागली वाद्यांची ध्वनी ॥ अष्ट जुटँपती अष्ट कोणीं ॥ राघवापार्शी उभे राहिले ॥ ६ ॥ मृगांकवर्ण चामरें घेऊन ॥ अंगद आणि लक्ष्मण ॥ वरी विराजती दोघेजण ॥ समसमान दोहींकडे ॥ ७ ॥ असो आतां रघुनाथ ॥ लक्षूनियां अयोध्येचा पंथ ॥ राजाधिराज समर्थ ॥ जाता झाला ते काळीं ॥ ८ ॥ राम-विजय रत्नखाणी ॥ उत्तरकांड हें मुकुटमणी ॥ पुढें श्रवण करावें सज्जनीं ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ९ ॥ ब्रह्मानंद यतीश्वर ॥ पूर्णज्ञानाचा समुद्र ॥ त्याच्या चरणाब्जीं श्रीधर भ्रमर ॥ अभंग रुंजी घालीतसे ॥ २१० ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटका-धार ॥ सदा परिसोत पंडित चतुर ॥ चतुस्त्रिंशत्तमोध्याय गोड हा ॥ २११ ॥ अध्याय ॥ ३४ ॥ ओंव्या ॥ २११ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

७७ सुग्रीव. ७८ पडदा. ७९ पायऱ्या. ८० मुख्य वानर.

३५



श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ देहबुद्धिलंका घेऊन ॥ मारिला अहंकृति रावण ॥ स्थापूनि भाव बिभीषण ॥ छत्र धरिलें तयावरी ॥ १ ॥ ज्ञानकळा जनकतनया ॥ भेटली येऊन रघुराया ॥ मग स्वानंदविमानीं बैसोनियां ॥ आत्माराम चालिला ॥ २ ॥ लागला वाद्यांचा गजर ॥ राघवकीर्ति गाती वानर ॥ योजनें दोन सहस्र ॥ विमान तेव्हां उंचावलें ॥ ३ ॥ जैसा पौर्णिमेचा रोहिणीवर ॥ पश्चिमेस जाय सत्वर ॥ कीं समुद्रीं जहाज थोर ॥ लोटीत समीर वेगेंसी ॥ ४ ॥ तैसें वेगीं जात विमान ॥ घंटा वाजती घणघण ॥ दिव्यमणिमय प्रभाघनें ॥ उत्तरपंथें जातसे ॥ ५ ॥ ऐसा जात रविकुळमंडण ॥ जो असुरकुळकाननदहन ॥ वामांगीं अवनिजागर्भरत्न ॥ सौदामिनी मेघीं जैसी ॥ ६ ॥ तयेप्रती बोले रघुनंदन ॥ कांते खालीं पाहें विलोकून ॥ लंका दिसे देदीप्यमान ॥ हेमवर्ण विशाळ ॥ ७ ॥ पैल पाहें निकुंभिला ॥ येथें शत्रुजित सौमित्रें मारिला ॥ आम्ही राहिलों होतों तेच सुवेळा ॥ प्राणवल्लभे विलोकीं ॥ ८ ॥ पैल पाहें रणमंडळ ॥ येथें युद्ध जाहलें तुंबळ ॥ आटिले राक्षस सकळ ॥ महासबळ पराक्रमी ॥ ९ ॥ वज्रदंष्ट्री विरूपाक्ष अकंपन ॥ मत्त महामत्त प्रहस्त प्रधान ॥ भयानक विशाळ कुंभकर्ण ॥ येथेंच आटले इंदुवदने ॥ १० ॥ देवांतक नरांतक महोदर ॥ कुंभ निकुंभ त्रिशिरा महाअसुर ॥ ते येथें आटले समग्र ॥ जनकतनये पाहें पां ॥ ११ ॥ युद्ध करूनि सप्त दिन ॥ येथेंच पडला दशवदन ॥ हा समुद्र पाहें विलोकून ॥ सेतु नळें बांधिला ॥ १२ ॥ पैल उत्तरतीरीं दर्भशयन ॥ येथें समुद्र भेटला येऊन ॥ पुढें मलयाचल विंध्याद्रि पूर्ण ॥ किष्किंधा पाहें राजसे ॥ १३ ॥ पैल पाहें पंपासरोवर ॥ येथें भेटला वायुकुमर ॥ पैल स्थळीं वालिवीर ॥ सुग्रीवकैवारें वधियेला ॥ १४ ॥ येथें शबरीचा केला उद्धार ॥ येथें कबंध वधिला साचार ॥ पैल दिसे गोमतीतीर ॥ खर दूषण वधिले येथें ॥ १५ ॥ पुढें पंचवटी पाहें गजगमने ॥ तेथूनि तुज नेलें द्विपंजवदनें ॥ ऋषींचे आश्रम पद्मनयने ॥ पाहें गौतमीतटींचे ॥ १६ ॥ शरभंग सुतीक्ष्ण मंदकर्णी ॥ हा सिंहाद्रि राजसे पाहें नयनीं ॥ येथें दत्तात्रेय अनुसूया अत्रिमुनी ॥ भेटलीं होतीं पाहें पां ॥ १७ ॥ हा अगस्तीचा आश्रम पाहें ॥ पुढें चित्रकूट दिसताहे ॥ भारद्वाजआश्रम जनकतनये ॥ पुढें तीर्थराज प्रयाग ॥ १८ ॥ पैल नंदिग्राम दिसत ॥ तेथें प्राणसखा आहे भरत ॥ पैल शृंगवेरीं महाभक्त ॥ किरात गुहक वसतसे ॥ १९ ॥ खंजनाक्षि पाहें सादर ॥ शरयूतीरीं अयोध्यानगर ॥ घवघवीत परम सुंदर ॥ वास्तव्यस्थळ आमुचें ॥ २० ॥ परमस्नेहादरेंकरूनी ॥ जानकीस दावी चापपाणी ॥ तों अगस्तीचे आश्रमीं मोक्षदानी ॥ क्षण एक राहूं इच्छीत ॥ २१ ॥ रामें आज्ञापितां विमान ॥ खालीं आलें न लागतां क्षण ॥ पद्माक्षीरमण तेव्हां वचन ॥ पद्मोक्षीप्रती बोलत ॥ २२ ॥ आम्हां भेटेल घटोद्भवमुनी ॥ तुज लोपामुद्रा नेईल सदनीं ॥ आणिकही ऋषिपत्न्या मिळूनी ॥ तुज पुसितील साक्षेपें ॥ २३ ॥ रावणें तुज नेलें कैसे रीतीं ॥ कैसा लंकेसी आला रघुपती ॥ पुसेल कुंभसंभव-

१ चंद्र. २ तेजस्वी मेघ. ३ सीता. ४ मारुती. ५ मिळणीचा. ६ दशमुखी रावणानें. ७ या नांवाची नदी. ८ खंजीरीट पक्ष्याच्या नेत्रांसारखे नेत्र असणारी. ९ कमळासारखे डोळे असणारी. १० अगस्तीची स्त्री लोपामुद्रा.

सती ॥ कथा कैसी जाहली ते ॥ २४ ॥ सांगें सकळ वर्तमान ॥ परी जें केलें सागरबंधन[11] ॥ ही कथा तियेलागून ॥ सर्वथाही सांगूं नयेचि ॥ २५ ॥ हे कथा सांगसील पूर्ण ॥ तुज ती आणिल हीनपण[12] ॥ ऐसें सांगोनि राघवें विमान ॥ ऋषिआश्रमीं उतरिलें ॥ २६ ॥ होतसे वाद्यांचा गजर ॥ दणाणलें तेणें अंबर ॥ शिष्य धांवून सत्वर ॥ अगस्तिप्रती सांगती ॥ २७ ॥ स्वामी विमान आलें पृथ्वीवरी ॥ भरलें रीसवानरीं ॥ तों अगस्ति उठिला झडकरी ॥ म्हणे रघुवीर पातला ॥ २८ ॥ मग शिष्य घेऊन अपार ॥ रामासी सामोरा जाय सत्वर ॥ लवलाही आश्रमाबाहेर ॥ कैलशोद्भव[13] पातला ॥ २९ ॥ ऋषिमेळा रामें देखतां ॥ उतरला विमानाखालता ॥ पुढें येतां कमलोद्भवपिता ॥ कलशोद्भवें देखिला ॥ ३० ॥ अगस्तीस न घरवे धीर ॥ भूमंडळ क्रमीत सत्वर ॥ तंव रघूत्तमें नमस्कार ॥ साष्टांग घातला ऋषीतें ॥ ३१ ॥ अगस्तीनें धांवोनि त्वरित ॥ हृदयीं धरिला रघुनाथ ॥ जैसा वाचस्पति[14] आलिंगीत ॥ शचीवरासी[15] आदरें ॥ ३२ ॥ सवेंच सौमित्रासी दिधलें आलिंगन ॥ तों रघूत्तम बोले हांसोन ॥ आजि आश्रम सोडून ॥ कां स्वामी आलेत बाहेरी ॥ ३३ ॥ मागें अरण्यकांडीं कथा गहन ॥ सीता घेऊनि गेला द्विपंचवदन[16] ॥ तेव्हां परतोन रामलक्ष्मण ॥ अगस्तिआश्रमा पैं आले ॥ ३४ ॥ ते वेळीं अगस्तीनें जाणोन ॥ घेतलें नाहीं रामदर्शन ॥ परतविले दारींहून ॥ दोघे दाशरथी ते काळीं ॥ ३५ ॥ ती गोष्ट आठवूनि रघुपती ॥ म्हणे तोच मी राम तूं अगस्ती ॥ तैं अनादर आतां प्रीती ॥ विशेष दिसे विप्रोत्तमा ॥ ३६ ॥ ऐसें बोलतां सीताधव ॥ प्रत्युत्तर देत कलशोद्भवें[17] ॥ तैं स्त्रीरहित तूं राघव ॥ नाहीं वैभव तेधवां ॥ ३७ ॥ तो विपरीत काळ जाणोन ॥ नाहीं घेतलें तुझें दर्शन ॥ आतां तूं स्त्रीयुक्त सीतारमण ॥ आलों म्हणोन सामोरा ॥ ३८ ॥ स्त्रीस अवघे देती मान ॥ तूं निर्विकार रघुनंदन ॥ मानापमानविरहित जाण ॥ सच्चिदानंद परब्रह्म तूं ॥ ३९ ॥ तूं अज अजित आप्तकाम[18] ॥ निरुपाधिक निर्गुण अनाम ॥ नाना विकार सम विषम ॥ स्त्रीचे सर्वही राघवा ॥ ४० ॥ ऐकोनि अगस्तीचें उत्तर ॥ आनंदमय झाला रघुवीर ॥ मग आश्रमाप्रती सीतावर ॥ कलशोद्भव नेता जाहला ॥ ४१ ॥ तों ते लोपामुद्रा येऊन ॥ जनकजेसी करीं धरून ॥ गेली आश्रमांत घेऊन ॥ करूनि पूजन पुसतसे ॥ ४२ ॥ विदेहतनये तुजसीं प्रीती ॥ अत्यंत करितो रघुपती ॥ किंवा विरक्त असे चित्तीं ॥ सांग स्थिती कैसी ते ॥ ४३ ॥ वनीं विचरतां रघुनंदन ॥ तोषवीत असे कीं तुझें मन ॥ तूं भागलीस म्हणोन ॥ समाधान करितो कीं ॥ ४४ ॥ याउपरी विदेहराजनंदिनी ॥ त्रिभुवनपतीची पट्टराणी ॥ श्रीरामप्रताप वाखाणी ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ४५ ॥ म्हणे परम दयाळु रघुनाथ ॥ मजवरी स्नेह करी अत्यंत ॥ तूं म्हणसी स्त्रीलंपट बहुत ॥ जनकजामात तैसा नव्हे ॥ ४६ ॥ तरी अत्यंत दयाळु श्रीराम ॥ मजवरी स्नेह करी परम ॥ विरक्त सदा निष्काम ॥ रूप नाम नाहीं तया ॥ ४७ ॥ ग्रज घेऊन गेला रावण ॥ दयासागर तो रघुनंदन ॥

११ समुद्रावर सेतु बांधला तें. १२ उणेपणा. १३ अगस्ति. १४ बृहस्पति. १५ इंद्राला. १६ रावण. १७ सर्व गोष्टींनीं परिपूर्ण.

करूनियां नाना प्रयत्न ॥ मज सोडविलें श्रीरामें ॥ ४८ ॥ तों लोपामुद्रा म्हणे सीते ॥ तुज कैसें नेलें लंकानाथें ॥ मग येऊन जनक-जामातें ॥ सोडविलें कवणे रीतीं ॥ ४९ ॥ हर्षें सांगतसे जानकी ॥ म्यां इच्छिली मृगकंचुकी ॥ तें जाणोनि एकाएकीं ॥ अयोध्या-प्रभु धांविन्नला ॥ ५० ॥ मागें अतीतवेषें येऊन ॥ मज घेऊन गेला रावण ॥ माझिया वियोगें राम आपण ॥ वृक्ष पाषाण आलिंगी ॥ ५१ ॥ मजानिमित्त राजीवनेत्र ॥ मित्र करोनि चंडांशुपुत्र ॥ शक्रसुता वधोनि सर्वत्र ॥ कपिवीर सखे केले ॥ ५२ ॥ मग लोक-प्राणेशनंदन ॥ धाडिला माझे शुद्धीलागोन ॥ तेणें जाळून लंकाभुवन ॥ रघुनंदन आणिला ॥ ५३ ॥ अष्टादश पद्में वानर ॥ संगें घेऊन आला श्रीरामचंद्र ॥ वेढूनियां लंकापुर ॥ युद्ध अपार पैं केलें ॥ ५४ ॥ संततीसमवेत रावण ॥ रणीं मारी रविकुळभूषण ॥ राज्यीं स्थापूनियां बिभीषण ॥ पुष्पकारूढ मग जाहले ॥ ५५ ॥ खालीं मी जों विलोकीं पूर्ण ॥ तंव अद्भुत केलें सेतुबंधन ॥ लंबायमान शतयोजन ॥ आणोनि पाषाण बांधिला ॥ ५६ ॥ समुद्र बांधिला पाषाणीं ॥ आश्चर्य मज वाटलें मनीं ॥ हें जानकीनें विसरूनी ॥ सेतुचरित्र कथियेलें ॥ ५७ ॥ तों ते लोपामुद्रा बोलत ॥ काय सांगसी गोष्टी अद्भुत ॥ पाषाणीं बांधिला सरितानाथ ॥ काय पुरु-षार्थ केला हा ॥ ५८ ॥ टाकूनियां एक शर ॥ कां शोषिला नाहीं सागर ॥ न लागतां क्षणमात्र ॥ माझे पतीनें प्राशिला ॥ ५९ ॥ ऐसें अगस्तिजायाबोलतां ॥ क्षणेक होय तटस्थ सीता ॥ म्हणे इणें उणें आणिलें रघुनाथा ॥ उत्तर आतां ईस देऊं ॥ ६० ॥ म्हणे रघूत्तमाचा जातां बाण ॥ सप्त समुद्र जातील आटून ॥ बिंदुमात्र नुरे जीवन ॥ जीव संपूर्ण भरतील ॥ ६१ ॥ रामापासीं वानरगण ॥ आहेत परम बळें संपन्न ॥ सप्त समुद्रांचें आचमन ॥ एकदांच करितील ॥ ६२ ॥ म्हणसी कां केलें नाहीं आचमन ॥ तरी तुझ्या पतीचें मूत्र पूर्ण ॥ न शिवती वानरगण ॥ मग प्राशन केवीं करितील ॥ ६३ ॥ रघुनाथदास सोंवळे बहुत ॥ म्हणोनि तिहीं बांधिला सेत ॥ नाहीं तरी सरितानाथ ॥ प्राशावया क्षण न लागता ॥ ६४ ॥ ऐसें बोलता जनकतनया ॥ उगीच राहिली ऋषिजाया ॥ असो जान-कीची पूजा करूनियां ॥ संतोषविले ते काळी ॥ ६५ ॥ अगस्तीनें पूजोनि रघुनंदना ॥ सर्वेंच ऋषीची घेऊनि आज्ञा ॥ पुष्पकीं बैसे अयोध्याराणा ॥ सीतेसहित ते काळी ॥ ६६ ॥ पुष्पक उचलिलें तेथूनी ॥ चालिलें अयोध्यापंथ लक्षोनी ॥ तों भारद्वाजआश्रमीं येऊनी ॥ उतरलें तेव्हां प्रयागीं ॥ ६७ ॥ मनांत विचारी रघुनंदन ॥ ध्यावें भारद्वाजदर्शन ॥ यालागीं उतरलें विमान ॥ इच्छा जाणून प्रभूची ॥ ६८ ॥ भारद्वाजासहित अपार ॥ चहूंकडून धांवती मुनीश्वर ॥ जैसे महानद्यांचे पूर ॥ सिंधूस जाती भेटावया ॥ ६९ ॥ रघूत्तमें खालतें उतरून ॥ नमिले समस्त ऋषिजन ॥ भारद्वाजें दिधलें आलिंगन ॥ प्रेमेंकरून तेधवां ॥ ७० ॥ म्हणे आजि धन्य दिवस ॥ घरा आला अयोध्याधीश ॥ जाहलीं वर्षें चतुर्दश ॥ चवदा दिवस अधिक पैं ॥ ७१ ॥ भारद्वाजें लक्ष्मण ॥ आलिंगिला

१८ श्रीराम. १९ सुग्रीव. २० वाळीला. २१ मारुति. २२ शोधासाठीं. २३ बुडणारे पाषाण पाण्यावर तरले हें आश्चर्य. २४ पत्नी. २५ समुद्र.

प्रीतीकरोन ॥ ते दिवसीं रघुनंदन ॥ आपुले आश्रमीं राहविला ॥ ७२ ॥ मग तो जगदात्मा रघुनाथ ॥ स्नेहें हनुमंतासी सांगत ॥ म्हणे आम्हीं आजि राहिलों येथ ॥ प्रीतीस्तव ऋषीच्या ॥ ७३ ॥ तरी पुढें जाऊनि त्वरित ॥ भरताप्रती करावें श्रुत ॥ शृंगवेरीं गुहक-भक्त ॥ त्यासी हें विदित करावें ॥ ७४ ॥ ऐसी आज्ञा होतांचि पूर्ण ॥ वंदोनियां रघुवीरचरण ॥ वायुसुतें केलें उड्डाण ॥ पित्याहून चपळत्वें ॥ ७५ ॥ गगनींहूनि अर्क उतरत ॥ तैसा गुहकाश्रमीं हनुमंत ॥ येऊनि बोले अकस्मात ॥ अयोध्यानाथ आला कीं ॥ ७६ ॥ जो जगदानंदमूळकंद ॥ भरतहृदयारविंदमिलिंद ॥ तो रघुनाथ भक्तजनवरद ॥ जवळी आला जाणिंजे ॥ ७७ ॥ परमानंद उदार-घन ॥ अंतररंगें मनमोहन ॥ परात्परसोयरा जाण ॥ तो जवळी आला कीं ॥ ७८ ॥ विश्वात्मक विश्वपाळक ॥ विश्वमनउदारक ॥ जनहृदयचाळक ॥ तो जवळी आला कीं ॥ ७९ ॥ ऐसें गुहकें ऐकतां वचन ॥ वोसंडलें आनंदेंकरून ॥ धांवोनियां मारुतीचे चरण ॥ धरिले सद्गद होऊनियां ॥ ८० ॥ ओळखोनियां परम भक्त ॥ त्यास हृदयीं धरी हनुमंत ॥ गुहक मागुती लोळत ॥ चरणावरता मारु-तीच्या ॥ ८१ ॥ म्हणे हें तन मन धन ॥ ओंवाळावें तुजवरून ॥ मग फळें सुमनें आणोन ॥ हनुमंत पूजिला गुहकें ॥ ८२ ॥ गुह-कासी म्हणे हनुमंत ॥ चला नंदिग्रामासी त्वरित ॥ स्वामी आला हें करूं श्रुत ॥ भरताप्रती जाऊनियां ॥ ८३ ॥ दोघेही उठिले तेच क्षणीं ॥ एकमेकांचा हस्त धरूनी ॥ दोघेही भक्तशिरोमणी ॥ वेगेंकरूनि जाती ते ॥ ८४ ॥ तों नंदिग्रामीं भरत ॥ बोटानें दिवस मोजीत ॥ म्हणे आतां न ये रघुनाथ ॥ चतुर्दश वर्षें लोटलीं ॥ ८५ ॥ भरत सर्वगुणीं संपन्न ॥ तो भजनमुद्रींचा मीनें ॥ कीं वैरा-गरींचा पूर्ण ॥ अमोलिक मणि हा ॥ ८६ ॥ विवेकगंगेचा लोट थोर ॥ कीं ज्ञानाकाशाचा भास्कर ॥ कीं क्षमा धरिता सहस्रवक्त्र ॥ कीं सरोवर निश्चयाचें ॥ ८७ ॥ कीं दयेचा पर्वत पूर्ण ॥ कीं गुणागुण निर्गुण ॥ कीं उपरतीचा नंदन ॥ किंवा मेघ आकाशींचा ॥ ८८ ॥ ऐसा तो भरत ते वेळीं ॥ म्हणे यावयाची सीमा जाहली ॥ राम प्रेमळाची माउली ॥ अजूनि दृष्टी पडेना ॥ ८९ ॥ आतां हा देह टाकून ॥ धुंडीत जाईन रघुनंदन ॥ तत्काळचि कुंड रचून ॥ चेतविला अग्न कैकयीसुतें ॥ ९० ॥ मार्ग पाहिला दोन प्रहर ॥ अग्नींत घालावया शरीर ॥ सिद्ध जाहला भरत वीर ॥ परम प्रियकर रामाचा ॥ ९१ ॥ कुंडासमीप उभा राहून ॥ अंतरीं आठविलें रामध्यान ॥ मुकुट कुंडलें आकर्ण नयन ॥ सुहास्यवदन सांवळें ॥ ९२ ॥ उडी घालावी जों आंत ॥ तों समीप आला वायुसुत ॥ म्हणे आला आला रघुनाथ ॥ दशमुखांतक जगदात्मा ॥ ९३ ॥ आला सुरांचा कैवारी ॥ आला भक्तजनसाहाकारी ॥ भरत नेत्र उघडी ते अवसरीं ॥ तों मारुति घाली नमस्कार ॥ ९४ ॥ उष्णकाळ अत्यंत ॥ घायाळ रथीं उदक मागत ॥ त्यासी जीवन पाजिजे अकस्मात ॥ तैसा भरत सुखावला ॥ ९५ ॥ चकोर असतां क्षुधाक्रांत ॥ अवचित उगवे निशानाथ ॥ तैसा आनंदला भरत ॥ हनु-

२६ सूर्य. २७ जगताच्या आनंदाचें मूलस्थान. २८ सर्वांतर्यामी. २९ उचंबळला. ३० मासा. ३१ रत्नखाणीतील. ३२ पृथ्वी. ३३ रोष. ३४ विरक्ती, निरिच्छपणा. ३५ चंद्र.

मंतासी देखोनियां ॥ ९६ ॥ उचलोनि परम प्रीतीं ॥ हृदयीं आलिंगिला मारुती ॥ म्हणे कोठें आहे रघुपती ॥ दावीं मज प्राणसखया ॥ ९७ ॥ प्राण जातां अमृत ॥ एकाएकीं घालिजे मुखांत ॥ तैसी शुभ वार्ता अकस्मात ॥ घेऊनि आलासी कपींद्रा ॥ ९८ ॥ मग हनुमंतासी बैसोन ॥ पुसिलें सकळ वर्तमान ॥ अमृतवर्षाव करीत घन ॥ तैसें येरें कथियेलें ॥ ९९ ॥ म्हणे कृपासिंधु रघुनंदन ॥ क्षण-क्षणां तुमची आठवण ॥ करूनि म्हणे केव्हां जाईन ॥ भरताप्रती भेटावया ॥ १०० ॥ धन्य तुमचें बंधुपण ॥ शक्रपदातुल्य राज्य टाकून ॥ सकळ मंगलभोग त्यजून ॥ नंदिग्रामीं बैसलां ॥ १ ॥ भरत म्हणे हो मारुती ॥ मृगजीवनीं बुडेल अगस्ती ॥ तमार्णवीं पडेल दिनपती ॥ दोषें भागीरथी जरी लिंपे ॥ २ ॥ शेष जरी भागेल धरितां क्षिती ॥ जरी मर्यादा टाकील सरितापती ॥ तरी राज्यवासना मारुती ॥ मज होईल जाण पां ॥ ३ ॥ असो शत्रुघ्नासी म्हणे भरत ॥ तूं अयोध्येसी जाईं त्वरित ॥ वसिष्ठ-मातादि समस्त ॥ तयांसी श्रुत करीं वेगीं ॥ ४ ॥ अरुणोदय होतां सत्वर ॥ प्रजा सेना घेऊनि समग्र ॥ जगद्वंद्यासी सामोर ॥ गजरेंकरून येईंजे ॥ ५ ॥ ऐसी आज्ञा होतां शत्रुघ्न ॥ अयोध्येसी गेला धांवोन ॥ टवटवीत प्रसन्नवदन ॥ सुमंतासी भेटला ॥ ६ ॥ म्हणे पाहतां काय उठा त्वरित ॥ जवळी आले श्रीरघुनाथ ॥ नंदिग्रामीं आला हनुमंत ॥ पुढें सत्वर सांगावया ॥ ७ ॥ हर्षें धांवत सुमंत ॥ आनंद न माये गगनांत ॥ दुंदुभी त्राहाटिल्या त्वरित ॥ आला रघुनाथ म्हणोनियां ॥ ८ ॥ दणाणिल्या राजभेरी ॥ नाद न समाये अंबरीं ॥ शत्रुघ्नें राजसदनावरी ॥ कळस चढविला लवलाहें ॥ ९ ॥ सूर्योदयीं अकस्मात ॥ पृथ्वीवरी किरणें धांवत ॥ तैसी नगरीं प्रकटली मात ॥ आला रघुनाथ म्हणोनियां ॥ ११० ॥ आळोआळी जन धांवती ॥ अंगीं रोमांच उभे राहाती ॥ सुख न समाये तयां चित्तीं ॥ नयनीं लोटती प्रेमबिंदु ॥ ११ ॥ सोळा पद्में दळभार ॥ सिद्ध जाहले तेव्हां सत्वर ॥ कुंजरभेरी चवदा सहस्र ॥ एकसरें ठोकिल्या ॥ १२ ॥ शत्रुघ्न आणि सुमंत ॥ आले कौसल्येच्या सदनांत ॥ म्हणती माते आला रघुनाथ ॥ सीतासौमित्रांसहित पैं ॥ १३ ॥ कौसल्या सुमित्रा दोघी जणी ॥ उचंबळल्या आनंदेंकरूनी ॥ सुखाश्रु लोटले नयनीं ॥ बैसल्या वहनीं सत्वर ॥ १४ ॥ वसिष्ठापासीं जाऊन ॥ आनंदें सांगे शत्रुघ्न ॥ स्वामी आले जी रघुनंदन ॥ चला सत्वर सामोरे ॥ १५ ॥ आला ऐकतां रघुनाथ ॥ स्वानंदें उचंबळे ब्रह्मसुत ॥ चतुरंग दळ समस्त ॥ नगराबाहेर निघालें ॥ १६ ॥ विद्युत्प्राय ध्वज झळकती ॥ मकरबिरुदें पुढें चालती ॥ अष्टादश प्रजा धांवती ॥ नगराबाहेर सत्वर ॥ १७ ॥ कैकयी सुमित्रा कौसल्या ॥ सुखासनारूढ जाहल्या ॥ मंगळवाद्यांच्या ध्वनी लागल्या ॥ तो सोहळा न वर्णवे ॥ १८ ॥ वसिष्ठ शत्रुघ्न सुमंत ॥ दिव्य रथीं बैसले त्वरित ॥ आनंदमय जन समस्त ॥ श्रीरघुनाथ पाहावया ॥ १९ ॥ थोडीशी उरतां लमघडी ॥ वेगें धांवती वन्हाडी ॥ कीं गंगेचिया जवळी थडी ॥ तृषाक्रांत करिती त्वरेनें ॥ १२० ॥ तैसे ब्रह्मानंदेंकरून ॥ पुढें धांवती अयोध्येचे

३६ स्वर्गाच्या वैभवाप्रमाणें संपन्न. ३७ सूर्यकिरणांचे ठायीं जलाची भ्रांति होते त्या खोट्या पाण्यांत. ३८ पृथ्वी. ३९ वाजविल्या. ४० मोठे नगारे. ४१ वसिष्ठ. ४२ पालखींत.

जन ॥ इकडे भरत सीताशोकहरण ॥ सूर्योदयीं उठियेले ॥ २१ ॥ नित्यनेमातें सारून ॥ पुढें चालिले दोघे जण ॥ भरत म्हणे आजि धन्य नयन ॥ रामनिधान देखती ॥ २२ ॥ इकडे भारद्वाजाची आज्ञा घेऊन ॥ पुष्पकीं बैसे रघुनंदन ॥ सत्वर चालिलें विमान ॥ अयोध्यापट्टण लक्षीत ॥ २३ ॥ तों भरतासी म्हणे हनुमंत ॥ ऊर्ध्वपंथें पाहा जी त्वरित ॥ भरत जों ऊर्ध्व विलोकित ॥ तों अद्भुत देखिलें ॥ २४ ॥ भरत म्हणे हनुमंतासी ॥ हें काय असंभाव्य आकाशीं ॥ वाद्यें वाजती मानसीं ॥ आश्चर्य मज वाटतें ॥ २५ ॥ हनुमंत म्हणे पुष्पकविमान ॥ सेनेसहित सीतारमण ॥ वरी येताती बैसोन ॥ परम वेगेंकरूनियां ॥ २६ ॥ ऐसें सांगतां वायुनंदन ॥ भरतें घातलें लोटांगण ॥ मागुती ऊर्ध्व वदन करून ॥ पुनः विमान विलोकी ॥ २७ ॥ मागुती साष्टांग नमस्कार ॥ प्रेमें घाली भरत वीर ॥ चंद्राकडे पाहे चकोर ॥ ऊर्ध्वपंथें प्रीतीनें ॥ २८ ॥ मारुतीचा हस्त धरून ॥ पुढें चाले कैकयीनंदन ॥ तों राघवइच्छेंकरून ॥ पुष्पक उतरलें भूमीवरी ॥ २९ ॥ सीतेसहित रघुनंदन ॥ विमान खालीं उतरून ॥ अयोध्येसी साष्टांग नमन ॥ राजीवनयन करी तेव्हां ॥ १३० ॥ जन्मभूमि जान्हवी जननी ॥ सद्गुरुस्थळ पवित्र अवनी ॥ शिवहरिप्रतिमा संत देखोनी ॥ साष्टांग नमन करावें ॥ ३१ ॥ तपस्वी वेदज्ञ वृद्ध ब्राह्मण ॥ यज्ञप्रसाद ध्वज देखोन ॥ वंद्यद्रुमें समाधिस्थान ॥ महापुरुष वंदावे ॥ ३२ ॥ सत्यव्रती श्रीरघुनाथ ॥ म्हणोनि अयोध्येसी नमस्कारीत ॥ तों हनुमंतासमवेत ॥ जवळी भरत देखिला ॥ ३३ ॥ दाटला अष्टभावेंकरून ॥ घालीत येतसे लोटांगण ॥ श्रीरामावियोगेंकरून ॥ शरीर कृश जाहलें ॥ ३४ ॥ भस्म लाविलें शरीरासी ॥ वल्कलें वेष्टीत तो तापसी ॥ तैसा भरत देखोन मानसीं ॥ सीतावर कळवळला ॥ ३५ ॥ चरणीं क्रमीत भूमंडळ ॥ पुढें चाले तमालनीळ ॥ तान्हया वत्सालागीं स्नेहाळ ॥ धेनु हंबरत जैसी कां ॥ ३६ ॥ भरतें कैसें देखिलें रघुनाथा ॥ बहुत दिवस गेला पिता ॥ तो कुमरें दृष्टीं देखतां ॥ धांवें जैसा स्नेहभरें ॥ ३७ ॥ तैसें भरतें धांवोनी ॥ मिठी घातली श्रीरामचरणीं ॥ कीं गेलें धन देखतां नयनीं ॥ मिठी घाली जेवीं लोभी ॥ ३८ ॥ कीं जन्मांधासी आले नयन ॥ कीं मृत्युसमयीं अमृतपान ॥ कीं दरिद्रियास निधान ॥ अकस्मात प्राप्त जाहलें ॥ ३९ ॥ किंवा मारितां तस्करीं ॥ अकस्मात धांवला कैवारी ॥ तो जेवीं सुखावे अंतरीं ॥ भरतासी तैसें वाटत ॥ १४० ॥ राघवें उचलूनि ते समयीं ॥ भरत दृढ धरिला हृदयीं ॥ दोघांचे नयनप्रवाहीं ॥ जलसरिता लोटल्या ॥ ४१ ॥ हरिहर दोघे भेटले ॥ शशिमित्र एकवट जाहले ॥ कीं क्षीराब्धीचे एकवटले ॥ लोट जैसे एकत्र ॥ ४२ ॥ कीं वेदांतग्रंथींचे अर्थ ॥ ऐकत्वा परस्परें येत ॥ तैसा दशमुखांतक आणि भरत ॥ एकपणें मिळाले ॥ ४३ ॥ सम संतोष समान प्रीती ॥ सोडावें हें न वाटे चित्ती ॥ वियोगव्यथा दिगंतराप्रती ॥ जाती जाहली ते काळीं ॥ ४४ ॥ आलिंगन देऊन वेगळे होती ॥ परी अंतरीं नव्हेच तृप्ती ॥ तो सोहळा डोळां पाहाती ॥ सुग्रीव आणि बिभीषण ॥ ४५ ॥ म्हणती भरत रघुपती ॥ अद्भुत दोघांची प्रीती ॥ एकास एक आवडती ॥ प्राणाहून पलीकडे ॥ ४६ ॥ बंधु साधु विरक्त

४३ भूमी. ४४ वृक्ष.

भक्त ॥ चारही प्रकारें वंद्य भरत ॥ राज्य टाकूनि अरण्यांत ॥ चतुर्दश वर्षें बैसला ॥ ४७ ॥ नाहीं तरी आमुचें बंधुपण ॥ एकमेकांचे घेतले प्राण ॥ आतां रघुनाथदास म्हणोन ॥ वंद्य जाहलों त्रिलोकीं ॥ ४८ ॥ परी धन्य वाळी आणि रावण ॥ त्यांचे विरोधप्रसंगें-करून ॥ सखा जोडला रघुनंदन ॥ सच्चिदानंदस्वरूप जो ॥ ४९ ॥ असो भरतें प्रेमेंकरून ॥ वंदिले जनकॅंजेचे चरण ॥ जैसें वत्स प्रीतीनें धांवोन ॥ रिघे धेनूचे कांसेसी ॥ १५० ॥ यावरी भरत आणि लक्ष्मण ॥ उचंबळती प्रेमरसेंकरून ॥ एकमेकांसी आलिंगन ॥ देते जाहले तेधवां ॥ ५१ ॥ सुग्रीव आणि बिभीषण ॥ उभयतांसी म्हणे रघुनंदन ॥ भरतासी क्षेमालिंगन ॥ द्यावें आतां ये समयीं ॥ ५२ ॥ ऐसें ऐकतां दोघे जण ॥ भरतासी करिती साष्टांग नमन ॥ सुग्रीवासी उठवून ॥ भरतें आधीं आलिंगिलें ॥ ५३ ॥ सवेंचि उठोनि बिभीषण ॥ हृदयीं धरिला प्रीतींकरून ॥ यावरी नळ नीळ वाळिनंदन ॥ जांबुवंतादि भेटले ॥ ५४ ॥ याउपरी गुहॅंके भक्त ॥ तोही भरताऐसा व्रतस्थ ॥ तेणे प्रेमभरें दंडवत ॥ केलें तेव्हां रामासी ॥ ५५ ॥ सर्वांसी समान रघुनाथ ॥ गुहकास तेव्हां हृदयीं धरीत ॥ आनंद न माय गगनांत ॥ गुहकाचा ते काळीं ॥ ५६ ॥ मग गुहक भरतासमवेत ॥ विमानीं बैसला रघुनाथ ॥ विमानी मागुती उंचावत ॥ चालिलें अद्भुत वायुवेगें ॥ ५७ ॥ क्षीराब्धितटीं जाऊन ॥ बैसे जैसा विष्णुवॅंहन ॥ नंदिग्रामासमीप विमान ॥ उतरलें तैसें ते वेळीं ॥ ५८ ॥ सीता आणि श्रीरघुनाथ ॥ पुष्पकाखालीं उतरत ॥ वानर असुर समस्त ॥ क्षण न लागतां उतरले ॥ ५९ ॥ राघव म्हणे पुष्पकासी ॥ आतां तुवां जावें कुबेरापासीं ॥ चिंतिल्या समयासी ॥ आम्हापासीं येइंजे ॥ १६० ॥ ऐसी आज्ञा होतां तात्का-लिक ॥ ऊर्ध्वपंथें गेलें पुष्पक ॥ धॅनपतिपासीं जाऊनि देख ॥ स्थिर जाहलें ते काळीं ॥ ६१ ॥ नंदिग्रामासमीप अरण्यांत ॥ उतरता जाहला रघुनाथ ॥ वानर असुरदळ समस्त ॥ सेना तेथें बैसली ॥ ६२ ॥ इकडे अयोध्येबाहेर ॥ निघालें जाण दळ परिकर ॥ रथ शृंगारिले सुंदर ॥ आनंदें बहुत चालिले ॥ ६३ ॥ चवदा सहस्र कुंजरभेरी ॥ दणाणिल्या ते अवसरीं ॥ सोळा पद्मॅं दळेंसीं झडकरी ॥ शत्रुघ्न येत भेटावया ॥ ६४ ॥ भरत म्हणे जी रघुराया ॥ शत्रुघ्न सुमंत आले भेटावया ॥ आणि माताही येती लवलाहॅंया ॥ होऊनियां स्नेहभरित ॥ ६५ ॥ जो तपें ज्ञानें समर्थ ॥ जो शांतिक्षमेचा पर्वत ॥ तो वसिष्ठमुनि सद्गुरुनाथ ॥ भेटावया येत त्वरेनें ॥ ६६ ॥ आणि अयोध्येचे सकळ ब्राह्मण ॥ अष्टादश प्रजा सैन्य संपूर्ण ॥ असंभाॅव्य प्रीतींकरून ॥ भेटावया येतसे ॥ ६७ ॥ तो सुमंत आणि शत्रुघ्न ॥ रथाखालीं उतरून ॥ अवलोकितां सीताजीवन ॥ लोटांगण घालिती ॥ ६८ ॥ देखोनि शत्रुघ्न सुमंत ॥ भेटावया उठे रघुनाथ ॥ शत्रुघ्न चरणीं मिठी घालीत ॥ नेत्रीं उदक स्रवतसे ॥ ६९ ॥ रावणारि सद्गद होऊन ॥ शत्रुघ्नासी देत आलिंगन ॥ तों सुमंतें घरिले चरण ॥ विषकंठवंद्याचे ते काळीं ॥ १७० ॥ बंधूचे परी आदरें ॥ तोही आलिंगिला रघुवीरें ॥ परम प्रीतीं सौमित्रें ॥

४५ सीतेचे. ४६ अरण्यवासास जातेसमयीं रामचंद्राला ज्यानें नॉकॅंतून गंगापार केलें तो. ४७ गरुड. ४८ कुबेराजवळ. ४९ लवकर. ५० अद्भुत.

सुमंत शत्रुघ्न आलिंगिले ॥ ७१ ॥ यावरी सकळ जुंत्पती ॥ सुग्रीव बिभीषण नृपती ॥ सुमंतशत्रुघ्ना परम प्रीतीं ॥ भेटते जाहले तेधवां ॥ ७२ ॥ अवश्य सौभाग्यसरिता ॥ दोघांहीं वंदिली जनकदुहिता ॥ यावरी सुमंत म्हणे रघुनाथा ॥ सद्गुरु वसिष्ठ समीप आले ॥ ७३ ॥ ऐसें बोलतां सुमंत ॥ सामोरा धांवे रघुनाथ ॥ तों वहनाखालीं ब्रह्मसुत ॥ राम देखोनि उतरला ॥ ७४ ॥ नेत्रीं देखून सद्गुरुनाथ ॥ सद्गद जाहला जनकजामात ॥ दंडन्यायें नमस्कार घालीत ॥ धांवूनि वसिष्ठ उचली प्रेमें ॥ ७५ ॥ म्हणे जगद्वंद्या रघुनाथा ॥ तुझें दर्शन दुर्लभ समस्तां ॥ भूभार हरावया तत्त्वतां ॥ अवतरलासी सूर्यवंशीं ॥ ७६ ॥ संसारभयश्रममोचना ॥ रावणांतका चिन्मयलोचना ॥ पुराणपुरुषा जगन्मोहना ॥ धन्य लीला दाविली ॥ ७७ ॥ मग बोले जगदात्मा ॥ सर्व तुमचे कृपेचा महिमा ॥ गुरुभक्तासी शिव ब्रह्मा ॥ सनकादिक वंदिती ॥ ७८ ॥ रोग काळ भय मृत्य ॥ त्यांपासूनि रक्षी सद्गुरुनाथ ॥ देव केले बंधनमुक्त ॥ हा प्रताप गुरुकृपेचा ॥ ७९ ॥ मग वसिष्ठमुनीचे चरण ॥ वंदी प्रेमें सुमित्रानंदन ॥ त्यासी गुरूनें हृदयीं धरून ॥ म्हणे धन्य कीर्ति तुझी ॥ १८० ॥ त्यावरी वसिष्ठाचे चरण ॥ जानकी वंदी प्रेमेंकरून ॥ गुरु म्हणे अनंत कल्याण ॥ सौभाग्यवर्धन तुझें हो कां ॥ ८१ ॥ जनकात्मजे तूं पूर्ण सती ॥ वाढविली राघवाची कीर्ती ॥ तूं प्रणवरूपिणी चिच्छक्ती ॥ ब्रह्मांड रचिसी स्वइच्छें ॥ ८२ ॥ असो सुग्रीवबिभीषणादि वीर ॥ करिती सद्गुरूसी नमस्कार ॥ तों माता आली सत्वर ॥ सुखासनीं बैसोनियां ॥ ८३ ॥ वहनापुढें वेत्रधार ॥ चालती सहस्रांचे सहस्र ॥ वहन आच्छादिलें समग्र ॥ हेमांबरेंकरूनियां ॥ ८४ ॥ सुमंत म्हणे रघुनाथा ॥ स्वामी जवळी आली माता ॥ तों धीर न धरवे सीताकांता ॥ सामोरा जात त्वरेनें ॥ ८५ ॥ वहन ठेलें भूमंडळीं ॥ तों राघव धांवूनि आला जवळी ॥ जैसें तान्हें बाळ उडी घाली ॥ धेनु जवळी देखतां ॥ ८६ ॥ मातेचे चरणीं मस्तक ॥ ठेवी त्रिभुवननायक ॥ मायेनें उचलोन तात्कालिक ॥ हृदयीं धरिला ते काळीं ॥ ८७ ॥ नेत्रीं अश्रुधारा वाहात ॥ तेणें अभिषेकिला रघुनाथ ॥ स्नेहभरें माता स्फुंदत ॥ सद्गद कंठ जाहला ॥ ८८ ॥ म्हणे चतुर्दश वर्षेंपर्यंत ॥ बाळें माझीं गेलीं वनांत ॥ सुकुमार चरणीं चालत ॥ शीतोष्ण सोशीत पैं ॥ ८९ ॥ श्रीराम माझा राजहंस ॥ सोडोनि अयोध्यामानस ॥ पाठविला कंटकवनास ॥ सांवळा डोळस सुकुमार ॥ १९० ॥ माझा रामचंद्र निर्मळ ॥ वियोगराहु मध्यें सबळ ॥ चतुर्दश वर्षें शुद्ध मंडळ ॥ वदनेंदु आजि देखिला ॥ ९१ ॥ चतुर्दश वर्षें क्रमिली रजनी ॥ आजि राम उगवला वासरमणी ॥ अयोध्याजनवदनकमळिणी ॥ टवटवल्या एकदांचि ॥ ९२ ॥ नवमेघरंग रघुवीर ॥ वियोगसमीरें नेला दूर ॥ देहक्षेत्र शोषिलें समग्र ॥ आजिवरी आमुचें ॥ ९३ ॥ असो यावरी रघुनंदन ॥ करी मातेचें समाधान ॥ म्हणे भाग्य आमुचें परिपूर्ण ॥ देखिले चरण डोळां तुझे ॥ ९४ ॥ तों येऊनि लक्ष्मण ॥ वंदी कौसल्येचे चरण ॥ कौसल्येनें हृदयीं धरून ॥ बोले वचन सद्गद ॥ ९५ ॥ दोघे माझे चिंतामणी ॥

५१ जेठी अथवा मल्ल. ५२ ज्ञानस्वरूप. ५३ आदिनारायणा. ५४ ओंकार. ५५ ज्ञानशक्ति. ५६ भरजरी वस्त्र. ५७ आनंदानें अश्रु कंठांत उतरल्यामुळें दाटून येतो जो कंठ तो. ५८ मुखचंद्र. ५९ दिनरत्न सूर्य.

गोफणिले होते दूर वनीं ॥ माझे पूर्वभाग्येंकरूनी ॥ पुढती नयनीं देखिले ॥ ९६ ॥ सुमित्रेचे चरण सप्रेमें ॥ वंदिले तेव्हां आत्मारामें ॥ हृदयीं आलिंगिला सप्रेमें ॥ सुमित्रेनें तेधवां ॥ ९७ ॥ म्हणे चतुर्दश वर्षेंपर्यंत ॥ अयोध्या जाहली होती प्रेतवत ॥ आजि निजप्राण रघुनाथ ॥ मागुती आंत संचरला ॥ ९८ ॥ असो सुमित्रेसी वंदून ॥ रामें कैकयीस केलें नमन ॥ कौसल्येऐसें आलिंगन ॥ प्रीतीनें तेणें दीधलें ॥ ९९ ॥ कैकयी म्हणे रघुनाथा ॥ कल्याणरूपें नांदें आतां ॥ अपयश आलें माझे माथां ॥ तें आजि सर्व निरसलें ॥ २०० ॥ शुष्क कासारींचे मीन ॥ तळमळत होते अयोध्याजन ॥ तें आजि राम जगज्जीवन ॥ येऊनि भरलें एकसरें ॥ १ ॥ इकडे सुमित्रेचे चरण ॥ साष्टांग नमी लक्ष्मण ॥ पुत्रास प्रेमें उचलून ॥ हृदयीं धरी तेधवां ॥ २ ॥ म्हणे चवदा वर्षें निराहार ॥ वनीं श्रमलासी तूं थोर ॥ सौमित्र देत प्रत्युत्तर ॥ रघुवीरकृपेनें सुखी होतों ॥ ३ ॥ मग कैकयीस नमस्कार ॥ करीत भूधरावंतार ॥ आलिंगोनियां सौमित्र ॥ म्हणे बा रे विजयी होईं ॥ ४ ॥ यावरी कौसल्येचे चरणीं ॥ लागे येऊन मंगलेभगिनी ॥ हृदयीं दृढ आलिंगोनी ॥ रामजननी बोलत ॥ ५ ॥ चतुर्दश वर्षेंपर्यंत ॥ माये श्रमलीस बहुत ॥ स्नेहें मुख कुरवाळीत ॥ जानकीचें तेधवां ॥ ६ ॥ नवरत्नमुद्रिका परम प्रीतीं ॥ घाली जानकीचे हातीं ॥ तों सीतेनें सुमित्रा सती ॥ परम स्नेहें नमियेली ॥ ७ ॥ सुमित्रा म्हणे वो साजणी ॥ परम श्रमलीस काननीं ॥ आपले कंठींची माळ काढूनी ॥ गळां घातली जानकीच्या ॥ ८ ॥ स्नेहेंकरूनि धरिली हृदयीं ॥ मग सीतेनें वंदिली कैकयी ॥ क्षेम जों दिधलें नाहीं ॥ तों वचन काय बोलत ॥ ९ ॥ वय तुझें लहान साचार ॥ परी कीर्ति केली बहुत थोर ॥ रावणाची संपदा समग्र ॥ भोगूनियां आलीसी ॥ २१० ॥ श्रोत्रियाचें पात्र पूर्ण ॥ न कळतां घेऊनि गेलें श्वान ॥ तें श्वान मारिलें क्रोधेंकरून ॥ तरी पात्र तें पवित्र नोहेचि ॥ ११ ॥ तैसा रामें रावण मारून ॥ तुज आणिलें सोडवून ॥ कोणे एके प्रकारेंकरून ॥ कीर्ति त्रिभुवनीं प्रकटली ॥ १२ ॥ राम कष्टला वनवासीं ॥ परी तूं सुखें होतीस लंकेसी ॥ तेथींचा सोहळा मानसीं ॥ आठवत असेल तूझिया ॥ १३ ॥ ऐसें कैकयी बोलतां ॥ उगीच परतोनि गेली सीता ॥ अपवित्रासी उत्तर देतां ॥ येत हीनता श्रेष्ठासी ॥ १४ ॥ म्हणोनियां जनकबाळी ॥ जाऊनियां बैसली कौसल्येजवळी ॥ शांतीपासीं जैसी शोभली ॥ क्षमा निरंतर राहावया ॥ १५ ॥ कीं आवडी तेथें भक्ती ॥ राहे जैसी परम प्रीतीं ॥ कीं धारणा तेथें वृत्ती ॥ न सोडीच सर्वथा ॥ १६ ॥ तैसी कौसल्येपासीं सीता ॥ शोभली ती जगन्माता ॥ भाविक दुर्जना त्यागूनि तत्त्वतां ॥ संतसंगें जेवीं वसे ॥ १७ ॥ रामविजय ग्रंथ सुरस ॥ उत्तरकांड हाचि कळस ॥ त्यावरी अयोध्याप्रवेश ॥ सावकाश परिसिंजे ॥ १८ ॥ मंगलस्नान करून ॥ रघुवीर करील भोजन ॥ मग सुमुहूर्तेंसीं संपूर्ण ॥ अयोध्येंत प्रवेशती ॥ १९ ॥ श्रीधरवरदा राघवेशा ॥ ब्रह्मानंदा पुराणपुरुषा ॥ अभंगपद निजदासा ॥ कृपा करून देईं तूं ॥ २२० ॥ स्वस्ति श्रीरामविजय ग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ पंचत्रिंशत्तमोऽध्याय गोड हा ॥ २२१ ॥ ॥

६० शेषाचा अवतार लक्ष्मण. ६१ सीता.

३६

॥ श्रीगणेशाय नमः ॥ जो सद्गुरु आद्य निर्विकार ॥ जो ब्रह्मादिकांचें माहेर ॥ जो आदिमायेचा निजवर ॥ तो हा रघुवीर रविकुळीं ॥ १ ॥ अनंतब्रह्मांडांचा कर्ता ॥ जो प्रळयकाळाचा शासनकर्ता ॥ तो भरताग्रज तत्त्वतां ॥ नंदिग्रामीं राहिला ॥ २ ॥ अयोध्येचे जन सकळ ॥ षोडशपद्मे राजदळ ॥ सैन्य उतरलें तुंबळ ॥ नंदिग्राम वेष्टूनियां ॥ ३ ॥ अष्टादश पद्मे वानरदळ ॥ बहात्तर कोटी रीस सबळ ॥ छप्पन्न कोटी गोलांगूळ ॥ उतरलें यथावकाशें ॥ ४ ॥ यावरी विश्रव्याचा सुत ॥ बिभीषण जो कां पुण्यपंडित ॥ त्याची असुरसेना अद्भुत ॥ श्रीरघुनाथ-भक्त उतरले ॥ ५ ॥ अष्टादश अक्षौहिणी वाजंत्रें ॥ बिभीषणाचीं गर्जती गजरें ॥ त्याहूनि अयोध्येचीं परिकरें ॥ अहोरात्र वाजती ॥ ६ ॥ शत्रुघ्न आणि सुमंत ॥ हेमांबरें शिबिरें बहुत ॥ उभीं करिते जाहले तेथ ॥ लक्षानुलक्ष ते काळीं ॥ ७ ॥ त्यांसी रत्नजडित स्तंभ ॥ वरी खचित कळस सुप्रभ ॥ त्यांच्या तेजेंकरूनि नभ ॥ उजळलें ते काळीं ॥ ८ ॥ सुग्रीवबिभीषणादि नृपवर ॥ आणिक कपिराज थोरथोर ॥ त्यांसीही शिबिरगृहें सविस्तर ॥ ठाव दीधला राहावया ॥ ९ ॥ कुळाचळांत मेरु थोर ॥ तैसें मुख्य श्रीरामाचें शिबिर ॥ मातागुरुबंधूंसह रघुवीर ॥ तेथें राहता पैं जाहला ॥ १० ॥ अंतर्गृहीं सीता सती ॥ ऊर्मिला मांडवी श्रुतकीर्ती ॥ चवघी जावा तेथें राहाती ॥ आनंद चित्तीं न समाये ॥ ११ ॥ आला ऐकतां रघुवीर ॥ पातला जनकराज श्वशुर ॥ संगें दळभार अपार ॥ वाद्यगजरें येतसे ॥ १२ ॥ छप्पन्न देशींचे नृपती ॥ पावले तेव्हां शीघ्रगती ॥ सप्तद्वीपीं नवखंडीं जे वसती ॥ धांवती करभार घेऊनियां ॥ १३ ॥ धांवले सकळ ऋषीश्वर ॥ नाना-साधनी व्रती थोरथोर ॥ योग याग टाकोनि समग्र ॥ येती रघुवीर पाहावया ॥ १४ ॥ सप्त पुऱ्या गिरिकंदरीं ॥ नानातीर्थीं गूढविवरीं ॥ वृक्षाग्रवासी वायुआहारी ॥ आसनें जयांचीं नानाविध ॥ १५ ॥ शमदमादिक साधनें ॥ अष्टांगयोगें देहदंडणें ॥ नानाहठयोग व्रताचरणें ॥ सांडूनि वेगीं धांवती ॥ १६ ॥ तितुक्यांसही रघुनंदन ॥ उठोनि देत आलिंगन ॥ समस्तांसहित सीताजीवन ॥ वस्त्रमंडपीं बैसला ॥ १७ ॥ देहीं विदेही रघुवीर ॥ त्यासी भेटों आला विदेही श्वशुर ॥ तो जगन्मातेचा पिता मिथिलेश्वर ॥ पद्मजजनकें आलिंगिला ॥ १८ ॥ असो नर वानर नृपवर ॥ वसिष्ठादि सकळ ऋषीश्वर ॥ त्यांसी मंगलस्नान रघुवीर ॥ करविता जाहला ते काळीं ॥ १९ ॥ लक्षानुलक्ष सुवर्ण-कढया ॥ उष्णोदकें तापवूनियां ॥ सुगंध तैल लावूनियां ॥ मंगलस्नानें करवीतसे ॥ २० ॥ सर्वांसी वस्त्रें अलंकार ॥ नानारत्नभूषणें अपार ॥ देऊनियां जनकजावर ॥ रघुवीर सर्वां पाठवी ॥ २१ ॥ बिभीषणादि सुग्रीव वानर ॥ मंगलस्नान करिती सत्वर ॥ अमौल्य वस्त्रें अलंकार ॥ स्वयें रघुवीरें दीधले ॥ २२ ॥ वसिष्ठ नाहतांचि सत्वर ॥ अमौल्य वस्त्रें अलंकार ॥ स्वयें उठोनि रघुवीर ॥ देता जाहला आनंदें ॥ २३ ॥ मणि-मय पादुका आणून ॥ गुरूपुढें ठेवी रघुनंदन ॥ त्या वसिष्ठें पायीं घालोन ॥ मग बैसले स्वस्थानीं ॥ २४ ॥ त्रयभगिनींसमवेत सीता ॥ अंत-र्गृहीं जगन्माता ॥ नाहोनियां समस्ता ॥ लेइल्या वस्त्रें भूषणें ॥ २५ ॥ सकळ अयोध्यावासी जन ॥ नारीनर आदिकरून ॥ अवघ्यांसी गौरव

१ मानकें. २ सुवर्णवस्त्रांचीं. ३ राजलोक तळ देतात तीं. ४ सप्त पर्वतांत. ५ यम, नियम, आसन, प्राणायाम, प्रत्याहार, धारणा, ध्यान आणि समाधि असे आठ योग. ६ तीन बहिणींसह

समसमान ॥ जनकजामातें दीधला ॥ २६ ॥ मग बंधूसहित रघुनंदन ॥ करिता जाहला मंगलस्नान ॥ तैल सुगंध[७] लावून ॥ जटा उकलल्या मस्तकींच्या ॥ २७ ॥ चवदा वर्षेंपर्यंत ॥ भरताकारणें धरिलें व्रत ॥ तें आजि विसर्जिलें समस्त ॥ सीतावल्लभें तेधवां ॥ २८ ॥ अभ्यंग जाहलिया समग्र ॥ सुमंतें वस्त्रें अलंकार ॥ आणोनियां सत्वर ॥ रघूत्तमासी समर्पिलीं ॥ २९ ॥ जो लावण्यामृतसागर ॥ लेइला वस्त्रें अलंकार ॥ भरतें पादुका सत्वर ॥ मस्तकींच्या पुढें ठेविल्या ॥ ३० ॥ मग रघुनाथआज्ञेंकरून ॥ सौमित्र भरत शत्रुघ्न ॥ चौथा सुमंत प्रधान ॥ मंगलस्नान करिते जाहले ॥ ३१ ॥ संध्यादि नित्यकर्में सारिलीं ॥ तंव पाकनिष्पत्ति जाहली ॥ सकळ ऋषि नृप ते काळीं ॥ भोजनासी बैसले ॥ ३२ ॥ बिभीषण सुग्रीव वायुनंदन ॥ नळ नीळ शरभ गंधमादन ॥ बंधूंसहित रघुनंदन ॥ भोजनासी बैसले ॥ ३३ ॥ मणिमय कनकताटें[८] शोभलीं ॥ रत्नखचित अंडणिया तळीं ॥ उदकपात्रें भरूनियां ठेविलीं ॥ समसमान सर्वांसी ॥ ३४ ॥ रजताचळाऐसा केवळ[९] ॥ तैसा भात वाढिला निर्मळ ॥ पंचभक्ष्यें परमान्नें सोज्ज्वळ ॥ शाखा साठी पत्रशाखा शोभती ॥ ३५ ॥ दधि मधु दुग्ध घृत ॥ शर्करा पंचामृत वाढीत ॥ पंक्तीस जेथें रघुनाथ ॥ तेथें कांहीं न्यून नसे ॥ ३६ ॥ तीं अन्नें वर्णावीं समस्त ॥ तरी कां व्यर्थ वाढवावा ग्रंथ ॥ सकळ जीवांसहित रघुनाथ ॥ तृप्त जाहला भोजनीं ॥ ३७ ॥ हस्त प्रक्षालून निर्मळ ॥ त्रयोदशगुणी तांबूल ॥ सर्वांसहित तमालनील ॥ घेता जाहला ते काळीं ॥ ३८ ॥ राम कोटिमन्मथतात ॥ तीन दिवस राहिला तेथ ॥ वसिष्ठें काढिला दिव्य मुहूर्त ॥ अयोध्याप्रवेश करावया ॥ ३९ ॥ पुष्यार्कयोग बहु सुभद्र ॥ रामचंद्रासी उत्तम चंद्र ॥ त्या सुमुहूर्तीं गुणसमुद्र ॥ उठता जाहला तेधवां ॥ ४० ॥ लागला वाद्यांचा गजर ॥ भेरी ठोकिल्या चौदा सहस्र ॥ बिभीषणाचीं वाद्यें समग्र ॥ वाजों लागलीं तेधवां ॥ ४१ ॥ बिभीषणसुग्रीवादि नृपती ॥ बैसले तेव्हां दिव्य रथीं ॥ वाद्यगजरें करूनि क्षिती ॥ हालों लागली तेधवां ॥ ४२ ॥ दिव्यरथीं रघुनाथ ॥ बैसला तेव्हां सीतेसहित ॥ शत्रुघ्न आणि भरत ॥ चामरें वरी ढाळिती ॥ ४३ ॥ सहस्रांचे सहस्र वेत्रधार[१०] ॥ पुढें मार्ग करिती सत्वर ॥ नगरद्वाराजवळी रघुवीर ॥ पावता जाहला ते काळीं ॥ ४४ ॥ सप्त पुऱ्यांत अतिश्रेष्ठ ॥ अयोध्यापुरी हे वरिष्ठ ॥ सकळविद्यांमाजी सुभट ॥ अध्यात्मविद्या जैसी कां ॥ ४५ ॥ अयोध्येची रचना ते क्षणीं ॥ कपी असुर पाहती नयनीं ॥ देवराजपुरी[१२] उपमे उणी ॥ अयोध्येसीं तुलितां पैं ॥ ४६ ॥ अयोध्येभोंवतें उपवन ॥ उपमेसी उणें नंदनवन ॥ वृक्ष सदा सुफळ संपूर्ण ॥ गेले गगन भेदीत ॥ ४७ ॥ सूर्यकिरण न दिसे तळीं ॥ ऐसी सघनछाया पडिली ॥ कस्तूरीमृग सर्वकाळीं ॥ क्रीडा करिती वनांत ॥ ४८ ॥ रावे साळ्या मयूर ॥ चातकें लावे तित्तिर ॥ नानापक्षी निरंतर ॥ रामनामें गर्जती ॥ ४९ ॥ स्फटिकनिबद्ध सरोवरें ॥ माजी रातोत्पलें[१३] सुवासकरें ॥ राजहंस आनंदें थोरें ॥ क्रीडा करिती तये स्थानीं ॥ ५० ॥ अयोध्येभोंवते दुर्ग पूर्ण ॥ उंच सतेज अतिगहन ॥ नागफणाकृती शोभायमान ॥ चर्या त्यांवरी विकासती ॥ ५१ ॥ कीं ओळीनें जडले गभस्ती[१४] ॥ दुर्गावरी वृक्ष विराजती ॥ ते सदा फळीं

७ सुगंधितैल अंगास लावून स्नान करणें. ८ भोजनपात्र इत्यादिक ठेवण्याच्या तिवया. ९ रुप्याचा पर्वत. १० चवऱ्या. ११ छडीदार. १२ इंद्रपुरी. १३ तांबडी कमळें. १४ सूर्य.

निरोळें[15] भेदिती ॥ कपी पाहाती समस्त ॥ ५२ ॥ जैसे कनकाद्रीचे सुत ॥ तैसे हुडे[16] भोंवते विराजत ॥ महाद्वारें लखलखित ॥ तेज अमित न गणवे ॥ ५३ ॥ ऐरावतावरी देवपाळ ॥ बैसोन महाद्वारें जाईल ॥ तेवीं चोवीस योजनें विशाळ ॥ ओतप्रोत अयोध्या ॥ ५४ ॥ अयोध्येचा बाजार बहुत ॥ मृगमदाचा सुवास सुटत ॥ मठ मंडप चौबारा[17] शोभत ॥ रत्नजडित अपूर्व ॥ ५५ ॥ हिरेयांच्या मदलेसा[18] झळकती ॥ वरी मुक्तांचे हंस नाचती ॥ पाचूचे रावे शब्द करिती ॥ घरोघरीं नवल हें ॥ ५६ ॥ वीणे टाळ मृदंग वाजवून ॥ लेपें[19] करिती सुस्वर गायन ॥ रत्नपुतळ्या करिती नर्तन ॥ हस्तसंकेत दावूनियां ॥ ५७ ॥ शतखणी निर्मळ गोपुरें[20] विशाळ ॥ खणोखणीं पुतळ्या निर्मळ ॥ अणुमात्र लागतां अनिळ[21] ॥ फिरफिरून नृत्य करिती ॥ ५८ ॥ अवतारलेपें[22] रत्नजडित ॥ गोपुरांवरी सतेज झळकत ॥ उडुगणांसी[23] हिणावीत ॥ लक्षावधि चहूंकडे ॥ ५९ ॥ राजगृहीं अत्यंत सुप्रभ ॥ झळकती हिरियांचे स्तंभ ॥ निळियांचीं उथाळीं स्वयंभ ॥ जोतीं[24] घडलीं पाचूचीं ॥ ६० ॥ सुवर्णतुळवट लंबायमान ॥ वरी पाचूचे दांडे सघन ॥ माणिकांच्या किलच्या संपूर्ण ॥ तेजेंकरून लखलखती ॥ ६१ ॥ अष्टमहासिद्धि घरोघरीं नवनिधि तिष्ठती द्वारीं ॥ समानबुद्धि नरनारी ॥ पुण्यराहाटीं वर्तती ॥ ६२ ॥ मृत्यु रोग दरिद्र दुःख ॥ दुर्बुद्धि अवर्षण पाप शोक ॥ तस्कर कापट्य पीडा निंदक ॥ अयोध्येमाजी नसेचि ॥ ६३ ॥ छत्रासी एक दंड प्रसिद्ध ॥ सुमनहारासी गुंफितां बंध ॥ सारी[25] खेळतां मारी सुबुद्ध ॥ शूरत्व युद्धीं जाणिजे ॥ ६४ ॥ घरासी न येती ऋषि भिक्षुक[26] ॥ तरी लोकांस वाटे परम दुःख ॥ प्रजेसी साम्राज्य सुख देख ॥ देतील तेंच घेइंजे ॥ ६५ ॥ त्रिकाळ गाई दुभती ॥ इच्छिलें तितुकें दुग्ध देती ॥ यथाकाळीं मेघ वर्षती ॥ समयोचित पाहूनियां ॥ ६६ ॥ धर्मशाळा मंडप विशाळ ॥ हिऱ्यांचीं लिंगें शोभती सोज्ज्वळ ॥ आरक्त माणिकांच्या निर्मळ ॥ गणेशमूर्ति झगमगती ॥ ६७ ॥ घरोघरीं वेदाध्ययन ॥ न्याय मीमांसा सांख्य संपूर्ण ॥ पतंजलि वेदांत व्याकरण ॥ हेच चर्चा होतसे ॥ ६८ ॥ टाळ मृदंग उपांगेंसीं तेथ ॥ कीर्तन करिती प्रेमळ भक्त ॥ राग उपराग भार्येसहित ॥ सामगायन एक करिती ॥ ६९ ॥ लास्यकलाकुशल बहुत ॥ एक करिती तांडव नृत्य ॥ विद्युत्प्राय ध्वज तेथ ॥ देउळावरी झळकती ॥ ७० ॥ चंदनाचे सडे घालूनी ॥ वाटा रंगविल्या कुंकुमेंकरूनी ॥ बृद्धदशा कोणालागूनी ॥ अयोध्येमाजी नसेचि ॥ ७१ ॥ नानातीर्थांचीं कारंजीं बहुत ॥ घरोघरीं उफाळत ॥ नीळांचे मयूर धांवत ॥ बिदोबिदीं[27] लवलाहें ॥ ७२ ॥ आळोआळीं पाहतां मंदिरें ॥ एकाहूनि एक सुंदरें ॥ गृहागृहाप्रती गोपुरें[28] ॥ चित्रविचित्र शोभती ॥ ७३ ॥ असो ऐसी अयोध्या देखोन ॥ तटस्थ जाहले वानरगण ॥ तंव पूर्वद्वारीं रघुनंदन ॥ अयोध्येच्या पातला ॥ ७४ ॥ महाद्वारीं गणेश सरस्वती ॥ त्यांची पूजा करून श्रीरघुपती ॥ आंत प्रवेशला त्वरितगती ॥ सकळ नृपांसहित पैं ॥ ७५ ॥ जैसा नद समुद्रीं मिळाला ॥ नंदनवनीं[29] भ्रमर संचरला ॥ कीं चतुर्मुखाचे

१५ आकाश. १६ बुरुज. १७ चवाठा. १८ सभा. १९ चित्रें. २० देवालयादिकांच्या परिघद्वारावर दुमजली तिमजली बांधतात तीं २१ वायु. २२ दशावतारांचीं चित्रें. २३ नक्षत्रांना. २४ चौथरे. २५ सोंगटी. २६ संन्यासी. २७ निष्कंटक राज्य. २८ गल्लोगल्ली. २९ इंद्राच्या वनांत.

हृदयीं निघाला ॥ वेद जैसा षडंगेंसीं ॥ ७६ ॥ कीं वृत्रासुर मर्दून ॥ निजमंदिरीं प्रवेशे शचीरमण[30] ॥ तेवीं सकळांसहित स्घुनंदन ॥ अयोध्येंत प्रवेशला ॥ ७७ ॥ देव अंबरीं पाहाती ॥ असंख्य दाटले नृपती ॥ किरीटास किरीट आदळती ॥ रत्नें विखुरती चहूंकडे ॥ ७८ ॥ त्या अयोध्येच्या समस्त नारी ॥ ज्या देवांगनांहूनि सुंदरी ॥ रत्नदीप घेऊनियां करीं ॥ ओंवाळूं आल्या रामातें ॥ ७९ ॥ लक्षानुलक्ष नगरललना ॥ म्हणती राघवा चिन्मयलोचना[31] ॥ जयलाभ तुझिया चरणा- ॥ जवळी अखंड असोत ॥ ८० ॥ म्हणोनि आपुल्या गोपुरावरूनी ॥ ओंवाळिती सकळ कामिनी ॥ राकेंदूहूनी[32] वदनीं ॥ प्रभा विशेष विराजे ॥ ८१ ॥ त्यांकडे पाहून रघुनाथ ॥ सुमंतास भ्रूसंकेत दावीत ॥ तो त्यासी समजला अर्थ ॥ जें कां हृद्गत रामाचें ॥ ८२ ॥ वस्त्रें अलंकार आणूनी ॥ तात्काळ गौरविल्या कामिनी ॥ तों नगरलोक धांवले ते क्षणीं ॥ मंडपघसणी जाहली ॥ ८३ ॥ तयांसी वेत्रधारी मारीत ॥ तें दृष्टीं देखोन रघुनाथ ॥ तात्काळ परते केले दूत ॥ म्हणे जन सर्वत्र येऊं द्या ॥ ८४ ॥ आज्ञा होतांचि जाण ॥ जवळ आले सकळ जन ॥ पाहोनियां श्रीरामाचें वदन ॥ चरणीं मिठ्या घालिती ॥ ८५ ॥ लक्षोनियां श्रीरघुनाथा ॥ नारी टाकिती वरी अक्षता ॥ एक लिंबलोण तत्त्वतां ॥ मुखावरून उतरिती ॥ ८६ ॥ एक म्हणती तुजवरून ॥ राघवा जाऊं ओंवाळून ॥ एक म्हणती हें वदन ॥ पुनः दृष्टीं पडेना ॥ ८७ ॥ दिव्यसुमनांचे संभार ॥ वरोन वर्षती सुरवर ॥ असो जगद्वंद्य रघुवीर ॥ निजमंदिरीं प्रवेशला ॥ ८८ ॥ जाऊनि अंतर्गृहांत ॥ पुष्पांजलि देवांस समर्पीत ॥ राजयांच्या सेना समस्त ॥ अयोध्याप्रदेशीं उतरल्या ॥ ८९ ॥ अष्टादशपद्मे वानर ॥ उतरले लंकेचे असुर ॥ तितुक्यांसी आदर उपचार ॥ सुमंत शत्रुघ्न करिताती ॥ ९० ॥ बिभीषण सुग्रीव राजे सकळी ॥ ते सदा असती रामाजवळी ॥ वसिष्ठें सामग्री सिद्ध केली ॥ राज्यपदाची तेधवां ॥ ९१ ॥ श्वेत चामर श्वेत छत्र ॥ श्वेत गज श्वेत तुरंग थोर ॥ चतुःसमुद्रींचें आणिलें नीर ॥ पंच वल्लभ सप्त मृत्तिका ॥ ९२ ॥ सभामंडप देदीप्यमान ॥ तेथें मांडिलें दिव्य सिंहासन ॥ मिळाले सकळ विद्वज्जन ॥ आणि नृपती सर्वही ॥ ९३ ॥ वसिष्ठ म्हणे राजीवनयना ॥ जलजगात्रा[33] जानकीजीवना ॥ जगद्वंद्या अनंतसदना ॥ राज्य आतां अंगिकारीं ॥ ९४ ॥ भरत सप्रेमें बोले ॥ चतुर्दश वर्षें तप केलें ॥ तें आजि शीघ्र काळें ॥ सुफळ जाहलें पाहिजे ॥ ९५ ॥ सिंहासनीं बैसावें आपण ॥ मग अक्षय भांडारें फोडून ॥ द्रव्य याचकांसी देईन ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ९६ ॥ मग वसिष्ठें हातीं धरून ॥ मंडपा आणिला रघुनंदन ॥ सीतेसहित बैसवून ॥ अभिषेक केला वेदमंत्रीं ॥ ९७ ॥ घनश्याम पूर्ण रघुवीर ॥ तप्तकांचनवर्ण पीतांबर[34] ॥ लेववियले दिव्य अलंकार ॥ मुकुटकुंडलें कौस्तुभादि ॥ ९८ ॥ जानकीसहवर्तमान ॥ सिंहासनीं बैसविला रघुनंदन ॥ सकळ भूपती येऊन ॥ अक्षता कपाळीं लाविती ॥ ९९ ॥ सुमुहूर्तवेळा साधून सत्वर ॥ वरी उभारिलें दिव्य छत्र ॥ तों सकळ वाद्यांचा गजर ॥ होता जाहला ते काळीं ॥ १०० ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ सुमनें वर्षती सुरवर ॥ सकळ राजयांनीं

३० इंद्र. ३१ ज्ञानस्वरूपा. ३२ पौर्णिमेच्या चंद्राहून. ३३ कमळासारखें शरीर असणाऱ्या रामा. ३४ तापलेल्या सुवर्णाप्रमाणें लखलखीत.

करभार ॥ राघवापुढें समर्पिला ॥ १ ॥ सर्व नृप करून नमन ॥ उभे ठाकती कर जोडून ॥ भरतें भांडार फोडून ॥ याचकजन गौरविले ॥ २ ॥ उदार धीर रघुवीर ॥ ज्याचा बंधु भरत वीर ॥ मोटा बांधूनि अपार ॥ द्रव्य न्या हो म्हणतसे ॥ ३ ॥ पुरे पुरे हेचि मात ॥ याचक बोलती समस्त ॥ हयें[35] गज रत्नें अद्भुत ॥ दिधले बहुत याचकां ॥ ४ ॥ गोदानें भूदानें अपार ॥ जें वेदीं बोलिलें साचार ॥ तितुकें देऊनि द्विजवर ॥ सुखी केले ते काळीं ॥ ५ ॥ ऐसा षोडश दिनपर्यंत ॥ सोहळा होतसे अद्भुत ॥ कळेपात्रें[36] येवूनि तेथ ॥ विद्या दावीत रामापुढें ॥ ६ ॥ लक्ष्मण आणि भरत ॥ शत्रुघ्न आणि सुमंत ॥ युवराज्य[37] त्यांतें देत ॥ श्रीरघुनाथ ते समयीं ॥ ७ ॥ वस्त्रें भूषणें देऊन ॥ चवघे केले मुख्य प्रधान ॥ तुमच्या अनुमतेंकरून ॥ राज्य चालवीन राम म्हणे ॥ ८ ॥ असो दिव्य अन्नें निर्मून ॥ सकळ रायांसी दिधलें भोजन ॥ वस्त्रालंकारीं पूर्ण ॥ सेनेसहित गौरविले ॥ ९ ॥ मग श्रीरामाची आज्ञा घेती ॥ सेनेसहित सकळ नृपती ॥ स्वदेशाप्रती तेव्हां जाती ॥ गुण वर्णिती राघवाचे ॥ ११० ॥ सुग्रीव आणि बिभीषणास ॥ रामें राहविलें एकमास ॥ नित्य भोजन पंक्तीस ॥ नानाविलास सोहळे पैं ॥ ११ ॥ सिंहासनीं बैसतां रघुनाथ ॥ बंधू भोंवते आनंदभरित ॥ भक्तिरसें शत्रुघ्न भरत ॥ चामरें वरी वारिती ॥ १२ ॥ तों गवाक्षद्वारें ते समयीं ॥ अवलोकिती जाहली कैकयी ॥ म्हणे त्रिभुवनीं शोधितां पाहीं ॥ अभागी नाहीं भरताऐसा ॥ १३ ॥ चवदा वर्षें भिकारी ॥ जावूनि बैसला वनांतरीं ॥ शेवटीं बंधूचें दास्य करी ॥ चामरें वरी वारितो ॥ १४ ॥ माझें पूर्व पाप फळासी आलें ॥ ऐसें भरताची माता बोले ॥ वसिष्ठास बोलावून ते वेळे ॥ कैकयी सांगे एकांतीं ॥ १५ ॥ म्हणे माझिया पोटीं भरत ॥ दरिद्र जन्मला अत्यंत ॥ बंधूचें दास्य करीत ॥ मज हें दुःख वाटतें ॥ १६ ॥ मग बोले ब्रह्मसुत ॥ अजून तरी राहें निवांत ॥ ग्रासिला राजा दशरथ ॥ वना रघुनाथ धाडिला ॥ १७ ॥ सच्चिदानंद ब्रह्म पूर्ण ॥ तो हा अवतरला रघुनंदन ॥ मूर्खे तुज हें नाहीं ज्ञान ॥ अद्यापि कां कळेना ॥ १८ ॥ जे ब्रह्मादिदेवांची ध्येयमूर्ती ॥ हृदयीं ध्यात अपर्णापती[38] ॥ हृदयकमळीं वाहती ॥ सनकादिक[39] प्रीतीनें ॥ १९ ॥ पुराणपुरुष रघुनंदन ॥ त्याचे भजनीं लावीं मन ॥ आपुली युक्ति ठेवीं झांकून ॥ नसतीं वचनें बोलूं नको ॥ १२० ॥ तुजप्रती सांगावें ज्ञान ॥ जैसें काननामाजी रुदन ॥ कीं बधिरापुढें गायन ॥ लसणीं कर्पूर घांसिला ॥ २१ ॥ पुष्पवाटिकेंत पेंलांडु[40] उपजला ॥ परी तो गुण न सांडी आपुला ॥ नित्य दुर्गंधें वायस धुतला ॥ परी कृष्णत्व[41] नवजाय ॥२२॥ शर्करेचें आलें केलें ॥ माजी निंबबीज पेरिलें ॥ परी शेवटीं कडू येती फळें ॥ व्यर्थ गेले कष्ट सर्व ॥ २३ ॥ खापरास परिस घांसतां ॥ परी सुवर्ण नव्हेचि तत्त्वतां ॥ कीं दुग्धामाजी हरळें[42] घालितां ॥ मवाळ नव्हे कल्पांतीं ॥ २४ ॥ तैसें तुजप्रती जें जें शिकविलें ॥ तें तें सर्वही व्यर्थ गेलें ॥ आतां स्वस्थ राहूनि उगलें ॥ चित्त ठेवीं रघुनाथीं ॥ २५ ॥ ऐसें शिकवून तियेसी ॥ बाहेर आला वसिष्ठ ऋषी ॥ यावरी बिभीषण-सुग्रीवांसी ॥ निरोप देतसे श्रीराम ॥ २६ ॥ वानरांसी श्रीराम म्हणे ॥ भोजन करून गमन करणें ॥ तें केलें मान्य वचन ॥ अवश्य म्हणती

३५ घोडे. ३६ गाणाऱ्या वेश्या. ३७ यौवराज्याचा अधिकार. ३८ शंकर. ३९ ब्रह्मदेवाचे पुत्र–सनक, सनंदन, सनातन व सनत्कुमार. ४० कांदा. ४१ काळा रंग. ४२ रेती.

तेघवां ॥ २७ ॥ ते दिवसीं मोठा सोहळा ॥ मेळवूनि द्विजांचा मेळा ॥ वानरांसहित सकळां ॥ भोजनविधि आरंभिला ॥ २८ ॥ प्रेमाचिया गंधाक्षता ॥ लावी सर्वां सँरासिजोद्भवपिता ॥ सुमनमाळा तत्त्वतां ॥ अर्पीत समस्तां आदरें ॥ २९ ॥ चैतन्य परिमलद्रव्यें बहुत ॥ सर्वांस चर्चिलीं शोभिवंत ॥ अत्तर धूप दीप यथार्थ ॥ करूनि भोजना बैसविले ॥ १३० ॥ श्रीरामगृहींचें दिव्यान्न ॥ त्या सुवासालागीं वेधोन ॥ वसंत करी प्रदक्षिण ॥ इच्छाभोजन तेथींचें ॥ ३१ ॥ त्या अन्नाचा सुवास बहुत ॥ स्वर्गीं देवांस आँवतूं जात ॥ विबुध लाळ घोंटिती समस्त ॥ श्रीरामपंक्तीस जेवावया ॥ ३२ ॥ बैसावया सुवर्णपाट ॥ मांडिलें दिव्यरत्नाचें ताट ॥ जडित अडणियांचें प्रकट ॥ दिव्य तेज चहूंकडे ॥ ३३ ॥ सुगंध उदकें भरूनियां ॥ जवळी ठेविल्या जडित झारिया ॥ पात्रांप्रती शोभती समया ॥ लावूनियां रत्नदीप ॥ ३४ ॥ प्रथम विश्वास संपूर्ण ॥ तेंच आधीं वाढिलें लवण ॥ विरक्तीचीं मिरगुंडें जाण ॥ नानासाधनें त्याचि शाखा ॥ ३५ ॥ सत्कर्माचिया कोशिंबिरी ॥ वाढिल्या नवविध भक्तीचिया क्षीरी ॥ निश्चय शर्करा त्यांवरी ॥ ऐसियापरी शुभ्र दिसे ॥ ३६ ॥ निजबोधाचा भात पूर्ण ॥ अक्षय शांतीचें वरी वरान्न ॥ तेथें अभेद वडे करून ॥ नानापरींचे वाढिले ॥ ३७ ॥ पूर्ण प्राप्तीचे मांडे थोर ॥ भूतकृपेच्या घारिया सुकुमार ॥ तेलवरिया गोडपुऱ्या अपार ॥ मिष्ट ऐसीं वाढिलीं ॥ ३८ ॥ सत्वघृतांत तळून ॥ गुँळवरिया अंतरीं गोड पूर्ण ॥ क्षमाफेणिया शोभायमान ॥ समसमान सर्वांसी ॥ ३९ ॥ विवेकपापड चांगले ॥ वैराग्यअमीवरी भाजिले ॥ विज्ञान तेंचि अमृतफळें ॥ वाढिलीं केळें सत्त्वाचीं ॥ १४० ॥ सर्वांगभूतीं समता चोखँडी ॥ तेच घमघमीत वाढिली कढी ॥ सज्जन जाणती तिची गोडी ॥ वेदांतशास्त्रवेत्ते जे ॥ ४१ ॥ मुख्य गुरुकृपेचें घृत ॥ त्याविणें अन्न विरस समस्त ॥ प्रेमेंकरून सद्यस्तप्त ॥ शुद्ध करीत अन्नातें ॥ ४२ ॥ जेवणार बैसले सद्भक्त ॥ स्वानंदजळें पात्रें प्रोक्षीतँ ॥ देहबुद्धीच्या चित्राहुती तेथ ॥ पात्राबाहेरी घातल्या ॥ ४३ ॥ सोहंगायत्री जपोनी ॥ देहबुद्धीनांवें सोडिलें पाणी ॥ निवृत्ति आपोशन घेऊनी ॥ रामस्मरणें गर्जिन्नले ॥ ४४ ॥ पंचप्राणांच्या प्राणाहुती ॥ योगाभ्यासें आधीं करिती ॥ शिखेची कामग्रंथी ॥ सत्वर सोडिती निजहस्तें ॥ ४५ ॥ निरभिमान संपूर्ण ॥ तेणेंच केलें करक्षालन ॥ नेत्रांसी लाविलें जीवन ॥ जगजीवन सर्व दिसे ॥ ४६ ॥ श्रीरामभक्त क्षुधाक्रांत ॥ स्वाद घेऊनि प्रीतीनें जेवीत ॥ पद्मासन घालोनि निश्चित ॥ ग्रासामागें ग्रास घेती ॥ ४७ ॥ भवरोगें जे वेष्टित ॥ नाहीं भावक्षुधा पोटांत ॥ ते टकमकां उगेच पाहात ॥ ग्रास एक न घेववे ॥ ४८ ॥ चंद्रोदयीं द्रवे सोमकांत ॥ इतर पाषाण कोरडे समस्त ॥ तैसे श्रीरामपंक्तीस जेविले भक्त ॥ अभाग्यां प्राप्त कैचें तें ॥ ४९ ॥ ऐसे जेविती आनंदें ॥ नामें गर्जती महाशब्दें ॥ भावें चर्चा करिती ऋषी वेदें ॥ त्याचे स्मरणें करूनियां ॥ १५० ॥ जे दैवी संपँत्तीनें सभाग्य होती ॥ तेच रामपंक्तीस जेविती ॥ तृप्तीचे ढेंकर देती ॥ ब्रह्मानंदेंकरूनियां ॥ ५१ ॥ जे त्रिभुवनपतीची राणी ॥ वाढी जानकी त्रिजगज्जननी ॥ तेथें न्यून पदार्थांची काहाणी ॥ कदाकाळीं पडेना ॥ ५२ ॥ स्वानुभव जळ सेवून ॥ कर्मधर्मांचें

४३ कमलामध्यें जन्मलेल्या ब्रह्मदेवाचा बाप-विष्णु तोच राम. ४४ सांगावयास. ४५ एक प्रकारचें पक्वान्न. ४६ चांगली. ४७ उदकानें शुद्ध करणें. ४८ शेंडीची. ४९ चित्तशुद्धि इत्यादि.

उत्तरोपोशन ॥ घेऊनि उठिले ते जन ॥ आंचवले पूर्ण संसारा ॥ ५३ ॥ अमानित्व अदंभित्व ॥ हेच विडे घेती समस्त ॥ निजधन नाम-मुद्रांकित ॥ दक्षिणा देती याचकां ॥ ५४ ॥ भक्तीचीं भूषणें वस्त्रें ॥ सद्भक्तांसी दिधलीं राजीवनेत्रें ॥ तो सोहळा वर्णावया वक्त्रें ॥ सहस्रवदना शक्ति नोहे ॥ ५५ ॥ ऐसें स्वपंक्तीस बैसवून ॥ दिधलें सकळांसी भोजन ॥ मग सभामंडपास येऊन ॥ रघुनंदन गौरवी तयां ॥ ५६ ॥ मुकुट कुंडलें सर्व अलंकार ॥ आपण स्वयें देत रघुवीर ॥ तैसेची इतर वानर ॥ गौरविले रघुनाथें ॥ ५७ ॥ बिभीषण सुग्रीव जांबुवंत ॥ त्यांच्या सेना ज्या ज्या समस्त ॥ तितुक्या गौरवी रघुनाथ ॥ वस्त्रें अलंकार देऊनीयां ॥ ५८ ॥ दोन सिंहासनें दोन छत्रें ॥ बिभीषणसुग्रीवां दिधलीं राजीवनेत्रें ॥ दिधलीं कित्येक उत्तरवस्त्रें ॥ नानावस्तु अपार ॥ ५९ ॥ परी पुढें असे हनुमंत ॥ त्याकडे न पाहे रघुनाथ ॥ वानरगण पाहती समस्त ॥ विपरीतार्थ देखोनी ॥ १६० ॥ कां न पाहे रघुनंदन ॥ तरी हनुमंताऐसें निधान ॥ हें ब्रह्मांड ओंवाळून ॥ तयावरून टाकावें ॥ ६१ ॥ ज्याच्या उपकारांच्या राशी अपार ॥ मेरूपरीस जाहल्या थोर ॥ त्यासी द्यावया अलंकार ॥ दृष्टीस कांहीं दिसेना ॥ ६२ ॥ मग उठोनियां रघुपती ॥ हृदयीं दृढ धरी मारुती ॥ म्हणे तव हृदयीं निश्चिती ॥ मीच सर्वदा राहेन ॥ ६३ ॥ तुजवेगळा एक क्षण ॥ जिव-लगा मी नव्हे जाण ॥ हनुमंतें दृढ धरिले चरण ॥ म्हणे मज हेंचि देईं ॥ ६४ ॥ सीतेनें वस्त्रें अलंकार ॥ देऊनि गौरविले सकळ वानर ॥ परी आपुले गळ्याचा दिव्य हार ॥ हनुमंतासी दीधला ॥ ६५ ॥ त्या हारासी तत्त्वतां ॥ उपमा नाहीं सर्वथा ॥ त्रिभुवनींचें मोल देतां ॥ तेंही उणें तयासी ॥ ६६ ॥ पृथ्वीचें मोल संपूर्ण ॥ एक एक मणि जाण ॥ तो हार जानकीनें घेऊन ॥ मारुतीच्या गळां घातला ॥ ६७ ॥ हनुमंत तत्काळ उडाला ॥ वृक्षावरी समोर बैसला ॥ एक एक मणि फोडिला ॥ दाढेखालीं घालूनियां ॥ ६८ ॥ जो मणि पाहे फोडून ॥ म्हणे यांत नाहीं रघुनंदन ॥ म्हणोनि देतसे भिरकावून ॥ व्यर्थ पाषाण काय हे ॥ ६९ ॥ बोलती सुग्रीवादि वानर ॥ व्यर्थ कां फोडिसी दिव्य हार ॥ मारुती म्हणे रघुवीर ॥ याचे अंतरीं दिसेना ॥ १७० ॥ वानर म्हणती तुझे हृदयीं ॥ राम दावीं या समयीं ॥ ऐसें बोलत लवलाहीं ॥ काय केलें हनुमंतें ॥ ७१ ॥ हृदयकपाट उघडिलें ॥ उदर विदारून दाविलें ॥ तों आंत श्रीरामरूप सांवळें ॥ समस्तीं देखिलें एकदांचि ॥ ७२ ॥ जैसा सिंहासनीं रघुनाथ ॥ तैसा मारुतीचे हृदयीं दिसत ॥ मग वानर उठोनि समस्त ॥ नमस्कारिती हनुमंता ॥ ७३ ॥ असो अयोध्येसी निरंतर ॥ राहिला अंजनीचा कुमर ॥ वरकड सिद्ध जाहले वानर ॥ निजग्रामासी जावया ॥ ७४ ॥ लक्ष्मण भरत शत्रुघ्न ॥ तिहीं सुग्रीव बिभीषण ॥ वस्त्राभरणीं गौरविले पूर्ण ॥ सदना आपुले नेऊनियां ॥ ७५ ॥ कौसल्या सुमित्रेप्रती ॥ सुग्रीव बिभी-षण पुसती ॥ म्हणे माते हो आह्मांवरी प्रीती ॥ असों द्यावी बहुसाल ॥ ७६ ॥ कौसल्या सुमित्रा बोलत ॥ बा रे तुमचे उपकार अमित ॥ विजयी करून रघुनाथ ॥ माझा मज भेटविला ॥ ७७ ॥ अमोल्य अलंकार देऊन ॥ गौरविले ते दोघे जण ॥ मग सुग्रीव

५० भोजनाचे शेवटीं तळहातावर उदक घेऊन प्राशनं करतात तें. ५१ निगर्वीपणा. ५२ दांभिकपणा नव्हे तें. ५३ अनंत. ५४ किंमत होत नाहीं असे.

आणि बिभीषण ॥ कैकयीसदना चालिले ॥ ७८ ॥ तों आडवा येऊन भरत ॥ तिकडे न जावें जी म्हणत ॥ कैकयी विपरीत बोलत ॥ चित्तें[५५] खेद पावेल तूंमचें[५६] ॥ ७९ ॥ ऐसें भरतें बोलोन ॥ परतविले सुग्रीव बिभीषण ॥ रघुनाथाजवळी येऊन ॥ आज्ञा मागती जावया ॥ १८० ॥ उभे राहिले जोडूनि कर ॥ सर्वांचे अश्रूंनीं भरले नेत्र ॥ म्हणती राघवा निरंतर ॥ सर्वथा आम्हां न विसरावें ॥ ८१ ॥ त्रिभुवनींचें राज्य टाकावें ॥ रामा तुजजवळी नित्य राहावें ॥ परी हें प्राक्तनें[५७] नाहीं बरवें ॥ ओढून नेतें बळेंचि ॥ ८२ ॥ काय आठवावे उपकार ॥ जन्मोजन्मीं न पडावा अंतर ॥ तुझे बोल गोड निरंतर ॥ राघवा हृदयीं आठवती ॥ ८३ ॥ स्फुंदस्फुंदोनि दोघेजण ॥ बोलती सुग्रीव बिभीषण ॥ मग म्हणे रघुनंदन ॥ तुमच्या हृदयीं वसे मी ॥ ८४ ॥ मग उठोनियां रघुनाथ ॥ दोघांचे मस्तकीं ठेवी हस्त ॥ मग सैन्य घालोनि सीताकांत ॥ निघते जाहले ते काळीं ॥ ८५ ॥ तयांसी बोळवीत रघुवीर ॥ गेला अयोध्येबाहेर ॥ मग सर्व वानरीं[५८] नमस्कार ॥ रघुनाथासी घातला ॥ ८६ ॥ बिभीषण सुग्रीव जांबुवंत ॥ नळ नीळ शरभ वाळिसुत ॥ इंहीं साष्टांग नमूनि रघुनाथ ॥ जाते जाहले ते काळीं ॥ ८७ ॥ दक्षिणपंथें चालिले त्वरित ॥ मागुती राघवाकडे पाहात ॥ तेथोनि नमस्कार घालीत ॥ सद्गद चित्तीं होवूनियां ॥ ८८ ॥ मग पवनवेगेंकरून ॥ कँपी असुर[५९] निघाले तेथून ॥ किष्किंधेस सूर्यनंदन[६०] ॥ राहिला कपींसमवेत ॥ ८९ ॥ तेणें बिभीषण गौरविला ॥ मग घेऊनि असुरमेळा ॥ रावणानुज लंकीं आला ॥ स्वस्थ राहिला निजस्थानीं ॥ १९० ॥ इकडे अयोध्येसी रघुनाथ ॥ बंधूंसहित राज्य करीत ॥ पृथ्वी संपूर्ण आनंदभरित ॥ दुःख किंचित असेना ॥ ९१ ॥ अकरासहस्र वर्षें वरी ॥ अयोध्यानाथ राज्य करी ॥ लोक सर्व धर्माधिकारी ॥ पाप तिळभरी असेना ॥ ९२ ॥ अवतार हरि उदंड धरी ॥ परी बहुत सुख रामावतारीं ॥ अकरासहस्र वर्षवरी ॥ अक्षय्य राज्य चालविलें ॥ ९३ ॥ जरा[६१] मृत्यु दुःख दरिद्र ॥ राज्यांत नाहीं अणुमात्र ॥ सीतेसहित राजीवनेत्र ॥ ब्रह्मानंदें वर्ततसे ॥ ९४ ॥ वसिष्ठ विश्वामित्र अगस्ती ॥ आणीक ऋषी जैसे गौभस्ती[६२] ॥ अयोध्येमाजी सदा वसती ॥ जनकजापतीचे समीप ॥ ९५ ॥ अगस्तीच्या मुखें श्रवण ॥ नित्य करी रघुनंदन ॥ सदा तृप्त याचकजन ॥ राघवदर्शन घेतांचि ॥ ९६ ॥ सुरस रामविजय ग्रंथ ॥ उत्तरकांड कथा अद्भुत ॥ राज्यीं बैसला राजीवनेत्र ॥ धन्य कार्यार्थ सुरस हा ॥ ९७ ॥ रामविजयाचें एक आवर्तन[६३] ॥ करी संपूर्ण पापाचें दहन ॥ आणि शत्रुपराजय पूर्ण ॥ श्रवण करितां होतसे ॥ ९८ ॥ अज्ञानांसी होय ज्ञान ॥ निपुत्रिकांसी पुत्रसंतान ॥ भवरोग जाय विरून ॥ भावें करून परिसतां ॥ ९९ ॥ अयोध्याप्रवेश जाहला पूर्ण ॥ पुढें रसाळ कथा गहन ॥ श्रवण करोत पंडितजन ॥ राघवीं मन समर्पूनियां ॥ २०० ॥ अयोध्यापुरवासिया रामा ॥ श्रीब्रह्मानंदा कल्याणधामा ॥ श्रीधरवरदा पूर्णकामा ॥ नामा अनामा अतीत तूं ॥ १ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ षट्त्रिंशत्तमोध्याय गोड हा ॥ २०२ ॥ अ० ॥ ३६ ॥

---

५५ तुमच्या अंतःकरणास व्यथा होईल. ५६ दैव. ५७ उजवा. ५८ वानर. ५९ राक्षस. ६० सुग्रीव. ६१ म्हातारपण. ६२ सूर्य. ६३ ईश्वरप्रीत्यर्थ एक वेळ वाचणें.


३७
गोलिवडेकर

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ जयजय राघवा करुणाकरा ॥ अवनिजाकुलभूषणा मनविहारा ॥ रावणानुज-पाळका समरधीरा ॥ मित्रपुत्रहितप्रिया ॥ १ ॥ प्रतापसूर्यवंशविवर्धना ॥ मयजामातकुलकाननच्छेदना ॥ सकळवृंदारकबंधमोचना ॥ आनंदसदना अक्षया ॥ २ ॥ कौसल्याहृदयारविंदभ्रमरा ॥ भरतनयनपद्मदिवाकरा ॥ सौमित्रप्राणआधारा ॥ अतिउदारा अयोध्या-प्रभो ॥ ३ ॥ ब्रह्मानंदा रघुनंदना ॥ वदवीं पुढें ग्रंथरचना ॥ तुझी लीला जगन्मोहना ॥ तूंचि बोलें यथार्थ ॥ ४ ॥ पंडितीं ऐकावें सावधान ॥ छत्तिसावे अध्यायीं जाण ॥ राजाधिराज रघुनंदन ॥ राज्यासनीं बैसला ॥ ५ ॥ एकादशसहस्र वर्षें ॥ निर्विघ्न राज्य पुराण-पुरुषें ॥ अयोध्येचें केलें संतोषें ॥ विश्व सकळ कोंदलें ॥ ६ ॥ तों विदेहराजनंदिनी ॥ जगन्माता प्रणवरूपिणी ॥ ते अयोध्यापतीची राणी ॥ झाली गर्भिणी पहिल्यानें ॥ ७ ॥ शास्त्रसंख्या मास भरतां जाण ॥ वोंटभरण करी रघुनंदन ॥ तो सोहळा वर्णितां पूर्ण ॥ भागे वदन शेषाचें ॥ ८ ॥ वसंतकाळीं क्रीडावनांत ॥ राघव प्रवेशला सीतेसहित ॥ अत्यंत वन तें शोभिवंत ॥ नंदनवनाहूनियां ॥ ९ ॥ वृक्ष सदाफळ आणि सघन ॥ माजी न दिसे सूर्यकिरण ॥ तेथें सीतेची अंगुली धरून ॥ राजीवनयन विचरतसे ॥ १० ॥ नाना वृक्षांचिया जाती ॥ सीतेस दावी त्रिभुवनपती ॥ एकांत देखोन सीतेप्रती ॥ पुसत राघव प्रीतीनें ॥ ११ ॥ म्हणे सुकुमारे जनक-बाळे ॥ तुज काय होताती अंतरीं डोहळे ॥ मना आवडे तें ये वेळे ॥ सांग सर्वही पुरवीन ॥ १२ ॥ मग इच्छित हास्यवदन ॥ जानकी देत प्रतिवचन ॥ म्हणे एक आवडे रघुनंदन ॥ नलगे आन पदार्थ ॥ १३ ॥ राजीवाक्ष म्हणे लाज सांडूनी ॥ डोहळे सांग काय ते मनीं ॥ जें म्हणसील तें ये क्षणीं ॥ पुरवीन जाण राजसे ॥ १४ ॥ जनकजा बोले याउपरी ॥ म्हणे जन्हुकुमारीचिये तीरीं ॥ पवित्र ऋषिपत्न्यांमाझारी ॥ पंचरात्री राहावें ॥ १५ ॥ घालोनियां तृणासन ॥ करावें भूमीवरी शयन ॥ कंदमुळें भक्षून ॥ शुचिभूत असावें ॥ १६ ॥ मनांत म्हणे रघुनंदन ॥ पूर्वी वनवास भोगिले दारुण ॥ अजूनि न धायेचि मन ॥ आवडे कानन इयेतें ॥ १७ ॥ पुढील भविष्यार्थ जाणोन ॥ अवश्य म्हणे रघुनंदन ॥ मनकामना पूर्ण करीन ॥ तुझी जाण सुकुमारे ॥ १८ ॥ याउपरी एकदां रघु-वीर ॥ पुरींचे रक्षक जे हेर ॥ त्यांसीं पुसतसे श्रीधर ॥ दृढभावें निर्धारें ॥ १९ ॥ तुम्ही नगरीं हिंडतां निरंतर ॥ ऐकर्णितां जनवार्ता समग्र ॥ तरी तें सांगावें साचार ॥ लोक काय म्हणती आम्हां ॥ २० ॥ वंदिती किंवा निंदिती ॥ यश किंवा अपयश स्थापिती ॥ अभय असे तुह्मांप्रती ॥ सांगा निश्चिती काय तें ॥ २१ ॥ हेर म्हणती नगरांत ॥ राघवा तुझे सर्व भक्त ॥ सकळ लोक पुण्यवंत ॥ यश वर्णिती सर्वदा ॥ २२ ॥ परी रजक एक दुर्जन ॥ तेणें स्त्रीसी केलें ताडन ॥ त्या रागें ती स्त्री रुसोन ॥ पितृसदना-प्रती गेली ॥ २३ ॥ माहेरीं होती बहुदिन ॥ मग पित्यानें हातीं धरून ॥ जामातगृहाप्रती नेऊन ॥ घालिता जाहला ते काळीं ॥ २४ ॥

१ सीता. २ सुग्रीव. ३ रावण. ४ देव. ५ ओंकार. ६ सहा महिने. ७ ओटी भरणे. ८ कमळासारखे नेत्र आहेत ज्याचे, असा राम. ९ भागीरथी नदीच्या. १० ऐकतां. ११ साचंत. १२ परीट.

तंव तो रजक क्रोधायमान ॥ श्वशुरप्रती बोले वचन ॥ म्हणे ईस माझें सदन ॥ प्रवेशों नेदीं सर्वथा ॥ २५ ॥ मी तों राम नव्हें निर्धारीं ॥ रावणें नेली त्याची अंतुरी ॥ षण्मास होती असुरघरीं ॥ तेणें माघारी आणिली ॥ २६ ॥ आम्ही रजक शुद्ध साचार ॥ जगाचे डोंग काढणार ॥ आमुचे जातींत निर्धार ॥ विपरीत ऐसें सोसेना ॥ २७ ॥ हें अनुचित केलें रघुनाथें ॥ मागुती नांदवितो सीतेतें ॥ तैसा लंपट मी नव्हें येथें ॥ वदन इचें न पाहेंचि ॥ २८ ॥ ऐसा चांडाळ तो रजक ॥ बोलिला लावून कलंक ॥ ऐसें ऐकतां रघुनायक ॥ परम संतप्त जाहला ॥ २९ ॥ पाचारूनियां लक्ष्मण ॥ त्यास सांगे सकळ वर्तमान ॥ म्हणे रजकें निंदिलें मजलागून ॥ जानकी त्यागीन सौमित्रा ॥ ३० ॥ दशमुख मारूनि सहकुळीं ॥ सुवेळीं आणिली जनकबाळी ॥ विधि पुरंदर चंद्रमौळी ॥ देवमंडळी सर्व होती ॥ ३१ ॥ सकळांदेखत ते वेळे ॥ जानकीनें दिव्य दाविलें ॥ अजूनि रजक लांछन बोले ॥ तें मज न सोसवे निर्धारें ॥ ३२ ॥ तनु त्यागी जैसा प्राण ॥ कोप टाकी रेणुकारमण ॥ कीं संसार संकल्प तपोधन ॥ त्यागी जैसा साक्षेपें ॥ ३३ ॥ संसारभय तत्त्वतां ॥ योगी टाकी जैसी ममता ॥ तैसीच त्यागीन मी सीता ॥ सुमित्रासुता सत्य हें ॥ ३४ ॥ अहिंसक हिंसा सांडिती पूर्ण ॥ कीं मौनी त्यागी वाचाळपण ॥ सत्पुरुष मनांतून ॥ परनिंदा त्यागी जैसा ॥ ३५ ॥ श्रोत्रिय त्यागी दुष्टाचार ॥ तैसी सीता त्यागीन साचार ॥ यावरी सुमित्राकुमर ॥ काय बोलता जाहला ॥ ३६ ॥ पाखांडी म्लेच्छ दुर्मती ॥ सदा निंदिती वेदश्रुती ॥ परी पंडित काय त्यागिती ॥ जनकजापती सांगें हें ॥ ३७ ॥ मुक्तांसें निंदिती वायस ॥ परी टाकिती काय राजहंस ॥ दैदुर निंदिती भ्रमरास ॥ परी तो पद्मिणीस टाकीना ॥ ३८ ॥ निंदक निंदिती संतांस ॥ परी विवेकी पूजी रात्रंदिवस ॥ तस्कर निंदिती इंदूस ॥ परी चकोर विटेना ॥ ३९ ॥ याकारणें जनकजामाता ॥ सहसा न त्यागीं गुणसरिता ॥ त्या रजकाची तत्त्वतां ॥ जिव्हा आतां छेदीन ॥ ४० ॥ श्रीराम म्हणे विशेष ॥ तरी लोक निंदितील रात्रंदिवस ॥ म्हणती दंडिलें रजकास ॥ अंगीं दोष म्हणोनियां ॥ ४१ ॥ आतां सौमित्रा हेंचि जाण ॥ सीता टाकीं वनीं नेऊन ॥ नाहीं तरी आपुला प्राण ॥ मी त्यागीन आतांचि ॥ ४२ ॥ ऐसें बोलतां निर्वाण ॥ तत्काळ उठिला लक्ष्मण ॥ बोलीं मुहूर्तीं तेव्हां सदन ॥ जानकीचें प्रवेशला ॥ ४३ ॥ परम विव्हळ होऊन ॥ जगन्मातेचे वंदिले चरण ॥ म्हणे पाहावया तापसारण्य ॥ आज्ञा दीघली रघूत्तमें ॥ ४४ ॥ ऐसें ऐकतांचि श्रवणीं ॥ मनीं हर्षली विदेहनंदिनी ॥ म्हणे जे डोहाळे पुरवीन चापपाणी ॥ मागें वचन बोलिले ॥ ४५ ॥ साचें करावया तया वचना ॥ तुम्हांसी पाठविलें लक्ष्मणा ॥ तरी पंचरात्री क्रमोन जाणा ॥ सत्वर येऊं माघारे ॥ ४६ ॥ ऐसें सौमित्रें ऐकतां कर्णीं ॥ अश्रु सांडी नयनींहूनी ॥ मनीं म्हणे आतां परतोनी ॥ कैंचें येणें माउलीये ॥ ४७ ॥ असो जानकी हर्षयुक्त ॥ वस्त्राभरणें वस्तु बहुत ॥ सौभाग्यद्रव्यें सवें घेत ॥ ऋषिअंगना पूजावया ॥ ४८ ॥

---

१३ पत्नी, स्त्री. १४ मल. १५ चिकटाचळावर. १६ इंद्र. १७ शंकर. १८ जगदंबा. १९ सोळांस. २० बेडूक. २१ पहांटे चार घटिका राहीस. २२ खरें.

मंगळभगिनी[२३] सौभाग्यसरिता[२४] ॥ रथीं बैसली क्षण न लागतां ॥ लक्ष्मणें रथ झांकून तत्त्वतां ॥ धुरेस आपण बैसला ॥ ४९ ॥ कोणास वार्ता न कळत ॥ जान्हवीतीरा आणिला रथ ॥ तेव्हां अपशकुन बहुत ॥ जगन्मातेस जाणवती ॥ ५० ॥ आडवे महाउरग[२५] घांवती ॥ पतिवियोग पिंगळे वदती ॥ वायस वामभागें जाती ॥ शोक सांगती अत्यंत ॥ ५१ ॥ ऐसे अपशकुन देखतां ॥ मनीं दचके जनकदुहिता ॥ देवराप्रती[२६] पुसे तत्त्वतां ॥ चिन्हें विपरीत कां दिसती ॥ ५२ ॥ तंव तो भूधरावतार[२७] ॥ सहसा नेदी प्रत्युत्तर ॥ नयनीं वाहतसे नीर ॥ कंठ सद्गदित जाहला ॥ ५३ ॥ सीता म्हणे बंधुसहित ॥ सुस्वरूप असो जनकजामात ॥ त्याचें अशुभ दुःख समस्त ॥ तें मजवरी पडो कां ॥ ५४ ॥ मग म्हणे देवरा[२८] सुमती ॥ विलोकून वन आणि भागीरथी ॥ सत्वर जाऊं अयोध्येप्रती ॥ रघुपतीस पाहावया ॥ ५५ ॥ परी तो न बोलेचि सर्वथा ॥ तटस्थ पाहे रघुवीरकांता ॥ पुढें नौकेमाजी जनकदुहिता ॥ रथासहित बैसविली ॥ ५६ ॥ सुरनदी[२९] उतरूनि ते वेळीं ॥ सत्वर पैल पार नेली ॥ मागुती रथ भूमंडळीं ॥ पवनवेगें चालविला ॥ ५७ ॥ परम भयंकर कानन ॥ नाहीं मनुष्याचें दर्शन ॥ सिंह सर्प व्याघ्र पूर्ण ॥ वास्तव्य करिती त्या स्थळीं ॥ ५८ ॥ सीता म्हणे हो ऊर्मिलापती ॥ कां एथें ऋषिआश्रम न दिसती ॥ कोणीकडे राहिली भागीरथी ॥ नेतां निश्चितीं मज कोठें ॥ ५९ ॥ विप्रवेदघोष कानीं ॥ कां ऐकूं न येती अझूनी ॥ स्वाहास्वधावषट्कारध्वनी ॥ यागसदनीं[३०] कां न उठती ॥ ६० ॥ तों गहनवनीं नेऊनि रथ ॥ सौमित्र तृणशेज करीत ॥ जानकीस उतरूनि त्वरित ॥ बैसविली तये ठायीं ॥ ६१ ॥ तों भूगर्भीचें दिव्यरत्न ॥ वनितांचक्रांत[३१] मुख्य मंडण ॥ कीं लावण्यभूमीचें निधान ॥ वनीं लक्ष्मण टाकीत ॥ ६२ ॥ तें सौंदर्यनभींचें नक्षत्र ॥ कीं त्रिभुवनींचें कृपापात्र ॥ अंगींच्या तेजें अपार ॥ बन तेव्हां उजळलें ॥ ६३ ॥ चंद्रीं वसे सदा कलंक ॥ त्याहूनि सुंदर जानकीचें मुख ॥ चपळेहूनि अधिक ॥ अलंकार शोभती ॥ ६४ ॥ असो तृणशेजेसीं सीता बैसवून ॥ सौमित्र करी साष्टांग नमन ॥ स्खालतें करूनियां वदन ॥ स्फुंदत उभा ठाकला ॥ ६५ ॥ प्रदक्षिणा करूनि लक्ष्मण ॥ पुढती दृढ धरी चरण ॥ देवरांचें[३२] शुभ वचन ॥ तटस्थ ऐके जानकी ॥ ६६ ॥ सौमित्र म्हणे जगन्माते ॥ तुज वनीं सोडिलें रघुनाथें ॥ त्याची आज्ञा अलोट[३३] मातें ॥ घेऊनि आलों म्हणोनी ॥ ६७ ॥ रजकें निंदा केली म्हणोनी ॥ तुज सोडविलें घोर वनीं ॥ आतां रघुपतीचे चरण मनीं ॥ आठवीत राहें सुखेंचि ॥ ६८ ॥ कमळिणी सुकुमार बहुत ॥ तयेवरी वीज पडे अकस्मात ॥ मग पद्मिणीचा होय अंत ॥ तेवीं मूर्च्छित पडे सीता ॥ ६९ ॥ रुदन करी भूधरावतार ॥ रथारूढ झाला सत्वर ॥ तेथोनि परतला उर्मिलावर ॥ कठिण मन करूनियां ॥ ७० ॥ वनदेवता[३४] वृक्ष पाषाण ॥ वारण उरग पंचानन ॥ तयांसी विनवी लक्ष्मण ॥ जानकी जतन करा हे ॥ ७१ ॥ पृथिवी आप तेज समीर[३५] ॥ अवाधियांनो जतन करा सुकुमार ॥ असो पवनवेगें सौमित्र ॥ अयोध्यापुर पावला ॥ ७२ ॥

२३ सीता. २४ नदी. २५ सर्प. २६ दिरास. २७ शेषाचा अवतार लक्ष्मण. २८ गंगा. २९ यज्ञशाळा. ३० स्त्रियांच्या समुदायांत. ३१ अपरिहार्य. ३२ अरण्यांतील देवता. ३३ वायु.

इकडे सीता मूर्च्छना सांवरून ॥ उघडोन पाहे पद्मनयन ॥ तों दूरी गेला लक्ष्मण ॥ उभी ठाकून हांक फोडी ॥ ७३ ॥ बाह्या उभारून तत्वतां ॥ म्हणे परत वेगें सुमित्रासुता ॥ माझा अन्याय कांहीं नसतां ॥ कां हो जातां टाकूनि मज ॥ ७४ ॥ सत्वर माझा वध तरी करोनी ॥ सांगा रघुपतीस जाऊनी ॥ मी एकली दुस्तरवनीं ॥ कवण्या ठाया जाऊं आतां ॥ ७५ ॥ म्हणे धांव धांव रघुनाथा ॥ म्हणोनि हांक देत जगन्माता ॥ वनीं श्वापदें वृक्ष लता ॥ तयांस गहिंवर दाटला ॥ ७६ ॥ थरथरां कांपत मेदिनी[३४] ॥ पर्वत पक्षी रडती वनीं ॥ गज व्याघ्र मूर्च्छना येऊनी ॥ दुःखेंकरून पडताती ॥ ७७ ॥ हंस मुक्ताहार[३५] सांडोनी ॥ सीता देखतां रडती वनीं ॥ नृत्यकला विसरोनी ॥ शिखी[३६] शोक करिताती ॥ ७८ ॥ पक्षी स्वपक्षें ते वेळीं ॥ सीतेवरी करिती साउली ॥ जळें चंचू भरूनि सकळी ॥ जनकजेवरी शिंपिती ॥ ७९ ॥ वनगाई पुच्छेंकरून ॥ सीतेवरी घालिती पवन ॥ वनदेवता करिती रुदन ॥ सीतादेवी देखोनियां ॥ ८० ॥ वनचरकळप कांतारीं[३७] ॥ रुदन करिती दीर्घस्वरीं ॥ वैरभाव ते अवसरीं ॥ विसरती मोहशोकें ॥ ८१ ॥ हे राम हे राम म्हणोन ॥ सीता विलापे अतिगहन ॥ गुल्मलता[३८] वापी कूप जाण ॥ सरिता शोकें कांपिन्नल्या ॥ ८२ ॥ हे रामा राजीवनेत्रा ॥ मज कां त्यागिलें पवित्रा ॥ तूं दीनदयाळा पवित्रा ॥ विसरलासी ये काळीं ॥ ८३ ॥ कां हो मोकेलिलें[३९] एकलीतें ॥ आतां सांभाळील कोण मातें ॥ कोठें थारा न दिसेचि येथें ॥ तुजविण मज राघवा ॥ ८४ ॥ काय अन्याय जाहला मजपासूनी ॥ मज टाकिलें घोरवनीं ॥ कृपासागरा चापपाणी ॥ श्रुत मज त्वां न केलें ॥ ८५ ॥ जन्मोनि नेणें दोषांतें ॥ स्वप्नीं नातळें दुर्बुद्धीतें ॥ परी जन्मांतर न कळे मातें ॥ तें कां टाकूनि आलें भोगावया ॥ ८६ ॥ तूं अनाथबंधु करुणाकर ॥ मी दासी हीन पामर ॥ माझा न कीजे अव्हेर ॥ सकळ गण गोतँ तूं माझें ॥ ८७ ॥ अगा हे श्रीदाशरथी ॥ माझी करुणा नुपजे चित्तीं ॥ कैसा स्नेह सांडोनि रघुपती ॥ निष्ठुर जाहलासी मजवरी ॥ ८८ ॥ मी अज्ञान बाळ भोळें ॥ सहज पुसिलें कृपाकल्लोळें ॥ त्याचें फळ कीं त्यागिलें ॥ महावनीं एकटें ॥ ८९ ॥ आतां जाऊं कोणीकडे ॥ कवण जिवलग येथें सांपडे ॥ जें माझें जन्मसांकडें[४१] ॥ निवारील दर्शनीं ॥ ९० ॥ रामा तूंचि बापमाय ॥ बंधु सुहृत गोत होय ॥ मम अपराध विसरून जाय ॥ अभय देईं मज आतां ॥ ९१ ॥ करुणासागरा रघुवीरा ॥ मातें उद्धरीं दयासमुद्रा ॥ तुझें ध्यान असंख्यमुद्रा ॥ चित्तीं वसो माझिया ॥ ९२ ॥ तंव अयोध्यापुरा लक्ष्मण ॥ पावला तेव्हां म्लानवदन ॥ तों गुणसिंधु रघुनंदन ॥ एकांतसदनीं बैसला असे ॥ ९३ ॥ ऊर्मिलावरें तेथें जाऊनी ॥ भाळ[४२] ठेविलें रामचरणीं ॥ करुणार्णवें सीता आठवूनी ॥ अश्रु नयनीं आणिले ॥ ९४ ॥ सौमित्र म्हणे रघुराया ॥ चित्रींच्या वृक्षाची छाया ॥ स्वप्नवत संसारमाया ॥ लटकी जैसी मुळींहूनी ॥ ९५ ॥ नावरे अत्यंत शोकसागर ॥ परी कलेशोद्भव[४३] जाहला रघुवीर ॥ आचमन करूनि समग्र ॥ उगाचि मौनें बैसला ॥ ९६ ॥ असो इकडे जनकनंदिनी

३४ पृथ्वी. ३५ मोत्यांचा चारा (खावें). ३६ मोर. ३७ अरण्यांत. ३८ वेलींचे झुपके. ३९ टाकिलें. ४० गोतवळा. ४१ जन्मसंकट. ४२ मस्तक. ४३ अगस्ति.

निघाली चालत दुःखें वनीं ॥ मूर्छना येऊनि क्षणक्षणीं ॥ अवनीवरी पडतसे ॥ ९७ ॥ मागुती उठे हस्त टेंकूनी ॥ रुदन करी बाय मोकलूनी ॥ म्हणे कोण्या ठाया जाऊनी ॥ राहूं आतां राघवेंद्रा ॥ ९८ ॥ मी अनाथ अत्यंत दीन ॥ जरी देऊं येथें प्राण ॥ तरी आत्महत्या पाप गहन ॥ दुजी गर्भहत्या घडेल ॥ ९९ ॥ कळपांतून धेनु चुकली ॥ कीं हरिणी एकटी वनीं पडली ॥ कीं जीवनेंविण मासोळी ॥ तळमळीत जैसी कां ॥ १०० ॥ कीं नैषधरायाची राणी ॥ पूर्वी पडिली घोरवनीं ॥ कीं भिल्लीवेषें भवानी ॥ एकटी काननीं जेवीं हिंडे ॥ १ ॥ एक मार्ग न दिसे तेथ ॥ सव्य अपसव्य वनीं हिंडत ॥ दीर्घ स्वरें रुदन करीत ॥ तों नवल एक वर्तलें ॥ २ ॥ तेथें कंदमुळें न्यावयासी ॥ वना आले वाल्मीक ऋषी ॥ तो त्रिकाळज्ञानी तेजोराशी ॥ ज्याचे ज्ञानासी सीमा नाहीं ॥ ३ ॥ अवतारादि जन्मपत्र ॥ जेणें रामकथा केली विचित्र ॥ तेणें जगन्मातेचा शोकस्वर ॥ कर्णीं ऐकिला हिंडतां ॥ ४ ॥ सीता देखिली दुरोनी ॥ जवळी येत वाल्मीकमुनी ॥ म्हणे आमुची तपःश्रेणी ॥ प्रकट जाहली येणें रूपें ॥ ५ ॥ म्हणे कोण हे शुभ कल्याणी ॥ कीं मूळप्रकृति प्रणवरूपिणी ॥ कीं अनादिपीठनिवासिनी ॥ दर्शन द्यावया प्रकटली हे ॥ ६ ॥ मग म्हणे जवळी येऊन ॥ सांग माते आहेस तूं कोण ॥ कां सेविलें घोर वन ॥ कोणें दुःख दीघलें ॥ ७ ॥ मग बोले जगन्माता ॥ मी मिथिलेश्वराची दुहिता ॥ रावणांतकाची असें कांता ॥ सौमित्रें आणोनि सोडिलें वनीं ॥ ८ ॥ अन्याय नसतां किंचित ॥ टाकिलें घोर अरण्यांत ॥ परदेशी आहें मी अनाथ ॥ तरी माझा तात केवळ तूं ॥ ९ ॥ मग ऋषि म्हणे वो जननी ॥ माझें नाम वाल्मीक मुनी ॥ अयोध्यानाथ कोदण्डपाणी ॥ मज बरवें जाणतसे ॥ ११० ॥ त्याचें भाष्य मी करीं निरंतर ॥ मज जाणतसे मिथिलेश्वर ॥ तुझा पिता आमुचा मित्र ॥ कन्या साचार तूं माझी ॥ ११ ॥ तुज होतील दोन पुत्र ॥ पित्याहूनी पराक्रमी थोर ॥ तुज घातलें जेणें बाहेर ॥ त्याचा सूड घेतील ते ॥ १२ ॥ मग जानकीस हातीं धरून ॥ गेला आश्रमा घेऊन ॥ भोंवते मिळाले ऋषिजन ॥ काय वचन बोलिले ॥ १३ ॥ म्हणती हे कोण आहे ताता ॥ येरू म्हणे जानकी जगन्माता ॥ ऋषी म्हणती अनर्थ तत्त्वतां ॥ घरासी आणिला साक्षेपें ॥ १४ ॥ आम्ही अत्यंत भोळे ब्राह्मण ॥ टाकोनि ग्राम कुटिलें जन ॥ वसविलें घोर कानन ॥ येथेंही विघ्न आणिलें ॥ १५ ॥ इचें सुंदरपण अत्यंत ॥ इजवरी अपवादें आले बहुत ॥ इचे पायीं आम्हांसी घात ॥ होऊं शके एकादा ॥ १६ ॥ एक म्हणती सीता सती ॥ जरी हे असेल निश्चिती ॥ तरी येथें वळोनि भागीरथी ॥ अकस्मात आणील ॥ १७ ॥ हें जरी नव्हे इचेनी ॥ तरी दवडावी येच क्षणीं ॥ ऐसें ऐकतां जनकनंदिनी ॥ भागीरथीस पाचारीत ॥ १८ ॥ म्हणे सगरकुलतारक माये ॥ हरिचरणोद्भव जन्हुतनये ॥ ब्रह्मकटाह फोडून स्वयें ॥ प्रकट होसी अद्भुत ॥ १९ ॥ कमलोद्भव कमलावर ॥ शिव इंद्रादि सकळ निर्जर ॥ सप्त ऋषी मुख्य सनत्कुमार ॥ निरंतर तुज स्तविती ॥ १२० ॥

---

४४ भूमीवर. ४५ नलराजाची दमयंती. ४६ पार्वती. ४७ ओंकार. ४८ जनकाची. ४९ निंदक. ५० संगी दुर्गुण नसतां आळ येते ती. ५१ ब्रह्मांड. ५२ ब्रह्मदेव. ५३ विष्णु.

तुझें अणुमात्र स्पर्शतां नीरें ॥ भस्म होती पापें अपार ॥ शुभ्र सुमनांचा दिव्य हार ॥ हा मुकुटीं शुभ्र तेवीं दिसे ॥ २१ ॥ हिमनग भेदोनि साचार ॥ एकसरें भरला सागर ॥ तरी मजकारणें वेगेंवक्त्र ॥ जननी धांव या पंथें ॥ २२ ॥ ऋषी सकळ झाले भयभीत ॥ ऐसा ओघ लोटला अद्भुत ॥ आश्रम सांडोनि ऋषी पळत ॥ चित्त उद्विग्न सर्वांचें ॥ २३ ॥ एक सीतेस करिती नमन ॥ माते आश्रम जाती बुडोन ॥ आम्हांसी रक्षावया तुजविण ॥ कोणी दुजें दिसेना ॥ २४ ॥ मग सीतेनें प्रार्थून ते वेळां ॥ ओघ निश्चळ चालविला ॥ सत्य सती जनकबाळा ॥ ऋषी गर्जती सर्वही ॥ २५ ॥ सकळ ऋषी मिळोन ॥ करिती जानकीचें स्तवन ॥ म्हणती माते तुज छळून ॥ जवळी आणिली भागीरथी ॥ २६ ॥ असो वाल्मीकें आपुले आश्रमांत ॥ जानकीतें ठेविलें तेव्हां गुप्त ॥ सकळ ऋषींचें एकमत ॥ अणुमात्र मात फुटेना ॥ २७ ॥ नव मास भरतां पूर्ण ॥ शुभ नक्षत्र शुभ दिन ॥ माध्यान्हीं आला चंडकिरण ॥ तों प्रसूत जाहली जानकी ॥ २८ ॥ वृद्ध ऋषिपत्न्या धांवोनी ॥ जवळी आल्या तये क्षणीं ॥ तों दोघे पुत्र देखिले नयनीं ॥ शशी तरणी ज्यांपरी ॥ २९ ॥ प्रथम उपजे तो धाकुटा केवळ ॥ मागुती उपजे तो वडील ॥ असो दोघे जन्मले बाळ ॥ सांवळे जावळे ते क्षणीं ॥ १३० ॥ वाल्मीक गेले होते स्नानासी ॥ शिष्य धांवत गेले तयांपासी ॥ दोघे पुत्र जानकीसी ॥ जाहले म्हणून सांगती ॥ ३१ ॥ ऐसें ऐकतांच वचन ॥ येरें कुशलहु हातीं घेऊन ॥ जानकीजवळी येऊन ॥ केलें विधान शास्त्ररीतीं ॥ ३२ ॥ कुशेंकरून अभिषेकिला बाळ ॥ त्याचें नांव ठेविलें कुश निर्मळ ॥ आकर्णनेत्र घननीळ ॥ प्रतिमा केवळ रामाची ॥ ३३ ॥ लवांवरी निजवूनी ॥ धाकुटा अभिषेकिला तये क्षणीं ॥ त्यासी नाम लहू ठेवूनी ॥ सोहळा केला वाल्मीकें ॥ ३४ ॥ शुक्लपक्षीं वाढे चंद्र ॥ कीं पळोपळीं वाढे दिनकर ॥ तेवीं दोघे रघुवेय सुंदर ॥ वाढूं लागले तैसेचि ॥ ३५ ॥ दोघांचें लालन पालन ॥ वाल्मीक करी अनुदिन ॥ ऋषिबाळकांत दोघेजण ॥ क्रीडा करिती निरंतर ॥ ३६ ॥ सप्त संवत्सर होतां पूर्ण ॥ वाल्मीकें सुरभी आणोन ॥ आरंभिलें मौंजीबंधन ॥ मेळवूनि ऋषी बहुत ॥ ३७ ॥ चाऱ्ही दिवसपर्यंत ॥ जो जो पाहिजे पदार्थ ॥ तो सर्वही कामधेनु पुरवीत ॥ जाहले तृप्त अवघे ऋषी ॥ ३८ ॥ बाळ सुंदर देखोन ॥ बहु ऋषी देती वरदान ॥ वाल्मीकें वेदाध्ययन ॥ दोघांकडून करविलें ॥ ३९ ॥ षट्शास्त्रीं प्रवीण जाहले ॥ सकळ पुराणें करतलामलें ॥ मग रामचरित्र पढविलें ॥ शतकोटी ग्रंथ केला जो ॥ १४० ॥ बाळांचें ज्ञान अत्यद्भुत ॥ अधिकाधिक तर्क फुटत ॥ मग मंत्रशास्त्र समस्त ॥ वाल्मीकमुनि सांगे तयां ॥ ४१ ॥ मग धनुर्वेद पढवून ॥ हातीं देत धनुष्य बाण ॥ युद्धगति सांगे पूर्ण ॥ दोघेजण धरिती मनीं ॥ ४२ ॥ असो चतुर्दश विद्या चौसष्टी कळा ॥ वाल्मीक शिकवी दोघां बाळां ॥ ऋषिपुत्रांचा सर्वे मेळा ॥ घेऊनि दोघे हिंडती ॥ ४३ ॥ नाना गोष्टी कौतुकें बोलून ॥ रंजविती जानकीचें मन ॥ कंद मूळें आणून ॥ जगन्मातेपुढें ठेविती ॥ ४४ ॥ सत्संग घडतां देख ॥

५४ पाणी. ५५ पाण्याची ओढ. ५६ चंद्र. ५७ सूर्य. ५८ एका जातीचे दर्भ. ५९ लव्हाळ्यांवर ( नदीकांठचें गवत ). ६० राघवाचे पुत्र. ६१ कामधेनु. ६२ करतळावर घेतलेल्या आंवळ्याप्रमाणें.

प्राणी विसरे संसारदुःख ॥ तैसें जानकी विसरे सकळिक ॥ खेद मागील त्यांचेनी ॥ ४५ ॥ दशवर्षें होतां पूर्ण ॥ मृगयेस जाती दोघेजण ॥ नाना श्वापदें मारून ॥ आणिती ओढून दावावया ॥ ४६ ॥ एके दिवसीं वनीं हिंडत ॥ तों पर्वत मस्तकीं ध्यानस्थ ॥ एक शृंगी[६३] तप करीत ॥ वाल्मीकाचा बंधु तो ॥ ४७ ॥ तो मृगवेष देखोनि पूर्ण ॥ कुशें विंधिला टाकूनि बाण ॥ तत्काळ गेला त्याचा प्राण ॥ प्रेत ओढूनि दोघे नेती ॥ ४८ ॥ वाल्मीक पुसे जवळी येऊन ॥ काय तें आणितां ओढून ॥ येरू म्हणती मृग वधून ॥ आणिला तुम्हांकारणें ॥ ४९ ॥ त्यार्चे आतां चर्म काढून ॥ करूं तुम्हांकारणें आसन ॥ वाल्मीक पाहे विलोकून ॥ तंव तो बंधु वधिलेला ॥ १५० ॥ वाल्मीक म्हणे हे दोघेजण ॥ अनिवार जाहले पूर्ण ॥ ब्रह्महत्या करून ॥ कैसे आलां वनांतरीं ॥ ५१ ॥ बंधूचें और्ध्वदैहिक[६४] उत्तरकार्य सकळिक ॥ विधियुक्त करोनि वाल्मीक ॥ जानकीजवळ तात्काळिक ॥ वर्तमान सांगितलें ॥ ५२ ॥ तंव बोले जानकी हांसोन ॥ ताता सूर्यवंश अतितीक्ष्ण ॥ त्यावरी सकळकळाप्रवीण ॥ तुम्हींच केलीं बाळकें ॥ ५३ ॥ परम धीटें[६५] अनिवार ॥ तुमचा तुम्हां फळला मंत्र ॥ आतां याच्या दोषास परिहार ॥ करावा जी समर्था ॥ ५४ ॥ तों वाल्मीक बोले वचन ॥ सुवर्णकमळें सहस्र आणून ॥ भावें अर्चावीं[६६] उमारमण ॥ तरीच जाईल ब्रह्महत्या ॥ ५५ ॥ तंव ते दोघे तये वेळे ॥ ताता कोठें तीं सुवर्णकमळें ॥ तीं सांगिजे येचि वेळे ॥ घेऊन येतों दोघेही ॥ ५६ ॥ मग बोले मुनीश्वर ॥ अयोध्येसमीप ब्रह्मसरोवर ॥ तेथें कमळें अपार ॥ परी रक्षिती वीर रामाचे ॥ ५७ ॥ तीं ब्रह्मकमळें नेऊन ॥ राघव करितो शिवार्चन ॥ महाबळी रक्षिती पूर्ण ॥ रात्रंदिवस सभोंवते ॥ ५८ ॥ गदगदां हांसती दोघेजण ॥ कमळें आणूं न लागतां क्षण ॥ तरीच तुमचे शिष्य जाण ॥ निश्चयेंसीं मुनिराया ॥ ५९ ॥ तेथें कृतांत[६७] असेल रक्षण ॥ त्यासहि शिक्षा लावूं पूर्ण ॥ जरी स्वयें आला रघुनंदन ॥ त्यासही घरून आणूं येथें ॥ १६० ॥ धनुष्यासी लावूनि बाण ॥ चपळ चालिले दोघेजण ॥ जैसे सिंह दिसती लहान ॥ परी प्रताप अतिविशेष ॥ ६१ ॥ कीं शशी सूर्य लघु दिसती ॥ परी प्रकाशें उजळ क्षिती ॥ लहान दिसे विप्र अगस्ती ॥ परी सरितापतीं[६८] प्राशिला ॥ ६२ ॥ तैसे ते घाकुटे वीर ॥ वेगें पावले ब्रह्मसरोवर ॥ कुश प्रवेशोनि समग्र ॥ कमळें तेव्हां तोडीतसे ॥ ६३ ॥ तंव ते वीर खवळले ॥ लहूनें तेव्हां शर सोडिले ॥ रक्षक बहुत प्रेत केले ॥ उरले पळाले अयोध्येसी ॥ ६४ ॥ रामासी सांगती वर्तमान ॥ ऋषिबाळ आले दोघे जण ॥ ते सबळ युद्ध करूनि जाण ॥ कमळें घेऊन गेले पैं ॥ ६५ ॥ आश्चर्य करी रघुपती ॥ पहा केवढी बाळांची शक्ती ॥ असो इकडे दोघे निघती ॥ कमळें घेऊनि त्वरेनें ॥ ६६ ॥ वाल्मीकापुढें कमळें ठेविती ॥ ऋषि आश्चर्य करी चित्तीं ॥ तटस्थ पाहे सीता सती ॥ अद्भुत कर्तव्य बाळकांचें ॥ ६७ ॥ मग नूतन[६९] शिवलिंग निर्मून ॥ सहस्रकमळीं केलें पूजन ॥ ब्रह्महत्येचें पाप पूर्ण ॥ निरसोन गेलें तेधवां ॥ ६८ ॥ ऐके दिवसीं दोघेजण ॥ चुरीत

६३ ज्याला शृंग आहे तो. ६४ उत्तमगति प्राप्त होण्यासाठीं करितात तें. ६५ ज्याचे भंगीं भय नाहीं तो. ६६ पूजावा. ६७ यम. ६८ समुद्र. ६९ नवीन.

जों जानकीचे चरण ॥ तंव तो कुश काय वचन ॥ बोलता जाहला ते काळीं ॥ ६९ ॥ आम्ही जन्मलों कोणे देशीं ॥ कोण ग्राम कोणे वंशीं ॥ आमुचा पिता निश्चयेंसीं ॥ सांगें कोण तो आमुतें ॥ १७० ॥ सीता म्हणे अयोध्यानगर ॥ सूर्यवंशीं अजराजपुत्र ॥ दशरथनामें नृपवर ॥ प्रचंड प्रताप तयाचा ॥ ७१ ॥ त्यासी राम लक्ष्मण भरत ॥ चौथा शत्रुघ्न विख्यात ॥ त्यांत रौंवणांतक प्रतापवंत ॥ तो तुमचा पिता जाणिजे ॥ ७२ ॥ रजकें निंदिलें म्हणोनी ॥ बा रे मज सोडिलें घोरवनीं ॥ तेव्हां जगन्मातेचे नयनीं ॥ अश्रु आले बोलतां ॥ ७३ ॥ वर्तमान ऐकोनि समस्त ॥ दोघेही झाले परम तप्त ॥ मग सीतेचें समाधान बहुत ॥ करिते झाले ते काळीं ॥ ७४ ॥ तों द्वादशवर्षेंपर्यंत ॥ अवर्षण पडलें अयोध्येंत ॥ सीता सती क्षोभली अद्भुत ॥ श्री समस्त गेली पैं ॥ ७५ ॥ जैसें उद्दैस कां दग्ध कांतार ॥ तैसें कलाहीन अयोध्यानगर ॥ घन न वर्षेच अणुमात्र ॥ गाई विप्र गांजले ॥ ७६ ॥ वसिष्ठास पुसे रघुनंदन ॥ कां हो पडलें अवर्षण ॥ येरू म्हणे अपराधाविण ॥ सीता बाहेर घातली ॥ ७७ ॥ जानकीऐसें द्रिचल ॥ सकळ पतिव्रतांचें मंडण ॥ लक्ष्मी गेली निघोन ॥ तरीच अवर्षण पडियेलें ॥ ७८ ॥ तरी अश्वमेघ महायज्ञ ॥ राघवा करावा संपूर्ण ॥ घोडा पाहून श्यामकर्ण ॥ पृथ्वीवरी सोडावा ॥ ७९ ॥ मग शरयूतीरीं एक योजन ॥ मंडप घातला विस्तीर्ण ॥ दूत पाठवून संपूर्ण ॥ मुनीश्वर मेळविले ॥ १८० ॥ बिभीषणा आणि सुग्रीवास ॥ बोलावूं पाठवी राघवेश ॥ ते दळासहित अयोध्येस ॥ येते जाहले ते काळीं ॥ ८१ ॥ नळ नीळ अंगद जांबुवंत ॥ शरभ गवाक्ष बळ अद्भुत ॥ वानर पातले समस्त ॥ अष्टादश पद्मे पैं ॥ ८२ ॥ सर्व सामग्री केली पूर्ण ॥ मग वसिष्ठ रघुनंदन ॥ अश्वशाळेंतूनि श्यामकर्ण ॥ निवडिती पूर्ण सुलक्षणी ॥ ८३ ॥ सुवर्णपत्रिका ते वेळीं ॥ बांधिली श्यामकर्णाचें भाळीं ॥ वसिष्ठें त्यावरी लिहिल्या ओळी ॥ ऐका सकळ श्रोते हो ॥ ८४ ॥ अयोध्याप्रभु दशरथनंदन ॥ रावणांतक सुरबंधमोचन ॥ सकळनृपश्रेष्ठ रविकुळमंडण ॥ श्यामकर्ण सोडिला तेणें ॥ ८५ ॥ जो कोणी असेल बळवंत ॥ तेणें हा घोडा धरावा यथार्थ ॥ षोडशपद्मे दळांसहित ॥ शत्रुघ्न राखीत पाठीसी ॥ ८६ ॥ घोडा पूजोनि राजीवनेत्र ॥ मस्तकीं बांधिलें दिव्य पत्र ॥ शत्रुघ्न करूनि नमस्कार ॥ दळभारेंसीं निघाला ॥ ८७ ॥ शत्रुघ्नासी म्हणे रघुनंदन ॥ सोळावे दिवसीं यावें परतोन ॥ सकळ पृथ्वी जिंकून ॥ नृप सांगातीं आणिजे ॥ ८८ ॥ मग सुवर्णप्रतिमा सुंदर ॥ जानकीची निर्मिली परिकर ॥ मग ते प्रतिमेसहित रघुवीर ॥ यज्ञदीक्षा घेत पैं ॥ ८९ ॥ जैसा किरणचक्रांत दिवाकरें ॥ कीं निर्जरांतें अमरेश्वरें ॥ तैसा यज्ञमंडपीं रघुवीर ॥ ऋषींसहित शोभला ॥ १९० ॥ सुग्रीव बिभीषण मारुती ॥ यज्ञमंडपाभोंवते रक्षिती ॥ सुमंत भरत ऊर्मिलाँपति ॥ सदा तिष्ठत राघवापाशीं ॥ ९१ ॥ जे जे सामग्री लागेल पूर्ण ॥ ते ते तत्काळ देती आणून ॥ तो सोहळा देवगण ॥ विमानीं बैसोन पाहाती ॥ ९२ ॥ इकडे छपन्न देश जिंकीत

७० श्रीराम. ७१ वृष्टीचा अभाव. ७२ वैभव, ऐश्वर्य. ७३ ओसाड. ७४ या नांवाची नदी. ७५ सूर्य. ७६ देवसमुदायांत. ७७ इंद्र. ७८ लक्ष्मण.

पूर्ण ॥ जात महावीर शत्रुघ्न ॥ सकळ राजे येती शरण ॥ करभार देऊनि सांगातें ॥ ९३ ॥ तेच काळीं पाताळीं वरुण ॥ आरंभिता जाहला महायज्ञ ॥ तेणें वाल्मीक बोलावून ॥ नेला होता आधींच ॥ ९४ ॥ पाताळास गेला जेव्हां ऋषी ॥ तेणें आज्ञा केली लहूसी ॥ बा रे माझिया उपवनाँसी ॥ रक्षावें तुवां निरंतर ॥ ९५ ॥ ऐसें बोलूनि पाताळा ॥ वाल्मीक गेले तये वेळां ॥ कुशही दूर वना प्रवेशला ॥ कंदमुळें आणावया ॥ ९६ ॥ लहू उपवन रक्षीत ॥ सवें बँटु बाळें बहुत ॥ नानाक्रीडा विनोद करीत ॥ वृक्षच्छायेस बैसलीं ॥ ९७ ॥ अष्टवर्षी दशवर्षी कुमर ॥ कटीं मौंजी कौपीन सुंदर ॥ मस्तकीं शिखा परिकर ॥ खेळतां उडती तयांच्या ॥ ९८ ॥ तों श्यामकर्ण धांवत ॥ आला त्याच पंथें अकस्मात ॥ ऋषिपुत्रांस लहू दावीत ॥ पाहा रे येथें घोडा कैसा हा ॥ ९९ ॥ मग सीतासुतें धांवून ॥ शेंडीसी धरिला श्यामकर्ण ॥ कपाळींचें पत्र तोडून ॥ वाचिता जाहला तत्काळीं ॥ २०० ॥ पत्रार्थ पाहूनि समस्त ॥ लहू गदगदां हांसत ॥ बळिया काय रघुनाथ ॥ त्रिभुवनीं थोर जाहला ॥ १ ॥ काय त्यासीच व्याली जननी ॥ काय निर्वीर जाहली अवनी ॥ तरी कैसा घोडा सोडोनी ॥ नेईल आतां पाहूं पां ॥ २ ॥ माझी प्रतिज्ञा हेच आतां ॥ धरिला घोडा न सोडीं मागुता ॥ ना तरी सीतेउदरीं तत्त्वतां ॥ जंत होवूनि जन्मलों ॥ ३ ॥ अश्वोत्तमाचे नेत्र पुसोन ॥ कौतुकेंकरून थापटी मान ॥ उत्तरीय चीर[२] गळां घालून ॥ बांधोन ठेविला केळीसी ॥ ४ ॥ ऋषिपुत्रांस तेव्हां म्हणत ॥ पहा रे घोडा कैसा नाचत ॥ तों ऋषिबाळें समस्त ॥ पोट बडविती भयेंकरूनि ॥ ५ ॥ कोण्या राजाचा घोडा आला ॥ तो तुवां बळेंचि धरिला ॥ तरी आम्ही सांगूं तयाला ॥ लहूनें बांधिला म्हणोनी ॥ ६ ॥ लहू तयांप्रती बोलत ॥ आमुचीच निश्चयें हे वस्त ॥ आपुली आपण घेतां सत्य ॥ शंका येथें कायसी ॥ ७ ॥ काळासी शिक्षा करूनियां ॥ लया पाववीन सर्व क्षत्रियां ॥ तों वीर आले धांवूनियां ॥ अश्वरक्षक पुढील जे ॥ ८ ॥ विप्रकुमर देखोन ॥ वीर पुसती दटावून ॥ कोणीं रे हा श्यामकर्ण ॥ कर्दळीसी बांधिला ॥ ९ ॥ लेंकुरें बोलती भिऊन ॥ पैल किशोर आरक्तनयन ॥ आम्हीं वैरितांही ठेवीत बांधून ॥ त्याचेच कान कापा हो ॥ २१० ॥ रामविजय ग्रंथ पावन ॥ त्यामाजी लहूकुशआख्यान ॥ कथा गोड अमृताहून ॥ भक्तचतुरीं परिसावी ॥ ११ ॥ ब्रह्मानंद श्रीधरवर ॥ जानकीहृदयकमलभ्रमर ॥ अगाध तयाचें चरित्र ॥ सविस्तर संख्या शतकोटी ॥ १२ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ सप्तत्रिंशत्तमोध्याय गोड हा ॥ २१३ ॥ ॥ अध्याय ॥ ३७ ॥ ॥ ओंव्या ॥ २१३ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

७९ फुलझाडें, केळी, नारळी इ० रमणीय स्थळ. ८० मुंज झालेले. ८१ आंगावरचें. ८२ वस्त्र. ८३ मको म्हणत असतांहि.

३८

श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ हातीं घेऊनि चाप शर ॥ उभा मंगलभगिनीचा कुमर[1] ॥ तंव मागूनि चतुरंग दळभार ॥ अति गजरें पातले ॥ १ ॥ सर्वें सकळ पृथ्वीचे नृपवर ॥ मध्यें शत्रुघ्न प्रचंड वीर ॥ तों तेणें ऐकिली मात[2] सुंदर ॥ घोडा धरिला म्हणोनि ॥ २ ॥ भ्रूसंकेत[3] दावी शत्रुघ्न ॥ अपार लोटलें तेव्हां सैन्य ॥ तंव कर्दळीस श्यामकर्ण ॥ वस्त्रेंकरून बांधिला असे ॥ ३ ॥ ऋषींचीं मुंजियें बाळें खेळती ॥ जे वीर आले ते पुसती ॥ वारू[4] कोणीं बांधिला म्हणती ॥ लेंकुरें बोलती भिऊनियां ॥ ४ ॥ कानावरी हात ठेविती ॥ आम्हीं नाहीं धरिला आण वाहती ॥ पैल दिसे धनुष्य हातीं ॥ कलागती करितो तो ॥ ५ ॥ तेणें बांधिला श्यामकर्ण ॥ तवं वीर बोलती हांसोन ॥ म्हणती लेंकुरें नेणोन ॥ घोडा बांधिला कौतुकें ॥ ६ ॥ सोडा रे सोडा श्यामकर्ण ॥ जवळ उरलें आतां अयोध्यापट्टण ॥ वाट पाहातसे रघुनंदन ॥ सत्वर जावें वेगेंसी ॥ ७ ॥ घोडा सोडावया धांवले वीर ॥ तंव तो बोले जानकीकुमर ॥ कोण रे तुम्ही तस्करें[5] ॥ घोडा सोडूं पातलां ॥ ८ ॥ घोडा धरिला तोचि मी एथ ॥ उभा लक्षीत युद्धपंथ ॥ तुमचा कोण आहे रघुनाथ ॥ त्यासी जाऊन सांगा रे ॥ ९ ॥ मज म्हणतां तुम्ही बाळ ॥ परी सर्वांचा मी आहें काळ ॥ तुमचीं गर्वाचीं कवचें सकळ ॥ फोडीन आज समरांगणीं ॥ १० ॥ तटस्थ पाहती सकळ वीर ॥ म्हणती हा बाळ सुकुमार ॥ लीलाचाप[6] घेऊनि परिकर ॥ धीट गोष्टी बोलतो ॥ ११ ॥ यावरी शस्त्र धरितां निश्चितीं ॥ सकळ योद्धे आम्हां हांसती ॥ तरी वारू सोडून त्वरितगती ॥ पुढें चला सत्वर ॥ १२ ॥ घोडा सोडूं धांवले वीर ॥ लहू चाप ओढी सत्वर ॥ शतांचीं शतें सोडूनि शर ॥ तोडिले कर तितुक्यांचे ॥ १३ ॥ जैसीं वटपत्रें तुटोनि पडती ॥ तैसीं मणगटें पडलीं क्षितीं ॥ तों मागुती बहु वीर धांवती ॥ घे घे शब्देंकरूनियां ॥ १४ ॥ स्वर्गासहित[7] भुजादंड ॥ लहूनें पाडिले उदंड ॥ जैसे शाखारहित तरू प्रचंड ॥ तैसे वीर उभे तेथें ॥ १५ ॥ जाहला एकचि हाहाकार ॥ सेना लोटली तेव्हां समग्र ॥ लक्षांचे लक्ष वीर ॥ धांवते जाहले ते काळीं ॥ १६ ॥ जैसा धारा वर्षे जलधर ॥ तैसे शर सोडी भूमिजाकुमर ॥ शिरांच्यां राशी अपार ॥ पाडिल्या तेव्हां पुरुषार्थें ॥ १७ ॥ दूरोनि पाहती वीर सकळ ॥ बारा वर्षांचा दिसे बाळ ॥ परी प्रचंड वीर समोर काळ ॥ उभा ठाकूं न शकेचि ॥ १८ ॥ एक म्हणती गुरु समर्थ ॥ याचा असेल हा यथार्थ ॥ तरीच एवढें सामर्थ्य ॥ कवणासही नाटोपे ॥ १९ ॥ तंव सोळा पद्मे दळभार ॥ एकदांचि लोटले समग्र ॥ परी त्या वीराचें संधान थोर ॥ खिळिले समग्र बाणांनीं ॥ २० ॥ मयूरपिच्छें पिंजारती ॥ तैसे वीर सकळ दिसती ॥ मग हांक देऊनि महारथी ॥ शत्रुघ्न पुढें लोटला ॥ २१ ॥ गजकलेवरें पडलीं सदट[8] ॥ चालावया नाहीं वाट ॥ वीर पडिले महासुभट[9] ॥ नामांकित पुरुषार्थी ॥ २२ ॥ सकळ प्रेतें मागें टाकून ॥ पुढें धांवला शत्रुघ्न ॥ बाळ पाहिला विलोकून ॥ तंव रघुनंदन दुसरा ॥ २३ ॥ म्हणे कोणाचा तूं किशोर येथ ॥ दळ पाडिलेंस असंख्यात ॥ आतां शिक्षा लावीन तुज बहुत ॥ पाहें पुरुषार्थ पैं माझा ॥ २४ ॥ लहू म्हणे सिंहदरींत वारण[10] ॥ आला मदभरेंकरून ॥ परी तो क्षेम स्वस्ति

१ सीतेचा पुत्र, लहु. २ हकीकत. ३ भुंवईची खूण. ४ घोडा. ५ चोर. ६ क्रीडेतील धनुष्य. ७ तलवारीसह. ८ डोक्यांच्या. ९ दाट. १० मोठे शूर. ११ हत्ती.

वांचून ॥ केवीं जाईल माघारा ॥ २५ ॥ विष्णुवर्हनाचे[12] कवेंतून ॥ उरग[13] केवीं जाय वांचून ॥ ऐसें ऐकतां शत्रुघ्न ॥ लावी बाण चापासी ॥ २६ ॥ आकर्णवरी ओढी ओढून ॥ लहूवरी सोडिला बाण ॥ सीतापुत्रें नलगतां क्षण ॥ तोडोनियां टाकिला ॥ २७ ॥ आणिक सोडिले पांच बाण ॥ तेही तत्काळ टाकिले तोडून ॥ सर्वेंचि शत शर शत्रुघ्न ॥ मोकलीत अति रागें ॥ २८ ॥ तेही लहू तोडी सत्वर ॥ मग काय करी सीतापुत्र ॥ बाणजाळ घातलें अपार ॥ झांकिलें अंबर प्रतापें ॥ २९ ॥ सेनेसहित कैकयीनंदन ॥ बाणीं जर्जर केला पूर्ण ॥ जें जें शस्त्र प्रेरी शत्रुघ्न ॥ तें तें सर्वेंच लहू छेदी ॥ ३० ॥ मग निर्वाणें[14] बाण जो शत्रुघ्नातें ॥ दिधला होता रघुनाथें ॥ परम संकट देखोनि तेथें ॥ तूणीरांतून ओढिला ॥ ३१ ॥ वीज निघे मेघाबाहेर ॥ तैसा झळकतसे दिव्य शर ॥ तो धनुष्यीं योजून सत्वर ॥ लहूवरी सोडिला ॥ ३२ ॥ दृष्टीं देखतां सीताकुमर ॥ म्हणे बाण आला दुर्धर ॥ याचें निवारणें[15] समग्र ॥ कुश एक जाणतसे ॥ ३३ ॥ फळें आणावया कुश गेला ॥ माझा पाठिराखा दुरावला ॥ बाणापुढें या वेळां ॥ न वांचेंचि सर्वथा ॥ ३४ ॥ परम धैर्यवंत सीतानंदन ॥ वेगीं सोडिला दिव्यबाण ॥ तेणें शत्रुघ्नाचा निर्वाण-बाण ॥ अर्ध खंडिला अंतराळीं ॥ ३५ ॥ अर्ध शर जो कां उरला ॥ तो लहूचे हृदयीं भेदला ॥ मूर्च्छना येऊनि पडिला ॥ बाळ तेव्हां धरणीवरी ॥ ३६ ॥ भडभडां चालिलें रुधिर ॥ आरक्त नेत्र जाहलें वक्त्र[16] ॥ श्वासोच्छ्वास कोंडले समग्र ॥ शेंडी रुधिरें थबथबली ॥ ३७ ॥ लहूपासोनि वांचले वीर ॥ त्यांनीं सिंहनाद[17] केला थोर ॥ पडिला पडिला किशोर ॥ म्हणोनि समग्र धांवले ॥ ३८ ॥ दूरोनि पाहती ते वेळे ॥ एक म्हणती मीसें[18] घेतलें ॥ मग शत्रुघ्न रथासालें ॥ उतरूनि जवळी पातला ॥ ३९ ॥ शत्रुघ्न जवळी बैसोन ॥ पाहे बाळ विलोकून ॥ धन्य जननी प्रसवली रत्न ॥ म्हणोनि उचलूनि घेतला ॥ ४० ॥ श्यामसुंदर आकर्णनयन ॥ आजानुबाहु सुहास्यवदन ॥ शत्रुघ्नें उदक आणून ॥ मुखींचें अशुद्ध धूतलें ॥ ४१ ॥ आश्चर्य करिती अवघे वीर ॥ म्हणती दुजा अवतरला रघुवीर ॥ आतां याची माता अपार ॥ शोक करील यालागीं ॥ ४२ ॥ स्नेहाचा पूर अत्यंत ॥ शत्रुघ्नाचे हृदयीं दाटत ॥ नयनीं आले अश्रुपात ॥ बाळक दृष्टीं विलोकितां ॥ ४३ ॥ रामचंद्रासी दाखवूं म्हणून ॥ रथीं घातला त्वरेंकरून ॥ घेऊनिगां श्यामकर्ण ॥ शत्रुघ्न त्वरेनें चालिला ॥ ४४ ॥ लागला वाद्यांचा एकचि नाद ॥ मनीं न समाये आनंद ॥ महासिद्धि साधूनि सिद्ध ॥ घवघवीत परते जैसा ॥ ४५ ॥ इकडे लेंकुरें धांवोनी ॥ जानकीस सांगती जाऊनी ॥ माते तुझा लहू मारूनी ॥ नेला घालोनि रथावरी ॥ ४६ ॥ ऐकतां सर्व वर्तमान ॥ जानकी पडिली मूर्च्छा येऊन ॥ जैसें लोभियाचें धन गेलें हारपोन ॥ तैसे प्राण सर्व एकवटती ॥ ४७ ॥ जैसी काष्ठाची बाहुली ॥ तैसी निचेष्टित सीता पडली ॥ पुढती आक्रंदत उठिली ॥ वक्षःस्थळ[19] बडवीत ॥ ४८ ॥ मीं अनाथ दुर्बळ ॥ परदेशी भणंगें[20] केवळ ॥ माझें धरूनियां बाळ ॥ कोणीं निर्दयें नेलें पैं ॥ ४९ ॥ माझीं दुर्बळाचीं दोन बाळें ॥ त्यांत एक धरूनि नेलें ॥ पूर्व कर्म फळास आलें ॥ अहाहा जाहलें ओखटें[21] ॥ ५० ॥

१२ गरुडाचे. १३ सर्प. १४ बाणीचाणीचा, कठीण. १५ निवारणाचा उपाय. १६ मुख. १७ मोठा ध्वनि. १८ ढोंग. १९ छाती. २० भिकारी. २१ वाईट.

बाळ माझें अत्यंत कोमळ ॥ घायें जाहलें असेल विकळ ॥ मुखचंद्र त्याचा अति निर्मळ ॥ नयन विशाळ सुरेख ॥ ५१ ॥ तेथें लागोनियां बाण ॥ फुटले असतील नयन ॥ सुहास्यवदन छिन्नभिन्न[२३] ॥ जाहलें असेल बाळाचें ॥ ५२ ॥ माझीं बाळें अत्यंत दीन ॥ होतीं कंदमुळें भक्षून ॥ तयांसीं बळ कैचें संपूर्ण ॥ झुंजावया कोणासीं ॥ ५३ ॥ बाळावरी शस्त्र उचलिती ॥ ते क्षत्रिय नव्हेत दुर्मती ॥ कैसी कोणाचेहि चित्तीं ॥ दया उपजली नाहीं तेथें ॥ ५४ ॥ माझें दरिद्रियाचें किंचित धन ॥ कोणें निर्दयें नेलें चोरून ॥ मज अंधाची काठी हिरून ॥ कोणीं वनीं भिरकाविली ॥ ५५ ॥ कोणीं पक्ष माझा छेदिला ॥ कोणीं नेत्र माझा फोडिला ॥ माझा कल्पवृक्ष उपडिला ॥ कोण्या पापियें येऊनि ॥ ५६ ॥ वाल्मीक तात ये वेळां ॥ तोही गेला असे पाताळा ॥ मजवरी अनर्थ जाहला ॥ कोणा सांगूं जाऊनियां ॥ ५७ ॥ कुश वनास गेला तत्त्वतां ॥ कोण धांवणें करील आतां ॥ माझा लहू बाळ मागुता ॥ कोण मज भेटवील ॥ ५८ ॥ तों कुश परतला वनींहून ॥ मार्गीं होती अपशकुन[२४] ॥ जड जाहले चालतां चरण ॥ तैसाच धांवून येतसे ॥ ५९ ॥ कौपीन मौंजी कटीं शोभत ॥ मस्तकीं शिखा वातें उडत ॥ माता जाहली असेल क्षुधितें[२५] ॥ म्हणोन धांवत वेगेंसीं ॥ ६० ॥ पर्णकुटींत प्रवेशला ॥ म्हणे माते बंधु कोठें गेला ॥ आजि सामोरा मज नाहीं आला ॥ कोठें गुंतला खेळावया ॥ ६१ ॥ मग त्रिभुवनपतीची राणी ॥ बोले आक्रोशें हांक फोडूनी ॥ बा रे आजि परचक्र येऊनी ॥ नेला धरून बंधु तुझा ॥ ६२ ॥ तूं त्याचा पाठिराखा पूर्ण ॥ तुझें करीत घडी घडी स्मरण ॥ सोडिला असेल तेणें प्राण ॥ तूं लवकरी धांव आतां ॥ ६३ ॥ कुशें घेतले धनुष्य बाण ॥ जानकीसी केलें साष्टांग नमन ॥ जय सद्गुरु वाल्मीक म्हणून ॥ केली गर्जना ते काळीं ॥ ६४ ॥ गुरुनाममंत्रें ते वेळीं ॥ सर्वांगीं विभूति चर्चिली ॥ उभा राहून बाळ बळी ॥ जानकीप्रती बोलत ॥ ६५ ॥ अंबे इंद्र चंद्र कुबेर ॥ अथवा ब्रह्म विष्णु महेश्वर ॥ जरी मी असेन तुझा कुमर ॥ तरी बाणेंकरूनि फोडीन ते ॥ ६६ ॥ समरांगणीं सर्व वीर ॥ आटोनियां रथ कुंजर ॥ बंधु सोडवीन सत्वर ॥ शिक्षा करीन वैरियां ॥ ६७ ॥ आजि दाखवीन बळाची प्रौढी[२६] ॥ तरीच जन्मलों तुझें पोटीं ॥ म्हणूनि चालिला जगजेठी ॥ नमून माता सत्वर ॥ ६८ ॥ कुंजरांचा[२७] मार्ग काढीत पूर्ण ॥ जेवीं आवेशें धांवे पंचानन[२८] ॥ कीं सर्प शोधावया सुपर्ण[२९] ॥ क्रोधें जैसा धांवत ॥ ६९ ॥ असो दूर देखोनियां भार ॥ प्रचंड हांक दिघली थोर ॥ उभे रे उभे तस्कर ॥ चोरून नेतां वस्तु माझी ॥ ७० ॥ तस्करासी शिक्षा हेचि पूर्ण ॥ हस्तचरण खंडोन ॥ कर्ण नासिक छेदोन ॥ शिक्षा लावीन येथेंचि ॥ ७१ ॥ खळबळला सेनासमुद्र ॥ अवघे माघारे पाहती वीर ॥ तों राजस घनश्याम सुंदर ॥ दिसे राघव दूसरा ॥ ७२ ॥ द्वादश वर्षांचा किशोर[३०] ॥ देखोनि चळचळां कांपती वीर ॥ एक म्हणती सकळ संहार ॥ करील आतां उरलियांचा ॥ ७३ ॥ तों कुशें कोदंड चढवून ॥ सोडिले तेव्हां दिव्य बाण ॥ किंवा वर्षत पर्जन्य ॥ सायकांचा[३१] ते काळीं ॥ ७४ ॥ तों सेनापति दळ घेऊन ॥ मुरडलों[३२] तेव्हां वर्षत बाण ॥ म्हणे बाळा तुज न लागतां क्षण ॥ धरून नेईन अयोध्ये ॥ ७५ ॥

२२ तुटून-फुटून पडलेलें. २३ वाईट शकुन. २४ भुकेली. २५ मोठी ख्याती. २६ हत्तींचा. २७ सिंह. २८ गरुड. २९ बाल्यदशेचा मुलगा. ३० बाणांचा. ३१ परतला.

निर्वाणींचे दहा बाण ॥ कुशावरी प्रेरिले दारुण ॥ येरें एकचि शर सोडून ॥ दहाही छेदिले ते काळीं ॥ ७६ ॥ जैसे मूढाचे बोल अपार ॥ एकेचि शब्दें छेदी चतुर ॥ कीं स्पर्शतां जान्हवीचें नीर ॥ पापें सर्वत्र संहारती ॥ ७७ ॥ तैसे कुशें शर छेदून ॥ तत्काळ सोडिले नव बाण ॥ चारही वारू आणि स्यंदन ॥ सेनापतीचा तोडिला ॥ ७८ ॥ आणीक तीन बाण सोडिले ॥ चाप हातींचें छेदिलें ॥ कवच[३२] अंगींचें उडविलें ॥ विरथ केलें ते काळीं ॥ ७९ ॥ पुढें चरणचाली चालत ॥ कुशावरी आला अकस्मात ॥ जैसा कां सूकर उन्मत्त ॥ मृगेंद्रावरी चौताळे ॥ ८० ॥ तों कुशें सोडूनि दोन बाण ॥ दोन्ही हस्त टाकिले छेदून ॥ सवेंच दिव्य शर सोडून ॥ शिर तयाचें उडविलें ॥ ८१ ॥ सेनापति पडतांच ते वेळां ॥ एकचि हाहाकार जाहला ॥ तों तयाचा बंधु सरसावला ॥ नागेंद्रनाम जयासी ॥ ८२ ॥ विद्युत्प्राय वीस बाण ॥ नागेंद्रें सोडिले चापीं योजून ॥ त्या शरतेजें प्रकाशलें गगन ॥ मग सीतानंदन काय करी ॥ ८३ ॥ एकेंचि शरें ते वेळे ॥ वीसही बाण पिष्ट केले ॥ जैसीं एकाचि नामें सकळें ॥ महापातकें भस्म होती ॥ ८४ ॥ मग सोडोनि अर्धचंद्र शर ॥ उडविलें नागेंद्राचें शिर ॥ सोडीत बहुबाणांचा पूर ॥ न ये समोर कोणीही ॥ ८५ ॥ तों समीरीसी[३३] मार्गे टाकून ॥ पुढें धांवला कैकयीनंदन[३४] ॥ चपळेहून सतेज बाण ॥ वर्षता जाहला ते काळीं ॥ ८६ ॥ तंव तो राघवी[३५] वीर चतुर ॥ एवं पिष्टवत करी शर ॥ सवेंचि बाण अपार ॥ वर्षत मेघासारिखे ॥ ८७ ॥ उरलें शत्रुघ्नाचें दळ ॥ शिरें छेदूनि पाडी सकळ ॥ जैसें अपार जलदजाळ ॥ प्रभंजन विभांडी[३६] ॥ ८८ ॥ मग आठवोनि वाल्मीकाचे चरण ॥ काढिला सद्गुरु दत्त बाण ॥ सोडिला जेवीं पंचानन ॥ वारणावरी चपेटे ॥ ८९ ॥ वज्र पडे शैलशिखरीं[३७] ॥ तैसा शत्रुघ्नाचे हृदयावरी ॥ बाण खडतरला ते अवसरीं ॥ पडला धरणीं शत्रुघ्न ॥ ९० ॥ मग भोंवतें पाहे कुश वीर ॥ तंव एकही न ये समोर ॥ जैसा दिनकराप्रति अंधकार ॥ मुख परतोनि न दाखवी ॥ ९१ ॥ षोडश पद्मे दळभार ॥ आणीक देशोदेशींचे नृपवर ॥ तितुकेही संहारिले समग्र ॥ जैसें तृण अग्नि-संगें ॥ ९२ ॥ मग कुश चापासी घाली गवसणी ॥ जैसा याज्ञिकें[३८] आच्छादी अग्नि ॥ कीं मेघांमाजी सौदामिनी ॥ गुप्त जैसी राहिली ॥ ९३ ॥ जैसीं उद्भसग्रामींचीं मंदिरें ॥ तेवीं रथ शून्य दिसती एकसरें ॥ लहुवाकारणें कुशेंद्रें ॥ तितुकेंही शोधिलें ते काळीं ॥ ९४ ॥ व्हावया वस्तुसाक्षात्कार ॥ साधक शोधिती तत्त्वें समग्र ॥ तैसे रथ शोधित कुशेंद्र ॥ बंधुरत्नाकारणें ॥ ९५ ॥ तों शत्रुघ्नाचा मुख्य रथ ॥ त्यावरी लव्हू होता मूर्च्छागत ॥ तो कुशें उचलूनियां त्वरित ॥ हृदयकमळीं आलिंगिला ॥ ९६ ॥ तों लव्हूनें उघडिले नयन ॥ विलोकी निज-बंधूचें वदन ॥ तत्काळ उभा ठाकला उठोन ॥ म्हणे शत्रुघ्न पळोन गेला कोठें ॥ ९७ ॥ देह चारी[३९]ही शोधोनि विविध ॥ संत अंतरीं धरिती बोध ॥ तैसाच कुश होऊनि सद्गद ॥ बंधू हृदयीं धरियेला ॥ ९८ ॥ मग कुश वचन बोलत ॥ बा रे तूं श्रमलासी बहुत ॥ येरू म्हणे कष्ट समस्त ॥ हरले तुज देखतां ॥ ९९ ॥ म्हणे श्यामकर्ण घेऊन ॥ चला आश्रमा करूं गमन ॥ मग कुश बोलिला वचन ॥ कदा येथून

३२ चिलखत. ३३ वायूला. ३४ शत्रुघ्न. ३५ रामाचा पुत्र. ३६ नाश करी. ३७ पर्वतावर. ३८ यज्ञकर्म चालविणारा अग्निहोत्री. ३९ स्थूल, सूक्ष्म, कारण आणि महाकारण हे चार देह.

जाऊं नये ॥ १०० ॥ आतां युद्धास येतील बहुत ॥ ते समरीं जिंकूनि समस्त ॥ मग वारू घेऊनि त्वरित ॥ जाऊं जननीच्या दर्शना ॥ १ ॥ लहू म्हणे घालोनि पैज ॥ घ्यावें अयोध्येचें राज्य ॥ धरून आणावा रघुराज ॥ वाल्मीकचरणाजवळी पैं ॥ २ ॥ असो वृक्षीं बांधोनि श्यामकर्ण ॥ हातीं घेऊनि धनुष्य बाण ॥ अयोध्यापंथ लक्षीत पूर्ण ॥ दोघे जण उभे असती ॥ ३ ॥ घायाळ सैन्य उरलें किंचित ॥ तें अयोध्येसी गेलें धांवत ॥ राघवासी सकळ मात ॥ श्रुत केली तेधवां ॥ ४ ॥ दळभारासहित पूर्ण ॥ रणीं आटिला वीर शत्रुघ्न ॥ विप्रबाळक दोघे जण ॥ द्वादश वर्षांचे असती पैं ॥ ५ ॥ यज्ञमंडपीं रघुनंदन ॥ बंधूचा समाचार ऐकोन ॥ टाकोनि हातींचें अँवदान ॥ भूमीवरी उलंडला ॥ ६ ॥ नेत्रीं ढळढळां वाहे नीर ॥ गजबजले भरत सौमित्र ॥ बिभीषण हनुमंत मित्रेपुत्र ॥ हडबडले तेधवां ॥ ७ ॥ म्हणती यज्ञासी जाहलें विघ्न ॥ पडला महावीर शत्रुघ्न ॥ असो सौमित्रीप्रती राजीवनयनें ॥ काय बोलिला तेधवां ॥ ८ ॥ म्हणे शत्रुघ्नाऐसा वीरराणा ॥ ऋषिकिशोरें आटिला रणा ॥ तरी सर्वें घेऊनि अपार सेना ॥ धांवण्या धांवें बंधूच्या ॥ ९ ॥ श्रीरामचरणाब्ज नमून ॥ वायुवेगें निघाला लक्ष्मण ॥ सर्वें चतुरंग सैन्य ॥ अपार तेव्हां निघालें ॥ ११० ॥ चवदा गांवें रुंद थोर ॥ मार्गीं चालिला सेनासागर ॥ वायुवेगें ऊर्मिलावर ॥ रणमंडलासीं पातला ॥ ११ ॥ तों सेनापती काळजित ॥ सौमित्रीपासीं पावला त्वरित ॥ तंव दोघे देखिले अकस्मात ॥ शशी आदित्य जयापरी ॥ १२ ॥ श्यामसुंदर दोघे जण ॥ द्वादशवर्षांच्या मूर्ती लहान ॥ हातीं घेऊनि धनुष्य बाण ॥ धीट दोघे विलोकिती ॥ १३ ॥ पाहावया बंधूचें मानस ॥ बोलता जाहला वीर कुश ॥ म्हणे सेना पातली विशेष ॥ प्रताप विशेष दिसतसे ॥ १४ ॥ सेनापती क्रोधायमान ॥ चपळ येतसे त्याचा स्यंदन ॥ आतां हा युद्ध करील दारुण ॥ आम्हांसी पुन्हां नाटोपे ॥ १५ ॥ मग बोलिला लहू वीर ॥ तूं पाठिराखा आलासी सत्वर ॥ आतां मज बळ अपार ॥ येथोनियां चढियेलें ॥ १६ ॥ जैसी साह्य होतां सरस्वती ॥ सकळ कठिनार्थ उमजती ॥ तेवीं आजि निर्वीर करीन क्षिती ॥ तुझ्या बळेंकरूनियां ॥ १७ ॥ तुजसीं युद्धीं राहे समोर ॥ ऐसा असेल कोण वीर ॥ जरी स्वयें आला रामचंद्र ॥ तरी तूं त्यासी नाटोपसी ॥ १८ ॥ तोंवरी गर्जे जलार्णव ॥ जों देखिला नाहीं कलशोद्भव ॥ तूं पंचाँनन हे सर्व ॥ जंबूक तुजवरी पातले ॥ १९ ॥ जरी तूंम जिंकील सूर्यासी ॥ कीं भूतें गिळितील काळासी ॥ तरी समरांगणीं युद्धासी ॥ तुजसीं हे पुरतील ॥ १२० ॥ जरी आकाश बुडेल मृगजळीं ॥ वारा कोंडिजे भूगोळीं ॥ तरीच तुजसीं सम दळीं ॥ भिडों शकतील बंधुराया ॥ २१ ॥ परी एके संशयें गोविलें ॥ जें माझें धनुष्य भंगिलें ॥ असंख्यात युद्ध जाहलें ॥ उपवनाजवळी प्रथमचि ॥ २२ ॥ मग सैन्य दळभार ॥ धरा धरा म्हणती किशोर ॥ आतां जातील हे कोठवर ॥ पाहूं नयनीं आम्हींच कीं ॥ २३ ॥ वीर दोघे उभे ठाकूनी ॥ दळभार विलोकिती नयनीं ॥ सैन्य जैसें तृणप्राय करूनी ॥ उभे ठाकती तैसेच ते ॥ २४ ॥ कुश म्हणे ऐसिया समयासी ॥ कोण चाप देईल आम्हांसी ॥ तरी आतां प्रार्थूं सूर्यासी ॥ धनुष्यप्राप्तीकारणें ॥ २५ ॥ मग ते

४० आहुति. ४१ सुग्रीव. ४२ लक्ष्मणाला. ४३ श्रीराम. ४४ युद्धाचा रथ. ४५ समुद्र. ४६ अगस्ति. ४७ सिंह. ४८ अंधार.

राघवी वीर दोघे जण ॥ एकनिष्ठें मांडिती सूर्यस्तवन ॥ ऊर्ध्व वदनें करून ॥ सूर्यमंडळ विलोकिती ॥ २६ ॥ जय जय तमनाशका सहस्र-किरणा ॥ अंबरचूडामणे सूर्यनारायणा ॥ जीवमिलिंदबंधमोचना ॥ हृदयदळप्रकाशका ॥ २७ ॥ एकचक्र कनकभूषित रथ ॥ सप्तमुख अश्व-वेग बहुत ॥ निमिषार्धामाजी अपार पंथ ॥ क्रमोनि जात मनोगती ॥ २८ ॥ आदिपुरुष तूं निर्विकार ॥ ब्रह्मा विष्णु महेश्वर ॥ हीं स्वरूपें तुझींच साचार ॥ सर्वप्रकाशक आदित्या ॥ २९ ॥ सकळ रोग दुःख भयहारका ॥ विश्वदीपना विश्वपाळका ॥ त्रिभुवननेत्रप्रकाशका ॥ काळात्मका काळरूपा ॥ १३० ॥ परिसोनि बाळकांची स्तुती ॥ तत्काळ प्रसन्न जाहला गभस्ती ॥ अक्षय्य धनुष्य क्षितीं ॥ ऊर्ध्वपंथें टाकिलें ॥ ३१ ॥ सूर्यास साष्टांग नमून ॥ घेतले तेव्हां धनुष्य बाण ॥ म्हणती वाल्मीक गुरु धन्य पूर्ण ॥ सूर्यआराधन दिघलें जेणें ॥ ३२ ॥ आम्हांसी सद्गुरुराया अखंड ॥ क्षणें जिंकूं हें ब्रह्मांड ॥ लहू म्हणे आजि कोडें ॥ पुरवीन यांचें संग्रामीं ॥ ३३ ॥ सूर्यदत्त कोदंड घेऊन सत्वर ॥ सरसा-वला तेव्हां लहू वीर ॥ तों सौमित्राचें दळ समग्र ॥ चतुरंग भार लोटला ॥ ३४ ॥ अचूक दोघांचें संधान ॥ वायां न जाय टाकिला बाण ॥ पदाती अश्व रथ वारण ॥ तोडोनि पाडिती एकसरें ॥ ३५ ॥ कोणी धनुष्याची ओढी ओढीत ॥ तों भुज तोडिती अकस्मात ॥ मणगटें असिलतेसहित ॥ तोडोनि पाडिती क्षितीवरी ॥ ३६ ॥ शिरांच्या लाखोल्या घालोनी ॥ भूलिंगें पूजिलीं दोघां जणीं ॥ अशुद्धनदी लोटली वनीं ॥ जाती वाहन कलेवरें ॥ ३७ ॥ वीर संहारिले अपार ॥ काळजिताम म्हणे सौमित्र ॥ हे दोघे असतां एकत्र ॥ कल्पांतींही नाटोपती ॥ ३८ ॥ तरी बहुत कटक घेऊन ॥ ज्येष्ठासी धरीं तूं वेगून ॥ धाकट्याभोंवतें आवरण ॥ मी घालूनि धरीतसें ॥ ३९ ॥ मग दोन भाग कैटक केले ॥ दोघे दोहींकडे फोडिले ॥ चोवीस वेढे घातले ॥ सभोंवते सैन्याचे तेधवां ॥ १४० ॥ सौमित्रें वेढिला लहू वीर ॥ जैसा तृणें झांकिला वैश्वानर ॥ कीं अजांनीं कोंडिला महाव्याघ्र ॥ कीं खगेश्वर सर्पांनीं ॥ ४१ ॥ परी तो लहू प्रतिज्ञावीर ॥ चापामी लावून सोडी शर ॥ फिरत फिरत चक्राकार ॥ सोडी पूर बाणांचा ॥ ४२ ॥ धन्य वाल्मीकाचे दिव्य मंत्र ॥ एका बाणाचे कोटी शर ॥ होऊनि शिरें पाडी समग्र ॥ नवल वीर राघवी ॥ ४३ ॥ रघुपतीचा मित्र विशेष ॥ रुधीनामा धांवला राक्षस ॥ तो महाबलिष्ठ गगनास ॥ उडोनि गेला तेधवां ॥ ४४ ॥ खालीं अकस्मात उतरूनी ॥ लहूचें चाप सत्वर हिरूनी ॥ अंतरिक्ष गेला उडोनी ॥ फळ घेऊन पक्षी जैसा ॥ ४५ ॥ हातींचें हिरून नेलें चाप ॥ लहू पाहे तटस्थरूप ॥ तस्करापाठीं लागतां सर्प ॥ खंडी जैसा चरणातें ॥ ४६ ॥ ब्यौंळ मूषक धरूं जातां ॥ वणव्यांत सांपडे अवचिता ॥ कीं रिसांमागें धांवतां ॥ वोरांटी अंगीं अडकली ॥ ४७ ॥ निधान साधावया गेला ॥ तों विवेशी पडिली येऊन गळां ॥ तैसें लहूस जाहलें ते वेळां ॥ धनुष्य नेतां रुधीनें ॥ ४८ ॥ असो सीतासुत परम चतुर ॥ जैसा निगळीं उडे खगेश्वर ॥ तैसा उडोनियां सत्वर ॥ रुधी राक्षस धरियेला ॥ ४९ ॥ हातींचें धनुष्य हिरून घेतलें ॥ असुर झोटीं धरिला तये वेळे ॥ गरगरां फिरव-

४९. आकाशाचें मस्तकभूषण. ५० नेत्र मिटण्याचा व्यापार तो. ५१ जगताला प्रकाश करणाऱ्या. ५२ सूर्य. ५३ आवड. ५४ तलवारीसह. ५५ रक्त. ५६ सैन्याचा वेढा. ५७ सैन्य. ५८ सर्प. ५९ अस्त्रबल. ६० विघ्नदेवता. ६१ आकाशांत. ६२ केस धरून.

नियां बळें ॥ पृथ्वीवरी आपटिला ॥ १५० ॥ मृत्तिकाघटाचीं शकलें ॥ तेवीं असुरअवयव चूर जाहले ॥ रुधीनें प्राण सोडिले ॥ सकळांदेखतां ते काळीं ॥ ५१ ॥ मागुती कटकांत उतरोन ॥ युद्ध करी सीतानंदन ॥ चोवीस वेढे संहारून ॥ टाकिले सैन्याचे ते क्षणीं ॥ ५२ ॥ महाझुंजार येऊन ॥ हातींचीं शस्त्रें टाकून ॥ धरिती लहूचे चरण ॥ आमुचे प्राण रक्षीं कां ॥ ५३ ॥ एक पळती रण सांडून ॥ एक दांतीं धरिती तृण ॥ मग सिंहनादें लक्ष्मण ॥ गर्जोनि पुढें धांविन्नला ॥ ५४ ॥ जैसा पांच विजा अति तीक्ष्ण ॥ तैसे सौमित्रें पांच बाण ॥ लहूवरी सोडिले पूर्ण ॥ महाक्रोधेंकरूनियां ॥ ५५ ॥ रघुवीराचा लहू वीर ॥ तत्काळ सोडी दिव्य शर ॥ पांच बाण केले चूर ॥ लोहपिष्टन्यायेंसीं[६३] ॥ ५६ ॥ लहू सौमित्राप्रती बोलत ॥ त्वां पूर्वीं मारिला इंद्रजित ॥ ते तुझी विद्या समस्त ॥ आजि दावीं मजलागीं ॥ ५७ ॥ चतुर्दश वर्षें निराहार ॥ काननीं श्रमलासी तूं फार ॥ आज समरांगणीं साचार ॥ सावकाश निद्रा करीं ॥ ५८ ॥ सौमित्र म्हणे तूं कोणाचा कोण ॥ तंव तो लहू बोले हांसोन ॥ तुज पुसावया काय कारण ॥ आला बाण सांभाळीं ॥ ५९ ॥ लहू निधडा प्रचंड वीर ॥ सोडी एक सबळ शर ॥ रथासहित सौमित्र ॥ आकाशपंथें उडविला ॥ १६० ॥ गरगरां गगनीं भोंवे रथ ॥ भूमीवरी पडे अकस्मात ॥ मग दुजे रथीं सुमित्रासुत ॥ आरूढला लवलाहें ॥ ६१ ॥ जैसा कां वर्षे घन ॥ तैसा बाण सोडी लक्ष्मण ॥ लहू त्याचिया त्रिगुण ॥ शर सोडीत सतेज ॥ ६२ ॥ ऊर्मिलापतीचे बाण ॥ तटतटां टाकी तोडून ॥ मग मंत्र जपोनि लक्ष्मण ॥ शर सोडोनि देतसे ॥ ६३ ॥ त्या शरापासून एकदां ॥ निघाल्या कोट्यवधि गदा ॥ विमानीं सकळ सुरवृंदां ॥ आश्चर्य तेव्हां वाटलें ॥ ६४ ॥ तों लहू जपे गुरुमंत्र ॥ चक्रें सोडिलीं तेव्हां अपार ॥ गदा छेदोनि समग्र ॥ चक्रें सवेंचि गुप्त जाहलीं ॥ ६५ ॥ तों सौमित्रें सोडिले पर्वत ॥ सवेंचि लहू वज्र प्रेरीत ॥ फोडिले अचळ समस्त ॥ वज्र जात स्वस्थाना ॥ ६६ ॥ मंगळाचा भाचा लहू वीर ॥ सूर्यवंशमंडणाचा कुमर ॥ शरमुखीं द्वादशदिनेंकर[६४] ॥ स्थापोनियां सोडिले ॥ ६७ ॥ निघतां द्वादश आदित्यमेळ ॥ प्रतापें लोपला विरिंचिगोळ[६५] ॥ ऐसें देखतां फणिपाळ[६६] ॥ राहुअस्त्र सोडित ॥ ६८ ॥ सूर्य आणि राहुअस्त्र ॥ दोन्ही जाहलीं एकत्र ॥ सवेंच गुप्त जाहलीं क्षणमात्र ॥ नलगतां ते काळीं ॥ ६९ ॥ कामास्त्र सोडी अहिनायक[६७] ॥ लहूवीरें प्रेरिलें कामांतक ॥ कामास्त्र दग्ध जाहलें तात्कालिक ॥ नामें पातक हरे ज्यापरी ॥ १७० ॥ सौमित्रें सोडिलें तारकास्त्र ॥ लहू प्रेरी षण्मुखास्त्र ॥ विघ्नास्त्र सोडी सौमित्र ॥ हेरंबास्त्रें[६८] लहू टाकी ॥ ७१ ॥ सौमित्र सोडी सरितापती[६९] ॥ लहू त्यावरी प्रेरी अगस्ती ॥ मग त्यावरी ऊर्मिलापती ॥ पावकास्त्र प्रेरीतसे ॥ ७२ ॥ लहूनें मेघास्त्र प्रेरून ॥ विझविला प्रचंड अग्न ॥ जैसें प्रगटतां आत्मज्ञान ॥ जाय वितळोन प्रेममोह ॥ ७३ ॥ वातास्त्र प्रेरी ऊर्मिलानाथ ॥ लहू आड घाली पर्वत ॥ असो आठ अक्षौहिणी गणित ॥ रामसेना पाडिली ॥ ७४ ॥ आश्चर्य करी लक्ष्मण ॥ म्हणे याचा पार न कळे पूर्ण ॥ हातासी कदा न ये श्यामकर्ण ॥ आतां यज्ञ कायसा ॥ ७५ ॥ हे

६३ लोखंडाचा चुरा. ६४ सूर्य. ६५ ब्रह्मांड. ६६ लक्ष्मण. ६७ गणपति-अस्त्र. ६८ समुद्रास्त्र. ६९ अग्न्यस्त्र.

असती कोणाचे कोण ॥ हें कदा न कळे वर्तमान ॥ मज वाटे शिव आणि रमारमण ॥ बाळवेषें प्रकटले ॥ ७६ ॥ आणिकांची नव्हे शक्ती ॥ हे त्रिभुवनासी नाटोपती ॥ असो लहू म्हणे सौमित्राप्रती ॥ कां रे उगाचि निवांत ॥ ७७ ॥ तुझे सरले असतील बाण ॥ तरी जाईं अयोध्येसी परतोन ॥ तुझा कैवारी रघुनंदन ॥ घेऊनि येईं सत्वर ॥ ७८ ॥ सौमित्र नेदी प्रत्युत्तर ॥ विलोकी बाळांचा मुखचंद्र ॥ मागुती क्रोध उचंबळतां अपार ॥ सोडिले शर सौमित्रें ॥ ७९ ॥ भोगींद्रअवतार लक्ष्मण ॥ हें भूमिजासुतें जाणोन ॥ प्रेरिला नादास्त्र बाण ॥ नवल पूर्ण वर्तलें ॥ १८० ॥ असंभाव्य नाद मंजुळ ॥ ध्वनीनें भरला ब्रह्मांडगोळ ॥ धनुष्य टाकूनि फणिपाळ ॥ नादब्रह्मीं मिसळला ॥ ८१ ॥ जे कर्णकबीज भक्षिती ॥ त्यांचे अंगीं संचरे भ्रांती ॥ ऊर्मिलापतीची गती ॥ तैसीच जाहली तेधवां ॥ ८२ ॥ नादास्त्र बाण हृदयीं भरला ॥ जैसा विखार विळीं प्रवेशला ॥ त्यावरी नादरंगें व्यापिला ॥ भूतळीं पडिला मूर्च्छित ॥ ८३ ॥ इकडे सैन्याचे चोवीस आवर्त ॥ कुशाभोंवते घातले अद्भुत ॥ ते संहारून समस्त ॥ काळजित मारिला ॥ ८४ ॥ विभांडोनि दोन्ही दळें ॥ दोन्ही बंधू एकवटले ॥ रण अपार तेथें पडिलें ॥ कुंजरें मोकळे धांवती ॥ ८५ ॥ नाहीं रथस्वामी सारथी ॥ रिते रथ तुरंग ओढिती ॥ सैरावरा चौताळती ॥ सव्य अपसव्य रणांगणीं ॥ ८६ ॥ असो अयोध्येंत कोदंडपाणी ॥ सांगे गुज भरताचे कर्णीं ॥ म्हणे आणिक सेना घेऊनी ॥ साह्य जाईं सौमित्रासी ॥ ८७ ॥ दारुण योद्धा तो लक्ष्मण ॥ त्याप्रती सांगें इतुकें वचन ॥ कीं बाळक दोघे-जण ॥ जितेच धरून आणावे ॥ ८८ ॥ ते जिवें न मारावे सर्वथा ॥ आकांत करील त्यांची माता ॥ तरी बाण अंगीं न खुपतां ॥ मोहनास्त्र घालोनि धरावे ॥ ८९ ॥ त्यांचीं माता पिता कोण ॥ धनुर्वेद गुरु संपूर्ण ॥ कां हिंडतां वनोपवन ॥ वर्तमान सर्व पुसावें ॥ १९० ॥ त्यांच्या स्वरूपाची आकृती ॥ कोणासारिखे दोघे दिसती ॥ धरूनि आणा त्वरितगती ॥ रथावरी घालोनियां ॥ ९१ ॥ सौमित्राचा क्रोध दारुण ॥ घेईल बाळकांचा प्राण ॥ अन्याय केला तरी पूर्ण ॥ कृपा करावी बाळकांवरी ॥ ९२ ॥ ज्याचें हृदय परम कोमळ ॥ ते दृष्टीं देखतांचि बाळ ॥ स्नेहें द्रवेल तत्काळ ॥ अग्निसंगें घृत जैसें ॥ ९३ ॥ बाळकाविणें शून्य मंदिर ॥ आमुचें पडलें कीं साचार ॥ गुणसरिता सीता सुंदर ॥ विवेक न करितां त्यागिली ॥ ९४ ॥ ऐसें बोलतां रघुनाथ ॥ कंठ जाहला सद्गदित ॥ नयनीं सुटले अश्रु-पात ॥ प्रिया हृदयांत आठवली ॥ ९५ ॥ ऐसें राजीवनेत्र बोलत ॥ तों घायाळ आले धांवत ॥ म्हणती सौमित्र आणि काळजित ॥ सेनेसहित आटिले ॥ ९६ ॥ ऐसें ऐकतां राजीवनेत्र ॥ परम चिंतातुर जाहले वानर ॥ श्रीराम म्हणे सर्वेश्वर ॥ अत्यंत कोपला आम्हां-वरी ॥ ९७ ॥ ब्रह्मानंद म्हणे श्रीधर ॥ पुढें वीरश्री माजेल अपार ॥ ते श्रवण करोत श्रोते चतुर ॥ व्युत्पन्न आणि प्रेमळ ॥ ९८ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ अष्टत्रिंशत्तमोध्याय ॥ गोड हा ॥ १९९ ॥ अ० ३८॥

७० गायनास्त्र. ७१ घोड्याचें बीं. ७२ भ्रमण, घेरी. ७३ अटकवणारे वेढे. ७४ जर्जर करून. ७५ हत्ती. ७६ श्रीराम. ७७ पढलेले, पंडित.


३९
गोलिवडेकर

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ देवाधिदेव राजीवनेत्र[1] ॥ पुराणपुरुष घनश्यामगात्र[2] ॥ लीला दाखविली विचित्र ॥ भक्त-जन तारावया ॥ १ ॥ सौमित्र पडिला रणांगणीं ॥ श्रवणीं ऐकतां कोदंडपाणी ॥ शोकाकुलित पडिला धरणीं ॥ सुमंतें सांवरून उठविला ॥ २ ॥ दळ घेऊन अपरिमित[3] ॥ समागमें घेतला हनुमंत ॥ रणाप्रती धांविन्नला भरत ॥ पवनवेगेंकरूनियां ॥ ३ ॥ भरत आणि हनुमंत ॥ रण विलोकिती समस्त ॥ तंव ते सरसावोनि सीतासुत ॥ दोघे पुढें पातले ॥ ४ ॥ हनुमंताचे कर्णीं समस्त ॥ भरत सांगे गुप्त मात ॥ म्हणे हे राघवाऐसे दिसत ॥ सीतासुत निश्चयें ॥ ५ ॥ जानकी होती गर्भिणी ॥ तैसीच रामचंद्रें सोडिली वनीं ॥ हनुमंत म्हणे मजही मनीं ॥ ऐसेंच गमे निश्चयें ॥ ६ ॥ वैरागरावांचून रत्न[4] ॥ सहसा न होय निर्माण ॥ हे जानकीचे नंदन ॥ मजही पूर्ण कळों आलें ॥ ७ ॥ तों लहूसी म्हणे कुश वीर ॥ पैल ते नर आणि वानर ॥ हळूच करितात विचार ॥ तें तुज कांहीं समजलें ॥ ८ ॥ आम्हां दोघांसी युद्धीं गोवूनी ॥ श्यामकर्ण न्यावा सोडोनी ॥ हेंच त्यांनीं धरिलें मनीं ॥ सांगती कानीं एकमेकां ॥ ९ ॥ तरी तूं रक्षीं श्यामकर्ण ॥ त्यांसीं युद्ध करितों मी निर्वाण ॥ ऐसें कुश वीर बोलोन ॥ सरसावून पुढें आला ॥ १० ॥ धनुष्यासी लावून बाण ॥ भरताप्रती बोले वचन ॥ तूं वडील काय लक्ष्मणाहून ॥ तुझें आंगवण थोर दिसतसे ॥ ११ ॥ तुझें नाम काय सांग सत्वर ॥ पिता तुझा कोठील नृपवर ॥ त्वां पूर्वी युद्ध दुर्धर ॥ कोणासीं केलें सांग पां ॥ १२ ॥ माझें नाम पुससील ये क्षणीं ॥ तरी मी वीर कुशेंद्रचूडामणी ॥ याउपरी भरत तये क्षणीं ॥ काय बोलता जाहला ॥ १३ ॥ म्हणे लेंकुरा तूं जाय येथोन ॥ तुज मी दिधलें जीवदान ॥ भरतें मज सोडिलें म्हणोन ॥ सांग आपुले मातेसी ॥ १४ ॥ मग कुश बोले हांसोन ॥ तुझे बंधू पडले दोघेजण ॥ त्यांचा सूड घ्यावया पूर्ण ॥ रामें पाठविलें तुम्हांसी ॥ १५ ॥ युद्ध सांडूनि सांगसी गोष्टी ॥ बंधूचा सूड घेईं उठाउठीं ॥ ना तरी आतां रणीं दावून पाठी ॥ अयोध्येसी पळें कां ॥ १६ ॥ पाठमोऱ्यासी न मारीं जाण ॥ तुज अभय दिधलें पूर्ण ॥ कोण तुझा आहे रघुनंदन ॥ त्यासी घेऊन येईं वेगें ॥ १७ ॥ ऐसें बोलतां सीतानंदन ॥ भरतें चापासी लावूनि बाण ॥ आकर्णपर्यंत ओढून ॥ कुशावरी सोडिला ॥ १८ ॥ सीतात्मजें शर टाकून ॥ मध्येंच तोडिला तो बाण ॥ सवेंच शरजाळ घालून ॥ कटक[5] बहुत संहारिलें ॥ १९ ॥ भरत जें जें अस्त्र सोडीत ॥ तें तें न मानी सीतासुत ॥ युद्धविद्या सरली समस्त ॥ सीतासुत नाटोपे ॥ २० ॥ भरतें प्रेरिलें कार्तवीर्यास्त्र[6] ॥ सहस्रकरांचे प्रकटले वीर ॥ बाण सोडिती अनिवार ॥ हांकें अंबर गाजविती ॥ २१ ॥ ऐसें देखतां राघवकुमरें ॥ भार्गवास्त्र सोडिलें त्वरें ॥ कार्तवीर्यास्त्र एकसरें ॥ गुप्त जाहलें तेधवां ॥ २२ ॥ मग भरतें प्रेरिली काल-रात्री ॥ तमें दाटली धरित्री ॥ तंव सीतापुत्रें ते अवसरीं ॥ द्वादश सूर्य प्रकटविले ॥ २३ ॥ त्या प्रकाशें ते वेळां ॥ विरिंचिगोळ[7] तपों लागला ॥ भरत म्हणे हा कळिकाळा ॥ सर्वथाही नाटोपे ॥ २४ ॥ भरतें सोडिलें महिषासुर ॥ कुशें टाकिली शक्ति अनिवार ॥ भरतें

---

१ कमलासारखे नेत्र असलेला. २ मेघवर्णाप्रमाणें शरीर. ३ असंख्य. ४ हिऱ्यांची खाण. ५ कुश. ६ मंत्र. ७ सहस्रार्जुनास्त्र. ८ ब्रह्मांडगोल.

सोडिलें त्र्यंबकास्त्र ॥ येरें भस्मासुरास्त्र सोडिलें ॥ २५ ॥ मग कुशेंद्रें ते वेळां ॥ सूर्यमुख बाण काढिला ॥ जैसी मेघांतून निघे चपळा ॥ तैसा गेला त्वरेनें ॥ २६ ॥ भरताचे हृदयीं येऊन ॥ खडतरला दिव्य बाण ॥ स्यंदनावरून[9] उलथोन ॥ भरत खालीं पडियेला ॥ २७ ॥ दळ पूर्वीच आटिलें समस्त ॥ ऐसें देखोनि हनुमंत ॥ घेऊन एक विशाळ पर्वत ॥ कुशेंद्रावरी धांविन्नला ॥ २८ ॥ भोवंडून बळें भिरकाविला ॥ कुशें वज्रमुख बाण सोडिला ॥ अचळ फोडोनि पिष्ट केला ॥ धुरोळा उडाला आकाशीं ॥ २९ ॥ मारुतीचें हृदय लक्षून ॥ सोडिले तेव्हां वज्रबाण ॥ तो वज्रदेही परी मूर्च्छना येऊन ॥ धरणीवरी पडियेला ॥ ३० ॥ इकडे बिभीषण आणि रघुनंदन ॥ विचार करीत बैसले पूर्ण ॥ बाळक हे कवणाचे कोण ॥ युद्ध निर्वाण करिताती ॥ ३१ ॥ तों अकस्मात आली मात ॥ रणीं पडला वीर भरत ॥ मूर्च्छना येऊनि हनुमंत ॥ रणांगणीं तळमळे ॥ ३२ ॥ विभीषण म्हणे रघुनाथा ॥ आतां कासया यज्ञ करितां ॥ परमाश्चर्य तत्त्वतां ॥ जाऊनियां पाहावें ॥ ३३ ॥ रघुवीर बोले तेव्हां वचन ॥ काळ कैसा परम कठिण ॥ बंधू पडिले तिघेजण ॥ कुळक्षय पूर्ण मांडला ॥ ३४ ॥ परम क्रोधावला रघुनंदन ॥ तोडोनि टाकिलें यज्ञकंकण ॥ होमद्रव्यें उलंडून ॥ सीतारमण ऊठला ॥ ३५ ॥ हेडबडली[11] अयोध्या सर्व ॥ निशाणीं न घालितां घाव ॥ रथारूढ होऊनि सर्व ॥ पवनवेगें धांवले ॥ ३६ ॥ विभीषण सुग्रीव जांबुवंत ॥ नळ नीळ शरभ वाळिसुत ॥ अयोध्येचें दळ समस्त ॥ परमवेगें धांवत ॥ ३७ ॥ वर्षाकाळीं गंगेचे पूर ॥ सागराप्रती जाती सत्वर ॥ तेवीं नरवानरांचे भार ॥ रणसिंधूजवळी पातले ॥ ३८ ॥ तिघे बंधू पडिले रणीं ॥ ते नयनीं विलोकी चापपाणी ॥ कीं नमस्कार घातले धरणीं ॥ तिघांहीं मिळून एकदांचि ॥ ३९ ॥ तुझे कन्येस गांजिलें व्यर्थ ॥ म्हणोनि पृथ्वीस नमस्कार करीत ॥ असो प्रेतें देखोनि रघुनाथ ॥ मनीं परम क्षोभला ॥ ४० ॥ मग दुरोनि देखिलीं नयनीं ॥ श्यामसुंदर बाळें ते क्षणीं ॥ एकाकडे एक पाहोनी ॥ गोष्टी करिती कौतुकें ॥ ४१ ॥ कौपीन मौंजी यज्ञोपवीत ॥ तेणें शोभती किशोर अद्भुत ॥ माथांची शिखा[13] उडत ॥ दृष्टीं नाणिती परदळातें ॥ ४२ ॥ असो वृक्ष पाषाण घेऊन ॥ धांवले एकदांचि वानरगण ॥ तों दोघेही धनुष्य चढवून ॥ सरसावून पुढें आले ॥ ४३ ॥ आश्चर्य करी रघुनंदन ॥ सोडिती बाणापाठीं बाण ॥ मृगेंद्रा[13]ऐसे गर्जोन ॥ दोघे वचन बोलती ॥ ४४ ॥ घालती असंभाव्य[10] बाणजाळ ॥ जर्जर केलें वानरदळ ॥ शिळा वृक्ष फोडोनि सकळ ॥ परदळावरी टाकिती ॥ ४५ ॥ अनिवार बाळकांचा मार ॥ न सोसवती दारुण शर ॥ प्रेतें पडलीं अपार ॥ उरले वानर पळती भयें ॥ ४६ ॥ हनुमंत भावी मनांत ॥ ऊर्ध्वपंथें उतरून अकस्मात ॥ पुच्छें बांधोन दोघे त्वरित ॥ राघवापासीं आणावे ॥ ४७ ॥ उडों पाहे अंजनीकुमर ॥ तों कुशें टाकिला सकळ शर ॥ त्याच्या हृदयीं आदळोनि सत्वर ॥ बाण पृथ्वीवरी पडियेला ॥ ४८ ॥ कुश बोले गर्जोन ॥ मर्कटा उभा राहें एक क्षण ॥ त्वां विध्वंसिलें[15] अशोकवन ॥ तें येथें न चले सर्वथा ॥ ४९ ॥ टाकोन वृक्ष पाषाण ॥ हें राक्षसयुद्ध नव्हे जाण ॥ तो नव्हे रे गिरि-

९ अंगांत खोंचला. १० व्यर्थ. ११ गडबडली. १२ शेंडी. १३ सिंहासारखे. १४ कल्पनातीत. १५ नाशिलें.

द्रोण ॥ उपटोन त्वरें न्यावया ॥ ५० ॥ गोवत्सपदें[16] जीवन ॥ पुरुषार्थ भोगिसी समुद्र उडोन ॥ रावणाचें नगर जाळिलें पूर्ण ॥ तें येथें न चले आम्हांसीं ॥ ५१ हा संग्रामसिंधु परम दुर्धर ॥ येथें जय न पावसी तूं वानर ॥ आमुचे जननीसी अपार ॥ स्नेह तुझा लागलासे ॥ ५२ ॥ ते क्षणक्षणां आठवीत ॥ म्हणोनि तुज रक्षिलें येथ ॥ उगाच राहें निवांत ॥ अचळवर्तें[17] हनुमंता ॥ ५३ ॥ तों वृक्ष घेऊनि सत्वर ॥ पुढें घांविन्नला मित्रपुत्रें[18] ॥ बाणघातें तरुवर ॥ लहूनें तोडिला हातींचा ॥ ५४ ॥ म्हणे ऐक रे चंडांशुसुता ॥ तो मागील काळ राहिला आतां ॥ तुम्हां पतितांसी तेंत्त्वतां[19] ॥ लावीन शिक्षा आज येथें ॥ ५५ ॥ वाळी ज्येष्ठबंधु मारवून ॥ त्याचे स्त्रियेसीं करिसी गमन ॥ ज्याचे बळें कर्म केलें पूर्ण ॥ त्याचें ज्ञान कळों आलें ॥ ५६ ॥ तुम्हां मर्कटांसी केंचें[20] ज्ञान ॥ परी तुज गुरु भेटला जाण ॥ उत्तम न्याय करून ॥ तारा तुज दीधली ॥ ५७ ॥ गुरु अंपर्थें[21] चाले सदा ॥ मग केंची शिष्यास मर्यादा ॥ असो प्रायश्चित्त एकदां ॥ घेईं आजि रणांगणीं ॥ ५८ ॥ — २.
मग घालून सहस्र बाण ॥ रणीं पाडिला सूर्यनंदन ॥ फणसफळावरी कंटक पूर्ण ॥ तैसेचि शर भेदले ॥ ५९ ॥ तंव पुढें घांवला जांबुवंत ॥ तयाप्रती कुश वीर बोलत ॥ म्हणे अस्वला तूं निर्बळ बहुत ॥ वृद्ध अत्यंत दृष्टिहीन ॥ ६० ॥ सोडोनियां सहस्र बाण ॥ तोही पाडिला उलथोन ॥ तों घेऊनियां पाषाण ॥ नळ वानर धांविन्नला ॥ ६१ ॥ तयाप्रती लहू बोले वचन ॥ म्हणे हें नव्हे सेतुबंधन ॥ पांच बाण सोडून ॥ तोही पाडिला रणभूमीं ॥ ६२ ॥ तंव अंगद धांवला सकोप ॥ तयासी बोले रविकुळदीप[22] ॥ रावणाचा सभामंडप ॥ नव्हे पोंमरा[23] उचलावयाचा ॥ ६३ ॥ माझे पाठीसीं रिघें येऊन ॥ तुझे पित्याचा मी सूड घेईन ॥ शत्रूची सेवा करितां पूर्ण ॥ लाज न वाटे मर्कटा ॥ ६४ ॥ तुझे मातेनें केला व्यभिचार ॥ त्याचें प्रायश्चित्त देईन सत्वर ॥ म्हणोनि पांच शर ॥ टाकोनि अंगद पाडिला ॥ ६५ ॥ असो अष्ट जुंपती[24] आणि हनुमंत ॥ रणीं पाडिले वीर समस्त ॥ मग कोदंड चढवूनि त्वरित ॥ बाण लावीत राघव ॥ ६६ ॥ वेगें सोडिले दश बाण ॥ कुशें शत सोडिले निर्वाण ॥ सहस्र शर रघुनंदन ॥ टाकिता जाहला तयावरी ॥ ६७ ॥ कुशें लक्ष बाण सोडिले ॥ राघवें कोटी मोकलिले ॥ बाणमंडपें ते वेळे ॥ झांकुळलें सूर्यबिंब ॥ ६८ ॥ रघुपतीचा हस्तवेग बहुत ॥ त्याहूनि विशेष कुशवीर दावीत ॥ बाणांचें तेव्हां गणीत ॥ लेखित शेषातें न करवे ॥ ६९ ॥ अनिवार बाळकें दोन्ही ॥ नाटोपती रामासी रणीं ॥ यावरी कोदंडपाणी ॥ काय बोले तेधवां ॥ ७० ॥ म्हणे ऋषिबाळक हो ऐका वचन ॥ तुम्हांस भोंतुकें[25] देईन ॥ करावयासी दुग्धपान ॥ धेनु देईन सत्वर ॥ ७१ ॥ मी तुम्हांसी जाहलों प्रसन्न ॥ जें मागाल ते इच्छा पुरवीन ॥ सकळ दुःख दरिद्र हरून ॥ देईन दान वींजी[26] गज ॥ ७२ ॥ मग ते देती प्रतिवचना ॥ आम्हांस मागावयास नसे वासना ॥ तूंच मागें मनकामना ॥ पूर्ण करूं तुझी आम्हीं ॥ ७३ ॥ तुझी तूंच भोगीं संपत्ती ॥ आम्हीं ऐकिली तुझी कीर्ती ॥ शोधितां हे त्रिजगती ॥ निर्दय नाहीं तुजऐसा ॥ ७४ ॥ तुज साधु म्हणेल तरी कोण ॥ व्यर्थ वाळी मारिला कपटेंकरून ॥

१६ गाईचें पाऊल बुडण्याइतकें पाणी. १७ पर्वताप्रमाणें स्थिर. १८ सुग्रीव. १९ पातक्यांना. २० वाईट चालीनें. २१ कुश. २२ नीचा. २३ मोठे पुढारी. २४ पोहे, लाडू, मेवा मिठाई इत्यादि. भातुकली. २५ घोडे.

जानकीसारिखें चिद्रत्न[२६] ॥ अन्यायाविण दवडिलें ॥ ७५ ॥ निःपाप जैसी भागीरथी ॥ तिजहून पवित्र सीतासती ॥ घोर वनीं टाकिली ही रुयाती ॥ तुज न शोभे राघवा ॥ ७६ ॥ ऐसे दोघेही बाळ बोलती ॥ ॥ प्रत्युत्तर देत रघुपती ॥ मनांत उपजे बहु प्रीती ॥ कीं दोघांप्रती आलिंगावें ॥ ७७ ॥ बाळभाषण ऐकोन ॥ वाटें तयांसी द्यावें चुंबन ॥ याउपरी ते दोघेजण ॥ म्हणती बाण सोडीं वेगें ॥ ७८ ॥ तूं क्षत्रिय म्हणविसी पूर्ण ॥ गोष्टी सांगसी युद्ध टाकून ॥ लीलेंअवतारी[२७] रघुनंदन ॥ काय बोले याउपरी ॥ ७९ ॥ तुम्ही दोघे कोणाचे कोण ॥ झालेत कोणे वंशीं निर्माण ॥ मातापितयांची नाम स्थूण ॥ सांगा संपूर्ण आम्हांप्रती ॥ ८० ॥ दोघांचें देहेंडेंचि[२८] ठाण ॥ दोघांची विद्या समसमान ॥ वेद शास्त्र पुराण रामायण ॥ कोण्या गुरूनें पढविलें ॥ ८१ ॥ धनुर्वेद मंत्रास्त्र ॥ कळा कौशल्य युक्ति विचित्र ॥ सद्गुरु कोण तुमचा पवित्र ॥ नाम त्याचें सांगा पां ॥ ८२ ॥ ऐसें बोलतां रघुनाथ ॥ दोघे गदगदां हांसत ॥ रणीं बंधू पडिले समस्त ॥ त्यांचा खेद सांडिला येणें ॥ ८३ ॥ विद्या सरली तुझी सकळिक ॥ रणीं पुससी आतां सोयरिक ॥ कीं बंधू पडिले हा धाक ॥ मनीं दचक बैसला तुझा ॥ ८४ ॥ तुज पुसावया काय कारण ॥ सोडीं वेगें निर्वाण बाण ॥ बंधूंचा सूड घेईं[२९] पूर्ण ॥ मग सोयरिक पुसें सुखें ॥ ८५ ॥ म्हणती तूं अयोध्येचा नृपवर ॥ वधिले रावणादि असुर ॥ ती अवघी विद्या बाहेर ॥ काढीं आज पाहूं दे ॥ ८६ ॥ आम्ही असों धाकुटे किशोर ॥ तूं पूर्वीचा जुनाट झुंजारें[३०] ॥ धनुर्वेद पढविला समग्र ॥ गुरु वसिष्ठें तुजलागीं ॥ ८७ ॥ तुज एकपत्नीव्रत पूर्ण ॥ सत्कीर्ति जानकीतें सोडून ॥ अपकीर्ति कां वरिली दाटून ॥ हें तों दूषण जगीं जाहलें ॥ ८८ ॥ युद्ध केलियाविण सर्वथा ॥ आम्ही तुज न सोडूं आतां ॥ भय वाटत असेल चित्ता ॥ तरी पळून जाईं[३१] अयोध्ये ॥ ८९ ॥ दारा कुटुंब तुज नाहीं ॥ आतां संन्यास घेऊन सुखें राहीं ॥ यावरी जनकाचा ज्येष्ठ जांवई ॥ काय बोलता जाहला ॥ ९० ॥ तुम्ही सांगा आपुलें वर्तमान ॥ मग मी तुम्हांसीं झुंजेन ॥ यावरी कुश बोले हांसोन ॥ ऐकें सावध होऊनियां ॥ ९१ ॥ जानकीउदरकमल शुद्ध ॥ त्यांत जन्मलों दोघे मिलिंद[३२] ॥ शत्रुकाष्ठें कोरून सुबद्ध ॥ पिष्ठ करितों रणांगणीं ॥ ९२ ॥ वाल्मीकतात गुरु पूर्ण ॥ तेणें आमुचें केलें पाळण ॥ त्यानंतरें मौंजीबंधन ॥ करून वेद पढविले ॥ ९३ ॥ सकळ शास्त्रें रामचरित्र ॥ धनुर्वेद पढविला समग्र ॥ तो आमुचे मातेचा तात पवित्र ॥ वाल्मीक ऋषि जाण पां ॥ ९४ ॥ मातेचे कैवारेंकरूनी ॥ भार्गवें निःक्षत्री केली अवनी[३३] ॥ तैसेंच आम्हीं धरिलें मनीं ॥ करूं अवनी निर्वीर ॥ ९५ ॥ कीं मातृकैवारें विनतासुत[३४] ॥ उरगें[३५] संहारी तेव्हां समस्त ॥ तैसेंच करणें आजि येथ ॥ आम्हांसही निर्धारें ॥ ९६ त्वां सांडिली जे सीतासती ॥ तैंच गळाली तुझी शक्ती ॥ अविवेक[३६] केला निश्चितीं ॥ पुनः मागुती अवतरेना ॥ ९७ ॥ ऐसें ऐकतां रामचंद्र ॥ सीता आठवूनि दयासमुद्र ॥ हृदय पिटून सर्वेश्वर ॥ धरणीवरी पडियेला ॥ ९८ ॥ मूर्च्छना सांवरूनि पुढती ॥ मागुती उठिला रघुपती ॥ पुढें बिभीषण मारुती ॥ तयांप्रती पुसतसे ॥ ९९ ॥

२६ ज्ञानरत्न. २७ क्रीडावतारी. २८ एका पायावर भार घेऊन दुसरा पाय टेकणें असा जो वक्र पाय तो. २९ योद्धा. ३० पत्नी. ३१ भ्रमर. ३२ पृथ्वी. ३३ गरुड. ३४ साप. ३५ अविचार.

म्हणे हे कवणाचे नंदन ॥ मग ते बोलती विचारून ॥ तुमचीं प्रतिबिंबें परिपूर्ण ॥ जानकीउदरीं जन्मलीं ॥ १०० ॥ चार घटिका संपूर्ण ॥ निवांत राहिला रघुनंदन ॥ सीता सोडिली त्या दिवसापासून ॥ संपूर्ण दिवस मोजिले ॥ १ ॥ द्वादश वर्षें तीन मास पूर्ण ॥ गणित करी जानकीजीवन ॥ तों लहू कुश दोघेजण ॥ एकाप्रती एक बोलती ॥ २ ॥ म्हणती वृक्षाआड बैसोन ॥ काय करितो रघुनंदन ॥ तों कुशें सोडिला एक बाण ॥ वृक्ष छेदोनि उडविला ॥ ३ ॥ हस्तकौशल्य[३६] देखोन ॥ हास्य करी जगन्मोहन ॥ म्हणे हे आम्हांलागून ॥ वश नव्हेत कदापि ॥ ४ ॥ आतां युद्धचि करावें यथार्थ ॥ म्हणोन उभा राहिला रघुनाथ ॥ जे जे बाण सोडित ॥ ते ते निष्फळ जात आकाशीं ॥ ५ ॥ विमानीं इंद्राद्रि सुरवर ॥ आश्चर्य करिती तेव्हां थोर ॥ म्हणती रामाचें सामर्थ्य अपार ॥ काय जाहलें ये समयीं ॥ ६ ॥ अंकाळींचीं अस्त्रें व्यर्थ पूर्ण ॥ तैसे निष्फळ जाती रामाचे बाण ॥ मग कुशें मोहनास्त्र संपूर्ण ॥ निजबाणीं स्थापिलें ॥ ७ ॥ तो मोहनबाण येऊन ॥ रघुनाथहृदयीं भेदला पूर्ण ॥ मोहें विलोकितां पुत्रवदन ॥ मूर्च्छा येऊन पडियेला ॥ ८ ॥ रघुनाथ पडतां भूमंडळीं ॥ एकचि हांक चोहींकडे जाहली ॥ पर्वत घेऊनि ते वेळीं ॥ हनुमंत पुढें धांविन्नला ॥ ९ ॥ त्यावरी टाकोनियां वज्रबाण ॥ मूर्च्छागत पाडिला न लागतां क्षण ॥ तों गदा घेऊन बिभीषण ॥ हांक देत पुढें आला ॥ १० ॥ तों कुशें बाण सोडिला ॥ लंकापतीचे हृदयीं बैसला ॥ तोहि मूर्च्छित पडियेला ॥ नाहीं उरला कोणी तेथें ॥ ११ ॥ मग लहू कुश दोघेजण ॥ आले रामाजवळी धांवोन ॥ पिता पाहिला अवलोकून ॥ वंदिले चरण प्रेमभावें ॥ १२ ॥ रघुपतीचा मुकुट काढिला ॥ कुशें आपुले मस्तकीं घातला ॥ कुंडलें कौस्तुभ[३७] कटीं मेखळा[३८] ॥ सर्वही लेइला कुश तेव्हां ॥ १३ ॥ सौमित्राचीं भूषणें काढोनी ॥ लहू लेइला तेच क्षणीं ॥ मग श्यामकर्ण घेऊनी ॥ दिव्य रथीं बैसले ॥ १४ ॥ लहू म्हणे दादा परियेसीं ॥ वानर धरून आश्रमासी ॥ नेऊन दाखवूं मातेसी ॥ खेळावयासी सर्वदा ॥ १५ ॥ मग नळ नीळ सुग्रीव मारुती ॥ यांचीं पुच्छें धरून हातीं ॥ जांबुवंत अंगद ते क्षितीं ॥ ओढीतचि चालविले ॥ १६ ॥ अंगें खरडती भूमीवरी ॥ जांबुवंत म्हणे मारुति अवधारीं ॥ ऊठ वेगें झडकरी ॥ युद्ध करूं चला यांसीं ॥ १७ ॥ मग म्हणे हनुमंत ॥ पुढें आहे बहुत कार्यार्थ ॥ त्रिभुवननाथ सीताकांत ॥ तोही मूर्च्छित पडियेला ॥ १८ ॥ आतां मेलियाचें मीसें[३९] घेऊन ॥ घेऊं जानकीचें दर्शन ॥ शक्तीचें सामर्थ्य दारुण ॥ केलें विंदाण[४०] अंतर्क्य हें ॥ १९ ॥ असो आश्रमा आले किशोर ॥ रथाखालीं उतरलें सत्वर ॥ अलंकारें मंडित सुंदर ॥ आश्रमामाजी प्रवेशले ॥ १२० ॥ कुश सन्मुख देखिला ॥ जानकीस ऐसा भाव गमला ॥ कीं रघुनाथचि आला ॥ सरसाविला अंचळा[४१] ॥ २१ ॥ तंव ते दोघेही कुमर ॥ घालिती साष्टांग नमस्कार ॥ सीतेसी दाटला गहिंवर[४२] ॥ नंदनें[४३] हृदयीं कवळिले ॥ २२ ॥ सीतेचे कंठीं मिठी घालून ॥ दोघे सांगती वर्तमान ॥ रामासमवेत बंधू चौघेजण । रणांगणीं पहुडविले ॥ २३ ॥ ऐकतांच ऐसी मात ॥ सीता पडली मूर्च्छागत ॥ सवेंच उठली आक्रंदत ॥

३६ हाताची चपळता. ३७ योग्य नसणारा काळ. ३८ मणी, कंठभूषण. ३९ कमरेचा पट्टा. ४० मिष, सोंग. ४१ विचार करण्यास अशक्य. ४२ पदर. ४३ कंठ दाटून आला. ४४ पुत्र.

हृदय पिटीत ते काळीं ॥ २४ ॥ म्हणे त्रिभुवनेश्वर घनसांवळा ॥ तो रणीं तुम्हां केवीं सांपडला ॥ अरे पितृवध कैसा केला ॥ जाणोनियां बाळ हो ॥ २५ ॥ मत्स्यें कैसा सागर शोषिला ॥ जंबुकें मृगेंद्र कैसा धरिला ॥ दीपतेजें काळवंडला ॥ वासरमणि कैसा हो ॥ २६ ॥ तृणप्रहारें भंगलें वज्र ॥ कीं पतंगें गिळिला वैश्वानर ॥ सैंपपभारें भोगींद्र-॥ ग्रीवा कैशा दडपिल्या ॥ २७ ॥ मक्षिकेचा पक्षवात सुटला ॥ तेणें मेरु कैसा उलथोनि पडिला ॥ मुंगीचे मुखवातें विदारला ॥ प्रळयमेघ जैसा पां ॥ २८ ॥ तंदुळभारें ऐरावत ॥ कैसा पडिला हो मूर्च्छित ॥ पुष्पहारें अद्भुत ॥ पाताळीं कूर्म दुखावला ॥ २९ ॥ तों कुश लहू तेव्हां बोलत ॥ माते ते पडले मूर्च्छागत ॥ आतां उठतील समस्त ॥ चिंता कांहीं न करावी ॥ १३० ॥ आई आम्हीं आणिलीं वानरें ॥ उड्या घेती बहुत सुंदरें ॥ वृक्षास बांधिलीं समग्रें ॥ पाहीं बाहेरी अंबे तूं ॥ ३१ ॥ मग जगन्माता येऊन पाहात ॥ तों हनुमंत नळ नीळ जांबुवंत ॥ वीर देखोनि समस्त ॥ आश्चर्य करी अंतरीं ॥ ३२ ॥ म्हणे बाळकांचें सामर्थ्य दारुण ॥ मैंदवीर आणिले धरून ॥ म्हणे यांस ओळखी देतां पूर्ण ॥ लज्जायमान होतील हे ॥ ३३ ॥ मग पुत्रांसी म्हणे ते अवसरीं ॥ अरे हे वानर ठेवूं नये घरीं ॥ सोडा जाऊं द्या वनांतरीं ॥ आपुलिया स्वस्थाना ॥ ३४ ॥ मग भोवंडिले पुच्छें धरून ॥ दूर दिघले भिरकावून ॥ मग ते महावीर उठोन ॥ राघवाकडे पळाले ॥ ३५ ॥ रणीं सावध जाहला रघुवीर ॥ तों पळतचि आले वानर ॥ सांगती सर्व समाचार ॥ वाल्मीकाचे आश्रमींचा ॥ ३६ ॥ आम्ही मूर्च्छेचें मीस घेऊनी ॥ जाऊन पाहिली जनकनंदिनी ॥ श्यामकर्ण दोघांनीं नेउनी ॥ आश्रमांगणीं पूजिलासे ॥ ३७ ॥ तुमचा रथ अलंकार ॥ घेऊनि गेले दोघे कुमर ॥ जैसा सुपर्णें जिंकिला श्रीधर ॥ तैसेंच पूर्ण येथें जाहलें ॥ ३८ ॥ कीं नंदीनें जिंकिला उमारमण ॥ कीं आपुलेच फळभारेंकरून ॥ वृक्ष जाय जैसा मोडून ॥ तैसेंच येथें जाहलें ॥ ३९ ॥ सूर्यापासून जाहलें आभाळ ॥ तेणें त्यास आच्छादिलें तत्काळ ॥ ऐसें बोलतां तमालनील ॥ उगाच राहिला क्षणभरी ॥ १४० ॥ इकडे वर्तला वृत्तांत ॥ रामासी झुंजले सुत ॥ उपवनाजवळी बहुत ॥ अपार रण पडियेलें ॥ ४१ ॥ समाचार ऐकोनि विपरीत ॥ पाताळाहून अकस्मात ॥ वाल्मीक मुनि आला धांवत ॥ आश्रमापासीं आपुलिया ॥ ४२ ॥ सीतेनें सांगितलें वर्तमान ॥ श्यामकर्ण आणिला धरून ॥ मग वाल्मीक मुनि हांसोन ॥ तेचि क्षणीं ऊठला ॥ ४३ ॥ रणांगणाप्रती येऊन ॥ अद्भुत करणी केली पूर्ण ॥ कमंडलूचें उदक शिंपून ॥ दळ अवघें उठविलें ॥ ४४ ॥ लक्ष्मण भरत शत्रुघ्न ॥ आदिकरून थोर लहान ॥ निद्रिस्थापरी उठोन ॥ उभे केले ते काळीं ॥ ४५ ॥ यावरी वाल्मीकें येऊन ॥ श्रीरामासी दिघलें आलिंगन ॥ म्हणे राघवा तूं सर्वज्ञ ॥ कर्तृत्व पूर्ण तुझेंच हें ॥ ४६ ॥ सर्वांचा गर्व झाडावया ॥ लीला तुवां केली रघुराया ॥ येरव्हीं सीता तुजपासूनियां ॥ दूर कोठें गेली पां ॥ ४७ ॥ अनंत ब्रह्मांडांचा कर्ता ॥ तो तूं पुराणपुरुष रघुनाथा ॥ लटकेंच बाहेर आतां ॥

४५ मोहरीच्या भारानें. ४६ शेषाची मान. ४७ मोठे योद्धे. ४८ मिष, ढोंग. ४९ गरुडानें. ५० शंकर. ५१ नीलवर्ण राम. ५२ कृति. ५३ क्रीडा.

नेणेंतपण धरिसी तूं ॥ ४८ ॥ श्रीराम म्हणे युद्ध करूनी ॥ दोघांस जिंकीन समरांगणीं ॥ म्यां आपुली निर्वाण करणी ॥ दाविली नाहीं तयांतें ॥ ४९ ॥ हांसोनि बोले वाल्मीक ऋषी ॥ हस्ताचा ढका लागला नेत्रासी ॥ तरी क्रोध धरून मानसीं ॥ हस्त काय छेदावा ॥ १५० ॥ भोजन करितां नकळत ॥ जिव्हेसीं रुतला दंत ॥ तरी कोणावरी क्षोभ तेथ ॥ करावा सांग राजेंद्रा ॥ ५१ ॥ कनक रुसे कांतीवरी ॥ रत्न प्रभा घालूं इच्छी बाहेरी ॥ काष्ठ धेऊनि निर्धारीं ॥ वृक्ष मारी आपुलीं फळें ॥ ५२ ॥ गूळ गोडीवरी रुसला ॥ प्रवाहासीं गंगा धरी अेंबोला ॥ प्रभेवरी दीप कोपला ॥ तैसा मांडिला विचार येथें ॥ ५३ ॥ हे जगदात्म्या अयोध्यापती ॥ तुझ्या वीर्याची अगाध गती ॥ 'आत्मा वै[५६] पुत्रनामासि' निश्चितीं ॥ गर्जती श्रुंती राघवा ॥ ५४ ॥ वाल्मीकाचे बोल ऐकोन ॥ जाहलें राघवाचें समाधान ॥ ते दिवसीं सीतारमण ॥ राहिला तेथें परिवारेंसीं ॥ ५५ ॥ कुश लहू भेटती रघुनंदना ॥ तो सोहळा पाहावया नयना ॥ सकळ राजयांसहित सेना ॥ त्वरेंकरून धांवती ॥ ५६ ॥ शत्रुघ्न सुमंत धांवती ॥ हेममय शिबिरें उभीं करिती ॥ अयोध्याजन वेगें येती ॥ महोत्साह पाहावया ॥ ५७ ॥ वसिष्ठाद्रिक मुनीश्वर ॥ कौतुक पाहूं आले सत्वर ॥ हेमांबरें[५७] सभेसी रघुवीर ॥ सकळांसहित बैसला ॥ ५८ ॥ नित्य नेम सारून रघुवीर ॥ नूतन वस्त्रें दिव्य अलंकार ॥ लेवोनियां श्रीरामचंद्र ॥ सभामंडपीं बैसला ॥ ५९ ॥ वाल्मीकें आश्रमाप्रती जाऊन ॥ लहू कुश आणि शामकर्ण ॥ राघवापासीं आणून ॥ उभे केले तेधवां ॥ १६० ॥ इंद्रादि देवगण पाहाती ॥ सर्व नृप सादर विलोकिती ॥ म्हणती केवळ रघूत्तमाच्या मूर्ती ॥ दोघे पुत्र दिसती हे ॥ ६१ ॥ शामसुंदर आकर्णनयन ॥ विशाळ भाळ सुहास्यवदन ॥ पुत्रांसहित रघुनंदन ॥ समसमान तीन्ही मूर्ती ॥ ६२ ॥ गर्जली तेव्हां आकाशवाणी ॥ राघवा तुझे पुत्र पाहें नयनीं ॥ जयजयकार करूनी ॥ मस्तक डोलविती सुरवर ॥ ६३ ॥ वस्त्रालंकारमंडित पूर्ण ॥ लहू कुश श्रीरामाजवळी येऊन ॥ हातीं तैसेचि धनुष्यवाण ॥ घालिती लोटांगण पितयासी ॥ ६४ ॥ जाहला एकचि जयजयकार ॥ वृंदारक[५८] वर्षती सुमनसंभार ॥ रामास प्रार्थिती नृपवर ॥ पुत्रांसी क्षेमें[५९] देइंजे ॥ ६५ ॥ मग उठोनियां रघुनंदन ॥ हृदयीं धरिले निजनंदन ॥ मस्तकीं करूनि अवघ्राण[६०] ॥ पुढें घेऊनि बैसला ॥ ६६ ॥ सकळ वेदशास्त्रप्रवीण ॥ वाल्मीकें केले दोघे जण ॥ पाठ शतकोटी रामायण ॥ बाळ म्हणोनि दाविती ॥ ६७ ॥ त्यावरी आरंभिलें गायन ॥ अवतारचरित्रें गहन ॥ तीं ऐकतां रघुनंदन ॥ सप्रेम जाहला ते काळीं ॥ ६८ ॥ चवदा विद्या चौसष्टी कळा ॥ बाळांनीं अभ्यासिल्या सकळा ॥ जैसा करतळींचा आंवळा ॥ आकळिल्या विद्या तैशाचि ॥ ६९ ॥ वाल्मीकास म्हणे रघुनाथ ॥ धन्य धन्य तुमचें गुरुत्व ॥ विद्याभ्यास युद्ध अद्भुत ॥ बाळकांहातीं करविलें ॥ १७० ॥ वाल्मीक वदे प्रत्युत्तर ॥ तुझें वीर्यसामर्थ्य परम तीव्र ॥ माझें गुरुत्व साचार ॥ काय करील नुसतेंचि ॥ ७१ ॥ सौमित्र भरत शत्रुघ्न ॥ सुमंत सुग्रीव बिभीषण ॥

५४ अज्ञानपणा. ५५ रुसवा. ५६ साक्षात्कार, स्वचित. ५७ वेद. ५८ सोनेरी छताड्या. ५९ देव. ६० आलिंगन. ६१ वास घेणें.

हनुमंतादि सकळ सैन्य ॥ सीता आणावया चालिले ॥ ७२ ॥ आश्रमापुढें येऊन ॥ घालिती सारे लोटांगण ॥ वाल्मीकें बहुत प्रार्थोन ॥ सीता आणिली वोहरी ॥ ७३ ॥ सकळहि सद्गद होऊन ॥ धरिती जगन्मातेचे चरण ॥ पुढें ठेविलें सुखासन[६२] ॥ जानकीसी बैसावया ॥ ७४ ॥ सकळ ऋषिपत्न्यांची पूजा करूनी ॥ जानकी बैसली सुखासनीं[६३] ॥ समुद्रासी भेटावया मंदाकिनी[६४] ॥ वेगेंकरून चालिली जैसी ॥ ७५ ॥ जवळी देखोनि रघुनाथा ॥ खाली उतरली जगन्माता ॥ वाल्मीक येऊनि तत्त्वतां ॥ रघुनाथाप्रती बोलतसे ॥ ७६ ॥ पंचभूतें[६५] शशी आदित्य ॥ रामा तूं साक्षी आहेसी हृदयस्थ ॥ निष्पाप जानकी निश्चित ॥ आदिमध्यावसानीं ॥ ७७ ॥ माझी धर्मकन्या जनककुमारी ॥ आजिवरी पाळिली म्यां माहेरीं ॥ आतां दिधली तुमचे करीं ॥ अर्धांगीं बैसवीं इयेतें ॥ ७८ ॥ तंव ते वदली आकाशवाणी ॥ सत्य सती हे जनकनंदिनी ॥ मग श्रीरामें आलिंगोनी ॥ अंकावरी बैसविली ॥ ७९ ॥ लागला वाद्यांचा गजर ॥ मग वाल्मीकास प्रार्थी रघुवीर ॥ घेऊनि सकळ ऋषीश्वर ॥ अयोध्येसी तुम्ही चला ॥ १८० ॥ पूर्ण करावया महायज्ञ ॥ सकळिकां मानलें तें वचन ॥ मग वाल्मीकादि मुनिजन ॥ दिव्य वहनीं बैसविले ॥ ८१ ॥ जानकीसहित रघुनंदन ॥ रथीं बैसला जैसा चंडकिरण[६६] ॥ दोघे दोहींकडे नंदन ॥ विराजमान शोभती ॥ ८२ ॥ मस्तकीं विराजती दिव्य छत्रें ॥ मित्रपुत्रें अतिविचित्रें ॥ निजभक्त अपार चौंमेरें ॥ रघूत्तमावरी ढाळिती ॥ ८३ ॥ मकरविरुदें[६७] पुढें चालती ॥ भाट सूर्यवंश वाखाणिती ॥ परम गजरें रघुपती ॥ अयोध्येमाजी प्रवेशला ॥ ८४ ॥ कौसल्या सुमित्रा प्रेमेंकरूनी ॥ सीतेस आलिंगिती नयेक्षणीं ॥ लहकुशांवरूनी ॥ मूद ओंवाळी कौसल्या ॥ ८५ ॥ सामुग्री पूर्वीच सिद्ध होती ॥ यज्ञदीक्षा[६८] घेऊन रघुपती ॥ पूर्ण केली पूर्णाहुती ॥ यज्ञ समाप्ती पावला ॥ ८६ ॥ वस्त्रालंकार दक्षिणा अपार ॥ देऊनि वोळविले ऋषीश्वर ॥ वर्णीत रघुवीरचरित्र ॥ आपले आश्रमाप्रती गेले ॥ ८७ ॥ रायांसी दिधली पाठवणी ॥ श्रीरामाची आज्ञा घेऊनि ॥ सीतेचा महिमा वर्णीत वदनीं ॥ निजनगराप्रती गेले ॥ ८८ ॥ विभीषण सुग्रीव प्राणसखे ॥ गौरवूनियां रघुनायकें ॥ आपुले स्थळाप्रती सुखें ॥ पाठविले तये काळीं ॥ ८९ ॥ जानकीकुमरांसमवेत ॥ अयोध्येचें राज्य करी रघुनाथ ॥ ही कथा श्रवण करितां बहुत ॥ अक्षय सुख पाविजे ॥ १९० ॥ परम संकटहरणी हे कथा ॥ विजयी होय श्रोता वक्ता ॥ पाहतां श्रीरामविजयग्रंथा ॥ सर्व चिंता हरे पैं ॥ ९१ ॥ यावरी कथा गोड बहुत ॥ लीला कैसी दावी रघुनाथ ॥ तो शेवटींचा अध्याय यथार्थ ॥ सादर आतां परिसिंजे ॥ ९२ ॥ चाळीस अध्याय अवघा ग्रंथ ॥ त्यांत उरला एक गोड बहुत ॥ जैसा मुकुटावरी मणि झळकत ॥ तैसा अध्याय पुढील असे ॥ ९३ ॥ ब्रह्मानंदा स्वामी समर्था ॥ श्रीधरवरदा पंढरीनाथा ॥ हा ग्रंथ वाची त्या भक्ता ॥ तूंच रक्षीं निजांगें ॥ ९४ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ एकोनचत्वारिंशमोध्याय गोड हा ॥ १९५ ॥ अ० ॥ ३९ ॥

---

६२ शिबिका. ६३ गंगा. ६४ पृथ्वी, आप, तेज, वायु व आकाश. ६५ सूर्य. ६६ अष्टदिशा. ६७ चवऱ्या. ६८ मत्स्याकार बावटे. ६९ यज्ञकंकण पुनः बांधून.

४०
गोलिवडेकर

॥ श्रीगणेशाय नमः ॥ श्रीसीतारामचंद्राभ्यां नमः ॥ जय जय निगमागमतनू[1] अखिला[2] ॥ वृंदारकैवंद्या[3] अजित अमला ॥ असुरसंहारणा परम मंगला ॥ अचळ अढळ अविनाशा ॥ १ ॥ मन्मथवारणविदारक मृगेंद्रा ॥ क्रोधजलदविदारक समीरा ॥ मदतमनाशक भास्करा ॥ परात्परा परमानंदा ॥ २ ॥ मत्सरतृणदाहका वैश्वानरा ॥ मायाचक्रचाळका विश्वंभरा ॥ दंभनगच्छेदका वज्रधरा ॥ भूमिजावरा भय-नाशना ॥ ३ ॥ अहंद्विपंचमुखदर्पहरणा ॥ मोहघटश्रोत्रसंहरणा ॥ शोकशक्रजितगर्वविदारणा ॥ ऊर्मिलारमणाग्रजा[4] श्रीरामा ॥ ४ ॥ तव कृपेच्या बळें समस्त ॥ संपत आला रामविजय ग्रंथ ॥ शेवटींचा अध्याय रसभरित ॥ वदवीं कैसा असे तो ॥ ५ ॥ गतकथा-ध्यायीं निरूपण ॥ संपलें लहूकुशाख्यान ॥ जानकी आणूनियां यज्ञ ॥ अश्वमेघ संपविला ॥ ६ ॥ याउपरी एके दिनीं ॥ सिंहासनीं बैसला कोदंडपाणी ॥ बंधुवर्ग कर जोडूनी ॥ स्वस्थानीं उभे राहिले ॥ ७ ॥ तों कृतांतभगिनीतीरवासी[5] ॥ द्विज प्रजा पातल्या वेगेंसीं ॥ जैसे सुर क्षीरसागरासी ॥ जाती गाऱ्हाणें सांगावया[6] ॥ ८ ॥ तंव भक्तजनसभाभूषित ॥ मुक्तमंडपीं बैसला रघुनाथ ॥ जो कोटी कंदर्पांचा तात ॥ दीनबंधु गुणसिंधु ॥ ९ ॥ दूत जाणविती रघुराया ॥ प्रजाजन आले भेटावया ॥ येऊं द्या म्हणे लवलाह्या ॥ कोणीं पीडिल्या माझ्या प्रजा ॥ १० ॥ तों मुक्तामंडपासमोर ॥ पातले तेव्हां प्रजांचे भार ॥ करूनियां जयजयकार ॥ नमस्कार सर्व घालिती ॥ ११ ॥ उभे ठाकले समोर ॥ भ्रूसंकेतें विचारी जगदुद्धार ॥ म्हणती यमुनातीरीं क्रूर ॥ महान लवणासुर माजला ॥ १२ ॥ महापातकी अत्यंत क्रूर ॥ मुरदैत्याचा कुमर ॥ भानुजेचें[7] पैलतीर ॥ तेथें असुर वसे सदा ॥ १३ ॥ प्रजा गाई आणि ब्राह्मण ॥ चांडाळ भक्षितो नित्य मारून ॥ रघुराया तयासी वधून ॥ समस्त जन सुखी करीं ॥ १४ ॥ ऐसें ऐकतां कोदंडपाणी ॥ कोदंड आणवी तये क्षणीं ॥ आरक्तता उदेली नयनीं ॥ क्रोध मनीं न सांवरे ॥ १५ ॥ तों शत्रुघ्न पुढें येऊनी ॥ मस्तक ठेवीत श्रीरामचरणीं ॥ म्हणे मज आज्ञा दीजे ये क्षणीं ॥ लवणासुर वधावया ॥ १६ ॥ घेऊनियां चतुरंग दळ ॥ वेगें जाईं म्हणे तमालनीळ ॥ लवणासुर वधोनि तत्काळ ॥ प्रजा सुखें राखिजे ॥ १७ ॥ मंत्रशक्ति दिव्य बाण ॥ बंधूस देत रघुनंदन ॥ सीताधवाचे चरण वंदोन ॥ वीर शत्रुघ्न चालिला ॥ १८ ॥ संग्रामसंकेतभेरी ॥ सेवकीं ठोकिल्या ते अवसरीं ॥ तीन अक्षौहिणी दळ बाहेरी ॥ परम वेगें निघालें ॥ १९ ॥ नौका आणोनियां अपार ॥ भानुकन्येचें लंघिलें तीर ॥ तों चहूंकडून अपार ॥ ऋषीश्वर पातले ॥ २० ॥ ऋषी म्हणती हा दैत्य दारुण ॥ पूर्वीं मांधातराजयासी मरण ॥ हस्तें याच्या आलें जाण ॥ बळेंकरून नाटोपे ॥ २१ ॥ शत्रुघ्न बोले तेव्हां वचन ॥ यार्चे सांगा कैसें मरण ॥ ऋषी म्हणती उमारमण ॥ येणें पूर्वीं आराधिला ॥ २२ ॥ शंकरें स्वहातींचा दिधला शूळ ॥ तेणें बळें संहारी विश्व सकळ ॥ तरी तो शूळ घेतां तत्काळ ॥ मरण त्यास तेणेंचि पैं ॥ २३ ॥ तो शूळ ठेवूनियां मंदिरीं ॥ आहारालागीं हिंडे दिवस रात्रीं ॥

---

१ वेद आणि धर्मशास्त्रादिकांची मूर्ति. २ संपूर्ण, सर्व. ३ देवांनीं वंद्य. ४ लक्ष्मणाच्या ज्येष्ठबंधो. ५ यमुनेच्या कांठीं राहणारे. ६ मदनांचा. ७ यमुनानदीचें. ८ अन्न मिळविण्यासाठीं.

श्वापदें गो ब्राह्मण मारी ॥ शोधूनियां साक्षेपें ॥ २४ ॥ तरी तो काळ साधून ॥ आधीं घ्यावें तयाचें दर्शन ॥ शूळ हातीं चढतांचि पूर्ण ॥ बळ क्षीण नव्हें तयाचें ॥ २५ ॥ त्याचिया भयेंकरून ॥ ओस पडिलें मथुरापट्टण ॥ तें शत्रुघ्नें ओलांडून ॥ काळ साधून चालिला ॥ २६ ॥ लवणासुर नसतां सदनीं ॥ मंदिर तयाचें पाहे उघडोनी ॥ तों शूळ ठेविलासे पूजोनी ॥ उचली ते क्षणीं दाशरथी ॥ २७ ॥ शूळ घेऊनि कैकयीनंदन ॥ दळभारेंसीं सिद्ध पूर्ण ॥ उभा ठाकला तों लवण ॥ वनींहून परतला ॥ २८ ॥ गाई ब्राह्मण मारून ॥ प्रेतभार मस्तकीं घेऊन ॥ तों वेष्टिलें देखे सदन ॥ मानववीरदळेंसीं ॥ २९ ॥ नयनीं देखोनि मानवभार ॥ परम आनंदला लवणासुर ॥ म्हणे ईश्वरें मज आहार ॥ सदनाप्रती पाठविला ॥ ३० ॥ कृतांतवत हांक फोडूनी ॥ लवणें शत्रुघ्नासी देखोनी ॥ परम क्रोधें आला धांवूनी ॥ तों शूळ हिरोनि नेलासे ॥ ३१ ॥ मग क्रोधावला दारुण ॥ म्हणे तूं मनुष्याचा नंदन ॥ तुज मारून अयोध्या-पट्टण ॥ क्षणमात्रें घेईन आतां ॥ ३२ ॥ माझा मातुळ[१०] रावण ॥ रामें मारिला कपटेंकरून ॥ परी त्या राघवासी वधून ॥ सीता आणीन बळेंचि ॥ ३३ ॥ तुम्हां चौघांस मारून ॥ मातुळाचा सूड घेईन ॥ आजि प्रथम अवदान[११] ॥ तुझें घेईन शत्रुघ्ना ॥ ३४ ॥ लवणासी म्हणे शत्रुघ्न ॥ मशका तुज येथेंच वधीन ॥ जैसा मारावया मत्कुण[१२] ॥ उशीर कांहीं न लागेचि ॥ ३५ ॥ वृक्ष उपडोनि सत्वर ॥ वेगें धांवला लवणासुर ॥ तों शत्रुघ्नें सोडिला शर ॥ चापावरी लावूनियां ॥ ३६ ॥ तेणें तो वृक्ष छेदिला ॥ असुरें पर्वत भिरकाविला ॥ तोही कैकयीनंदनें फोडिला ॥ क्षणमात्र न लागतां ॥ ३७ ॥ कोट्यनुकोटी बाण ॥ शत्रुघ्नें मोकलिले[१३] दारुण ॥ परी तो न मानीच लवण ॥ बाण तृणवत तयासी ॥ ३८ ॥ जैसा कां वर्षे घन ॥ तैसे टाकी वृक्ष पाषाण ॥ ते बाणें वरी फोडोन ॥ वीर शत्रुघ्न टाकीतसे ॥ ३९ ॥ मग शत्रुघ्नें तये वेळां ॥ बाण विचारून काढिला ॥ जो कमळोद्भवें[१४] निर्मिला ॥ मधुकैटभवधालागीं ॥ ४० ॥ विधीनें तो बाण तत्त्वतां ॥ रघुपतीसी दिधला होता ॥ तो लवणवधासी निघतां ॥ रामें दिधला शत्रुघ्ना ॥ ४१ ॥ तो बाण शत्रुघ्नें योजिला ॥ जैसी प्रकटली प्रळयचंपळा[१५] ॥ तैसा चापापासोनि सुटला ॥ वेगें आला लवणावरी ॥ ४२ ॥ तेणें डळमळलें भूमंडळ ॥ देवांसी विमानीं सुटला पळ ॥ वज्रें चूर्ण होय अचळ[१६] ॥ तैसा हृदयीं भेदला ॥ ४३ ॥ मेरूवरूनि पडे ऐरावत[१७] ॥ तैसा जाहला असुर-देहपात ॥ प्राण निघोनि गेला त्वरित ॥ पडलें प्रेत धरणीवरी ॥ ४४ ॥ विजयी जाहला शत्रुघ्न ॥ सुमनें वर्षती सुरगण ॥ तत्काळ मथुरापट्टण ॥ प्रजा नेऊन भरियेलें ॥ ४५ ॥ जैसें अयोध्यापुर सुंदर ॥ तैसेंच मथुरा जाण नगर ॥ देश भरला समग्र ॥ दुःख दरिद्र पळालें ॥ ४६ ॥ जय पावला शत्रुघ्न ॥ कळलें रघुपतीस वर्तमान ॥ छत्रचामरादि संपूर्ण ॥ राजचिन्हें पाठविलीं ॥ ४७ ॥ शत्रुघ्नावरी धरून छत्र ॥ केला मथुरेचा नृपवर ॥ समुद्रपर्यंत समग्र ॥ देश तयासी दीधला ॥ ४८ ॥ तों अयोध्येमाजी ते वेळे ॥ एक नवल

९ शत्रुघ्न. १० मामा. ११ आहुती. १२ डेंकूण. १३ सोडिले. १४ ब्रह्मदेवानें. १५ प्रळयकाळची वीज. १६ पर्वत. १७ इंद्राचा हत्ती, गजेंद्रांत मुख्य.

परम वर्तलें ॥ एकादश सहस्र वर्षें केलें ॥ अयोध्येचें राज्य श्रीरामें ॥ ४९ ॥ रामराज्यामाजी मृत्य ॥ अकाळीं नसेच सत्य ॥ तंव तेथें एक ब्राह्मणसुत ॥ मरण अकस्मात पावला ॥ ५० ॥ झालें त्याचें व्रतबंधन ॥ तों सर्वेंच पावला मरण ॥ तंव पित्यानें उचलोन ॥ राजद्वारा आणिला ॥ ५१ ॥ राघवास म्हणे ब्राह्मण ॥ त्वां काय केलें दोषाचरण ॥ अकाळीं बाळ पावला मरण ॥ करीं प्रयत्न लवकरी ॥ ५२ ॥ परम चिंताक्रांत रघुनाथ ॥ तंव पातला कमलोद्भवसुत[20] ॥ सीताकांतें वृत्तांत ॥ नारदासी सांगीतला ॥ ५३ ॥ नारद म्हणे जानकीपती ॥ कोणी तप करितो शूद्रयाती ॥ त्या पापेंकरूनि निश्चितीं ॥ ऋषिकुमर निमाला ॥ ५४ ॥ तप करणें हा ब्राह्मणांचा धर्म ॥ इतरांसी तो सहजचि अधर्म ॥ शूद्र तप आचरतां परम ॥ अकाळीं मरण होय पैं ॥ ५५ ॥ ऐसें बोलतां ब्रह्मनंदन ॥ राम चिंती पुष्पकविमान ॥ तें तत्काळ आलें धांवोन ॥ राघवें बैसविलें[21] म्हणोनियां ॥ ५६ ॥ प्रधान सेनेसहित तत्काळ ॥ वरी आरूढे तमालनील[22] ॥ शोधूं लागला पृथ्वीमंडळ ॥ गुहा अचळ[23] कठिण स्थानें ॥ ५७ ॥ जो जो तपस्वी दृष्टीं दिसे ॥ तयास कोण जाती राघव पुसे ॥ तंव ते बोलती त्याचिसरसे ॥ श्रेष्ठवर्ण ब्राह्मण ॥ ५८ ॥ तयांसी राघव नमून ॥ करी मग तयांचें पूजन ॥ याचपरी उर्वी[24] संपूर्ण ॥ रघुनंदन शोधीतसे ॥ ५९ ॥ दक्षिणपंथें शोधी श्रीराम ॥ तों द्रुम लागले निबिड परम ॥ गिरिकंदरीं एक अधम ॥ किरात[25] तप करीतसे ॥ ६० ॥ तेणें आरंभिलें धूम्रपान[26] ॥ तयास पुसे जनकजारमण ॥ कोण वेद कोण वर्ण ॥ तप किमर्थ आरंभिलें ॥ ६१ ॥ तंव तो म्हणे मी किरात ॥ स्वर्गानिमित्त तप करितों येथ ॥ ऐकतां कोपला जानकीनाथ ॥ म्हणे हा आचरत परम अधर्म ॥ ६२ ॥ बाण तीक्ष्ण परम चपळ ॥ छेदिलें तयाचें कंठनाळ ॥ तो उद्धरूनि तत्काळ ॥ स्वर्गलोक पावला ॥ ६३ ॥ तों विमानीं बैसोन अमरनाथ[27] ॥ रघुनाथासी येऊनि भेटत ॥ म्हणे बरा वधिला किरात ॥ पुरले मनोरथ देवांचे ॥ ६४ ॥ सीतावल्लभा रघुनंदना ॥ पुराणपुरुषा गुणसंपन्ना ॥ मज कांहीं सांगावी आज्ञा ॥ ते मी सिद्धी पाववीन ॥ ६५ ॥ रघुनाथ म्हणे ऋषिनंदन ॥ अयोध्येंत पावला मरण ॥ तयासी द्यावें जीवदान ॥ सहस्रनयन[28] अवश्य म्हणे ॥ ६६ ॥ इंद्रआज्ञेंकरून ॥ परतला ऋषिपुत्राचा प्राण ॥ जैसा ग्रामासी जातां पंथींहूनि[29] ॥ येत परतोन माघारा ॥ ६७ ॥ बहुतांचे सुत त्यावेगळे ॥ पूर्वी होते जे निर्मीले[30] ॥ तेही इंद्रें आणोनि दिधले ॥ तद्रूप तैसेच पूर्ववत ॥ ६८ ॥ उसणी जेवीं वस्तु नेत ॥ ती परतोनि तैसीच देत ॥ तैसे तयांचे त्यांसी सुत ॥ अमरेश्वरें दीधले ॥ ६९ ॥ असो इकडे अयोध्यापती ॥ अगस्तीच्या काननाप्रती ॥ जाता जाहला सहजगती ॥ वनें उपवनें विलोकीत ॥ ७० ॥ तों पुढें दोन पक्षी येऊन ॥ राघवासी घालिती लोटांगण ॥ म्हणती आमुचा वाद निवडोन ॥ पुढें जावें राघवेंद्रा ॥ ७१ ॥ तें रघूत्तमें ऐकोन ॥ स्थिर केलें तेव्हां विमान ॥ तों उलूक गृध्र[31] दोघेजण ॥ बोलते जाहले तेधवां ॥ ७२ ॥ दिवाभीतें[32] बोले वचन ॥ गृह माझें पूर्वीहून ॥ हा गृध्र

१८ लहानपणीं. १९ नारद. २० स्मरणपूर्वक बोलाविलें. २१ तमाल वृक्षासारखा नीलवर्ण राम. २२ पर्वत. २३ पृथ्वी. २४ भिल्ल. २५ धूर पिऊन तप करणें. २६ इंद्र. २७ मार्गानें. २८ मेलेले. २९ घुबड. ३० गिधाड.

मज दवडून ॥ बळेंच येथें नांदतो ॥ ७३ ॥ मग गृध्र वचन बोलत ॥ उगेंच पीडितो दिवा[३१]भीत ॥ गृह माझें यथार्थ ॥ बहुकाळ येथेंचि ॥ ७४ ॥ प्रधानास म्हणे सीतावर ॥ यांचा वाद निवडावा सत्वर ॥ सत्य निवडोन मंदिर ॥ ज्याचें त्यास देइंजे ॥ ७५ ॥ तों गृध्र बोले पापमती ॥ जंव येथें पृथ्वी नव्हती ॥ तों या वृक्षावरी निश्चितीं ॥ गृह माझें म्यां रचियेलें ॥ ७६ ॥ दिवा[३१]भीत बोले वचन ॥ ईश्वरें पृथ्वी केली निर्माण ॥ मग वृक्ष वाढला पूर्ण ॥ म्यां सदन निर्मिलें तें ॥ ७७ ॥ प्रधान म्हणे गृध्र सत्य ॥ बहुत काळाच्या गोष्टी सांगत ॥ ऐकोनि हांसिन्नला रघुनाथ ॥ म्हणे केवीं हा अर्थ निवडिला ॥ ७८ ॥ पृथ्वी वृक्षास आधार ॥ नीडा[३२]सी आश्रय तरुवर ॥ दुरात्मा गृध्र साचार ॥ उलू[३३]कालागीं पीडीतसे ॥ ७९ ॥ निवडूनी यथार्थ व्यवहार ॥ राम उलूकासी देत मंदिर ॥ म्हणे हा गृध्र चांडाळ थोर ॥ यासी वधीन मी आतां ॥ ८० ॥ बाण काढिला तये क्षणीं ॥ तंव गर्जिली आकाशवाणी ॥ म्हणे हे राम कोदंडपाणी ॥ यासी न मारीं सर्वथा ॥ ८१ ॥ हा पूर्वी भूपति ब्रह्मदत्त ॥ गौतमऋषीचा अं[३३]कित ॥ याचे सदना अकस्मात ॥ भोजना आला गौतम ऋषि ॥ ८२ ॥ तयासी येणें मांस वाढिलें ॥ देखतां गुरूचें मन क्षोभलें ॥ तत्काळ यासी शापिलें ॥ गृध्र होईं म्हणोनियां ॥ ८३ ॥ मग लागला गुरुचरणीं ॥ उच्छाप बोले गौतम मुनी ॥ रामदर्शन होतां ते क्षणीं ॥ जासी उद्धरून स्वर्गातें ॥ ८४ ॥ ऐसें देववाणी बोलत ॥ तों विमान पातलें अकस्मात ॥ दिव्य देह पावला ब्रह्म[३४]दत्त ॥ भावें नमीत रामचंद्रा ॥ ८५ ॥ स्तवोनियां कोदंडपाणी ॥ तत्काळ बैसला विमानीं ॥ रघुवीरप्रतापेंकरूनी ॥ स्वर्गी सुखी राहिला ॥ ८६ ॥ असो कैल[३५]शोद्भवाचे आश्रमासी ॥ येता जाहला अयोध्यावासी ॥ साष्टांग नमून ऋषीसी ॥ राघव उभा राहिला ॥ ८७ ॥ बहुत करून आदर ॥ आश्रमीं पूजिला रघुवीर ॥ हस्तकं[३६]कण एक सुंदर ॥ ऋषीनें दिधलें राघवा ॥ ८८ ॥ पृथ्वीचें मोल संपूर्ण ॥ ऐसें एक एक जडलें रत्न ॥ तें सीतावल्लभें देखोन ॥ घटोद्भवा[३७]प्रती पुसतसे ॥ ८९ ॥ म्हणे यासी निर्मिता चतुरानन ॥ स्वर्गींची वस्तु प्रभाधन ॥ मनुष्यांसी दुर्लभ पूर्ण ॥ तुम्हांस कैसी लाभ[३८]ली ॥ ९० ॥ मग अगस्ति ते कथा सांगत ॥ पैल ते सरोवरीं पाहें प्रेत ॥ हा वैदर्भदेशींचा नृपनाथ ॥ पुण्यवंत तपोराशि ॥ ९१ ॥ दानें केलीं अं[३९]परिमित ॥ रामा तप आचरला बहुत ॥ परी अन्नदान किंचित ॥ घडलें नाहीं यापासूनि ॥ ९२ ॥ स्वर्गास गेला तो नृपनाथ ॥ परी क्षुधेनें पीडिला अत्यंत ॥ मग तयासी म्हणे पद्म[४०]जात ॥ नाहीं भक्षार्थ तुज येथें ॥ ९३ ॥ नाहीं केलें अन्नदान ॥ येथें न पाविजे दीधल्याविण ॥ तरी तूं भूतळाप्रती जाऊन ॥ आपुलें प्रेत भक्षीं कां ॥ ९४ ॥ तूं भक्षितां नित्यकाळ ॥ मांस वाढेल बहुसाल ॥ मग तो विमानीं बैसोन भूपाळ ॥ नित्यकाळ येत तेथें ॥ ९५ ॥ तो तें आपुलें प्रेत भक्षून ॥ स्वर्गासी जाय परतोन ॥ अन्नोदकाएवढें दान ॥ दुजें नाहीं राघवा ॥ ९६ ॥ भाग्य तें वैराग्य निश्चित ॥ दैवत एक सद्गुरुनाथ ॥ शांतिसुखाहून

३१ घुबड. ३२ घरट्याला. ३३ आईत वागणारा. ३४ गृध्र झालेला. ३५ अगस्तीचे. ३६ कडें. ३७ मिळाली. ३८ असंख्य. ३९ ब्रह्मदेव.

अद्भुत ॥ दुजें सुख नसेचि ॥ ९७ ॥ तिर्थींमाजी द्वादशी श्रेष्ठ ॥ कीं मंत्रांत गायत्री वरिष्ठ ॥ कीं तीर्थांमाजी सुंभट ॥ प्रयागराज थोर जैसा ॥ ९८ ॥ तैसें दानांमाजी अन्नदान ॥ राघवा अत्यंत श्रेष्ठ पूर्ण ॥ असो त्या रायासी कमलासन ॥ बोलता जाहला ते काळीं ॥ ९९ ॥ म्हणे अगस्तीचें होतां दर्शन ॥ तुझें कर्म खंडेल गहन ॥ तंव एके दिवशीं येऊन ॥ प्रेत भक्षी नृपवर ॥ १०० ॥ तें म्यां अकस्मात देखिलें ॥ कृपेनें हृदय माझें द्रवलें ॥ मग म्यां तया वरदान दीधलें ॥ कर्म खंडलें तयाचें ॥ १ ॥ मग तो वैदर्भराजा तेथून ॥ करी स्वर्गीं अमृतपान ॥ तेणें गुरुपूजेसी संपूर्ण ॥ मज हें कंकण समर्पिलें ॥ २ ॥ देवांचे अंश रत्नावरी ॥ चिंतित मनोरथ सिद्ध करी ॥ ऐसें ऐकोनि अयोध्याविहारी ॥ घाली करीं कंकण तें ॥ ३ ॥ राघव म्हणे महाऋषी ॥ दंडकारण्य म्हणती यासी ॥ याची पूर्वकथा आहे कैसी ॥ ते मजपासीं सांगिजे ॥ ४ ॥ अगस्ति म्हणे मित्रेकुळीं देख ॥ मनूचा पुत्र इक्ष्वाक ॥ तयाचा पुत्र दंडक ॥ तो निघाला मृगयेसी ॥ ५ ॥ तों काननीं ऋषिआश्रम बहुत ॥ दंडक जाय पहात ॥ तंव भृगूचा आश्रम देखत ॥ शोभिवंत अत्यंत जो ॥ ६ ॥ तेथें राव बैसला क्षणभरी ॥ तंव भृगुऋषि नव्हता मंदिरीं ॥ घरीं तयाची होती कुमारी ॥ अरजा नाम तियेचें ॥ ७ ॥ देखोनियां एकांत ॥ कामातुर होत तो नृपनाथ ॥ परी ते बाळ असे अत्यंत ॥ दशवर्षांची कुमारिका ॥ ८ ॥ दंडकें धरूनियां बळें ॥ ऋषिकन्येप्रती भोगिलें ॥ शरीर तियेचें अचेतन पडलें ॥ दंडक गेला तेथूनि ॥ ९ ॥ भृगु आश्रमासी आला त्वरित ॥ देखे कन्या पडली मूर्च्छित ॥ ऋषी वार्ता सांगती समस्त ॥ दंडकें अनर्थ केला हा ॥ ११० ॥ ऋषि क्षोभला जैसा कृतांत ॥ दंडकासी तेव्हां शापीत ॥ म्हणे सेना प्रजा देश समस्त ॥ वनें पट्टणें सर्वही ॥ ११ ॥ वृक्ष तोयें तृण धान्य ॥ तुझें वंशासहित प्रधान ॥ चांडाळा जाईं रे भस्म होऊन ॥ सप्त दिन न लागतां ॥ १२ ॥ ऐसें बोलतां विप्रोत्तम ॥ सर्वही जाहले तेव्हां भस्म ॥ नाहीं उरलें वृक्षाचें नाम ॥ पक्षी तोय मग कैंचें ॥ १३ ॥ बहुत काळपर्यंत ॥ शून्य देश पडिला समस्त ॥ पुढें नारदें कलह बहुत ॥ पर्वतांमाजी लाविला ॥ १४ ॥ मेरु आणि विंध्याचळ ॥ उंचावले भांडती सबळ ॥ खळबळलें सूर्यमंडळ ॥ सृष्टि सकळ हेंडबडली ॥ १५ ॥ विंध्याद्रि नाटोपे साचार ॥ सूर्याविण पडला अंधकार ॥ मग मिळोनि ऋषि निर्जर ॥ मजप्रति येऊनि प्रार्थिती ॥ १६ ॥ तुजविण विंध्याचळ ॥ नाटोपे कोणासी परम खळ ॥ तूं दक्षिणेस जाई तत्काळ ॥ तीर्थयात्रा करावया ॥ १७ ॥ मग मी वारीणसी टाकूनि त्वरित ॥ दक्षिणेस आलों ऋषींसहित ॥ मज देखतां विंध्याचळ पडत ॥ पृथ्वीवरी आडवा ॥ १८ ॥ तयासी मी बोलिलों वचन ॥ जों मी माघारा येईं परतोन ॥ तोंवरी न उठावें येथून ॥ उठल्या शापीन क्षणार्धें ॥ १९ ॥ शापघाकें पर्वत ॥ अद्यापि न उठेचि यथार्थ ॥ मग उगवला आदित्य ॥ लोक समस्त सुखी जाहले ॥ १२० ॥ तें हें दंडकारण्य ओस ॥ ऋषींसह म्यां केला वास ॥

४० चांगलें. ४१ ब्रह्मदेव. ४२ तुटलें. ४३ सूर्यवंशामध्यें. ४४ ( विवाह न झालेली ) मुलगी. ४५ निर्जीव. ४६ यम. ४७ पाणी. ४८ गडबडली. ४९ देव. ५० काशीक्षेत्र.

इंद्रासी सांगून बहुवस ॥ मेघवृष्टि करविली ॥ २१ ॥ आणि धनधान्य बीजें बहुत ॥ तींही वर्षला अमरनाथ ॥ मग हा देश वसला अद्भुत ॥ दोष दुष्काळ निमाला ॥ २२ ॥ तैंपासूनि दंडकारण्य ॥ राघवा म्हणती यालागून ॥ असो यावरी आज्ञा घेऊन ॥ रघुनंदन निघाला ॥ २३ ॥ पुष्पकारूढ रघुवीर ॥ अयोध्येसी पातला सत्वर ॥ तों ऋषीश्वर घेऊन कुमर ॥ रामदर्शना पातले ॥ २४ ॥ म्हणती धन्य धन्य रघूत्तमा केलें ॥ मृतपुत्रां माघारें आणिलें ॥ यशाचे पर्वत उंचावले ॥ मेरूहून आगळे बहुत ॥ २५ ॥ मुक्तमंडपीं रघुनाथ ॥ शोभला तेव्हां जानकीसहित ॥ भोंवते बंधु तिष्ठत ॥ पुढें हनुमंत उभा सदा ॥ २६ ॥ श्रीरामविजय ग्रंथ पावन ॥ उत्तरकांड सुरस गहन ॥ पुढें निजधामा गेला रघुनंदन ॥ हें अनुसंधान न वर्णावें ॥ २७ ॥ तों माध्यान्हीं प्रगटोनि रघुनाथ ॥ म्हणे येथोनि करीं ग्रंथ समाप्त ॥ अवतार संपला हें चरित्र ॥ रामविजयीं न सांगावें ॥ २८ ॥ मी जन्ममरणविरहित ॥ अभंग अक्षय शाश्वत ॥ तोच मी ब्रह्मानंद पंढरीनाथ ॥ भीमातीरीं उभा असें ॥ २९ ॥ टाकूनियां चाप शर ॥ दोन्ही जंघनीं ठेवूनि कर ॥ समपाद समनेत्र ॥ उभा साचार मी येथें ॥ १३० ॥ ऐसी आज्ञा होतां सत्वर ॥ श्रीधरें घातला नमस्कार ॥ करूनियां जयजयकार ॥ रामविजय ग्रंथ संपविला ॥ ३१ ॥ चाळीस अध्याय ग्रंथ तत्त्वतां ॥ तुजप्रती पावो पंढरीनाथा ॥ ब्रह्मानंदा विश्वभरिता ॥ जगदात्मया जगद्गुरो ॥ ३२ ॥ वाल्मीककृत मूळ ग्रंथ ॥ हनुमंतकाव्य गोड बहुत ॥ आणिकही ग्रंथीं सत्यवतीसुत ॥ रामकथा बोलिला ॥ ३३ ॥ तेथींचीं संमतें[५७] घेऊनी ॥ पंढरीनाथें कृपा करूनी ॥ सांगीतलें कर्णीं येऊनी ॥ तेंच लिहिलें साक्षेपें ॥ ३४ ॥ रामविजय वरदें ग्रंथ ॥ कर्ता याचा पंढरीनाथ ॥ श्रीधर नाम हें निमित्त ॥ पुढें केलें उगेंचि ॥ ३५ ॥ या ग्रंथासी वरदान ॥ पंढरीनाथें दीधलें आपण ॥ वाचिती पढती जे अनुदिन ॥ होय ज्ञान अद्भुत तयां ॥ ३६ ॥ ओढवतां संकट महाविघ्न ॥ एक करितां तरी आवर्तन ॥ तत्काळ संकट जाय निरसोन ॥ वार्तेकरून अभ्र जैसें ॥ ३७ ॥ पांच आवर्तनें करितां पूर्ण ॥ जाती महाव्याधी निरसोन ॥ संतति संपत्ति संपूर्ण ॥ पावेल सत्य निर्धारीं ॥ ३८ ॥ होऊनियां शुचिर्भूत ॥ दहा आवर्तनें करितां सत्य ॥ पोटीं होईल दिव्य सुत ॥ रघुनाथभक्त प्रतापी ॥ ३९ ॥ जरी नव्हे श्रवण पठण ॥ नित्य करितां ग्रंथपूजन ॥ तरी ते घरींचें संकट पूर्ण ॥ हनुमंत येऊनि निवारील ॥ १४० ॥ अद्यापि चिरंजीव हनुमंत ॥ जे रघुनाथकथा वाचिती भक्त ॥ त्यांस अंतर्बाह्य रक्षीत ॥ उभा तिष्ठत त्यांजवळी ॥ ४१ ॥ करितां रामकथा श्रवण ॥ सप्रेम सदा वायुनंदन ॥ ग्रंथ वाची त्यापुढें येऊन ॥ कर जोडोनि उभा राहे ॥ ४२ ॥ शुचिर्भूत होऊनी ॥ रामविजय उसां घेऊनी ॥ निद्रा करितां स्वप्नीं ॥ मारुति दर्शन देतसे पैं ॥ ४३ ॥ ऐसा या ग्रंथाचा चमत्कार ॥ जाणती रामउपासक नर ॥ आधि व्याधी दुःख दरिद्र ॥ जाय सर्वत्र ग्रंथसंग्रहें ॥ ४४ ॥ बाळकांड आठ अध्यायवरी ॥ अयोध्याकांड अध्याय चारी ॥

५१ इंद्र. ५२ मोत्यांच्या मंडपांत. ५३ आख्यान. ५४ नाशवंत नव्हे तो. ५५ कटोवर. ५६ व्यास. ५७ संमति, प्रमाणें. ५८ इच्छित देणारा. ५९ प्रत्यहीं. ६० पवित्र.

चार अध्याय निर्धारीं ॥ अरण्यकांड प्रचंड ॥ ४५ ॥ दोन अध्याय किष्किंधाकांड ॥ तेथोनि पांच अध्याय रस वितंडे[६१] ॥ तें सुंदरकांड प्रचंड ॥ लीलाचरित्र मारुतीचें ॥ ४६ ॥ दहा अध्याय संपूर्ण ॥ युद्धकांड रसाळ गहन ॥ सात अध्याय परम पावन ॥ उत्तरकांड जाणावें ॥ ४७ ॥ ऐसे अवघे अध्याय चाळीस ॥ मिळून रामविजय जाहला सुरस ॥ श्रवण करितां आसमास[६२] ॥ ब्रह्मानंद उचंबळे[६३] ॥ ४८ ॥ प्रथमाध्यायीं मंगलाचरण ॥ गणेशसरस्वतीगुरुस्तवन ॥ वाल्मीकाची उत्पत्ति सांगोन ॥ प्रथमाध्याय संपविला ॥ ४९ ॥ बंधू-समवेत निश्चितीं ॥ सांगीतली रावणाची उत्पत्ती ॥ दशरथलग्नाची गती ॥ द्वितीयाध्यायीं निरूपिली ॥ १५० ॥ श्रावणवध शृंगीचें आगमन ॥ याग दशरथें केला पूर्ण ॥ त्यावरी हनुमंतजन्मकथन ॥ तृतीयाध्यायीं हेचि कथा ॥ ५१ ॥ कौसल्या सुमित्रा कैकयीप्रती ॥ डोहळे पुसों गेला नृपती ॥ श्रीरामध्यान जन्मस्थिती ॥ चतुर्थाध्यायीं हेचि कथा ॥ ५२ ॥ श्रीरामाचें मौंजीबंधन ॥ ब्रह्मचर्य[६४] तीर्थाटण ॥ विश्वामित्र मागे रघुनंदन ॥ हें निरूपण पंचमाध्यायीं ॥ ५३ ॥ योगवासिष्ठकथन ॥ मायेनें गांधिज[६५] केला दीन ॥ वेदांतभागनिरूपण ॥ सहावा संपूर्ण जाणावा ॥ ५४ ॥ ताटिका मर्दूनि याग रक्षिला ॥ अहल्योद्धार पुढें केला ॥ सीतेचा जन्म सांगितला ॥ सातव्या-माजी संपूर्ण ॥ ५५ ॥ आठव्यामाजी सीतास्वयंवर ॥ अपमानिला दशकंधर ॥ लग्न लागलें जिंकिला फरशधर[६६] ॥ आला रघुवीर अयोध्येसी ॥ ५६ ॥ राज्यीं बैसतां रघुनाथ ॥ कैकयीनें केला अनर्थ ॥ त्याकरितां दुःखी दशरथ ॥ नवमाध्यायीं हे कथा ॥ ५७ ॥ श्रीराम वनासी निघाला ॥ कौसल्येनें शोक केला ॥ जाह्नवीतीरा श्रीराम आला ॥ दशमाध्यायीं हेचि कथा ॥ ५८ ॥ मग दशरथें त्यागिला प्राण ॥ भरत आला मातुलगृहाहून ॥ भक्तिरस दिव्य निरूपण ॥ गोड बहुत अकरावा ॥ ५९ ॥ चित्रकूटीं भेटला रघु-नंदन ॥ भरतें बहुत केलें स्तवन ॥ नंदिग्रामीं भरत स्थापन ॥ हें निरूपण बाराव्यांत ॥ १६० ॥ बहुत ऋषींचें दर्शन ॥ घेता जाहला रघुनंदन ॥ अगस्तीचा महिमा पूर्ण ॥ तेराव्यांत कथियेला ॥ ६१ ॥ शूर्पणखा विटंबून ॥ वधिले त्रिशिरा खर दूषण ॥ दशमुखासी वर्तमान ॥ हेचि कथा चवदाव्यांत ॥ ६२ ॥ मृग वधूं गेला रघुनंदन ॥ सीता घेऊनि गेला रावण ॥ जटायु वधिला कपटेंकरून ॥ पंधराव्यांत हेचि कथा ॥ ६३ ॥ सीताविरहें राम व्यापिला ॥ त्यावरी जटायु उद्धरिला ॥ पंपासरोवरीं आला ॥ सोळाव्यांत हेचि कथा ॥ ६४ ॥ वाळिसुग्रीवांची उत्पत्ती ॥ मग शक्रसुत[६७] वधी रघुपती ॥ सत्रावे अध्यायीं निश्चितीं ॥ कथा हेचि निश्चयें ॥ ६५ ॥ तारे-प्रती बोध करून ॥ शुद्धीस[६८] गेले वानरगण ॥ समुद्रतीरीं संपातीदर्शन ॥ हें निरूपण अठराव्यांत ॥ ६६ ॥ समुद्र उल्लंघून लंका शोधून ॥ रावणसभा विटंबून ॥ विजयी जाहला वायुनंदन ॥ हें चरित्र एकोणिसाव्यांत ॥ ६७ ॥ हनुमंतास सीतादर्शन ॥ विध्वंसिलें अशोकवन ॥ वधिला अक्षय आणि राक्षस संपूर्ण ॥ हेचि कथा विसाव्यांत ॥ ६८ ॥ इंद्रजिताचें विटंबन ॥ रावणा छळूनि लंका-

६१ अघटित. ६२ केव्हांही, सतत. ६३ पुष्कळ वाढतो. ६४ मुंज झाल्यापासून सोडमुंज होईपर्यंत. ६५ विश्वामित्र. ६६ परशुराम. ६७ वाली. ६८ सीतेच्या शोधार्थ.

दहन ॥ किष्किंधेसी आला अंजनीनंदन ॥ हेचि कथा एकविसाव्यांत ॥ ६९ ॥ ब्रह्मपाशबंधन ॥ मिष घेऊनि वायुनंदन ॥ सागरीं पुच्छ विझवून ॥ सुवेळेसी[७१] पातला ॥ १७० ॥ ब्रह्मपत्र वाचून ॥ समुद्रतीरास आला रघुनंदन ॥ मग बिभीषणें बोधिला रावण ॥ हेचि कथा बाविसाव्यांत ॥ ७१ ॥ मग बिभीषण भेटे श्रीरामास येऊन ॥ सागरदर्शन सेतुबंधन ॥ सुवेळेसी आला सीतारमण ॥ हें निरूपण तेविसाव्यांत ॥ ७२ ॥ कापट्य दाविलें सीतेसी ॥ मंदोदरी भेटली जनककन्येसी ॥ मग सुग्रीवें त्रासिलें रावणासी ॥ कथा हेच चोविसाव्यांत ॥ ७३ ॥ अंगदें बोधिला रावण ॥ आपर युद्ध जाहलें दारुण ॥ नागपाशीं बांधिले रामलक्ष्मण ॥ हे लीला पंचविसाव्यांत ॥ ७४ ॥ प्रहस्तवध मंदोदरीनीती ॥ मग युद्धा आला लंकापती ॥ तो पराभव पावला निश्चितीं ॥ हें चरित्र सव्विसाव्यांत ॥ ७५ ॥ जागा केला कुंभकर्ण ॥ त्यावरी युद्ध जाहलें दारुण ॥ समरीं घटश्रोत्रें दिघला प्राण ॥ हें निरूपण सत्ताविसाव्यांत ॥ ७६ ॥ नरांतकादि सहा जण पाडिले ॥ शक्रजितें शरजाल सोडिलें ॥ मारुती द्रोणाचळ आणी ते वेळे ॥ अष्ठाविसाव्यांत हेचि कथा ॥ ७७ ॥ निकुंभिलेसी जाऊन ॥ वानरीं होम विध्वंसून ॥ शक्रजितासी मारी लक्ष्मण ॥ एकुणतिसाव्यांत हेचि कथा ॥ ७८ ॥ तिसाव्यांत सुलोचनागर्हिवर ॥ एकतिसाव्यांत अहिमहीसंहार ॥ शक्ति भेदोनि निर्धार ॥ बत्तिसावा संपूर्ण पैं ॥ ७९ ॥ रावणाचा होम विध्वंसून ॥ अपार माजविलें तेव्हां रण ॥ रावण वधोनि स्थापिला बिभीषण ॥ हें चरित्र तेतिसाव्यांत ॥ १८० ॥ जानकीनें दिव्यें[७३] देऊन ॥ मग इंद्र वर्षला अमृतपर्जन्य ॥ देव स्वस्थाना गेले स्तवून ॥ हे कथा संपूर्ण चौतिसाव्यांत ॥ ८१ ॥ पुष्पकीं बैसोन रघुनंदन ॥ घेतलें अगस्तीचें दर्शन ॥ त्यावरी भरतभेटी पूर्ण ॥ हें चरित्र पस्तिसाव्यांत ॥ ८२ ॥ नंदिग्रामीं राहिला राघवेश ॥ मग केला अयोध्याप्रवेश ॥ राज्यीं स्थापून रामास ॥ वानर गेले स्वस्थाना ॥ ८३ ॥ छत्तिसावे अध्यायीं जाण ॥ हेचि कथा असे पूर्ण ॥ त्यावरी तीन अध्यायीं कौतुक गहन ॥ लहूकुशाख्यान गोड पैं ॥ ८४ ॥ चाळिसाव्यांत रघुवीरें ॥ मृत्यु पावलीं ऋषींचीं कुमरें ॥ किरात वधोनियां त्वरें ॥ बाळें माघारीं आणिलीं ॥ ८५ ॥ चाळीस अध्यायपर्यंत ॥ रामविजय संपूर्ण ग्रंथ ॥ श्रवणमननें पुरे अर्थ ॥ जाणती पंडित विवेकी ॥ ८६ ॥ रामविजय ग्रंथ नृपती ॥ चाळीस अध्याय वीर निश्चितीं ॥ दोषदळ संहारिती ॥ प्रचंड प्रतापी वीर हे ॥ ८७ ॥ कीं रामविजय ग्रंथ सुंदर ॥ हें चाळीस खणांचें दिव्य मंदिर ॥ सीतेसहित रघुवीर ॥ क्रीडा करीत तेथें पैं ॥ ८८ ॥ कीं हें चाळीस खणांचें वृंदावन ॥ रघुनाथकथा तुळसी पूर्ण ॥ दृष्टांत तीं पत्रें जाण ॥ आवर्तन प्रदक्षिणा भक्त करिती ॥ ८९ ॥ रामविजय ग्रंथमंदिर ॥ चाळीस कोठड्या अति सुंदर ॥ साहित्य द्रव्य अपार ॥ माजी भरलें न गणवे ॥ १९० ॥ कीं ग्रंथ हा वासरमणी[७५] ॥ वेष्टिला असे दृष्टांतकिरणीं ॥ कीं साहित्यतारागणीं ॥ ग्रंथचंद्र वेष्टिला ॥ ९१ ॥ कीं ग्रंथ हाचि रघुवीर ॥ दृष्टांत हे त्याचे वानर ॥ मारूनि

६९ मारुती. ७० ब्रह्मास्त्रानें अभिमंत्रित केलेला पाश. ७१ त्रिकूटावर. ७२ नागाकृति एक बंधनसाधन. ७३ शपथ, अग्नीमध्यें चालणें इत्यादि. ७४ मिस. ७५ सूर्य.

अहंदर्दशकंधर ॥ विजयरूप सर्वदा ॥ ९२ ॥ रामविजय मांदुस आळी ॥ आंत होतीं चाळीस कोहळीं ॥ नवरत्नद्रव्यें पूर्ण भरलीं ॥ मज दीघलीं ब्रह्मानंदें ॥ ९३ ॥ पळालें भवदुःखदरिद्र ॥ भाग्य घरा आलें अपार ॥ कीं ग्रंथ हा पंढरीनगर ॥ दृष्टांत अपार यात्रा तेथें ॥ ९४ ॥ रामविजय रत्नखाणी ॥ वर्णितां धन्य जाहली वाणी ॥ ब्रह्मानंदकृपेंकरूनी ॥ ग्रंथ सिद्धीस पावविला ॥ ९५ ॥ आनंदसांप्रदाय पूर्ण ॥ वाढत आलें मुळींचें ज्ञान ॥ सृष्टीचे आदिकाळीं कमलासन ॥ उपदेशिला नारायणें ॥ ९६ ॥ पंद्मोद्भवें तेंचि ज्ञान ॥ अत्रीस दिधलें संपूर्ण ॥ त्याचे पोटीं आदिपुरुष जाण ॥ दत्तात्रेय अवतरला ॥ ९७ ॥ दत्तात्रेयें ज्ञान शुद्ध ॥ सांगूनि बोधिला सदानंद ॥ तेथूनि रामानंद प्रसिद्ध ॥ यतीश्वर अगाध पैं ॥ ९८ ॥ तेथोनि मंगलानंद ईश्वर ॥ गंभीर ज्ञानानंद दिवाकर ॥ सहजानंद योगेश्वर ॥ कल्याणधामवासी जो ॥ ९९ ॥ तेथूनि पूर्णानंद महायतिराज ॥ जो तपोज्ञानें तेजःपुंज ॥ तेथोनि दत्तानंद यति सहज ॥ पूर्ण दत्तात्रेय अवतार ॥ २०० ॥ त्या दत्तात्रेयाचे उदरीं शुद्ध ॥ पूर्ण अवतरला ब्रह्मानंद ॥ पिता आणि गुरु प्रसिद्ध ॥ तोचि माझा जाणिजे ॥ १ ॥ पंढरीहूनि चारि योजनें दूरी ॥ नैर्ऋत्यकोनीं नाशरें नगरीं ॥ तेथील देशलेखकें निर्धारीं ॥ ब्रह्मानंद पूर्वाश्रमीं ॥ २ ॥ मग पंढरीस येऊन ॥ विधिपूर्वक केलें संन्यासग्रहण ॥ भीमातीरीं समाधिस्थ पूर्ण ॥ ब्रह्मानंद यतिराव ॥ ३ ॥ तो ब्रह्मानंद पूर्ण पिता ॥ सावित्री नामें माझी माता ॥ श्रीधरें वंदोनियां उभयतां ॥ रामविजय ग्रंथ संपविला ॥ ४ ॥ शके सोळाशें पंचवीस ॥ सुभानु नाम संवत्सरास ॥ भानुसप्तमी शुद्ध विशेष ॥ श्रावण मास विख्यात पैं ॥ ५ ॥ पंढरीक्षेत्रीं निश्चयेंसीं ॥ ग्रंथ संपविला ते दिवसीं ॥ लेखक आणि श्रोतयांसी ॥ कल्याण असो सर्वथा ॥ ६ ॥ सुभानु संवत्सर भानुवार ॥ भानुवंशीं जन्मला रघुवीर ॥ भानु आणि रोहिणीवर ॥ तोंवरी ग्रंथ असो हा ॥ ७ ॥ ब्रह्मानंदा पांडुरंगा ॥ श्रीधरवरदा पूर्ण अभंगा ॥ पुराणपुरुषा भक्तभवभंगा ॥ श्रोता वक्ता तूंचि पैं ॥ ८ ॥ स्वस्ति श्रीरामविजयग्रंथ सुंदर ॥ संमत वाल्मीकनाटकाधार ॥ सदा परिसोत भक्त चतुर ॥ चत्वारिंशत्तमोध्याय गोड हा ॥ २०९ ॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥ श्रीदत्तात्रेयार्पणमस्तु ॥ शुभं भवतु ॥ ॥ अ० ॥ ४० ॥ ॥ ओव्या ॥ २०९ ॥ उत्तरकांड समाप्त ॥

॥ श्रीरामचंद्रार्पणमस्तु ॥

७६ अहंकाररूपी रावण. ७७ मोठी पेटी. ७८ रांग ७९ अध्यायरूपी ठेवे. ८० ब्रह्मदेव. ८१ सूर्य. ८२ सोळा कोश. ८३ कुलकर्णी.

# श्रीरामरक्षास्तोत्रम्।

श्रीगणेशाय नमः॥ अस्य श्रीरामरक्षास्तोत्रमन्त्रस्य। बुधकौशिक ऋषिः। श्रीसीतारामचन्द्रो देवता। अनुष्टुप् छंदः। सीता शक्तिः। श्रीमद्धनुमान् कीलकम्। श्रीरामचन्द्रप्रीत्यर्थे जपे विनियोगः॥

॥ अथ ध्यानम्॥

ध्यायेदाजानुबाहुं धृतशरधनुषं बद्धपद्मासनस्थं।
पीतं वासो वसानं नवकमलदलस्पर्धिनेत्रं प्रसन्नम्॥
वामाङ्कारूढसीतामुखकमलमिलल्लोचनं नीरदाभं।
नानालङ्कारदीप्तं दधतमुरुजटामण्डनं रामचन्द्रम्॥

॥ इति ध्यानम्॥

चरितं रघुनाथस्य शतकोटिप्रविस्तरम्।
एकैकमक्षरं पुंसां महापातकनाशनम्॥ १॥
ध्यात्वा नीलोत्पलश्यामं रामं राजीवलोचनम्।
जानकीलक्ष्मणोपेतं जटामुकुटमण्डितम्॥ २॥
सासितूणधनुर्बाणपाणिं नक्तंचरान्तकम्।
स्वलीलया जगत्त्रातुमाविर्भूतमजं विभुम्॥ ३॥
रामरक्षां पठेत्प्राज्ञः पापघ्नीं सर्वकामदाम्।
'शिरो' मे राघवः पातु 'भालं' दशरथात्मजः॥ ४॥
कौसल्येयो 'दृशौ' पातु, विश्वामित्रप्रियः 'श्रुती'
'घ्राणं' पातु मखत्राता, 'मुखं' सौमित्रिवत्सलः॥ ५॥
'जिव्हां' विद्यानिधिः पातु, 'कण्ठं' भरतवन्दितः।
'स्कन्धौ' दिव्यायुधः पातु, 'भुजौ' भग्नेशकार्मुकः॥ ६॥
'करौ' सीतापतिः पातु 'हृदयं' जामदग्न्यजित्।
'मध्यं' पातु खरध्वंसी, 'नाभिं' जाम्बवदाश्रयः॥ ७॥
सुग्रीवेशः 'कटी' पातु, 'सक्थिनी' हनुमत्प्रभुः।
'ऊरू' रघूत्तमः पातु, रक्षःकुलविनाशकृत्॥ ८॥
'जानुनी' सेतुकृत्पातु, 'जङ्घे' दशमुखान्तकः।
'पादौ' विभीषणश्रीदः, पातु रामो 'ऽखिलं वपुः'॥ ९॥
एतां रामबलोपेतां रक्षां यः सुकृती पठेत्।
स चिरायुः सुखी पुत्री विजयी विनयी भवेत्॥ १०॥
पातालभूतलव्योमचारिणश्छद्मचारिणः।
न द्रष्टुमपि शक्तास्ते रक्षितं रामनामभिः॥ ११॥
रामेति रामभद्रेति रामचन्द्रेति वा स्मरन्।
नरो न लिप्यते पापैर्भुक्तिं मुक्तिं च विन्दति॥ १२॥
जगज्जैत्रैकमन्त्रेण रामनाम्नाभिरक्षितम्।
यः कण्ठे धारयेत्तस्य करस्थाः सर्वसिद्धयः॥ १३॥
वज्रपञ्जरनामेदं यो रामकवचं स्मरेत्।
अव्याहताज्ञः सर्वत्र लभते जयमङ्गलम्॥ १४॥
आदिष्टवान्यथा स्वप्ने रामरक्षामिमां हरः।
तथा लिखितवान्प्रातः प्रबुद्धो बुधकौशिकः॥ १५॥
आरामः कल्पवृक्षाणां विरामः सकलापदाम्।
अभिरामस्त्रिलोकानां रामः श्रीमान् स नः प्रभुः॥ १६॥
तरुणौ रूपसंपन्नौ सुकुमारौ महाबलौ।
पुण्डरीकविशालाक्षौ चीरकृष्णाजिनाम्बरौ॥ १७॥
फलमूलाशिनौ दान्तौ तापसौ ब्रह्मचारिणौ।
पुत्रौ दशरथस्यैतौ भ्रातरौ रामलक्ष्मणौ॥ १८॥
शरण्यौ सर्वसत्त्वानां श्रेष्ठौ सर्वधनुष्मताम्।
रक्षःकुलनिहन्तारौ त्रायेतां नो रघूत्तमौ॥ १९॥

आत्तसज्जधनुषाविषुस्पृशावक्षयाशुगनिषङ्गसंगिनौ ।
रक्षणाय मम रामलक्ष्मणावग्रतः पथि सदैव गच्छताम् ॥ २० ॥
सन्नद्धः कवची खड्गी चापबाणधरो युवा ।
गच्छन्मनोरथोऽस्माकं रामः पातु सलक्ष्मणः ॥ २१ ॥
रामो दाशरथिः शूरो लक्ष्मणानुचरो बली ।
काकुत्स्थः पुरुषः पूर्णः कौसल्येयो रघूत्तमः ॥ २२ ॥
वेदान्तवेद्यो यज्ञेशः पुराणपुरुषोत्तमः ।
जानकीवल्लभः श्रीमानप्रमेयपराक्रमः ॥ २३ ॥
इत्येतानि जपन्नित्यं मद्भक्तः श्रद्धयाऽन्वितः ।
अश्वमेधाधिकं पुण्यं संप्राप्नोति न संशयः ॥ २४ ॥
रामं दूर्वादलश्यामं पद्माक्षं पीतवाससम् ।
स्तुवन्ति नामभिर्दिव्यैर्न ते संसारिणो नरः ॥ २५ ॥
रामं लक्ष्मणपूर्वजं रघुवरं सीतापतिं सुंदरम् ।
काकुत्स्थं करुणार्णवं गुणनिधिं विप्रप्रियं धार्मिकम् ॥
राजेन्द्रं सत्यसंधं दशरथतनयं श्यामलं शान्तमूर्तिं ।
वन्दे लोकाभिरामं रघुकुलतिलकं राघवं रावणारिम् ॥ २६ ॥
रामाय रामभद्राय रामचन्द्राय वेधसे ।
रघुनाथाय नाथाय सीतायाः पतये नमः ॥ २७ ॥
श्रीराम राम रघुनन्दन राम राम ।
श्रीराम राम भरताग्रज राम राम ॥
श्रीराम राम रणकर्कश राम राम ।
श्रीराम राम शरणं भव राम राम ॥ २८ ॥
श्रीरामचन्द्रचरणौ मनसा स्मरामि ।
श्रीरामचन्द्रचरणौ वचसा गृणामि ॥
श्रीरामचन्द्रचरणौ शिरसा नमामि ।
श्रीरामचन्द्रचरणौ शरणं प्रपद्ये ॥ २९ ॥
माता रामो मत्पिता रामचन्द्रः स्वामी रामो मत्सखा रामचन्द्रः ।
सर्वस्वं मे रामचन्द्रो दयालुर्नान्यं जाने नैव जाने न जाने ॥ ३० ॥
दक्षिणे लक्ष्मणो यस्य वामे तु जनकात्मजा ।
पुरतो मारुतिर्यस्य तं वन्दे रघुनन्दनम् ॥ ३१ ॥
लोकाभिरामं रणरङ्गधीरं, राजीवनेत्रं रघुवंशनाथम् ।
कारुण्यरूपं करुणाकरं तं, श्रीरामचन्द्रं शरणं प्रपद्ये ॥ ३२ ॥
मनोजवं मारुततुल्यवेगं, जितेन्द्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं, श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ ३३ ॥
कूजन्तं रामरामेति मधुरं मधुराक्षरम् ।
आरुह्य कविताशाखां वन्दे वाल्मीकिकोकिलम् ॥ ३४ ॥
आपदामपहर्तारं दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ३५ ॥
भर्जनं भवबीजानामर्जनं सुखसंपदाम् ।
तर्जनं यमदूतानां रामरामेति गर्जनम् ॥ ३६ ॥
रामो राजमणिः सदा विजयते रामं रमेशं भजे ।
रामेणाभिहता निशाचरचमू रामाय तस्मै नमः ॥
रामान्नास्ति परायणं परतरं रामस्य दासोऽस्म्यहं ।
रामे चित्तलयः सदा भवतु मे भो राम मामुद्धर ॥ ३७ ॥
राम रामेति रामेति रमे रामे मनोरमे ।
सहस्रनाम तत्तुल्यं रामनाम वरानने ॥ ३८ ॥

इति श्रीबुधकौशिकविरचितं श्रीरामरक्षास्तोत्रं संपूर्णम् ॥
श्रीसीतारामचन्द्रार्पणमस्तु ।

# श्रीरामाचे सुंदर ध्यानश्लोक, भूपाळ्या, काकडआरति वगैरे

## (ध्यानश्लोक)

नमोऽस्तु रामाय सशक्तिकाय,
नीलोत्पलश्यामलकोमलाय ।
किरीटहारांगदभूषणाय,
सिंहासनस्थाय, महाप्रभाय ॥ १ ॥

रामाय रामभद्राय, रामचंद्राय वेधसे
रघुनाथाय नाथाय, सीतायाः पतये नमः ॥ २ ॥

दक्षिणे लक्ष्मणो यस्य, वामे तु जनकात्मजा ।
पुरतो मारुतिर्यस्य, तं वन्दे रघुनंदनम् ॥ ३ ॥

आपदामपहर्तारं, दातारं सर्वसंपदाम् ।
लोकाभिरामं श्रीरामं, भूयो भूयो नमाम्यहम् ॥ ४ ॥

(हा मंत्रमय श्लोक आहे. याचा जप संकटाच्या वेळीं केला असतां संकट दूर होतें. प्रवासास निघतेवेळीं म्हटला असतां प्रवास निर्विघ्न व सुखकारक होतो, असें स्वानुभवी संतांचें सांगणें आहे.)

## (मारुतिरायाचे ध्यानश्लोक)

मनोजवं मारुततुल्यवेगं, जितेंद्रियं बुद्धिमतां वरिष्ठम् ।
वातात्मजं वानरयूथमुख्यं, श्रीरामदूतं शरणं प्रपद्ये ॥ १ ॥

बुद्धिर्बलं यशो धैर्यं, निर्भयत्वं अरोगिता ।
अजाड्यं वाक्पटुत्वं च, हनुमत्स्मरणाद्भवेत् ॥ २ ॥

## (श्रीरामध्यानाचा अभंग)

रत्नजडित सिंहासन । वरी शोभे रघुनंदन ॥ १ ॥
वामांकीं ते सीताबाई । जगज्जननी माझी आई ॥ २ ॥
सव्यभागीं लक्ष्मण । पुढें अंजनीनंदन ॥ ३ ॥
भरत शत्रुघन भाई । चवरें ढाळिति दोन्ही बाहीं ॥ ४ ॥
नळ नीळ जांबुवंत । अंगद सुग्रिव बिभिषण भक्त ॥ ५ ॥
देहबुद्धी नेणों काई । दास अंकित रामापायीं ॥ ६ ॥

## (पद)

रामा हो जय रामा हो । पतितपावन पूर्णकामा हो ॥ १ ॥
नाथा हो दिननाथा हो । तुमचे चरणीं राहो माथा हो ॥ २ ॥
बंधू हो दिनबंधू हो । रामदास म्हणे कृपासिंधू हो ॥ ३ ॥

## (अभंग)

गोविंदा रामा । जयजय गोपाळा रामा ॥ १ ॥
यादवा रामा । जयजय माधवा रामा ॥ २ ॥
सुल्भा रामा । जयजय दुर्ल्भा रामा ॥ ३ ॥
एक तूं रामा । जयजय अनेक तूं रामा ॥ ४ ॥
एका जनार्दनीं रामा । जयजय विठ्ठला रामा ॥ ५ ॥

## (श्रीरामाची भूपाळी)

उठोनियां प्रातःकाळीं । जपा रामनामावळी ॥
स्वयें ध्यातो चंद्रमौळी । शैलबाळीसमवेत ॥ १ ॥
राम योग्यांचें मंडण । राम भक्तांचें भूषण ।
राम धर्माचें रक्षण । संरक्षण दासाचें ॥ २ ॥
रामें ताटिका मारिली । रामें शिळा उद्धरिली ।
रामें जानकी पर्णिली । गणिका केली ते मुक्त ॥ ३ ॥

रामें पाषाण तारिले। रामें दैत्य संहारिले।
रामें बंदी सोडविले। मुक्त केले सुरवर ॥ ४ ॥
रामें रक्षिलें भक्तांसी। रामें सोडविलें देवांसी।
राम दासाचे मानसीं। रामदासीं आनंद ॥ ५ ॥

## (श्रीमारुतीची भूपाळी)

उठा प्रातःकाळ झाला। मारुतिला पाहूं चला ॥
ज्याचा प्रताप आगळा। विरंचिही नेणती ॥ १ ॥
आमुचा हनुमंत साह्यकारी। तेथें विघ्न काय करी ॥
दृढ धरा हो अंतरीं। तो पावेल त्वरीत ॥ २ ॥
आमुचा निर्वाणींचा गडी। तोचि पावेल सांकडीं।
त्याचे भजनाची आवडी। दृढ बुद्धी धरावी ॥ ३ ॥
थोर महिमा जयाची। कीर्ती वर्णावी तयाची ॥
रामीं रामदासाची। निकट भक्ती करावी ॥ ४ ॥

## (गजर)

राम-लक्ष्मण-जानकी ॥ जय बोलो हनुमानकी ॥ ४ ॥

## (कांकड आरति)

कांकडे-आरति, परमात्मया श्रीरघुपति। पर०।
जीवीं जीवा ओवाळीन, निजीं निजात्मज्योती ॥ ध्रु० ॥
त्रिगुण कांकडा, द्वैतघृतें तिंबीयला।
उजळली आत्मज्योति, तेणें प्रकाश फांकला ॥ १ ॥
काजळी ना मैस, अवघें तेज डळमळ।
अवनी ना अंबर, अवघें निघोट निश्चळ ॥ २ ॥
उदय ना अस्त, जेथें बोध प्रातःकाळीं।
रामीं रामदास, सहजीं सहज ओंवाळी ॥ कांकडे० ॥ ३ ॥

## (धांवा)

धांव रे रामराया। किती अंत पाहसी ॥ धांव रे० ॥ ध्रु० ॥ प्राणान्त मांडियेला। नये करुणा कैसी ॥ पाहीन धणीभरी ॥ चरण झाडिन मी केशीं ॥ नयन शिणले बा। आतां केधवां येशी ॥ धांव रे० ॥ १ ॥ मीपण अहंकारें। अंगीं भरिला ताठा ॥ विषयकर्दमांत। लाज नाहीं लोळतां ॥ चिळस उपजेना। ऐसें झालें बा आतां ॥ धांव रे० ॥ २ ॥ मारुतीस्कंधभागी। शीघ्र बैसोनि यावें ॥ राघवें वैद्यराजें। कृपाऔषध द्यावें ॥ दयेचे पद्महस्त। माझे शिरीं ठेवावे ॥ धांव रे० ॥ ३ ॥ या भवीं रामदास। थोर पावतो व्यथा ॥ कौतुक पाहतोसी। काय जानकीक॰ ना ॥ दयाळा दीनबंधो। भक्तवत्सला ताता ॥ धांव रे० ॥ ४ ॥

## (मानसपूजा-नैवेद्याचें पद)

जेवितसे भक्तराज। शोभे पदनत समाज। जगज्जननी धरुनी लाज। वाढी रघुराया ॥ ध्रु० ॥ बंधु सुकुमार तीन। दिसती याहुनी अभिन्न। व्यापक कां परिच्छिन्न। हे सुजाण माया ॥ जेवितसे० ॥ १ ॥ कौसल्या मोदभरित पाहे रघुवर अनंत। स्तविति भाट निगम भक्त। नम्र करूनि काया ॥ जेवितसे० ॥ २ ॥ पाट ताट रस अमोल। भोजन करी विश्वपाल। बालकांसी दे प्रसाद। धन्य जगीं कराया ॥ ३ ॥

## (आरति श्रीरामाची)

नाना देहीं देव एक विराजे। नाना नाटक लीला सुंदर रुप साजे ॥ नाना तीर्थीं क्षेत्रीं अभिनव गति माजे। अगाध महिमा पिंडब्रह्मांडीं गाजे ॥ १ ॥ जयदेव जयदेव आत्मयारामा। निगमागम शोधितां नकळे गुणसीमा ॥ जयदेव जयदेव ॥ ध्रु० ॥ बहुरूपी बहुगुणी बहुता काळाचा। हरिहर ब्रह्मादिक देव सकळांचा ॥ युगानयुगीं आत्माराम आमुचा। दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥ जयदेव जयदेव० ॥ २ ॥

## (आरती श्रीहनुमंताची)

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं। करि डळमळ भूमंडळ सिंधूजळ गगनीं॥ कडाडिले ब्रह्मांड धाके त्रिभुवनीं। सुरवर नर निशाचर त्यां झाल्या पळणी॥ १॥ जयदेव जयदेव जयजय हनुमंता। तुमचेनि प्रसादें न भियें कृतांता॥ ध्रु०॥ दुमदुमिलें पाताळ उठिला पडशब्द। धगधगिला धरणीधर मानिला खेद॥ कडाडिले पर्वत उडुगण उच्छेद। रामीरामदासा शक्तीचा शोध॥ जयदेव जयदेव०॥ २॥

## (अभंग - मारुतीच्या नाममाहात्म्याचा)

नांव मारुतीचें घ्यावें। पुढें पाऊल टाकावें॥ १॥ अवघा मुहूर्त शकुन। हृदयीं मारुतीचे ध्यान॥ २॥ जिकडे तिकडे जाती भक्त। पाठीं जाय हनुमंत॥ ३॥ राम उपासना करी। मारुति नांदे त्यांचे घरीं॥ ४॥ दास म्हणे ऐसें करा। सदा मारुती हृदयीं धरा॥ ५॥

मुख्यप्राणासी पूजिलें। राम-दर्शन घडलें॥ १॥
तुम्ही पहा हो मारुती। रामभक्तांचा सारथी॥ २॥
देव अंजनीनंदन। रामदासीं केलें ध्यान॥ ३॥

## श्रीरामाकडे करुणेची सर्वांगसुंदर प्रार्थना :

[१]कोमल वाचा दे रे राम। विमल करणी दे रे राम॥ १॥ प्रसंग वोळखी दे रे राम। धूर्त कळा मज दे रे राम॥ २॥ स्वहीतकारक दे रे राम। जनसुखकारक दे रे राम॥ ३॥ अंतरपारखि दे रे राम। बहुजन मैत्री दे रे राम॥ ४॥ विद्यावैभव दे रे राम। उदासीनता दे रे राम॥ ५॥ मागों नेणें तें दे रे राम। मज नकळे तें दे रे राम॥ ६॥ तुझी आवडी दे रे राम। दास म्हणे मज दे रे राम॥ ७॥ जय जय रघुवीर समर्थ॥

[२]संगीत गायन दे रे राम। आलाप गोडी दे रे राम॥ १॥ धातमात मज दे रे राम। अनेक धाटी दे रे राम॥ २॥ रसाळ मुद्रा दे रे राम। जाड कथा मज दे रे राम॥ ३॥ हस्तक टाळी दे रे राम। नृत्यकला मज दे रे राम॥ ४॥ प्रबंध सरळी दे रे राम। शब्द मनोहर दे रे राम॥ ५॥ सावधपण मज दे रे राम। बहुत पाठांतर दे रे राम॥ ६॥ उत्तम गुण मज दे रे राम। दास म्हणे मज दे रे राम॥ ७॥ जय जय रघुवीर समर्थ॥

[३]पावन भिक्षा दे रे राम। दीन दयाळा दे रे राम॥ १॥ अभेद भक्ती दे रे राम। आत्मनिवेदन दे रे राम॥ २॥ तद्रूपता मज दे रे राम। अर्थारोहण दे रे राम॥ ३॥ सज्जनसंगति दे रे राम। अलिप्तपण मज दे रे राम॥ ४॥ ब्रह्म अनुभव दे रे राम। अनन्य सेवा दे रे राम॥ ५॥ मजविण तूं मज दे रे राम। दास म्हणे मज दे रे राम॥ ६॥ जय जय रघुवीर समर्थ॥

## (श्लोक)

श्रीरामा पुरुषोत्तमा नरहरे, नारायणा केशवा।
गोविंदा गरुडध्वजा गुणनिधे, दामोदरा माधवा॥
श्रीकृष्णा कमलापते यदुपते, सीतापते श्रीपते।
वैकुंठाधिपते, चराचरपते, लक्ष्मीपते पाहि माम्॥

## (भजन)

रामा रामा रामा रामा रघूनंदना। रामा रघू०॥ रामा रामा रामा रामा कुळभूषणा॥ १॥ रामा रामा रामा रामा जानकीपते। रामा जानकीपते॥ रामा रामा रामा रामा विमलपते॥ २॥ रामा रामा रामा रामा दीनवत्सला। रामा भक्तवत्सला॥ रामदास म्हणे तूझी अगम्य लीला॥ ३॥ रामा रामा रामा रामा, रामा हो। जय रामा हो॥ तारीं तारीं तारीं तारीं, आम्हां हो॥ ४॥ तोडीं तोडीं तोडीं तोडीं, भवपाश देवा भवपाश॥ अनन्य शरण रामीं रामदास॥ ५॥ जयजय रघुवीर समर्थ॥

## (गजर)

रघुपतिराघव राजाराम। पतीतपावन सीताराम॥
नारायण विधि वशिष्ठ राम। रामदास कल्याण धाम॥

## हृदयस्थ श्रीराम व मारुति ह्यांचें अध्यात्मस्वरूप दर्शविणारीं गुरुखुणेचीं पदें

### (सवडीप्रमाणें म्हणणेचीं)

प्रभु अखंडसुखमय रामचि हा । देह-मीपण सांडुनि उलट पहा ॥ प्रभु अखंड० ॥ ध्रु० ॥ दिसतो जो तुज दृश्य-पसारा । मिथ्या मृगजळ जाण । होशिल सुजाण । वधुनि शत्रूंसि सहा ॥ प्रभु अखंड सुखमय० ॥ १ ॥ अंतर्दृष्टी करुनि निरीक्षीं । खेळे ज्यावरि प्राण । लक्ष्यिं त्या आण । न कल्पित उगिच रहा ॥ प्रभु० ॥ २ ॥ राम-विष्णु-कृष्ण-जगन्नाथ- । स्मरणें कर कल्याण । सख्या तुझि आण । ज्यासि प्रिय भक्त महा ॥ प्रभु० ॥ ३ ॥

(२)

तो राम पाहूं सन्मती । श्रीगुरुप्रसादें ॥ तो राम० ॥ ध्रु० ॥ सहज-सिंहासनीं, आपण विराजे । सन्मूख नाचे मारुती ॥ श्रीगुरु प्रसादें ॥ तो राम पाहूं० ॥ १ ॥ हळू हळू नाचुनी, चैतन्य-रामातें । आलिंगि अद्वय स्थितीं ॥ श्रीगुरु० । तो राम० ॥ २ ॥ देव-भक्त नामें, हरपूनि जेथें । मुकावल्या वेदश्रुति ॥ श्रीगुरु० । तो राम पाहूं ॥ ३ ॥ राम विष्णु कृष्ण-जगन्नाथ अंगें । हें मंदभाग्य नेणती ॥ श्रीगुरुप्रसादें । तो राम पाहूं० ॥ ४ ॥

### नामस्मरणाचें रहस्यदर्शक पद

जप तूं रामनाम किती । मधुर मधुर मधुर मधुर ॥ ध्रु० ॥ रामनाम ध्वनि उमटे । लक्ष्य लावि तेथें नेटें ॥ ब्रह्मानंद सहज भेटे । प्रचुर प्रचुर प्रचुर ॥ जप तूं राम० ॥ १ ॥ दृश्य देखतांचि दिठीं । देइं द्रष्ट्यासि मिठी ॥ आपुलें आपण सौख्य घोटीं । न दूर न दूर न दूर दूर ॥ जप तूं रामनाम० ॥ २ ॥ राम विष्णु कृष्ण ध्यान । त्यासि दे मुकुंद ज्ञान ॥ जेणें होय समाधान । चतुर चतुर चतुर चतुर ॥ जप तूं रामनाम० ॥ ३ ॥

### (गजर)

राम रघूत्तम सीतानायक । दशरथनंदन चित्सुखदायक ॥

### (श्रीशंकराच्या ध्यानाचा अभंग)

ढवळे भोळे चक्रवर्ती । ढवळे अळंकार शोभती ॥ ढवळे धाम उमापती । सदा चित्तीं चिंतावा ॥ १ ॥ ढवळ्या जटा गंगाजळ । ढवळा मयंक निर्मळ ॥ ढवळे कुंडलाचे लोळ । शंखपाळे लोंबती ॥ २ ॥ ढवळी स्फटिकाची माळ । ढवळे गळां उलथे व्याळ ॥ ढवळे हातीं नर-कपाळ । ढवळा शूळ शोभतो ॥ ३ ॥ ढवळा सर्वांगें आपण । ढवळें विभूति-लेपन ॥ ढवळे गात्र ढवळें वसन । ढवळा वहन नंदी तो ॥ ४ ॥ ढवळें कैलास भुवन । ढवळें मध्यें सिंहासन ॥ ढवळें शंकराचें ध्यान । दास चिंतन करीतसे ॥ ५ ॥ (ढवळे म्हणजे गोरे, पांढऱ्या रंगाचे)

### (गजर)

शिव हर शंकर गौरीश । वन्दे गंगाधरमीशं ॥ शिव शिव शिव शिव सांबसदाशिव । हर हर हर हर सांबसदाशिव ॥ जय शिवशंकर उमामाधवा । पतितपावन सदाशिवा ॥

### (श्रीदेवीच्या ध्यानाचा अभंग)

सदा आनंदभरित । रंगसाहित्य संगीत ॥ १ ॥ जगन्माता जगदीश्वरी । जगज्ज्योती जगदोद्धारी ॥ २ ॥ जिच्या वैभवाचे लोक । हरिहरब्रह्मादिक ॥ ३ ॥ त्रिभुवनींच्या वनिता । बाळ तारुण्य समस्तां ॥ ४ ॥ वसे आकाशीं पाताळीं । सर्व काळीं तिहीं तालीं ॥ ५ ॥ सर्व देहा हालविते । चालविते बोलविते ॥ ६ ॥ योगी मुनी जन ध्यानीं । सर्व लागले चिंतनीं ॥ ७ ॥ मूळ माया विस्तारली । सिद्ध साधकाची बोली ॥ ८ ॥ सतरावी जीवनकळा । सर्व जीवांचा जिव्हाळा ॥ ९ ॥

Astro • Puja • Vastu

# FALIT JYOTISH AND VASTU SHASTRA CONSULTANT

## FOR ALL DHARMIK POOJA'S

SHRI GANESH PUJA

SHRI SATYANARAYAN PUJA

VASTU SHANTI

WEDDING | SAKHARPUDA | MUNJ

JANANA SHANTI | RUDRABHISHEK

SAPTASHATI PATH | HAVAN | ETC.

## HARI OM DHARMIK PUJA VIDHI KENDRA

**SANPADA OFFICE**
Office No. 8, 1st Floor, Shiva Triveni Galleria CHS., Plot No. 13, Sector 8, Sanpada, Navi Mumbai - 400705.

**GOVANDI OFFICE**
Shri Swaybhu Hanuman Mandir, Deonar Mahanagarpalika Vasahat, Govandi, Mumbai - 400043.

hariom astrologers | hariom astrologers | hariom_astrologers

hariomastrologers@gmail.com | www.hariomastrologers.com